# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—०२ /१२/२०१५

## दि.२/१२/२०१५ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त

८

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा बुधवार दिनांक ०२/१२/२०१५ रोजी सायं. ४.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यात आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्रीमती. जया प्रकाश माखिजा | सभापती |
| २ | श्रीमती. राजश्री राजेंद्र चौधरी | सदस्या |
| ३ | श्रीमती शंकुतला जीवनलाल जग्यासी | सदस्या |
| ४ | डॉ. महेश गजानन गावडे | सदस्य |
| ५ | श्री. भगवान शंकर भालेराव | सदस्य |
| ६ | श्रीमती. मिनु राज दासानी | सदस्या |
| ७ | श्री.राजेश नानीकराम वदारिया | सदस्य |
| ८ | श्रीमती लिलाबाई आशान | सदस्या |
| ९ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर | सदस्य |
| १० | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे | सदस्य |
| ११ | श्री. जमनादास पुरस्वानी | सदस्य |
| १२ | श्रीमती अंजली साळवे | सदस्या |
| १३ | श्रीमती आशा इदनानी | सदस्या |
| १४ | श्री. गुरूनो भिकोमल वलेचा | सदस्य |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्रीम. इसरद सऊद खान २. श्री. उमेश सुरेश कालानी

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. श्रीधर पाटणकर, अति.आयुक्त
२. श्रीम. प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
३. श्री. जमीर लेंगरेकर ,उप–आयुक्त
४. श्री. सुखदेव बलमे, मुख्य लेखा परिक्षक
५. श्री. गणेश शिंपी, प्र.सहा. आयुक्त (मालमत्ता)
६. श्री. हनुमंत खरात, प्र. कार्यकारी अभियंता (विदयुत)
७. श्री. बाळू नेटके, प्र. सुरक्षा अधिकारी

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.

१. श्रीमती विशाखा सावंत

२. श्रीमती नर्गिस खान

३. श्री. मनिष भोवते

श्री. श्रीधर पाटणकर, अति.आयुक्त हे आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ होते.

दुपारी ४.०० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

**प्र. महापालिका सचिव :–** विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. १ :–** मागील सभेचे दिनांक ०३/९/२०१५ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

**सदस्या, श्रीमती. अंजली साळवे :–** आपण जो रस्त्याचा प्रस्ताव पास केला होता त्यानुसार आता पर्यंत आमच्या प्रभागातील रस्त्यावरील खडडे भरलेले नाही. आमच्या प्रभागातील खड्डे अदयाप भरलेले नाहीत, अर्धा रस्ता काम करतांना सोडुन दिला आहे याबाबत मी मागील सभेच्यावेळी मी आपणांस सांगितले होते.

**सदस्य श्री. राजेश वधारीया :–** मागील सभेत आपण आश्वासन दिले होते की नेहरु चौक ते फॉलवर लाईन चौक बीएमएसी केला जाईल परंतु अदयाप तो केलेला नाही, मी मागील सभेत म्हटले होते की, नेहरु चौक ते फॉलवर लाईन असा रस्ता करण्यात आला आहे परंतु तसे न करता फॉलवर लाईन वरुन नेहरु चौक ते पुढे असे करण्यात यावे व बीएमएसी करावा. परंतु ते काम अदयाप झालेले नाही. सार्वजनिक बांधकाम विभागाचे उत्तर देण्यासाठी कोणी अधिकारी नाही, आपण आता इतिवृत्त पारीत करु नये, इतिवृत्ताचा विषय नंतर घ्या.

**सदस्या, श्रीमती. अंजली साळवे :–** जे काम पुर्ण केले नाही ते किती दिवसात पुर्ण करणार आहे. मी सार्वजनिक बांधकाम विभागातील अभियंता यांना सांगितले आहे, मी पंधरा दिवसांपासुन त्यांना सांगत आहे परंतु काम अदयाप चालु केले नाही.

**सभापती, श्रीमती जया माखिजा:–**आता इतिवृत्ताचा विषय चालु आहे.?

**सदस्य श्री. राजेश वधारिया :–**आपले म्हणणे बरोबर आहे, हे सर्वांनाच माहित आहे, इतिवृत्तावर बोलायचे आहे.

**प्र. महापालिका सचिव :–**मा. सभापती महोदयांनी इतिवृत्त पास करण्यास सांगितले आहे, चर्चा नंतर करु.

**सदस्य श्री. राजेश वधारीया** :– सभा सुरू होवुन १५ मिनिटे झाली. सावजनिक बांधकाम विभागाचे कोणीही अधिकारी उपलब्ध नाहीत. त्यामुळे विषय क्रमांक १ मंजुर करू नये, विषय क्रमांक २ घ्यावा

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर** :– आपण मागील सभेत पारीत झालेल्या विषयांवर चर्चा करू शकतो का?

सदस्य श्री. राजेश वधारीया :– आपण नंतर चर्चा करू शकतो मा. महासभेमध्ये चर्चा होत असते.

सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :– आधी इतिवृत्तावर चर्चा करू.

प्र. महापालिका सचिव :– सदरहु विषय पारीत करण्यात यावे का?

काही सदस्य :–पास–पास……

सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा :– मागील सभेचे दिनांक ३/९/२०१५ रोजीचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे. 👍

---

☑

**विषय क्र. १** :– मागील सभेचे दिनांक ३/९/२०१५ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नांव : श्री. सुनिल सुर्वे

अनुमोदकाचे नांव : श्री. जमनादास पुरस्वानी

स्थायी समिती ठराव क्र. :– ५१ अ                    दिनांक : २/१२/२०१५

ही स्थायी समिती महापालिका सचिवांनी प्रस्तुत केलेले दिनांक ३/९/२०१५ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते ४१ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

प्र.महापालिका सचिव :– विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. २** :– उल्हासनगर महानगरपालिकेच्या अंतर्गत असलेले २८ द.ल.ली. क्षमतेचे मलप्रक्रिया केंद्र व २२/४३३ व्होल्ट विद्युत उपकेंद्रासह चालविणे, देखभाल व दुरुस्ती कामी न्युनत्तम दराचे निविदाकार मे. कल्पतरु इंजिनिअर्स, बदलापूर यांची निविदा स्विकृत करुन कार्यादेश देण्यास मंजुरी देणे.

---

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :– ठरावात मे. कल्पतरु इंजिनिअर्स ऐवजी कल्पतरु इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रक्टरर्स प्रा. लि. अशी दुरुस्ती करण्यांत यावी.?

काही सदस्य :—पास—पास......

सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा :— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. २ :—** उल्हासनगर महानगरपालिकेच्या अंतर्गत असलेले २८ द.ल.ली. क्षमतेचे मलप्रक्रिया केंद्र व २२/४३३ व्होल्ट विद्युत उपकेंद्रासह चालविणे, देखभाल व दुरुस्ती कामी न्युनत्तम दराचे निविदाकार मे. कल्पतरु इंजिनिअर्स, बदलापूर यांची निविदा स्विकृत करुन कार्यादेश देण्यास मंजुरी देणे.

प्रस्तावना

विषयांकित कामाच्या निविदा सन २०१५—१६ साठी ई—निविदा मागविण्याचे असल्याने, मागील मंजुर केलेल्या अंदाजपत्रकानुसार सन २०१५—१६ साठी १२ महिन्याच्या कालावधी करीता रु.३३,८५,९२४/— इतक्या रकमेचे अंदाजत्रक तयार केले आहेत. सदर अंदाजपत्रकात पंपचालक, मदतनिस, जोडारी, विजतंत्री, माळी, सुरक्षा रक्षक यांची तरतुद केलेली आहे. तसेच दळण—वळणाच्या व्यवस्था, विद्युत उप केंद्राची देखभाल दुरुस्ती, मोटार दुरुस्तीसाठीचे दर बाजार भावाप्रमाणे घेण्यात आलेले आहेत. विषयांकित कामाच्या ई—निविदा वरील संदर्भिय ०१ व ०२ अन्वये मागविण्यात आल्या होत्या. परंतु योग्य तो प्रतिसाद न मिळाल्याने, विषयांकित कामाच्या निविदा संदर्भिय ०३ अन्वये तिसऱ्यांदा ई—निविदा पध्दतीने मागविण्यात आल्या होत्या. सदर ई—निविदेचा लिफाफा क्र.०१ दिनांक ०२/०७/२०१५ रोजी उघडण्यात आले. त्यात खालील प्रमाणे निविदाकाराने सदर निविदा सादर केल्या आहेत.

१) मे. अंकुश इंटरप्रायजेस, नवी मुंबई.

२) मे. कल्पतरु इंजिनिअर्स, बदलापुर.

सदर कामाच्या ई—निविदा उघडतांना मे. अंकुश इंटरप्रायजेस, नवी मुंबई यांचे कागदपत्रे निविदेच्या अटी व शर्तीनुसार तांत्रिक दृष्टया योग्य वाटत नाहीत. त्यामुळे सदर निविदाकार यांचा लिफाफा क्र.०२ (कमर्शिअल बीड) उघडता येणे शक्य नाही. तसेच मे. कल्पतरु इंजिनिअर्स, बदलापुर यांचे कागदपत्रे तांत्रिक दृष्टया योग्य आहेत. (सोबत तुलनात्मक तक्ता सादर करण्यात येत आहे.) त्यामुळे सदर निविदाकार यांचा लिफाफा क्र.०२ उघडण्यासाठी निविदा समितीपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आले होते. त्या अन्वये सदर कामाचा ई—निविदेचा लिफाफा क्र.०२ उघडण्यासाठी मा. अतिरीक्त आयुक्त सो., यांच्याकडून दिनांक २३/०७/२०१५ रोजी मान्यता घेण्यात आली होती.

सदर बाब निविदा समितीपुढे ठेवून व मंजुर टिप्पणी अन्वये मे.कल्पतरु इंजिनिअर्स, बदलापुर यांचा ई—निविदेचा लिफाफा क्र.०२ उघडण्यात आला व त्यात खालील प्रमाणे दर नमुद करण्यात आलेले आहेत.

| अ.क्र | ठेकेदारांचे नाव | प्राकलनीय किंमत | सादर केलेला दर | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | मे.कल्पतरु इंजिनिअर्स, बदलापुर. | ३३,८५,९२४/— | २.१० % टक्के कमी दराने | ३३,१४,८१९.६ |

उपरोक्त तक्त्यामध्ये मे. कल्पतरु इंजिनिअर्स, बदलापुर यांचे न्युनतम निविदेचे दर अंदाजित किंमतीच्या २.१० : टक्के कमी असल्याने त्यांची एकुण किंमत रु.३३,१४,८१९.६ एवढी होते. तरी सदर ई—निविदेचा न्युनतम देकार मे. कल्पतरु इंजिनिअर्स, बदलापुर यांची निविदा स्विकुत करून त्यांच्याशी करारनामा करून कार्यादेश देण्यासाठी प्रस्ताव मा. स्थायी समितीपुढे निर्णयास्तव सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ५२ दिनांक:— २/१२/२०१५

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वधारीया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिकेच्या अंतर्गत असलेले २८ द.ल.ली. क्षमतेचे मलप्रक्रिया केंद्र व २२/४३३ व्होल्ट विद्युत उपकेंद्रासह चालविणे, देखभाल व दुरुस्ती करणे कामी न्युनत्तम दराचे

निविदाकार मे. कल्पतरु इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रक्टर्स प्रा.लि. यांची निविदा स्विकृत करुन कार्यादेश देण्यास मंजुरी देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

प्र.महापालिका सचिव :— विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. ३** :— श्री. प्रकाश के. माखिजा, शॉप नं. ५५१, उल्हासनगर—४, नळ ग्राहक क्र. यु/४/३८०७ सन १९९१ पासुन पाणी पुरवठा खंडीत असल्याने पाणी देयके निर्लेखित करणे.

---

सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— हा विषय कोणी दिला आहे. हे प्रकरण कधीचे आहे. या विषयाबाबत जरा सांगावे काय आहे ते.

श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा :— सदरचे प्रकरण ८/८/२०१४ पासुनचे आहे. अशी प्रकरणे यापुर्वीही आली आहेत. श्री. प्रकाश के. माखीजा, शॉप नं.५५१, उल्हासनगर—४ यांनी त्यांची नळजोडणी सन १९९१ मध्ये खंडीत केली असल्याने नळजोडणीस आकारण्यात आलेली पाणी देयकाची रक्कम निर्लेखित करायची आहे. पाणी पुरवठा दिनांक ८/८/२०१४ पासुन चालु आहे.

सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— आमच्या प्रभागातील ही अशी अनेक प्रकरणे आहेत ती व्यक्ती अनेक वर्षापासुन फे—याा मारत आहेत. आपण अशी सर्व प्रकरणे एकत्र का नाही आणत आपल्याला महाराष्ट्र जिवण प्राधिकरण कडुन आपणाला पत्र आले आहे. त्यांचा २००९ ला सर्वे झाला असुन आपण सदर प्रकरणामध्ये कसे काय म्हणता की हे प्रकरणामध्ये १९९१ पासुन पाणी खंडीत आहे . महाराष्ट्र जीवन प्राधिकरणने कोणत्या आधारावर त्याना पत्र दिले.

सदस्य डॉ. महेश गावडे :—जेव्हा पाणी येत नाही तेव्हा आम्ही माणसे पाठवितो तर तुमचे लोक सांगतात की एमजेपीमधुनच पाण्याचा पुरवठा बरोबर होत नाही.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—काय केले ते सांगा, यामध्ये तर सेटिंग केल्याची दुर्गंधी येत आहे.

सदस्य श्री. महेश गावडे :—असे विषय सर्व सोबत आणावे.

श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा :— अर्जदाराने वारंवार पत्रव्यवहार केला आहे त्या आधारावर दिले असावे.

सदस्य श्री. राजेश वधारिया :—याबाबत काही विचारले तर तुम्ही सांगु शकणार नाहीत. १९९१ पासुन पाणी पुरवठा खंडीत आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्राधिकरणाच्या दि. ०६/०१/२००९ च्या पत्रान्वये १९९१

पासुन नळ जोडणी बंद असल्याने नाहरकत दाखला दिला होता, २००९ मध्ये सर्व्हे झालेला नाही, जरा त्याची तपासणी करा.

<u>श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा :—</u> १९९४ मध्ये महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाने हॅण्डओव्हर केले होते.

<u>सदस्य श्री. राजेश वधारिया :—</u>२००९ मध्ये महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाने कोणता आदेश दिला होता? ८ लाखाचे काम आहे, कमी नाही. २०१४ पासुन आतापर्यंत पाहिले तर १ लाख रुपयाचा वेस्टेज आहे. आजच्या तारखेपर्यंत गणित बरोबर जुळत नाही. आजच्या तारखेस त्याचे पाण्याचे बिल किती होते?

<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u> २०१४ पर्यंत ८ लाख बिल आहे ते, आता १० लाख पर्यंत असेल आज पर्यंत त्यानी काय पत्र व्यवहार केला आहे.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>याबाबत २००९ पासुन पत्रव्यवहार केला जात आहे.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>२००९ मध्ये एक सुध्दा पत्रव्यवहार झालेला दिसत नाही. या पत्राची पडताळणी केली तर ते बोगस असेल, वरचे ४ लाख रुपये कोण भरेल? २००९ चे पत्र दाखवा त्याचे २००९ मध्ये एकही पत्र नाही आपण त्याना ८ लाख माफ कराल व उर्वरीत बिल कोण भरणार

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>गोषवा—यामध्ये स्पष्ट लिहिले आहे, पत्रव्यवहार झाला आहे. यास पारीत करा, दुसरे सुध्दा विषय आहेत.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>स्थायी समितीचा काय रोल आहे? महासभेत आणावे.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>महासभेचा ठराव पहा काय आहे ते.

<u>सदस्य, डॉ. महेश गावडे :—</u> अशा प्रकरणामध्ये महासभेमध्ये ठराव केला आहे. त्यानुसार आपण अशी प्रकरणे स्थायी समितीमध्ये का आणता?

<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर</u> :— आपण आशा प्रकारची प्रकरणे एकत्र आणावीत.

<u>प्र.महापालिका सचिव :—</u> विषय वगळायचा का कसे?

<u>सदस्य श्री. राजेश वधारिया :—</u>असे काही विषय असतील, प्रलंबित असतील तर ते सर्व विषय सोबत आणावेत. हा विषय वगळण्यांत यावा.

<u>काही सदस्य :—</u>सदरहु विषय वगळण्यात यावा.

<u>सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑

**विषय क्र. ३** :— श्री. प्रकाश के. माखिजा, शॉप नं. ५५१, उल्हासनगर—४, नळ ग्राहक क्र. यु/४/३८०७ सन १९९१ पासुन पाणी पुरवठा खंडीत असल्याने पाणी देयके निर्लेखित करणे.

<u>प्रस्तावना</u>

उपरोक्त विषयान्वये श्री. हरिराम व्दारकादास, शॉप नं.५५१, उल्हासनगर ४ यांचा नळ ग्राहक क्र. यु/४/३८०७ असा असुन त्यांना आजतागायत त्यांना बिगर घरगुती दराने देयके अदा करण्यात येतात.

सद्यस्थितीत नळधारकाकडे पाणी बीलापोटी माहे मार्च–२०१४ पर्यत रु.८,०३,५७८/– (आठ लाख तीन हजार पाचशे अठ्ठयात्तर मात्र) थकबाकी आहे.

अर्जदार श्री. प्रकाश के. माखीजा, यांनी वेळोवेळी सादर केलेल्या पत्राव्दारे श्री. प्रकाश के. माखीजा, शॉप नं.५५१, उल्हासनगर–४ यांनी त्यांची नळजोडणी सन १९९१ मध्ये खंडीत केली असल्याचे नमुद केले असुन याबाबत उप अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रकल्प अंबरनाथ यांचेकडील पत्र क्र. मजीप्रा/प्रउपविअं/१७० दि. ०६/०१/२००९ यांचेकडील पत्रान्वये संबंधीत नळधारकाकडील नळजोडणी सन १९९१ पासुन बंद असल्याबाबत श्री. माखीजा यांना नाहरकत दाखला दिला आहे.

सदर ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी केली असता त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारची नळजोडणी असल्याचे दिसुन आले नाही. यास्तव सदर नळजोडणीस आकारण्यात आलेली पाणी देयकाची रक्कम रु. ८,०३,५७८ /– निर्लेखित करण्याबाबत सदर बाब आर्थिक बाबीशी निगडित असल्याने प्रस्तावास मा. स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक असल्याने, सबब श्री. प्रकाश के. माखीजा, शॉप नं. ५५१, उल्हासनगर ४, नळ ग्राहक क्र.यु/४/३८०७ यांचा सन.१९९१ पासुन पाणी पुरवठा खंडीत असल्याने पाणी देयके निर्लेखित करणेबाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ५२ अ — दिनांक:– २/१२/२०१५

सुचकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेश वधारीया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार श्री. प्रकाश के. माखिजा, शॉप नं. ५५१, उल्हासनगर–४, नळ ग्राहक क्र. यु/४/३८०७ सन १९९१ पासुन पाणी पुरवठा खंडीत असल्याने पाणी देयके रक्कम रुपये ८,०३,५७८/– निर्लेखित करण्याचा प्रस्ताव या कार्यसूचीवरुन वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

प्र. महापालिका सचिव :– विषय क्रमांक. ४ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र.४** :– मनपा कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 53DO011375300 अन्वये नोंद असलेल्या मिळकतीची नोंद रद्द करून वर्ष २००५–२००६ पासुन ते २०१५–२०१६ अखेर थकीत असलेली रक्कम रुपये ५४६४१९+ विलंब शास्तीसह (वसुल न होण्याजोगा कर) निर्लेखित करणेबाबत.

---

श्री. शैलेश दोंदे, प्र. कर निर्धारक व संकलक:– वर्ष २००५–२००६ मध्ये मालमत्ता क्र. 53DO011375300 िर हतभजि हनष्कासित करुन निर्मल रोशनी अपार्टमेंट या नावाची इमारत उभारण्यात आली. त्याअनुषंगाने वर्ष २००५–२००६ मध्ये इमारतीमधील सदनिकाधारकांचे स्वतंत्ररित्या कर आकारणी सुरु केली. वर्ष २००५–२००६ पासुन

मालमत्ता क्र. 53DO011375300 ही नोंद बंद करणे आवश्यक होते. तथापि, अद्यापही सदरील नोंद सुरू आहे. त्यामुळे त्यावरील थकित असलेली रक्कम निर्लेखित करायची आहे.

श्री. श्रीधर पाटणकर, अतिरीक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या जागी प्राधिकृत अधिकारी:– अशी किती प्रकरणे आहेत.

श्री. शैलेश दोंदे, प्र. कर निर्धारक व संकलक :– सदर ठिकाणी बॅरेक होते ते तोडुन त्यावर इमारतीचे बांधकाम केले आहे. त्याची बॅरेक ची कर पावती रदद न होता त्याची इमारतीची ही कर पावती येते आहे. त्याचे बॅरेक ची कर पावती रदद करण्याचे हे प्रकरण आहे.

श्री. श्रीधर पाटणकर, अतिरीक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या जागी प्राधिकृत अधिकारी:– निर्लेखित करायची रक्कम ५४ लाख आहे की ५२ लाख?

श्री. शैलेश दोंदे, प्र. कर निर्धारक व संकलक :– ५४६४१९ + विलंब शास्ती निर्लेखित करायची आहे. यामध्ये बॅरेक होती त्यानंतर तेथे इमारत बांधली, त्या बॅरेकचे बिल बंद व्हायला पाहिजे होते, ते चालु आहे.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे :– ती चुक कोणाची आहे. जुनी टॅक्स पावती रदद करून नंतरच त्याची नविन टॅक्स पावती बनवायला हवी होती.

सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :– ही इमारत २००५–०६ ला झाली आहे. त्याना नगररचना विभागाची मंजुरी केव्हा मिळाली आहे. व ती इमारत केव्हा पुर्ण झाली आहे. यामध्ये जबाबदार कोण?

श्री. शैलेश दोंदे, प्र. कर निर्धारक व संकलक :– २००५–०६ ची अबस्ट्रॅक्ट ची पावती आहे.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–याबाबत काय कार्यवाही करत आहात? वर्ष २००४–२००५ अखेर मालमत्ता कराचा संपुर्ण भरणा करण्यात आला आहे, वर्ष २००५ पर्यंत कुठले पैसे भरले? २ वर्षाचे पैसे का घेतले? एक सर्वसामान्य माणसाला कर पावती इश्यु होत नाही. कोण व्यक्ती आहे? त्याच्यावर काय कारवाई केली? माझी सर्वांना विनंती आहे की हा विषय वगळा. अशा किती इमारती असतील, तुम्ही कशी कर आकारणी करता?

सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :– अबस्ट्रॅक्ट ची पावती नका दाखवु, त्याचा प्लान दाखवा.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे :– जर त्याची इमारीत ०५–०६ ला झाली आहे. तर त्याचे ०४–०५ चे कराचे पैसे का घेतले. त्यावेळेचे निरिक्षक कोण होते. त्यावर कुठल्या अधिका–याने सही केली आहे. माझी सर्व सदस्यांना विनंती आहे की याची रक्कम मोठी आहे. त्यावेळेस च्या अधिका–यांने जुनी कर पावती रदद करून नंतरच नविन टॅक्स पावती काढणे बंधनकारक असताना यावर लेखा परिक्षण विभागाने आक्षेप का नाही घेतला. सदरचे प्रकरण ०५–०६ चे आहे हे प्रकरण १५–१६ ला आणले तेव्हा आपण सर्व सदस्यानी विचार करून त्यावर निर्णय घ्यावा. व त्यावेळेचे जे अधिकारी होते त्यावर कार्यवाही व्हावी असा निर्णय घ्यावा.

मुख्य लेखा परिक्षक, श्री. बलमे :– अशा संचिका आमच्याकडे येत नाहीत.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:– ज्या व्यक्तीने आपल्या जागेवर इमारत उभी केली त्याने जुने बिल रद्द नाही केले. ही बाब २००५ ची आहे, तुम्ही २०१० मध्ये आणला, ही बाब आर्थिक आहे, उदया जर अडचणी निर्माण झाल्या तर? याबाबत संबंधीत अधिका–यावर कारवाई करावी. याबाबत प्रथम खुलासा व्हावा मग निर्णय घ्यावा. असे विषय प्रत्येक वेळी आमच्याकडे येतात, तो अधिकारी चुक करत राहील, हे आर्थिक नुकसान आहे.

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :– अशा प्रकरणामध्ये जर महापालिकेच्या अधिका–यांनी चुकी केली असेल तर त्याचा त्रास त्या व्यक्तीला का दयावा. अनेक मालमत्ताची अशी प्रकरणे आहेत. आता चुक झाली आहे त्यात आर्थिक नुकसान झाले असे नाही म्हणता येणार. मी म्हणतो आता जो विषय आला आहे त्यास पारीत करा. व श्री. दोंदे जर असे आणखीन काही विषय असतील, बॅरेकच्या जागेवर इमारती उभ्या केल्या असतील तर तपासणी करा.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–विना परवानगी इमारती कश्या बांधल्या जातात, हे चुकीचे आहे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>२००४ पर्यंत रक्कम भरणा केली आहे. वर्ष २००५–२००६ पासुन ते २०१५–२०१६ अखेर थकीत असलेली रक्कम रुपये ५४६४१९+ विलंब शास्तीसह (वसुल न होण्याजोगा कर) निर्लेखित करायची आहे.

<u>सदस्य श्री. राजेश वधारिया :–</u>२००५–०६ पासुन त्याची वेगळी कर आकारणी झालेली आहे.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वेः–</u>आम्ही दोषी ठरत असतो, नविन नावाने नविन लोक येतात.

<u>सदस्य श्री. राजेश वधारिया :–</u>जुनी कर आकारणी करुन नविन कर आकारणी सुरु करा. परंतु कर आकारणी करतांना एका माणसाच्या वेगवेगळया मालमत्ता असतील तर, हे फार त्रासाचे आहे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>त्या व्यक्तीस त्रास नाही झाला पाहिजे.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे</u> :– मी माझे मत मांडले आहे. त्यावर आपण विचार करून निर्णय घ्यावा.

यावेळी सदस्या श्रीमती आशा जीवन इदनानी हया सभागृहातुन बाहेर गेल्या. 

<u>सदस्य श्री. राजेश वधारिया :–</u>हा प्रस्ताव पारीत करा, निरिक्षकाने जुनी मालमत्ता रदद करून नवीन मालमत्ता पावती दयायला हवी होती परंतु आपल्या कर्मचा–यामुळे त्याना किती त्रास सहन करावा लागला. कृपया असा ठराव करण्यात यावा की, ०५–०६ च्या वेळेस जे अधिकारी होते त्यावर कार्यवाही करावी.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वेः–</u>सदरचा विषय पुढील सभेत आणा.

<u>सदस्य, महेश गावडे :–</u> सदर जागेचा प्लान पास आहे का?

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे</u> :– ज्या जागेची जुनी पावती होती तेथे इमारत बांधली ना?

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u> जेथे बॅरेक होते तेथेच आहे ना ती इमारत हा विषय आता पारीत करा. थकीत असलेल्या रक्कमेबाबत चौकशी करुन संबंधीत दोषी अधिका–यावर कारवाई करण्यात यावी. सचिव महोदया, ठराव वाचुन दाखवा व ठरावात तसे नमुद करा. व हा ठराव इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करा.

<u>सदस्य श्री. राजेश वधारिया :–</u>होय, इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता प्रस्ताव पारीत करा .

<u>सभापती, श्रीमती जया माखिजा :–</u>ठराव वाचुन दाखवा.

<u>प्र. महापालिका सचिव :–</u> ठराव वाचुन दाखवितात.

<u>काही सदस्य :–</u> पास पास

<u>सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा :–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑

**विषय क्र. ४ :–** मनपा कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 53DO011375300 अन्वये नोंद असलेल्या मिळकतीची नोंद रदद् करून वर्ष २००५–२००६ पासुन ते २०१५–२०१६ अखेर थकीत असलेली रक्कम रुपये ५४६४१९+ विलंब शास्तीसह (वसुल न होण्याजोगा कर) निर्लेखित करणेबाबत

<u>प्रस्तावना</u>

मनपा कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 53DO011375300 अन्वये नोंद असलेल्या मिळकतीकरीता मालमत्ता कर वसुलीच्या प्रयोजनार्थ कर देण्यास प्रथम पात्र व्यक्ती म्हणुन बसोमल डी रूपचंदानी अशी नोंद आहे. वर्ष २००४–२००५ अखेर मालमत्ता कराचा संपुर्ण भरणा करण्यात आला आहे.

वर्ष २००५—२००६ मध्ये संदर्भित मिळकत निष्कासित करून त्यावर निर्मल रोशनी अपार्टमेंट या नावाची इमारत उभारण्यात आली. (तळमजला अधिक तीन मजल्याची इमारत) त्याअनुषंगाने वर्ष २००५—२००६ मध्ये इमारतीमधील सदनिकाधारकांचे नावे मालमत्ता क्र. 53DI013677100, 53DI013677200, 53DI013677300, 53DI013677400, 53DI013676200, 53DI013676300, 53DI013676400, 53DI013676500, 53DI013676600, 53DI013676700, 53DI013676800, 53DI013676900, 53DI013677000 स्वतंत्ररित्या कर आकारणी सुरू आहे.

वास्तविक पाहता वरीलप्रमाणे स्वतंत्ररित्या कर आकारणी केल्यानंतर वर्ष २००५—२००६ पासुन मालमत्ता क्र. 53DO011375300 ही नोंद बंद करणे आवश्यक होते. तथापि, अद्यापही सदरील नोंद सुरू आहे. त्यामुळे सदर मिळकतींचे खात्यात वर्ष २००५—२००६ पासुन ते २०१५—२०१६ अखेर खालीलप्रमाणे मालमत्ता कर व पाणीपट्टी थकीत आहे.

| मालमत्ता कर | पाणीपट्टी | एकुण |
|---|---|---|
| रूपये ५२०६१५ + विलंब शास्ती | २५८०४ | रूपये ५४६४१९ + विलंब शास्ती |

श्री. बच्चुराम रूपचंदानी, ब्लॉक नं. ए ६९९/रूम नं. १३९७, उल्हासनगर—५ यांनी दिनांक २४/११/२०१४ रोजीचे अर्जान्वये मालमत्ता क्र. 53DO011375300 ही मिळकत निष्कासित करून त्यावर निर्मल रोशनी अपार्टमेंट या नावाची इमारत उभारण्यात आल्याने मालमत्ता क्र. 53DO011375300 ही नोंदी रद्द करणेसाठी विनंती अर्ज केला आहे.

उक्त बाबी पाहता कर आकारणी पुस्तकातील मालमत्ता क्र. 53DO011375300 ही नोंद रद्द करून मिळकतीचे खात्यात कर आकारणीपोटी वर्ष २००५—२००६ पासुन ते २०१५—२०१६ अखेर थकीत असलेली रक्कम रू. ५४६४१९ + विलंब शास्ती (वसुल न होण्याजोगा कर) निर्लेखित करणे आवश्यक आहे, असे इकडील मत आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १५२ नुसार आयुक्तास स्थायी समितीच्या मान्यतेने, कोणत्याही कराबद्दल किंवा कोणताही कर वसूल करण्यासाठी झालेल्या खर्चाबद्दल येणे असलेली जी कोणतीही रक्कम त्याच्या मते वसूल होण्याजोगी नसेल ती वेळोवेळी निर्लेखित करता येईल.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता मालमत्ता क्र. 53DO011375300 ही नोंद रद्द करून मिळकतीचे खात्यात कर आकारणीपोटी वर्ष २००५—२००६ पासुन ते २०१५—२०१६ अखेर थकीत असलेली रक्कम रू. ५४६४१९ + विलंब शास्ती (वसुल न होण्याजोगा कर) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १५२ नुसार निर्लेखित करणेसाठी मंजुरीकरीता स्थायी समितीपुढे प्रस्तावित करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र.** ५३ दिनांकः— २/१२/२०१५

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वधारीया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार मनपा कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 53DO011375300 अन्वये नोंद असलेल्या मिळकतीची नोंद रदद् करून वर्ष २००५—२००६ पासुन ते २०१५—२०१६ अखेर थकीत असलेली रक्कम रुपये ५४६४१९+ विलंब शास्तीसह (वसुल न होण्याजोगा कर) निर्लेखित करीत आहे.

तसेच याबाबत थकीत असलेल्या रक्कमेबाबत चौकशी करुन संबंधीत दोषी अधिका—यावर कारवाई करणेस प्रशासनास निर्देश देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>प्र. महापालिका सचिव :—</u> विषय क्रमांक ५ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. ५ :—** ई निविदा क्र. १३५ उल्हासनगर शहराच्या अंतर्गत कॅम्प नं. १ ते ५ मध्ये भुयारी गटार व चेंबर्सचे एस.एल.सी.एम. द्वारे प्रभाग क्र. १,२,३ व ४ करीता साफसफाई करणेसाठी मजुर पुरवठा करणेकामी मे. अे.एम. रामचंदानी, उल्हासनगर यांच्या जादा दराच्या निविदेच्या कामास मान्यता देणे.

---

<u>**सदस्या, श्रीम. अंजली साळवे:—**</u> भुयारी गटारीचे काम करण्यास जेव्हा गाडी येते तेव्हा त्या गाडीवर कधीही पुरेशे कर्मचारी नव्हते व त्याच्याकडे पाईप तसेच इतर सामुग्री नसतात. त्यामुळे आपण दिलेल्या तक्रारीचे निवारण किती दिवसात व्हायला हवे.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>खुलासा करा, किती दिवस लागतात?

<u>**कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा, श्री. सेलवन :—**</u> चोकअपबाबत प्रभाग अधिकारी तक्रार देतात ते नियंत्रण करतात. भुयारी गटार व चेंबर्सचे एस.एल.सी.एम. द्वारे प्रभाग क्र. १,२,३ व ४ करीता साफसफाई करणेसाठी मजुर पुरवठा करणे आवश्यक आहे. आता सध्या आरोग्य विभागामार्फत नाला सफाई होत असते. आमच्या विभागात पुरेशे कर्मचारी नसल्याने आम्ही त्याचे नियंत्रण प्रभागनिहाय दिले आहे. त्यामुळे त्यावर पुर्णनियंत्रण प्रभाग अधिका—याचे असते.

<u>**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—**</u> ती मजुर संस्था किती मजुर पुरविणार आहेत. त्यानां एवढे पैसे का दिले जात आहेत.

<u>**कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा, श्री. सेलवन :—**</u> १२ महिन्यासांठी कर्मचारी पुरविणार आहेत. त्यात त्यांना लागणारे मनुष्यबळ तसेच त्याना लागणारी सुरक्षेच्या दृष्टीने साधन सामग्री ते पुरविणार आहेत. त्यामुळे हे अधिक वाटत आहेत.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>एका माणसाचे किती? किती ठिकाणी एक माणुस देणार व त्यास किती गाडया देणार?

<u>**कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा, श्री. सेलवन :—**</u> एका गाडीवर ५ माणसे असतील. आपण गोषवारा वाचावा, हे काम आवश्यक आहे.

<u>**सदस्या, श्रीम. अंजली साळवे:—**</u> ते फार महत्वाचे आहे कारण बहुतांश वेळा कामगार नसतात.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>हा विषय पारीत करा.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>गोषवारा वाचु तर दया.

<u>**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—**</u> आपण गाडया वाढवायला हव्यात.

<u>सदस्य श्री. राजेश वधारीया</u> :— कारण बहुतांश वेळा असे होते की, आम्ही आपल्या विभागात संपर्क केले असता असे सांगण्यात येते की, गाडी खराब आहे त्यामुळे आपल्याकडे एखादी अधिक गाडी असावी.

<u>सदस्य, भगवान भालेराव:–</u> यावर नियंत्रण कोणाचे राहणार आहे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>हा विषय पारीत करा.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>गोषवारा वाचु तर दया.

<u>सदस्या श्रीमती अंजली साळवे :–</u> जेव्हा गाडी बोलाविली जाते गाडी येवुन सुध्दा काम होत नाही, गटारे भरुन जातात.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>आपणाकडे ४ गाडया आहेत, दुसरीचे प्रपोजल आहे. एक ना एक गाडी प्रभागात जाण्यासाठी तयार असेल.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया:–</u>वाहन विभागाचे कोण आहेत? किती गाडया मागविल्या आहेत.

<u>श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक :–</u>४ गाडया आहेत, एक रिपेरिंगला पाठविली आहे. टेंडर बनवुन ते लोड केले आहे. त्यामुळे १ गाडी मागविणार आहे. त्यामुळे एक गाडी उपलब्ध असेल.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे</u> :– प्रत्येक गाडीवर किती मजुर असतात. श्री. सुंदरम साहेब कोठे आहेत, ते का नाही आले सभेत?

<u>कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा, श्री. सेलवन :–</u> ते मुंबईला गेले आहेत. प्रत्येक गाडीवर ४ मजुर असतात. आमच्याकडे मनुष्यबळ कमी आहे.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे</u> :– हा विषय कोणाचा आहे. सुंदरम का नाही आले. आणि कधीच लेबर पुर्ण नसतात गाडी बंद असतात गाडी आली तरी पाणी मारतात आणि घाण काढत नाही. त्यामुळे पुन्हा दोन दिवसात ते घाण तशीच होते काही वेळेस तर अशी परिस्थिती असते की गाडी आली तरी पाणी नसते नंतर ते पाणी भरण्यास जातात. ते पुर्ण दिवसात एक ते दोन चेंबर्स साफ करतात. आम्हाला एखदया मुकादमा सारखे त्यांच्यावर लक्ष दयावे लागते.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>४–६ महिन्यांपासुन गाडया बंद आहेत.

<u>सदस्य श्री. राजेश वधारिया :–</u>मी दुसरी सुचना देतो.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>आम्ही नगरसेवक मुकादमासारखे उभे राहुन काम करुन घेतो, तुमची माणसे येत नाहीत.

<u>श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा :–</u>एका गाडीवर पाच मजुर आहे. म्हणजेच ४ X ५ = २० मजुर होतात.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>हा विषय पारीत करा. आणि याकामाचे नियंत्रण महापालिकेतुन झाले पाहिजे.

<u>सदस्य श्री. राजेश वधारिया :–</u>होय, याचे सेंट्रलाईज झाले पाहिजे. म्हणजेच सदर कामाचे नियंत्रण हे प्रभाग समितीतुन न करता उल्हासनगर महापालिका मुख्यालयातुन सेंट्रलाईज पध्दतीने करण्यात यावे. म्हणजेच नियंत्रण व्यवस्थित होईल.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>होय सेंट्रलाईज पध्दतीने आदेश काढण्यात यावा.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी</u> :– त्यावर विचार करावा.

<u>सदस्य श्री. राजेश वधारीया</u> :– माझे असे म्हणणे आहे की, भुयारी गटार साफसफाईसाठी चार गाडया ठेवाव्यात व त्यावर आपल्या महापालिकेतून नियंत्रण असावे असे ठरावात घ्या ना. जेणेकरून ज्या प्रभागात गरज असेल तर त्यावेळेस आपल्या येथुन गाडी रवाना करता येऊ शकेल.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी</u> :— भुयारी गटार व चेंबर्स साफसफाईची कामे तक्रार क्रमांकानुसार झाली पाहिजेत.

<u>सदस्य, डॉ. महेश गावडे :—</u> यासाठी वेगवेगळे युनीट तयार करावे लागतील.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे</u> :— सदरचे दर कशापध्दतीने घेतलेले आहेत.

<u>कार्यकारी अभियंता (पा.पू.), श्री. सेलवन</u> :— डीएसआरनुसार दर दिलेले आहेत.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे</u> :— सदर प्रस्तावात निविदाकारांनी नमुद केलेले दर आणि वाटाघाटीनंतरचे दर यात तफावत दिसते.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे</u> :— यामध्ये दर हा डी.एस. आर नुसार आहे ना, मग ठिक आहे.

<u>कार्यकारी अभियंता (पा.पू.), श्री. सेलवन</u> :— आम्ही सादर केलेला प्रस्ताव अॅट पारनुसार आहे.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे</u> :— त्यावर कोण नियंत्रण ठेवणार?

<u>सदस्य श्री. राजेश वधारीया</u> :— ते काम प्रशासनाचे आहे.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी</u> :— प्रभाग समितीमध्ये काम अधिक असल्याने त्यांचे त्यावर नियंत्रण राहत नाही.

<u>प्र. महापालिका सचिव, श्रीम. प्राजक्ता कुलकर्णी:—</u> सदरचा विषय पारीत करण्यात यावा का? ठराव वाचून दाखविते.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे</u> :— ४ गाडया नाही ५ करा.

<u>सदस्य श्री. राजेश वधारीया</u> :— जसा प्रस्ताव आहे त्यानुसार कर्मचारी पूरविण्याची जबाबदारी ही त्या संस्थेकडे राहील. त्याचे नियंत्रण मध्यवर्ती ठिकाणी असायला हवे त्यामुळे आपण पाण्याच्या गळतीसाठी जसा आपण हेल्पलाईन नंबर दिला आहे तसाच नंबर व्हॉटस अप चालु करून ज्याची तक्रार येईल त्यानुसार त्याला प्राधान्य देवुन त्या तक्रारीचे निवारण करावे.

<u>सदस्य श्री. राजेश वधारीया</u> :— ४ गाडया आहेत, ५ वी गाडी येण्यास वेळ लागणार आहे.

<u>सदस्य, भगवान भालेराव:—</u> ४.९४ जास्त दराने आपण प्रस्ताव आणला आहे.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी</u> :— सदर प्रस्तावात निविदा प्रक्रीया झाली आहे.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे</u> :— सेलवन साहेबांनी सांगितले की, निविदाकाराशी वाटाघाटी करताना प्रकल्पाच्या रक्कमेवर ४.९४ टक्के रक्कम जास्त आकारून असे का? जर त्याने निविदा भरताना १५ टक्के रक्कम जास्त भरलेली होती ना,

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी</u> :— निविदा अशाप्रकारे प्राप्त झाल्या आहेत.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे</u> :— यात मजूर संख्या वाढणार नाही. मग डी.एस. आर नुसार दयावे.?

<u>सदस्य श्री. राजेश वधारीया</u> :— मजूर संख्या वाढणार नसली तरी इतर बाबी आहेत ना.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे</u> :— मग डीएसआरमधील दरापेक्षा ४.९४ टक्के जास्त दर कशासाठी?

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी</u> :— जुन्या डी.एस. आर नुसार दयावे

<u>सदस्य, डॉ. महेश गावडे :—</u> अॅट पार नुसार सांगत आहे.

<u>सदस्य श्री. राजेश वधारीया</u> :— सदर कामासाठी निविदा मागविण्यात आल्या होत्या तर त्यानुसार प्रस्ताव बनविला आहे का?

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे</u> :— आता आपणच असे सांगत आहात मग अडचण काय आहे?

<u>प्र. महापालिका सचिव :—</u> ठराव वाचून दाखविते.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे</u> :— प्रशासनाने जी मान्यता दिली आहे त्याप्रमाणे देण्यात यावे.

<u>प्र. महापालिका सचिव :—</u> सदरचा ठराव पारीत करण्यात यावा का?

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी</u> :— सदर विषयाच्या ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता करण्यात यावी.

<u>सदस्य श्री. राजेश वधारीया</u> :— इतिवृत्ताची वाट न पहाता सदरचा विषय पारीत करण्यात यावा.

<u>काही सदस्य :—</u> पास पास

<u>सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ५ :—** ई निविदा क्र. १३५ उल्हासनगर शहराच्या अंतर्गत कॅम्प नं. १ ते ५ मध्ये भुयारी गटार व चेंबर्सचे एस.एल.सी.एम. द्वारे प्रभाग क्र. १,२,३ व ४ करीता साफसफाई करणेसाठी मजुर पुरवठा करणेकामी मे. अे.एम. रामचंदानी, उल्हासनगर यांच्या जादा दराच्या निविदेच्या कामास मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर शहराच्या अंतर्गत कॅम्प नं. १ ते ५ मध्ये भुयारी गटार व चेंबर्सचे एस.एल.सी.एम.द्वारे प्रभाग क्र. १,२,३ व ४ करीता साफसफाई करणेसाठी मजुर पुरवठा करणेबाबतच्या कामाकरीता तांत्रिक व आर्थिक पध्दतीने नोंदणीकृत ठेकेदाराकडुन ई—निविदा पध्दतीने मागविण्यात आल्या त्यांची माहिती खालीलप्रमाणे....

| | | |
|---|---|---|
| १ | प्राकलनीय खर्च | रू. २६,१२,७५२/— |
| २ | निविदा प्रसिध्द | दि. २७/१/२०१५ |
| ३ | प्रथम मुदतवाढ | दि. २३/२/२०१५ |
| ४ | द्वितीय मुदतवाढ | दि. ५/३/२०१५ |
| ५ | निविदा प्रसिध्द केलेली वर्तमानपत्रे | वार्ताहर,उल्हासविकास,दैनिक वार्ताहार, दैनिक सामना |
| ६ | निविदा प्रसिध्द केल्याचा दिनांक | दि. ०६/२/२०१५ ते दि. २९/२/२०१५ पर्यंत वेळ ११ ते १५ वाजेपर्यंत |
| ७ | निविदा विक्री व स्विकृती कालावधी | दि. ६/२/२०१५ ते १७/३/२०१५ वेळ ११ ते १५ वाजेपर्यंत |
| ८ | निविदा सादर करावयाचा अंतिम दिनांक | दि. १८/३/२०१५ ते दि. २०/३/२०१५ |
| ९ | तांत्रिकबाब उघडल्याचा दिनांक | दि. १५/५/२०१५ |

| | | |
|---|---|---|
| १० | आर्थिक बाब उघडल्याचा दिनांक | दि. ०१/९/२०१५ |
| ११ | विक्री केलेल्या निविदांची संख्या | ०—२ |
| २२ | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ०—२ |

दि. १५/५/२०१५ रोजी मा. अतिरीक्त आयुक्त यांच्या अध्यक्षतेच्या खाली निवड समिती सदस्या व कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा यांच्या उपस्थितीत समोर उल्हासनगर शहराच्या अंतर्गत कॅम्प नं. १ ते ५ मध्ये भुयारी गटार व चेंबर्स चे एस.एल.सी.द्वारे प्रभाग क्र. १,२,३ व ४ करीता साफसफाई करणेसाठी मजुर पुरवठा करणेबाबत याकामाच्या निविदेचा तांत्रिक भाग उघडण्यात आला त्याचा तपशिल खालील प्रमाणे

| निविदा क्र. | कामाचा तपशिल | प्रकल्प निहाय किंमत | निविदाकार | नोंदणी प्रमाणपत्र व वर्ग | काम केल्याचे प्रमाणपत्र | जाईन्ट व्हेंनचर | पेन कार्ड |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १४६ | उल्हासनगर शहराच्या अंतर्गत कॅम्प नं. १ ते ५ मध्ये भुयारी गटार व चेंबर्स चे एस. एल.एम.द्वारे प्रभाग क्र. १,२,३ व ४ करीता साफसफाई करणेसाठी मजुर पुरवठा करणेबाबत | २६,१२,७५२/— | मे. एम.राम चंदानी उल्हासनगर | होय | होय | आवश्यकता नाही | ✓ |
| | | | श्री. मा. कंन्स्ट्रक्शन कंपनी | होय | होय | आवश्यकता नाही | ✓ |

सदर निविदेची पाणी पुरवठा मध्ये छाननी केली असता १) श्री. अे.एम.रामचंदानी उल्हासनगर २) श्री. मा कन्स्ट्रक्शन यांच्या निविदा अटी व शर्ती नुसार आहेत तरी उपरोक्त निविदा काराचा दुसरा भाग आर्थिक बाबी संदर्भात दि. १/९/२०१५ रोजी निविदा कारांच्या (आर्थिक दर) अतिरीक्त आयुक्त सो. यांच्या अध्यक्षते खाली निवड समितीतील सदस्य यांच्या उपस्थितीत उघडण्यात आला त्या प्रमाणे निविदा काराणे दिलेले दर खालील प्रमाणे आहेत.

निविदा क्र. १३५ मध्ये दिलेल्या प्रकल्पाची एकूण किंमत २६,१२,७५२/— रूपये ऐवढी आहे.

| अ. क्र. | निविदा कारकाचे नाव | निविदा कारकाने नमुद केलेले दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | अे.एम.रामचंदाणी, उल्हासनगर | ३०,०४,६६४.८/— | दिलेले दरापेक्षा १५ टक्के जास्त |
| २ | श्री मा. कन्स्ट्रक्शन कंपनी | ३०,३६,०१७.८२/— | दिलेले दरापेक्षा १६.२० टक्के जास्त |

सदर निविदेस दुस—यांना मुदतवाढ देण्यात आलेली होती.

तरी निविदा क्र. १३५ या निविदाकारापैकी अ.क्र. १) अे.एम. रामचंदाणी, उल्हासनगर यांनी महापालिकेने ठरविलेल्या रक्कमे पेक्षा १५ टक्के रक्कम जास्त भरलेली आहे. अ.क्र. २) श्री. मा. कन्ट्रक्शन कंपनी यांनी महापालिकेने ठरविलेल्या रक्कमे पेक्षा १६.२० टक्के रक्कम जास्त भरलेली आहे.

निविदा समिती अध्यक्ष यांच्या दालनात दि. ८/९/२०१५ रोजी निविदाकारास वाटाघाटी करीता बोलविण्यात आलेले होते. त्यावेळेस अ.क्र. १) अे.एम. रामचंदानी, उल्हासनगर यांनी निविदा क्र. १३५ मधे १५ टक्के जास्तीची रक्कम दिलेली होती. त्यामध्ये १०.०६ टक्के रक्कम कमी करत असुन प्रकल्पाचे एकूण रू. २६,१२,७५२/— या रक्कमेवर ४.९४ टक्के रक्कम जास्त आकारून

सदरचे रू.२७,४१,८२२/— एवढया रक्कमेवर काम करण्यास तयार आहे. असे पत्रव्दारे दि.८/९/२०१५ रोजी कळविले होते. त्याप्रमाणे अे एम रामचदांनी यांना सदर काम देण्याकरीता शिफारस करण्यात येत आहे.

उल्हासनगर महानगरपालिका अंतर्गत आरोग्य खात्यामध्ये उल्हासनगर नाला सफाई करणेसाठी मजुर पुरवठा करण्यात येत आहे. सदर मजुर पुरवठा करणेबाबतच्या निविदेतील अंदाजपत्रकाच्या रक्कमेपेक्षा ४.९४ जास्त रक्कम आकारुन मे. २०१५ मध्ये स्विकारण्यात आलेला आहे.

तरी अे.एम.रामचंदानी, उल्हासनगर यांची ४.९४ जादा दराच्या निविदेस मा. स्थायी समिती कडुन मान्यता मिळणेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ५४</u> <u>दिनांक:— २/१२/२०१५</u>

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वधारीया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार ई निविदा क्र. १३५ उल्हासनगर शहराच्या अंतर्गत कॅम्प नं. १ ते ५ मध्ये भुयारी गटार व चेंबर्सचे एस.एल.सी.एम. द्वारे प्रभाग क्र. १,२,३ व ४ करीता साफसफाई करणेसाठी मजुर पुरवठा करणेकामी मे. अे.एम. रामचंदानी, उल्हासनगर यांच्या जादा दराच्या निविदेच्या कामास मान्यता देत आहे.

<u>तसेच</u>

१. सदर कामाचे नियंत्रण हे प्रभाग समितीतुन न करता उल्हासनगर महापालिका मुख्यालयातुन सेंट्रलाईज पध्दतीने करण्यात यावे.

२. मलनिस्सारण संदर्भात तक्रार स्विकारण्यासाठी स्वतंत्र नि:शुल्क (टोल फ्री) दुरध्वनी प्रशासनाने ठेवावा.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची <u>सही/—</u>

अनुमोदकाची <u>सही/—</u>

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>प्र.महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ६ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. ६ :—** उल्हासनगर—४ मध्ये स्मशानभुमीचे नुतनीकरण करणेचे कामास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणे.

---

<u>सदस्य, भगवान भालेराव:—</u> सदर विषयाबाबत कोण माहिती देणार?

<u>प्र. महापालिका सचिव :—</u> सार्वजनिक बांधकाम विभागाचे कांणी अधिकारी आलेले नाहीत.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी** :— सभेतील विषयाशी संबंधित अधिकारी जर सभेत उपस्थित नसतील तर ते विषय घ्यायचेच नाहीत. सदरचा विषय वगळण्यात यावा.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया** :— विषय वगळण्यापेक्षा नंतर घेण्यात यावा.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे** :— हा स्मशान भुमीचा विषय असल्याने पास करण्यात यावा

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी** :— जर त्या विभागाचे अधिकारी नसतील तर हा विषय प्रलंबित ठेवावा.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे** :— आपण जर एखादया विषयाला कायदा लावाल तर तो पुढील सर्वच विषयांसाठी लागू असला पाहिजे.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भूल्लर** :— स्मशानभूमीच्या बाबतीत मला चार दिवसांपासून मेसेज येत आहेत की, तिथे लाईट नाही, स्मशानभुमीत सर्वत्र अंधार आहे, आवश्यक सुविधा नाहीत.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया** :— सदर विषय ज्या प्रभागातील आहे त्या प्रभागाचे कोणी प्रभाग अधिकारी पण नाहीत का? असे कसे चालेल अधिकारी नसतील तर संबंधित विषयाची माहिती कशी मिळणार?

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी** :— वॉटस्पवर एवढे मेसेजेस येत आहेत कि, स्मशानभुमीत लाईट नाही. इतर आवश्यक सुविधा नाहीत जे आवश्यक आहे ते होत नाही आणि स्मशानभूमीत ग्रेनाईट लावून सजावट करण्याची काय गरज?

**सदस्य, श्री. राजेश वधारीया** :— आपल्याला प्रस्ताव तयार होतानाच सांगायला हवे होते ना.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भूल्लर** :—सदरचे काम होणे जरूरीचे आहे.

**प्र. महापालिका सचिव :—** सार्व. बांधकाम विभागाचे अधिकारी येईपर्यंत सदरचा विषय प्रलंबित ठेवण्यात यावा का?

**काही सदस्य :—**सदरहु विषय प्रलंबित ठेवण्यात यावा.

**सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ६ :— उल्हासनगर—४ मध्ये स्मशानभुमीचे नुतनीकरण करणेचे कामास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणे.**

प्रस्तावना

उपरोक्त विषयानुसार उल्हासनगर—४ मधील स्मशानभुमीचे नुतनीकरण करणे अत्यावश्यक आहे. कारण सदर स्मशानभुमीचा ब—याच वर्षापासून विकास करण्यात आलेला नाही. सदर स्मशानभुमीमध्ये प्रेताचे दहन करण्यासाठी चूल बांधणेसाठी, नागरिकांसाठी बेंचेस, अस्तित्वात असलेले शेड यांची दुरुस्ती करणे, स्मशानभुमीचे शेवटच्या भागामध्ये सि. सि. पेव्हमेंट रस्ता करणे, झाड लावण्यासाठी व गेटची दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

मा.आयुक्त सो. यांनी मा. नगरसेवक श्री. रमेश चव्हाण व शहर अभियंता यांचेसह सदर जागेची पहाणी केली आहे. त्याअनुषंगाने उल्हासनगर—४ येथील स्मशानभुमीमध्ये विविध कामे करणेसाठी प्राकलन तयार करण्यात आले आहे.

i) लेखाशिर्ष :– 16/C-5/9 Maintenance Burial grounds

ii) लेखाशिर्षामध्ये उपलब्ध एकंदर तरतुद :– १७५०००००/–

iii) या कामापूर्वी बजेट कंट्रोल रजिस्टरप्रमाणे शिल्लक असलेली तरतुद :– रु. ६२१२२००/–

iv) या कामावरील खर्च :–रु.३५०००००/–

v) या कामानंतर उक्त लेखाशिर्षात शिल्लक राहणारी तरतुद :– रु.२७१२२००/–

सदर कामास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेकरिता मा.स्थायी समितीची मान्यता मिळणेकरिता प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. ५४ अ दिनांकः– २/१२/२०१५

सुचकाचे नाव :– जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेश वधारीया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर–४ मध्ये स्मशानभुमीचे नुतनीकरण करणेचे कामास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्याचा प्रस्ताव या कार्यसूचीवरुन वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

प्र.महापालिका सचिव :– विषय क्र. ७ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. ७** :– उल्हासनगर महानगरपालिकेच्या सिवेज पंपिंग स्टेशन क्रमांक २, शांतीनगर व सिवेज पंपिंग स्टेशन क्रमांक–३ नेहरुनगर चालविणे, देखभाल व दुरुस्ती कामी न्युनत्तम दराचे निविदाकार मे. ओम इंडस्ट्रीअल सर्व्हिसेस, ठाणे यांची निविदा स्विकृत करुन कार्यादेश देण्यास मंजुरी देणे.

---

सदस्य, भगवान भालेराव:– याचे ठेकेदार कोण आहेत? पंपींग स्टेशनच्या सर्व कामांमध्ये मे. कल्पतरूवालाच असतो.

प्र. महापालिका सचिव :– नाही, मे. ओम इंडस्ट्रीअल सर्व्हिसेस, ठाणे लिहिले नाही.

कार्यकारी अभियंता, श्री. सेलवन :– आता पंपिग स्टेशनचे काम आहे व पुर्वीचा विषय हा मलप्रक्रीया केंद्राचा होता.

<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया :— </u>सिव्हरेज पंपिंग स्टेशन क्र.२ कुठे आहे.

<u>कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा, श्री. सेलवन :— </u>शांतीनगर येथे आहे. खडेगोलवलीला जो आहे तो ट्रिटमेंन्ट प्लान्ट आहे.

<u>प्र. महापालिका सचिव :— </u> सदरचा विषय पारीत करण्यात यावा का?

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :— </u>सदर विषयाच्या ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता करण्यात यावी.

<u>काही सदस्य :—</u> पास पास

<u>सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑

**विषय क्र. ७ :—** उल्हासनगर महानगरपालिकेच्या सिवेज पंपिंग स्टेशन क्रमांक २, शांतीनगर व सिवेज पंपिंग स्टेशन क्रमांक—३ नेहरुनगर चालविणे, देखभाल व दुरुस्ती कामी न्युनत्तम दराचे निविदाकार मे. ओम इंडस्ट्रीअल सर्व्हिसेस, ठाणे यांची निविदा स्विकृत करुन कार्यादेश देण्यास मंजुरी देणे.

<u>प्रस्तावना</u>

विषयांकित कामाच्या ई—निविदा मागविण्याचे असल्याने, मागील मंजुर केलेल्या अंदाजपत्रकानुसार सन २०१५—१६ साठी १२ महिन्याच्या कालावधी करीता रु.३१,२९,१२८/— इतक्या रकमेचे अंदाजत्रक तयार केले आहेत. सदर अंदाजपत्रकात पंपचालक, मदतनिस, जोडारी, विजतंत्री, माळी, सुरक्षा रक्षक यांची तरतुद केलेली आहे. तसेच दळण—वळणाच्या व्यवस्था, विद्युत उप केंद्राची देखभाल दुरुस्ती, मोटार दुरुस्तीसाठीचे दर बाजार भावाप्रमाणे घेण्यात आलेले आहेत. विषयांकित कामाच्या ई—निविदा पहिली व दुसरी मागणी अन्वये मागविण्यात आल्या होत्या. परंतु योग्य तो प्रतिसाद न मिळाल्याने, विषयांकित कामाच्या ई—निविदा तिसऱ्यांदा मागविण्यात आल्या होत्या. सदर ई—निविदेचा लिफाफा क्र.०१ दिनांक ०२/०७/२०१५ रोजी उघडण्यात आले. त्यात खालील प्रमाणे निविदाकाराने सदर निविदा सादर केल्या आहेत.

१) मे. अंकुश इंटरप्रायजेस, नवी मुंबई.
२) मे. कल्पतरु इंजिनिअर्स, बदलापुर.
३) मे. ओम इंडस्ट्रीअल इंजि. सर्व्हिसेस, ठाणे.

<u>सदर कामाच्या ई—निविदा उघडतांना मे. अंकुश इंटरप्रायजेस, नवी मुंबई यांचे कागदपत्रे निविदेच्या अटी व शर्तीनुसार तांत्रिक दृष्टया योग्य वाटत नाहीत. </u>त्यामुळे सदर निविदाकार यांचा लिफाफा क्र.०२ (कमर्शिअल बीड) उघडता येणे शक्य नाही. <u>तसेच मे. कल्पतरु इंजिनिअर्स, बदलापुर व मे. ओम इंडस्ट्रीअल इंजि. सर्व्हिसेस, ठाणे यांचे कागदपत्रे तांत्रिक दृष्टया योग्य आहेत. त्यामुळे सदर निविदाकार यांचा लिफाफा क्र.०२ उघडण्यासाठी निविदा समितीपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आले होते. त्या अन्वये सदर कामाचा ई—निविदेचा लिफाफा क्र.०२ उघडण्यासाठी मा. अतिरिक्त आयुक्त सो., यांच्याकडून दिनांक २७/०७/२०१५ रोजी मान्यता घेण्यात आली होती.</u>

सदर बाब निविदा समितीपुढे ठेवून व मंजुर टिप्पणी अन्वये मे.कल्पतरु इंजिनिअर्स, बदलापुर तसेच मे. ओम इंडस्ट्रीअल इंजि. सर्व्हिसेस, ठाणे यांचा ई—निविदेचा लिफाफा क्र.०२ उघडण्यात आला व त्यात खालील प्रमाणे दर नमुद करण्यात आलेले आहेत.

| अ.क्र | ठेकेदारांचे नाव | प्राकलनीय किंमत | सादर केलेला दर | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | मे. कल्पतरु इंजिनिअर्स, बदलापुर. | ३१,२९,१२८/— | ११.१ : टक्के कमी दराने | २७,८१,७९५/— |
| २ | मे. ओम इंडस्ट्रीअल इंजि. सर्व्हिसेस, ठाणे | | २१.२ : टक्के कमी दराने | २४,६५,७५३/— |

उपरोक्त तक्त्यामध्ये मे. ओम इंडस्ट्रीअल इंजि. सर्व्हिसेस, ठाणे यांचे न्युनतम निविदेचे दर अंदाजित किंमतीच्या २१.२ %टक्के कमी असल्याने त्यांची एकुण किंमत रु.२४,६५,७५३/– एवढी होते. तरी सदर ई–निविदेचा न्युनतम देकार मे. ओम इंडस्ट्रीअल इंजि. सर्व्हिसेस, ठाणे यांची निविदा स्विकुत करून त्यांच्याशी करारनामा करून कार्यादेश देण्यासाठी प्रस्ताव मा. स्थायी समितीपुढे निर्णयास्तव सादर करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र. ५५** **दिनांकः– २/१२/२०१५**

सुचकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेश वधारीया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिकेच्या सिवेज पंपिंग स्टेशन क्रमांक २, शांतीनगर व सिवेज पंपिंग स्टेशन क्रमांक–३ नेहरुनगर चालविणे, देखभाल व दुरुस्ती करणे कामी न्युनत्तम दराचे निविदाकार मे. ओम इंडस्ट्रीअल सर्व्हिसेस, ठाणे यांची निविदा स्विकृत करुन कार्यादेश देण्यास मंजुरी देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**प्र.महापालिका सचिव :–** विषय क्र. ८ वाचुन दाखवितात.

---

**➩विषय क्र. ८ :–** मालमत्ता क्र 23BI019081400 [OLD NO. 23/0443] या मिळकतीचे बांधकाम प्रकार **एसीब्रिक्स** असुन कर आकारणी नोंदवहीत एसीब्रिक्स व टिअर गरडर रदद् झाले असुन त्यावरील टिअरगरडरची रक्कम रुपये २३८९९/– निर्लेखित करणे.

---

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे** :– पुन्हा सारखाच विषय आला आहे. या प्रस्तावातील अर्जदारांवर अन्याय कोणी केला आहे.

**सदस्य श्री. राजेश वधारीया** :– माझ्या प्रभागामधील प्रकरण आहे. एक ७८ वर्षाचा वृध्द नागरीक आहे. एकटाच राहतो. त्याचे घर एसीब्रिक्सचे असुन त्याला महापालिकेने टिअरगर्डरचे बिल पाठविले आहे. एवढे वाढीव बिल पाहुन त्याला काय वाटले असेल. सदर ठिकाणची पाहणी ज्या अधिका–यांनी केली आहे व करआकारणी निश्चितीसाठी अहवाल दिला होता त्यांचेवर कारवाई व्हायला पाहिजे. मागील ३ वर्षापासुन मी याचा पाठपुरावा करीत आहे.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे** :– खरे आहे, असे काम करणा–या अधिका–यांवर आपण काय कार्यवाही करता.

**सदस्य श्री. राजेश वधारीया** :– अशाप्रकारांनी महानगरपालिकेचे नाव खराब होत आहे.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे** :– माझ्या प्रभागात दत्तात्रय व्यायामशाळा आहे त्याच्या मुलाला तिथे प्रवेश दिला नाही म्हणुन चुकीचा अहवाल देवुन जास्तीची करआकारणी लावली गेली आहे. ज्या अधिका–याने हे कृत्य केले आहे त्याचेवरसुध्दा कारवाई झाली पाहिजे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी** :– हो, बरोबर आहे, आपण त्या संबधित अधिका–यावर कारवाई करावी व तसा अहवाल आम्हाला पुढील सभेत सादर करावा.

**प्र. उपकर निर्धारक व संकलक, श्री. शैलेश दोंदे :–** तुम्ही ठरावात तसे नमुद केले तर आम्ही त्याप्रमाणे संबधित अधिका–यांवर कार्यवाही प्रस्तावित करू शकतो.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे** :– माझ्या प्रभागातील प्रकरणातसुध्दा असेच झाले पाहिजे. पुढील सभेमध्ये कारवाईचा अहवाल आला पाहिजे.

**प्र. महापालिका सचिव** :– सदर विषय पारीत करण्यात यावा का?

**सदस्य, श्री. राजेश वधारीया** :– आपण ठराव काय तयार केला आहे? ज्याप्रकारे त्या अर्जदाराला आधी बिल जात होते त्याप्रमाणेच बिल गेले पाहिजे.

**प्र. महापालिका सचिव** :– ठराव वाचून दाखविते.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया** :– संबंधित दोषी अधिका–यांवर कारवाई करून त्याचा अहवाल स्थायी समितीपुढे पाठविण्यात यावा असे ठरावात नमुद करा.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी** :– श्री. लेंगरेकर साहेब, आपण सर्व निरिक्षकांना नोटीस दया व त्यांना बजावण्यात यावे की असे प्रकार न होण्याबाबत.

**उप–आयुक्त, श्री. लेंगरेकर** :– मी कार्यवाही सुरू केली आहे.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया** :– सदर विषय इतिवृत्ताची वाट न पहाता पारीत करण्यात यावा.

**काही सदस्य :–** पास पास

**सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा :–** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑

**विषय क्र. ८ :–** मालमत्ता क्र 23BI019081400 [OLD NO. 23/0443] या मिळकतीचे बांधकाम प्रकार **एसीब्रिक्स** असुन कर आकारणी नोंदवहीत एसीब्रिक्स व टिअर गरडर रदद् झाले असुन त्यावरील टिअरगरडरची रक्कम रुपये २३८९९/– निर्लेखित करणे.

**प्रस्तावना**

१) श्रीम. सिताबाई वधुमल राहणार बॅ. नं. ५३५ रुम नं. १७ व १८ उल्हासनगर २.यांनी दि. २०/१२/२०१३ रोजीच्या अर्जान्वये महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत करपात्र १) मालमत्ता क्र 23 BI 019081400 [OLD NO. 23/0443] चे आकारणी विरूद्ध खालील बाबींबाबत हरकत दाखल केली आहे.

२) उल्हासनगर मनपा आयुक्त कार्यालय यांचेकडील दि.२५/२/२०१५ रोजीचे पत्र

विषयांकित प्रकरणी सादर करण्यात येते की .

उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत संदर्भित मिळकतीकरिता नमुद असलेल्या करपात्र बाबीचा तपषिल पुढीलप्रमाणे

**मुद्दा क. १)** कर भरण्यास प्रथम पात्र व्यक्ती म्हणून सिताबाई वधुमल या नावाची नोंद असुन त्याचे क्षेत्रफळ खालीलप्रमाणे

| बांधकाम प्रकार | वापर | करयोग्य मुल्यासाठीचे दर | वार्शिक भाडे | एकुण क्षेत्र | करमाफ क्षेत्र | करपात्र क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|
| ACBriks | Resi | 1/4/86 | 0 | 676 | 0 | 676 |

उमपा नोंदीनुसार उक्त मिळकतीचे क्षेत्रफळ व एसीब्रिक्स वर्श २०११–१२ पर्यत नोंद होती.

**मुद्दा क.२)** तद्नंतर उक्त मिळकतीचे क्षेत्रफळात व बांधकाम प्रकारात फिल्ड बुक प्रमाणे वर्श २०१२–१३ मध्ये खालीलप्रमाणे बदल झाले.

| बांधकाम प्रकार | वापर | करयोग्य मुल्यासाठीचे दर | वार्शिक भाडे | एकुण क्षेत्र | करमाफ क्षेत्र | करपात्र क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|
| **टिअर गरडर** | निवासी | ०१सप्टेंबर १२ | ० | १०० चौ फट | — | १०० चौ फट |
| एसीब्रिक्स | निवासी | ०१सप्टेंबर १२ | ० | १०० चौ फट | — | १०० चौ फट |
| **टिअर गरडर** | निवासी | ०१सप्टेंबर १२ | ० | ७० चौ फट | — | ७० चौ फट |
| **टिअर गरडर** | निवासी | ०१सप्टेंबर १२ | ० | ६३ चौ फट | — | ६३ चौ फट |
| एसीब्रिक्स | निवासी | ०१सप्टेंबर १२ | ० | ६३ चौ फट | — | ६३ चौ फट |
| **टिअर गरडर** | निवासी | ०१सप्टेंबर १२ | ० | १०० चौ फट | ५० चौ फुट | ५० चौ फुट |
| एसीब्रिक्स | निवासी | ०१सप्टेंबर १२ | ० | १०० चौ फट | ५० चौ फुट | ५० चौ फुट |
| एसीब्रिक्स | निवासी | ०१सप्टेंबर १२ | ० | ५० चौ फट | ५० चौ फुट | ० |
| **टिअर गरडर** | निवासी | ०१सप्टेंबर १२ | ० | ५० चौ फट | ५० चौ फुट | ० |
| एसीब्रिक्स | निवासी | ०१सप्टेंबर १२ | ० | ७० चौ फट | ३५ चौ फुट | ३५ चौ फुट |
| **टिअर गरडर** | निवासी | ०१सप्टेंबर १२ | ० | २४ चौ फट | १२ चौ फुट | १२ चौ फुट |
| एसीब्रिक्स | निवासी | ०१सप्टेंबर १२ | ० | ६० चौ फट | ३० चौ फुट | ३० चौ फुट |
| **टिअर गरडर** | निवासी | ०१सप्टेंबर १२ | ० | २०० चौ फट | — | २०० चौ फुट |

अशी नोंद असून कर आकारणी नोंदवहीत मिळकतीचा बांधकाम प्रकार **टिअर गरडर व एसीब्रिक्स असा नोंदविण्यात** आला आहे.

तरी सदर मिळकतीचा बांधकाम प्रकार संपुर्ण **एसीब्रिक्स** आहे तसेच उक्त मिळकतीमधील बांधकाम प्रकार **एसीब्रिक्स** आकरणी क्षेत्र स्तत:वापर होत असल्याने कर आकारणी करणेसंदर्भात हरकत दाखल केली आहे.

मुद्दा क.३) सबब मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूचितील प्रकरण ८ मधील

नियम २० अन्वये तरतुद नुसार मिळकतीमध्ये दुरूस्ती करणेकरिता व संबंधित कर निरीक्षक यांच्या प्रत्यक्ष पाहणी अहवालानुसा र व मिळकतीसंदर्भातील सर्व कार्यवाही पुर्ण करुन सदर अर्जदारास दिनांक १५/०१/२०१५ अन्वये खालीलप्रमाणे एसीब्रिक्स

| बांधकाम प्रकार | वापर | करयोग्य मुल्यासाठीचे दर | वार्शिक भाडे | एकुण क्षेत्र | करमाफ क्षेत्र | करपात्र क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|
| एसीब्रिक्स | निवासी | ०१सप्टेंबर १२ | ० | १०० चौ फट | — | १०० चौ फट |
| एसीब्रिक्स | निवासी | ०१सप्टेंबर १२ | ० | ६३ चौ फट | — | ६३ चौ फट |
| एसीब्रिक्स | निवासी | ०१सप्टेंबर १२ | ० | १०० चौ फट | ५० चौ फुट | ५० चौ फुट |
| एसीब्रिक्स | निवासी | ०१सप्टेंबर १२ | ० | ५० चौ फट | ५० चौ फुट | ० |
| एसीब्रिक्स | निवासी | ०१सप्टेंबर १२ | ० | ७० चौ फट | ३५ चौ फुट | ३५ चौ फुट |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| एसीब्रिक्स | निवासी | ०१सप्टेंबर १२ | ० | ६० चौ फट | ३० चौ फुट | ३० चौ फुट |

नुसार आदशे देण्यात आले व त्यानुसार सदर मिळकतीचा बांधकाम प्रकार संपुर्ण **एसीब्रिक्स** वर्ष २०१४—०१५ नुसार बिल जारी करण्यात आले आहे.

मुद्दा क्र.४) परंतु अर्जदाराने **मनापा आयुक्त कार्यालयाकडे दि. २५/०२/२०१५** यांचेकडे पुन्हा अर्ज सादर केला असुन पुर्वीचे कर निर्धारणानुसार एसीब्रिक्स व क्षेत्रफळाची नोंद करणेबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअनुशंगाने उमपा नोंदीनुसार तपासणी केली असता कर निर्धारणापासुन ते वर्श २०११—१२ पर्यत एसीब्रिक्सची खालीलप्रमाणे नोंद होती. तद्नंतर वर्श २०१२—१३ मध्ये सुधारीत क्षेत्रफळ व बांधकाम प्रकार ( **टिअर गरडर व एसीब्रिक्स** ) अषी दुरुस्ती फिल्डबुक प्रमाणे **मुद्दा क्र.२ नुसार** नमुद करण्यात आला आहे.त्याअनुशंगाने कर आकारणीत खालीलप्रमाणे वाढ झाली आहे.

| वर्ष | टिअर गरडर प्रमाणे कर आकारणी | एसी ब्रिक्स प्रमाणे कर आकारणी | अतिरिक्त कर आकारणी |
|---|---|---|---|
| २०१२—२०१३ | १०७७७/— | १७७८/— | ८९९९/— |
| २०१३—२०१४ | १२४३४/— | २०२९/— | १०४०५/— |
| २०१४—२०१५ | ६५२४/— | २०२९/— | ४४९५/— |
| **एकुण** | २९७३५/— | ५८३६/— | २३८९९/— |

तरी विषयांकित प्रकरणी अतिरिक्त कर आकारणीत रु.२३८९९/— हि रक्कम निर्लेखित करणेकामी मा. स्थायी समिती पटलावर मंजुरीकरीता प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. ५६ दिनांकः— २/१२/२०१५

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वधारीया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार मालमत्ता क्र 23BI019081400 [OLD NO. 23/0443] या मिळकतीचे बांधकाम प्रकार **एसीब्रिक्स** असुन कर आकारणी नोंदवहीत एसीब्रिक्स व टिअर गरडर रदद् झाले असुन त्यावरील टिअरगरडरची रक्कम रुपये २३८९९/— निर्लेखित करीत आहे. तसेच संबंधीत दोषी अधिका—यावर कारवाई करावी व पुर्वीप्रमाणे देयक काढुन तसा अहवाल पुढील स्थायी समिती सभेत सादर करण्याचे प्रशासनास निर्देश देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

प्र.महापालिका सचिव :— विषय क्र. ९ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र.९** :– उल्हासनगर महानगरपालिका मालमत्तेच्या सुरक्षेच्या दृष्टीने मा.सचिव सुरक्षा रक्षक मंडळ. सानपाडा यांचेद्वारा नियुक्त सुरक्षा रक्षक यांना मुदतवाढ देणेस प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणे.

---

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे** :– मुदतवाढ का मागता? नविन निविदा का काढत नाही. त्यांनाच वांरवार का मुदत वाढ देण्यात येते?

**प्र. सुरक्षा अधिकारी, श्री. बाळु नेटके:–** त्यांना मुदत वाढ देण्याचे कारण की, आपण त्यांच्याऐवजी दुसरीकडे सुरक्षारक्षक मागवु शकत नाही. महाराष्ट्र शासनाचा तसा निर्णय आहे. महाराष्ट्र शासनाने नेमलेल्या सुरक्षामंडळाकडून ४ फेब्रुवारी २०१४ रोजी २१ सुरक्षा रक्षक घेतले होते त्यांना वांरवार मुदतवाढ देण्यात येते.

**सदस्य, डॉ. महेश गावडे** :– भरतीचे काय झाले.

**प्र. सुरक्षा अधिकारी, श्री. बाळु नेटके:–** भरती प्रक्रीया करणेबाबत आम्ही वारंवार सामान्य प्रशासन विभागाकडे प्रस्ताव दिलेला आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–** सदर कर्मचा–यांना मुदतवाढ दयावयाची झाली तर त्याचा एकुण खर्च किती आहे?

**प्र. सुरक्षा अधिकारी, श्री. बाळु नेटके:–** रू. ३,११,०६०/– एका महिन्याचा खर्च आहे तर एका सुरक्षारक्षकाचे मासिक वेतन रू. १०,७५०/– इतके आहे.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:–** तुम्ही जे सांगत आहात ती तरतुद दाखविली आहे. आपल्याकडे विविध ठिकाणी उद्याने आहेत जिथे सुरक्षारक्षकांची गरज आहे. २१ पेक्षा जास्त सुरक्षारक्षक मागवा ना.

**प्र. सुरक्षा अधिकारी, श्री. बाळु नेटके:–** ९ सुरक्षा क्षक वाढविण्यासंदर्भात प्रस्ताव मा. आयुक्त यांच्याकडे ठेवला आहे. आणि आधी आता सद्या कार्यरत २१ सुरक्षारक्षकांना मुदतवाढ घ्यायची आहे.

**प्र. महापालिका सचिव** :– सदर विषय पारीत करण्यात यावा का?

**काही सदस्य :–** पास पास

**सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा :–** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ९ :–** उल्हासनगर महानगरपालिका मालमत्तेच्या सुरक्षेच्या दृष्टीने मा.सचिव सुरक्षा रक्षक मंडळ. सानपाडा यांचेद्वारा नियुक्त सुरक्षा रक्षक यांना मुदतवाढ देणेस प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणे.

**प्रस्तावना**

सुरक्षा विभागामार्फत सुरक्षा रक्षक मिळणे कामी विविध विभागाकडुन महापालिकेच्या मलमत्तेच्या ठिकाणी सुरक्षिततेसाठी सतत मागणी होत असते परंतु सुरक्षा विभागाकडे सुरक्षा रक्षक मागणीपेक्षा कमी असल्याने मा. आयुक्त सो. यांच्या दिनांक ८/१०/२०१३ ,२७/११/२०१४ रोजीच्या मान्यतेने तसेच मा. स्थायी समिती ठराव क्रमांक ६३ दिनांक १७/१२/२०१३ व ठराव क्रमांक ६६ दिनांक ३०/१२/२०१४ अन्वये उल्हासनगर महानगरपालिकेच्या मालमत्तेचे रक्षण करणेसाठी मा. सचिव सुरक्षा रक्षक मंडळ सानपाडा (मुंबई ठाणे जिल्ह्या करिता) यांचे कडील २१ सुरक्षा रक्षक घेण्यात आलेले आहेत.

सदरील सुरक्षा रक्षकांचा कालावधी सन.२०१४—२०१५ या वर्षातील व यापुढेही सहा महिने कालावधीकरीता म्हणजेच ३० सप्टेंबर २०१५ अखेर संपूष्ठात येणार आहे, उल्हासनगर महानगरपालिकेच्या मालमत्तेच्या संरक्षणासाठी यापूढे २१ सुरक्षा रक्षकाची आवशक्ता आहे. तसेच उल्हासनगर महानगरपालिकेच्या मालमत्तेमध्ये दिवसें दिवस विस्तार होत असल्याकारणाने सुरक्षिततेच्या दृष्टिकोणातुन सन.२०१५—२०१६ या वर्षासाठी दिनांक १ऑक्टोंबर २०१५ रोजी पासुन २१ सुरक्षा रक्षक यांना पुढिल १ वर्षा करिता मुदतवाढ देणे अत्यंत आवशक आहे.

वरिल दर्शविणेत आलेल्या एकुण २१ सुरक्षा रक्षकांना महापालिका प्रशासकिय भवन,चार प्रभाग समिती, तसेच पाणी पुरवठा विभागाच्या पाण्याच्या टाक्या, उद्याने इत्यादी ठिकाणी सुरक्षा रक्षकांची आवश्यक्ता आहे.

मा.सचिव सुरक्षा रक्षक मंडळ सानपाडा (मुंबई ठाणे जिल्ह्याकरिता) यांचे कडुन घेण्यात आलेले २१ सुरक्षा रक्षकांच्या पगारात दर दोन वर्षानी व इतर भत्यात दर सहा महिन्याने वाढ होत असते.

सबब. मा. सचिव सुरक्षा रक्षक मंडळ सानपाडा (मुंबई ठाणे जिल्ह्याकरिता) यांचे कडुन २१ सुरक्षा रक्षक यांना माहे, १ ऑक्टोंबर २०१५ पासुन १वर्षाची मुदत वाढ करून मिळणेस व सन २०१५—१६ अ. १ (२७) आस्थापना खर्च रोजंदारी/मानधन इत्यादी या लेखाशिर्षकात (रक्कम रू. १कोटी ३०लाख) या मंजुर तरतुदीतुन अंदाजीत खर्च करणेसाठी मा. स्थायी समितीची प्रशासकिय व वित्तीय मान्यतेस्तव सविनय सादर.

**स्थायी समिती ठराव क्र.** ५७ दिनांकः— २/१२/२०१५

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वधारीया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिका मालमत्तेच्या सुरक्षेच्या दृष्टीने मा.सचिव सुरक्षा रक्षक मंडळ. सानपाडा यांचेद्वारा नियुक्त सुरक्षा रक्षक यांना १ ऑक्टोंबर २०१५ पासून एक वर्षाची मुदतवाढ देत आहे. तसेच येणा—या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**प्र.महापालिका सचिव :—** विषय क्र. १० वाचुन दाखवितात.

———————————————————————————————————

⇨ **विषय क्र.१०** :— मजुर कामगार सहकारी संस्था मर्या. यांचेकडुन घेतलेले तात्पुरत्या स्वरुपातील फायरमन यांना कार्योत्तर मंजुरी देणे.

———————————————————————————————————

**सदस्य, श्री. भगवान भालेराव :—** पास पास

**सदस्या, श्रीमती. राजश्री चौधरी :—** कसे काय आपण लगेच पास असे म्हणता आम्हाला यावर बोलायचे आहे. आपण फक्त ७ कर्मचारी का घेत आहात,

**प्र. अग्निशमन अधिकारी, श्री. मिरपगारे :—** मेसर्स जनता मजुर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. उल्हासनगर जि. ठाणे यांना मुदतवाढ देवून सध्या कार्यरत असलेले १५ फायरमन कार्यरत आहेत. अग्निशमन विभागात एकूण ०४ वर्षात अग्निशमन विभागातील ०४ कर्मचारी सेवानिवृत्त व ०१ कर्मचारी मयत झाले आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांची अत्यंत कमतरता आहे. त्यामुळे अग्निशमन सेवा ही अत्यावश्यक सेवा असल्याने विशेष बाब म्हणून कार्यरत १५ फायरमन व्यतिरिक्त वाढीव ०७ फायरमन घेण्याच्या प्रस्ताव आहे.

**सदस्या, श्रीमती. राजश्री चौधरी :—** कायम स्वरूपाच्या भरतीचे काय? भरतीचे नियमावली आहे त्यानुसार आपण जी पदे रिक्त आहेत ती का नाही भरत आहात.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे :—** आपण भरती प्रक्रीया राबवु शकत नाही का? कारण आपण मागच्या वर्षी मा. सचिव याच्या बैठकीत आपल्याला त्यांनी निर्देश दिले होते की एका वर्षात भरती प्रक्रीया राबवुन मनुष्यबळाची तुट कायमची भरून काढण्यात यावी.

**प्र. अग्निशमन अधिकारी, श्री. मिरपगारे :—** प्रस्ताव तयार आहे. प्रत्येक गाडीवर ३२ कर्मचारी पाहीजेत असा प्रस्ताव आम्ही सामान्य प्रशासन विभागाकडे पाठविला आहे. त्यानुसार २४४ कर्मचा—यांची आवश्यकता असल्याचा प्रस्ताव आम्ही पाठविला आहे.

**सदस्य, भगवान भालेराव:—** आपल्या महापालिकेचे सेवा शर्ती अजुन पास झालेले नाही त्यामुळे ज्या मजुर संस्थेकडुन काम सुरू आहे त्यांच्याकडुनच मजुर पुरवठा करावा.

**सदस्या, श्रीमती. राजश्री चौधरी :—** आम्हाला याची पुर्ण माहिती मिळावी. सदर कर्मचा—यांच्या नियुक्तीसाठी किती खर्च होणार आहे.

**प्र. अग्निशमन अधिकारी, श्री. मिरपगारे :—** रू. १४,९२,७४०/— एवढा वार्षिक खर्च येत आहे.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे :—** अशाप्रकारे कायदेशीर भरती करू शकता का?

**प्र. अग्निशमन अधिकारी, श्री. मिरपगारे :—** अग्निशमन सेवा ही अत्यावश्यक सेवा असल्याने विशेष बाब म्हणून करता येते.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे :—** तुम्ही सभागृहाची दिशाभूल करत आहात, चुकीची माहिती देत आहात, मागे सचिवांकडे बैठक होती तेव्हा मीही तेथे होते, सचिवांनी आदेश दिले होते की, अग्निशमन यंत्रणेतील कर्मचा—यांची तुट त्वरीत भरून काढावी. एका महिन्यात कार्यवाही करावयाची होती तर आतापर्यंत का केले नाही.

**प्र. अग्निशमन अधिकारी, श्री. मिरपगारे :—** कार्यवाही सुरूच आहे.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे :—** नियमित स्वरूपात भरती करण्यात यावी.

**अति. आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :—** भरती प्रक्रीयेच्या नियमानुसार भरती प्रक्रीया करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** आपल्या महापालिकेच्या सेवा शर्ती नियमानुसार भरती प्रक्रीया राबवु शकतो का? सेवाप्रवेश नियम मंजूर आहेत का?

**प्र. अग्निशमन अधिकारी, श्री. मिरपगारे :—** अद्याप मंजूरी मिळालेली नाही.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे :—** भरती करण्यात यावी असा सचिवांचा आदेश असतांनाही १६ महिन्यात कार्यवाही का नाही करण्यात आली.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी</u> :— जो पर्यंत आपली भरती प्रक्रीया होत नाही तो पर्यंत आपण हा ठराव पास करावा.

<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया</u> :— सदर विषयात निर्णय काय घ्यायचा आहे.

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u> आपल्याला हा अधिकार नाही जो पर्यंत महापालिकेच्या सेवा शर्ती नियम पास होत नाही तो पर्यंत आपण भर्ती करू शकत नाही. तो पर्यंत ज्या मजुर संस्थेकडे काम आहे त्यांनाच हे काम देण्यात यावे. आपण सदर विषय सदस्यांना समजावून सांगा ना.

<u>अति. आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :—</u> शासनाचे आदेशानुसार सेवाप्रवेश नियमावलीत ज्या त्रुटी आहेत त्यांची पुर्तता करून प्रस्तावास मान्यता मिळणेसाठी पाठपुरावा करण्यात येईल.

<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया</u> :— प्रशासनास असे सांगण्यात येते की, अग्निशमन सेवा कर्मचा—यांच्या सेवाप्रवेश नियमावलीस मंजुरी मिळणेकामी पाठपुरावा करावा.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे</u> :— मग मागील १६ महिन्यांत कार्यवाही का नाही केली.

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u> सचिव मॅडम यावर आपण काहीतरी सांगावे. आपल्याला अधिकारच नाही म्हणुन तर अत्यावश्यक सेवा असल्यामुळे व कर्मचा—यांची कमतरता असल्यामुळे मजूर संस्थेकडून मनुष्यबळ घेण्यात येत आहे.

<u>सदस्या, श्रीमती. राजश्री चौधरी :—</u> आपण नियमित भरती करत नाहीत आणि ठोक पगारावर या लोकांना घेतो ते प्रशिक्षीत नसतात, तुटपुंज्या पगारात ते काम करतात, यापैकी कितीतरी कर्मचा—यांना अपघात झाला आहे, झाडे कापायला नेतात तेव्हादेखील कितीतरी कर्मचा—यांना दुखापत होत असते. याची जबाबदारी कोण घेणार, त्यांना त्याबदद्लचा खर्च मिळत नाही.

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u> लिडींग फायरमनची किती पदे मंजुर आहेत का?

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे</u> :— लिडींग फायरमनची किती पदे मंजूर आहेत

<u>प्र. अग्निशमन अधिकारी, श्री. मिरपगारे :—</u> लिडींग फायरमन पदाची १४ पदे मंजुर आहेत त्यापैकी ४ पदे भरलेली असुन १० पदे रिक्त आहेत. फायरमनची ६० पदे मंजूर आहेत त्यापैकी १४ कार्यरत आहेत ४६ रिक्त आहेत.

<u>सदस्य, डॉ. महेश गावडे</u> :— एवढी ४६ पदे रिक्त आहेत मग भरती प्रक्रीया का नाही करत आपण.

<u>प्र. अग्निशमन अधिकारी, श्री. मिरपगारे :—</u> लिडींग फायरमनच्या पदांना मंजूरीची आवश्यकता नाही.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे</u> :— जर आपण सांगत आहात की आपल्याकडे एवढी पदे मंजुर आहेत तर ती पदे भरण्यासाठी सेवा शर्ती आल्या कुठुन.

<u>प्र. अग्निशमन अधिकारी, श्री. मिरपगारे :—</u> महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालयाकडून सेवाप्रवेश नियमावलीस मान्यता मिळणे प्रलंबित आहे.

<u>सदस्य, डॉ. महेश गावडे</u> :— आजुबाजुच्या महापालिका ठाणे, कल्याणडोंबिवली यांचे निकष आहेत ना त्यानुसार तुम्ही मान्यता घेवु शकता ना.

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u> मागच्या महासभेमध्ये सुध्दा सांगितले आहे अग्निशमन विभागातील रिक्त पदे लवकरात लवकर भरण्यात यावीत.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे</u> :— या विषयाबाबत मी कोर्टात जाणार आहे, सरळसेवा भरती प्रक्रीया न करता आपण मजूर संस्थांमार्फत ठोक वेतनावर कर्मचारी नेमणूक करत आहात.

<u>प्र. अग्निशमन अधिकारी, श्री. मिरपगारे :—</u> सर्व महापालिकेसाठी अग्निशमन सेवा संचालनालयाकडे भरतीबाबत नियमावली तयार होत आहे त्यानंतर भरती प्रक्रीया राबविता येईल.

<u>अति. आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :—</u> भरती प्रक्रीयेच्या नियमानुसार भरती प्रक्रीया करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u> हे टेंडर कधीपासुन आहे.

<u>प्र. अग्निशमन अधिकारी, श्री. मिरपगारे :—</u> सन २०११ पासुन हे टेंडर आहे त्यांना आपण किमान वेतन कायद्यानुसार वेतन अदा करीत आहोत.

<u>सदस्य, श्री.भगवान भालेराव:—</u> किती वेळा मुदतवाढ दिली आहे.

<u>प्र. अग्निशमन अधिकारी, श्री. मिरपगारे :—</u> ६ वेळा मुदतवाढ दिली आहे.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे</u> :— या विषयास माझा विरोध आहे.

<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u> भरती प्रक्रीयेची कार्यवाही सुरू करावी तो पर्यंत यास मंजुरी दयावी.

<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया :—</u> ठराव असा बनवावा की महापालिकेच्या सेवा शर्ती नियम पारीत होऊन भरती प्रक्रीया राबविली जाईल तो पर्यंत हा प्रस्ताव पारीत करीत आहोत.

<u>प्र. महापालिका सचिव :—</u> कार्योत्तर मंजूरीसाठी हा विषय आला आहे.

<u>काही सदस्य :—</u> पास पास

<u>सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा :</u>— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १०** :—मजुर कामगार सहकारी संस्था मर्या. यांचेकडुन घेतलेले तात्पुरत्या स्वरुपातील फायरमन यांना कार्योत्तर मंजुरी देणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिकेतील अग्निशमन विभागातील दोन अग्निशमन केंद्राकरीता एकूण कार्यरत ०७ अग्निशमन वाहनावर कार्य करण्यासाठी शासन स्तरावर एकूण ६० फायरमन या संवर्गाची पदे मंजूर आहेत. त्यापैकी केवळ १४ फायरमनची पदे भरलेली आहेत. सबब ४६ पदे रिक्त असून उर्वरीत मंजुर पदावर फायरमनची नेमणूक करण्याची कार्यवाही सामान्य प्रशासन विभागामार्फत सुरू आहे.

महानगरपालिका अग्निशमन विभागाकरीता ६० फायरमन पदापैकी १४ पदे नियमानुसार भरती केलेली आहेत व ०४ प्रभारी फायरमन इतर विभागातील मजुर/सफाई कामगार या संवर्गातुन घेण्यात आलेले आहेत. त्यामुळे त्यांना नेहमी जादा तास काम करावे लागते. व त्यांना सुट्टी देखील घेता येत नाही. त्यामुळे ते सतत अग्निशमन अधिका—यास फायरमन भरती करण्याबाबतची मागणी करीत असतात.

अग्निशमन विभागातील कर्मचाऱ्यांना आगीसारख्या मानवनिर्मीत व नैर्सगीक आपत्तीना सामोरे जावे लागते. तसेच अग्निशमन विभाग हा २४ तास कार्यरत व तत्पर असतो. सध्याचा कर्मचारी वर्ग हा अत्यंत अल्प असुन फायर कॉल/स्पेशल कॉल हया वर्दीवर कार्य करणे अत्यंत अडचणीचे होत आहे.

शासन निर्णय क्रमांक अशस/१४०७/३६०/प्रक्र२११/नवि—२० दिनांक ३१/०८/२००९ च्या महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान मधील परिशिष्ट ड (भाग—२) अन्वये एक अग्निशमन वाहनासाठी एकुण ३२ अधिकारी/कर्मचारी असणे आवश्यक आहे. ते खालीलप्रमाणे दर्शविले आहे.

| अक्र | पदाचे नाव | आवश्यक मनुष्य बळ | |
|---|---|---|---|
| १ | अग्निशमन केंद्र अधिकारी | ०१ | ०१ |
| २ | उप—अग्निशमन अधिकारी | ०१ | ०१ |
| ३ | प्रमुख अग्निशमन विमोचक (लि.फा.) | ०१ | ०३ |
| ४ | चले यंत्रचालक | ०२ | ०६ |
| ५ | अग्निशामन विमोचक (फायरमन) | ०७ | २१ |
| | एकूण आठ तास कर्तव्यकाळ | १२ | |
| | एकूण आठ तास ३ पाळीत कर्तव्यकाळ | .... | ३२ |

सबब तातडीची बाब म्हणुन दि २१/७/२०११ पासून खाजगी कंपनी मेसर्स संतोषी मजुर कामगार सहकारी संस्था मार्यदीत ता. कल्याण जि. ठाणे यांचेकडुन Minimum Wages Act च्या दरानुसार १५ फायरमन घेण्यात आलेले होते. पुन्हा कार्यालयीन आदेश कं जा क्र उमपा/अग्नि/४७०/२०११ दिं ३१/१२/२०११ अन्वये मुदतवाढ देवून दि २१/१/२०१२ ते २०/३/२०१२ पर्यंत मेसर्स संतोषी मजुर कामगार सहकारी संस्था यांचेकडून तेच १५ फायरमन घेणेत आलेले आहे. दि ८/८/२०१२ रोजी निविदा काढून ठेका पध्दतीने प्रशिक्षित फायरमन घेण्यास मान्यता मिळणे कामी प्रस्ताव सादर करण्यात आला होता. परंतु मा. आयुक्त सो. यांचे टिपणीनुसार निविदेची प्रक्रियामध्ये सहाय्यक कामगार आयुक्त /असिस्टट डायरेक्टर यांचेकडून आवश्यक तरतूदी निश्चित करणेसाठी पत्र देणेत आले होते. निविदाधारकाने निविदेतील अटी व शर्तीचे पालन न केल्यामुळे निविदा प्रक्रिया पूर्ण झाली नाही.

अग्निशमन सेवा ही अत्यावश्यक सेवेचा विचार करून मा. आयुक्त सो. यांचे दिं २०/१०/२०१२ रोजीचे मंजुरीनुसार कार्यालयीन आदेश कं जा क्र उमपा/ अग्नि/ १११ /२०१२ दि २०/१०/२०१२ अन्वये मेसर्स जनता मजुर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. उल्हासनगर जि. ठाणे यांना मुदतवाढ देवून सध्या कार्यरत असलेले १५ फायरमन कार्यरत आहेत.

सदर फायरमन पद हे Minimum Wages Act च्या नोटीफीकेशन नुसार Seme Skilled या दर्जामध्ये धरले तर त्यांचा भत्ता सोबत जोडलेल्या नोटीफीकेशननुसार प्रती फायरमन रुपये करीता ८,२९३/— (आठ हजार दानशे त्र्यान्नव) एवढा खर्च प्रति महिना व १५ फायरमन करीता रू. ८,२९३ x १५ = १,२४,३९५/— (एक लाख चोविस हजार तीनशे पंच्यानव) एवढा

मासिक खर्च व रू. १४,९२,७४०/— (चौदा लाख ब्यान्नव हजार सातशे चाळीस) एवढा वार्षिक खर्च येत आहे. सध्या जे १५ फायरमन मजूर सहकारी संस्थेतर्फे कार्यरत आहे. त्यांची मुदत संपल्यानंतर सदर कर्मचारी निविदा प्रक्रियेद्वारे कंत्राटी पध्दतीने घ्यावयाचे आदेश प्राप्त झाले तेव्हा निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर मे. संतोषी मजूर सहकारी कामगार संस्थेची न्युनतम निविदा मंजुर झाल्यानंतर मा. आयुक्त सो. यांनी सुचना केल्या की प्रत्येक फायरमनला कामगार योजना लागू करणेत यावी व प्रत्येक फायरमनची रक्कम भविष्य निर्वाह निधीमधे जमा करणेत यावी. त्यानुसार मा. अधिक्षक कामगार विमा योजना यांना दि २२/७/२०१३ रोजी व मा. कामगार उप— आयुक्त यांना २८/७/२०१३ रोजी पत्र देवून मार्गदर्शन मागतिले होते. त्या अन्वये मा. सहाय्यक कामगार आयुक्त यांनी पत्राद्वारे असे कळविले की भविष्य निर्वाह निधी तसेच कामगार विमा योजना या सदंर्भातील अंमलबजावणी व इतर बाबींची कार्यवाही हया कार्यालयाकडून केली जात नाही. याबाबत भविष्य निर्वाह निधी कार्यालय ठाणे व कामगार विमा योजना सदंर्भात राज्य विमा योजना कार्यालय कल्याण यांचेकडे सपंर्क साधण्याकरीता सांगण्यात आले. तेव्हा संपर्काअंती कामगार विमा योजना कार्यालया तर्फे दि ८/१/२०१४ चे पत्रान्वये कळविले की कर्मचांऱ्याचे E.S.I. Act 1948 नुसार ज्या कर्मचांऱ्याचे वेतन १५०००/— रू पेक्षा कमी नसल्यास अशा कामगारांना विमा योजना लागू शकतात. करीता निविदाकाराच्या ही बाब निदर्शनास आणून देणेत आली. तेव्हा निविदाकाराने असे सांगितले की भविष्य

निर्वाह निधीची रक्कम मी वेतनामध्ये देण्यास तयार आहे व कामगार विमा योजनेऐवजी वर्कमॅन कम्पनसेशेन योजना देणेस तयार आहे.

तथापी सदरची बाब मान्य न झाल्याने निविदेतील अटी पूर्ण न झाल्यामुळे मिनिमम वेजेस ॲक्टनुसार सेमी स्किल्ड या वर्गामध्ये फायरमन या संवर्गातील कर्मचाऱ्याना ८२९३/— रू या वेतनावर मा. आयुक्त सो. यांचे मुदतवाढीचे मान्यतेनुसार या वेतनावर सदर मजूर सहकारी संस्थेच्या कर्मचाऱ्याना कार्यरत ठेवून अग्निशमन विभागाचे कार्य सुरू ठेवले आहे. निविदाकारांचे वाटाघाटीनुसार देवू केलेले १३०००/— रू वेतन यापेक्षा सध्या देणेत येत असलेले वेतन ८२९३/— हे वेतन खुप कमी असून महापालिकेचे प्रति फायरमन रू ४७०७/— बचत होत आहे.

आज रोजी अग्निशमन विभागात एकूण ०४ वर्षात अग्निशमन विभागातील ०४ कर्मचारी सेवानिवृत्त व ०१ कर्मचारी मयत झाले आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांची अत्यंत कमतरता आहे. त्यामुळे तात्पुरत्या स्वरूपात एकूण ०७ प्रशिक्षित फायरमन वाढवून १५ + ०७ एकूण २२ फायरमन असणे आवश्यक आहे.

या अनुषंगाने Minimum Wages Act नुसार सोबत जोडलेल्या अंदाज पत्रकानुसार वाढीव ०७ फायरमनकरीता १ महिन्याचे रू ५८०५१/— व सहा महीन्यांसाठी घेतल्यास महापालिकेचा रुपये एकूण खर्च रू ३,४८,३०६/— व एका वर्षाकरीता रू ६,९६,६१२/— इतका होणार आहे. परंतु सदर बाबत अग्निशमन विभागात तरतुद नसल्यामुळे सदर खर्च लेखाशिर्ष AA (२७) रोजंदारी या लेखा शिर्षातुन करणे प्रस्तावित करणेत येत आहे. अग्निशमन विभागाचे काम सुरळीत चालविणे करीता पुन: १५ प्रशिक्षित कार्यरत फायरमन व्यतिरिक्त + ०७ वाढीव प्रशिक्षित फायरमन यांना सहा महिन्यांकरीता घेणेस प्रस्तावित आहे.

सदर काम करून घेणेसाठी मुंबई प्रांतीक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (५) अंतर्गत रू. २५ लाख पर्यंत मा. आयुक्त सो. यांना अधिकार असल्याने सदर काम हे अत्यावश्यक सेवेचे कार्य असल्यांने कृपया प्रथम प्राधान्यांने सदर कामाच्या प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणे करीता तसेच सदर काम अत्यंत तातडीचे असल्यामुळे ज्यांनी राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, मुंबई येथुन प्रशिक्षण घेतलेले आहे अशा उमेदवारांना मजुर सहकारी संस्थेव्दारे तात्पुरता स्वरूपात काम करवून घेणेसाठी मंजूरी मिळावी.

तरी सबब मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे ५ चे कलम २ (२) अन्वये स्थायी समितीची मंजुरी प्राप्त करणेसाठी स्थायी समितीपूढे प्रस्ताव सादर करणेसाठी या प्रस्तावास अग्निशमन सेवा ही अत्यावश्यक सेवा असल्याने विशेष बाब म्हणून कार्यरत १५ फायरमन व्यतिरिक्त वाढीव ०७ फायरमन सहा महीन्यांसाठी घेतल्याने महापालिकेचा रुपये एकूण खर्च रू ३,४८,३०६/— एवढया प्राकलनीय रक्कमेस कार्येत्तर मंजुरी मिळणेसाठी स्थायी समितीस घेतलेल्या फायरमनची माहितीसाठी सादर करण्यात येत आहे

<u>स्थायी समिती ठराव क्र. </u> ५८        <u>दिनांकः— २/१२/२०१५</u>

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार मजुर कामगार सहकारी संस्था मर्या. यांचेकडुन घेतलेले तात्पुरत्या स्वरुपातील फायरमन यांना कार्योत्तर मंजुरी देत आहे.

तसेच प्रशासनास सेवा भरती नियमावली शासनाकडुन मंजुर करुन घेणेसाठी पाठपुरावा करणेचे निर्देश देत आहे.

सुचकाची <u>सही/—</u>

अनुमोदकाची <u>सही/—</u>

<u>मंजुर</u>

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>प्र.महापालिका सचिव :–</u> विषय क्र. ११ वाचुन दाखवितात.

———————————————————————————————————————————

⇨ **विषय क्र.११** :– सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत निविदा प्रक्रिया केलेल्या उल्हासनगर–५ येथिल गायकवाड पाडा मधील बॅरेक क्र. २०५८ ते शिवमंदिर टॅंकर पॉईंट येथे सी.सी. पेव्हमेंट रस्ता बांधणे या कामाकरीता मे. साई सिध्दनाथ कंस्ट्रक्शन यांच्या कमी दराच्या निविदेस मान्यता देणे.

———————————————————————————————————————————

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:–</u>** सदर विषय प्रलंबित ठेवण्यात यावा.

**<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया :–</u>** सदर विषय प्रलंबित ठेवुन नंतर घेण्यात यावा.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे :–</u>** संबंधित विभागातील कोणीच अधिकारी कसे आले नाहीत.

**<u>काही सदस्य :–</u>**सदरहु विषय वगळण्यात यावा.

**<u>सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा :–</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ११** :–सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत निविदा प्रक्रिया केलेल्या उल्हासनगर–५ येथिल गायकवाड पाडा मधील बॅरेक क्र. २०५८ ते शिवमंदिर टॅंकर पॉईंट येथे सी.सी. पेव्हमेंट रस्ता बांधणे या कामाकरीता मे. साई सिध्दनाथ कंस्ट्रक्शन यांच्या कमी दराच्या निविदेस मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिका प्रभाग क्षेत्र क.४ मधील मंजुरी मिळालेल्या **उल्हासनगर–५ येथील गायकवाड पाडा मधील बॅरेक क.२०५८ ते शिव मंदिर टॅंकर पॉईंट येथे सि.सि. पेव्हमेंट रस्ता बांधणे** या कामांकरीता बी–१ प्रकारच्या दोन भाग (तांत्रिक व आर्थिक) पध्दतीने नोंदणीकृत ठेकेदारांकडून दिनांक १५/०७/२०१५ रोजी निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्राकलनीय खर्च | रु.१३५०५१४९/– |
| २ | निविदा प्रसिध्द केलेली वर्तमानपत्रे | १) दै.नवशक्ती २) दै. हमारा महानगर |
| ३ | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक १५/०७/२०१५ |

| | | |
|---|---|---|
| ४ | निविदा विक्री कालावधी | दिनांक १७/०७/२०१५ ते २८/०९/२०१५ |
| ५ | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक ३०/०९/२०१५ |
| (अ) | प्रथम मुदतवाढ | दिनांक ०३/०९/२०१५ |
| (ब) | द्वितीय मुदतवाढ | दिनांक २४/०९/२०१५ |
| ६ | तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | दिनांक ०५/१०/२०१५ |
| ७ | आर्थिक भाग उघडण्याचा दिनांक | दिनांक ०५/१०/२०१५ |
| ८ | विक्री केलेल्या निविदांची संख्या | २ |
| ९ | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | २ |

**दिनांक** ०५/१०/२०१५ रोजी मा.अतिरिक्त आयुक्त, मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक, शहर अभियंता यांचे उपस्थितीत **उल्हासनगर–५ येथील गायकवाड पाडा मधील बॅरेक क्र.२०५८ ते शिव मंदिर टॅंकर पॉईंट येथे सि.सि. पेव्हमेंट रस्ता बांधणे** या कामाच्या निविदेचा तांत्रिक भाग उघडण्यात आला त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ. क्र. | निविदाकाराच्या निविदेमधील बाबी | मे. साई सिध्दनाथ कन्स्ट्रक्शन | मे.शुभम कन्स्ट्रक्शन |
|---|---|---|---|
| १ | निविदा प्रपत्रकाच्या खरेदीची पावती | होय | होय |
| २ | इसारा रक्कमेचा डी.डी. जोडला आहे का ? | होय | होय |
| ३ | महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्यात वर्ग–१–अ मध्ये नोंदणी असल्याचे प्रमाणपत्र जोडले आहे का? | होय | होय |
| ४ | अद्यावत आयकर रिटर्न भरल्याची पावती | होय | होय |
| ५ | कामाचा अनुभव | होय | नाही |
| | अ) ८० टक्के पहिल्या कामासाठी | – | – |
| | ब) ५० टक्के दुस–या कामासाठी | होय | – |
| | क) ४० टक्के तिस–या कामासाठी | – | – |
| | निविदाकाराने निविदा भरलेली रक्कम तपासणे. | | |
| ६ | निविदाकाराकडे उपलब्ध असलेल्या तांत्रिक कर्मचा–यांची माहिती | होय | होय |
| ७ | निविदा फॉर्म पुर्णपणे भरलेले (परिशिष्ट–१) | होय | होय |
| ८ | प्राधिकृत केलेल्या व्यक्तिसाठी निविदाकाराने द्यावयाचे | होय | होय |

| | | | |
|---|---|---|---|
| | प्रमाणपत्र (परिशिष्ट–२) | | |
| ९ | निविदाकाराने प्राधिकृत व्यक्तिसाठी दिलेला दाखला निविदाकार अंकलिखित असल्याचे नोटराईजड केलेले प्रतिज्ञापत्र (परिशिष्ट–३) | होय | होय |
| १० | निविदाकाराची सविस्तर माहिती (परिशिष्ट–४) | होय | होय |
| ११ | निविदाकाराची कामगिरी वरुन माहिती (परिशिष्ट–५) | होय | होय |
| १२ | संस्था/कंपनी नोंदणी (भागिदारी, मालकी, कंपनी इत्यादीचे) दस्तऐवज | होय | होय |
| १३ | व्हॅट नोंदणी प्रमाणपत्र | होय | होय |
| १४ | विक्रीकर/व्हॅट रिर्टन भरण्याची पावती | होय | होय |
| १५ | पॅन कार्डाची प्रत | होय | होय |
| १६ | निविदा भरतेवेळी निविदाकाराच्या हाती असलेल्या अथवा पूर्ण झालेल्या निविदा किंमती इतक्या सम कामाचा अनुभवाचा दाखला. | होय | होय |
| १७ | नाव, पदनाम व मोबाईल नंबर इत्यादी मुख्य कार्य अधिकारी स्तरावरील अधि–याचे अखत्यारित (प्रोब्लेम एक्सलेशन मेकॅनिझम) | होय | होय |
| १८ | प्लांट मशिनरी, व्हायब्रेटर रोलर, स्टॅटीक रोल्ट, पेव्हर फिनिशर यांची मालकी व असल्याचे दस्तऐवज | होय | होय |
| १९ | मेमोरण्डम पुर्णपणे भरलेले व स्वाक्षरी केलेले | होय | होय |
| २० | सॉलवन्सी सर्टीफिकेट | होय | होय |

सदर निविदांची सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये छाननी समिती मार्फत छाननी केली असता १) **मे. साई सिध्दनाथ कन्स्ट्रक्शन** २) **मे. शुभम कन्स्ट्रक्शन** यांच्या निविदा अटी शर्तीनुसार असल्याने पात्र आहेत. तरी उपरोक्त निविदाकारांच्या निविदांचा आर्थिक बाबींचा दुसरा भाग (आर्थिक दर) उघडण्यात आला. **मे. शुभम कन्स्ट्रक्शन** यांनी अनुभव प्रमाणपत्र सोबत जोडलेले नाही. सदर निविदेस ०२ वेळा मुदतवाढ देण्यात आली आहे

आज **दिनांक** ०५/१०/२०१५ रोजी उपरोक्त निविदाकारांचा आर्थिक बाबींचा दुसरा भाग (आर्थिक दर) मा.अतिरिक्त आयुक्त सो., यांचे अध्यक्षतेखालील निवड समिती सदस्य मुख्य लेखाअधिकारी, मुख्य लेखापरिक्षक, शहर अभियंता, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे उपस्थितीत उघडण्यात आला. त्याप्रमाणे निविदाकांरानी दिलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| १) **मे. साई सिध्दनाथ कन्स्ट्रक्शन** | दिलेले दर ०.५२ टक्के कमी |
| २) **मे. शुभम कन्स्ट्रक्शन** | दिलेले दर ५.५७ टक्के जास्त |

उपरोक्त निविदाकारांपैकी **मे. साई सिध्दनाथ कन्स्ट्रक्शन** यांनी दरसूची वर ०.५२ टक्के कमी (0.52% below) प्रमाणे दर दिले असुन त्याप्रमाणे **मे. साई सिध्दनाथ कन्स्ट्रक्शन** यांची सदर काम देणेकरिता शिफारस करण्यात येत आहे.

तरी **मे. साई सिध्दनाथ कन्स्ट्रक्शन** यांची दरसूचीपेक्षा ०.५२% कमी दराच्या निविदेस मा. स्थायी समितीची मान्यता मिळणेकरिता प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. ५८ अ                                                    दिनांकः— २/१२/२०१५

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वधारीया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत निविदा प्रक्रिया केलेल्या उल्हासनगर—५ येथिल गायकवाड पाडा मधील बॅरेक क्र. २०५८ ते शिवमंदिर टॅंकर पॉईंट येथे सी.सी. पेव्हमेंट रस्ता बांधणे या कामाकरीता मे. साई सिध्दनाथ कंस्ट्रक्शन यांच्या कमी दराच्या निविदेस मान्यता देण्याचा प्रस्ताव या कार्यसूचीवरुन वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

प्र.महापालिका सचिव :— विषय क्र. १२ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र.१२** :— सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत निविदा प्रक्रिया केलेल्या उल्हासनगर—४ येथिल स्वामी लिलाशहा नारी शाळा ते ओटी पर्यंत सी.सी. पेव्हमेंट रस्ता बांधणे या कामाकरीता मे. साई सिध्दनाथ कंस्ट्रक्शन यांच्या कमी दराच्या निविदेस मान्यता देणे.

---

प्र.महापालिका सचिव :— सदरहु विषयदेखील सार्व. बांधकाम विभागाचा आहे.

काही सदस्य :—सदरहु विषय प्रलंबित ठेवण्यात यावा.

सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा :— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १२** :— सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत निविदा प्रक्रिया केलेल्या उल्हासनगर—४ येथिल स्वामी लिलाशहा नारी शाळा ते ओटी पर्यंत सी.सी. पेव्हमेंट रस्ता बांधणे या कामाकरीता मे. साई सिध्दनाथ कंस्ट्रक्शन यांच्या कमी दराच्या निविदेस मान्यता देणे.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिका प्रभाग क्षेत्र क्र.३ मधील मंजुरी मिळालेल्या **उल्हासनगर—४ येथील स्वामी लिलाशहा नारी शाळा ते ओटी पर्यंत सि.सि. पेव्हमेंट रस्ता बांधणे** या कामांकरीता बी—१ प्रकारच्या दोन भाग (तांत्रिक व आर्थिक) पध्दतीने नोंदणीकृत ठेकेदारांकडून दिनांक १५/०७/२०१५ रोजी निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्राकलनीय खर्च | रु.६५२१७३९/— |
| २ | निविदा प्रसिध्द केलेली वर्तमानपत्रे | १) दै.नवशक्ती २) दै. हमारा महानगर |
| ३ | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक १५/०७/२०१५ |
| ४ | निविदा विक्री कालावधी | दिनांक १७/०७/२०१५ ते २८/०९/२०१५ |
| ५ | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक ३०/०९/२०१५ |
| अ) | प्रथम मुदतवाढ | दिनांक ०२/०९/२०१५ |
| ब) | द्वितीय मुदतवाढ | दिनांक १९/०९/२०१५ |
| क) | तृतीय मुदतवाढ | दिनांक २४/०९/२०१५ |
| ड) | चौथी मुदतवाढ | — |
| ६ | तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | दिनांक ०५/१०/२०१५ |
| ७ | आर्थिक भाग उघडण्याचा दिनांक | दिनांक ०५/१०/२०१५ |
| ८ | विक्री केलेल्या निविदांची संख्या | २ |
| ९ | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | २ |

**दिनांक** ०५/१०/२०१५ रोजी मा.अतिरिक्त आयुक्त, मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक, शहर अभियंता यांचे उपस्थितीत उल्हासनगर—४ येथील स्वामी लिलाशहा नारी शाळा ते ओटी पर्यंत सि.सि. पेव्हमेंट रस्ता बांधणे या कामाच्या निविदेचा तांत्रिक भाग उघडण्यात आला त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ. क्र. | निविदाकाराच्या निविदेमधील बाबी | मे. साई सिध्दनाथ कन्स्ट्रक्शन | मे.शुभम कन्स्ट्रक्शन |
|---|---|---|---|
| १ | निविदा प्रपत्रकाच्या खरेदीची पावती | होय | होय |
| २ | इसारा रक्कमेचा डी.डी. जोडला आहे का ? | होय | होय |
| ३ | महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्यात वर्ग—१—अ मध्ये नोंदणी असल्याचे प्रमाणपत्र जोडले आहे का? | होय | होय |
| ४ | अद्यावत आयकर रिटर्न भरल्याची पावती | होय | होय |
| ५ | कामाचा अनुभव | होय | नाही |
| | अ) ८० टक्के पहिल्या कामासाठी | — | — |
| | ब) ५० टक्के दुस—या कामासाठी | होय | — |
| | क) ४० टक्के तिस—या कामासाठी | — | — |

| | | | |
|---|---|---|---|
| | निविदाकाराने निविदा भरलेली रक्कम तपासणे. | | |
| ६ | निविदाकाराकडे उपलब्ध असलेल्या तांत्रिक कर्मचा—यांची माहिती | होय | होय |
| ७ | निविदा फॉर्म पुर्णपणे भरलेले (परिशिष्ट—१) | होय | होय |
| ८ | प्राधिकृत केलेल्या व्यक्तिसाठी निविदाकाराने द्यावयाचे प्रमाणपत्र (परिशिष्ट—२) | होय | होय |
| ९ | निविदाकाराने प्राधिकृत व्यक्तिसाठी दिलेला दाखला निविदाकार अंकलिखित असल्याचे नोटराईजड केलेले प्रतिज्ञापत्र (परिशिष्ट—३) | होय | होय |
| १० | निविदाकाराची सविस्तर माहिती (परिशिष्ट—४) | होय | होय |
| ११ | निविदाकाराची कामगिरी वरुन माहिती (परिशिष्ट—५) | होय | होय |
| १२ | संस्था/कंपनी नोंदणी (भागिदारी, मालकी, कंपनी इत्यादीचे) दस्तऐवज | होय | होय |
| १३ | व्हॅट नोंदणी प्रमाणपत्र | होय | होय |
| १४ | विक्रीकर/व्हॅट रिर्टन भरण्याची पावती | होय | होय |
| १५ | पॅन कार्डाची प्रत | होय | होय |
| १६ | निविदा भरतेवेळी निविदाकाराच्या हाती असलेल्या अथवा पूर्ण झालेल्या निविदा किंमती इतक्या सम कामाचा अनुभवाचा दाखला. | होय | होय |
| १७ | नाव, पदनाम व मोबाईल नंबर इत्यादी मुख्य कार्य अधिकारी स्तरावरील अधि—याचे अखत्यारित (प्रोब्लेम एक्सलेशन मेकॅनिझम) | होय | होय |
| १८ | प्लांट मशिनरी, व्हायब्रेटर रोलर, स्टॅटीक रोल्ट, पेव्हर फिनिशर यांची मालकी व असल्याचे दस्तऐवज | होय | होय |
| १९ | मेमोरण्डम पुर्णपणे भरलेले व स्वाक्षरी केलेले | होय | होय |
| २० | सॉलवन्सी सर्टीफिकेट | होय | होय |

सदर निविदांची सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये छाननी समिती मार्फत छाननी केली असता **१) मे. साई सिध्दनाथ कन्स्ट्रक्शन २) मे. शुभम कन्स्ट्रक्शन** यांच्या निविदा अटी शर्तीनुसार असल्याने पात्र आहेत. तरी उपरोक्त निविदाकारांच्या निविदांचा आर्थिक बाबींचा दुसरा भाग (आर्थिक दर) उघडण्यात आला. **मे. शुभम कन्स्ट्रक्शन** यांनी अनुभव प्रमाणपत्र सोबत जोडलेले नाही. सदर निविदेस ०३ वेळा मुदतवाढ देण्यात आली आहे

आज **दिनांक** ०५/१०/२०१५ रोजी उपरोक्त निविदाकारांचा आर्थिक बाबींचा दुसरा भाग (आर्थिक दर) मा. अतिरिक्त आयुक्त सो., यांचे अध्यक्षतेखालील निवड समिती सदस्य मुख्य लेखाअधिकारी, मुख्य लेखापरिक्षक, शहर अभियंता, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे उपस्थितीत उघडण्यात आला. त्याप्रमाणे निविदाकांरानी दिलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

१) **मे. साई सिध्दनाथ कन्स्ट्रक्शन** दिलेले दर ०.५२ टक्के कमी

२) **मे. शुभम कन्स्ट्रक्शन** दिलेले दर ५.५७ टक्के जास्त

उपरोक्त निविदाकारांपैकी मे. साई सिध्दनाथ कन्स्ट्रक्शन यांनी दरसूची वर ०.५२ टक्के कमी (0.52% below) प्रमाणे दर दिले असुन त्याप्रमाणे मे. साई सिध्दनाथ कन्स्ट्रक्शन यांची सदर काम देणेकरिता शिफारस करण्यात येत आहे.

तरी **मे.साई सिध्दनाथ कन्स्ट्रक्शन** यांची दरसूचीपेक्षा ०.५२% कमी दराच्या निविदेस मा. स्थायी समितीची मिळणेकरिता प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. ५८ब — दिनांकः— २/१२/२०१५

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वधारीया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत निविदा प्रक्रिया केलेल्या उल्हासनगर—४ येथिल स्वामी लिलाशहा नारी शाळा ते ओटी पर्यंत सी.सी. पेव्हमेंट रस्ता बांधणे या कामाकरीता मे. साई सिध्दनाथ कंस्ट्रक्शन यांच्या कमी दराच्या निविदेस मान्यता देण्याचा प्रस्ताव या कार्यसूचीवरुन वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

प्र.महापालिका सचिव :— विषय क्र. १३ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र.१३** :— उल्हासनगर शहरातील महिलांना प्रोत्साहन देणेसाठी आयोजित मंगळागौर सांस्कृतिक कार्यक्रमासाठी करण्यात आलेला खर्च मा. स्थायी समितीच्या माहितीसाठी नोंद करणे.

---

सदस्य, श्री. भगवान भालेराव :— सदरचा विषय महिला बाल कल्याण समितीचा आहे.

प्र.महापालिका सचिव :— सदर विषय माहितीसाठी नोंद करणेबाबत आलेला आहे.

काही सदस्य :— पास पास

सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा :— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १३** :—उल्हासनगर शहरातील महिलांना प्रोत्साहन देणेसाठी आयोजित मंगळागौर सांस्कृतिक कार्यक्रमासाठी करण्यात आलेला खर्च मा. स्थायी समितीच्या माहितीसाठी नोंद करणे.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिका महिला व बाल कल्याण समिती अंतर्गत विविध प्रकारचे योजना राबविण्यात येत आहेत.यावेळी महिला व बाल कल्याण समितीतर्फे उल्हासनगर महानगरपालिका कार्यालयात गेली अनेक वर्षे काम करित असलेले सर्व महिला पदाधिकारी व कर्मचारी व उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये गेली अनेक वर्षे उत्कृष्ठ काम करित असलेले महिला बचत गट व महिला मंडळे यांच्यासाठी माहे श्रावण महिन्यात मंगळागौर सांस्कृतीक कार्यक्रम आयोजित करण्यात येत असतो.

महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक संकिर्ण २००५/प्र.क्र.२५५/०५/नवि—२० दिनांक ८/११/२०१० व संकिर्ण २०१२/आर—११७७/नवि—२०दिनांक ५/०९/२०१२ अन्वये राखीव तरतुदीतुन महिला व बालकल्याण समितीने सोबत जोडलेल्या परिपत्रकानुसार खर्च करण्याबाबत निर्देश दिलेले आहे.सदर शासन निर्णयात शासनाने मान्य केलेल्या वरिल योजना तसेच इतर उपयुक्त योजना तयार करून राबविण्याचे पूर्ण अधिकार महानगरपालिकांच्या आयुक्तांना देण्याचे नमुद केले आहे.त्याप्रमाणे मा. आयुक्तांची मान्यता मिळाल्यास सदर योजना राबविण्यात येईल.

तरी या ही वर्षी मा. आयुक्त सो‍ा यांची दिनांक २७/०८/२०१५ मान्यतेने व महिला व बालकल्याण समिती ठराव क्रं. २ दिनांक २८/०८/२०१५ रोजी अन्वये उल्हासनगर शहरातील महिलांना प्रोत्साहन देणेसाठी मंगळवार दिनांक ०८/०८/२०१५ रोजी मंगळागौर सांस्कृतीक कार्यक्रम करणेसाठी संस्थेची नियुक्ती करण्यासाठी व त्यांचे साहित्याचे दर मागविण्यासाठी महापालिकेच्या सांकेतीक स्थळावर व नोटीस बोर्डवर जाहिर दरपत्रक सुचना प्रसिध्द करण्यात मान्यता दिलेली आहे.

तरी वेळ कमी असल्यामुळे सदर कार्यक्रमाकरिता खालील साहित्य उपलब्ध करून घेणे करिता महिला व बालकल्याण समिती मार्फत उमपा/मबाकस/२१ दिनांक ०४/०९/२०१५ अन्वये अल्प मुदतीची दरपत्रक सुचना वेबसाईड वर व महापालिकेच्या सुचना फलकावर प्रसिध्द करून दरपत्रके मागविण्यात आली होती.

| अनु.क्र | साहित्य | नग |
|---|---|---|
| १ | महिलांसाठी भेटवस्तु (कंटेनर) | १००० |
| | एकुण | |

तरी दिनांक ७/०९/२०१५ रोजी पूर्वी खालील तीन पुरवठादारांनी आपली दरपत्रके या कार्यालयास सादर केली आहेत.

१) वृंदा बहुउददेशिय सामाजिक शिक्षण संस्था, उल्हासनगर

२) सिध्दांत समाज विकास संस्था, उल्हासनगर

३) यशवंतराव यादव बहुउददेशिय संस्था, कल्याण

४) साईकृपा बहुउददेशिय संस्था, उल्हासनगर

सदर प्राप्त झालेली दरपत्रके मा. उप आयुक्त (मबाकस) यांच्या दालनात दिनांक ०७/०९/२०१५ रोजी संध्याकाळी ५:०० वाजता उघडण्यात आले.सदर दरपत्रकांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

| अ क्रं | तपशिल | आवश्यक परीमाण | पुरवठादाराचे नांव व त्यांनी सादर केलेले प्रति नग दर | | | | पुरवठादार वृंदा बहुउददेशिय सामाजिक शिक्षणसंस्था, उल्हासनगर यांचे प्राप्त न्युनत्तम दर रू. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | साईकृपा बहुउददेशिय संस्था, उल्हासनगर | सिध्दांत समाज विकास सेवा संस्था, उल्हासनगर | वृंदा बहुउददेशिय सामाजिक शिक्षण संस्था, उल्हासनगर | यशवंतराव यादव बहुउददेशिय संस्था, कल्याण | |
| १ | महिलांसाठी भेटवस्तू (कंटनेर) | १००० | २,१०,००० | १,९८,००० | १,९४,००० | १,९३,००० | १,९३,००० |
| | एकूण | | २,१०,००० | १,९८,००० | १,९४,००० | १,९३,००० | **१,९३,०००** |

तरी वरील दरपत्रकांत तुलनात्मक दृष्टया **कै. यशवंतराव यादव बहुउददेशिय संस्था, कल्याण** त्यांचे दर कमी आहेत.सदर प्राप्त झालेला दर बाजारभावापेक्षा वाजवी आहेत.सदर कार्यक्रमाचे आयोजन उल्हासनगर महानगरपालिका शहीद अरूणकुमार वैद्य सभागृह, उल्हासनगर ३ येथे करण्यात आले होते. सदर कार्यक्रमासाठी **कै. यशवंतराव यादव बहुउददेशिय संस्था, कल्याण** यांनी साहित्य पुरवठा केला असून एकूण साहित्य खरेदी करून घेण्यासाठी एकुण रूपये १,९३,०००/— {एक लाख त्र्यानव हजार} एवढा खर्च झालेला आहे.सदरचा खर्च रू. **१,९३,०००/—** हा महिला व बाल कल्याण समिती महिला व मुलांसाठी विविध स्पर्धा आयोजन व प्रोत्साहन या लेखाशिर्षात रू. ३५ लाख तरतुद उपलब्ध असून यामधुन करण्यात आला आहे.

तरी सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समिती च्या माहितीसाठी सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ५९ दिनांक:— २/१२/२०१५

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वधारीया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर शहरातील महिलांना प्रोत्साहन देणेसाठी आयोजित मंगळागौर सांस्कृतिक कार्यक्रमासाठी करण्यात आलेल्या खर्चाची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>प्र.महापालिका सचिव :—</u> विषय क्र. १४ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र.१४ :—** उल्हासनगर शहरातील महिलांना प्रोत्साहन देणेसाठी आयोजित मंगळागौर सांस्कृतिक कार्यक्रमासाठी करण्यात आलेला खर्चाची माहिती नोंद करणे.

---

<u>प्र.महापालिका सचिव :—</u> सदर विषय माहितीसाठी नोंद करणेबाबत आलेला आहे.

<u>काही सदस्य :—</u> पास पास

<u>सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १४ :—** उल्हासनगर शहरातील महिलांना प्रोत्साहन देणेसाठी आयोजित मंगळागौर सांस्कृतिक कार्यक्रमासाठी करण्यात आलेला खर्चाची माहिती नोंद करणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिका महिला व बाल कल्याण समिती अंतर्गत विविध प्रकारचे योजना राबविण्यात येत आहेत.यावेळी महिला व बाल कल्याण समितीतर्फे उल्हासनगर महानगरपालिका कार्यालयात गेली अनेक वर्षे काम करित असलेले सर्व महिला पदाधिकारी व कर्मचारी व उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये गेली अनेक वर्षे उत्कृष्ठ काम करित असलेले महिला बचत गट व महिला मंडळे यांच्यासाठी माहे श्रावण महिन्यात मंगळागौर सांस्कृतीक कार्यक्रम आयोजित करण्यात येत असतो.

महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक संकिर्ण २००५/प्र.क्र.२५५/०५/नवि—२० दिनांक ८/११/२०१० व संकिर्ण २०१२/आर—११७७/नवि—२०दिनांक ५/०९/२०१२ अन्वये राखीव तरतुदीतुन महिला व बालकल्याण समितीने सोबत जोडलेल्या परिपत्रकानुसार खर्च करण्याबाबत निर्देश दिलेले आहे.सदर शासन निर्णयात शासनाने मान्य केलेल्या वरिल योजना तसेच इतर उपयुक्त योजना तयार करून राबविण्याचे पूर्ण अधिकार महानगरपालिकांच्या आयुक्तांना देण्याचे नमुद केले आहे.त्याप्रमाणे मा. आयुक्तांची मान्यता मिळाल्यास सदर योजना राबविण्यात येईल.

तरी या ही वर्षी मा. आयुक्त सो यांची दिनांक २७/०८/२०१५ मान्यतेने व महिला व बालकल्याण समिती ठराव क्रं. २ दिनांक २८/०८/२०१५ रोजी अन्वये उल्हासनगर शहरातील महिलांना प्रोत्साहन देणेसाठी मंगळवार दिनांक ०८/०८/२०१५ रोजी मंगळागौर सांस्कृतीक कार्यक्रम करणेसाठी संस्थेची नियुक्ती करण्यासाठी व त्यांचे साहित्याचे दर मागविण्यासाठी महापालिकेच्या सांकेतीक स्थळावर व नोटीस बोर्डवर जाहिर दरपत्रक सुचना प्रसिध्द करण्यात मान्यता दिलेली आहे.

तरी वेळ कमी असल्यामुळे सदर कार्यक्रमाकरिता खालील साहित्य उपलब्ध करून घेणे करिता महिला व बालकल्याण समिती मार्फत उमपा/मबाकस/१९ दिनांक ०४/०९/२०१५ अन्वये अल्प

मुदतीची दरपत्रक सुचना वेबसाईड वर व महापालिकेच्या सुचना फलकावर प्रसिध्द करून दरपत्रके मागविण्यात आली होती.

| अनु.क्र | साहित्य | नग |
|---|---|---|
| १ | बॅनर्स फ्रेमसहित १० x १० चे (१००स्क्वेअर फुट) | १० |
| २ | मंगळागौर पुजन कार्यक्रम पथक | १ |
| ३ | सेलेब्रेटीज (सिनेकलाकार) | १ |
| ४ | सांस्कृतिक कार्यक्रम महिंलाच्या जिवनावर पथनाटय | १ |
| ५ | म्युझिक सिस्टम ४ तास | १ |
| ६ | बॅनर्स ३० x १० चे (६०० स्क्वेअर फुट) | २ |
| ७ | चहा | १००० |
| ८ | बिसलेरी पिण्याचे ग्लास | १००० |
| ९ | गजरे | १००० |
| १० | निमंत्रण पत्रिका | ५०० |
| ११ | स्टेज बॅनर्स १० x १५ चे (१०० स्क्वेअर फुट) | १ |
| | एकुण | |

तरी दिनांक ७/०९/२०१५ रोजी पूर्वी खालील तीन पुरवठादारांनी आपली दरपत्रके या कार्यालयास सादर केली आहेत.

१) वृंदा बहुउददेशिय सामाजिक शिक्षण संस्था, उल्हासनगर
२) सिध्दांत समाज विकास संस्था, उल्हासनगर
३) साईकृपा बहुउददेशिय संस्था, उल्हासनगर

सदर प्राप्त झालेली दरपत्रके मा. उप आयुक्त (मबाकस) यांच्या दालनात दिनांक ०७/०९/२०१५ रोजी संध्याकाळी ५:०० वाजता उघडण्यात आले.सदर दरपत्रकांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

| अ क्रं | तपशिल | आवश्यक परीमाण | पुरवठादाराचे नांव व त्यांनी सादर केलेले प्रति नग दर | | | पुरवठादार वृंदा बहुउददेशिय सामाजिक शिक्षण संस्था, उल्हासनगर यांचे प्राप्त न्युनत्तम दर रू. |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | साईकृपा बहुउददेशिय संस्था, उल्हासनगर | सिध्दांत समाज विकास सेवा संस्था, उल्हासनगर | वृंदा बहुउददेशिय सामाजिक शिक्षण संस्था, उल्हासनगर | |
| १ | बॅनर्स २० x १० चे (२०००स्क्वेअर फुट) | १० | ६६,००० | ६०,००० | ५०,००० | ५०,००० |
| २ | फ्रेमसहित बॅनर्स १० x १० चे (१००स्क्वेअर फुट) | १० | ३३,००० | ३०,००० | २५,००० | २५,००० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | बॅनर्स ३० x१० चे (६०० स्क्वेअर फुट | २ | १९,८०० | १२,००० | १५,००० | **१५,०००** |
| ४ | स्टेज बॅनर्स १० x १५ चे (१०० स्क्वेअर फुट) | १ | १८०० | २००० | १,५०० | **१,५००** |
| ५ | निमंत्रण पत्रिका | ५०० | ११,००० | ९,५०० | ८,००० | ८,००० |
| ६ | महापालिका महिला सदस्यां व मान्यवंर यांना (नास्ता | १०० | २१,५०० | २१,००० | १७,५०० | **१७,५००** |
| ७ | बिसलेरी पिण्याचे ग्लास | १००० | ९,००० | ८००० | ६,००० | **६,०००** |
| ८ | नास्ता पॅकेट (अल्पोहार १ समोसा,१ गुलाबजाम,वेफर्स एकत्रित) | १००० | ६५,००० | ६३,००० | ६१,००० | **६१,०००** |
| ९ | चहा | १००० | २०,००० | १९,००० | १३,००० | **१३,०००** |
| | एकूण | | २,३९,००० | २,२४,५०० | १,९४,००० | १,९४,००० |

तरी वरील दरपत्रकांच्या तुलनात्मक दृष्टया **वृंदा बहुउददेशिय सामाजिक शिक्षण संस्था, उल्हासनगर** यांनी एकूण साहित्य उपलब्ध करून देणेकरिता सादर केलेले दर रू. **१,९४,०००/—** हे कमी आहेत.सदर प्राप्त झालेले दर बाजारभावापेक्षा वाजवी आहेत.सदर कार्यक्रमासाठी साहित्य पुरविण्याबाबत **वृंदा बहुउददेशिय सामाजिक शिक्षण संस्था, उल्हासनगर** यांना आदेशित करणेकरिता प्रस्तावित केला असता मा. उप आयुक्त, मबाकस व मा. अतिरिक्त आयुक्त यांनी प्रसिध्दीसाठी आवश्यक असणाऱ्या बॅनर्स वरिल खर्च कमी करणे व आवश्यक तेवढेच बॅनर्स लावून इतरांची संख्या कमी करणेबाबत आदेशित केले होते.सदर बॅनर्स वरिल खर्च कमी करणेबाबत ठेकेदार वृंदा बहुउद्देशिय सामाजिक शिक्षण संस्था, उल्हासनगर यांना तोंडी कळविण्यात आले होते.सदर संस्थेने बॅनर्स वरिल खर्च खालील प्रमाणे कमी केलेला आहे.

| अनु. क्र | साहित्य | प्रस्तावित नग | कमि केलेले नग |
|---|---|---|---|
| १ | बॅनर्स फ्रेमसहित १० x १० चे (१००स्क्वेअर फुट) | १० | ६ |
| २ | बॅनर्स ३० x१० चे (६०० स्क्वेअर फुट) | २ | २ |
| ४ | बॅनर्स २० x१० चे (२००० स्क्वेअर फुट) | १० | ५ |

या अनुषंगाने वरिल प्रमाणे बॅनर्सची संख्या कमी करून पुरवठादार वृंदा बहुउद्देशिय सामाजिक शिक्षण संस्था, उल्हासनगर यांनी सादर केलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ क्रं | तपशिल | आवश्यक परीमाण | कमी केलेले नग | वृंदा बहुउददेशिय सामाजिक शिक्षण संस्था, उल्हासनगर | वृंदा बहुउददेशिय सामाजिक शिक्षण संस्था, उल्हासनगर वाटाघाटी अंती प्राप्त झालेले दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | बॅनर्स २० x१० चे (२०००स्क्वेअर फुट) | १० | ५ | ५०,००० | २५,००० |
| २ | फ्रेमसहित बॅनर्स १० x १० चे (१००स्क्वेअर फुट) | १० | ६ | २५,००० | १८,००० |
| ३ | बॅनर्स ३० x१० चे (६०० स्क्वेअर फुट | २ | २ | १५,००० | १५,००० |
| ४ | स्टेज बॅनर्स १० x१५ चे (१०० स्क्वेअर फुट) | १ | १ | १,५०० | १,५०० |
| ५ | निमंत्रण पत्रिका | ५०० | ५०० | ८,००० | ८,००० |
| ६ | महापालिका महिला सदस्यां व मान्यवंर यांना (नास्ता | १०० | १०० | १७,५०० | १७,५०० |
| ७ | बिसलेरी पिण्याचे ग्लास | १००० | १००० | ६,००० | ६,००० |
| ८ | नास्ता पॅकेट (अल्पोहार १ समोसा,१ गुलाबजाम,वेफर्स एकत्रित) | १००० | १००० | ६१,००० | ६१,००० |
| ९ | चहा | १००० | १००० | १३,००० | १३,००० |
| | एकूण | | | १,९४,००० | १,६५,००० |

या अनुषंगाने वरिल प्रमाणे बॅनर्सची संख्या कमी करून पुरवठादार **वृंदा बहुउद्देशिय सामाजिक शिक्षण संस्था, उल्हासनगर** यांना उमपा/मबाकस/१९ दिनांक ०८/०९/२०१५ अन्वये सदर कामाचा कार्यादेश देण्यात आला.सदर कार्यक्रमाचे आयोजन उल्हासनगर महानगरपालिका शहीद अरूणकुमार वैद्य सभागृह, उल्हासनगर ३ येथे करण्यात आले होते. यास्तव सदर कार्यक्रमासाठी **वृंदा बहुउददेशिय सामाजिक शिक्षण संस्था, उल्हासनगर** यांनी साहित्य पुरवठा केला असून एकूण साहित्य खरेदी करून घेण्यासाठी एकुण रूपये १,६५,०००/– {एक लाख पासष्ठ हजार फक्त} एवढा खर्च झालेला आहे.सदरचा खर्च रू. **१,६५,०००/–** हा महिला व बाल कल्याण समिती महिला व मुलांसाठी विविध स्पर्धा आयोजन व प्रोत्साहन या लेखाशिर्षात रू. ३५ लाख तरतुद उपलब्ध असून यामधुन करण्यात आला आहे.

तरी सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समिती च्या माहितीसाठी सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ६०                                                                      दिनांक:— २/१२/२०१५

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वधारीया

हो स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर शहरातील महिलांना प्रोत्साहन देणेसाठी आयोजित मंगळागौर सांस्कृतिक कार्यक्रमासाठी करण्यात आलेल्या खर्चाची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**प्र.महापालिका सचिव :—** विषय क्र. १५ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र.१५ :—** उल्हासनगर शहरातील महिलांना प्रोत्साहन देणेसाठी आयोजित मंगळागौर सांस्कृतिक कार्यक्रमासाठी करण्यात आलेला खर्चाची माहिती नोंद करणे.

---

**प्र. महापालिका सचिव :—** सदर विषय माहितीसाठी नोंद करणेबाबत आलेला आहे.

**काही सदस्य :—** पास पास

**सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १५ :—** उल्हासनगर शहरातील महिलांना प्रोत्साहन देणेसाठी आयोजित मंगळागौर सांस्कृतिक कार्यक्रमासाठी करण्यात आलेला खर्चाची माहिती नोंद करणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका महिला व बाल कल्याण समिती अंतर्गत विविध प्रकारचे योजना राबविण्यात येत आहेत.यावेळी महिला व बाल कल्याण समितीतर्फे उल्हासनगर महानगरपालिका कार्यालयात गेली अनेक वर्षे काम करित असलेले सर्व महिला पदाधिकारी व कर्मचारी व उल्हासनगर

महानगरपालिका क्षेत्रामध्ये गेली अनेक वर्षे उत्कृष्ठ काम करित असलेले महिला बचत गट व महिला मंडळे यांच्यासाठी माहे श्रावण महिन्यात मंगळागौर सांस्कृतीक कार्यक्रम आयोजित करण्यात येत असतो.

महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक संकिर्ण २००५/प्र.क्र.२५५/०५/नवि—२० दिनांक ८/११/२०१० व संकिर्ण २०१२/आर—११७७/नवि—२०दिनांक ५/०९/२०१२ अन्वये राखीव तरतुदीतुन महिला व बालकल्याण समितीने सोबत जोडलेल्या परिपत्रकानुसार खर्च करण्याबाबत निर्देश दिलेले आहे.सदर शासन निर्णयात शासनाने मान्य केलेल्या वरिल योजना तसेच इतर उपयुक्त योजना तयार करून राबविण्याचे पूर्ण अधिकार महानगरपालिकांच्या आयुक्तांना देण्याचे नमुद केले आहे.त्याप्रमाणे मा. आयुक्तांची मान्यता मिळाल्यास सदर योजना राबविण्यात येईल.

तरी या ही वर्षी मा. आयुक्त सो़ यांची दिनांक २७/०८/२०१५ मान्यतेने व महिला व बालकल्याण समिती ठराव क्रं. २ दिनांक २८/०८/२०१५ रोजी अन्वये उल्हासनगर शहरातील महिलांना प्रोत्साहन देणेसाठी मंगळवार दिनांक ०८/०९/२०१५ रोजी मंगळागौर सांस्कृतीक कार्यक्रम करणेसाठी संस्थेची नियुक्ती करण्यासाठी व त्यांचे साहित्याचे दर मागविण्यासाठी महापालिकेच्या सांकेतीक स्थळावर व नोटीस बोर्डवर जाहिर दरपत्रक सुचना प्रसिध्द करण्यात मान्यता दिलेली आहे.

तरी वेळ कमी असल्यामुळे सदर कार्यक्रमाकरिता खालील साहित्य उपलब्ध करून घेणे करिता महिला व बालकल्याण समिती मार्फत उमपा/मबाकस/२० दिनांक ०४/०९/२०१५ अन्वये अल्प मुदतीची दरपत्रक सुचना वेबसाईड वर व महापालिकेच्या सुचना फलकावर प्रसिध्द करून दरपत्रके मागविण्यात आली होती.

| अनु.क्र | साहित्य | नग |
|---|---|---|
| १ | मंगळागौर पुजन कार्यक्रम पथक | १ |
| २ | सेलेब्रेटी | १ |
| ३ | सांस्कृतिक कार्यक्रम महिंलाच्या जिवनावर पथनाटय | १ |
| ४ | म्युझिक सिस्टम ४ तास | १ |
| ५ | गजरे | ११०० |
| ६ | शॉल श्रीफळ | ५० |
| ७ | हार फुले मंगळागौरांचे पुजन सामान | १ |
| ८ | पुष्पगुच्छ मोठे | ७५ |
| | एकुण | |

तरी दिनांक ७/०९/२०१५ रोजी पूर्वी खालील तीन पुरवठादारांनी आपली दरपत्रके या कार्यालयास सादर केली आहेत.

१) वृंदा बहुउददेशिय सामाजिक शिक्षण संस्था, उल्हासनगर

२) सिध्दांत समाज विकास संस्था, उल्हासनगर

३) साईकृपा बहुउददेशिय संस्था, उल्हासनगर

सदर प्राप्त झालेली दरपत्रके मा. उप आयुक्त (मबाकस) यांच्या दालनात दिनांक ०७/०९/२०१५ रोजी संध्याकाळी ५:०० वाजता उघडण्यात आले.सदर दरपत्रकांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

| अ क्रं | तपशिल | आवश्यक परीमाण | पुरवठादाराचे नांव व त्यांनी सादर केलेले प्रति नग दर | | | पुरवठादार वृंदा बहुउददेशिय सामाजिक शिक्षण संस्था, उल्हासनगर यांचे प्राप्त न्युनत्तम दर रू. |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | साईकृपा बहुउददेशिय संस्था, उल्हासनगर | सिध्दांत समाज विकास सेवा संस्था, उल्हासनगर | वृंदा बहुउददेशिय सामाजिक शिक्षण संस्था, उल्हासनगर | |
| १ | मंगळागौर पुजन कार्यक्रम पथक | १ | ३३,५०० | ३३,५०० | ३१,५०० | ३१,५०० |
| २ | सेलेब्रेटी | १ | ४१,००० | ४१,५०० | ४०,००० | ४०,००० |
| ३ | सांस्कृतिक कार्यक्रम महिंलाच्या जिवनावर पथनाटय | १ | ३९,००० | ३९,००० | ३७,००० | ३७,००० |
| ४ | म्युझिक सिस्टम ४ तास | १ | १०,८०० | १०,४०० | १०,००० | १०,००० |
| ५ | गजरे | ११०० | १७,००० | १७,००० | १५,००० | १५,००० |
| ६ | शॉल श्रीफळ | ५० | ३०,००० | ३५,००० | २२,५०० | २२,५०० |
| ७ | हार फुले मंगळागौरांचे पुजन सामान | १ | ६,५०० | ६००० | ५,५०० | ५,५०० |
| ८ | पुष्पगुच्छ मोठे | ७५ | १६,८७५ | १९,८७५ | १८,७५० | १८,७५० |
| | एकूण | | २,११,५५० | २,०२,२७५ | १,८०,२५० | १,८०,२५० |

तरी वरील दरपत्रकांच्या तुलनात्मक दृष्टया **वृंदा बहुउददेशिय सामाजिक शिक्षण संस्था, उल्हासनगर** त्यांचे दर कमी आहेत.सदर प्राप्त झालेला दर बाजारभावापेक्षा वाजवी आहेत.सदर कार्यक्रमाचे आयोजन उल्हासनगर महानगरपालिका शहीद अरूणकुमार वैद्य सभागृह, उल्हासनगर ३ येथे करण्यात आले होते. सदर कार्यक्रमासाठी **वृंदा बहुउददेशिय सामाजिक शिक्षण संस्था, उल्हासनगर** यांनी साहित्य पुरवठा केला असून एकूण साहित्य खरेदी करून घेण्यासाठी एकुण रूपये १,८०,२५०/— {एक लाख ऐंशी हजार दोनशे पन्नास फक्त} एवढा खर्च झालेला आहे.सदरचा खर्च रू. **१,८०,२५०/—** हा महिला व बाल कल्याण समिती महिला व मुलांसाठी विविध स्पर्धा आयोजन व प्रोत्साहन या लेखाशिर्षात रू. ३५ लाख तरतुद उपलब्ध असून यामधुन करण्यात आला आहे.

तरी सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समिती च्या माहितीसाठी सादर करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र. ६१** दिनांकः— २/१२/२०१५

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वधारीया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर शहरातील महिलांना प्रोत्साहन देणेसाठी आयोजित मंगळागौर सांस्कृतिक कार्यक्रमासाठी करण्यात आलेल्या खर्चाची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

प्र.महापालिका सचिव :— विषय क्र. १६ वाचुन दाखवितात.

————————————————————————————————————————

⇨ **विषय क्र.१६** :— वाहतुक नियमनासाठी सन २०१५—१६ साठी २५ 'ट्रफिक वॉर्डन' चे अर्थसहाय्यास मंजुरी देणे.

————————————————————————————————————————

**सदस्य, श्री. राजेश वधारीया :—** कोण अधिकारी उत्तर देणार?

**सदस्य, डॉ. महेश गावडे :—** या विषयाची माहिती कोण देणार?

**सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी :—** ट्रफिक वार्डन काय काम करतात. व किती आहेत त्यांच्यावर नियंत्रण कोणाचे असते. कधी हे लोक रस्त्यात दिसत नाहीत.

**प्र. वाहन व्यवस्थापक, श्री.यशवंत सगळे :—** २५ वार्डन आहेत. वाहतुक पोलिस अधिकारी यांना सहाय्यक म्हणुन यांची नियुक्ती केलेली आहे.

**सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी :—** यांना आपण अर्थसहाय्य करित आहोत मग यावर नियंत्रण हि आपले असावे आणि आपण यांना किती वर्ष असेच पैसे देणार आहोत, ३ वर्षापुर्वी आपण ठराव केला होता की आपण त्यानां १ वर्षाकरिता नेमत आहोत नंतर वाहतुक शाखा भरती प्रक्रीया करून ते नेमणार होते. मागे त्यांचे अधिकारी आले होते त्यावेळेस त्यांना आम्ही कुठला वार्डन कोठे असणार त्यांच्या नावांसहित मोबाईल क्रमांक देण्यास सांगितले होते. तेही अद्याप मिळालेले नाहीत. सद्यस्थितीत महापालिकेची आर्थिक स्थिती हलाखीची असल्याने हा अतिरिक्त बोजा पडणार आहे.

**सदस्य, डॉ. महेश गावडे :—** अर्थसहाय्य केव्हापासून देत आहोत.

**प्र. वाहन व्यवस्थापक, श्री.यशवंत सगळे :—** तीन वर्षापासून अर्थसहाय्य देण्यात येते.

**सदस्य, डॉ. महेश गावडे :—** तीन वर्षापुर्वी काय स्थिती होती.

**प्र. वाहन व्यवस्थापक, श्री.यशवंत सगळे :—** यापुर्वी पोलिस विभागामार्फत अर्थसहाय्य दिले जात होते.

<u>सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी :—</u> हि सर्व जबाबदारी वाहतुक पोलिस शाखेची आणि शहर पोलिस विभागाची आहे, परंतु २५ ट्रफिक वार्डन नेमुन त्यांचेवर संपुर्ण शहराच्या वाहतुक समस्येची जबाबदारी टाकलेली आहे. आणि हे वाहतुक पोलिस अधिकारी असतात ते एका बाजुला उभे राहुन नियमभंग करणा—या प्रवाशांकडून पावती फाडून पैसे वसुल करीत असतात.

<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u> अर्थसहाय्य तर दयावे लागेलच ना, सर्व महापालिकांमध्ये असेच सुरू आहे.

<u>सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी :—</u> आता महापालिकेची आर्थिक स्थितीसुध्दा खराब आहे. आता महापालिकेकडेसुध्दा फंड नाही त्यामुळे आता अर्थसहाय्य देणे उचीत होणार नाही. महापालिकेवर खर्चाचा किती बोजा पडत आहे.

<u>प्र. वाहन व्यवस्थापक, श्री.यशवंत सगळे :—</u> रू. १२ लाख वार्षिक खर्च होणार आहे.

<u>सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी :—</u> अजुनपर्यंत सदस्यांना नगरसेवक निधी, प्रभागसमिती निधी मिळालेला नाही.

<u>सदस्य, डॉ. महेश गावडे :—</u> हे वॉर्डन डयुटीवर असतात का? कधी भर रस्त्यात गाडी उभी असते ते हे लोक काढण्यासाठी उभे नसतात.

<u>प्र. वाहन व्यवस्थापक, श्री.यशवंत सगळे :—</u> हो असतात ना, त्यांचेवर नियंत्रण वाहतुक शाखेचे असते.

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव :—</u> चौधरी मॅडम सभापती असतांना आम्ही त्यांचे नाव व मोबाईल नंबर सर्व नगरसेवकांना दयावे असे सांगितले होते.

<u>सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी :—</u> सन्मानीय नगरसेविका रेखा ठाकुर यांनी कॉलेज युवकांच्या मदतीने जनजागृती रॅली काढली होती त्यावेळेस वाहतुकीची समस्या काही प्रमाणात सूटली होती. सदर विषय वगळण्यात यावा.

<u>काही सदस्य :—</u>सदरहु विषय वगळण्यात यावा.

<u>सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑

**विषय क्र. १६ :—** वाहतुक नियमनासाठी सन २०१५—१६ साठी २५ 'ट्रफिक वॉर्डन' चे अर्थसहाय्यास मंजुरी देणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिकेकडून मा. स्थायी समिती ठराव क्रं. ७१ दिनांक ०२/०१/२०१५ अन्वये वाहतुक शाखेस उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे २५ ट्रॉफिक वॉर्डन यांना खालील अटी व शर्तीच्या आधारे देय मानधनावरील खर्च अर्थसहाय्य स्वरुपात देणेस मान्यता दिलेली होती.

१) संबंधित २५ ट्रॅफिक वॉर्डन नियुक्ती करण्याची जबाबदारी पोलिस विभागाची राहील.

२) संबंधित २५ ट्रॅफिक वॉर्डन यांना प्रतिमहा रु.४०००/— मानधन महानगरपालिकेतर्फे सहाय्यक पोलिस आयुक्त, शहर वाहतूक शाखा, उल्हासनगर विभाग यांचेकडून देयक प्राप्त झाल्यावर अर्थसहाय्य स्वरुपात देण्यात येईल.

३) २५ ट्रॅफिक वॉर्डन यांचे मानधनापोटी वार्षिक रक्कम रु.१२,००,०००/– खर्च अपेक्षित आहे.सदर खर्च वर्ष २०१५–१६ चे अंदाजपत्रकात सी ५ (६) वाहतूक नियंत्रण या लेखाशिर्षात १.५० कोटी एवढया उपलब्ध तरतूदी मधून करणेस मान्यता मिळणेस मा.स्थायी समिती समोर प्रस्तावित करणेत येत आहे.

४) ट्रॅफिक वॉर्डन यांच्या सेवेचा महानगरपालिकेशी कोणताही संबंध राहणार नाही.

५) ट्रॅफिक वॉर्डन यांना सेवेत असताना काही अपघात झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी पोलिस विभागाची राहिल.

६) याबाबत भविष्यात कोणताही न्यायालयीन वाद उद्‌भवल्यास त्याची जबाबदारी पोलिस विभागाची राहिल.

नियुक्तीचा एक वर्षाचा कार्यकाल दिनांक ३१ ऑगस्ट २०१५ मध्ये संपुष्ठात येत आहे.

या अनुषंगाने मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत सर्व विभाग प्रमुख व पोलिस विभाग यांच्या समवेत वाहतुक समस्या बाबत झालेल्या चर्चेत ट्रॉफिक वार्डन यांची नियुक्तीची वैधता संपल्यामुळे दिनांक ३१/८/२०१६ पर्यत त्यांना अर्थसहाय्य मंजुरी मिळणेबाबत सदर प्रस्थाव मा. स्थायी समिती समोर मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ६१अ</u> <u>दिनांकः– २/१२/२०१५</u>

सुचकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेश वधारीया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार वाहतुक नियमनासाठी सन २०१५–१६ साठी २५ 'ट्रफिक वॉर्डन' चे अर्थसहाय्य देण्याचा प्रस्ताव या कार्यसूचीवरुन वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची <u>सही/–</u>

अनुमोदकाची <u>सही/–</u>

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>प्र.महापालिका सचिव :–</u> विषय क्र. १७ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र.१७** :– ई–निविदा क्र. १३४ उल्हासनगर शहराच्या अंतर्गत कॅम्प नं. १ ते ५ मध्ये भुयारी गटार व चेंबर्सचे साफसफाई करणेसाठी मजुर पुरवठा करणेच्या कामास मान्यता देणे.

---

<u>कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा), श्री. सेलवन :</u>— सदर कामासाठी निविदा मागविण्यात आल्या आहेत व निविदाकारांनी अॅट पारचे दर सादर केलेले आहेत.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :</u>— सदर ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्ताची वाट न पहाता करण्यात यावी.

<u>काही सदस्य :—</u> पास पास

<u>सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा :</u>— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १७ :—** ई—निविदा क्र. १३४ उल्हासनगर शहराच्या अंतर्गत कॅम्प नं. १ ते ५ मध्ये भुयारी गटार व चेंबर्सचे साफसफाई करणेसाठी मजुर पुरवठा करणेच्या कामास मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर शहराच्या अंतर्गत कॅम्प नं. १ ते ५ मध्ये भुयारी गटार व चेंबर्सचे साफसफाई करणेसाठी मजुर पुरवठा करणेबाबतच्या कामाकरीता तांत्रिक व आर्थीक पध्द्तीने नोंदणीकृत ठेकेदाराकडुन ई—निविदा पध्द्तीने मागविण्यात आल्या त्यांची माहिती खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्राकलनीय खर्च | रू. ३७,४५,९४२/— |
| २ | निविदा प्रसिध्द | दि. २७/१/२०१५ |
| ३ | प्रथम मुदतवाढ | दि. २३/२/२०१५ |
| ४ | द्वितीय मुदतवाढ | दि. ५/३/२०१५ |
| ५ | निविदा प्रसिध्द केलेली वर्तमानपत्रे | वार्ताहर,उल्हासविकास,दैनिक वार्ताहार, दैनिक सामना |
| ६ | निविदा प्रसिध्द केल्याचा दिनांक | दि. ०६/२/२०१५ ते दि. २९/२/२०१५ पर्यंत वेळ ११ ते १५ वाजेपर्यंत |
| ७ | निविदा विक्री व स्विकृती कालावधी | दि. ६/२/२०१५ ते १७/३/२०१५ वेळ ११ ते १५ वाजेपर्यंत |
| ८ | निविदा सादर करावयाचा अंतिम दिनांक | दि. १८/३/२०१५ ते दि. २०/३/२०१५ |
| ९ | तांत्रिकबाब उघडल्याचा दिनांक | दि. १५/५/२०१५ |
| १० | आर्थिक बाब उघडल्याचा दिनांक | दि. ०१/९/२०१५ |
| ११ | विक्री केलेल्या निविदांची संख्या | ०—२ |
| २२ | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ०—२ |

दि. १५/५/२०१५ रोजी मा. अतिरीक्त आयुक्त यांच्या अध्यक्षतेच्या खाली निवड समिती सदस्या व कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा यांच्या उपस्थितीत समोर उल्हासनगर शहराच्या अंतर्गत कॅम्प नं. १ ते ५ मध्ये भुयारी गटार व चेंबर्स चे साफसफाई करणेसाठी मजुर पुरवठा करणेबाबत याकामाच्या निविदेचा तांत्रिक भाग उघडण्यात आला त्याचा तपशिल खालील प्रमाणे

| निविदा क्र. | कामाचा तपशिल | प्रकल्प निहाय किंमत | निविदाकार | नोंदणी प्रमाणपत्र व वर्ग | काम केल्याचे प्रमाणपत्र | जाईन्ट व्हॅनचर | पेन कार्ड |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १३४ | उल्हासनगर शहराच्या अंतर्गत कॅम्प नं. १ ते ५ मध्ये भुयारी गटार व चेंबर्स चे साफसफाई करणेसाठी मजुर पुरवठा करणेबाबत | ३७,४५,९४२/– | श्री.मा. कन्ट्रक्शन कंपनी | होय | होय | आवश्यकता नाही | ✓ |
| | | | अे.एम.रामचंदाणी, उल्हासनगर | होय | होय | आवश्यकता नाही | ✓ |

सदर निविदेची पाणी पुरवठा मध्ये छाननी केली असता १) श्री. मा.कन्स्ट्रक्शन कंपनी २) अे.एम.रामचंदाणी उल्हासनगर– यांच्या निविदा अटी व शर्ती नुसार आहेत तरी उपरोक्त निविदा काराचा दुसरा भाग आर्थिक बाबी संदर्भात दि. १/९/२०१५ रोजी निविदा कारांच्या (आर्थिक दर) अतिरीक्त आयुक्त सो. यांच्या अध्यक्षते खाली निवड समितीतील सदस्य यांच्या उपस्थितीत उघडण्यात आला त्या प्रमाणे निविदा काराणे दिलेले दर खालील प्रमाणे आहेत.

निविदा क्र. १३४ मध्ये दिलेल्या प्रकल्पाची एकूण किंमत ३७,४५,९४२/– रूपये ऐवढी आहे.

| अ. क्र. | निविदा कारकाचे नाव | निविदा कारकाने नमुद केलेले दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | श्री. मा. कन्ट्रक्शन कंपनी | ४३,०७,८३३.३/– | दिलेले दरापेक्षा १५ टक्के जास्त |
| २ | अे.एम.रामचंदाणी, उल्हासनगर | ४३,५२,७८४.६/– | दिलेले दरापेक्षा १६.२० टक्के जास्त |

सदर निविदेस दुस–यांना मुदतवाढ देण्यात आलेली होती.

अ.क्र. १) अे.एम. रामचंदाणी, उल्हासनगर यांनी महापालिकेने ठरविलेल्या रक्कमे पेक्षा १५ टक्के रक्कम जास्त भरलेली आहे. अ.क्र. २) श्री. मा. कन्ट्रक्शन कंपनी यांनी महापालिकेने ठरविलेल्या रक्कमे पेक्षा १६.२० टक्के रक्कम जास्त भरलेली आहे.

निविदा समिती अध्यक्ष यांच्या दालनात दि. ८/९/२०१५ रोजी निविदाकारास वाटाघाटी करीता बोलविण्यात आलेले होते. त्यावेळेस अ.क्र. १) श्री. मा कन्ट्रक्शन कंपनी यांनी निविदा क्र. १३४ मधे १५ टक्के जास्तीची रक्कम दिलेली होती. त्यामध्ये १०.०६ टक्के रक्कम कमी करत असुन प्रकल्पाचे एकूण रू. ३७,४५,९४२/– या रक्कमेवर ४.९४ टक्के रक्कम जास्त आकारून सदरचे रू.३९,३०,९९२/– एवढया रक्कमेवर काम करण्यास तयार आहे. असे पत्रव्दारे दि.८/९/२०१५ रोजी कळविले होते. सदर बाब निविदा समितीपुढे सादर करण्यात आले होते.

निविदा समितीच्या अंतिम निर्णयानुसार निविदेतील दर रु.३७४५९४२/– याप्रमाणे म्हणजेच किंमतीच्या (At Par) दराप्रमाणे काम करणेकरीता शिफारशीसह प्रस्ताव मा. स्थायी समितीपुढे मान्यतेसाठी सादर.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ६२</u> <u>दिनांक:– २/१२/२०१५</u>

सुचकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वधारीया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार ई—निविदा क्र. १३४ अन्वये उल्हासनगर शहराच्या अंतर्गत कॅम्प नं. १ ते ५ मध्ये भुयारी गटार व चेंबर्सचे साफसफाई करणेसाठी मजुर पुरवठा करणेकामी श्री. मा. कन्स्ट्रक्शन कंपनी यांना ॲटपर दराने काम करणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>प्र.महापालिका सचिव :—</u> विषय क्र. १८ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र.१८ :—** उल्हासनगर—३ येथील सपना उद्यान येथे सिंधुभवन बनविणेच्या कामाचे तयार करण्यात आलेल्या प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देवुन कामांची ई—निविदा प्रक्रिया करणेस मान्यता देणे.

---

<u>**सदस्य, श्री. भगवान भालेराव :—**</u> सार्वजनिक बांधकाम विभागाचे एकही अधिकारी नसल्याने हा विषय नंतर घेण्यात यावा.

<u>**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—**</u> सार्वजनिक बांधकाम विभागाचा विषय आहे त्यामुळे प्रलंबित ठेवण्यात यावा.

<u>**काही सदस्य :—**</u>सदरहु विषय प्रलंबित ठेवण्यात यावा.

<u>**सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा :—**</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १८ :—** उल्हासनगर—३ येथील सपना उद्यान येथे सिंधुभवन बनविणेच्या कामाचे तयार करण्यात आलेल्या प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देवुन कामांची ई—निविदा प्रक्रिया करणेस मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

उपरोक्त विषयान्वये उल्हासनगर–३ येथील सपना उद्यान येथे तळमजला + पहिला मजला असे सिंधुभवन बनविणेकरीता मा.आमदार महोदया तसेच मा.श्री.राम (चार्ली) पारवानी, गटनेता व मा.श्री.नरेंद्र के.ठाकूर (कुमारी ) यांनी त्यांचे संदर्भिय पत्रान्वये विनंती केली असून तळमजल्यावर पार्कींग व पहिल्या मजल्यावर सिंधु भवन बनवावे असे कळविले होते. सदर कामासाठी अर्थसंकल्पात पान क्र.४१ अनु.क्र.२३ (१२१) वर उल्हासनगर–३ येथील राजीव गांधी उद्यान (सपना गार्डन) या ठिकाणी महापालिकेतर्फे नविन सिंधुभवन निर्माण करण्याकरीता रु. १.०० कोटी रक्कमेची (पूर्वीचे २५ लाख वाढीव ७५ लाख) तरतूद ठेवण्यात आली असल्याने सदर कामाचे प्राकलन तयार करणेकरीता मान्यता मिळणेकरीता प्रस्तावित करण्यात आले होते. मा.आयुक्त सो. यांची सदर कामाचे प्राकलन तयार करण्यास मान्यता प्राप्त झाली आहे.

त्यानुसार महापालिकेचे स्थापत्य सल्लागार यांचेमार्फत उल्हासनगर–३ येथील सपना उद्यान येथे वाचनालय जवळ तळमजला + पहिला मजला असे सिंधुभवन बनविण्याच्या कामाचे प्राकलन तयार करण्यात आले असून त्याची प्राकलनिय किंमत रु.१,१९,७०,६१३/– एवढी होत आहे. महापालिकेच्या अंदाजपत्रकात सदर कामासाठी रु.१.०० कोटीची तरतूद आहे. उर्वरीत रु.२०.०० लक्ष मा.श्री.नरेंद्र के.ठाकूर हे त्यांचे विरोधी पक्ष नेता निधीतून देण्यास तयार असल्याचे त्यांनी त्यांचे दिनांक  पत्रान्वये कळविले आहे.

तरी वरीलप्रमाणे सदर कामासाठी उपलब्ध तरतूद लक्षात घेता कामाचे प्राकलनास मा.स्थायी समितीकडून प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळून कामाची ई निविदा मागविणेस मान्यता मिळणेस सदर प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे ठेवणेस सविनय सादर.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ६२अ</u>  <u>दिनांक:– २/१२/२०१५</u>

सुचकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेश वधारीया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर–३ येथील सपना उद्यान येथे सिंधुभवन बनविणेच्या कामाचे तयार करण्यात आलेल्या प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देवुन कामांची ई–निविदा प्रक्रिया करणेस मान्यता देण्याचा प्रस्ताव या कार्यसूचीवरुन वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची <u>सही/–</u>

अनुमोदकाची <u>सही/–</u>

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>प्र.महापालिका सचिव :–</u> विषय क्र. १९ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र.१९:–** उल्हासनगर शहरातील कॅम्प ४ येथील नागेश्वर मंदीर येथे २०० मि.मि. व्यासाची आर.

सी.सी. एन.पी. क्लास २ व ३०० मि.मि. व्यासाची आर.सी.सी. एन.पी. क्लास ३ ची मलवाहिनी टाकणेच्या झालेल्या कामास मान्यता मिळणेबाबत.

---

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव :—</u> सेलवन साहेब काम झाले आहे ना.

<u>कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा), श्री. सेलवन:—</u> होय, काम झाले आहे.

<u>काही सदस्य :—</u> पास पास

<u>सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १९** :—उल्हासनगर शहरातील कॅम्प ४ येथील नागेश्वर मंदीर येथे २०० मि.मि. व्यासाची आर.सी.सी. एन.पी. क्लास २ व ३०० मि.मि. व्यासाची आर.सी.सी. एन.पी. क्लास ३ ची मलवाहिनी टाकणेच्या झालेल्या कामास मान्यता मिळणेबाबत.

<u>प्रस्तावना</u>

उपरोक्त विषयांकित प्रकरणी सादर करण्यात येते की, उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत शहरात उपरोक्त ठिकाणच्या रस्त्याचे कॉक्रीटीकरण करण्याच्या कामास मे. इंदरदिप कंन्स्ट्रक्सन कंपनी, उल्हासनगर ३ यांना शहर अभियंता, बाधंकाम विभाग उमपा/यांचे पत्र क्र. उमपा/पी.डब्ल्यु.डी/सी.ई/२३९७ दि. १५/०४/२०११ तसेच मुदतवाढ पत्र क्र. २३९७ दिनांक २५/०६/२०१४ अन्वये सार्वजनिक बाधंकाम विभागामार्फत कामाचे आदेश देण्यात आले होते. त्यानुसार संबंधीत ठेकेदारने काम केले आहे.

सदरच्या रस्त्यावरील कॅम्प ४ येथील नागेश्वर मंदीर येथे २०० मि.मि. व्यासाची आर.सी.सी. एन.पी. क्लास २ व ३०० मि.मि. व्यासाची आर.सी.सी. एन.पी. क्लास ३ ची मलवाहिनी टाकणेबाबतचे काम सदर रस्ता कॉक्रीटीकरण करण्याच्या आगोदर करणे आवश्यक होते. अन्यथा रस्त्याची कामे झाल्यावर मलवाहिन्या टाकल्यास रस्ता नादुरुस्त होईल व महापालिकेने रस्त्यासाठी केलेला खर्च वाया गला असता.

त्या अनुषंगाने पाणी पुरवठा व मलनि:स्सारण विभागामार्फत महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाच्या सन २०११—१२ च्या दरसुचीनुसार वरील कामाचे प्राकलन तयार करुन बाधंकाम विभागामार्फत मंजुर स्विकृती निविदा नुसार तरतुदी मधील आत्यावश्यक नागरी सुविधा स्थलांत्तरीत करावयाच्या कामा करीता १५ : तरतुदी मधील निधी वापरुन अतिरिक्त बाब म्हणून काम करण्यासाठी रु. १२,६१,५१२/— चा प्रस्ताव तयार करुन सार्वजनिक बाधंकाम विभागात सदर रस्त्याच्या कॉक्रीटीकरण करणारे ठेकेदार मे. इंदरदिप कंन्स्ट्रक्सन कंपनी, उल्हासनगर ३ यांना सदर काम " अतिरिक्त बाब " म्हणुन काम करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. परंतु बाधंकाम विभागामार्फत आत्यावश्यक नागरी सुविधा स्थलात्तरीत करावयाच्या कामात तरतुद उपलब्ध केली नसल्याने मा. शहर अभियंता यांनी पाणी पुरवठा व मलनि:स्सारण विभागात उपलब्ध असलेल्या तरतुदी मधुन कामाची पुर्तता करण्यासाठी सदर प्राकलन दि. १६/०३/२०१५ रोजी पाणी पुरवठा विभागात परत पाठविण्यात आले. कामासाठी पाणी पुरवठा व मलनि:स्सारण विभागामधील B ( 4 ) Part – I] लेखाशिर्षा मधुन तरतुद करण्यात आली व प्रशासकीय व वित्तीय मंजुरी घेण्यात आली असुन सदरचे काम मे. इंदरदिप कंन्स्ट्रक्सन कंपनी, उल्हासनगर ३ यांनी सदर रस्त्याचे कॉक्रीटीकरण करण्यापुर्वी सेवा संविधाचे काम अतिरिक्त बाब निविदेच्या अंतर्गत केलेले आहे. सदरील काम सन २०१४ मध्ये पुर्ण झाले असल्यामुळे सदर अहवाल मा. स्थायी समितीच्या पटलावर मान्यतेसाठी सादर.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> ६३          <u>दिनांकः— २/१२/२०१५</u>

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वधारीया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर शहरातील कॅम्प ४ येथील नागेश्वर मंदीर येथे २०० मि.मि. व्यासाची आर.सी.सी. एन.पी. क्लास २ व ३०० मि.मि. व्यासाची आर.सी.सी. एन.पी. क्लास ३ ची मलवाहिनी टाकणेबाबत झालेल्या कामास मान्यता देत आहे.

सुचकाची <u>सही/—</u>

अनुमोदकाची <u>सही/—</u>

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>प्र.महापालिका सचिव :—</u> विषय क्र. २० वाचुन दाखवितात.

———————————————————————————————————————

⇨ **विषय क्र.२०** :— उल्हासनगर शहरातील कॅम्प ३ येथील गुरुव्दारा सी—ब्लॉक चौक ते अमीत टॉवर पर्यत कॉक्रीटीकरण होणा—या रस्त्यांच्या मध्यातुन अस्तित्वातील चेंबरर्सची उंची वाढवणे, प्रापर्टी कनेक्शन च्या मलवाहिन्या टाकणेच्या झालेल्या कामास मान्यता मिळणेबाबत.

———————————————————————————————————————

<u>कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा), श्री. सेलवनः—</u> सदरहु काम झालेले आहे.

<u>काही सदस्य :—</u> पास पास

<u>सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. २०** :—उल्हासनगर शहरातील कॅम्प ३ येथील गुरुव्दारा सी—ब्लॉक चौक ते अमीत टॉवर पर्यत कॉक्रीटीकरण होणा—या रस्त्यांच्या मध्यातुन अस्तित्वातील चेंबरर्सची उंची वाढवणे, प्रापर्टी कनेक्शन च्या मलवाहिन्या टाकणेच्या झालेल्या कामास मान्यता मिळणेबाबत.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत शहरात उपरोक्त ठिकाणच्या रस्त्याचे कॉक्रीटीकरण करण्याच्या कामास मे. ईगल कंन्स्ट्रक्सन कंपनी, उल्हासनगर ३ यांना शहर अभियंता, बाधंकाम विभाग उमपा/यांचे पत्र क्र. उमपा/ पी.डब्ल्यु.डी/सी.ई/२३९३ दि. २१/०३/२०११ तसेच मुदतवाढ पत्र क्र.. उमपा/पी.डब्ल्यु.डी/सी. ई/२३९३ दिनांक २४/०६/२०१४ अन्वये सार्वजनिक बाधंकाम विभागामार्फत कामाचे आदेश देण्यात आले होते.

सदर या रस्त्यावर असलेली अस्तित्वातील मलवाहिन्याचे मॅनहोल चेंबर्स व प्रोपर्टी कनेक्शन चे चेंबर्स रस्त्याखाली दाबलेले आहे. सदरच्या मलवाहिन्या वरील चेंबर्स दुरुस्त करणे नविन चेबंर्स बांधणे व चेंबर्सची उंची वाढविणे, प्रोपर्टी कनेक्शनच्या मलवाहिन्या टाकणे इत्यादी कामाचे कॉक्रीटीकरणाच्या कामा आधी करणे करणे गरजेचे होते.

त्या अनुषंगाने म.जी.प्रा च्या सन २०११–१२ च्या दरसुची नुसार अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर कामाचे रु. २२,९५,३५०/– एवढया रकमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते.

सदरच्या रस्त्याचे कॉक्रिटीकरण करण्याच्या आगोदर गुरुव्दारा सी–ब्लॉक चौक ते अमीत टॉवर पर्यत कॉक्रीटीकरण होणा–या रस्त्यांच्या मध्यातुन अस्तित्वातील चेंबरर्सची उंची वाढवणे, प्रापर्टी कनेक्शन च्या मलवाहिन्या टाकणे करीता "अतिरिक्त बाब" म्हणून करुन घेण्यासाठी तत्कालीन मा. आयुक्त सो, यांनी मौखीक आदेश दिले होते. सदर मलवाहिन्यांचे कामे रस्त्यांचे कामे करण्याआधी करणे गरजेचे होते. अन्यथा रस्त्यांची कामे झाल्यावर मलवाहिन्या टाकल्यास रस्ता नादुरुस्त होईल, व महानगरपालिकेचा रस्त्यासाठी केलेला खर्च वाया जाईल. या दृष्टीन रु.२२,९५,३५०/– रक्कमेचा प्रस्तावाचे काम मे. ईगल कंन्स्ट्रक्सन कंपनी, उल्हासनगर ३ यांनी सन २०१४ मध्ये "अतिरिक्त बाब" म्हणून काम पुर्ण केलेले आहे.

सदर कामाची स्विकृत निविदेचे कार्यादेश क्रमांक उमपा/साबा/श.अ/२३९३ दिनांक २१/०३/२०११ रोजीच्या कार्यदेशामधील निविदेतील अटी व शर्तीमधील अ.क्र. ३८ प्रमाणे सदर प्रस्ताव सादर करण्यात आला होता. स्वीकृत निविदेतील अुनषंकगिकेनुसार (Contigency) सदर प्रस्ताव प्रस्तावित करण्यात आला होता. सदर अतिरीक्त कामाचा खर्च हा स्विकृत निविदेतील तरतुदीनुसार खर्च करण्यात आलेला आहे.

वरील सादर केलेल्या माहितीनुसार मे. ईगल कंन्स्ट्रक्सन कंपनी, उल्हासनगर ३ यांनी सदर रस्त्याचे कॉक्रीटीकरण करण्यापुर्वी सेवा संविधाचे काम "अतिरिक्त बाब" म्हणून निविदेच्या अंतर्गत केलेले आहे. सदरील काम सन २०१४ मध्ये पुर्ण झाले असल्यामुळे सदर अहवाल मा. स्थायी समितीच्या पटलावर मान्यतेसाठी सादर.

स्थायी समिती ठराव क्र. ६४ | दिनांकः– २/१२/२०१५

सुचकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेश वधारीया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर शहरातील कॅम्प ३ येथील गुरुव्दारा सी–ब्लॉक चौक ते अमीत टॉवर पर्यत कॉक्रीटीकरण होणा–या रस्त्यांच्या मध्यातुन अस्तित्वातील चेंबरर्सची उंची वाढवणे, प्रापर्टी कनेक्शन च्या मलवाहिन्या टाकणेच्या झालेल्या कामास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

प्र.महापालिका सचिव :— विषय क्र. २१ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. २१** :— मालमत्ता क. ५०डीआय०१०८०२३०० जुना क्र. ५०/०५६३ करीता कराचे बिलात वर्ष २००९—२०१० ते २०१५—२०१६ पर्यंत समाविष्ट असलेली रू.१६,२००/— मालमत्ता करापोटी समायोजित करणेस मंजुरी देणे.

---

सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी :— यापुर्वी कोणी पाणीपट्टी भरली असेल तर त्यांची पाणीपटटी रदद् करा.

सदस्य, श्री.राजेश वधारीया :— बिल जास्त भरले असेल तर ते परत का नाही करणार? नाहीतर पाणीपटटी रदद् करा.

सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी :— महापालिकेत भरणा केलेली रक्कम परत करणार तर मग असे कितीतरी लोकं येतील आमचीदेखील पाणीपट्टी परत करा.

प्र. उपकर निर्धारक व संकलक, श्री. शैलेश दोदे :— ज्या इमारतींनी पाणीपटटी अधिक भरली असेल तर ती रक्कम त्यांच्या कराच्या बिलात समायोजित करण्यात येईल जी कर पावती सचिवाच्या नावाने गेले आहे त्या सचिवाने आम्हाला पत्रव्यवहार करावा त्याची रक्कम समायोजित करण्यात येईल.

सदस्य, श्री.सुनिल सुर्वे :— अशाप्रकारचे प्रस्ताव एकत्रितपणे आणा ना.

प्र. उपकर निर्धारक व संकलक, श्री. शैलेश दोदे :— एकत्रितपणे कसे आणता येतील, जसजसे प्रस्ताव या कार्यालयाकडे प्राप्त होतील तसतसे सादर करण्यात येत आहेत.

सदस्य, श्री.भगवान भालेराव :—जादा भरणा केलेली रक्कम समायोजित करायची आहे.

सदस्य, श्री.सुनिल सुर्वे :— अशाप्रकारे तुम्ही सर्वांची प्रकरणे निकाली काढा ना.

प्र.उपकर निर्धारक व संकलक, श्री. शैलेश दोदे :— आपण करतो ना तसे सर्वांचे, जसजशी प्रकरणे प्राप्त होतात तसतशी ती सादर करण्यात येत आहेत.

सदस्य, श्री.राजेश वधारीया :— आता बाजारात नविन सॉफ्टवेअर आली आहेत, हि सॉफ्टवेअर आपण आपल्याकडे संगणकात टाकावीत जेणेकरून त्यामध्ये आपणांस ज्याप्रकारे नोंदी हव्या आहेत त्याप्रमाणे माहिती प्राप्त होवू शकते.

<u>सदस्य, डॉ. महेश गावडे :—</u> पाणीपट्टी मालमत्ता कर आकारणीतसुध्दा येते. पाणीपुरवठा विभागाकडूनसुध्दा अशाप्रकारचे प्रस्ताव येतील का?

<u>उपकर निर्धारक व संकलक, श्री. शैलेश दोदे :—</u> नाही, नाही, रहिवासी ........

<u>सदस्य, श्री.राजेश वधारीया :—</u> खुलया जागेच्या कर पावतीतही पाण्याचे बिल नसावे.

<u>प्र. महापालिका सचिव :—</u> सदरचा विषय पारीत करण्यात यावा का?

<u>काही सदस्य :—</u> पास पास

<u>सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑

**विषय क्र. २१ :—** मालमत्ता क्र. ५०डीआय०१०८०२३०० जुना क्र. ५०/०५६३ करीता कराचे बिलात वर्ष २००९—२०१० ते २०१५—२०१६ पर्यंत समाविष्ट असलेली १६,२००/— मालमत्ता करापोटी समायोजित करणेस मंजुरी देणे.

<u>प्रस्तावना</u>

श्री. धनश्या मजी. अडवानी, सेक्रेटरी, शारदा रेसिडेन्सी, ब्लॉक नं. ए/२६६, २६७, रूम नं. ५३१, ५३२ व ५३३, उल्हासनगर—४ यांनी दि. २२/११/२०१४ रोजीच्या पत्रान्वये इमारतीचे जिना, टेरेस, पार्किंग इ. क्षेत्रांवर मालमत्ता क्र. ५०डीआय०१०८०२३०० जुना क्र. ५०/०५६३ अन्वये कर आकारणी सुरू असल्याने पाणीपट्टी आकारणी रद्द करणेबाबत विनती केली आहे.

उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात संदर्भित मिळकतीकरीता नमुद असलेल्या करपात्र बाबींचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| | Room Type | Const.Typ | Occu.Statu | Usage | Asst.Yea | Total | Exempte | Assessabl |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Stilt for Parking | RCC | OWNER | RESIDENTIA | 29-AUG- | 290 | 152.63 | 152.63 |
| 2 | Stilt for Parking | RCC | OWNER | RESIDENTIA | 29-AUG- | 189 | 94.5 | 94.5 |
| 3 | Stilt for Parking | RCC | OWNER | RESIDENTIA | 29-AUG- | 374 | 187 | 187 |
| 4 | Stilt for | RCC | OWNER | RESIDENTIA | 29-AUG- | 494 | 247 | 247 |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Parking | | | | | | | |
| 5 | Stilt for Parking | RCC | OWNER | RESIDENTIA | 29-AUG- | 285 | 142.5 | 142.5 |
| 6 | Stilt for Parking | RCC | OWNER | RESIDENTIA | 29-AUG- | 285 | 142.5 | 142.5 |
| 7 | Covere | OPEN | OWNER | RESIDENTIA | 29-AUG- | 280 | 0 | 280 |
| 8 | Covere | OPEN | OWNER | RESIDENTIA | 29-AUG- | 1325 | 0 | 1325 |
| 9 | Covered | OPEN | OWNER | RESIDENTIA | 29-AUG- | 675 | 0 | 675 |
| 10 | Covere | OPEN | OWNER | RESIDENTIA | 29-AUG- | 468 | 0 | 468 |
| 11 | Covere | OPEN | OWNER | RESIDENTIA | 29-AUG- | 754 | 0 | 754 |
| 12 | StairCas | RCC | OWNER | RESIDENTIA | 29-AUG- | 441 | 220.5 | 220.5 |
| 13 | Stair Case 2 | RCC | OWNER | RESIDENTIA | 29-AUG- | 167.3 | 83.67 | 83.67 |
| 14 | Stair Case 1 | RCC | OWNER | RESIDENTIA | 29-AUG- | 196 | 98 | 98 |
| 15 | Terrace | OPEN | OWNER | RESIDENTIA | 29-AUG- | 293.5 | 146.78 | 146.78 |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |
| 16 | Terrace Open | OPEN | OWNER | RESIDENTIA | 29-AUG- | 131.25 | 65.63 | 65.63 |
| 17 | Terrace Open | OPEN | OWNER | RESIDENTIA | 29-AUG- | 108 | 54 | 54 |
| 18 | Terrace Open | OPEN | OWNER | RESIDENTIA | 29-AUG- | 331.2 | 165.63 | 165.63 |
| 19 | Terrace Open | OPEN | OWNER | RESIDENTIA | 29-AUG- | 53.13 | 26.57 | 26.57 |
| 2 | Terrace Open | OPEN | OWNER | RESIDENTIA | 29-AUG- | 504 | 252 | 252 |
| 21 | Terrace Open | OPEN | OWNER | RESIDENTIA | 29-AUG- | 53.13 | 26.57 | 26.57 |
| 2 | Terrace Open | OPEN | OWNER | RESIDENTIA | 29-AUG- | 285 | 142.5 | 142.5 |

मिळकतीच्या उक्त करपात्र बाबींमध्ये इमारतीचे टेरेस, पार्किग, जिना इ. क्षेत्राचा समावेष आहे. मिळकतीमध्ये पाण्याचा वापर होत नाही. तसेच इमारतीमधील सदनिकाधारकांचे नावे स्वतंत्ररित्या कर आकारणी सुरू असुन त्यामध्ये पाणीपट्टी आकारणी करण्यात येत आहे.

उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात करपात्र मालमत्ता क्र. ५०डीआय०१०८०२३०० जुना क्र. ५०/०५६३ करीता इमारतीचा जिना, टेरेस, पार्किंग इ. क्षेत्रांवर सेक्रेटरी नावे स्वतंत्ररित्या कर आकारणी सुरू आहे. सदर बिलामध्ये वर्ष २००९—२०१० ते २०१४—२०१५ पर्यत संपुर्ण कराची रक्कम भरणा केली आहे. त्यामध्ये पाणीपट्टी खालीलप्रमाणे जमा केली आहे.

१) वर्ष २००९—२०१० :— पाणीपट्टी रक्कम रू. १८००/—

२) वर्ष २०१०—२०११ :— पाणीपट्टी रक्कम रू. १८००/—

३) वर्ष २०११—२०१२ :— पाणीपट्टी रक्कम रू. १८००/—

४) वर्ष २०१२—२०१३ :— पाणीपट्टी रक्कम रू. ३६००/—

५) वर्ष २०१३—२०१४ :— पाणीपट्टी रक्कम रू. ३६००/—

६) वर्ष २०१४—२०१५ :— पाणीपट्टी रक्कम रू. ३६००/—

————————————————————————————

एकुण भरणा केलेली पाणीपट्टी रक्कम रू. १६,२००/—

तसेच इमारतीमधील सदनिकाधारकांचे नावे स्वतंत्ररित्या कर आकारणी सुरू असुन बांधकाम प्रकारानुसार त्यांचे मालमत्ता कर बिलात पाणीपट्टी आकारणी करण्यात येत आहे.

वर्ष २०००—२००१ पासुन स्थायी समिती ठराव क्र. १०२, दिनांक १६/०२/२००० व महासभा ठराव क्र. २३, दिनांक १८/२/२००० नुसार फक्त निवासी वापर होत असलेल्या मिळकतींवर बांधकाम प्रकारानुसार मालमत्ता कर बिलात पाणीपट्टी आकारणी करण्यात येत आहे. परंतु सदर ठरावामध्ये इमारतीचा जिना, टेरेस, पार्किंग इ. क्षेत्रांवर सेक्रेटरी नावे कर आकारणी होत असलेल्या मिळकतींवर पाणीपट्टी आकारणीबाबत स्पष्टीकरण करण्यात आलेले नाही.

तरी उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात नमुद मालमत्ता क्र. ५०डीआय०१०८०२३०० जुना क्र. ५०/०५६३ करीता मालमत्ता कराचे बिलात वर्ष २००९—२०१०

ते २०१५—२०१६ पर्यंत समाविष्ट असलेली पाणीपट्टी रद्द करणे तसेच भरणा केलेली पाणीपट्टी रक्कम रू. १६,२००/— मालमत्ता करापोटी समायोजित करून वर्ष २०१५—२०१६ करीता सुधारीत बिल बजावणेसाठी मंजुरीकरीता स्थायी समिती पटलावर सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ६५ दिनांकः— २/१२/२०१५

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वधारीया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार मालमत्ता क्र. ५०डीआय०१०८०२३०० जुना क्र. ५०/०५६३ करीता कराचे बिलात वर्ष २००९—२०१० ते २०१५—२०१६ पर्यंत समाविष्ट असलेली पाणीपट्टी रद्द करीत आहे. तसेच भरणा केलेली पाणीपट्टी रक्कम रू. १६,२००/— मालमत्ता करापोटी समायोजित करणेस मंजुरी देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

प्र.महापालिका सचिव :— विषय क्र. २२ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र.२२** :— राणा टेडिंग कंपनी जवळील डंपिंग ग्रउंडवरील कच—याचे सपाटीकरण करणेसाठी अतिरिक्त मशिन व त्यांची वेळ वाढविणेस मान्यता देणे.

---

सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— किती मशीन जास्तीच्या लावणार आहात?

प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे :— २ डोजर, ३ जेसीबी मशीन आहेत. दिवाळीत अतिरिक्त कचरा वाढल्याने डंपिग शेजारील जागेवर आम्ही कचरा उतरविला होता आता तो वर नेऊन त्याला सपाटीकरणाचे काम सुरू आहे. त्यामुळे अस्तित्वात असलेल्या मशीनचा टाईम तसेच अतिरिक्त १ डोजर लागणार आहे. असा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे.

सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— किती जागा आहे. मशिन्स कुठे उभ्या करणार आहात?

प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे :— जमिनीपासुन जवळ जवळ ७० ते ८० फुट उंच असा कच—याचा ढीग झाला आहे व बाजुच्या ५ ते ६ गुंठयावर आम्ही कचरा टाकला आहे. २ डोजर व २ जेसीबी

कचरा खालुन वर नेतात व नंतर ते सपाटी करण केले जाते जर आपण १ डोजर वाढवण्यास परवाणगी दिली तर ते काम लवकरात लवकर करता येईल

सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— आम्ही आपणाला मशीन तसेच वेळ वाढवण्यास परवानगी दिली तर आपण शाश्वती देणार आहात का? की त्यानंतर शहरात कचरा आढळणार नाही. शहरातील कचरा व्यवस्थित उचलला जात नसतांना आपण का वेळ व मशीन्स वाढवण्यास सांगत आहात.

प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे :— साहेब तेथे कच—याचे ढीग जमा झाले आहेत.

सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी :— शहरात कच—याची समस्या वाढत आहे त्यासाठी आपण यांना परवानगी दयावी असे मला वाटते.

सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— आपण दिवाळीचा कचरा उचलण्यासाठी मशिन्स वाढवुन देण्याची मागणी केली आहे आणि शहरात कचरा आढळला तर.....

सदस्य, डॉ. महेश गावडे :— आपण यांना १ महिन्याची मूदत देवु या नंतर पाहुया .

प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे :— १ डोजर व १ जेसीबी यांच्या सहाय्याने कचरा वर नेला जातो. जर आपण १ डोजरसाठी परवानगी दिली तर आम्हाला त्याचा उपयोग होईल.

सदस्य, श्री.भगवान भालेराव:— ८ तास कुठलीही मशीन चालत नाही. किती दिवसांसाठी मशिन्स लावणार?

प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे :— ४ महिन्यांसाठी लावणार आहेत.

सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— शहरातून आधीच कचरा उचलला जात नाही. फालतू खर्च करण्याची आवश्यकता नाही. सदरचा विषय वगळण्यात यावा.

सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी :— कच—याचा विषय आहे तो आपण पास करावा

सदस्य, श्री.भगवान भालेराव:— आता जी मशिनरी आपल्याकडे आहे त्यांचीच कामाची वेळ वाढवा ना.

सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— ८ ते १० दिवसांसाठी दोन दोन तास वेळ वाढवा ना.

सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी :— आधीच शहरात कच—याची भयंकर समस्या आहे त्यामुळे हा विषय पारीत करण्यात यावा.

सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— आम्ही पास करतो, परंतु शहरात कचरा आढळल्यास तो मी स्व खर्चाने उचलुन आपल्या घरासमोर तसेच कार्यालयासमोर टाकेन.

सदस्य, श्री.भगवान भालेराव:— १ महिन्यासाठी वाढवून देवू नंतर पाहु.

सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— आम्ही १ महिन्यासाठी मुदत देवु नंतरचं नंतर पाहु.

सदस्य, श्री.राजेश वधारीया :— १ महिन्यासाठी कोणी मशीन्स देतात का?

सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— एक महिन्यासाठी वेळ वाढवून दयायचे असेल तर ठिक आहे नाहीतर विषय वगळण्यात यावा, चार महिन्यांसाठी दयावयाचे असेल तर नविन निविदा काढा ना.

सदस्य, श्री.भगवान भालेराव:— आपल्या निविदेतील अटीनुसार आपण १ महीन्याची मुदत देवु शकतो ना. पास करा १४ महिन्यांसाठी

प्र. महापालिका सचिव :— सदर विषय पारीत करण्यात यावा का?

काही सदस्य :— पास पास....

<u>सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी :–</u> सदर विषयाच्या ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्ताची वाट न पाहता करण्यात यावी.

<u>सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा :</u>– सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

☑

**विषय क्र. २२** :–राणा टेडिंग कंपनी जवळील डंपिंग ग्राउंडवरील कच–याचे सपाटीकरण करणेसाठी अतिरिक्त मशिन व त्यांची वेळ वाढविणेस मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर शहरात दररोज अंदाजीत ४१० मेट्रीक टन कचरा निर्माण होत आहे. सदरचा कचरा नियमीत राणा ट्रेडींग कंपनी जवळील पडीक खदाण, म्हारळ गांव, उल्हासनगर–१ येथिल डंपिंगग्राउंडवर वाहतूक केला जातो. तसेच शहरातील नाले सफाईमधून निघणारा गाळ व अतिरीक्त कचरा डंपिग ग्राउंडवर टाकण्यात येत आहे. सदर ठिकाणी गेले १८ ते १९ वर्षे कचरा टाकण्यात येत आहे. त्यामुळे सदर ठिकाणी कच–याचे ढीग निर्माण झालेले आहेत. सद्यस्थितीत उल्हासनगर महानगरपालिकेची डंपिंग ग्राउंडची स्थिती अंत्यत बिकट असून पर्यायी जागा उपलब्ध नसल्याने महापालिकेसमोरील हि सर्वात मोठी समस्या आहे. सदर ठिकाणी झालेल्या प्रंचड मोठया कच–याच्या ढिगा–यामुळे तेथे जिवित व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. पर्यायी जागा सर्वोतोपरी प्रयत्न करुनही उपलब्ध होत नसल्याने दैनंदिन निर्माण होणार घनकचरा राणा ट्रेडींग कंपनी जवळील पडीक खदाण, म्हारळ गांव, उल्हासनगर–१ येथेच टाकण्यात येत आहे. सदर ठिकाणी नियमित व सातत्याने बायोकल्चर व जंतूनाशक फवारणी करुन डोझर व पोक्लेन मशिनद्वारे कच–याचे सपाटीकरण सुरु आहे. सपाटीकरणाच्या कामात व्यत्यय आल्यास घरकचरा वाहतुकीवर त्याचा परीणाम होवून शहरात कचरा साचतो. त्यामुळे नियिमीत व सातत्याने कचरा सपाटीकरणाचे काम करणे आवश्यक आहे.

डंपिंग ग्राउंडवर कचरा टाकण्यासाठी जागा उपलब्ध नसल्याने प्रशासनाने दिनांक ५,६,७ नोंव्हेंबर, २०१५ रोजी पोलिस बंदोबस्त घेवुन उपायुक्त (आरोग्य) व सहा. आयुक्त यांच्या नियंत्रणाखाली डंपिंग ग्राऊंडच्या खालील बाजुस डंपिंग ग्राउंडवरील कचरा उतरवण्यात येवुन सदर कचऱ्याची डंपिंगच्या पायथ्याशी कचरा सपाटीकरणाचे काम करण्यात आले. सदर ठिकाणी नियमीत कचरा सपाटीकरणसाठी कामाकरीता अतिरीक्त मशिन वाढवणे तसेच कामाची वेळ वाढवणे आवश्यक असल्याचे डंपिंग ग्राउंड इन्चार्ज यांचे जाक्र.उमपा/आवि/स्वनि/प्र.स.क्र.०१/०९/१५, दि. ०७/११/२०१५ रोजीचे पत्रान्वये इकडील कार्यालयास कळविले आहे. तसेच मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि., उल्हासनगर यांनी क्र. ६४ दिनांक ०६/१०/२०१५ रोजी अन्वये कचरा सपाटीकरणासाठी मशिन वाढविणे व वेळ वाढविणेबाबत विनंती केलेली आहे. तसेच दिवाळीच्या सणा निमीत्त कचऱ्याचे प्रमाण मोठया प्रमाणात वाढले असून व डंपिंगवर जागा बनविण्यास अधिक वेळ लागत असल्यामुळे संध्याकाळी उशीरापर्यंत डंपिंगच्या खालील परिसरात जागा बनवुन कचरा सपाटी करण करणे आवश्यक आहे. तरी सदर कामाकरीता अतिरीक्त किमान एक मशन व कामाची वेळ वाढवल्यास डंपिंग वरील कचऱ्याच्या ढिगाऱ्यांचे योग्य रित्या सपाटीकरण करणे व खालील बाजूस कचरा सपाटीकरण करून जागा बनवण्याबाबत शक्य होईल.

मा. स्थायी समिती ठराव क्र. ३६, दिनांक १०/०६/२०१५ रोजी अन्वये राणा ट्रेडिंग कंपनी जवळ, म्हारळ गांव, उल्हासनगर – १, येथिल डंपिंग ग्राउंडवरील कचऱ्याचे सपाटीकरण करण्याकरीता मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर, लि. उल्हासनगर, यांची अभिकर्ता म्हणून नेमणुक करण्यास मा. स्थायी समितीने मान्यता दिलेली आहे. ठेकेदाराने कार्यादेश दिल्यापासुन पुढील आदेशहोईपर्यंत डंपिंग ग्राउंडवरील कचऱ्याचे सपाटीकरण निविदेतील अटी व शर्तीनुसार व महापालिकेशी केलेल्या करारनाम्यानुसार उपायुक्त (आरोग्य) यांनी वेळोवेळी दिलेल्या सुचनेनुसार घनकचरा सपाटीकरणाचे काम मुख्य स्वच्छता निरिक्षक यांचे नियंत्रणखाली व स्वच्छता निरीक्षक डंपिंग ग्राउंड नियंत्रक यांच्या पर्यवेक्षणाखाली दिनांक ०८/०७/२०१५ रोजी पासुन सुरू केले आहे. सद्या सुरु असलेल्या मशनरीचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | मशिनचा तपशिल | मंजुर दर रूपये (प्रति तास) | परिमाण | प्रति दिन आठ तासांसाठी एकूण खर्च रूपये |
|---|---|---|---|---|
| १ | पोक्लेन<br>EX-200 | २६०५/— | ३ | ६५५२० |
| २ | बुलडोझर<br>D-120 | २७२३/— | २ | ४३५६८ |
| | प्रतिदिन आठ तासांसाठीचा खर्च रूपये | | | १०९०८८ |

सद्यास्थितीत बाबा रामदेव नगर, म्हारळ गांव येथिल डंपिंग ग्राउंड जमिनी पासुन कच—याची उंची ७० ते ८० फुट त्रिकोणाप्रमाणे झालेली असून सदर जागेची कचरा सामवून घेण्याची क्षमता संपलेली आहे. सदर ठिकाणी निर्माण झालेले कच—याचे ढिग समांतर करणे गरजेचे आहे. जेणे करून कचरा ढासाळण्याचे प्रमाण कमी करता येईल. त्यानुसार उपायुक्त यांनी दिलेल्या निर्देशानुसार सहा. आयुक्त व आरोग्य विभागाच्या नियंत्रणाखाली दिनांक ५,६, व ७ नोव्हेंबर २०१५ रोजी खालच्या बाजूला रस्त्याच्या लगत सपाठीकरणाचे काम सुरु केले होते. तथापी सर्व मशनरी सदर कामासाठी लागत असल्याने कच—याच्या येणा—या वाहनांद्वारे टाकलेला कचरा उचलून वरच्या बाजूस नेण्यास मशनरी उपलब्ध नव्हती. त्यामुळे वाहतुकीचे काम थांबवावे लागले होते. पर्यायाने शहरातील कचरा उचलण्यास विलंब होत होता. तसेच कचरा उशिरा पर्यंत उचलला जात असल्याने ८ तास अपुरे पडत असल्याचे डंपिंग ग्राउंडवरील पर्यवेक्षकांनी निदर्शनास आणून दिले आहे.

सबब उक्त परीस्थिती पाहता व प्रत्यक्ष उपायुक्त (आरोग्य) व मुख्य स्वछता निरिक्षक यांनी डंपिंग ग्राउंडची पाहणी केली असता किमान एक अतिरीक्त बुलडोझर ड१२० ४ महिन्यांच्या (१२० दिवस) कालावधीसाठी प्रति दिन ८ तासांसाठी पुरवठा करुन घेतल्यास व इतर २ मशनरींचे प्रत्येकी २ तास वाढविल्यास येणारा अतिरीक्त खर्च खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | मशिनचा तपशिल | मंजुर दर रुपये (प्रति तास) | १२० दिवसांसाठी (८ तसांसाठी) एकूण खर्च |
|---|---|---|---|
| १ | बुलडोझर<br>D-120 | २७२३/— | २६१४०८०/— |

तसेच पोक्लेन EX-200 एक मशिनचे प्रत्येक दिवशी दोन तास वाढविल्यास १२० दिवसांसाठी रुपये ६२५२००/— मात्र व बुलडोझर एक मशिनचे प्रत्येक दिवशी दोन तास वाढविल्यास १२० दिवसांसाठी रुपये ६५३५२०/— मात्र खर्च असून एकूण ३८,९२,८००/— (रुपये अडोतीस लाख ब्यान्नव हजार आठशे) मात्र अपेक्षित आहे. सदरचा खर्च अंदाजपत्रक सन २०१५—२०१६ च्या भाग—१ सी—१(१), कचरा वाहतुक खर्च या लेखाशिर्षकातून प्रस्तावित करण्यात येते. सदरची बाब नागरीकांच्या आरोग्याशी निगडीत असून सदरचे दैनंदिन कामासाठी उक्त मशनरी अत्यंत आवश्यक आहे. करीता एक अतिरीक्त डोझर मशिन व दोन मशिनच्या कामाचे २ तास वाढविण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

तरी मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर, लि. उल्हासनगर, यांच्या कडून अतिरीक्त एक बुलडोझर मशिन व दोन मशिनच्या (एक EX-200 पोक्लेन व एक D-120 बुलडोझर) कामाचे २ तास वाढवून कच—याच्या सपाटीकरणाच्या कामास मान्यतेसाठी सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३ (क) अन्वये मा. स्थायी समितीच्या मंजुरीसाठी सविनय सादर.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ६६</u> — <u>दिनांकः— २/१२/२०१५</u>

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वधारीया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार राणा टेडिंग कंपनी जवळील डंपिंग ग्राउंडवरील कच—याचे सपाटीकरण करणेकामी एक महिन्याकरीता अतिरीक्त एक बुलडोझर मशिन व दोन मशिनच्या (एक EX-२०० पोक्लेन व एक D-१२० बुलडोझर) कामाचे २ तास वाढविणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

प्र.महापालिका सचिव :— विषय क्र. २३ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र.२३** :— उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. ३९डीओ००८६२७३०० व ३९डीओ००८६७३६०० अन्वये नोंद असलेल्या मिळकतीसाठी नोंद असलेल्या करपात्र बाबी एकत्रित करून मिळकतींचे करयोग्य मुल्य प्रथम वर्ष आकारणी परिसरातील प्रचलित वाजवी दरानुसार वर्ष २०१५—२०१६ पासुन निश्चित करून मालमत्ता क्र. ३९डीओ००८६२७३०० अन्वये कर आकारणी सुरू ठेवणे तसेच पाणीपट्टी रू. ३६००/— रद्द करणेसाठी मंजुरी देणे.

---

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे :— मागच्या विषयात काय निर्णय घेतला होता. पारीत करण्यापुर्वी विषय पाहुन घ्या.

प्र. उपकर निर्धारक व संकलक, श्री.शैलेश दोदे :— एकाच मालमत्तेची दोन बिले जात होती. दोन ग्राहक नंबर पडले होते.

सदस्य, श्री. राजेश वधारीया :— संगणकावर चुकीची नोंद झाली असेल.

प्र. उपकर निर्धारक व संकलक, श्री.शैलेश दोदे :— एकाच

काही सदस्य :— पास पास...

सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी :— सदर विषयाच्या ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्ताची वाट न पाहता करण्यात यावी.

<u>सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा :–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

☑

**विषय क्र. २३** :– उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. ३९डीओ००८६२७३०० व ३९डीओ००८६७३६०० अन्वये नोंद असलेल्या मिळकतीसाठी नोंद असलेल्या करपात्र बाबी एकत्रित करून मिळकतींचे करयोग्य मुल्य प्रथम वर्ष आकारणी परिसरातील प्रचलित वाजवी दरानुसार वर्ष २०१५–२०१६ पासुन निश्चित करून मालमत्ता क्र. ३९डीओ००८६२७३०० अन्वये कर आकारणी सुरू ठेवणे तसेच पाणीपट्टी रू. ३६००/– रद्द करणेसाठी मंजुरी देणे.

<u>प्रस्तावना</u>

श्रीम. नर्मदा दयालाल परमार, बी–68 समोर, न्यु इग्लिष शाळेजवळ, कुर्ला कॅम्प, उल्हासनगर–5 यांनी दि. 09/12/2014 रोजीच्या अर्जान्वये महानगरपालिका कर आकारणी पुस्तकातील मालमत्ता क्र. 39डीओ008627300 व 39डीओ008673600 करीता खालील बाबींबाबत हरकत दाखल केली आहे.

**<u>एकाच मिळकतीची मालमत्ता क्र. 39डीओ008627300 व 39डीओ008673600 नुसार दोन बिले काढण्यात येत असल्याने एक बिल देण्यात यावे.</u>**

विषयांकित प्रकरणी संबंधित विभागाचे कर निरीक्षक यांनी मिळकतींची प्रत्यक्ष पाहणी केली असुन त्यांनी पुढीलप्रमाणे अहवाल सादर केला आहे.

१) मनपा कर आकारणी पूस्तकात दोन्ही मिळकतींसाठी कर देण्यास प्रथम जबाबदार व्यक्ती म्हणुन Narmada D Parmar अशी नोंद आहे.

2) तसेच पत्त्यात Opp. B-68 Kurla Camp Ulhasnagar-4 अषी नोंद आहे.

3) कर आकारणी पुस्तकाप्रमाणे करपात्र बाबींचा तपषिल खालीलप्रमाणे आहे.

अ) मालमत्ता क. 39डीओ008627300

| Const. Type | Occu.Status | Usage | Annual Rent | Asst. Year | Total Area | Exempted Area | Assessable Area |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Open | Owner | Residential | 0 | 01-APR-86 | 204 | 0 | 204 |
| AC Sheet Bricks | Owner | Residential | 0 | 01-APR-86 | 252 | 0 | 252 |

ब) मालमत्ता क. 39डीओ008673600

| Const. Type | Occu.Status | Usage | Annual Rent | Asst. Year | Total Area | Exempted Area | Assessable Area |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Open | Owner | Residential | 0 | 01-APR-86 | 204 | 0 | 204 |
| Tear Gardier | Owner | Residential | 0 | 01-APR-86 | 252 | 0 | 252 |

4) तथापि प्रत्यक्षात जागेवर कोणत्याही प्रकारचे टियर गरडर बांधकाम अस्तित्वात नाही. करपात्र बाबीचा तपषिल खालीलप्रमाणे आहे. .

| Const. Type | Occu.Status | Usage | Annual Rent | Asst. Year | Total Area | Exempted Area | Assessable Area |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Open | Owner | Residential | 0 | 01-APR-86 | 130 | 0 | 130 |
| Ac Sheet Bricks | Owner | Residential | 0 | 01-APR-86 | 252 | 0 | 252 |
| Ac Sheet Bricks | Owner | Residential | 0 | 30-NOV-15 | 138 | 0 | 138 |

5) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमात कर आकारणी पुस्तकात सुधारणा करणे तसेच करांच्या मागण्यांबद्दल एक देणेसंदर्भात कराधान नियमातील तरतुदीं पुढीलप्रमाणे आहेत.

**नियम 20. आयुक्तास, सरकारी वर्षात आकारणी पुस्तकात सुधारणा करता येतील–**

(1) पोट–नियम (2) मधील तरतुदींच्या अधीन राहून, आयुक्तास कोणत्याही संबंधित व्यक्तीने अभिवेदन केल्यावर किंवा आकारणी पुस्तक ज्या सरकारी वर्षाषी संबंधित व्यक्तीने अभिवेदन केल्यावर किंवा आकारणी पुस्तक ज्या सरकारी वर्षात कोणत्याही वेळी अन्य कोणतीही माहिती मिळाल्यावर त्या आकारणी पुस्तकातः

(क) कोणत्याही करयोग्य मुल्याची आणि त्यावर आधारलेल्या आकारणीची रक्कम वाढवुन किंवा कमी करून

(इ) आकारणी पुस्तक तयार करण्यात आल्यानंतर पुर्णतः किंवा अषंतः उभारण्यात आलेल्या, पुन्हा उभारण्यात आलेल्या, फेरफार करण्यात आलेल्या, वाढवण्यात आलेल्या किंवा पुन्हा बांधण्यात आलेल्या कोणत्याही इमारतीसंबंधी नोंद दाखल करून किंवा अषा नोंदीत फेरफार करून

(फ)कोणताही मालमत्ता कर देण्याच्या दायित्वातून कोणत्याही जागेस सूट देणारी कोणतीही नोंद दाखल करून किंवा रद्द करून

**सुधारणा करता येईलः**

(3) फेरफार केलेल्या नोंदीनुसार संबंधित व्यक्तीची असलेली जबाबदारी किंवा तिला मिळणारी सुट ठरवण्याच्या प्रयोजनार्थ अषी प्रत्येक सुधारणा, ही सुधारणेचे समर्थन करणारी परिस्थिती अस्तित्वात असेल तेव्हा, चालु सरकारी वर्षातील सर्वात अगोदरच्या दिवसापासुन करण्यात आली आहे, असे मानले जाईल. अषी तरतुद आहे.

**नियम :– 40. अनेक करांच्या मागण्यांबद्दल एक बिल केव्हा सादर करता येईल,**

(2) कोणतीही व्यक्ती एकापेक्षा अधिक मालमत्ताच्या संबंधात उक्त करांपैकी सर्व किंवा कोणताही कर भरण्यास पात्र असेल, तर आयुक्त त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे, अषा मालमत्तांबद्दल अषा व्यक्तीने देय असलेल्या पृथक रकमा तिच्यावर एका किंवा पृथक बिलात आकारण्यास सक्षम असेलः

परंतु, अषा व्यक्तीने, आयुक्तास लेखी नोटीस देऊन तिला पृथक बिले देण्यात यावीत अषी विनंती केली तर, आयुक्तास नोटीस मिळाल्यानंतर उक्त व्यक्ती ज्या करास पात्र होईल, अषा उक्त सर्व करांच्या बाबतीत आयुक्ताने अशी विनंती मान्य केली पाहिजे.

6) उक्त तरतूदींच्या अनुषंगाने मालमत्ता क्र. 39डीओ008627300 व 39डीओ008673600_अन्वये लागु करण्यात येणारी बिले एकत्रित केल्यास मिळकतींचे करयोग्य मुल्यात वाढ किंवा कमी होणार नाही. तथापि, पाणीपट्टी रक्कम रू. 3600/– कमी होणार आहे.

7) मालमत्ता क्र. 39डीओ008627300 जुना क. 39/2380 व 39डीओ008673600 जुना क. 39/2865 अषा दोन मालमत्तांची बिले नर्मदा परमार यांना येतात. वास्तविक ते राहत असलेली मालमत्ता ही एकच आहे. दोन बिले येत आहे. दोन बिले येत असल्याने पाणीपट्टी ही एका ऐवजी दोन बिलातुन येत आहे. त्यामुळे रू. 1800/— जास्त पाणीपट्टी भरावी लागते. तथापि, लोड बेअरींग मिळकत नसताना ही लोड बेंअरींग दाखविली असल्याने रू. 3600/— भरावे लागतात.

8) उपरोक्त बाबी विचारात घेता ) उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 39डीओ008627300 व 39डीओ008673600 अन्वये नोंद असलेल्या मिळकतीसाठी टियर गरडर बांधकाम नोंद रद्द करून मिळकतीचे करयोग्य मुल्य वर्ष 2015—2016 करीता खालीलप्रमाणे करपात्र बाबी गृहीत धरून निष्चित करणे. तसेच मालमत्ता क्र. 39डीओ008627300

| Const. Type | Occu.Status | Usage | Annual Rent | Asst. Year | Total Area | Exempted Area | Assessable Area |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Open | Owner | Residential | 0 | 01-APR-86 | 130 | 0 | 130 |
| Ac Sheet Bricks | Owner | Residential | 0 | 01-APR-86 | 252 | 0 | 252 |
| Ac Sheet Bricks | Owner | Residential | 0 | 30-NOV-15 | 138 | 0 | 138 |

इ) टियर गरडर बांधकाम प्रकारानुसार आकरण्यात येणारी पाणीपट्टी रू. 3600/— रद्द करणेसाठी मंजुरीकरीता स्थायी समितीपुढे प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ६७ — दिनांकः— २/१२/२०१५

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. ३९डीओ००८६२७३०० व ३९डीओ००८६७३६०० अन्वये मिळकतीसाठी नोंद असलेल्या करपात्र बाबी एकत्रित करून मिळकतींचे करयोग्य मुल्य प्रथम वर्ष आकारणी परिसरातील प्रचलित वाजवी दरानुसार वर्ष २०१५—२०१६ पासुन निश्चित करून मालमत्ता क्र. ३९डीओ००८६२७३०० अन्वये कर आकारणी सुरू ठेवणेस तसेच पाणीपट्टी रू. ३६००/— रद्द करणेस मंजुरी देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

प्र.महापालिका सचिव :— विषय क्र. २४ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र.२४ :–** सार्वजनिक बांधकाम विभागअंतर्गत निविदा प्रक्रिया केलेल्या उल्हासनगर प्रभाग क्र. २६, मधील बॅरेक नं. १४९२–१४९३ येथे समाजमंदिर बांधणेस मान्यता देणे.

---

**सदस्य, श्री. भगवान भालेराव :–** सार्वजनिक बांधकाम विभागाचे एकही अधिकारी नसल्याने हा विषय वगळण्यात यावा.

**काही सदस्य :–**सदरहु विषय वगळण्यात यावा.

**सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा:–** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. २४ :–** सार्वजनिक बांधकाम विभागअंतर्गत निविदा प्रक्रिया केलेल्या उल्हासनगर प्रभाग क्र. २६, मधील बॅरेक नं. १४९२–१४९३ येथे समाजमंदिर बांधणेस मान्यता देणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका प्रभाग क्षेत्र क्र. ३ मधील मंजूरी मिळालेल्या **उल्हासनगर प्रभाग क्र.२६, मधील बॅरेक क्र. १४९२–१४९३ येथे समाजमंदिर बांधणे** या कामांकरीता बी–१ प्रकारच्या दोन भाग (तांत्रिक व आर्थिक) पध्दतीने नोंदणीकृत ठेकेदारांकडून दिनांक २५/०४/२०१५ रोजी दु.३.०० वाजेपर्यंत निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्राकलनीय खर्च | रु.३५,५६,०००/– |
| २ | निविदा प्रसिध्द केलेली वर्तमानपत्रे | १) दै.नवशक्ती २) दै. हमारा महानगर |
| ३ | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक ३०/०४/२०१५ |
| ४ | निविदा विक्री कालावधी | दिनांक ३०/०४/२०१५ ते ११/०५/२०१५<br>मुदतवाढ दिनांक २८/०५/२०१५ |
| ५ | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक ०१/०६/२०१५ |
| ६ | तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | दिनांक ०९/०६/२०१५ |
| ७ | आर्थिक भाग उघडण्याचा दिनांक | दिनांक १७/०७/२०१५ |
| ८ | विक्री केलेल्या निविदांची संख्या | २ |
| ९ | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | २ |

दिनांक ०९/०६/२०१५ रोजी मा.अतिरिक्त आयुक्त, मुख्य लेखा परिक्षक, शहर अभियंता यांचे उपस्थितीत **उल्हासनगर प्रभाग क्र.२६, मधील बॅरेक क्र.१४९२–१४९३ येथे समाजमंदिर बांधणे** या कामाच्या निविदेचा तांत्रिक भाग उघडण्यात आला त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ. | निविदाकाराच्या निविदेमधील बाबी | मे.नवनिर्माण | मे.ए.एम. |
|---|---|---|---|

| क्र. | | कन्स्ट्रक्शन | रामचंदानी |
|---|---|---|---|
| १ | निविदा प्रपत्रकाच्या खरेदीची रक्कम भरलेली आहे का? | होय | होय |
| २ | इसारा रक्कम भरलेली आहे का ? | होय | होय |
| ३ | अद्यावत आयकर रिटर्न भरल्याची पावती | होय | होय |
| ४ | कामाचा अनुभव | होय | होय |
| ५ | पॅन कार्डाची प्रत | होय | होय |
| ६ | संस्था/कंपनी नोंदणी (भागिदारी, मालकी, कंपनी इत्यादीचे) दस्तऐवज | होय | होय |

सदर निविदांची सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये छाननी समिती मार्फत छाननी केली असता १) **मे. नवनिर्माण कन्स्ट्रक्शन** २) **मे. ए.एम.रामचंदानी** यांच्या निविदा अटी शर्तीनुसार असल्याने पात्र आहेत. तरी उपरोक्त निविदाकारांच्या निविदांचा दुसरा भाग उघडण्यात प्रस्तावित करण्यात आले. सदरचे प्राकलनाचे दर सन २०१३—२०१४ च्या दराने तयार करण्यात आले आहे

आज **दिनांक** १७/०७/२०१५ रोजी उपरोक्त निविदाकारांचा आर्थिक बाबींचा दुसरा भाग (आर्थिक दर) मा. अतिरिक्त आयुक्त सो., यांचे अध्यक्षतेखालील निवड समिती सदस्य मुख्य लेखाअधिकारी, मुख्य लेखापरिक्षक, शहर अभियंता, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे उपस्थितीत उघडण्यात आला. त्याप्रमाणे निविदाकारांनी दिलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

१) **मे. नवनिर्माण कन्स्ट्रक्शन** दिलेले दर १७.१७ टक्के जास्त

२) **मे. ए.एम.रामचंदानी** दिलेले दर १६.०० टक्के जास्त

उपरोक्त निविदाकारांपैकी **मे.ए.एम.रामचंदानी** या सर्वात कमी दराच्या निविदाकारांशी निविदा समितीने चर्चा करुन दर कमी करण्यास वाटाघाटी केल्या त्याप्रमाणे **मे. ए.एम.रामचंदानी** यांनी वाटाघाटीअंती दरसूचीप्रमाणे ७.००टक्के जास्त (7.00% above) दर दिले असुन त्याप्रमाणे **मे. ए.एम. रामचंदानी** यांनी दि.२३/०७/२०१५ रोजीचे पत्र दिले आहे. त्याप्रमाणे **मे. ए.एम.रामचंदानी** यांना सदर काम देणेकरिता शिफारस करण्यात येत आहे.

तरी. **मे. ए.एम.रामचंदानी** यांची ७.००% दराच्या निविदेस मा. स्थायी समितीकडून मान्यता मिळणेसाठी प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. ६७अ दिनांकः— २/१२/२०१५

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार सार्वजनिक बांधकाम विभागअंतर्गत निविदा प्रक्रिया केलेल्या उल्हासनगर प्रभाग क्र. २६, मधील बॅरेक नं. १४९२–१४९३ येथे समाजमंदिर बांधणेचा प्रस्ताव या कार्यसूचीवरुन वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

प्र.महापालिका सचिव :— विषय क्र. २५ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र.२५:—** उल्हासनगर-४ येथील सर्टीफाईड स्कुल जवळ ब्लॉक नं. ३१२ ते ३१४ पर्यंतच्या रस्त्याचे खडीकरण करण्याकामी रु.४८५६००/- खर्चास प्रशासकीय व वित्तीय देवुन सदर कामी मे. साईनाथ कंन्स्ट्रक्शन यांच्याशी संविदा करण्यास मान्यता देणे.

---

सदस्या, श्रीमती अंजली साळवे :— हे काम झाले आहे, परंतु चांगल्याप्रकारे झालेले नाही. त्यामुळे सदर विषय वगळण्यात यावा.

सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी :— सदर विषय वगळण्यात यावा.

काही सदस्य :—सदरहु विषय वगळण्यात यावा.

सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा:— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. २५ :—** उल्हासनगर-४ येथील सर्टीफाईड स्कुल जवळ ब्लॉक नं. ३१२ ते ३१४ पर्यंतच्या रस्त्याचे खडीकरण करण्याकामी रु.४८५६००/- खर्चास प्रशासकीय व वित्तीय देवुन सदर कामी मे. साईनाथ कंन्स्ट्रक्शन यांच्याशी संविदा करण्यास मान्यता देणे.

प्रस्तावना

उल्हासनगर—४ येथील सर्टीफाईड स्कुल जवळ ब्लॉक नं.३१२ ते ३१४ पर्यंत रस्त्याबाबत गेल्या ३ वर्षापासून आजूबाजूचे परिसरातील नागरीक व नगरसेवक सदर रस्ता बनविणेसाठी मागणी करत आहेत. कारण सदर ठिकाणाहून ये—जा करणे नागरिकांच्या गैरसोईचे झाले आहे. याबाबत आजूबाजूचे परिसरातील रहिवाशांनी दिनांक २७/०६/२०१४ रोजी आंदोलन करण्याबाबत कळविले होते. दिनांक २७/०६/२०१४ रोजी मा. सहाय्यक आयुक्त प्रभाग समिती क्र.४ यांनी त्यांचे दालनात आंदोलनकर्त्यांना, तसेच स्थानिक नगरसेविका मा. श्रीमती अंजली साळवे व संबंधित विभागाचे अधिका—यांसह चर्चा केली. तसेच मा.सहाय्यक आयुक्तांनी रस्त्यामध्ये बाधित असलेल्या ट्रान्सफार्मर हटविणेसाठी विद्युत विभागास आदेश दिले आहेत. तसेच सार्वजनिक

बांधकाम विभागास सदर रस्त्याचे प्राकलन तयार करणेसाठी निर्देश दिले आहेत. त्याप्रमाणे सदर रस्त्याचे प्राकलन तयार करण्यात आले असून त्याची प्राकलनीय किंमत रु.४८५६००/— इतकी होत आहे.

उक्त कामावरील खर्च महापालिका अर्थसंकल्पातील C-5 (4) P-I या लेखाशिर्षातून तरतुदीमधून करावयाचा आहे. उल्हासनगर महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात उपलब्ध असलेल्या तरतुदीची आकडेवारी खाली नमुद आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | महानगरपालिका निधीमधून खर्च करणे अपेक्षित असल्यास **लेखाशिर्षाचे नांव** | C-5 (4) P-I |
| २ | विभाग क्रमांक | सार्वजनिक बांधकाम विभाग |
| ३ | एकुण अंदाजपत्रकीय तरतूद | रु.१३,५०,००,०००/— |
| ४ | दि.१/४/२०१४ रोजी प्रलंबित असलेल्या कामाच्या द`य रक्कमेपैकी सन २०१४—१ मध्ये खर्च होणारी रक्कम | रु.३६,०६,८७६/— |
| ५ | दि.१/४/२०१४ पासून खर्ची टाकण्यात आलेल्या प्रस्तावांची रक्कम (लेखा विभागातील) | रु.९८,९३,१२४/— |
| ६ | नविन कामासाठी उपलब्ध असलेली रक्कम ३—(४+५) | रु.२,७६,९४,०५०/— |
| ७ | प्रस्तावाची रक्कम | रु.४,८५,६००/— |
| ८ | एकूण खर्च (४+५+६) | रु.१,०३,७८,७२४/— |
| ९ | शिल्लक रक्कम (१०—१५) | रु.२,७२,०८,४५०/— |
| १० | प्रस्ताव रजिस्टर पान नं.२० वर नोंद घेतली | — |

सदर उल्हासनगर—४ येथील सर्टीफाईड शाळेजवळ ब्लॉक नं.३१२ ते ३१४ पर्यंतच्या रस्त्याचे खडीकरण करण्याचे कामाचे रु.४८५६००/— खर्चाच्या कामाची निविदा कार्यवाही करुन केल्यास वेळेचा अपव्यय होणार असल्याने सदर कामाची तातडी पहाता सदर काम मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ चे कलम २ (२) अंतर्गत मे.साईनाथ कंन्स्ट्रक्शन यांचेकडून सदर काम करुन घेणेसाठी मा. स्थायी समितीच्या मान्यतेकरीता ठेवणेस मंजूरी मिळणेस्तव प्रस्तावित केले होते. त्यावर मा.अतिरिक्त आयुक्त सो. यांनी उल्हासनगर—४ येथील सर्टीफाईड शाळेजवळ महापालिकेच्या पाण्याच्या टाकीचे व त्या कुंपणाचे बांधकाम चालू आहे. सदर कामामुळे एका बाजूचा नागरीकांच्या रहदारीचा रस्ता पूर्णपणे बांधकामात आल्यामुळे रस्ता बंद होणार आहे. सबब नागरीकांच्या सोईसाठी हटविण्यात येत असलेल्या इलेक्ट्रीक ट्रान्सफार्मरच्या जागेवरुन तातडीने रस्ता तयार करणे गरजेचे आहे. अन्यथा नागरीकांमध्ये असंतोष निर्माण होण्याची शक्यता आहे. तरी प्रशासनाने प्रस्तावित केल्याप्रमाणे रस्त्याचे काम मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ चे कलम २ (२) अंतर्गत करणेस मा.स्थायी समितीच्या मान्यतेकरीता सादर करणेच्या सुचना दिल्या.

तरी वरीलप्रमाणे कामाची तातडी पाहता रु.४८५६००/— खर्चाच्या प्रस्तावास मा.आयुक्त यांच्या अधिकारात प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ चे कलम २ (२) अंतर्गत मे.साईनाथ कंन्स्ट्रक्शन यांचेकडून सदर काम करुन घेणेस संविदा करण्यास मा. स्थायी समितीची मंजूरी मिळणेस्तव प्रस्तावित.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ६७ ब</u> <u>दिनांकः— २/१२/२०१५</u>

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर—४ येथील सर्टीफाईड स्कुल जवळ ब्लॉक नं. ३१२ ते ३१४ पर्यंतच्या रस्त्याचे खडीकरण करण्याकामी रु.४८५६००/— खर्चास प्रशासकीय व वित्तीय देण्याचा तसेच सदर कामी मे. साईनाथ कंन्स्ट्रक्शन यांच्याशी संविदा करण्याचा प्रस्ताव या कार्यसूचीवरुन वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची <u>सही/—</u>

अनुमोदकाची <u>सही/—</u>

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>प्र.महापालिका सचिव :—</u> विषय क्र. २६ वाचुन दाखवितात.

———————————————————————————————————————————

⇨ **विषय क्र.२६ :—** उल्हासनगर महानगरपालिका नागरी दैनंदीनी २०१५ छपाई साहित्य खरेदीची माहिती नोंद करणे.

———————————————————————————————————————————

<u>प्र.महापालिका सचिव :—</u> सदर विषय माहिती नोंद करणेसाठी प्राप्त झाला आहे.

<u>काही सदस्य :—</u> पास पास

<u>सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. २६ :—** उल्हासनगर महानगरपालिका नागरी दैनंदीनी २०१५ छपाई साहित्य खरेदीची माहिती नोंद करणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महापालिका नागरी दैनंदीनी २०१५ छपाई करून पूरवठा करणे कामी जाहिर निविदा सुचना दिनांकः १९/११/२०१४ रोजीच्या दै. सामना, दै. यशोभुमी, दै. नगरन्युज हया वृत्त पत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आली होती. त्या अनुषंगाने दिनांकः १९/११/२०१४ ते २७/११/२०१४ या कालावधी मध्ये खालील प्रमाणे पुरवठादारांनी/निविदाकारांनी निविदा अर्ज विकत घेतले होते.

| अ.क्र | पुरवठादारांचे नाव | पावती क्र. | दिनांक |
|---|---|---|---|
| १. | मे. अमरज्योत एंटरप्रायजेस,उल्हासनगर—३ | १८८७२५ | २४/११/२०१४ |
| २. | मे. अक्षय एंटरप्रायजेस, लोअर परेल,मुंबई | १८८७२६ | २५/११/२०१४ |
| ३. | मे. नेक्टर प्रिंटर्स प्रायव्हेट लिमिटेड, | १८८७२७ | २६/११/२०१४ |
| ४. | मे. ओम मनिश एंटरप्रायजेस, उल्हासनगर—४. | १८८७२९ | २७/११/२०१४ |
| ५ | मे. विघ्नेश एंटरप्रायजेस, उल्हासनगर—४. | १८८७३१ | २७/११/२०१४ |

उपरोक्त २,३,४,५ या पुरवठादारांनी आपल्या सिलबंद निविदा आवश्यक त्या दस्त ऐवजासह दिनांकः २७/११/२०१४ रोजी भांडार विभागात सादर केल्या होत्या. प्राप्त पूरवठादारांच्या सिलबंद निविदा हया दिः २९/११/२०१४ रोजी दुपारी ३.०० वाजता मा. अतिरिक्त आयुक्त सा़े. यांच्या दालनामध्ये उपस्थित निविदाकार, उप आयुक्त (भांडार), मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक यांच्या उपस्थितीमध्ये उघडण्यात आल्या होत्या.

अनु. क्र. २,३,४,५ यांचे पाकीट क्र. १ प्रथम उघडण्यात येउन निविदेच्या अटी व शर्तीनुसार अनु. क्र. २,४,५ यांनी आवश्यक ते कागदपत्र सादर केलेले होते. तसेच अनु. क्र. ३ यांनी पाकीट क्र. १ मध्ये निविदेसाठी लागणारी कागदपत्रे तसेच निविदापत्र हे सुध्दा एकत्रित सादर केलेले असल्यामुळे निविदेचा भंग व दरा बाबतची गोपनीयता न राखल्याबाबत उपस्थित निविदाकारांनी आक्षेप घेतल्यामुळे व निविदा कमिटीने सदर निविदा रद्द करून त्यांचे पाकिट क्र. २ हे न उघडण्याचा निर्णय घेतला. अनु. क्र. २,४,५ यांनी महापालिका दैनदिनी २०१५ करीता सादर केलेले न्युनतम दर हे उपस्थित निविदाकांराना वाचुन दाखविण्यात आले व त्या बाबतचा तुलनात्मक तक्ता खालिल प्रमाणे सादर केलेले आहे.

| | | | मे. ओम मनिष एंटरप्रायजेस | मे. अक्षय एंटरप्रायजेस | मे. विघ्नेश एंटरप्रायजेस |
|---|---|---|---|---|---|
| १ | महापालिका दैनदिनी सन २०१५ साईज (१८×२४) नमुन्यानुसार ७० जी.एस.एम. व्हाईट पेपर वापर करून पूरवठा करावा लागेल तसेच पूरवठादारास जनसंपर्क विभागाने दैनदिनी छपाईसाठी लागणारी सर्व शासकिय/निमशासकिय तसेच महापालिका अधिका—यांची पदाधिका—यांची माहिती व फोटोग्राफसह, छपाई व पूरवठा करणे. | २००० नग | २२५/— प्रति नग | ११५.६५/— पैसे प्रति नग | २२९/— प्रति नग |

महापालिका दैनदिनी २०१५ छपाई व पूरवठा करणेकामी मे. अक्षय एंटरप्रायजेस, लोअर परेल यांनी सादर केलेले न्यूनतम दर रक्कम रू. ११५. ६५/– प्रति नग प्रमाणे २००० नग छपाई व पूरवठा करून घेण्यासाठी एकूण रू. २,३१,३००/– (रू. दोन लाख एकतिस हजार तीनशे मात्र) खर्च होणार असुन यासाठी सन २०१४–२०१५ च्या अर्थसंकल्पात AB A-3 (2) या लेखा शिर्षात पूरेशी तरतूद उपलब्ध आहे. न्यूनतम दराचे निविदाकार मे. अक्षय एंटरप्रायजेस, लोअर परेल, मुंबई यांचेशी दैनदिनी पूरविणेकामी प्रशासनाने रीतसर करारनामा करून कार्यादेश दिला आहे.

तरी सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ७३ 'ड' अन्वये मा. स्थायी समितीच्या माहितीसाठी सविनय सादर.

स्थायी समिती ठराव क्र. ६८ दिनांकः– २/१२/२०१५

सुचकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिका नागरी दैनंदीनी २०१५ छपाई साहित्य खरेदीची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

प्र.महापालिका सचिव :– विषय क्र. २७ वाचुन दाखवितात.

---

⇨ विषय क्र.२७ :– प्रस्तावाची सूचना
मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०२ नुसार मागील वर्षाचे प्रलंबित प्रभाग समिती निधी व नगरसेवक निधीची कामे होणेबाबतचा पालिका सदस्य श्री. सुनिल सुर्वे यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

---

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे :– मा. सभापती महोदया, या विषयावर उत्तर देण्यास कोणी उपलब्ध नाही.

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :– सुर्वेसाहेब, आयुक्तसाहेब उत्तर देतील ना.

सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :– आयुक्तसाहेब, जबाबदारीने उत्तर दयावे लागेल.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे :–** प्रभाग समिती निधी व नगरसेवक निधीची कामे होणेबाबत ठराव झालेला आहे.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे :–** मा. आयुक्त महोदय याचे म्हणणे आहे निधी नाही.

**अति. आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :–** लेखा विभागाने यासंबंधी माहिती दयावी.

**मुख्य लेखा अधिकारी, श्री. दादासाहेब पाटील :–** सदर विषय आमचा नाही, सार्व.बांधकाम विभागाने याविषयी कार्यवाही करावयाची आहे.

**सदस्य, डॉ. महेश गावडे :–** निधीचे काय? तुमच्याकडे संचिका आल्या कि तुम्ही पैसे नाहीत म्हणुन सांगता.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे :–** संबंधित विभागाकडून प्रभाग समिती निधी व नगरसेवक निधीतील कामांच्या संचिका आल्या तर त्या प्रलंबित राहणार नाहीत ना. मा. महापौर तसेच उप महापौर यांना कसा निधी उपलब्ध होतो.

**मुख्य लेखा अधिकारी, श्री. दादासाहेब पाटील :–** हो, नाही राहणार. आपण आपले प्रस्ताव पाठवावे आपणास निधी उपलब्ध करून दिला जाईल.

**सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा :–** सर्वांनी कृपया लक्ष दयावे.

**अति. आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :–** साहेबांनी आदेश दिल्याप्रमाणे आपल्याला निधी दिला जाईल.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे :–** सर्व संमतीने सर्व सदस्यांना मिळाले पाहिजेत. मागचे साडे तेरा व आताचे ५ याप्रमाणे साडे अठरा लाख मिळाले पाहिजेत.

**काही सदस्य :–** पास पास

**सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा :–** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑

**विषय क्र. २७ :– प्रस्तावाची सूचना**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०२ नुसार मागील वर्षाचे प्रलंबित प्रभाग समिती निधी व नगरसेवक निधीची कामे होणेबाबतचा पालिका सदस्य श्री. सुनिल सुर्वे यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या सन २०१४–१५ च्या आर्थिक वर्षातील तरतूदीनुसार सदर निधी हा मा. महापौर, उप–महापौर व मा. स्थायी समिती सभापती यांना पुर्णपणे वापरणेसाठी अदा करणेत आलेला आहे तसेच स्थायी समितीच्या १६ सदस्यांना १० लाखाप्रमाणे विशेष निधी देण्यात आला आहे. परंतू महापालिकेच्या अन्य सदस्यांना मंजूर निधीपैकी प्रभाग समिती निधी व नगरसेवक निधी ५० टक्के देण्यात आला असून उर्वरीत ५० टक्के निधीचा अदयाप वापर करणेत आलेला नसल्याने मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ मधील कलम १०२ नुसार कुठल्याही अर्थसंकल्पामध्ये तरतूद केल्यानंतर निधी खर्च न झाल्यास सदरचा निधी हा पुढील २ वर्षापर्यंत वापरता येत असल्याने सदर निधीतून प्रलंबित असलेली विकास कामे करण्यासाठी व मान्यता मिळणेसाठी प्रस्तावाची सूचना मांडत आहे.

कृपया सदर प्रस्तावाची सुचना बैठकीमध्ये चर्चेला घेवुन उर्वरीत निधी वापरणेस मंजूरी मिळावी ही नम्र विनंती.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ६९</u> <u>दिनांक:— २/१२/२०१५</u>

सुचकाचे नाव :— श्री. सुनिल सुर्वे

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०२ नुसार मागील वर्षाचे प्रलंबित प्रभाग समिती निधी व नगरसेवक निधीतून प्रलंबित असलेली विकास कामे करण्यासाठी मान्यता देत आहे.

सुचकाची <u>सही/—</u>

अनुमोदकाची <u>सही/—</u>

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा :</u>—मा. आयुक्त महोदयांनी एक आयत्या वेळेचा विषय दिला आहे, तो घ्यायचा आहे. सचिव महोदया विषय वाचून दाखवा.

<u>प्र. महापालिका सचिव :</u>— आयत्या वेळचा विषय वाचुन दाखविला. सर्वांची संमती असेल तर विषय सामावुन घेण्यात येईल. सदर विषय सामावुन घ्यायचा आहे का?

<u>सदस्य, श्री.राजेश वधारीया :—</u> आयत्या वेळेचा विषय सामावुन घेण्यात यावा.

<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u> या विषयाची आम्हाला माहीती दयावी. हा विषय वाचुन दाखवा.

<u>सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा :</u>—सचिव महोदया, हा विषय वाचुन दाखवा.

<u>प्र. महापालिका सचिव :—</u>मी विषय वाचुन दाखविते.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>हया विषयाचा गोषवारा आम्हांला वाचु दया.

<u>सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा :</u>—ठिक आहे तुम्ही गोषवारा आधी वाचुन घ्या.

<u>कार्यकारी अभियंता, श्री. सेलवन:—</u> राष्ट्रीय हरित लवादाने असा निर्णय दिला आहे की, खेमाणी नाला व वालधुनी नाला यांच्या प्रदुषणावरून आपल्याला रू. १५ कोटीचा दंड आकारण्यात आला होता. त्यांनी कालमर्यादेत प्रदुषणाच्या निवारणासंदर्भात उपाययोजना करण्यासंबधि विभागीय आयुक्त यांनी अमृत योजनेमध्ये प्रस्ताव पास करावे यासाठी आपल्याला एकच सल्लागाराची नेमणुक करावी लागेल जेणेकरून विकास आराखडा हा एकाच व्यक्तीकडे असेल.

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव :—</u> आपणाला जर अमृत योजनेमध्ये जायचे असेल तर आपल्याला विविध प्रकारच्या कामासाठी एकच सल्लागार नियुक्त करावा लागेल.

<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u> काय बनवायचे आहे?

<u>कार्यकारी अभियंता, श्री. सेलवन:–</u> विकास आराखडा तयार करावयाचा आहे.

<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u> संपुर्ण शहरासाठी भुयारी गटार योजना बनवायची आहे का?

<u>कार्यकारी अभियंता, श्री. सेलवन:–</u> अमृत योजनेमध्ये वेगवेगळया कामांसाठी प्रस्ताव तयार करायचे आहेत.

<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u> भुयारी गटार योजनेचाच आराखडा तयार करा.

<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया :–</u> अमृत योजना हि शहरातील विविध विकास कामांसाठी लागू आहे त्यामुळे विविध कामांचे प्रस्ताव तयार करायचे आहेत.

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव :–</u> अमृत योजनेमध्ये सहभागी व्हायचे असेल तर सर्वच प्रस्ताव घ्यावे लागतील.

<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया :–</u> अमृत योजनेमध्ये पैसे दया व वापरा, भुयारी गटार, पाणीपुरवठा इत्यादी वेगवेगळया विषयांचे प्रस्ताव दयायचे आहेत.

<u>कार्यकारी अभियंता, श्री. सेलवन :–</u> आपल्याला तातडीने डिसेंबर २०१५ पर्यंत शासनाकडे विकास आराखडा पाठवावयाचा आहे. तरच आपल्याला निधी मिळू शकेल.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :–</u> आम्ही १६ डिसेंबर रोजी दिल्ली येथे मा. केंद्रीय मंत्री श्री व्यकंया नायडु याची भेट घेणार आहोत. त्यावेळेस आम्ही त्यांना अमृत योजनेतुन आपल्याला अधिक निधी देण्यासंदर्भात विनंती करू. सुमारे २०० ते ३०० करोड निधी मिळू शकतो.

<u>सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा :–</u> भुल्लर महाराजजी आपले काय म्हणणे आहे.

<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u> गोषवाराच बरोबर नाही.

<u>सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी :–</u> सदर विषयाच्या ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्ताची वाट न पाहता करण्यात यावी.

<u>प्र. महापालिका सचिव :–</u> सदर विषय पारीत करण्यात यावा का?

<u>काही सदस्य :–</u> पास पास

<u>सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा :–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

<u>आयत्यावेळचा विषय</u>

**विषय क्र. २८ :–** पाणी पुरवठा अंतर्गत 'ई' निविदा प्रक्रिया केलेल्या निविदा क्रमांक– ५४५
Request for proposal from experienced agencies for providing Consultancy servies for Development of various projects under taken by Ulhasnagar Municipal Corporation.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागाअंतर्गत वरील कामाकरीता 'ई' निविदा प्रक्रियेची माहिती खालीलप्रमाणे.

१) 'ई' निविदा प्रसिध्दी :– दिनांक १२/०९/२०१५
३) प्रथम मुदतवाढ :– दिनांक ३०/१०/२०१५

१) निविदा रिलीज केल्याचा दिनांक :– दिनांक १२/०९/२०१५ ते १३/१०/२०१५ वेळ –१०.०० ते १७.०० वाजेपर्यंत

२) निविदा विक्री व स्विकृती :— दिनांक १३/०९/२०१५ ते ०७/११/२०१५
कालावधी वेळ — १०.०० ते १७.०० वाजेपर्यंत
३) निविदा सादर करण्याचा
(Transfer of Custody)
अंतिम दिनांक :— दिनांक १६/११/२०१५ ते १९/११/२०१५.
४) प्रथम मुदतवाढीनंतर प्राप्त झालेल्या निविदाची संख्या— तीन.
५) निविदाचा तांत्रिक भाग —
उघडण्यात आल्याचा दिनांक :— दिनांक २१/११/२०१५.

प्रथम मुदत वाढीत तीन निविदाधारकांचा प्रतिसाद मिळाला असून तांत्रिक बाब लिफाफा क्रमांक १ दिनांक २१/११/२०१५ रोजी उघडण्यात आला होता. त्यामध्ये खालील दोन निविदाधारक पात्र ठरले आहेत.

१) में. टंडन आर्बन सोल्यूशन प्रा. लि. व २) मे. शाह टेक्निकल कन्स्लटंट

दिनांक २७/११/२०१५ रोजी सदर पात्र झालेले दोन्ही निविदाधारकांचे आर्थिक बाब लिफाफे उघडण्यात आले. त्यांचेकडून प्राप्त झालेले देकार खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | निविदाधारकांचे नांव | निविदा धारकाने नमुद केलेले दर |
|---|---|---|
| १ | में. टंडन आर्बन सोल्यूशन प्रा. लि. | ५ टक्के दराने |
| २ | मे. शाह टेक्निकल कन्स्लटंट | ९.५ टक्के दराने |

अनु क्रं. १ में. टंडन आर्बन सोल्यूशन प्रा. लि. यांनी निविदा ५ टक्के दराने भरलेली आहे. तर अनुक्रमांक २ में. शाह टेक्निकल कन्स्लटंट यांनी ९.५ टक्के दराने निविदा भरली आहे. वरील दोन्ही निविदाधारकांपैकी में. टंडन आर्बन सोल्यूशन प्रा. लि. यांचे दर न्युनतम असल्यामुळे में. टंडन आर्बन सोल्यूशन प्रा. लि. यांना दिनांक ०१/१२/२०१५ रोजी वाटाघाटीसाठी निविदा समिती अध्यक्ष यांच्या दालनात बोलविण्यात आले होते.

सदर वाटाघाटी दरम्यान मे. टंडन आर्बन सोल्यूशन प्रा. लि. यांनी दिलेल्या देकारापेक्षा ०.७५ टक्के कमी म्हणजे ४.२५ टक्के इतक्या दराने काम करणेस लेखी पत्राव्दारे संमती दिलेली आहे. याप्रमाणे में. टंडन आर्बन सोल्यूशन प्रा. लि. यांनी सादर केलेल्या ४.२५ टक्के दराच्या निविदेस मा. स्थायी समितीकडून मान्यता मिळणेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> ७० <u>दिनांकः— २/१२/२०१५</u>

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार 'ई' निविदा प्रक्रिया केलेल्या निविदा क्रमांक—५४५ अन्वये अनुभवी संस्थेकडुन महापालिकेअंतर्गत विविध विकासाचे प्रकल्पाच्या कामांसाठी सल्लागाराचे काम करणेकामी न्युनत्तम दराचे निविदाकार मे. टंडन अर्बन सोल्युशन प्रा. लि. यांच्या निविदेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची <u>सही/—</u>

अनुमोदकाची <u>सही/—</u>

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

सायं. ६.०० वाजंता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती श्रीमती जया प्रकाश माखिजा यांनी जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी )
प्र.महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:—२३/१२/२०१५

**दि. २३/१२/२०१५ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवत्त.**

१

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा बुधवार दिनांक २३/१२/२०१५ रोजी दुपारी १२.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्रीमती. जया प्रकाश माखिजा | सभापती |
| २ | डॉ. महेश गजानन गावडे | सदस्य |
| ३ | श्री. भगवान शंकर भालेराव | सदस्य |
| ४ | श्रीमती. मिनु राज दासानी | सदस्या |
| ५ | श्री.राजेश नानीकराम वदारिया | सदस्य |
| ६ | श्रीमती लिलाबाई आशान | सदस्या |
| ७ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर | सदस्य |
| ८ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे | सदस्य |
| ९ | श्री. उमेश सुरेश कालानी | सदस्य |
| १० | श्री. गुरुनो भिकोमल वलेचा | सदस्य |
| ११ | श्रीमती अंजली साळवे | सदस्या |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्रीमती. राजश्री राजेंद्र चौधरी, २. कु. शंकुतला जीवनलाल जग्यासी, ३. श्रीमती. इसरद सऊद खान, ४. श्री. जमनादास पुरस्वानी, ५. श्रीमती आशा जिवन इदनानी

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. श्रीधर पाटणकर, अतिरिक्त आयुक्त
२. श्री. नितीन कापडनीस, उप–आयुक्त, मुख्यालय
३. श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी
४. श्री. सुखदेव बलमे, मुख्य लेखा परिक्षक
५. डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी
६. श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
७. श्री. भरत बठिजा, प्र. शहर अभियंता
८. श्री. शैलेश दोंदे, कर निर्धारक व संकलक
९. श्री. गणेश शिंपी, सहा. आयुक्त
१०. श्री. अश्विनी अहुजा, कनिष्ठ अभियंता, साबांवि
११. श्री. धिंडे, उप अभियंता, विदयुत
१२. श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक
१३. श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी वा सहा. आयुक्त
१४. श्री. बाळु नेटके, प्र. सुरक्षा अधिकारी
१५. श्री. नितेश रंगारी, अधिक्षक
१६. श्री. मनिष हिवरे, मुख्य लिपीक
१७. श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक
१८. श्री. राजा बुलानी, लिपिक

यावेळी श्री. श्रीधर पाटणकर, अतिरिक्त आयुक्त हे आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ झाले.

तसेच महापालिका सचिवांच्या स्थानी श्री. सुखदेव बलमे, मुख्य लेखा परिक्षक हे आसनस्थ होते.

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.

१. श्रीमती विशाखा सावंत

२. श्रीमती मनिषा महाजन

३. श्रीमती नर्गिस खान

दुपारी १२.४५ वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. १ :—** सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत निविदा प्रक्रिया केलेल्या उल्हासनगर—५ येथिल गायकवाड पाडा मधील बॅरेक क्र. २०५८ ते शिवमंदिर टॅकर पॉईंट येथे सी.सी. पेव्हमेंट रस्ता बांधणे या कामाकरीता मे. साई सिध्दनाथ कंस्ट्रक्शन यांच्या कमी दराच्या निविदेस मान्यता देणे.

---

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**सर्वात आधी मी आपणांस सांगतो की, स्थायी समिती जो निर्णय घेते तो निर्णय जनतेला माहिती असली पाहिजे त्यासाठी एक प्रेस नोट दिली पाहिजे. जनसंपर्क अधिकारी यांनी सविस्तर माहिती एक प्रेस नोटमध्ये दिली पाहिजे.

**सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—**याबाबत आयुक्तांना सांगा, आयुक्त साहेबांना अधिकार आहे ना, आपण कसे आदेश देता.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**हा अधिकार सभापती महोदय यांना आहे. पत्रकारांना येथे बोलवा, ते सूचना प्रेस नोटमध्ये देतील. आणि असे जर करायचे असेल तर दोन्ही सभागृहामध्ये तसे करा. सूचना आहे बरोबर आहे परंतु चुकीचा पायंडा पडेल.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया:–</u>यात काय होते साहेब, आयुक्तांच्या आदेशानुसार स्थायी समिती निविदा काढते, आमच्या म्हणण्यानुसार, नगरसेवकांच्या म्हणण्यानुसार ठराव पारीत होत असतात. त्याकरीता जनसंपर्क अधिका–याने एक प्रेस नोट दिली पाहिजे.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>हे महापालिकेचे काम आहे. आम्हांस आदेश दयायची आवश्यकता नाही.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>हा माझा आदेश नाही, सभापती आदेश देवु शकतात.

<u>सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा :–</u>सर्वांची इच्छा असेल तर मी सूचना देते, प्रेस नोट दया.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>आपण जनसंपर्क अधिका–याला आदेश दया, जनतेच्या माहितीसाठी एक प्रेस नोट दिली पाहिजे.

<u>सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा :–</u>मी जनसंपर्क अधिकारी यांना आदेश देते की, जनतेच्या माहितीसाठी एक प्रेस नोट देणे आवश्यक आहे.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>सदरचा विषय पारीत करण्यात यावा.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>सदरचा विषय इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करण्यात यावा. तसेच आजच्या सभा सूचनेवर जेवढे विषय आहेत ते सर्व इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करण्यात यावेत.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>इतिवृत्त पास होवु दया. घाई काय आहे.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :–</u>एक मिनिट, यांची निविदा १ कोटी ३५ लाखाची आहे. सदर कामासाठी निधी कोठुन उपलब्ध होणार?

<u>श्री. भरत बठिजा, प्र. शहर अभियंता:–</u>महापालिका निधीतुन सदरचे काम करण्यात येईल. मागील वर्षात आपण महासभेत पारीत केले होते.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>होय, बरोबर आहे, महासभेत पारीत केले होते.

<u>श्री. सुखदेव बलमे, मुख्य लेखा परिक्षक तथा सचिवांच्या जागी प्राधिकृत अधिकारी:—</u>सदर विषय पारीत करण्यात यावा का?

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑**विषय क्र. १ :—** सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत निविदा प्रक्रिया केलेल्या उल्हासनगर—५ येथिल गायकवाड पाडा मधील बॅरेक क्र. २०५८ ते शिवमंदिर टॅकर पॉईंट येथे सी.सी. पेव्हमेंट रस्ता बांधणे या कामाकरीता मे. साई सिध्दनाथ कंस्ट्रक्शन यांच्या कमी दराच्या निविदेस मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिका प्रभाग क्षेत्र क्र.४ मधील मंजुरी मिळालेल्या **उल्हासनगर—५ येथील गायकवाड पाडा मधील बॅरेक क्र.२०५८ ते शिव मंदिर टॅकर पॉईंट येथे सि.सि. पेव्हमेंट रस्ता बांधणे** या कामांकरीता बी—१ प्रकारच्या दोन भाग (तांत्रिक व आर्थिक) पध्दतीने नोंदणीकृत ठेकेदारांकडून दिनांक १५/०७/२०१५ रोजी निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्राकलनीय खर्च | रु.१३५०५१४९/— |
| २ | निविदा प्रसिध्द केलेली वर्तमानपत्रे | १) दै.नवशक्ती २) दै. हमारा महानगर |
| ३ | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक १५/०७/२०१५ |
| ४ | निविदा विक्री कालावधी | दिनांक १७/०७/२०१५ ते २८/०९/२०१५ |
| ५ | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक ३०/०९/२०१५ |
| (अ) | प्रथम मुदतवाढ | दिनांक ०३/०९/२०१५ |
| (ब) | द्वितीय मुदतवाढ | दिनांक २४/०९/२०१५ |
| ६ | तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | दिनांक ०५/१०/२०१५ |
| ७ | आर्थिक भाग उघडण्याचा दिनांक | दिनांक ०५/१०/२०१५ |
| ८ | विक्री केलेल्या निविदांची संख्या | २ |
| ९ | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | २ |

**दिनांक ०५/१०/२०१५** रोजी मा.अतिरिक्त आयुक्त, मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक, शहर अभियंता यांचे उपस्थितीत **उल्हासनगर–५ येथील गायकवाड पाडा मधील बॅरेक क्र.२०५८ ते शिव मंदिर टॅंकर पॉईंट येथे सि.सि. पेव्हमेंट रस्ता बांधणे** या कामाच्या निविदेचा तांत्रिक भाग उघडण्यात आला त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ. क्र. | निविदाकाराच्या निविदेमधील बाबी | मे. साई सिध्दनाथ कन्स्ट्रक्शन | मे.शुभम कन्स्ट्रक्शन |
|---|---|---|---|
| १ | निविदा प्रपत्रकाच्या खरेदीची पावती | होय | होय |
| २ | इसारा रक्कमेचा डी.डी. जोडला आहे का ? | होय | होय |
| ३ | महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्यात वर्ग–१–अ मध्ये नोंदणी असल्याचे प्रमाणपत्र जोडले आहे का? | होय | होय |
| ४ | अद्यावत आयकर रिटर्न भरल्याची पावती | होय | होय |
| ५ | कामाचा अनुभव | होय | नाही |
| | अ) ८० टक्के पहिल्या कामासाठी | – | – |
| | ब) ५० टक्के दुस–या कामासाठी | होय | – |
| | क) ४० टक्के तिस–या कामासाठी | – | – |
| | निविदाकाराने निविदा भरलेली रक्कम तपासणे. | | |
| ६ | निविदाकाराकडे उपलब्ध असलेल्या तांत्रिक कर्मचा–यांची माहिती | होय | होय |
| ७ | निविदा फॉर्म पुर्णपणे भरलेले (परिशिष्ट–१) | होय | होय |
| ८ | प्राधिकृत केलेल्या व्यक्तिसाठी निविदाकाराने द्यावयाचे प्रमाणपत्र (परिशिष्ट–२) | होय | होय |
| ९ | निविदाकाराने प्राधिकृत व्यक्तिसाठी दिलेला दाखला निविदाकार अंकलिखित असल्याचे नोटराईजड केलेले प्रतिज्ञापत्र (परिशिष्ट–३) | होय | होय |
| १० | निविदाकाराची सविस्तर माहिती (परिशिष्ट–४) | होय | होय |
| ११ | निविदाकाराची कामगिरी वरुन माहिती (परिशिष्ट–५) | होय | होय |
| १२ | संस्था/कंपनी नोंदणी (भागिदारी, मालकी, कंपनी इत्यादीचे) दस्तऐवज | होय | होय |
| १३ | व्हॅट नोंदणी प्रमाणपत्र | होय | होय |
| १४ | विक्रीकर/व्हॅट रिर्टन भरण्याची पावती | होय | होय |
| १५ | पॅन कार्डाची प्रत | होय | होय |
| १६ | निविदा भरतेवेळी निविदाकाराच्या हाती असलेल्या अथवा पूर्ण झालेल्या निविदा किंमती इतक्या सम कामाचा अनुभवाचा दाखला. | होय | होय |

| | | | |
|---|---|---|---|
| १७ | नाव, पदनाम व मोबाईल नंबर इत्यादी मुख्य कार्य अधिकारी स्तरावरील अधि–याचे अखत्यारित (प्रोब्लेम एक्सलेशन मेकॅनिझम) | होय | होय |
| १८ | प्लांट मशिनरी, व्हायब्रेटर रोलर, स्टॅटीक रोल्ट, पेव्हर फिनिशर यांची मालकी व असल्याचे दस्तऐवज | होय | होय |
| १९ | मेमोरण्डम पुर्णपणे भरलेले व स्वाक्षरी केलेले | होय | होय |
| २० | सॉलवन्सी सर्टीफिकेट | होय | होय |

सदर निविदांची सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये छाननी समिती मार्फत छाननी केली असता १) **मे. साई सिध्दनाथ कन्स्ट्रक्शन** २) **मे. शुभम कन्स्ट्रक्शन** यांच्या निविदा अटी शर्तीनुसार असल्याने पात्र आहेत. तरी उपरोक्त निविदाकारांच्या निविदांचा आर्थिक बाबींचा दुसरा भाग (आर्थिक दर) उघडण्यात आला. **मे. शुभम कन्स्ट्रक्शन** यांनी अनुभव प्रमाणपत्र सोबत जोडलेले नाही. सदर निविदेस ०२ वेळा मुदतवाढ देण्यात आली आहे

आज **दिनांक** ०५/१०/२०१५ रोजी उपरोक्त निविदाकारांचा आर्थिक बाबींचा दुसरा भाग (आर्थिक दर) मा.अतिरिक्त आयुक्त सो., यांचे अध्यक्षतेखालील निवड समिती सदस्य मुख्य लेखाअधिकारी, मुख्य लेखापरिक्षक, शहर अभियंता, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे उपस्थितीत उघडण्यात आला. त्याप्रमाणे निविदाकांरानी दिलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| १) **मे. साई सिध्दनाथ कन्स्ट्रक्शन** | दिलेले दर ०.५२ टक्के कमी |
| २) **मे. शुभम कन्स्ट्रक्शन** | दिलेले दर ५.५७ टक्के जास्त |

उपरोक्त निविदाकारांपैकी **मे. साई सिध्दनाथ कन्स्ट्रक्शन** यांनी दरसूची वर ०.५२ टक्के कमी (0.52% below) प्रमाणे दर दिले असुन त्याप्रमाणे **मे. साई सिध्दनाथ कन्स्ट्रक्शन** यांची सदर काम देणेकरिता शिफारस करण्यात येत आहे.

तरी **मे. साई सिध्दनाथ कन्स्ट्रक्शन** यांची दरसूचीपेक्षा ०.५२% कमी दराच्या निविदेस मा. स्थायी समितीची मान्यता मिळणेकरिता प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. ७१ दिनांकः– २३.१२.२०१५

सुचकाचे नाव :– श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेश वदारिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत निविदा प्रक्रिया केलेल्या उल्हासनगर–५ येथिल गायकवाड पाडा मधील बॅरेक क्र. २०५८ ते शिवमंदिर टॅकर पॉईंट येथे सी.सी. पेव्हमेंट रस्ता बांधणेकामी मे. साई सिध्दनाथ कंस्ट्रक्शन यांच्या कमी दराच्या निविदेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी

---

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. २ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. २ :–** सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत निविदा प्रक्रिया केलेल्या उल्हासनगर–४ येथिल स्वामी लिलाशहा नारी शाळा ते ओटी पर्यंत सी.सी. पेव्हमेंट रस्ता बांधणे या कामाकरीता मे. साई सिध्दनाथ कंस्ट्रक्शन यांच्या कमी दराच्या निविदेस मान्यता देणे.

---

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :–</u>या विषयाबाबत श्री. सुर्वे साहेबांना बोलायचे असेल तर बोलावे.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>सुरुवातीचा व हा विषय हे दोन्ही विषय सारखे आहेत. हा विषय इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करा. हे काम लवकरात लवकर सुरु झाले पाहिजे.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:–</u>दोन्ही विषय सारखे असल्याने इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करा.

<u>श्री. सुखदेव बलमे, मुख्य लेखा परिक्षक तथा सचिवांच्या जागी प्राधिकृत अधिकारी:–</u>सदर विषय पारीत करण्यांत यावा का?

<u>काही सदस्य:–</u>पास,पास.......

<u>सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा :–</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑ **विषय क्र. २ :–** सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत निविदा प्रक्रिया केलेल्या उल्हासनगर–४ येथिल स्वामी लिलाशहा नारी शाळा ते ओटी पर्यंत सी.सी. पेव्हमेंट रस्ता बांधणे या कामाकरीता मे. साई सिध्दनाथ कंस्ट्रक्शन यांच्या कमी दराच्या निविदेस मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिका प्रभाग क्षेत्र क्र.३ मधील मंजुरी मिळालेल्या **उल्हासनगर–४ येथील स्वामी लिलाशहा नारी शाळा ते ओटी पर्यंत सि.सि. पेव्हमेंट रस्ता बांधणे** या कामांकरीता बी–१ प्रकारच्या दोन भाग (तांत्रिक व आर्थिक)

पध्दतीने नोंदणीकृत ठेकेदारांकडून दिनांक १५/०७/२०१५ रोजी निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्राकलनीय खर्च | रु.६५२१७३९/— |
| २ | निविदा प्रसिध्द केलेली वर्तमानपत्रे | १) दै.नवशक्ती २) दै. हमारा महानगर |
| ३ | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक १५/०७/२०१५ |
| ४ | निविदा विक्री कालावधी | दिनांक १७/०७/२०१५ ते २८/०९/२०१५ |
| ५ | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक ३०/०९/२०१५ |
| अ) | प्रथम मुदतवाढ | दिनांक ०२/०९/२०१५ |
| ब) | द्वितीय मुदतवाढ | दिनांक १९/०९/२०१५ |
| क) | तृतीय मुदतवाढ | दिनांक २४/०९/२०१५ |
| ड) | चौथी मुदतवाढ | — |
| ६ | तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | दिनांक ०५/१०/२०१५ |
| ७ | आर्थिक भाग उघडण्याचा दिनांक | दिनांक ०५/१०/२०१५ |
| ८ | विक्री केलेल्या निविदांची संख्या | २ |
| ९ | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | २ |

**दिनांक** ०५/१०/२०१५ रोजी मा.अतिरिक्त आयुक्त, मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक, शहर अभियंता यांचे उपस्थितीत उल्हासनगर—४ येथील स्वामी लिलाशहा नारी शाळा ते ओटी पर्यंत सि.सि. पेव्हमेंट रस्ता बांधणे या कामाच्या निविदेचा तांत्रिक भाग उघडण्यात आला त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ. क्र. | निविदाकाराच्या निविदेमधील बाबी | मे. साई सिध्दनाथ कन्स्ट्रक्शन | मे.शुभम कन्स्ट्रक्शन |
|---|---|---|---|
| १ | निविदा प्रपत्रकाच्या खरेदीची पावती | होय | होय |
| २ | इसारा रक्कमेचा डी.डी. जोडला आहे का ? | होय | होय |
| ३ | महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्यात वर्ग—१—अ मध्ये नोंदणी असल्याचे प्रमाणपत्र जोडले आहे का? | होय | होय |
| ४ | अद्यावत आयकर रिटर्न भरल्याची पावती | होय | होय |
| ५ | कामाचा अनुभव | होय | नाही |
| | अ) ८० टक्के पहिल्या कामासाठी | — | — |
| | ब) ५० टक्के दुस—या कामासाठी | होय | — |
| | क) ४० टक्के तिस—या कामासाठी | — | — |

| | | | |
|---|---|---|---|
| | निविदाकाराने निविदा भरलेली रक्कम तपासणे. | | |
| ६ | निविदाकाराकडे उपलब्ध असलेल्या तांत्रिक कर्मचा–यांची माहिती | होय | होय |
| ७ | निविदा फॉर्म पुर्णपणे भरलेले (परिशिष्ट–१) | होय | होय |
| ८ | प्राधिकृत केलेल्या व्यक्तिसाठी निविदाकाराने द्यावयाचे प्रमाणपत्र (परिशिष्ट–२) | होय | होय |
| ९ | निविदाकाराने प्राधिकृत व्यक्तिसाठी दिलेला दाखला निविदाकार अंकलिखित असल्याचे नोटराईजड केलेले प्रतिज्ञापत्र (परिशिष्ट–३) | होय | होय |
| १० | निविदाकाराची सविस्तर माहिती (परिशिष्ट–४) | होय | होय |
| ११ | निविदाकाराची कामगिरी वरुन माहिती (परिशिष्ट–५) | होय | होय |
| १२ | संस्था/कंपनी नोंदणी (भागिदारी, मालकी, कंपनी इत्यादीचे) दस्तऐवज | होय | होय |
| १३ | व्हॅट नोंदणी प्रमाणपत्र | होय | होय |
| १४ | विक्रीकर/व्हॅट रिर्टन भरण्याची पावती | होय | होय |
| १५ | पॅन कार्डाची प्रत | होय | होय |
| १६ | निविदा भरतेवेळी निविदाकाराच्या हाती असलेल्या अथवा पूर्ण झालेल्या निविदा किंमती इतक्या सम कामाचा अनुभवाचा दाखला. | होय | होय |
| १७ | नाव, पदनाम व मोबाईल नंबर इत्यादी मुख्य कार्य अधिकारी स्तरावरील अधि–याचे अखत्यारित (प्रोब्लेम एक्सलेशन मेकॅनिझम) | होय | होय |
| १८ | प्लांट मशिनरी, व्हायब्रेटर रोलर, स्टॅटीक रोल्ट, पेव्हर फिनिशर यांची मालकी व असल्याचे दस्तऐवज | होय | होय |
| १९ | मेमोरण्डम पुर्णपणे भरलेले व स्वाक्षरी केलेले | होय | होय |
| २० | सॉलवन्सी सर्टीफिकेट | होय | होय |

सदर निविदांची सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये छाननी समिती मार्फत छाननी केली असता १) **मे. साई सिध्दनाथ कन्स्ट्रक्शन** २) **मे. शुभम कन्स्ट्रक्शन** यांच्या निविदा अटी शर्तीनुसार असल्याने पात्र आहेत. तरी उपरोक्त निविदाकारांच्या निविदांचा आर्थिक बाबींचा दुसरा भाग (आर्थिक दर) उघडण्यात आला. **मे. शुभम कन्स्ट्रक्शन** यांनी अनुभव प्रमाणपत्र सोबत जोडलेले नाही. सदर निविदेस ०३ वेळा मुदतवाढ देण्यात आली आहे

आज **दिनांक ०५/१०/२०१५** रोजी उपरोक्त निविदाकारांचा आर्थिक बाबींचा दुसरा भाग (आर्थिक दर) मा.अतिरिक्त आयुक्त सो., यांचे अध्यक्षतेखालील निवड समिती सदस्य मुख्य लेखाअधिकारी, मुख्य लेखापरिक्षक, शहर अभियंता, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे उपस्थितीत उघडण्यात आला. त्याप्रमाणे निविदाकारांनी दिलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

१) मे. साई सिध्दनाथ कन्स्ट्रक्शन — दिलेले दर ०.५२ टक्के कमी

२) मे. शुभम कन्स्ट्रक्शन — दिलेले दर ५.५७ टक्के जास्त

उपरोक्त निविदाकारांपैकी **मे. साई सिध्दनाथ कन्स्ट्रक्शन** यांनी दरसूची वर ०.५२ टक्के कमी (0.52% below) प्रमाणे दर दिले असुन त्याप्रमाणे **मे. साई सिध्दनाथ कन्स्ट्रक्शन** यांची सदर काम देणेकरिता शिफारस करण्यात येत आहे.

तरी **मे.साई सिध्दनाथ कन्स्ट्रक्शन** यांची दरसूचीपेक्षा ०.५२% कमी दराच्या निविदेस मा. स्थायी समितीची मिळणेकरिता प्रस्तावित.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ७२</u> <u>दिनांकः— २३.१२.२०१५</u>

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत निविदा प्रक्रिया केलेल्या उल्हासनगर—४ येथिल स्वामी लिलाशहा नारी शाळा ते ओटी पर्यंत सी.सी. पेव्हमेंट रस्ता बांधणेकामी मे. साई सिध्दनाथ कंस्ट्रक्शन यांच्या कमी दराच्या निविदेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ३ :—** उल्हासनगर—३ येथील सपना उद्यान येथे सिंधुभवन बनविणेच्या कामाचे तयार करण्यात आलेल्या प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देवुन कामांची ई—निविदा प्रक्रिया करणेस मान्यता देणे.

---

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>माझी सर्व सदस्यांना विनंती आहे की, हे काम झालेच पाहिजे. परंतु सिंधुभवन ऐवजी उल्हासनगर भवन असे नाव देण्यात यावे. जेणेकरुन सर्व समाजाचे लोक येतील, जर सिंधुभवन नाव असेल तर लोकांना वाटेल की, सिंधी समाजासाठी आहे, फक्त सिंधी लोकच त्याचा वापर करतील. म्हणुन सिंधुभवन ऐवजी उल्हासनगर भवन असे नाव देण्यात यावे. नाहीतर फक्त सिंधी समाजच याचा वापर करतील.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया:—</u>नाही, याचा वापर सर्व समाजाचे लोक करतील. हा विषय पुर्वी महासभेत सिंधुभवन या नावाने पारीत झालेला आहे.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>माझे म्हणणे असे आहे की, सिंधी लोकांना वाटेल की फक्त आमच्यासाठी आहे.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>सिंधुभवनाचा विषय महापालिका अंदाजपत्रकात पारीत झालेला आहे.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>सर्व उल्हासनगरवाशी या भवनाचा वापर करु शकतात.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>ती शाळेची जागा आहे ना?

<u>श्री. भरत बठिजा, प्र. शहर अभियंता:—</u>ती उदयानाची जागा आहे ती जागा महापालिकेच्या ताब्यात आहे. त्याचा पार्किंगसाठी वापर होतो.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>इतिवृत्ताची वाट न पाहता हा विषय पारीत करण्यात यावा.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>अधिका—यांना सांगावे की हे तांत्रिकदृष्टया योग्य आहे का, कृपया जरा सांगावे की महासभेत पारीत झालेला विषयात स्थायी समिती नावात बदल करु शकते काय?

<u>श्री. नितीन कापडणीस, उप—आयुक्त, मुख्यालय :—</u>नाही करु शकत.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>ठिक आहे.

<u>सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा :—</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ३ :—** उल्हासनगर—३ येथील सपना उद्यान येथे सिंधुभवन बनविणेच्या कामाचे तयार करण्यात आलेल्या प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देवुन कामांची ई—निविदा प्रक्रिया करणेस मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

उपरोक्त विषयान्वये उल्हासनगर—३ येथील सपना उद्यान येथे तळमजला + पहिला मजला असे सिंधुभवन बनविणेकरीता मा.आमदार महोदया तसेच मा.श्री.राम (चार्ली) पारवानी, गटनेता व मा.श्री.नरेंद्र के.ठाकूर (कुमारी ) यांनी त्यांचे संदर्भिय पत्रान्वये विनंती केली असून तळमजल्यावर पार्कींग व पहिल्या मजल्यावर सिंधु भवन बनवावे असे कळविले होते. सदर कामासाठी अर्थसंकल्पात पान क्र.४१ अनु.क्र.२३ (१२१) वर उल्हासनगर—३ येथील राजीव गांधी उद्यान (सपना गार्डन) या ठिकाणी महापालिकेतर्फे नविन सिंधुभवन निर्माण करण्याकरीता रु.१.०० कोटी रक्कमेची (पूर्वीचे २५ लाख वाढीव ७५ लाख) तरतूद ठेवण्यात आली असल्याने सदर कामाचे प्राकलन तयार करणेकरीता मान्यता मिळणेकरीता प्रस्तावित करण्यात आले होते. मा.आयुक्त सो. यांची सदर कामाचे प्राकलन तयार करण्यास मान्यता प्राप्त झाली आहे.

त्यानुसार महापालिकेचे स्थापत्य सल्लागार यांचेमार्फत उल्हासनगर—३ येथील सपना उद्यान येथे वाचनालय जवळ तळमजला + पहिला मजला असे सिंधुभवन बनविण्याच्या कामाचे प्राकलन तयार करण्यात आले असून त्याची प्राकलनिय किंमत रु.१,१९,७०,६१३/— एवढी होत आहे. महापालिकेच्या अंदाजपत्रकात सदर कामासाठी रु.१.०० कोटीची तरतूद आहे. उर्वरीत रु.२०.०० लक्ष मा.श्री.नरेंद्र के.ठाकूर हे त्यांचे विरोधी पक्ष नेता निधीतून देण्यास तयार असल्याचे त्यांनी त्यांचे दिनांक  पत्रान्वये कळविले आहे.

तरी वरीलप्रमाणे सदर कामासाठी उपलब्ध तरतूद लक्षात घेता कामाचे प्राकलनास मा.स्थायी समितीकडून प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळून कामाची ई निविदा मागविणेस मान्यता मिळणेस सदर प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे ठेवणेस सविनय सादर.

स्थायी समिती ठराव क्र. ७३ दिनांकः— २३.१२.२०१५

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर—३ येथील सपना उद्यान येथे सिंधुभवन बनविणेच्या कामाचे तयार करण्यात आलेल्या प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देवुन कामांची ई—निविदा प्रक्रिया करणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्रमांक. ४ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. ४ :—** सार्वजनिक बांधकाम विभागअंतर्गत निविदा प्रक्रिया केलेल्या उल्हासनगर प्रभाग क्र. २६, मधील बॅरेक नं. १४९२—१४९३ येथे समाजमंदिर बांधणेस मान्यता देणे.

---

काही सदस्य :—पास—पास……

सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा :— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ४ :—** सार्वजनिक बांधकाम विभागअंतर्गत निविदा प्रक्रिया केलेल्या उल्हासनगर प्रभाग क्र. २६, मधील

बॅरेक नं. १४९२–१४९३ येथे समाजमंदिर बांधणेस मान्यता देणे.

## प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिका प्रभाग क्षेत्र क. ३ मधील मंजूरी मिळालेल्या **उल्हासनगर प्रभाग क.२६, मधील बॅरेक क.१४९२–१४९३ येथे समाजमंदिर बांधणे** या कामांकरीता बी–१ प्रकारच्या दोन भाग (तांत्रिक व आर्थिक) पध्दतीने नोंदणीकृत ठेकेदारांकडून दिनांक २५/०४/२०१५ रोजी दु.३.०० वाजेपर्यंत निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्राकलनीय खर्च | रु.३५,५६,०००/– |
| २ | निविदा प्रसिध्द केलेली वर्तमानपत्रे | १) दै.नवशक्ती २) दै. हमारा महानगर |
| ३ | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक ३०/०४/२०१५ |
| ४ | निविदा विक्री कालावधी | दिनांक ३०/०४/२०१५ ते ११/०५/२०१५<br>मुदतवाढ दिनांक २८/०५/२०१५ |
| ५ | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक ०१/०६/२०१५ |
| ६ | तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | दिनांक ०९/०६/२०१५ |
| ७ | आर्थिक भाग उघडण्याचा दिनांक | दिनांक १७/०७/२०१५ |
| ८ | विक्री केलेल्या निविदांची संख्या | २ |
| ९ | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | २ |

दिनांक ०९/०६/२०१५ रोजी मा.अतिरिक्त आयुक्त, मुख्य लेखा परिक्षक, शहर अभियंता यांचे उपस्थितीत **उल्हासनगर प्रभाग क.२६, मधील बॅरेक क.१४९२–१४९३ येथे समाजमंदिर बांधणे** या कामाच्या निविदेचा तांत्रिक भाग उघडण्यात आला त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ. क. | निविदाकाराच्या निविदेमधील बाबी | मे.नवनिर्माण कन्स्ट्रक्शन | मे.ए.एम.रामचंदानी |
|---|---|---|---|
| १ | निविदा प्रपत्रकाच्या खरेदीची रक्कम भरलेली आहे का? | होय | होय |
| २ | इसारा रक्कम भरलेली आहे का ? | होय | होय |
| ३ | अद्यावत आयकर रिटर्न भरल्याची पावती | होय | होय |
| ४ | कामाचा अनुभव | होय | होय |
| ५ | पॅन कार्डाची प्रत | होय | होय |
| ६ | संस्था/कंपनी नोंदणी (भागिदारी, मालकी, कंपनी इत्यादीचे) दस्तऐवज | होय | होय |

सदर निविदांची सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये छाननी समिती मार्फत छाननी केली असता **१) मे. नवनिर्माण कन्स्ट्रक्शन २) मे. ए.एम.रामचंदानी** यांच्या निविदा अटी शर्तीनुसार असल्याने पात्र आहेत. तरी उपरोक्त निविदाकारांच्या निविदांचा दुसरा भाग उघडण्यात प्रस्तावित करण्यात आले. सदरचे प्राकलनाचे दर सन २०१३–२०१४ च्या दराने तयार करण्यात आले आहे

आज **दिनांक १७/०७/२०१५** रोजी उपरोक्त निविदाकारांचा आर्थिक बाबींचा दुसरा भाग (आर्थिक दर) मा.अतिरिक्त आयुक्त सो., यांचे अध्यक्षतेखालील निवड समिती सदस्य मुख्य लेखाअधिकारी, मुख्य लेखापरिक्षक, शहर अभियंता, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे उपस्थितीत उघडण्यात आला. त्याप्रमाणे निविदाकांरानी दिलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

१) मे. **नवनिर्माण कन्स्ट्रक्शन** दिलेले दर १७.१७ टक्के जास्त

२) मे. ए.एम.रामचंदानी दिलेले दर १६.०० टक्के जास्त

उपरोक्त निविदाकारांपैकी **मे.ए.एम.रामचंदानी** या सर्वात कमी दराच्या निविदाकारांशी निविदा समितीने चर्चा करुन दर कमी करण्यास वाटाघाटी केल्या त्याप्रमाणे **मे. ए.एम.रामचंदानी** यांनी वाटाघाटीअंती दरसूचीप्रमाणे ७.००टक्के जास्त (7.00% above) दर दिले असुन त्याप्रमाणे **मे. ए.एम.रामचंदानी** यांनी दि.२३/०७/२०१५ रोजीचे पत्र दिले आहे. त्याप्रमाणे **मे. ए.एम.रामचंदानी** यांना सदर काम देणेकरिता शिफारस करण्यात येत आहे.

तरी **मे. ए.एम.रामचंदानी** यांची ७.००% दराच्या निविदेस मा. स्थायी समितीकडून मान्यता मिळणेसाठी प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. ७४ दिनांकः— २३.१२.२०१५

सुचकाचे नाव :—

अनुमोदकाचे नाव :—

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार सार्वजनिक बांधकाम विभागअंतर्गत निविदा प्रक्रिया केलेल्या उल्हासनगर प्रभाग क्र. २६, मधील बॅरेक नं. १४९२—१४९३ येथे समाजमंदिर बांधणेकामी मे. ए.एम.रामचंदानी यांच्या ७.०० टक्के दराच्या निविदेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

महापालिका सचिव :— विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

————————————————————————————————————————————

⇨ **विषय क्र. ५** :—उल्हासनगर-४ येथील सर्टीफाईड स्कुल जवळ ब्लॉक नं. ३१२ ते ३१४ पर्यंतच्या रस्त्याचे खडीकरण करण्याकामी रु.४८५६००/- खर्चास प्रशासकीय व वित्तीय देवुन सदर कामी मे. साईनाथ कंन्स्ट्रक्शन यांच्याशी संविदा करण्यास मान्यता देणे.

---

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—याबाबत जरा खुलासा करण्यात यावा. ४ लाख ८५ हजार खर्चास मान्यता देण्याचा विषय स्थायी समितीसमोर कसा आला?

सदस्या श्रीमती अंजली साळवे:—पावसाळयापुर्वी केलेले काम आहे. मी स्थायी समितीला विनंती करते की हा विषय पुढील सभेत आणावा.

सदस्य श्री. राजेश वदारिया :—या कामास पंधरा दिवस लागतील, ५ लाखाचे काम आहे. आजच पारीत करावे.

सदस्या श्रीमती अंजली साळवे :—हा विषय पुढील सभेत घ्या.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—आधी खुलासा करण्यात यावा.

श्री. भरत बठिजा, प्र. शहर अभियंता :—हे काम तातडीचे असल्याने ५(२) (२) अंतर्गत केले आहे. त्याकरीता कार्योत्तर मंजुरीची आवश्यकता आहे.

श्री. श्रीधर पाटणकर, अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:—होय, यास कार्योत्तर मंजुरी दयावी.

सदस्य श्री. राजेश वदारिया :—बाकीच्या उर्वरीत कामाचे प्राकलन तयार करुन लवकरात लवकर पारीत करावे व तसे ठरावात नमुद करावे.

श्री. सुखदेव बलमे, मुख्य लेखा परिक्षक तथा सचिवांच्या जागी प्राधिकृत अधिकारी:—सदर विषय पारीत करण्यात यावा का?

सदस्य श्री. राजेश वदारिया :—सदरचा विषय इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करावा.

काही सदस्य :—पास—पास......

<u>सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा :—</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑**विषय क्र. ५ :—** उल्हासनगर-४ येथील सर्टीफाईड स्कुल जवळ ब्लॉक नं. ३१२ ते ३१४ पर्यंतच्या रस्त्याचे खडीकरण करण्याकामी रु.४८५६००/- खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देवुन सदर कामी मे. साईनाथ कंन्स्ट्रक्शन यांच्याशी संविदा करण्यास मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर—४ येथील सर्टीफाईड स्कुल जवळ ब्लॉक नं.३१२ ते ३१४ पर्यंत रस्त्याबाबत गेल्या ३ वर्षापासून आजूबाजूचे परिसरातील नागरीक व नगरसेवक सदर रस्ता बनविणेसाठी मागणी करत आहेत. कारण सदर ठिकाणाहून ये—जा करणे नागरिकांच्या गैरसोईचे झाले आहे. याबाबत आजूबाजूचे परिसरातील रहिवाशांनी दिनांक २७/०६/२०१४ रोजी आंदोलन करण्याबाबत कळविले होते. दिनांक २७/०६/२०१४ रोजी मा.सहाय्यक आयुक्त प्रभाग समिती क्र.४ यांनी त्यांचे दालनात आंदोलनकर्त्यांना, तसेच स्थानिक नगरसेविका मा.श्रीमती अंजली साळवे व संबंधित विभागाचे अधिका—यांसह चर्चा केली. तसेच मा.सहाय्यक आयुक्तांनी रस्त्यामध्ये बाधित असलेल्या ट्रान्सफार्मर हटविणेसाठी विद्युत विभागास आदेश दिले आहेत. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागास सदर रस्त्याचे प्राकलन तयार करणेसाठी निर्देश दिले आहेत. त्याप्रमाणे सदर रस्त्याचे प्राकलन तयार करण्यात आले असून त्याची प्राकलनीय किंमत रु. ४८५६००/— इतकी होत आहे.

उक्त कामावरील खर्च महापालिका अर्थसंकल्पातील C-5 (4) P-I या लेखाशिर्षातून तरतुदीमधून करावयाचा आहे. उल्हासनगर महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात उपलब्ध असलेल्या तरतुदीची आकडेवारी खाली नमुद आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | महानगरपालिका निधीमधून खर्च करणे अपेक्षित असल्यास **लेखाशिर्षाचे नांव** | C-5 (4) P-I |
| २ | विभाग क्रमांक | सार्वजनिक बांधकाम विभाग |
| ३ | एकुण अंदाजपत्रकीय तरतूद | रु.१३,५०,००,०००/— |
| ४ | दि.१/४/२०१४ रोजी प्रलंबित असलेल्या कामाच्या द`य रक्कमेपैकी सन २०१४—१ मध्ये खर्च होणारी रक्कम | रु.३६,०६,८७६/— |
| ५ | दि.१/४/२०१४ पासून खर्ची टाकण्यात आलेल्या प्रस्तावांची रक्कम (लेखा विभागातील) | रु.९८,९३,१२४/— |
| ६ | नविन कामासाठी उपलब्ध असलेली रक्कम ३—(४+५) | रु.२,७६,९४,०५०/— |
| ७ | प्रस्तावाची रक्कम | रु.४,८५,६००/— |
| ८ | एकूण खर्च (४+५+६) | रु.१,०३,७८,७२४/— |
| ९ | शिल्लक रक्कम (१०—१५) | रु.२,७२,०८,४५०/— |
| १० | प्रस्ताव रजिस्टर पान नं.२० वर नोंद घेतली | — |

सदर उल्हासनगर—४ येथील सर्टीफाईड शाळेजवळ ब्लॉक नं.३१२ ते ३१४ पर्यंतच्या रस्त्याचे खडीकरण करण्याचे कामाचे रु.४८५६००/— खर्चाच्या कामाची निविदा कार्यवाही करुन केल्यास वेळेचा अपव्यय होणार

असल्याने सदर कामाची तातडी पहाता सदर काम मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ चे कलम २ (२) अंतर्गत मे.साईनाथ कंन्स्ट्रक्शन यांचेकडून सदर काम करुन घेणेसाठी मा.स्थायी समितीच्या मान्यतेकरीता ठेवणेस मंजूरी मिळणेस्तव प्रस्तावित केले होते. त्यावर मा.अतिरिक्त आयुक्त सो. यांनी उल्हासनगर–४ येथील सर्टीफाईड शाळेजवळ महापालिकेच्या पाण्याच्या टाकीचे व त्या कुंपणाचे बांधकाम चालू आहे. सदर कामामुळे एका बाजूचा नागरीकांच्या रहदारीचा रस्ता पूर्णपणे बांधकामात आल्यामुळे रस्ता बंद होणार आहे. सबब नागरीकांच्या सोईसाठी हटविण्यात येत असलेल्या इलेक्ट्रीक ट्रान्सफार्मरच्या जागेवरुन तातडीने रस्ता तयार करणे गरजेचे आहे. अन्यथा नागरीकांमध्ये असंतोष निर्माण होण्याची शक्यता आहे. तरी प्रशासनाने प्रस्तावित केल्याप्रमाणे रस्त्याचे काम मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ चे कलम २ (२) अंतर्गत करणेस मा.स्थायी समितीच्या मान्यतेकरीता सादर करणेच्या सुचना दिल्या.

तरी वरीलप्रमाणे कामाची तातडी पाहता रु.४८५६००/– खर्चाच्या प्रस्तावास मा.आयुक्त यांच्या अधिकारात प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ चे कलम २ (२) अंतर्गत मे.साईनाथ कंन्स्ट्रक्शन यांचेकडून सदर काम करुन घेणेस संविदा करण्यास मा.स्थायी समितीची मंजूरी मिळणेस्तव प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. ७५ दिनांक:– २३.१२.२०१५

सुचकाचे नाव :–

अनुमोदकाचे नाव :–

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर–४ येथील सर्टीफाईड स्कुल जवळ ब्लॉक नं. ३१२ ते ३१४ पर्यंतच्या रस्त्याचे खडीकरण करण्याकामी रु.४८५६००/– खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देवुन मे.साईनाथ कंन्स्ट्रक्शन यांच्याशी संविदा करण्यास मान्यता देत आहे.

तसेच

उर्वरीत कामाचे प्राकलन तयार करुन लवकरात लवकर पुढील सभेत आणण्यास मान्यता देत आहे.
या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/–
अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ६ :–** उल्हासनगर–४ मध्ये स्मशानभुमीचे नुतनीकरण करणेचे कामास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणे.

---

<u>श्री. सुखदेव बलमे, मुख्य लेखा परिक्षक तथा सचिवांच्या जागी प्राधिकृत अधिकारी:—</u>सदर विषय पारीत करण्यात यावा का?

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>सदरचा विषय इतिवृत्त कायम होण्याची वाट पाट न पाहता थेट पारीत करण्यांत यावा.

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता विषय पारीत करावा.

<u>सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा :—</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ६ :—** उल्हासनगर—४ मध्ये स्मशानभुमीचे नुतनीकरण करणेचे कामास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

उपरोक्त विषयानुसार उल्हासनगर—४ मधील स्मशानभुमीचे नुतनीकरण करणे अत्यावश्यक आहे. कारण सदर स्मशानभुमीचा ब—याच वर्षापासून विकास करण्यात आलेला नाही. सदर स्मशानभुमीमध्ये प्रेताचे दहन करण्यासाठी चूल बांधणेसाठी, नागरिकांसाठी बेंचेस, अस्तित्वात असलेले शेड यांची दुरुस्ती करणे, स्मशानभुमीचे शेवटच्या भागामध्ये सि.सि. पेव्हमेंट रस्ता करणे, झाड लावण्यासाठी व गेटची दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

मा.आयुक्त सो. यांनी मा. नगरसेवक श्री. रमेश चव्हाण व शहर अभियंता यांचेसह सदर जागेची पहाणी केली आहे. त्याअनुषंगाने उल्हासनगर—४ येथील स्मशानभुमीमध्ये विविध कामे करणेसाठी प्राकलन तयार करण्यात आले आहे.

| | | |
|---|---|---|
| i) | लेखाशिर्ष | :— 16/C-5/9 Maintenance Burial grounds |
| ii) | लेखाशिर्षामध्ये उपलब्ध एकंदर तरतुद | :— १७५००००० /— |
| iii) | या कामापूर्वी बजेट कंट्रोल रजिस्टरप्रमाणे शिल्लक असलेली तरतुद | :— रु. ६२१२२०० /— |
| iv) | या कामावरील खर्च | :—रु.३५००००० /— |
| v) | या कामानंतर उक्त लेखाशिर्षात शिल्लक राहणारी तरतुद | :— रु.२७१२२०० /— |

सदर कामास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेकरिता मा.स्थायी समितीची मान्यता मिळणेकरिता प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. ७६ दिनांकः— २३.१२.२०१५

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर—४ मध्ये स्मशानभुमीचे नुतनीकरण करणेचे कामास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. ७ :— मनपा कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 42CI009529000, 42CI009529100,42CO009529200, 42CI018846600, 42CI009529300 अन्वये नोंद असलेल्या मिळकतींच्या नोंदी रदद् करून त्यावरील थकीत मालमत्ता कर व पाणीपटट्ी विलंब शास्तीसह (वसुल न होण्याजोगा कर) निर्लेखित करणेबाबत

---

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—मागील सभेत ठरविले होते की, संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई करा, ती केली काय? ज्यांनी निर्लेखित करण्याचा प्रस्ताव वेळेवर आणला नाही त्या अधिका—यांवर कारवाई केली की नाही?

श्री. शैलेश दोंदे, प्र. कर निर्धारक व संकलक:—मी खुलासा मागविला आहे.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>खुलासा कधी येईल. खुप वेळ झाला आहे. किती दिवस लागतील? ७ दिवस, १५ दिवस, २५ दिवस, एक महिना, दिड महिना ते तर सांगा.

<u>श्री. शैलेश दोंदे, प्र. कर निर्धारक व संकलक:—</u>पंधरा दिवस लागतील.

<u>श्री. श्रीधर पाटणकर, अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :—</u>खुलासा नाही आला तर त्यांच्यावर पुढील कारवाई प्रस्तावित करा.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>सभा होवुन किती दिवस झाले, अदयाप खुलासा आला नाही? स्थायी समितीच्या आदेशानुसार काम झाले पाहिजे. जर होत नसेल तर कारवाई करा. आम्ही चुकीचा ठराव करतो तर ठिक आहे. परंतु कायदयात बसत असेल तर हरकत नाही. संबंधीतांवर कारवाई झाली नाही तर तुमच्यावर कारवाई होईल. आर्थिक बाबतीत दिरंगाई केली तर त्यांच्यावर कारवाई करुन प्रापर्टी सिल करायला हव्या होत्या. अधिकारी फक्त चेंज ऑफ नेमची कामे करतात. किती सदनिका होत्या?

<u>श्री. शैलेश दोंदे, कर निर्धारक व संकलक:— </u>या बॅरेकस् होत्या, ज्यावेळेस इमारत झाली तेव्हा तेथे २३ सदनिका होत्या. त्या सदनिका निष्कासित करून त्यांचे जागेवर उमा पॅलेस या नावाची इमारत उभारण्यात आली. त्यानुसार उमा पॅलेस इमारतीमधील सदनिकाधारकांचे नावे स्वतंत्ररित्या कर आकारणी करण्यात आली आहे. त्यानुसार त्यांच्या नोंदी बंद करणे आवश्यक होते. तथापि, अद्यापही सदरच्या नोंदी सुरू आहेत. मिळकतींचे खात्यात वर्ष २०१०—११ ते २०१५—२०१६ पर्यंत मालमत्ता कर व पाणीपट्टी थकीत आहे. त्यांची रक्कम निलेखिंत करणे आवश्यक आहे.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>प्रत्येक काम अशा पध्दतीने होईल तर कसे होईल? असे बरेच प्रकरणे होत असतात. बॅरेकच्या जागेवर इमारती उभ्या राहत असतात. प्रत्येक वेळेस असेच होत राहील काय?

<u>श्री. श्रीधर पाटणकर, अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :—</u>नविन इमारती बांधल्या जातात तेव्हा त्याचवेळी त्याच्या नोंदी रद्द केल्या पाहिजेत.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया:—</u>मग त्याचवेळेस तशी आकारणी सुरु केली पाहिजे. नागरीकांना डबल बिल पाठविले जाते त्यामुळे त्याचा त्यांना त्रास होतो.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>संबंधित अधिका—यांवर अशा वेळी कारवाई केली पाहिजे.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>संबंधित अधिका—यांवर कारवाई झाली पाहिजे असे ठरावात नमुद करावे.

<u>श्री. सुखदेव बलमे, मुख्य लेखा परिक्षक तथा सचिवांच्या जागी प्राधिकृत अधिकारी:—</u>सदर विषय पारीत करण्यात यावा का?

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>सदरचा विषय इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करण्यात यावा.

<u>काही सदस्य :—</u>पास—पास……

<u>सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा :—</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑ **विषय क्र. ७ :—** मनपा कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 42CI009529000, 42CI009529100, 42CO009529200, 42CI018846600, 42CI009529300 अन्वये नोंद असलेल्या मिळकतींच्या नोंदी रदद् करून त्यावरील थकीत मालमत्ता कर व पाणीपटट्ी विलंब शास्तीसह (वसुल न होण्याजोगा कर) निर्लेखित करणेबाबत

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र 42CI009529000, 42CI009529100, 42CO009529200, 42CI018846600, 42CI009529300 अन्वये नोंद असलेल्या मिळकतींचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| Property NO. | Address |
|---|---|
| 42CI009529000 (Old No. 41/0537) | Bk. No. 1352, Room No. 8, Ulhasnagar- 4 |
| 42CI009529100 (Old No. 41/0538) | Bk. No. 1352, Room No. 9, Ulhasnagar- 4 |
| 42CO009529200 (Old No. 41/0539) | Bk. No. 1352, Room No. 10, Ulhasnagar- 4 |
| 42CI018846600 (Old No. 41/0540) | Bk. No. 1352, Room No. 11, Ulhasnagar- 4 |
| 42CI009529300 (Old No. 41/0541) | Bk. No. 1352, Room No. 12, Ulhasnagar- 4 |

वर्ष २००१ मध्ये उपरोक्त मिळकतींचे जागेवर श्री. बलराम सी. छाब्रिया यांचे नावे उल्हासनगर महानगरपालिका नगररचना विभागाकडील जा क्र. उमपा/न.र.वि/बा.प/२७१/९९/१२०२, दिनांक १९/१/२००१ व जा क्र. उमपा/न.र.वि/बा.प /२७२/ २०००/११२६, दिनांक ६/१/२००१ अन्वये बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र जारी करण्यात आले. सदर कालावधीमधील मालमत्ता कराचा भरणा ही करण्यात आला आहे. संदर्भित मिळकतीं निष्कासित करून त्यांचे जागेवर उमा पॅलेस या नावाची इमारत उभारण्यात आली. त्यानुसार उमा पॅलेस इमारतीमधील सदनिकाधारकांचे नावे स्वतंत्ररित्या कर आकारणी करण्यात आली आहे.

वास्तविक पाहता बॅरेक नं. १३५२, रूम न. ८ ते १२, उल्हासनगर—४ या जागेवर उमा पॅलेस नावाची इमारत उभारण्यात आल्यानंतर मालमत्ता क्रमांक 42CI009529000 (Old No. 41/0537), 42CI009529100 (Old No. 41/0538), 42CO009529200 (Old No. 41/0539), 42CI018846600 (Old No. 41/0540), 42CI009529300 (Old No. 41/0541) नुसार

असलेल्या नोंदी बंद करणे आवश्यक होते. तथापि, अद्यापही सदरच्या नोंदी सुरू आहेत. त्यामुळे सदर मिळकतींचे खात्यात वर्ष २०१०–११ ते २०१५–२०१६ पर्यंत खालीलप्रमाणे मालमत्ता कर व पाणीपट्टी थकीत आहे.

| मालमत्ता क्रमांक | मालमत्ता कर | पाणीपट्टी | एकुण<br>(वर्ष २०१०–२०११ ते २०१५–२०१६ अखेर) |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| ४२ब्ब००९५२९०००<br>;ब्सक छवण ४१ॅ०५३७द्ध | १२८७५ + विलंब शास्ती | १५०५६ | २७९३१ + विलंब शास्ती |
| ४२ब्ब००९५२९१००<br>;ब्सक छवण ४१ॅ०५३८द्ध | ११४६८ + विलंब शास्ती | १५०५६ | २६५२४ + विलंब शास्ती |
| ४२ब्ब००९५२९२००<br>;ब्सक छवण ४१ॅ०५३९द्ध | ६२३० + विलंब शास्ती | १५०५६ | २१२८६ + विलंब शास्ती |
| ४२ब्ब०१८८४६६००<br>;ब्सक छवण ४१ॅ०५४०द्ध | ५२६६ + विलंब शास्ती | १५०५६ | २०३२२ + विलंब शास्ती |
| ४२ब्ब००९५२९३००<br>;ब्सक छवण ४१ॅ०५४१द्ध | १४६४९ + विलंब शास्ती | १५०५६ | २९७०५+ विलंब शास्ती |

श्री. विनोद नरसिंघानी, हॅप्पी होम, सी–ब्लॉक रोड, उल्हासनगर–४ यांनी ॲड अशोक एन. अडवानी यांचेमार्फत दिनांक २४/३/२०१४ रोजीचे अर्जान्वये मालमत्ता क्रमांक 42CI009529000, 42CI009529100, 42CO009529200, 42CI018846600, 42CI009529300 अन्वये असलेल्या नोंदी रद्द करणेसाठी विनंती अर्ज केला आहे.

उक्त बाबी पाहता कर आकारणी पुस्तकातील बॅरेक नं. १३५२, रूम न. ८ ते १२, उल्हासनगर–४ या करीता मालमत्ता क्रमांक 42CI009529000 (Old No. 41/0537), 42CI009529100 (Old No. 41/0538), 42CO009529200 (Old No. 41/0539), 42CI018846600 (Old No. 41/0540), 42CI009529300 (Old No. 41/0541) नुसार असलेल्या नोंदी रद्द करून मिळकतीचे खात्यात कर आकारणीपोटी वर्ष २०१०–२०११ ते २०१५–२०१६ पर्यंत थकीत असलेली मालमत्ता कर व पाणीपट्टी अधिक विलंब शास्ती (वसुल न होण्याजोगा कर) निर्लेखित करणे आवश्यक आहे, असे इकडील मत आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील **कलम १५२ नुसार** आयुक्तास स्थायी समितीच्या मान्यतेने, कोणत्याही कराबद्दल किंवा कोणताही कर वसूल करण्यासाठी झालेल्या खर्चाबद्दल येणे असलेली जी कोणतीही रक्कम त्याच्या मते वसूल होण्याजोगी नसेल ती वेळोवेळी निर्लेखित करता येईल.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता मनपा कर आकारणी पुस्तकात खालीलप्रमाणे नोंद असलेल्या मिळकतींच्या नोंदी रद्द करून त्यांचे खात्यात वर्ष २०१०–२०११ ते २०१५–२०१६ अखेर थकीत असलेली मालमत्ता कर व पाणीपट्टी विलंब शास्तीसह (वसुल न होण्याजोगा कर) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १५२ नुसार स्थायी समितीच्या मंजुरीने निर्लेखित करणेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

| मालमत्ता क्रमांक | मालमत्ता कर | पाणीपट्टी | एकुण (वर्ष २०१०–२०११ ते २०१५–२०१६ अखेर) |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| 42CI009529000 (Old No. 41/0537) | १२८७५ + विलंब शास्ती | १५०५६ | २७९३१ + विलंब शास्ती |
| 42CI009529100 (Old No. 41/0538) | ११४६८ + विलंब शास्ती | १५०५६ | २६५२४ + विलंब शास्ती |
| 42CO009529200 (Old No. 41/0539) | ६२३० + विलंब शास्ती | १५०५६ | २१२८६ + विलंब शास्ती |
| 42CI018846600 (Old No. 41/0540) | ५२६६ + विलंब शास्ती | १५०५६ | २०३२२ + विलंब शास्ती |
| 42CI009529300 (Old No. 41/0541) | १४६४९ + विलंब शास्ती | १५०५६ | २९७०५+ विलंब शास्ती |

स्थायी समिति ठराव क्र. ७७ दिनांकः– २३.१२.२०१५

सुचकाचे नाव :– श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेश वदारिया

ही स्थायी समिति वरील प्रस्तावनेनुसार मनपा कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 42CI009529000, 42CI009529100,42CO009529200, 42CI018846600, 42CI009529300 अन्वये नोंद असलेल्या मिळकतींच्या नोंदी रदद् करून त्यावरील थकीत मालमत्ता कर व पाणीपट्टी विलंब शास्तीसह (वसुल न होण्याजोगा कर) निर्लेखित करीत आहे.

तसेच

संबधीत अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई करणेस प्रशासनास निर्देश देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ८ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ८ :—** पाणी पुरवठा अंतर्गत ई निविदा प्रक्रिया केलेल्या निविदा क्रमांक ७३६ मधील खेमाणी नाला यावर बंधारा बांधणेस, संप व पंपगृह, एस.बी.आर. तंत्रज्ञानावर आधारीत सांडपाणी प्रक्रिया केंद्राचे संकल्पन तयार करणे, बांधकाम करणे व कार्यान्वित करणे त्याप्रमाणे खेमाणी नाला ते शांतीनगर येथिल सांडपाणी प्रक्रिया केंद्रापर्यंत ६०० मी. मी. व्यासाची डी.आय.के—९ उध्वरण नलिका पुरवठा करणे व अंथरणे तसेच ५ वर्षाकरीता देखभाल व दुरुस्ती करणेकामी मे. खिल्लारी इन्फ्रा. प्रा. लिमिटेड या निविदाकाराची निविदा स्विकृत करुन त्यांच्याशी संविदा करणेस मान्यता देणे.

---

**सदस्य श्री. महेश गावडे :—**याचे मॅथडोलॉजी दिली आहे काय? निविदेत मॅथोलॉजी दिलेली नाही. ५ वर्षासाठी देखभाल व दुरुस्तीसाठी दिले आहे. सदर काम पूर्ण झाल्यानंतर देखभाल व दुरूस्ती ५ वर्षोपर्यत करावयाची आहे. मॅथेडोलॉजी देणे आवश्यक आहे. परंतू निविदाधारकांने निविदे बरोबर जोडलेले नाही.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**वर्कऑर्डरमध्ये तशा अटी टाकाव्यात, व त्या त्या ठेकेदाराकडुन पुर्ण करुन घ्याव्यात.

**सदस्य श्री. महेश गावडे:—**श्री. सेलवन साहेब, तुम्ही वाचली का निविदा?

**श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा :—**सांडपाणी हे खेमानी नाल्यापासुन उल्हास नदीत मिसळतो. खेमानी नाला येथे पंप व संपगृह बांधणे आवश्यक आहे. निविदा धारकाने १५ एम.एल.डी. पंपीग स्टेशन बांधण्याचे पाणी पुरवठा प्रकल्प किवा मलनिसारण प्रकल्प आवश्यक आहे. यासाठी २ वर्षाचा कालावधी लागणार आहे. मा. हरित लवाद न्यायालयाच्या आदेश विचारात घेता तसेच सार्वजनिक हिताच्या व आरोग्याचा विचार करता सदर काम कालमर्यादेत पुर्ण करणे आवश्यक आहे.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**आमचे म्हणणे आहे की ही निविदा मोठी आहे तर आता हा विषय डिफर करावा. आम्हांला ही माहिती वाचायची आहे.

**सदस्या श्रीमती मिनु दासानी :—**ही मोठी निविदा असल्याने आम्हांला अभ्यास करण्यास वेळ दयावा.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**१५ लाखाचा दंड झाला आहे. उच्च न्यायालयाने स्टे दिला आहे. उच्च न्यायालयाचा आदेश आहे की निविदा दयावी, नंतर बोलतील आणाकडुन दंड वसुल नाही करणार. कधीही

सभेची सूचना दोन दिवसांपुर्वी दिली जाते. त्यामुळे आपणांस विषय काय आहे ते वाचता येते. जर या कामास विलंब झाला तर याचा परिणाम शहरास भोगावा लागेल. दुसरे स्थायी समितीस जबाबदार धरले जाईल.

श्री. सुखदेव बलमे, मुख्य लेखा परिक्षक तथा सचिवांच्या जागी प्राधिकृत अधिकारी:—सदर विषय पारीत करण्यात यावा का ?

सदस्य श्री. महेश गावडे :—यात मॅथेडोलॉजी टाकुन हा विषय पारीत करण्यात यावा.

सदस्य श्री. राजेश वदारिया :—होय सदरचा विषय इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करण्यात यावा.

काही सदस्य :—पास—पास......

सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा :—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑विषय क्र. ८ :— पाणी पुरवठा अंतर्गत ई निविदा प्रक्रिया केलेल्या निविदा क्रमांक ७३६ मधील खेमाणी नाला यावर बंधारा बांधणेस, संप व पंपगृह, एस.बी.आर. तंत्रज्ञानावर आधारीत सांडपाणी प्रक्रिया केंद्राचे संकल्पन तयार करणे, बांधकाम करणे व कार्यान्वित करणे त्याप्रमाणे खेमाणी नाला ते शांतीनगर येथिल सांडपाणी प्रक्रिया केंद्रापर्यंत ६०० मी.मी. व्यासाची डी.आय.के—९ उध्वरण नलिका पुरवठा करणे व अंथरणे तसेच ५ वर्षाकरीता देखभाल व दुरुस्ती करणेकामी मे. खिल्लारी इन्फ्रा. प्रा. लिमिटेड या निविदाकाराची निविदा स्विकृत करुन त्यांच्याशी संविदा करणेस मान्यता देणे.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागाअंतर्गत वरील कामाकरीता हि निविदा प्रक्रियेची माहिती खालील प्रमाणे

| | |
|---|---|
| १) कामाचा प्राकलनीय खर्च | :— रू. ३२,७०,३५,५७६.०० |
| २) 'ई' निविदा प्रसिध्दी | :— दिनांक २७/११/२०१५ |
| ३) निविदा प्रसिध्द केल्याचा | :— दिनांक २७/११/२०१५. |
| ४) निविदा सादर करावयाचा अंतिम | :— दिनांक ०९/१२/२०१५ |
| ५) तांत्रिक भाग उघडल्याचा | :— दिनांक ०९/१२/२०१५ |
| ६) आर्थिक भाग उघडल्याचा | :— दिनांक ०९/१२/२०१५ |
| ७) विक्री केलेल्या निविदांची संख्या | :— ०३ |
| ८) प्राप्ता झालेल्या निविदांची संख्या | :— ०३ |

सदर निविदा प्रक्रिया सुरू असताना भाग घेतलेल्या निविदा धारक मे. एस.पी.एम.एल. इंन्फ्रा. लिमीटेड न्यु दिल्ली.यांनी पूर्ण झालेल्या प्रक्रिया बाबतच्या आक्षेप त्यांच्या पत्र क्रं. १०//१२/२०१५ व १५/१२/२०१५ च्या पत्रान्वये नोंदलेले होते. त्यानंतर निवेदेमधील

मागविण्यात आलेल्या तांत्रिक बाब Prequalification तसेच अर्थिक बाबी संदभातील स्पष्टीकरण खालील प्रमाणे.

१तंत्रिक मुद्देः—

| अ. क्र. | मुद्दा | स्पष्टीकरण | शेरा |
|---|---|---|---|
| १ | निविदा धारकाने मलनि:स्सारण केंद्र 15 MLD SBR Tecnhology) ांधण्याचा अनुभव असणे आवश्यक आहे. | १६ एम.एल.डी. मलनि:स्सारण केद्र शिर्डी येथे व १५.५ एम एल डी मलनिसारण केद्र पंढरपुर नगर परिषद येथे खिलारी एस एस इजिनियरिग च्या नावाने जोडलेले आहे. | या संदर्भात कमीत कमी दर भरलेले निविदाधारक मे.खिल्लारी इन्फ्रा.प्रा.लिमिटेड यांची निविदा समिती अध्यक्ष यांच्याकडे झालेल्या बैठकी मधील चर्चेनुसार निविदा बरोबर Memorandum of Articles अनुसार मे.खिल्लारी इन्फ्रा. प्रा. लिमिटेड व में. खिल्लारी एस. एस. इजिनिअरींग ॲन्ड कंन्स्ट्रक्शन कंपनी या दोन्ही कंपन्याचे एकत्रीकरण झालेले असल्याने व Proprietor एकच असल्याने दोन्ही कंपन्याच्या केलेल्या कामाचा अनुभव ग्राहय धरण्यास विनंती केली आहे. |
| २ | निविदा धारकाने १५ एम.एल.डी. स्टेशन बाधण्याचे पाणी पुरवठा किवा मलनिसारण प्रकल्प आवश्यक आहे, | १५.२९ एम. एल. डी. पंपीग स्टेशन पंढरपुर नगरपरिषदेत खिलारी एस. एम, इजिनियरिग, या नावाने जोडलेला आहे. | |
| ३ | निविदा धारकाने ३०० मि.मि. व्यास डी. आय.के. ९ लांबी = १७०० मिटर चा अनुभव असल्याचा पुरावा सादर करणे. | पंढरपुर नगरपरिषदेच्या प्रमाणपत्रानुसार मि.मि. व्यास डी. आय. के. ९ लांबी १५२० मिटर व ४०० मि.मि. व्यास लांबी १५२० मिटर अंथरणे बाबत मे. खिल्लारी एस.एस. इजिनिरीगच्या प्रमाणपत्र सादर केले आहे. | |
| ४ | निविदा धारकास १५ एम.एला .डी क्षमतेचे मलनि:स्सारण केंद्र देखभाल व दुरुस्ती अनुभव आसल्याचे प्रमाणपत्र सादर करणे. | १६ एम.एल.डी व १५ एम.एल.डी. मलनि:स्सारण केंद्र देखभाल व दुरुस्ती अनुभव प्रमाणपत्र मे. खील्लारी एस. एस.इजिनिरीगच्या नावाने सादर केले आहे. | |
| ५ | निविदा धारकाने Work plan, methodology, design and supply calculation तसेच consumption of all units in STP सादर करणे. | निविदा धारकाने SBR Technology फक्त write-up.... सादर केलेला आहे. Support calculation of Consumption of all units in STP | सदर काम पूर्ण झाल्यानंतर देखभाल व दुरूस्ती ५ वर्षोपर्यत करावयाची आहे. त्यामुळे देखभाल व दुरूस्तीच्या कालावधी मधील लागणारे विजेचा वापर व लागणारे केंमिकल्स/रसायणे व इतर साहित्य सेन्ट्री वस्तूचा पुरवठा महापालिका मार्फत करावयाचा असल्याने कमीत कमी खर्चाच्या Methodology देणे आवश्यक |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | आहे. परंतू निविदा धारकांने निविदे बरोबर जोडलेले नाही. |

लेखा शाखेचे मुद्देः—

| अ. क्र. | मुद्दा | शेरा |
|---|---|---|
| १ | मे.खिल्लारी इन्फ्रा.प्रा.लिमिटेड यांनी निविदा सोबत सादर केलेले वित्तीय वर्ष २००८ पासुन ते २०१५ पर्यंतचे Balance Sheet, Profit and loss account Statement, Net worth, Net Cash accruals इ. माहिती Register of Companies (ROC) च्या Website वर उपलब्ध असलेली माहितीशी जुळत नाही. | मे.खिल्लारी इन्फ्रा.प्रा.लिमिटेड यांच्या सनदी लेखा पालांनी मागील पाच वर्षाच्या उलाढालीचे प्रमाणपत्र दिलेले असुन, निविदेमधील अटी व शर्ती नुसार सुसंगत आहे. |
| २ | मे.खिल्लारी इन्फ्रा.प्रा.लिमिटेड यांनी मे. जय भारत कंन्स्ट्रक्शन कंपनीची JV केलेले आहे. परंतु मे. जय भारत कंन्स्ट्रक्शन कंपनीचे Annual Report, CA प्रमाणपत्र, Income Tax प्रमाणपत्र निविदेसाबत जोडलेले नाही. | मे.खिल्लारी इन्फ्रा.प्रा.लिमिटेड यांनी सादर केलेले Annual Report Ca प्रमाणपत्र व Incom Tax ही व इतर आवश्यक कागदपत्रे सनदी लेखा पालाने निविदेमधील अटी व शर्तीनुसार दिलेली असल्याने, मे. जय भारत यांच्या कागदपत्रांची आवश्यकता नाही. |
| ३ | Register of Companies (ROC) प्रमाणे मे. खिल्लारी एस. एस. इजिनिअरींग ॲन्ड कंन्स्ट्रक्शन कंपनी व मे. खिल्लारी इन्फ्रा.प्रा.लिमिटेड या दोन्ही कंपन्यामध्ये Transaction झालेले आहे व या वेगवेगळया कायदेशिर कंपनी आहेत व त्या एकत्र झालेल्या नाहीत. त्यामुळे मे.खिल्लारी एस.एस. इजिनिअरींग ॲन्ड कंन्स्ट्रक्शन कंपनीचे अनुभव प्रमाणपत्र ग्राहय धरु नये. | कंपनी रजिस्ट्रेशन ॲक्ट नुसार नोंद केलेली असुन, अनु. क्र.२ नुसार आयकर विभागास मे.एस.एस. खिल्लारी नावाने वैयक्तीक आयकर परतावे व कर भरलेला असल्याने त्यांचे अनुभव प्रमाणपत्र ग्राहय धरण्यास हरकत नाही. |

उपरोक्त प्रमाणे सदर निविदा प्रकरणी आलेल्या तक्रारीचे प्रशासकीय मुद्यांचे स्पष्टीकरण खालील प्रमाणे.

सदर निविदा मा. हरित लवाद न्यायालयाच्या आदेश विचारात घेता तसेच सार्वजनिक हिताच्या व आरोग्याचा विचार करता सदर कामे पुर्ण करणेसाठी मा. हरित लवाद न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे कालबध्द वेळेत पुर्ण करणे क्रमप्राप्त आहे.

सदर तक्रारदार यांनी या कामासाठी यापुर्वी भरलेला चौथा मुदवाढीनंतर निविदेचा दर खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | निवदाधारकांचे नाव | निविदा धारकांने नमुद केलेले दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे. त्रिवेणी इंजिनिअरींग ॲन्ड इंडस्ट्रीज लिमीटेड, न्यु दिल्ली. | रु.३८,२६,३१,६२४/— | दिलेल्या दरापेक्षा १७ टक्के जास्त |
| २ | मे. एस.पी.एम.एल. इंन्फ्रा. लिमिटेड | रु.३७,७०,५८,२०९/— | दिलेल्या दरापेक्षा १४.९ |

| | | | |
|---|---|---|---|
| | न्यु दिल्ली. | | टक्के जास्त |

सदर निविदा पाचव्यंदा फेर निविदा दिल्यानंतर वरील निविदा धारकांनी भरलेले दर खालील प्रमाणे.

| अ. क्र. | निविदा कारकाचे नाव | निविदा कारकाने नमुद केलेले दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे. एस.पी.एम.एल. इन्फ्रा. लिमिटेड | ३८,९१,७२,३३५.४४/— | दिलेले दरापेक्षा १९ टक्के जास्त |
| २ | मे.खिल्लारी इन्फ्रा. प्रा.लिमिटेड | ३२,०२,६५,९३९.५८/— | दिलेले दरापेक्षा २.०७ टक्के कमी |
| ३ | मे.त्रिवेनी इन.ॲण्ड इन्फ्रा.लिमिटेड | ४०,८७,९४,४७०/— | दिलेले दरापेक्षा २५ टक्के जास्त |

उपरोक्त वस्तुस्थिती लक्षात घेता सदर निविदाकार (१) मे. एस.पी.एम.एल. इन्फ्रा. लिमिटेड (२) मे. त्रिवेनी इन.ॲण्ड इन्फ्रा.लिमिटेड यांनी पुर्वीपेक्षा जादा दर भरले असुन, महापालिकेच्या आर्थिक बाबीच्या दृष्टीने जादाचे व न परवडणारे नुकसानीचे दर आहेत.

*दि. ०९/१२/२०१५ रोजीच्या निविदा समितीच्या बैठकी मध्ये कमीत कमी दराची स्पर्धात्मक निविदा मान्य करण्यास मंजुरी दिली आहे.*

अ.क्र. २) मे.खिल्लारी इन्फ्रा.प्रा.लिमिटेड यांनी महापालिकेने ठरविलेल्या रक्कमे पेक्षा २.०७ टक्के रक्कम कमी भरलेली आहे. प्राप्त झालेल्या वरील ३ निविदा दारांपैकी सदर चे दर वाजवी आहेत. त्यामुळे मे. खिल्लारी इन्फ्रा.प्रा.लिमिटेड या निविदाकारची निविदा स्विकृत करून त्यांच्याशी संविदा करण्यास मा. स्थायी समिती च्या मंजुरीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ७८ दिनांकः— २३.१२.२०१५

सुचकाचे नाव :— श्री. भगवान भालेराव

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार पाणी पुरवठा अंतर्गत ई निविदा प्रक्रिया केलेल्या निविदा क्रमांक ७३६ मधील खेमाणी नाला यावर बंधारा बांधणेस, संप व पंपगृह, एस.बी.आर. तंत्रज्ञानावर आधारीत सांडपाणी प्रक्रिया केंद्राचे संकल्पन तयार करणेस, बांधकाम करणेस व कार्यान्वित करणेस त्याप्रमाणे खेमाणी नाला ते शांतीनगर येथिल सांडपाणी प्रक्रिया केंद्रापर्यंत ६०० मी.मी. व्यासाची डी.आय.के—९ उध्वरण नलिका पुरवठा करणेस व अंथरणेस तसेच ५ वर्षाकरीता देखभाल व दुरुस्ती करणेकामी मे. खिल्लारी इन्फ्रा. प्रा. लिमिटेड या निविदाकाराची निविदा स्विकृत करुन त्यांच्याशी संविदा करणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ९ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ९** :—सन २०१५—२०१६ करीता सफाई साहित्य खरेदीस न्युनत्तम दराच्या निविदाकारांशी संविदा करणेस मान्यता देणे

---

सदस्य श्री. राजेश वदारिया :—सदस्यांना यामध्ये माहित पडत नाही की आमच्या प्रभागात कोणते साहित्य आले, कोणत्या औषधी आल्या. याबाबत नगरसेवकांना माहिती असली पाहिजे. तुम्ही माहिती दिली पाहिजे की आपल्या प्रभागात एवढे एवढे साहित्य तथा औषधी वगैरे आले आहेत.

सदस्य श्री. भगवान भालेराव:—तुम्ही माहिती दया परंतु कोणतीच माहिती मिळत नसते. यापुर्वी सुध्दा विषय झाला होता. कोणार्कवाले किती लेबर देतात? किती डबेवाले आले, किती फवारणी केली काहीच माहिती मिळत नाही.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—आतापर्यंत काहीच माहिती देण्यात आलेली नाही. कोठे कोठे खत्ते आहेत, कचरा किती उचलला जातो.

श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :—मायक्रो प्लान सर्वांना दिलेले आहे.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—माहिती दिली पाहिजे की, खत्त्यावर आज किती लोक असतील. किती कचरा उचलला जाईल.

श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :—होय सर्व माहिती मिळेल.

काही सदस्य :—पास—पास......

<u>सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा :–</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ९ :–** सन २०१५–२०१६ करीता सफाई साहित्य खरेदीस न्युनत्तम दराच्या निविदाकारांशी संविदा करणेस मान्यता देणे

**प्रस्तावना**

मा. आयुक्त सो. यांनी दिनांक २२/५/२०१५ अन्वये आरोग्य विभागासाठी सफाई व स्वच्छतेसाठी आवश्यक साहित्ये–साधने खरेदी करणेसाठी ई–निवदा सुचना प्रसिध्द करण्यास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार दै. आपला महानगर व दै. धनुष्यधारी या वृत्तपत्रात निविदा सुचना प्रसिध्द करुन दिनांक २५/६/२०१५ ते दिनांक २२/७/२०१५ पर्यंत कार्यालयीन कामाचे वेळेत व ई–टेंडरींगद्वारे महापालीका वेबसाईटवर जाहिर निविदा सुचना प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. त्याअनुषंगाने मुदत वाढ कालावधीतसह ३ निविदाकारांनी विहित मुदतीत निविदा सादर केल्या होत्या. प्राप्त निविदा दि. १९/९/२०१५ रोजी ई–निविदा कक्षात निविदा समिती सदस्य व निविदाकारांच्या उपस्थितीत संगणकाच्या माध्यमाने उघडण्यात आल्या. सदर सर्व निविदाकारांनी निविदेतील नमुद अटी व शर्तीनुसार आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्याने निविदा समितीने वित्तीय लिफाफा उघडण्याबाबत सुचना केल्या त्यानुसार दिनांक ६/१०/२०१५ रोजी सकाळी १२.०० वाजता निविदा समितीच्या मान्यतेन वित्तीय लिफाफा उघडण्यात आला. पात्र ३ निविदाकारांनी सादर केलेल दर खालीलप्रमाणे आहेत.

**तुलनात्मक तक्ता**

| अ.क्र | सफाई साधनांचे/साहित्याचे नाव | अंदाजीत आवश्यक मागणी | निविदाकाराचे नाव व त्याने सादर केलेले दर रुपये | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | मे. अमर ज्योत | मे. मोहिनी | es- eksfgr |
| १ | गॅलव्हनाईज बादल्या | ३२० | २३० | २२८ | २२४ |
| २ | गोवा ब्रुम (७५० ग्राम प्रति नग) | १५००० | ५९ | ५९ | ६२ |
| ३ | बांम्बु ( अदांजे १८ फुट लाबी) | २३४ | २८० | २८५ | २७० |
| ४ | रबरी हातमौजे | ९६०० | ५६ | ६२ | ६० |
| ५ | हातरूमाल ( २४X८ इंच) | १५००० | ५५ | ५४ | ५० |
| ६ | साबण (हंदुिस्थान लिव्हर कंपनीचे ७५ ग्राम/नग | १४८०० | २५ | २७ | २३ |
| ७ | फावडे, ४'' इंच साइज | १५६ | १५६ | १५७ | १५४ |
| ८ | फावडे, ६'' इंच साइज | १५६ | १७५ | १७३ | १६७ |
| ९ | फावडे, ८'' इंच साइज | १५६ | १८५ | १८८ | १८१ |
| १० | पंखा झाडू (ब्रुम) | ७८० | १०० | ९६ | १०२ |
| ११ | फुल झाडू | १५० | ६६ | ६० | ६५ |
| १२ | काथ्या ब्रश | ५८५ | २०५ | १९७ | २१० |
| १३ | घमेला प्लास्टिकचे दोरीवाले | २३४ | २८५ | २९० | २७४ |
| १४ | फेस मास्क (कापडी) | १०००० | २५ | २६ | २३ |
| १५ | फावडे दांडे ४ फुटी | ४६८ | ४६ | ४७ | ४४ |
| १६ | टू–व्हील बिन्स १२० (लिटर क्षमतेच्या) | २३६ | ५००० | ५३०० | ५१०० |
| १७ | रबरी बुच | ५० | १७० | १६४ | १६९ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १८ | रबरी स्कायझर | १०० | ३४५ | ३२८ | ३५० |
| १९ | डस्टर्स | १५० | ३३ | ३२ | ३० |
| २० | विम पावडर | १०० | ५३ | ५१ | ५० |
| २१ | दातारी (१२ — दाती) | १५६ | ३४० | ३४० | ३२८ |
| २२ | दातारी (०२ — दाती) | ७८ | २०० | २०५ | १९६ |

वरील साहित्यात खालील निविदाकारांचे त्यांचेनावासमोर दर्शविलेल्या अनुक्रमावर साहित्याचे दर न्युनमत आहेत.

मे. अमरज्योत इंटरप्राईझेस :— अनु क्र. ४ व १६

मे. मोहिनी इंटरप्राईझेस :— अनु क्र. १०,११,१२,१७ व १८

मे. मोहित इंटरप्राईझेस :— अनु क्र. १,३,५,६,७,९,१३,१४,१५,१९,२०,२१ व २२

तसेच अ.क्र.२ गोवा ब्रुम झाडू साठी मे.अमरज्योत इंटरप्राईझेस व मे.मोहिनी इंटरप्राईझेस यांनी समान दर भरलेले आहेत.

उक्त प्राप्त परीमाण व दरानुसार साहित्य/साधने खरेदीस रुपये ४५,३६,९६१/— मात्र खर्च अपेक्षित आहे. तथापी प्राप्त न्युनतम दरांबाबत निविदा समितीने दिलेल्या निर्देशानुसार निविदाकारांना वाटाघाटी करिता जा. क्र.उमपा/उप.आ/आवि/२९१/१४ दिनांक ७/१०/२०१५ रोजीच्या पत्रान्वये न्युनतम दर सादर करणा—या निविदाकारांना वाटाघाटीसाठी उपायुक्त (आरोग्य) यांच्या दालनात बोलविण्यात आले होते. वाटाघाटीअंती संबंधीत निविदाकारांनी लेखी पत्र दिलेले आहे. वाटाघाटी अंती प्राप्त दरांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | सफाई साधनांचे/साहित्याचे नाव | अंदाजीत आवश्यक मागणी | मगील प्राप्त दर २०१४–१५ | निविदाकाराचे नाव व त्याने सादर केलेले दर रुपये | | | वाटाघाटी अंती प्राप्त दर रुपये | अपेक्षीत खर्च रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | मे. अमर ज्योत इंटर. | मे. मोहिनी इंटर. | मे. मोहित इंटर. | | |
| १ | गॅलव्हनाईज बादल्या (१० लिटर) | ३२० | २०५ | | | २२४ | २१५ | ६८८०० |
| २ | गोवा ब्रुम (७५० ग्राम प्रति नग) | १५००० | ४९ | ५९ | ५९ | | ५५ | ८२५००० |
| ३ | बांम्बु ( अदांजे १८ फुट लाबी) | २३४ | — | | | २७० | २५० | ५८५०० |
| ४ | रबरी हातमौजे, फुल साईज, प्रति जोडी | ९६०० | ५१ | ५६ | | | ५३ | ५०८८०० |
| ५ | हातरूमाल ( २४X८ इंच) | १५००० | ३४ | | | ५० | ५० | ७५०००० |
| ६ | साबण (हंदिुस्थान लिव्हर कंपनीचे ७५ ग्राम/नग | १४८०० | २६.५० | | | २३ | २३ | ३४०४०० |
| ७ | फावडे, ४'' इंच साइज | १५६ | — | | | १५४ | १५० | २३४०० |
| ८ | फावडे, ६'' इंच साइज | १५६ | १५२ | | | १६७ | १६० | २४९६० |
| ९ | फावडे, ८'' इंच साइज | १५६ | १६५ | | | १८१ | १७५ | २७३०० |
| १० | पंखा झाडू (ब्रुम) | ७८० | ८८ | | ९६ | | ९० | ७०२०० |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ११ | फुल झाडू | १५० | ५५ | | ६० | | ६० | ९००० |
| १२ | काथ्या ब्रश, ३ फुट लांबी व ५ फुट दांडयासहित | ५८५ | १८० | | १९७ | | १९० | १११९५० |
| १३ | घमेला, प्लास्टिकचे दोरीवाले, डाया १८ इंच | २३४ | २५० | | | २७४ | २७० | ६३१८० |
| १४ | फेस मास्क (कापडी) | १०००० | २१ | | | २३ | २२ | २२०००० |
| १५ | फावेड दांडे ४ फुटी | ४६८ | ४० | | | ४४ | ४२ | १९६५६ |
| १६ | टू—व्हील बिन्स १२० (लिटर क्षमतेच्या) | २३६ | ४४०० | ५००० | | | ४८०० | ११३२८०० |
| १७ | रबरी बुच | ५० | — | | १६४ | | १६० | ८००० |
| १८ | रबरी स्क्वायझर | १०० | ३०० | | ३२८ | | ३१४ | ३१४०० |
| १९ | डस्टर्स | १५० | २७ | | | ३० | २९ | ४३५० |
| २० | विम पावडर | १०० | ४५ | | | ५० | ५० | ५००० |
| २१ | दातारी (१२ — दाती) | १५६ | ३०० | | | ३२८ | ३१८ | ४९६०८ |
| २२ | दातारी (०२ — दाती) | ७८ | १८० | | | १९६ | १९० | १४८२० |

वाटाघाटी अंती प्राप्त दरानुसार व नमुद केलेल्या परीमाणा नुसार सदरचे साहित्य/साधने खरेदीस रुपये ४३,६६,३२४/— (रुपये त्रेचाळीस लाख साहसष्ट हजार तिनशे चोविस मात्र) अपेक्षीत आहे. सन २०१५—१६ साठी भांडवली खर्च भाग—२, सी—१(१) साफसफाई साहित्य खरेदी या लेखा शिर्षकाअंतर्गत रु. ५०,००,०००/— तरतूदी पैकी रुपये ३८,६२,४००/— इतकी तरतूद उपलब्ध आहे. उपलब्ध तरतूदीतुन मुख्य स्वच्छता निरिक्षक (आरोग्य भांडार) यांनी दिलेल्या मागणी नुसार आवश्यक साहित्य/साधने त्यांच्या समोर दर्शविलेल्या परीमाणा प्रमाणे खरेदी करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

| अ.क्र | सफाई साधनांचे/साहित्याचे नाव | अंदाजीत आवश्यक मागणी | मागील प्राप्त दर २०१४—१५ | निविदाकाराचे नाव व त्याने सादर केलेले दर रुपये | | | वाटाघाटी अंती प्राप्त दर रुपये | अपेक्षीत खर्च रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | मे. अमर ज्योत इंटर. | मे. मोहिनी इंटर. | मे. मोहित इंटर. | | |
| १ | गॅलव्हनाईज बादल्या (१० लिटर) | ३२० | २०५ | | | २२४ | २१५ | ६८८०० |
| २ | गोवा ब्रुम (७५० ग्राम प्रति नग) | १०००० | ४९ | ५९ | ५९ | | ५५ | ५५०००० |
| ४ | रबरी हातमौजे, फुल साईज, प्रति जोडी | ९६०० | ५१ | ५६ | | | ५३ | ५०८८०० |
| ५ | हातरूमाल ( २४X८ इंच) | १५००० | ३४ | | | ५० | ५० | ७५०००० |
| ६ | साबण (हंदिुस्थान लिव्हर कंपनीचे ७५ ग्राम/नग | १४८०० | २६.५० | | | २३ | २३ | ३४०४०० |
| ७ | फावडे, ४'' इंच साइज | १५६ | — | | | १५४ | १५० | २३४०० |
| ८ | फावडे, ६'' इंच साइज | १५६ | १५२ | | | १६७ | १६० | २४९६० |
| ९ | फावडे, ८'' इंच साइज | १५६ | १६५ | | | १८१ | १७५ | २७३०० |
| १० | पंखा झाडू (ब्रुम) | ७८० | ८८ | | ९६ | | ९० | ७०२०० |
| ११ | फुल झाडू | १५० | ५५ | | ६० | | ६० | ९००० |
| १२ | काथ्या ब्रश, ३ फुट लांबी व ५ | ५८५ | १८० | | १९७ | | १९० | १११९५० |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | फुट दांडयासहित | | | | | | | |
| १३ | घमेला, प्लास्टिकचे दोरीवाले, डाया १८ इंच | २३४ | २५० | | | २७४ | २७० | ६३१८० |
| १४ | फेस मास्क (कापडी) | १०००० | २१ | | | २३ | २२ | २२०००० |
| १५ | फावेड दांडे ४ फुटी | ४६८ | ४० | | | ४४ | ४२ | १९६५६ |
| १६ | टू–व्हील बिन्स १२० (लिटर क्षमतेच्या) | १६० | ४४०० | ५००० | | | ४८०० | ७६८००० |
| १७ | रबरी बुच | ५० | — | | १६४ | | १६० | ८००० |
| १८ | रबरी स्क्वायझर | १०० | ३०० | | ३२८ | | ३१४ | ३१४०० |
| १९ | डस्टर्स | १५० | २७ | | | ३० | २९ | ४३५० |
| २० | विम पावडर | १०० | ४५ | | | ५० | ५० | ५००० |
| २१ | दातारी (१२ — दाती) | १५६ | ३०० | | | ३२८ | ३१८ | ४९६०८ |
| २२ | दातारी (०२ — दाती) | ७८ | १८० | | | १९६ | १९० | १४८२० |

उक्त नमूद आवश्यक साहित्य/साधने त्यांच्या समोर दर्शविलेल्या परीमाणा प्रमाणे खरेदी केल्यास रुपये ३६,६८,०२४/— (रु. छत्तीस लाख अडुसष्ट हजार चोविस मात्र) खर्च अपेक्षित आहे. तरी अ.क्र. १ ते २२ साठी साहित्य/साधने बाब निहाय न्युनतम दर सादर करणा—या निविदाकार मे.अमरज्योत इंटरप्राईझेस,मे.मोहित इंटरप्राईझेस व मे.मोहिनी इंटरप्राईझेस, उल्हासनगर यांच्याशी संविदा करण्याकरीता मा. स्थायी समितीची मान्यता आवश्यक आहे. करिता सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या मंजुरीसाठी विषय पटलावर सविनय सादर.

स्थायी समिती ठराव क्र. ७९ दिनांकः— २३.१२.२०१५

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार सन २०१५—२०१६ करीता सफाई साहित्य खरेदी करणेकामी बाब निहाय न्युनतम दर सादर करणा—या निविदाकार मे.अमरज्योत इंटरप्राईझेस, मे.मोहित इंटरप्राईझेस व मे.मोहिनी इंटरप्राईझेस, उल्हासनगर यांच्याशी संविदा करणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>श्री. नितीन कापडणीस, उप–आयुक्त, मुख्यालय :–</u>प्रशासनातर्फे आयत्यावेळचे चार विषय आहेत ते मी आपणांस वाचुन दाखवितो.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>याची आम्हांला प्रत दया.

<u>काही सदस्य :–</u>गोषवा–याची प्रत दया.

<u>श्री. नितीन कापडणीस, उप–आयुक्त, मुख्यालय:–</u>होय प्रत देतो. आता मी आपणांस विषय वाचुन दाखवितो.

<u>आयत्यावेळचा विषय क्र.१ :–</u> कल्याण–अंबरनाथ रस्त्यावर बाधित होणारी बांधकामे निष्कासीत करणेकामी यंत्रसामुग्री पुरविणेकामी मे.खान स्क्रॅप ट्रेडर्स यांचेशी निविदेशिवाय थेट संविदेस मान्यता देणेबाबत

<u>आयत्यावेळचा विषय क्र.२:–</u> उल्हासनगर क्षेत्रातून जाणा–या कल्याण अंबरनाथ रस्त्यावरील डेब्रिज उचलण्याकरिता येणा–या खर्चास मान्यता मिळणेबाबत..

<u>आयत्यावेळचा विषय क्र.३</u>:– सन २०१५–१६ करीता लोखंडी हातगाडया खरेदीच्या न्युनत्तम दराचे निविदाकाराशी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u> विषय क्र. ३ हा आयत्यावेळी कसा आणता येईल.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u> सदर विषय नियमित सभा सूचनेवर आणा. सदर विषय हा केवळ माहितीची नोंद घेणेचा आहे.

<u>श्री. नितीन कापडणीस, उप–आयुक्त, मुख्यालय:–</u>ठिक आहे. सदर विषय मागे घेण्यात येत आहे. सदर विषय नियमित सभा सुचनेवर आणण्यात येईल.

<u>आयत्यावेळचा विषय क्र.४:–</u> कल्याण–अंबरनाथ रस्त्यावर बाधित होणारी बांधकामे निष्कासीत करणेकामी फोटोग्राफी व व्हिडीओ चित्रीकरण करणेकामी निविदेशिवाय थेट संविदेस मान्यता देणेबाबत...

<u>प्र. महापालिका सचिव :–</u> विषय क्र. १० वाचुन दाखवितात.

---

⇨ <u>आयत्यावेळचा विषय क्र.</u>

**विषय क्र. १०** :— कल्याण—अंबरनाथ रस्त्यावर बाधित होणारी बांधकामे निष्कासीत करणेकामी यंत्रसामुग्री पुरविणेकामी मे.खान स्क्रॅप ट्रेडर्स यांचेशी निविदेशिवाय थेट संविदेस मान्यता देणेबाबत

---

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—हा डेब्रिजचा विषय आहे काय?

श्री. नितीन कापडणीस, उप—आयुक्त, मुख्यालय:—नाही, यंत्रसामग्री पुरविण्याचा आहे.

सदस्य श्री. भगवान भालेराव :—लेबर पुरविणार आहात काय?

श्री. नितीन कापडणीस, उप—आयुक्त, मुख्यालय:—नाही. अनधिकृत बांधकाम निष्कासीत केल्यानंतर ते उचलण्यासाठी यंत्रसामुग्री पुरविणेबाबतचा विषय आहे.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—याबाबत कामाची प्रक्रिया चालु आहे काय?

श्री. नितीन कापडणीस, उप—आयुक्त, मुख्यालय:—प्रोक्लेन २ प्रकारचे आहे. बकेट व ब्रेकर असे २ प्रकार आहेत. इतर महापालिकेप्रमाणेच कारवाई चालु आहे. सदरचे काम इतर महापालिका ज्या दराने करत होती त्याच दराने करत आहोत.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—नियमाप्रमाणेच करा.

सदस्य श्री. राजेश वदारिया :—नियमाप्रमाणे पारीत करावे.

काही सदस्य :—पास—पास......

सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा :—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

आयत्यावेळचा विषय क्र.

**विषय क्र. १०** :— कल्याण—अंबरनाथ रस्त्यावर बाधित होणारी बांधकामे निष्कासीत करणेकामी यंत्रसामुग्री पुरविणेकामी मे.खान स्क्रॅप ट्रेडर्स यांचेशी निविदेशिवाय थेट संविदेस मान्यता देणेबाबत

प्रस्तावना

उपरोक्त विषयान्वये सादर करण्यात येते की, राज्य मार्ग क्र. ३५ रुंदीकरणासाठी उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील अतिक्रमणे काढण्याबाबत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने महापालिकेस कळविले होते. कल्याण—अंबरनाथ रस्त्याच्या रुंदीकरणाची १०० फुटाची मर्यादा प्राप्त करण्यासाठी डाव्या बाजुकडील ४५० व रस्त्याच्या उजव्या बाजुकडील ३६१ अशी एकूण ८२१ बांधकामे बाधीत होणार आहेत.

तथापी उल्हासनगर महानगरपालिकेने सदर रस्ता १०० फुट ऐवजी ८० फुट ठेवण्याबाबतचा ठराव क्रमांक ३२, दिनांक २०/११/२०१३ पारीत केला होता. शासनाने संदर्भिय शासन निर्णयान्वये सदरहु ठराव हा लोकहिताच्या दृष्टीकोनातून अयोग्य असून शासनाच्या ध्येयधोरणाशी विसंगत असल्यामुळे अधिनियमातील कलम ४५१(३) मधील तरतुदीनुसार अंतिमत: विखंडीत करण्यात आलेला आहे.

सदर रस्त्यामध्ये बाधित होणारी बहुमजली बांधकामे निष्कासीत करणे आवश्यक आहे. यासाठी महापालिकेकडे अद्यावत यंत्रसामुग्री उपलब्ध नाही. महापालिकेने यापूर्वी निष्कासनाकामी अद्यावत यंत्रसामुग्री पुरविणेची निविदा प्रसिध्द् केली होती, तथापी सदर निविदा रद्द झालेली आहे. सदर रस्ता रुंदीकरणातील बांधकामे तातडीने निष्कासीत करणे आवश्यक आहे. यासाठी निविदा कार्यवाही केल्यास विलंब होऊ शकतो.

सद्यस्थितीत महापालिकेच्या आरोग्य विभागामार्फत शहरातील डेबरीज उचलण्याचे व डंपीग ग्राउंडच्या सपाटीकरणाचे काम करण्यात येते. यासाठी लागणारी मशिनरी ठेकेदारामार्फत पुरविण्यात आलेली आहे. सोबत त्यांचे मंजुर दराचा तपशिल जोडलेला आहे. त्यांचे मंजुर दरानुसार मे.खान स्क्रॅप ट्रेडर्स, उल्हासनगर—४२१००५ हे ठेकेदार रस्ता रुंदीकरणाच्या कामासाठी लागणारी मशिनरी उदा० जेसीबी, डंपर व पोकलेन मशिन इत्यादी पुरविण्यासाठी तयार आहेत व त्यांनी तसे लेखी पत्र दिलेले आहे.

रस्ता रुंदीकरणातील काम तातडीने करणे आवश्यक असल्याने मे.खान स्क्रॅप ट्रेडर्स, उल्हासनगर—४२१००५ यांनी त्यांच्या पत्रात नमुद केल्याप्रमाणे त्यांना हे काम दिल्यास त्यासाठी अपेक्षित खर्च पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | यंत्रसामुग्रीचा तपशिल | आवश्यक परिमाण | अंदाजे कालावधी | अपेक्षित खर्च प्रतिदिन | एकूण अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | पोक्लेन मशिन—२०० बकेट | ३ | १६ दिवस प्रति दिन १० तास | रु. २६,०००/— | रु.१२,४८,०००/— |
| २ | पोक्लेन मशिन—२०० ब्रेकर | ३ | १६ दिवस प्रति दिन १० तास | रु. २९,०००/— | रु.१३,९२,०००/— |
| २ | जेसीबी मशिन | २ | १६ दिवस प्रति दिन १० तास | रु.७,०००/— | रु.२,२४,०००/— |
| ३ | डंपर | ५ | १६ दिवस प्रति दिन १० तास | रु.६,०००/— | रु.४,८०,०००/— |
| | | | | एकूण | रु.३३,४४,०००/— |

अंदाजित खर्च रु.३३,४४,०००/— एवढा असला तरी प्रत्यक्षात जेवढे काम होईल तेवढयाच कामाचे देयक अदा करण्यात येणार आहे.

सन २०१५—१६ च्या अर्थसंकल्पात इ.संकिर्ण (१४) अनधिकृत बांधकाम निष्कासीत खर्च या लेखाशिर्षाखाली रु. १०० लक्ष एवढी तरतुद उपलब्ध असून सद्यस्थितीत सदर लेखाशिर्षाखाली रु. ४६ लक्ष एवढी तरतुद शिल्लक आहे. तरी सदरचे काम अतितातडीचे असल्याने निविदा न मागविता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ५ चे कलम (२)(२)अन्वये मे.खान स्क्रॅप ट्रेडर्स, उल्हासनगर—४२१००५ यांचेशी थेट संविदा करुन काम पार पाडण्यास मान्यता मिळणेकामी स्थायी समितीसमोर प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. ८० दिनांक:— २३.१२.२०१५

सुचकाचे नाव :— श्री. भगवान भालेराव

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार कल्याण–अंबरनाथ रस्त्यावर बाधित होणारी बांधकामे निष्कासीत करणेकामी यंत्रसामुग्री पुरविणेकामी आयुक्तांस मे.खान स्क्रॅप ट्रेडर्स यांचेशी निविदाशिवाय थेट संविदा करणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. ११ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. ११ :– आयत्यावेळचा विषय

उल्हासनगर क्षेत्रातून जाणा–या कल्याण अंबरनाथ रस्त्यावरील डेब्रिज उचलण्याकरिता येणा–या खर्चास मान्यता मिळणेबाबत..

---

सदस्य श्री. राजेश वदारिया :–यास तर मंजुरी दिली आहे.

श्री. नितीन कापडणीस, उप–आयुक्त, मुख्यालय:–हा दुसरा विषय आहे. कल्याण–अंबरनाथ रस्त्यावरील डेब्रिज उचलण्याकरीता खर्चास मान्यता देण्याचा विषय आहे.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–यास किती खर्च होईल?

श्री. नितीन कापडणीस, उप–आयुक्त, मुख्यालय:–रुपये २४,१८,०००/– इतका खर्च होईल.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–खर्च किती आहे?

**<u>श्री. नितीन कापडणीस, उप–आयुक्त, मुख्यालय:–</u>**रुपये २४,१८,०००/– इतका खर्च होईल. या मोहिमेत लोखंड उचलण्याची परवानगी आम्ही दिलेली नाही.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>**त्याचा काय उपयोगच नाही.

**<u>सदस्य श्री. उमेश कालानी:–</u>**जर तो दुकानदार स्वत: बांधकाम तोडत असेल तर डेब्रिज उचलण्याचे पैसे त्यास देणार काय?

**<u>सदस्य श्री. महेश गावडे :–</u>**जो डेब्रिज उचलला जातो त्याचा भर घालायला उपयोग होता ना?

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>**आधीचा जो ठेकेदार आहे त्यास याचा उपयोग झाला पाहिजे.

**<u>काही सदस्य :–</u>**पास–पास......

**<u>सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा :–</u>**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**<u>आयत्यावेळचा विषय</u>**

**विषय क्र. ११ :– उल्हासनगर क्षेत्रातून जाणा–या कल्याण अंबरनाथ रस्त्यावरील डेब्रिज उचलण्याकरिता येणा–या खर्चास मान्यता मिळणेबाबत..**

**<u>प्रस्तावना</u>**

शहरात सर्वत्र ठिकठिकाणी पडलेला डेब्रिज, रॅबिट, माती, खडी उचलण्यासाठी मा. स्थायी समिती ठराव क्र. ९२, दिनांक २०/३/२०१५ अन्वये मे. शुभम कंन्स्ट्रक्शन, उल्हासनगर यांची नेमणूक केली असून विभागाने आदेश क्र.उप.आ/आवि/५८/२०१५, दि. २२/५/२०१५ या अन्वये कामाचे आदेश दिलेला आहेत. त्याअनुषंगाने दिनांक २२/०६/२०१५, यापासून दैनंदिन २ जेसिबी व ८ डंपर व्दारे जूने व नव्याने पडलेला डेब्रिज/रॅबिट नियमित उचलण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

निविदेतील अटी व शर्तीनुसार अतिरीक्त मशिनरी मागणी नुसार ठेकेदारास पुरविणे बंधन कारक आहे. त्यानुसार दैनंदिन मशिनरी वगळता मंजूर दरानूसार अतिरीक्त मशिनरी (दिवसपाळीत २ जेसीबी, ६ डंपर व रात्रपाळीत ४ जेसीबी, १२ डंपर) दि. ४/१२/२०१५ पासून २० दिवसाकरीता अतिरिक्त जेसीबी व डंपर कल्याण अंबरनाथ रस्त्यावरील डेब्रिज उचलण्यासाठी खालिल प्रमाणे लावण्यात आलेले आहे. त्याकरीता येणार खर्च खालील प्रमाणे अपेक्षीत आहे.

| अ.क्र. | मशिनरीचा तपशील | दिवसपाळी आवश्यक परिणाम | रात्रपाळी आवश्यक परिणाम | प्र. मि. मासिक दर (प्रति दिन प्रति तास) | एकूण प्रतिदिन खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | जेसीबी | २ | ४ | ५६०० | ३३,६००/— |
| २ | डंपर | ६ | १२ | ४८५० | ८७,३००/— |
| | | | | एकूण | १,२०,९००/— |

वरील मंजूर दरानूसार सदरच्या अतिरीक्त कामास व येणाऱ्या खर्चास मंजुरी मिळावी. सदरचे काम साधारण पणे २० दिवस चालल्यास एकूण १,२०,९०० प्रति दिन X २० दिवस = रु २४,१८,०००/— खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च सी—१(९) कचरा वाहतुक खर्च यातून करण्यात येईल, याकरिता येणारा खर्च हा मंजूर खर्चाच्या मर्यादेत करण्यात येईल, याची दक्षता घेण्यात येईल. तरी मे. शुभम कंन्स्ट्रक्शन, उल्हासनगर यांचेकडून अतिरीक्त मशिनरी (दिवसपाळीत २ जेसीबी, ६ डंपर व रात्रपाळीत ४ जेसीबी, १२ डंपर (२० दिवस) उपलब्ध करुन घेण्यास व त्याकरिता येणाऱ्या रुपये २४,१८,०००/— (रुपये चोवीस लाख अठरा हजार मात्र) या खर्चास मान्यतेकरिता सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीसमोर सविनय सादर.

<u>स्थायी समिती ठराव क्र. </u> ८१ — <u>दिनांकः— २३.१२.२०१५</u>

सुचकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

अनुमोदकाचे नाव :— श्री. सुनिल सुर्वे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर क्षेत्रातून जाणा—या कल्याण अंबरनाथ रस्त्यावरील डेब्रिज उचलण्याकरिता मे. शुभम कंन्स्ट्रक्शन, उल्हासनगर यांचेकडून अतिरीक्त मशिनरी (दिवसपाळीत २ जेसीबी, ६ डंपर व रात्रपाळीत ४ जेसीबी, १२ डंपर (२० दिवस) उपलब्ध करुन घेण्यास व त्याकरिता येणाऱ्या रुपये २४,१८,०००/— (रुपये चोवीस लाख अठरा हजार मात्र) या खर्चास मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. १२ वाचुन दाखवितात

---

⇨ आयत्यावेळचा विषय

**विषय क्र. १२ :—** कल्याण—अंबरनाथ रस्त्यावर बाधित होणारी बांधकामे निष्कासीत करणेकामी फोटोग्राफी व व्हिडीओ चित्रीकरण करणेकामी निविदेशिवाय थेट संविदेस मान्यता देणेबाबत...

---

सदस्य श्री. भगवान भालेराव :—बांधकामे निष्कासीत करतांना जी फोटोग्राफी व व्हिडीओ चित्रीकरण करणार त्यास ३ लाख रुपये खर्च होणार काय?

श्री. नितीन कापडणीस, उप—आयुक्त, मुख्यालय:—होय. यामध्ये रस्ता रुंदीकरणाचे काम हे सुमारे १६ दिवस चालणार असून प्रतिदिन सुमारे ८ कॅमेरामॅनची आवश्यकता आहे. ८ कॅमेरामन प्रतिदिन रु.२,४००/— प्रमाणे एकूण खर्च रु.३,०७,२००/— एवढा अपेक्षित असून सुमारे २००० फोटो काढल्यास त्यासाठी खर्च रु. ५०,०००/— एवढा अपोक्षित आहे. व्हिडीओ चित्रीकरण व फोटो काढणेकामी एकूण अंदाजित खर्च रु. ३,५७,०००/— अपेक्षित आहे.

सदस्य श्री. राजेश वदारिया :— आपण जी व्हिडीओ चित्रीकरण करणार आहात त्याची कॅसेट दिली पाहिजे.

श्री. नितीन कापडणीस, उप—आयुक्त, मुख्यालय:—होय.

काही सदस्य :—पास—पास......

सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा :—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

आयत्यावेळचा विषय

**विषय क्र. १२ :—** कल्याण—अंबरनाथ रस्त्यावर बाधित होणारी बांधकामे निष्कासीत करणेकामी फोटोग्राफी व व्हिडीओ चित्रीकरण करणेकामी निविदेशिवाय थेट संविदेस मान्यता देणेबाबत...

**प्रस्तावना**

उपरोक्त विषयान्वये सादर करण्यात येते की, राज्य मार्ग क्र. ३५ रुंदीकरणासाठी उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील अतिक्रमणे काढण्याबाबत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने महापालिकेस कळविले होते. कल्याण—अंबरनाथ रस्त्याच्या रुंदीकरणाची १०० फुटाची मर्यादा प्राप्त करण्यासाठी डाव्या बाजुकडील ४५० व रस्त्याच्या उजव्या बाजुकडील ३६१ अशी एकूण ८२१ बांधकामे बाधीत होणार आहेत.

तथापी उल्हासनगर महानगरपालिकेने सदर रस्ता १०० फुट ऐवजी ८० फुट ठेवण्याबाबतचा ठराव क्रमांक ३२, दिनांक २०/११/२०१३ पारीत केला होता. शासनाने संदर्भिय शासन निर्णयान्वये सदरहु ठराव हा लोकहिताच्या दृष्टीकोनातून अयोग्य असून शासनाच्या ध्येयधोरणाशी विसंगत असल्यामुळे अधिनियमातील कलम ४५१(३) मधील तरतुदीनुसार अंतिमत: विखंडीत करण्यात आलेला आहे.

रस्ता रुंदीकरणातील बांधकामे निष्कासीत करतेवेळेस व्हिडीओ चित्रीकरण व फोटोग्राफी करणे आवश्यक आहे. सदर बांधकामे निष्कासीत करताना न्यायालयीन वाद उद्‌भवल्यास, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उभा राहिल्यास तसेच कोणताही अपप्रसंग घडल्यास त्याचा पुरावा राहणेकामी फाटो काढणे व व्हिडीओ चित्रीकरण करणे अत्यावश्यक आहे.

प्रभाग समिती कार्यालयामार्फत अनधिकृत बांधकामांचे निष्कासन करताना फोटोग्राफी व व्हिडीओ चित्रीकरण करण्यात येत असते. सदरचे काम मे.हेरंब फोटो स्टुडिओ, उल्हासनगर व मे.कुणाल फोटो स्टुडिओ, उल्हासनगर—१ यांचेमार्फत करुन घेण्यात येत असते. त्यांना याबाबत विचारणा केली असता त्यांनी खालीलप्रमाणे दर सादर केलेले आहेत.

| पुरवठादाराचे नांव | फोटोग्राफी | व्हिडीओ चित्रीकरण |
|---|---|---|
| मे.हेरंब फोटो स्टुडिओ | रु.२५/— | रु. २,४००/— |

| | प्रति फोटो | प्रति दिन |
|---|---|---|
| मे.कुणाल फोटो स्टुडिओ | रु.२५/— प्रति फोटो | रु. २,४००/— प्रति दिन |

रस्ता रुंदीकरणाचे काम हे सुमारे १६ दिवस चालणार असून प्रतिदिन सुमारे ८ कॅमेरामॅनची आवश्यकता आहे. ८ कॅमेरामन प्रतिदिन रु.२,४००/— प्रमाणे एकूण खर्च रु.३,०७,२००/— एवढा अपेक्षित असून सुमारे २००० फोटो काढल्यास त्यासाठी खर्च रु. ५०,०००/— एवढा अपोक्षित आहे. व्हिडीओ चित्रीकरण व फोटो काढणेकामी एकूण अंदाजित खर्च रु. ३,५७,०००/— अपेक्षित आहे. प्रत्यक्षात जेवढे काम होईल तेवढयाच कामाचे देयक अदा करण्यात येणार आहे.

सन २०१५—१६ च्या अर्थसंकल्पात इ.संकिर्ण (२२) या लेखाशिर्षाखाली रु. ५० लक्ष एवढी तरतुद उपलब्ध असून सद्यस्थितीत सदर लेखाशिर्षाखाली रु. ३६ लक्ष एवढी तरतुद शिल्लक आहे. तरी सदरचे काम अतितातडीचे असल्याने निविदा न मागविता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ५ चे कलम (२)(२) अन्वये मे.हेरंब फोटो स्टुडिओ, उल्हासनगर व मे.कुणाल फोटो स्टुडिओ, उल्हासनगर—१ यांचेशी थेट संविदा करुन काम पार पाडण्यास मान्यता मिळावी.

**स्थायी समिती ठराव क्र. ८२** **दिनांकः— २३.१२.२०१५**

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार कल्याण—अंबरनाथ रस्त्यावर बाधित होणारी बांधकामे निष्कासीत करणेकामी फोटोग्राफी व व्हिडीओ चित्रीकरण करणेकामी आयुक्तांस मे.हेरंब फोटो स्टुडिओ, उल्हासनगर व मे.कुणाल फोटो स्टुडिओ, उल्हासनगर—१ यांचेशी निविदेशिवाय थेट संविदा करणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

दुपारी १.१५ वाजंता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती श्रीमती जया प्रकाश माखिजा यांनी जाहिर केले.

(सुखदेव बलमे)

मुख्य लेखा परिक्षक

तथा

सचिवांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी

उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:—२७ /०१/२०१६

## दि. २७/०१/२०१६ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिति सभेचे इतिवृत्त

१०

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा सोमवार दिनांक २७/०१/२०१६ रोजी साय. ४.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्रीमती. राजश्री राजेंद्र चौधरी | सदस्या |
| २ | कु. शंकुतला जीवनलाल जग्यासी | सदस्या |
| ३ | डॉ. महेश गजानन गावडे | सदस्य |
| ४ | श्री. भगवान शंकर भालेराव | सदस्य |
| ५ | श्री उमेश कलानी | सदस्य |
| ६ | श्री.राजेश नानीकराम वदारिया | सदस्य |
| ७ | श्रीमती लिलाबाई आशान | सदस्या |
| ८ | श्री. गुरूनो वलेचा | सदस्य |
| ९ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे | सदस्य |
| १० | श्रीमती आशा इदनानी | सदस्या |

तर,

१. मा. सभापती श्रीम. जया प्रकाश माखिजा

तसेच खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

२. श्री. इसरद खान, ३. श्रीमती मिनु राज दासानी, ४. श्री. राजेंद्रसिंह भुल्लर, ५. श्री. जमनादास पुरस्वानी, ६. श्रीमती अंजली साळवे

खालील अधिकारी सभेस हजर होते.

८. श्री. श्रीधर पाटणकर, अति.आयुक्त
९. श्री नितिन कापडनीस, उप— आयुक्त, मुख्यालय
१०. श्रीम. प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
११. श्री. जमीर लेंगरेकर, उप—आयुक्त
१२. श्री. सुखदेव बलमे, मुख्य लेखा परिक्षक
१३. श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा
१४. श्री. भरत बठिजा, प्र. शहर अभियंता
१५. श्री. महेंद्र दिंडे, प्र. कार्यकारी अभियंता (विदयुत)
१६. श्री. भगवान कुमावत, प्र. सहा. आयुक्त

१७.श्री. नंदु समतानी, प्र. सहा. आयुक्त
१८.श्री. गणेश शिंपी, प्र.सहा. आयुक्त (मालमत्ता)
१९.श्री. मनिष हिवरे, प्र. सहा. आयुक्त
२०.श्री. शैलेश दोंदे, प्र. कर निर्धारक व संकलक
२१.श्री. भास्कर मिरपगारे, प्र. अग्निशमन अधिकारी
२२.श्री. बाळू नेटके, प्र. सुरक्षा अधिकारी
२३.श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक
२४.श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक
२५.श्रीमती अंजु शेमला, डॉक्टर, वैद्यकीय आरोग्य विभाग
२६.श्रीमती राशी ओचानी, लिपिक, वैद्यकीय आरोग्य विभाग

श्री. श्रीधर पाटणकर, अति. आयुक्त हे आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ होते. दुपारी ४.०० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

प्र. महापालिका सचिव :—आज मा.सभापती महोदया अनुपस्थितीत असून त्यांच्या जागी पीठासीन अधिकारी म्हणुन आपल्यापैकी एकाने आसनस्थ व्हावे. सन्माननिय सदस्यांनी तसे ठरवावे.

सदस्य श्री. राजेश वधारीया :—मी श्रीमती राजश्री चौधरी मॅडम याचें नाव आज सभापती पदी विराजमान होण्यास प्रस्तावित करीत आहे.

सदस्य श्री. भगवान भालेराव:—श्रीमती राजश्री चौधरी मॅडम यांनी आजच्या सभेचे अध्यक्षस्थान स्विकारावे. त्यास माझे अनुमोदन आहे.

**यावेळी श्रीमती राजश्री चौधरी हया सभापतींच्या जागी पीठासीन अधिकारी म्हणुन आसनस्थ झाल्या.**

प्र. महापालिका सचिव :— मी सर्व सन्मानीय सदस्यांना विनंती करते की, आज इतिवृत्त लिहिणारे लिपिक रजेवर गेले असून सर्वानी कृपया माईक सुरू करून नंतर बोलावे जेणेकरून आपण केलेले सर्व संभाषण व्यवस्थित रेकॉर्ड होईल.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे :—कर्मचारी पुरेसा नाही त्यास कारण काय?

प्र. महापालिका सचिव:—माझ्याकडील कर्मचारी काढुन टाकण्यात आले आहेत. एका कर्मचा—याची बदली करण्यात आली व दुसरा जो कर्मचारी दिला तो सिंधी आहे, ते आता दोन वर्षात सेवानिवृत्त होतील. त्यांच्याकडुन मराठी इतिवृत्त लिहिणे अपेक्षित नाही. एक लिपिक आहे ती कधी स्थायी समिती सभेत इतिवृत्त लिहित नाही, श्रीमती नर्गीस खान आहेत ती लिहिते परंतु एवढे लिहु शकणार नाही. माझ्याकडे कर्मचारी पुरेसा नाही त्यामुळे मी वेळोवेळी पत्रव्यवहार केला आहे. तर तुम्ही कृपया माईकमध्ये बोलावे.

श्री. श्रीधर पाटणकर, अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :—ही गोष्ट येथे बोलण्याची नाही. माईकमध्ये बोलावे असे कसे बोलत आहात? तुम्ही इतिवृत्त लिहा. तुमच्या कर्मचा—यांना सांगा.

प्र. महापालिका सचिव :—इतिवृत्त लिहिणे सचिवांचे काम नाही. आज इतिवृत्त लिहिणारे लिपिक गैरहजर असून सदस्यांनी माईकमध्ये बोलावे हे सांगणे आताच गरजेचे होते. जेणेकरुन इतिवृत्त व्यवस्थित लिहिता येईल.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—कर्मचारी वर्ग नाही ही दुर्देवाची गोष्ट आहे साहेब. जरा लक्ष दया. सदर विभाग हा महापालिकेचा महत्वाचा विभाग असतांना त्या विभागाची अशी परीस्थिती आहे. आयुक्त महोदय त्यांना पुरेपुर कर्मचारी पुरवावे. नाहीतर महासभेत असा विषय जर आला तर पुन्हा मग.....

सदस्य श्री. राजेश वधारीया :— हा विषय नेहमी येत असतो, सचिव विभाग हा महत्वपुर्ण विभाग आहे. सर्व महासभा, स्थायी समिती सभा, वृक्ष प्राधिकरण सभा, परिवहन समिती सभा इत्यादी सर्व सभांचे इतिवृत्त तयार करणे, सुचना काढणे, ठराव तयार करणे इत्यादी कामे करावयाची असतात, तर मग दोन लिपिकांनी काम कोठे होईल? जर अशाप्रकारे कर्मचारी अपुरे पडत असतील तर काम कसे होणार? त्यांना कर्मचारी नाही ही दुर्देवी गोष्ट आहे. आपण त्यांना पुरेसा कर्मचारी वर्ग दयावा. सचिव महोदया तुम्ही तशी मागणी केली आहे का?

<u>प्र. महापालिका सचिव :—</u> सभेसाठी इतिवृत्त लिहिणारे कर्मचारी हे लिपिक संवर्गाचे असून त्यांना एवढया फास्ट लिहिणे शक्य नाही. प्रशासनास आम्ही वांरवार पत्रव्यवहार केजा असून अदयाप आम्हाला कर्मचारी वर्ग उपलब्ध होत नाही.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे</u> :—सदर विषय हा प्रशासनाचा आहे. एक दिवस सभा असते त्यादिवशी तरी कर्मचारी उपलब्ध करून दिले पाहिजेत ना? नाही दिले तर कसे चालेल साहेब? नाहीतर सभांसाठी ठराविक कर्मचा—यांचे विशेष आदेश तरी काढा. त्यावर आपण निर्णय घेवुन आपण कर्मचारी पुरवावेत. कर्मचारी पुरविणे हि बाब प्रशासनाची आहे ती आम्ही सांगणे संयुक्तिक वाटत नाही.

<u>प्र. महापालिका सचिव :—</u>माईक चालु केला तर रेकॉर्डींगमध्ये येईल व व्यवस्थित इतिवृत्त लिहिले जातील. यात अधिका—यांचे आवाज येत नाही. इतिवृत्त व्यवस्थित लिहावे लागते. जर काही मुद्दे लिहायचे राहिले तर? आम्ही तर आमच्यापरीने करत आहोत. परंतु प्रशासनाने सुध्दा आमची मागणी पुर्ण केली पाहिजे. कामकाजात बराच अडथळा येत आहे.

<u>सदस्य श्री. महेश गावडे :—</u>अनावधाने एखादा मुद्दा राहिला तर.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>कर्मचारी दया ना प्रशासनाने. म्हणजे महत्वाचा विषय आहे, स्थायी समितीमध्ये सुध्दा हा विषय येतो.

<u>सदस्य श्री. महेश गावडे :—</u>दोन महिन्यापुर्वी सुध्दा हेच झाले होते. पुर्वी जेवढा कर्मचारी वर्ग होता तेवढा त्यांना देणे आवश्यक आहे.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>कर्मचारी वर्ग पुरेसा नाही हा विषय आहे ना? प्रशासनाने आपल्या स्तरावर करायचे होते, आम्हांला बोलायला लावायला नको होते.

<u>सदस्या, श्रीमती. राजश्री चौधरी :—</u> प्रशसनाने माझ्याकडे आयत्या वेळेचे २ विषय दिले आहेत. विषय खालिलप्रमाणे आहेत.

**विषय क्र. १:—** रिक्षांद्वारे करण्यात आलेल्या ध्वनीक्षेपकांचे देयक अदा करणेकामी कार्योत्तर मंजुरी देणे.

**विषय क्र. २:—** उल्हासनगर—३ मधील राधास्वामी सतसंग हॉल ते ओ.टी. पर्यंत सी.सी. पेव्हमेंट रोड आणि नाली बनविणेच्या कामाकरीता करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत मे. जयभारत कंन्स्ट्रक्शन यांची ७.२० टक्के जास्त दराच्या निविदेस मान्यता देणे.

तरी सर्व सदस्यांनी सदर विषय स्विकारावे की नाही हे ठरवावे.

<u>काही सदस्य :—</u> आयत्या वेळचे दोन्ही विषय स्विकारण्यात यावेत.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे</u> :—आमची मागील वेळेस सुध्दा विनंती होती की, तुम्ही आयत्यावेळचे विषय आणा परंतु आणत असतांना त्या विषयाचा गोषवा—याची प्रत तर दया. सदस्यांना ते तर पाहु दया की काय विषय आणत आहेत, फक्त एक विषय आला म्हणजे संपले, फक्त होकार दया नकार दया. सदर विषय स्विकारण्यास आम्ही नाही म्हणत नाही. पण विषय काय आणला आहे तो तर पाहु दया.

<u>प्र. महापालिका सचिव :—</u>साहेब, आता आयत्यावेळचा विषय सामावुन घेतला आहे त्या गोषवा—यांची प्रत देतो.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>ठिक आहे, ठिक आहे.

<u>प्र.महापालिका सचिव :—</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ <u>विषय क्र. १</u> :— मागील सभेचे दिनांक २/१२/२०१५ व २३/१२/२०१५ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे :– इतिवृत्त कायम करतो, परंतु पुर्वी झालेल्या आदेशाचे काय झाले, त्याची अंमलबजावणी काय झाली, ते तर विचारु शकतो ना? आम्हांला आधी त्याची माहिती दयावी. पारीत झालेल्या ठरावांवर काय अंमलबजावणी केली त्याची माहिती तर घेवू शकतो ना, कितीतरी ठराव इतिवृत्ताची वाट न पहाता अंमलबजावणी करण्यात यावी असे पारीत होतात त्याच्यावर अंमलबजावणी झाली कि नाही हे कोण सांगणार? हा विषय कधी घेणार आम्ही, प्रशासनाला जे आवश्यक वाटतात,गरजेचे वाटतात, त्यांच्या सोयीनुसार त्यांचीच अंमलबजावणी होते. असे स्थायी समिती सदस्यांचे ठाम मत आहे. आता हल्लीचेच मी दोन चार विषय सांगतो, मागच्या सभेत कर विभागासाठी ठराव पारीत झाला होता त्यामध्ये संबंधित जबाबदार अधिका–यांवर कारवाई व्हावी असे नमुद होते. परंतु त्यावर कारवाई झाली का? नाही, काहीच कारवाई झाली नाही. याबाबतचा आम्हाला काही अहवाल दयाल कि नाही. स्थायी समिती मध्ये पारीत झालेल्या निर्णयाला काही महत्व आहे कि नाही ते सांगा. आयुक्त साहेब कधीच सभेत उपस्थित नसतात यापेक्षा मोठे दुदैव नाही. स्थायी समिती आर्थिक सभा आहे त्यात आयुक्त साहेब नसतात प्रत्येक सभेला. आता तर आयुक्त साहेब आता रजेवर आहेत म्हणुन ठिक आहे. काही तरी ठोस निर्णय कोण घेणार आणि त्यानुसार कार्यवाही कधी होणार.

पीठासीन अधिकारी श्रीमती राजश्री चौधरी :– श्री. सुर्वे साहेब, कुठल्या विषयाची अंमलबजावणी झाली नाही याची आपण माहिती दयावी त्यानुसार आपणास संबधित अधिकारी माहिती देतील.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे :– ते सांगतील ना, त्यांना सांगु देत ना काय ते.

पीठासीन अधिकारी श्रीमती राजश्री चौधरी :– नाही तुम्ही तुमचा कोणता विषय असेल तर ते स्पष्ट सांगा ना आपण त्याचा यात समावेश करू ना.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे :– नाही, माझा कोणता विषय नाही. मी जो आता कर विभागाचा मुददा सांगितला त्यात अधिकारी यांनी उभे राहुन सांगावे की कधीपर्यंत होईल ते, की पुढच्या सभेपर्यत होईल.

पीठासीन अधिकारी श्रीमती राजश्री चौधरी :– नाही, प्रत्येक विषयाची अंमलबजावणी होत असते.

सदस्य श्री. भगवान भालेराव:– प्रशासनाचा महत्वाच्या विषयांवरच अंमलबजावणी होते उर्वरीत विषयावंर अमंलबजावणी होते की नाही याची माहिती देण्यासाठी आयुक्त महोदय केव्हाही स्थायी समितीच्या सभेत उपस्थित नसतात.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे :– मागील सभेत पारीत झालेल्या ठरावांवर काय अंमलबजावणी झाली ते तरी सांगितले पाहिजे ना, किंवा पुढील सभेमध्ये सांगतो ते ही नाही. त्यांनी सांगितले पाहिजे ना, १५ दिवसांनी देतो किंवा पुढच्या सभेमध्ये देतो.

सदस्य श्री. भगवान भालेराव:– अहो, संबंधित अधिकारी, आयुक्त नाहीत ना.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे :– अहो, प्रत्येक वेळेला कुठे आयुक्त साहेब असतात मिटींगला.

सदस्य श्री. भगवान भालेराव:– पुढच्या सभेमध्ये माहिती देण्यात यावी.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे :– ठिक आहे, बघतो पुढच्या मिटींगमध्ये माहिती मिळते की नाही.

पीठासीन अधिकारी श्रीमती राजश्री चौधरी :– पुढील सभेत याची माहिती दयावी.

प्र.महापालिका सचिव :– सदर विषय पारीत करण्यात यावा का?

काही सदस्य:– पास– पास.

पीठासीन अधिकारी श्रीमती राजश्री चौधरी :– मागील सभेचे दिनांक २/१२/२०१५ व २३/१२/२०१५ रोजीचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १** :– मागील सभेचे दिनांक २/१२/२०१५ व दिनांक २३/१२/२०१५ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नांव : श्री. भगवान भालेराव

अनुमोदकाचे नांव : श्री. सुनिल सुर्वे

स्थायी समिती ठराव क्र. :— ८२ अ दिनांक : २७/१/२०१६

ही स्थायी समिती महापालिका सचिवांनी प्रस्तुत केलेले दिनांक २/१२/२०१५ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते ७९ पर्यंतचे व दिनांक २३/१२/२०१५ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते ३० पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

प्र.महापालिका सचिव :— विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. २ :—**उल्हासनगर—२ भैय्यासाहेब आंबेडकरनगर समोरील शौचालय बांधणेच्या कामास मान्यता देणे.

---

सदस्य श्री. भगवान भालेराव:— सन्माननीय सभापती महोदया, हा विषय असा आहे की, या विभागातुन निवडुन आलेले नगरसेवक, स्थायी समितीचे सदस्य, सभापती, इतर विषय समित्यांचे सभापती,सदस्य तसेच आमदार, खासदार असोत यांनी पत्रव्यवहार केला असता तर ठिक आहे, परंतु एखादा सामाजिक संघटनेचा माणूस पत्र देतो आणि त्यानुसार आपण तेथे ५(२)(२) नुसार कामाना मंजुरी देवुन ते काम मार्गी लावतात. यामध्ये तुम्हाला कोणत्याही नगरसेवकाचे पत्र नव्हते का? अशी जर यंत्रणा असेल तर एखादी संघटना जर महापालिका चालवत असेल तर इथे आम्ही नगरसेवक कशासाठी आहोत? काय काम नगरसेवकांचे इथे, मी स्वतः नगरसेवक म्हणुन अनेक वेळा पत्रव्यवहार केला आहे त्या पत्राची आपण केव्हाही दखल घेतली नाही, माझे नांव न येता एका संघटनेचे नांव इथे येते त्याबदद्ल आपली काय भुमिका आहे. संस्था मोठी आहे का नगरसेवकापेक्षा?

श्री. भरत बठिजा, प्र. शहर अभियंता:— सदर शौचालयाच्या ५ वेळा मुदतवाढ दिली असुन त्यात कोणीही निविदा भरली नाही त्यामुळे सदर काम हे ५(२)(२) नुसार करण्यात येत आहे.

सदस्य, श्री. भगवान भालेराव:— ठिक आहे, ५ वेळा निविदा मागविल्या, काम झाले नाही, कुठलीही संघटना येते तुम्हाला सांगते कायदयाने वागा सांगते व सांगते की ५(२)(२) मध्ये काम करा. उपोषणला ५० लोक बसतात हो, मग प्रत्येक उपोषणचे मुदद्े तुम्ही स्थायी समितीपुढे आणता का? नगरसेवकापेक्षा कुणीही सामाजिक संघटनेच्या व्यक्तीने आपल्याला पत्रव्यवहार केला तर आपण त्या कामाना मंजुरी दयाल का कोणीही उठाव आणि उपोषण करावे त्यामुळे जर आपण काम करणार असणार तर रोज भरपुर व्यक्ती उपोषणास बसत असतात मग आपण त्यावंर लगेच ५(२)(२) नुसार काम करणार आहात का. प्रशासनाने याबाबत खुलासा करावा.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे :— श्री. भालेराव यांनी उपस्थित केलेला मुददा एकदम बरोबर आहे, मी स्वतः सदस्य असुन, मला स्वतःला आणि श्री. विजय पाटील यांना महासभेत उपोषणाला बसावे लागले. आम्ही उपस्थित

केलेल्या मुदद्यांची अद्याप पुर्तता झालेली नाही. प्रशासनाचा हा काय प्रकार आहे तो आम्हाला समजावा, खुलासा करावा.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** माझा मुदद्ा एकच आहे, तुम्ही विभागाने, सार्व. बांधकाम विभागाने प्रस्ताव का आणला नाही, संबंधित संघटनेचे नांव टाकण्याची काय आवश्यकता भासली तुम्हाला, तुम्ही स्वत: आणु शकता ना, ५(२)(२) मध्ये ५ वेळा निविदा मागविल्या परंतु काम झाले नाही.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे** :—सदस्यांची पण पत्र होती त्यासंदर्भात.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** मीसुध्दा पत्र दिलेले होत ना.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे** :— मग त्यांच्या पत्रांना किंमत न देता असे करणे म्हणजे स्थानिक नगरसेवकाला डावलले गेले आहे.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** सभापती महोदया, तुमच्या लक्षात येते का, यांनी ५ वेळा निविदा काढल्या, प्रशासनाने काढल्या, कोणाच्या म्हणण्यानुसार काढल्या का? नियमानुसार प्रशासनाने ५ वेळा निविदा काढल्या मग प्रशासनाने तसा प्रस्ताव आणायला हवा होता. आवश्यकता काय आहे कोणत्याही संघटनेचे नांव टाकण्याची?

**पीठासीन अधिकारी श्रीमती राजश्री चौधरी :—** सर्व सदस्याच्या म्हणण्यानुसार हा विषय रदद करू या.

**सदस्य श्री. राजेश वधारीया :—** हा विषय अमान्य करावा. हा स्थायी समिती सदस्यांचा अपमान आहे.

**पीठासीन अधिकारी श्रीमती राजश्री चौधरी :—** सदरचा विषय अमान्य करण्यात येत आहे.

**काही सदस्य:—** सदर विषय अमान्य करावा.

**पीठासीन अधिकारी श्रीमती राजश्री चौधरी :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. २** :— उल्हासनगर—२ भैय्यासाहेब आंबेडकरनगर समोरील शौचालय बांधणेच्या कामास मान्यता देणे.

**प्रस्तावना**

मा. आयुक्त सो. यांनी त्यांचे पत्र क्र. उमपा/आ.का./३३९/२०१५ दिनांक ५ ऑक्टोंबर, २०१५ रोजीच्या पत्रान्वये श्री. राज असरोंडकर, अध्यक्ष कायदयाने वागा, उल्हासनगर यांनी केलेले बेमुदत उपोषणाचे अनुषंगाने भैय्यासाहेब आंबेडकर नगर समोरील शौचालय बांधणेच्या कामाकरीता महापालिकेतर्फे ऑनलाईन निविदा प्रसिध्द करण्यात आल्या होत्या व सुमारे ५ वेळा मुदतवाढ देवूनही निविदेस प्रतिसाद प्राप्त झाला नसल्याने सदर शौचालय बांधणेचे काम मुंबई महापालिका अधिनियमाचे प्रकरण ५ (२) (२) अंतर्गत प्रस्तावित करावे.

त्या अनुषंगाने उक्त शौचालयाचे कामाकरीता निविदा मागवूनही प्रतिसाद न मिळाल्याने व परिसरातील नागरीकांना सदर शौचालयाची अत्यावश्यकता पाहता सदर काम मुंबई महापालिका अधिनियमाचे प्रकरण ५ (२) (२) अंतर्गत योग्य त्या एजन्सीला देण्यासाठी मा. स्थायी समितीतर्फे निर्णय होणेस सविनय सादर.

**स्थायी समिती ठराव क्र.** ८३      **दिनांक:—२७/१/२०१६**

सुचकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

अनुमोदकाचे नाव :— श्री. भगवान भालेराव

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर—२ भैय्यासाहेब आंबेडकरनगर समोरील शौचालय बांधणेच्या कामास मान्यता देत नाही.

*कारण :*

सदरहु प्रकरणी प्रशासनाने सुधारीत गोषवारा आणणे आवश्यक आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

प्र.महापालिका सचिव :— विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. ३** :—उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील भटक्या कुत्र्यांचे निर्बिजीकरण करण्याकामी न्युनत्तम दराचे निविदाकार मे. नांदेड सोसायटी फॉर प्रिर्व्हेंशन ऑफ क्रुयल्टी टू अनिमल्स नांदेड यांच्याशी संविदा करण्यास मान्यता देणे.

---

सदस्य श्री. राजेश वधारीया :— हा विषय फार गंभीर आहे, कुत्र्यापासुन माझ्या प्रभागातच नाही तर पुर्ण उल्हासनगर शहरातील नागरिक, महिला, बालके यानां फार त्रास होत आहे रस्यावर कधीही कुत्रे येता जाता नागरिंकाना चावत आहेत. त्यावर गोरगरिब नागरिक मध्यवर्ती रूग्णालयात उपचार घेतात. जे श्रीमंत आहेत, खर्च करू शकतात ते मोठया दवाखान्यात जावुन उपचार घेतात, परंतु जे गरीब लोकं आहेत ते शासकीय मध्यवर्ती रूग्णालयात उपचारासाठी जातात, त्यावेळी त्यांना खुप खस्ता खाव्या लागतात. तर माझे असे म्हणणे आहे की, आता सर्वोच्च न्यायालयाने महापालिकेला परवानगी दिली आहे की जे कुत्रे आजारी असतील, खराब झाले असतील किवा ज्याना रेबीज रोगाची लागण झालेली असेल त्या कुत्र्यांना तुम्ही मारून टाकु शकता, तर ही मोहिम आपणांस हाती घ्यावी लागेल. व त्याद्वारे जे कुत्रे आजारी असतील, खराब झाले असतील किवा ज्याना रेबीज रोगाची लागण झालेली असेल अशा कुत्र्यांना तातडीने मारून टाकले पाहिजे. कारण ही महापालिका शहरासाठी/नागरिकांसाठी आहे, जर शहरातील नागरीकांच्या जिवीताचे रक्षण झाले नाही तर कुत्र्यांची रक्षा करून काही फायदा नाही. नाहीतर समाज चालू शकणार नाही. त्यासाठी मारणे योग्य राहील. किवा त्यांची उपाययोजना करावी.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे :— सदरचा जो प्रस्ताव आणला आहे तो फार चांगला आहे. हे झाले पाहिजे, याबदद्ल प्रशासनाचे दुमत नाही. या विषयांबरोबर जर आपण शहरातील डुकरांचाही प्रस्ताव आणयला हवा होता. डुकरांचेदेखील प्रमाण वाढलेले आहे आणि आपण याविषयावंर काय उपाय योजना करणार आहात त्याचा आधी प्रशासनाने खुलासा करावा.

सदस्या, श्रीमती लिलाबाई आशान :— आधी कुत्र्यांचा प्रश्न घेवु या.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे :— हा प्रस्ताव आला आहे तर हा ही विषय घ्यावा. शहरात डुकरांचे प्रमाण फारच वाढले आहे, यामुळे आपल्या शहराचे नांव खराब होत आहे. कोणतीही महापालिका पाहली तर समजेल कोणत्याही महापालिकेच्या हददीत, ठाणे, कल्याण डोंबिवली, मुंबई या कुठल्याच शहरामध्ये तुम्हाला डुक्कर दिसणार नाहीत. आणि इथे रस्त्यारस्त्यावर दिसत आहेत, कारण पुर्वी जेव्हा आपल्या महापालिकेचे आयुक्त म्हणुन चंद्रशेखर साहेब आले होते त्यानी एक मत नोंदविले होते की, उल्हासनगर शहरात नागरीक व डुक्कर हे गुण्यागोंविदाने नांदतात, त्यामुळे अशा गोष्टीची आपले अधिकारी घेत नाहीत का? ते जेव्हा पाहणी करायला जातात, कचराकुंडीवर पहा ना, कुत्र्यांचा विचार करता तर हा ही विषय विचारात घ्यावा.

सदस्य श्री. राजेश वधारीया :— आमचे असे निवेदन आहे की, आपण डुक्करांवरदेखील कार्यवाही केली पाहिजे.

**<u>सदस्या, श्रीमती लिलाबाई आशान :—</u>** कुत्र्याच्या भुंकण्याने लोंकाना त्रास होत असतो परंतु डुकरे भुकत नाहीत म्हणुन तो विषय आणला नसेल बहुतेक.

**<u>सदस्य, श्री. महेश गावडे</u>** :— कुत्र्यांना मारण्यापुर्वी त्याचे मेडीकल चेक अप करावे नंतरच त्याना मारावे जर त्यानां रेबिज असेल तर तेही चेक करावे व त्यांचे निर्बिजीकरण करावे.

**<u>सदस्य श्री. राजेश वधारीया :—</u>** या प्रस्तावात तसे नमुद केले आहे. सदर कामाची तशी निविदाच काढण्यात येणार आहे. त्यामध्ये त्यांना त्याचे डॉक्टर पुरवणे तसेच त्याचे मेडीकल चेक अप करणे व त्यावंर उपाय योजना करणे हे पुर्ण त्याचे काम आहे. सदर डॉक्टर प्रमाणित करून देतील कि, हया कुत्र्याला रेबीज झाले आहे कि तो मारणे आवश्यक आहे. निविदेत तशी तरतुद ठेवलेली आहे, ज्या संस्थेला आपण हे काम देणार आहोत ती संस्था जनावरांच्या डॉक्टरांची नियुक्ती करतील तसा प्रस्तावात नमुद केले आहे. हा विषय माझ्या प्रभागातीलच आहे.

<u>प्र. महापालिका सचिव :—</u> सदर विषय पारीत करण्यात यावा का?

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

**<u>पीठासीन अधिकारी श्रीमती राजश्री चौधरी :—</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ३ :—** उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील भटक्या कुत्र्यांचे निर्बिजीकरण करण्याकामी न्युनत्तम दराचे निविदाकार मे. नांदेड सोसायटी फॉर प्रिव्हेंशन ऑफ क्रुयल्टी टू अनिमल्स नांदेड यांच्याशी संविदा करण्यास मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

वैद्यकीय आरोग्य विभागा मापर्फत, मा. आयुक्त सो. यांचे आदेशानुसार सन २०१५—२०१६ या अर्थिक वर्षामध्ये उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील भटक्या कुत्र्यांचे निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करणे संदर्भात दिनांक १२+०८+२०१५ ते ०१+०९+२०१५ या कालावधीत अंतिम फेर निविदा ई—टेडरींगव्दारे उल्हासनगर महानगरपालिकेच्या वेब साईटवर ई—निविदा सुचना प्रसिध्द करुन E-Tendering निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर निविदा मे. नांदेड सोसायटी पफॉर प्रिव्हेंशन ऑपफ क्रुयल्टी टू अनिमल्स नांदेड व मे. वेट/स सोसायटी पफॉर ॲनिमल वेलपफेर ॲण्ड रफरल डेव्हलप्मेंट, हैदराबाद या दोन निविदाधारकाने भरली होती. सदर ई—निविदा दिनांक २१+०९+२०१५ रोजी दु. १२.०० वा निविदा समिती सदस्य यांचे समक्ष ई निविदा संगणक प्रणालीव्दारे TECHNICAL BID उघडण्यात आला. प्राप्त दोन निविदाकारांनी TECHNICAL BID मध्ये आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केलेली असल्याने सदर निविदेची Commercial Bid उघडण्यास निविदा समिती सदस्याने मान्यता दिली. त्यानुसार दिनांक ३०+११+२०१५ रोजी दुपारी ४.०० वा. सदर निविदेची Commercial Bid निविदा समिती सदस्य यांचे समवेत संगणक प्रणालीव्दारे उघडण्यात आली. पात्र झालेल्या निविदाकारांकडुन सादर केलेल्या भटक्या कुत्र्यांचे निर्बिजीकरण शस्त्रक्रिया दर तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | तपशील कामाचा | परिमाण | निविदाधारकाचे नाव व त्याचे प्राप्त दर | | अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|---|---|
| | | | मे. नांदेड सोसायटी पफॉर प्रिव्हेंशन ऑपफ क्रुयल्टी टू अनिमल्स नांदेड | मे. वेट/स सोसायटी पफॉर ॲनिमल वेलपफेर ॲण्ड रफरल डेव्हलप्मेंट, हैदराबाद | |
| १ | Dog Catching with own vehicle, labour and shifting to dispensary and sterilize for planning operation and sterilize dogs | | <u>८६०/— प्रति भटक्या कुत्र्यांचे निर्बिजीकरण</u> | ९९५/— प्रति भटक्या कुत्र्यांचे निर्बिजीकरण | २१,५०,०००/— |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | treated, provide to dogs food in admitting period and dog release which place they catching in Ulhasnagar Municipal Corporation Limits. | २५०० | शस्त्रक्रिया | शस्त्रक्रिया | |

वरील प्रमाणे तक्ता मध्ये **मे. नांदेड सोसायटी फॉर प्रिव्हेंशन ऑफ क्रुयल्टी टू अ निमल्स नांदेड यांचे दर कमी असुन सदर** वरील प्रमाणे परिमाणानुसार उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील भटक्या कुत्र्यांचे निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करणे करिता रु. २१,५०,०००/– रुपये एकवीस लाख पन्नास हजार मात्र खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च सन २०१५–१६ या वर्षात मधील लेखाशिर्ष सी – २ (x) श्वान निर्बिजीकरण कार्यक्रम या लेखाशिर्षाखालील रु ४०,००,०००/– इतकी तरतूद करण्यात आली आहे पैकी पुर्ण तरतुद शिल्लक आहे त्यातुन करण्याचे प्रस्तावित करण्यात येते. तसेच सदर खर्चास व उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील भटक्या कुत्र्यांचे निर्बिजीकरण शस्त्रक्रिया न्युनतम दर सादर करणा–या निविदाकारकाडुन करण्याचे प्रस्तावित करणेत येते.

तरी भटक्या कुत्र्यांचे निर्बिजीकरण शस्त्रक्रियाचे न्युनतम दर सादर करणा–या **मे. नांदेड सोसायटी फॉर प्रिव्हेंशन ऑफ क्रुयल्टी टू अ निमल्स नांदेड** यांच्याशी संविदा करण्याकरिता मा. स्थायी समितीची मान्यता आवश्यक आहे. करिता सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३ (d) अन्वये मा. स्थायी समितीच्या मंजुरीसाठी सविनय सादर.

स्थायी समिती ठराव क्र. ८४ दिनांक:– २७/१/२०१६

सुचकाचे नाव :– श्री. सुनिल सुर्वे

अनुमोदकाचे नाव :– श्री. भगवान भालेराव

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील भटक्या कुत्र्यांचे निर्बिजीकरण करण्याकामी प्रशासनास न्युनतम दराचे निविदाकार मे. नांदेड सोसायटी फॉर प्रिव्हेंशन ऑफ क्र्युलिटी टू ॲनिमल्स, नांदेड यांच्याशी संविदा करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

प्र.महापालिका सचिव :– विषय क्र. ४ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र.** ४ :– पॅनल क्र. १३, महालक्ष्मी मार्केटसमोर, मानस मार्केट जवळ, उल्हासनगर–२ येथिल एकुण ३ सिट्चे वापरात नसलेल्या शौचालय निष्कासन करुन विनियोगास मान्यता देणे.

---

सदस्य श्री. राजेश वधारीया :– सदरचे शौचालय माझ्या प्रभागातील आहे.

सहा. आयुक्त, श्री. गणेश शिंपी :– हा मालमत्ता विभागातील प्रश्न आहे.

सदस्य, श्री. महेश गावडे :– सदर शौचालयाचे नुतनीकरण का नाही करत आपण. नविन का नाही बांधत तिकडे.

<u>सहा. आयुक्त, मालमत्ता, श्री. गणेश शिंपी :—</u> तशी मागणी तेथील नागरीकांकडून आली पाहिजे ना.

<u>सदस्य, श्री. महेश गावडे</u> :— मार्केटमध्ये जे लोक येतात त्यांच्यासाठी शौचालय आहेत का?

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव:—</u> त्याठिकाणी नविन शौचालय तयार करा ना.

<u>सदस्य, श्री. महेश गावडे</u> :— त्याठिकाणी नविन शौचालय तयार करा, उल्हासनगर शहरातील मार्केटमध्ये एवढी लोक येतात बाहेरून, त्याठिकाणी शौचालय नाहीत, आजपर्यंत एवढी शौचालये तोडली आहेत ती दिसतात का तुम्हाला कुठे, त्याठिकाणी अनधिकृत इमारती झाल्या आहेत, नाहीतर विकली जातील त्या शौचालयाच्या जागापण, किती दाखवु शौचालयाच्या जागा तुम्हाला, जेव्हा श्री. नरेंद्र मोदी हे पंतप्रधान झाले तेव्हापासून स्वच्छता अभियान राबवत आहेत. मार्केटमध्ये दाखवा तुम्ही किती शौचालये आहेत, काय सोय केली आहे लोकांची, व्यापारी आहेत करोडोने उद्योग होतो.

<u>सदस्य श्री. राजेश वधारीया :—</u> सदर विषय माझ्या प्रभागातील असल्यामुळे मी थोडी माहिती देवु इच्छितो, तोलाराम मार्केटच्या बाहेर हनुमान गल्लीच्याबाहेर आणि जय गजानन मार्केटच्या समोर तीन शौचालये होती. सदरची शौचालये मिलीटरी काळातील बनवलेली होती. तीन सिटस्‌ची शौचालये होती. परंतु या तीनही मार्केटमधील व्यापारी किंवा नागरीक त्याचा वापर करित नाहीत कारण ते फार जुने आहे ते तोडुन तेथे वाहनाच्या पार्कींगसाठी जागा उपलब्ध होऊ शकते त्याचा वापर तेथे येणा—या नागरीकांना तसेच व्यापा—यांना होणार आहे. नाहीतरी आपल्याकडे पार्किंगची फार गैरसोय आहे, मी याची खात्री देवु शकतो की, या शौचालयांच्या जागी दुकाने होणार नाहीत.

<u>सदस्य, श्री. महेश गावडे</u> :— यापुर्वीही बहुतेक वेळा असे प्रकार झाले आहेत की शौचालयाच्या जागा तोडुन त्याठिकाणी अनधिकृत बांधकामे होतात. त्यावर आपले काही नियंत्रण नसते.

<u>सदस्य श्री. राजेश वधारीया :—</u> मी माझ्या प्रभागासंबंधित बोलू शकतो.

<u>सदस्य, श्री. महेश गावडे</u> :— आपल्या प्रभागातदेखील काही शौचालये गायब झाली आहेत त्यांचे काय?

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u> तुमच्या प्रभागात एक दहा सिटचे शौचालय होते ते गायब झाले आहे. त्याठिकाणी इमारत तयार झाली आहे.

<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया :—</u> आम्ही त्याठिकाणी समाजमंदिर बांधलेले आहे. सदर ठिकाणची आयुक्त, अति. आयुक्त यांनीसुध्दा पहाणी केली होती. इमारत कुठे आहे?

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव:—</u> राजेशजी, आम्ही सर्व उल्हासनगरचे बोलत आहोत कुणी एका विषयी बोलत नाहीत तेव्हा आयुक्त महोदय आपण यावर आपले मत माडांवे.

<u>सदस्य, श्री. महेश गावडे</u> :— इतर ठिकाणीसुध्दा शौचालये गायब झालेली आहेत त्यांचे काय?

<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया :—</u> मी फक्त माझ्या प्रभागाचे सांगु शकतो, इतर ठिकाणचे मला माहित नाही.

<u>सदस्य, श्री. महेश गावडे</u> :— मी तुम्हाला विचारत नाही, मी आयुक्त साहेबांशी बोलत आहे.

<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया :—</u> ठिक आहे, आयुक्त साहेबांना विचारा,

<u>सदस्य, श्री. महेश गावडे</u> :— आयुक्त साहेब, या सर्व बाबींचा विचार करून सदर विषय पुढच्यावेळेला आणा.

<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया :—</u> सर्व ठिकाणची माहिती नंतर येवु दे, परंतु हा विषय थांबविण्यात काही अर्थ नाही.

<u>सदस्य, श्री. महेश गावडे</u> :— आयुक्त साहेब, आम्ही कधी शौचालय तोडतच नाहीत आणि तोडली तरी त्याठिकाणी शौचालयच तयार करतो. आयुक्त साहेब, सांगु देत मला मी देतो शौचालयांची यादी, कुठे कुठे अनधिकृत आणि काय काय तयार झाले आहे ते,

<u>श्री. श्रीधर पाटणकर अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:—</u> सन्मानीय स्थायी समितीने निर्णय घ्यावा.

<u>सदस्य, श्री. महेश गावडे</u> :– आयुक्त साहेब, ऐकतच नाही मी काय म्हणतो ते. तुम्हाला मी सांगतो, जेवढे शौचालय गायब झाले आहेत, आपल्याकडे शौचालय बांधणेसाठी नविन फंड दिला जातो, श्री. मोदी साहेब देतात हा फंड आणि तुम्ही गायब करत आहात, तुमच्याकडे शौचालय आहेत का मार्केटमध्ये, तुम्ही आधी फिरलात का संपुर्ण उल्हासनगर आजपर्यंत?

<u>श्री. श्रीधर पाटणकर अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:–</u> हे पहा, या विषयावर सन्मानीय स्थायी समितीने निर्णय घ्यावा, आपण उल्हासनगर शहरात फिरलात का हा प्रश्न होवु शकत नाही आणि मी पुर्ण उल्हासनगर फिरलो आहे. आयुक्त काय शौचालयच पहात बसत नाही, सदर विषयावर मी मालमत्ता विभागाकडुन माहिती मागवित आहेत.

<u>सदस्य, श्री. महेश गावडे</u> :– मग आपण काय पहाता? असे उत्तर आपले योग्य आहे का? तुम्ही सुविधा देता का उल्हासनगरच्या मार्केटमध्ये येणा–या लोकांना?

<u>श्री. श्रीधर पाटणकर अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:–</u> असे खोचक, अपमानकारक प्रश्न विचारणे योग्य नाही.

<u>सदस्य, श्री. महेश गावडे</u> :– अपमानकारक काय बोललो मी, मी याआधीही आपणांस प्रश्न विचारला त्याचे उत्तर दिले का आपण? तुम्हाला मी जेव्हा बोलत होतो तेव्हा तुम्ही मोबाईलमध्ये बिझी होतात, हा माझा प्रॉब्लेम नाही.

<u>श्री. श्रीधर पाटणकर अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:–</u> आम्ही व्यवस्थितच उत्तर दिलेले आहे, स्थायी समितीपुढेच उत्तर दिलेले आहे. तुम्ही नेहमी अपमानकारकच बोलत असता.

<u>सदस्य, श्री. महेश गावडे</u> :– तुमचे कर्तव्य नाही का हे करणे, अपमान केला नाही तुमचा, मार्केटमध्ये शौचालये किती आहेत हे विचारले तुम्हाला. आपण उत्तर दिले नाही, अपमान आपण करतात.

<u>श्री. श्रीधर पाटणकर अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:–</u> सहा. आयुक्त, उत्तर दया किती शौचालये आहेत त्याचे, आणि दुसरे असे की आपल्याकडे जी शौचालये होती...

<u>सदस्य, श्री. महेश गावडे</u> :– साहेब, आपल्याकडे कितीतरी शौचालये होती आणि त्यापैकी कितीतरी गायब झालेली आहेत.

<u>श्री. श्रीधर पाटणकर अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:–</u> त्याबदद्लच मी सांगतो आहे, किती शौचालये बांधलेली होती, त्यापैकी किती पाडलेली आहेत व त्या त्या ठिकाणी काय काय बांधकाम झालेले आहे, कुठल्याप्रकारचे बांधकाम झालेले आहे, त्याबदद्लची माहिती मागविली आहे. सदर माहिती तयार करण्याची कार्यवाही मालमत्ता विभागामार्फत सुरू आहे.

<u>सदस्य, श्री. महेश गावडे</u> :– काही इमारतींना ५ वर्ष झाली आहेत ती पाडू शकता का तुम्ही, जी शौचालये गायब झाली आहेत त्याठिकाणी ५–१० वर्ष झाली आहेत इमारती होवून, शौचालये पडतात आणि इमारती उभ्या राहतात, काय करणार आपण त्याला? १९७४ चा डीपी प्लॅन आहे त्यात बघा ना ब्रिटीशकालीन शौचालये होती ती गायब झाली आहेत. राजेश वधारीया साहेब इकडून म्हणतात, आता पुर्वीचे काय झाले ते मला माहित नाही. राजेश वधारीया गेले की, दुसरे येणार ते म्हणणार मला आधीचे काय माहीत नाही. लोकांची गरज आहे, मार्केटमध्ये शौचालये नाहीत, तुम्ही चांगले पध्दतीने व्यवस्थित शौचालय बांधा ना, सदर विषय वगळण्यात यावा व पुढील सभेत नव्याने विषय आणा ना.

<u>सदस्य श्री. राजेश वधारीया :–</u> हा विषय आता पास करावा नंतर आपण सर्व शौचालयाच्या प्रश्नावर प्रशासनाकडुन माहिती घेवु या.

<u>सदस्य, श्री. महेश गावडे</u> :– पास नाही, आम्हाला आयुक्तांकडुन हमी पाहिजे. माझ्या प्रभागातीलपण १०–१५ शौचालये सुध्दा पाडण्यात यावीत.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव:—</u> सदरचा प्रस्ताव वगळण्यात यावा.

<u>सदस्य श्री. राजेश वधारीया :—</u> आपण हा विषय का वगळत आहात, माझे म्हणणे आहे आपण हा विषय पारीत करावा आणि संबंधित विभागाला सुचना दया पुढील सभेत शौचालयांची माहिती सादर करण्यासाठी, हा विषय पास करावा लोकांची गरज आहे

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे</u> :—हा प्रस्ताव आता वगळून पुढील सभेत घेवु या.

<u>सदस्य, श्री. महेश गावडे</u> :—सदर विषयावर मतदान घ्या.

<u>सदस्य श्री. राजेश वधारीया :—</u> हे बरोबर नाही, आम्ही सदर विषयाचा संबधित विभागाशी वारंवार पाठपुरावा केला आहे त्यानंतर हा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे आपण यावर मतदान घेवु या, त्यावर सदस्याचे मत कळेल. हा माझ्या प्रभागातील विषय आहे.

<u>सदस्य, श्री. महेश गावडे</u> :— मी तुमच्या प्रभागाबदद्ल बोलत नाही. मी हकीकत सांगत आहे. किती शौचालये दाखवू आणि काय सांगू. मला आयुक्त साहेबांनी सांगावे काय ते. आताच्या आता कारवाई करता का?

<u>सदस्य श्री. राजेश वधारीया :—</u> मग आम्हीपण प्रत्येक वेळेला विषय मतदानाला टाकू चालेल का?

<u>सदस्य, श्री. महेश गावडे</u> :— आम्हाला काही फरक पडत नाही, तुम्ही विषय टाका मतदानाला.

<u>सदस्य श्री. राजेश वधारीया :—</u> सदर विषय आता पारीत करावा, दुसरे सर्व विषय पुढील सभेत एकत्रितपणे आणावेत.

<u>सदस्य, श्री. महेश गावडे</u> :— आयुक्त साहेब, तुम्ही मला याचे स्पष्टीकरण दयावे.

<u>पीठासीन अधिकारी श्रीमती राजश्री चौधरी :—</u> या विषयावंर मतदान घेवु या.

<u>सदस्य श्री. महेश गावडे:—</u> सचिव महोदया, विषय मतदानास टाकण्यापुर्वी मी तुम्हाला तेच बोलेल की प्रशासनाने योग्य माहिती दयावी आणि बाकीच्या शौचालयांची माहिती आणावी.

<u>पीठासीन अधिकारी श्रीमती राजश्री चौधरी :—</u> आयुक्त साहेब, स्पष्ट माहिती दया तुम्ही.

<u>सदस्य श्री. राजेश वधारीया :—</u> सभापती महोदया, यांनी प्रश्न काय विचारला माझ्या प्रभागात आणखी १० सिटसची शौचालये आहेत ती पाडून इमारती तयार झाल्या आहेत, याला मी आव्हान देतो त्यांनी मला दाखवावे कुठल्या १० सिटसच्या शौचालयाच्याजागी इमारत बांधली आहे ते, मी सर्व सदस्यांना आव्हान देतो, आम्ही समाजमंदिर बांधले आहे, त्याबाबत तक्रार आली होती त्यावेळेस, उप—आयुक्त, अति. आयुक्त, आयुक्त सर्व पहाणीसाठी आले होते त्यांनी पहाणी केली की त्याठिकाणी समाजमंदिर बांधलेले आहे.

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u> आपल्या कार्यकाळात झाले आहे असे केव्हा बोललो मी. शौचालयाच्या जागी बांधकाम झालेले आहे ते मी दाखवेन आपल्याला, घ्या आता मतदान.

<u>सदस्य श्री. राजेश वधारीया :—</u> परंतु आपण हा आरोप करीत आहात.

<u>सदस्य, श्री. महेश गावडे</u> :— आरोप कोणी लावला तुमच्यावर, तुमचे नांव घेवुन कोणी बोलले नाही, आपण व्यवस्थित ऐका आधी, मी आयुक्तांना काय प्रश्न विचारला ते इथे रेकॉर्ड झालेले आहे.

<u>सदस्य श्री. राजेश वधारीया :—</u> मी तुम्हाला विषय समजावलेला आहे.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे</u> :— वधारीया साहेब, त्यांनी तुमच्यावर आरोप केलेला नाही, ते आपणास नाही सर्व शहराविषयी बोलत आहेत. त्याचा विरोध आपल्याला नसुन सर्व शहरातील शौचालयाची काय अवस्था आहेत याविषयी ते बोलत आहेत.

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u> आम्ही सर्व सहकार्य करायला तयार आहोत, त्याठिकाणी शौचालय बनवायला काय अडचण आहे.

**सदस्य श्री. राजेश वधारीया :—**त्याठिकाणी आजूबाजूला तीन शौचालये आहेत.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** आपल्याला काय अडचण आहे.

**सदस्य श्री. राजेश वधारीया :—** त्याठिकाणी तशी लोकांची मागणी नाही ना. काय करू शकतो. बोलण्याआधी विचार करा. हे माझ्यावर आरोप लावत आहेत.

**सदस्य, श्री. महेश गावडे** :—लोकांनी मागणी केली नाही शौचालयासाठी तर लोकांनी पार्किंगसाठी मागणी केली आहे का? तसे पत्र दिले आहे का?

**सदस्य श्री. राजेश वधारीया :—** माझ्या प्रभागाचे काम आहे मी ठरवेन ना, तुमच्या प्रभागाचे काही काम असेल तेव्हा आम्हीपण मग बोलणार.

**सदस्य, श्री. महेश गावडे** :— बोला तुम्ही, आम्ही आपणांस चांगल्यापध्दतीने सांगत आहोत तर तुम्हाला समजत नाही, तुम्ही सभा पुढे सुरू ठेवा.

**पीठासीन अधिकारी श्रीमती राजश्री चौधरी :—**सचिव महोदया, मतदान घ्या.

**प्र.महापालिका सचिव :—** जे सदस्य प्रस्तावाच्या बाजुने असतील अशा सदस्यांनी हात वर करावे

**प्रस्तावाच्या बाजुने असलेले सदस्य**

१. श्री राजेश वधारीया
२. श्री उमेश कलानी
३. श्री. गुरूनो वलेचा
४. कु. शकुतला जग्यासी.

**प्र.महापालिका सचिव :—** जे सदस्य प्रस्तावाच्या विरोधात असतील अशा सदस्यांनी हात वर करावे.

**प्रस्तावाच्या विरोधात सदस्य**

१. श्रीमती आशा इदनानी

२. श्री महेश गावडे

३. श्री भगवान भालेराव

**प्र.महापालिका सचिव :—**जे तटस्थ आहेत त्यांनी आपले हात वर करावे.

**तटस्थ सदस्य:—** १) श्रीमती राजश्री चौधरी, २) श्रीमती लिलाबाई आशान व ३) श्री. सुनिल सुर्वे

**प्र.महापालिका सचिव :—** प्रस्तावाच्या बाजुने ४ सदस्य व प्रस्तावाच्या विरोधात ३ सदस्य असल्याने हा विषय बहुमताने पारीत झाला आहे.

**सदस्य श्री. राजेश वधारीया :—** सदर विषयाच्या ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्ताची वाट न पाहता करण्यात यावी. तसेच सदर शौचालयाच्या ठिकाणी सी सी पॅसेज तयार झाल्यावर त्याचे फोटो आम्ही आपल्या माहितीस्तव सादर करू.

**सदस्य, श्री. महेश गावडे :—**कोणी तुमच्याकडे फोटो मागितलेले नाहीत. याच्या आधीच्यापण सर्व्हे केला आहेत शौचालये चोरीला गेल्याचा त्याचा अहवाल सभेला सादर करावा.

**पीठासीन अधिकारी श्रीमती राजश्री चौधरी :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे बहुमताने ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ४ :—** पॅनल क्र. १३, महालक्ष्मी मार्केटसमोर, मानस मार्केट जवळ, उल्हासनगर—२ येथिल एकुण ३

सिट्चे वापरात नसलेल्या शौचालय निष्कासन करुन विनियोगास मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

श्री. राजेश वधारीया, नगरसेवक, यांनी दि ०१/०९/२०१५ रोजीच्या पत्रान्वये पॅनल क्र. १३ महालक्ष्मी मार्केट समोर, मानस मार्केट जवळ, उल्हासनगर—२ येथील एकुण ३ सिट्चे वापरात नसलेले सार्वजनीक शौचालय निष्कासन करणे बाबत विनंती केलेली आहे.

आरोग्य विभागाकडुन सदर शौचालय बाबत संबंधीत मुख्य स्वच्छता निरीक्षक यांचे अभिप्रायसह अहवाल मालमत्ता विभागास प्राप्त झालेला आहे. सदर अहवालात नमुद केलेप्रमाणे पॅनल क्र. १३ महालक्ष्मी मार्केट समोर, मानस मार्केट जवळ, उल्हासनगर—२ येथील एकुण ३ सिट्चे सार्वजनीक शौचालय मोडकळीस अवस्थेत असुन वापरात नाही. तरी तेथील सार्वजनिक शौचालय निष्कासन करणेसाठी श्री. राजेश वधारीया, नगरसेवक, यांनी मागणी केली असल्याचे नमुद करण्यात आले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७९ अन्वये महानगरपालिकेच्या मालमत्तेचा अन्य प्रकारे विनियोग करावयाचा झाल्यास मा. स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक आहे. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या अभिप्रायानुसार पॅनल क्र. १३ महालक्ष्मी मार्केट समोर, मानस मार्केट जवळ, उल्हासनगर—२ येथील शौचालय आरोग्य निरिक्षक यांचे पंचनाम्यानुसार धोकादायक शौचालय असल्याने निष्कासित करणे आवश्यक आहे. सदर परिसरातील नागरीकांची मागणी पाहता सदर ठिकाणी शौचालय निष्कासित करून सि.सी. पॅसेज बांधणेच्या प्रस्तावास सार्वजनिक बांधकाम विभागाची काहीही हरकत नाही, असे नमुद केले आहे.

उक्त बाबी विचारात घेता पॅनल क्र. १३ महालक्ष्मी मार्केट समोर, मानस मार्केट जवळ, उल्हासनगर—२ येथील एकुण ३ सिट्चे सार्वजनीक शौचालय निष्कासन करून श्री. राजेश वधारीया, नगरसेवक, यांनी मागणी केल्यानुसार सदर ठिकाणी सि.सी. पॅसेज बनविणेस मंजुरी मिळण्यासाठी किंवा सदर मालमत्तेचा महानगरपालिकेच्या आवश्यकतेनुसार अन्य प्रकारे विनियोग करणेबाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समिती पटलावर प्रस्तावित करणेत येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> ८५ <u>दिनांक:— २७/१/२०१६</u>

सुचकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

अनुमोदकाचे नाव :— श्री. उमेश कालानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार पॅनल क्र. १३, महालक्ष्मी मार्केटसमोर, मानस मार्केट जवळ, उल्हासनगर—२ येथिल एकुण ३ सिट्चे वापरात नसलेल्या सार्वजनिक शौचालय निष्कासीत करून तेथे सी.सी. पॅसेज बनविणेस किंवा सदर मालमत्तेचा महानगरपालिकेच्या आवश्यकतेनूसार अन्य प्रकारे विनियोग करणेस मान्यता देत आहे.

**परंतु,**

१. सदरचे शौचालय तोपर्यंत निष्कासित करू नये जोपर्यंत त्याठिकाणी विकासकाम सुरू होत नाही.

२. निष्कासित केल्यावर महापालिकेचे फलक लावणे आवश्यक राहील.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची <u>सही/—</u>

अनुमोदकाची <u>सही/—</u>

<u>बहुमताने</u>

पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>प्र.महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ५ वाचुन दाखवितात.

---

➡ **विषय क्र. ५ :–** पूर्वप्राथमिक/माध्यमिक शिक्षण समिती सभापती मा.श्री.विजय खंडू सुपाळे यांनी वाहन प्रतिपुर्ती भत्ता मिळणेस मान्यता देणे.

---

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:–**हा विषय स्थायी समितीपुढे आणण्याचे कारण काय? तुम्हाला काय वाटते नियमात.

**सदस्य, श्री. महेश गावडे** :–हा विषय स्थायी समिती सभेत का आणण्यात आला.

**श्री. जमीर लेंगरेकर, उप–आयुक्त, कर** :–यापुर्वी स्थायी समितीचे आदेश आहेत की जर त्या संबधित पदाधिका–याच्या नावे वाहन नसेल तर त्यानां वाहन भत्ता देण्यात येवु नये अणि ज्या दिवसापासुन त्याकडे वाहन त्याच्या नावावर उपलब्ध होईल त्याकाळापासुन त्यांना वाहन भत्ता देण्यात यावा.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:–**त्यांच्याकडे पुर्वी वाहन नव्हतेच ना. मग आता कसे काय देता येईल.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे** :– त्यांच्या नांवावर वाहन नसुन त्यांच्या मुलाच्या नावावर होते. वाहन घरातलेच होते. प्रशासनाला स्थायी समितीचे अगोदरचे असे निर्देश होते की, ज्यावेळेस सदर वाहन त्यांच्या नावावर होईल.

**श्री. जमीर लेंगरेकर, उप–आयुक्त, कर**:– ज्या काळात ते सभापती म्हणुन होते तेव्हा काही दिवस त्याच्याकडे स्वत:च्या नावावर वाहन नव्हते परंतु ते त्याच्या मूलाच्या नावे असलेले वाहनाचा वापर करीत होते आणि त्यांनी तसे पत्र संबधित विभागास दिले आहे. नंतर त्यांनी त्याच्या मुलाच्या नावावर असलेले वाहन स्वत:च्या नावावर केले त्यानुसार आपण त्यांना वाहन भत्ता देवु शकतो.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे** :– त्यानी आपल्याला तसे पत्र दिले होते ना, पण अडचण हीच निर्माण झाली की वाहन घरातल्या व्यक्तीचेच होते, मला वाटते मागे आपण गुप्ता यांचादेखील प्रस्ताव पारीत केला होता. श्री. प्रभुनाथ गुप्ता अशा तीन चार लोकांचे प्रस्ताव स्थायी समितीपुढे आले होते व ते आपण सर्वसंमतीने पारीत केले होते ही तांत्रिक चुक झाली आहे त्यांच्याकडून त्यांना कल्पना नसल्यामुळे. तरी या विषयावंर सर्व सदस्यांनी निर्णय घ्यावा.

**सदस्य श्री. भगवान भालेराव:–** संबधित विषय हा आर्थिक बाबीशी निगडीत असल्याने आपण यावर मतदान घ्यावे.

**श्री. श्रीधर पाटणकर अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:–** आपण आधी असे दिले आहे का? किती रक्कम देय आहे? तांत्रिक बाब आहे, स्थायी समितीमध्ये ठराव केलेला आहे आणि त्यात म्हटले आहे कि, त्याच्या स्वत:च्या नावावर असली पाहिजे असे लिहिलेले आहे.

**सदस्य श्री. भगवान भालेराव:–** स्थायी समिती आता नविन निर्णय कसा घेणार?

**पीठासीन अधिकारी श्रीमती राजश्री चौधरी :–** यापुर्वी दिले आहे तर मग आपण आता त्याना देवु शकतो की नाही ते सांगावे.

**सदस्य श्री. भगवान भालेराव:–** आधी केलेले आहे त्याच्या विरूध्द आता करायचे आहे.

**सदस्य, श्री. महेश गावडे:–** लेंगरेकर साहेब तुम्ही सांगा ना, याच्याआधी अशी प्रकरणे केली आहेत का प्रशासनाने. माहिती करून तुम्ही प्रकरण आणायला हवे होते ना, प्रशासन सर्व स्थायी समितीपुढे सोडते, याची वैद्यता कि अवैद्यता कोणी तपासायची?

**श्री. जमीर लेंगरेकर, उप–आयुक्त, कर**:–_ स्थायी समितीने निर्णय घ्यायचा आहे त्यानी आपल्या परीवारातील व्यक्तीच्या नावे असलेले वाहन वापरले आहे.

**श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक:–** या पुर्वी प्रभूनाथ गुप्ताजी तसेच माजी परीवहन सभापती श्री जावळे यांनाही अशा प्रकारे वाहन भत्ता मंजुर करण्यात आला आहे.

**सदस्य श्री. भगवान भालेराव:–** ज्या सदस्यांना यापुर्वी वाहन भत्ता मंजुर केला आहे त्यांचा ठराव आधी सर्व सदस्यांना दाखवावे नंतरच हा विषय चर्चेला घ्यावा.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे** : माझी विनंती आहे, हा विषय पुढच्यावेळेस आणावा तत्पुर्वी पुर्वीचा जो ठराव आहे त्यात अंशत: बदल करण्याबाबतचा प्रस्ताव आणावा आणि त्यानंतर हा विषय आणावा. जेणेकरून कोणालाच त्रास होणार नाही, प्रशासनालापण नाही आणि इतरांनापण, आणि सदस्यांनापण त्रास होणार नाही.

**पीठासीन अधिकारी श्रीमती राजश्री चौधरी :—** ठरावात नमुद केलेल्या कुटुंबाच्याबाबतीत बदल करावा लागेल.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे** :— आपण पुर्वीच्या ठरावातच बदल करणार आहोत मग त्यामध्ये येईल.

**पीठासीन अधिकारी श्रीमती राजश्री चौधरी :—** ठरावात नमुद केलेल्या कुटूंबाच्या व्याखेतसुध्दा बदल होईल ना.

**श्री. श्रीधर पाटणकर अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:—** कुटुबांची व्याख्या शासनाच्या वेगवेगळया विभागांमध्ये वेगवेगळी नमुद केलेली आहे. तर आपली शासकिय व्याख्या काय आहे कुटूंबाची त्याप्रमाणे ठरावात आले पाहिजे.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे** :— आता हा विषय वगळण्यात यावा.

**काही सदस्य :—** सदर विषय कार्यसूचीवरून वगळण्यात यावा.

**प्र.महापालिका सचिव :—** ठराव वाचुन दाखविते, ठरावात असे येईल, सर्व सदस्याच्या मागणीनुसार स्थायी समिती ठराव क्र. ६, दिनांक ३०/४/९७ मध्ये अंशत: बदल करण्यासाठी ठराव स्थायी समितीच्या पुढील सभेत आणण्यास प्रशासनास निर्देश देत आहे.

**काही सदस्य:—**ठिक आहे.

**पीठासीन अधिकारी श्रीमती राजश्री चौधरी :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ५ :—** पूर्वप्राथमिक/माध्यमिक शिक्षण समिती सभापती मा.श्री.विजय खंडू सुपाळे यांनी वाहन प्रतिपुर्ती भत्ता मिळणेस मान्यता देणे.

**प्रस्तावना**

मा. सभापती शिक्षण समिती यांनी वाहन प्रर्तीपुर्ती भत्ता मिळणेबाबत पत्राद्वारे कळविले असुन त्यांनी वाहन वापराबाबतचे कागदपत्र सादर केले आहे. परंतु वाहनाचे कागदपत्र तपासले असता कागदपत्र त्यांच्या नावे नसुन त्यांच्या मुलाच्या नावे असल्याचे आढळुन आले आहे. त्यासाठी त्यांनी मुलाकडुन कुलमुखत्यपत्र (Power of Attani) लिहून दिलेली आहे. तसा बॉन्ड सोबत जोडला आहे. तसेच मा. सभापती श्री. विजय सुपाळे यांनी दिनांक २३/१२/२०१५ रोजी आर.सी. बुक त्यांच्या नावे केल्याचे या विभागात सादर केले आहे. या अनुषंगाने सदर वाहन भत्ता दिनांक २३/१२/२०१५ पासुन दयावा किंवा मा. सभापती नियुक्ती दिनांक ७/८/२०१५ पासुन अदा करण्यात यावा. याबाबत मा. आयुक्त सो. यांनी दिलेल्या आदेशान्वये पुढील कार्यवाही करीता मा. स्थायी समिती समोर सादर.

परंतु वाहन प्रतिपुर्ती भत्ता अदा करण्याबाबत मा. स्थायी समिती ठराव क्र. ६ दिनांक ३०/४/९७ अन्वये ही योजना पूर्णपणे ऐच्छीक असून जर संबंधीतांकडे स्वत:चे वाहन असेल तरच वाहन भत्ता मंजुर होईल असे नमुद करण्यात आलेले आहे. तसेच आजमितीस संबंधीताकडे वाहन नसेल तर योग्य असे वाहन ज्या दिवशी खरेदी करतील त्या दिवसापासुन वाहन भत्ता अदा करण्यात येईल. असा ठराव क्र. ६, दिनांक ३०/४/९७ रोजी मा. स्थायी समितीमध्ये पारीत करण्यात आलेला आहे. परंतु मा. सभापती श्री. विजय सुपाळे यांची ज्या दिवसापासुन सभापती निवड झालेली आहे त्या दिवसापासुन वाहन भत्त्याची मागणी करत असल्याने याबाबत पुढील निर्णयासाठी मा. स्थायी समिती समोर मान्यतेस्तव प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. ८५ अ                                                  दिनांकः— २७/१/२०१६

सुचकाचे नाव :— श्री. सुनिल सुर्वे

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार पूर्वप्राथमिक/माध्यमिक शिक्षण समिती सभापती मा. श्री. विजय खंडू सुपाळे यांना वाहन प्रतिपुर्ती भत्ता देणेचा प्रस्ताव या कार्यसूचीवरुन वगळण्यास मान्यता देत आहे.

तसेच

स्थायी समिती ठराव क्र. ६, दिनांक ३०/४/९७ मध्ये अंशतः बदल करण्यासाठी ठराव स्थायी समितीच्या पुढील सभेत आणण्यास प्रशासनास निर्देश देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

प्र.महापालिका सचिव :— विषय क्र. ६ वाचुन दाखवितात.

---

⇨ विषय क्र. ६ :— पाणी पुरवठा विभागासाठी एका लेखाशिर्षातुन मंजुर असलेल्या दुस—या शिल्लक असलेल्या लेखाशीर्षात रक्कम हस्तांतरण करणे.

---

सदस्य, श्री. भगवान भालेराव :— सेलवन साहेब, आता सद्या पाणीटंचाई आहे. हे तुम्ही वर्ग केलेले पैसे किती असतील?

श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठाः— रू. २ कोटी ५० लाख, संबधित पाणी पुरवठा विभागाचा प्रश्न आहे २०१५—१६ मधील काही लेखाशिर्षाचा निधी शिल्लक आहे तो निधी आपण जर दुस—या शिर्षाखाली वळवल्यास पाणी पुरवठा विभागातील कामे करण्यास निधी कामी येईल.

सदस्य, श्री. भगवान भालेराव :— रू. २ कोटी ५० लाखामध्ये तुम्ही आम्हाला सांगु शकता का? आम्हाला हे पैसे मिळाले तर ५० टक्के पाणीटंचाईपैकी १० टक्के पाणीटंचाईवर आम्ही मात करू शकतो म्हणुन,

सदस्य, श्री. महेश गावडे :— आम्ही आपणास परवानगी दिली तर आपण सांगु शकतात की आपल्या शहराची पाणी टंचाईची समस्या १० टक्के कमी होईल नंतरच आम्ही आपल्याला परवानगी देवु.

श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठाः— तो निधी पाणी पुरवठा जलवाहीनी याच्या दुरूस्तीसाठी वापरला जाणार असल्याने त्यामुळे पाणी गळतीचे प्रमाण कमी होवु शकते.

सदस्य, श्री. भगवान भालेराव :— नाहीतर पैसे दयायचे वर्ग करून आणि मग बिले काढून वेगळे भरायचे, तुम्ही याबाबत काही ठोस निर्णय घेणार आहात का? शहरातील लिकेज काढणार आहात कि, कुपनलिकेसाठी पैसे देणार आहात, कुठेतरी त्या पैशाचा वापर झाला पाहिजे ना.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे :—कुपनलिका किती आहेत? आपण जो खर्च करणार आहात त्यात कुपनलिकेचे काय करणार आहात. प्रत्येक नगरसेवकाच्या प्रभागात किती खर्च करणार आहात माझ्याकडे १५ बोअरवेलची मागणी आहे तर तुम्ही मला एकटयाला १५ बोअरवेल देणार का? किती देणार, त्याचे धोरण आपण काय ठरविले आहे. प्रशासनाचे काहीतरी धोरण असले पाहिजे ना. कसा खर्च करणार तुम्ही.

**श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा:—** काही ठिकाणी नविन कुपनलिका तसेच ज्या कुपनलिका नादुरूस्त आहेत त्याची दुरूस्ती करण्यात येणार आहे. नविन बोअरवेल साठीही आहेत. नविन कुपनलिकासाठी ७५ हजार होतील. एका करीता २५ लाख खर्च आहे.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे** :— रू.२५ लाखामध्ये किती कुपनलिका होतील. नगरसेवक आहेत ७८, मग तुम्ही त्यांच्यामध्ये भांडण लावणार का?

**श्री. श्रीधर पाटणकर अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:—** आपल्या महापालिका कार्यक्षेत्रात एकुण ७८ नगरसेवक आहेत आणि आयुक्तानी सर्व नगरसेवकांनी त्यांच्या आवश्यकतेनुसार ४ बोअरवेलचे प्रस्ताव दयावा असे सांगितले होते. त्याच्यासाठी एकुण किती पैसा लागणार आहे आपल्याला, जुन्या कुपनलिकांच्या दुरूस्तीसाठी किती पैसा लागणार अशाप्रकारे स्पष्ट प्रस्ताव त्यांच्यासमोर पाहिजे असे त्यांचे म्हणणे आहे.

**सदस्य, श्री. महेश गावडे** :— आता जो तुम्ही प्रस्ताव आणला त्यात किती कुपनलिका आहेत, २५ कुपनलिकांचाच प्रस्ताव आहे का? आपण जेव्हा विषय आणतो तेव्हा संपूर्ण अभ्यास करूनच प्रस्ताव आणायला पाहिजे ना.

**श्री. श्रीधर पाटणकर अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:—** आपण वेगवेगळया ठिकाणी जे शिल्लक आहेत ते आपण पाणीपुरवठात आणतो आहे.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव** :— आमचे साधे म्हणणे आहे, लिकेजचा त्रास शहरात मोठया प्रमाणात होत आहे, तुम्ही या पैशाने लिकेजचा त्रास सोडवू शकता का?

**सदस्य, श्री. महेश गावडे** :— सेलवन साहेब लिकेजमुळे जीव गेलेले आहेत लोकांचे, अपघात होवुन, गेले आहेत की नाही, हे माहित आहे तुम्हाला. मग का नाही लक्ष देत तुम्ही त्या गोष्टीला एक महिना झाला आहे, अजुन लिकेज तसेच आहे ते, पत्र दिले पण कितीतरी वेळा, अहो, साहेब तुम्ही रबराचे टयुब बांधून ठेवता तर ते लगेच निघतात. अधिकारी काही लक्षच देत नाहीत. बघितलं आहे तुम्ही चोपडा येथे जावून आतापण लोकं पडतात तिथे. अहो, तिथला पाईप बदलला पाहिजे, त्या पाईपला २० वर्ष झाली आहेत, रबरी टयुब व्यवस्थित बांधा तरी.

**श्री. श्रीधर पाटणकर अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:—** आपण जे पैसे वर्ग करणार आहोत ते त्यात लिकेज, नविन बोअरवेल या कामांना प्राधान्य दिले पाहिजे, यासाठीच खर्च झाला पाहिजे.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे** :— स्थायी समितीच्या १६ सदस्यांना काय मिळणार आहे?

**श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा:—** सर्वच ठिकाणी गरज नाही.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे** :— सर्वच ठिकाणी गरज नाही तो भाग सोडून दया, पण प्रत्येक सदस्य मागणी करणार ना. मग त्याचे प्राधान्य तुम्ही कसे ठरवणार? सदस्यांनी इथे लक्षात घ्यावे आपल्याला इथे एकही बोअरवेल मिळणार नाही. आपण सदस्य म्हणुन पास करणार पण आपल्याला एकही बोअरवेल मिळणार नाही.

**श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा:—** प्रत्येक नगरसेवकांना ४ बोअरवेल दयायचे असेल तर जवळजवळ ५ कोटीचा खर्च अपेक्षित आहे.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे** :— मी आठ ते नऊ ठिकाणचे प्रस्ताव दिले आहेत तर त्यापैकी मला किती बोअरवेल मिळतील.

**सदस्य, श्री. महेश गावडे** :— आपण आधी पाणीगळतीच्या समस्येवर लक्ष दयावे त्यामुळे नागरिकांना जीव गमवावा लागला आहे.?

**श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा:—** सध्या तेथिल रस्त्याचे काम चालु असल्याने तेथील कामे करण्यास अडचण येत आहे. ज्या भागातील बोअरवेल खराब आहेत त्याची दुरूस्ती करण्यात येईल.

**श्री. श्रीधर पाटणकर अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:—** आपण पाणी गळती रोखण्यासाठी तसेच बोअरवेल साठी निधी मागत आहात ना?

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे :— निधी नसेल तर एकाही सदस्याच्या बोअरवेलचे कामे होणार नाही. साहेब, आमचे असे म्हणणे आहे की, खरेच कुठे पाणी लागणार आहे याचे प्राधान्य ठरवुन नव्याने सविस्तर प्रस्ताव आणावा.

सदस्य श्री. भगवान भालेराव:— आता एवढी पाणीटंचाई आहे, लिकेजचा प्रॉब्लेम आहे, आता हा प्रस्ताव पारीत करावा, परत पुढची स्थायी समिती महिन्यात होते की दोन महिन्यात होते.

सदस्य श्री. राजेश वधारीया :— आता रू. ५० लाख वर्ग करून त्यामध्ये पंप लावण्याचे काम खुप तातडीचे आहे. लिकेजचा भरपुर त्रास आहे.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे :— साहेब, पंप आणि लिकेज यासाठी किती निधी ठेवणार आहे ते सांगा.

पीठासीन अधिकारी श्रीमती राजश्री चौधरी :— पंप आणि लिकेजसाठी आता तरतुद ठेवा.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे :— आमचे असे म्हणणे आहे, लिकेज आणि पंपसाठी

श्री. नितीन कापडणीस, उप—आयुक्त, मुख्यालय:— सद्यस्थितीत या प्रस्तावातील ५० लाखाचा निधी वर्ग करण्यास मान्यता दयावी व उर्वरित निधीचा प्रस्ताव आम्ही पुढील स्थायी समिती समोर मांडु.

सदस्य श्री. भगवान भालेराव:— आता किती निधीची आवश्यकता आहे त्यानुसार निधी वर्ग करावे.

सदस्य श्री. राजेश वधारीया :— आधी पंपाची व्यवस्था करावी त्यासाठी वळवावे.

श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा:— २.५० कोटी पैकी ५० लाखाचा निधी हा बोअरवेल साठी ठेवणार आहोत. व बाकीचा निधी हा डागडुजी करणेसाठी साहीत्य खरेदी करणे तसेच इतर कामासाठी ठेवत आहोत.

सदस्य श्री. भगवान भालेराव:— डागडुजी करण्यास जेव्हा कर्मचारी येतात तेव्हा त्याच्याकडे पुरेसे साहित्य नसते त्यासाठीही आम्हाला साहित्य पुरवावे लागते.

सदस्य, श्री. महेश गावडे :— १ कोटी रूपयाची तरतुद नवीन बोअरवेलसाठी करावी व २५ लाखाची दुरूस्ती करण्यासाठी करावे

पीठासीन अधिकारी श्रीमती राजश्री चौधरी :— बोअरवेलचा विषय पुढील बैठकीत चर्चेला घेवु सद्यस्थितीत पाणी गळतीचे प्रमाण मोठया प्रमाणावर असल्याने तो विषय पास करू या व नंतर पुर्ण माहिती घेवुन पुढील सभेत तो विषय घेवु या.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे :— आम्ही तेच म्हणत आहोत कि, बोअरवेलचा विषय आहे ना तो किती आहे तो सविस्तर आणावा.

पीठासीन अधिकारी श्रीमती राजश्री चौधरी :— सेलवन साहेब, व्यवस्थित माहिती दया ना या विषयाची?

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे :— रू. ७५ लाख फक्त दुरूस्ती करण्यासाठी मागितले आहेत, बोअरवेलमध्ये रू. १ करोड ठेवायचे.

श्री. नितीन कापडणीस, उप—आयुक्त, मुख्यालय:— जर नविन बोअरवेल लावायचे असतील तर ५ नंबरच्या लेखाशिर्षात तरतुद आहे. जर स्थायी समितीला वाटत असेल तर यातील २५ लाख खर्च करु.

पीठासीन अधिकारी श्रीमती राजश्री चौधरी :— पुढच्या वेळेस बोअरवेलचा सविस्तर प्रस्ताव घेवू आपण. दुरूस्ती व लिकेज या दोन बाबींसाठी आता प्रस्ताव पारीत करू या. दुसरा विषय व्यवस्थित माहिती घेवुन पुढील सभेत आणावा.

प्र.महापालिका सचिव :— गोंषवा—यात आपण काही बदल नाही करू शकत

सदस्य श्री. भगवान भालेराव:— स्थायी समिती सदस्याच्या प्रभागाात अतिरिक्त २ बोअरवेल मंजुर कराव्यात.

श्री. नितीन कापडणीस, उप—आयुक्त, मुख्यालय:— गोषवारा चुकला आहे पुढील सभेत गोषवारा सुधारून आणु.

**<u>सदस्य, श्री. महेश गावडे</u>** :— प्रत्येक नगरसेवकाला काय उत्तर देणार तुम्ही, आपल्याकडे नविन बोअरवेल चे किती प्रस्ताव आले आहेत.

**<u>श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठाः—</u>** एकुण ४०० बोअरवेलसाठी आहेत. यापैकी काही शिर्षातील कामे मंजुर असुन त्याचे प्रस्ताव आले आहे.

**<u>सदस्य, श्री. महेश गावडे</u>** :— व्यवस्थित गोषवारा आणा, आपण २ वर्षापासुन काय करत आहात, पाणी समस्या सोडविणेसाठी आपण काय प्रयत्न करीत आहेत.

**<u>श्री. श्रीधर पाटणकर अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारीः—</u>** वर्ग करावयाची रक्कम किती आहे ते आधी निश्चित करून घ्या.

**<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया :—</u>** आयटम नं. १ मध्ये ५० ऐवजी ७५ लाख, नं. २ मध्ये ७५ लाख, नं. ३ मध्ये ७५ ऐवजी २५ लाख, नं. ४ मध्ये २५ ऐवजी ५० लाख, नं. ५ मध्ये २५ ऐवजी ५० लाख, हे वर्ग करू या, बाकी जे राहतात ते त्यांना उर्वरित काम करण्यासाठी लागतील. आपण अशाप्रकारे निधी मंजुर करू शकतात १ क्रमाकासाठी १ कोटी, २ क्रमांकासाठी १ कोटी, ३ क्रमांकासाठी ५० लाख, ४ क्रमांकासाठी ५०, ५ क्रमांकासाठी २५ लाख.

**<u>श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठाः—</u>**एकाच क्षेत्रातुन खर्च करता येत नाही.

**<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया :—</u>** आता आपण म्हणत आहात की पुढील सभेत हा विषय घेवु या परंतु आता बजेट संदर्भात चर्चा होणार आहे त्यात फार वेळ जाईल आपण आता ठरावात सुधारणा करून हा विषय मंजुर करावा. स्थायी समिती सदस्यांना २, २ बोअरींग एक्स्ट्रा दया.

**<u>प्र.महापालिका सचिव :—</u>** आपण सुचविलेले सुचना या ठरावात येणार नाही. इतिवृत्तांतात येईल. व सदस्यांच्या म्हणण्यानुसार ठरावात पुढीलप्रमाणे बदल करता येईल. मा. सदस्यांनी सुचविलेल्या बदलाप्रमाणे १ नंबर मध्ये ५० ऐवजी ७५, २ नंबर मध्ये ७५ लाख, ३ नंबर मध्ये ७५ ऐवजी २५ लाख व ४ नंबर मध्ये २५ ऐवजी ५० लाख व ५ मध्ये २५ ऐवजी ५० लाख असा बदल करायचा आहे ना?

**<u>काही सदस्यः—</u>**पास, पास.....

**<u>पीठासीन अधिकारी श्रीमती राजश्री चौधरी :</u>**— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑ **विषय क्र. ६ :—** पाणी पुरवठा विभागासाठी एका लेखाशिर्षातुन मंजुर असलेल्या दुस—या शिल्लक असलेल्या लेखाशीर्षात रक्कम हस्तांतरण करणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महापालिकेने वर्ष २०१५—२०१६ अंदाजपत्रकात विविध विभागांसाठी त्यांचे कार्य व कर्तव्ये पार पाडण्यासाठी लेखाशीर्षानिहाय तरतुद केलेली आहे. त्या अनुषंगाने <u>पाणी पुरवठा</u> विभागासाठीही काही लेखाशीर्षातर्गत करण्यात आलेल्या तरतुदी संपुष्टात आल्या असल्याने पाणी पुरवठा विभागासाठी मंजुर असलेल्या दुस—या शिल्लक असलेल्या लेखाशीर्षातील तरतुदीतुन पुढील प्रमाणे हस्तांतरण करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | सन.२०१५—१६ मधील लेखाशिर्षा नुसार मंजुर तरतुद | आज पर्यत झालेला खर्च | शिल्लक | ज्या लेखाशीर्षात रक्कम वर्ग करावयाची आहे | वर्ग करावयाची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | पाणी पुरवठा इमारती निगा दुरुस्ती<br>भाग — १ ब —१०<br>रु. | रु.<br>१०,६८,२६७/— | रु.<br>८९,३१,७३३/— | पाणी पुरवठा साहित्य खरेदी /दुरुस्ती<br>भाग — १ ब | रु.५०,००,०००/— |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | १,००,०००,००/— | | | —५ | |
| २ | महिती व तंत्रज्ञान सेवा खर्च<br>भाग — १ ब —१४<br>रु. १,००,०००,००/— | ०० | रु. १,००,०००,००/— | कुपनलिका दुरुस्ती खर्च भाग — १ ब —६ | रु.७५,००,०००/— |
| ३ | भाग — १ ब —१४<br>महिती व तंत्रज्ञान सेवा खर्च<br>रु. १,००,०००, ००/— | ०० | — ” —<br>वरील प्रमाणे | पाणी पुरवठा साहित्य खरेदी व बसविणे (दुरुस्ती) (दुर्बल घटक)<br>भाग — १ ब —९ | रु.७५,००,०००/— |
| ४ | पाणी पुरवठा इमारती निगा दुरुस्ती<br>भाग — २ ब —५<br>रु. ५०,००,०००/— | ०० | रु. ५०,००,०००/— | पावर पंप/पाणी पुरवठा साहित्य खरेदी व बसविणे (नविन)<br>भाग — २ ब —१ | रु. २५,००,०००/— |
| ५ | पाणी पुरवठा योजना अक्षदान<br>भाग — २ ब — ६<br>रु. ५०,००,०००/— | ०० | रु. ५०,००,०००/— | पावर पंप/पाणी पुरवठा साहित्य खरेदी व बसविणे (नविन)<br>(दुर्बल घटक)<br>भाग — २ ब — २ | रु. २५,००,०००/— |
| | | | | एकुण :— | २,५०,००,०००/ — |

सदर बाब आर्थिक बाबीशी निगडित असल्याने प्रस्तावास मा. स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक असल्याने, सबब सदर प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ८६ दिनांकः— २७/१/२०१६

सुचकाचे नाव :— श्री. सुनिल सुर्वे

अनुमोदकाचे नाव :— श्री. भगवान भालेराव

ही स्थायी समिती सभेत झालेल्या चर्चेअंती मा. सदस्यांनी सुचविल्यानुसार खालीलप्रमाणे पाणी पुरवठा विभागासाठी एका लेखाशिर्षातील रक्कम दुस—या लेखाशीर्षात हस्तांतरण करण्यास मान्यता देत आहे.

| अ. | सन.२०१५—१६ मधील लेखाशिर्षा | ज्या लेखाशीर्षात रक्कम वर्ग | वर्ग करावयाची |
|---|---|---|---|

| क्र. | नुसार मंजुर तरतुद | करावयाची आहे | रक्कम |
|---|---|---|---|
| १ | पाणी पुरवठा इमारती निगा दुरुस्ती<br>भाग – १ ब –१०<br>रु. १,००,०००,००/– | पाणी पुरवठा साहित्य खरेदी /दुरुस्ती<br>भाग – १ ब –५ | रु. ५०,००,०००/–<br>**ऐवजी**<br>रु. ७५,००,०००/– |
| २ | महिती व तंत्रज्ञान सेवा खर्च<br>भाग – १ ब –१४<br>रु. १,००,०००,००/– | कुपनलिका दुरुस्ती खर्च भाग – १ ब –६ | रु. ७५,००,०००/– |
| ३ | भाग – १ ब –१४<br>महिती व तंत्रज्ञान सेवा खर्च<br>रु. १,००,०००,००/– | पाणी पुरवठा साहित्य खरेदी व बसविणे (दुरुस्ती) (दुर्बल घटक)<br>भाग – १ ब –९ | रु. ७५,००,०००/–<br>**ऐवजी**<br>रु. २५,००,०००/– |
| ४ | पाणी पुरवठा इमारती निगा दुरुस्ती<br>भाग – २ ब –५<br>रु. ५०,००,०००/– | पावर पंप/पाणी पुरवठा साहित्य खरेदी व बसविणे (नविन)<br>भाग – २ ब –१ | रु. २५,००,०००/–<br>**ऐवजी**<br>रु. ५०,००,०००/– |
| ५ | पाणी पुरवठा योजना अक्षदान<br>भाग – २ ब – ६<br>रु. ५०,००,०००/– | पावर पंप/पाणी पुरवठा साहित्य खरेदी व बसविणे (नविन)<br>(दुर्बल घटक)<br>भाग – २ ब – २ | रु. २५,००,०००/–<br>**ऐवजी**<br>रु. ५०,००,०००/– |

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

पीठासीन अधिकारी<br>
स्थायी समिती सभा<br>
उल्हासनगर महानगरपालिका

---

प्र.महापालिका सचिव :– विषय क्र. ७ वाचुन दाखवितात.

––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––

⇨ **विषय क्र. ७ :–** प्रभाग समिती क्र. ३ क्षेत्रातील रस्त्याच्या कडेला उभे असलेल्या चार चाकी व दुचाकी वाहने उचलुन कार्यवाही करणेकरीता २ मोठे क्रेन, २ जेसीबी व २ डंपर या वाहनाचा पुरवठा करणेत आल्याबाबतची माहिति नोंद करणे.

---

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे** :– माहीती नोंद करावयाचा विषय आहे तर ठिक आहे.

**काही सदस्य:–**पास, पास....

**पीठासीन अधिकारी श्रीमती राजश्री चौधरी :–** सदरचा प्रस्ताव सर्वानुमते पुढीलप्रमाणे पारीत करण्यात येत आहे.

---

☑ **विषय क्र. ७ :–** प्रभाग समिती क्र. ३ क्षेत्रातील रस्त्याच्या कडेला उभे असलेल्या चार चाकी व दुचाकी वाहने उचलुन कार्यवाही करणेकरीता २ मोठे क्रेन, २ जेसीबी व २ डंपर या वाहनाचा पुरवठा करणेत आल्याबाबतची माहिति नोंद करणे.

**प्रस्तावना**

उपरोक्त विषयान्वये उल्हासनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.३ क्षेत्रातील रस्त्याच्या कडेला अनधिकृत उभे असलेल्या चार चाकी व दुचाकी वाहनांना उचलून कार्यवाही करणेसाठी मोठी क्रेन,दोन जेसीबी व दोन डंपर अशी यंत्र सामुग्रीची करीता संदर्भ : सहा.आयुक्त प्रभाग समिती क्र. ३ यांचे पत्र. १) जा.क्र. उमपा/प्रसक्र–३/ ५३२/१५, दिनांक २७/०८/२०१५, २) जा.क्र.उमपा/प्रसक्र–३/५४०/१५, दि. ०१/०९/२०१५३) जा.क्र.उमपा/प्रसक्र–३/५७९/१५ दि.११/०९/२०१५ पत्रान्वये मागणी केली होती परंतु महापालिकेमध्ये सदरची यंत्र सामुग्री उपलब्ध नसल्यामुळे ठेकेदारामार्फत सदर यंत्र सामुग्रीचा पुरवठा करण्यात आला आहे. कामगीरी तातडीची असल्यामुळे निविदा प्रक्रिया न करता थेठ ठेकेदारामार्फत वाहने उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत.

मा.आयुक्त सो यांच्या आदेशान्वये व तत्कालीन प्रभाग समिती क्र. ३ चे सहाय्यक आयुक्त यांचे मार्गदर्शना खाली सदरील विशेष मोहिम महापालिका व ट्रॅफिक कंट्रोल विभाग यांच्या सयुक्त विद्यमाने हाती घेण्यात आली होती अनधिकृत वाहन पार्किगनिमित्त कसुरदारावर दंड देखिल आकारण्यात आला होता. दिनांक ३१/०८/२०१५, दि. ०१/०९/२०१५, दि.०२/०९/२०१५, दि. १५/०९/२०१५, दि. १६/०९/२०१५, दि. १९/०९/२०१५ या कालावधीत कार्यवाही करण्यात आलेली असुन पोलीस विभाग व अतिक्रमण विभाग यांनी संयुक्त कार्यवाही केलेली आहे.या बाबतचा मा. सहा.पोलिस निरिक्षक यांचा आहवाल सोबत जोडण्यात आले आहे.या कार्यवाही साठी आवश्यक वाहनांचा पुरवठा वाहन विभागामार्फत ठेकेदाराकडून करण्यात आलेला आहे सदरचा खर्च लेखा शिर्ष AE-(12) मधुन करण्यात येईल ठेकेदारमार्फत पुरविलेल्या वाहनांची दर खालील प्रमाणे आहेत.सदरचे दर हे बाजार भावा प्रमाणे असुन मंजुर दरापेक्षा ही कमी आहे.

| अ. क्र. | वाहनांचे प्रकार | प्रतिदिन दर | कालावधी | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | २ डंपर | ४५००X २= ९,०००/– | ६ दिवस | ५४,०००/– |
| २ | २ जेसीबी | ४८००X २= ९,६००/– | ६ दिवस | ५७,६००/– |
| ३ | २ मोठी क्रेन | ८८००X २= १७,६००/– | ६ दिवस | १,०५,६००/– |
| | | | एकूण रक्कम | २,१७,२००/– |

सदरचे काम हे तातडीचे असल्यातुळे दरपत्रक प्रक्रिया न करता थेट करण्यात आलेले आहे सदरचे काम मे. नाझ ट्रान्सपोर्ट सर्विस उल्हासनगर या ठेकेदारास देणेंत आले होते. सध्यास्थितीत कामपूर्ण झालेले आहे

व त्यासाठी रू. २,१७,२००/— इतका खर्च आलेला असुन सदर मा. स्थायी समिती समोर माहिती नोंद घेण्यासाठी सादर.

स्थायी समिती ठराव क्र. ८७ दिनांक:—२७/१/२०१६

सुचकाचे नाव :— श्री. सुनिल सुर्वे

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार प्रभाग समिती क्र. ३ क्षेत्रातील रस्त्याच्या कडेला अनाधिकृतपणे उभे असलेल्या चार चाकी व दुचाकी वाहने उचलुन कार्यवाही करणेकरीता २ मोठे क्रेन, २ जेसीबी व २ डंपर या वाहनाचा पुरवठा करणेत आल्याबाबतची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

सदस्य श्री. भगवान भालेराव :—विषय क्र. ८,९,१० हे एकत्रित घ्या, एकाच वेळी वाचा.

काही सदस्य :—तिन्ही विषय आताच वाचुन घ्या.

प्र.महापालिका सचिव :— विषय क्र. ८,९,१० वाचुन दाखवितात.

———————————————————————————————

⇨ विषय क्र. ८ :— मालमत्ता क्र. 30 CO 0054789000 Old No. 30/0808 करीता करयोग्य मुल्य भाडोत्री गृहीत धरून निश्चित केलेले आहे.परंतु मिळकतीमध्ये भाडोत्री नाही रक्कम रू. २०८४३७/— वर्ष २००५ पासुन निर्लेखित करणे.

———————————————————————————————

⇨ विषय क्र. ९:— मालमत्ता क्र. 30 CO 005479000 Old No. 30/0809 करीता करयोग्य मुल्य भाडोत्री गृहीत धरून निश्चित केलेले आहे.परंतु मिळकतीमध्ये भाडोत्री नाही रक्कम रू. 65056/— वर्ष २००५—०६ पासुन निर्लेखित करणे.

———————————————————————————————

⇨ विषय क्र. १० :— मालमत्ता क्र. 30 CO 005479100 Old No. 30/0810 करीता करयोग्य मुल्य भाडोत्री गृहीत धरून निश्चित केलेले आहे.परंतु मिळकतीमध्ये भाडोत्री नाही रक्कम रू. 137396/— वर्ष २००५—०६ पासुन निर्लेखित करणे.

———————————————————————————————

सदस्य श्री. राजेश वदारिया :—विषय क्र. ८,९,१० हे एकत्र घेवु या.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे</u> :— हे तिन्ही विषय सारखेच आहेत, यावर आपण प्रशासनाने निर्णय घ्यावे. २००५ पासुनचे प्रकरण आहेत. आता २०१६ ला हे प्रकरण का आणत आहेत. त्याठिकाणी असलेले निरिक्षकाची जबाबदारी आहे की त्याप्रकरणाची लवकरात लवकर सोडविणे परंतु आपणाकडे त्यानी अर्ज केला आहे का, यापुर्वी कारण आपण २००५ चे प्रकरणावर आता चर्चा करित आहोत. मागच्या वेळेस सुध्दा हा विषय आला होता, त्यावेळेस सुध्दा हे मुद्दे राहिले होते. त्या व्यक्तीचे २००५ साली भाडोत्री नव्हता, २००७ साली त्यास कराची पावती तर गेली असेल ना? त्यास लक्षात तर आले असेल ना की मला भाडोत्री लागलेले आहे. कसे आहे आम्ही हे पास करु परंतु ही जबाबदारी तुमची व विभागाची राहील.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>ठिक आहे.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>एक मिनिट, पास करु परंतु मी मागील वेळेस हा विषय आला होता तेव्हा मी म्हटले होते की २००२ पासुन आहे, २००२ चा अर्ज नाही तर २००६ चा अर्ज आहे, तर २००६ पासुन देवु शकतो असा तुम्ही आम्हांला कायदा सांगितला होता. म्हणुन मी तुम्हांला बोललो कारवाई करा. आता सुध्दा श्री. जेठानंद हा त्याच प्रभागातील असून तोच आणत आहे. क्षेत्र नं. ६, ५ युनिट त्या क्षेत्रात आहे तर तो आता आणतो तर त्यास जबाबदारी आमची नाही हे लक्षात घ्या. त्यात निर्णय घ्यायची ही प्रशासनाची जबाबदारी आहे. हे लक्षात घ्या कारण मी वारंवार सांगत आहे, उदया कोण हे करेल आणि आम्हांला कामाला लावेल. प्रशासनाची जबाबदारी आहे आमची नाही अर्ज ज्याप्रमाणे दाखल झाला त्याप्रमाणे.

<u>सदस्य श्री. महेश गावडे:—</u>पास करा परंतु जबाबदारी प्रशासनाची राहील, ठरावात तसे नमुद करावे.

<u>प्र. महापालिका सचिव :—</u>ठिक आहे.

<u>पीठासीन अधिकारी श्रीमती राजश्री चौधरी :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ८** :— मालमत्ता क्र. 30 CO 0054789000 Old No. 30/0808 करीता करयोग्य मुल्य भाडोत्री गृहीत धरून निश्चित केलेले आहे.परंतु मिळकतीमध्ये भाडोत्री नाही रक्कम रू. २०८४३७/— वर्ष २००५ पासुन निर्लेखित करणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील रा. शाप पंचशिल नगर शाप नं. १ ते ४ उल्हासनगर—३ या मिळकतीची कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. ३० CO 0054789000 Old No. 30/0808 अन्वये नोंद असुन मालमत्ता कर वसुलीच्या प्रयोजनार्थ कर भरण्यास प्रथम पात्र व्यक्ती म्हणुन श्री नारायण बी. कलानी या नावे कर आकारणी सुरू आहे. यांनी दिनांक २९/१२/२०१४ रोजीचे अर्जान्वये संदर्भित मिळकतीच रिकामी असल्याने तसेच ती वापरात नसल्यामुळे भाडोत्री रद्द करणेसाठी विनंती केली आहे.

करपात्र बाबींचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| Const. Type | Occu.Status | Usage | Annual Rent | Asst. Year | Total Area | Exempted Area | Assessable Area |
|---|---|---|---|---|---|---|---|
| A.C. Bricks | Owner | Non Residential | 0 | 01-Apr-86 | 2485 | 0 | 2485 |
| RCC | Tenant | Non Residential | 36000 | 01-Apr-86 | 915 | 0 | 915 |
| RCC | Owner | Non Residential | 0 | 01-Apr-96 | 260 | 0 | 260 |

संदर्भित मिळकतीच रिकामी असल्याने तसेच ती वापरात नसल्यामुळे भाडोत्री नोंदीप्रमाणे आकारणी करण्यात येत आहे.

सदर मिळकत २६ जुलै२००५ च्या पावसामुळे बाधीत झाल्याचे संबधित अर्जदाराने दिनांक ०७/०५/२०१५ रोजी सुनवणी दरम्यान आपले म्हणणे मांडले आहे. तसेच दिनांक १४/०९/२०१५ रोजीच्या अर्जात वर्ष २००५ पासुन भाडोत्री नोंद रद्द करणेस विनंती केलेली आहे.

आक्षेपाच्या अनुशंगाने मिळकतीची प्रत्यक्ष पाहणी केली असता सद्यस्थितीत करपात्र बाबी पुढीलप्रमाणे असल्याचे दिसुन येत आहे.

१) कर निरिक्षक श्री. जेठानंद ताराचंद यांच्या प्रत्यक्ष पाहणी सदर मिळकती करीता रकान्यात अहवाल सादर केलेला आहे.

२) प्र.कर निर्धारक संकलक यांच्या पाहणी नुसार सदर मिळकती करीता वर्ष २००५ पासुन भाडोत्री नोंद रद्द करण्याबाबत व सदर रक्कम निर्लेखित करण्याकरीता मा. स्थायी समिती सदर प्रस्ताव मान्यतेसाठी सादर व्हावे असे अहवालात नमुद केलेले आहे.

३) सदर प्रकरणी मा. उप आयुक्त कर यांनी दिलेल्या निर्देशानुसार विशेष कक्षामार्फत पडताळणी केल्यानंतर सदर ठिकाणी भाडोत्री नाही असे प्रतिपादन केलेले आहे

सदर मिळकत २६ जुले२००५ च्या पावसामुळे बाधीत झाल्याचे संबधित अधिका—याच्या प्रत्यक्ष पाहणी अहवाल व अर्जदाराचे म्हणण्यानुसार भाडोत्री गृहीत धरून प्रथम वर्ष आकारणी परिसरातील प्रचलित वाजवी दरानंसार वर्ष २००५—६ पासुन निश्चित करणे उचित वाटते

वास्तवित पाहता कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 30 CO 005479100 Old No. 30/0810 अन्वये नोंद असलेल्या मिळकतीचे करयोग्य मुल्य वर्ष २००५ ते २०१५—२०१६ या कालावधीत खालील क्षेत्रफळ गृहीत धरून कर आकारणी सुरू ठेवणे आवश्यक आहे.

| Const. Type | Occu.Status | Usage | Annual Rent | Asst. Year | Total Area | Exempted Area | Assessable Area |
|---|---|---|---|---|---|---|---|
| A.C. Bricks | Owner | Non Residential | 0 | 01-Apr-86 | 2485 | 0 | 2485 |
| RCC | Owner | Non Residential | 0 | 01-Apr-86 | 915 | 0 | 915 |
| RCC | Owner | Non Residential | 0 | 01-Apr-96 | 260 | 0 | 260 |

त्याअनुषंगाने मिळकतीचे खात्यात थकीत अतिरिक्त कर आकारणी झाली असुन त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| वर्ष | भाडोत्री गृहीत धरून करण्यात आलेली कर आकारणी | भाडोत्री नोद रद्द करून करावयाची कर आकारणी | अतिरिक्त थकीत कर आकारणी |
|---|---|---|---|
| 2005-06 | 24196 | 4571 | 19625 |
| 2006-07 | 24196 | 4571 | 19625 |
| 2007-08 | 24834 | 4571 | 20263 |
| 2008-09 | 24196 | 4571 | 19625 |
| 2009-10 | 24196 | 4571 | 19625 |
| 2010-11 | 25090 | 4742 | 20348 |
| 2011-12 | 25090 + विलंब शास्ती | 4742 | 20348 + विलंब शास्ती |
| 2012-13 | 27608 + विलंब शास्ती | 5162 | 22446 + विलंब शास्ती |
| 2013-14 | 28440+ विलंब शास्ती | 5318 | 23122 + विलंब शास्ती |
| 2014-15 | 28728 + विलंब शास्ती | 5318 | 23410 + विलंब शास्ती |
| एकुण | 256574 + विलंब शास्ती | 48137 | 208437+ विलंब शास्ती |

उक्त बाबी पाहता कर आकारणी पुस्तकात 30 CO 0054789000 Old No. 30/0808 नुसार नोंद असलेल्या मिळकतीचे खात्यात कर आकारणीपोटी वर्ष २००५—२००६ पासुन थकीत असलेली अतिरिक्त रक्कम (वसुल न होण्याजोगा कर) रू. २०८४३७ + विलंब शास्ती निर्लेखित करणे आवश्यक आहे, असे इकडील मत आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील **कलम १५२ नुसार** आयुक्तास स्थायी समितीच्या मान्यतेने, कोणत्याही कराबद्दल किंवा कोणताही कर वसूल करण्यासाठी झालेल्या खर्चाबद्दल येणे असलेली जी कोणतीही रक्कम त्याच्या मते वसूल होण्याजोगी नसेल ती वेळोवेळी निर्लेखित करता येईल.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, कर आकारणी पुस्तकात 30 CO 0054789000 Old No. 30/0808 नुसार नोंद असलेल्या मिळकतीसाठी वर्ष २००५–२००६ पासुन भाडोत्री नोद रद्द करून कर आकारणी करून मिळकतीचे खात्यात कर आकारणीपोटी थकीत असलेली अतिरिक्त रक्कम (वसुल न होण्याजोगा कर) रू. २०८४३७ + विलंब शास्ती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १५२ नुसार स्थायी समितीच्या मंजुरीने निर्लेखित करणेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ८८ दिनांकः– २७/१/२०१६

सुचकाचे नाव :–श्री. भगवान भालेराव

अनुमोदकाचे नाव :– श्री. उमेश कालानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार मालमत्ता क्र. 30 CO 0054789000 Old No. 30/0808 करीता करयोग्य मुल्य भाडोत्री गृहीत धरून निश्चित केलेले केलेले आहे. परंतु मिळकतीमध्ये भाडोत्री नाही अशा रक्कम रू. २०८४३७/– + विलंब शास्ती वर्ष २००५ पासुन निर्लेखित करण्यास मान्यता देत आहे.

परंतु

नियमानुसार कार्यवाही करण्याची संपुर्ण जबाबदारी प्रशासनाची राहील.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

☑ विषय क्र. ९ :– मालमत्ता क्र. 30 CO 005479000 Old No. 30/0809 करीता करयोग्य मुल्य भाडोत्री गृहीत धरून निश्चित केलेले आहे.परंतु मिळकतीमध्ये भाडोत्री नाही रक्कम रू. 65056/– वर्ष २००५–०६ पासुन निर्लेखित करणे.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील रा. शाप पंचशिल नगर शाप नं. ६ ते १० उल्हासनगर–३ या मिळकतीची कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 30 CO 005479000 Old No. 30/0809 अन्वये नोंद असुन मालमत्ता कर वसुलीच्या प्रयोजनार्थ कर भरण्यास प्रथम पात्र व्यक्ती म्हणुन श्रीम पमी बी. कलानी या नावे कर आकारणी सुरू आहे. यांनी दिनांक २९/१२/२०१४ रोजीचे अर्जान्वये संदर्भित मिळकतीच रिकामी असल्याने तसेच ती वापरात नसल्यामुळे भाडोत्री रद्द करणेसाठी विनंती केली आहे.

करपात्र बाबींचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| Const. Type | Occu.Status | Usage | Annual Rent | Asst. Year | Total Area | Exempted Area | Assessable Area |
|---|---|---|---|---|---|---|---|
| A.C. Bricks | Owner | Non Residential | 0 | 01-Apr-86 | 2745 | 0 | 2745 |
| A.C. Bricks | Tenant | Non Residential | 12000 | 01-Apr-86 | 915 | 0 | 915 |

संदर्भित मिळकतीच रिकामी असल्याने तसेच ती वापरात नसल्यामुळे भाडोत्री नोंदीप्रमाणे आकारणी करण्यात येत आहे.

सदर मिळकत २६ जुलै २००५ च्या पावसामुळे बाधीत झाल्याचे संबधित अर्जदाराने दिनांक ०७/०५/२०१५ रोजी सुनवणी दरम्यान आपले म्हणणे मांडले आहे. तसेच दिनांक १४/०९/२०१५ रोजीच्या अर्जात वर्ष २००५ पासुन भाडोत्री नोंद रद्द करणेस विनंती केलेली आहे.

आक्षेपाच्या अनुशंगाने मिळकतीची प्रत्यक्ष पाहणी केली असता सद्यस्थितीत करपात्र बाबी पुढीलप्रमाणे असल्याचे दिसुन येत आहे

१) कर निरिक्षक श्री. जेठानंद ताराचंद यांच्या प्रत्यक्ष पाहणी नुसार सदर मिळकती करीता रकान्यात अहवाल सादर केलेला आहे.

२) प्र.कर निर्धारक संकलक यांच्या पाहणी नुसार सदर मिळकती करीता वर्ष २००५ पासुन भाडोत्री नोंद कमी करण्याबाबत व सदर रक्कम निर्लेखित करण्याकरीता मा. स्थायी समिती सदर प्रस्ताव मान्यतेसाठी सादर व्हावे असे अहवालात नमुद केलेले आहे.

३) सदर प्रकरणी मा. उप आयुक्त कर यांनी दिलेल्या निर्देशानुसार विशेष कक्षामार्फत पडताळणी केल्यानंतर सदर ठिकाणी भाडोत्री नाही असे प्रतिपादन केलेले आहे.

आक्षेपाच्या अनुशंगाने अधिकारी/कर्मचारी यांचा प्रत्यक्ष पाहणी अहवाल नुसार व सदर मिळकत २६ जुले२००५ च्या पावसामुळे बाधीत झाल्याचे संबधित अर्जदाराचे म्हणण्यानुसार भाडोत्री गृहीत धरून प्रथम वर्ष आकारणी परिसरातील प्रचलित वाजवी दरानंसार वर्ष २००५–६ पासुन निश्चित करणे उचित वाटते.

वास्तवित पाहता कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 30 CO 005479000 Old No. 30/0809 अन्वये नोंद असलेल्या मिळकतीचे करयोग्य मुल्य वर्ष २००५ ते २०१५–२०१६ या कालावधीत खालील क्षेत्रफळ गृहीत धरून कर आकारणी सुरू ठेवणे आवश्यक आहे.

| Const. Type | Occu.Status | Usage | Annual Rent | Asst. Year | Total Area | Exempted Area | Assessable Area |
|---|---|---|---|---|---|---|---|
| A.C. Bricks | Owner | Non Residential | 0 | 01-Apr-86 | 2745 | 0 | 2745 |
| A.C. Bricks | Owner | Non Residential | 0 | 01-Apr-86 | 915 | 0 | 915 |

त्याअनुषंगाने मिळकतीचे खात्यात थकीत अतिरिक्त कर आकारणी झाली असुन त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| वर्ष | भाडोत्री गृहीत धरून करण्यात आलेली कर आकारणी | भाडोत्री नोद रद्द करून करावयाची कर आकारणी | अतिरिक्त थकीत कर आकारणी |
|---|---|---|---|
| 2005-06 | 9350 | 3222 | 6128 |
| 2006-07 | 9350 | 3222 | 6128 |
| 2007-08 | 9596 | 3222 | 6374 |
| 2008-09 | 9350 | 3222 | 6128 |
| 2009-10 | 9350 | 3222 | 6128 |
| 2010-11 | 9694 | 3363 | 6332 |
| 2011-12 | 9694 + विलंब शास्ती | 3363 | 6332 + विलंब शास्ती |
| 2012-13 | 10670 + विलंब शास्ती | 3674 | 6996 + विलंब शास्ती |
| 2013-14 | 10990 + विलंब शास्ती | 3790 | 7200 + विलंब शास्ती |
| 2014-15 | 11100 + विलंब शास्ती | 3790 | 7310 + विलंब शास्ती |
| एकुण | 99144 + विलंब शास्ती | 34088 | 65056+ विलंब शास्ती |

उक्त बाबी पाहता कर आकारणी पुस्तकात 30 CO 005479000 Old No. 30/0809 नुसार नोंद असलेल्या मिळकतीचे खात्यात कर आकारणीपोटी वर्ष २००५–२००६ पासुन थकीत असलेली अतिरिक्त रक्कम (वसुल न होण्याजोगा कर) रू. 65056 + विलंब शास्ती निर्लेखित करणे आवश्यक आहे, असे इकडील मत आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील **कलम १५२ नुसार** आयुक्तास स्थायी समितीच्या मान्यतेने, कोणत्याही कराबद्दल किंवा कोणताही कर वसूल करण्यासाठी झालेल्या खर्चाबद्दल येणे असलेली जी कोणतीही रक्कम त्याच्या मते वसूल होण्याजोगी नसेल ती वेळोवेळी निर्लेखित करता येईल.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, कर आकारणी पुस्तकात 30 CO 005479000 Old No. 30/0809 नुसार नोंद असलेल्या मिळकतीसाठी वर्ष २००५—२००६ पासुन भाडोत्री नोद रद्द करून कर आकारणी करून मिळकतीचे खात्यात कर आकारणीपोटी थकीत असलेली अतिरिक्त रक्कम (वसुल न होण्याजोगा कर) रू. ६५०५६ + विलंब शास्ती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १५२ नुसार स्थायी समितीच्या मंजुरीने निर्लेखित करणेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ८९ — दिनांकः— २७/१/२०१६

सुचकाचे नाव :—श्री. भगवान भालेराव

अनुमोदकाचे नाव :— श्री. उमेश कालानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार मालमत्ता क्र. 30 CO 005479000 Old No. 30/0809 करीता करयोग्य मुल्य भाडोत्री गृहीत धरून निश्चित केलेले केलेले आहे.परंतु मिळकतीमध्ये भाडोत्री नाही अशा रक्कम रू. 65056/— + विलंब शास्ती वर्ष २००५—०६ पासुन निर्लेखित करण्यास मान्यता देत आहे.

परंतु

नियमानुसार कार्यवाही करण्याची संपुर्ण जबाबदारी प्रशासनाची राहील.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

☑ विषय क्र. १० :— मालमत्ता क्र. 30 CO 005479100 Old No. 30/0810 करीता करयोग्य मुल्य भाडोत्री गृहीत धरून निश्चित केलेले आहे.परंतु मिळकतीमध्ये भाडोत्री नाही रक्कम रू. 137396/— वर्ष २००५—०६ पासुन निर्लेखित करणे.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील रा. शाप पंचशिल नगर शाप नं. ५,११ ते १४ उल्हासनगर—३ या मिळकतीची कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 30 CO 005479100 Old No. 30/0810 अन्वये नोंद असुन मालमत्ता कर वसुलीच्या प्रयोजनार्थ कर भरण्यास प्रथम पात्र व्यक्ती म्हणुन श्रीम जयश्री पी. कलानी या नावे कर आकारणी सुरू आहे. यांनी दिनांक २९/१२/२०१४ रोजीचे अर्जान्वये संदर्भित मिळकतीच रिकामी असल्याने तसेच ती वापरात नसल्यामुळे भाडोत्री रद्द करणेसाठी विनंती केली आहे.

करपात्र बाबींचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| Const. Type | Occu.Status | Usage | Annual Rent | Asst. Year | Total Area | Exempted Area | Assessable Area |
|---|---|---|---|---|---|---|---|
| A.C. Bricks | Owner | Non Residential | 0 | 01-Apr-86 | 2745 | 0 | 2745 |
| A.C. Bricks | Tenant | Non Residential | 24000 | 01-Apr-86 | 915 | 0 | 915 |

संदर्भित मिळकतीच रिकामी असल्याने तसेच ती वापरात नसल्यामुळे भाडोत्री नोंदीप्रमाणे आकारणी करण्यात येत आहे.

सदर मिळकत २६ जुलै२००५ च्या पावसामुळे बाधीत झाल्याचे संबधित अर्जदाराने दिनांक ०७/०५/२०१५ रोजी सुनवणी दरम्यान आपले म्हणणे मांडले आहे. तसेच दिनांक १४/०९/२०१५ रोजीच्या अर्जात वर्ष २००५ पासुन भाडोत्री नोंद रद्द करणेस विनंती केलेली आहे.

आक्षेपाच्या अनुशंगाने मिळकतीची प्रत्यक्ष पाहणी केली असता सद्यस्थितीत करपात्र बाबी पुढीलप्रमाणे असल्याचे दिसुन येत आहे.

१) कर निरिक्षक श्री. जेठानंद ताराचंद यांच्या प्रत्यक्ष पाहणी सदर मिळकती करीता रकान्यात अहवाल सादर केलेला आहे.

२) प्र.कर निर्धारक संकलक यांच्या पाहणी नुसार सदर मिळकती करीता वर्ष २००५ पासुन भाडोत्री नोंद रद्द करण्याबाबत व सदर रक्कम निर्लेखित करण्याकरीता मा. स्थायी समिती सदर प्रस्ताव मान्यतेसाठी सादर व्हावे असे अहवालात नमुद केलेले आहे.

३) सदर प्रकरणी मा. उप आयुक्त कर यांनी दिलेल्या निर्देशानुसार विशेष कक्षामार्फत पडताळणी केल्यानंतर सदर ठिकाणी भाडोत्री नाही असे प्रतिपादन केलेले आहे

सदर मिळकत २६ जुले२००५ च्या पावसामुळे बाधीत झाल्याचे संबधित अधिका—याच्या प्रत्यक्ष पाहणी अहवाल व अर्जदाराचे म्हणण्यानुसार भाडोत्री गृहीत धरून प्रथम वर्ष आकारणी परिसरातील प्रचलित वाजवी दरानंसार वर्ष २००५—६ पासुन निश्चित करणे उचित वाटते

वास्तवित पाहता कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 30 CO 005479100 Old No. 30/0810 अन्वये नोंद असलेल्या मिळकतीचे करयोग्य मुल्य वर्ष २००५ ते २०१५—२०१६ या कालावधीत खालील क्षेत्रफळ गृहीत धरून कर आकारणी सुरू ठेवणे आवश्यक आहे.

| Const. Type | Occu.Status | Usage | Annual Rent | Asst. Year | Total Area | Exempted Area | Assessable Area |
|---|---|---|---|---|---|---|---|
| A.C. Bricks | Owner | Non Residential | 0 | 01-Apr-86 | 2745 | 0 | 2745 |
| A.C. Bricks | Owner | Non Residential | 0 | 01-Apr-86 | 915 | 0 | 915 |

त्याअनुषंगाने मिळकतीचे खात्यात थकीत अतिरिक्त कर आकारणी झाली असुन त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| वर्ष | भाडोत्री गृहीत धरून करण्यात आलेली कर आकारणी | भाडोत्री नोद रद्द करून करावयाची कर आकारणी | अतिरिक्त थकीत कर आकारणी |
|---|---|---|---|
| 2005-06 | 16172 | 3222 | 6128 |
| 2006-07 | 16172 | 3222 | 6128 |
| 2007-08 | 16598 | 3222 | 6374 |
| 2008-09 | 16172 | 3222 | 6128 |
| 2009-10 | 16172 | 3222 | 6128 |
| 2010-11 | 16768 | 3363 | 6332 |
| 2011-12 | 16768 + विलंब शास्ती | 3363 | 6332 + विलंब शास्ती |
| 2012-13 | 18454 + विलंब शास्ती | 3674 | 6996 + विलंब शास्ती |
| 2013-14 | 19008 + विलंब शास्ती | 3790 | 7200 + विलंब शास्ती |
| 2014-15 | 19200 + विलंब शास्ती | 3790 | 7310 + विलंब शास्ती |
| एकुण | 171484 + विलंब शास्ती | 34088 | 137396+ विलंब शास्ती |

उक्त बाबी पाहता कर आकारणी पुस्तकात 30 CO 005479100 Old No. 30/0810 नुसार नोंद असलेल्या मिळकतीचे खात्यात कर आकारणीपोटी वर्ष २००५—२००६ पासुन थकीत असलेली अतिरिक्त

रक्कम (वसुल न होण्याजोगा कर) रू. 137396 + विलंब शास्ती निर्लेखित करणे आवश्यक आहे, असे इकडील मत आहे.
महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील **कलम १५२ नुसार** आयुक्तास स्थायी समितीच्या मान्यतेने, कोणत्याही कराबद्दल किंवा कोणताही कर वसूल करण्यासाठी झालेल्या खर्चाबद्दल येणे असलेली जी कोणतीही रक्कम त्याच्या मते वसूल होण्याजोगी नसेल ती वेळोवेळी निर्लेखित करता येईल.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, कर आकारणी पुस्तकात 30 CO 005479100 Old No. 30/0810 नुसार नोंद असलेल्या मिळकतीसाठी वर्ष २००५–२००६ पासुन भाडोत्री नोद रद्द करून कर आकारणी करून मिळकतीचे खात्यात कर आकारणीपोटी थकीत असलेली अतिरिक्त रक्कम (वसुल न होण्याजोगा कर) रू. 137396 + विलंब शास्ती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १५२ नुसार स्थायी समितीच्या मंजुरीने निर्लेखित करणेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र.** ९० **दिनांक:–** २७/१/२०१६

सुचकाचे नाव :–श्री. भगवान भालेराव

अनुमोदकाचे नाव :– श्री. उमेश कालानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार मालमत्ता क्र. 30 CO 005479100 Old No. 30/0810 करीता करयोग्य मुल्य भाडोत्री गृहीत धरून निश्चित केलेले आहे.परंतु मिळकतीमध्ये भाडोत्री नाही अशा रक्कम रू. 137396/– + विलंब शास्ती वर्ष २००५–०६ पासुन निर्लेखित करण्यास मान्यता देत आहे.

**परंतु**

नियमानुसार कार्यवाही करण्याची संपुर्ण जबाबदारी प्रशासनाची राहील.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**प्र.महापालिका सचिव :–** विषय क्र. ११ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. ११ :–** अभय योजना २०१४–२०१५ अंतर्गत केलेल्या कार्यवाहीच्या अहवालास मंजुरी मिळणे.

---

**सदस्य श्री. राजेश वदारिया :–**जेव्हा आपण अभय योजना आणली होती ती फारच चांगली योजना होती, परंतु त्यामध्ये वेळ फार कमी दिला होता व पैश्यांची कमतरता आहे मार्केटमध्ये. मनीमार्केट फार टाईट आहे. लोकांना प्रथम वॅट भरायचा आहे, सर्व्हिस टॅक्स भरायचा आहे. दुसरे कर भरायचे आहेत, ॲडव्हान्स टॅक्स भरायचे आहेत. ते प्रथम प्रायोरायटी देतात, महापालिकेस नंतर प्रायोरायटी देतात, तर माझी अशी विनंती आहे की एक वेळ अजुन अभय योजनेची आपणांस सुरुवात करावयास हवी. तर ती जास्त वेळ चालली पाहिजे त्याची जाहिरात सुध्दा चांगल्याप्रकारे झाली पाहिजे. त्याची मार्केटींग केली पाहिजे तर मी सभापती यांना विनंती करतो, तर त्यांनी निर्देश दयावेत. प्रशासनाने मागे अभय योजना आणली होती ती फार चांगली योजना होती परंतु त्या काळात नागरिकांकडे पैसे नसल्याने किंवा नागरिकापर्यंत याची माहिती उशीरा गेल्याने नागरिकांचा त्याला अल्प प्रतिसाद मिळाला आणि व्यापारीवर्गाचे त्याकाळात विविध कर भरण्याचा काळ होता त्यावेळेस त्यानी शासनाचा कर आधी भरला त्यानंतर त्याच्याकडे पैसे कमी असल्याने महापालिकेचा कर भरणा केला नाही आता आपण पुन्हा अभय योजना आणावी अशी मी सभापतींना विनंती करतो.

**पीठासीन अधिकारी श्रीमती राजश्री चौधरी :–** आपण मागील अभय योजनेचा काळ वाढवला असता तर त्यास नागरिंकाचा उत्तम प्रतिसाद लाभला असता तरी आपण पुन्हा अभय योजना सुरु करण्याबाबत विचार करावा. या योजनेचा नागरीकांना फायदा होईल.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे :–** याव्दारे महानगरपालिकेस आर्थिक फायदा होईल.

<u>सदस्य, श्री. उमेश कलानी</u>:– आपण सदर योजना १ महिन्यासाठी सुरू करावी व नंतर याचा कार्यकाळ वाढवावा.

<u>श्री. शैलेश दोंदे, कर निर्धारक व संकलक :–</u>१ फेब्रुवारीपासुन ३१ मार्चपर्यंत.

<u>पीठासीन अधिकारी श्रीमती राजश्री चौधरी :–</u>नाही, नाही श्री. दोंदे साहेब, मी आपणाला सांगितले होते, जी १४–१५ पासुन केली ती अभय योजना पुढे आपण चालु ठेवु या.

<u>श्री. श्रीधर पाटणकर अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:–</u>ठिक आहे हा फायनान्स वर्ष अखेर ३१ मार्च व त्यानंतर पुढे चालवु या.

<u>पीठासीन अधिकारी श्रीमती राजश्री चौधरी :–</u>होय ती सलग आपण करु या.

<u>सदस्य श्री. महेश गावडे :–</u>परंतु १ फेब्रुवारीपासुन सुरु करा.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>माझी सदस्यांना विनंती आहे की, १ फेब्रुवारी ते २८ फेब्रुवारी असे करुन एक महिना प्रथम व नंतर एक महिना वाढवु या. कारण जर आपण आधी एक महिना डिक्लेअर केले तर लोक टॅक्स लवकर भरायचा प्रयत्न करतील. आणि नाही झाले तर पुन्हा एक महिना आपणांस वाढविता येईल.

<u>पीठासीन अधिकारी श्रीमती राजश्री चौधरी :–</u>मागील वेळेस नागरीकांनी याचा लाभ घेतला होता व त्यांनी मागणी केली होती की ही योजना आपण परत राबवु या. तर आपण अशी योजना करुन घेवु या.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :–</u>१ फेब्रुवारी ते २८ फेब्रुवारी करा.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>१ फेब्रुवारी ते २९ फेब्रुवारी असे डिक्लेअर करा व त्याची जाहिरात करा.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :–</u>त्याची जाहिरात मोठया प्रमाणात करा. ज्या ज्या प्रभागात नगरसेवक आहे त्यांना पॉम्पलेट दया, प्रभागातील दोन नगरसेवकांची नावे टाकुन दया म्हणजे लोकांना ते पॉम्पलेट वाटता येतील. तसेच श्री. कापडनीस साहेबांनी हे सर्व ग्रुपवर माहिती दया. तसेच जाहिरातीसाठी जो खर्च येईल त्याला सुध्दा आता मान्यता देण्यात येईल.

<u>श्री. शैलेश दोंदे, प्र. कर निर्धारक व संकलक–</u> २००२ साली अर्ज केला होता त्याठिकाणी भाडोत्री नव्हता सन २००७.२००९ सालापासुनची अनेक प्रकरणे आहेत ती आता आम्ही हळुहळु काढत आहोत त्यामुळे कराची वसुली चे आकडे वाढतांना दिसतात.

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:–</u> सदर योजनेची मोठया प्रमाणावर जाहिरात करावी जेणेकरून शहरातील सर्व नागरिकां पर्यंत याची माहिती होईल व जास्तीत जास्त नागरिक कर भरतील

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे</u> :– माझी अजु न एक सुचना आहे सदर योजने सोबत आपण पाणी बिलाचाही यात समावेश करावा. जेणेकरून १९९६ ते २००५ या सालात महामंडळा कडुन जी बिले येत होती त्या बिलाचाही निपटारा होईल व त्या नागरिंकानाही त्याचा फायदा होईल. त्या बिलामुळेही पाणी बिलाची रक्कम फार जास्त दिसत आहे.

<u>श्री. नितीन कापडणीस, उप–आयुक्त, मुख्यालय:–</u> संबधित पाणी पुरवठयाची बिलाचा स्वतंत्र विभाग आहे त्यामुळे त्या संदर्भात अभय योजना लागु करण्याबाबत शासनाकडुन अहवाल मागवावा लागेल परंतु जी घरगुती बिले आहेत ती पुर्वीच घराच्या करपावती मध्ये लावुन येताात अशा करपावत्यावरील पाणी बिलासंबधी ही योजना लागु करण्यात येईल.

<u>सदस्य, श्री. महेश गावडे</u> :–ती बिले पुर्वी २५ हजार होती परंतु एवढया वर्षापासुन ती न भरल्यामुळे त्यावरील व्याजापोटी त्याची रक्कम ३.५० लाखाच्या घरात गेली आहे. त्यानांही या योजनेचा कसा लाभ घेता येइल

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे</u> :– आपण सध्या जे २ प्रभागात महिला बचत गटाना कर पावती वाटपाचे काम दिले आहे ते फार चांगले आहे कारण पुर्वी आपण १ कर पावती वाटण्यासाठील पोस्ट कार्यालयास १७ रू देत होतो परंतु बचत गटाना आपण तेच ९ रूपयात वाटण्यास सांगत आहे . यामुळे महापालिकेचे आर्थिक फायदा होत आहे तरी आपण पुर्ण शहरात अशा प्रकारे कर पावती वाटण्याचे काम शहरातील बचत गटाना दयावे जेणेकरून

बचतगटाना त्याचा आर्थिक लाभ होऊन महापालिकेचा फायदा होईल. त्याने त्यांना रोजगारपण मिळेल आणि प्रत्येक बिलामागे महापालिकेचे आठ रुपये वाचतील.

**<u>सदस्य श्री. राजेश वधारीया :—</u>** हे पहा आणखीन एक विषय आहे, अनिवासी क्षेत्रासाठी जे आमचे ग्राहक आहेत प्रथम त्यांना बिल २५ हजार लिटर प्रत्येक महिन्याचे येते आणि नंतर लगेल काही महिन्यानी तेच बिल ५० हजाराच्या आसपास जाते असे बरेचसे वादग्रस्त प्रकरणे आहेत त्याबद्दल एक वादग्रस्तबाबत मी श्री. सेलवन साहेबांना दोन तीन वेळा पत्र दिले आहे. तर एका माणसाचेही असेच आहे प्रथम एव्हरेज २५ हजार बिल दिले चार महिने गेले, सहा महिने गेले वर्ष गेले आणि त्यांनी बिल भरले. लगेच ते बिल एव्हरेज ५० हजार दिले. कनेक्शन तर अर्धा इंचचेच आहे. तर ५० हजार एव्हरेज कसा झाला? त्याचे कारण काहीच नाही याने आपली थकबाकी वाढत आहे व लोक पैसे भरत नाहीत. तर तशी सिस्टम असली पाहिजे की ज्यास २५ हजाराचे एव्हरेज जाते व तो पत्र लिहुन देत आहे की माझे आता एव्हरेज ५० हजार केले तर त्याचे ऐकुन घ्या. व त्यांना ५० हजाराचे २५ हजार करुन दया. तर तो पटकन पैसे भरत जाईल व आपली थकबाकी निघत जाईल. कागदावर पाहणार की ३०० कोटी बाकी आहे, त्यामुळे त्यांना मानसिक त्रास होतो. त्यावर प्रशासनाने लवकरात लवकर निर्णय घ्यावा त्यातुन त्यांना मदत करावी.

**<u>सदस्य, श्री. महेश गावडे</u>** :—यासाठी सर्वांना अभय योजना लागु करावी. आणि १९९० पासुनची जी बिले आहेत ती कर पावती येत नव्हती. तर त्यास सुध्दा अभय योजना लागु करावी.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया:—</u>**इतिवृत्ताताची वाट न पाहता हा ठराव पारीत करावा. १ फेब्रुवारीपासुन ही योजना लागु झाली पाहिजे. व याची जाहिरात देण्यासाठी जो खर्च येईल त्या खर्चासाठी सुध्दा मान्यता देतो.

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>**या ठरावाची तरी निदान कमीत कमी अंमलबजावणी करा.

**<u>प्र.महापालिका सचिव :—</u>** ठराव वाचुन दाखवितात.

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार अभय योजना २०१४—२०१५ अंतर्गत केलेल्या कार्यवाहीच्या अहवालास मंजुरी देत आहे.

<u>तसेच</u>

१ फेब्रुवारी २०१६ ते २८ फेब्रुवारी २०१६ पर्यंत पुन: अभय योजना राबविणेस प्रशासनास निर्देश देत आहे.

**<u>पीठासीन अधिकारी श्रीमती राजश्री चौधरी :</u>**— इतिवृत्ताची वाट न पाहता सदर योजनेची अमलबजावणी करण्यात यावी. सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑ **विषय क्र. ११ :—** अभय योजना २०१४—२०१५ अंतर्गत केलेल्या कार्यवाहीच्या अहवालास मंजुरी मिळणे.

<u>प्रस्तावना</u>

वर्ष १९६० मध्ये **''उल्हासनगर नगरपरिषद''** अस्तित्वात आल्यानंतर कार्य व कर्तव्य पार पाडणेसाठी आवश्यक निधीसाठी शहरात अस्तित्वात असलेल्या मिळकतींवर मालमत्ता कराची आकारणी करण्यात आली. त्यावेळी फक्त एकत्रित मालमत्ता करासोबत इतर किरकोळ कराची आकारणी करण्यात येत होती. सर्वांना याची जाणीव असेल कि, उल्हासनगर शहर हे पुवी लष्करी छावणी म्हणुन अस्तित्वात होते त्यामुळे मिळकतींची संख्याही अत्यल्प प्रमाणात होती.
उल्हास नदीच्या काठाने रेयॉन आणि रासायनिक उद्योग उभे आहेत. एक लहानशी सिंधी विस्थापितांची वसाहत असलेले उल्हासनगर आता एक विस्तीर्ण शहर बनले असुन घाऊक व्यापार आणि लघुउद्योगांचे केंद्र बनलेले आहे.
सद्यस्थितीत उल्हासनगर महानगरपालिका हद्दीत अस्तित्वात असलेल्या अंदाजित १,७०,००० मिळकतींवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १२७ (१) (अ), कलम १२९ तसेच अधिनियमाचे अनुसूची ड चे प्रकरण ८ (कराधान नियम) मधील तरतुदीनुसार ''मालमत्ता कर'' आकारणी व वसुली करण्यात येते. शिवाय वर्ष २००१—२००२ पासुन फक्त निवासी वापर होत असलेल्या मिळकतींवर ''पाणीपट्टी'' आकारणी मालमत्ता कर बिलात करण्यात येत आहे.

प्रतिवर्षाप्रमाणे अधिनियमातील तरतुदीनुसार मालमत्ता कराची बिले तयार करून त्याचे वितरण करण्यात येते. वर्ष २०१४—२०१५ अखेर मालमत्ता कराची अंदाजित मागणी रक्कम रू ३३८ कोटी (चालु मागणीसह) थकीत आहे. त्यापैकी माहे डिसेंबर २०१४ अखेर रक्कम रू ४९.७२ कोटी (चालु मागणीसह) वसुली झाली आहे. याशिवाय वसुलीसाठी अधिनियमातील तरतुदीनुसार वेळोवेळी सक्तीची उपाययोजना (उदा. शास्ती लागु करणे, अधिपत्र (वॉरंट) बजावणे, मिळकतीची जप्ती/अटकावणी करून विक्रीद्वारे वसुली करणे इ.) करण्यात येत आहे. मात्र तरीही बहुतांश मिळकतींच्या कर आकारणी असलेला वाद तसेच आर्थिक अडचणींमुळे करदात्यांचा कराचा भरणा न करण्याकडे कल आहे. त्यामुळे कराच्या थकबाकीमध्ये वाढ होत आहे.

तसेच वर्ष २०१० पासुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसूची ड मधील प्रकरण ८ (कराधान नियम) मधील नियम ४१ व महासभा ठराव क्र. ४८ दिनांक १७/०९/२०११ नुसार बिलाच्या न दिलेल्या रक्कमेवर प्रतिमाह २ टक्के इतकी शास्ती (थकबाकी व चालु मागणीवर) लागु करण्यात येत आहे. मालमत्ता कराच्या मागणीमध्ये शास्तीचा समावेश असल्याने थकबाकीचे प्रमाणात वाढ होत आहे.

तसेच शास्ती लागु केल्यामुळे नागरिक व लोकप्रतिनिधी यांचेमध्ये ही रोष निर्माण झालेला असुन परिणामी कराचे वसुलीस अपेक्षित प्रतिसाद प्राप्त होत नाही. वारंवार शास्तीची रक्कम माफ करणेबाबत तक्रारी/निवेदन विभागात प्राप्त होत आहेत.

मालमत्ता कराच्या मागणीपैकी माहे डिसेंबर २०१४ अखेर रक्कम रू. ४९.७२ कोटी (चालु मागणीसह) इतकी वसुली झाली असुन जास्तीत जास्त वसुलीच्या अनुषंगाने ठोस उपाययोजना करणे आवश्यक आहे. अशा योजनेचा एक भाग म्हणुन पिनलाईज केलेली रक्कम माफ केल्यास मालमत्ता कराच्या रक्कमा एकरक्कमी वसुली होण्यास मदत होणार आहे.
महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसूची 'ड' मधील प्रकरण ८ (कराधान नियम) मधील नियम ५१, आयुक्तास, आपल्या स्वेच्छानिर्णयानुसार, नियम ४१ खालील शास्ती, किंवा नियम ५० खालील फी किंवा वसुलीचा खर्च पुर्णतः किंवा अंशता माफ करता येईल.

सदर नियमाअंतर्गत मा. आयुक्तांचे स्वेच्छानिर्णयानुसार माहे मार्च २०१४ पर्यत शिल्लक शास्तीची रक्कम (अंदाजित रक्कम रू. ७९.९५ कोटी) तसेच दिनांक १ एप्रिल २०१४ ते ३१ डिसेंबर २०१४ पर्यंत शास्तीची रक्कम (अंदाजित रक्कम रू. २५.७९ कोटी) वगळता उर्वरीत संपुर्ण मालमत्ता कराची रक्कम एकरकमी भरणा करणाऱ्या करदात्यास अशी माफी दिल्यास मालमत्ता कराच्या रक्कमा वसुल होण्यास मदत होईल. अशा परिस्थितीत **''अभय योजना २०१४—२०१५'** राबविण्यात आली.

## अ) <u>योजनेचा तपशिल</u>

**१) योजनेचा कालावधी :—**

दिनांक ०१ फेब्रुवारी २०१५ ते दिनांक ३१ मार्च २०१५ असा राहील.

**२) योजनेची व्याप्ती:—**

अ) सदर योजनेअंतर्गत मालमत्ता कर व पाणीपटटी थकबाकी असलेल्या करदात्यांना लाभ घेता येईल.

ब) योजनेच्या कालावधीत करदात्याकडे प्रलंबित असलेल्या मुळ रक्कमेचे एकरक्कमी १०० टक्के अभिवादन केल्यास प्रलंबित रक्कमेवर नियम ४१ नुसार प्रतिमाह २ टक्के दराने आकारण्यात येणारी शास्ती व नियम ५० खालील जप्ती अधिपत्र बजावणी शुल्क किंवा वसुलीचा खर्च माफ करण्यात येईल.

**३) योजनेचा लाभ खालील बाबीसाठी अनुज्ञेय असेल:—**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसूची ड मधील प्रकरण ८ (कराधान नियम) मधील नियम ४१ खालील शास्ती, किंवा नियम ५० खालील फी किंवा वसुलीचा खर्च पुर्णतः किंवा अंशता माफ करता येईल.

**४) योजनेअंतर्गत सवलतीस पात्र असलेल्या रक्कमा:—**

सदर योजना ही वर नमुद केलेल्या कालावधीत जमा केलेल्या रक्कमांनाच लागु राहील. या योजनेच्या प्रारंभापुर्वी अथवा समाप्तीनंतर भरणा केलेल्या कोणत्याही रक्कमांना लागू

राहणार नाही. योजना सुरू होण्यापुर्वी भरणा केलेल्या कोणत्याही रक्कमांच्या परताव्यासाठी या योजने अंतर्गत दावा करता येणार नाही.

**५) योजनेच्या सवलतीचा लाभ घेण्यासाठी करावयाचा भरणा आणि अपील मागे घेणे इत्यादीसाठी लागु असलेल्या अटी व शर्ती :—**

अ) ज्या कालावधीसाठी सवलतीचा लाभ घ्यावयाचा आहे, त्या कालावधीत कोणतेही प्रलंबित असलेले अपील, पुर्ननिरीक्षणासाठी आलेले आवेदन, संदर्भ आवेदन, विविध स्तरावरील न्यायालयात दाखल केलेला दावा किंवा रिट याचिका प्रलंबित असल्यास ते विना अट मागे घेतले पाहीजे.

ब) जर अभय योजनेचा लाभ मिळाल्यानंतर अपील, पुर्ननिरीक्षणासाठी आवेदन, संदर्भ आवेदन, विविध स्तरावरील न्यायालयात दाखल केलेला दावा किंवा रिट याचिका दाखल केली, तर योजने अंतर्गत संबंधित कालावधीसाठी दिलेल्या सवलती काढुन घेण्यात येतील.

**६) आयुक्तांचे अधिकार प्रदान करणे:—**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६९, कलम १२८ तसेच अधिनियमाचे अनुसूची ड मधील प्रकरण ८ (कराधान नियम) मधील नियम ५१ नुसार आयुक्तास असलेले अधिकार दिनांक दिनांक ०१ फेब्रुवारी २०१५ ते दिनांक ३१ मार्च २०१५ या कालावधीत उप आयुक्त (कर) व कार्यकारी अभियंता (पा.पु.वि) यांना प्रदान करणे. सदर कालावधी नंतर सदरचे अधिकार संपुष्टात येतील.

**७) योजने अंतर्गत कार्यवाही विषयक बाबी:—**

अ) मालमत्ता कर व पाणी पुरवठा विभागाने ''अभय योजना २०१४—२०१५'' राबविण्यासाठी मागणी पुस्तकात सदर रक्कमा माफ केल्याची नोंद करदात्याने कराची संपुर्ण रक्कम अधिदान केल्यानंतर घ्यावी.

ब) प्रोग्रामर, माहिती तंत्रज्ञान विभाग यांनी ''अभय योजना २०१४—२०१५'' राबविण्यासाठी संगणकप्रणालीत योग्य ती सुधारणा/बदल तात्काळ करावे. त्याअनुशंगाने मालमत्ता कराची रक्कम भरणा करणेसाठी उपलब्ध असलेल्या सर्व ठिकाणी (नागरिक सुविधा केंद्र, किऑक्स सेंटर) करदाता ज्या क्षणास कराचा भरणा करेल त्या क्षणास (Real Time) नियम ४१ खालील शास्ती व नियम ५० खालील फी किंवा वसुलीचा खर्च माफ करणेबाबत बदल करावेत. व तसे प्रमाणपत्र /दाखला करदात्यास देण्यात यावा.

**८) योजनेची जाहीरात व प्रसिध्दी** :—''अभय योजना २०१४—२०१५'' राबविण्यासाठी नागरिकांचा मोठया प्रमाणात प्रतिसाद मिळावा यासाठी सदर योजनेचा तपशिलाबाबत केबल, वृत्तपत्र, इलेक्ट्रॉनिक्स प्रसार माध्यमे, मनपा संकेतस्थळ इत्यादीद्वारे व्यापक प्रसिध्दी देणे.

## ब) <u>जनसपंर्कासाठी उपाययोजना</u>

१) सर्वप्रथम अभय योजनेच्या अनुषंगाने आवश्यक त्या सुधारणा संगणकप्रणालीत करण्यात आल्या.

२) योजनेचा लाभ घेणेसाठी नागरीकांना प्रवृत्त करणेबाबत शहरात ध्वनीक्षेपकामार्फत **जाहीर आवाहन** (Announcement) करण्यात आले.

यासाठी विभागामार्फत ध्वनीफित तयार करणे तसेच साउंड सिस्टीम व इतर साहित्य खरेदी करण्यात आले आहे. याकामी रक्कम रू. १,९५,९५०/— इतका खर्च झाला आहे. साउंड सिस्टमचा उपयोग मनपामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध मोहीमांच्या प्रचारासाठी करता येईल. (उदा. पोलिओ, आपतकालीन व्यवस्थापन वगैरे)

३) स्थानिक वृत्तपत्राद्वारे हॅण्डबिल (रंगीत छपाई पेपरवर) वाटप करण्यात आले.

हॅण्डबिल (रंगीत छपाई पेपरवर) छपाई करून वृत्तपत्राद्वारे वाटप करणेसाठी रक्कम रू. ५०,०००/— इतका खर्च झाला आहे.

४) योजनेबाबतची **'सुचनापट्टी'** (Script) केबलद्वारे शहराच्या भागात प्रसारीत करण्यात आली.

<table>
<tr><td>□२७०८८३०<br>बिल रक्कमेच्या<br>माहितीसाठी<br>नऊ अंकी मालमत्ता<br>क्रमांक आवश्यक</td><td>उल्हासनगर महानगरपालिका<br>अभय योजना २०१४—२०१५</td><td>□२७०८८३०<br>ज्ञदवू ल्वनत क्नमे<br>छपदम क्पहपज च्तवचमतजल<br>छवण् मेमदजपंस</td></tr>
<tr><td colspan="3">दिनांक ०१ फेब्रुवारी २०१५ ते दिनांक ३१ मार्च २०१५ या कालावधीत मालमत्ता कर व पाणीपट्टी एकरक्कमी भरणा केल्यास विलंब शास्ती ;च्मदंसजलद्ध माफ करण्यात येईल. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका</td></tr>
</table>

५) योजनेची माहिती देणेसंदर्भातील शहरात विविध भागात **होर्डीग्ज** लावण्यात आले आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र | ठिकाण |
|---|---|
| १ | कल्याण—अंबरनाथ रोड, साईबाबा मंदिर जवळ, एमएस्ईबी ऑफीस उल्हासनगर —३ |
| २ | गोलमैदान मेनगेटवर उल्हासनगर — १ |
| ३ | गोलमैदान लेप्टमेनगेटवर उल्हासनगर — १ |
| ४ | विठ्ठलवाडी पोलिस स्टेशन समोर उल्हासनगर — ४ |
| ५ | गोलमैदान लेप्टमेनगेटवर साधूवासवानी उल्हासनगर — १ |
| ६ | व्हीनस चौक सेक्शन २५ उल्हासनगर — ४ |
| ७ | हिराघाट, बोटक्लब समोर उल्हासनगर — ३ |
| ८ | सेक्शन —१७ डरबी हॉटेल समोर उल्हासनगर — ३ |
| ९ | लालचौकी रोड चौक वाघमारे हॉलजवळ उल्हासनगर — ४ |
| १० | सपना गार्डन, पाठीमागे न्यू ईरा उल्हासनगर — ३ |
| ११ | नेताजी चौक उल्हासनगर — ४ |
| १२ | सेंट्रल हॉस्पिटल उल्हासनगर — १ |
| १३ | फालवर लाईन चौक, राधा स्वामी हॉल जवळ, उल्हासनगर — ३ |
| १४ | कालीमाता चौक कुर्ला कॅम्प उल्हासनगर — ४ |
| १५ | गांधी रोड , तहलिदार कार्यालय उल्हासनगर — ५ |
| १६ | शहाड स्टेशन ऑटो स्टॅण्ड उल्हासनगर —३ |
| १७ | विठ्ठलवाडी स्टेशन जवळ उल्हासनगर — ३ |
| १८ | साई सेवाराम गार्डन चोपडा कोर्ट समोरील उल्हासनगर — ३ |
| १९ | उल्हासनगर स्टेशन पश्चिम सी एच एम कॉलेज गेट समोर |
| २० | शिवमंदीर मेनगेट चौक नाका क्र. ९ उल्हासनगर — ५ |
| २१ | उल्हासनगर स्टेशन पश्चिम जकात नाक्यावर उल्हासनगर — ३ |
| २२ | दुधनाका चौक उल्हासनगर — ५ |
| २३ | क्रॉस ब्रिज रेल्वे स्टेशन उल्हासनगर |
| २४ | महापालिका मुख्यालय लोखंडी फ्रेमसहीत |
| २५ | प्रभाग समिती कार्यालय क्र १ ते ४ लोखंडी फ्रेमसहीत |

**होर्डीग्ज** छपाई करून वरील ठिकाणी प्रसिध्द्रीसाठी रक्कम रू. २,००,०००/— इतका खर्च झाला आहे.

(६) सदर योजनेच्या प्रचारासाठी महानगरपालिकेच्या कर्मचा—यामार्फमत गुरूवार दिनांक १२/०२/२०१५ रोजी सकाळी ११.३० वाजलेपासुन २ तासांकरीता दुचाकी व चारचाकी रॅली आयोजित करण्यात आली. त्याचा मार्गाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे. तसेच रॅलीमध्ये नागरिकांना सिंधी, हिंदी भाषेमध्ये योजनेची माहिती देण्यात आली.

(१) बिर्ला गेट (शिव रोड) ते उल्हासनगर—१ बस स्टॉप (२) उल्हासनगर—१ बस स्टॉप ते सिरू चौक

(३) सिरू चौक ते नेहरू चौक (४) नेहरू चौक ते फेडरीयल बॅक

(५) फेडरीयल बॅक ते लिंक रोड (६) लिंक रोड ते शिवाजी चौक

(७) शिवाजी चौक ते सेक्शन १७ (८) सेक्शन १७ ते श्रीराम सिनेमा

(९) श्रीराम सिनेमा ते नेताजी चौक (१०)नेताजी चौक ते कैलास कॉलनी

(११) कैलास कॉलनी ते व्हिनस चौक (१२) व्हिनस चौक ते फ्लायओवर ब्रिज
(१३) फ्लायओवर ब्रिज ते राधास्वामी संतसंग हॉल (१४) राधास्वामी संतसंग हॉल ते शांती नगर

(७) जास्तीत जास्त कर थकीत असलेल्या मालमत्तांधारकांना योजनेचा लाभ घेणेसाठी २ टिम मध्ये कर्मचारी नियुक्त करून व्यक्तिश: संबंधित मिळकतधारकांस योलनेची माहिती देण्यात आली.
(८) महानगरपालिका सदस्य तसेच सेवाभावी संस्थांच्या सहकार्याने खालील ठिकाणी 'मालमत्ता कर वसुली शिबीर'' आयोजित करण्यात आले. त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे

| अ क्र | युनिट क्र | मनपा सदस्य/ संस्थेचे नाव | दिनांक व वेळ | ठिकाण | वसुल झालेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | १ | श्रीम पुष्पाताई नाना बागुल<br>श्री. महेश गावडे | दि. २४/२/२०१५ सकाळी ११.०० ते दुपारी ५.०० | डॉ. आंबेडकर नगर, उल्हासनगर—३ | ४,५०,०००/— |
| २ | | श्री. भुल्लर महाराज | दि. २८/ ३/२०१५ सकाळी ११.०० ते दुपारी ५.०० | गुरूद्वारा जवळ, उल्हासनगर—३ | २५,००,०००/— |
| ३ | २ | श्री. प्रकाश माखिजा | दि. १३/ ३/२०१५ सकाळी ११.०० ते दुपारी ४.३० | भाजप कार्यालया समोर,उल्हासनगर—२ | ७,५०,०००/— |
| ४ | | श्री. जमनु पुरस्वानी | दि. ३/३/२०१५ सकाळी ११.०० ते दुपारी ४.३० | गुडमॅन कॉटेज, बसंतराम चौक कमल ऑप्टीशियन जवळ,उल्हासनगर—१ | ४२,००,०००/— |
| ५ | ३ | डॉ. भगवान सिंग | दि. ७/२/२०१५ सकाळी ११.०० ते दुपारी ४.३० | आझाद नगर, उल्हासनगर—२ | २०,०००/— |
| ६ | | डॉ. भगवान सिंग | दि. १४/२/२०१५ सकाळी ११.०० ते दुपारी ४.३० | आझाद नगर, उल्हासनगर—२ | ७०,०००/— |
| ७ | | श्री. राजेश वदरीया | दि. २५/३/२०१५ दि. २६/३/२०१५ दि. २७/३/२०१५ दि. २८/३/२०१५ सकाळी ११.०० ते दुपारी ५.०० | शेरावाली बिल्डिंग, शॉप नं. २, व्हाईट हाऊस जवळ, उल्हासनगर—३ | ६९,४५,०००/— |
| ८ | | श्री. भगवान भालेराव | दि. ३०/३/२०१५ सकाळी ११.०० ते दुपारी ५.०० | आझादनगर, भगवान भालेराव ऑफिस, उल्हासनगर—२ | १,२५,०००/— |
| ९ | ४ | फर्निचर बाजार असोशिएशन | दि. ५/२/२०१५ सकाळी ११.०० ते दुपारी ५.०० | समाज मंदिर, फर्निचर बाजार, उल्हासनगर—३ | ८,५०,०००/— |
| १० | ५ | श्री. टोनी सिरवानी | दि. २/३/२०१५ सकाळी ११.०० | गुलराज आश्रम, ओ.टी सेक्शन, उल्हासनगर—३ | १७,००,०००/— |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | ते दुपारी ५.०० | | |
| ११ | | श्री. राजु जगयासी | दि. १९/३/२०१५ सकाळी ११.०० ते दुपारी ५.०० | श्री. राजु जगयासी यांचे कार्यालय | ४७,००,०००/— |
| १२ | ६ | श्री. राजेश वानखेडे | दि. २३/२/२०१५ सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० | कालिमाता मंदिर चौक जवळ, उल्हासनगर—४ | ४,००,०००/— |
| १३ | | श्रीम. अंजली साळवे | दि. २७/३/२०१५ दि. २८/३/२०१५ दि. २९/३/२०१५ सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० | कालिमाता मंदिर चौक जवळ, उल्हासनगर—४ | १५,००,०००/— |
| १४ | ७ | श्रीम. कंचन अमर लुंड | दि. २७/३/२०१५ सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० | कै. गोविंदराम लुंड यांचे कार्यालय, दिपक दरबार समोर, उल्हासनगर—४ | ११,८०,०००/— |
| १५ | | श्रीम. कंचन अमर लुंड | दि. ३१/३/२०१५ सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० | कै. गोविंदराम लुंड यांचे कार्यालय, दिपक दरबार समोर, उल्हासनगर—४ | २६,५०,०००/— |
| १६ | ८ | श्रीम. मिना सोडे | दि. २३/२/२०१५ सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० | कुर्ला कॅम्प, मिना सोंडे ऑफिस, | ७,५०,०००/— |
| १७ | | श्रीम. मिना सोडे | दि. २७/२/२०१५ सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० | कुर्ला कॅम्प, मिना सोंडे ऑफिस, | ४,१५,०००/— |
| १८ | ८ | श्री. जयेंद्र मोरे | दि. ३/३/२०१५ सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० | एस.एस.टी कॉलनी, शिवसेना शाखा | १,६०,०००/— |
| १९ | | श्री.सतराम जेसवानी | दि. १२/३/२०१५ सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० | भगत कंवाराम गार्डन | ४,७५,०००/— |
| २० | | श्रीम. जया साधवानी | दि. १९/३/२०१५ सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० | स्वामी शांतीप्रकाश उद्यान | ७,५०,०००/— |
| २१ | | श्री. समिधा कोरडे | दि. २४/३/२०१५ सकाळी ११.०० ते सायंकाळी ५. | रायगड शाखा | ६,००,०००/— |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | ०० | | |
| २२ | | श्री.सतराम जेसवानी | दि. २५/३/२०१५ सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० | भगत कंवाराम गार्डन | ७,९०,०००/— |
| २३ | | श्रीम. जया साधवानी | दि. २६/३/२०१५ सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० | पुरूषोत्तम भाटीया हॉल | ७,२५,०००/— |
| २४ | | श्री.सतराम जेसवानी | दि. २८/३/२०१५ सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० | संत कंवाराम गार्डन | ११,२५,०००/— |

वरीलप्रमाणे आयोजित वसुली शिबीरात नागरिकांना मालमत्ता कर बिलाची प्रत व भरणा केल्याची पावती देणेकामी संपुर्ण संगणक संच प्रिटर्स व संगणक चालकासह इ. व्यवस्था करण्यात आली होती. सदर कामी रक्कम रू. ८२,६५०/— इतका खर्च करण्यात आला आहे.

(९) सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने अंतर्गत दारिद्रय रेषेखालील स्थापन केलेल्या महिला व बालके विकास गटांना पणन सहाय्य उपलब्ध करण्यासाठी महानगरपालिका/नगरपरिषदांमधील कामे प्राधान्याने देणेबाबत नगरपरिषद प्रशासन संचालनालय, परिपत्रक क्र. नपप्रसं/१३/पणन सहाय्य/२००४/प्र.क्र. १०९७, दिनांक २१ डिसेंबर, २००४ अन्वये दिलेल्या सुचनांनुसार ''अभय योजना २०१४—२०१५'' ची अंमलबजावणीसाठी महिला बचत गटामार्फत थकबाकीदारांना घरोघरी जावून योजनेची सविस्तर माहिती देण्यात आली. त्याचबरोबर संबंधित मिळकतधारकास संबंधित योजनेचे माहतीपत्रक (हॅण्डबिल)/ आवेदन पत्र वाटप करण्यात आले.
महिला बचत गटास रक्कम रू. १८,९९६/— मानधन अदा करण्यात आले आहे.

## ड) फलश्रुती

उक्त कारवाईच्या अनुषंगाने मालमत्ता कर वसुलीस प्राप्त झालेला प्रतिसाद पुढीलप्रमाणे आहे.

### १) वार्षिक मागणी व वसुलीचा तपशिल (रूपये लाखात)

| वर्ष | मागणी | वसुली |
|---|---|---|
| २०१२—२०१३ | २५३७६ | ५०९१ |
| २०१३—२०१४ | ३००९० | ६७३० |
| २०१४—२०१५ | ३४८३७ | १०३३१ |

### २) अभय योजने अंतर्गत वसुली

(दिनांक १ फेब्रुवारी २०१५ ते दिनांक ३१ मार्च २०१५)

| लाभार्थी | ३४०९४ |
|---|---|
| वसुली (रूपये लाखात) | ५०४८ |
| शास्ती माफ केलेली रक्कम (रूपये लाखात) | २४४२ |

## इ) अभय योजना टप्पा क्र. २ व वित्तीय वर्ष २०१५—२०१६ करीता केलेली कार्यवाही.

**(१) अभय योजनाचा टप्पा क्र. २**

उल्हासनगर महानगरपालिका महासभा ठराव क्र. ७८, दिनांक २०/३/२०१५ अन्वये अभय योजना २०१४—२०१५ अंतर्गत मालमत्ता करावरील नियम ४१ खालील शास्ती, किंवा नियम ५० खालील फी किंवा वसुलीचा खर्च, कराची रक्कम भरणा करणा—या करदात्यांना नियम ५१

अंतर्गत माफ करण्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच सदर योजनेस मुदतवाढ देण्यास मा. आयुक्तांना प्राधिकृत करण्यात आले आहे.

''अभय योजना २०१४—२०१५'' अंतर्गत नागरिकांनी कराचा भरणा करणेसाठी भरघोस प्रतिसाद दिला आहे. तथापि, अद्यापही ७७३९५ थकबाकीदारांनी कराचा भरणा केलेला नाही. त्यामुळे अभय योजनेस मुदतवाढ देण्यात यावी, असे मौखिक निवेदन लोकप्रतिनिधी/ नागरिकांकडुन प्राप्त झाले आहे.

त्याअनुषंगाने कराच्या वसुलीच्या दृष्टीने अधिनियमाचे अनुसूची ड चे प्रकरण ८ (कराधान नियम) मधील नियम ५१ अन्वये आयुक्तास प्राप्त झालेल्या अधिकारानुसार अभय योजना २०१४—२०१५ च्या अटी व शर्तीच्या अधिन राहुन दिनांक २०/०४/२०१५ ते दिनांक ११/०५/२०१५ या कालावधीत वर्ष २०१५—२०१६ पर्यंत संपुर्ण मालमत्ता कराची रक्कम एकरकमी भरणा करणाऱ्या करदात्यास संपुर्ण शास्ती ;च्मदंसजलद्ध माफ करणेसाठी योजनेस मुदतवाढ देण्यात आली.

**(२) मालमत्ता कर धारकाने नियमाप्रमाणे विहीत मुदतीत कर जमा केल्यास सुट देणे.**
उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात अस्तित्वात असलेल्या मिळकतींना मालमत्ता करात खालीलप्रमाणे सुट देणेबाबत महासभा ठराव क्र. ४८, दिनांक १७/९/२०११ अन्वये मंजुरी देण्यात आलेली आहे. त्यानुसार विहीत कालावधीत कराचा भरणा केल्यास संबंधितास मालमत्ता करात सुट देण्यात येते.

| अ. क्र | बिल भरण्याचा कालावधी | अनुज्ञेय सूट |
|---|---|---|
| १ | मागील वर्षाच्या थकबाकीवर | कोणतीही सुट प्रस्तावित नाही |
| २ | चालु वर्षाची संपूर्ण मागणी ३० जून पुर्वी महापालिका तिजोरीत जमा करतील | चालु वर्षाचे देय रक्कमेतुन ५ टक्के सुट |
| ३ | चालु वर्षाची अर्धवर्षीय मागणी ३० जून पुर्वी महापालिका तिजोरीत जमा करतील | चालु वर्षाचे देय रक्कमेतुन २ टक्के सुट |
| ४ | चालु वर्षाची उर्वरीत अर्धवर्षीय मागणी ३१ डिसेंबर पुर्वी महापालिका तिजोरीत जमा करतील | चालु वर्षाचे देय रक्कमेतुन २ टक्के सुट |

**(३) जाहीर नोटीस**
महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूचितील प्रकरण ८ मधील नियम २१ (१३ व १५ सह) नुसार कर आकारणीसंदर्भात दिनांक ०२/०३/२०१५ पासुन दि. ३०/०३/२०१५ पर्यंत आक्षेप/हरकती दाखल करणेसाठी कर विभागातर्फे दि ०२/०३/२०१५ रोजीचे वर्तमानपत्रात जाहीर नोटीस प्रसिध्द् करण्यात आली.

**(४) मालमत्ता कर आकारणी पुस्तक प्रमाणित करणे.**
अधिनियमातील प्रकरण ८ कराधान नियम २० मधील तरतुदीन्वये हरकतींमुळे ज्या सुधारणा करण्यात येतील, अशा फेरफारांच्या अधिन राहून वर्ष २०१५—२०१६ करीता महानगरपालिका मालमत्ता कर आकारणी पुस्तक जा. क्र. उमपा/कर विभाग/०३/१५, दि ०६/०४/२०१५ नुसार प्रमाणित करण्यात आले आहे.

**(५) मालमत्ता कर बिल तयार करणे व त्याचे वितरण.**
अभय योजना व मालमत्ता करात अनुज्ञेय असलेली सुट या बाबी विचारात घेता वित्तीय वर्ष २०१५—२०१६ करीता अंदाजित १.७० लाख मालमत्ता कराची बिले खाजगी अभिकरणामार्फत युनिटनिहाय टप्प्याटप्प्याने छपाई करण्यात आली असुन पोष्ट कार्यालयामार्फत स्पीड पोष्ट व शासन निर्देशानुसार प्रायोगिक तत्वावर काही वार्डमध्ये महिला बचत गटामार्फत त्याचे वितरण करण्याची कार्यवाही सुरू आहे. कराची बिले छपाई करीता अंदाजित रक्कम रू. १४.५० लाख व ती वितरीत करणेसाठी अंदाजित रक्कम रू. ३१ लाख खर्च अपेक्षित आहे.

## ई) अभय योजना टप्पा क्र. २ जनसपंर्कासाठी उपाययोजना

१) सर्वप्रथम अभय योजनेच्या अनुषंगाने आवश्यक त्या सुधारणा संगणकप्रणाली करण्यात आल्या.

२) योजनेचा लाभ घेणेसाठी नागरीकांना प्रवृत्त करणेबाबत शहरात ध्वनीक्षेपकामार्फत **जाहीर आवाहन** (Announcement) करण्यात आली.

३) स्थानिक वृत्तपत्राद्वारे हॅण्डबिल (रंगीत छपाई पेपरवर) वाटप करण्यात आले.

४) योजनेबाबतची **'सुचनापट्टी'** (Script) केबलद्वारे शहराच्या भागात प्रसारीत करण्यात आली.

<table>
<tr><td>□२७०८८३०<br>बिल रक्कमेच्या माहितीसाठी<br>नऊ अंकी मालमत्ता क्रमांक आवश्यक</td><td>उल्हासनगर महानगरपालिका<br>अभय योजना २०१४—२०१५</td><td>□२७०८८३०<br>ज्ञदवू ल्वनत कनमे<br>छपदम क्पहपज त्तवचमतजल छवण मेदजपंस</td></tr>
<tr><td colspan="3">दिनांक २०/०४/२०१५ ते दिनांक ११/०५/२०१५ या कालावधीत वर्ष २०१५—२०१६ पर्यंत संपुर्ण मालमत्ता कराची रक्कम एकरकमी भरणा करणाऱ्या करदात्यास कर बिलातील संपुर्ण विलंब शास्ती ;च्मदंसजलद्ध माफ करण्यात येईल.<br>आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका</td></tr>
</table>

५) योजनेची माहिती देणेसंदर्भातील शहरात विविध भागात **होर्डीग्ज** व बॅनर्स लावण्यात आले आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र | ठिकाण |
|---|---|
| १ | सपना टॉकिज (होर्डीग्ज) |
| २ | यु. एम. सी समोर चोपडा कोर्टच्या दिशेला (होर्डीग्ज) |
| ३ | उल्हासनगर स्टेशन (होर्डीग्ज) |
| ४ | दुध नाका, उल्हासनगर—५ (होर्डीग्ज) |
| ५ | एस. बी. आय समोर, उल्हासनगर—३ (होर्डीग्ज) |
| ६ | पवई चौक, उल्हासनगर—३ (होर्डीग्ज) |
| ७ | राधास्वामी संतसंग रोड, उल्हासनगर—३ (होर्डीग्ज) |
| ८ | उल्हासनगर —३ ओ टी ब्रिज (होर्डीग्ज) |
| ९ | बॅनर्स |

होर्डीग्ज व बॅनर्स छपाई करून वरील ठिकाणी प्रसिध्दीसाठी रक्कम रू. ५०,०००/— इतका खर्च झाला आहे.

६) अभय योजनेची प्रसिघ्दीसाठी शहरात विविधी ठिकाणी दवंडी (वाद्यासह) पिटवुन योजनेची माहिती देण्यात आली. याकामी रक्कम रू. ५०,०००/ — खर्च करण्यात आला आहे.

(७) अभय योजनेचा अहवाल लोकप्रतिनिधी, पत्रकार, विभागातील कर्मचारी व इतर यांना वितरीत करणेसाठी त्याच्या प्रति छपाई करणेसाठी अंदाजित रक्कम रू. २,००,०००/— खर्च अपेक्षित आहे.

## उ) फलश्रुती

उक्त कारवाईच्या अनुषंगाने मालमत्ता कर वसुलीस प्राप्त झालेला प्रतिसाद पुढीलप्रमाणे आहे.

अभय योजना टप्पा क्र. २ अंतर्गत वसुली (दिनांक २० एप्रिल २०१५ ते दिनांक ११ मे २०१५)

| | |
|---|---|
| वसुली (रूपये लाखात) | ७३६ |
| शास्ती माफ केलेली रक्कम (रूपये लाखात) | १७९ |

सदरचा अहवाल स्थायी समिती पटलावर मंजुरीकरीता सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ९१ दिनांक:— २७/१/२०१६

सुचकाचे नाव :— श्री. सुनिल सुर्वे

अनुमोदकाचे नाव :— श्री. भगवान भालेराव

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार अभय योजना २०१४—२०१५ अंतर्गत केलेल्या कार्यवाहीच्या अहवालास मंजुरी देत आहे.

तसेच

१ फेब्रुवारी २०१६ ते २८ फेब्रुवारी २०१६ पर्यंत पुनः अभय योजना राबविणेस प्रशासनास निर्देश देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

काही सदस्य:—विषय क्र. १२ वच १३ दोन्ही विषय सारखे असून दोन्ही विषय वाचावे.

प्र.महापालिका सचिव :— विषय क्र. १२, १३ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. १२** :— मनपा कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 52DI013357000 (Old No. 52/2941) अन्वये नोंद असलेल्या मिळकतीकरीता वर्ष २०१३—२०१४ व २०१४—२०१५ या कालावधीत भाडोत्री रदद् करून अतिरिक्त झालेली कर आकारणी रक्कम रू. ५९,६९३/— (वर्ष २०१३—२०१४) व रू. ५५,५४२/— (वर्ष २०१४—२०१५) विलंब शास्तीहस (वसुल न होण्याजोगा कर) निर्लेखित करणेबाबत.

---

⇨ **विषय क्र. १३** :— मालमत्ता क्र. 52DO011240700 (जुना क्र. 52/1165) करीता बांधकाम प्रकार एसी शिट ब्रिक्स बांधकाम प्रकार गृहीत धरून करयोग्य मुल्य निश्चित करणेबाबत.

---

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे :— सदर प्रकरणात सर्वस्वी जबाबदारी ही प्रशासनाची राहील याची नोंद घ्यावी. नाहीतर असे प्रकरणे सारखी येत राहतील. मी मागच्या वेळेस सुध्दा सांगितले होते.

पीठासीन अधिकारी श्रीमती राजश्री चौधरी :— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १२** :—मनपा कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 52DI013357000 (Old No. 52/2941) अन्वये नोंद असलेल्या मिळकतीकरीता वर्ष २०१३—२०१४ व २०१४—२०१५ या कालावधीत भाडोत्री रदद् करून अतिरिक्त झालेली कर आकारणी रक्कम रू. ५९,६९३/— (वर्ष २०१३—२०१४) व रू. ५५,५४२/— (वर्ष २०१४—२०१५) विलंब शास्तीहस (वसुल न होण्याजोगा कर) निर्लेखित करणेबाबत.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकातील मालमत्ता क्र. 52DI013357000 Old No. 52/2941 अन्वये नोंद असलेल्या मिळकतीकरीता कर भरण्यास प्रथम पात्र व्यक्ती म्हणुन Secretary, जय महालक्ष्मी को. ऑ. हौ. सोसायटी, कुर्ला कॅम्प रोड, प्रभात टॉकिज जवळ, उल्हासनगर–५ या नावे कर आकारणी सुरू आहे. सदरील इमारतीचे टेरेसवर Bharti Infratel Ventures Ltd. या कंपनीमार्फत मोबाईल टॉवर उभारण्यात आल्याने खालीलप्रमाणे करपात्र बाबीं गृहीत धरून कर आकारणी सुरू आहे.

| Const. Type | Occu.Status | Usage | Annual Rent | Asst. Year | Total Area | Exempted Area | Assessable Area |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Open | Tenant | Non Residential | 84000 | 01-Apr-86 | 550 | 0 | 550 |

२) परंतु Bharti Infratel Ventures Ltd. यांचेकडील यांचेकडील १५/०५/२०१३ रोजीचे पत्रान्वये जय महालक्ष्मी को. ऑ. हौ. सोसायटी या इमारतीमधील मोबाईल टॉवर निष्कासित केल्याचे कळविले आहे. तसेच अध्यक्ष, जय महालक्ष्मी को. ऑ. हौ. सोसायटी, कुर्ला कॅम्प रोड, प्रभात टॉकिज जवळ, उल्हासनगर–५ यांनी दिनांक १२/०२/२०१४ रोजीचे पत्रान्वये इमारतीचे टेरेसवरील टॉवर निष्कासित करण्यात आल्याने त्यानुसार कर आकारणी करणेबाबत विनंती केली आहे. सदरील अर्जावर निर्णय झालेला नाही.

३) संदर्भित मिळकतीची संबंधित कर निरीक्षक यांनी प्रत्यक्ष पाहणी केली असता इमारतीचे टेरेसवर मोबाईल टॉवर नसल्याचे दिसुन आले. त्याअनुशंगाने करपात्र बाबींचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| Const. Type | Occu.Status | Usage | Annual Rent | Asst. Year | Total Area | Exempted Area | Assessable Area |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Open | Owner | Residential | 0 | 01-Apr-86 | 550 | 0 | 550 |

४) वास्तवित पाहता कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 52DI013357000 Old No. 52/2941 अन्वये नोंद असलेल्या मिळकतीचे करयोग्य मुल्य व आकारणी वर्ष २०१३–२०१४ व २०१४–२०१५ या कालावधीत भाडोत्री नोंद रद्द करून मुद्दा क्र. ३ मध्ये नमुद करपात्र बाबी गृहीत धरून निश्चित करणे आवश्यक होते. तथापि, सदर प्रकरणांत निर्णय न झाल्याने मिळकतीचे खात्यात खालीलप्रमाणे अतिरिक्त कर आकारणी झाली आहे.

| भाडोत्री गृहीत धरून करण्यात आलेली आकारणी | | मुद्दा क्र. ३ मध्ये नमुद करपात्र बाबी गृहीत धरून करावयाची आकारणी | | अतिरिक्त कर आकारणी | |
|---|---|---|---|---|---|
| २०१३–१४ | २०१४–१५ | २०१३–१४ | २०१४–१५ | २०१३–१४ | २०१४–१५ |
| ५५५६८ अधिक विलंब शास्ती | ५५५६८ | २६ | २६ | ५९६९३ | ५५५४२ |

५) उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता अतिरिक्त कर आकारणी विलंब शास्तीसह (वसुल न होण्याजोगा कर) निर्लेखित करणे आवश्यक आहे, असे इकडील मत आहे.

६) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १५२ नुसार आयुक्तास स्थायी समितीच्या मान्यतेने, कोणत्याही कराबद्दल किंवा कोणताही कर वसूल करण्यासाठी झालेल्या खर्चाबद्दल येणे असलेली जी कोणतीही रक्कम त्याच्या मते वसूल होण्याजोगी नसेल ती वेळोवेळी निर्लेखित करता येईल.

तरी मनपा कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र 52DI013357000 Old No. 52/2941 अन्वये नोंद असलेल्या मिळकतीकरीता वर्ष २०१३–२०१४ व २०१४–२०१५ या कालावधीत भाडोत्री नोंद रद्द करून अतिरिक्त झालेली कर आकारणी रक्कम रू. ५९,६९३/– (वर्ष २०१३–२०१४ ) व रू. ५५,५४२/– (वर्ष २०१४–२०१५ ) विलंब शास्तीसह (वसुल न होण्याजोगा कर) महाराष्ट्र

महानगरपालिका अधिनियमातील कलम १५२ नुसार स्थायी समितीच्या मंजुरीने निर्लेखित करणेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ९२ दिनांक:— २७/१/२०१६

सुचकाचे नाव :— श्री. भगवान भालेराव

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार मनपा कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 52DI013357000 (Old No. 52/2941) अन्वये नोंद असलेल्या मिळकतीकरीता वर्ष २०१३—२०१४ व २०१४—२०१५ या कालावधीत भाडोत्री रदद् करून अतिरिक्त झालेली कर आकारणी रक्कम रू. ५९,६९३/— (वर्ष २०१३—२०१४) व रू. ५५,५४२/— (वर्ष २०१४—२०१५) विलंब शास्तीहस (वसुल न होण्याजोगा कर) निर्लेखित करण्यास मान्यता देत आहे.

परंतु

नियमानुसार कार्यवाही करण्याची संपुर्ण जबाबदारी प्रशासनाची राहील.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

☑

**विषय क्र. १३** :—मालमत्ता क्र. 52DO011240700 (जुना क्र. 52/1165) करीता बांधकाम प्रकार एसी शिट ब्रिक्स बांधकाम प्रकार गृहीत धरून करयोग्य मुल्य निश्चित करणेबाबत.

प्रस्तावना

श्रीम. भारती मोहनदास एच. रा. बॅरेक नं. बी—४७, उल्हासनगर—५ यांनी दि. १०/१२/२०१३ रोजीच्या अर्जान्वये महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत करपात्र मालमत्ता क्र. **५२डीओ०११२४०७०० (जुना क्र. ५२/११६५)** करीता पुढीलप्रमाणे हरकत दाखल केली आहे.

संदर्भित मिळकतीचा बांधकाम प्रकार एसी शिट ब्रिक्स अशा असुन कर आकारणी नोंदवहीत आर.सी.सी. अशा दर्शविण्यात आलेला आहे.

विषयांकित प्रकरणी संबंधित विभागाचे कर निरीक्षक यांनी दिनांक २५/०३/२०१४ रोजी संदर्भित मिळकतीची प्रत्यक्ष पाहणी केली असुन त्यानी पुढीलप्रमाणे अहवाल सादर केला आहे.

१) उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात मिळकतीकरीता नमुद असलेल्या करपात्र बाबींचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| बांधकाम प्रकार | भोगवटाधारकाचे स्वरूप | वापर | करयोग्य मुल्यासाठीचे दर | वर्षिक भाडे | एकुण क्षेत्र चौ.फु. | करमाफ क्षेत्र | करपात्र क्षेत्र चौ.फु |
|---|---|---|---|---|---|---|---|
| आर.सी.सी. | मालक | निवासी | ०१ एप्रिल ९१ | ० | १०० | ० | १०० |

२) संदर्भित मिळकतीची प्रत्यक्ष पाहणी केली असता मिळकतीचे बांधकाम **एसी शिट ब्रिक्स** स्वरूपाचे असल्याचे दिसुन आले आहे. आर. सी. सी. चे बांधकाम दिसुन येत नाही. त्याअनुशंगाने करपात्र बाबींचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| बांधकाम प्रकार | भोगवटाधारकाचे स्वरूप | वापर | करयोग्य मुल्यासाठीचे दर | वर्षिक भाडे | एकुण क्षेत्र चौ.फु. | करमाफ क्षेत्र | करपात्र क्षेत्र चौ.फु |
|---|---|---|---|---|---|---|---|
| एसी शिट ब्रिक्स | मालक | निवासी | २५ मार्च १४ | ० | १०० | ० | १०० |

३) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमात कर आकारणी पुस्तकात कराधान नियम मधीन नियम २०, आयुक्तास सरकारी वर्षात आकारणी पुस्तकात सुधारणा करणे संदर्भात खालिलमाणे तरतुद आहे.

(१) पोट—नियम (२) मधील तरतुदीचे अधिन राहुन आयुक्तास कोणत्याही संबंधित व्यक्तीने अभिवेदन केल्यावर किंवा आकारणी पुस्तक ज्या रकारी वर्षाशी संबंधित व्यक्तीने अभिवेदन केल्यावर किंवा आकारणी पुस्तक ज्या सकारी वर्षात कोणत्याही वेळी अन्य कोणतीही माहिती मिळाल्यावर त्या आकारणी पुस्तकात

(क) कोणत्याही करयोग्य मुल्याची आणि त्यावर आधारलेल्या आकारणीची रक्कम वाढवून किंवा कमी करून

(ड) ज्या कोणत्याही जमिनीचे किंवा इमारतीचे मूल्य चुकिचे ठरवण्यात आले असेल किंवा जिची आकारणी लबाडीने, अभावितपणे किंवा चुकिने करण्यात आली असेल त्या जमिनीवरील किंवा इमारतीवरील आकारणीत फेरफार करून सुधारणा करण्यात येईल.

(३) फेरफार केलेल्या नोंदीनुसार संबंधित व्यक्तीची असलेली जबाबदारी किंवा तिला मिळणारी सूट ठरवण्याच्या प्रयोजनासाठी अशी प्रत्येक सुधारणा, ही सुणारणेचे समर्थन करणारी परिस्थिती अस्तित्वात असेल तेव्हा, चालू सरकारी वर्षातील सर्वात अगोदरच्या दिवसापासून करण्यात आली आहे. असे मानले जाईल.

४) मनपा कर आकारणी पुस्तकातील मालमत्ता क्र. **५२डीओ०११२४०७००** **(जुना क्र. ५२/११६५)** करीता खलिलप्रमाणे करपात्र बाबी, गृहीत धरून प्रथम वर्ष आकारणी परिसरातील प्रचलित वाजवी दरानुसार वर्ष २०१३—१४ करीता करयोग्य मुल्य निश्चित करणेसाठी मा. स्थायी समिती पटलावर मंजुरीकरीता प्रस्तावित.

| बांधकाम प्रकार | भोगवटाधारकाचे स्वरूप | वापर | करयोग्य मुल्यासाठीचे दर | वर्षिक भाडे | एकुण क्षेत्र चौ.फु. | करमाफ क्षेत्र | करपात्र क्षेत्र चौ.फु |
|---|---|---|---|---|---|---|---|
| एसी शिट ब्रिक्स | मालक | निवासी | २५ मार्च १४ | ० | १०० | ० | १०० |

स्थायी समिती ठराव क्र. ९३ दिनांकः— २७/१/२०१६

सुचकाचे नाव :— श्री. भगवान भालेराव

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार मालमत्ता क्र. 52DO011240700 (जुना क्र. 52/1165) करीता बांधकाम प्रकार एसी शिट ब्रिक्स बांधकाम प्रकार गृहीत धरून करयोग्य मुल्य निश्चित करण्यास मान्यता देत आहे.

परंतु

नियमानुसार कार्यवाही करण्याची संपुर्ण जबाबदारी प्रशासनाची राहील.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

प्र.महापालिका सचिव :— विषय क्र. १४ वाचुन दाखवितात.

————————————————————————————————————————

➪ **विषय क्र. १४ :—** श्री. प्रकाश के. माखिजा, शॉप नं. ५५१, उल्हासनगर—४, नळ ग्राहक क्र. यु/४/३८०७ सन १९९१ पासुन पाणी पुरवठा खंडीत असल्याने पाणी देयके निर्लेखित करणे.

————————————————————————————————————————

सदस्य श्री. भगवान भालेराव :—आता यावर चर्चा करा.

सदस्य, श्री. महेश गावडे :— सारखाच विषय आहे आपण यासाठीही अभय योजना लागु करावी जेणेकरून अशा प्रकरणात वाढ होणार नाही. अभय योजना चालु करा त्यात ही सर्व प्रकरणे घ्या.

**काही सदस्य :–**आता हा विषय निर्लेखित करण्यास पारीत करा.

**पीठासीन अधिकारी श्रीमती राजश्री चौधरी :–** सदरचा विषय सर्वानुमते पुढीलप्रमाणे पास करण्यात येत आहे.

---

**विषय क्र. १४ :–** श्री. प्रकाश के. माखिजा, शॉप नं. ५५१, उल्हासनगर–४, नळ ग्राहक क्र. यु/४/३८०७ सन १९९१ पासुन पाणी पुरवठा खंडीत असल्याने पाणी देयके निर्लेखित करणे.

**प्रस्तावना**

उपरोक्त विषयान्वये श्री. हरिराम व्दारकादास, शॉप नं.५५१, उल्हासनगर ४ यांचा नळ ग्राहक क्र. यु/४/३८०७ असा असुन त्यांना आजतागायत त्यांना बिगर घरगुती दराने देयके अदा करण्यात येतात. सद्यस्थितीत नळधारकाकडे पाणी बीलापोटी माहे मार्च–२०१४ पर्यत रु.८,०३,५७८/– (आठ लाख तीन हजार पाचशे अठ्ठयात्तर मात्र) थकबाकी आहे.

अर्जदार श्री. प्रकाश के. माखीजा, यांनी वेळोवेळी सादर केलेल्या पत्राव्दारे श्री. प्रकाश के. माखीजा, शॉप नं.५५१, उल्हासनगर–४ यांनी त्यांची नळजोडणी सन १९९१ मध्ये खंडीत केली असल्याचे नमुद केले असुन याबाबत उप अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रकल्प अंबरनाथ यांचेकडील पत्र क्र. मजीप्रा/प्रउपविअं/१७० दि. ०६/०१/२००९ यांचेकडील पत्रान्वये संबंधीत नळधारकाकडील नळजोडणी सन १९९१ पासुन बंद असल्याबाबत श्री. माखीजा यांना नाहरकत दाखला दिला आहे.

सदर ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी केली असता त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारची नळजोडणी असल्याचे दिसुन आले नाही. यास्तव सदर नळजोडणीस आकारण्यात आलेली पाणी देयकाची रक्कम रु. ८,०३,५७८ /– निर्लेखित करण्याबाबत सदर बाब आर्थिक बाबीशी निगडित असल्याने प्रस्तावास मा. स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक असल्याने, सबब श्री. प्रकाश के. माखीजा, शॉप नं. ५५१, उल्हासनगर ४, नळ ग्राहक क्र.यु/४/३८०७ यांचा सन. १९९१ पासुन पाणी पुरवठा खंडीत असल्याने पाणी देयके निर्लेखित करणेबाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र.** ९४ **दिनांक:– २७/१/२०१६**

सुचकाचे नाव :– श्री. भगवान भालेराव

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेश वदारिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार श्री. प्रकाश के. माखिजा, शॉप नं. ५५१, उल्हासनगर–४, नळ ग्राहक क्र. यु/४/३८०७ सन १९९१ पासुन पाणी पुरवठा खंडीत असल्याने पाणी देयके निर्लेखित करण्यास मान्यता देत आहे.

**परंतु**

नियमानुसार कार्यवाही करण्याची संपुर्ण जबाबदारी प्रशासनाची राहील.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**प्र.महापालिका सचिव :–** विषय क्र. १५ वाचुन दाखवितात.

---

**विषय क्र. १५** :– वाहतुक नियमनासाठी सन २०१५–१६ साठी २५ 'ट्रफिक वॉर्डन' चे अर्थसहाय्यास मंजुरी देणे.

---

**<u>सदस्य श्री. महेश गावडे :–</u>**येथे आता ते ट्रॅफिकवाले आले आहेत का? जेव्हापासुन आपण सभापती होता तेव्हापासुन आपण त्यांना बोलाविले आहे. तरी ते अजुन आले नाही. हा विषय वगळा व पुढील सभेत त्यांना बोलवा. मग करु या.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:–</u>** वाहतुक विभागाचे कोणी अधिकारी आले आहेत का?

**<u>श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक, वाहन व्यवस्थापक:–</u>** सदर विभागातुन एकही अधिकारी नाही आले.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:–</u>** वाहतुक व्यवस्थित आहे का सदरचा विषय वगळण्यात यावा.

**<u>काही सदस्य :–</u>**सदरहु विषय वगळण्यांत यावा.

**<u>सभापती तथा पीठासीन अधिकारी श्रीमती राजश्री चौधरी:</u>**– सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १५** :–वाहतुक नियमनासाठी सन २०१५–१६ साठी २५ 'ट्रफिक वॉर्डन' चे अर्थसहाय्यास मंजुरी देणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिकेकडून मा. स्थायी समिती ठराव क्रं. ७१ दिनांक ०२/०१/२०१५ अन्वये वाहतुक शाखेस उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे २५ ट्रॉफिक वॉर्डन यांना खालील अटी व शर्तीच्या आधारे देय मानधनावरील खर्च अर्थसहाय्य स्वरुपात देणेस मान्यता दिलेली होती.

१) संबंधित २५ ट्रॅफिक वॉर्डन नियुक्ती करण्याची जबाबदारी पोलिस विभागाची राहील.

२) संबंधित २५ ट्रॅफिक वॉर्डन यांना प्रतिमहा रु.४०००/– मानधन महानगरपालिकेतर्फे सहाय्यक पोलिस आयुक्त, शहर वाहतूक शाखा, उल्हासनगर विभाग यांचेकडून देयक प्राप्त झाल्यावर अर्थसहाय्य स्वरुपात देण्यात येईल.

३) २५ ट्रॅफिक वॉर्डन यांचे मानधनापोटी वार्षिक रक्कम रु.१२,००,०००/– खर्च अपेक्षित आहे.सदर खर्च वर्ष २०१५–१६ चे अंदाजपत्रकात सी ५ (६) वाहतूक नियंत्रण या लेखाशिर्षात १.५० कोटी एवढया उपलब्ध तरतूदी मधून करणेस मान्यता मिळणेस मा.स्थायी समिती समोर प्रस्तावित करणेत येत आहे.

४) ट्रॅफिक वॉर्डन यांच्या सेवेचा महानगरपालिकेशी कोणताही संबंध राहणार नाही.

५) ट्रॅफिक वॉर्डन यांना सेवेत असताना काही अपघात झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी पोलिस विभागाची राहिल.

६) याबाबत भविष्यात कोणताही न्यायालयीन वाद उद्‌भवल्यास त्याची जबाबदारी पोलिस विभागाची राहिल.

नियुक्तीचा एक वर्षाचा कार्यकाल दिनांक ३१ ऑगस्ट २०१५ मध्ये संपुष्ठात येत आहे.

या अनुषंगाने मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत सर्व विभाग प्रमुख व पोलिस विभाग यांच्या समवेत वाहतुक समस्या बाबत झालेल्या चर्चेत ट्रॉफिक वार्डन यांची नियुक्तीची वैधता संपल्यामुळे दिनांक ३१/८/२०१६ पर्यत त्यांना अर्थसहाय्य मंजुरी मिळणेबाबत सदर प्रस्थाव मा. स्थायी समिती समोर मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ९४ अ दिनांकः— २७/१/२०१६

सुचकाचे नाव :— श्री. सुनिल सुर्वे
अनुमोदकाचे नाव :— श्री. भगवान भालेराव

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार वाहतुक नियमनासाठी २५ 'ट्रॅफिक वॉर्डन' यांना अर्थसहाय्य देण्याचा प्रस्ताव या कार्यसूचीवरुन वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

प्र.महापालिका सचिव :— विषय क्र. १६ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. १६** :— उल्हासनगर महानगरपालिकेचा घनकचरा व्यवस्थापनासंबंधीचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्याचे काम विभागीय नागरी आणि पर्यावरण संशोधन केंद्र, मुंबई (RCUES) यांचे कडून बनवुन घेण्यास व त्यासाठी येणा—या खर्चास मान्यता मिळणेबाबत.

---

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे :— या विषयाची कोण माहिती देणार ?

श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षकः— DPR बनविण्याचे काम विभागीय नागरी आणि पर्यावरण संशोधन केंद्र, मुंबई (RCUES) याना देण्यात येणार आहे सदर संस्था ही सरकारी मान्यतेची आहे. त्याना २० ते २५ वर्षाचा विषयाची DPR बनविण्याचे काम देण्यात येणार आहे.

सदस्य श्री. महेश गावडे :—जी सरकारी एजन्सी आहे व खाजगी आहे त्यात फरक किती पडतो पैश्यांचा?

श्री. नितीन कापडणीस, उप—आयुक्त, मुख्यालयः— संबधित संस्था ही सरकारी मान्यतेची असल्याने या संस्थेस आपणाला कमी फी अदा करावी लागेल परंतु आपण जर दुस—या संस्थेस हे काम दिले तर त्याना जास्त फी अदा करावी लागेल.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—खर्च किती आहे? खर्च दिलाच नाही.

सदस्य श्री. महेश गावडे :—किती फरक पडेल?

श्री. नितीन कापडणीस, उप—आयुक्त, मुख्यालयः— ३०० ते ४०० कोटीपर्यंत डीपीआर तयार होईल. टंडनला जर दिले तर १० ते ४० लाखा पर्यंत जाईल.

सदस्य श्री. राजेश वधारीया :— आपण डीपीआर बनविण्यासाठी नुकतेच एक टेंडर मंजुर केले आहे. ज्यास महानगरपालिकेच्या सर्वच प्रोजेक्टचा एक डीपीआर बनवायचा आहे. परंतु सदर संस्था विकास आराखडा बनवुन देण्या बरोबरच राज्य शासन तसेच केंद्रं शासनाकडुन प्रकल्प मान्य करून घेणे तसेच त्यासाठी निधी घेवुन येणे या सर्व जबाबदा—या पार पाडणार आहे का? ही सर्व जबाबदारी यांची आहे. आपणांस एक उदाहरण देतो मोनार्चला आपण एक डीपीआर बनविण्यासाठी दिला त्यात २५ क्युरी निघाल्यात. त्याने एकाचेही उत्तर दिले नाही. त्यास आपण किती वेळा फोन केला तो म्हणतो मी लंडनला आहे, इथे आहे, तिथे आहे. साहेब, आपण

या यांच्या क्युरी आहेत त्याचे उत्तर दया. तर तो म्हणतो हो येतो, हो येतो. तर डीपीआर बनविणे महत्वाचे नसुन जो टॅक्नीकल एजन्सी आहेत त्यास पास करणे, राज्य शासन व केंद्र शासनाकडुन पारीत करणे व निधी आणणे. डीपीआर बनवुन दिला पैसे दिले तर निघुन गेले. नंतर कोण काय? जर तांत्रिक अडचण निर्माण झाली तर जबाबदारी कोणाची राहील?

<u>सदस्य श्री. महेश गावडे :–</u>तर मग प्रोफिटेबल प्रायव्हेट आहे आपल्याला.

<u>सदस्य श्री. राजेश वधारीया :–</u> होय, तर माझे तेच म्हणणे आहे की त्यांची संपुर्ण जबाबदारी आहे की डीपीआर बनविणे, राज्य शासन तसेच केद्रं शासनाकडुन प्रकल्प मान्य करून घेणे तसेच त्यासाठी निधी घेवुन येणे काम करुन घेणे, या सर्व जबाबदा–या पार पाडणार आहे हे त्यांचे काम आहे. जर आपण त्यांना निविदा देतो त्यांनी आपली तयारी केली व काम आपण दुस–या कंपनीस देत आहोत. तर यापुर्वीचे सर्व विकास आराखडे टंडन असोएिट या कंपनी कडुन करुन घेतले आहे तर त्यानाच याचे काम देण्यात यावे जेणे करून एकच कंपनीस पुर्ण शहराची माहिती राहील व त्याना त्याचे योग्य नियोजन करता येईल.

<u>श्री. नितीन कापडणीस, उप–आयुक्त, मुख्यालयः–</u> वधारीया साहेबाच्या वक्तव्याशी मी सहमत आहे परंतु आपल्याला विकासदाराच्या किमतीच्या १.२५ टक्के एवढी रक्कम फी म्हणुन अदा करावी लागेल व ती रक्कम ३ ते ४ करोड होते, ती फार अधिक आहे व तसे आपण केल्यास लेखापरिक्षण अहवालात आपल्याला त्रास निर्माण होण्याची शक्यता आहे.

<u>सदस्य श्री. राजेश वधारीया :–</u> यापुर्वी जेव्हा आपण मोनार्च कंपनीला काम दिले होते त्यावेळेस त्यांनी त्यात फार चुका केल्या होत्या व त्यावेळेस अधिकारी त्याना त्या चुका सुधारण्यासाठी बोलावत तेव्हा येण्यास टाळाटाळ करीत होते त्यामुळे या गोष्टीचा अनुभव आपल्याला आहे तेव्हा नीट विचार करून नंतरच काम देण्यात यावे.

<u>श्री. नितीन कापडणीस, उप–आयुक्त, मुख्यालयः–</u> ही आर्थिक बाब असल्याने शासनाच्या निर्देशानुसारच आपल्याला कार्यवाही करावी लागेल नाही तर आपण आडचणीत येण्याची शक्यता आहे. आणि आपण टंडन असोसिएटला मलनिःसारण चे काम दिले आहे ते प्रत्येक कामाचे वेगळे पैसे घेतात. पुढे ऑडिटला त्रास होईल.

<u>सदस्य श्री. राजेश वधारीया :–</u> एकच सल्लागार राहिल्यास त्याचे नियोजन उत्तम राहिल एवढेच.

<u>सदस्य, श्री. भगवान भालेरावः–</u> शासनाचा विषय असल्याने आपण त्यास मंजुरी देवु या.

<u>श्री. नितीन कापडणीस, उप–आयुक्त, मुख्यालयः–</u> आणि ही कंपनी आपल्याला कमी पैशात करून देणर आहे त्यात महापालिकेचा आर्थिक फायदा आहे त्यामुळे संबधित कंपनीस काम देण्यास काही हरकत नाही.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे</u> :– हा विषय शासनाच्या नियमानुंसार पास करण्यात यावा.

<u>पीठासीन अधिकारी श्रीमती राजश्री चौधरी :–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १६** :– उल्हासनगर महानगरपालिकेचा घनकचरा व्यवस्थापनासंबंधीचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्याचे काम विभागीय नागरी आणि पर्यावरण संशोधन केंद्र, मुंबई (RCUES) यांचे कडून बनवुन घेण्यास व त्यासाठी येणा–या खर्चास मान्यता मिळणेबाबत.

<u>प्रस्तावना</u>

केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियानाच्या धर्तीवर राज्यामध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) ची अंमलबजावणी संदर्भातील शासन निर्णय दिनांक १५ मे, २०१५ रोजी निर्गमित करण्यात आलेला आहे. या अभियानाचा कालावधी २ ऑक्टोबर, २०१९ पर्यंत आहे. स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीसाठी सविस्तर सूचना राज्य अभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान यांच्या दिनांक २७ जुलै, २०१५ च्या परिपत्रकान्वये देण्यात आल्या आहेत. त्यामधील महानगरपालिका क्षेत्रातील स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणी करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

त्यानुसार जा.क्र.उमपा/आवि/उप.आ/२१६दिनांक २५/८/२०१५ रोजी अन्वये उल्हासनगर शहराचा घनकचराबाबत सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्याकरीता घनकचऱ्याचे वर्गीकरण करून शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करण्यासाठी शासनाने नियुक्ती केलेल्या ३ संस्थां (Agency) कडुन प्रस्ताव मागविण्यात आले होते.

त्यानुसार नागरी आणि पर्यावरण संशोधन केंद्र, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई यांनी इकडील कार्यालयास संपर्क साधल्याने उल्हासनगर महापालिकेने शहरातील घनकचऱ्याचे वर्गीकरण करून शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रीया करण्यासाठी शहराचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्याकरीता घनकचऱ्याचे वर्गीकरण करून शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करण्यासाठी शासनाने नियुक्ती केलेल्या (Agency) संस्थांना व नागरी आणि पर्यावरण संशोधन केंद्र, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई यांना उक्त प्रकरणी कार्यवाही करण्यासाठी पत्र देवून याबाबत माहिती, घनकचऱ्याचे वर्गीकरण करून शास्त्रोक्त प्रकल्प उभारण्या बाबत कार्यवाही करण्यासाठी व सविस्तर DPR बनविण्यासाठी व त्यांचे (offer) देकार मागविण्यासाठी कळविण्यात आले होते.

त्याअनुशंगाने केंद्र शासनाचे शहरी विकास मंत्रालय नवी दिल्ली सन १९६८ सालापासून विभागीय नागरी आणि पर्यावरण संशोधन केंद्र, मुंबई यांची स्थापना केली आहे. तसेच राज्य शासनाचे पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग शासन निर्ण क्र. २०११/प्र.क्र. ४६७/पा.पु.२२, दि. ३ सप्टेंबर, २०११ अन्वये मान्यता प्राप्त Waste Management and Research Center आमच्याकडे स्थापित आहे व कार्यरत आहे. सदर केंद या संस्थेकडे स्थापित असल्याने घनकचरा व्यवस्थापन सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणे ही बाब विभागीय नागरी आणि पर्यावरण संशोधन केंद्र, मुंबई (RCUES) च्या कार्यक्षेत्र आहे. या केंद्रा अंतर्गत विविध तज्ञ सल्लागार सेवा उपलब्ध आहे. केंद्र शासनाचे शहरी विकास मंत्रालय नवी दिल्ली यांचेकडील पत्र क्र. D.O.No. Q-15014/2/2009-CPHEEO Dt. 15th July, 2015 अन्वये केंद्र शासनाने घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प तयार करणेसाठी विभागीय नागरी आणि पर्यावरण संशोधन केंद्राची Empanelment वर नियुक्ती केलेली आहे. असे दिनांक २/११/२०१५ रोजीच्या पत्रान्वये RCUES यांनी कळविले.

सदर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी महापालीकेमार्फत केंद्र शासनाच्या Empanelment वर नियुक्ती केलेल्या संस्थांना जा.क्र. २१६ दिनांक २५/८/२०१५ रोजी अन्वये पत्रान्वये प्रस्ताव मागविण्यात आले होते. त्याअनुशंगाने संचालिका, विभागीय नागरी आणि पर्यावरण संशोधन केंद्र, मुंबई (RCUES) यांनी त्यांचे दिनांक १०/९/२०१५ रोजीच्या पत्रान्वये सदरचा डीपीआर कार्यादेश दिल्यापासून ३ महिन्याच्या कालावधीत बनविण्यात येईल व त्यासाठी रुपये २४ लाख फी आकारण्यात येईल असे कळविले होते. तथापी सदरची फी जास्त वाटत असल्याने प्रशासनाने संबंधीतांना फी बाबत वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते. तद्नंतर दिनांक २३/१०/२०१५ व २८/१०/२०१५ रोजी विभागीय नागरी आणि पर्यावरण संशोधन केंद्र, मुंबई (RCUES) यांचे संबंधीत अधिकारी येवून वाटाघाटी अंती उल्हासनगर शहराचा घनकचरा व्यवस्थापनाचा सविस्तर प्रकल्प अहवाल रुपये १० लक्ष किंमतीस करणेस विभागीय नागरी आणि पर्यावरण संशोधन केंद्र तयार असल्याचे नमूद केले.

सबब मा. सचिव, नगर विकास विभाग, नवि—३४ यांनी स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) या अंतर्गत सं.क्र. ९०४ दिनांक २७ जुलै २०१५ रोजी अन्वये दिलेल्या सुचनेनुसार उल्हासनगर महानगरपालिकेचा घनकचरा व्यवस्थापनासंबंधीचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणे आवश्यक असल्याने सदरचा प्रकल्प अहवाल (DPR) विभागीय नागरी आणि पर्यावरण संशोधन केंद्र, मुंबई (RCUES) यांचे कडून तयार करुन घेण्यासाठी व त्यासाठी येणा—या रुपये १० लक्ष खर्चास मान्यतेसाठी सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीपुढे सविनय सादर.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> ९५ <u>दिनांक:—२७/१/२०१६</u>

सुचकाचे नाव :— श्री. सुनिल सुर्वे

अनुमोदकाचे नाव :— श्री. भगवान भालेराव

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिकेचा घनकचरा व्यवस्थापनासंबंधीचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्याचे काम विभागीय नागरी आणि पर्यावरण संशोधन केंद्र, मुंबई (RCUES) यांचे कडून करुन घेण्यास व त्यासाठी येणा—या खर्च रुपये १० लाख यास मान्यता देत आहे.

सुचकाची <u>सही/—</u>

अनुमोदकाची <u>सही/—</u>

<u>सर्वानुमते</u>

पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>प्र.महापालिका सचिव :—</u> विषय क्र. १७ वाचुन दाखवितात.

---

⇨ आयत्यावेळचा विषय

**विषय क्र. १७** :— रिक्षांद्वारे करण्यात आलेल्या ध्वनीक्षेपकांचे देयक अदा करणेकामी कार्योत्तर मंजुरी देणे.

---

<u>**काही सदस्य :—**</u>पास, पास.....

<u>**पीठासीन अधिकारी श्रीमती राजश्री चौधरी :—**</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ आयत्यावेळचा विषय

**विषय क्र. १७** :— रिक्षांद्वारे करण्यात आलेल्या ध्वनीक्षेपकांचे देयक अदा करणेकामी कार्योत्तर मंजुरी देणे.

<u>**प्रस्तावना**</u>

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये दिनांक १/७/२०१२ पासुन स्थानिक संस्था कर लागू करण्यात आलेला आहे. स्थानिक संस्था कर हा लेखाधारीत कर असल्यामुळे व्यापा—यांनी स्वत: प्रत्येक महिन्याच्या २० तारखेपर्यंत त्याचा भरणा बॅकेमध्ये करणे बंधनकारक आहे. दिनांक २० जून २०१३ च्या शासन आदेशान्वये स्थानिक संस्था कर नियम २०१० मध्ये नियम २६ वगळण्यात आल्यामुळे प्रशासनाला तपासणीचे अधिकार राहिले नसल्यामुळे वसुलीवर परिणाम झाल्याचे निदर्शनास आल्यानंतर मा. आयुक्त व मा. अतिरिक्त आयुक्त यांनी दिलेल्या तोंडी आदेशान्वये, तातडीचे काम म्हणुन श्री. अशोक पी. बाबलानी, रा. बॅरेक नं. ९४३/१, सेक्शन—२२, उल्हासनगर—३ यांना दिनांक १९/३/२०१४ रोजी मा. अतिरिक्त आयुक्त यांच्या स्वाक्षरीने उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात, व्यापा—यांनी स्थानिक संस्था कराचा भरणा योग्य व वेळेवर करणे, तसेच दंडात्मक कार्यवाही टाळणे व महापालिकेस सहकार्य करणेबाबत ध्वनीक्षेपणाचे काम सुरु करणेकामी कार्यादेश देण्यात आले. स्थानिक संस्था कराची वसुली वाढविण्याच्या प्रयोजनार्थ ध्वनीक्षेपण तात्काळ सुरु करणे गरजेचे असल्यामुळे सदर वेळी कोणत्याही प्रकारचे कोटेशन/ निविदा न मागविता कार्यादेश देण्यात आलेले होते.

श्री. अशोक पी. बाबलानी यांनी सदरचे काम दिनांक ८/३/२०१४ पासुन सुरु केले त्यांना दिनांक ५/१/२०१५ च्या पत्रान्वये चालू असलेले ध्वनीक्षेपणाचे काम बंद करणेकामी उप आयुक्त, स्थानिक संस्था कर यांनी आदेश दिले.

सदरचे काम सुरु करण्यापुर्वी कोणत्याही प्रकारचे कोटेशन/ निविदा न मागविता सुरु करुन पूर्ण केले असल्यामुळे सदर बाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ७ मधील ७३ (क) व अनुसूची ‘‘ड’’ प्रकरण ५ अन्वये मा. स्थायी समितीची कार्योत्तर मंजुरी घेणे आवश्यक असल्यामुळे सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या पटलावर सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ९६ दिनांक:— २७/१/२०१६

सुचकाचे नाव :— श्री. सुनिल सुर्वे

अनुमोदकाचे नाव :— श्री. भगवान भालेराव

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार रिक्षांद्वारे करण्यात आलेल्या ध्वनीक्षेपकांचे देयक अदा करणेकामी कार्योत्तर मंजुरी देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

प्र.महापालिका सचिव :— विषय क्र. १८ वाचुन दाखवितात.

---

⇨ आयत्यावेळचा विषय

**विषय क्र. १८** :—उल्हासनगर—३ मधील राधास्वामी सतसंग हॉल ते ओ.टी. पर्यंत सी.सी. पेव्हमेंट रोड आणि नाली बनविणेच्या कामाकरीता करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत मे. जयभारत कंन्स्ट्रक्शन यांची ७.२० टक्के जास्त दराच्या निविदेस मान्यता देणे.

---

सदस्य श्री. राजेश वदारिया :—विषय काय आहे?

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—गोषवा—यात रक्कम नाही लिहिली? त्याचे कारण काय? फक्त टक्के टाकले किती अबोव आहे ते.

यावेळी सदस्य श्री. राजेश वदारिया हे सभागृहातुन बाहेर गेले. 

श्री. भरत बठिजा, प्र. शहर अभियंता :—याची रक्कम २.६१ लाख आहे.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—गोषवा—यातच रक्कम का नाही लिहिली? ७.२९ टक्के अबोवने आपण देवु शकतो ना?

श्री. भरत बठिजा, प्र. शहर अभियंता :—होय.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—ठिक आहे, आम्हांला तेवढेच पाहिजे बाकी काय? पास करा.

पीठासीन अधिकारी श्रीमती राजश्री चौधरी :— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

☑ आयत्यावेळचा विषय

**विषय क्र. १८** :—उल्हासनगर—३ मधील राधास्वामी सतसंग हॉल ते ओ.टी. पर्यंत सी.सी. पेव्हमेंट रोड आणि नाली बनविणेच्या कामाकरीता करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत मे. जयभारत कंन्स्ट्रक्शन यांची ७.२० टक्के जास्त दराच्या निविदेस मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

उपरोक्त विषयान्वये उल्हासनगर—३ मधील राधास्वामी सतसंग हॉल ते ओ.टी.पर्यंत सि.सि.पेव्हमेंट रोड आणि नाली बनविण्याच्या कामाकरीता निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर निविदा प्रक्रियेमध्ये खालीलप्रमाणे निविदाकारांनी दर भरले होते.

१) मे.जयभारत कंन्स्ट्रक्शन :— दिलेले दर ७.२९ टक्के जास्त

२) मे.साईसिध्दनाथ कंन्स्ट्रक्शन :— दिलेले दर ८.४५ टक्के जास्त

३) मे.मोनिका कंन्स्ट्रक्शन :— दिलेले दर ३३.३० टक्के जास्त

उपरोक्त निविदाकारापैकी मे.जयभारत कंन्स्ट्रक्शन यांनी भरलेले दर सर्वात कमी असून सदर निविदाकारांशी निविदा समितीने चर्चा करुन दर कमी करण्यास वाटाघाटी करणेकरीता दिनांक २४/९/२०१५ रोजी पत्र देण्यात आले होते. सदर पत्रास अनुसरुन मे.जय भारत कंन्स्ट्रक्शन यांनी या कार्यालयास असे कळविले की, प्राकलनामधील दर सन २०१३—१४ च्या दरसुचीवर आधारीत असून सद्यस्थितीत आजच्या बाजारभावाशी तुलना केली असता प्राकलनातील दरामध्ये खूप तफावत आहे. महापालिकेने केलेल्या विनंतीस मान देवून त्यांनी निविदेत भरलेले ७.२९ टक्के मधून ०.०९ टक्के दर कमी करुन ७.२० टक्के जास्त दरावर काम करण्यास संमती दर्शविली.

त्यानुसार मे.जयभारत कंन्स्ट्रक्शन यांनी त्यांचे कमी केलेले ७.२० टक्के या दराप्रमाणे त्यांच्या निविदेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणेकरीता स्थायी समितीच्या पटलावर ठेवणेस मंजूरी घेणेकरीता प्रस्तावित केले असता सदर प्रस्तावावर मा.अतिरिक्त आयुक्त सो. यांनी चालू DSR दराच्या तुलनेत तसेच बाजारभावाशी तुलना करता दर किती जादा किंवा कमी आहेत याचा गोषवाऱ्यात समावेश करुन स्थायी समितीसमोर मान्यतेस ठेवणे असा शेरा लिहिला तसेच मा.आयुक्त सो.यांनी सदर काम दरसुचीप्रमाणे (At par rate) करण्याकरीता सुचना दिल्या.

वरील सुचनांनुसार/शेऱ्यानुसार या विभागातर्फे मे.जयभारत कंन्स्ट्रक्शन यांना सदर काम वर्ष २०१३—१४ च्या दरसुचीनुसार करण्यास तयार असल्यास तसे या कार्यालयास कळवावे असे इकडील पत्र क्र.उमपा/साबांवि/शअ/१४६/२०१५ दिनांक ५ ऑक्टोंबर,२०१५ अन्वये कळविले त्यानुसार मे. जयभारत कंन्स्ट्रक्शन यांनी त्यांचे दिनांक ६/१०/२०१५ रोजीच्या पत्रान्वये त्यांनी दिलेले ७.२० टक्के जास्त दर बरोबर असून प्राकलनावर ७.२० टक्के जास्त दराने काम करण्यास सहमती दर्शविली आहे.

दरयानच्या काळात दिनांक १ ऑक्टोंबर,२०१५ पासून लागू करण्यात आलेली वर्ष २०१५—१६ चे नविन दरसुची या कार्यालयास प्राप्त झाली. या दरसुचीच्या आधारावर महापालिकेचे सल्लागार मे. माहिमतुरा यांना सदर प्राकलनावर वर्ष २०१५—१६ या दरसुचीशी तुलना करुन सदर प्राकलनावर किती तफावत येते यासंदर्भात शहानिशा करणेबाबत कळविले. त्यानुसार मे.माहिमतुरा यांनी त्यांचे दिनांक १० नोव्हेंबर,२०१५ चे पत्रासह वर्ष २०१३—१४ ची दरसुची व चालु वर्ष २०१५—१६ च्या दरसुचीशी तुलना केली असता दोन्ही दरसुचीच्या दरामध्ये ९.०० टक्के जास्त असल्याचे कळविले आहे.

वरील बाब ग्राहय धरल्यास प्राकलनिय दरावर ९.०० टक्के भर पडत आहे. त्यामुळे मे.जयभारत कंन्स्ट्रक्शन यांना प्राकलनावर ७.२० टक्के दिल्यास सदर काम वर्ष २०१५—१६ च्या दरसुचीप्रमाणे तुलना केल्यास प्राकलनिय दरावर १.८० टक्के कमी होत आहे.

तरी वरीलप्रमाणे वस्तुस्थिती लक्षात घेता सदर काम मे.जयभारत कंन्स्ट्रक्शन यांना ७.२० टक्के जास्त दराच्या प्रस्तावावर मा.स्थायी समितीकडून निर्णय होणे आवश्यक आहे. त्याकरीता सदर प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या पटलावर ठेवणेस प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. ९७ दिनांक:— २७/१/२०१६

सुचकाचे नाव :— श्री. भगवान भालेराव

अनुमोदकाचे नाव :— श्री. महेश गावडे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर—३ मधील राधास्वामी सतसंग हॉल ते ओ.टी. पर्यंत सी.सी. पेव्हमेंट रोड आणि नाली बनविणेच्या कामाकरीता करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेमध्ये मे. जयभारत कंन्स्ट्रक्शन यांची ७.२० टक्के जास्त दराच्या निविदेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

सांयकाळी ५.२५ वाजंता सभेचे कामकाज संपल्याचे पीठासीन अधिकारी श्रीमती राजश्री चौधरी यांनी जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी )
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:— १५/२/२०१६

दि. १५/२/२०१६ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती

सभेचे इतिवत्त.

११

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा सोमवार दिनांक १५/२/२०१६ रोजी दुपारी ३.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्रीमती. जया प्रकाश माखिजा | सभापती |
| २ | श्रीमती. राजश्री राजेंद्र चौधरी | सदस्या |
| ३ | श्रीमती शंकुतला जीवनलाल जग्यासी | सदस्या |
| ४ | डॉ. महेश गजानन गावडे | सदस्य |
| ५ | श्री. भगवान शंकर भालेराव | सदस्य |
| ६ | श्रीमती. इसरद सऊद खान | सदस्या |
| ७ | श्रीमती. मिनु राज दासानी | सदस्या |
| ८ | श्री.राजेश नानीकराम वदारिया | सदस्य |
| ९ | श्रीमती लिलाबाई आशान | सदस्या |
| १० | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे | सदस्य |
| ११ | श्री. गुरुनो भिकोमल वलेचा | सदस्य |
| १२ | श्रीमती आशा जिवन इदनानी | सदस्या |
| १३ | श्रीमती अंजली साळवे | सदस्या |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर २. श्री. उमेश सुरेश कालानी ३. श्री. जमनादास पुरस्वानी

खालील अधिकारी सभेस हजर होते.

२७.श्री. मनोहर हिरे, आयुक्त
२८.श्री. श्रीधर पाटणकर, अतिरीक्त आयुक्त
२९.सौ. प्राजक्ता मि. कुलकर्णी, महापालिका सचिव
३०.श्री. जमीर लेंगरेकर,उप–आयुक्त
३१.श्री. दादासाहेब पाटील, मुख्य लेखा अधिकारी
३२.श्री. सुखदेव बलमे, मुख्य लेखा परिक्षक
३३.श्री. वेखंडे, सहा. मुख्य लेखा परिक्षक
३४.श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
३५.डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी
३६.श्री. हनुमंत खरात, प्र. कार्यकारी अभियंता (विदयुत)
३७.श्रीम. मंगला माळवे, सहा. आयुक्त
३८.श्री. शैलेश दोंदे, प्र. कर निर्धारक व संकलक
३९.श्री. भास्कर मिरपगारे, प्र. मुख्य अग्निशमन अधिकारी
४०.श्रीम. श्रध्दा बाविस्कर, प्रोग्रॅमर, ना. सु. केंद्र
४१.श्री. बाळु नेटके, प्र. सुरक्षा अधिकारी
४२.श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक
४३.श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक
४४.श्रीम. निलम कदम, लेखा अधिकारी, शिक्षण मंडळ

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.

१. श्रीम. विशाखा सावंत

२. श्रीमती नर्गिस खान

३. श्री. अशोक रामरख्यानी

दुपारी ३.१० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ **<u>विषय क्र. १</u>** :– सन २०१५–१६ चे सुधारीत व वित्तीय वर्ष सन २०१६–१७ चे मुळ र्थसंकल्पीय अंदाजपत्रक तयार करणे व करांचे दर निश्चित करणे.

---

**सदस्य, श्री. राजेश वधारीया :—** स्थायी समितीच्या सभेमध्ये जे काही निर्णय होतात त्याबदद्ल प्रेस नोट काढून ती महापालिकेतर्फे प्रसिध्द केली पाहिजे. कारण आता रस्त्यांवरील खडड्े भरण्याचे काम सुरू झाले आहे. मागील सभेमध्ये रस्त्यांवरील खडडे भरण्याच्या कामास मान्यता दिली होती परंतु सदर काम सुरू झालेले नव्हते. सदर काम सुरू करण्यासाठी आम्ही मागणी केली, प्रयत्न केले परंतु त्याचे श्रेय दुसरेच घेत आहेत. यासाठी स्थायी समितीमध्ये जे काही निर्णय होत असतील त्याबाबतची जनसंपर्क कार्यालयाद्वारे प्रेसनोट काढून प्रसिध्दी दिल्यानंतर असे प्रकार घडणार नाहीत.

**सदस्य, श्री.महेश गावडे :—** अभय योजनेमध्ये पाण्याचे घेतले नाही का?

**आयुक्त, श्री.मनोहर हिरे :—** ते मी तयार करायला सांगितले होते. परंतु पाण्यासाठी वेगळेच करावे लागेल.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया :—** ज्या मालमत्ताधारकांच्या देयकांमध्ये वाद आहेत त्याबाबत त्यांनी पत्रव्यवहार केलेला आहे. अशा मालमत्ताधारकांना अभययोजनेचा लाभ घेता येईल का?

मा. आयुक्त यांनी सभापती, स्थायी समिती यांना अंदाजपत्रक सादर केले व अर्थसंकल्पाच्या पुस्तकाचे अनावरण करावे अशी विनंती केली.

अंदाजपत्रकाचे अनावरण झाल्यानंतर आयुक्तांनी आपले मनोगत सादर केले.

## मा. आयुक्तांचे मनोगत

मा. सभापती स्थायी समिती व सन्माननीय स्थायी समिती सद्स्य, तयेच उपस्थित सर्व अधिकारी कर्मचारी बंधू व भगिनिंनो, मला आपल्या समोर महापालिकेचा सन २०१५—१६ चा सुधारित अर्थ संकल्प, सन २०१६—१७ चा मुळ अर्थसंकल्प सादर करतांना अतिशय आनंद होत आहे. महानगरपालिकेचा आयुक्त म्हणून आपल्या समोर पहिल्यांदाच अर्थसंकल्प मांडण्याची संधी मला मिळाल्याबद्दल मी आपल्या सर्वांचे अर्थसंकल्पीय सभेत हार्दीक स्वागत करतो.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमात कलम ९५ ते १०० अन्वये महापालिकेचे अंदाजपत्रक तयार करण्यासाठी विहीत करण्यात आलेले आहे. सर्व प्रथम कलम ९५ नुसार आयुक्तांनी पुढील सरकारी वर्षात प्रत्येक लेखाशिर्ष निहाय अपेक्षित उत्पन्न व खर्चाचा अंदाज व करधाना संबंधिचा प्रस्ताव सादर करावयाचा आहे. कलम ९६ नुसार आयुक्तांचे अंदाज व प्रस्ताव लक्षात घेवून स्थायीसमिती मार्फत अंदाजपत्रकात जसेच्या तसे किंवा इष्ट वाटतील असे फेरफार करुन स्विकृत करण्याचे अधिकार कलम १०० नुसार महासभेचे आहेत.

उपरोक्त प्रक्रिया पहाता, मर्यादीत स्त्रोताद्वारे प्राप्त उत्पन्न, अस्तीत्वात असलेल्या नागरी सुविधांची देखभाल, पायाभूत सुविधांची निर्मिती आणि नागरी सेवांचा दर्जा उंचावणे या उद्देशाने सन २०१६—१७ चे जमा खर्चाचे अंदाज तयार करण्यात आले आहेत. यामध्ये शहरातील सर्व घटकांचा विचार डोळयासमोर ठेवून शहराचा सर्वांगीन विकास साधण्याचा सर्वतोपरी प्रयत्न करण्यात आलेला आहे. शहरातील दिन, दुबळे, गरीब, महीला, मुले व ज्येष्ठ नागरिक या सर्वांना समान न्याय व समान संधी देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

उत्पन्न बाजू:—

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये विहित कार्य व कर्तव्य पार पाडण्यासाठी उपलब्ध उत्पन्नाचे साधन पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र | लेखा शीर्ष | उत्पन्न |
|---|---|---|
| १ | स्थानिक संस्था कर अनुदान व वसुली | १८०—०० कोटी |
| २ | मालमत्ता कर | ८५—१० कोटी |
| ३ | पाणी पट्टी | ४३—५० कोटी |
| ४ | एम.आ.टी.पी अंतर्गत वसुली | ३८—६५ कोटी |
| ५ | परवाने शुल्क व इतर शुल्क | ०४—२३ कोटी |
| ६ | वित्त आयोग व इतर अनुदान | ५१—९० कोटी |

| | | |
|---|---|---|
| ७ | अमृत व सुवर्ण जयंती योजना | १११—६८कोटी |
| ८ | इतर | २०—६९ कोटी |
| | **एकूण** | **५३५—६५ कोटी** |

स्थानिक संस्था कर (स्वबंस ठवकल ज्ंग) :—

राज्यातील व्यापा—यांची एल.बी.टी. आकारणी भरण्यास उदासीनता व रोष लक्षात घेता, राज्य शासनाने दिनांक १/८/२०१५ पासून एल.बी.टी. आकारणी बंद केलेली आहे. या आकारणी ऐवजी महापालिकेस सुरुवातीस १० कोटी अनुदान प्राप्त होत होते, जानेवारी २०१६ पासून अनुदान १२.५० कोटी करण्यात आलेली आहे. सदर अनुदान थकबाकी व सेंचुरी कंपनी या सर्वापोटी **१८० कोटी उत्पन्न** अपेक्षीत आहे.

अभय योजना:—

आपणा सर्वांना मी सांगु इच्छीतो की, नागरिकांच्या सोयीच्या दृष्टीने थकबाकी वसूलीसाठी दि. १०/२/२०१६ पासून अभय योजना सुरु करण्यात आली असून त्याचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

१) दि. १०/२/२०१६ ते २९/२/२०१६ शास्ती व जप्ती, वसूली खर्चाची एक रकमी कर भरणा केल्यास १००: माफी.

२) दि. १/३/२०१६ ते १५/३/२०१६ शास्ती व जप्ती, वसूली खर्चावर ७५: माफी.

३) दि. १६/३/२०१६ ते ३१/३/२०१६ शास्ती व जप्ती वसुलीवर ५०: माफी.

अभय योजनेचा जास्तीत जास्त लाभ होण्यासाठी मी नागरिकांना आवाहन करतो की, त्यांनी शहर हितासाठी जास्तीत जास्त कर भरणा करुन महपालिका विकासास हातभार लावावा तसेच मी जनप्रतिनिधी यांना विनंती करतो की, त्यांनी आपल्या प्रभागात जनजागृती करुन चालु वर्षाचे आर्थिक ध्येय गाठण्यासाठी आम्हाला सहकार्य करावे.

मालमत्ता कर/पाणी पट्टी वसुली:—

महापालिकेचे एल.बी.टी. व मालमत्ता कर हे उत्पन्नाचे २ प्रमुख स्त्रोत आहेत. १ ऑगस्ट २०१५ पासून राज्य सरकारने एल.बी.टी. बंद केल्यामुळे संपुर्ण यंत्रणा मालमत्ता कर विभागात वर्ग करुन मालमत्ता आकारणी व्यवस्थापनेत पुढील प्रमाणे सुधारणा करण्याचा मानस आहे.

१) जी. आय.एस्. संगणक प्रणाली विकसीत करणे व माहिती संकलीत करणे.
२) कर आकारणी न झालेल्या किंवा कमी झालेल्या मिळकतीची माहिती गोळा करुन त्यावर नियमाप्रमाणे कर आकारणी करणे.
३) कर आकारणी विरुध्द प्रलंबीत तक्रारीचा निपटारा करण्यासाठी विशेष मोहीम राबविणे.

या सर्व बाबी लक्षात घेता, **रुपये ८५.१० कोटी** मालमत्ता कर व **रुपये ४३.५० कोटी** पाणी पट्टी वसूलीचे उदीष्ट ठेवण्यात आलेले आहे.

भांडवली मुल्यआधारीत कर प्रणाली:—

राज्यातील महानगरपालिकांनी कर आकारणी व्यवस्थेत सुधारणा करुन भांडवली मुल्य आधारित कर प्रणाली लागू करण्याचे शासनाचे निर्देश आहेत. केंद्र व राज्य शासनाच्या अमृत योजनेत अनुदान प्राप्त करण्यासाठी कर आकारणी व्यवस्थापनेत सुधारणा करणेची अट आहे. केंद्रिय वित आयोगाच्या शिफारशी नुसार ज्या 'ड' वर्ग महानगरपालिका आपल्या क्षेत्रात भांडवली मुल्य आधारीत कर आकारणी सुरु करतील त्या

महानगरपालिकांमध्ये उत्तेजनार्थ निधी वितरीत करण्याचे निश्यच केला आहे. सबब भांडवली मुल्य आधारीत करप्रणाली लागू करण्याच्या प्रस्तावास मंजूरी मिळावी.

विकास शुल्क व इतर फी:—

नगररचना विभागात प्राप्त इमारत बांधकाम प्रस्ताव मंजूर करतांना विकास शुल्क व इतर फी वसूल करण्यात येते. नुकतीच राज्य शासनाने कोकण विभागातील महापालिकांच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावली मध्ये विकास हक्क हस्तांतरण (ज्क्त) संदर्भात नवीन विनियम अंतर्भुत करण्याबाबत मंजूरी दिली आहे. त्यामध्ये जे विकासक ज्क्त चा वापर करतील, त्यांचे कडून बांधकाम खर्चाच्या ५: रक्कम पायाभूत संविधा विकास शुल्क वसूल करण्याचे प्रावधान आहे. शहरात ९० मिटर पर्यंत इमारत बांधण्यासाठी परवानगी देण्याचे धोरण या अगोदरच मंजूर करण्यात आलेले आहे. एम.एम.आर.डी.ए. रिझन मध्ये महानगरपालिकासाठी समान डी. सी. रुल्स काही दिवसात प्रसिध्द होण्याची अपेक्षा आहे. या डी. सी. आर मध्ये विकास कांमांना जास्त एफ.एस. आय. मिळेल अशी अपेक्षा आहे. या सर्व बाबी लक्षात घेता, विकास शुल्क व प्रिमियम पोटी **रु. ३८.६५ कोटी** उत्पन्न अपेक्षीत आहे.

वित आयोग व इतर अनुदान:—

महापालिकेस प्राप्त होणा—या विविध अनुदानांपैकी वित्त आयोगाच्या शिफारशी प्रमाणे प्राप्त होणारे अनुदान मुख्य आहे. याशिवाय दलीत वस्ती सुधारणा, डी.पी.डी.सी., एम्.पी. व स्टॅम्प डयुटी अनुदान महापालिकेत प्राप्त होत असते. या सर्व अनुदानांपोटी वर्ष २०१६—१७ मध्ये **रुपये ५१.९०** कोटी उत्पन्न प्राप्त होणार आहे.

अमृत योजना:—

शहरातील रहिवाशांना पाणी पुरवठा, मलनिस:रण, नागरी परिवहन व इतर सुविधांची निर्मीती करुन नागरिकांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या सहकार्याने अमृत योजना जाहीर करण्यात आलेली आहे. अमृत योजना अभियानाचा वित्तीय आकृतीबंध पुढील प्रमाणे आहे.

**केंद्र शासन हिस्सा — प्रकल्प किमतीच्या ५० टक्के.**
**राज्य शासन हिस्सा — प्रकल्प किमतीच्या २५ टक्के.**
**महापालिका हिस्स — प्रकल्प किमतीच्या २५ टक्के.**

सदर योजनेत उल्हासनगर शहरासाठी २२३ कोटी रुपयांचा भुयारी गटार प्रकल्प मंजूर करण्यात आलेला आहे. सदर अनुदानापोटी वर्ष २०१६—१७ मध्ये **रु. ६६.९२** कोटी उत्पन्न मिळणार आहे.

खर्च बाजू:—

महापालिकेस पार पाडाव्या लागणारे कार्य व कर्तव्यांचा तपशिल व त्यासाठी उपलब्ध करण्यात आलेल्या तरतूदीचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र | लेखा शिर्ष | खर्च |
|---|---|---|
| १ | पगार,भत्ते व इतर प्रशासकिय खर्च | १०८.३८ कोटी |
| २ | एम.आय.डी.सी | ३८.४० कोटी |
| ३ | कर्ज परतफेड | ४०.३६ कोटी |
| ४ | रस्त्यावरील दिवा बत्ती | १२.९८ कोटी |
| ५ | कचरावाहतुक व जंतूनाशक इत्यादी खर्च | ३४.०२ कोटी |
| ६ | उद्याने | ११.९५ कोटी |
| ७ | अग्निशमन व आणिबाणी व्यवस्थापन | ४.७६ कोटी |
| ८ | दवाखाना व आरोग्य विषयी कार्यक्रम | ५.४६ कोटी |
| ९ | रस्ते व पायाभुत सुविधा विकास | ८१.३४ कोटी |
| १० | प्रभाग समित्या | ३.१२ कोटी |
| ११ | पाणी पुरवठा | २८.०० कोटी |
| १२ | मल निस:रण | ११.८२ कोटी |

| | | |
|---|---|---|
| १३ | भुयारी गटार योजना | ६.९५ कोटी |
| १४ | प्राथमिक शिक्षण | ४२.१३ कोटी |
| १५ | परिवहन सेवा | ३.७० कोटी |
| १६ | असाधारण लेखे | १३.५७ कोटी |
| १७ | इतर | १८.१९ कोटी |
| | **एकूण** | **४६५.१३ कोटी** |
| | **अमृत योजना** | **१४१.७२ कोटी** |
| | **अमृत योजने सह एकूण** | **६०६.८५ कोटी** |

१) पगार भत्ते व प्रशासकिय खर्चः—

महापालिकेत अंदाजे २३०० अधिकारी व कर्मचारी वर्ग १ ते ४ मध्ये कार्यरत आहेत. यामध्ये अंदाजे १२५० सफाई कामगार आहेत याशिवाय निवृत्त वेतन घेणा—या सेवा निवृत्त कर्मचा—यांची संख्या १३०० आहे. सर्व कर्मचा—यांना पगार, भत्ते निवृत्ती वेतन व इतर फायदे अदा करण्यात येतात. तसेच कार्यालयीन फर्निचर, प्रिंटींग स्टेशनरी, वाहने, लाईट बिल, टेलिफोन बिल इत्यादी बाबींपोटी खर्च करावा लागतो. यासाठी अंदाज पत्रकात **१०८.३८ कोटी** तरतूद उपलब्ध करण्यात आलेली आहे.

२) शहर रोषणाईः—

महानगरपालिका क्षेत्रातील जनतेच्या सुरक्षेसाठी शहरातील रस्त्यांवर व सार्वजनिक ठिकाणी अंदाजे १४००० स्ट्रिट लाईट उभारण्यात आलेले आहेत. या शिवाय महापालिका मुख्यालय, प्रभाग क्षेत्र कार्यालय, बाग बगीचे, उड्डान पूल शहराची प्रवेशद्वारे इत्यादींवर सार्वजनिक सोयीच्या दृष्टीने विद्युत रोषणाई करण्यात येते. यासाठी सन २०१६—१७ च्या अंदाज पत्रकात **रु. १२.९७** कोटी तरतूद करण्यात आलेली आहे.

३) कचरा वाहतूक व जंतूनाशक खरेदीः—

उल्हासनगर महानगरपालिका हे औद्योगिक शहर असल्यामुळे शहरात मोठया प्रमाणावर कच—याची निर्मीती होत आहे. तसेच शहराच्या लोकसंख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे. या बाबी लक्षात घेता, शहराचे पर्यावरण संतुलित व लोकांचे आरोग्य चांगले राखण्यासाठी कच—याची दैनंदिन वाहतूक, डंपींग ग्राउंड व्यवस्थापन जंतूनाशक खरेदी व फवारणी व इतर यंत्रसामग्रीसाठी महापालिकेने चालू अर्थसंकल्पात **रु. ३४.०२ कोटी** तरतूद केलेली आहे.

४) सार्वजनिक बांधकाम :—

शहराचे सौंदर्य हे शहरातील रस्त्यामुळे खुलून दिसते. महापालिका सद्स्यांनी गेल्या ४ वर्षाच्या कालावधीमध्ये आपआपल्या प्रभागात नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी यामधून अनेक विकासकामे केलेली आहेत. तसेच नविन रस्ते बनविणे या लेखा शिर्षामधून शहरातील अनेक मुख्य रस्त्यांची कामे करण्यात आलेली आहेत. सध्य स्थितीत शहाड ते महानगरपालिका मुख्यालय या मुख्य रस्त्याच्या कॉंक्रिटी करणाचे काम वेगाने सुरु आहे. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत घेण्यात येणा—या पायाभूत विकास कामांना गती प्रदान करण्यासाठी ८१.३४ कोटीची तरतूद सन २०१६—१७ च्या अंदाजपत्रकात केलेली आहे.

प्राथमिक शिक्षणः—

महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळामध्ये गरीब, गरजू व दुर्बल घटकातील विद्यार्थी शिक्षण घेत आहेत, त्यांना विशेष बाब म्हणून उदा. वहया, पुस्तके बुट मोजे, गणवेश इ. शालेय साहित्य व क्रिडा साहित्य पुरेशा प्रमाणात मिळावे यासाठी महापालिकेने पुरेशी तरतूद केलेली आहे तसेच नविन इमारत बांधण्यासाठी रु. १८ कोटीसह तरतूद करण्यात आलेली असून चालू वर्षात आर्थिक वर्षात **रु. ४२.१३ कोटी** उपलब्ध करुन देण्याचा संकल्प केला आहे.

अमृत योजना (भुयारी गटार)ः—

शहरातील भुयारी गटार व्यवस्था फारच जुनी असल्याने व पुर्णक्षमतेने कार्यान्वीत नसल्यामुळे काही ठिकाणी घरामधून निघणारे सांडपाणी रस्त्या लगतच्या उघडया गटाराद्वारे वाहत असते. या समस्यां पासून येत्या दोन वर्षात सुटकारा मिळेल कारण केंद्र व राज्य शासन पुरस्कृत अमृत अभियाना अंतर्गत **रु. २२३ कोटी**

रुपयांचा प्रकल्प मंजूर झाला आहे. वर्ष २०१६–१७ च्या अंदाजपत्रकात महानगरपालिका वर्गणीसह **८९.२२ कोटी** रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे.

<u>अमृत योजना (परिवहन सेवा):–</u>

केंद्र शासनाने पुरस्कृत अमृत योजनेत परिवहन सेवेचा समावेश आहे. काही कालावधीपासून बंद असलेल्या परिवहन सेवा पुन्हा सुरु करण्यासाठी परिवहन समिती मार्फत १० मिनी बसेस खरेदी करण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात आलेला आहे. सदर प्रकल्पासाठी रुपये **२ कोटीची** तरतूद चालू अर्थ संकल्पात करण्यात आलेली आहे.

उत्पन्न व खर्चाच्या विविध लेखाशिर्षात करण्यात आलेल्या तरतूदीचा विस्तृत तपशिल आपणास सादर करण्यात आलेल्या अंदाजपत्रकात उपलब्ध आहे.

उपरोक्त सर्व बाबीचा समावेश करुन वर्ष २०१५–१६ चे एकूण जमा रक्कम **३८८.७६ कोटी** व खर्च रक्कम **३७७.५२ कोटींचे** सुधारीत अंदाज सादर करण्यात येत आहे. तसेच वर्ष २०१६–१७ साठी एकूण जमा रक्कम रुपये **५३५.६५ कोटी** व खर्च रक्कम **६०६.८५ कोटी** अर्थ संकल्पीय अंदाजपत्रक सादर करण्यात येत आहे. उत्पन्न व खर्चाच्या रक्कमेत रुपये **७१.२० कोटीची** तफावत भरुन काढण्यासाठी मालमत्ता कर व पाणी पुरवठा दरात वाढ प्रस्तावित करण्यात आलेली आहे. सदरचे प्रस्ताव स्वतंत्ररित्या सादर करण्यात आलेले आहेत. शहराच्या विकासासाठी जमा व खर्चाच्या अंदाजातून वास्तविक अंदाजपत्रक मा. स्थायी समितीने तयार करणे अशी विनंती आहे. आतापर्यंत सन्माननीय सद्स्यांनी केलेल्या सुचना व सहकार्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया :–</u> आपण जे मनोगत व्यक्त केले/वाचून दाखविले त्याची प्रत आम्हाला मिळालेली नाही.

<u>सभापती, स्थायी समिती, श्रीम. जया प्रकाश माखिजा :–</u> आपण जे मनोगत व्यक्त केले आहे त्याची प्रत आम्हालाही मिळावी.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे :–</u> काही गोष्टी ऐकायला मिळाल्या आहेत. लेखापरिक्षकांनी ब–याच गोष्टींवर आक्षेप घेतलेले आहेत. आजच्या अंदाजपत्रकावर तुम्हाला काय वाटते, मी बाहेरून ऐकले आहे, उत्पन्नाच्या स्त्रोतांमध्ये कशी वाढ करता येईल, अशा ब–याच गोष्टींवर चर्चा करावी लागेल, एक ते दोन दिवस चर्चा करूनच अंदाजपत्रक ठरवता येईल.

<u>सभापती, स्थायी समिती, श्रीम. जया प्रकाश माखिजा :–</u> सन २०१५–१६ चे अंदाजपत्रक जास्तीत जास्त चांगले करण्याकरीता आपल्याला वेळ दयावा लागेल. त्यासाठी आजची सभा तहकुब करण्यात येत आहे.

दुपारी ३.४५ वाजता सभापती श्रीमती जया माखिजा यांनी सभेचे कामकाज स्थगित केल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी )
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः— १४/३/२०१६

दि. १४/३/२०१६ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवत्त.

११—अ

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा दिनांक १५/२/२०१६ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित केलेली सभेचे कामकाज स्थगित केल्याने दिनांक १४/३/२०१६ रोजी सायंकाळी ४.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्रीमती शंकुतला जीवनलाल जग्यासी | सदस्या |
| २ | डॉ. महेश गजानन गावडे | सदस्य |
| ३ | श्री. भगवान शंकर भालेराव | सदस्य |
| ४ | श्रीमती. इसरद सऊद खान | सदस्या |
| ५ | श्रीमती. मिनु राज दासानी | सदस्या |
| ६ | श्री.राजेश नानीकराम वदारिया | सदस्य |
| ७ | श्रीमती लिलाबाई आशान | सदस्या |
| ८ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर | सदस्य |
| ९ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे | सदस्य |
| १० | श्री. गुरुनो भिकोमल वलेचा | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ११ | श्री. जमनादास पुरस्वानी | सदस्य |
| १२ | श्रीमती अंजली साळवे | सदस्या |

तर,

१. सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा

व

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

२. श्रीमती. राजश्री राजेंद्र चौधरी, ३. श्री. उमेश सुरेश कालानी, ४. श्रीमती आशा जिवन इदनानी

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. श्रीधर पाटणकर, अतिरीक्त आयुक्त
२. श्री. नितीन कापडनीस, उप–आयुक्त, मुख्यालय
३. सौ. प्राजक्ता मि. कुलकर्णी, महापालिका सचिव
४. श्री. जमीर लेंगरेकर,उप–आयुक्त
५. श्री. सुखदेव बलमे, मुख्य लेखा परिक्षक
६. श्री. वेखंडे, सहा. मुख्य लेखा परिक्षक
७. श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
८. डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी
९. श्री. शैलेश दोंदे, प्र. कर निर्धारक व संकलक
१०. श्री. बाळु नेटके, प्र. सुरक्षा अधिकारी
११. श्री. विनोद केणे, प्र. स्वच्छता निरिक्षक
१२. श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक
१३. श्री. मनोज जाधव, लिपिक, पाणी पुरवठा विभाग
१४. श्री. सतीश दोंदे, लिपिक, पाणी पुरवठा विभाग

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.

१. श्रीमती मनिषा महाजन

२. श्रीमती नर्गिस खान

३. श्री. अशोक रामरख्यानी

४. श्री. रवि दंडगव्हाळ

सांयकाळी ४.०० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

श्री. जमनादास पुरस्वानी, हे पिठासीन अधिकारी म्हणुन आसनस्थ होते.

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ <u>विषय क्र. १ </u>:— सन २०१५—१६ चे सुधारीत व वित्तीय वर्ष सन २०१६—१७ चे मुळ र्थसंकल्पीय अंदाजपत्रक तयार करणे व करांचे दर निश्चित करणे.

---

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>मला वाटते, शहरात पाण्याची समस्या गंभीर आहे, त्यामुळे या २०० बोरींगच्याबाबत निविदेला मान्यता दिली. तर मला वाटते भविष्यातही अजुनही गरज भासेल. तर पाण्याचे जे बजेट आहे त्यामध्ये ४—५ कोटीची जी वाढीव तरतुद आहे त्यामध्ये करावी. पाणी पुरवठयाचा जो बजेट आहे त्यामध्ये पाण्याची तरतुद वाढवुन घेवु. आपणांस अजुन पाणी टंचाईवर जर मात करता आली तर आपणांस ती करता येईल. त्यामध्ये बोरींग घ्या. आणि एक विशेष म्हणजे माझ्या प्रभागामध्ये मी वारंवार अधिका—यांना सांगितले आहे, विहिंरींची संख्या मोठया प्रमाणात आहे. विहिर दुरुस्तीचा प्रस्ताव आणि जुन्या जलवाहिन्यांचा प्रस्ताव अशा तिन्ही प्रस्तावांची लेखाशिर्षात जर तदतुद केली तर मला वाटते चांगले होईल. कमीत कमी ५ कोटीची अतिरिक्त तरतुद पाणी पुरवठयात करावी. अशी माझी सर्वांना विनंती आहे.

<u>पीठासीन अधिकारी, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>पाणी पुरवठयाची तरतुद वाढवुन घेवु.

<u>सदस्य श्री. महेश गावडे :—</u>पाईप लाईन दुरुस्तीचा जो निधी आहे तो नगरसेवकांना थोडा देण्यात यावा. तसेच दुसरे म्हणजे जे बोअरवेल बंद पडलेल्या आहेत ज्या फ्लश आउट करायच्या आहेत त्या सुध्दा मंजुर करण्यात याव्यात.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>माझ्या मते तर एक महत्वपुर्ण अडचण आहे की ज्यावेळी अर्थसंकल्पाची पहिली सभा झाली होती, त्यावेळी प्रेझेंटेशनदेण्यात आलेले नव्हते. असे सांगण्यात आले की नंतर देण्यात येईल, दुसरी सभा बोलविण्यात आली तर त्या दोन्ही सभेत कोणी आले नव्हते. आज अचानक ही सभा ठेवण्यात आली आहे. तर अर्थसंकल्पात काय टाकण्यात आले आहे त्याबाबत एक प्रेझेंटेशन झाले पाहिजे.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>प्रेझेंटेशनलावले नाही, ही सभा परवा ठेवा.

<u>सदस्य श्री. महेश गावडे :—</u>उदया परवा ठेवा ना सभा.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>दुसरे म्हणजे यांना मी सूचना देतो की, मोना कंपनीजवळ एनआरसीने एक जुने विहिर बनविले आहे तेथे उल्हास नदी व उल्हास खाडी वेगवेगळी होत असते. त्या विहिरीची उंची वाढविण्याचा प्रस्ताव होता. परंतु एनआरसी कंपनी बॉम्बे उच्च न्यायालयात जावुन स्टे घेवुन आली. असे आम्हांस इरिगेशन डिपार्टमेंटच्या इंजिनिअरने सांगितले. तर माझे म्हणणे असे आहे की, त्या विहिरीस सोडुन दोन तीनशे मिटर दुरीने दुसरी विहीर बनविली पाहिजे. त्या विहिरीची उंची पहिल्या विहिरीच्या उंचीपेक्षा एक मिटरने उंच असली पाहिजे, ज्याने उल्हासनदीच्या पात्रात जास्त पाणी जमेल. आणि त्या विहिरीची कॉस्ट केडीएमसी, स्टेम व युएमसी या तिन्हीने मिळुन बिअर करावी. त्यासाठी अर्थसंकल्पात तरतुद असणे आवश्यक आहे. पाणी वाटपाबाबत कित्येक प्रभागात १० टक्के पासुन ते ५० टक्क्यापर्यंत काम झालेले नाही. तर पाणी पुरवठा विभाग सांगतो की जी निविदा काढली होती नंतर वाढ देण्यात आली होती. ती पुर्ण झाली आहे. तर ती तरतुद सुध्दा या अर्थसंकल्पात होणे आवश्यक आहे. दुसरे म्हणजे एक प्रेझेंटेशनपाणी पुरवठयाने दिले पाहिजे

की, पाऊस न आल्याने पाण्याची जी अडचण निर्माण झाली आहे, पुढे सुध्दा असे कधीही होवु शकते, तर त्यांची पुढे भविष्यात योजना काय आहे. पुढे उल्हासनगरच्या जनतेस पाणी कोठुन मिळेल? त्यासाठी यांच्याकडे दिर्घमुदतीची योजना काय आहे? जसे मुंबई महानगरपालिकेकडे आपले स्वत:चे डॅम आहेत, तर त्यांना पाण्याची कपात कमी सहन करावी लागत आहे. त्यांच्याकडे सुध्दा पाणी कपात आहे परंतु कमी आहे. मुंबई महानगरपालिकेस फारच कमी दराने मिळत आहे ठिक आहे ती दोनशे वर्ष जुनी महापालिका आहे. त्यांनी आपली पध्दत हळु हळु विकसीत केली आहे. या सर्व गोष्टीचे प्रेझेंटेशनपाणी पुरवठा विभागाने दयावे. तसेच प्रत्येक विभाग असा सॉलिड वेस्टबाबत आरोग्य विभाग काय करु इच्छितो तसे प्रेझेंटेशन त्यांनी दयावे. तसेच अग्निशमन विभाग, विद्युत विभाग काय करु इच्छितो, त्याप्रमाणे त्यांचे प्रेझेंटेशन असले पाहिजे. तसेच लेखा विभाग आपले प्रेझेंटेशन देईल की त्यांनी कशाप्रकारे आकडेवारींचा खेळ केला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने सुध्दा प्रेझेंटेशन दयावे.

पीठासीन अधिकारी, श्री. जमनादास पुरस्वानी:—सभागृहातील सर्व सदस्य आयुक्तांनी जो अर्थसंकल्प आणला आहे त्याबाबत स्थायी समितीतील सर्व सदस्यांनी निर्णय घ्यायचा आहे, अधिकारी निर्णय घेणार नाहीत, आपण सांगावे त्यात काय काय करायचे आहे ते.

सदस्य श्री. राजेश वदारिया :—श्री. पाटील साहेब सांगत आहेत की तीन मिटींग झाल्यात त्या तीन मिटींगमधुन आम्हांला फक्त दोन वेळाच बोलविण्यात आले. व दोन्ही सभेत आपण सुध्दा होतात, दोन तास बसलो कोणी आलेच नाहीत. आपण नंतर बोलावुन काय अंतिम केले त्याची मला माहिती नाही.

पीठासीन अधिकारी, श्री. जमनादास पुरस्वानी:—तेच म्हणतो आपण निर्णय घेण्यासाठीच बसलो आहोत, जर आज नाही निर्णय झाला, तर उदया बसु, परवा बसु. आपण का चिंता करत आहात. आपण आता बसलो आहोत ना, आता काय अडचण आहे, काय कमी आहे ते पहा ना.

सदस्य श्री. राजेश वदारिया:—महोदय, आता पाण्याची फारच अडचण आहे, त्यावर त्वरीत उपाय म्हणुन आपण काय करु शकता? मी आपणांस उदाहरण देतो, शनिवार श्री. रहेजा, अभियंता यांच्याबरोबर प्रभाग समिती सभापती व मी आम्ही एमआयडीसी येथे गेलो होतो तेथे श्री. इंगळे भेटले त्यांनी त्यांना स्पष्ट सांगितले की, एक आठवडयापुर्वी मी आपणांस सांगितले आहे की ४०५ एमएलडी पाणी देवु. तर आपणांस ते कशाप्रकारे पाहिजे, भले ते आपण एक दिवसात घ्या किंवा तीन दिवसात घ्या ४०५ एमएलडी, तर आपण आपले शेडयुल दया त्याप्रमाणे आम्ही पंपींग करु. तर फारच खेदाने म्हणावे लागत आहे, शनिवार सुट्टी असतांना देखील आयुक्त महोदयांनी वेळ काढुन संपुर्ण दिवस अधिका—यांबरोबर बसले आम्हांला सुध्दा बोलाविले. माजी आमदार श्री. कुमार आयलानी होते, काही नगरसेवक होते, आम्ही सुध्दा आपल्या सूचना दिल्या परंतु तो शेडयुल बनविलाच नाही, नाही काही अंमलबजावणी झाली आहे. ही फारच खेदाची गोष्ट आहे. एकतर आपले जे इंजिनिअर्स आहेत ते अनएफिशिएंट आहेत की शेडयुल बनवु शकत नाहीत. ९६ तासाची पंपींग होती जुन्या एलडीआरमध्ये आता ते ७२ तास करत आहेत. २५ टक्क्याची कपात आहे. आपणांस शेडयुल बनवायचे आहे ते २४ तासामध्ये १८ तासाचे, २५ टक्क्याची कपात झाली. तसेच विभागात कशा प्रकारे पाणी दयायचे ते इंटरनल आहे. तर ते शेडयुल ७२ तासात ४ पंप चालतील, १८ तास गुणिले ४ बरोबर ७२ तास पंपींग आहे. एवढे शेडयुल जर आपण तयार करु शकत नाही, सोपे आहे. म्हणजेच याचा अर्थ आपल्या इंजिनिअर्सची जी डिग्री आहे ती डुप्लीकेट आहे. कॉमन सेन्सचा व्यक्ती आपणांस सांगु शकतो की ७२ तासला कसे भागायचे आहे. आपणांस फक्त इंटरनल डिवाईड करायचे आहे. हे २ तास येथे, २ तास तेथे अशाप्रकारे

करायचे आहे हे एवढे १२ दिवस झाले तरी आपण करु शकत नाहीत? तर आपापल्या इंजिनिअर्सची डिग्री आपण तपासा. आम्हांला संशय आहे.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :–**सभापती महोदय, पिण्याच्या पाण्याच्या समस्या गंभीर आहेत. सभेत आयुक्त साहेब, आणि येथे सर्व अधिकारी आहेत, मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीत जे अनाधिकृत बांधकामे आहेत, ज्या इमारती आहेत, त्याचे संपुर्ण बांधकामे थांबावायला सांगितले आहे. त्याच पध्दतीने आपल्या येथे ज्या बांधकामाला परवानगी दिल्या असतील ते बांधकाम थांबवायला सांगा. मला वाटते रेजन्सी सारख्या ठिकाणी १० बोअरवेल मारले आहेत. श्री. कापडनीस साहेब, तेथे पाण्याच्या ज्या बोरींग मारल्या आहेत तेथे पाण्याची व्यवस्था व्यवस्थित आहे. तेथुन आपणांस टॅंकरची व्यवस्था करता येते काय? शहरातील ज्या विहिरी आहेत त्या जर आपण आता स्वच्छ केल्या ताबडतोब, पाण्याची समस्या काही विहिरींच्या माध्यमातुनही सुटु शकते. अशा अनेक ज्या गोष्टी आहेत, जिल्हाधिकारीमार्फत, आपल्या मार्फत तसेच ज्या खाजगी गोष्टी आहेत. येथे मला वाटते कॅम्प नं. ४ येथे एका बोअरवेलला चांगले पाणी लागते, २५ ते ३० टॅंकर पाणी भरते दिवसाला, ती आपल्या ताब्यात घ्या. अशा काही योजना आपल्या ताब्यात घेवुन नागरीकांना पाणी देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. लवकरात लवकर या गोष्टीवर उपाययोजना होणे अत्यावश्यक आहे. कारण पाण्याची समस्या मोठया प्रमाणात आहे. दुसरे म्हणजे श्री. राजेश वदारिया यांनी जसे सांगितले की आपल्या डॅमची मोठी परिस्थिती आहे, आपणांस आता डंम्पींगलाच जागा कोठे मिळत नाही. तर डॅमला जागा मिळणे कठिणच आहे. ठाणे महापालिकेस शाही धरणाचे मुरबाड मध्ये जागा दिली होती, कालांतराने उच्च न्यायालयाने त्यास स्टे दिला. आणि सुप्रीम कोर्टाने सुध्दा दिला ते काम सुध्दा थांबले नाहीतर शाही धरणातुन काही पाणी मिळणार होते. परिस्थिती अशी आहे की प्रकल्प पिडीतांचा प्रश्न सुटल्यानंतर मला वाटते, बारवी धरणामध्ये पाणी ६७ एमएलडी आहे, जर चार मिटर उंची वाढविली तर ६७ पेक्षा डबल पाणी बारवी धरणामध्ये येईल. मुळात यावर्षी पाऊसच पडला नाही त्यामुळे ही अडचण निर्माण झाली. आता आपले जे सोर्स आहेत ते लवकर आयुक्त महोदय, आपल्या ताब्यात घेतले पाहिजे. तसेच मार्च, एप्रिल आणि मे, जुनपर्यंत आपणांस काय उपाययोजना करता येईल, पाण्याच्या संदर्भामध्ये. आता बोरींगचा विषय झाला अजुनही काही विषय आहेत, विहीरीचा विषय असेल,कोठुन तलावातील पाणी मिळत असेल तो विषय असेल तर असे सर्व विषय घेवुन जर आपण काही उपाययोजना केल्या तर शहरातील नागरीकांना पाण्याची व्यवस्था आपण करु शकतो. नाहीतर बाहेर कोठुन पाणी आणता येईल काय? मला वाटते सर्व शहराची तिची परिस्थिती आहे. त्यामुळे आपणांस पाणी मिळणार नाही. त्यामुळे जी बांधकामे चालु असतील ती ताबडतोब थांबविण्याचे आदेश दयावेत. जरी हा स्थायी समितीचा विषय नसेल तरी हा अत्यंत महत्वाचा विषय असल्याने या संदर्भात आदेश व्हावे अशी मी आपल्याला विनंती करतो.

**सदस्या श्रीमती अंजली साळवे:–**दुसरी गोष्ट म्हणजे जे लिकेजेच आहेत ते दुरुस्त करण्यासाठी उपाय केला पाहिजे. एवढे पाणी वाया जात आहे. आपण सांगत नाही तोपर्यंत दोन–दोन, तीन–तीन दिवस लिकेजेस दुरुस्त होत नाहीत. लिकेज झाल्यानंतर, केल्यानंतर, तो टोल फ्री नंबर आम्हां सर्व सदस्यांना कळवा ना? आम्हांला माहितच नाही की कोणता टोल फ्री नंबर आहे. आणि लिकेजेस दोन तासाच दुरुस्त झालीच पाहिजे अशी काही तरतुद करा. आणि जर फोन आला तर अधिका–यांना फोन केला तर ते उपलब्ध नसतात वेळेवर. कसे करणार? दोन तासाच कुठलेही लिकेज दुरुस्त झालेच पाहिजे. त्यामुळे भरपुर पाणी वाया जाते. आणि कित्येक ठिकाणी कोणार्कच्या पाईप लाईन जोडल्या नाहीत, आमच्या इकडे लिकेजेस होत आहेत तेथे सुध्दा पाणी वाया जात आहे.

**सदस्या श्रीमती लिलाबाई आशान :–**माझ्या प्रभागात पाणी येतच नाही. माझ्या पॅनलमधील एका सदस्याच्या प्रभागात पाणी येते आणि माझ्या प्रभागातच पाणी येत नाही.

<u>सदस्य श्री. महेश गावडे :–</u>तुम्ही जे आता ब्ल्यु लाईन टाकण्याचे काम केले ती योजना जर निट राबविली असती तर, प्रत्येकाच्या घरात जर मिटर दिले असते तर पाण्याचा अपव्यय कमी झाला असता. प्रत्येक घरात दोन दोन मोटर लागले आहेत, माझ्या घरात पाणी पाहिजे, बाजुच्या घरात पाणी नाही आले तरी चालेल. प्रत्येक इमारतीमध्ये पंचवीस पंचवीस पंप लावले आहेत, इलेक्ट्रीक पंप. इमारतीत खाली पाण्याची टाकी असते, आपल्या किती अधिका–यांनी जावुन पाहिले आहे? गरीब लोकांना पाणी कोठुन मिळणार? उत्तर दयावे अधिका–यांनी. प्रत्येक ठिकाणी, प्रत्येक घरात इलेक्ट्रीक पंप आहेत, ज्याच्याकडे पैसा आहे तो दोन दोन लावतो.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :–</u>दुसरी गोष्ट अशी आहे श्री. सेलवन साहेब, ज्याठिकाणी ज्या विभागात पाणी जाणार आहे, तर मला वाटते आपल्या किंवा एमएससीबीला विश्वासात घेवुन त्या काळापुरते पंप जर बंद केले तर काही होईल माहित आहे का, पाणी सर्वांना मिळेल.

<u>सदस्य श्री. महेश गावडे :–</u>लाईट बंद करा त्यावेळेला.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :–</u>कारण माझ्याकडे कॅपिसीटी आहे त्यामुळे मी घरात मोटर लावतो. तर त्या भागातील पाणी बंद करण्यात यावे. त्या भागात जर पाणी बंद केले तर पाणी सर्वांना मिळेल.

<u>सदस्य श्री. महेश गावडे :–</u>पाण्याचा दुरुपयोग कमी होईल.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :–</u>होय, म्हणजे समोरच्याला पाणी मिळेल. जर मी घेतो २००० लिटर तर समोरच्याला २०० लिटर सुध्दा मिळत नाही. जर पाणी सोडले ना तर माझ्याकडे जर पंप असेल तर ते मी खेचुन घेतो आणि पुढे पाणीच जात नाही.

<u>सदस्य श्री. महेश गावडे :–</u>सर्वच एरियामध्ये पंप आहेत.

<u>सदस्या श्रीमती अंजली साळवे :–</u>होय, पुढे पाणीच जात नाही.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :–</u>अर्धा तास लाईट बंद केले तर पाणी सर्वांना मिळेल, आणि अर्धा तास चालु करु दया पंप भलेही. साहेब हा व्यवस्थीत पर्याय आहे. सर्व शहरास पुर्ण पाणी मिळेल. एक तास पाणी येते ना तर त्यामध्ये अर्धा तास लाईट बंद करायची, आणि नंतर अर्धा तासांनी लाईट चालु केल्यावर पंप चालु केले तरी हरकत नाही.

<u>सदस्या श्रीमती अंजली साळवे:—</u>अजुन एक समस्या आहे की जेव्हा पाणी सोडले जाते, ते रात्री दोन, तीन, चार, पाच कधीही पाणी येते. जेव्हा पाणी सोडतात तेव्हा सायरनची व्यवस्था प्रत्येक प्रभागात करा. कारण लोक सतरा वेळा मोटर लावुन त्रस्त होतात, आता परवाच दुर्घटना घडली सुभाष टेकडी येथे १९ वर्षाची मुलगी मोटरचा शॉक लागुन मरण पावली आहे. जेव्हा पाणी सोडले जाते तेव्हा सायरन वाजवायला प्रत्येक एरियामध्ये कम्पल्सरी करा.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>बोला, अर्थसंकल्पाविषयी बोला आता.

<u>श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी :—</u>बोलु?

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>होय.

<u>पीठासीन अधिकारी, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>श्री. सेलवनजी, आता सभागृहातील सर्व सदस्यांनी, श्री. राजेश वदारिया, श्री. भगवान भालेराव व अन्य सदस्यांनी पाण्याविषयी जी चर्चा केली की, आयुक्त महोदयांबरोबर शनिवारी सभा झाली, पाण्याच्या वितरण व्यवस्थेविषयी आपण नविन उपाययोजना लागु करणार होते, तीन दिवस पाणी येईल, चार दिवस बंद असेल आणि भरपुर ४०५ एमएलडी पाणी आम्ही देणार, तर त्याबाबत आपण काय विचार केला याबाबत सभागृहास जरा माहिती दया.

<u>श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा :—</u>प्रत्येक वेळेस वेगवेगळया विभागात पाणी पुरवठा केला जाईल. त्यात आठवडयात तीन दिवस पाणी पुरविण्यात येईल व चार दिवस बंद ठेवण्यात येईल. ४०५ एमएलडी पाणी आठवडाभरात वितरण केले जाईल.

<u>पीठासीन अधिकारी, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>आता आपण ४०५ एमलएलडी पाणी देणार तर प्रत्येक दिवशी १३५ एमएलडी पाणी येईल, तर ते पुर्ण होईल का आपणांस?

<u>श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा :—</u>होय.

<u>पीठासीन अधिकारी, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>१३५ एमएलडी पाणी शहरात प्रत्येक दिवशी मिळेल असे तीन दिवसात मिळणार आहे तर भरपुर पाणी लोकांना होईल, व्यवस्थीत पाणी मिळेल. लोक तयार आहेत तसे घेण्यास तर त्याबाबत जरा अंमलबजावणी करा ना.

<u>श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा :—</u>एमआयडीसीकडुन जे पाणी येईल ते रात्री दयायचे आहे. रात्री टाकी भरल्यानंतर दिवसा लोकांना पाणी मिळेल.

**श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी :—**मा. सभापती महोदय, सर्व सन्माननिय सदस्य, अधिकारी वर्ग...

**सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—**आम्हांस प्रत दया.

**श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी :—**होय, साहेब देतो ना, आधी ऐकुन घ्या. आपण ज्या सूचना करणार त्याप्रमाणे आम्ही निर्णय घेवुन अंमलबजावणी करु.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**आयुक्त महोदय, पाण्याबद्दल आणखी एक गोष्ट आहे. बदलापुरपासुन आपण उल्हासनदीमध्ये जेथुन पाणी उचलतो, मोठया प्रमाणात भाजीपाल्याची शेती झाली आहे हे जिल्हाधिकारी महोदयांच्या निदर्शनास आणुन दया. जर जिल्हाधिकारी महोदयांच्या निदर्शनास आणुन दिले व ते पंप वगैरे बंद झाले तर ब—याच प्रमाणात पाण्याचा उपयोग होईल.

**श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी :—** सन २०१५—१६ चे जे अंदाजपत्रक आहे ते प्रशासनाने मा. स्थायी समितीपुढे सादर केले होते. आणि त्या अंदाजपत्रकामध्ये आम्ही ७१ कोटीची करवाढ सुचविलेली होती. असे मिळुन जो अर्थसंकल्प होता तो ६०७ कोटीचा होता. आता सन्माननिय स्थायी समितीच्या सर्व सदस्यांनी ज्यावेळेस एक दोन बैठका झाल्या त्यावेळेस ही सर्व करवाढ नामंजुर केली आहे. आणि त्यामध्ये शहरातील मुख्य १६ रस्ते जे आहेत, ते घेतले आहेत. दरवर्षी आपण अंदाजपत्रकामध्ये सदस्यांच्या नावाने यादी काढतो. सर्व शहरातील मुख्य रस्ते आणखी तीन प्रपोजल असे १९ वेगळे प्रपोजल या यादीत सादर करण्यास सांगितले होते. तर स्थायी समितीने या अर्थसंकल्पात काय काय सुधारणा करायच्या, आपल्या ज्या सूचना आलेल्या होत्या त्यानुसार मी ते लिहिलेले आहे. आपणांस जर मान्य असेल तर मंजुर करा, नाहीतर आपण ज्या पध्दतीने सांगाल त्यानुसार आम्ही चालु. तर आपल्याकडे एकुण अंदाजपत्रकातील जी तरतुद होती, आपणाकडे जी येणारी रिसीट होती ती एकुण रुपये पाचशे पसतीस कोटी एकोणसाठ होती. आणि प्रशासनाने जी ७१ कोटीची तरतुद सांगितलेली होती, कर वाढीची ती नामंजुर झालेली असल्याने ७१ अधिक ८० कोटीचे नविन रस्ते दिले. त्यानंतर आपले जे निधी आहेत, महापौर, उप—महापौर, स्थायी समिती, प्रभाग समिती, व नगरसेवक जो निधी आहे या सर्वांचे २२ कोटी होतात, म्हणजे आपले बजेट एवढयाचे जास्तीचे वाढावे लागणार आहे. त्याअनुषंगाने आपले जे उत्पन्नाचे मार्ग आहे ते बदल केलेले आहेत. मुळ किती होते आणि स्थायी समितीने किती बदल केला ते आणि त्यानंतर कुठल्या कुठल्या विषयाला किती पैसे दिले ते वाचुन दाखवितो.

स्थानिक संस्था करामध्ये आपण ७० कोटीची तरतुद केलेली आहे. बांधकाम परवाना आणि नकाशा याची फी आपण ३० कोटी केलेली आहे. शासनाने अनाधिकृत बांधकामे मोठया प्रमाणात नियमाधीन केलेले आहे त्यामुळे त्याचे मोठया प्रमाणात पैसे आपणांस मिळतील. तर तो हेतु आपण त्यामध्ये धरु.

**सदस्य श्री. महेश गावडे :—**अनाधिकृत बांधकामे जी झालीत त्यामध्ये टीअरगर्डची कामे जेवढी झाले त्यामध्ये कर विभाग सर्तक आहे का? त्यासाठी किती लोक नेमावे लागणार आहेत?

**श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी :—**त्यांनी करायला पाहिजे ना.

<u>सदस्य श्री. महेश गावडे :—</u>त्यामध्ये वसुली कव्हर होईल, कर वसुली जर निट केली तर.

<u>श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी :—</u>पायाभुत सुविधासाठी आपण १९ कोटीची तरतुद केलेली आहे. महापालिका मालमत्ता विनियोग १९ कोटीची तरतुद केलेली आहे. पाणी बिले वसुली, पाणी पुरवठा १० कोटी, पाणी बिले वसुली कर १६ कोटी ५० लाख. आता मा. सदस्यांनी ज्या महत्वाच्या तरतुदी सुचविलेल्या आहेत खर्चासाठी तर त्याचे मी आकडे वाचुन दाखवितो. प्रभाग क्षेत्र मुलभुत सेवा प्रभाग समिती १ मध्ये ९९ लाखाची तरतुद, प्रभाग क्षेत्र मुलभुत सेवा दुर्बल घटक मध्ये १ कोटीची तरतुद, प्रभाग क्षेत्र मुलभुत सेवा प्रभाग समिती २ मध्ये १ कोटी १० लाखाची तरतुद, प्रभाग क्षेत्र मुलभुत सेवा दुर्बल घटक मध्ये ९९ लाख, प्रभाग क्षेत्र मुलभुत सेवा प्रभाग समिती ३ मध्ये १ कोटी १० लाखाची तरतुद, प्रभाग क्षेत्र मुलभुत सेवा दुर्बल घटक मध्ये ९९ लाख, प्रभाग क्षेत्र मुलभुत सेवा प्रभाग समिती ४ मध्ये १ कोटी ३२ लाखाची तरतुद, प्रभाग क्षेत्र मुलभुत सेवा दुर्बल घटक मध्ये ९९ लाख, त्यानंतर महापौर निधी गेल्या वर्षी १ कोटी ७५ लाख होता तर आता सुध्दा तेवढाच आहे. उप–महापौर निधी १ कोटी, स्थायी समिती सभापती निधी १ कोटी, नगरसेवक निधी ४ कोटी ३ लाख, नगरसेवक निधी दुर्बल घटक २ कोटी ९६ लाख, नविन सिमेंट कॉंक्रिटीकरण ५६ कोटी. स्थायी समिती सदस्य निधी ३ कोटी २० लाख, सभागृह नेता व विरोधी पक्ष नेता ५० लाख, सर्व गटनेते, प्रभाग समिती सभापती यांचे २ कोटी, व्हीटीसी ग्राउंड बाळासाहेब ठाकरे स्मारक बांधणे ५ कोटी, समाज मंदिर, स्पोर्ट कॉम्पलेक्स, दुर्बल घटक, वसाहती ५ कोटी, सांस्कृतिक कार्यक्रम ५० लाख, नाला सफाई आणि गटार खर्च ३ कोटी, असे एकंदरित जे बजेट आहे ते ७१० कोटीचे बनविले आहे स्थायी समितीने आणि ५७ लाख ९४ हजाराचे शिल्लकी आहे. त्याचबरोबर १९ रस्ते सांगितलेले होते, ज्या सुधारणा सांगितल्या होत्या तर त्या सुधारणा मी आपणांस वाचुन दाखवितो.

| | | |
|---|---|---|
| १ | विठ्ठलवाडी से शांतीनगर डॉल्फीन | ३ कोटी |
| २ | नेहरु चौक ते फारवर लाईन | ८ कोटी |
| ३ | आशा कोल्ड्रीक ते पोलीस स्टेशन , बस स्टॉप, उल्हासनगर–१ | ३ कोटी |
| ४ | श्रीराम, आनंद दिघे प्रवेशव्दार | २ कोटी |
| ५ | खेमानी ते बजरंग आईस फॅक्टरी | ५ कोटी |
| ६ | उल्हास स्टेशन ते जिजामाता व्हाया सावरकर चौक | ५ कोटी |
| ७ | नेताजी स्कूल ते लालचक्की, उल्हासनगर–५ | ५ कोटी |
| ८ | सी.ब्लॉक ते शांतीनगर<br>साईबाबा डॉल्फीन व्हाया | १० कोटी |
| ९ | गणेशनगर शिवसेना शाखा ते स्वामी शांतीप्रकाश पुतळा, उल्हासनगर–५ | ८ कोटी |
| १० | कल्याण अंबरनाथ रोड | २० कोटी |
| | | |
| ११ | शिवाजी महाराज पुतळा नुतनीकरण | ५१ लाख |
| १२ | बाबासाहेब आंबेडकर १२५ वी जयंती | ५१ लाख |

| | | |
|---|---|---|
| १३ | शिवाजी महाराज पुतळा नुतनीकरण, राजा गेमनानी हाउस | १० लाख |
| १४ | शहाड स्टेशन से महानगरपालिका व्हाया सी.ब्लॉक रोड, साईड ड्रेन आणि फुटपाथ | ७ कोटी |
| १५ | नाला सफाई | ३ कोटी |
| १६ | रमेश मुकने हाऊस ते शास्त्री नगर | १.५० कोटी |
| १७ | मधुबन होटेल ते हिरा मॅरंज हॉल सिमेंट कॉक्रीटीकरण रोड बनविणे | ५० लाख |
| १८ | व्ही. टी. सी. क्रिडा संकुल विकास व मा. बालासाहेब ठाकरे स्मारक बांधणे | १० कोटी |
| १९ | दुध नाका ते स्वामी शांतीप्रकाश आश्रम सिमेंट कॉक्रीटीकरण रोड बनविणे | १.५० कोटी |

तर हे मा. सदस्यांनी एकत्र येवुन हे मुख्य रस्ते घेतलेले आहेत. तर आपणांस विस्तृत चर्चा करायची असेल तर त्यानुसार आपण आदेश दया किंवा हा ठराव पास करुन दया.

सदस्य श्री. भगवान भालेराव :—कुठल्याही नगरसेवकांचे रस्ते घेतलेले नाही.

पीठासीन अधिकारी, श्री. जमनादास पुरस्वानी:—फक्त शहरातील मुख्य रस्ते घेतलेले आहेत.

सदस्या कु. शकुंतला जग्यासी :—यात ४ नंबरचे रस्ते नाहीत.

सदस्य श्री. राजेश वदारिया :—आम्हांला कॉन्फीडन्समध्ये घेतलेले नाही. दोन सभा बोलविल्या आम्ही आलो होतो, सदस्य उपस्थित नव्हते. आमच्याकडे बुक नाही, आम्ही वाचलेलेच नाही, आमची काही तयारी नाही आपणांस सभा स्थगित करावीच लागेल.

सदस्या श्रीमती मिनु दासानी :—सर्व सदस्यांना बसवुन बनवा ना?

सदस्य श्री. भगवान भालेराव :—सर्व पक्षांच्या सदस्यांनी बसुन बनवुन दया.

सदस्या श्रीमती मिनु दासानी :—सर्वांना सभेस बोलवायला पाहिजे होत ना? कोणी केले?

सदस्य श्री. गुरुनो वलेचा :—परत बैठक बोलवा काय फरक पडणार?

सदस्य श्री. भगवान भालेराव :—कोणत्याच सदस्यांचे काम घेतले नाही.

सदस्य श्री. महेश गावडे :—कोणतेच घेतले नाही, एवढेच आहे मग संपवा ना?

पीठासीन अधिकारी श्री. जमनादास पुरस्वानी :—आपणांस वाटले आपले रस्ते आले पाहिजेत तर तसे महासभेत सुध्दा टाकता येईल.

सदस्य श्री. राजेश वदारिया :—नेहरु चौक ते फॉलवर लाईनचा रस्ता मागील वेळेस सुध्दा घेण्यात आला होता. आपण आश्वासन देता की, महासभेत होईल. आता निवडणूकीचा कार्यकाळ येणार आहे, काम नाही होणार तसे कसे चालेल? आम्हांला मागील वर्षाची निधी नाही देण्यात आली आतापर्यंत? अर्थसंकल्पात जी तरतुद आहे आमच्या प्रभागाची ती अदयापपर्यंत आपण अंमलात आणली नाही. आमचे असे म्हणणे आहे की ही सभा स्थगित करण्यात यावी. बसुन सल्ला करा, अंतिम करु या.

सदस्या श्रीमती मिनु दासानी :—रस्त्याचे काय काम करत आहात, लोकांना पाणी मिळत नाही, आमचा विरोध आहे.

सदस्य श्री. गुरुनो वलेचा :—माझा सुध्दा विरोध आहे.

सदस्या श्रमती मिनु दासानी :—आम्ही बाहेर जातो.

सदस्य श्री. राजेश वदारिया :—बाहेर जावु नका. आपण अभ्यास करु त्यानंतर बघु या.

पीठासीन अधिकारी श्री. जमनादास पुरस्वानी :—ते बाहेर जावु इच्छितात तर जावु दया त्यांना.

सदस्या श्रीमती मिनु दासानी :—हे शहराच्या विकासासाठी नाही. आम्हांला सभेत बोलविले नाही.

श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी :—महोदया हे मी नाही बनविले आपण सर्वांनी मला बनवुन दिले आहे.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—मतदान घेण्यात यावे.

श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी :— कोणताही कर व पाणी पट्टी स्थायी समितीने वाढविली नाही.

सदस्य श्री. राजेश वदारिया :—आपण विश्वासात नाही घेतले, ओपन आहे. आपण सांगावे ना की कोणती सभा झाली, हे आपण कधी बनविले? सर्व सदस्य बसले आहे, भाजपाचे बसले आहेत, शिवसेनेचे बसले आहेत,

कॉंग्रेसचे बसले आहेत, आरपीआयचे बसले आहेत. सर्व बसले आहेत तर कोणा कोणास विश्वासात घेतले ते सांगा.

सदस्य श्री. भगवान भालेराव :—सेनावाले होते, आरपीआयवाले होते......

सदस्य श्री. राजेश वदारिया :—नावे सांगा ना, कॉंग्रेसचे कोण होते, नाव सांगा, आपण होतात काय?

सदस्य श्री. भगवान भालेराव :—श्रीमती जया साधवानी महोदया होते.

सदस्य श्री. राजेश वदारिया :—श्रीमती जया साधवानी स्थायी समितीच्या सदस्य नाहीत.

सदस्य श्री. भगवान भालेराव :—गटनेत्या आहेत.

सदस्य श्री. राजेश वदारिया :—आम्हांस बोलाविले नाही. अर्थसंकल्प बनविता, स्थायी समितीच्या सदस्यांना बोलावत नाही व गटनेता यांना बोलविता याचाच अर्थ आपण डिवायडर रुल पॉलिसी करत आहात. आपण प्रत्येक पक्षात झगडा लावु इच्छिता. माझा आरोप आहे आपणावर.

पीठासीन अधिकारी, श्री. जमनादास पुरस्वानी:—हे पहा स्थायी समितीमध्ये सर्व सदस्य बसले आहेत, अर्थसंकल्प आपणासमोर ठेवला आहे, जो बनविला आहे तो ठेवला आहे आपण यामध्ये सूचना दया.

सदस्य श्री. राजेश वदारिया :—आपण जे बनविले आहे ते माझ्यासमोर ठेवले नाही. आमच्या सदस्या आहे श्रीमती अंजली साळवे महोदया त्यांच्यासमोर नाही झाला. आपले भाजपाचे लोकांनी बोलावे, एनसीपीच्या लोकांनी बोलावे कोणासमोर झाला आहे?

सदस्य श्री. महेश गावडे :—नाही तर नंतर ठेवा सभा.

पीठासीन अधिकारी, श्री. जमनादास पुरस्वानी:—नाही, आपण आता कच्चे बनविले आहे त्यात आपणांस करेक्शन करायचे आहे.

सदस्य श्री. राजेश वदारिया :—आम्हां सदस्यांना त्याची एक एक प्रत दया, कोठे आहे? आम्ही त्यावर अभ्यास करु व नंतर परवा त्यावर निर्णय देवु. श्री. जमनुजी, आम्ही पाहिले नाही आपण यामध्ये काय टाकले ते. आपण दाखविणार नाही तर स्थायी समिती सदस्यांकडुन आपण कशी आशा करु शकता.

<u>सदस्य श्री. महेश गावडे :—</u>मी काय म्हणतो सभा अर्धा तास स्थगित करुन परत सुरु करा.

<u>सदस्या श्रीमती अंजली साळवे :—</u>त्याची प्रत दया आम्हांला.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>अर्धा तास सभा स्थगित करा.

<u>सदस्य श्री. महेश गावडे :—</u>आम्ही येथेच बसतो, त्याची झेरॉक्स काढुन देवुन टाका ना आम्हांला.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>फक्त १६ रस्ते नाहीत, सफाईची समस्या आहे, पाण्याची समस्या आहे. आज पाण्यामुळे सर्व त्रस्त आहेत हे लक्षात ठेवा. ८० टक्के लोक निवडुन येणार नाहीत.

<u>सदस्या श्रीमती मिनु दासानी :—</u>प्रभागात पाण्याची फारच समस्या आहे, लोकांना पाणी मिळत नाही, तुम्ही रस्ते बनवायला घेतात.

<u>सदस्या श्रीमती अंजली साळवे :—</u>पाण्याची फारच गंभीर समस्या आहे.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>पाण्यासाठी ५ कोटीची तरतुद करुन घ्या.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>आम्हांला दोन दिवस लागतील, आपण अर्ध्या तासात कसे समजणार? मागील वेळेस प्रेझेंटेशनदेणार म्हणुन सांगितले परंतु प्रेझेंटेशनदिले नाही.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>मतदान घ्या, आपण मागील वेळेस सुध्दा मतदान घेतले होते.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>यांना मी म्हटले सभा परवा ठेवा दोन दिवस यांना दया.

<u>सदस्य श्री. महेश गावडे:—</u>पाणी पट्टी वाढविली नाही, कुठला कर वाढविला नाही तर मग ठिक आहे, पास करा.

<u>सदस्या श्रीमती मिनु दासानी :—</u>लोकांना पाण्याची समस्या आहे, आपण इतर कामे करु नका. पाणी दया. आमचा विरोध आहे आम्ही बाहेर जातो.

<u>**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**</u>मेहरबानी करुन तुम्ही बाहेर जावु नका. आपण बाहेर का जात आहात?

यावेळी सदस्या श्रीमती मिनु दासानी व सदस्य श्री. गुरुनो वलेचा सभागृहातुन बाहेर गेले.

<u>**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**</u>सन्माननिय मुख्य लेखा अधिका—यांनी अर्थसंकल्प पुर्ण वाचुन दाखविलेला आहे. आपण प्रत दया.

<u>**सदस्य श्री. महेश गावडे :—**</u>आपण प्रत दया आम्ही येथे वाचतो अर्ध्या तासात.

<u>**सदस्या श्रीमती अंजली साळवे :—**</u>प्रत दया आणि परवा सभा लावा.

<u>**पीठासीन अधिकारी, श्री. जमनादास पुरस्वानी:—**</u>सन्माननिय सर्व सदस्यांनी लक्ष दयावे, या अर्थसंकल्पात आयुक्त महोदयांनी कर व दर दोन्ही वाढविले होते, पाणीपट्टी वाढविली होती, करदर वाढविले होते त्यात आम्ही कशातच वाढ केलेली नाही. ब—याचवर्षापासुन जो कर व दर चालला आहे तोच आहे. आणि शहरातील महत्वाचे रस्ते आहेत कुण्या नगरसेवकांचे रस्ते नाहीत. शहरातील कॅम्प नं. १ ते ५ चे जे मुख्य रस्ते आहेत व जे आवश्यक आहे ते आम्ही टाकण्याचा प्रयत्न केला आहे. हा शहराच्या हितासाठी फारच चांगला अर्थसंकल्प आहे, एकवेळ आणखीन आपले अधिकारी आपणांस पत्र देतील आपण ते वाचावे. परंतु यावर एवढी चर्चा करणे हे नाही करणार ते नाही करणार असे नाही, आपण ते वाचा आपली जर काही मत असेल ते आपण दया, आम्ही ते सुध्दा घेवु. दोन दिवसानंतर सभा ठेवु असे करु नका. आपणांस महासभा सुध्दा बोलवायची आहे. त्याकरीता वेळ पाहिजे. तर आम्ही आपणांस आता पाच मिनिटे वेळ देतो येथे बसा आणि पहा, आपण चर्चा करा, आपणांस काय पाहिजे नाही पाहिजे. आपला सल्ला काय आहे, आम्ही आपले म्हणणे मान्य करण्यासाठी बसलो आहोत. फक्त चर्चा करणे गोष्ट नाही.

<u>**श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी :—**</u> मी आता उदयानांची यादी वाचुन दाखवितो.

| | |
|---|---|
| १ | गोलमैदान, उल्हासनगर—२ येथिल उद्यानाचे नुतनिकरण करणे. |
| २ | रोटरी, उल्हासनगर—३ येथिल उद्यानाचे नुतनिकरण करणे. |
| ३ | नेताजी, उल्हासनगर —४ येथिल उद्यानाचे नुतनिकरण करणे. |
| ४ | स्वामी बोधराज, उल्हासनगर —५ येथिल उद्यानाचे नुतनिकरण करणे. |

| | |
|---|---|
| ५ | मनपा (मु), उल्हासनगर—३ येथिल उद्यानाचे नुतनिकरण करण |
| ६ | सपना, उल्हासनगर—२ येथिल उद्यानाचे नुतनिकरण करणे. |
| ७ | दशहरा, उल्हासनगर—५ येथिल उद्यानाचे नुतनिकरण करणे. |
| ८ | जिजामाता, उल्हासनगर—४ येथिल उद्यानाचे नुतनिकरण करणे. |
| ९ | हशू आडवाणी, उल्हासनगर—५ येथिल उद्यानाचे नुतनिकरण करणे. |
| १० | साई आत्माराम उद्यान, उल्हासनगर—५ येथिल उद्यानाचे नुतनिकरण करणे. |
| ११ | वासुदेव गार्डन, उल्हासनगर—२ येथिल येथिल उद्यानाचे नुतनिकरण करणे. |
| १२ | कैलाशवासी मोरन्दमल, उल्हासनगर—२ येथिल उद्यानाचे नुतनिकरण करणे. |
| १३ | प्लॉट क्रं ७०५, उल्हासनगर—२. येथिल उद्यानाचे नुतनिकरणाचे काम करणे. |
| १४ | बाल शिवाजी, उल्हासनगर—१, येथिल उद्यानाचे नुतनिकरण करणे. |
| १५ | बैरक क्रं ५८६ राम मालिश वाला ओटी उल्हासनगर २, येथे नवीन गार्डन बनविणे |
| १६ | शांतीनगर शमशान भूमी मागे येथे नवीन गार्डन बनविणे |

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u> नाना नानी उदयान, रामरख्यानी उदयान व इंदिरा उदयान हे शहरातील फार मोठे उदयान आहे. आपण कसे म्हणत आहात की आपण सर्व नावे घेतली.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>त्यापेक्षा नावेच टाकु नका.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>कोणतेच उदयानाचे नाव टाकु नका.

<u>श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी:—</u>मी ही जी नावे वाचुन दाखविली ती वृक्ष समितीचे स्वतंत्र बजेट होते. त्यांनी बनविलेले आहे.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>तुम्ही दसेरा मैदानाचे नाव घेतले नाही.

<u>श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी:—</u>हे जे अधिकार आहेत ते वृक्षप्राधिकरण समितीचे आहे.

<u>सदस्य श्री. महेश गावडे :—</u>आमच्या येथे चोपडयाला सुध्दा एक उदयान आहे.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**आमच्या प्रभागात तर उदयानच नाही. उदयानाचा निधी एकच ठेवा.

**श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी:—** फक्त नावे घेतली आहेत.

**सदस्या श्रीमती अंजली साळवे :—**सार्वजनिक ठिकाणी महिलांसाठी शौचालय असलेच पाहिजे. त्यासाठी किती निधी ठेवला आहे तुम्ही? प्रत्येक सार्वजनिक ठिकाणी उदयाने आहेत तेथे, त्यामध्ये वाढीव निधी ठेवा.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**उल्हासनदीवर जो बांधारा बांधायचा आहे जे पाण्यास रोखतो, त्याची उंची एक मिटर असली पाहिजे. एनआरसी कंपनीचा आहे, त्याने उच्च न्यायालयात स्टे घेतला आहे. त्याची उंची वाढविण्यासाठी. एरिगेशनवाले नविन विहिरी बनवतील. स्टेम, एमआयडीसी, केडीएमसी आहेत, एमआयडीसी म्हणतील आपण आपली करा, अर्थसंकल्पात तर तरतुद असली पाहिजे. पाण्याविषयी त्यादिवशी सभा झाली होती, त्यात आयुक्तांना म्हटले होते की आपण रेडीरेकनरनुसार पैसे जमा करा आम्ही आपणांस लॅण्ड देणार. त्याची तरतुद कोठे आहे? आपणांस स्वतःचे जे वॉटर ट्रीटमेंट प्लान बनवायचे आहे, त्यासाठी जागा नाही, जागा त्यांनी दिली आहे. त्याचे ५० लाख त्यावेळेस आयुक्त श्री. रामनाथ सोनवणे होते त्यांनी भरले होते. बाकीचे पैसे आजपर्यंत भरले नाहीत, आतापर्यंत तरतुदच केलेली नाही. जर स्वतःच्या पाण्याचा स्त्रोत उभारायचा असेल तर अर्थसंकल्पात तरतुद करणे आवश्यक आहे.

**श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी:—**सभापती महोदय, आपण सर्व सदस्यांच्या सूचना घेवुन मला अंतिम सूचना दया. ७१५ कोटी १९ लाख ७० हजार आमचे उत्पन्न असेल खर्च ७१४६१७६ व उर्वरीत बजेट ५७ लाख ९४ हजार शिल्लक असेल.

**पीठासीन अधिकारी, श्री. जमनादास पुरस्वानी:—**७१५ कोटी १९ लाख ७० हजार आमचे उत्पन्न असेल खर्च ७१४६१७६ व उर्वरीत बजेट ५७ लाख ९४ हजार शिल्लक राहते. करांचे दर न वाढविता हा अर्थसंकल्प मंजुर करण्यांत येत आहे. हा सर्व संमतीने पारीत करु या. शहरासाठी चांगला अर्थसंकल्प आहे.

**काही सदस्य :—**पास—पास......

**पीठासीन अधिकारी, श्री. जमनादास पुरस्वानी:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**प्रस्तावना :—**

अंदाजपत्रक हे महानगरपालिकेचे वार्षीक बाब आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ च्या तरतुदीप्रमाणे प्रत्येक वर्षी सर्व प्रथम उत्पन्न व खर्च यांचे अंदाज आयुक्तांनी तयार करावयाचे आहे. सदर अंदाजात अधिनियमाचे विविध कलमान्वये

महानगरपालिकेस पार पाडावयाची कार्य व कर्तव्ये तसेच प्राथमिक शिक्षण निधीत घ्यावयाच्या अनुदानाची रक्कम अशा बाबींसंबधी करावया लागणा—या खर्चाची तरतुद करणे आवश्यक आहे . तसेच पुढील वर्षात या अधिनियमाच्या तरतुदीन्वये जे कर लादणे आवश्यक असेल अशा कराधानासंबधीच्या प्रस्तावांचे विवरण पत्र व कराधाना पासून मिळणा—या जमा रक्कमांचे अदांज ही सादर करणे आवश्यक आहे .

वरील सर्व बाबी लक्षात घेता, प्रत्येक बाबी अंतर्गत अपेक्षित उत्पन्न व अपेक्षित खर्च यांचे वर्गीकरणासहित अंदाजपत्रक तयार करण्याच्या प्रयोजनासाठी सादर करण्यांत येत आहेत.

सन २०१५—२०१६ चे सुधारीत अंदाज व सन २०१६—२०१७ चे मूळ अंदाजपत्रकासंबधी तपशिल पुढील प्रमाणे.

<u>सन २०१५ — २०१६ चे सुधारीत अंदाजपत्रक</u> :—

सन २०१५—२०१६ साठी एकूण रुपये **६२६.२८ कोटी** चे मुळ अंदाजपत्रक मंजूर करण्यात आले होते . मागील ८ महिन्याचे प्रत्यक्ष उत्पन्न लक्षात घेता, २०१५—२०१६ वर्षासाठी खालीप्रमाणे सुधारीत अंदाज तयार करण्यात आले आहे .

(आकडे हजारात)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **अ अंदाजपत्रकीय उत्पन्न** | : | **रुपये.** | ३३५७०७६ | |
| **ब अंदाजपत्रकीय उत्पन्न** | : | **रुपये.** | .... | |
| **क अंदाजपत्रकीय उत्पन्न** | : | **रुपये.** | <u>५३०६००</u> | <u>३८८७६७६</u> |
| **अ अंदाजपत्रकीय खर्च** | : | **रुपये.** | २७२१६८४ | |
| **ब अंदाजपत्रकीय खर्च** | : | **रुपये** | ६०० | |
| **क अंदाजपत्रकीय खर्च** | : | **रुपये.** | <u>१०५२८९७</u> | <u>३७७५१८१</u> |

प्रत्येक वर्षाप्रमाणे मालमत्ता कर, पाणी पट्टी व अन्य करापोटी अधिक वसुली होईल, महानगरपालिका मालमत्ता विनियोग करण्यात येईल असे गृहित धरुन स्थायी समितीने अंदाज तयार केले होते तथापी त्यानुसार वसुली व विनियोग करण्यात आला नाही. दर वर्षात उत्पन्नाचे अवास्ताविक अंदाज गृहित धरुन विविध लेखाशीर्षातर्गत विविध प्रकल्पासाठी तरतूद करण्यात येते . वर्षाअखेर उत्पन्नाचे अवास्ताविक उद्दिष्टे पार पाडणे शक्य होत नाही परंतु खर्च मात्र पुर्ण करण्यात येतो. काही वर्षापासून सुरु असलेल्या या प्रथेमूळे कर्जाची अदायगी शक्य होत नाही व ठेकेदार व पुरवठादारांचे थकीत देयकांचे प्रमाणही वाढत चालले आहे. ६ व्या वेतन आयोगाप्रमाणे कर्मचा—यांच्या पगारात २० ते २५ टक्के वाढ झालेली आहे. मासिक वेतनात शिफारसीप्रमाणे वाढ देण्यात येत आहे. परंतु कर्मचा—यांना २००६ पासूनची थकबाकीचे काही हाप्ते अद्याप अदा करावयाची आहे. जानेवरी २०१६ पासून ७ व्या वित आयोग सिफारशी प्रमाणे वेतन व थकबाकी अदा करावे लागेल.महानगरपालिकेने जे.एन.एन.यु. आर.एम. योजनेत पाणी पुरवठा प्रकल्प हाती घेतले असून त्यासाठी महापालिकेने ६३ कोटी कर्जाची एम.एम.आर.डी.ए. या वित्तीय संस्थेकडून उभारणी केलेली आहे त्याची परतफेड पुढील सुरु झाली आहे. महानगरपालिकेने अमृत योजनेत भुयारी गटार, शिल्लक पाणी पुरवठा योजना व बस खरेदी असे तीन नवीन प्रस्ताव सादर केलेले आहेत. त्या करिता महानगरपालिका वर्गणी पोटी नवीन कर्जाची उभारणी एम.एम.आर.डी.ए. या वित्तीय संस्थेकडून करावयाची आहे. एम.आय.डी.सी. ने दिनांक १/४/२०१३ पासून ७००० ऐवजी ८००० प्रति घन लिटर दर निश्चित केली आहे. एम.आय.डी.सी. ने पाण्याच्या दरात वाढ केल्यामूळे महापालिकेस प्रत्येक वर्षात फक्त पाणी खरेदी पोटी ३५ कोटी रुपये दयावे लागतील. महापालिका सुरूवातीपासूनच खरेदीपेक्षा कमी दराने ग्राहकांना पाणी पुरवठा करीत आहे त्यामूळे महापालिकेची आर्थिक स्थिती दिवसेंदिवस खालावत चालली आहे या सर्व बाबी लक्षात घेता, महापालिकेच्या वित्तीय स्थितीत सुधार होईपर्यंत काही कालावधीसाठी अति अवश्यक कामे

वगळता सर्व कामांना पुर्णविराम देणे गरजेचे राहील. सव विभागीय स्तरावर प्रलंबीत देयकांचे तपशिल दर्शविणारी यादी सोबत जोडली आहे.

सन २०१६—२०१७ चे मूळ अंदाजपत्रक :—

आर्थिक वर्ष २०१६—२०१७ साठी तयार करण्यात आलेला उत्पन्न व खर्चाचा तपशिल पुढील प्रमाणे आहे .

(आकडे हजारात)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| अ अंदाजपत्रकीय उत्पन्न | : | रुपये. | ३६५९६७० | |
| ब अंदाजपत्रकीय उत्पन्न | : | रुपये. | १७५०० | |
| क अंदाजपत्रकीय उत्पन्न | : | रुपये | १६७९८०० | ५३५६९७० |
| अ अंदाजपत्रकीय खर्च | : | रुपये. | ३४२००१७ | |
| ब अंदाजपत्रकीय खर्च | : | रुपये. | ३७००० | |
| क अंदाजपत्रकीय खर्च | : | रुपये | २६१५९५९ | ६०७२९७६ |

आर्थिक वर्ष २०१६—२०१७ मध्ये अपेक्षित उत्पन्न व खर्च लक्षात घेता, रहाणारी तुट रुपये ७१.६० कोटी एवढी पाणी पट्टी, मालमत्ता कर , टॅकर भाडे व इतर दरामध्ये वाढ करुन ती भरुन काढणे आवश्यक आहे . मालमत्ता कर, पाणी पट्टी, टॅकर भाडे इत्यादीच्या दरात वाढ करणेबाबतचा स्वतंत्र प्रस्ताव तयार करण्यात आला आहे .

शिक्षण मंडळाचे सन २०१६ — १७ चे मुळ अंदाज :

प्राथमिक शिक्षण अधिनियम १९४७ मधील पार पाडावयाची कार्ये व कर्तव्य लक्षात घेता, उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण मंडळातर्फे वर्ष २०१६—२०१७ साठी खालील प्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे .

(आकडे हजारात)

| | | |
|---|---|---|
| अंदाजपत्रकीय उत्पन्न रुपये | : | ५३३३६५/— |
| अंदाजपत्रकीय खर्च रुपये | : | ५३१८८३/— |

उपरोक्त दर्शविलेल्या एकूण अंदाजात रुपये ११०५६१/— शासकीय अनुदान व रक्कम रु ४२१३२२/— महापालिकेकडून महापालिका वर्गणी म्हणून अपेक्षित करण्यात आले आहे.

सबब शिक्षण मंडळाचे सन २०१६—२०१७ चे अंदाजपत्रक स्थायी समिती मान्यतेसाठी प्रस्तावीत करीत आहे.

शिक्षण मंडळाचे सन २०१५ — १६ चे सुधारित अंदाज :

शिक्षण मंडळाचे वर्ष २०१५— १६ करिता मुळ अंदाजपत्रकीय तरतुद, जमा व खर्चाच्या प्रत्येक लेखा शिर्षात प्रत्यक्ष झालेले उत्पन्न व खर्च (तक्ता सोबत) तसेच महापालिकेची वित्तिय परिस्थिती लक्षात घेता , शिक्षण मंडळाचे वर्ष २०१५ —२०१६ चे अंदाजपत्रक पुढील प्रमाणे सुधारित करण्याचे प्रस्तावित आहे.

(आकडे हजारात)

अंदाजपत्रकीय उत्पन्न रुपये : ३५७२३७/—

अंदाजपत्रकीय खर्च रुपये : ३५६२३०/—

अखेरची शिल्लक रुपये : १००७/—

**परिवहन उपक्रमाचे अंदाज :**

परिवहन उपक्रमाचे वित्तिय वर्ष २०१५—२०१६ चे उत्पन्न व खर्चाचे सुधारीत व वर्ष २०१६—१७ चे मूळ अंदाज परिवहन समिती माार्फत पुढील प्रमाणे तयार करण्यात आले आहे.

(आकडे हजारात)

| अ. क्र. | उत्पन्न तपशिल | वर्ष २०१५—१६ मूळ अंदाज | वर्ष २०१५—१६ सुधारित अंदाज | वर्ष २०१६—१७ मूळ अंदाज | अ. क्र. | खर्च तपशिल | वर्ष २०१५—१६ मूळ अंदाज | वर्ष २०१५—१६ सुधारित अंदाज | वर्ष २०१६—१७ मूळ अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | परिवहन सेवा उत्पन्न | २५०० | —— | २५०० | १ | परिवहन सेवा देखभाल दुरूस्ती व इतर खर्च | १५००० | —— | १५००० |
| २ | बस खरेदी अनुदान (अमृत योजना) | ७५४०० | —— | १५००० | २ | सभासदांना मानधन, सभा व इतर भत्ते | २३९८ | ६०० | १००० |
| | अ अंदाजपत्रकातून वर्ग | ३५३२३ | ६०० | १९५०० | ३ | सभासद प्रशिक्षण व प्रवास खर्च | १००० | —— | १००० |
| | | | | | ४ | बस खरेदी व बस डेपो खर्च | ९४८२५ | —— | २०००० |
| | एकूण | ११३२२३ | ६०० | ३७००० | | एकूण | ११३२२३ | ६०० | ३७००० |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका १९४९ चे कलम ९८ च्या तरतुदीप्रमाणे परिवहन उपक्रम अंदाजपत्रक स्थायी समिती मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

**वृक्ष प्राधिकरणाचे चे अंदाजपत्रक :**

नागरी क्षेत्रात झाडांचे संरक्षणासाठी महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे रक्षण व संरक्षण अधिनियम करण्यात आले आहेत. सदर अधिनियमातील तरतूदीनुसार झाडांची लागवड , संरक्षण इत्यादी बाबींसाठी स्वतंत्र अंदाजपत्रक तयार करावयाचे आहे. त्यानुषंगाने वर्ष २०१५—२०१६ चे सुधारित व २०१६—१७ चे मूळ अंदाज वृक्ष प्राधिकरण समिती मार्फत पुढील प्रमाणे तयार करण्यात आले आहे.

(आकडे हजारात)

| अ.क्र. | उत्पन्न तपशिल | वर्ष २०१५—१६ मूळ अंदाज | वर्ष २०१५—१६ सुधारित अंदाज | वर्ष २०१६—१७ मूळ अंदाज | अ.क्र. | खर्च तपशिल | वर्ष २०१५—१६ मूळ अंदाज | वर्ष २०१५—१६ सुधारित अंदाज | वर्ष २०१६—१७ मूळ अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | वृक्ष कर | १०६५० | ७००० | ८००० | | उदयाने विभाग पगार (पाहरेकरी व माळी नेमणे) | २०३५० | १६३७५ | २०५१३ |
| | वृक्ष तोडण्यासाठी अनामत रक्कम | १०० | ५० | १०० | | नवीन झाडे माती व ट्री गार्डस इ. लावणे | ७००० | २५०० | ५००० |
| | अ अंदाजपत्रकातून वर्ग करावयाची रक्कम | ११९७०० | ६७१७५ | ९५५१३ | | वृक्ष गणना | ५००० | —— | २५०० |
| | | | | | | नर्सरीची निगा व विकास | ५०० | १०० | ५०० |
| | | | | | | झाडे व रोपांचे प्रदर्शन | ५०० | —— | ५०० |
| | | | | | | उदयाने निगा व दुरुस्ती | ६०००० | ३०००० | ३०००० |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | (वीज पुरवठा व रोषनाई) | | | |
| | | | | | | नवीन उदयाने (बैरक क्रं ह्व८ˆ राम मालिश वाला ओटी उल्हासनगर ह्म, शांतीनगर शमशान भूमी मागे गार्डन) | ३०००० | २०००० | ३०००० |
| | | | | | | सपना, दशहरा, गोलमैदान, रोटरी, नेताजी, जिजामाता, स्वामी बोधराज, मनपा (मु) गार्डन, हशू वाध्वाणी, साई आत्माराम, वासुदेव गार्डन, कैलाशवासी मोहरमल, प्लॉट क्रं त्त्ञ्ह्व, बाल शिवाजी गार्डन | ५००० | ५००० | १३००० |
| | | | | | | प्रशिक्षण व अभ्यास दौरा | १००० | १०० | ५०० |
| | | | | | १० | वृक्ष तोडण्यासाठी अनामत रक्कम परतावा | १०० | ५० | १०० |
| | | | | | ११ | वृक्ष तोडणे | १००० | १०० | १००० |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |
| | एकूण | १३०४५० | ७४२२५ | १०३६१३ | | एकूण | १३०४५० | ७४२२५ | १०३६१३ |

उद्यानांची देखभाल दुरूस्तीसाठी माळी, पहारेकरी, मजूर इत्यादी कर्मचाऱ्यांची अपूरी संख्या पाहता असे खाजगी कर्मचारी नेमण्यासाठी निवीदा कार्यवाही करून अभिकर्ता नेमावा.

मा. वृक्षप्राधिकरण सदस्यांनी सुचिविलेली उद्यानांची खालील खर्चाची कामे उपरोक्त अंदाजपत्रकाकडुन प्रस्तावित करण्यात आले आहेत.

| अ.क्रं. | तपशिल |
|---|---|
| १ | गोलमैदान, उल्हासनगर–२ येथिल उद्यानाचे नुतनिकरण करणे. |
| २ | रोटरी, उल्हासनगर–३ येथिल उद्यानाचे नुतनिकरण करणे. |
| ३ | नेताजी, उल्हासनगर –४ येथिल उद्यानाचे नुतनिकरण करणे. |
| ४ | स्वामी बोधराज, उल्हासनगर –५ येथिल उद्यानाचे नुतनिकरण करणे. |
| ५ | मनपा (मु), उल्हासनगर–३ येथिल उद्यानाचे नुतनिकरण करण |
| ६ | सपना, उल्हासनगर–२ येथिल उद्यानाचे नुतनिकरण करणे. |
| ७ | दशहरा, उल्हासनगर–५ येथिल उद्यानाचे नुतनिकरण करणे. |
| ८ | जिजामाता, उल्हासनगर–४ येथिल उद्यानाचे नुतनिकरण करणे. |
| ९ | हशू आडवाणी, उल्हासनगर–५ येथिल उद्यानाचे नुतनिकरण करणे. |
| १० | साई आत्माराम उद्यान, उल्हासनगर–५ येथिल उद्यानाचे नुतनिकरण करणे. |
| ११ | वासुदेव गार्डन, उल्हासनगर–२ येथिल येथिल उद्यानाचे नुतनिकरण करणे. |
| १२ | कैलाशवासी मोरन्दमल, उल्हासनगर–२ येथिल उद्यानाचे नुतनिकरण करणे. |
| १३ | प्लॉट क्रं ७०५, उल्हासनगर–२. येथिल उद्यानाचे नुतनिकरणाचे काम करणे. |
| १४ | बाल शिवाजी, उल्हासनगर–१, येथिल उद्यानाचे नुतनिकरण करणे. |
| १५ | बैरक क्रं ५८६ राम मालिश वाला ओटी उल्हासनगर २, येथे नवीन गार्डन बनविणे |
| १६ | शांतीनगर शमशान भूमी मागे येथे नवीन गार्डन बनविणे |

सबब अधिनियमाचे कलम १६ नुसार वर्ष २०१५–१६ चे सुधारित व २०१६–१७ चे मूळ अंदाजपत्रक स्थायी समिती मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

शिक्षण मंडळाचे अंदाजपत्रक, परिवहन उपक्रमाचे अंदाजपत्रक , वृक्ष प्राधिकरणाचे चे अंदाजपत्रक , आयुक्तांचे महापालिकेसाठी सन २०१५–१६ चे सुधारीत अंदाजपत्रक व सन २०१६–१७ चे जमा व खर्चाचे अंदाज, कर व दरवाढी इत्यादी प्रस्ताव तसेच प्रशासनाकडून इतर माहिती घेवून अधिनियमाचे कलम ९६ नुसार अर्थसंकल्पीय अंदाज तयार करण्यासाठी प्रस्तावीत दृ

**स्थायी समिती ठराव क्रमांक : १०६** **दिनांक १४/०३/२०१६**

**सुचकाचे नाव : श्री. भगवान भालेराव**

**अनुमोदकाचे नाव : श्रीमती लिलाबाई आशान**

ही स्थायी समिती शिक्षण मंडळाचे अंदाजपत्रक , परिवहन उपक्रमाचे अंदाजपत्रक, वृक्ष प्राधिकरणाचे अंदाजपत्रक, आयुक्तांचे महापालिकेसाठी सन २०१५–२०१६ चे सुधारित अंदाजपत्रक, आयुक्तांकडून विविध करांमधील वाढीसंबंधी प्रस्ताव, भांडवली मुल्यावर आधारित कर प्रणाली लागू करणेचा प्रस्ताव आयुक्तांचे सन २०१६–१७ चे जमा व खर्चाचे अंदाज वर्ष २०१४–२०१५ चे लेखा विवरण पत्र , अर्थसहाय देवून पुरविण्यात येणा–या सेवांचा तपशिल तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ९६ मधील सर्व तरतूदी व सभेत चर्चेअंती सुचविलेला फेरफार विचारात घेवून विविध कर व दरात वाढ करणेबाबत खालील प्रमाणे शिफारस करीत आहे.

१) **मालमत्ता कर** : नाव हस्तांतरण शुल्क व प्रचलीत करांचे दर मान्य करण्यात येत असून प्रस्तावीत वाढ अमान्य करण्यात येत आहे.

२) **मालमत्ता कर** : केंद्र व राज्य शासनाच्या अमृत योजनेत अनुदान प्राप्त करण्यासाठी कर आकारणी व्यवस्थापनेत सुधारणा करणेची अट आहे. केंद्रिय वित आयोगाच्या शिफारशी

नुसार ज्या ‘ड’ वर्ग महानगरपालिका आपल्या क्षेत्रात भांडवली मुल्य आधारीत कर आकारणी सुरु करतील त्या महानगरपालिकांमध्ये उत्तेजनार्थ निधी वितरीत करण्याचे धोरण

आहे. सबब भांडवली मुल्य आधारीत करप्रणाली लागू करण्याच्या प्रस्ताव मान्य करण्यात येत आहे.

३) **पाणी पट्टी दर** : प्रचलीत करांचे दर मान्य करण्यात येत असून प्रस्तावीत वाढ अमान्य करण्यात येत आहे.

४) **पाणी टॅंकर भाडे** : प्रस्तावीत आकारणी अमान्य करण्यात येत आहे .

५) वर्ष २०१४–१५ मध्ये अर्थसहाय देवून पुरविण्यात येणा–या सेवांबाबतचा तपशिल विचारात घेवून महापालिकेच्या इतर उपलब्ध निधीतून अर्थसहाय कायम ठेवण्यास शिफारस

करण्यात येत आहे . साफसफाई व घनकचरा व्यवस्थापनासाठी देण्यात येणारे अर्थसहाय स्थानिक संस्था कर व मालमत्ता करातील सामान्य कर या दोन्ही उत्पन्नाच्या बाबीतून वर्ग

करण्यात यावे .

६) वर्ष २०१४–१५ चे लेखा विवरण पत्र , कर्ज विवरण पत्र, विविध खात्यात जमा रक्कम, आयुक्तांचे वित्तीय परिस्थिती बाबत अभिप्राय, इतर विवरण पत्र, प्रलंबीत कामे व

देयकांच्या माहितीची नोंद घेण्यात येत आहे. प्रलंबित कामे लवकरात लवकर पुर्ण करून विकास कामाना गती देण्यात यावी.

**शिक्षण मंडळाचे सन २०१६—१७ चे मूळ अंदाजपत्रक :**

शिक्षण मंडळाचे वर्ष २०१६—१७ करिता मूळ अंदाजपत्रकीय तरतूद , मागील वर्षात प्रत्येक लेखा शिर्षात प्रत्यक्ष झालेले उत्पन्न व खर्च तसेच महापालिकेची वित्तीय परिस्थिती लक्षात घेता , पुढील प्रमाणे मंजुर करण्यास शिफारस करण्यात येत आहे.
(आकडे हजारात)

अंदाजपत्रकीय उत्पन्न रुपये : ५३३३६५/—
अंदाजपत्रकीय खर्च रुपये : ५३१८८३/—
अखेरची शिल्लक रुपये : १४८२/—

उपरोक्त दर्शविलेल्या एकूण अंदाजात रुपये ११०५६१/— शासकीय अनुदान व रक्कम रु ४२१३२२/— महापालिकेकडून महापालिका वर्गणी म्हणून अपेक्षित करण्यात आले आहे.

**शिक्षण मंडळाचे सन २०१५—१६ चे सुधारित अंदाजपत्रक :**

शिक्षण मंडळाचे वर्ष २०१५—१६ करिता मूळ अंदाजपत्रकीय तरतूद , जमा व खर्चाच्या प्रत्येक लेखा शीर्षात प्रत्यक्ष झालेले उत्पन्न व खर्च तसेच महापालिकेची वित्तीय परिस्थिती लक्षात घेता , पुढील प्रमाणे मंजुर करण्यास शिफारस करण्यात येत आहे व वर्ष २०१५—१६ करिता रक्कम रुपये २५०५८४/— महापालिका हिस्सा म्हणून मंजूर करण्यात येत आहे.

(आकडे हजारात)

अंदाजपत्रकीय उत्पन्न रुपये : ३५७२३७/—

अंदाजपत्रकीय खर्च रुपये : ३५६२३०/—

अखेरची शिल्लक रुपये : १००७/—

**परिवहन उपक्रमाचे अंदाजपत्रक :**

परिवहन उपक्रमाचे वित्तिय वर्ष २०१५—२०१६ चे सुधारित व वर्ष २०१६—१७ चे मूळ अंदाजपत्रक फकरफार करुन पुढील प्रमाणे मंजुर करण्यास शिफारस करण्यात येत आहे

(आकडे हजारात)

| अ. क्र. | उत्पन्न तपशिल | वर्ष २०१४—१५ मूळ अंदाज | वर्ष २०१४—१५ सुधारित अंदाज | वर्ष २०१५—१६ मूळ अंदाज | अ. क्र. | खर्च तपशिल | वर्ष २०१४—१५ मूळ अंदाज | वर्ष २०१४—१५ सुधारित अंदाज | वर्ष २०१५—१६ मूळ अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | परिवहन सेवा उत्पन्न | ६६२ | —— | २५०० | १ | परिवहन सेवा खर्च | ५०० | —— | १५००० |
| २ | बस खरेदी | ७५४० | —— | ७५४०० | २ | सभासदांना | ६९८ | ६९८ | २३९८ |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | अनुदान | ० | | | | मानधन, सभा व इतर भत्ते | | | |
| | अ अंदाजपत्रक ातून वर्ग | १०९६१ | ६९८ | ३५३२३ | ३ | सभासद प्रशिक्षण व प्रवास खर्च | १००० | —— | १००० |
| | | | | | ४ | बस खरेदी | ८४८२५ | —— | ९४८२५ |
| | एकूण | ८७०२ ३ | ६९८ | ११३२२३ | | एकूण | ८७०२३ | ६९८ | ११३२२३ |

<u>वृक्ष प्राधिकरणाचे अंदाजपत्रक</u> :

वृक्ष प्राधिकरण अधिनियमाचे कलम १६ मधील तरतूदीस अधिन राहून वृक्ष प्राधिकरण उपक्रमाचे वर्ष २०१५—२०१६ चे सुधारित व वर्ष २०१६—१७ चे मूळ अंदाजपत्रक पुढील प्रमाणे मंजुर करण्यास शिफारस करण्यात येत आहे.

(आकडे हजारात)

| अ. क्र. | उत्पन्न तपशिल | वर्ष २०१५—१६ मूळ अंदाज | वर्ष २०१५—१६ सुधारित अंदाज | वर्ष २०१६—१७ मूळ अंदाज | अ. क्र. | खर्च तपशिल | वर्ष २०१५—१६ मूळ अंदाज | वर्ष २०१५—१६ सुधारित अंदाज | वर्ष २०१६—१७ मूळ अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | वृक्ष कर | १०६५० | ७००० | ८००० | १ | उदयाने विभाग पगार (पाहरेकरी व माळी नेमणे) | २०३५० | १६३७५ | २०५१३ |
| २ | वृक्ष तोडण्यासाठी अनामत रक्कम | १०० | ५० | १०० | २ | नवीन झाडे माती व ट्री गार्डस इ. लावणे | ७००० | २५०० | ५००० |
| ३ | अ अंदाजपत्रकातून वर्ग करावयाची रक्कम | ११९७०० | ६७१७५ | ९५५१३ | ३ | वृक्ष गणना | ५००० | —— | २५०० |
| | | | | | ४ | नर्सरीची निगा व विकास | ५०० | १०० | ५०० |
| | | | | | ५ | झाडे व रोपांचे प्रदर्शन | ५०० | —— | ५०० |
| | | | | | ६ | उदयाने निगा व दुरुस्ती (वीज पुरवठा व रोषनाई) | ६०००० | ३०००० | ३०००० |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |
| | | | | | ७ | नवीन उदयाने (बैरक क्रं ह्ळ८ˆ राम मालिश वाला ओटी उल्हासनगर ह्ल, शांतीनगर शमशान भूमी मागे गार्डन) | ३०००० | २०००० | ३०००० |
| | | | | | ८ | सपना,दशहरा , गोलमैदान, रोटरी, नेताजी, जिजामाता, स्वामी बोधराज, मनपा (मु) गार्डन, हशू वाध्वाणी, साई आत्माराम, वासुदेव गार्डन, कैलाशवासी मोहरमल, प्लॉट क्रं क्त९ह्व, बाल शिवाजी गार्डन | ५००० | ५००० | १३००० |
| | | | | | ९ | प्रशिक्षण व अभ्यास दौरा | १००० | १०० | ५०० |
| | | | | | १० | वृक्ष तोडण्यासाठी अनामत रक्कम परतावा | १०० | ५० | १०० |
| | | | | | ११ | वृक्ष तोडणे | १००० | १०० | १००० |
| | एकूण | १३०४५० | ७४२२५ | १०३६१३ | | एकूण | १३०४५० | ७४२२५ | १०३६१३ |

उद्यानांची देखभाल दुरूस्तीसाठी माळी, पहारेकरी, मजूर इत्यादी कर्मचाऱ्यांची अपूरी संख्या पाहता असे खाजगी कर्मचारी नेमण्यासाठी निवीदा कार्यवाही करून अभिकर्ता नेमावा.

वृक्षप्राधिकरण सदस्यांनी सुचिविलेली उद्यानांची खालील खर्चाची कामे उपरोक्त अंदाजपत्रकाकडुन प्रस्तावित करण्यात आले आहेत.

| अ.क्रं. | तपशिल |
|---|---|
| १ | गोलमैदान, उल्हासनगर—२ येथिल उद्यानाचे नुतनिकरण करणे. |
| २ | रोटरी, उल्हासनगर—३ येथिल उद्यानाचे नुतनिकरण करणे. |
| ३ | नेताजी, उल्हासनगर —४ येथिल उद्यानाचे नुतनिकरण करणे. |
| ४ | स्वामी बोधराज, उल्हासनगर —५ येथिल उद्यानाचे नुतनिकरण करणे. |
| ५ | मनपा (मु), उल्हासनगर—३ येथिल उद्यानाचे नुतनिकरण करण |
| ६ | सपना, उल्हासनगर—२ येथिल उद्यानाचे नुतनिकरण करणे. |
| ७ | दशहरा, उल्हासनगर—५ येथिल उद्यानाचे नुतनिकरण करणे. |
| ८ | जिजामाता, उल्हासनगर—५ येथिल उद्यानाचे नुतनिकरण करणे. |
| ९ | हशू आडवाणी, उल्हासनगर—५ येथिल उद्यानाचे नुतनिकरण करणे. |
| १० | साई आत्माराम उद्यान, उल्हासनगर—५ येथिल उद्यानाचे नुतनिकरण करणे. |
| ११ | वासुदेव गार्डन, उल्हासनगर—२ येथिल येथिल उद्यानाचे नुतनिकरण करणे. |
| १२ | कैलाशवासी मोरन्दमल, उल्हासनगर—२ येथिल उद्यानाचे नुतनिकरण करणे. |
| १३ | प्लॉट क्रं ७०५, उल्हासनगर—२. येथिल उद्यानाचे नुतनिकरणाचे काम करणे. |
| १४ | बाल शिवाजी, उल्हासनगर—१, येथिल उद्यानाचे नुतनिकरण करणे. |
| १५ | बैरक क्रं ५८६ राम मालिश वाला ओटी उल्हासनगर २, येथे नवीन गार्डन बनविणे |
| १६ | शांतीनगर शमशान भूमी मागे येथे नवीन गार्डन बनविणे |

**महापालिकेचे सन २०१५—१६ चे सुधारित अंदाज :**

सन २०१५—१६ करिता उत्पन्न रुपये ३८८.७६ कोटी व रुपये ३७७.५२ कोटी खर्चाच्या सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजास मान्यता देत आहे.

**महापालिकेचे सन २०१६—१७ चे अदाज :**

स्थानिक संस्था कर, मालमत्ता कर, पाणी पुरवठा व इतर थकबाकी या सर्व बाबी लक्षात घेता आयुक्तांनी वर्ष २०१६—१७ करिता उत्पन्न व खर्चाचे जे अंदाज सादर केले आहेत ते पुढील प्रमाणे फेरफार करून मंजुर करण्यास शिफारस करण्यात येत आहे. (अडे हजारात)

| पान क्रमांक | उत्पन्न (आयुक्तांचे अंदाज) | 5356970 | खर्च (आयुक्तांचे अंदाज) | 6072976 | पान क्रमांक |
|---|---|---|---|---|---|

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| 1 | स्थानिक संस्था कर | +700000 | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा (प्रभाग —१) | +9900 | 17 |
| 2 | बांधकाम परवाना व नकाशे छाननी फी | +400000 | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा (प्रभाग —१)(दुर्बल घटक) | +11000 | 17 |
| 2 | पायाभूत सुविधा निधी | +190000 | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा (प्रभाग —२) | +11000 | 17 |
| 6 | महापालिका मालमत्ता विनियोग | +290000 | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा (प्रभाग —२)(दुर्बल घटक) | +9900 | 18 |
| 33 | पाणी बीले वसुली (पा. पु.) | +100000 | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा (प्रभाग —३) | +11000 | 18 |
| 33 | पाणी बीले वसुली (कर) | +165000 | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा (प्रभाग —३)(दुर्बल घटक) | +9900 | 18 |
| | | | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा (प्रभाग —४) | +13200 | 18 |
| | | | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा (प्रभाग —४)(दुर्बल घटक) | +9900 | 18 |
| | | | महापौर निधी | +17500 | 23 |
| | | | उप महापौर निधी | +10000 | 23 |
| | | | स्थायी समिती सभापती निधी | +10000 | 23 |
| | | | नगरसेवक निधी | +40300 | 23 |
| | | | नगरसेवक निधी (दुर्बल घटक) | +29600 | 23 |
| | | | नविन रस्ते (सिमेंट कॉंक्रीट) | +560000 | 23 |
| | | | स्थायी समिती सदस्य निधी | +32000 | 25 |
| | | | सभागृह नेता | +5000 | 26 |
| | | | विरोधी पक्ष नेता | +5000 | 26 |
| | | | गटनेता | +20000 | 26 |
| | | | प्रभाग समिती सभापती निधी | +20000 | 26 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | व्ही.टी.सी. क्रिडा संकूल विकास व मा. बाळासाहेब ठाकरे स्मारक बांधणे. | +50000 | 25 |
| | | | समाजमंदिर, वेलकम गेट, यात्री निवास स्पोर्टस कॉम्पलेक्स इ. नुतनीकरण करणे | +10000 | 22 |
| | | | पुतळे बसविणे | +5000 | 23 |
| | | | गलिच्छ वस्त्यात विकास कार्य | +50000 | २३ |
| | | | दुर्भल घटक वसाहतीत विकास कार्य | +50000 | २३ |
| | | | सांस्कृतिक कार्यक्रम | +5000 | १६ |
| | | | नाला व गटार सफाइ खर्च | +18000 | ४० |
| | | | उल्हास नदीवर बंधारा बांधणे | +30000 | ४४ |
| | | | पाणी प्रकल्पासाठी जमीन खरेदी करणे | +10000 | ४३ |
| | | | घनकचरा व्यवस्थापनासाठी जागा विकत घेणे | +10000 | २१ |
| | | | विहिर दुरूस्ती | +20000 | ३९ |
| | | | जलवाहिनी दुरूस्ती | +15000 | ३८ |
| | | | इंधन विहरी | +15000 | ४३ |
| | **एकुण** | **7201970** | **एकुण** | **7196176** | |
| | | | **अखेरची शिल्लक** | **5794** | |

उत्पन्न : **7201970**

**खर्च : 7196176**

**अखेरची शिल्लक : 5794**

**नागरी घनकचरा व्यवस्थापनासाठी व सांडपाणी प्रकल्पासाठी भांडवली खर्चामधून २५ टक्के तरतूदी बाबत** :——

पर्यावरण (संरक्षण) कायदा १९८६, नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम २००० व जल (प्रदुषण प्रतिबंधक नियंत्रण) अधिनियम १९७४ मधील प्राप्त अधिकारानुसार महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून जारी करण्यात आलेल्या निदेर्शांच्या अनुषंगाने नागरी घन कचरा व्यवस्थापनासाठी व सांडपाणी प्रकल्प इत्यादीसाठी वर्ष २०१६—१७ चे अंदाजपत्रकात पुढील प्रमाणे तरतूद करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

(आकडे हजारात)

| अ.क्र. | तपशिल | रक्कम |
|---|---|---|
| १ | शहर स्वच्छता आराखडा अंतर्गत घनकचरा प्रकल्पासाठी जमिन विकास | १०००० |
| २ | शहर स्वच्छता आराखडा अंतर्गत कच—यावर प्रक्रिया प्रकल्प राबविणे | २०००० |
| ३ | खेमानी नाला विकास | २००००० |
| ४ | वालधुनी नाला विकास | १०००० |
| ५ | भुयारी गटार दुरुस्ती व विकास | ४९५०० |
| ६ | भुयारी गटार नविन योजना | ८९२२०० |
| ७ | शौचालय, नाला व गटार विकास | ९८२०० |
| ८ | घनकचरा व्यवस्थापन व सार्वजनिक आरोग्य | ३०२६५० |
| ९ | सांडपाण्याचे पुनर्चकीकरण | १०००० |
| | एकूण तरतूद | १५९२५५० |

नगरसेवक निधीसाठी करण्यात आलेल्या एकूण तरतूदीमध्ये नामनिर्देशित सदस्यांसाठी प्रत्येकी १५ लाख नगरसेवक निधीचा समावेश आहे.

वर्ष २०१६—१७ चे अंदाजपत्रकातील नमूद असलेल्या विविध लेखा शीर्षातून हाती घेण्यात आलेली कामे प्राधान्याने पुर्ण करण्यात यावे तसेच खालील नविन कामे हाती घेण्यात यावे.

| अ.क्र. | तपशील | रक्कम |
|---|---|---|
| १ | विठ्ठलवाडी से शांतीनगर डॉल्फीन | ३ कोटी |
| २ | नेहरु चौक ते फारवर लाईन | ८ कोटी |
| ३ | आशा कोल्ड्रीक ते पोलीस स्टेशन , बस स्टॉप, उल्हासनगर—१ | ३ कोटी |
| ४ | श्रीराम, आनंद दिघे प्रवेशव्दार | २ कोटी |
| ५ | खेमानी ते बजरंग आईस फॅक्टरी | ५ कोटी |
| ६ | उल्हास स्टेशन ते जिजामाता व्हाया सावरकर चौक | ५ कोटी |

| | | |
|---|---|---|
| ७ | नेताजी स्कूल ते लालचक्की, उल्हासनगर—५ | ५ कोटी |
| ८ | सी.ब्लॉक ते शांतीनगर<br><br>साईबाबा डॉल्फीन व्हाया | १० कोटी |
| ९ | गणेशनगर शिवसेना शाखा ते स्वामी शांतीप्रकाश पुतळा, उल्हासनगर—५ | ८ कोटी |
| १० | कल्याण अंबरनाथ रोड | २० कोटी |
| ११ | शिवाजी महाराज पुतळा नुतनीकरण | ५१ लाख |
| १२ | बाबासाहेब आंबेडकर १२५ वी जयंती | ५१ लाख |
| १३ | शिवाजी महाराज पुतळा नुतनीकरण, राजा गेमनानी हाउस | १० लाख |
| १४ | शहाड स्टेशन से महानगरपालिका व्हाया सी.ब्लॉक रोड, साईड ड्रेन आणि फुटपाथ | ७ कोटी |
| १५ | नाला सफाई | ३ कोटी |
| १६ | रमेश मुकने हाऊस ते शास्त्री नगर | १.५० कोटी |
| १७ | मधुबन होटेल ते हिरा मॅरंज हॉल सिमेंट कॉक्रीटीकरण रोड बनविणे | ५० लाख |
| १८ | व्ही. टी. सी. क्रिडा संकुल विकास व मा. बालासाहेब ठाकरे स्मारक बांधणे | १० कोटी |
| १९ | दुध नाका ते स्वामी शांतीप्रकाश आश्रम सिमेंट कॉक्रीटीकरण रोड बनविणे | १.५० कोटी |
| २० | नाना नानी गार्डन, ४४४ गार्डन समोर, धनराज गार्डन,<br><br>नेहरु नगर गार्डन, आनंद दिघे गार्डन, आजी आजोबा पार्क, तक्षशिला पाण्याच्या टाकी समोर, लिला चौक बिल्डीगच्या बाजुजा, लोकशाहीर अण्णाभाउ साठे उदयान, उ.न.५, राजीव गांधी उदयान, इंदिरा गांधी गार्डन, रामरख्यानी गार्डन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर उदयान, कुर्ला कॅम्प, उल्हासनगर—४, इंदिरा गांधी गार्डन, गोल मैदान महिला उदयान. | अंदाजपत्रकात उदयाने या लेखाशीर्षखाली तरतूद<br><br>करण्यात आली आहे. |
| २१ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिका उभारणे | शिक्षण मंडळाच्या सन २०१६—१७ च्या अंदाजपत्रकात ष्नवीन शाळेच्या इमारती बनविणेष या लेखाखाली तरतूद उपलब्ध आहे |

अंदाजपत्रक छापून प्रत्येक पालिका सदस्यास प्रत पाठविण्याची व्यवस्था मुख्य लेखा अधिकारी करतील व छापील अंदाजपत्रक या ठरावाचा भाग मानला जाईल.

**सुचकाची सही /—**

अनुमोदकाची सही /—

<u>सर्वानुमते</u>

सभापती /पीठासीन अधिकारी

स्थायी समिती

उल्हासनगर महानगरपालिका

---

सांयकाळी ५.१० वाजंता सभेचे कामकाज संपल्याचे पीठासीन अधिकारी, श्री. जमनादास पुरस्वानी यांनी जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी )

महापालिका सचिव

उल्हासनगर महानगरपालिका

.

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:—१४/३/२०१६

दि. १४/३/२०१६ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवत्त.

१२

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा दिनांक १४/३/२०१६ रोजी दुपारी ३.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्रीमती शंकुतला जीवनलाल जग्यासी | सदस्या |
| २ | डॉ. महेश गजानन गावडे | सदस्य |
| ३ | श्री. भगवान शंकर भालेराव | सदस्य |
| ४ | श्रीमती. इसरद सऊद खान | सदस्या |
| ५ | श्रीमती. मिनु राज दासानी | सदस्या |
| ६ | श्री.राजेश नानीकराम वदारिया | सदस्य |
| ७ | श्रीमती लिलाबाई आशान | सदस्या |
| ८ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर | सदस्य |
| ९ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे | सदस्य |
| १० | श्री. गुरुनो भिकोमल वलेचा | सदस्य |
| ११ | श्री. जमनादास पुरस्वानी | सदस्य |
| १२ | श्रीमती अंजली साळवे | सदस्या |

तर,

१. सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा

व

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

२. श्रीमती. राजश्री राजेंद्र चौधरी, ३. श्री. उमेश सुरेश कालानी, ४. श्रीमती आशा जिवन इदनानी

खालील अधिकारी सभेस हजर होते.

४५. श्री. श्रीधर पाटणकर, अतिरीक्त आयुक्त
४६. श्री. नितीन कापडनीस, उप–आयुक्त, मुख्यालय
४७. सौ. प्राजक्ता मि. कुलकर्णी, महापालिका सचिव
४८. श्री. जमीर लेंगरेकर,उप–आयुक्त
४९. श्री. सुखदेव बलमे, मुख्य लेखा परिक्षक
५०. श्री. वेखंडे, सहा. मुख्य लेखा परिक्षक
५१. श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
५२. डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी
५३. श्री. शैलेश दोंदे, प्र. कर निर्धारक व संकलक
५४. श्री. बाळु नेटके, प्र. सुरक्षा अधिकारी
५५. श्री. विनोद केणे, प्र. स्वच्छता निरिक्षक
५६. श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक
५७. श्री. मनोज जाधव, लिपिक, पाणी पुरवठा विभाग
५८. श्री. सतीश दोंदे, लिपिक, पाणी पुरवठा विभाग

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.

१. श्रीमती मनिषा महाजन

२. श्रीमती नर्गिस खान

३. श्री. अशोक रामरख्यानी

४. श्री. रवि दंडगव्हाळ

दुपारी ३.२५ वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

<u>महापालिका सचिव :–</u> आज सभापती महोदया अनुपस्थितीत आहेत, त्यामुळे आपल्यातील एखादया सदस्याने पीठासीन अधिकारी म्हणुन आसनस्थ व्हावे.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :–</u>मी सभापती स्थानी श्री. जमनादास पुरस्वानी यांचे नाव सुचवित आहे.

**यावेळी श्री. जमनादास पुरस्वानी हे स्थायी समिती सभापती स्थानी पीठासीन अधिकारी म्हणुन आसनस्थ झाले.**

<u>महापालिका सचिव :–</u>एक बोअरवेल संदर्भात आयत्यावेळचा विषय आलेला आहे.

<u>पीठासीन अधिकारी, श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>विषय समावेश करावा.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>सदरचा विषय समावेश करावा.

<u>महापालिका सचिवः—</u>विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>एक मिनिट ही सभा अवैध आहे. ही सूचना मला आज मिळाली. ३ दिवस आधी सूचना दिली पाहिजे.

<u>महापालिका सचिव :—</u>सर्वांना ३ दिवस आधीच सूचना देण्यात आली आहे.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>आम्हांला ३ दिवस आधी सूचना मिळाली.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>मी माझे म्हणत आहे, तुमचे नाही. मला सभा सूचना आज प्राप्त झाली आहे.

<u>महापालिका सचिव :—</u> आमच्याकडे सही आहे.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>तुम्ही मध्ये बोलु नका, मला प्रथम बोलु दया.

<u>पीठासीन अधिकारी, श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>महोदया सदस्यांना प्रथम बोलु दया, मग आपण बोलावे.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>माझे असे म्हणणे आहे की, १.०० वाजता स्थायी समितीमधुन मला श्री. राजु म्हणुन आहेत त्यांचा फोन आला होता. त्यांनी म्हटले की ३.०० वाजता स्थायी समितीची सभा आहे. त्यांना मी म्हटले की सभा सूचनाच मला मिळाली नाही. तर मी त्यांना म्हटले की, तुम्ही मा. सभापती महोदया व सचिव महोदयांना सूचना दया की मला सभा सूचना मिळाली नाही व मी स्थायी समितीमध्ये असे बोलेल. त्यानंतर सचिव महोदयांचा मला फोन आला त्यांनी म्हटले की, आम्ही आपल्या वॉचमनजवळ सभा सूचना दिली आहे. जर आपण वॉचमनजवळ सूचना दिली तर ती तर पोच झालीच नाही. कोणत्या वॉचमनजवळ दिले? आमच्या कॉम्पलेक्समध्ये चार इमारती आहेत, तीन बंगले आहेत. आपण घरी पोहचवत नाहीत, खाली कोणीही उभा आहे, त्यास दिले जाते. माझ्या सोबत असे दोन वेळा झाले आहे, त्यापुर्वी मी हा मुद्दा उचलला नाही. ही सभा माझ्यामते बेकायदेशीर आहे. आता आपणांस काय म्हणायचे आहे ते सांगावे.

<u>महापालिका सचिव :—</u>मा. सभापती महोदय, माझ्या शिपायांनी सभा सूचना वॉचमनला दिली, नेहमीप्रमाणे वॉचमन सभा सूचना घेतात. त्यांच्या मिसेसला सभा सूचना मिळाली असे त्या म्हणाल्या.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>दुसरी गोष्ट म्हणजे, सदस्यांनी ई—मेल आयडी दिलेले आहेत, त्यावर सुध्दा सभा सूचना दिली जात नाही.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>आम्हांला कॉम्प्युटर येत नाही. आम्ही अनाडी आहोत आम्हांला कोठे ई—मेल आयडी उघडता येईल? आम्हांला तर सभा सूचना मिळते.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>आमचा ई—मेलआयडी यांना दिला आहे तर त्यावर त्यांनी सूचना पाठवावी.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>एक काम करा यांना जेथे पाहिजे तेथे सूचना देण्यात यावी.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>घरात पोहवावे ना, वॉचमनला का दयावे? ही सभा बेकायदेशीर आहे, आपण इतिवृत्तांतात लिहा, आपण जे काही पारीत करणार त्याचा आम्ही पाठपुरावा करणार, कोर्टात जावे लागले तर कोर्टात जावु. जेथे लिगली सल्ला भेटेल तेथे आम्ही जाणार. परत दुपारी त्यांनी दुस—या सभा सूचनेची प्रत पाठविली आहे. जर तुम्ही मला प्रत पाठविली आहे तर पुन्हा पाठविण्याची काय आवश्यकता होती?

<u>महापालिका सचिव :—</u>ती स्थगित महासभेची सूचना होती. आणि ती स्थायी समितीची नव्हती.

<u>पीठासीन अधिकारी, श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>सन्माननिय सदस्य, श्री. राजेश वदारियाजी, जसे महापालिका सचिव महोदयांनी म्हटले आहे की जर त्यांच्याकडुन चुक झाली आहे तर पुढील वेळेस अशी चुक होणार नाही. त्या घरात आपणांस पुढील वेळेस पोहचवुन देणार. एका छोटयाश्या चुकीमुळे, आपण एक सृजाणव्यक्ती आहात तर मला नाही वाटत एवढयाश्या चुकीमुळे आपण एवढी चर्चा करणार. संपुर्ण सभागृह आपणांस विनंती करत आहे की यापुढे सभा सूचना आपल्या घरी येईल, जर यानंतर अशा प्रकारचे कार्य झाले तर आम्ही ही सभा चालवु देणार नाही.

<u>महापालिका सचिव :—</u>नियमानुसार सभा सूचना पोस्टाने पाठवायचे आहे, तरी सुध्दा आम्ही घरोघरी पोहचवत असतो. जर संध्याकाळी उशिर होत असेल तर आम्ही दुस—या दिवशी सभा सूचना पोहचवु अशी आम्हांला नाहीतर सवलत दयावी. शिपाई ६ वाजेनंतर सभा सूचना वाटायला निघतात. त्यानंतर ११—१२ वाजेपर्यंत शिपाई सभा सूचना वाटत असतात. आपण जर विषय लवकर दिलेत तर लवकरात लवकर सभा सूचना मिळु शकते.

<u>पीठासीन अधिकारी, श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>ठिक आहे. सभागृहातील सर्व सदस्य, एक विषय आहे, तो आरटीओचा आहे. त्यातील एक लोकप्रतिनधी येथे आला आहे. तो येथे आत येवु इच्छितो तर त्यास बोलवावे काय?

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**जेव्हा त्यांचा विषय येईल तेव्हाच त्यांना आत बोलवा.

**महापालिका सचिव :—**विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. १ :—** मा. स्थायी समिती ठराव क्र. ६ दिनांक ३०/४/९७ या ठरावामध्ये अंशत: बदल करणे.

---

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**ठराव क्र. ६ कोठे आहे? ठिक आहे, श्री. सुपाळे साहेबांचा विषय आहे. ठिक आहे. पास करावा.

**सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—**ठराव पारीत करण्यांत यावा.

**महापालिका सचिव :—**मी ठराव वाचुन दाखविते.

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे ''पुर्वीच्या ठरावात नमूद असलेले संबंधिताकडे स्वत:चे वाहन असेल तरच वाहन प्रतिपुर्ती भत्ता मंजुर होईल'', यात पुढीलप्रमाणे बदल करणेस मान्यता देत आहे.

''संबंधीत व्यक्तीच्या कुटूंबाची व्याख्या स्पष्ट करून रक्ताचे नाते उदा पत्नी, मुलगा व मुलगी (अविवाहीत) यांचे नावे वाहन असल्यास संबधीतास वाहन प्रतीपुर्ती भत्ता मंजुर होईल. ''

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**येथे अविवाहीत मुलगा कशासाठी मुलगा तर मुलगा आहे ना?

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**अविवाहीत मुलगा नाही म्हटले, मुलगी अविवाहीत.

**सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—**अविवाहीत कसासाठी लिहीले? ते काढुन टाकण्यात यावे.

**महापालिका सचिव :—**ठिक आहे.

**पीठासीन अधिकारी, श्री. जमनादास पुरस्वानी :—**सदरचा विषय इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पास करावा.

**काही सदस्य :—**पास—पास......

<u>पीठासीन अधिकारी, श्री. जमनादास पुरस्वानी :–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १:–** मा. स्थायी समिती ठराव क्र. ६ दिनांक ३०/४/९७ या ठरावामध्ये अंशतः बदल करणे.

<u>प्रस्तावना</u>

उपरोक्त विषयान्वये वाहन प्रर्तीपुर्ती भत्ता अदा करण्या बाबत मा. स्थायी समिती ठराव क्र. ६ दिनांक ३०/४/९७ अन्वये हि योजना पूर्णपणे ऐच्छीक असुन जर संबधिताकडे स्वतःचे वाहन असेल तरच वाहन प्रतीपुर्ती भत्ता मंजुर होईल असे नमुद करण्यात आलेले आहे. तसेच अजमितीस संबधीताकडे वाहन नसेल तर, योग्य असे वाहन ज्या दिवशी खरेदी करतील त्या दिवसापासुन वाहन प्रतीपुर्ती अदा करण्यात येईल असा ठराव क्र. ६ दि. ३०/४/१९९७ रोजी मा. स्थायी समिती मध्ये पारित करण्यात आलेला आहे.

मा. श्री विजय खंडू सुपाळे सभापती शिक्षण समिती यांनी वाहन प्रतीपुर्ती भत्ता मिळण्यासाठी वाहन विभागा मध्ये पत्र व्यवहार केला व वाहना वापराबाबतची कागदपत्रे सादर केलेली आहेत ती तपासली असता वापरात असलेले वाहन हे त्यांच्या नावे नसुन त्यांच्या मुलाच्या नावे असल्याचे आढळून आलेले आहे. मुलाने वाहना संबधी कधीही रदद न होणारे कुलमुखत्यरपत्र (Power of Attorney) लिहून दिलेले आहे. परंतु सदरचे वाहन हे सभापती श्री सुपाळे यांचे नावे नसल्याने त्यांना वाहन प्रतीपुर्ती देण्यात यावा किंवा कसे या बाबत मा.स्थायी समिती ठराव क्र ८५ दि २७/१/२०१६ अन्वये सादर केले असता मा.स्थायी समितीने वाहन प्रतीपुर्ती बाबत ठराव क्र. ६ दिनांक ३०/४/१९९७ मध्ये अंशतः बदल करणे बाबतच्या सुचना दिलेल्या आहेत. त्यानुसार मा.स्थायी समिती ठराव क्र.६ दिनांक ३०/४/९७ च्या ठरावामध्ये अंशतः बदल समितीच्या सुचणेप्रमाणे करण्यास प्रस्तावित करण्यात येत आहे. कुटूंबाची व्याख्या स्पष्ट करून रक्ताचे नाते उदा पत्नी, अविवाहीत मुलगा,मुलगी यांचे नावे वाहन असल्यास संबधीतास वाहन प्रतीपुर्ती भत्ता अदा करण्यास हरकत नाही असा ठराव पारित करण्यासाठी मा. स्थायी समिती पुढे प्रस्तावीत करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्रः</u> ९८ <u>दिनांकः–१४/३/२०१६</u>

सुचकाचे नाव :– श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :– श्री. सुनिल सुर्वे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे ''पुर्वीच्या ठरावात नमूद असलेले संबंधिताकडे स्वत:चे वाहन असेल तरच वाहन प्रतिपुर्ती भत्ता मंजुर होईल'', यात पुढीलप्रमाणे बदल करणेस मान्यता देत आहे.

''संबंधीत व्यक्तीच्या कुटूंबाची व्याख्या स्पष्ट करून रक्ताचे नाते उदा पत्नी, मुलगा व मुलगी (अविवाहीत) यांचे नावे वाहन असल्यास संबधीतास वाहन प्रतीपुर्ती भत्ता मंजुर होईल. ''

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. २ वाचुन दाखवितात

**विषय क्र. २ :—** उल्हासनगर महानगरपालिकेच्या वाहन विभागा अंतर्गत ई निविदा प्रक्रियाद्वारे सिव्हरेज लाईन क्लिनीग व संक्शन मशिन हे नविन वाहन खरेदी करण्यासाठी कमी दराच्या निविदेस मान्यता देणे.

<u>काही सदस्य:—</u>पास,पास.......

<u>सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा :—</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑

**विषय क्र. २** :–उल्हासनगर महानगरपालिकेच्या वाहन विभागा अंतर्गत ई निविदा प्रक्रियाद्वारे सिव्हरेज लाईन क्लिनीग व संक्शन मशिन हे नविन वाहन खरेदी करण्यासाठी कमी दराच्या निविदेस मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील भुयारी गटार योजना देखभाल दुरूस्ती अंतर्गत शहरातील ड्रेनेज चेंबरर्सचे चोकअप काढण्याचे काम वाहन क्र एम.एच ०५–२७६०,एम.एच ०५–एन ५३, एम.एच ०५–एन ७४, एम.एच ०५–एन २१६ या वाहनाद्वारे (एस.एल.सी.एम) काम करण्यात येते परंतु एम.एच०५ –२७६० हे सन १९९८साली खरेदी केली असल्याने हे वाहन सतत नादुरूस्त होते. त्यामुळे या वाहनाची वारवार दुरूस्ती करून घ्यावी लागते. सदर वाहननिविदेचा वाहन पुरविणे कामी लागणारा रू.३८,३१,३२७/– हा खर्च सन २०१५–२०१६ याच्या लेखा शिर्ष CC(3) PART II या मधुन खर्च करण्यात येणार आहे. सबब याकरीता सिव्हरेज लाईन क्लिनीग मशिन संक्शन (जेटींग व सक्शन) नविन वाहन खरेदी करण्यासाठी ई निविदा प्रक्रियाद्वारे या कामाकरिता २ लिफाफा पध्दतीने ठेकेदार/मक्तेदार यांचेकडून निविदा मागविण्यात आल्या होत्या त्याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्राकलनीय खर्च | रु. ३८,३१,३२७/– |
| २ | निविदा प्रसिध्द केलेली वर्तमानपत्रे | १)दैनिक फ्रि प्रेस जनर्रल, २)दैनिक लोकमत, ३)दैनिक उल्हास विकास |
| ३ | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक १६/११/२०१५ ते दिनांक १७/११/२०१५ |
| ४ | निविदा विक्री कालावधी | दिनांक १७/११/२०१५ ते दिनांक९/१२/२०१५ |
| ५ | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक ११/११/२०१५ ते दिनांक १४/१२/२०१५ |
| ६ | निविदेचा तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | दिनांक १४/१२/२०१५ ते दिनांक १६/१२/२०१५ |
| ७ | निविदेचा आर्थिक भाग उघडण्याचा दिनांक | दिनांक १४/१२/२०१५ ते दिनांक १६/१२/२०१५ |
| ८ | विक्री केलेल्या निविदांची संख्या | २ |
| ९ | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | २ |

दिनांक १४/०१/२०१६रोजी मा.अतिरिक्त आयुक्त सो.,मा.मुख्य लेखा परिक्षक,उप आयुक्त (वाहन), यांचे उपस्थितीत **उल्हासनगर महानगरपालिकेच्या सिव्हरेज लाईन क्लिनीग मशिन संक्शन (जेटींग व संक्शन) वाहन खरेदी बाबतचे** या कामाच्या निविदेचा भाग–१ लिफाफा उघडण्यात आला त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ. क्र. | निविदाकाराच्या निविदेमधील बाबी | में.श्री साई फायबर्स | में.मिरा स्टिल फॅब्रीकेशन ॲन्ड फयबर्स |
|---|---|---|---|
| १ | EMD (Earnest money deposit) | होय | होय |
| २ | संस्था नोंदणी प्रमाणपत्र | होय | होय |
| ३ | २५ नग सिव्हरेज संक्शन व जेटींग मशिन पुरवढा केल्या बाबतचा तीन वर्षाचा दाखला. | होय | होय |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | ५ कोटीचा रू प्रति वर्षाप्रमाणे वार्षिक उलाढाल केल्याबाबतचे प्रमाण पत्र | होय | होय |
| ५ | बॅकेचे १ कोटी रू एपतदारी प्रमाणपत्र | होय | होय |
| ६ | Copy of Pan Card | होय | होय |

सदर निविदेची वाहन व्यावस्थापक यांनी छाननी केली असता १) में.श्री साई फायबर्स २)में. मिरा स्टिल फॅब्रीकेशन ॲन्ड फयबर्स यांच्या निविदा अटी शर्तीनुसार असल्याने पात्र आहेत.

तरी उपरोक्त निविदाकांराच्या निविदाचा दुसरा भाग (आर्थिक) दिनांक ०४/०२/२०१६ रोजी मा. अतिरिक्त आयुक्त साो, यांच्या आध्यक्षते खालील निवड समिती सदस्य मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखाअधिकारी, उप आयुक्त (वाहन) यांचे उपस्थितीत उघडण्यात आला. त्याचा तपशिल दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | तपशील | युनीट | निविदा रक्कम | मे.श्री साई फायबर्स | मे. मिरा स्टिल फॅब्रीकेशन ॲन्ड फयबर्स |
|---|---|---|---|---|---|
| | | | रू | दर रू. | दर रू. |
| 1 | Designing,Fabrication,Mounting and Supplying of Sewer Suction cum Jetting Maching of 6000liters on TATA 1109 | 1 | 38,31,327 /- | **44,08,000 /-** | 47,50,000 /- |
| 2 | वाढीव दर % | | | **+ 15 %** | **+ 24 %** |

वरील तुलनात्मक तक्त्यानुसार १) मे. श्री साई फायबर्स, यांनी वाहना संबंधी सादर केलेले दर हे न्युनतम व वाजवी आहेत.परंतु सदर निविदाकाराचे दर हे अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा १५ % जास्त म्हणजेच ४४,०८,०००/— इतका आहे व मे. मिरा स्टिल फॅब्रीकेशन ॲन्ड फयबर्स यांनी सादर केलेले दर अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा २४% जास्त आहे.

मा.आयुक्त सो.यांनी दि १२/२/२०१६ रोजीचे अभिप्रयानुसार सिव्हरेज लाईन क्लिनींग मशिन सक्शंसन (जेटींग व संक्शन) या वाहनाचे बाजारभाव काढण्यासाठी सिलबंद दरपत्रके अटी व शर्तीच्या अधीन राहुन मागविण्यात आल्या होत्या. सदर कामाचा तपशील दिनांकसह जा. क्र. उमपा/वाहन/२१७/१६ दिनांक १८/०२/२०१६ उल्हासनगर महानगरपालिकेच्या नोटीस बोर्डवर लावण्यात आले व नागरी सुविधा केंद्र येथे एक प्रत देण्यात आली.

याचा प्रतिसाद (१) मे. एस.एस इंजिनियर्स पुणे (२) मे. कॅम एविडा इनवायरो इंजिनियर्स प्रा.लि पुणे. (३) मे. पोलिफेब इंजिनियर्स ॲण्ड इटरप्राईजेस अशा एकुण तीन मक्तेदारांनी दरपत्रके वाहन विभागामध्ये दि.२६/०२/२०१६ रोजी दु. ३:०० वाजेपर्यंत सादर केले. तसेच वेळेवर मिळालेल्या तीनही दरपत्रके दिनांक ०१/०३/२०१६ रोजी उघडण्यात आले त्याचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

| अ. क्र | कामाचे स्वरुप | नग | मे.एस.एस इंजिनियर्स पुणे | मे.कॅमएविडा इनवायरो इंजिनियर्स प्रा.लि. पुणे. | मे.पोलिफेब इंजिनियर्स ॲण्ड इटरप्राईजेस |
|---|---|---|---|---|---|
| १ | Truck Chassis TATA LPT 1109-HEX2/36 Cab-BS III is | १ | १४००००० /— | १३९०००० /— | १४००००० /— |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | 6000 Ltrs Capacity Suction Cum Jetting Machine ( Water Capacity (Fresh) 4000 Ltrs& Sludge Compartment 2000 Ltrs) , jurop Spa Italy or Equi Pump for Sludge Block Back, PRATISSLI POMPE spe Italy or Equivalent for Jetting | १ | ३३००००००/— | ३०६४७७८४/— | ३१७५००००/— |
| | Total | | ४७,००,०००/ | ४४,५४,७८४/ | ४५,७५,०००/ |

सदर दराचा तुलनात्मक तक्त्यानुसार मे.कॅम एविडा इनवायरो इंजिनियर्स प्रा.लि पुणे.यांचा दर इतर मक्तेदारांपेक्षा कमी आहे.

तसेच में साई फायबर्स यांच्या दर रू ४४,०८,०००/— व मे.कॅम इविडा इनवायरो इंजिनियर्स प्रा.लि यांचे दर ४४,५४,७८४/— या दोघांनची तुलना केली असता निविदाधारक (में साई फायबर्स ) यांच्या दराची तुलना केली तर मे. कॅम एविडा इनवायरो इंजिनियर्स प्रा.लि.यांचे दर हे १.०५ % पेक्षा जास्त आहे.

यावरून असे दिसुन येते की, नविन वाहन खरेदीसाठी में. साई फायबर्स यांचे दर हे बाजार भावापेक्षा १.०५ % कमी असुन त्यांच्या कमी दराच्या निविदेस मान्यता देणेसाठी सदर प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर सादर.

स्थायी समिती ठराव क्र: ९९ दिनांक:—१४/३/२०१६

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. सुनिल सुर्वे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेच्या वाहन विभागा अंतर्गत ई निविदा प्रक्रियादृवारे सिव्हरेज लाईन क्लिनीग व संक्शन मशिन हे नविन वाहन खरेदी करण्यासाठी मागविलेल्या निविदेतील में. साई फायबर्स यांच्या कमी दराच्या निविदेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

महापालिका सचिव :– विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ३ :–** वाहतुक नियमनासाठी सन २०१५–१६ साठी २५ 'ट्रफिक वॉर्डन' चे अर्थसहाय्यास मंजुरी देणे.

---

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–सदरचा विषय इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करण्यात यावा.

सदस्य श्री. भगवान भालेराव :–जे प्रतिनिधी आले आहेत त्यांना येथे बोलवा.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–होय, त्यांना बोलवा.

सदस्य श्री. राजेश वदारिया :–याबाबत पाणी पुरवठा विभागाचे अभियंता जबाबदार आहेत. जे प्रतिनधी आले आहेत त्यांना आपली ओळख करुन देण्यास सांगावे.

श्री. श्रीकांत दळवे, ट्रफिक प्रतिनिधी:–मी श्रीकांत दळवे, जे बंद झालेले आहे ते ....................

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–ठिक आहे, पास करा, पास करा, इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता ठराव पारीत करण्यात यावा.

सदस्य श्री. भगवान भालेराव :–होय, इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करण्यात यावा.

महापालिका सचिव :–दिनांक ३१/८/२०१६ पर्यंत मुदतवाढ दयायची?

सदस्य श्री. भगवान भालेराव :–होय, पास करा. चार महिने वाढवा.

काही सदस्य :–पास–पास......

पीठासीन अधिकारी, श्री. जमनादास पुरस्वानी :–सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑

**विषय क्र. ३** :— वाहतुक नियमनासाठी सन २०१५—१६ साठी २५ 'ट्रफिक वॉर्डन' चे अर्थसहाय्यास मंजुरी देणे.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिकेकडून मा. स्थायी समिती ठराव क्रं. ७१ दिनांक ०२/०१/२०१५ अन्वये वाहतुक शाखेस उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे २५ ट्रॉफिक वॉर्डन यांना खालील अटी व शर्तींच्या आधारे देय मानधनावरील खर्च अर्थसहाय्य स्वरुपात देणेस मान्यता दिलेली होती.

१) संबंधित २५ ट्रॅफिक वॉर्डन नियुक्ती करण्याची जबाबदारी पोलिस विभागाची राहील.

२) संबंधित २५ ट्रॅफिक वॉर्डन यांना प्रतिमहा रु.४०००/— मानधन महानगरपालिकेतर्फे सहाय्यक पोलिस आयुक्त, शहर वाहतूक शाखा, उल्हासनगर विभाग यांचेकडून देयक प्राप्त झाल्यावर अर्थसहाय्य स्वरुपात देण्यात येईल.

३) २५ ट्रॅफिक वॉर्डन यांचे मानधनापोटी वार्षिक रक्कम रु.१२,००,०००/— खर्च अपेक्षित आहे.सदर खर्च वर्ष २०१५—१६ चे अंदाजपत्रकात सी ५ (६) वाहतूक नियंत्रण या लेखाशिर्षात १.५० कोटी एवढया उपलब्ध तरतूदी मधून करणेस मान्यता मिळणेस मा.स्थायी समिती समोर प्रस्तावित करणेत येत आहे.

४) ट्रॅफिक वॉर्डन यांच्या सेवेचा महानगरपालिकेशी कोणताही संबंध राहणार नाही.

५) ट्रॅफिक वॉर्डन यांना सेवेत असताना काही अपघात झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी पोलिस विभागाची राहिल.

६) याबाबत भविष्यात कोणताही न्यायालयीन वाद उद्‌भवल्यास त्याची जबाबदारी पोलिस विभागाची राहिल.

नियुक्तीचा एक वर्षाचा कार्यकाल दिनांक ३१ ऑगस्ट २०१५ मध्ये संपुष्ठात येत आहे.

या अनुषंगाने मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत सर्व विभाग प्रमुख व पोलिस विभाग यांच्या समवेत वाहतुक समस्या बाबत झालेल्या चर्चेत ट्रॉफिक वार्डन यांची नियुक्तीची वैधता संपल्यामुळे दिनांक ३१/८/२०१६ पर्यत त्यांना अर्थसहाय्य मंजुरी मिळणेबाबत सदर प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र:१०० — दिनांक:—१४/३/२०१६

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. सुनिल सुर्वे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे वाहतुक नियमनासाठी सन २०१५—१६ साठी २५ 'ट्रफिक वॉर्डन' यांना दिनांक ३१/८/२०१६ पर्यत अर्थसहाय्य देणेस मंजुरी देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

**महापालिका सचिव :—** विषय क्रमांक. ४ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र.** ४ :— पूर्वप्राथमिक/माध्यमिक शिक्षण समिती सभापती मा.श्री.विजय खंडू सुपाळे यांनी वाहन प्रतिपुर्ती भत्ता मिळणेस मान्यता देणे.

---

**पीठासीन अधिकारी, श्री. जमनादास पुरस्वानी :—** हा विषय सुध्दा इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करण्यात यावा.

**काही सदस्य :—** पास—पास......

**पीठासीन अधिकारी, श्री. जमनादास पुरस्वानी :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑

**विषय क्र.** ४:— पूर्वप्राथमिक/माध्यमिक शिक्षण समिती सभापती मा.श्री.विजय खंडू सुपाळे यांनी वाहन प्रतिपुर्ती भत्ता मिळणेस मान्यता देणे.

**प्रस्तावना**

मा. सभापती शिक्षण समिती यांना वाहन प्रतिपुर्ती भत्ता मिळणेबाबत पत्राद्वारे कळविले असून त्यांनी वाहन वापराबाबतचे कागदपत्र सादर केले आहे. परंतु वाहनाचे कागदपत्र तपासले असता कागदपत्र त्यांच्या नावे नसुन त्यांच्या मुलाच्या नावे असल्याचे आढळुन आले आहे. त्यासाठी त्यांनी मुलाकडुन कुलमुखत्यपत्र (Power of

Attani) लिहुन दिलेली आहे. तसा बॉन्ड सोबत जोडला आहे. तसेच मा. सभापती श्री. विजय सुपाळे यांनी दिनांक २३/१२/२०१५ रोजी आर.सी.बुक त्यांच्या नावे केल्याचे या विभागात सादर केले आहे. या अनुषंगाने सदर वाहन भत्ता दिनांक २३/१२/२०१५ पासुन दयावा किंवा मा. सभापती नियुक्ती दिनांक ७/८/२०१५ पासुन अदा करण्यात यावा. याबाबत मा. आयुक्त सो. यांनी दिलेल्या आदेशान्वये पुढील कार्यवाही करीता मा. स्थायी समिती समोर सादर.

परंतु वाहन प्रतिपुर्ती भत्ता अदा करण्याबाबत मा. स्थायी समिती ठराव क्र. ६ दिनांक ३०/४/९७ अन्वये ही योजना पूर्णपणे ऐच्छिक असून जर संबंधिताकडे स्वत:चे वाहन असेल तरच वाहन भत्ता मंजुर होईल असे नमुद करण्यात आलेले आहे. तसेच आजमितीस संबंधीतांकडे वाहन नसेल तर योग्य असे वाहन ज्या दिवशी खरेदी करतील त्या दिवसापासुन वाहन भत्ता अदा करण्यात येईल असा ठराव क्र. ६, दिनांक ३०/४/९७ रोजी मा. स्थायी समिती मध्ये पारित करण्यात आलेला आहे परंतु मा. सभापती श्री. विजय सुपाळे यांची ज्या दिवसापासून सभापती निवड झालेली आहे त्या दिवसापासुन वाहन भत्त्याची मागणी करत असल्याने याबाबत पुढील निर्णयासाठी मा. स्थायी समिती समोर मान्यतेस्तव प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र: १०१ दिनांक:—१४/३/२०१६

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. सुनिल सुर्वे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे पूर्वप्राथमिक/माध्यमिक शिक्षण समिती सभापती मा. श्री.विजय खंडू सुपाळे यांना वाहन प्रतिपुर्ती भत्ता देणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

पीठासीन अधिकारी

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र.** ५ :— स्थानिक संस्था कर विभागासाठी ६ सल्लागार नियुक्ती करणेबाबत.

---

**सदस्य श्री. राजेश वदारिया:—**मी आपणांस एक सूचना देतो.

**सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—** आम्हांला हे नको आहेत. बस झाले आता.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**आपणाकडे सक्षम अधिकारी नाहीत काय आपण बाहेरचे घेत आहोत. आम्हांला हे म्हणायचे आहे की आपणाकडे सक्षम अधिकारी नाहीत काय? त्यामुळे सदरचा विषय सर्वानुमते रिजेक्ट करण्यांत यावा, अशी सर्वांना विनंती आहे.

**सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—**नको आहे.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**एक मिनिट, मला माझे विचार मांडु दया नंतर आपणांस काय निर्णय घ्यायचा आहे तो घ्या. आता ज्या व्यापा—यांना नोटिसा दिल्या जातात....

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**बेकायदेशीर आहे.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**आपले ऐकुनच मी बोलत आहे, जर बेकायदेशीर आहे तर त्या विषयावर बोलणार तर बोलतो. आमच्या प्रभारी सभापती महोदयांनी विनंती केली आहे म्हणुन मी मान्य केले. आपणाकडे जेवढे व्यापारी आहेत, ज्यांना आपले रिटर्न्स दाखल करायचे आहेत, त्याचबरोबर तीन वर्ष, चार वर्ष जोपर्यंत एलबीटी सुरु होती, त्याचे ॲसेसमेंट करायचे आहे आणि ते केल्यानंतर अंतिम आदेश असतो, त्यात उल्हासनगर महापालिकेचे उत्पन्न, रिव्हेन्यु वाढेल आणि व्यापा—यांचे सुध्दा विषय संपतील. आज अधिका—यांना सहा, सहा, सात सात वेळा बोलवावे लागते. आधी बोलतात की आपण परचेस रजिस्टर घेवुन या, आणतात ठिक आहे, आता म्हणतात सेल रजिस्टर आणा, सेल रजिस्टर आणले जाते, तिस—या वेळेस सांगतात बिल बुक आणा, ते घेवुन येतात आणि कित्येक वेळा अशा कागदपत्रांची मागणी करतात की व्यापारी ते करुच शकत नाहीत. तरी सुध्दा व्यापारी असहयतेने ते कागदपत्र उपलब्ध करुन देतात. सात सात वेळा तारखा झाल्यानंतर सुध्दा त्याचे प्रकरण अंतिम होत नाही. अशा अडचणी आपले व्यापारी बंधु भोगत आहेत. जर आपण सल्लागार नियुक्त करत आहात तर ॲसेसमेंटचे काम लवकरात लवकर होईल. व यावेळी फायनन्शीअल करन्समध्ये आपली महापालिका फसली आहे, तर महापालिकेस रिव्हेन्युचा एक मार्ग मिळेल. तसेच बाहेर आपणावर जे आरोप लागत आले आहे, तर ते आरोप खरे आहेत कि खोटे आहेत ते समोर येईल.

तर माझी सदस्यांना विनंती आहे की, सांगितलेल्या गोष्टींवर लक्ष दयावे व आपल्या बुध्दीने निर्णय घ्यावे, धन्यवाद।

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>आम्ही महासभेत सुध्दा रिजेक्ट केला आहे तर आता सुध्दा रिजेक्ट करण्यात यावा.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u> नाहीतर मतदान घ्या.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>परंतु याने समस्या वाढेल.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>तुम्ही म्हणतात समस्या वाढेल जर असेसमेंट होणार नाही तर त्यांची समस्या संपेल? ७ वर्षापर्यंत ती केस उघड असेल आणि ७ वर्षानंतर तुमचा कुठलाही अधिकारी येईल तो फाईल उघडेल.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>साहेब, येथे एक अधिकारी होते श्री. प्रकाश कुकरेजा, ते सर्व फाईल ओके करुन देत होते. आता काय कुणी सक्षम अधिकारी नाही काय? कोणी येथे वाचुन आले नाही काय?

<u>श्री. जमीर लेंगरेकर, उप—आयुक्त:—</u>सभापती महोदय, अॅसेसमेंट करणे गरजेचे होते. ही महत्वाची बाब आहे. एलबीटी हा कायदाच समजलेला नाही. हा लेखा पुस्तकांवर आधारीत आहे. व्यापा—यांनी स्वत:च असेसमेंट करायची होती. मागील ३ वर्षाचा आढावा घेतला तर जवळजवळ ९० टक्के व्यापा—यांनी विवरणपत्रात कर भरणा केलेला नाही. निर्धारण करणे आवश्यक आहे. तत्कालीन अधिका—यांनी निर्धारण केल्याचे आढळुन येत नाही. स्थानिक संस्थेचे हे कामकाज करण्यासाठी अशी अधिका—यांची पॅनलची नेमणूक करुन तुम्ही कामकाज करु शकता. महापालिकेची अख्या आस्थापनाची अवस्था पाहता आपणाकडे बरीचशी रिक्त पदे आहेत आणि आपणाकडे सक्षम वर्ग सुध्दा नाही. त्याचबरोबर स्थानिक संस्था कर विभागाच्या अकार्यक्षमतेमुळे किंवा कर्तव्यात कसूर केला म्हणुन तेथिल विभागाच्या तत्कालीन निरिक्षकांवर आपण कारवाई करुन काही निरिक्षकांना निलंबित सुध्दा केले आहे आणि काही निरिक्षकांची खातेनिहाय चौकशी सुध्दा सुरु आहे. त्याकरीता अशा बाबतीत आपण एक जबाबदार म्हणुन निर्णय घ्यावा. व्यापा—यांचाही यामध्ये विचार करावा आणि कायदेशीर बाबी पाहुन आपण मान्य करावे अशी माझी मागणी आहे.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>नाही, नाही, या आधी आपण अधिकारी नियुक्त केला जर अधिकार आहे तर आपण रिअपॉईंट करा ना.

<u>श्री. जमीर लेंगरेकर, उप—आयुक्त:—</u>याचे पुढे सांगतो, ६ महिन्यामध्ये अडीच कोटीच्या आसपास निर्धारण केले आहे.

**<u>सदस्य श्री. महेश गावडे :–</u>**त्याचा परिणाम काय आला? एलबीटीची वसुली किती झाली?

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>**मी असे म्हणतो पुढील सभेत यांना सांगा अहवाल आणण्यास. आता हा विषय वगळण्यात यावा.

**<u>पीठासीन अधिकारी, श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>**आता आपण हा विषय वगळु या. आपण अहवाल आणा. आणि जेव्हापासुन कामावर लागले आहेत, काय काय शहरासाठी केले आहे? किती व्यापारी संतृष्ट झाले?

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>**ॲसेसमेंट किती केली आहे वगैरे. किती प्रकरण काढली आहेत, व त्या प्रकरणात रिकव्हरी किती केली आहे ते महत्वाचे आहे.

**<u>काही सदस्य :–</u>**विषय वगळण्यात यावा.

**<u>पीठासीन अधिकारी, श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र.** ५:– स्थानिक संस्था कर विभागासाठी ६ सल्लागार नियुक्ती करणेबाबत.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात दि. ०१ जुलै २०१२ पासुन स्थानिक संस्था कर प्रणाली अंमलात आली आहे. त्याअनुषंगांने आजपर्यंत १५१२८ व्यापाऱ्यांची नोंदणी करण्यात आलेली अूसन, स्थानिक संस्था कर नियम २०१० चे नियम २९ (२) (ख) अंतर्गत प्रत्येक नोंदणीकृत व्यापाऱ्यांनी आपले व्यवसायासंबंधीचे वार्षिक विवरणपत्र सादर करणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने सन २०१२–१३, २०१३–१४ व २०१४–१५ या आर्थिक वर्षाचे व्यापाऱ्यांनी सादर केलेले वार्षिक विवरणपत्र (E-II) सादर केलेले असून, त्यांचे मुल्यमापन (असेसमेंट) करून स्थानिक संस्था करातील फरक व व्यापाऱ्यांचे खरेदी–विक्री बाबतचे दस्तऐवज तपासणे तसेच ज्या व्यापाऱ्यांनी चुकीची माहिती सादर केलेली आहे अथवा कमी कर भरणा केलेला आहे याबाबतची शहानिशा करणेकामी तज्ञ व अनुभवी अधिका–यांची आवश्यकता आहे.

याबाबतचा गोषवारा दिनांक १४/०५/२०१५ रोजीच्या मा. महासभेच्या पटलावर सादर करण्यात आलेला आहे. परंतू सदरची महासभा तहकुब झालेली असून, पुढील महासभेचे आयोजन होईपर्यंत सदरचा ठराव संमत होण्यास विलंब लागणार असल्यामुळे व स्थानिक संस्था कराची वसुली वाढविण्याच्या दृष्टीने तसेच अशा व्यापा–यांचा फरक वसुल केल्यास महापालिकेच्या उत्पन्नात भरणा पडेल यादृष्टीने मागील तीन वर्षाचे मुल्यमापन करणे अत्यावश्यक आहे.

मा. महासभेच्या मंजुरीसाठी ठेवण्यात आलेल्या गोषवाऱ्याच्या मंजुरीच्या (महासभा ठराव) अधिन राहून मा. आयुक्त यांच्या मंजुरीने सल्लागार या पदाच्या नियुक्तीसाठी अनुभवी सेवानिवृत्त विक्रिकर/आयकर

अधिकारी/सनदी लेखापाल यांचेकडुन वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन सल्लागारांची (पात्र सनदी लेखापाल) नियुक्ती करणेकामी अटी/शर्तीच्या अधिन राहून अर्ज मागविण्यात येते होते.

: **स्थानिक संस्था कर विभागसाठी सल्लागार नियुक्तीबाबतच्या अटी व शर्ती** :

१) जाहिरातीमध्ये नमूद केल्याप्रमाणे ज्या कामांसाठी सल्लागार नियुक्त करावयाचे आहेत, त्या कामासाठी आवश्यक शैक्षणीक पात्रता असलेल्या उमेदवारांनी, स्वसाक्षांकित केलेल्या शैक्षणीक अर्हता व अनुभवांची प्रमाणपत्रे अर्जा सोबत जोडणे आवश्यक आहे. आवश्यकता असल्यास संबंधित सल्लागार व्यक्ती/संस्था यांना प्रत्यक्ष मुलाखतीसाठी बोलाविण्यात येईल त्यावेळी मूळ प्रमाणपत्रांची तपासणी करण्यात येईल.

२) विहित शैक्षणीक अर्हता धारण करणाऱ्या सल्लागारांनी/संस्थांनी दिनांक / / २०१५ पर्यंत जाहिराती मध्ये नमूद केलेल्या वेळेत अर्ज दाखल करावेत.

३) करावयाच्या कामासाठी स्थानिक संस्था कर रक्कमेच्या मर्यादेनुसार महापालिकेने एकत्रित दर निश्चित केलेले आहेत ते खालीलप्रमाणे

| LBT assessed amount (including interest, penalty etc) | Unit | Rate |
|---|---|---|
| Up to Rs. 5000 | Per assessee | 800 |
| From Rs. 5001 to Rs. 50000 | Per assessee | 1260 |
| From Rs. 50001 to Rs. 500000 | Per assessee | 3000 |
| From Rs. 500001 to Rs. 2500000 | Per assessee | 3400 |
| From Rs. 2500001 to Rs. 5000000 | Per assessee | 7250 |
| From 5000001 to Rs. 1 Crore | Per assessee | 12500 |
| Above Rs. 01 Crore | Per assessee | 14000 |

४) वरील दर हे ठरवून दिलेल्या कामासाठी एकत्रितपणे निश्चित केलेले असल्याने ज्या सल्लागारांकडून जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या कामापैकी जे काम करून घेतले जाईल त्या कामासाठी निश्चित केलेल्या एकूण रक्कमेच्या १/३, २/३ किंवा संपूर्ण रक्कम अदा केली जाईल.

५) सल्ला देण्यासाठी ज्या विवरणपत्राच्या नस्ती संबंधितांना उपलब्ध करून देण्यात येतील त्या संदर्भातील कामकाजाच्या नस्ती दिल्यापासून ०८ दिवसांच्या आत पूर्ण करावी लागेल तसे न केल्यास प्रति दिवस रू. ५०/— याप्रमाणे दंड आकारण्यात येईल.

६) कोणत्याही परिस्थितीत विवरणपत्राच्या नस्ती कार्यालयाच्या बाहेर नेता येणार नाहीत किंवा त्यांच्या छायांकीत प्रती काढुन घेता येणार नाही असे केल्याचे आढळून आल्यास त्यांचेवर कायद्यातील विहित तरतूदीप्रमाणे पुढील कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

७) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५२ (म) मधील तरतूदीप्रमाणे सल्लागार यांना दिलेल्या कामाची कोणतीही माहिती अन्य व्यक्तीस/संस्थेस देता येणार नाही असे हमीपत्र द्यावे लागेल.

८) वरील प्रकारच्या कामांसाठी निश्चित केलेली शैक्षणीक अर्हता असलेल्या उमेदवारांनी प्रस्तूत कामकाजासाठी श्रवपदज टमदजनतम करता येईल. मात्र Joint Venture मध्ये अटी व शर्ती या महापालिकेस लागू असलेल्या नियमातील तरतूदींशी व प्रस्तूत कामकाजाच्या अटी व शर्तींशी विसंगत असणार नाहीत.

९) Joint Venture केलेले असल्यास एकापेक्षा जास्त सल्लागार एकत्रितपणे अर्ज करण्यास पात्र असतील.

१०) सल्लागार म्हणून नियुक्ती केल्यास विहित नमुन्यात व विहित रक्कमेच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करून द्यावा लागेल.

११) प्रस्तूत कामामध्ये विवरणपत्रांची छाननी करणे, निर्धारणा आदेश पारित करणे, पुर्ननिर्धारणा करणे, पुर्ननिधारणा आदेश पारित करणे, पुर्ननिर्धारणा आदेशामध्ये दुरूस्ती करणे, अपील प्राप्त झाल्यास त्याची छाननी करणे, त्या संदर्भातील सल्ला देणे, स्थानिक संस्था कर विवरणपत्र धारकांना परतावा मागीतला असल्यास, दिलेला परतावा योग्य आहे किंवा नाही याबाबत सल्ला देणे इत्यादी व इतर त्या अनुषंगाने येणारी इतर सर्व कामे अभिप्रेत आहेत.

१२) संबंधित सल्लागार यांना द्यावयाच्या सल्लागार फी मधून शासनाचे दरांप्रमाणे आवश्यक असलेले सर्व कर व दर यांची कपात करून घेण्यात येईल.

१३) केलेली नियुक्ती पूर्णपणे तात्पूरत्या स्वरूपाची असून, कोणत्याही वेळी सल्ला देण्याबाबतची सेवा खंडित करण्याचे अधिकार महापालिकेचे राहतील. त्याबाबतचे कोणतेही स्पष्टीकरण देणे महापालिकेवर बंधनकारक असणार नाही.

१४) सल्लागार त्यांचे मदतीसाठी त्यांचे कर्मचारी नियुक्त करू शकतील. मात्र त्यापूर्वी अशी नेमणूक करण्यासाठी स्थानिक संस्था कर विभागाकडील उपायुक्त, स्थानिक संस्था कर यांची पूर्व मान्यता घेणे बंधनकारक असेल. सदर कर्मचाऱ्यांनाही स्थानिक संस्था कर कार्यालयातच मुदद्‌ा क्रमांक ७ मध्ये नमूद केल्यानुसार प्रतिज्ञापत्र देऊन कामकाज करावे लागेल.

१५) सल्लागार यांना नेमून दिलेल्या कामकाजासंदर्भातच सल्ला देणे मर्यादित राहील. मात्र दिलेल्या निर्णयावर अंतिम निर्णय घ्यावयाचा अधिकार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम व स्थानिक संस्था कर निमय २०१० मधील तरतूदीप्रमाणे महापालिकेस असतील.

१६) सल्ला देण्यासाठी निश्चित केलेले दर हे सन २०१२–१३, २०१३–१४ व २०१४–१५ या वर्षांच्या विवरणपत्रांची छाननीचे काम पूर्ण होईपर्यंत अंमलात राहतील. त्यामध्ये कोणत्याही प्रकारची दरवाढ केली जाणार नाही.

१७) सल्लागार यांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम व स्थानिक संस्था कर नियम २०१० मधील तरतूदीनुसार वरील दिलेल्या कामकाजासाठी कायद्याशी विसंगत सल्ला देता येणार नाही. अशी बाब निदर्शनास आल्यास संबंधित सल्लागार यांचेवर कायदेशीर कार्यवाही करणे संदर्भात महापालिका उपायुक्त यांचा निर्णय अंतिम असेल.

१८) या संदर्भात कोणतेही प्रकरण न्यायालयांत नेल्यास, याबाबत न्यायालयीन प्रकरणाचा सर्व खर्च संबंधीत सल्लागार यांना करावा लागेल आणि यासाठी उल्हासनगर हेच न्यायालयीन क्षेत्र राहील.

१९) यासाठी नियुक्त केलेल्या सल्लागारांची संख्या निश्चित करण्याचे अधिकार मा. महापालिका आयुक्त यांचे असतील.

२०) या संदर्भातील कोणताही वाद निर्माण झाल्यास मा. महापालिका आयुक्त यांचा निर्णय अंतिम राहील व सदरचा निर्णय दोन्ही पक्षांवर बंधनकारक राहील.

२१) वरिल सर्व अटी मान्य असल्याबाबत व त्याप्रमाणे कामकाज करण्याची तयारी असल्यास संबंधितांनी अर्ज करावेत असे सूचविण्यात येत असून, अर्ज दाखल केल्यानंतर या संदर्भातील कोणतीही तक्रार महापालिकेकडून विचारात घेतली जाणार नाही.

२२) नेमणूक केलेल्या सल्लागारांकडे महापालिका हद्दीतील ज्या व्यापाऱ्यांचे कोणतेही कर विषयक कामकाज असेल त्याची यादी अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहील. तसेच असे नसल्यास त्याबाबतचे हमीपत्र द्यावे लागेल.

२३) उल्हासनगर महापालिकेत सेवा उपलब्ध करून घेतल्यावर, त्या सल्लागार व्यक्ती/संस्था यांना स्थानिक संस्था कर विभागाकडे नोंदणी केलेल्या व्यापाऱ्यांचे स्थानिक संस्था कर संदर्भातील कामकाज करता येणार नाही. सेवा संपूष्टात आल्यावर उल्हासनगर महापालिका क्षेत्रात ०३ वर्षे स्ठण्ज्ञ विषयक काम करदात्याच्या वतीने घेता येणार नाही.

२४) तज्ञ व्यक्ती ज्यात सनदी लेखापाल/वकील/विक्रिकर किंवा उप कर विभागातील निवृत्ती अधिकारी/कर्मचारी/नोंदणीकृत कर सल्लागार मंडळ तयार करणेकामी त्यांची किमान शैक्षणिक पात्रता/अनुभव यांचे निकष निश्चित करावे लागतील. त्यानुसार खालील निष्कर्ष निश्चित करणेत येत आहेत

२४ अ) विक्रिकर/उपकर/निवृत्त अधिकारी/कर्मचारी/नोंदणीकृत कर सल्लागार किमान शिक्षण कोणत्याही शाखेतील पदवी व अनुभव—विक्रिकर/उपकर यांच्या निर्धारणा/ पुर्ननिर्धारणा/दुरुस्ती आदेश आणि अपीले या संदर्भातील कामकाज किमान ४ वर्षाचा अनुभव तसेच अन्वेषण/ अपील व अनुषंगिक कामकाजाचा अनुभव.

२४ ब) सनदी लेखापाल/वकील/नोंदणीकृत कर सल्लागार म्हणुन विक्रिकर/उपकर/ विषयातील निर्धारणा पुर्ननिर्धारणा/दुरुस्ती आदेश आणि अपीले या संदर्भातील कामकाजाचा किमान ४ वर्षाचा अनुभव तसेच अन्वेषण अनूषंगिक कामकाजाचा अनूभव.

यानुषंगाने मा.आयुक्त यांनी सदरची बाब ही महानगरपालिकेच्या अर्थिक हिताची असल्याने सद्यस्थितीत मानधन तत्वावर किमान ६ (सहा) सल्लागार रू १५०००/— मानधनावर नेमण्याची मान्यता दिली असल्याने सहा सल्लागारांना दिनांक ०१ ऑक्टोंबर २०१५ पासुन तात्पुरती नियुक्ती देण्यात आली आहे. सदरची बाब ही मा.स्थायी समितीच्या निदर्शनास तसेच मा. स्थायी समितीकडून मान्यता मिळणेस्तव सादर

<u>स्थायी समिती ठराव क्र:</u> १०१ अ          <u>दिनांक:—१४/३/२०१६</u>

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. भगवान भालेराव

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे स्थानिक संस्था कर विभागासाठी ६ सल्लागार नियुक्ती करणेचा प्रस्ताव या सभेच्या कार्यसूचीवरुन वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— आयत्यावेळे विषय आहेत. विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

---

⇨ आयत्यावेळचा विषय

**विषय क्र. ६**:— उल्हासनगर शहरातील प्रभाग समिती क्र. १ मध्ये असलेल्या पॅनल/वार्ड मध्ये एकुण ५० नविन बोअरवेल घेवुन त्यावर १.५ अश्वशक्तीचा सबमर्सिबल/पाणबुडे पंप बसविणेकामी मे. ए.एम. रामचंदानी, उल्हासनगर—३ या निविदाकाराची निविदा स्विकृत करुन त्यांच्याशी संविदा करणेस मान्यता देणे.

---

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—एका प्रभागात ४ आहेत.

सदस्य श्री. भगवान भालेराव :—एका पॅनलमध्ये ८ आहेत.

पीठासीन अधिकारी, श्री. जमनादास पुरस्वानी :—एका पॅनलमध्ये पाच. हे २०० आहेत, आपणाकडे ४९ पॅनल आहे, त्याप्रमाणे प्रत्येक पॅनवर पाच असेल.

सदस्य श्री. राजेंदसिंह भुल्लर :—३९ आहेत.

पीठासीन अधिकारी, श्री. जमनादास पुरस्वानी :—ठिक आहे, ३९ मधुन ४० पकडा. ५—१ मध्ये तर २०० होतील ना. काल आमची व आयुक्त महोदयांची बैठक झाली होती. त्यात आयुक्त महोदयांनी म्हटले की,

कोणताही निधी, प्रभाग समिती निधी, नगरसेवक निधी जो आम्ही वापरला नसेल तर आपण त्यात दुसरे सुध्दा याच ठेकेदाराकडुन किंवा कोणी ११ टक्के कमी दराने काम करत असेल तर त्याच्याकडुन हे काम करु शकतो.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—एका प्रभागात ४ येणार. होय कोणत्याही ठेकेदाराकडुन करुन घेवु शकतो.

पीठासीन अधिकारी, श्री. जमनादास पुरस्वानी :—हे ठरावात आपण नमुद करु या.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—हे काम किती दिवसात करणार ते सांगा. आज आपण पास करत आहोत. तर २०० किती दिवसात करणार.

सदस्य श्री. महेश गावडे :—त्यांच्या बोअरवेलच्या स्वत:च्या मशिन आहेत काय?

सदस्य श्री. भगवान भालेराव :—निविदा काढतांना तसेच नमुद करावे ना, मशिनसहीत.

सदस्य श्री. महेश गावडे :—उन्हाळा आहे, उन्हाळयात मशिन मिळणार का तुम्हांला?

सदस्य श्री. भगवान भालेराव :—एका मशिनचे दोन बोअरींग असते.

सदस्य श्री. महेश गावडे :—अहो, श्री. सेलवन साहेब, एमआयडीसीची पाईप लाईन फॉरेस्ट नाक्यावरुन तीन वर्ष होवुन गेले तरी आली नाही अजुन.

सदस्या श्रीमती अंजली साळवे:—ही कामे लवकरात लवकर संपले पाहिजे. मागील वर्षाचे बोअरवेलचे काम चालु आहे. एक वर्ष झाले तरी अजुन काम संपले नाही.

सदस्य श्रर. राजेश वदारिया :—आपण किती डायमिटरचा बोर्ड घेतला आहे.

सदस्या श्रीमती अंजली साळवे :—तुम्ही ॲक्शन का घेत नाही? विहीरीचे आहे पाईप टाकुन दुसरीकडे टाकी बसवायची आहे, तर ते सुध्दा काम होत नाही.

सदस्य श्री. महेश गावडे :—श्री. सेलवन साहेब, तुम्ही निविदा काढतांना याचा उल्लेख का नाही केला की स्वत:चे बोअरवेल गाडया वगैरे. आता तुम्हांला उन्हाळयात भाडयाने गाडया मिळतील काय?

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>आपण जे बोअरवेल टाकणार ते किती याचे आहे.

<u>श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा :–</u>ते दिड एच पीचे आहे.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>जे दिड एचपीचे आहे ना ते घरात किंवा इमारतीमध्ये लावतात.

<u>श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा :–</u>जमिनीत जे पाणी आहे ते ६०० लिटरवर येणार आहे. तो जास्त वर येवु शकत नाही.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>एक तासाचे किती होतात?

<u>श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा :–</u>एका तासाचे ६०० लिटर पाणी येणार.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>एक मिनिट माझ्याबरोबर चला, टँकर घेवुन जावु या, ३० हजार लिटरचे टँकर आहे. बोअरवेलमधुन हे २८ लिटरचे पाणी टँकरमध्ये येईल.

<u>श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा :–</u>बोअरमध्ये कमी असेल ना.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>किती एमएमचे डाय आहे?

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :–</u>६ इंचचा बोअर असेल.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>तो ६ इंचचा बोअर असेल ना साहेब. तेव्हा तर विचारत आहे.

<u>सदस्य श्री. महेश गावडे :</u>–एका घरात ५००–६०० लिटर पाणी लागते. पुर्ण दिवस जाईल, १२ लोकांनाच पाणी मिळेल.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>माझ्या प्रभागात एक बोअर केले आहे पॅनल नं. ४४२ मध्ये तर तेथे २ तासानंतर २० सेकंद पाणी देतो आणि बंद होवुन जाते.

<u>पीठासीन अधिकारी, श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>जमिनीला पाणी नसेल.

<u>सदस्य श्री. महेश गावडे :–</u>याची गॅरेंटी काय आहे?

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>गॅरेंटी कमी आहे.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>बोअरचे आपण डाय तर सांगा की एमएम किती आहे? श्री. सेलवन साहेब, किती एमएमचे डाय आहे?

<u>श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा :–</u>याचे ६ इंचाचे बोअर असेल.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>६ इंचाचे असेल ठिक आहे. तर आपल्या माहितीसाठी मी सांगतो, आपणांस तर माहित असेलच, ६ इंच डायची जी मशिन आहे ती छोटया गल्लीत जाणार नाही.

<u>सदस्य श्री. महेश गावडे :–</u>आमच्या स्लम वार्डमध्ये कशी जाणार?

<u>सदस्या श्रीमती अंजली साळवे:–</u>नाही जाणार.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>आमचा काही विभाग झोपडपट्टीचा विभाग आहे, येथे बरेचसे सदस्य आहे त्यांचे संपुर्ण प्रभाग झोपडपट्टीचे आहेत, तर तेथे ६ इंचाची मशिन जावु शकत नाही. ती मोठी मशिन असते. ती जेथे उभी असेल ती तेथेच बोअर करेल. साडे चार इंचाचा जो बोअर असतो तो १०० फुटापर्यंत जावु शकतो.

<u>श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा :–</u>साडे चार इंचाचे सुध्दा आपणाकडे प्राकलन आहे.

<u>सदस्य श्री. महेश गावडे :–</u>तुम्ही निविदा कशी काढली आहे?

<u>श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा :–</u>यामध्ये दोन टाईपचे आहे जे चार इंच केले ते साडे चार इंची होईल आणि जे साडे चार इंचीचे केले तर त्यामध्ये ६ इंचाचा जोडावा लागेल.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>ठिक आहे ना, ६ इंच केले तर ६ इंचीस मोठा पंप लावला पाहिजे आणि ४ इंचाचे केले तर त्यास पंप छोटा लागेल तर चालेल. ६ इंचवाल्याला व ४ इंचवाल्याला सुध्दा दिडचा पंप लागेल.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>एक काम करु या श्री. राजेश भाऊ, ठेकेदारास बोलवु या ना.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>ठेकेदारास काय बोलावायचे साहेब, तांत्रिक व्यक्ती तर हे आहेत ना?

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>तांत्रिक व्यक्ती हे आहेत, जबाबदारी तर यांची आहे ना.

<u>पीठासीन अधिकारी, श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>सभागृहातील सर्व सदस्य, हा अतिशय महत्वाचा तातडीचा विषय आहे.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>होय, परंतु श्री. सेलवन साहेब काय जबाबदारी घेतात, एक महिन्याच्या आत काम होईल ना.

<u>पीठासीन अधिकारी, श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>ठरावात आपण एक लाईन जोडु या, कोणताही नगसेवक...

<u>सदस्य श्री. महेश गावडे :—</u>श्री. सेलवन साहेब नाही करणार, चोपडाच्या वार्डमध्ये एक लिकेज होते तेथे तीन—चार—सहा व्यक्ती मरण पावले काहीच करु शकले नाही. बोअरींगमध्ये नगरसेवक लोक मरतील, कोण जबाबदारी घेणार, लोक घरी येवुन मारतील. त्यापेक्षा बोअरींग नगरसेवकांना दया, चार करुन घेवुन आपणच.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>माझ्या प्रभागात मीच बोअरींग टाकली.

<u>सदस्या श्रीमती अंजली साळवे :—</u>जुने जे बोअरवेल आहेत ते तुम्ही चालु का नाही करुन देत? किती तरी जुने बोअरवेल बंद पडले आहेत.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>साडेचार आणि ६ ची बोअर आहे आणि तुम्ही पंप दिडचाच लावणार आहेत, हे जरा स्पष्ट करा. हा महत्वाचा विषय आहे.

<u>सदस्य श्री. महेश गावडे :—</u>जे पंप खराब झालेले आहेत ते जरा बदलायला आपणाकडे एक एक महिना लागतो, त्याता जर दगड गेले, फ्लश करायला सांगितले तर अधिकारी दोन दोन महिने येत नाहीत. यास कोण जबाबदार आहे? म्हणजे हे नगरपालिकेचे आर्थिक नुकसान आहे की नाही? माझ्या प्रभागात तीन बोअरवेल आहेत, दगड गेले आहेत, मी फ्लश करायला सांगितले दोन दोन महिने अधिकारी येत नाहीत. नुसते नविन निविदा काढत असतात.

<u>सदस्या श्रीमती अंजली साळवे:–</u>आमच्या प्रभागात सुध्दा बोअरवेल बंद पडले आहेत, मी कधीची मागणी केली आहे, तेथिल लोकांना पाण्याचा दुसरा सोर्सच नाही.

<u>सदस्य श्री. महेश गावडे :–</u>का नाही फ्लश केले गेले.

<u>सदस्या श्रीमती अंजली साळवे :–</u>भरत नगर सारख्या विभागात बिल्कुल पाण्याचा सोर्स नाही. त्यांना नळाने पाणी पुरवठा होत नाही, बोअरवेल नाही, काय करायचे मग?

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>यामध्ये फक्त बोअर करायचे नाही तर पॅनल बसवायचे आहे, पंप बसवायचे आहे आणि चालु करुन दयायचे आहे. टाकी बसवायची आहे, चालु करुन पाणी दयायचे आहे.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :–</u>पाणी नाही राहणार तर कोठुन देणार?

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>एकतर मोठी समस्या ही आहे की पाण्याचे मॅनेजमेंट बरोबर नाही, ते बरोबर नसल्याने लोकांना भोगावे लागत आहे, आणि ही लोक समजुन घेत नाहीत. आज १२ दिवस झालेत एमआयडीसी सांगत आहे की, आपले नविन शेडयुल दया.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :–</u>हा विषय संपवु दया नंतर पाण्यावर चर्चा करु.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>या मुद्दयाशीच संबंधीत आहे, हा पाण्याचाच इश्यु आहे ना?

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>हे पहा सभापती महोदय, एक तर हे जबाबदार व्यक्ती नाहीत, त्यांची जबाबदारी घ्या.

<u>सदस्य श्री. महेश गावडे :–</u>त्यांची अंडरटेकिंग घ्या. स्टॅम्प पेपरवर घ्या.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>होय, त्यांची अंडरटेकिंग घ्या. व यांच्यावर कारवाई करा.

<u>सदस्य श्री. महेश गावडे :–</u>एकतर कडक रहावे लागेल.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>यांच्याकडुन अंडरटेकिंग घ्या, हे जबाबदार असतील नाहीतर त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल. पास करा.

<u>सदस्य श्री. महेश गावडे :—</u>काम लवकरात लवकर झाले पाहिजे, एप्रिल, मे नंतर पाण्याची गरज नाही ना कोणाला.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>प्रयत्न करा, लवकर काम झाले पाहिजे.

<u>पीठासीन अधिकारी, श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>आपण हे काम ठेकेदारास देत आहोत. जर कुण्या नगरसेवकाला वाटत असेल आपण स्वत:चे बोरींग करु तर करु शकतो.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>श्री. जमनुजी, जबाबादारी कोण घेणार?

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>श्री. सेलवन साहेब, खुलासा करा जरा.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—</u>खुलासा नाही, जबाबदारी घ्या.

<u>सदस्य श्री. महेश गावडे :—</u>आमच्या प्रभागात फ्लश सुध्दा झाली नाही बोअरवेल.

<u>सदस्या श्रीमती अंजली साळवे:—</u>पहिले दुरुस्त कधी होणार ते सांगा मला. श्री. सेलवन साहेब, किती दिवसात पुर्ण होणार आपल्या बोअरवेल? जुने बोअरवेल बंद आहेत, नविन तर टाकायचीच आहेत आपल्याला. निविदा काढल्या तर काम होईल कधी? पुढील वर्षी काय?

<u>सदस्य श्री. महेश गावडे :—</u>एका महिन्याच्या आत झाले नाही तर आपण ठेकेदारास ब्लॅक लिस्ट करणार?

<u>सदस्य श्री. महेश गावडे :—</u>एका महिन्यात त्याने काम नाही केले तर त्यास काळया यादीत टाकण्यात येईल. मंजुर करा.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—</u>होय काळया यादीत टाकण्यात यावे.

<u>सदस्य श्री. महेश गावडे :—</u>ठेकेदाराने जबाबदारी घ्यायलाच पाहिजे. इंजिनिअरने घ्यावी किंवा ठेकेदाराने घ्यावी. शहराला पाण्याची गरज आहे, नसेल तर ठराव डिफर करावा.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>बाहेरचा जर करत असेल तर प्रत्येक नगरसेवक आपापले करुन घेईल निविदा कसाला काढली मग? निविदेत ज्या अटी आहेत त्याव्यतिरिक्त आणखीन कोणत्या अटी आपण टाकु शकत नाहीत.

<u>सदस्य श्री. महेश गावडे :—</u>श्री. सेलवन साहेब, निविदेमध्ये किती वेळ दिला तुम्ही?

<u>श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा :—</u>एक महिना दिला आहे.

<u>सदस्य श्री. महेश गावडे :—</u>जर एक महिना दिला आहे, तर तुम्हांला हरकत काय? अंडरटेकिंग दया त्या ठेकेदाराचे नाहीतर मग तुम्ही दया. पैसे कमी घेणार आहे का? मग एक महिना दिला तर एक महिन्याचे अंडरटेकिंग घ्या. तुम्ही दया नाहीतर तुमच्या ठेकेदारास सांगा. श्री. सेलवन साहेब, जर बोअरला पाणी नाही लागले तर काय केले तुम्ही? बोअरला पाणी नाही लागले तर काय केली सोय? टॅकर? बोरींगला पाणी नाही लागले तर श्री. सेलवन साहेब, काय करणार?

<u>सदस्या श्रीमती लिलाबाई आशान :—</u>ज्या प्रभागात बोरींगला पाणी नाही लागले तर काय?

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>सहाची बोर व साडेचारची बोर यामध्ये बसविणा—या पंपाचे गणित सांगा ना?

<u>सदस्या श्रीमती अंजली साळवे :—</u>२०० ला पाणीच नाही लागत.

<u>श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा :—</u>स्वत: इंजिनिअर लक्ष घालेल व एक महिन्याच्या आत काम पुर्ण करुन घेवु. इतर ठिकाणी जर अर्जंट असेल तर नगसवेक स्वत: ते काम करु शकतो, नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधीमधुन हे काम करता येईल.

<u>पीठासीन अधिकारी, श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>सदरचा विषय पारीत करावा व इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करण्यात यावा. तसेच नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधीमधुन कशातुनही करु शकतो.

<u>सदस्य श्री. महेश गावडे :—</u>नगरसेवक करु शकतात.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>३९ प्रभाग पकडले तर पाच येतील ना?

<u>पीठासीन अधिकारी, श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>एक प्रभागात पाच.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>यामध्ये १०.७० टक्के दराने जो ठेकेदार काम करायला तयार आहे तर कमी दराने असा शब्द काढण्यात यावा.

<u>महापालिका सचिव :—</u>मी ठराव वाचुन दाखविते.

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे व सभेत झालेल्या चर्चेअंती उल्हासनगर शहरातील प्रभाग समिती क्र. १ मध्ये असलेल्या पॅनल/वार्ड मध्ये एकुण ५० नविन बोअरवेल घेवुन त्यावर १.५ अश्वशक्तीचा सबमर्सिबल/पाणबुडे पंप बसविणेकामी निविदेतील किंमतीच्या १०.६० टक्के दराप्रमाणे निविदा स्विकृत करुन शहरामध्ये सध्याची पाणी टंचाईची तीव्रता पाहता याच दराने मे. ए.एम. रामचंदानी वा इतर कोणत्याही ठेकेदाराकडुन काम करुन घेणेस मान्यता देत आहे.

<u>सदस्य श्री. महेश गावडे :—</u>असे नाही इतर ठेकेदाराकडुन करुन घेवु शकतो असे ठरावात टाका. याव्यतिरिक्त आणि याच दराने करावे. जर या लोकांचे काम चालु आहे जर माझ्याकडे १० दिवसात कुणी नाही आले तर ते काम मी करुन घेवु शकतो ना.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>साहेब जसे बोलले आहेत ते टाका.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>व नगरसेवक निधी तसेच प्रभाग समिती निधीतुन करण्यात येईल.

<u>पीठासीन अधिकारी, श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>होय, त्याच दराने.

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>पीठासीन अधिकारी, श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

<u>आयत्यावेळचा विषय</u>

**विषय क्र. ६:—** उल्हासनगर शहरातील प्रभाग समिती क्र. १ मध्ये असलेल्या पॅनल/वार्ड मध्ये एकुण ५० नविन बोअरवेल घेवुन त्यावर १.५ अश्वशक्तीचा सबमर्सिबल/पाणबुडे पंप बसविणेकामी मे. ए.एम. रामचंदानी, उल्हासनगर—३ या निविदाकाराची निविदा स्विकृत करुन त्यांच्याशी संविदा करणेस मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

ई निविदा क्र.८१६, उल्हासनगर शहरातील प्रभाग समिती क्रमांक—१ मध्ये असलेल्या पॅनल / वार्ड मध्ये एकुण ५० नविन बोअरवेल घेवून त्यावर १.५ अश्वशक्तीचा सबमर्सिबल /पाणबुडे पंप बसविणे बाबतच्या कामाकरीता तांत्रिक व आर्थीक पध्दतीने नोंदणी कृत ठेकेदाराकडुन दि.२९/०२/२०१६ रोजी ई—निविदा पध्दतीने मागविण्यात आल्या त्यांची माहिती खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्राकलनीय खर्च | रू. ८३,६१,८८७/— |
| २ | निविदा प्रसिध्द | दि. २२/०२/२०१६ |
| ३ | निविदा प्रसिध्द केलेली वर्तमानपत्रे | दैनिक सामना, दैनिक पुर्णविराम, दैनिक हितमाता मिरर. |

दि.०४/०३/२०१६ रोजी मा. अतिरीक्त आयुक्त यांच्या अध्यक्षतेच्या खाली निवड समिती सदस्या व कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा यांच्या उपस्थितीत समोर ई निविदा क्र.८१६, उल्हासनगर शहरातील प्रभाग समिती क्रमांक—१ मध्ये असलेल्या पॅनल / वार्ड मध्ये एकुण ५० नविन बोअरवेल घेवून त्यावर १.५ अश्वशक्तीचा सबमर्सिबल /पाणबुडे पंप बसविणे बाबत. याकामाच्या निविदेचा तांत्रिक भाग उघडण्यात आला त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

| निविदा क्र. | कामाचा तपशिल | प्रकल्प निहाय किंमत | निविदाकार | नोंदणी प्रमाणपत्र व वर्ग | काम केल्याचे प्रमाणपत्र | पेन कार्ड |
|---|---|---|---|---|---|---|
| ८१६ | उल्हासनगर शहरातील प्रभाग समिती क्रमांक—१ मध्ये असलेल्या पॅनल / वार्ड मध्ये एकुण ५० नविन बोअरवेल घेवून त्यावर १.५ अश्वशक्तीचा सबमर्सिबल /पाणबुडे पंप बसविणे बाबत. | ८३,६१,८८७/— | मे.ए.एम. रामचंदानी | अ (कुशल) | ✓ | ✓ |
| | | | मे. बुबरे असोसिएट्स | अ (कुशल) | ✓ | ✓ |

सदर निविदेची पाणी पुरवठा मध्ये छाननी केली असता अनु क्र. १ ते २ पर्यंत निविदा अति व शर्ती नुसार आहेत तरी उपरोक्त निविदा काराचा दुसरा भाग आर्थिक बाबी संदर्भात दि.०५/०३/२०१६ रोजी निविदा कारांच्या (आर्थिक दर) अतिरीक्त आयुक्त सो. यांच्या अध्यक्षते खाली निवड समितीतील सदस्य यांच्या उपस्थितीत उघडण्यात आला त्याप्रमाणे निविदा काराणे दिलेले दर खालील प्रमाणे आहेत.

निविदा क्र.८१६ मध्ये दिलेल्या प्रकल्पाची एकूण किंमत ८३,६१,८८७/— रूपये ऐवढी आहे.

सदर काम सुधारीत अंदाजपत्रक सन २०१६—१७ च्या लेखाशिर्षातुन करण्यात येईल.

| अ. क्र. | निविदा कारकाचे नाव | निविदा कारकाने नमुद केलेले दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे. ए.एम. रामचंदानी | ७४,७५,५२६.९८ | दिलेल्या दरा पेक्षा १०.६० टक्के कमी |
| २ | मे. बुबरे असोसिएट्स | ८३,२००,७७.५७ | दिलेल्या दरा पेक्षा ०.५ टक्के कमी |

तरी निविदा क्र.८१६ या अ.क्र. १) मे. ए.एम. रामचंदानी यांनी महापालिकेने ठरविलेल्या रक्कमे पेक्षा १०.६० टक्के कमी रक्कम भरलेली आहे. २) मे. बुबरे असोसिएट्स, यांनी महापालिकेने ठरविलेल्या रक्कमे पेक्षा ०.५ टक्के कमी रक्कम भरलेली आहे.

*दि.०५/०३/२०१६ रोजीच्या निविदा समितीच्या बैठकी मध्ये कमीत कमी दराची स्पर्धात्मक निविदा मान्य करण्यास मंजुरी दिली आहे.*

प्राप्त झालेल्या वरील २ निविदा दारांपैकी अ.क्र. १) मे. ए.एम. रामचंदानी यांनी महापालिकेने ठरविलेल्या रक्कमे पेक्षा १०.६० टक्के कमी रक्कम भरलेली आहे.

निविदा समितीच्या अंतिम निर्णयानुसार निविदेतील दर रु.७४,७५,५२६.९८ याप्रमाणे म्हणजेच किंमतीच्या 10.60 % (Below) दराप्रमाणे काम करण्याची निविदा स्विकारण्यास मा. स्थायी समितीकडून मान्यता मिळणेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे. तसेच शहरामध्ये सध्याची पाणी टंचाईची तीव्रता पाहता दराने म्हणजेचे महापालिकेने ठरविलेल्या रक्कमेपेक्षा म्हणजेच १०.६० टक्के कमी दराने इतर कोणत्याही ठेकेदाराने काम करण्याची तयारी दशविल्यास अशा ठेकेदाराकडून याच दराने म्हणजेच १०.६० टक्के कमी दराने हे काम करुन घेण्यास मान्यता देण्यास्तव मा. स्थायी समितीच्या मान्यतेस्तव प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र:</u> १०२ <u>दिनांक:—१४/३/२०१६</u>

सुचकाचे नाव :— श्री. भगवान भालेराव

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वधारीया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे व सभेत झालेल्या चर्चेअंती उल्हासनगर शहरातील प्रभाग समिती क्र. १ मध्ये असलेल्या पॅनल/वार्ड मध्ये एकुण ५० नविन बोअरवेल घेवुन त्यावर १.५ अश्वशक्तीचा सबमर्सिबल/पाणबुडे पंप बसविणेकामी निविदेतील किंमतीच्या १०.६० टक्के दराप्रमाणे निविदा स्विकृत करुन शहरामध्ये सध्याची पाणी टंचाईची तीव्रता पाहता याच दराने मे. ए.एम. रामचंदानी वा इतर कोणत्याही ठेकेदाराकडुन काम करुन घेणेस मान्यता देत आहे. तसेच नगरसेवकास याव्यतिरिक्त अजुन

बोअरवेल लावणे आवश्यक वाटल्यास प्रभाग समिती निधी व नगरसेवक निधीतून याच मंजुर दराने काम करुन घेता येईल.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

---

⇨ आयत्यावेळचा विषय

**विषय क्र.** ७:— उल्हासनगर शहरातील प्रभाग समिती क्र. २ मध्ये असलेल्या पॅनल/वार्ड मध्ये एकुण ५० नविन बोअरवेल घेवुन त्यावर १.५ अश्वशक्तीचा सबमर्सिबल/पाणबुडे पंप बसविणेकामी मे. ए.एम. रामचंदानी, उल्हासनगर—३ या निविदाकाराची निविदा स्विकृत करुन त्यांच्याशी संविदा करणेस मान्यता देणे.

---

काही सदस्य :—पास—पास......

सदस्य श्री. भगवान भालेरवा :— आयत्यावेळचे पुढील तिन्ही विषय तसेच पारीत करा व हे सुध्दा इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करावा.

<u>पीठासीन अधिकारी, श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

<u>आयत्यावेळचा विषय</u>

**विषय क्र. ७:—** उल्हासनगर शहरातील प्रभाग समिती क्र. २ मध्ये असलेल्या पॅनल/वार्ड मध्ये एकुण ५० नविन बोअरवेल घेवुन त्यावर १.५ अश्वशक्तीचा सबमर्सिबल/पाणबुडे पंप बसविणेकामी मे. ए.एम. रामचंदानी, उल्हासनगर—३ या निविदाकाराची निविदा स्विकृत करुन त्यांच्याशी संविदा करणेस मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

ई निविदा क्र.८१७, उल्हासनगर शहरातील प्रभाग समिती क्रमांक—२ मध्ये असलेल्या पॅनल / वार्ड मध्ये एकुण ५० नविन बोअरवेल घेवून त्यावर १.५ अश्वशक्तीचा सबमर्सिबल /पाणबुडे पंप बसविणे बाबतच्या कामाकरीता तांत्रिक व आर्थीक पध्द्तीने नोंदणी कृत ठेकेदाराकडुन दि.२९/०२/२०१६ रोजी ई—निविदा पध्द्तीने मागविण्यात आल्या त्यांची माहिती खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्राकलनीय खर्च | रू. ८३,६१,८८७/— |
| २ | निविदा प्रसिध्द | दि. २२/०२/२०१६ |
| ३ | निविदा प्रसिध्द केलेली वर्तमानपत्रे | दैनिक सामना, दैनिक पुर्णविराम, दैनिक हितमाता मिरर. |

दि.०४/०३/२०१६ रोजी मा. अतिरीक्त आयुक्त यांच्या अध्यक्षतेच्या खाली निवड समिती सदस्या व कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा यांच्या उपस्थितीत समोर ई निविदा क्र.८१७, उल्हासनगर शहरातील प्रभाग समिती क्रमांक—२ मध्ये असलेल्या पॅनल / वार्ड मध्ये एकुण ५० नविन बोअरवेल घेवून त्यावर १.५ अश्वशक्तीचा सबमर्सिबल /पाणबुडे पंप बसविणे बाबत. याकामाच्या निविदेचा तांत्रिक भाग उघडण्यात आला त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

| निविदा क्र. | कामाचा तपशिल | प्रकल्प निहाय किंमत | निविदाकार | नोंदणी प्रमाणपत्र व वर्ग | काम केल्याचे प्रमाणपत्र | पेन कार्ड |
|---|---|---|---|---|---|---|
| ८१७ | उल्हासनगर शहरातील प्रभाग समिती क्रमांक—२ मध्ये असलेल्या पॅनल / वार्ड मध्ये एकुण ५० नविन बोअरवेल घेवून त्यावर १.५ | ८३,६१,८८७/— | मे.ए.एम. रामचंदानी | अ (कुशल) | ✓ | ✓ |
| | | | मे. बुबरे असोसिएट्स | अ (कुशल) | ✓ | ✓ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | अश्वशक्तीचा सबमर्सिबल /पाणबुडे पंप बसविणे बाबत. | | | | | |

सदर निविदेची पाणी पुरवठा मध्ये छाननी केली असता अनु क्र. १ ते २ पर्यंत निविदा अति व शर्ती नुसार आहेत तरी उपरोक्त निविदा काराचा दुसरा भाग आर्थिक बाबी संदर्भात दि.०५/०३/२०१६ रोजी निविदा कारांच्या (आर्थिक दर) अतिरीक्त आयुक्त सो. यांच्या अध्यक्षते खाली निवड समितीतील सदस्य यांच्या उपस्थितीत उघडण्यात आला त्याप्रमाणे निविदा काराणे दिलेले दर खालील प्रमाणे आहेत.

निविदा क्र.८१७ मध्ये दिलेल्या प्रकल्पाची एकूण किंमत ८३,६१,८८७/— रूपये ऐवढी आहे.

सदर काम सुधारीत अंदाजपत्रक सन २०१६—१७ च्या लेखाशिर्षातुन करण्यात येईल.

| अ. क्र. | निविदा कारकाचे नाव | निविदा कारकाने नमुद केलेले दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे. ए.एम. रामचंदानी | ७३,८३,५४६.२२ | दिलेल्या दरा पेक्षा ११.७० टक्के कमी |
| २ | मे. बुबरे असोसिएट्स | ८३,२००,७७.५७ | दिलेल्या दरा पेक्षा ०.५ टक्के कमी |

तरी निविदा क्र.८१७ या अ.क्र. १) मे. ए.एम. रामचंदानी यांनी महापालिकेने ठरविलेल्या रक्कमे पेक्षा ११.७० टक्के कमी रक्कम भरलेली आहे. २) मे. बुबरे असोसिएट्स, यांनी महापालिकेने ठरविलेल्या रक्कमे पेक्षा ०.५ टक्के कमी रक्कम भरलेली आहे.

*दि.०५/०३/२०१६ रोजीच्या निविदा समितीच्या बैठकी मध्ये कमीत कमी दराची स्पर्धात्मक निविदा मान्य करण्यास मंजुरी दिली आहे.*

प्राप्त झालेल्या वरील २ निविदा दारांपैकी अ.क्र. १) मे. ए.एम. रामचंदानी यांनी महापालिकेने ठरविलेल्या रक्कमे पेक्षा ११.७० टक्के कमी रक्कम भरलेली आहे.

निविदा समितीच्या अंतिम निर्णयानुसार निविदेतील दर रु.७३,८३,५४६.२२ याप्रमाणे म्हणजेच किंमतीच्या 11.70 % (Below) दराप्रमाणे काम करण्याची निविदा स्विकारुन मा. स्थायी समितीकडून मान्यता मिळणेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे. तसेच शहरामध्ये सध्याची पाणी टंचाईची तीव्रता पाहता दराने म्हणजेचे महापालिकेने ठरविलेल्या रक्कमेपेक्षा म्हणजेच ११.७० टक्के कमी दराने इतर कोणत्याही ठेकेदाराने काम करण्याची तयारी दशविल्यास अशा ठेकेदाराकडून याच दराने म्हणजेच ११.७० टक्के कमी दराने हे काम करुन घेण्यास मान्यता देण्यास्तव मा. स्थायी समितीच्या मान्यतेस्तव प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र: १०३ दिनांक:—१४/३/२०१६

सुचकाचे नाव :— श्री. भगवान भालेराव

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वधारीया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे व सभेत झालेल्या चर्चेअंती उल्हासनगर शहरातील प्रभाग समिती क्र. २ मध्ये असलेल्या पॅनल/वार्ड मध्ये एकुण ५० नविन बोअरवेल घेवुन त्यावर १.५ अश्वशक्तीचा सबमर्सिबल/पाणबुडे पंप बसविणेकामी निविदेतील किंमतीच्या ११.७० टक्के दराप्रमाणे निविदा स्विकृत करुन शहरामध्ये सध्याची पाणी टंचाईची तीव्रता पाहता याच दराने मे. ए.एम. रामचंदानी वा इतर कोणत्याही ठेकेदाराकडुन काम करुन घेणेस मान्यता देत आहे. तसेच नगरसेवकास याव्यतिरिक्त अजुन बोअरवेल लावणे आवश्यक वाटल्यास प्रभाग समिती निधी व नगरसेवक निधीतून याच मंजुर दराने काम करुन घेता येईल.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— आयत्यावेळचा विषय क्र. ८ वाचुन दाखवितात

---

⇨ आयत्यावेळचा विषय

**विषय क्र. ८:—** उल्हासनगर शहरातील प्रभाग समिती क्र. ३ मध्ये असलेल्या पॅनल/वार्ड मध्ये

एकुण ५० नविन बोअरवेल घेवुन त्यावर १.५ अश्वशक्तीचा

सबमर्सिबल/पाणबुडे पंप बसविणेकामी मे. ए.एम. रामचंदानी, उल्हासनगर–३

या निविदाकाराची निविदा स्विकृत करुन त्यांच्याशी संविदा करणेस मान्यता देणे.

---

काही सदस्य :–पास–पास......

पीठासीन अधिकारी, श्री. जमनादास पुरस्वानी :–सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

आयत्यावेळचा विषय

**विषय क्र. ८:–** उल्हासनगर शहरातील प्रभाग समिती क्र. ३ मध्ये असलेल्या पॅनल/वार्ड मध्ये

एकुण ५० नविन बोअरवेल घेवुन त्यावर १.५ अश्वशक्तीचा

सबमर्सिबल/पाणबुडे पंप बसविणेकामी मे. ए.एम. रामचंदानी, उल्हासनगर–३

या निविदाकाराची निविदा स्विकृत करुन त्यांच्याशी संविदा करणेस मान्यता देणे.

प्रस्तावना

ई निविदा क्र.८१८, उल्हासनगर शहरातील प्रभाग समिती क्रमांक–३ मध्ये असलेल्या पॅनल / वार्ड मध्ये एकुण ५० नविन बोअरवेल घेवून त्यावर १.५ अश्वशक्तीचा सबमर्सिबल /पाणबुडे पंप बसविणे बाबतच्या कामाकरीता तांत्रिक व आर्थीक पध्द्तीने नोंदणी कृत ठेकेदाराकडुन दि.२९/०२/२०१६ रोजी ई–निविदा पध्द्तीने मागविण्यात आल्या त्यांची माहिती खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्राकलनीय खर्च | रू. ८३,६१,८८७/– |
| २ | निविदा प्रसिध्द | दि. २२/०२/२०१६ |
| ३ | निविदा प्रसिध्द केलेली वर्तमानपत्रे | दैनिक सामना, दैनिक पुर्णविराम, दैनिक हितमाता मिरर. |

दि.०४/०३/२०१६ रोजी मा. अतिरीक्त आयुक्त यांच्या अध्यक्षतेच्या खाली निवड समिती सदस्या व कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा यांच्या उपस्थितीत समोर ई निविदा क्र.८१८, उल्हासनगर शहरातील प्रभाग समिती क्रमांक–३ मध्ये असलेल्या पॅनल / वार्ड मध्ये एकुण ५० नविन बोअरवेल घेवून त्यावर १.५ अश्वशक्तीचा सबमर्सिबल /पाणबुडे पंप बसविणे बाबत. याकामाच्या निविदेचा तांत्रिक भाग उघडण्यात आला त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

| निविदा क्र. | कामाचा तपशिल | प्रकल्प निहाय किंमत | निविदाकार | नोंदणी प्रमाणपत्र व वर्ग | काम केल्याचे प्रमाणपत्र | पेन कार्ड |
|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ८१८ | उल्हासनगर शहरातील प्रभाग समिती क्रमांक—३ मध्ये असलेल्या पॅनल / वार्ड मध्ये एकुण ५० नविन बोअरवेल घेवून त्यावर १.५ अश्वशक्तीचा सबमर्सिबल /पाणबुडे पंप बसविणे बाबत. | ८३,६१,८८७/— | मे.ए.एम. रामचंदानी | अ (कुशल) | ✓ | ✓ |
| | | | मे. बुबरे असोसिएट्स | अ (कुशल) | ✓ | ✓ |
| | | | मे. हर्षल टेक्नीक्स, नाशिक | अ (कुशल) | ✓ | ✓ |

सदर निविदेची पाणी पुरवठा मध्ये छाननी केली असता अनु क्र. १ ते ३ पर्यंत निविदा अति व शर्ती नुसार आहेत तरी उपरोक्त निविदा काराचा दुसरा भाग आर्थिक बाबी संदर्भात दि.०५/०३/२०१६ रोजी निविदा कारांच्या (आर्थिक दर) अतिरीक्त आयुक्त सो. यांच्या अध्यक्षते खाली निवड समितीतील सदस्य यांच्या उपस्थितीत उघडण्यात आला त्याप्रमाणे निविदा काराणे दिलेले दर खालील प्रमाणे आहेत.

निविदा क्र.८१८ मध्ये दिलेल्या प्रकल्पाची एकूण किंमत ८३,६१,८८७/— रूपये ऐवढी आहे.

सदर काम सुधारीत अंदाजपत्रक सन २०१६—१७ च्या लेखाशिर्षातुन करण्यात येईल.

| अ. क्र. | निविदा कारकाचे नाव | निविदा कारकाने नमुद केलेले दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे. ए.एम. रामचंदानी | ७४३६२२६.११ | दिलेल्या दरा पेक्षा ११.०७ टक्के कमी |
| २ | मे. बुबरे असोसिएट्स | ८११३५३८.९६ | दिलेल्या दरा पेक्षा २.९७ टक्के कमी |
| ३ | मे. हर्षल टेक्नीक्स, नाशिक | ७९६०५१६.४२ | दिलेल्या दरा पेक्षा ४.८ टक्के कमी |

तरी निविदा क्र.८१८ या अ.क्र. १) मे. ए.एम. रामचंदानी यांनी महापालिकेने ठरविलेल्या रक्कमे पेक्षा ११.०७ टक्के कमी रक्कम भरलेली आहे. २) मे. बुबरे असोसिएट्स, यांनी महापालिकेने ठरविलेल्या रक्कमे पेक्षा २,९७ टक्के कमी रक्कम भरलेली आहे. ३) मे. हर्षल टेक्नीक्स, नाशिक, यांनी महापालिकेने ठरविलेल्या रक्कमे पेक्षा ४.८ टक्के कमी रक्कम भरलेली आहे.

*दि.०५/०३/२०१६ रोजीच्या निविदा समितीच्या बैठकी मध्ये कमीत कमी दराची स्पर्धात्मक निविदा मान्य करण्यास मंजुरी दिली आहे.*

प्राप्त झालेल्या वरील ३ निविदा दारांपैकी अ.क्र. १) मे. ए.एम. रामचंदानी यांनी महापालिकेने ठरविलेल्या रक्कमे पेक्षा ११.०७ टक्के कमी रक्कम भरलेली आहे.

निविदा समितीच्या अंतिम निर्णयानुसार निविदेतील दर रु.७४३६२२६.११ याप्रमाणे म्हणजेच किंमतीच्या 11.07 % (Below) दराप्रमाणे काम करण्याची निविदा स्विकारुन मा. स्थायी समितीकडून मान्यता मिळणेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे. तसेच शहरामध्ये सध्याची पाणी टंचाईची तीव्रता पाहता दराने म्हणजेचे महापालिकेने ठरविलेल्या रक्कमेपेक्षा म्हणजेच ११.०७ टक्के कमी दराने इतर कोणत्याही ठेकेदाराने काम करण्याची तयारी दशविल्यास अशा ठेकेदाराकडून याच दराने म्हणजेच ११.०७ टक्के कमी दराने हे काम करुन घेण्यास मान्यता देण्यास्तव मा. स्थायी समितीच्या मान्यतेस्तव प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र:</u> १०४ <u>दिनांकः–१४/३/२०१६</u>

सुचकाचे नाव :– श्री. भगवान भालेराव

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेश वधारीया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे व सभेत झालेल्या चर्चेअंती उल्हासनगर शहरातील प्रभाग समिती क्र. ३ मध्ये असलेल्या पॅनल/वार्ड मध्ये एकुण ५० नविन बोअरवेल घेवुन त्यावर १.५ अश्वशक्तीचा सबमर्सिबल/पाणबुडे पंप बसविणेकामी निविदेतील किंमतीच्या ११.०७ टक्के दराप्रमाणे निविदा स्विकृत करुन शहरामध्ये सध्याची पाणी टंचाईची तीव्रता पाहता याच दराने मे. ए.एम. रामचंदानी वा इतर कोणत्याही ठेकेदाराकडुन काम करुन घेणेस मान्यता देत आहे. तसेच नगरसेवकास याव्यतिरिक्त अजुन बोअरवेल लावणे आवश्यक वाटल्यास प्रभाग समिती निधी व नगरसेवक निधीतून याच मंजुर दराने काम करुन घेता येईल.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

**महापालिका सचिव :—** आयत्यावेळचा विषय विषय क्र. ९ वाचुन दाखवितात

---

⇨ आयत्यावेळचा विषय

**विषय क्र. ९:—** उल्हासनगर शहरातील प्रभाग समिती क्र. ४ मध्ये असलेल्या पॅनल/वार्ड मध्ये एकुण ५० नविन बोअरवेल घेवुन त्यावर १.५ अश्वशक्तीचा सबमर्सिबल/पाणबुडे पंप बसविणेकामी मे. ए.एम. रामचंदानी, उल्हासनगर—३ या निविदाकाराची निविदा स्विकृत करुन त्यांच्याशी संविदा करणेस मान्यता देणे.

---

**काही सदस्य :—**पास—पास......

**पीठासीन अधिकारी, श्री. जमनादास पुरस्वानी :—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

आयत्यावेळचा विषय

**विषय क्र. ९:—** उल्हासनगर शहरातील प्रभाग समिती क्र. ४ मध्ये असलेल्या पॅनल/वार्ड मध्ये एकुण ५० नविन बोअरवेल घेवुन त्यावर १.५ अश्वशक्तीचा सबमर्सिबल/पाणबुडे पंप बसविणेकामी मे. ए.एम. रामचंदानी, उल्हासनगर—३ या निविदाकाराची निविदा स्विकृत करुन त्यांच्याशी संविदा करणेस मान्यता देणे.

प्रस्तावना

ई निविदा क्र.८१९, उल्हासनगर शहरातील प्रभाग समिती क्रमांक—४ मध्ये असलेल्या पॅनल / वार्ड मध्ये एकुण ५० नविन बोअरवेल घेवून त्यावर १.५ अश्वशक्तीचा सबमर्सिबल /पाणबुडे पंप बसविणे बाबतच्या कामाकरीता तांत्रिक व आर्थीक पध्द्तीने नोंदणी कृत ठेकेदाराकडुन दि.२९/०२/२०१६ रोजी ई—निविदा पध्द्तीने मागविण्यात आल्या त्यांची माहिती खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्राकलनीय खर्च | रू. ८३,६१,८८७/— |
| २ | निविदा प्रसिध्द | दि. २२/०२/२०१६ |
| ३ | निविदा प्रसिध्द केलेली वर्तमानपत्रे | दैनिक सामना, दैनिक पुर्णविराम, दैनिक हितमाता मिरर. |

दि.०४/०३/२०१६ रोजी मा. अतिरीक्त आयुक्त यांच्या अध्यक्षतेच्या खाली निवड समिती सदस्या व कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा यांच्या उपस्थितीत समोर ई निविदा क्र.८१९, उल्हासनगर शहरातील प्रभाग समिती क्रमांक—४ मध्ये असलेल्या पॅनल / वार्ड मध्ये एकुण ५० नविन बोअरवेल घेवून त्यावर १.५ अश्वशक्तीचा सबमर्सिबल /पाणबुडे पंप बसविणे बाबत. याकामाच्या निविदेचा तांत्रिक भाग उघडण्यात आला त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

| निविदा क्र. | कामाचा तपशिल | प्रकल्प निहाय किंमत | निविदाकार | नोंदणी प्रमाणपत्र व वर्ग | काम केल्याचे प्रमाणपत्र | पेन कार्ड |
|---|---|---|---|---|---|---|
| ८१९ | उल्हासनगर शहरातील प्रभाग समिती क्रमांक—४ मध्ये असलेल्या पॅनल / वार्ड मध्ये एकुण ५० नविन बोअरवेल घेवून त्यावर १.५ अश्वशक्तीचा सबमर्सिबल /पाणबुडे पंप बसविणे बाबत. | ८३,६१,८८७/— | मे.ए.एम. रामचंदानी | अ (कुशल) | ✓ | ✓ |
| | | | मे. बुबरे असोसिएट्स | अ (कुशल) | ✓ | ✓ |
| | | | मे. हर्षल टेक्नीक्स, नाशिक | अ (कुशल) | ✓ | ✓ |

सदर निविदेची पाणी पुरवठा मध्ये छाननी केली असता अनु क्र. १ ते ३ पर्यंत निविदा अति व शर्ती नुसार आहेत तरी उपरोक्त निविदा काराचा दुसरा भाग आर्थिक बाबी संदर्भात दि.०५/०३/२०१६ रोजी निविदा कारांच्या (आर्थिक दर) अतिरीक्त आयुक्त सो. यांच्या अध्यक्षते खाली निवड समितीतील सदस्य यांच्या उपस्थितीत उघडण्यात आला त्याप्रमाणे निविदा काराणे दिलेले दर खालील प्रमाणे आहेत.

निविदा क्र.८१९ मध्ये दिलेल्या प्रकल्पाची एकूण किंमत ८३,६१,८८७/— रूपये ऐवढी आहे.

सदर काम सुधारीत अंदाजपत्रक सन २०१६—१७ च्या लेखाशिर्षातुन करण्यात येईल.

| अ. | निविदा कारकाचे नाव | निविदा कारकाने नमुद | शेरा |
|---|---|---|---|

| क्र. | | केलेले दर | |
|---|---|---|---|
| १ | मे. ए.एम. रामचंदानी | ७३८३५४६.२२ | दिलेल्या दरा पेक्षा ११.७० टक्के कमी |
| २ | मे. बुबरे असोसिएट्स | ८११३५३८.९६ | दिलेल्या दरा पेक्षा २.९७ टक्के कमी |
| ३ | मे. हर्षल टेक्नीक्स, नाशिक | ७९६०५१६.४२ | दिलेल्या दरा पेक्षा ४.८ टक्के कमी |

तरी निविदा क्र.८१९ या अ.क्र. १) मे. ए.एम. रामचंदानी यांनी महापालिकेने ठरविलेल्या रक्कमे पेक्षा ११.७० टक्के कमी रक्कम भरलेली आहे. २) मे. बुबरे असोसिएट्स, यांनी महापालिकेने ठरविलेल्या रक्कमे पेक्षा २.९७ टक्के कमी रक्कम भरलेली आहे. ३) मे. हर्षल टेक्नीक्स, नाशिक, यांनी महापालिकेने ठरविलेल्या रक्कमे पेक्षा ४.८ टक्के कमी रक्कम भरलेली आहे.

*दि.०५/०३/२०१६ रोजीच्या निविदा समितीच्या बैठकी मध्ये कमीत कमी दराची स्पर्धात्मक निविदा मान्य करण्यास मंजुरी दिली आहे.*

प्राप्त झालेल्या वरील ३ निविदा दारांपैकी अ.क्र. १) मे. ए.एम. रामचंदानी यांनी महापालिकेने ठरविलेल्या रक्कमे पेक्षा ११.७० टक्के कमी रक्कम भरलेली आहे.

निविदा समितीच्या अंतिम निर्णयानुसार निविदेतील दर रु.७३८३५४६.२२ याप्रमाणे म्हणजेच किंमतीच्या 11.70 % (Below) दराप्रमाणे काम करण्याची निविदा स्विकारुन मा. स्थायी समितीकडून मान्यता मिळणेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे. तसेच शहरामध्ये सध्याची पाणी टंचाईची तीव्रता पाहता दराने म्हणजेचे महापालिकेने ठरविलेल्या रक्कमेपेक्षा म्हणजेच ११.७० टक्के कमी दराने इतर कोणत्याही ठेकेदाराने काम करण्याची तयारी दशविल्यास अशा ठेकेदाराकडून याच दराने म्हणजेच ११.७० टक्के कमी दराने हे काम करुन घेण्यास मान्यता देण्यास्तव मा. स्थायी समितीच्या मान्यतेस्तव प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र:१०५</u> <u>दिनांकः—१४/३/२०१६</u>

सुचकाचे नाव :— श्री. भगवान भालेराव

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वधारीया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे व सभेत झालेल्या चर्चेअंती उल्हासनगर शहरातील प्रभाग समिती क्र. ४ मध्ये असलेल्या पॅनल/वार्ड मध्ये एकुण ५० नविन बोअरवेल घेवुन त्यावर १.५ अश्वशक्तीचा सबमर्सिबल/पाणबुडे पंप बसविणेकामी निविदेतील किंमतीच्या ११.७० टक्के दराप्रमाणे निविदा स्विकृत करुन शहरामध्ये सध्याची पाणी टंचाईची तीव्रता पाहता याच दराने मे. ए.एम. रामचंदानी वा इतर कोणत्याही ठेकेदाराकडुन काम करुन घेणेस मान्यता देत आहे. तसेच नगरसेवकास याव्यतिरिक्त अजुन बोअरवेल लावणे आवश्यक वाटल्यास प्रभाग समिती निधी व नगरसेवक निधीतून याच मंजुर दराने काम करुन घेता येईल.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

सांयकाळी ४.०० वाजंता सभेचे कामकाज संपल्याचे पीठासीन अधिकारी, श्री. जमनादास पुरस्वानी यांनी जाहिर केले.

**(प्राजक्ता मि. कुलकर्णी )**

महापालिका सचिव

उल्हासनगर महानगरपालिका

.

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः— ३१/३/२०१६

दि. ३१/३/२०१६ रोजी घेण्यांत आलेल्या
स्थायी समिती सभेचे इतिवृत्त

१३

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा गुरूवार दिनांक ३१/३/२०१६ रोजी दुपारी ३.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्रीमती. जया प्रकाश माखिजा | सभापती |
| २ | श्रीमती. राजश्री राजेंद्र चौधरी | सदस्या |
| ३ | श्रीमती शंकुतला जीवनलाल जग्यासी | सदस्या |
| ४ | डॉ. महेश गजानन गावडे | सदस्य |
| ५ | श्री. भगवान शंकर भालेराव | सदस्य |
| ६ | श्रीमती. इसरद सऊद खान | सदस्या |
| ७ | श्रीमती. मिनु राज दासानी | सदस्या |
| ८ | श्री.राजेश नानीकराम वदारिया | सदस्य |
| ९ | श्रीमती लिलाबाई आशान | सदस्या |
| १० | श्री. उमेश सुरेश कालानी | सदस्य |
| ११ | श्री. गुरुनो भिकोमल वलेचा | सदस्य |
| १२ | श्री. जमनादास पुरस्वानी | सदस्य |
| १३ | श्रीमती अंजली साळवे | सदस्या |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर २. श्री. सुनिल मुकुंद सुर्वे ३. श्रीमती आशा जिवन इदनानी

खालील अधिकारी सभेस हजर होते.

५९.श्री. श्रीधर पाटणकर, अतिरिक्त आयुक्त
६०.श्रीम. प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
६१.श्री. जमीर लेंगरेकर, उप–आयुक्त
६२.श्रीम. मंगला माळवे, सहा. आयुक्त
६३.श्री. शैलेश दोंदे, प्र. कर निर्धारक व संकलक
६४.श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
६५.श्री. मनिष हिवरे, प्र. सहा. आयुक्त, साप्रवि
६६.श्री. भगवान कुमावत, प्र. प्रभाग अधिकारी
६७.श्री. विनोद केणे, प्र. स्वच्छता निरिक्षक
६८.श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.

१. श्रीमती विशाखा सावंत
२. श्रीमती नर्गिस खान
३. श्री. अशोक रामरख्यानी

दुपारी ३.१० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

श्री. श्रीधर पाटणकर, अति. आयुक्त हे आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ होते.

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ <u>विषय क्र. १ :–</u> मागील सभेचे दिनांक २७/१/२०१६ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

<u>महापालिका सचिव :–</u> सदरहु विषय पारीत करण्यात यावा का?

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा :–</u>मागील सभेचे दिनांक २७/१/२०१६ रोजीचे इतिवृत जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १ :–** मागील सभेचे दिनांक २७/१/२०१६ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नांव : श्री. राजेश वधारीया

अनुमोदकाचे नांव : श्री. जमनादास पुरस्वानी

<u>स्थायी समिती ठराव क्र. :– १०६ अ</u> <u>दिनांक : ३१/३/२०१६</u>

ही स्थायी समिती महापालिका सचिवांनी प्रस्तृत केलेले दिनांक मागील सभेचे दिनांक २७/१/२०१६ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते ५४ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. २ वाचुन दाखवितात

———————————————————————————————————————

**विषय क्र. २ :—** मालमत्ता क्र ०९ अेआय०२०३७७१०० करीता वर्ष —२०१२—१३ पासून एकुण क्षेत्रफळ २९३४.३१ चौ फुट पैकी २५६८ चौ. फुट करणेत येत असुन व ३६६ चौ फुट कमी करणेत आलेल्या क्षेत्रफळाची रक्कम रूपये ३५६७७/— व विलंब शास्ती निर्लेखित करणे. व वर्ष —२०१५—१६ पासुन सुधारीत देयक जारी करणेबाबत.

———————————————————————————————————————

<u>महापालिका सचिव :—</u> सदरहु विषय पारीत करण्यात यावा का?

<u>काही सदस्य:—</u>पास,पास.......

<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया :—</u> सदरहु विषयाच्या ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता करण्यात यावी.

<u>सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा :—</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र.२ :—** मालमत्ता क्र ०९अेआय०२०३७७१०० करीता वर्ष —२०१२—१३ पासून एकुण क्षेत्रफळ २९३४.३१ चौ फुट पैकी २५६८ चौ. फुट करणेत येत असुन व ३६६ चौ फुट कमी करणेत आलेल्या क्षेत्रफळाची रक्कम रूपये ३५६७७/— व विलंब शास्ती निर्लेखित करणे.. व वर्ष —२०१५—१६ पासुन सुधारीत देयक जारी करणेबाबत

<u>**प्रस्तावना**</u>

उपरोक्त विशयास अनुसरण सादर करण्यात येते की श्री . चंद्रकांत शिवदास बडगुजर रा. शिवदास मास्तर भवन, सचदेव नगर कॉम्पलेक्स—२ सि ब्लॉक रोड, उल्हासनगर—३ यांनी दिनांक १४/१०/२०१३ रोजीच्या अर्जान्वये महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत कर पात्र मालमत्ता क्र

०९अेआय०२०३७७१०० क्षेत्रफळ जास्त दर्शविलेमुळे करयोग्य मुल्यात व त्याअनुशंगाने कर आकारणीत वाढ झालेली आहे. या बाबत हरकत दाखल केली आहे.

**स्थळ पहाणी अहवालाचा तपशील**

1. कर निरीक्षक यांचा दि 14/10/2015 रोजीचा प्रत्यक्ष पाहणी अहवाल खालील प्रमाणे

महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत संदर्भित मिळकतीकरीता नमुद असलेल्या करपात्र बाबींचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| Sr.no Room Type | Length | Width | Const. Type | Occ. Stu | Usage | Ann. Rent. | Asst. Year. | Total area | Exp. Area | Assess. Area. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Room | 10 | 12 | RCC | Owner | Resi | 0 | 22/02/13 | 120 | 0 | 120 |
| Room | 19 | 10-3 | Rcc | Owner | Resi | 0 | 22/02/13 | 195.7 | 0 | 195.7 |
| kitchan | 14 | 9.75 | Rcc | Owner | Resi | 0 | 22/02/13 | 136.5 | 0 | 136.5 |
| Balcony(Open) | 5.75 | 7.5 | Rcc | Owner | Resi | 0 | 22/02/13 | 43.13 | 21.57 | 21.57 |
| Stair Case | 21 | 2.42 | Rcc | Owner | Resi | 0 | 22/02/13 | 50.82 | 25.41 | 25.41 |
| Stair Case | 14 | 2.42 | Rcc | Owner | Resi | 0 | 22/02/13 | 33.88 | 16.94 | 16.94 |
| Passage | 17 | 3 | Rcc | Owner | Resi | 0 | 22/02/13 | 51 | 25.5 | 25.5 |
| Passage | 21 | 3 | Rcc | Owner | Resi | 0 | 22/02/13 | 63 | 31.5 | 31.5 |
| Parking Space | 26 | 14 | Rcc | Owner | Resi | 0 | 22/02/13 | 364 | 0 | 364 |
| Terrace Open | 16 | 11.9 | Rcc | Owner | Resi | 0 | 22/02/13 | 190.4 | 95.2 | 95.2 |
| Covered Open | 50 | 30 | Rcc | Owner | Resi | 0 | 22/02/13 | 1500 | 0 | 1500 |
| Covered Open | 16 | 17 | Rcc | Owner | Resi | 0 | 22/02/13 | 272 | 0 | 272 |
| Covered Open | 26 | 5 | Rcc | Owner | Resi | 0 | 22/02/13 | 130 | 0 | 130 |
| Bathroom/W.C.1 | 4 | 10 | Rcc | Owner | Resi | 0 | 22/02/13 | 40 | 40 | 0 |
| Bathroom/W.C.1 | 4 | 10 | Rcc | Owner | Resi | 0 | 22/02/13 | 40 | 40 | 0 |

2. मा.उपायुक्त कर यांनी दिलेल्या मौखिक आदेशानुसार संबधित युनिटचे कर निरिक्षक व प्र.करनिर्धारक व संकलक यांनी अर्जदार यांच्या मिळकतीच्या ठिकाणी प्रत्यक्ष पहाणी करून त्यानुसार अहवाल सादर करावा त्या अनुषंगाने अर्जदार यांच्या आक्षेपाच्या अनुषंगाने दिनांक 16/09/2015 रोजी मिळकतीची प्रत्यक्ष पाहणी केली असता सद्यस्थितीत करपात्र बाबी पुढीलप्रमाणे असल्याचे दिसुन येत आहे.

| Sr.no Room Type | Length | Width | Const. Type | Occ. Stu | Usage | Ann. Rent. | Asst. Year. | Total area | Exp. Area | Assess. Area. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Room | 10 | 12 | RCC | Owner | Resi | 0 | 22/02/13 | 120 | 0 | 120 |
| Room | 19 | 10-3 | Rcc | Owner | Resi | 0 | 22/02/13 | 195.7 | 0 | 195.7 |
| kitchan | 14 | 9.75 | Rcc | Owner | Resi | 0 | 22/02/13 | 136.5 | 0 | 136.5 |
| Balcony(Open) | 5.9 | 7.6 | Rcc | Owner | Resi | 0 | 22/02/13 | 43.13 | 21.56 | 21.56 |
| Stair Case | 14 | 2.5 | Rcc | Owner | Resi | 0 | 22/02/13 | 33.88 | 16.94 | 16.94 |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Stair Case | 14 | 2.42 | Rcc | Owner | Resi | 0 | 22/02/13 | 33.88 | 16.94 | 16.94 |
| Passage | 4 | 3 | Rcc | Owner | Resi | 0 | 22/02/13 | 12 | 6 | 6 |
| Passage | 4 | 3 | Rcc | Owner | Resi | 0 | 22/02/13 | 12 | 6 | 6 |
| Stilt for Parking | 26 | 14 | Rcc | Owner | Resi | 0 | 22/02/13 | 364 | 182 | 182 |
| Terrace Open | 10.6 | 11.9 | Rcc | Owner | Resi | 0 | 22/02/13 | 123.38 | 61.96 | 61.69 |
| Covered Open | 33.6 | 25 | Rcc | Owner | Resi | 0 | 22/02/13 | 837 | 0 | 837 |
| Covered Open | 23 | 30.9 | Rcc | Owner | Resi | 0 | 22/02/13 | 760.25 | 0 | 760.25 |
| Covered Open | 26 | 10 | Rcc | Owner | Resi | 0 | 22/02/13 | 260 | 0 | 260 |
| Bathroom/W.C.1 | 4 | 10 | Rcc | Owner | Resi | 0 | 22/02/13 | 40 | 40 | 0 |
| Bathroom/W.C.1 | 4 | 10 | Rcc | Owner | Resi | 0 | 22/02/13 | 40 | 40 | 0 |

3 .उपरोक्त नुसार प्रत्यक्ष पहाणीनुसार पॅसेज व स्टेअर केस आणि पार्किंग स्पेस व ओपन टेरस यामध्ये मोजमापात फरक दिसून आला व तसेच निवासी मोकळी जागेला आर.सी.सी. अशी नोंद करण्यात आली आहे अर्जदार यांच्या घेतलेल्या हारकतीनुसार स़द्यास्थितीत मालमत्तेच्या खातेउता–यात आकारणी पात्र क्षेत्रफळ 2934.31 चौ.फु.नोंद आहे. तरी दिनांक रोजी प्रत्यक्ष पहाणी नुसार आकारणी पात्र क्षेत्रफळ 2568 चौ.फु. आढळून आले आहे. तरी वर्ष–2012–13 मध्ये क्षेत्रफळ 2568 चौ.फु. एवढया क्षेत्रफळाची नोंद करावयाची होती परंतु संबधित मालमत्ता धारकास 2934.31 चौ.फु. एवढया क्षेत्रफळाची नोंद करण्यात आली आहे. त्यामुळे मालमत्ता धारकास करयोग्य मुल्यात वाढ झाल्याचे दिसून येते. तरी संबधित मालमत्ता धारकास 2568 चौ.फु. नोंद होउन. एवढे 366 चौ.फु. कमी होत आहे. तरी सदरील पहाणी नुसार सदरील क्षेत्रफळाची दुरूस्ती करण्यास हारकत नाही. सबब मोकळी जागेवर कुठल्याप्रकारचे नविन बांधकाम आढळून आलेजे नाही. अर्जदार यांनी सांगितल्यानुसार असेसमेंट झाल्यानंतर तत्कालीन कर निरिक्षक यांनी कुठल्या प्रकारची नोटीस न बजावता मला लगेच बिल पाठविले त्यानुसार अर्जदार यांनी दिनांक 14/10/2013 रोजी हारकत घेतली परंतु तत्कालीन कर निरीक्षक यांनी सदर

अर्जाची दखल न घेता त्याबाबत सुनावणी घेण्यात आली नाही. तरी उक्त प्रमाणे क्षेत्रफळ 366 कमी करून उर्वरीत क्षेत्रफळ 2568 क्षेत्रफळाचे सुधारीत बिलाचा तक्ता खालील प्रमाणे आहे.

अ सद्यास्थितीत येत असलेले कर आकारणीचे बिलाचा तक्ता खालील प्रमाणे आहे.

| मालमत्ता कम्रांक | 09अेआय020377100 | | | | |
|---|---|---|---|---|---|
| करांचे तपशिल | | | | | |
| वर्ष | **2012-13** | **2012-13** | **2013-14** | **2014-15** | **Total** |
| **General Tax** | 11487 | 644 | 12370 | 12370 | 36871 |
| **Corporation Education Cess** | 2209 | | 2209 | 2209 | 6627 |
| **Conservancy Tax** | 2651 | 322 | 3093 | 3093 | 9159 |
| **Street Tax** | 3093 | 322 | 3534 | 3534 | 10483 |
| **Tree Tax** | 221 | | 221 | 221 | 663 |
| **Water Benefit Tax** | 1767 | 322 | 2209 | 2209 | 6507 |
| **Sewerage Benefit Tax** | 884 | 322 | 1325 | 1325 | 3856 |
| **Govt.Education Cess** | 2651 | | 2651 | 2651 | 7953 |
| **Water Charges Month** | 1800 | 1312 | 3600 | 3600 | 10312 |
| **Late Payment Penalty** | | 964 | 7968 | 15606 | 24538 |
| **Penalty on Education Cess** | | | 133 | 265 | 398 |
| **Fire Service Tax** | | 644 | 884 | 884 | 2412 |
| **Total** | **26763** | **4852** | **40197** | **47967** | **119779** |

ब सुधारीत कर आकारणी बिलाचा तक्ता खालील प्रमाणे आहे.

| मालमत्ता कम्र्मांक | 09अेआय020377100 | | | | |
|---|---|---|---|---|---|
| करांचे तपशिल | | | | | |
| वर्ष | **2012-13** | **2012-13** | **2013-14** | **2014-15** | **Total** |
| **General Tax** | 6640 | 372 | 7151 | 7151 | 21314 |
| **Corporation Education Cess** | 1277 | | 1277 | 1277 | 3831 |
| **Conservancy Tax** | 1532 | 186 | 1788 | 1788 | 5294 |
| **Street Tax** | 1778 | 186 | 2043 | 2043 | 6050 |
| **Tree Tax** | 128 | | 128 | 128 | 384 |
| **Water Benefit Tax** | 1022 | 186 | 1277 | 1277 | 3762 |
| **Sewerage Benefit Tax** | 511 | 186 | 766 | 766 | 2229 |
| **Govt.Education Cess** | 1532 | | 1532 | 1532 | 4596 |
| **Water Charges Month** | 1800 | 1312 | 3600 | 3600 | 10312 |
| **Late Payment Penalty** | | | | | |
| **Penalty on Education Cess** | | | | | |
| **Fire Service Tax** | | 372 | 511 | 511 | 1394 |
| **Total** | **162220** | **2800** | **20073** | **20073** | **59166** |

4. तरी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 कलम 8 नियम 20 नुसार दुरूस्तीसाठी तरतदु करण्यात आली आहे. तरी अर्जदाराने सोबत प्रतिज्ञापत्र, जोडले आहे.. वर्ष –2012–13 पासून सुधारीत क्षेत्रफळानुसार सुट देणे करीता उपरोक्त प्रमाणे अ मधील एकूण रूपये 119779 मधून विलंब शास्ती रू.24936/– वजा केल्यास कर आकारणी रूपये 94843 मधून ब मधील सुधारीत बिलाप्रमाणे रक्कम रूपये 59166/– वजा केल्यास उर्वरित रक्कम रूपये 35677/– व विलंब शास्ती मा.स्थायी समिती सभेपुढे निर्लेखित करण्यासाठी वर्ष 2015–2016 पासुन करणेसाठी कर निरीक्षक यांनी शिफारस केली आहे.

5. तसेच प्र कर निर्धारक व संकलंक यांनी दिं 16/10/2015 रोजीच्या प्रत्यक्ष अहवालानुसार क्षेत्रफळ 2568 चौ.फु. एवढया क्षेत्रफळाची नोंद करावयाची होती परंतु संबधित मालमत्ता धारकास 2934.31 चौ.फु. एवढया क्षेत्रफळाची नोंद करण्यात आली आहे. त्यामुळे मालमत्ता धारकास करयोग्य मुल्यात वाढ झाल्याचे दिसून येते. तरी संबधित मालमत्ता धारकास 2568 चौ.फु. नोंद होउन. एवढे 366 चौ.फु. कमी होत आहे.व रक्कम रूपये 35677/– व विलंब शास्ती मा.स्थायी समिती सभेपुढे निर्लेखित करण्यासाठी शिफारस केली आहे.

6 .श्री. चंद्रकांत शिवदास बडगुजर यांनी 21/10/2015 रोजीच्या स्वतंत्र अर्जातील मुदयांचे अवलोकन करुन मुदयांचा खुलासा कर निरीक्षक यांनी केला आहे.

**7** .श्री. चंद्रकांत शिवदास बडगुजर यांना दि. 04/ 07/2015, दि. 15 /07,/2015 दि. 20 /08/2015, दि. व 03/09 /2015 रोजी सुनावणी ठेवणेत आली होती सुनावणीस श्री. चंद्रकांत शिवदास बडगुजर हे उपस्थीत होते.काही सुनावणीस श्री. चंद्रकांत शिवदास बडगुजर यांचे तर्फे श्री. सुधाकर जाधव हजर होते.सुनावणी दरम्यान अर्जदाराने युक्तीवादात अर्जातील नमुद मुदयांचा उहापोह केला.

**8** .श्री. चंद्रकांत शिवदास बडगुजर यांनी सुधारीत कर आकारणीबाबत प्रतिज्ञा पत्र दाखल केले आहे.

**9** .वर्ष –2012–13 पासून एकुण क्षेत्रफळ 2934.31 चौ फुट पैकी 366 चौ फुट कमी करुन क्षेत्रफळ **2568** चौ.फु. क्षेत्रफळ करणे.व 366 चौ फुट कमी करुन सुट देणे करीता उपरोक्त प्रमाणे अ मधील एकूण रूपये 119779 मधून विलंब शास्ती रू.24936/– वजा केल्यास कर आकारणी रूपये 94843 मधून ब मधील सुधारीत बिलाप्रमाणे रक्कम रूपये 59166/– वजा केल्यास उर्वरित रक्कम रूपये 35677/– व विलंब शास्ती मा.स्थायी समिती सभेपुढे निर्लेखित करण्यासाठी असे इकडील मत आहे.

**10.** सबब महाराष्ट्र प्रांतिक महानगरपलिका अधिनियमचे कलम 152 नुसार मालमत्ता क्र 09अेआय020377100 करीता वर्ष –2012–13 पासून एकुण क्षेत्रफळ 2934.31 चौ फुट पैकी 366 चौ फुट कमी करुन क्षेत्रफळ **2568** चौ.फु. क्षेत्रफळ करणे.व 366 चौ फुट कमी करुन सुट देणे करीता उपरोक्त प्रमाणे अ मधील एकूण रूपये 119779 मधून विलंब शास्ती रू.24936/– वजा केल्यास कर आकारणी रूपये 94843 मधून ब मधील सुधारीत बिलाप्रमाणे रक्कम रूपये 59166/– वजा केल्यास उर्वरित रक्कम रूपये 35677/– व विलंब शास्ती मा. स्थायी समितीच्या मंजूरीने निर्लेखित करणेकामी व वर्ष –2015–16 पासुन सुधारीत देयक जारी करणेबाबत मा. स्थायी समिती पटलावर मंजुरीकरीता प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. १०७ दिनांकः– ३१/३/२०१६

सुचकाचे नाव :— श्री. राजेश वधारीया

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार मनपा कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र ०९अेआय०२०३७७१०० करीता वर्ष —२०१२—१३ पासून एकुण क्षेत्रफळ २९३४.३१ चौ फुट पैकी २५६८ चौ. फुट करणेत आल्यापैकी ३६६ चौ फुट कमी करणेत आलेल्या क्षेत्रफळाची रक्कम रूपये ३५६७७/— व विलंब शास्ती निर्लेखित करणे.. व वर्ष —२०१५—१६ पासुन सुधारीत देयक जारी करणेस मंजुरी देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

———————————————————————————————————————

विषय क्र. ३ :— शहरात डेंग्यू, हिवताप व चिकन गुनिया आदी रोगांचा प्रतिबंध करण्यासाठी फॉगींग मशिन व स्प्रे पंप खरेदीच्या संविदेस मान्यता देणेबाबत.

———————————————————————————————————————

महापालिका सचिव :— सदरहु विषय पारीत करण्यात यावा का?

सदस्य, श्री. राजेश वधारीया :— सदरहु विषयाच्या ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता करण्यात यावी.

काही सदस्य :—पास—पास......

सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा :—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

विषय क्र. ३:— शहरात डेंग्यू, हिवताप व चिकन गुनिया आदी रोगांचा प्रतिबंध करण्यासाठी फॉगींग मशिन व स्प्रे पंप खरेदीच्या संविदेस मान्यता देणेबाबत.

प्रस्तावना

मा. आयुक्त सो. यांनी दिनांक २३/१०/२०१५ रोजी अन्वये नागरीकांचे आरोग्य अबाधित ठेवण्यासाठी आरोग्य विभागासाठी फॉगींग मशिन व स्प्रे पंप खरेदी करणेसाठी ई—निविदा सुचना प्रसिध्द करण्यास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार दै. फ्री प्रेस जरनल, अमृत कलश व दै. हिंद माता मिरर या वृत्तपत्रात निविदा सुचना प्रसिध्द करुन व ई—टेंडरींगद्वारे महापालीका वेबसाईटवर जाहिर निविदा सुचना प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. त्याअनुशंगाने ४ निविदाकारांनी विहित मुदतीत निविदा सादर केल्या होत्या. प्राप्त निविदा दि. २०/११/२०१५ व ६/१/२०१६ रोजी ई—निविदा कक्षात निविदा समिती व निविदाकारांच्या उपस्थितीत उघडण्यात आल्या. निविदा समितीने चारही निविदाकरांच्या कागदपत्रांची तपासणी करुन सदर सर्व निविदाकारांनी निविदेतील नमुद अटी व शर्तीनुसार आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्याने निविदा समितीने वित्तीय लिफाफा उघडण्याबाबत सुचना केल्या त्यानुसार निविदा समितीच्या मान्यतेने वित्तीय लिफाफा उघडण्यात आला. पात्र ४ निविदाकारांनी सादर केलेल दर खालीलप्रमाणे आहेत.

## तुलनात्मक तक्ता

| अ. क्र | तपशील | अंदाजीत आवश्यक मागणी | निविदाकाराचे नाव व त्याने सादर केलेले प्रति नग दर रुपये | | | | मनपाचे अंदाजीत दर प्रति नग रुपये | मनपाच्या दरांशी न्युनतम निविदाकारांच्या दराशी तुलना |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | मे. डॉल्फीन | मे. रमेश ॲग्रो | मे. रॉयल ट्रेडलिंक | मे. श्रीराम ॲग्रो | | |
| १ | स्प्रेईंग पंप, ९ लिटर पितळी, स्पेसिफीकेशन प्रमाणे | ४० | ७६९० | ७८६० | —— | ८३१० | ७४०० | (३.९ टक्के जास्त) |
| २ | हॅन्डहेल्ड फॉगींग मशिन, स्पेसिफीकेशन प्रमाणे | ४० | ७६९०० | ७८४०० | ७२२८५ | ७९७७० | ७५५०० | (४.२५ टक्के कमी) |

उक्त प्राप्त दरांनुसार स्प्रे पंप साठी मे. डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेशन, कल्याण व हॅण्डहेल्ड फॉगींग मशिनसाठी मे. रॉयल ट्रेडलिंक, नवी दिल्ली यांनी न्युनतम दर सादर केलेले आहेत. निविदा समितीने दिलेल्या निर्देशानुसार सदर प्राप्त दरांबाबत निविदाकारांना वाटाघाटीसाठी जा.क्र. ३५९ दिनांक १२/१/१६ रोजीच्या पत्रान्वये दिनांक १४/१/१६ रोजी बोलविण्यात आले होते. त्याअनुशंगाने निविदा समिती व निविदाकारांच्या प्रतिनिधी समवेत दिनांक १४/१/२०१६ रोजी वाटाघाटी करण्यात आल्या त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र | तपशील | अंदाजीत आवश्यक मागणी | निविदाकाराचे नाव व त्याने सादर केलेले प्रति नग न्युनतम दर रुपये | | वाटाघाटी अंती प्राप्त दर प्रति नग रुपये | मनपाच्या दरांशी वाटाघाटी अंती न्युनतम निविदाकारांच्या दराशी तुलना | एकूण अपेक्षित खर्च रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | मे. डॉल्फीन | मे. रॉयल ट्रेडलिंक | | | |
| १ | स्प्रेईंग पंप, ९ लिटर पितळी, स्पेसिफीकेशन प्रमाणे | ४० | ७६९० | —— | ७५०० | १.३५ टक्के जास्त | ३००००० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | हॅन्डहेल्ड फॉगींग मशिन, स्पेसिफीकेशन प्रमाणे | ४० | | ७२२८५ | ७२२८५ | ४.२५ टक्के कमी | २८९१४०० |

उक्त नमूद आवश्यक साहित्य/साधने त्यांच्या समोर दर्शविलेल्या परीमाणा प्रमाणे खरेदी केल्यास रुपये ३१,९१,४००/– (रु. एकतिस लाख एक्यान्नव हजार चारशे मात्र) खर्च अपेक्षित आहे. तरी अ.क्र. १ साठी न्युनतम दर सादर करणारे निविदाकार मे. डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेशन, कल्याण व अ.क्र. २ साठी न्युनतम दर सादर करणारे निविदाकार मे. रॉयल ट्रेडलिंक्स प्रा. ली. नवी दिल्ली यांच्याशी संविदा करण्याकरीता मा. स्थायी समितीची मान्यता आवश्यक आहे. करिता सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या मंजुरीसाठी विषय पटलावर सविनय सादर.

स्थायी समिती ठराव क्र. १०८ दिनांकः—३१/३/२०१६

सुचकाचे नाव :— डॉ. महेश गावडे

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार शहरात डेंग्यू, हिवताप व चिकन गुनियाआदी रोगांचा प्रतिबंध करण्यासाठी फॉगिंग मशिन व स्प्रे पंप खरेदीच्या संविदेस बाबनिहाय लघुत्तम दराचे निविदाकार मे. डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेशन, कल्याण व मे. रॉयल ट्रेडलिंक्स प्रा. ली. नवी दिल्ली यांच्याशी संविदा करणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्रमांक. ४ वाचून दाखवितात.

---

⇨ विषय क्र. ४ :— सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत निविदा प्रक्रीया केलेल्या उल्हासनगर—३, येथील सपना गार्डन मध्ये सिंधु भवन बांधणे कामी मे. सतिश कन्स्ट्रक्शन यांच्या कमी दराच्या निविदेस मान्यता देणे.

---

<u>महापालिका सचिव :–</u> सदरहु विषय पारीत करण्यात यावा का?

<u>काही सदस्य :–</u>पास–पास……

<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया :–</u> सदरहु विषयाच्या ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता करण्यात यावी.

<u>सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा :–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

विषय क्र. ४:– सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत निविदा प्रक्रीया केलेल्या उल्हासनगर–३, येथील सपना गार्डन मध्ये सिंधु भवन बांधणे या कामाकरिता मे. सतिश कन्स्ट्रक्शन यांच्या कमी दराच्या निविदेस मा. स्थायी समितीची मान्यता मिळणेबाबत.

<u>**प्रस्तावना**</u>

उल्हासनगर महानगरपालिका प्रभाग क्षेत्र क्र.३ मधील मंजुरी मिळालेल्या उल्हासनगर–३, येथील सपना गार्डन मध्ये सिंधु भवन बांधणे या कामांकरीता बी–१ प्रकारच्या दोन भाग (तांत्रिक व आर्थिक) पध्दतीने नोंदणीकृत ठेकेदारांकडून दिनांक ११/०१/२०१६ रोजी निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्राकलनीय खर्च | रु.१,००,२००,०००/– |
| २ | निविदा प्रसिध्द केलेली वर्तमानपत्रे | १) दै.नवशक्ती २) दै. हमारा महानगर |
| ३ | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक ११/०१/२०१६ |
| ४ | निविदा विक्री कालावधी | दिनांक १२/०१/२०१६ ते २७/०१/२०१६ |
| ५ | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक २९/०२/२०१६ |
| (अ) | प्रथम मुदतवाढ | – |
| ब) | द्वितीय मुदतवाढ | – |
| क) | तृतीय मुदतवाढ | – |
| ६ | तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | दिनांक १२/०१/२०१६ |

| | | |
|---|---|---|
| ७ | आर्थिक भाग उघडण्याचा दिनांक | दिनांक ११/०३/२०१६ |
| ८ | विक्री केलेल्या निविदांची संख्या | ४ |
| ९ | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ४ |

दिनांक १२/०१/२०१६ रोजी मा.अतिरिक्त आयुक्त, मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक, शहर अभियंता यांचे उपस्थितीत उल्हासनगर–३, येथील सपना गार्डन मध्ये सिंधु भवन बांधणे या कामाच्या निविदेचा तांत्रिक भाग उघडण्यात आला त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ. क्र. | निविदाकाराच्या निविदेमधील बाबी | मे. सागर कन्स्ट्रक्शन | मे. व्ही.के. कन्स्ट्रक्शन | मे.शुभम कन्स्ट्रक्शन | मे. सतिश कन्स्ट्रक्शन |
|---|---|---|---|---|---|
| १ | निविदा प्रपत्रकाच्या खरेदीची रक्कम भरलेली आहे का? | होय | होय | होय | होय |
| २ | इसारा रक्कम भरलेली आहे का? | होय | होय | होय | होय |
| ३ | अद्यावत आयकर रिटर्न भरल्याची पावती | होय | होय | होय | होय |
| ४ | कामाचा अनुभव | होय | होय | होय | होय |
| ५ | पॅन कार्डाची प्रत | होय | होय | होय | होय |
| ६ | संस्था/कंपनी नोंदणी (भागिदारी, मालकी, कंपनी इत्यादीचे) दस्तऐवज | होय | होय | होय | होय |
| ७ | शासनामार्फत केलेल्या साारख्या पध्दतीचे कामाचा दाखला/प्रमाणपत्र | होय | होय | नाही | होय |

सदर निविदांची सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये छाननी समिती मार्फत छाननी केली असता १) मे. सागर कन्स्ट्रक्शन २) मे. व्ही.के.कन्स्ट्रक्शन ३) मे.शुभम कन्स्ट्रक्शन ४) मे.सतिश कन्स्ट्रक्शन यांच्या निविदा अटी शर्तीनुसार असल्याने त्यापैकी ०३ निविदाकार पात्र आहेत. परंतु मे. शुभम कन्स्ट्रक्शन या निविदाकाराची निविदा अपात्र आहे. तरी उपरोक्त ०३ निविदाकारांच्या निविदांचा दुसरा भाग उघडण्यात प्रस्तावित करण्यात आले.

मा. महापौर यांचे दालनामध्ये दिनांक १५ सप्टेंबर, २०१५ रोजी ई–निविदेची आढावा बैठक घेण्यात आली होती. त्याअनुषंगाने ई–निविदेचा लिफाफा क्र.१ व २ वर एकाच वेळी उघडण्यात यावे. असे निर्देश देण्यात आले आहे. त्यामुळे सदर निविदेचे आर्थिक व तांत्रिक भाग उघडण्यात आला आहे.

आज दिनांक ०२/०२/२०१६ रोजी उपरोक्त निविदाकारांचा आर्थिक बाबींचा दुसरा भाग (आर्थिक दर) मा.अतिरिक्त आयुक्त सो., यांचे अध्यक्षतेखालील निवड समिती सदस्य मुख्य लेखाअधिकारी, मुख्य लेखापरिक्षक, शहर अभियंता, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे उपस्थितीत उघडण्यात आला. त्याप्रमाणे निविदाकांरानी दिलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) मे. सागर कन्स्ट्रक्शन | | दिलेले दर १८.५० टक्के जास्त |
| २) मे. व्ही.के.कन्स्ट्रक्शन | | दिलेले दर २१.०० टक्के जास्त |
| ३) मे. सतिश कन्स्ट्रक्शन | | दिलेले दर १२.५० टक्के जास्त |

उपरोक्त निविदाकारांपैकी **मे. सतिश कन्स्ट्रक्शन** या सर्वात कमी दराच्या निविदाकारांशी निविदा समितीने चर्चा करुन दर कमी करण्यास वाटाघाटी करणेबाबत या विभागामार्फत दिनांक १४/०३/२०१६ रोजी पत्र देण्यात आले होते. तरी सदर पत्राच्या अनुषंगाने **मे.सतिश कन्स्ट्रक्शन** यांनी आपल्या पत्रामध्ये नमुद केले आहे की, सदर प्राकलनामध्ये दर सन २०१३–१४ च्या दरसूचीवर आधारित असून मजूर वर्ग, मशिनरी, इंधन यांचे आजच्या बाजारभावाशी तुलना केली असता दरामध्ये खूप फरक पडतो. तसेच खडी व रेतीचा दर वाढल्यामुळे **मे.सतिश कन्स्ट्रक्शन** यांना कॉक्रीटचा दर देखील महाग पडणार आहे. त्यानुसार निविदेत भरलेल्या १२.५० टक्के जादा दर योग्य आहेत. तरी सुध्दा आपल्या पत्रास मान देवून आम्ही निविदेत भरलेले १२.५० टक्के मधून ३.०० टक्के दर कमी करुन ९.५० टक्के जादा दर देत आहोत. तरी वाटाघाटीअंती दरसूची प्रमाणे ९.५० टक्के जास्त (९.५०% above) दर दि. १५/०३/२०१६ रोजीचे पत्र दिले आहे.

तरी मे. **सतिश कन्स्ट्रक्शन** ९.५०% या दराचे निविदेस मा. स्थायी समितीची मिळणेकरिता प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. १०९ दिनांकः– ३१/३/२०१६

सुचकाचे नाव :– श्री. राजेश वधारीया

अनुमोदकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत निविदा प्रक्रीया केलेल्या उल्हासनगर–३, येथील सपना गार्डन मध्ये सिंधु भवन बांधणे या कामाकरिता मागविलेल्या निविदेतील मे. सतिश कन्स्ट्रक्शन यांच्या ९.५० टक्के या दराचे निविदेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

महापालिका सचिव :— विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ५ :— माहे जानेवारी २०१५ अखेरपर्यंतचा महानगरपालिका लेख्यांच्या छाननीचा मुख्य लेखा परिक्षकांचा अहवाल विचारात घेणे.**

---

महापालिका सचिव :— सदरहु विषय पारीत करण्यात यावा का?

काही सदस्य :—पास—पास......

सदस्य, श्री. राजेश वधारीया :— सदरहु विषयाच्या ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता करण्यात यावी.

सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा :—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ५ :—** माहे जानेवारी २०१५ अखेरपर्यंतचा महानगरपालिका लेख्यांच्या छाननीचा मुख्य लेखा परिक्षकांचा अहवाल विचारात घेणे.

प्रस्तावना

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ नुसार माहे फेब्रुवारी, २०१५ चा जमा खर्चाचा अहवाल खालील प्रमाणे सादर केलेला आहे. कृपया सदरचा अहवाल मा. स्थायी समितीपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात यावा.

जमा:—

वित्तीय वर्ष २०१४—२०१५ च्या “अ” “ब” व “क” अर्थसंकल्पात अंदाजे अपेक्षित केलेले उत्पन्न खालीलप्रमाणे आहे.

| अर्थसंकल्प | अंदाजपत्रकानुसार जमा रुपये |
|---|---|
| १ | २ |
| “अ” | ५०९,१८,७०,००० |
| “ब” | ७,६०,६२,००० |
| “क” | ११८,६८,००,००० |
| एकूण | ६३५,४७,३२,००० |

सदर अपेक्षित जमेमध्ये कर्ज वगळता खालील बाबी अंर्तभूत आहेत.

| अ.क्र. | बाब | अंदाजपत्रकानुसार जमा रुपये |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| २ | महसूल जमा | ४५३,७०,०७,००० |
| ३ | शासकीय अनुदान | ८०,८८,००,००० |
| ४ | अनामत रकमा/दायित्वे इ. | १५,०६,२५,००० |

| | | |
|---|---|---|
| ५ | एकुण | ५४९,६४,३२,००० |
| ६ | प्रारंभिक शिल्लक | १४६,८३,००० |
| ७ | एकुण :— | ५५१११११५००० |

वित्तीय वर्ष २०१४—२०१५ च्या अर्थसंकल्पात सुधारीत महसूल जमा रक्कम रुपये ४५३,७०,०७,०००/— अपेक्षित धरलेली आहे. माहे जानेवारी, २०१५ मध्ये समप्रमाणात रुपये ३७८,०८,३९,०००/— महसूल उत्पन्न अपेक्षित होते. आरंभिची शिल्लक वगळता प्रत्यक्षात रुपये १५१,४४,५७,०००/— (एकूण अपेक्षित महसूल जमेच्या ४०.०५ टक्के) महसूल उत्पन्न प्राप्त झाले.

माहे जानेवारी, २०१५ मध्ये प्रारंभिक अंदाजानुसार अपेक्षित असलेली जमा व प्रत्यक्ष जमा महसूल लेखा शिर्षनिहाय खालीलप्रमाणे आहे.

| लेखा शिर्ष **अर्थ संकल्प "अ"** | | सन २०१४—१५ चे अंदाजित उत्पन्न | माहे डिसेंबर, २०१४ पर्यंत अपेक्षित उत्पन्न | माहे डिसेंबर, २०१४ पर्यंत प्रत्यक्ष जमा उत्पन्न |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | स्थानिक संस्था कर | २१६,००,००,००० | १८०,००,००,००० | ८२,६२,०७,००० |
| २ | मालमत्ता कर | ७०,६७,००,००० | ५८,८९,१७००० | २४,३८,५४,,००० |
| ३ | एम. आर. टी. पी. वसूली | ५२,१५,००,००० | ४३,४५,८३,००० | ७,०९,५६००० |
| ४ | अनाधिकृत बांधकाम दंड वसूली | १,००,००,००० | ८३,३३,००० | — |
| ५ | रुग्णालय फी | ४,५०,००० | ३,७५००० | १,३०,००० |
| ६ | परवाना व इतर फी | २,८२,००,००० | २,३५,००,००० | ३१,९६,००० |
| ७ | संकीर्ण | २,१९,९५,००० | १,८३,३०,००० | १,९०,७९,०००. |
| ८ | महानगरपालिका मालमत्ता उत्पन्न | ३१,०९,००,००० | २५,९०,८३,००० | ५४,८९,००० |
| | **एकूण "अ"** | **३७५,९७,४५,०००** | **३१३,३१,२१,०००** | **११६,८९,११,०००** |
| | **अर्थसंकल्प "ब"** | | | |
| | महसूल उत्पन्न | ७,६०,६२,००० | ६३,३८,५००० | |
| | **एकूण "ब"** | ७,६०,६२,००० | ६३,३८,५००० | ५,९८,६००० |
| | **अर्थसंकल्प "क"** | | | |
| १ | पाणी बिल वसुली (कर) | ३०,००,००,००० | २५,००,००,००० | १७,३२,१५,००० |
| १ (अ) | पाणी बिल वसुली (पाणी पट्टी) | २१,००,००,००० | १७,५०,००,००० | २,२३,२२,००० |
| २ | मालमत्ता कर | १९,००,००,००० | १५,८३,३३,००० | ६,६०,७६,००० |
| ३ | परवाना/इतर फी | ९,००,००० | ७,५०,००० | १,४४,००० |
| ४ | संकीर्ण | ३,००,००० | २,५०,००० | १३,००० |
| | **एकुण "क"** | ७०,१२,००,००० | ५८,४३,३३,००० | ३४,५५,४६,००० |
| | **एकुण "अ","ब" व "क"** | **४५३,७०,०७,०००** | **३७८,०८,३९०००** | **१५१,४४,५७,०००** |

सन २०१४—१५ च्या 'अ''ब'व'क' अंदाजपत्रकात एकूण उत्पन्न रु. ६३६,९४,१५०००/— (प्रारंभिक शिल्लकेसह) अपेक्षित धरलेले आहे. प्रत्यक्षात माहे जानेवारी, २०१५ अखेरपर्यंत रू. २०३,११,६५,५४४/— (प्रारंभिक शिल्लकेसह) उत्पन्न प्राप्त झाले आहे. अपेक्षित धरण्यात आलेले जमा उत्पन्नापेक्षा प्रत्यक्ष जमा उत्पन्नामध्ये फार मोठी घट निर्देशनास येते.

पुरेसा कर्मचारीवृंद नसल्याने उत्पन्नाचे लेखा परिक्षण अद्यावत ठेवता येत नाही. तथापी आर्थिक वर्ष संपताच मागील वर्षाचे जमेचे लेखापरिक्षण करण्यात येत असून अनियमितता आढळल्यास निदर्शनास आणून देवून योग्य ती कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात येतात.

<u>खर्च—</u>

माहे जानेवारी, २०१५ अखेर पर्यंत रु. १८९,८१,३१,२८७/— खर्च लेखांकित झालेला आहे. तो एकूण प्रत्यक्ष जमा महसुलाच्या ९३.४५ टक्के झाल्याचे दिसून येत आहे. खर्चाचे पूर्व लेखापरिक्षण होत असते व लेखा परिक्षणात उपस्थित केलेल्या आक्षेपांचे निराकरण झाल्यावरच देयकाचे प्रदान करण्यात येत आहे. झालेला खर्च हा सक्षम प्राधिका—याच्या पूर्व मंजुरीने झालेला असून तो अर्थसंकल्पीय तरतूदीच्या अधिन आहे.

माहे फेब्रुवारी ची जमा व खर्चाची पत्रके सोबत जोडली आहेत.

निवृत्ती वेतन प्रकरणे—माहे जानेवारी, २०१५ मध्ये महानगरपालिकेच्या सेवेतून निवृत्त झालेल्या / निधन पावलेल्या कर्मचा—यांची ०३ निवृत्ती वेतन प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत.
**लेखा परिक्षणामध्ये निदर्शनास आलेल्या खालील गंभीर बाबींमुळे (मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ कलम ०६(१) अ च्या तरतुदीप्रमाणे) अर्थसंकल्पिय अंदाजाप्रमाणे महानगरपालिकेस फारच कमी उत्पन्न मिळाले आहे.**

१) स्थानिक संस्था कर  २) मालमत्ता कर  ३) महानगरपालिका मालमत्ता उत्पन्न
एकूण उत्पन्नात वाढ होणे आवश्यक आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ११०  दिनांकः— ३१/३/२०१६

सुचकाचे नाव :— श्री. राजेश वधारीया
अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार माहे जानेवारी २०१५ अखेरपर्यंतचा महानगरपालिका लेख्यांच्या छाननीचा मुख्य लेखा परिक्षकांचा अहवाल नोंद घेत आहे व उत्पन्न वाढविण्या प्रयोजनार्थ प्रशासनास योग्य उपाययोजना करण्यास व कठोर पावले उचलण्यास निर्देशित करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ६ :— माहे फेब्रुवारी २०१५ अखेरपर्यंतचा महानगरपालिका लेख्यांच्या छाननीचा मुख्य लेखा परिक्षकांचा अहवाल विचारात घेणे.**

---

महापालिका सचिव :— सदरहु विषय पारीत करण्यात यावा का?

काही सदस्य :—पास—पास......

सदस्य, श्री. राजेश वधारीया :— सदरहु विषयाच्या ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता करण्यात यावी.

<u>सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा :—</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र.६ :—** माहे **फेब्रुवारी २०१५** अखेरपर्यंतचा महानगरपालिका लेख्यांच्या छाननीचा मुख्य लेखा परिक्षकांचा अहवाल विचारात घेणे.

<u>प्रस्तावना</u>

मुबंई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ नुसार माहे फेब्रुवारी, २०१५ चा जमा खर्चाचा अहवाल खालील प्रमाणे सादर केलेला आहे. कृपया सदरचा अहवाल मा. स्थायी समितीपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात यावा.

<u>जमा:—</u>

वित्तीय वर्ष २०१४—२०१५ च्या “अ” “ब” व “क” अर्थसंकल्पात अंदाजे अपेक्षित केलेले उत्पन्न खालीलप्रमाणे आहे.

| अर्थसंकल्प | अंदाजपत्रकानुसार जमा रुपये |
|---|---|
| १ | २ |
| “अ” | ५०९,१८,७०,००० |
| “ब” | ७,६०,६२,००० |
| “क” | ११८,६८,००,००० |
| एकूण | ६३५,४७,३२,००० |

सदर अपेक्षित जमेमध्ये कर्ज वगळता खालील बाबी अंर्तभूत आहेत.

| अ.क्र. | बाब | अंदाजपत्रकानुसार जमा रुपये |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| २ | महसूल जमा | ४५३,७०,०७,००० |
| ३ | शासकीय अनुदान | ८०,८८,००,००० |
| ४ | अनामत रकमा/दायित्वे इ. | १५,०६,२५,००० |
| ५ | एकुण | ५४९,६४,३२,००० |
| ६ | प्रारंभिक शिल्लक | १४६,८३,००० |
| ७ | एकुण :— | ५५१११५००० |

वित्तीय वर्ष २०१४—२०१५ च्या अर्थसंकल्पात सुधारीत महसूल जमा रक्कम रुपये ४५३,७०,०७,०००/— अपेक्षित धरलेली आहे. माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये समप्रमाणात रुपये ४१५,८९,२५,०००/— महसूल उत्पन्न अपेक्षित होते. आरंभिची शिल्लक वगळता प्रत्यक्षात रुपये १५७,४७,१७,०००/— (एकूण अपेक्षित महसूल जमेच्या ३७.८६ टक्के) महसूल उत्पन्न प्राप्त झाले.

माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये प्रारंभिक अंदाजानुसार अपेक्षित असलेली जमा व प्रत्यक्ष जमा महसूल लेखा शिर्षनिहाय खालीलप्रमाणे आहे.

| लेखा शिर्ष<br>अर्थ संकल्प “अ” | | सन २०१४—१५ चे अंदाजित उत्पन्न | माहे **फेब्रुवारी**, २०१५ पर्यंत अपेक्षित उत्पन्न | माहे **फेब्रुवारी**, २०१५ पर्यंत प्रत्यक्ष जमा उत्पन्न |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | स्थानिक संस्था कर | २१६,००,००,००० | १९८,००,००,००० | ८९,८९,९६००० |
| २ | मालमत्ता कर | ७०,६७,००,००० | ६४,७८,०८००० | २६,८६,७६,,००० |
| ३ | एम. आर. टी. पी. वसूली | ५२,१५,००,००० | ४७,८०,४२,००० | ७४,९३,५००० |
| ४ | अनाधिकृत बांधकाम दंड वसूली | १,००,००,००० | ९१,६७,००० | — |
| ५ | रुग्णालय फी | ४,५०,००० | ४,१३००० | १,४५,००० |
| ६ | परवाना व इतर फी | २,८२,००,००० | २,५८,५०,००० | ३,४९,४००० |
| ७ | संकीर्ण | २,१९,९५,००० | २,०१,६२,००० | —. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८ | महानगरपालिका मालमत्ता उत्पन्न | ३१,०९,००,००० | २८,४९,९२,००० | २,१५,२१,००० |
| | एकूण “अ” | ३७५,९७,४५,००० | ३४४,६४,३४,००० | १२६,७७,६७,००० |
| | अर्थसंकल्प “ब” | | | |
| | महसूल उत्पन्न | ७,६०,६२,००० | ६,९७,२४००० | ५,९८,६००० |
| | एकूण “ब” | ७,६०,६२,००० | ६,९७,२४००० | ५,९८,६००० |
| | अर्थसंकल्प “क” | | | |
| १ | पाणी बिल वसुली (कर) | ३०,००,००,००० | २७,५०,००,००० | २०,३१,४८,००० |
| १ (अ) | पाणी बिल वसुली (पाणी पट्टी) | २१,००,००,००० | १९,२५,००,००० | २,३७,३६,००० |
| २ | मालमत्ता कर | १९,००,००,००० | १७,४१,६७,००० | ७,३९,२७,००० |
| ३ | परवाना/इतर फी | ९,००,००० | ८,२५,००० | १,५३,००० |
| ४ | संकीर्ण | ३,००,००० | २,७५,००० | — |
| | एकुण “क” | ७०,१२,००,००० | ६४,२७,६७,००० | ३०,०९,६४,००० |
| | एकुण “अ”,“ब” व “क” | ४५३,७०,०७,००० | ४१५,८९,२५००० | १५७,४७,१७,००० |

सन २०१४–१५ च्या ‘अ’‘ब’व‘क’ अंदाजपत्रकात एकूण उत्पन्न रु. ६३६,९४,१५०००/– (प्रारंभिक शिल्लकेसह) अपेक्षित धरलेले आहे. प्रत्यक्षात माहे फेब्रुवारी, २०१५ अखेरपर्यंत रू. २१८,२४,८८,२०१/– (प्रारंभिक शिल्लकेसह) उत्पन्न प्राप्त झाले आहे. अपेक्षित धरण्यात आलेले जमा उत्पन्नापेक्षा प्रत्यक्ष जमा उत्पन्नामध्ये फार मोठी घट निर्देशनास येते.

पुरेसा कर्मचारीवृंद नसल्याने उत्पन्नाचे लेखा परिक्षण अद्यावत ठेवता येत नाही. तथापी आर्थिक वर्ष संपताच मागील वर्षाचे जमेचे लेखापरिक्षण करण्यात येत असून अनियमितता आढळल्यास निदर्शनास आणून देवून योग्य ती कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात येतात.

खर्च–

माहे फेब्रुवारी, २०१५ अखेर पर्यंत रु. २०५,४३,९०,२९९/– खर्च लेखांकित झालेला आहे. तो एकूण प्रत्यक्ष जमा महसुलाच्या ९४.१३ टक्के झाल्याचे दिसून येत आहे. खर्चाचे पूर्व लेखापरिक्षण होत असते व लेखा परिक्षणात उपस्थित केलेल्या आक्षेपांचे निराकरण झाल्यावरच देयकाचे प्रदान करण्यात येत आहे. झालेला खर्च हा सक्षम प्राधिका–याच्या पूर्व मंजुरीने झालेला असून तो अर्थसंकल्पीय तरतूदीच्या अधिन आहे.

माहे फेब्रुवारी ची जमा व खर्चाची पत्रके सोबत जोडली आहेत.

निवृत्ती वेतन प्रकरणे–माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये महानगरपालिकेच्या सेवेतून निवृत्त झालेल्या / निधन पावलेल्या कर्मचा–यांची ०९ निवृत्ती वेतन प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत.

**लेखा परिक्षणामध्ये निदर्शनास आलेल्या खालील गंभीर बाबींमुळे (मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ कलम ०६(१) अ च्या तरतुदीप्रमाणे) अर्थसंकल्पिय अंदाजाप्रमाणे महानगरपालिकेस फारच कमी उत्पन्न मिळाले आहे.**

१) स्थानिक संस्था कर  २) मालमत्ता कर  ३) महानगरपालिका मालमत्ता उत्पन्न

एकूण उत्पन्नात वाढ होणे आवश्यक आहे.

**स्थायी समिती ठराव क्र. १११** दिनांकः– ३१/३/२०१६

सुचकाचे नाव :– श्री. राजेश वधारीया
अनुमोदकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार माहे **फेब्रुवारी २०१५** अखेरपर्यंतचा महानगरपालिका लेख्यांच्या छाननीचा मुख्य लेखा परिक्षकांचा अहवाल नोंद घेत आहे व उत्पन्न वाढविण्या प्रयोजनार्थ प्रशासनास योग्य उपाययोजना करण्यास व कठोर पावले उचलण्यास निर्देशित करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

⇨ **विषय क्र. ७ :— माहे मार्च २०१५ अखेरपर्यंतचा महानगरपालिका लेख्यांच्या छाननीचा मुख्य लेखा परिक्षकांचा अहवाल विचारात घेणे.**

**महापालिका सचिव :—** सदरहु विषय पारीत करण्यात यावा का?

**सदस्य, श्री. राजेश वधारीया :—** सदरहु विषयाच्या ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता करण्यात यावी.

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा :—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑

**विषय क्र.७** :— माहे **मार्च २०१५** अखेरपर्यंतचा महानगरपालिका लेख्यांच्या छाननीचा मुख्य लेखा परिक्षकांचा अहवाल विचारात घेणे.

**प्रस्तावना**

मुबंई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ नुसार माहे मार्च, २०१५ चा जमा खर्चाचा अहवाल खालील प्रमाणे सादर केलेला आहे. कृपया सदरचा अहवाल मा. स्थायी समितीपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात यावा.

जमा:—

वित्तीय वर्ष २०१४—२०१५ च्या “अ” “ब” व “क” अर्थसंकल्पात अंदाजे अपेक्षित केलेले उत्पन्न खालीलप्रमाणे आहे.

| अर्थसंकल्प | अंदाजपत्रकानुसार जमा रुपये |
|---|---|
| १ | २ |
| “अ” | ५०९,१८,७०,००० |
| “ब” | ७,६०,६२,००० |
| “क” | ११८,६८,००,००० |
| एकूण | ६३५,४७,३२,००० |

सदर अपेक्षित जमेमध्ये कर्ज वगळता खालील बाबी अंर्तभूत आहेत.

| अ.क्र. | बाब | अंदाजपत्रकानुसार जमा रुपये |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| २ | महसूल जमा | ४५३,७०,०७,००० |
| ३ | शासकीय अनुदान | ८०,८८,००,००० |
| ४ | अनामत रकमा/दायित्वे इ. | १५,०६,२५,००० |
| ५ | एकुण | ५४९,६४,३२,००० |
| ६ | प्रारंभिक शिल्लक | १४६,८३,००० |
| ७ | एकुण :— | ५५१११९५००० |

वित्तीय वर्ष २०१४—२०१५ च्या अर्थसंकल्पात सुधारीत महसूल जमा रक्कम रुपये ४५३,७०,०७,०००/— अपेक्षित धरलेली आहे. माहे मार्च, २०१५ मध्ये समप्रमाणात रुपये

४५३,७०,०७,०००— महसूल उत्पन्न अपेक्षित होते. आरंभिची शिल्लक वगळता प्रत्यक्षात रुपये २०४,६१,४९,०००/— (एकूण अपेक्षित महसूल जमेच्या ४५ टक्के) महसूल उत्पन्न प्राप्त झाले.

माहे मार्च, २०१५ मध्ये प्रारंभिक अंदाजानुसार अपेक्षित असलेली जमा व प्रत्यक्ष जमा महसूल लेखा शिर्षनिहाय खालीलप्रमाणे आहे.

| लेखा शिर्ष **अर्थ संकल्प "अ"** | | सन २०१४—१५ चे अंदाजित उत्पन्न | माहे मार्च, २०१५ पर्यंत अपेक्षित उत्पन्न | माहे मार्च, २०१५ पर्यंत प्रत्यक्ष जमा उत्पन्न |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | स्थानिक संस्था कर | २१६,००,००,००० | २१६,००,००,००० | ९६,२१,९७,००० |
| २ | मालमत्ता कर | ७०,६७,००,००० | ७०,६७,००,००० | ४३,०६,८०,००० |
| ३ | एम. आर. टी. पी. वसूली | ५२,१५,००,००० | ५२,१५,००,००० | ७,६८,२७,००० |
| ४ | अनाधिकृत बांधकाम दंड वसूली | १,००,००,००० | १,००,००,००० | —. |
| ५ | रुग्णालय फी | ४,५०,००० | ४,५०,००० | १,६०,००० |
| ६ | परवाना व इतर फी | २,८२,००,००० | २,८२,००,००० | ४५,४७,००० |
| ७ | संकीर्ण | २,१९,९५,००० | २,१९,९५,००० | — |
| ८ | महानगरपालिका मालमत्ता उत्पन्न | ३१,०९,००,००० | ३१,०९,००,००० | २,४४,५९,००० |
| | **एकूण "अ"** | ३७५,९७,४५,००० | ३७५,९७,४५,००० | १४९,८८,७०,००० |
| | **अर्थसंकल्प "ब"** | | | |
| | महसूल उत्पन्न | ७,६०,६२,००० | ७,६०,६२,००० | — |
| | **एकूण "ब"** | ७,६०,६२,००० | ७,६०,६२,००० | — |
| | **अर्थसंकल्प "क"** | | | |
| १ | पाणी बिल वसुली (कर) | ३०,००,००,००० | ३०,००,००,००० | ३८,८३,६९,००० |
| १ (अ) | पाणी बिल वसुली (पाणी पट्टी) | २१,००,००,००० | २१,००,००,००० | ३,००,९२,००० |
| २ | मालमत्ता कर | १९,००,००,००० | १९,००,००,००० | १२,८७,८६,००० |
| ३ | परवाना/इतर फी | ९,००,००० | ९,००,००० | ३,२१,००० |
| ४ | संकीर्ण | ३,००,००० | ३,००,००० | — |
| | **एकुण "क"** | ७०,१२,००,००० | ७०,१२,००,००० | ५४,७२,७९,००० |
| | **एकुण "अ","ब" व "क"** | ४५३,७०,०७,००० | ४५३,७०,०७,००० | २०४,६१,४९,००० |

सन २०१४—१५ च्या 'अ''ब'व'क' अंदाजपत्रकात एकूण उत्पन्न रु. ६३६९४१५०००/— (प्रारंभिक शिल्लकेसह) अपेक्षित धरलेले आहे. प्रत्यक्षात माहे मार्च, २०१५ अखेरपर्यंत रू. २९२२२५१४४१/— (प्रारंभिक शिल्लकेसह) उत्पन्न प्राप्त झाले आहे.

पुरेसा कर्मचारीवृंद नसल्याने उत्पन्नाचे लेखा परिक्षण अद्यावत ठेवता येत नाही. तथापी आर्थिक वर्ष संपताच मागील वर्षाचे जमेचे लेखापरिक्षण करण्यात येत असून अनियमितता आढळल्यास निदर्शनास आणून देवून योग्य ती कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात येतात.

खर्च—

माहे मार्च, २०१५ अखेर पर्यंत रु. २५४९८२०८७९/— खर्च लेखांकित झालेला आहे. तो एकूण प्रत्यक्ष जमा महसुलाच्या ८७.२५ टक्के झाल्याचे दिसून येत आहे. खर्चाचे पूर्व लेखापरिक्षण होत असते व लेखा परिक्षणात उपस्थित केलेल्या आक्षेपांचे निराकरण झाल्यावरच देयकाचे प्रदान करण्यात येत आहे. झालेला खर्च हा सक्षम प्राधिका—याच्या पूर्व मंजुरीने झालेला असून तो अर्थसंकल्पीय तरतूदीच्या अधिन आहे.

माहे मार्च ची जमा व खर्चाची पत्रके सोबत जोडली आहेत.

निवृत्ती वेतन प्रकरणे—माहे मार्च, २०१५ मध्ये महानगरपालिकेच्या सेवेतून निवृत्त झालेल्या / निधन पावलेल्या कर्मचा—यांची १८ निवृत्ती वेतन प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत.

लेखा परिक्षणामध्ये निदर्शनास आलेल्या गंभीर बाबी (मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ कलम ०६(१) अ च्या तरतुदीप्रमाणे) अर्थसंकलपिय अंदाजाप्रमाणे महानगरपालिकेस फारच कमी उत्पन्न मिळाले आहे.

१) स्थानिक संस्था कर २) मालमत्ता कर ३) महानगरपालिका मालमत्ता उत्पन्न

एकूण उत्पन्नात वाढ होणे आवश्यक आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ११२ दिनांकः— ३१/३/२०१६

सुचकाचे नाव :— श्री. राजेश वधारीया

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार माहे **मार्च** २०१५ अखेरपर्यंतचा महानगरपालिका लेख्यांच्या छाननीचा मुख्य लेखा परिक्षकांचा अहवाल नोंद घेत आहे व उत्पन्न वाढविण्या प्रयोजनार्थ प्रशासनास योग्य उपाययोजना करण्यास व कठोर पावले उचलण्यास निर्देशित करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ८ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ८ :— माहे एप्रिल २०१५ अखेरपर्यंतचा महानगरपालिका लेख्यांच्या छाननीचा मुख्य लेखा परिक्षकांचा अहवाल विचारात घेणे.**

---

महापालिका सचिव :— सदरहु विषय पारीत करण्यात यावा का?

काही सदस्य :—पास—पास......

सदस्य, श्री. राजेश वधारीया :— सदरहु विषयाच्या ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता करण्यात यावी.

सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा :—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ८**:— माहे **एप्रिल** २०१५ अखेरपर्यंतचा महानगरपालिका लेख्यांच्या छाननीचा मुख्य लेखा परिक्षकांचा अहवाल विचारात घेणे.

प्रस्तावना

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ नुसार माहे एप्रिल, २०१५ चा जमा खर्चाचा अहवाल खालील प्रमाणे सादर केलेला आहे. कृपया सदरचा अहवाल मा. स्थायी समितीपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात यावा.

जमा:—

वित्तीय वर्ष २०१५—२०१६ च्या “अ” “ब” व “क” अर्थसंकल्पात अंदाजे अपेक्षित केलेले उत्पन्न खालीलप्रमाणे आहे.

| अर्थसंकल्प | अंदाजपत्रकानुसार जमा रुपये |
|---|---|
| १ | २ |
| “अ” | ४९६११०२००० |
| “ब” | ७७९००००० |
| “क” | १२१८१५०००० |
| एकूण | ६२५,७१,५२,००० |

सदर अपेक्षित जमेमध्ये कर्ज वगळता खालील बाबी अंर्तभूत आहेत.

| अ.क्र. | बाब | अंदाजपत्रकानुसार जमा रुपये |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| २ | महसूल जमा | १०४९३०००० |
| ३ | शासकीय अनुदान | १३४८९७,००० |
| ४ | अनामत रकमा/दायित्वे इ. | १५,२१,००० |
| ५ | एकुण | २४१३४८००० |
| ६ | प्रारंभिक शिल्लक | ३७२४३०५६२ |
| ७ | एकुण :— | ६१३७७९००० |

वित्तीय वर्ष २०१५—२०१६ च्या अर्थसंकल्पात सुधारीत महसूल जमा रक्कम रुपये ५३६८९५७०००/— अपेक्षित धरलेली आहे. माहे एप्रिल, २०१५ मध्ये समप्रमाणात रुपये ६५७०७९०००/— महसूल उत्पन्न अपेक्षित होते. आरंभिची शिल्लक वगळता प्रत्यक्षात रुपये १०४९२९०००./— (एकूण अपेक्षित महसूल जमेच्या १५.९६ टक्के) महसूल उत्पन्न प्राप्त झाले.

माहे एप्रिल, २०१५ मध्ये प्रारंभिक अंदाजानुसार अपेक्षित असलेली जमा व प्रत्यक्ष जमा महसूल लेखा शिर्षनिहाय खालीलप्रमाणे आहे.

| लेखा शिर्ष **अर्थ संकल्प “अ”** | | सन २०१५—१६ चे अंदाजित उत्पन्न | माहे एप्रिल, २०१५पर्यंत अपेक्षित उत्पन्न | माहे एप्रिल, २०१५पर्यंत प्रत्यक्ष जमा उत्पन्न |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | स्थानिक संस्था कर | २५०००००००० | २०८०००००० | ८१८७८००० |
| २ | मालमत्ता कर | ७९३९५०००० | ६६१६२००० | ८१८९००० |
| ३ | एम. आर. टी. पी. वसूली | ५८१५००००० | ४८४५८००० | १२६८००० |
| ४ | अनाधिकृत बांधकाम दंड वसूली | १००००००० | ८३३००० | |
| ५ | रुग्णालय फी | ४५०००० | ३८००० | ११००० |
| ६ | परवाना व इतर फी | ५९४५०००० | ४९५५००० | २४०००० |
| ७ | संकीर्ण | १७६५००००० | १४७०८००० | |
| ८ | महानगरपालिका मालमत्ता उत्पन्न | २९०५७००० | २४२२००० | ५२७००० |
| | **एकूण “अ”** | ४१५०९०७००० | ३४५५७६००० | ९२११३००० |
| | **अर्थसंकल्प “ब”** | | | |
| | महसूल उत्पन्न | २५००००० | २०८००० | |
| | **एकूण “ब”** | २५००००० | २०८००० | |

| | अर्थसंकल्प "क" | | | |
|---|---|---|---|---|
| १ | पाणी बिल वसुली (कर) | ४००००००००० | ३३३३३००० | ८२५६००० |
| १ (अ) | पाणी बिल वसुली (पाणी पट्टी) | १६०००००००० | १३३३३००० | २३३१००० |
| २ | मालमत्ता कर | २२४६५००००० | १८७२१००० | २२१७००० |
| ३ | परवाना/इतर फी | १५०९०००००० | १२५७५००० | १२००० |
| ४ | संकीर्ण | २८०००००००० | २३३३३३००० | |
| | **एकुण "क"** | **१२१५५५००००** | **३११२९५०००** | **१२८१६०००** |
| | **एकुण "अ","ब" व "क"** | **५३६८९५७०००** | **६५७०७९०००** | **१०४९२९०००** |

सन २०१५–१६ च्या 'अ''ब'व'क' अंदाजपत्रकात एकूण उत्पन्न रु. ६२६०७८२०००/– (प्रारंभिक शिल्लकेसह) अपेक्षित धरलेले आहे. प्रत्यक्षात माहे एप्रिल, २०१५ अखेरपर्यंत रू. ६१५३९९३४९/– (प्रारंभिक शिल्लकेसह) उत्पन्न प्राप्त झाले आहे.

पुरेसा कर्मचारीवृंद नसल्याने उत्पन्नाचे लेखा परिक्षण अद्यावत ठेवता येत नाही. तथापी आर्थिक वर्ष संपताच मागील वर्षाचे जमेचे लेखापरिक्षण करण्यात येत असून अनियमितता आढळल्यास निदर्शनास आणून देवून योग्य ती कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात येतात.

खर्च–

माहे एप्रिल, २०१५ अखेर पर्यंत रु. ३९६१७२९७९/– खर्च लेखांकित झालेला आहे. तो एकूण प्रत्यक्ष जमा महसुलाच्या ६४. ३७ टक्के झाल्याचे दिसून येत आहे. खर्चाचे पूर्व लेखापरिक्षण होत असते व लेखा परिक्षणात उपस्थित केलेल्या आक्षेपांचे निराकरण झाल्यावरच देयकाचे प्रदान करण्यात येत आहे. झालेला खर्च हा सक्षम प्राधिका–याच्या पूर्व मंजुरीने झालेला असून तो अर्थसंकल्पीय तरतूदीच्या अधिन आहे.

माहे एप्रिल ची जमा व खर्चाची पत्रके सोबत जोडली आहेत.

निवृत्ती वेतन प्रकरणे–माहे एप्रिल, २०१५ मध्ये महानगरपालिकेच्या सेवेतून निवृत्त झालेल्या / निधन पावलेल्या कर्मचा–यांची ०१ निवृत्ती वेतन प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत.

लेखा परिक्षणामध्ये निदर्शनास आलेल्या गंभीर बाबी (मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ कलम ०६(१) अ च्या तरतुदीप्रमाणे) अर्थसंकलपिय अंदाजाप्रमाणे महानगरपालिकेस फारच कमी उत्पन्न मिळाले आहे.

१) स्थानिक संस्था कर २) मालमत्ता कर ३) महानगरपालिका मालमत्ता उत्पन्न एकूण उत्पन्नात वाढ होणे आवश्यक आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ११३ दिनांकः–३१/३/२०१६

सुचकाचे नाव :– श्री. राजेश वधारीया
अनुमोदकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार माहे **एप्रिल २०१५** अखेरपर्यंतचा महानगरपालिका लेख्यांच्या छाननीचा मुख्य लेखा परिक्षकांचा अहवाल नोंद घेत आहे व उत्पन्न वाढविण्या प्रयोजनार्थ प्रशासनास योग्य उपाययोजना करण्यास व कठोर पावले उचलण्यास निर्देशित करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. ९ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. ९ :– माहे मे२०१५ ते ऑक्टोंबर २०१५ अखेरपर्यंतचा महानगरपालिका लेख्यांच्या छाननीचा मुख्य लेखा परिक्षकांचा अहवाल विचारात घेणे.

---

<u>महापालिका सचिव :—</u> सदरहु विषय पारीत करण्यात यावा का?

<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया :—</u> सदरहु विषयाच्या ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता करण्यात यावी.

<u>काही सदस्य :—</u>पास—पास……

<u>सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा :—</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ९ :— माहे मे ते ऑक्टोबर २०१५अखेरपर्यंतचा महानगरपालिका लेख्यांच्या** छाननीचा मुख्य लेखा परिक्षकांचा अहवाल विचारात घेणे.

<u>प्रस्तावना</u>

मुबंई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ नुसार माहे मे ते ऑक्टोबर २०१५ चा जमा खर्चाचा अहवाल खालील प्रमाणे सादर केलेला आहे. कृपया सदरचा अहवाल मा. स्थायी समितीपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात यावा.

<u>जमाः—</u>

वित्तीय वर्ष २०१५—२०१६ च्या “अ” “ब” व “क” अर्थसंकल्पात अंदाजे अपेक्षित केलेले उत्पन्न खालीलप्रमाणे आहे.

| अर्थसंकल्प | अंदाजपत्रकानुसार जमा रुपये |
|---|---|
| १ | २ |
| “अ” | ४९६११०२००० |
| “ब” | ७७९००००० |
| “क” | १२१८१५०००० |
| एकूण | ६२५,७१,५२,००० |

सदर अपेक्षित जमेमध्ये कर्ज वगळता खालील बाबी अंर्तभूत आहेत.

| अ.क्र. | बाब | अंदाजपत्रकानुसार जमा रुपये |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| २ | महसूल जमा | १०४९३०००० |
| ३ | शासकीय अनुदान | १३४८९७,००० |
| ४ | अनामत रकमा/दायित्वे इ. | १५,२१,००० |
| ५ | एकुण | २४१३४८००० |
| ६ | प्रारंभिक शिल्लक | ३७२४३०५६२ |
| ७ | एकुण :— | ६१३७७९००० |

वित्तीय वर्ष २०१५—२०१६ च्या अर्थसंकल्पात सुधारीत महसूल जमा रक्कम रुपये ५१९३६५७०००/— अपेक्षित धरलेली आहे. माहे मे ते ऑक्टोबर, २०१५ मध्ये समप्रमाणात रुपये २५९६८२९०००/— महसूल उत्पन्न अपेक्षित होते. आरंभिची शिल्लक वगळता प्रत्यक्षात रुपये ८६८७७३०००/— (एकूण अपेक्षित महसूल जमेच्या ३३.४५ टक्के) महसूल उत्पन्न प्राप्त झाले.

माहे मे ते ऑक्टोबर, २०१५ मध्ये प्रारंभिक अंदाजानुसार अपेक्षित असलेली जमा व प्रत्यक्ष जमा महसूल लेखा शिर्षनिहाय खालीलप्रमाणे आहे.

| लेखा शिर्ष<br>अर्थ संकल्प "अ" | | सन २०१५—१६ चे अंदाजित उत्पन्न | माहे मे ते ऑक्टोबर, २०१५पर्यंत अपेक्षित उत्पन्न | माहे मे ते ऑक्टोबर, २०१५पर्यंत प्रत्यक्ष जमा उत्पन्न |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | स्थानिक संस्था कर | २५००००००००० | १२५००००००० | ४७२८३२००० |
| २ | मालमत्ता कर | ७९३९५०००० | ३९६९७५००० | ११६७३७००० |
| ३ | एम. आर. टी. पी. वसूली | ५८१५००००० | २९०७५०००० | १३०२९२००० |
| ४ | अनाधिकृत बांधकाम दंड वसूली | १००००००० | ५०००००० | . |
| ५ | रुग्णालय फी | ४५०००० | २२५००० | ८९००० |
| ६ | परवाना व इतर फी | ५९४५०००० | २९७२५००० | ७४६०००० |
| ७ | संकीर्ण | २९०५७००० | १४५२९००० | २७०९००० |
| ८ | महानगरपालिका मालमत्ता उत्पन्न | २८०९००००० | १४०४५०००० | ६१०८००० |
| | एकूण "अ" | ४२५५३०७००० | २१२७६५४००० | ७३६२२७००० |
| | अर्थसंकल्प "ब" | | | — |
| | महसूल उत्पन्न | २५००००० | १२५०००० | — |
| | एकूण "ब" | २५००००० | १२५०००० | — |
| | अर्थसंकल्प "क" | | | — |
| १ | पाणी बिल वसुली (कर) | ४०००००००० | २०००००००० | ८२१८४००० |
| १ (अ) | पाणी बिल वसुली (पाणी पट्टी) | १६००००००० | ८०००००००० | १३५६७००० |
| २ | मालमत्ता कर | २२४६५०००० | ११२३२५००० | ३६६३३००० |
| ३ | परवाना/इतर फी | १५०९००००० | ७५४५०००० | १४१००० |
| ४ | संकीर्ण | ३००००० | १५०००० | २१००० |
| | एकुण "क" | ९३५८५०००० | ४६७९२५००० | १३२५४६००० |
| | एकुण "अ","ब" व "क" | ५१९३६५७००० | २५९६८२९००० | ८६८७७३००० |

सन २०१५—१६ च्या 'अ''ब'व'क' अंदाजपत्रकात एकूण उत्पन्न रु. ६२६०७८२०००/— (प्रारंभिक शिल्लकेसह) अपेक्षित धरलेले आहे. प्रत्यक्षात माहे मे ते ऑक्टोबर, २०१५ अखेरपर्यंत रू. १९४३९४५९४९/— (प्रारंभिक शिल्लकेसह) उत्पन्न प्राप्त झाले आहे.

पुरेसा कर्मचारीवृंद नसल्याने उत्पन्नाचे लेखा परिक्षण अद्यावत ठेवता येत नाही. तथापी आर्थिक वर्ष संपताच मागील वर्षाचे जमेचे लेखापरिक्षण करण्यात येत असून अनियमितता आढळल्यास निदर्शनास आणून देवून योग्य ती कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात येतात.

<u>खर्च—</u>

माहे मे ते ऑक्टोबर, २०१५ अखेर पर्यंत रु. १६७७००६६७५/— खर्च लेखांकित झालेला आहे. तो एकूण प्रत्यक्ष जमा महसुलाच्या ८६.२६ टक्के झाल्याचे दिसून येत आहे. खर्चाचे पूर्व लेखापरिक्षण होत

असते व लेखा परिक्षणात उपस्थित केलेल्या आक्षेपांचे निराकरण झाल्यावरच देयकाचे प्रदान करण्यात येत आहे. झालेला खर्च हा सक्षम प्राधिका–याच्या पूर्व मंजुरीने झालेला असून तो अर्थसंकल्पीय तरतूदीच्या अधिन आहे.

माहे एप्रिल ची जमा व खर्चाची पत्रके सोबत जोडली आहेत.

निवृत्ती वेतन प्रकरणे–माहे मे ते ऑक्टोबर, २०१५ मध्ये महानगरपालिकेच्या सेवेतून निवृत्त झालेल्या / निधन पावलेल्या कर्मचा–यांची ...... निवृत्ती वेतन प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत.
लेखा परिक्षणामध्ये निदर्शनास आलेल्या गंभीर बाबी (मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ कलम ०६(१) अ च्या तरतुदीप्रमाणे) अर्थसंकलपिय अंदाजाप्रमाणे महानगरपालिकेस फारच कमी उत्पन्न मिळाले आहे.
१) स्थानिक संस्था कर २) मालमत्ता कर ३) महानगरपालिका मालमत्ता उत्पन्न
एकूण उत्पन्नात वाढ होणे आवश्यक आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ११४</u> <u>दिनांक:–३१/३/२०१६</u>

सुचकाचे नाव :– श्री. राजेश वधारीया

अनुमोदकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार माहे **मे ते ऑक्टोबर २०१५**अखेरपर्यंतचा महानगरपालिका लेख्यांच्या छाननीचा मुख्य लेखा परिक्षकांचा अहवाल नोंद घेत आहे व उत्पन्न वाढविण्या प्रयोजनार्थ प्रशासनास योग्य उपाययोजना करण्यास व कठोर पावले उचलण्यास निर्देशित करीत आहे.

सुचकाची <u>सही/–</u>

अनुमोदकाची <u>सही/–</u>

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. १० वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १० :– प्रभाग क्षेत्र क्र.१,२ व ३ मधील उल्हासनगर क्षेत्र क्र. १, २ व ३ येथे रस्त्यावर ट्रॅफीक साईन बोर्ड लावणे व रस्त्यावर थर्मोप्लास्टीक पेंट करणे या कामास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.**

---

<u>महापालिका सचिव :–</u> सदरहु विषय पारीत करण्यात यावा का?

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया :–</u> सदरहु विषयाच्या ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता करण्यात यावी.

<u>सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा :—</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १० :—** प्रभाग क्षेत्र क्र.१,२ व ३ मधील उल्हासनगर क्षेत्र क्र. १, २ व ३ येथे रस्त्यावर ट्रॅफीक साईन बोर्ड लावणे व रस्त्यावर थर्मोप्लास्टीक पेंट करणे या कामास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

<u>प्रस्तावना</u>

पोलीस निरीक्षक, शहर वाहतूक उपशाखा, उल्हासनगर यांचे संदर्भिय पत्र या कार्यालयास प्राप्त झाले होते. सदर पत्रानुसार त्यांनी उल्हासनगर हद्दीतील नो पार्कींग, पी १, पी २, प्रवेश बंद असे फलक निघुन पडले असून काही ठिकाणी बोर्डावरील लिहिलेला मजकूर दिसत नाही तसेच शहर वाहतूक उपशाखा उल्हासनगर कार्यालयाकडून टोईंग वाहनांवर कारवाई तसेच जामरद्वारे कारवाई करताना अडचणी येत असून जनतेशी वादविवाद होतात, या सर्व कारणांमुळे वाहतूक चिन्ह दर्शविणारे नो पार्कींग चे ५० बोर्ड, पी १ पी २ चे ३० बोर्ड त्यांचे पत्रात नमुद ठिकाणी लावणेकरीता विनंती केली आहे.

सदर कामाचे सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे रु.३४,७४,३२५/— एवढया रक्कमेचे प्राकलन तयार करण्यात आले आहे. सदर खर्च महापालिका अर्थसंकल्पातील वाहतूक साईन बोर्ड बसविणे या लेखाशिर्षातील उपलब्ध तरतूदीतून हाती घेणे आहे. सदर लेखाशिर्षाची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| i) लेखाशिर्षाचे नाव | :– Providing Traffic Sign Boards |
| ii) लेखाशिर्षामध्ये उपलब्ध एकंदर तरतूद | :— रु. १,००,००,०००/— |
| iii) या कामापूर्वी बजेट कंट्रोल रजिस्टरप्रमाणे शिल्लक असलेली तरतुद | :— रु. ६८,१८,४५०/— |
| iv) या कामावरील खर्च | :— रु. ३४,७४,३२५/— |
| v) या कामानंतर उक्त लेखाशिर्षात शिल्लक राहणारी तरतुद | :— रु. ३३,४४,१२५/— |

वरील प्रस्तावाकरीता निविदा प्रक्रिया करणेस मा.आयुक्त सो. यांनी दिनांक १४/८/२०१५ रोजी मान्यता दिली आहे. तरी प्रभाग क्षेत्र क्र.१,२ व ३ मधील उल्हासनगर क्षेत्र क्र.१,२ व ३ येथे रस्त्यावर ट्रॅफीक साईन बोर्ड लावणेचे कामाची निविदा प्रक्रिया करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक असल्याने मा.स्थायी समितीच्या पटलावर मान्यतेकरीता प्रस्तावित.

<u>स्थायी समिती ठराव क्र. </u> ११५ <u>दिनांक:— ३१/३/२०१६</u>

सुचकाचे नाव :— श्री. राजेश वधारीया

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार प्रभाग क्षेत्र क्र. १,२ व ३ मधील उल्हासनगर क्षेत्र क्र. १, २ व ३ येथे रस्त्यावर ट्रॅफीक साईन बोर्ड लावणे या कामाची निविदा प्रक्रीया करणेस प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची <u>सही/—</u>

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ११ वाचुन दाखवितात.

---

**विषय क्र. ११ :— स्थानिक संस्था कर विभागासाठी ६ सल्लागार नियुक्ती करणेबाबत.**

---

**महापालिका सचिव :—** सदरहु विषय पारीत करण्यात यावा का?

**सदस्य, श्री. राजेश वधारीया :—** महासभेमध्ये ठरल्यानुसार विभागाने संपूर्ण अहवाल आधी स्थायी समिती सभेत सादर करणे आवश्यक असेल त्यानंतर यावर निर्णय घेणे योग्य राहिल, त्यामुळे आता विषय वगळण्यात यावा.

**काही सदस्य :—**सदरहु विषय वगळण्यात यावा.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया :—** सदरहु विषयाच्या ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता करण्यात यावी.

**सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा :—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ११ :—** स्थानिक संस्था कर विभागासाठी ६ सल्लागार नियुक्ती करणेबाबत.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात दि. ०१ जुलै २०१२ पासुन स्थानिक संस्था कर प्रणाली अंमलात आली आहे. त्याअनुषंगांने आजपर्यंत १५१२८ व्यापाऱ्यांची नोंदणी करण्यात आलेली अूसन, स्थानिक संस्था कर नियम २०१० चे नियम २९ (२) (ख) अंतर्गत प्रत्येक नोंदणीकृत व्यापाऱ्यांनी आपले व्यवसायासंबंधीचे वार्षिक विवरणपत्र सादर करणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने सन २०१२—१३, २०१३—१४ व २०१४—१५ या आर्थिक वर्षाचे व्यापाऱ्यांनी सादर केलेले वार्षिक विवरणपत्र (E-II) सादर केलेले असून, त्यांचे मुल्यमापन (असेसमेंट) करून स्थानिक संस्था करातील फरक व व्यापाऱ्यांचे खरेदी—विक्री बाबतचे दस्तऐवज तपासणे तसेच ज्या व्यापाऱ्यांनी चुकीची माहिती सादर केलेली आहे अथवा कमी कर भरणा केलेला आहे याबाबतची शहानिशा करणेकामी तज्ञ व अनुभवी अधिका—यांची आवश्यकता आहे.

याबाबतचा गोषवारा दिनांक १४/०५/२०१५ रोजीच्या मा. महासभेच्या पटलावर सादर करण्यात आलेला आहे. परंतू सदरची महासभा तहकुब झालेली असून, पुढील महासभेचे आयोजन होईपर्यंत सदरचा ठराव संमत होण्यास विलंब लागणार असल्यामुळे व स्थानिक संस्था कराची वसुली वाढविण्याच्या दृष्टीने तसेच अशा व्यापा—यांचा फरक वसुल केल्यास महापालिकेच्या उत्पन्नात भरणा पडेल यादृष्टीने मागील तीन वर्षाचे मुल्यमापन करणे अत्यावश्यक आहे.

मा. महासभेच्या मंजुरीसाठी ठेवण्यात आलेल्या गोषवाऱ्याच्या मंजुरीच्या (महासभा ठराव) अधिन राहून मा. आयुक्त यांच्या मंजुरीने सल्लागार या पदाच्या नियुक्तीसाठी अनुभवी सेवानिवृत्त विक्रिकर/आयकर

अधिकारी/सनदी लेखापाल यांचेकडुन वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन सल्लागारांची (पात्र सनदी लेखापाल) नियुक्ती करणेकामी अटी/शर्तींच्या अधिन राहून अर्ज मागविण्यात येते होते.

: **स्थानिक संस्था कर विभागसाठी सल्लागार नियुक्तीबाबतच्या अटी व शर्ती** :

१) जाहिरातीमध्ये नमूद केल्याप्रमाणे ज्या कामांसाठी सल्लागार नियुक्त करावयाचे आहेत, त्या कामासाठी आवश्यक शैक्षणीक पात्रता असलेल्या उमेदवारांनी, स्वसाक्षांकित केलेल्या शैक्षणीक अर्हता व अनुभवांची प्रमाणपत्रे अर्जा सोबत जोडणे आवश्यक आहे. आवश्यकता असल्यास संबंधित सल्लागार व्यक्ती/संस्था यांना प्रत्यक्ष मुलाखतीसाठी बोलाविण्यात येईल त्यावेळी मूळ प्रमाणपत्रांची तपासणी करण्यात येईल.

२) विहित शैक्षणीक अर्हता धारण करणाऱ्या सल्लागारांनी/संस्थांनी दिनांक / / २०१५ पर्यंत जाहिराती मध्ये नमूद केलेल्या वेळेत अर्ज दाखल करावेत.

३) करावयाच्या कामासाठी स्थानिक संस्था कर रक्कमेच्या मर्यादेनुसार महापालिकेने एकत्रित दर निश्चित केलेले आहेत ते खालीलप्रमाणे

| LBT assessed amount (including interest, penalty etc) | Unit | Rate |
|---|---|---|
| Up to Rs. 5000 | Per assessee | 800 |
| From Rs. 5001 to Rs. 50000 | Per assessee | 1260 |
| From Rs. 50001 to Rs. 500000 | Per assessee | 3000 |
| From Rs. 500001 to Rs. 2500000 | Per assessee | 3400 |
| From Rs. 2500001 to Rs. 5000000 | Per assessee | 7250 |
| From 5000001 to Rs. 1 Crore | Per assessee | 12500 |
| Above Rs. 01 Crore | Per assessee | 14000 |

४) वरील दर हे ठरवून दिलेल्या कामासाठी एकत्रितपणे निश्चित केलेले असल्याने ज्या सल्लागारांकडून जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या कामापैकी जे काम करून घेतले जाईल त्या कामासाठी निश्चित केलेल्या एकूण रक्कमेच्या १/३, २/३ किंवा संपूर्ण रक्कम अदा केली जाईल.

५) सल्ला देण्यासाठी ज्या विवरणपत्राच्या नस्ती संबंधितांना उपलब्ध करून देण्यात येतील त्या संदर्भातील कामकाजाच्या नस्ती दिल्यापासून ०८ दिवसांच्या आत पूर्ण करावी लागेल तसे न केल्यास प्रति दिवस रू. ५०/— याप्रमाणे दंड आकारण्यात येईल.

६) कोणत्याही परिस्थितीत विवरणपत्राच्या नस्ती कार्यालयाच्या बाहेर नेता येणार नाहीत किंवा त्यांच्या छायांकीत प्रती काढुन घेता येणार नाही असे केल्याचे आढळून आल्यास त्यांचेवर कायद्यातील विहित तरतूदीप्रमाणे पुढील कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

७) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५२ (म) मधील तरतूदीप्रमाणे सल्लागार यांना दिलेल्या कामाची कोणतीही माहिती अन्य व्यक्तीस/संस्थेस देता येणार नाही असे हमीपत्र द्यावे लागेल.

८) वरील प्रकारच्या कामांसाठी निश्चित केलेली शैक्षणीक अर्हता असलेल्या उमेदवारांनी प्रस्तूत कामकाजासाठी श्रवपदज टमदजनतम करता येईल. मात्र Joint Venture मध्ये अटी व शर्ती या महापालिकेस लागू असलेल्या नियमातील तरतूदींशी व प्रस्तूत कामकाजाच्या अटी व शर्तींशी विसंगत असणार नाहीत.

९) Joint Venture केलेले असल्यास एकापेक्षा जास्त सल्लागार एकत्रितपणे अर्ज करण्यास पात्र असतील.

१०) सल्लागार म्हणून नियुक्ती केल्यास विहित नमुन्यात व विहित रक्कमेच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करून द्यावा लागेल.

११) प्रस्तूत कामामध्ये विवरणपत्रांची छाननी करणे, निर्धारणा आदेश पारित करणे, पुर्ननिर्धारणा करणे, पुर्ननिधारणा आदेश पारित करणे, पुर्ननिर्धारणा आदेशामध्ये दुरूस्ती करणे, अपील प्राप्त झाल्यास त्याची छाननी करणे, त्या संदर्भातील सल्ला देणे, स्थानिक संस्था कर विवरणपत्र धारकांना परतावा मागीतला असल्यास, दिलेला परतावा योग्य आहे किंवा नाही याबाबत सल्ला देणे इत्यादी व इतर त्या अनुषंगाने येणारी इतर सर्व कामे अभिप्रेत आहेत.

१२) संबंधित सल्लागार यांना द्यावयाच्या सल्लागार फी मधून शासनाचे दरांप्रमाणे आवश्यक असलेले सर्व कर व दर यांची कपात करून घेण्यात येईल.

१३) केलेली नियुक्ती पूर्णपणे तात्पूरत्या स्वरूपाची असून, कोणत्याही वेळी सल्ला देण्याबाबतची सेवा खंडित करण्याचे अधिकार महापालिकेचे राहतील. त्याबाबतचे कोणतेही स्पष्टीकरण देणे महापालिकेवर बंधनकारक असणार नाही.

१४) सल्लागार त्यांचे मदतीसाठी त्यांचे कर्मचारी नियुक्त करू शकतील. मात्र त्यापूर्वी अशी नेमणूक करण्यासाठी स्थानिक संस्था कर विभागाकडील उपायुक्त, स्थानिक संस्था कर यांची पूर्व मान्यता घेणे बंधनकारक असेल. सदर कर्मचाऱ्यांनाही स्थानिक संस्था कर कार्यालयातच मुदद्‌ा क्रमांक ७ मध्ये नमूद केल्यानुसार प्रतिज्ञापत्र देऊन कामकाज करावे लागेल.

१५) सल्लागार यांना नेमून दिलेल्या कामकाजासंदर्भातच सल्ला देणे मर्यादित राहील. मात्र दिलेल्या निर्णयावर अंतिम निर्णय घ्यावयाचा अधिकार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम व स्थानिक संस्था कर निमय २०१० मधील तरतूदीप्रमाणे महापालिकेस असतील.

१६) सल्ला देण्यासाठी निश्चित केलेले दर हे सन २०१२–१३, २०१३–१४ व २०१४–१५ या वर्षांच्या विवरणपत्रांची छाननीचे काम पूर्ण होईपर्यंत अंमलात राहतील. त्यामध्ये कोणत्याही प्रकारची दरवाढ केली जाणार नाही.

१७) सल्लागार यांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम व स्थानिक संस्था कर नियम २०१० मधील तरतूदीनुसार वरील दिलेल्या कामकाजासाठी कायद्याशी विसंगत सल्ला देता येणार नाही. अशी बाब निदर्शनास आल्यास संबंधित सल्लागार यांचेवर कायदेशीर कार्यवाही करणे संदर्भात महापालिका उपायुक्त यांचा निर्णय अंतिम असेल.

१८) या संदर्भात कोणतेही प्रकरण न्यायालयांत नेल्यास, याबाबत न्यायालयीन प्रकरणाचा सर्व खर्च संबंधीत सल्लागार यांना करावा लागेल आणि यासाठी उल्हासनगर हेच न्यायालयीन क्षेत्र राहील.

१९) यासाठी नियुक्त केलेल्या सल्लागारांची संख्या निश्चित करण्याचे अधिकार मा. महापालिका आयुक्त यांचे असतील.

२०) या संदर्भातील कोणताही वाद निर्माण झाल्यास मा. महापालिका आयुक्त यांचा निर्णय अंतिम राहील व सदरचा निर्णय दोन्ही पक्षांवर बंधनकारक राहील.

२१) वरिल सर्व अटी मान्य असल्याबाबत व त्याप्रमाणे कामकाज करण्याची तयारी असल्यास संबंधितांनी अर्ज करावेत असे सूचविण्यात येत असून, अर्ज दाखल केल्यानंतर या संदर्भातील कोणतीही तक्रार महापालिकेकडून विचारात घेतली जाणार नाही.

२२) नेमणूक केलेल्या सल्लागारांकडे महापालिका हद्दीतील ज्या व्यापाऱ्यांचे कोणतेही कर विषयक कामकाज असेल त्याची यादी अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहील. तसेच असे नसल्यास त्याबाबतचे हमीपत्र द्यावे लागेल.

२३) उल्हासनगर महापालिकेत सेवा उपलब्ध करून घेतल्यावर, त्या सल्लागार व्यक्ती/संस्था यांना स्थानिक संस्था कर विभागाकडे नोंदणी केलेल्या व्यापाऱ्यांचे स्थानिक संस्था कर संदर्भातील कामकाज करता येणार नाही. सेवा संपूष्टात आल्यावर उल्हासनगर महापालिका क्षेत्रात ०३ वर्षे स्ण्ठण्ज्ञ विषयक काम करदात्याच्या वतीने घेता येणार नाही.

२४) तज्ञ व्यक्ती ज्यात सनदी लेखापाल/वकील/विक्रिकर किंवा उप कर विभागातील निवृत्ती अधिकारी/कर्मचारी/नोंदणीकृत कर सल्लागार मंडळ तयार करणेकामी त्यांची किमान शैक्षणिक पात्रता/अनुभव यांचे निकष निश्चित करावे लागतील. त्यानुसार खालील निष्कर्ष निश्चित करणेत येत आहेत

२४ अ) विक्रिकर/उपकर/निवृत्त अधिकारी/कर्मचारी/नोंदणीकृत कर सल्लागार किमान शिक्षण कोणत्याही शाखेतील पदवी व अनुभव—विक्रिकर/उपकर यांच्या निर्धारणा/ पुर्ननिर्धारणा/दुरुस्ती आदेश आणि अपीले या संदर्भातील कामकाज किमान ४ वर्षाचा अनुभव तसेच अन्वेषण/ अपील व अनुषंगिक कामकाजाचा अनुभव.

२४ ब) सनदी लेखापाल/वकील/नोंदणीकृत कर सल्लागार म्हणुन विक्रिकर/उपकर/ विषयातील निर्धारणा पुर्ननिर्धारणा/दुरुस्ती आदेश आणि अपीले या संदर्भातील कामकाजाचा किमान ४ वर्षाचा अनुभव तसेच अन्वेषण अनूषंगिक कामकाजाचा अनूभव.

यानुषंगाने मा.आयुक्त यांनी सदरची बाब ही महानगरपालिकेच्या अर्थिक हिताची असल्याने सद्यस्थितीत मानधन तत्वावर किमान ६ (सहा) सल्लागार रू १५०००/— मानधनावर नेमण्याची मान्यता दिली असल्याने सहा सल्लागारांना दिनांक ०१ ऑक्टोंबर २०१५ पासुन तात्पुरती नियुक्ती देण्यात आली आहे. सदरची बाब ही मा.स्थायी समितीच्या निदर्शनास तसेच मा. स्थायी समितीकडून मान्यता मिळणेस्तव सादर

<u>स्थायी समिती ठराव क्र ११५ अ</u> <u>दिनांक:—३१/३/२०१६</u>

सुचकाचे नाव :— श्री. भगवान भालेराव

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे स्थानिक संस्था कर विभागासाठी ६ सल्लागार मानधन तत्वावर नियुक्त करणेचा प्रस्ताव वगळण्यात येत आहे.

कारण—

सभेमध्ये ठरल्यानुसार विभागाने संपूर्ण अहवाल स्थायी समिती सभेत सादर करणे आवश्यक असेल.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. १२ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १२ :— उल्हासनगर—३ मधील ओ.टी. सेक्शन ते रामायणनगर पर्यंत सी.सी. पेव्हमेंट रोड आणि नाली बनविणेच्या कामाकरीता करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत मे. साई सिध्दनाथ कंन्स्ट्रक्शन यांची ७.२० टक्के जास्त दराच्या निविदेस मान्यता देणे.**

---

<u>महापालिका सचिव :—</u> सदरहु विषय पारीत करण्यात यावा का?

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—</u> कमी दर सादर करणा—या संस्थांपैकी दुस—या क्रमांकावरील मे.जयभारत कंन्स्ट्रक्शन या संस्थेस हे काम देण्यात यावे.

<u>महापालिका सचिव :—</u> सदरहु विषयाच्या ठरावात तसे कारण नमुद करावे लागेल.

<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया :–</u> हो, आपण ठरावात कारण नमुद करा की, यापुर्वी मे. साई सिध्दनाथ कंन्स्ट्रक्शन या कंपनीला दोन कामे देण्यात आली आहेत परंतु सदर कामास अद्याप कंपनीने सुरूवात केलेली नाही.

<u>सदस्य, डॉ. महेश गावडे :–</u> सदर कंपनीने कामास सुरूवात केलेली नाही तर अशा कंपनीला काळया यादीत का टाकत नाहीत.

<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया :–</u> कंपनीला काळया यादीत टाकावयाचे काम आयुक्तांचे आहे.

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया :–</u> सदरहु विषयाच्या ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता करण्यात यावी.

<u>सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा :–</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. १२:–** उल्हासनगर–३ मधील ओ.टी.सेक्शन ते रामायणनगर पर्यंत सि.सि.पेव्हमेंट रोड आणि नाली बनविणेच्या कामाकरीता करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत मे.साई सिध्दनाथ कंन्स्ट्रक्शन यांची ७.२० टक्के जास्त दराच्या निविदेस मा. स्थायी समितीची मान्यता मिळणेबाबत.

<u>प्रस्तावना</u>

उपरोक्त विषयान्वये उल्हासनगर–३ मधील ओ.टी.सेक्शन ते रामायणनगर पर्यंत सि.सि.पेव्हमेंट रोड आणि नाली बनविण्याच्या कामाकरीता निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर निविदा प्रक्रियेमध्ये खालीलप्रमाणे निविदाकारांनी दर भरले होते.

१) मे.जयभारत कंन्स्ट्रक्शन :– दिलेले दर ९.९० टक्के जास्त

२) मे.साईसिध्दनाथ कंन्स्ट्रक्शन :– दिलेले दर ८.४९ टक्के जास्त

३) मे.मोनिका कंन्स्ट्रक्शन :– दिलेले दर ३३.३० टक्के जास्त

उपरोक्त निविदाकारापैकी मे.साई सिध्दनाथ कंन्स्ट्रक्शन यांनी भरलेले दर सर्वात कमी असून सदर निविदाकारांशी निविदा समितीने चर्चा करुन दर कमी करण्यास वाटाघाटी करणेकरीता दिनांक २४/९/२०१५ रोजी पत्र देण्यात आले होते. सदर पत्रास अनुसरुन मे.साई सिध्दनाथ कंन्स्ट्रक्शन यांनी या कार्यालयास असे कळविले की, प्राकलनामधील दर सन २०१३–१४ च्या दरसुचीवर आधारीत असून मजूर वर्ग, मशिनरी, इंधन यांचे आजच्या बाजारभावाशी तुलना केली असता प्राकलनातील दरामध्ये खूप तफावत आहे. तसेच खडी व रेतीचा दर वाढल्यामुळे मे.साई सिध्दनाथ कंन्स्ट्रक्शन यांना कॉक्रिटचा दर देखील महाग पडणार आहे. त्यामुळे त्यांनी निविदेत भरलेले ८.४९ टक्के जास्त दर योग्य आहेत. तथापी महापालिकेने केलेल्या विनंतीस मान देवून त्यांनी निविदेत भरलेले ८.४९ टक्के मधून १.२९ टक्के दर कमी करुन ७.२० टक्के जास्त दरावर काम करण्यास संमती दर्शविली.

त्यानुसार मे.साई सिध्दनाथ कंन्स्ट्रक्शन यांनी त्यांचे कमी केलेले ७.२० टक्के या दराप्रमाणे त्यांच्या निविदेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणेकरीता स्थायी समितीच्या पटलावर ठेवणेस मंजूरी घेणेकरीता प्रस्तावित केले असता सदर प्रस्तावावर मा.अतिरिक्त आयुक्त सो. यांनी चालू DSR दराच्या

तुलनेत तसेच बाजारभावाशी तुलना करता दर किती जादा किंवा कमी आहेत याचा गोषवाऱ्यात समावेश करुन स्थायी समितीसमोर मान्यतेस ठेवणे असा शेरा लिहिला तसेच मा.आयुक्त सो.यांनी सदर काम दरसुचीप्रमाणे (At par rate) करण्याकरीता सुचना दिल्या.

वरील सुचनांनुसार/शेऱ्यानुसार या विभागातर्फे मे.साई सिध्दनाथ कंन्स्ट्रक्शन यांना सदर काम वर्ष २०१३–१४ च्या दरसुचीनुसार करण्यास तयार असल्यास तसे या कार्यालयास कळवावे असे इकडील पत्र क्र.उमपा/साबांवि/शअ/१४६/२०१५ दिनांक ५ ऑक्टोंबर,२०१५ अन्वये कळविले त्यानुसार मे.साई सिध्दनाथ कंन्स्ट्रक्शन यांनी त्यांचे दिनांक /१०/२०१५ चे पत्रान्वये त्यांनी दिलेले ७.२० टक्के जास्त दर बरोबर असून प्राकलनावर ७.२० टक्के जास्त दराने काम करण्यास सहमती दर्शविली आहे.

दरम्यानच्या काळात दिनांक १ ऑक्टोंबर,२०१५ पासून लागू करण्यात आलेली वर्ष २०१५–१६ चे नविन दरसुची या कार्यालयास प्राप्त झाली. या दरसुचीच्या आधारावर महापालिकेचे सल्लागार मे.माहिमतुरा यांना सदर प्राकलनावर वर्ष २०१५–१६ या दरसुचीशी तुलना करुन सदर प्राकलनावर किती तफावत येते यासंदर्भात शहानिशा करणेबाबत कळविले. त्यानुसार मे.माहिमतुरा यांनी त्यांचे दिनांक १० नोव्हेंबर,२०१५ चे पत्रासह वर्ष २०१३–१४ ची दरसुची व चालु वर्ष २०१५–१६ च्या दरसुचीशी तुलना केली असता दोन्ही दरसुचीच्या दरामध्ये ८.५४ टक्के जास्त असल्याचे कळविले आहे.

वरील बाब ग्राहय धरल्यास प्राकलनिय दरावर ८.५४ टक्के भर पडत आहे. त्यामुळे मे.साई सिध्दनाथ कंन्स्ट्रक्शन यांना प्राकलनावर ७.२० टक्के दिल्यास सदर काम वर्ष २०१५–१६ च्या दरसुचीप्रमाणे तुलना केल्यास प्राकलनिय दरावर १.३४ टक्के कमी होत आहे.

तरी वरीलप्रमाणे वस्तुस्थिती लक्षात घेता सदर काम मे.साई सिध्दनाथ कंन्स्ट्रक्शन यांना ७.२० टक्के जास्त दराच्या प्रस्तावावर मा.स्थायी समितीकडून निर्णय होणे आवश्यक आहे. त्याकरीता सदर प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या पटलावर ठेवणेस प्रस्तावित.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ११६</u> <u>दिनांकः– ३१/३/२०१६</u>

सुचकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :– डॉ. महेश गावडे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत निविदा प्रक्रीया केलेल्या उल्हासनगर–३ मधील ओ.टी.सेक्शन ते रामायणनगर पर्यंत सि.सि.पेव्हमेंट रोड आणि नाली बनविणेच्या कामाकरीता करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत दुस–या क्रमांकाचे लघुत्तम दराचे निविदाकार मे.जयभारत कंन्स्ट्रक्शन यांना ७.२० टक्के दराने काम करणेस मान्यता देत आहे.

**कारण–**

मे.साई सिध्दनाथ कंन्स्ट्रक्शन यांना यापुर्वी देण्यात आलेल्या दोन्ही कामांना त्यांनी अद्याप सुरूवात केलेली नाही.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. १३ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. १३ :— २०१५—२०१६ करीता लोखंडी हातगाडया खरेदीच्या न्युनत्तम दराचे निविदाकाराशी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.**

---

महापालिका सचिव :— सदरहु विषय पारीत करण्यात यावा का?

सदस्य, श्री. राजेश वधारीया :— सदरहु विषय माहितीची नोंद करणेसाठी आला आहे.

काही सदस्य :—पास—पास......

सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा :—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. १३** :— सन २०१५—२०१६ करीता लोखंडी हातगाडया खरेदीच्या न्युनत्तम दराचे निविदाकाराशी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

प्रस्तावना

मुख्य स्वच्छता निरीक्षक, भांडार आरोग्य विभाग यांचे मागणी पत्र क्र. १५६ दिनांक २५/३/२०१४ रोजीचे पत्र इकडिल कार्यालयास प्राप्त झालेले असून सदर पत्रान्वये कार्यक्षेत्रातील सफाईच्या कामासाठी कर्मचारी यांना आवश्यक संरक्षणार्थ व साहित्याचा पुरवठा करणे कामी सर्व स्वच्छता निरीक्षक यांनी मागणी केली आहे.

तसेच त्याअनुषंगाने आरोग्य विभागाच्या भांडारात असलेला साठा व प्रत्येक स्वच्छता निरीक्षक यांच्याकडे शिल्लक असलेला साठा अगदी नगन्य प्रमाणात असल्याने

सफाई/स्वरंक्षणार्थ साहित्य त्वरीत पुरवठा करून घेणे आवश्यक आहे. त्यात लोखंडी हातगाडीची मागणी मा. नगरसेवक यांच्या कडूनही वारंवार होत आहे.

तरी पावसाळयापुर्वी लोखंडी हातगाडया उपलब्ध करून घेणे आवश्यक असल्याने, सदरची निविदा प्रक्रीया पुर्ण करून सदर हातगाडया मागविण्यास खुप कालावधी लागणार असल्याने सन २०१४—२०१५ साठी सदर साहित्य निविदा प्रक्रीया अंती न्युनतम दराकडून खरेदी करण्यास मा. स्थायी समिती ठराव क्र. ३९ दिनांक २५/०८/२०१४ अन्वये मान्यता आहे. त्यानुसार लोखंडी हातगाडी खरेदीचे दर खालील प्रमाणे मंजूर आहेत.

| अ. क्र. | साहित्यांचे नांव | भांडार विभागात उपलब्ध/शिल्लक साठा | आवश्यक परीणाम | मंजूर दर रूपये | आलेला खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | लोंखडी हातगाडी | ०१ नग | १६० (नग) | ७२०० | ११,५२,००० |

वरील १६० लोखंडी हातगाडी नमुद केल्याप्रमाणे खरेदीसाठी रूपये ११,५२,०००/— (अक्षरी रूपये अकारा लाख बावन्न हजार मात्र.) खर्च आला असून, सदरचे साहित्य न्युनतम दराचे निविदाकार मे. मोहिनी इंटरप्राईझेस, उल्हासनगर यांच्या कडून खरेदी करण्यात आले आहे.

तरी सदरच्या संविदेची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३ (ड) अन्वये मा. स्थायी समितीच्या पटलावर माहितीकरीता सादर करणेत येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ११७ — दिनांकः—३१/३/२०१६

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्रीम. राजश्री चौधरी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार सन २०१५—२०१६ करीता लोखंडी हातगाडया खरेदीच्या न्युनत्तम दराचे निविदाकाराशी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. १४ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. १४ :— मालमत्ता क. **40CO018857700 Old No. 40/0211** करीता पाणीपट्टी रक्कम रू. ३६००/— वर्ष २०१५—१६ पासून रद्द करून सुधारीत बिल लागु करणे.

---

महापालिका सचिव :— सदरहु विषय पारीत करण्यात यावा का?

<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया :—</u> सदरहु विषयाच्या ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता करण्यात यावी.

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा :—</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

विषय क्र.१४:—मालमत्ता क्र. 40CO018857700 Old No. 40/0211 करीता पाणीपट्टी रक्कम रू. ३६००/— वर्ष २०१५—१६ पासून रद्द करून सुधारीत बिल लागु करणेबाबत.

<u>प्रस्तावना</u>

मनपा कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 40CO018857700 Old No. 40/0211 अन्वये नोंद असलेल्या मिळकतीकरीता मालमत्ता कर वसुलीच्या प्रयोजनार्थ कर देण्यास प्रथम पात्र व्यक्ती म्हणून सेंक्रेटरी, कृष्णकुंज अपार्टमेंन्ट अशी नोंद असून श्री. सचिंद्र कंचन व इतर, कृष्णकुंज अपार्टमेंन्ट ब्लॉक ए—५०१, रूम नं. १००२, उल्हासनगर —४ यांनी दिनांक ०४/०९/२०१४ रोजीचे अर्जान्वये इमारतीचे टेरेस, पार्किग, जिना इत्यादी क्षेत्रफळावर कर बिलात समाविष्ट असलेली पाणीपट्टी रद्द करणेसाठी विनंती केली आहे.

कृष्णकुंज अपार्टमेंन्ट या इमारतीमधील सदनिकाधारकांचे नावे स्वतंत्ररित्या कर आकारणी सुरू असून बांधकाम प्रकारानुसार त्यांचे मालमत्ता कर बिलात पाणीपट्टी आकारणी करण्यात येत आहे.

परंतु इमारतीचे जिना, टेरेस, पार्किग इत्यादी क्षेत्रावर सेक्रेटरी या नावे मालमत्ता क्र. 40CO018857700 Old No. 40/0211 नुसार कर आकारणी सुरू आहे. सदर बिलामध्ये वर्ष २०१४—१५ पर्यत भरणा केला आहे.

वर्ष २०००—०१ पासून स्थायी समिती ठराव क्र. १०२ दिनांक १६/०२/२००० व महासभा ठराव क्र. २३ दिनांक १८/०२/२००० नुसार फक्त निवासी वापर होत असलेल्या मिळकतीवर बांधकाम प्रकारानुसार मालमत्ता कर बिलात पाणीपट्टी आकारणी करण्यात येत आहे. परंतु सदर ठरावामध्ये इमारतीचे जिना, टेरेस, पार्किग इत्यादी क्षेत्रावर सेक्रेटरी कर आकारणी होत असलेल्या कर बिलात पाणीपट्टी आकारणी बाबत स्पष्टीकरण करण्यात आलेले नाही.

सबब मालमत्ता क्र. 40CO018857700 Old No. 40/0211 करीता वर्ष २०१५—१६ चे कर बिलात समाविष्ट असलेली पाणीपट्टी रू. ३६००/— यापुढे रद्द करून सुधारीत बिल लागु करणेसाठी मंजुरीकरीता स्थायी समितीपुढे प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ११८</u> <u>दिनांक:— ३१/३/२०१६</u>

सुचकाचे नाव :— श्री. राजेश वधारीया

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार मनपा कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 40CO018857700 Old No. 40/0211 करीता पाणीपट्टी रक्कम रू. ३६००/— वर्ष २०१५—१६ पासून रद्द करून सुधारीत देयक जारी करणेस मंजुरी देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

महापालिका सचिव :— विषय क्र. १५ वाचुन दाखवितात.

---

**विषय क्र. १५ :— उल्हासनगर महानगरपालिका शाळांमध्ये विद्यार्थ्यांना संगणकाचे ज्ञान होणेसाठी व ई—लर्निग शिकविण्यासाठी (प्रोजेक्टर, स्क्रिन, डी.व्ही.डी. प्लेअर) उपलब्ध करून देणेकामी दरास मान्यता देवुन वित्तीय मंजुरी देणे.**

---

सदस्या, श्रीम. राजश्री चौधरी :—शाळांमध्ये संगणक धूळ खात पडलेले आहेत.

सदस्य, डॉ. महेश गावडे :— ब—याच शाळांची दुरावस्था झालेली आहे.

सदस्या, श्रीम. राजश्री चौधरी :—शाळा क्र. १४ फक्त चालू आहे.

सदस्या, श्रीम. लिलाबाई आशान :—माझ्या प्रभागातील शाळा बघा, तिची दुरावस्था झालेली आहे.

उपायुक्त, श्री. जमीर लेंगरेकर :—सर्व शाळा डीजीटल करायचे काम सुरू आहे. महापालिका शाळांतील विद्यार्थ्यांना संगणकाचे ज्ञान होणेसाठी व ई—लर्निग शिकविण्यासाठी प्रोजेक्टर, स्क्रिन, डी.व्ही.डी. प्लेअर उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. त्यासाठी सर्व शाळांतील शिक्षीकांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

सदस्य, डॉ. महेश गावडे :— शाळांना संगणक देणार आहात परंतु शाळांचे वर्ग चांगले आहेत का?

सदस्या, श्रीम. लिलाबाई आशान :—शाळा क्र. १४ येवून बघा ना.

सदस्य, डॉ. महेश गावडे :— यापुर्वी महापालिका शाळांना फिल्टर दिले आहेत. आता एकसुध्दा शाळेत फिल्टर दिसत नाहीत.

सदस्या, श्रीम. राजश्री चौधरी :—आपण दिलेली वहयापुस्तके शाळांमध्ये धूळखात पडत आहेत. शाळेच्या एका खोलीत सर्व वहयापुस्तके ढिगारा रचून ठेवलेली आहेत.

सदस्या, श्रीम. अंजली साळवे :— मागे एकदा स्थायी समिती सभेत चर्चा झाली होती कि, प्रत्येक स्थायी समिती सदस्यांना शाळा वाटून देण्यात याव्यात, व त्या त्या प्रभागातील शाळांमध्ये सदस्य भेटी देवून तपासणी करतील.

सदस्या, श्रीम. लिलाबाई आशान :—त्या त्या प्रभागातील नगरसेवकांना शाळा वाटून दया ना.

उपायुक्त, श्री. जमीर लेंगरेकर :— मी सर्व शाळांना भेटीचे नियोजन करतो.

<u>सदस्या, श्रीम. अंजली साळवे :–</u> शिक्षण समितीच्या सदस्यांनासुध्दा काही माहिती नाही.

<u>महापालिका सचिव :–</u> सदरहु विषय पारीत करण्यात यावा का?

<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया :–</u> सदरहु विषयाच्या ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता करण्यात यावी.

<u>काही सदस्य :–</u>पास–पास……

<u>सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा :–</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

विषय क्र. १५ :– उल्हासनगर महानगरपालिका शाळांमध्ये विद्यार्थ्यांना संगणकाचे ज्ञान होणेसाठी व ई–लर्निग शिकविण्यासाठी (प्रोजेक्टर, स्क्रिन, डी.व्ही.डी. प्लेअर) उपलब्ध करून मिळणेबाबत.

<u>प्रस्तावना</u>

दिनांक ४.१२.२०१५ च्या दै. नगर न्युज, दै. अमृत कलश व निविदा महापालिकेच्या वेबसाईवर निविदा सुचना पसिध्दी केली होती व दि. २४.१२.२०१५ technical bid बंद झाली व ३ निविदा प्राप्त झाल्या आहेत ते खलील प्रमाणे.

| अनु. क्र. | निविदाकाराचे नाव | पावती क्र. |
|---|---|---|
| १ | में. ओम मनिष इन्टरप्राइजेस | उमपा २२८७० दि. १६.१२.१५ |
| २ | में.सिध्दांत इन्टरप्राइजेस | उमपा २२८७२ दि. १६.१२.१५ |
| ३ | में. विघ्नेश इन्टरप्राइजेस | उमपा २२८७३ दि. १७.१२.१५ |

दि. २२.०१.२०१६ online tender opening (commercial)

| Comparative Statement | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| product | Quantity | M/s Om Manish Enterprises | | M/s Vignesh Enterprises | | M/s Siddhant Enterprises | |
| | | price per unit | Amount | price per unit | Amount | price per unit | Amount |
| Projector (1/4 HD projector | 22 | 81999 | 1803978 | 82500 | 1815000 | 82500 | 1815000 |
| Screen (160 wide) | 22 | 14538 | 319836 | 15400 | 338800 | 16000 | 352000 |
| DVD Player | 22 | 9599 | 211178 | 10200 | 224400 | 10000 | 220000 |
| Speaker | 22 | 7500 | 165000 | 7800 | 171600 | 7750 | 170500 |
| Total | | | **2499992** | | **2549800** | | **2557500** |

मे. ओम मनिष एन्टरप्राइजेस यांनी सादर केलेले दर रू २४,९९,९९२/– (चोविस लाख नव्यान्नव हजार नऊशे ब्यान्नव मात्र) हे न्यूनतम आहेत. सदर दर मा. आयुक्त, यांनी दि. १८.०२.२०१६ यांनी मंजुरकेल्या प्रमाणे मा. स्थायी समिती समोर सादर करण्यात येत आहे.

उल्हासनगर महानगरपालिका पुर्व प्रार्थमिक व माध्यमिक शिक्षण समिती अंतर्गत समितीतर्फे महानगरपालिका शाळांमध्ये प्रोजेक्टर, स्क्रिन, डी.व्ही.डी.प्लेअर वाटप करणेबाबत योजले आहे. उल्हासनगर महानगरपालिकेच्या २८ शाळा असून त्या २२ ठिकाणी भरत आहेत. सदर शाळामध्ये ६९७० विद्यार्थी शिक्षण घेत आहे, त्याचे फायदे पुढिल प्रमाणे.

१. विद्यार्थी त्यांचे ज्ञान संगणकिय क्षेत्रात प्रगत करण्यासाठी व शिक्षण पद्धत सरळ व सोपी करून त्याचे ज्ञान विद्यार्थीत्यांना सहज समजावेत.
२. ई—लर्निंग प्रक्रिया मुळे कठिण विषय पण मुलांना चांगल्या प्रकारे समजतील.
३. ई—लर्निंग प्रक्रिय मुळे लहान मुलांना एखादा फोटा किंवा व्हिडीयों दाखवुन सहज समजावता येतो.
४. विद्यार्थीत्यांचे दप्तरांचे ओझे कमी होतील.

विद्यार्थ्यांची प्रगती म्हणजे आपल्या देशाची प्रगती म्हणुन ई—लर्निंगचे साहित्य खरेदी करणेसाठी, ओम मनिष एन्टरप्रईझेस, यांचे दर रू २४,९९,९९२/— हे न्युनतम निविदा दर मंजूरीस्तव सादर करणात येत आहे. त्याकरिता सन २०१५—१६ मध्ये पुर्व प्रार्थमिक व माध्यमिक शिक्षण समिती लेखाशिर्षात (पूर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण) रू. २५ लाखाची तरतुद उपलब्ध असून सदर तरतुदी मधुन रू २४,९९,९९२/ खर्च करण्यास वित्तीय मंजुरीसाठी मा. स्थायी समिती सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ११९ दिनांकः— ३१/३/२०१६

सुचकाचे नाव :— श्री. राजेश वधारीया

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिका शाळांमध्ये विद्यार्थ्यांना संगणकाचे ज्ञान होणेसाठी व ई—लर्निंगचे साहित्य खरेदी करणेच्या कामाकरीता सन २०१५—१६ मध्ये पुर्व प्रार्थमिक व माध्यमिक शिक्षण समिती लेखाशिर्षात (पूर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण) रू. २५ लाखाच्या उपलब्ध तरतुदीमधुन रू २४,९९,९९२/ खर्च करण्यास वित्तीय मान्यता देत असुन सदर कामाकरीता मागविलेल्या निविदेतील ओम मनिष एन्टरप्राईझेस यांच्या कमी दराच्या निविदेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. १६ वाचुन दाखवितात

———————————————————————————————————————

⇨ विषय क्र. १६ :— महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत करपात्र मालमत्ता क्र. १०एओ००४०८३९००जुना मिळकत क्र १०/०२७५ ही नोंद रद्द करुन या मालमत्तेची स्थायी समितीची मंजूरी मिळेपर्यंतची विलंब शास्तीसहची थकीत रक्कम निर्लेखित करणे.

---

<u>काही सदस्य :—</u>पास—पास……

<u>सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा :—</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

विषय क्र. १६ :— महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत करपात्र मालमत्ता क्र. 10एओ004083900 जुना मिळकत क्र 10/0275 ही नोंद रद्द करुन या मालमत्तेची स्थायी समितीची मंजूरी मिळेपर्यंतची विलंब शास्तीसहची थकीत रक्कम निर्लेखित करणे.

**<u>प्रस्तावना</u>**

उपरोक्त विषयास अनुसरण सादर करण्यात येते की श्री आत्माराम पी सावळे रा.चोपडा कोर्ट उल्हासनगर—1 यांनी दिनांक 1/09/2014 रोजीच्या अर्जान्वये महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत कर पात्र मालमत्ता क्र 10एओ004127500 जूना मिळकत क्र 10/0719 या मालमत्तेची मालमत्ता क्र 10एओ004083900 जुना मिळकत क्र 10/0275 ही नोंद रद्द करणेसाठी विनंती केलेली आहे.

विषयांकित प्रकरणा संदर्भात कार्यालयीन दप्तरी नोंदीचा तपशिल खालील प्रमाणे.

1.श्री आत्माराम पी सावळे मालमत्ता 10एओ004127500 जूना मिळकत क्र 10/0719

| बांधकाम प्रकार | वापर | भाडेपट्टी | करयोग्य मुल्यासाठीचे दर | क्षेत्रफळ |
|---|---|---|---|---|
| लफाटे | निवासी | — | 01/04/86 | 153 चौ.फु. |

श्री आत्माराम पी सावळे मालमत्ता क्र 10एओ004083900 जुना मिळकत क्र 10/0275

| बांधकाम प्रकार | वापर | भाडेपट्टी | करयोग्य मुल्यासाठीचे दर | क्षेत्रफळ |
|---|---|---|---|---|
| अेसी ब्रिक्स | निवासी | — | 01/04/96 | 126 चौ.फु. |

**<u>स्थळ पहाणी अहवालाचा तपशिल</u>**

दिनांक 7/7/2015 रोजी दोन्ही मिळकतीची कर निरीक्षक व प्र कर निर्धारक व संकलक यांनी दिनांक 9/12/2015 रोजी यांनी सदर जागेची प्रत्यक्ष पहाणी केली असता श्री आत्माराम पी सावळे यांचे नावे असलेली मालमत्ता क्रं 10एओ004127500 जूना मिळकत क्र 10/0719 ही अस्त्विात असून महानगरपालिका कर आकारणी नोंदवही प्रमाणे मिळकती करीता नमूद कर पात्र बाबी प्रत्यक्ष जागेवर दिसून येत आहे. तसेच संबधित प्रभाग क्र 10 मध्ये मालमत्ता क्र 10एओ004083900 जुना मिळकत क्र 10/0275 ही कुठेही असल्याचे आढळून येत नाही.मिळकतीचे छायाचित्र दाखल केले आहे.

मालमत्ता क्र 10एओ004083900 जुना मिळकत क्र 10/0275 ही दुबार नोंद असल्याने मिळकत संदर्भात **थकीत मालत्ता कर रक्कम रू.41,904/— व्** विलंब शास्ती आहे. स्थायी समिती मंजूरी मिळेपर्यंतची रक्कम वसुल न होण्याजोगे आहे .अशी शिफारस करणेत आली आहे.

उपरोक्त प्रकरणी दि. 23/7 /2015 रोजी प्रभाग समिती कार्यालय नं 1 येथे विशेष तक्रार निवारण शिबीराचे प्रभागनिहाय आयोजन करणेत आले होते शिबीर अर्तंगत अर्जदारास नोटीस देणेत आली होती सदर शिबीरास श्री आत्माराम पी सावळे उपस्थीत होते.

अर्जदाराने मालमत्ता क्र 10एओ004083900 जुना मिळकत क्र 10/0275 ही म्िळकत रदद करावी तसेच भविष्यात सदरची मिळकत सिध्द झालेस कर भरणेस बाधील राहील असे दि. 19/10/2015 रोजीचे सत्यप्रतिज्ञपपत्र दाखल केले आहे.

करपात्र मालमत्ता क्र 10एओ004127500 जूना मिळकत क्र 10/0719 या मालमत्तेची मालमत्ता क्र 10एओ004083900 जुना मिळकत क्र 10/0275 ही दुबार नोंद असल्याची दिसून येत आहे. तसेच मिळकत

संदर्भात **थकीत मालत्ता कर रक्कम रू.41,904/– व** विलंब शास्ती आहे. स्थायी समिती मंजूरी मिळेपर्यंतची रक्कम वसुल न होण्याजोगे आहे. असे इकडील मत आहे.

सबब महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियमचे कलम 152 नुसार मालमत्ता क 10एओ004083900 जुना मिळकत क 10/0275 ही दुबार नोंद रद्द करून या मालमत्तेची स्थायी समितीची मंजूरी मिळेपर्यंतची विलंब शास्तीसहची थकीत रक्कम मा.स्थायी समितीच्या मंजूरीने निर्लेखित करणेकामी मा. स्थायी समिती पटलावर मंजुरीकरीता प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. १२० दिनांकः– ३१/३/२०१६

सुचकाचे नाव :– श्री. राजेश वधारीया

अनुमोदकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार मनपा कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क.10एओ004083900 जुना मिळकत क 10/0275 ही नोंद रद्द करुन या मालमत्तेची स्थायी समितीची मंजूरी मिळेपर्यंतची विलंब शास्तीसहची थकीत रक्कम निर्लेखित करणेस मंजुरी देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. १७ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. १७ :– मालमत्ता क्र. १५एआय०१५७४६४०० करीता विलंब शास्ती रक्कम रु.१६१३११/– ही मालमत्ता करापोटी समायोजित करुन वर्ष २०१५–१६ करिता सुधारित बिल जारी करणे.

---

काही सदस्य :–पास–पास......

सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा :–सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र १७:- मालमत्ता क्र. १५एआय०१५७४६४०० करीता विलंब शास्ती रक्कम रु.१६१३११/- ही मालमत्ता करापोटी समायोजित करुन वर्ष २०१५-१६ करिता सुधारित बिल जारी करणेबाबत.**

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 15AI015746400 [Gurunanik Market Nr. Bus Stop, Ulhasnagar-1] अन्वये नोंद असलेल्या मिळकतीसाठी मालमत्ता कर वसुलीच्या प्रयोजनार्थ कर देण्यास प्रथम पात्र व्यक्ती म्हणुन DURGABAI /ANIL/SANGEETA. A. N. अशी नोंद आहे. प्रथम कर आकारणी करपात्र बाबींचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| Const. Type | Occu.Status | Usage | Annual Rent | Asst. Year | Total Area |
|---|---|---|---|---|---|
| RCC | OWNER | NON RESIDENTIAL | 0 | 01-APR-86 | 1428 |
| Open | OWNER | NON RESIDENTIAL | 0 | 01-APR-86 | 1500 |
| RCC | OWNER | NON RESIDENTIAL | 0 | 01-APR-86 | 2367 |

B] संदर्भित मिळकतीमध्ये भाडेकरू (युनियन बँक ऑफ इंडीया.) असल्याचे निदर्शनास आल्याने त्यानुसार मिळकतीचे करयोग्य मुल्य सुधारीत करण्यात आहे.

संगिता अर्जुनदास नारवानी उर्फ काजोल सुनिलकुमार जुमरानी/कविता अर्जुनदास नारवानी उर्फ ममता अनिलकुमार अजवानी /दुर्गाबाई अर्जुनदास नारवानी यांचे तर्फे कुलमूख्यत्यार म्हणुन अर्जुनदास शामनदास नारवानी (लिहुन घेणार) व युनियन बँक ऑफ इंडीया, उल्हासनगर-१ तर्फे मॅनेजर चंद्रावती शेट्टी/ रेबॉन ओंकार धुरंधर (लिहुन देणार) यांचेदरम्यान झालेले सह. दुय्यम निबंधक, उल्हासनगर यांचे कार्यालयात अ. क्र. उहन१/३३९३/२००९, दिनांक २९/०९/२०१५ अन्वये झालेल्या नोंदणीकृत भाडेपट्ट्यामध्ये खालीलप्रमाणे नमुद Rent विचारात घेण्यात आले आहे.

| Floor | Area | Rent | Total Rant | Total Rant [12 Month] |
|---|---|---|---|---|
| First | 2127 Sq.ft | 8.00 Per Sq.Ft / Per Month | 17016 | 204192 |
| Second | 240.50 Sq.ft | 7.00 Per Sq.Ft/ Per Month | 1680 | 20160 |

C] दिनांक ०९/१०/२००९ च्या अर्जान्वये श्री. ए. नारवानी यांनी दुसऱ्या मजल्यावरील १८३६.५ चौ.फुट क्षेत्र युनियन बॅंकेने खाली करून हस्तांतरीत केल्यामुळे त्यावरील भाडेनुसार असलेली कर आकारणी रद्द करणेबाबत विनंती केली होती. सदर अर्जावर वर्ष २००९-२०१० मध्ये निर्णय झालेला नाही. त्यामुळे त्यांनी पुन्हा दिनांक २५/११/२०१० रोजी अर्ज सादर केला आहे. सोबत युनियन बँक यांनी जागा हस्तांतरीत केल्याबाबतचे पत्र सादर केले आहे.

सदर अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन उप आयुक्तांनी दिनांक २९/०३/२०१० रोजी खालीलप्रमाणे करपात्र बाबी गृहीत धरून मिळकतीचे करयोग्य मुल्य वर्ष २०१०-२०११ करीता निश्चित करणेसाठी आदेश जारी केला आहे.

| Const. Type | Occu.Status | Usage | Annual Rent | Asst. Year | Total Area | Ratable Value |
|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 01/04/2010 TO 31/09/2010 | | | | | | |
| RCC | TENANT | NON RESIDENTIAL | 382848 | 01-APR-86 | 3795 | |
| 01/10/2010 TO 31/03/2011 | | | | | | |
| RCC | TENANT | NON RESIDENTIAL | 224394 | 01-APR-86 | 2367 | |
| 01/10/2010 TO 31/03/2010 | | | | | | |
| RCC | OWNER | NON RESIDENTIAL | 0 | 01-APR-86 | 1428 | |
| Open | OWNER | NON RESIDENTIAL | 0 | 01-APR-86 | 1500 | |

D] परंतु उक्त आदेशात अधिक भाडे नमुद केल्यामुळे पुन्हा दिनांक १३/०४/२०११ रोजीचे अर्जान्वये संबंधितांनी आदेशाविरूध्द् आक्षेप दाखल केला.

सदर अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन उप आयुक्तांनी दिनांक ३१/०३/२०११ रोजी खालीलप्रमाणे करपात्र बाबी गृहीत धरून मिळकतीचे करयोग्य मुल्य वर्ष २०१०-२०११ करीता निश्चित करणेसाठी पुन्हा सुधारीत आदेश जारी केला आहे.

| Const. Type | Occu.Status | Usage | Annual Rent | Asst. Year | Total Area | Ratable Value |
|---|---|---|---|---|---|---|
| 01/04/2010 TO 31/03/2011 | | | | | | |
| RCC | TENANT | NON RESIDENTIAL | 224394 | 01-APR-86 | 2367 | |
| 01/04/2010 TO 31/03/2011 | | | | | | |
| RCC | OWNER | NON RESIDENTIAL | 0 | 01-APR-86 | 1428 | |
| Open | OWNER | NON RESIDENTIAL | 0 | 01-APR-86 | 1500 | |

E] परंतु कर आकारणी संदर्भात वर्ष २००९ मध्ये हरकत दाखल केली असुन सदर प्रकरणात मनपाने निर्णय घेण्यास विलंब केला आहे. तसेच प्रकरणात योग्य तो निर्णय झालेला नाही. याबाबत तत्कालीन कर निरीक्षक श्री. सुखदेब भंबानी यांनी विलंब केल्यामुळे त्यांचेवर कार्यवाही करावी. तसेच योग्य तो निर्णय घेण्यात यावा असा आक्षेप दिनांक ४/१/२०१२ रोजीचे अर्जान्वये ए. एस. नारवानी यांनी दाखल केला.

सदर अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन उप आयुक्तांनी दिनांक २४/०६/२०१२ रोजी दिनांक ०१/१०/२००९ ते ३१/०३/२०१० मिळुन सहा महिने पर्यंत फायदा नजरचुकीने देण्यात आलेला नाही तरी दिनांक ३१/०३/२०११ रोजीचे आदेशात सुधारणा करून मिळकतधारकास ०१/१०/२००९ ते आजतागायत खालीलप्रमाणे करपात्र बाबी गृहीत धरून मिळकतीचे करयोग्य मुल्य निश्चित करणेसाठी पुन्हा सुधारीत आदेश जारी केला आहे.

| Const. Type | Occu.Status | Usage | Annual Rent | Asst. Year | Total Area | Ratable Value |
|---|---|---|---|---|---|---|
| 01/10/2009 TO 31/03/2010 | | | | | | |
| RCC | TENANT | RESIDENTIAL | 224394 | 01-APR-86 | 2260 | |
| RCC | OWNER | NON RESIDENTIAL | 0 | 01-APR-86 | 1500 | |
| Open | OWNER | NON RESIDENTIAL | 0 | 01-APR-86 | 1500 | |
| 01/04/2010 TO 31/03/2011 | | | | | | |
| RCC | TENANT | NON RESIDENTIAL | 224394 | 01-APR-86 | 2367 | |
| RCC | OWNER | NON RESIDENTIAL | 0 | 01-APR-86 | 1428 | |
| Open | OWNER | NON RESIDENTIAL | 0 | 01-APR-86 | 1500 | |

F] उक्त आदेशानुसार मिळकतीचे करयोग्य मुल्य व आकारणी वर्ष २००९ पासुन सुधारीत करण्यात आली आहे. सदर प्रकरणात वर्ष २०१२ मध्ये निर्णय घेण्यात आला. दरम्यानच्या कालावधीत बिलाच्या न दिलेल्या रक्कमेवर अधिनियमात नियम ४१ नुसार विलंब शास्ती लागु करण्यात आली आहे.

G] दिनांक २४/१०/२०१३ रोजीच्या अर्जान्वये ए. एस. नारवानी यांनी मिळकतीचे कर आकारणी संदर्भात वर्ष २००९ मध्ये हरकत दाखल केली असुन सदर प्रकरणात मनपाने निर्णय घेण्यास विलंब केला आहे. विलंब शास्ती माफ करणेबाबत विनंती केली आहे.

H] विषयांकित प्रकरणात निर्णय घेण्यास विलंब झालेला असल्यामुळे दरम्यान महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसूची 'ड' मधील प्रकरण ८ (कराधान नियम) मधील नियम ५१, आयुक्तास, आपल्या स्वेच्छानिर्णयानुसार, नियम ४१ खालील शास्ती, किंवा नियम ५० खालील फी किंवा वसुलीचा खर्च पुर्णतः किंवा अंशता माफ करता येईल.

I] वास्तविक पाहता मिळकतीचे करयोग्य मुल्य व आकारणी वर्ष २००९ मध्ये सुधारीत करणे आवश्यक होते परंतु ते वर्ष २०१२ मध्ये सुधारीत करण्यात आले आहे. सबब, दरम्यानच्या कालावधीत बिलाच्या न दिलेल्या रक्कमेवर नियम ४१ नुसार विलंब शास्ती रक्कम रु.१६१३११/- लागु करणे उचित वाटत नाही. परंतु सदरच रक्कम मिळकत धारकाने भरणा केली आहे.

सबब सदरची रक्कम भरणा केली असल्याने ती मालमत्ता करापोटी समायोजित करणेसाठी स्थायी समितीपुढे मंजुरीकरिता शिफारस करण्यात येत आहे. तसेच २०१५-१६ करीता सुधारीत बिल लागु करणेसाठी मंजुरी मिळावी.

स्थायी समिती ठराव क्र. १२१ दिनांकः— ३१/३/२०१६

सुचकाचे नाव :— श्री. राजेश वधारीया
अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार मनपा कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. १५एआय०१५७४६४०० करीता विलंब शास्ती रक्कम रु.१६१३११/— ही मालमत्ता करापोटी समायोजित करुन वर्श २०१५—१६ करिता सुधारीत देयक जारी करणेस मंजुरी देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. १८ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १८ :— उल्हासनगर—१ येथिल डंम्पींग ग्राउंडवर संरक्षण भिंत बांधणेच्या कामाकरीता नेमलेले मे. श्री. मॉ कन्स्ट्रक्शन यांचे नाव रद्द करणेस अथवा याबाबत पुढील निर्णय घेणेस मान्यता देणे.**

---

सदस्य, श्री. राजेश वधारीया :— कंपाऊंड भिंत बांधणेसाठीच्या कामाचे जे प्राकलन तयार केले आहे त्यामध्ये जी कामे (item) टाकावयास पाहिजेत ती टाकलेली नाहीत. त्यामुळे केवळ रस्त्याचे काम करून घ्यावे.

सदस्य, डॉ. महेश गावडे :— विषय काय आहे. कंपाऊंड भिंत बांधणेसाठीचा आहे ना.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया :—** डंपिंग ग्राउंडच्या पायथ्याशी संरक्षण भिंत व डंपिंग ग्राउंडचा रस्ता सि.सि.पॅसेज बनिवणे असे दोन्ही लिहिले आहे. कंपाऊंड भिंत रू. १ कोटी मध्ये तयार होवू शकत नाही. तसेच यात लिहिले आहे पुढील निर्णय घेणेबाबत.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—** तो ठेकेदार ब्लॅकलिस्ट होणार आहे. त्यामुळे विचारपुर्वक उत्तर दया.

**श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्व. निरीक्षक :—** सदर रस्त्यावरून कचरा वाहतुकीच्या गाडया जात असतात त्यामुळे तो रस्ता खराब झालेला आहे. सदर डंम्पिंग ग्राऊंडवर नियमित कचरा टाकल्याने कच—याचे डोंगर तयार झालेले आहेत. परंतु तिथे पावसाळयापुर्वी रस्ता तयार होणे आवश्यक आहे.

**महापालिका सचिव :—** सदरचा विषय पारीत करण्यात यावा का?

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा :—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १८ :— उल्हासनगर—१ येथील डंपींग ग्राउंडवर संरक्षण भिंत बांधणेच्या कामाकरीता नेमलेले मे.श्री मॉ कन्स्ट्रक्शन यांचे नाव रद्द करणेस अथवा याबाबत पुढील निर्णय होणेस मा.स्थायी समितीच्या पटलापुढे प्रस्तावित.**

**प्रस्तावना**

उपरोक्त विषयान्वये मा.उपायुक्त (मुख्यालय) यांचे संदर्भिय पत्र या कार्यालयास प्राप्त झाले आहेत. सदर पत्रान्वये त्यांनी मा.महासभा ठराव क्र.१२ दिनांक १९/०७/२००२ अन्वये डंपीग ग्राउंडच्या खालच्या बाजूस दुर्गा नगर झोपडपट्टी लगत कचऱ्याचा ढिग पडून कोणत्याही प्रकारची जिवित व वित्तहानी होवू नये म्हणून संरक्षण भिंत बांधण्यासाठी कळविल्याप्रमाणे सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे डंपीग ग्राउंडच्या खालच्या बाजूस दुर्गा नगर झोपडपट्टी लगत संरक्षण भिंत बांधणेच्या कामाचे रु.९५,००,०००/— एवढया रक्कमेचे प्राकलन तयार करण्यात आले. सदर कामाकरील खर्चाकरीता महापालिकेच्या वर्ष २०१५—१६ च्या अर्थसंकल्पातील (पान क्र.२४ वर) अ अंदाजपत्रक भाग—२ क ४ मध्ये नविन सि.सि.रस्ते व सुरक्षित भिंत बांधणे या लेखाशिर्षात रु.१.०० कोटी एवढी तरतूद ठेवण्यात आली आहे.

मा.उपायुक्त (मुख्यालय/आरोग्य) यांनी त्यांचे पत्रात डंपिंग ग्राउंडच्या पायथ्याशी संरक्षण भिंत व डंपिंग ग्राउंडचा रस्ता सि.सि.पॅसेज बनिवणेची कार्यवाही तातडीने न केल्यास त्यातून कोणत्याही प्रकारची जिवित व वित्तहानी झाल्यास त्यांस सर्वस्वी आपणास जबाबदार धरण्यात येईल असे स्पष्ट नमुद केल्याने सदर काम अत्यंत तातडीने करण्याकरीता मुंबई प्रांतिक

महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ डी अंतर्गत वित्तीय मान्यता मिळून सदर काम तातडीचे असल्याने प्रकरण ५ चे कलम २ (२) अंतर्गत मे.श्री मॉ कंन्स्ट्रक्शन कंपनी यांचेकडून करणेस मा.स्थायी समितीची ठराव क्र.१० दिनांक ७/५/२०१५ अन्वये मान्यता घेण्यात आली आहे.

संबंधित एजन्सीला या विभागातर्फे दिनांक १२/०५/२०१५ रोजी स्विकृती पत्र देवून सुरक्षा अनामत रक्कम भरणेकरीता विनंती केली होती. संबंधित एजन्सीने कोणताही प्रतिसाद न दिल्याने त्यांना पुन्हा इकडील दिनांक २५/६/२०१५ अन्वये ०३ दिवसांचे आत सुरक्षा अनामत रक्कम भरणेकरीता विनंती करण्यात आली. परंतू संबंधित एजन्सीने अद्यापपर्यंत कोणताही प्रतिसाद दिला नाही.

तरी सदर कामाकरीता नेमलेले मे.श्री मॉ कन्स्ट्रक्शन यांचे नाव रद्द करणेस अथवा याबाबत पुढील निर्णय होणेस मा.स्थायी समितीच्या पटलापुढे प्रस्तावित.

स्थायी समिति ठराव क्र. १२२ दिनांकः— ३१/३/२०१६

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वधारीया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार महापालिकेच्या वर्ष २०१५—१६ च्या अर्थसंकल्पातील (पान क्र. २४ वर) अ अंदाजपत्रक भाग—२ क ४ मध्ये नविन सि.सि. रस्ते व सुरक्षित भिंत बांधणे या लेखाशिर्षात ठेवण्यात आलेल्या रु. १.०० कोटी केलेल्या तरतुदीतुन संरक्षण भिंत ऐवजी सी.सी. पॅसेज, रस्ता बनविणे असा कामाच्या स्वरुपात बदल करुन सदर काम श्री. मॉ कन्स्ट्रक्शन यांचेकडुन करुन घेणेस मान्यता देत आहे.

कारण

डंम्पींग ग्राउंड येथे पावसाळयापुर्वी रस्ता बांधणे आवश्यक आहे, जिवित व वित्तीय हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. १९ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. १९ :— उल्हासनगर — ३ येथिल वडोल गाव येथे पूल बांधणेच्या कामाकरीता मे ए एम रामचंदानी यांचेशी संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत**

---

सदस्य, डॉ. महेश गावडे :— एकच निविदा कशी काय उघडतात.

अति. आयुक्त, श्री. श्रीधर पाटणकर, आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :— निविदा रिकॉल केलेल्या आहेत.

सदस्य, डॉ. महेश गावडे :— कायदयानुसार एकच निविदा उघडू शकतो का?

सदस्य, श्री. भगवान भालेराव :— सदर विषय वगळण्यात यावा. आमचे अडीच कोटीचे काम आहे ते होत नाही. पैसा मिळत नाही म्हणुन ठेकेदार काम करायला तयार नाही. त्यामुळे सदरचा विषय वगळण्यात यावा.

सदस्य, डॉ. महेश गावडे :— बोअरवेलचे काम दिले आहे या ठेकेदाराला त्याने अद्याप एकही काम केलेले नाही.

सदस्य, श्री. गुरूनो वलेचा :— सदर ठेकेदार फोन केला तर फोनसुध्दा उचलत नाही.

सदस्य, श्री. भगवान भालेराव :— २०० बोअरींग पाडण्याचे काम दिलेले आहे.

सदस्य, श्री. गुरूनो वलेचा :— बोअरींग नाही निदान त्याने फोन तर उचलावा.

सदस्य, श्री. भगवान भालेराव :— सदर ठेकेदाराचे काम पुर्ण झाल्याशिवाय त्याला देयक अदा करू नये.

सदस्य, श्री. राजेश वधारीया :— ठरावात असे लिहू शकत नाही.

सदस्य, डॉ. महेश गावडे :— एकच निविदा उघडता येते का?

अति. आयुक्त, श्री. श्रीधर पाटणकर, आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :— सदर कामासाठी ५ वेळा निविदा प्रक्रीया केली आहे. त्यामुळे एकापेक्षा जास्त कोणीच प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे आलेली एक निविदा उघडता येते.

सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा :—सदरच्या प्रस्तावावर मतदान घ्यावे.

महापालिका सचिव :— प्रस्तावाच्या बाजुने असणा—या सदस्यांनी हात उंच करावे.

प्रस्तावाच्या बाजूने १० सदस्यांनी मतदान केले आहे.

प्रस्तावाच्या बाजुने सदस्यांची नावे —

१) श्री. जमनादास पुरस्वानी २) श्रीम. लिलाबाई आशान ३) श्रीम. मिनू दासानी ४) श्रीम. राजश्री चौधरी ५) कु. शकुंतला जग्यासी ६) श्री. राजेश वधारीया ७) श्री. गुरूनो वलेचा ८) श्रीम. अंजली साळवे ९) श्री. उमेश सुरेश कलानी १०) श्रीम. जया माखिजा

प्रस्तावाच्या विरोधात असणा—या सदस्यांनी हात उंच करावे.

प्रस्तावाच्या विरोधातील :सदस्यांची नावे —

प्रस्तावाच्या बाजूने कोणीही हात वर केला नाही त्यामुळे ० मतदान झाले आहे.

प्रस्तावात तटस्थ असलेल्या सदस्यांनी हात उंच करावे.

तटस्थ सदस्य — १) डॉ. महेश गावडे २) श्री. भगवान भालेराव

प्रस्तावात तटस्थ असलेल्यांची संख्या ०२ आहे.

<u>महापालिका सचिव :—</u> सदर विषय मंजूर करण्यात येत आहे.

<u>काही सदस्य :—</u>पास—पास……

<u>सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा :—</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १९ :—** उल्हासनगर—३ येथील वडोल गांव येथे पूल बांधणेच्या कामाकरीता मे.ए.एम. रामचंदानी यांचेशी संविदा करणेस मा.स्थायी समितीची मान्यता मिळणेबाबत….

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर—३ वडोल गांव येथे पुल बांधणे या कामाचे रु.२.५४ कोटी रक्कमेचे प्राकलन तयार करुन व सदर कामाची निविदा प्रक्रिया करणेस लेखाशिर्षाअंतर्गत तरतूदीचे समायोजन करुन प्रशासकीय व वित्तीय मान्यतेसाठी मा.स्थायी समितीपुढे सादर केले असता मा.स्थायी समिती ठराव क्र.७१ दिनांक १०/०१/२०१४ अन्वये मान्यता प्राप्त झाली आहे.

त्यानुसार सदर कामाची या विभागातर्फे सदर कामाच्या ०५ वेळा मुदतवाढ देवून निविदा मागविण्यात आल्या. परंतू पाचही वेळा सदर निविदेस अल्प प्रतिसाद मिळाल्याने दिनांक ३१/०१/२०१५ रोजी फेरनिविदा मागविण्यात आली. त्यावेळीही एकच निविदाधारकाने निविदा सादर केली. सदर कामाकरीता वारंवार निविदा मागवूनही अल्प प्रतिसादामुळे होणारा वेळेचा अपव्यय टाळण्याकरीता व प्रत्यक्ष जागेवर कामाची आवश्यकता पाहता अपलोड झालेल्या एका निविदाकाराचा पहिला लिफाफा दिनांक ०९/०३/२०१५ रोजी उघडला. त्याची छाननी करुन निविदा समितीपुढे खालीलप्रमाणे सादर करण्यात आले होते.

| | | |
|---|---|---|
| १ | निविदा प्रसिध्द केलेली वर्तमानपत्रे | १) दै.पुढारी २) दै. लोकनायक ३) दै.हिंदमाता मिरर |
| २ | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दि. ३१/०१/२०१५ |
| ३ | निविदा डाऊनलोड करणे कालावधी | दि. २/०२/१५ ते ०२/०३/२०१५ |
| ४ | निविदा प्रपत्र भरणे | दि. २/०२/१५ ते ०२/०३/२०१५ |
| ५ | निविदेचा तांत्रिक भाग बंद होण्याचा कालावधी | दि.०२/०३/१५ १५.०१ वाजेपासून ते ०५/०३/२०१५ १७.०० वाजेपर्यंत |
| ६ | निविदेचा आर्थिक देकार बंद होण्याचा कालावधी | दि.०२/०३/१५ १५.०१ वाजेपासून ते ०५/०३/२०१५ १७.०० वाजेपर्यंत |
| ७ | निविदा पाठविणे | दि.०५/०३/१५ ते ०९/०३/२०१५ |
| ८ | निविदेचा तांत्रिक भाग उघडणे | दि.०९/०३/१५ १२.०१ वाजेपासून ते १२/०३/२०१५ १७.०० वाजेपर्यंत |
| ९ | निविदेचा आर्थिक भाग उघडण्याचा कालावधी | दि.०९/०३/१५ १२.०१ वाजेपासून ते १२/०३/२०१५ १७.०० वाजेपर्यंत |
| १० | डाऊनलोड झालेल्या निविदांची संख्या | १ |

| | | |
|---|---|---|
| ११ | अपलोड झालेल्या निविदांची संख्या | १ |
| १२ | निविदेचा तांत्रिक भाग (भाग–१) उघडण्याचा दिनांक | दिनांक १२/०३/२०१५ |
| १३ | प्राप्त निविदांची संख्या | १ |

वरीलप्रमाणे प्राप्त झालेल्या एका निविदाकाराचा पहिला लिफाफा दिनांक ०९/०३/२०१५ रोजी उघडून त्याची छाननी करुन निविदा समितीपुढे खालीलप्रमाणे सादर करण्यात आले होते

| अ.क्र. | निविदाकाराच्या निविदेमधील बाबी | मे. ए.एम. रामचंदानी |
|---|---|---|
| १ | निविदा प्रपत्राची रु. १५०००/– रकमेची पावती. | आहे |
| २ | अनामत रक्कम रु.२२२२५०/– जमा केल्याची पावतीची स्कॅन प्रत | आहे |
| ३ | महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्यात वर्ग–४–अ मध्ये नोंदणी असल्याचे प्रमाणपत्र | आहे |
| ४ | लेटेस्ट आयकर रिटर्न भरण्याची पावती | **आहे** |
| ५ | निविदाकाराकडे उपलब्ध असलेल्या तांत्रिक कर्मचा–यांची माहिती | आहे |
| ६ | संस्था/कंपनी नोंदणी (भागिदारी, मालकी, कंपनी इत्यादीचे) | आहे |
| ७ | व्हॅट रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट | आहे |
| ८ | विक्रीकर/व्हॅट रिर्टन भरण्याची पावती | **आहे** |
| ९ | पॅन कार्डाची प्रत | आहे |
| १० | आर.सी.सी.स्वरुपाचे काम केल्याचे प्रमाणपत्र जोडावे. | आहे |
| ११ | तांत्रिक कामामध्ये, एक्सलेशन मध्ये अडचण असल्यास अधिका–याचे नांव, भेटण्याचे ठिकाण व हुद्दा | आहे |
| १२ | प्लांट मशिनरी, व्हायब्रेटर रोलर, स्टॅटीक रोल्ट, पेव्हर फिनिशर यांची मालकी व असल्याचे दस्तऐवज | आहे |

निविदाकारांचा आर्थिक बाबींचा दुसरा भाग (आर्थिक दर) मा.अतिरिक्त आयुक्त साो. यांचे अध्यक्षतेखालील निवड समिती सदस्य मुख्य लेखाधिकारी, मुख्य लेखापरिक्षक, शहर अभियंता, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे उपस्थितीत उघडण्यात आला त्याप्रमाणे निविदाकारांनी दिलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

१) मे.ए.एम.रामचंदानी          दिलेला दर ४७% जास्त

उपरोक्त निविदाकार मे.ए.एम.रामचंदानी यांनी दिलेले दर ४७% जास्त दर दिल्यामुळे सदर निविदाकारांशी निविदा समितीने चर्चा करुन दर कमी करण्यास वाटाघाटी करणेबाबत या विभागामार्फत दिनांक रोजी पत्र देण्यात आले. त्याप्रमाणे मे.ए.एम.रामचंदानी यांनी वाटाघाटीअंती त्याप्रमाणे मे.ए.एम.रामचंदानी यांनी दिनांक ०९/०३/२०१६ रोजी १९.९९% दर दिले आहे.

दरम्यानच्या काळात दिनांक १ ऑक्टोंबर,२०१५ पासून लागू करण्यात आलेली वर्ष २०१५–१६ चे नविन दरसुची या कार्यालयास प्राप्त झाली. या दरसुचीच्या आधारावर महापालिकेचे सल्लागार मे.नोबल जिओ स्ट्रक्ट यांना सदर प्राकलनावर वर्ष २०१५–१६ या दरसुचीशी तुलना करुन सदर प्राकलनावर किती तफावत येते यासंदर्भात शहानिशा करणेबाबत कळविले. त्यानुसार मे.नोबल जिओ स्ट्रक्ट यांनी वर्ष २०१३–१४ ची दरसुची व चालु वर्ष २०१५–१६ च्या दरसुचीशी व सद्यस्थितीत रेतीच्या बाजार भावाशी तुलना केली असता १५.४५ टक्के जास्त असल्याचे कळविले आहे.

तरी वरील बाब ग्राहय धरल्यास प्राकलनिय दरावर १५.४५ टक्के भर पडत आहे. त्यामुळे मे.ए. एम.रामचंदानी यांना प्राकलनावर १९.९९ टक्के दिल्यास सदर काम वर्ष २०१५–१६ च्या दरसुचीप्रमाणे तुलना केल्यास प्राकलनिय दरावर ४.५४ टक्के जास्त होत आहे.

तरी वरीलप्रमाणे वस्तुस्थिती लक्षात घेता सदर काम मे.ए.एम.रामचंदानी यांना वर्ष २०१५–१६ च्या प्राकलनिय दरसुचीप्रमाणे ४.५४ टक्के जास्त दराच्या प्रस्तावावर मा.स्थायी समितीकडून निर्णय होणे आवश्यक आहे. त्याकरीता सदर प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या पटलावर ठेवणेस प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. १२३ दिनांकः– ३१/३/२०१६

सुचकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेश वधारीया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत निविदा प्रक्रीया केलेल्या वडोल गांव येथे पूल बांधणेच्या कामाकरीता मे.ए.एम. रामचंदानी यांच्या २०१५–१६ च्या प्राकलनीय दरसुचीप्रमाणे ४.५४ टक्के जास्त दराच्या निविदेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

मंजुर

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. २० वाचुन दाखवितात.

---

⇨ विषय क्र. २० :–प्रस्तावाची सूचना

महानगरपालिका अधिनियम कलम ५६ (४) मधील तरतुदीनुसार बडतर्फीचे आदेश रद्द करुन श्री. विलास सोनवणे यांना पुर्नस्थापित करण्याबाबतचा मा. सभापती, स्थायी समिती श्रीमती जया प्रकाश माखिजा यांचा यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

---

सदस्य, श्री. राजेश वधारीया :—सदर विषयाची आयुक्तांकडून झालेली टिप्पणी आहे. त्यात संबंधित कर्मचारी यांचेवरील दोषारोप सिध्द झालेले आहेत असे नमुद केलेले आहे. त्यामुळे सदरचा प्रस्ताव अमान्य करीत आहे.

सदस्य, श्री. भगवान भालेराव :—असे अधिकारी आहेत ज्यांच्यावर दोषारोप सिध्द झाले आहेत आणि त्यांना सेवेत पुर्नस्थापित केलेले आहे.

सदस्य, डॉ.महेश गावडे :— याच प्रकरणात अनिल जयसिंघानी, कनिष्ठ अभियंता सुध्दा होता ना, त्याला सुध्दा निलंबित केले होते मग त्याला कसे कामावर घेतले होते. एकच निर्णय घ्या ना.

अति. आयुक्त, श्री. श्रीधर पाटणकर, आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :— शासनाकडून सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना विभागासाठी निधी आला होता, महापालिका क्षेत्रात नागरिकांसाठी पायवाटा तयार करणे, शौचालय बांधणे इत्यादी कामासाठी निधी आला होता, सदर कामासाठी मजुर पुरविणे व साहित्य इत्यादीवर खर्च करावयाचा होता. पहिला निधी ४० ते ५० लाख आला होता त्यानंतर निधीचा दुसरा टप्पा येणार होता. सदर प्रकरण न्यायालयात सुरू असुन न्यायप्रविष्ट आहे.

सदस्य, श्री. भगवान भालेराव :—सदर निधी अंतर्गत करावयाच्या कामाच्या अहवालाची नोंद कोण करतो, कनिष्ठ अभियंता कि लिपीक?

अति. आयुक्त, श्री. श्रीधर पाटणकर, आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :— सदर काम हे सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेकडून करण्यात येत होते. व सदर विभागाचा प्रमुख प्रकल्प अधिकारी म्हणुन श्री. सोनावणे यांचेकडे सर्व जबाबदारी होती.

सदस्य, श्री. राजेश वधारीया :—कनिष्ठ अभियंता त्याच्या अधिपत्याखाली कार्यरत होता.

सदस्य, श्री. भगवान भालेराव :—असे कसे? तांत्रिक बाबींचा अहवाल कनिष्ठ अभियंताने ठेवला पाहिजे ना, ती त्याची जबाबदारी होती.

सदस्य, डॉ.महेश गावडे :— सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे त्यामुळे न्यायालयापुढे जे दोषी सिध्द होतील त्यावेळेस त्यांना बडतर्फ करण्यात यावे. तोपर्यंत अन्य निलंबित कर्मचा—यांना सेवेत पुर्नस्थापित करण्यात येते त्याप्रमाणे यांनादेखील पुर्नस्थापित करण्यास हरकत नाही.

सदस्य, श्री. भगवान भालेराव :— मा. न्यायालयाच्या अंतिम निर्णयास अधिन श्री. सोनावणे यांना सेवेत पुर्नस्थापित करण्यात यावे.

सदस्य, श्री. राजेश वधारीया :—मला हा प्रस्ताव मान्य नाही, मी यावर माझे मत व्यक्त केले आहे.

यावेळेस श्रीम. इसरद सऊद खान यांनी सभागृहात प्रवेश केला.

सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा :—सदरच्या प्रस्तावावर मतदान घ्यावे.

महापालिका सचिव :— प्रस्तावाच्या बाजुने असणा—या सदस्यांनी हात उंच करावे.

प्रस्तावाच्या बाजूने ११ सदस्यांनी मतदान केले आहे.

प्रस्तावाच्या बाजुने सदस्यांची नावे —

१) श्री. जमनादास पुरस्वानी २) श्रीम. लिलाबाई आशान ३) श्रीम. मिनू दासानी ४) श्रीम. राजश्री चौधरी ५) कु. शकुंतला जग्यासी ६) श्रीम. इसरद सऊद खान ७) श्री. गुरूनो वलेचा ८) श्री. उमेश सुरेश कलानी ९) श्रीम. जया माखिजा १०) श्री. भगवान भालेराव ११) डॉ. महेश गावडे

प्रस्तावाच्या विरोधात असणा—या सदस्यांनी हात उंच करावे.

प्रस्तावाच्या विरोधातील :सदस्यांची नावे —

१) श्री. राजेश वधारीया २) श्रीम. अंजली साळवे

प्रस्तावाच्या बाजूने कोणीही हात वर केला नाही त्यामुळे ०२ मतदान झाले आहे.

प्रस्तावात तटस्थ असलेल्या सदस्यांनी हात उंच करावे.

प्रस्तावात तटस्थ असलेल्यांची संख्या ० आहे.

महापालिका सचिव :— सदर विषय बहुमताने मंजूर करण्यात येत आहे.

सदस्य, श्री. भगवान भालेराव :— सदरहु विषयाच्या ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता करण्यात यावी.

काही सदस्य :—पास—पास......

सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा :—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. २० :— प्रस्तावाची सूचना**

महानगरपालिका अधिनियम कलम ५६ (४) मधील तरतुदीनुसार बडतर्फीचे आदेश रद्द करुन श्री. विलास सोनवणे यांना पुर्नस्थापित करण्याबाबतचा मा. सभापती, स्थायी समिती श्रीमती जया प्रकाश माखिजा यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

**प्रस्तावना**

श्री. विलास शिवदास सोनवणे यांच्या विनंती अर्जावर सहानुभुतीपुर्वक विचार होवुन त्यांना महापालिकेच्या सेवेत पुर्नस्थापित करण्याबाबत स्थायी समितीच्या विषय पटलावर विषय घेण्याकरीता महापालिका स्थायी समिती सदस्यांनी केलेल्या शिफारशी नुसार ठेवण्याबबात तसे सुचना प्रशासनास केले असता त्याचा विषय यांना बडतर्फ करण्याचा आदेश काढल्यापासुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५६ (४) मधील तरतुदीनुसार श्री. विलास सोनवणे यांनी एक महिन्याच्या आत स्थायी समितीकडे अपील करणे आवश्यक आहे. परंतु त्यांनी तसे केल्याचे दिसून येत नाही असे प्रशासनाने वरील संदर्भिय पत्रान्वये कळविले आहे.

श्री. विलास शिवदास सोनवणे यांनी बडतर्फ करण्याचा आदेश काढल्यापासुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलू ५६ (४) मधील तरतुदीनुसार एक महिन्याच्या आत दिनांक १०/९/२०१४, १४/९/२०१४, १९/९/२०१४ व ११/१२/२०१४ रोजीचे अपील अर्ज केले असून तसे कार्यालयीन पोहोच नोंदी वरुन दिसून येत आहे. त्याची प्रत सोबत जोडत आहे. त्याचे अवलोकन व्हावे.

स्थायी समिती सदस्य डॉ. महेश गावडे यांचे दिनांक १५/१२/२०१५ व श्री. भगवान भालेराव यांचे दिनांक १४/१२/२०१५ चे व तत्कालीन स्थायी समिती सभापती सौ. राजश्री राजेंद्र चौधरी यांचे दिनांक ७/१/२०१५ चे आणि मा. आमदार सौ. ज्योती सुरेश (पप्पु) कालानी यांनी त्यांच्या अर्जावर सहानुभुतीपुर्वक विचार करुन पुर्नस्थापित करण्याबाबत शिफारशी केल्याने तरी त्यांचा प्रस्ताव नियमानुसार स्थायी समितीच्या पटलावर विषय घेण्याकरीता कर्यवाही व्हावी.

**स्थायी समिती ठराव क्र. १२४** — **दिनांकः— ३१/३/२०१६**

सुचकाचे नाव :— श्री. भगवान भालेराव

अनुमोदकाचे नाव :— डॉ. महेश गावडे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार व सभेत झालेल्या चर्चेअंती श्री. विलास शिवदास सोनवणे, लिपिक यांचेवर दोषारोप सिध्द झालेबाबत मा. न्यायालयाकडुन अदयाप अंतिम निर्णय न झाल्याने प्रशासनाने दिलेल्या बडतर्फीचे आदेशाची शिक्षा रद्द करुन त्यांना मुळ पदावर पुर्नस्थापित करण्याचे निर्देश प्रशासनास देत आहे.

<u>परंतु</u>

सदर बाबतीत मा. न्यायालयाचा निर्णय अंतिम असेल.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

**बहुमताने**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

दुपारी ३.५५ वाजंता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती श्रीमती जया प्रकाश माखिजा यांनी जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी )
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

.

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—१३/४/२०१६

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १३/४/२०१६ रोजीच्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

१

उल्हासनगर महानगरपालिकेची स्थायी समितीच्या सभापती निवडणूकीची सभा बुधवार दिनांक १३/४/२०१६ रोजी दुपारी १२.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत **श्री. शेखर चन्ने, मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा** हे पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते/होत्या.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | सदस्या |
| २ | श्रीमती लिलाबाई आशान | सदस्या |
| ३ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर | सदस्य |
| ४ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे | सदस्य |
| ५ | श्री. उमेश सुरेश कालानी | सदस्य |
| ६ | श्री. गुरुनो भिकोमल वलेचा | सदस्य |
| ७ | श्री. जमनादास पुरस्वानी | सदस्य |
| ८ | श्रीमती आशा जिवन इदनानी | सदस्या |
| ९ | श्रीमती अंजली साळवे | सदस्या |
| १० | श्री. विजय चाहु पाटील | सदस्य |
| ११ | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | सदस्या |
| १२ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | सदस्या |
| १३ | श्रीमती इंदिरा उदासी | सदस्या |
| १४ | श्रीमती पुष्पाताई नाना बागुल | सदस्या |
| १५ | डॉ. निना प्रकाश नाथानी | सदस्या |
| १६ | श्रीमती वंदना पाटील उर्फ वंदना युवराज भदाणे | सदस्या |

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. शेखर चन्ने, जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर
२. श्री. मनोहर हिरे, आयुक्त
३. सौ. प्राजक्ता मि. कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
४. श्री. राम जयस्वाल, शहर अभियंता
५. डॉ. राजा रिजवानी, वैद्यकिय आरोग्य अधिकारी
६. श्रीम. मंगला माळवे, सहा. आयुक्त
७. श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
८. श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्व. निरीक्षक
९. श्री. यशवंत सगळे, प्र. परिवहन व्यवस्थापक

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्रीमती विशाखा सावंत

२. श्रीमती नर्गिस खान

सर्व प्रथम वंन्देमातरम् म्हणून १२. १५ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

महापालिका सचिव :— मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती, यांची निवडणूक घेणे) नियम—२००७ मधील नियम—४ अन्वये स्थायी समिती सभापती पदाची नेमणूक करण्यासाठी बोलविलेल्या आजच्या या विशेष सभेच्या अध्यक्षस्थानी मा. श्री. शेखर चन्ने, जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर हे आहेत.

विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. १** :— स्थायी समिती सदस्यांमधुन एका सदस्याची सभापती पदी निवड करणे.

---

श्री. शेखर चन्ने (पीठासीन अधिकारी):—

**स्थायी समिती सभापती** पदासाठी महापालिका सचिव यांचेकडे **दिनांक** ११/४/२०१६ रोजी ठरवून दिलेल्या वेळेमध्ये .०३ नामनिर्देशन पत्र प्राप्त झाले असून ते अनुक्रमे पुढीलप्रमाणे आहेत:—

| अ. क्र. | उमेदवाराचे नाव | सुचकाचे नाव | अनुमोदकाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | श्रीम. रेखा अशोक ठाकुर | श्रीम. लक्ष्मी सुरेंद्र सिंह | श्री. गुरूनो भिकोमल वलेचा |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | श्री. सुर्वे सुनिल मुकुंद | श्री. राजेंद्रसिंह वि. भुल्लर | श्री. विजय चाहु पाटील |
| ३ | श्री. सुर्वे सुनिल मुकुंद | श्रीम. जया प्रकाश माखिजा | श्री. जमनादास पुरस्वानी |

**स्थायी समिती सभापती** पदाच्या निवडणूका संबंधातील मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती, यांची निवडणूक घेणे) नियम—२००७ नियम—०५ (२) अन्वये, पीठासीन अधिकारी म्हणुन मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये, मी सर्व नामनिर्देशनाची छाननी केली आहे. छाननीमध्ये वैध ठरलेल्या उमेदवारांची नावे मराठी वर्णानुक्रमाने पुढीलप्रमाणे आहेत:—

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव |
|---|---|
| १. | श्रीम. ठाकुर रेखा अशोक |
| २. | श्री. सुर्वे सुनिल मुकुंद |

यावेळेस १२ वाजुन १८ मिनिटे झाली आहेत.

वरील २ उमेदवारांपैकी ज्या उमेदवाराला आपली उमेदवारी मागे घ्यावयाची असेल त्यासाठी १५ मिनिटांची वेळ देण्यात येत आहे. अशा उमेदवारास आपली उमेदवारी मागे घेण्यासंबंधातील विहित नमुन्यामधील अर्ज भरुन देवून आपली उमेदवारी मागे घेता येईल.

श्री. शेखर चन्ने (पीठासीन अधिकारी):—आता दुपारचे १२ वाजुन ३३ मिनिटे झाली आहेत. उमेदवारी मागे घेण्यासाठी देण्यात आलेली वेळ संपली आहे असे मी जाहिर करतो.

दिलेल्या वेळेमध्ये एक उमेदवार **श्रीम. ठाकुर रेखा अशोक** यांनी आपली **उमेदवारी मागे घेतली आहे**. .

आता, स्थायी समिती सभापती पदाच्या एका जागेसाठी एकच उमेदवार निवडणूक रिंगणात शिल्लक राहिलेले आहेत मी पुढीलप्रमाणे घोषित करीत आहे.

# निकाल घोषणा

महापालिका सचिवांनी दिनांक ७/४/२०१६ रोजी काढलेल्या सूचने अन्वये स्थायी समितीच्या सर्व सदस्यांना स्थायी समिती सभापती पदाचा निवडणूक कार्यक्रम कळविण्यांत आला होता. त्या अनुषंगाने दिनांक ११/४/२०१६ रोजी २ उमेदवारांनी आपले नामनिर्देशनपत्र विहीत कालावधीत दाखल केले होते. त्यातील १ उमेदवार **श्रीम. ठाकुर रेखा अशोक** यांनी आपले नामनिर्देशनपत्र मागे घेतल्याने स्थायी समिती सभापती पदासाठी एकमात्र उमेदवार निवडणूक रिंगणात असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती, यांची निवडणूक घेणे) नियम–२००७ च्या नियम–६ मधील पोटनियम–१ अन्वये पीठासीन अधिकारी म्हणून मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये स्थायी समितीच्या सभापती पदाचे उमदेवार ***श्री. सुर्वे सुनिल मुकुंद*** हे **बिनविरोध** निवडून आल्याचे जाहिर करतो.

दिनांक :–१३/४/२०१६

(शेखर चन्ने)

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर

***LFkku %& mYgkluxj egkuxjikfydk rFkk***

***egkikfydk lHkkx`g ihBklhu vf/kdkjh***

***mYgkluxj egkuxjikfydk***

यावेळी दुपारी १२.३५ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे पीठासीन अधिकारी यांनी जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)

प्र.महापालिका सचिव

उल्हासनगर महानगरपालिका

मान्य

(शेखर चन्ने)

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर

तथा

पीठासीन अधिकारी

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:— २/५/२०१६

दि.२/५/२०१६ रोजी घेण्यांत आलेल्या
स्थायी समिती सभेचे इतिवृत्त

२

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा सोमवार दिनांक २/५/२०१६ रोजी दुपारी १२.३० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे | सभापती |
| २ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | सदस्या |
| ३ | श्रीमती लिलाबाई आशान | सदस्या |
| ४ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर | सदस्य |
| ५ | श्री. जमनादास पुरस्वानी | सदस्य |
| ६ | श्रीमती अंजली साळवे | सदस्या |
| ७ | श्री. विजय चाहु पाटील | सदस्य |
| ८ | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | सदस्या |
| ९ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | सदस्या |
| १० | श्रीमती इंदिरा उदासी | सदस्या |
| ११ | श्रीमती पुष्पाताई नाना बागुल | सदस्या |
| १२ | डॉ. निना प्रकाश नाथानी | सदस्या |
| १३ | श्रीमती वंदना पाटील उर्फ वंदना युवराज भदाणे | सदस्या |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१.श्री. उमेश सुरेश कालानी २. श्री. गुरुनो भिकोमल वलेचा ३. श्रीमती आशा जिवन इदनानी

खालील अधिकारी सभेस हजर होते.

६९.श्री. श्रीधर पाटणकर, अति.आयुक्त
७०.श्री. जमीर लेंगरेकर, उप—आयुक्त

७१. श्रीम. प्राजक्ता कुलकर्णी, महापालिका सचिव
७२. श्री. दादासाहेब पाटील, मुख्य लेखा अधिकारी
७३. श्री. सुखदेव बलमे, मुख्य लेखा परिक्षक
७४. श्री. राम जयस्वाल, शहर अभियंता
७५. डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी
७६. श्री. शैलेश दोंदे, प्र. कर निर्धारक व संकलक
७७. श्रीम. मंगला माळवे, सहा. आयुक्त
७८. श्री. विजय रिजवानी, प्र. कार्यकारी अभियंता, सा.बां.वि.
७९. श्रीम. श्रध्दा बाविस्कर, प्रोग्रॅमर, ना.सु.केंद्र
८०. श्री. नितेश रंगारी, अधिक्षक
८१. श्री. मनिष हिवरे, प्र. सहा. आयुक्त
८२. श्री. महेंद्र धिंडे, कनिष्ठ अभियंता, विदयुत विभाग
८३. श्री. एकनाथ पवार, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक
८४. श्रीम. विशाखा सावंत, प्र. मालमत्ता व्यवस्थापक
८५. श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक
८६. श्रीम. निलम कदम, लेखा अधिकारी, शिक्षण मंडळ

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.

१. श्रीमती विशाखा सावंत
२. श्रीमती नर्गिस खान
३. श्री. अशोक रामरख्यानी

दुपारी १२.४५ वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

श्री. श्रीधर पाटणकर, अति. आयुक्त हे आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ होते.

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ <u>विषय क्र. १</u> :— मागिल सभेचे दिनांक: १५/०२/२०१६ त्यात दिनांक १४/०३/२०१६ विशेष सभेचे आणि दिनांक: १४/०३/२०१६ व दिनांक १३/०४/२०१६ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

<u>महापालिका सचिव :—</u> सदर विषय पारीत करण्यात यावा का?

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

**<u>सभापती, श्री. सुनिल मुकुंद सुर्वे —</u>** मागील सभेचे दिनांक १५/०२/२०१६ त्यात दिनांक: १४/०३/२०१६ विशेष सभेचे आणि दिनांक १४/०३/२०१६ व दिनांक १३/०४/२०१६ रोजीचे इतिवृत जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १** :— मागिल सभेचे दिनांक: १५/०२/२०१६ त्यात दिनांक: १४/०३/२०१६ विशेष सभेचे आणि दिनांक १४/०३/२०१६ व दिनांक १३/०४/२०१६ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नांव : श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नांव : श्री. जमनादास पुरस्वानी

<u>स्थायी समिती ठराव क्र. :–१</u> <u>दिनांक : २/५/२०१६</u>

ही स्थायी समिती महापालिका सचिवांनी प्रस्तुत केलेले १५/०२/२०१६ त्यात दिनांक: १४/०३/२०१६ विशेष सभेचे पृष्ठ क्र. १ ते २८ पर्यतचे तसेच दिनांक १४/०३/२०१६ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते २८ पर्यतचे व दिनांक १३/०४/२०१६ रोजीचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. २ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. २ :–** उल्हासनगर शहरात कॅम्प नं १ ते ५ मध्ये होडींग पथदिप व उंच फुग्याव्दारे जाहिरात प्रसिध्दी करणेबाबतची आलेली निविदा रदद करुन फेरनिविदा मागविणेसाठी मान्यता मिळणे.

---

<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u> फेरनिविदा मागविण्यात याव्यात तसेच लगतच्या महानगरपालिकांचे दर मागविण्यात यावेत.

<u>सभापती, श्री. सुनिल मुकुंद सुर्वे –</u> सदरहु विषयाच्या ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता करण्यात यावी.

<u>काही सदस्यः–</u>पास,पास.......

<u>सभापती, श्री. सुनिल मुकुंद सुर्वे –</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. २ :–** उल्हासनगर शहरात कॅम्प नं १ ते ५ मध्ये होडींग पथदिप व उंच फुग्याव्दारे जाहिरात प्रसिध्दी करणेबाबतची आलेली निविदा रदद करुन फेरनिविदा मागविणेसाठी मान्यता मिळणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर शहरात कॅम्प नं १ ते ५ मध्ये होर्डिग, पथदीप व उंच फुग्याव्दारे जाहिरात प्रसिध्द करणेकामी एजन्सी नियुक्त करणेकामी निविदा मागविण्यास मंजुरी मिळणेकामी मा. महासभेसमोर प्रस्ताव सादर करण्यात आला होता. मा. महासभेने ठराव क्र. ७९, दि. २०/०३/२०१५ अन्वये निविदा मागविण्यास मान्यता दिलेली आहे. तथापी प्रशासनाने प्रस्तावित केलेले दर ह अंबरनाथ नगरपरिषद व कल्याण डोबिंवली महापालिकेच्या दरापेक्षा जास्त असावेत असे ठरावात नमुद करण्यात आले होते.

याबाबत पुढीलप्रमाणे किमान देकार रक्कम निश्चित करण्यात आली होती.

| एकूण खांब (किमान ४३४) | होर्डिग्ज (१६०० चौ.मी.) | १० फूगे (२५ मी. उंची) |
|---|---|---|
| रू. १५०/—प्रतिखांब/ प्रतिमहा (किमान देकार रक्कम) | रु. ३१० प्रति चौ. मी. प्रति महा (किमान देकार रक्कम) | रु. १२५ प्रतिमहा मिटर (किमान देकार रक्कम) |

दि. १७/०७/२०१५ रोजी निविदा संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली होती. तसेच निविदेस तीन वेळा मुदत वाढ देण्यात आलेली होती. परंतु निविदा कालावधीमध्ये एकच निविदा प्राप्त झालेली होती. निविदा कालावधीमध्ये मे. विजय ॲडव्हरटायजिंग एजन्सी यांनी निविदा भरलेली होती. त्यांनी खालीलप्रमाणे प्रस्ताव दिलेला होता.

१) पहिल्या वर्षाकरिता रक्कम रू. २६,००,०००/—

२) व्दितीय वर्षाकरिता रक्कम रू. २९,१२,०००/—

३) तृतीय वर्षाकरिता रक्कम रू. ३२,६१,०००/—

तसेच निविदा प्रसिध्द केलेल्या निविदेमध्ये निविदाकाराने प्रति चौ.मी दर नमुद करणे आवश्यक होते तथापी प्राप्त निविदाकार यांनी प्रती चौ.मी चे दर सादर न करता सरसकट वार्षिक रक्कम सादर करण्यात आली होती.

मे. विजय ॲडव्हरटायजिंग यांनी वरीलप्रमाणे सादर केलेला प्रस्ताव पाहता त्यांना वाटाघाटीसाठी बोलावुन दर वाढवुन मिळणेसाठी कळविले असता मे. विजय ॲडव्हरटायजिंग यांनी खालीलप्रमाणे नव्याने आर्थिक प्रस्ताव सादर केलेला आहे.

१) पहिल्या वर्षाकरिता रक्कम रू. २९,००,०००/—
२) व्दितीय वर्षाकरिता रक्कम रू. ३२,००,०००/—
३) तृतीय वर्षाकरिता रक्कम रू. ३६,००,०००/—

महापालिकेने प्रसिध्द केलेल्या निविदेतील दरांचे अवलोकन केले असता किमान वार्षिक रक्कम रू. ६८ लक्ष एवढी प्राप्त होणे आवश्यक होते. तसेच महापालिकेने प्रसिध्द केलेल्या निविदेतील अटीप्रमाणे निविदाकाराने प्रति चौ.मी दर सादर करणे आवश्यक होते. तथापी निविदाकाराने प्रति चौ.मी दर प्रस्तावित न करता सरसकट वार्षिक रक्कम नमुद केलेली आहे. जी महापालिकेने प्रस्तावित केलेल्या दरांपेक्षा अत्यंत कमी आहे.

तरी उल्हासनगर शहरात कॅम्प नं १ ते ५ मध्ये होर्डिग, पथदीप व उंच फुग्याव्दारे जाहिरात प्रसिध्द करणेबाबतची आलेली निविदा रद्द करून व्यापक प्रसिध्दी देऊन फेर निविदा मागविणेसाठी मा. स्थायी समिती समोर निर्णयासाठी सादर.

स्थायी समिती ठराव क्र. २ दिनांकः— २/५/२०१६

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. विजय पाटील

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर शहरात कॅम्प नं १ ते ५ मध्ये होर्डिंग, पथदीप व उंच फुग्याव्दारे जाहिरात प्रसिध्द करणेबाबतची आलेली निविदा रद्द करून व्यापक प्रसिध्दी देऊन फेर निविदा मागविणेस मान्यता देत आहे.

परंतु

सदर जाहिरात दर लगतच्या महानगरपालिकेचे दर तपासून त्यानुसार फेरनिविदा मागविणे आवश्यक राहील.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ३ :—** महानगरपालिका करआकारणी नोंदवहीत करपात्र मालमत्ता क्र ४३सीआय ००९८४७२०० जुना मा क्र ४३/२०९२ हि नांद रदद करुन मा स्थायी समितीची मंजुरी मिळेपर्यंत थकीत कर आकारणी व पाणीपटटी बिलाची रक्कम विलंब शास्तीसह निर्लेखित करणे.

---

सभापती, श्री. सुनिल मुकुंद सुर्वे — सदर विषय विलंब अर्ज शास्ती निर्लेखित करण्याचा आहे ना.

कर निर्धारक व संकलक, श्री. शैलेश दोंदे — सदर विषयामध्ये दुबार नोंद आहे, एकच बॅरेक आहे.

महापालिका सचिव :— सदर विषय पारीत करण्यात यावा का?

काही सदस्य :—पास—पास......

<u>सभापती, श्री. सुनिल मुकुंद सुर्वे –</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

☑

**विषय क्र. ३ :–** महानगरपालिका करआकारणी नोंदवहीत करपात्र मालमत्ता क्र ४३सीआय ००९८४७२०० जुना मा क्र ४३/२०९२ हि नांद रदद करुन मा स्थायी समितीची मंजुरी मिळेपर्यंत थकीत कर आकारणी व पाणीपटटी बिलाची रक्कम विलंब शास्तीसह निर्लेखित करणे.

<u>प्रस्तावना</u>

उपरोक्त विषयास अनसुरून सादर करण्यात येते की, श्रीम. सुशिला एन. पाटील रा. बॅ. १२४२ रूम नं. ८, उल्हासनगर–४. यांनी दि. २१/०९/२०१४ रोजीच्या अर्जान्वये महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत करपात्र मालमत्ता क्र. **४३सीआय००९६६४८००(जुना मा. क्र. ४३/००९८)** या एकाच मालमत्तेची मालमत्ता क्र. **४३सीआय००९८४७२०० (जुना मा. क्र.४३/२०९२)** अन्वये झालेली दुबार नोंद रद्द करणेसाठी विनंती केलेली आहे. विषयांकित प्रकरणा संदर्भात कार्यालयीन दफ्तरी नोंदीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | तपशिल | मालमत्ता क्र. ४३/००९८ **४३सीआय००९६६४८००** | मालमत्ता क्र. ४३/२०९२ **४३सीआय००९८४७२००** |
|---|---|---|---|
| १. | मिळकतीचे कर भरण्यास जबाबदार असलेल्या व्यक्तीचे नाव व पत्ता | श्रीम. सुशिला एन. पाटील रा. बॅ. १२४२ रूम नं. ८, उल्हासनगर–४ | श्रीम. सुशिला एन. पाटील रा. बॅ. १२४२ रूम नं. ८, उल्हासनगर–४ |
| २. | मालमत्तेचा पत्ता | बॅ. १२४२ रूम नं. ८, उल्हासनगर–४ | बॅ. १२४२ रूम नं. ८, उल्हासनगर – ४ |
| ३. | प्रथम कर निर्धारण वर्ष | वर्ष १९९१–९२<br>वर्ष १९९६–९७<br>वर्ष २००३–०४ | वर्ष १९९१–९२ |
| ४ | क्षेत्रफळ | ३००. चौ.फु<br>१००. चौ.फु<br>२९६. चौ.फु | ३००. चौ.फु |
| ५ | बांधकाम प्रकार | एसी. शिट ब्रिक्स<br>एसी. शिट ब्रिक्स<br>मोकळी | एसी. शिट ब्रिक्स |
| ६ | वापर | निवासी | निवासी |
| ७ | भाडेकरू असल्यास वार्षीक भाडे रक्कम | निरंक | निरंक |
| ८ | प्रथम कर निर्धारणानंतर मालमत्ता कर भरण्यास प्रथमत:जबाबदार व्यक्तींमध्ये बदल झाला असल्यास त्याचा तपशिल (आदेश क्रमांकासह) | निरंक | निरंक |
| ९ | प्रथम कर निर्धारणानंतर वेळोवेळी सुधारीत कर निर्धारण झाली असल्यास त्याबाबतचासविस्तर तपशिल (मालमत्ता क्रमांक/निर्धारण वर्ष) | वर्ष १९९६–९७<br>वर्ष २००३–०४ | निरंक |
| ९अ | सुधारीत क्षेत्रफळ | १००. चौ.फु<br>२९६. चौ.फु | निरंक. |
| ९ब | सुधारीत बांधकाम प्रकार मिळकतीचा वापर | निवासी | निरंक |
| ९क | सुधारीत वापर | निवासी | निवासी |
| ९ड | भाडेकरू असल्यास वार्षीक भाडे रक्कम | निरंक | निरंक |
| १० | वर्ष १५–१६ अखेर मालमत्ता करापोटी थकीत रक्कम(चालु मागणीसह) | निरंक | ३०९६१/– |
| ११ | वर्ष १५–१६ अखेर पाणीपटट्री करापोटी थकीत रक्कम(चालु | निरंक | १६२५६/– |

| | | | |
|---|---|---|---|
| | मागणीसह) | | |
| १२ | एकुण थकीत रक्कम (चालु मागणीसह) | निरंक | ४७२१७/— +वि.शा. |
| १३ | मालमत्ता कराचा भरणा केला असल्यास त्याचा तपशिल (पावती क्रमांक,दिनांक,रक्कम) | पावती क्र. ५६२३६<br>दि. ७/०८/१५<br>रक्कम रू. ९०१८/— | निरंक |

<u>स्थळ पाहणी अहवालाचा तपशिल</u>

| | | |
|---|---|---|
| १ | स्थळ पाहणी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव पदनाम व दिनांक | श्री. डी. एल. मगर<br>दिनांक ३१/०७/२०१५ |
| २ | महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीप्रमाणे दोन्ही मिळकतीकरिता मालमत्ता कर भरण्यास जबाबदार असलेली व्यक्ती म्हणुन असलेल्या नोंदीत समानता आहे काय? नसल्यास मालमत्तानिहाय नोंदीचा तपशिल | करपात्र व्यक्तीच्या नावात समानता आहे. |
| ३ | महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीप्रमाणे संदर्भित दोन्ही मिळकतीकरीता पत्त्यात असलेल्या नोंदीत समानता आहे काय? नसल्यास मालमत्तानिहाय नोंदीचा तपशिल | दोन्ही मिळकतीचे पत्त्यात समानता असल्याचे दिसून येते. |
| ४ | दोन्ही मालमत्तेचे क्षेत्रफळ, बांधकाम प्रकार व वापर इ. करपात्र बाबींत समानता आहे काय? | मालमत्ता क्षेत्रफळ,बांधकाम प्रकार, इत्यादीमध्ये फरक आहे. वापरात समानता आहे. |
| ५ | स्थळ पाहणी केली असता सद्यस्थितीत जागेवर एकच मिळकत अस्तिवात असल्याचे आढळुन आले आहे काय? | होय. मालमत्ता क्र.४३/००९८<br>**४३सीआय००९६६४८००** |

दि. ३१/७/२०१५ संदर्भित दोन्ही मिळकतींची प्रत्यक्ष पाहणी केली असता सद्यस्थितीत जागेवर श्रीम. सुशिला एन. पाटील यांचे नावे असलेली मालमत्ता क्र. **४३सीआय००९६६४८०० (जुना मा. क्र.** ४३/००९८) ही अस्तिवात असून महानरगरपालिका कर आकारणी नोंदवहीप्रमाणे मिळकतीकरिता नमुद कर पात्र बाबी प्रत्यक्ष जागेवर असल्याचे दिसून येत आहे. तसेच संबंधीत प्रभाग क्र. ४३ मध्ये मालमत्ता क्र. **४३सीआय००९८४७२०० (जुना मा. क्र.**४३/२०९२) ही कोठेही अस्तित्वात असल्याचे आढळून येत नाही.

तरी महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत करपात्र मालमत्ता क्र. **४३सीआय००९८४७२०० (जुना मा. क्र.**४३/२०९२) रदद् करणे उचित वाटते.

अर्जदाराने मालमत्ता क्र. **४३सीआय००९८४७२०० (जुना मा. क्र.**४३/२०९२) ही मिळकत रद्य करावी तसेच भविष्यात सदरची मिळकत सिध्द झालेस कर भरणेस बांधील राहील असे दि. २०/०२/२०१६ रोजी प्रतिज्ञापत्र, (आधारकार्ड नं. ९१२४ ४५८४ ७७२४) सादर केले आहे.

उक्त बाबी विचारात घेता महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत करपात्र मालमत्ता क्र. **४३सीआय००९६६४८०० (जुना मा. क्र.** ४३/००९८ या एकाच मालमत्तेची मालमत्ता क्र. **४३सीआय००९८४७२०० (जुना मा. क्र.**४३/२०९२) ही दुबार नोंद असल्याचे दिसुन येत आहे. तसेच मिळकत संदर्भात वर्ष २०१५—१६ अखेर थकीत मालमत्ता कर रक्कम रु. ४७२१७/— +विलंब शास्ती वसुल न होण्याजोगे आहे असे इकडील मत आहे.

सबब, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५२ नुसार **४३सीआय००९८४७२०० (जुना मा. क्र.** ४३/२०९२) ही नोंद रद्द करून त्यापोटी आकारण्यात आलेला वर्ष २०१५—१६ अखेर थकीत मालमत्ता कर रक्कम रू. ४७२१७ /— + विलंब शास्ती. मा.स्थायी समितीच्या मंजुरीने निर्लेखित करणे गोग्य वाटते.

सबंधित विभागाचे कर निरीक्षक यांनी दि. ३१/०७/२०१५च्या स्थळपाहणी अहवालानुसार मालमत्ता क्र. **४३सीआय००९६६४८०० (जुना मा. क्र.** ४३/००९८) या जागेत सुशिला नारायण पाटील राहत असून वरील कर देयकाची रक्कम नियमित भरत आहेत, व मालमत्ता क्र. **४३सीआय००९८४७२०० (जुना मा. क्र.**४३/२०९२) ही कर देयकाची पावती दुबार येत आहे, ती रद्य करणे.

उक्त बाबी पाहता श्रीम. सुशिला एन. पाटील यांच्या बॅरेकचे मालमत्तेचे दुबार नोंद झालेली आहे. त्यामुळे सदर मालमत्ता एकच असून दोन बिले महापालिकेकडून बजावली जातात. अर्जदार मालमत्ता क्र. **४३सीआय००९६६४८०० (जुना मा. क्र.** ४३/००९८) या देयकाची बिले पुर्ण भरलेली आहेत. मालमत्ता क्र. **४३सीआय००९८४७२०० (जुना मा. क्र.**४३/२०९२) ही दुबार नोंद असून त्यावरील थकीत बिल व विलंब शास्ती मा स्थायी समितीच्या मंजूरीने निर्लेखित करणे आवश्यक आहे.

सबब महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १५२ नसार मालमत्ता क्र. **४३सीआय००९८४७२०० (जुना मा. क्र.** ४३/२०९२) ही दुबार नोंद रद्द करून मिळकतीचे खात्यात वर्ष २०१५—१६ अखेर थकीत कर आकारणी व पाणीपट्टी (विलंबशास्तीसह) रक्कम रू. ४७२९७/— + विलंब शास्ती निर्लेखित करणेसाठी मा. स्थायी समितीपुढे सादर करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ३</u> <u>दिनांक:— २/५/२०१६</u>

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार महाराष्ट् महानगरपालिका अधिनियमाचे कलम १५२ नसार मालमत्ता क्र. ४३सीआय००९८४७२०० (जुना मा. क्र.४३/२०९२) ही दुबार नोंद रद्द करून मिळकतीचे खात्यात वर्ष २०१५–१६ अखेर थकीत कर आकारणी व पाणीपट्टी (विलंबशास्तीसह) रक्कम रू. ४७२९७/– + विलंब शास्ती निर्लेखित करणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>**महापालिका सचिव :–**</u> विषय क्रमांक. ४ वाचून दाखवितात.

---

**विषय क्र. ४ :–** उल्हासनगर महानगरपालिका प्रभाग क्र ६ अ च्या पोट निवडणूक कामी लागणारे संगणकीय साहित्य उपलब्ध होणेबाबत.

---

<u>**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–**</u> प्रभाग क्र.६अ ची पोटनिवडणूक तर केव्हाच झाली आहे आणि आता कोणते संगणकीय साहित्य उपलब्ध करून दयायचे आहे.

<u>**प्रोग्रॅमर, ना.सु. केंद्र, श्रीम. श्रध्दा बावीस्कर :–**</u> पोटनिवडणूक प्रभाग क्र. ६ अ साठी संगणकीय साहित्य मागविले होते त्यांस कार्योत्तर मंजूरी मिळणेसाठी प्रस्ताव सादर केला आहे.

<u>**सभापती, श्री. सुनिल मुकुंद सुर्वे –**</u> विषयात कुठे म्हटले आहे कार्योत्तर मंजूरीकरीता म्हणुन.

<u>**प्रोग्रॅमर, ना.सु. केंद्र, श्रीम. श्रध्दा बावीस्कर :–**</u> गोषवा–यात तसे नमुद केलेले आहे.

<u>**महापालिका सचिव :–**</u> सदर विषय पारीत करण्यात यावा का?

<u>**काही सदस्य :–**</u>पास–पास......

<u>**सभापती, श्री. सुनिल मुकुंद सुर्वे –**</u>सदरचा सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ४ :–** उल्हासनगर महानगरपालिका प्रभाग क्र ६ अ च्या पोट निवडणूक कामी लागणारे संगणकीय साहित्य उपलब्ध होणेबाबत.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका प्रभाग क्र. ०६(अ) दिं. १४/०६/२०१५ च्या पोट निवडणुक साठी लागणारे संगणक संच, इंटरनेट, फॅक्स मशिन, प्रिंटर, झेरॉक्स मशिन, स्कॅनर, इत्यादी संगणकीय साहित्य तातडीने उपलब्ध करुन देणेबाबत निवडणुक विभागामार्फत निर्देशित केले होते. त्याअनुषंगाने नागरिक सुविधा केंद्राकडे कालावधी कमी असल्याने तातडीने मे. जे.एल.एटंरप्रायजेस, उल्हासनगर ३ यांचेकडुन मागणीनुसार सदर साहित्याची पुर्तत करण्यात आली. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| Sr. | Required Items | Type of Procurement | Qty | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 1) Desktop System<br>2) HP Laser printer<br>3) Scanner<br>4) UPS 600 VA | On Rent Basis<br>(For 1 Month) | 3 | 5000/- | 15000/- |
| 2 | Xerox machine | Rate Per Page | 1 | 8000/- | 8000/- |
| 3 | Fax machine | On Rent Basis (For 1 Month) | 1 | 1000/- | 1000/- |
| 4 | Internet Connection With Unlimited Plan.<br>(Wiring & installation) | On Purchase | 1 | 3000/- | 3000/- |
| 5 | Toner Hp 12 A | On Purchase | 4 | 4650/- | 18600/- |
| 6 | Toner HP 78 A | On Purchase | 4 | 4250/- | 17000/- |
| 7 | Speaker Set | On Purchase | 1 | 760/- | 760/- |
| 8 | 16GB Pendrive | On Purchase | 4 | 1110/- | 4440/- |
| | **Total** (incl. all taxes) = | | | | **67800/-** |

उपरोक्त नमुद साहित्य मे. जे.एल.एटंरप्रायजेस, उल्हासनगर ३ यांचेकडुन तातडीने उपलब्ध करुन घेण्यात आलेले असुन निवडणुक विभागाने सदर साहित्याची स्विकृती केलेली आहे. सदयस्थितीत सदर काम पुर्ण झालेले असुन त्याबाबत आता दरपत्रके काढल्यास लेखा परिक्षणामध्ये आक्षेप घेतला जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब उल्हासनगर महानगरपालिका प्रभाग क्र. ०६ (अ) दिनांक १४/०६/२०१५ च्या पोट निवडणुक साठी साहित्य पुरवठादार मे. जे.एल.एटंरप्रायजेस, उल्हासनगर ३ यांचेकडुन वारंवार विचारणा होत असल्याने सदरचा प्रस्ताव कार्योत्तर मंजुरीकरीता मा. स्थायी समिती पटलावर सादर करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र.** ४ **दिनांकः—** २/५/२०१६

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भूल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिका प्रभाग क्र ६ अ च्या पोट निवडणूक कामी लागणारे संगणकीय साहित्य उपलब्ध करणेकामी कार्योत्तर मंजुरी देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र.** ५ :–कैलास कॉलनी,उल्हासनगर–५ येथील बंद असलेला जकात नाका निष्कासित करणेबाबत.

---

<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u> जकात नाका निष्कासित केला तर सदर जागा हडप होवू शकते.

<u>मालमत्ता व्यवस्थापक, श्रीम. विशाखा सावंत:–</u> मा. महापौरांनी कैलास कॉलनी चौकाचे सुशोभीकरण व नुतनीकरण करावयाच्या दृष्टीने कैलास कॉलनी, उल्हासनगर–५ येथील बंद असलेला जकात नाका निष्कासनाच्या कार्यवाहीच्या सुचना करण्यात आल्या आहेत. त्यानुसार प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

<u>सदस्या, श्रीम. अंजली साळवे :–</u> जकात नाक्याची रस्ता रूंदीकरणास काय अडचण निर्माण होत आहे.

<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u> स्थानिक संस्था कर तसेच जकात वसुली बंद झाली असल्यामुळे जकात नाके भाडेतत्वावर देण्याबाबत कार्यवाही सुरू आहे. त्यामुळे जकात नाका निष्कासित करण्याची गरज नाही. सदर प्रस्ताव अमान्य करण्यात येत आहे.

<u>महापालिका सचिव :–</u> सदर विषय पारीत करण्यात यावा का?

<u>काही सदस्य :–</u>सदरचा विषय अमान्य करण्यात यावा.

<u>सभापती, श्री. सुनिल मुकुंद सुर्वे –</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र.** ५ :– कैलास कॉलनी,उल्हासनगर–५ येथील बंद असलेला जकात नाका निष्कासित करणेबाबत.

<u>प्रस्तावना</u>

कैलास कॉलनी, उल्हासनगर–५ येथे महानगरपालिकेचा जकात नाका आहे. महानगरपालिकेमार्फत जकात आकारणी स्थानिक संस्था कर आकारणी बंद झालेली असल्याने सदर जकात नाक्याचा वापर बंद आहे.

मा. महापौर, सौ. अपेक्षा विकास पाटील, उल्हासनगर महानगरपालिका यांनी दि. २४/०२/२०१६ रोजीच्या पत्रान्वये कैलास कॉलनी चौकाचे सुशोभीकरण व नुतनीकरण करावयाच्या दृष्टीने कैलास कॉलनी, उल्हासनगर–५ येथील बंद असलेला जकात नाका निष्कासनाच्या कार्यवाहीच्या सुचना करण्यात आल्या आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७९ अन्वये महापालिकेच्या मालमत्तेचा अन्य प्रकारे विनियोग करावयाचा झाल्यास मा. स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक आहे

उक्त बाबी विचारात घेता कैलास कॉलनी, उल्हासनगर–५ येथील बंद असलेला जकात नाका निष्कासित करणेस मान्यता मिळणेसाठी मा. स्थायी समिती पटलावर प्रस्ताव प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ५ दिनांक:— २/५/२०१६

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार कैलास कॉलनी, उल्हासनगर—५ येथील बंद असलेला जकात नाका निष्कासित करणेस मान्यता देत नाही.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ६** :— मोडकळीस आलेले शौचालय निष्कासन व जागेच्या विनियोगास मान्यता मिळणेबाबत.

---

सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— सदर शौचालयाच्या जागेवर काय बनवायचे आहे याचा उल्लेख नाही.

मालमत्ता व्यवस्थापक, श्रीम. विशाखा सावंत:— सदर शौचालयाच्या जागेवर हजेरी शेड/स्वच्छता विभागासाठी गोडाऊन बनविणेचा प्रस्ताव आहे.

सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— सदर कामाचे प्राकलन तयार केलेले आहे का? किती अंदाजित खर्च होणार आहे वगैरे.

मालमत्ता व्यवस्थापक, श्रीम. विशाखा सावंत:— प्राकलन सार्व. बांधकाम विभाग तयार करते.

सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— सदर विषय प्राकलनासहित आणावा. आता अमान्य करण्यात यावा.

महापालिका सचिव :— सदर विषय पारीत करण्यात यावा का?

काही सदस्य :—सदर विषय अमान्य करण्यात यावा.

<u>सभापती, श्री. सुनिल मुकुंद सुर्वे –</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ६ :–** मोडकळीस आलेले शौचालय निष्कासन व जागेच्या विनियोगास मान्यता मिळणेबाबत.

<u>प्रस्तावना</u>

श्रीम. पुष्पा रा. राजवानी, नगरसेविका यांनी दि ०७/०८/२०१५ रोजीच्या पत्रान्वये पॅनल क्र. ३४(ब) मधील बॅ.नं. १७२०, रूम नं १७ जवळ, उल्हासनगर–५ येथील एकुण ४ सिट्चे वापरात नसलेले सार्वजनीक शौचालय निष्कासीत करणेबाबत विनंती केलेली आहे.

आरोग्य विभागाकडुन सदर शौचालय बाबत संबंधीत मुख्य स्वच्छता निरीक्षक यांचे अभिप्रायसह अहवाल मालमत्ता विभागास प्राप्त झालेला आहे. सदर अहवालात नमुद केलेप्रमाणे पॅनल क्र.३४(ब) मधील बॅ.नं. १७२०, रूम नं १७ जवळ, उल्हासनगर–५ येथील एकुण ४ सिट्चे सार्वजनीक शौचालय मोडकळीस अवस्थेत असुन वापरात नाही. तरी तेथील सार्वजनिक शौचालय निष्कासन करून त्या ठिकाणी सी.सी. पॅसेज अथवा हजेरी शेड/स्वच्छता विभागासाठी गोडाऊन बनविण्यात यावे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७९ अन्वये महानगरपालिकेच्या मालमत्तेचा अन्य प्रकारे विनियोग करावयाचा झाल्यास मा. स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक आहे. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या अभिप्रायानुसार पॅनल क्र.३४(ब) मधील बॅ.नं. १७२०, रूम नं १७ जवळ, उल्हासनगर–५ येथील शौचालय निष्कासित करून त्या ठिकाणी नवीन बांधकाम हजेरी शेड/स्वच्छता विभागासाठी गोडाऊन बांधणेच्या प्रस्तावास स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे, असे नमुद केले आहे.

उक्त बाबी विचारात घेता पॅनल क्र.३४ (ब) मधील बॅ.नं. १७२०, रूम नं १७ जवळ, उल्हासनगर–५ येथील एकुण ४ सिट्चे सार्वजनीक शौचालय निष्कासन करून सदर ठिकाणी हजेरी शेड/स्वच्छता विभागासाठी गोडाऊन बनविणेस मंजुरी मिळण्यासाठीचा प्रस्ताव मा. स्थायी समिती पटलावर प्रस्तावित करणेत येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ६</u> <u>दिनांक:–२/५/२०१६</u>

सुचकाचे नाव :– श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :– श्री. विजय पाटील

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार पॅनल क्र.३४(ब) मधील बॅ.नं. १७२०, रूम नं १७ जवळ, उल्हासनगर–५ येथील एकुण ४ सिट्चे सार्वजनीक शौचालय निष्कासन करून सदर ठिकाणी हजेरी शेड/स्वच्छता विभागासाठी गोडाऊन बनविणेस मान्यता देत नाही.

<u>कारण</u>

सदर प्रस्ताव प्राकलनासहीत आणणे आवश्यक राहील.

सुचकाची <u>सही/–</u>

अनुमोदकाची <u>सही/–</u>

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

———————————————————————————————————————

विषय क्र. ७ :– .कर विभागातील अभिलेख/संचिका/नस्ती/दस्तावेज जतन करून ठेवणेसाठी Compactors खरेदी करणेसाठी निविदा मागविणे व येणा–या वित्तीय खर्चास मंजुरी मिळणेबाबत.

———————————————————————————————————————

उप–आयुक्त, श्री. जमीर लेंगरेकर :–कर विभागातील अभिलेख/संचिका/नस्ती जतन करून ठेवणेसाठी Compactors खरेदी करणेसाठी निविदा मागविणेचा प्रस्ताव आहे. सदर कामाचा खर्च रू. २५ लाखाच्यावर असल्याने स्थायी समितीची मान्यता आवश्यक आहे.

महापालिका सचिव :– सदर विषय पारीत करण्यात यावा का?

सभापती, श्री. सुनिल मुकुंद सुर्वे – सदरहु विषयाच्या ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता करण्यात यावी.

काही सदस्य :–पास–पास......

सभापती, श्री. सुनिल मुकुंद सुर्वे – सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

विषय क्र. ७ :– कर विभागातील अभिलेख/संचिका/नस्ती/दस्तावेज जतन करून ठेवणेसाठी Compactors खरेदी करणेसाठी निविदा मागविणे व येणा–या वित्तीय खर्चास मंजुरी मिळणेबाबत.

प्रस्तावना

**उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात अस्तित्वात असलेल्या अंदाजित १,७०,००० मिळकतींवर मालमत्ता कर आकारणी व वसुली करण्यात येते. त्याअनुषंगाने नागरिकांकडुन कर आकारणी पुस्तकात फेरफार करणेसंदर्भात नियमितपणे तक्रारी/हरकती अर्ज दाखल केले जातात. त्या बाबींचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.**

**१) कोणत्याही जागेच्या संबंधात मालमत्ता कर देण्यास प्रथमत: पात्र असलेली व्यक्ती म्हणुन नोंद करणे.**

**२) मिळकतीचे निश्चित करण्यात आलेले करयोग्य मुल्य व कर आकारणीत बदल करणे.**

**३) शहरात नव्याने उभारण्यात आलेल्या मिळकती किंवा ज्या मिळकतींचे क्षेत्रफळ, बांधकाम प्रकार व वापर अशा करपात्र बाबीमध्ये बदल झाला आहे, अशा मिळकतींचे सर्वेक्षण करून त्यावर कर आकारणी निश्चित करणे.**

उक्त कार्यवाही दरम्यान प्रत्येक मिळकतीच्या एकापेक्षा जास्त संचिका /नस्ती तयार होत असल्याचे निदर्शनास येत आहे. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम अंतर्गत माहिती उपलब्ध करून देणे, विविध न्यायालयात दाखल दावे, अपिल, जनहित याचिका इ. बाबत माहिती उपलब्ध करून देणे अडचणी होत आहे.

सद्यस्थितीत कर विभागाचे शेजारी असलेले अभिलेख कक्षाचे नुतणीकरण करण्याची कार्यवाही सुरू आहे. तसेच विभागातील अभिलेखांचे वर्गीकरण करण्याची कार्यवाही सुरू आहे. त्याअनुषंगाने कर विभागातील अभिलेख/संचिका/नस्ती/दस्तावेज जतन करून ठेवणेसाठी आरेखन नकाशा व Compactors खरेदी बाबतचा तपशिल पुढील प्रमाणे आहे -

| Sr.No | Size | Qty | Type |
|---|---|---|---|
| 1 | 3895 x 900 x 2535 mm | 9 Nos. | Double Faced Mechanical Unit |
| 2 | 3895 x 400 x 2535 mm | 1 Nos. | Single Faced Fixed Unit |
| 3 | 905 x 2435 mm | 57 Nos. | M. S. Shutter |
| 4 | 1180 x 2435 mm | 19 Nos. | M. S. Shutter |

Total No. of Shelf levels per face 6 Levels

a. Storage projection in terms of Box Files 5016 Box files
b. Storage projection in terms of Flat Files 20064 Flat Files
c. Each Mobile Unit will have Mechanical assisted drive arrangement .
d. Each Component of the System will be treated with rust preventive treatment and will be powder coated for better finish.

**Basic Price of the above system will be Rs. 18,37,768.00**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | **Basic Cost of the System** | | | 18,37,768.00 |
| **ADD:** | Excise Duty | 12.5 | % | 2,29,721.00 |
| | **Subtotal – 2** | | | 20,67,489.00 |
| **ADD:** | Vat | 12.5 | % | 2,58,436.13 |
| | **Subtotal – 3** | | | 23,25,925.13 |
| **ADD:** | Transport Charges | | | 15,000.00 |
| | **Subtotal – 4** | | | 23,40,925.13 |
| **ADD:** | Octroi or LBT Charges – Extra at actual ; if a applicable | | | -- |
| | **Subtotal – 5** | | | 23,40,925.13 |
| **ADD:** | Installation & Commissioning Charges | | | 1,83,776.80 |
| **ADD:** | Service Tax in Installation & Commissioning Charges | 14.5 | % | 26,647.64 |
| | **GRAND TOTAL** | | | **25,51,350.00** |

वरीलप्रमाणे Compactors द्वारे कर विभागातील अभिलेख/संचिका/नस्ती/ दस्तावेज जतन करून ठेवल्यास आवश्यक ती माहिती उपलब्ध करून देणे सोईचे होईल. शिवाय लेखा परिक्षणातर्गत आक्षेपांचे काम देखील कमी होईल.

तरी Compactors खरेदीसाठी रक्कम रू. **25,51,350.00** इतका अंदाजित खर्च अपेक्षित असुन याकामी निविदा मागविणे व येणा-या वित्तीय खर्चास मंजुरी मिळणेसाठी स्थायी समितीपुढे मंजुरीकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ७ दिनांकः— २/५/२०१६

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार कर विभागातील अभिलेख/संचिका/नस्ती/दस्तावेज जतन करून ठेवणेसाठी Compactors खरेदीसाठी रक्कम रू. 25,51,350.00 इतका अंदाजित खर्च अपेक्षित असुन याकामी निविदा मागविणेस व येणा—या वित्तीय खर्चास मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ८ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ८ :—** मनपा कर आकारणी पुस्तकात बॅरेक नं. ९९१, रूम नं. १ ते ८, यु. नं. १, उल्हासनगर—३ (मालमत्ता क्र 35BI018 906300 (Old No.35/0343) & 35BI018906400 (Old No. 35/0345) & 35BI006293300 (Old No. 35/0346) & 35BI006293400 (Old No.35/0347) & 35BI006293500 (Old No. 35/0348) & 35BI006293600 (Old No. 35/0349) & 35BI006293700 (Old No. 35/0350) & 35BI006456400 (Old No. 35/2133) & 35BI020758100 (Old No. 35/0325) करीता मोकळी जागा गृहीत धरून वर्ष २०१३ —२०१४ करीता अतिरिक्त कर आकारणी रू. १,१७,१३८/— करीता अतिरिक्त कर आकारणी रू. १,१३,४९५/— संबंधित कर बिलात समायोजित करणेबाबत.

---

सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— सदर विषय कर विभागाचा आहे.

कर निर्धारक व संकलक, श्री. शैलेश दोंदे :— वर्ष २०१३ —२०१४ तसेच २०१४—२०१५ करीता अतिरिक्त कर आकारणी कर बिलात समायोजित करावयाची आहे.

महापालिका सचिव :— सदर विषय पारीत करण्यात यावा का?

काही सदस्य :—पास—पास......

सभापती, श्री. सुनिल मुकुंद सुर्वे – सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑

**विषय क्र. ८ :–** मनपा कर आकारणी पुस्तकात बॅरेक नं. ९९१, रूम नं. १ ते ८, यु. नं. १, उल्हासनगर–३ (मालमत्ता क्र 35BI018 906300 (Old No.35/0343) & 35BI018906400 (Old No. 35/0345) & 35BI006293300 (Old No. 35/0346) & 35BI006293400 (Old No.35/0347) & 35BI006293500 (Old No. 35/0348) & 35BI006293600 (Old No. 35/0349) & 35BI006293700 (Old No. 35/0350) & 35BI006456400 (Old No. 35/2133) & 35BI020758100 (Old No. 35/0325) करीता मोकळी जागा गृहीत धरून वर्ष २०१३ –२०१४ करीता अतिरिक्त कर आकारणी रू. १,१७,१३८/– तसेच २०१४–२०१५ करीता अतिरिक्त कर आकारणी रू. १,१३,४९५/– संबंधित कर बिलात समायोजित करणेबाबत.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील बॅरेक नं. ९९१, रूम नं. १ ते ८, यु. नं. १, उल्हासनगर–३ या मिळकतीकरीता कर आकारणी पुस्तकात खालीलप्रमाणे नोंद आहे.

| मालमत्ता क्रमांक | पत्ता | बांधकाम प्रकार | कर देण्यास पात्र व्यक्तीचे नाव |
|---|---|---|---|
| 35BI018906300 (Old No. 35/0343) | बॅरेक नं. ९९१, रूम नं. ७ व ८, उल्हासनगर–३ | एसी शिट ब्रिक्स मोकळी जागा | केशव जयरामदास मोटवानी |
| 35BI018906400 (Old No. 35/0345) | बॅरेक नं. ९९१, रूम नं. ६, उल्हासनगर–३ | एसी शिट ब्रिक्स मोकळी जागा | नंदलाल जयरामदास मोटवानी |
| 35BI006293300 (Old No. 35/0346) | बॅरेक नं. ९९१, रूम नं. ५, उल्हासनगर–३ | एसी शिट ब्रिक्स मोकळी जागा | नंदलाल जयरामदास मोटवानी |
| 35BI006293400 (Old No. 35/0347) | बॅरेक नं. ९९१, रूम नं. ४, उल्हासनगर–३ | एसी शिट ब्रिक्स मोकळी जागा | नंदलाल जयरामदास मोटवानी |
| 35BI006293500 (Old No. 35/0348) | बॅरेक नं. ९९१, रूम नं. ३, उल्हासनगर–३ | एसी शिट ब्रिक्स आरसीसी | कमल जयरामदास मोटवानी |
| 35BI006293700 (Old No. 35/0350) | बॅरेक नं. ९९१, रूम नं. १ ए, उल्हासनगर–३ | एसी शिट ब्रिक्स आरसीसी | जयरामदास मोटवानी |
| 35BI006456400 (Old No. 35/2133) | बॅरेक नं. ९९१, रूम नं. २, उल्हासनगर–३ | एसी शिट ब्रिक्स आरसीसी | कमल जयरामदास मोटवानी |
| 35BI006293600 (Old No. 35/0349) | बॅरेक नं. ९९१, रूम नं. १, उल्हासनगर–३ | एसी शिट ब्रिक्स आरसीसी | कमल जयरामदास मोटवानी |
| 35BI020758100 (Old No. 35/0325) | स्टेशन रोड, शॉप नं. १४६, पोर्शन उल्हासनगर–३ | मोकळी जागा | केशव जयरामदास मोटवानी |

वर्ष २०१३ मध्ये बॅरेक नं. ९९१, रूम नं. १ ते ८, यु. नं. १, उल्हासनगर—३ या मिळकतीकरीता श्री. केशव जे. मोटवानी व श्री. कमल जे. मोटवानी व श्री. नंदलाल जे. मोटवानी यांचे नावे उल्हासनगर महानगरपालिका नगररचना विभागाकडील क्र. उमपा/न.र.वि/बा. प/७८/१२/६८६, दिनांक १५/०१/२०१३ अन्वये बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र जारी करण्यात आला आहे.

त्याअनुषंगाने सदरील मिळकती निष्कासित करून तेथे तळमजला अधिक सहा मजल्याची इमारत उभारण्याचे काम सुरू आहे. वास्तविक पाहता सदरील मिळकती निष्कासित केल्यानंतर मिळकतीची बांधकामप्रकारानुसार कर आकारणी बंद करून वर्ष २०१३—२०१४, २०१४—२०१५ मध्ये मोकळी जागा ९२८.४४ चौ.मीटर क्षेत्रफळ गृहीत धरून कर आकारणी सुरू ठेवणे आवश्यक होते. तथापि, अद्यापही सदरील मिळकतीची कर आकारणी बांधकाम गृहीत धरून सुरू आहे. तसेच संबंधितांनी त्यानुसार कराचा भरणा ही केलेला आहे.

तथापि, श्री. कमल जयरामदास मोटवानी यांनी दिनांक ९/१०/२०१३ रोजीचे अर्जान्वये बॅरेक नं. ९९१, रूम नं. १ ते ८, यु. नं. १, उल्हासनगर—३ या मिळकती निष्कासित करून त्यावर इमारत उभारणीची कार्यवाही सुरू असल्याने बांधकामप्रकारानुसार सुरू असलेली कर आकारणी रद्द करणेसाठी विनंती अर्ज केला आहे.

उक्त बाबी पाहता कर आकारणी पुस्तकातील बॅरेक नं. ९९१, रूम नं. १ ते ८, यु. नं. १, उल्हासनगर—३ (मालमत्ता क्र 35BI018906300 (Old No. 35/0343) & 35BI018906400 (Old No. 35/0345) & 35BI006293300 (Old No. 35/0346) & 35BI006293400 (Old No. 35/0347) & 35BI006293500 (Old No. 35/0348) & 35BI006293600 (Old No. 35/0349) & 35BI006293700 (Old No. 35/0350) & 35BI006456400 (Old No. 35/2133) & 35BI020758100 (Old No. 35/0325) या मिळकतींसाठी वर्ष २०१३—२०१४, २०१४—२०१५ मध्ये मोकळी जागा ९२८.४४ चौ.मीटर क्षेत्रफळ गृहीत धरून कर आकारणी सुरू ठेवणे तसेच उर्वरीत भरणा केलेली रक्कम संबंधिताचे पुढील कर बिलात स्थायी समितीच्या मंजुरीने समायोजित करणे उचित वाटते. त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| मालमत्ता क्रमांक | कर आकारणी पुस्तकाप्रमाणे नमुद करपात्र बाबीनुसार आकारणी | | मोकळी जागा आकारणी | | अतिरिक्त कर आकारणी | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २०१३—१४ | २०१४—१५ | २०१३—१४ | २०१४—१५ | २०१३—१४ | २०१४—१५ |
| 35BI018906300 (Old No. 35/0343) | 2,665 | 2,325 | | | | |
| 35BI018906400 (Old No. 35/0345) | 2,042 | 2,041 | | | | |
| 35BI006293300 (Old No. 35/0346) | 2,461 | 2,459 | | | | |
| 35BI006293400 (Old No. 35/0347) | 3,068 | 3,060 | | | | |
| 35BI006293500 (Old No. 35/0348) | 55,991 | 56,509 | 107815 | 113369 | 117138 | 113495 |
| 35BI006293700 (Old No. 35/0350) | 51,306 | 51,823 | | | | |
| 35BI006456400 (Old No. 35/2133) | 53,988 | 54,534 | | | | |
| 35BI006293600 (Old No. 35/0349) | 53,432 | 53,926 | | | | |
| 35BI020758100 (Old No. 35/0325) | 0 | 187 | | | | |
| TOTAL | 224953 | 226864 | 107815 | 113369 | 117138 | 113495 |

वरीलप्रमाणे वर्ष २०१३—२०१४ करीता अतिरिक्त कर आकारणी रू. १,१७,१३८/— तसेच २०१४—२०१५ करीता अतिरिक्त कर आकारणी रू. १,१३,४९५/— संबंधित कर बिलात समायोजित करणेसाठी मंजुरीकरीता स्थायी समितीपुढे प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ८ दिनांकः— २/५/२०१६

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्रीम. लक्ष्मी सिंह

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार मनपा कर आकारणी पुस्तकात बॅरेक नं. ९९१, रूम नं. १ ते ८, यु. नं. १, उल्हासनगर—३ (मालमत्ता क्र 35BI018 906300 (Old No.35/0343) & 35BI018906400 (Old No. 35/0345) & 35BI006293300 (Old No. 35/0346) & 35BI006293400 (Old No.35/0347) & 35BI006293500 (Old No. 35/0348) & 35BI006293600 (Old No. 35/0349) & 35BI006293700 (Old No. 35/0350) & 35BI006456400 (Old No. 35/2133) & 35BI020758100 (Old No. 35/0325) करीता मोकळी जागा गृहीत धरून वर्ष २०१३ —२०१४ करीता अतिरिक्त कर आकारणी रू. १,१७,१३८/— तसेच २०१४—२०१५ करीता अतिरिक्त कर आकारणी रू. १,१३,४९५/— संबंधित कर बिलात समायोजित करणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ९ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ९ :—** मनपा कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 35BI006324200 Old No.35/0709 अन्वये नोंद असलेल्या मिळकतीवरील अधिनियमाचे कलम २६७ अ नुसार लागु असलेली अवैध बांधकाम षास्ती वर्ष २०१५—२०१६ पासुन रद्द करणेबाबत.

---

कर निर्धारक व संकलक, श्री. शैलेश दोंदे :— अनुसुची 'ड' भरून दिले आहे. यामध्ये सदर मालमत्ता अनधिकृत होती परंतु ती आता अधिकृत झाली आहे. त्यामुळे अवैध बांधकाम शास्ती वर्ष २०१५-२०१६ पासुन रद्द करणेबाबत प्रस्ताव आहे.

सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— अनुसुची 'ड' भरून दिला आहे ना.

कर निर्धारक व संकलक, श्री. शैलेश दोंदे :— होय.

महापालिका सचिव :— सदर विषय पारीत करण्यात यावा का?

काही सदस्य :—पास—पास......

सभापती, श्री. सुनिल मुकुंद सुर्वे — सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ९ :—** मनपा कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 35BI006324200 Old No.35/0709 अन्वये नोंद असलेल्या मिळकतीवरील अधिनियमाचे कलम २६७ अ नुसार लागु असलेली अवैध बांधकाम शास्ती वर्ष २०१५—२०१६ पासुन रद्द करणेबाबत.

प्रस्तावना

मनपा कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 35BI006324200 Old No. 35/0709 अन्वये नोंद असलेल्या मिळकतीमध्ये भाडेकरू (बॅंक ऑफ महाराष्ट्र ए. टी. एम) असल्याचे निदर्शनास आल्याने वर्ष २०१५-२०१६ सुधारीत करयोग्य मुल्य निश्चित करणेसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसुची 'ड' चे प्रकरण ८ (कराधान नियम) मधील नियम १५ (२) अन्वये ASHOK B CHAWLA यांचे नावे विशेष नोटीस बजावण्यात आली. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| Room Type | Const. Type | Occu. Status | Usage | Annual Rent | Asst. Year | Total Area | Exempted Area | Assessable Area |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Room | RCC | Owner | Non Residential | 0 | 07-Jul-14 | 70 | 0 | 70 |
| Room | RCC | Tenant | Non Residential | 120000 | 07-Jul-14 | 80 | 0 | 80 |
| Room | AC Sheet Bricks | Owner | Non Residential | 0 | 07-Jul-14 | 100 | 0 | 100 |
| Stair Case 1 | RCC | Owner | Non Residential | 0 | 07-Jul-14 | 24 | 12 | 12 |

सदर नोटीसच्या विरुध्द् श्री. अशोक बी. चावला, बॅरंक नं. ९७९ जवळ, स्टेशन रोड, उल्हासनगर-३ यांनी दिनांक २६/११/२०१५ रोजीचे पत्रान्वये सदर मिळकत नियमाधीन असल्याने त्यावर आकारण्यात आलेली अनधिकृत बांधकाम शास्ती रद्द करणेबाबत विनंती केली आहे. सोबत खालीलप्रमाणे कागदपत्र सादर केली आहेत.

१) उल्हासनगर शहरातील अनधिकृत विकासकामे नियमाधीन करण्याकरिता आणि तद्संबंधित किंवा तदनुषंगिक बाबींसाठी तरतुद करण्याकरिता अद्यादेश २००६ अंतर्गत सक्षम प्राधिकारी तथा जिल्हाधिकारी, ठाणे यांचेमार्फत जारी करण्यात आलेले Certificate of Regularisation [Sr. No. 41, Date 12/06/2007] ची प्रत.

२) अनधिकृत बांधकाम जमिनीचे कब्जा हक्क रक्कम शासनास जमा केलेल्या प्रदानाची पावतीची प्रत.

३) मिळकतीच्या नकाशाची प्रत

४) महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ वीज आकार देयकाची प्रत

संदर्भित मिळकतीवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २६७ अ नुसार अनधिकृत बांधकाम शास्ती [Unauthorized Construction Penalty] लागु करण्यात आली आहे.

संदर्भित मिळकतीवरील अनधिकृत बांधकाम शास्ती [Unauthorized Construction Penalty] रद्द करणेसाठी उल्हासनगर शहरातील अनधिकृत विकासकामे नियमाधीन करण्याकरिता आणि तद्संबंधित किंवा तदनुषंगिक बाबींसाठी तरतुद करण्याकरिता अद्यादेश २००६ अंतर्गत सक्षम प्राधिकारी तथा जिल्हाधिकारी, ठाणे यांचेमार्फत जारी करण्यात आलेले Certificate of Regularisation [Sr. No. 41, Date 12/06/2007] नुसार संदर्भित मिळकतीचे नियमाधिन बांधकाम क्षेत्राबाबत तज्ञ समिती, नगररचना विभाग, उ.म.पा यांचेकडे वारंवार विचारणा करण्यात आली आहे. परंतु त्यांचेकडुन अद्यापही माहिती अप्राप्त आहे.

संदर्भित मिळकतीचे आर.सी.सी १६२ चौ.फुट व एसी. शिट ब्रिक्स १०० चौ.फुट क्षेत्रावर अधिनियमातील कलम २६७ अ नुसार अनधिकृत बांधकाम शास्ती [Unauthorized Construction Penalty] लागु करण्यात आली आहे.

परंतु श्री. अशोक बी चावला यांनी संदर्भित मिळकतीसाठी सक्षम प्राधिकारी तथा जिल्हाधिकारी, ठाणे यांचेमार्फत जारी करण्यात आलेले Certificate of Regularisation [Sr. No. 41, Date 12/06/2007] ची उप विभागीय अधिकारी, उल्हासनगर यांचे कार्यालयामार्फत प्रमाणित प्रत सादर केली आहे.

उक्त Certificate of Regularisation [Sr. No. 41, Date 12/06/2007] नुसार संदर्भित मिळकतीचे Margin and Setbacks 8.37 Sq.Mt **[90.09 Sq. Ft]** & FSI 14.51 Sq.Mt **[156.18 Sq. Ft]** क्षेत्रावरील अनधिकृत विकासकाम नियमाधीन करण्यात आले आहे. संबंधिताने याकामी Other Violation Developemnt Charges चा भरणा ही केला आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २६७ अ, नुसार जो कोणी कोणत्याही इमारतीचे किंवा इमारतीच्या भागाचे अवैधरित्या बांधकाम करील किंवा पुर्नबांधकाम करील, तो, अषा अवैध बांधकामाच्या बाबतीत, त्याच्याविरूध्द् दाखला करता येईल अषा कोणत्याही कार्यावाहीस बाधा न आणता, ते बांधकाम जोपर्यत अवैध बांधकाम जोपर्यंत अवैध म्हणुन राहील तोपर्यंत दरवर्षी, अशा इमारतीवर बसवण्यायोग्य असलेल्या मालमत्ता कराच्या दुप्पटीइतकी शास्ती भरण्यास पात्र असेल, अशी तरतुद करण्यात आली आहे.

परंतु उल्हासनगर शहरातील अनधिकृत विकासकामे नियमाधीन करण्याकरिता आणि तद्संबंधित किंवा तदनुषंगिक बाबींसाठी तरतुद करण्याकरिता अद्यादेश २००६ अंतर्गत सक्षम प्राधिकारी तथा जिल्हाधिकारी, ठाणे यांचेमार्फत जारी करण्यात आलेले Certificate of Regularisation [Sr. No. 41, Date 12/06/2007] नुसार संदर्भित मिळकत अनधिकृत बांधकाम शास्तीस [Unauthorized Construction Penalty] पात्र ठरत नाही.

तरी मनपा कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 35BI006324200 Old No. 35/0709 अन्वये नोंद असलेल्या मिळकतीवर अधिनियमाचे कलम २६७ अ नुसार लागु असलेली अवैध बांधकाम शास्ती वर्ष २०१५-२०१६ पासुन रद्द करणेसाठी मंजुरीकरीता स्थायी समितीपुढे प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ९ — दिनांकः—२/५/२०१६

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्रीम. लक्ष्मी सिंह

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार मनपा कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 35BI006324200 Old No.35/0709 अन्वये नोंद असलेल्या मिळकतीवरील अधिनियमाचे कलम २६७ अ नुसार लागु असलेली अवैध बांधकाम शास्ती वर्ष २०१५—२०१६ पासुन रद्द करणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १० वाचुन दाखवितात

———————————————————————————————————

**विषय क्र. १० :—** मकर संक्रांत निमित्ताने आयोजीत केलेल्या हळदी—कुंकु कार्यक्रमास साहित्य पुरविणेबाबत.

———————————————————————————————————

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—** सदर विषय कार्योत्तर मंजूरीसाठी आला आहे. पारीत करण्यात यावा.

**महापालिका सचिव :—** सदर विषय पारीत करण्यात यावा का?

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्री. सुनिल मुकुंद सुर्वे —** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. १० :—** मकर संक्रांत निमित्ताने आयोजीत केलेल्या हळदी—कुंकु कार्यक्रमास साहित्य पुरविणेबाबत.

**प्रस्तावना**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये, मकर संक्रात निमित्ताने आयोजित केलेल्या हळदी—कुंकू कार्यक्रमासाठी साहित्य पुरविणेकामी मा. महापौर यांनी दिनांक ३०/०१/२०१६ रोजीच्या पत्राद्वारे भांडार विभागामार्फत खालील प्रमाणे साहित्य पुरविणेकामी मागणी केली होती. त्यानुसार खालीलप्रमाणे साहित्य पुरविण्यात आले आहे.

| अ.क्र. | साहित्याचा तपशिल | नग | अंदाजीत प्रती नग रक्कम | अंदाजित एकूण किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | बॅनर्स (२०×१०) (प्रत्येक प्रभाग समिती कार्यालय व मुख्यालय समोर क (फ्रेमसह) | ०५ नग. | ६००० रू. | ३०,०००/— |
| २ | चहा | ५०० नग. | १० रू. | ५,०००/— |
| ३ | अल्पोपहार (नास्टा पॅकेट) | ५००नग. | ६५ रू. | ३२,५००/— |
| ४ | भेट वस्तु | ५०० नग. | १८० रू. | ९०,०००/— |
| ५ | पुष्पगुच्छ | २५ नग | ३५० रू. | ८,७५०/— |
| ६ | फुलांचे छोटे बुके | ५०० नग | २५ रू. | १२,५००/— |
| ७ | तिळगूळ लाडू | ७०० नग | २७ रू. | १८,९००/— |
| | एकूण | | | १,९७,६५०/— |

उपरोक्त प्रमाणे हळदी—कुंकु कार्यक्रमास दरपत्रकाद्वारे साहित्य मागविणेकामी भांडार विभागामार्फत प्रस्ताव तयार करण्यात आला होता. परंतू दर पत्रकांद्वारे साहित्य मागणी करून कार्यक्रम पार पाडणेकामी कालावधी कमी असल्याने खाजगी ठेकेदार मे. मोहिनी एंटरप्रायझेस यांचेमार्फत महापौर कार्यालयास साहित्य प्राप्त झाले असून कार्यक्रम संपन्न झालेला आहे. त्याकरीता रू. १,९७,६५०/— एवढा खर्च झालेला असून सदरचा खर्च मा. महापौर यांच्या निधितून करणेकामी मा. महापौर यांनी लेखी पत्राद्वारे मान्यता दिलेली आहे.

सदर कार्यक्रम पार पडलेला असून कार्योत्तर मंजूरीकरीता सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या पटलावर सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १०                                   दिनांकः— २/५/२०१६

सुचकाचे नाव :— श्री. विजय पाटील

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार मकर संक्रात निमित्ताने मा. महापौर यांनी आयोजित केलेल्या हळदी—कुंकू कार्यक्रमासाठी लागणारे साहित्य पुरविणेकामी झालेला खर्च रू. १,९७,६५०/— कार्योत्तर मंजूरी देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ११ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ११** :— उल्हासनगर महानगरपालिका महिला व बालकल्याण समितीमार्फत महिला व बालकल्याण समितीचा गंगटोक, सिक्कीम व दार्जिलिंग येथे आयोजितअभ्यास दौरा जाणेकरीता घेण्यात आलेली रक्कम समायोजित करून जादा खर्चास मान्यता मिळणे.

---

सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— सदर अभ्यास दौ—यासाठी नगरसेवकच गेले होते ना?

उप—आयुक्त, श्री.जमीर लेंगरेकर :— हो, नगरसेवकच गेले होते.

अति.आयुक्त, श्री.श्रीधर पाटणकर, मा. आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :— किती आगाऊ रक्कम देण्यात आली होती.

उप—आयुक्त, श्री.जमीर लेंगरेकर :— रूपये ५,३०,०००/— अग्रीम रक्कम देण्यात आली होती. सदस्य वाढल्याने खर्च वाढला होता.

महापालिका सचिव :— सदर विषय पारीत करण्यात यावा का?

काही सदस्य :—पास—पास......

सभापती, श्री. सुनिल मुकुंद सुर्वे — सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ११** :— उल्हासनगर महानगरपालिका महिला व बालकल्याण समितीमार्फत महिला व बालकल्याण समितीचा गंगटोक, सिक्कीम व दार्जिलिंग येथे आयोजितअभ्यास दौरा जाणेकरीता घेण्यात आलेली रक्कम समायोजित करून जादा खर्चास मान्यता मिळणे.

## प्रस्तावना

वरिल विषयान्वये सादर करण्यात येते की, उल्हासनगर महानगरपालिका महिला व बालकल्याण समीती अंतर्गत महिलांना स्वयंरोजगारासाठी विविध प्रकारचे प्रशिक्षण देवून आर्थिक दृष्टया स्वावलंबी बनविण्यासाठी यावेळेस गंगाटोक येथे Micro small Midium Enterprises चे केंद्र शासनाचे Ministri of Industries अंतर्गत उदयोजकता प्रशिक्षण केंद्र असून तेथे सुशिक्षित बेरोजगारांना प्रशिक्षिण देण्याचे काम केले जाते.तसेच सिक्किम मध्ये कचरा मुक्त शहर पाहण्यासाठी दौरा तसेच दार्जिलिंग येथे Refuji Center Tibet Health, Tezaing Rock Garden पाहण्याकरिता जाण्याकरिता महिला व बालकल्याण समितीच्या मा. सभापती व सदस्या, मा. सभापती गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती व मा. नगरसेविका, प्रभाग समिती १, महापालिका सचिव, उप आयुक्त (मबाकस), महिला व बालकल्याण समिती सात दिवसीय अभ्यास दौरा मा. आयुक्त सोा यांचे मान्यतेने सोमवार दिनांक २१/१२/२०१५ रोजी आयोजित करण्यात आला होता.

सदर बाबत सादर करण्यात येते की, महिला व बालकल्याण समिती मा. सभापती व सर्व सदस्या, महापालिका सचिव, उप आयुक्त (मबाकस), समन्वयक, लिपीक व शिपाई महिला व बालकल्याण समिती सदर दौऱ्यासाठी एकूण १५ लोकांचा उल्हासनगर महानगरपालिका येथून गंगाटोक, सिक्कीम व दार्जिलिंग येथे जाणे व येणे करिता सात दिवस राहण्याची व्यवस्था, दोन वेळचा चहा व नास्ता व दोन वेळेच जेवण याकरिता अंदाजित खर्च खालीलप्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहे. महिला व बालकल्याण समिती मा. सभापती व ८ सदस्या, महापालिका सचिव, मा. उप आयुक्त (मबाकस) असे एकूण ११ जण गंगाटोक, सिक्कीम व दार्जिलिंग येथे प्लेन ने व जाणे व येणे करिता, राहणे व नास्ता, जेवण यासाठी प्रति सदस्या अंदाजित खर्च रू. ४७,०००/— असे एकूण ११ जणां करिता ४७,००० x ११ = ५,१७,०००/— एवढा खर्च अपेक्षित आहे.तसेच महिला व बालकल्याण समिती समन्वयक, लिपीक व २ शिपाई असे एकूण ४ जण गंगटोक, सिक्कीम व दार्जिलिंग येथे रेल्वे व जाणे व येणे करिता प्रति सदस्या अंदाजित खर्च रू. ३७,०००/— असे एकूण ४ जणां करिता ३७,००० x ४= १,४८,००० /— एवढा खर्च अपेक्षित होता.

वरिल नमुद केलेले अभ्यास दौऱ्याकरिता एकूण १५ लोकांचा उल्हासनगर महानगरपालिका येथून गंगाटोक, सिक्कीम व दार्जिलिंग येथे जाणे व येणे करिता अंदाजित खर्च रू.६,६५,०००/— अग्रीम देण्याकरिता सदरचा प्रस्ताव मा. आयुक्त सोा व महिला व बालकल्याण समितीच्या मंजुरीस्तव सादर केले असता मा. आयुक्त सोा व महिला व बालकल्याण समितीने ठराव क्रं. २१ दिनांक ११/१२/२०१५ अन्वये वरिल नमुद केलेले अभ्यास दौऱ्याकरिता जाणेकरिता व येणारा खर्च रू. ६,६५,०००/— महिला व बाल कल्याण समितीच्या अंदाजपत्रकिय तरतुदीतुन करणेस मान्यता दिलेली होती.

तद्नंतर महापालिका महिला सदस्यांनी सदर अभ्यास दौऱ्यासाठी सदर ठीकाणी महिला व बालकल्याण समिती बरोबर जाणेकरिता ते इच्छुक असून त्यांना ही सदर अभ्यास दौऱ्यास जाणेकरता मान्यता देणे बाबत मा. आयुक्त सोा व महिला व बालकल्याण समिती पुढे मागणी केली होती.

या अनुषंगाने सदर दौऱ्यास जाणे करिता इच्छुक असलेल्या महापालिका महिला सदस्यांच्या मागणीनुसार मा. आयुक्त सोा यांनी सदर अभ्यास दौऱ्यासाठी महापालिका महिला सदस्यांना घेऊन जाणेकरिता मंजुरी दिली होती.सदर अभ्यास दौऱ्या करिता उल्हासनगर महानगरपालिका येथून गंगाटोक, सिक्कीम व दार्जिलिंग येथे जाणे व येणे करिता सात दिवस राहण्याची व्यवस्था, दोन वेळचा चहा व नास्ता व दोन वेळेच जेवण याकरिता अतिरिक्त अग्रीम रू. ५.३० लाख एवढे उपलब्ध करून देण्यात आले होते.ज्या कारणासाठी सदर रक्कम घेण्यात आली होती ती त्याच कामाकरिता खर्च करण्यात आली होती.

**सदर दौऱ्याकरिता खालीलप्रमाणे महापालिका सदस्या व अधिकारी उपस्थित होते.**

| अनु.क्रं. | नावे | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्रीमती समिधा कोरडे | सभापती, मबाकस |
| २ | श्रीमती वसुधा बोडारे | सदस्या, मबाकस/सभापती (प्र.स३) |
| ३ | श्रीमती अर्चना करनकाळे | सदस्या, मबाकस/सभापती (प्र स १) |
| ४ | श्रीमती मिनाताई सोंडे | सदस्या, मबाकस/सभापती (प्र स ४) |
| ५ | श्रीमती राजश्री चौधरी | सदस्या, मबाकस |
| ६ | श्रीमती इंदीरा उदासी | सदस्या, मबाकस |
| ७ | श्रीमती नेहा भोईर | नगरसेविका, प्रभाग समिती क्रं. १ |
| ८ | श्रीमती शकुंतला जग्यासी | सभापती, गलिच्छ वस्ती व निर्मुलन समिती |
| ९ | श्री जमीर लेंगरेकर | उप आयुक्त, मबाकस |
| १० | श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी | महापालिका सचिव |

सदर अभ्यास दौऱ्यास गेलेल्या महिला व बालकल्याण समिती सभापती व सदस्या यांनी व महापालिका सचिव यांनी सदर अभ्यास दौऱ्यामध्ये भेटी व पहाणी केलेल्या ठीकाणे याबाबतचा अहवाल व फोटो महिला व बालकल्याण समिती कार्यालयात सादर केले आहे.

तसेच देण्यात आलेले रूपये ५,३०,०००/— अग्रीम रक्कमे पेक्षा जास्त खर्च झालेला आहे.ज्या कारणासाठी सदर रक्कत देण्यात आली होती ती त्याच कामाकरिता खर्च करण्यात आली असल्याचा अहवाल इकडील कार्यालयास सादर करण्यात आला आहे.

खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहे.

अ) प्रवास :—

सदर अभ्यास दौऱ्यास मुंबई ते बागदोडा, पश्चिम बंगाल येथे जाणे येण्याचा विमान प्रवास १० व्यक्तींसाठी जाणे व येणे करिता रू. ४,३०,०००/— एवढा खर्च झाला आहे.

ब) निवास, चहा—पाणी, नास्ता—जेवण व पाहण दौऱ्यासाठी वाहन याबाबतचा खर्च :—

| अनु. क्रं. | तपशिल | कालावधी | परिमाण | एकूण अंदाजित खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | Viceroy हॉटेल रेस्टॉरंट, दार्जिलिंग येथे ३ दिवस व २ रात्र | दि. २१/१२/१५ ते २७/१२/११५ | १० | १७३५८६ |
| २ | हॉटेल आनंद पोरटीको, कालीमपोग येथे २ दिवस १ रात्र | | १० | १२५९२० |
| ३ | किपसा रेसीडेन्सी, सिक्किम गंगटोक येथे २ दिवस १ रात्र | | १० | २२१६४० |
| | एकूण | | | ५,२१,१४६ |

या अनुषंगाने सदर अभ्यास दौऱ्यासाठी उल्हासनगर महानगरपालिका येथून गंगाटोक, सिक्कीम व दार्जिलिंग येथे जाणे व येणे करिता सात दिवस राहण्याची व्यवस्था, दोन वेळचा चहा व नास्ता व दोन वेळेच जेवण याकरिता एकूण खर्च (अ+ब) रू. ९,५१,१४६/— (नऊ लाख एक्कावन हजार एकशे शेचाळीस मात्र) एवढा झालेला आहे.तरी दिलेली अग्रीम रू. ५,३०,०००/— वजा करता जादा खर्चाची रक्कम रू. ४,२१,१४६/—(चार लाख एकविस हजार एकशे शेचाळीस मात्र) सदरचा खर्च मा. उप आयुक्त (मबाकस) यांनी केलेला आहे.तरी जादा खर्चाची रक्कम रू. ४,२१,१४६/—(चार लाख एकविस हजार एकशे शेचाळीस मात्र) ही मा. स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सविनय सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ११ — दिनांकः— २/५/२०१६

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिका महिला व बालकल्याण समितीमार्फत महिला व बालकल्याण समितीचा गंगटोक, सिक्कीम व दार्जिलिंग येथे आयोजित अभ्यास दौरा जाणेकरीता घेण्यात आलेली रक्कम समायोजित करून जादा खर्च रुपये ४,२१,१४६/— यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. १२ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १२ :–** म.न.पा. शाळांतील विद्यार्थ्यांना पूरक पोषण आहार (चिक्की) पुरवठा करणे न्यूनतम दर सादर करणाऱ्या निविदाकार मे. हिंदूजा इंटरनॅशनल प्रायव्हेट लिमिटेड यांच्याशी संविदा करणेस मान्यता देणे.

---

सदस्या, डॉ. श्रीम. निना नाथानी :– या विषयात आहार देणार असल्याचे नमुद केले आहे. तर (चिक्की) या आहाराची गुणवत्ता तपासली जाते का? कोणाकडून तपासली जाते?

उपआयुक्त, श्री. जमीर लेंगरेकर :– अन्न परवाना धारण करीत असलेल्या संस्थेलाच आपण हे काम दिले आहे. तसा परवाना त्यांच्याकडे आहे तसेच सदर आहार (चिक्की) जो वाटप करणार आहोत त्याच्या आवरणावरदेखील परवाना असल्याचे नमुद आहे.

सदस्या, डॉ. श्रीम. निना नाथानी :– चिक्कीची तपासणीसाठी कुठे पाठविली जाते.

लेखाअधिकारी, शिक्षण मंडळ, श्रीम. निलम कदम :– महिन्यातुन एकदा चिक्कीची तपासणी केली जाते.

सदस्या, डॉ. श्रीम. निना नाथानी :– महिन्यातुन एकदा तपासणी करणार तर ज्या दिवशी तपासणी असणार त्यादिवशी चिक्कीची गुणवत्ता चांगलीच दिसणार, इतर दिवशीचे काय?

अति.आयुक्त, श्री. श्रीधर पाटणकर, आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :– अचानक केव्हाही तपासणी केली पाहिजे.

लेखाअधिकारी, शिक्षण मंडळ, श्रीम. निलम कदम :– रॅन्डमली तपासणी केली जाते. व आहाराची गुणवत्ता तपासुनच घेतली जाते.

सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–चिक्कीचा नमुना आणला आहे का?

लेखाअधिकारी, शिक्षण मंडळ, श्रीम. निलम कदम :– नाही, आता आणलेला नाही, परंतु मी उपलब्ध करून देईन.

सदस्या, श्रीम. अंजली साळवे :– रोज रोज चिक्कीच कसे काय देता, तेच तेच खाऊन मुले कंटाळतात.

सदस्या, डॉ. श्रीम. निना नाथानी :– हो, तेच तेच न देता, मुलांना देण्यासारखे आणखी सकस, पौष्टीक पदार्थ आहेत ना, प्रोटीनची बिस्कीट वगैरे तर तसे वेगवेगळा आहार का देत नाही.

सदस्या, श्रीम. अंजली साळवे :– मीसुध्दा काही शाळांमध्ये भेट दिली तेव्हा मला तिथल्या शिक्षकांनी सांगितले की, एकच आहार खायला मुले कंटाळतात, त्यांना आवडत नाही. तर नेहमी वेगवेगळा आहार दयायला पाहिजे ना.

सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–पुढील वर्षीकरीता हा प्रस्ताव विचारात घ्यावा असे वाटते.

सदस्या, श्रीम. अंजली साळवे :– नाही, नाही, एकच आहार रोज खाऊ शकत नाही कोणी.

सभापती, श्री. सुनिल मुकुंद सुर्वे – आता विषयपटलावर सदर विषय आलेला आहे त्यांस मान्यता देणे आवश्यक आहे, तसेच सदर आहार (चिक्की) चे वाटप ज्या दिवशी शाळा सुरू होईल त्या दिवसापासून करण्यात यावे.

सदस्या, श्रीम. लिलाबाई आशान :– मुले एकच खाऊ खाऊन कंटाळतात, तर कधी राजगिरा लाडू, कधी बिस्कीट असे वेगवेगळे आहार दिले पाहिजेत.

सभापती, श्री. सुनिल मुकुंद सुर्वे – पुढील वेळेस सदस्यांनी सुचविल्याप्रमाणे प्रस्ताव आणण्याची जबाबदारी प्रशासनाची राहिल.

<u>महापालिका सचिव :–</u> सदर विषय पारीत करण्यात यावा का?

<u>काही सदस्य :–</u>पास–पास……

<u>सभापती, श्री. सुनिल मुकुंद सुर्वे –</u> सदरहु ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता करण्यात यावी.

<u>सभापती, श्री. सुनिल मुकुंद सुर्वे –</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १२ :–** म.न.पा. शाळांतील विद्यार्थ्यांना पूरक पोषण आहार (चिक्की) पुरवठा करणे न्यूनतम दर सादर करणाऱ्या निविदाकार मे. हिंदूजा इंटरनॅशनल प्रायव्हेट लिमिटेड यांच्याशी संविदा करणेस मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

मागिल वर्षीप्रमाणे यावर्षीदेखिल २०१६–१७ मध्ये म.न.पा. शाळांतील विद्यार्थ्यांना पूरक पोषण आहार (चिक्की) पुरवठा करणे नियोजित आहे. त्यानुसार मा. आयुक्त सो. यांच्या दि. ०६/०२/२०१६ रोजीच्या मान्यतेने सदर चिक्की खरेदीची निविदा ई–टेंडरींगव्दारे प्रसिध्द करून जाहीर निविदा सुचना दै. परशुराम समाचार (हिंदी व मराठी), दै. नगर न्युज, दै. अमृत कलश या वृत्तपत्रात प्रसिध्दीसह उल्हासनगर महानगरपालिकेच्या वेब साइटवर ई–निविदा सुचना प्रसिध्द करून ई–टेंडरिंग पध्दतीने इंटरनेट व्दारे निविदा मागविण्यात आल्या होत्या.

यामध्ये प्राप्त तीन निविदा निविदा समितीचे सदस्य उपआयुक्त (शिक्षण), मुख्य लेखा परिक्षक, मुख्य लेखा अधिकारी, तसेच निविदाधारक व त्यांचे प्रतिनिधी यांचे समोर ई–निविदा संगणक प्रणालीव्दारे उघडण्यात आल्या. प्राप्त तीन निविदाधारकांनी लिफाफा क्र.१ मध्ये आवश्सक कागदपत्रांची पुर्तता केलेली असल्याने त्यांच्या निविदेचा दुसरा लिफाफा उघडण्यास निविदा समितीने मान्यता दिली. त्यानुसार निविदेचा वित्तीय लिफाफा निविदा समिती अध्यक्ष, सदस्य, निविदाधारक व त्यांचे प्रतिनिधी यांच्या समवेत संगणकाव्दारे उघडण्यात आला. पात्र झालेल्या निविदाकारांकडुन सादर केलेल्या सदर चिक्की खरेदीचा दरपत्रकांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | तपशिल | इयत्ता | नग | **M/s Hinduja International Pvt. Ltd** | **M/s GSN Associates** | **M/s R.M.M.S.G. Sangh (Maryadit)** |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Chikki all Flavours | 1st to 7th | 1254812 Pkts | 16.70 | 20.00 | 18.50 |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्यानुसार मेसर्स हिंदुजा इंटरनॅशनल प्रायव्हेट लिमिटेड यांनी सर्वात कमी दर सादर केलेले आहेत. तरी मा. अध्यक्ष निविदा समिती यांच्या निर्देशानुसार वरील प्रमाणे न्युनतम दराच्या निविदाधारकाशी त्यांनी सादर केलेल्या दरांबाबत वाटाघाटी करण्यासाठी रोजी बोलवण्यात आले. त्यानुसार वाटाघाटीअंती प्राप्त झालेले दर वाजवी आहेत. वाटाघाटी अंती प्राप्त दरांचा तक्ता खालीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | तपशिल | इयत्ता | नग | **M/s Hinduja International Pvt. Ltd** |
|---|---|---|---|---|
| 1 | Chikki all Flavours | 1st to 7th | 1254812 Pkts | 15.20 |

वरील परिमान व दराप्रमाणे चिक्की खरेदीकरीता रू. १,९०,७३,१४२ एवढा खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च सन २०१६–१७ च्या आर्थिक अंदाजपत्रकामध्ये चिक्की खरेदीसाठी रू. ४ कोटी तरतूद करण्यात आलेली आहे. त्यापैकी पूर्ण तरतूद शिल्लक आहे. त्यातून करण्याचे प्रस्तावित येत

आहे. तरी सदरच्या खर्चास व तसेच सदर चिक्की खरेदी करणेसाठी न्यूनतम दर सादर करणाऱ्या निविदाकार मे. हिंदूजा इंटरनॅशनल प्रायव्हेट लिमिटेड यांच्याशी संविदा करण्याकरीता मा. स्थायी समितीची मान्यता आवश्यक आहे. करिता सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३ (क) अन्वये मा. स्थायी समितीच्या मंजुरीसाठी सविनय सादर

स्थायी समिती ठराव क्र.१२ दिनांकः–२/५/२०१६

सुचकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :–श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार म.न.पा. शाळांतील विद्यार्थ्यांना पूरक पोषण आहार (चिक्की) पुरवठा करणे न्यूनतम दर सादर करणाऱ्या निविदाकार मे. हिंदूजा इंटरनॅशनल प्रायव्हेट लिमिटेड यांच्याशी संविदा करणेस मान्यता देत आहे.

तसेच

सदर पुरवठा शाळा सुरु झालेल्या तारखेपासुन करणे आवश्यक राहील.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. १३ वाचुन दाखवितात

---

➡ विषय क्र. १३ :– म.न.पा. शाळांतील विद्यार्थ्यांना बूट–मोजे पुरवठा करणेकामी न्युनत्तम दर सादर करणारे निविदाकार मे. मे. हिंदूजा इंटरनॅशनल यांच्याशी संविदा करणेस मान्यता देणे.

---

सभापती, श्री. सुनिल मुकुंद सुर्वे – शालेय विद्यार्थ्यांना बूट–मोजे ३० जूनपर्यंत मिळाले पाहिजेत. तसेच ते त्यांच्या साईजचे मिळाले पाहिजेत, लहान मोठे देता कामा नयेत.

महापालिका सचिव :– सदर विषय पारीत करण्यात यावा का?

काही सदस्य :–पास–पास......

सभापती, श्री. सुनिल मुकुंद सुर्वे – सदरहु ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता करण्यात यावी.

<u>सभापती, श्री. सुनिल मुकुंद सुर्वे –</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १३ :–** म.न.पा. शाळांतील विद्यार्थ्यांना बूट–मोजे पुरवठा करणेबाबत न्युनत्तम दर सादर करणारे निविदाकार मे. हिंदूजा इंटरनॅशनल यांच्याशी संविदा करणेस मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

_दरवर्षीप्रमाणे यावर्षीदेखिल २०१६–१७ मध्ये म.न.पा. शाळांतील विद्यार्थ्यांना बूट व मोजे पुरवठा करणे आवश्यक असते. त्यानुसार मा. आयुक्त सो. यांच्या दि.०६/०२/२०१६ रोजीच्या मान्यतेने सदर बूट व मोजे खरेदीची निविदा ई–टेंडरींगव्दारे प्रसिध्द करून जाहीर निविदा सुचना दै. परशुराम समाचार (हिंदी व मराठी), दै. नगर न्युज, दै. अमृत कलश या वृत्तपत्रात प्रसिध्दीसह उल्हासनगर महानगरपालिकेच्या वेब साइटवर ई–निविदा सुचना प्रसिध्द करून ई–टेंडरिंग पध्दतीने इंटरनेट व्दारे निविदा मागविण्यात आल्या होत्या.

यामध्ये प्राप्त तीन निविदा समितीचे सदस्य उपआयुक्त (शिक्षण), मुख्य लेखा परिक्षक, मुख्य लेखा अधिकारी, तसेच निविदाधारक व त्यांचे प्रतिनिधी यांचे समोर ई–निविदा संगणक प्रणालीव्दारे उघडण्यात आल्या. प्राप्त तिन निविदाधारकांनी लिफाफा क्र.१ मध्ये आवश्सक कागदपत्रांची पुर्तता केलेली असल्याने त्यांच्या निविदेचा दुसरा लिफाफा उघडण्यास निविदा समितीने मान्यता दिली. तद्नंतर निविदेचा वित्तीय लिफाफा निविदा समिती अध्यक्ष, सदस्य, निविदाधारक व त्यांचे प्रतिनिधी यांच्या समवेत संगणकाव्दारे उघडण्यात आला. पात्र झालेल्या निविदाकारांकडुन सादर केलेल्या सदर बूट व मोजे खरेदीचा दरपत्रकांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| Sr.No | Type | STD | Quantity | M/s Hinduja International | M/s R.M.M.S.G.Sangh (Maryadit) | M/s GSN Associates |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Boys | PP | 413 | 329.00 | 350.00 | 340.00 |
| 2 | Boys | 1st | 499 | 349.00 | 380.00 | 350.00 |
| 3 | Boys | 2nd | 443 | 349.00 | 380.00 | 360.00 |
| 4 | Boys | 3rd | 445 | 369.00 | 380.00 | 370.00 |
| 5 | Boys | 4th | 496 | 369.00 | 380.00 | 380.00 |
| 6 | Boys | 5th | 500 | 399.00 | 420.00 | 400.00 |
| 7 | Boys | 6th | 523 | 399.00 | 420.00 | 410.00 |
| 8 | Boys | 7th | 532 | 419.00 | 420.00 | 420.00 |
| 9 | Girls | PP | 412 | 329.00 | 355.00 | 340.00 |
| 10 | Girls | 1st | 507 | 349.00 | 385.00 | 350.00 |
| 11 | Girls | 2nd | 497 | 349.00 | 385.00 | 360.00 |
| 12 | Girls | 3rd | 478 | 369.00 | 385.00 | 370.00 |
| 13 | Girls | 4th | 509 | 369.00 | 385.00 | 380.00 |
| 14 | Girls | 5th | 505 | 399.00 | 425.00 | 400.00 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 15 | Girls | 6th | 563 | 399.00 | 425.00 | 410.00 |
| 16 | Girls | 7th | 606 | 419.00 | 425.00 | 420.00 |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्यानुसार मेसर्स हिंदूजा इंटरनॅशनल यांनी सर्वात कमी दर सादर केलेले आहेत. सदर दर व परिमानानुसार खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| Sr.No | Type | STD | Quantity | Rate | Total |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Boys | PP | 413 | 329.00 | 135877.00 |
| 2 | Boys | 1st | 499 | 349.00 | 174151.00 |
| 3 | Boys | 2nd | 443 | 349.00 | 154607.00 |
| 4 | Boys | 3rd | 445 | 369.00 | 164205.00 |
| 5 | Boys | 4th | 496 | 369.00 | 183024.00 |
| 6 | Boys | 5th | 500 | 399.00 | 199500.00 |
| 7 | Boys | 6th | 523 | 399.00 | 208677.00 |
| 8 | Boys | 7th | 532 | 419.00 | 222908.00 |
| 9 | Girls | PP | 412 | 329.00 | 135548.00 |
| 10 | Girls | 1st | 507 | 349.00 | 176943.00 |
| 11 | Girls | 2nd | 497 | 349.00 | 173453.00 |
| 12 | Girls | 3rd | 478 | 369.00 | 176382.00 |
| 13 | Girls | 4th | 509 | 369.00 | 187821.00 |
| 14 | Girls | 5th | 505 | 399.00 | 201495.00 |
| 15 | Girls | 6th | 563 | 399.00 | 224637.00 |
| 16 | Girls | 7th | 606 | 419.00 | 253914.00 |
| Grand Total | | | | | 2973142.00 |

सदर दर वाजवी आहेत तरी वरील परिमान व दराप्रमाणे बूट व मोजे खरेदीकरीता रू. २९,७३,१४२/— एवढा खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च सन २०१६—१७ च्या आर्थिक अंदाजपत्रकामध्ये बूट व मोजे खरेदीसाठी रू.३०लक्ष तरतूद करण्यात आलेली आहे. त्यापैकी पूर्ण तरतूद शिल्लक आहे. त्यातून करण्याचे प्रस्तावित येत आहे. तरी सदरच्या खर्चास व तसेच सदर बूट व मोजे खरेदी करणेसाठी न्यूनतम दर सादर करणाऱ्या निविदाकार मे. हिंदूजा इंटरनॅशनल यांच्याशी संविदा करण्याकरीता मा. स्थायी समितीची मान्यता आवश्यक आहे. करिता सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३ (क) अन्वये मा. स्थायी समितीच्या मंजुरीसाठी सविनय सादर.

<u>स्थायी समिती ठराव क्र. १३</u>      <u>दिनांकः— २/५/२०१६</u>

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार म.न.पा. शाळांतील विद्यार्थ्यांना बूट—मोजे पुरवठा करणेकामी न्युनत्तम दर सादर करणारे निविदाकार मे. हिंदूजा इंटरनॅशनल यांच्याशी संविदा करणेस मान्यता देत आहे.

**तसेच**

सदर पुरवठा ३० जुन पर्यंत करणे आवश्यक राहील.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १४ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. १४ :—** म.न.पा. शाळांतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य संच पुरवठा करणेकामी न्यूनतम दर सादर करणाऱ्या निविदाकार मे. एंजल फार्मासिटीकल्स् यांच्याशी संविदा करणेस मान्यता देणे.

---

**सभापती, श्री. सुनिल मुकुंद सुर्वे —** शाळांतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य संच ३० जूनपर्यंत मिळाले पाहिजेत.

**महापालिका सचिव :—** सदर विषय पारीत करण्यात यावा का?

**सभापती, श्री. सुनिल मुकुंद सुर्वे —** सदरहु ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता करण्यात यावी.

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्री. सुनिल मुकुंद सुर्वे —** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. १४ :—** म.न.पा. शाळांतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य संच पुरवठा करणेकामी न्यूनतम दर सादर करणाऱ्या निविदाकार मे. एंजल

फार्मासिटीकल्स् यांच्याशी संविदा करणेस मान्यता देणे.

प्रस्तावना

दरवर्षीप्रमाणे यावर्षीदेखिल २०१६—१७ मध्ये म.न.पा. शाळांतील विद्यार्थ्यांना शै. साहित्य संच पुरवठा करणे आवश्यक असते. त्यानुसार मा. आयुक्त सो. यांच्या दि.०६/०२/२०१६ रोजीच्या मान्यतेने सदर शै. साहित्य संच खरेदीची निविदा ई—टेंडरींगव्दारे प्रसिध्द करून जाहीर निविदा सुचना दै. परशुराम समाचार (हिंदी व मराठी), दै. नगर न्युज, दै. अमृत कलश या वृत्तपत्रात प्रसिध्दीसह उल्हासनगर महानगरपालिकेच्या वेब साइटवर ई—निविदा सुचना प्रसिध्द करून ई—टेंडरिंग पध्दतीने इंटरनेट व्दारे निविदा मागविण्यात आल्या होत्या.

यामध्ये प्राप्त तीन निविदा समितीचे सदस्य उपआयुक्त (शिक्षण), मुख्य लेखा परिक्षक, मुख्य लेखा अधिकारी, तसेच निविदाधारक व त्यांचे प्रतिनिधी यांचे समोर ई—निविदा संगणक प्रणालीव्दारे उघडण्यात आल्या. प्राप्त तिन निविदाधारकांनी लिफाफा क्र.१ मध्ये आवश्सक कागदपत्रांची पुर्तता केलेली असल्याने त्यांच्या निविदेचा दुसरा लिफाफा उघडण्यास निविदा समितीने मान्यता दिली. तद्नंतर निविदेचा वित्तीय लिफाफा निविदा समिती अध्यक्ष, सदस्य, निविदाधारक व त्यांचे प्रतिनिधी यांच्या समवेत संगणकाव्दारे उघडण्यात आला. पात्र झालेल्या निविदाकारांकडुन सादर केलेल्या सदर शै. साहित्य संच खरेदीचा दरपत्रकांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| Sr.No | STD | Quantity | M/s Angel Pharmaceuticals | M/s R.M.M.S.G.Sangh (Maryadit) | M/s P.P. Bafna Ventures Pvt. Ltd. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | PP | 825 | 773.70 | 780.00 | 787.00 |
| 2 | 1st | 1006 | 1276.50 | 1280.00 | 1287.00 |
| 3 | 2nd | 940 | 1274.50 | 1280.00 | 1297.00 |
| 4 | 3rd | 923 | 1368.90 | 1380.00 | 1397.00 |
| 5 | 4th | 1005 | 1548.45 | 1550.00 | 1557.00 |
| 6 | 5th | 1005 | 1832.70 | 1840.00 | 1847.00 |
| 7 | 6th | 1086 | 1832.70 | 1840.00 | 1847.00 |
| 8 | 7th | 1138 | 1832.70 | 1840.00 | 1847.00 |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्यानुसार मेसर्स एंजल फार्मासिटीकल्स् यांनी सर्वात कमी दर सादर केलेले आहेत. सदर दर व परिमानानुसार खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| Sr.No | STD | Quantity | Rate | Total |
|---|---|---|---|---|
| 1 | PP | 825 | 773.70 | 638302.50 |
| 2 | 1st | 1006 | 1276.50 | 1284159.00 |
| 3 | 2nd | 940 | 1274.50 | 1198030.00 |
| 4 | 3rd | 923 | 1368.90 | 1263494.70 |
| 5 | 4th | 1005 | 1548.45 | 1556192.25 |
| 6 | 5th | 1005 | 1832.70 | 1841863.50 |
| 7 | 6th | 1086 | 1832.70 | 1990312.20 |
| 8 | 7th | 1138 | 1832.70 | 2085612.60 |
| Grand Total | | | | 11857966.75 |

सदर दर वाजवी आहेत तरी वरील परिमान व दराप्रमाणे शै. साहित्य संच खरेदीकरीता रू. १,१८,५७,९६६.७५ एवढा खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च सन २०१६—१७ च्या आर्थिक अंदाजपत्रकामध्ये 'विद्यार्थ्यांना मोफत वहया वाटपावरील खर्च' या लेखाशिर्षकाअंतर्गत रू.३५लक्ष, 'विद्यार्थ्यांना लेखन साहित्य पूरविणे' या लेखाशिर्षकाअंतर्गत रू.३०लक्ष, 'विद्यार्थ्यांना मोफत दप्तर, जेवनाचा डब्बा, पिण्याची पाण्याची बाटली वाटपावरील खर्च' या लेखाशिर्षकाअंतर्गत असलेल्या रू. ५७लक्ष असे एकूण १.२२कोटी तरतूद करण्यात आलेली आहे. त्यापैकी पूर्ण तरतूद शिल्लक आहे. त्यातून करण्याचे प्रस्तावित येत आहे. तरी सदरच्या खर्चास व तसेच सदर शै. साहित्य संच खरेदी करणेसाठी न्यूनतम दर सादर करणाऱ्या निविदाकार मे. एंजल फार्मासिटीकल्स् यांच्याशी संविदा करण्याकरीता मा. स्थायी समितीची मान्यता आवश्यक आहे. करिता सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३ (क) अन्वये मा. स्थायी समितीच्या मंजुरीसाठी सविनय सादर.

स्थायी समिती ठराव क्र. १४ दिनांकः— २/५/२०१६

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— डॉ. निना नाथानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार म.न.पा. शाळांतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य संच पुरवठा करणेकामी न्यूनतम दर सादर करणाऱ्या निविदाकार मे. एंजल फार्मासिटीकल्स् यांच्याशी संविदा करणेस मान्यता देत आहे.

तसेच

सदर पुरवठा ३० जुन पर्यंत करणे आवश्यक राहील.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. १५ वाचुन दाखवितात

———————————————————————————————————————

⇨ **विषय क्र. १५ :—** म.न.पा. शाळांतील विद्यार्थ्यांना रेनकोट पुरवठा करणेबाबत न्युनत्तम दर सादर करणारे निविदाकार मे. राष्ट्रीय मजदूर मध्यवर्ती सहकारी ग्राहक संघ (मर्या.) यांच्याशी संविदा करणेस मान्यता देणे.

<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भूल्लर –</u> शाळांतील विद्यार्थ्यांना रेनकोट पुरवठा ३० जूनपर्यंत झाला पाहिजे, तसेच सदर साहित्याचा दर्जा कोण तपासतो.

<u>मुख्य लेखा अधिकारी, श्री. दादासाहेबं पाटील –</u> तपासणी करूनच घेण्यात येते व त्यानंतरच त्याचे वाटप केले जाते.

<u>महापालिका सचिव :–</u> सदर विषय पारीत करण्यात यावा का?

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>सभापती, श्री. सुनिल मुकुंद सुर्वे –</u> सदरहु ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता करण्यात यावी.

<u>सभापती, श्री. सुनिल मुकुंद सुर्वे –</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १५ :–** म.न.पा. शाळांतील विद्यार्थ्यांना रेनकोट पुरवठा करणेबाबत न्युनत्तम दर सादर करणारे निविदाकार मे. राष्ट्रीय मजदूर मध्यवर्ती सहकारी ग्राहक संघ (मर्या.) यांच्याशी संविदा करणेस मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

दरवर्षीप्रमाणे यावर्षीदेखिल २०१६–१७ मध्ये म.न.पा. शाळांतील विद्यार्थ्यांना रेनकोट पुरवठा करणे आवश्यक असते. त्यानुसार मा. आयुक्त सो. यांच्या दि.०६/०२/२०१६ रोजीच्या मान्यतेने सदर रेनकोट खरेदीची निविदा ई–टेंडरींगव्दारे प्रसिध्द करून जाहीर निविदा सुचना दै. परशुराम समाचार (हिंदी व मराठी), दै. नगर न्युज, दै. अमृत कलश या वृत्तपत्रात प्रसिध्दीसह उल्हासनगर महानगरपालिकेच्या वेब साइटवर ई–निविदा सुचना प्रसिध्द करून ई–टेंडरिंग पध्दतीने इंटरनेट व्दारे निविदा मागविण्यात आल्या होत्या.

यामध्ये प्राप्त तीन निविदा समितीचे सदस्य उपआयुक्त (शिक्षण), मुख्य लेखा परिक्षक, मुख्य लेखा अधिकारी, तसेच निविदाधारक व त्यांचे प्रतिनिधी यांचे समोर ई–निविदा संगणक प्रणालीव्दारे उघडण्यात आल्या. प्राप्त तिन निविदाधारकांनी लिफाफा क्र.१ मध्ये आवश्सक कागदपत्रांची पुर्तता केलेली असल्याने त्यांच्या निविदेचा दुसरा लिफाफा उघडण्यास निविदा समितीने मान्यता दिली. तद्नंतर निविदेचा वित्तीय लिफाफा निविदा समिती अध्यक्ष, सदस्य, निविदाधारक व त्यांचे प्रतिनिधी यांच्या समवेत संगणकाव्दारे उघडण्यात आला. पात्र झालेल्या निविदाकारांकडुन सादर केलेल्या सदर रेनकोट खरेदीचा दरपत्रकांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| Sr.No | Type | STD | Quantity | M/s Hinduja International Pvt. Ltd | M/s GSN Associates | M/s R.M.M.S.G.Sangh (Maryadit) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Boys | 1st | 499 | 300.00 | 295.00 | 288.75 |
| 2 | Boys | 2nd | 443 | 300.00 | 295.00 | 288.75 |
| 3 | Boys | 3rd | 445 | 325.00 | 320.00 | 299.25 |
| 4 | Boys | 4th | 496 | 325.00 | 320.00 | 299.25 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 5 | Boys | 5th | 500 | 350.00 | 345.00 | 315.00 |
| 6 | Boys | 6th | 523 | 375.00 | 345.00 | 325.50 |
| 7 | Boys | 7th | 532 | 400.00 | 345.00 | 336.00 |
| 8 | Girls | 1st | 507 | 300.00 | 300.00 | 299.25 |
| 9 | Girls | 2nd | 497 | 300.00 | 300.00 | 299.25 |
| 10 | Girls | 3rd | 478 | 325.00 | 325.00 | 304.50 |
| 11 | Girls | 4th | 509 | 325.00 | 325.00 | 304.50 |
| 12 | Girls | 5th | 505 | 350.00 | 350.00 | 320.25 |
| 13 | Girls | 6th | 563 | 375.00 | 350.00 | 330.75 |
| 14 | Girls | 7th | 606 | 400.00 | 350.00 | 341.25 |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्यानुसार मेसर्स राष्ट्रीय मजदूर मध्यवर्ती सहकारी ग्राहक संघ (मर्या.) यांनी सर्वात कमी दर सादर केलेले आहेत. सदर दर व परिमानानुसार खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| Sr.No | Type | STD | Quantity | Rate | Total |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Boys | 1st | 499 | 283.50 | 132678.00 |
| 2 | Boys | 2nd | 443 | 283.50 | 153940.50 |
| 3 | Boys | 3rd | 445 | 294.00 | 172284.00 |
| 4 | Boys | 4th | 496 | 294.00 | 164934.00 |
| 5 | Boys | 5th | 500 | 309.75 | 170052.75 |
| 6 | Boys | 6th | 523 | 320.25 | 198234.75 |
| 7 | Boys | 7th | 532 | 330.75 | 214987.50 |
| 8 | Girls | 1st | 507 | 288.75 | 138022.50 |
| 9 | Girls | 2nd | 497 | 288.75 | 168341.25 |
| 10 | Girls | 3rd | 478 | 299.25 | 181345.50 |
| 11 | Girls | 4th | 509 | 299.25 | 191819.25 |
| 12 | Girls | 5th | 505 | 315.00 | 201600.00 |
| 13 | Girls | 6th | 563 | 325.50 | 201484.50 |
| 14 | Girls | 7th | 606 | 336.00 | 192528.00 |
| Grand Total | | | | | 2173248.00 |

सदर दर वाजवी आहेत तरी वरील परिमान व दराप्रमाणे रेनकोट खरेदीकरीता रू. २१,७३,२४८/— एवढा खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च सन २०१६—१७ च्या आर्थिक अंदाजपत्रकामध्ये 'म.न.पा. शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत छत्र्या व रेनकोट' खरेदीसाठी रू. २५लक्ष तरतूद करण्यात आलेली आहे. त्यापैकी पूर्ण तरतूद शिल्लक आहे. त्यातून करण्याचे प्रस्तावित येत आहे. तरी सदरच्या खर्चास व तसेच सदर रेनकोट खरेदी करणेसाठी न्यूनतम दर सादर करणाऱ्या निविदाकार मेसर्स राष्ट्रीय मजदूर मध्यवर्ती सहकारी ग्राहक संघ (मर्या.) यांच्याशी संविदा

करण्याकरीता मा. स्थायी समितीची मान्यता आवश्यक आहे. करिता सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३ (क) अन्वये मा. स्थायी समितीच्या मंजुरीसाठी सविनय सादर.

स्थायी समिती ठराव क्र.१५ दिनांकः—२/५/२०१६

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार म.न.पा. शाळांतील विद्यार्थ्यांना रेनकोट पुरवठा करणेकामी न्युनत्तम दर सादर करणारे निविदाकार मे. राष्ट्रीय मजदूर मध्यवर्ती सहकारी ग्राहक संघ (मर्या.) यांच्याशी संविदा करणेस मान्यता देत आहे.

तसेच

सदर पुरवठा ३० जुन पर्यंत करणे आवश्यक राहील.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. १६ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १६** :— म.न.पा. शाळांतील विद्यार्थ्यांना गणवेश पुरवठा करणेकामी न्युनत्तम दर सादर करणारे निविदाकार मे. प्रभू लिंकस् यांच्याशी संविदा करणेस मान्यता देणे.

---

सभापती, श्री. सुनिल मुकुंद सुर्वे — शाळांतील विद्यार्थ्यांना गणवेष पुरवठा ३० जूनपर्यंत झाला पाहिजे.

सदस्या, श्रीम. अंजली साळवे — मागे मी शिक्षण विभागाला पत्र दिले होते आणि मागील ५ वर्षाची माहिती मागविली होती, ती अद्यापपर्यंत मिळालेली नाही.

लेखाअधिकारी, श्रीम. निलम कदम — महोदया, माहिती दिली आहे.

**सदस्या, श्रीम. अंजली साळवे –** नाही, माहिती मला मिळालेली नाही, तरी या आठवडयात ती मिळाली पाहिजे.

**महापालिका सचिव :–** सदर विषय पारीत करण्यात यावा का?

**काही सदस्य :–**पास–पास......

**सभापती, श्री. सुनिल मुकुंद सुर्वे –** सदरहु ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता करण्यात यावी.

**सभापती, श्री. सुनिल मुकुंद सुर्वे –** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १६ :–** म.न.पा. शाळांतील विद्यार्थ्यांना गणवेश पुरवठा करणेकामी न्युनत्तम दर सादर करणारे निविदाकार मे. प्रभू लिंकस् यांच्याशी संविदा करणेस मान्यता देणे.

**प्रस्तावना**

_दरवर्षीप्रमाणे यावर्षीदेखिल २०१६–१७ मध्ये म.न.पा. शाळांतील विद्यार्थ्यांना गणवेश पुरवठा करणे आवश्यक असते. त्यानुसार मा. आयुक्त सो. यांच्या दि.०६/०२/२०१६ रोजीच्या मान्यतेने सदर गणवेश खरेदीची निविदा ई–टेंडरींगव्दारे प्रसिध्द करून जाहीर निविदा सुचना दै. परशुराम समाचार (हिंदी व मराठी), दै. नगर न्युज, दै. अमृत कलश या वृत्तपत्रात प्रसिध्दीसह उल्हासनगर महानगरपालिकेच्या वेब साइटवर ई–निविदा सुचना प्रसिध्द करून ई–टेंडरिंग पध्दतीने इंटरनेट व्दारे निविदा मागविण्यात आल्या होत्या.

यामध्ये प्राप्त तीन निविदा समितीचे सदस्य उपआयुक्त (शिक्षण), मुख्य लेखा परिक्षक, मुख्य लेखा अधिकारी, तसेच निविदाधारक व त्यांचे प्रतिनिधी यांचे समोर ई–निविदा संगणक प्रणालीव्दारे उघडण्यात आल्या. प्राप्त तिन निविदाधारकांनी लिफाफा क्र.१ मध्ये आवश्सक कागदपत्रांची पुर्तता केलेली असल्याने त्यांच्या निविदेचा दुसरा लिफाफा उघडण्यास निविदा समितीने मान्यता दिली. तद्नंतर निविदेचा वित्तीय लिफाफा निविदा समिती अध्यक्ष, सदस्य, निविदाधारक व त्यांचे प्रतिनिधी यांच्या समवेत संगणकाव्दारे उघडण्यात आला. पात्र झालेल्या निविदाकारांकडुन सादर केलेल्या सदर गणवेश खरेदीचा दरपत्रकांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| Sr.No | Type | STD | Quantity | M/s Prabhu Links | M/s GSN Associates | M/s R.M.M.S.G.Sangh (Maryadit) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Boys | PP | 413 | 414.75 | 425.25 | 495.00 |
| 2 | Boys | 1st | 499 | 456.75 | 467.25 | 495.00 |
| 3 | Boys | 2nd | 443 | 472.50 | 480.90 | 495.00 |
| 4 | Boys | 3rd | 445 | 483.00 | 491.40 | 495.00 |
| 5 | Boys | 4th | 496 | 630.00 | 640.50 | 725.00 |
| 6 | Boys | 5th | 500 | 656.25 | 666.75 | 725.00 |
| 7 | Boys | 6th | 523 | 672.00 | 680.40 | 725.00 |
| 8 | Boys | 7th | 532 | 693.00 | 701.40 | 725.00 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 9 | Girls | PP | 412 | 417.90 | 422.10 | 510.00 |
| 10 | Girls | 1st | 507 | 472.50 | 477.75 | 510.00 |
| 11 | Girls | 2nd | 497 | 488.25 | 491.40 | 510.00 |
| 12 | Girls | 3rd | 478 | 504.00 | 508.20 | 510.00 |
| 13 | Girls | 4th | 509 | 798.00 | 803.25 | 835.00 |
| 14 | Girls | 5th | 505 | 807.45 | 823.20 | 835.00 |
| 15 | Girls | 6th | 563 | 819.00 | 827.40 | 835.00 |
| 16 | Girls | 7th | 606 | 829.50 | 831.60 | 835.00 |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्यानुसार मेसर्स प्रभू लिंकस् यांनी सर्वात कमी दर सादर केलेले आहेत. सदर दर व परिमानानुसार खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| Sr.No | Type | STD | Quantity | Rate | Total |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Boys | PP | 826 | 414.75 | 342583.50 |
| 2 | Boys | 1st | 998 | 456.75 | 455836.50 |
| 3 | Boys | 2nd | 886 | 472.50 | 418635.00 |
| 4 | Boys | 3rd | 890 | 483.00 | 429870.00 |
| 5 | Boys | 4th | 992 | 630.00 | 624960.00 |
| 6 | Boys | 5th | 1000 | 656.25 | 656250.00 |
| 7 | Boys | 6th | 1046 | 672.00 | 702912.00 |
| 8 | Boys | 7th | 1064 | 693.00 | 737352.00 |
| 9 | Girls | PP | 824 | 417.90 | 344349.60 |
| 10 | Girls | 1st | 1014 | 472.50 | 479115.00 |
| 11 | Girls | 2nd | 994 | 488.25 | 485320.50 |
| 12 | Girls | 3rd | 956 | 504.00 | 481824.00 |
| 13 | Girls | 4th | 1018 | 798.00 | 812364.00 |
| 14 | Girls | 5th | 1010 | 807.45 | 815524.50 |
| 15 | Girls | 6th | 1126 | 819.00 | 922194.00 |
| 16 | Girls | 7th | 1212 | 829.50 | 1005354.00 |
| Grand Total | | | | | 9714445.00 |

सदर दर वाजवी आहेत तरी वरील परिमान व दराप्रमाणे गणवेश खरेदीकरीता रू. ९७,१४,४४५/— एवढा खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च सन २०१६—१७ च्या आर्थिक अंदाजपत्रकामध्ये गणवेश खरेदीसाठी रू.१कोटी तरतूद करण्यात आलेली आहे. त्यापैकी पूर्ण तरतूद शिल्लक आहे. त्यातून करण्याचे प्रस्तावित येत आहे. तरी सदरच्या खर्चास व तसेच सदर गणवेश खरेदी करणेसाठी न्यूनतम दर सादर करणाऱ्या निविदाकार मे. प्रभू लिंकस् यांच्याशी संविदा करण्याकरीता मा. स्थायी समितीची मान्यता आवश्यक आहे. करिता सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र

महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३ (क) अन्वये मा. स्थायी समितीच्या मंजुरीसाठी सविनय सादर.

स्थायी समिती ठराव क्र. १६ दिनांकः—२/५/२०१६

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार म.न.पा. शाळांतील विद्यार्थ्यांना गणवेश पुरवठा करणेकामी न्युनत्तम दर सादर करणारे निविदाकार मे. प्रभू लिंकस् यांच्याशी संविदा करणेस मान्यता देत आहे.

तसेच

सदर पुरवठा ३० जुन पर्यंत करणे आवश्यक राहील.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. १७ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. १७ :— उल्हासनगर महानगरपालिकेतील विद्युत विभागाच्या कामाची माहिती स्थायी समितीस देणेकरीता.

---

सभापती, श्री. सुनिल मुकुंद सुर्वे — विदयुत विभागाची कामे करण्यापुर्वी स्थायी समितीची मंजूरी घेतलेली नाही. आधीच कामे करता आणि नंतर स्थायी समितीपुढे विषय आणत आहात. माझ्या प्रभागात काही ठिकाणी दिवाबत्तीची कामे करावयाची आहेत.

सदस्या, श्रीम. अंजली साळवे — आमच्या विभागातील राजीव गांधी उद्यान येथे दिवाबत्ती व्यवस्था नाही.

सभापती, श्री. सुनिल मुकुंद सुर्वे — माझ्या प्रभागातील जिजाबाई माता उद्यानामध्येसुध्दा दिवाबत्ती बंद आहे.

महापालिका सचिव :— सदर विषय पारीत करण्यात यावा का?

काही सदस्य :—पास—पास......

<u>सभापती, श्री. सुनिल मुकुंद सुर्वे –</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १७ :–** उल्हासनगर महानगरपालिकेतील विद्युत विभागाच्या कामाची माहिती स्थायी समितीस देणेकरीता.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिका विद्युत विभागाचे कामास दिलेल्या मंजुरीची माहिती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) नुसार पुढील प्रमाणे देण्यात येत आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | मंजुर रक्कम | कराराचा दिनांक | एजन्सीचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | महापालिका मुख्यालयाच्या मागे अग्निशमन विभागाजवळचे रोहित्र हलविणेबाबत | १३,४१,०१५/– | १५/०१/२०१६ | मे. जे. एम. इलेक्ट्रिकल्स वर्क्स. |
| २ | उल्हासनगर महानगरपालिका विद्युत अभियांत्रिकी विभागा अंतर्गत उप विभागीय कार्यालय १ मध्ये येणारे कॅम्प नं. १,२ आणि ३ येथे दिवाबत्ती पोल यांना रंगरंगोटी करणेबाबत. | १५,९४,४००/– | २८/०३/२०१६ | मे. जकनुश म. का.स.सं. लि. |
| ३ | उल्हासनगर महानगरपालिका विद्युत अभियांत्रिकी विभागा अंतर्गत उप विभागीय कार्यालय २ मध्ये येणारे कॅम्प नं. ४ आणि ५ येथे दिवाबत्ती पोल यांना रंगरंगोटी करणेबाबत. | १४,३०,३००/– | २८/०३/२०१६ | मे. गावदेवी म. का.स.सं.लि. |

तरी सदरची माहिती स्थायी समिती अवलोकनार्थ प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र.१७</u> <u>दिनांकः–२/५/२०१६</u>

सुचकाचे नाव :– श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार विद्युत विभागाने केलेल्या ३ विविध कामांची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. १८ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. १८ :–** घरगुती व बिगर घरगुती धारकांकडे थकीत असलेल्या पाणीपटटी वरील विलंब शुल्क व व्याज माफ करण्यासाठी सदर रक्कमा निर्लेखित करून अभय योजना लागू करण्याबाबत.

---

<u>सभापती, श्री. सुनिल मुकुंद सुर्वे –</u> अभय योजना राबवायची म्हटले तर थकबाकीदारांकडे आधी पाण्याची देयके पोहचली पाहिजेत. तरच ते देयक भरतील, सदर देयके त्यांचेपर्यंत विहीत मुदतीत पोहचविण्याची जबाबदारी आपल्यावर राहिल. दिनांक १० मेपर्यंत पाण्याची देयके संबंधितांना पोहचली पाहिजेत.

<u>अधिक्षक, श्री. नितेश रंगारी :–</u>अभय योजना दिनांक ९ ते २७ तारखेपर्यंत आहे. त्याप्रमाणे स्थानिक वर्तमानपत्रात, केबलद्वारे तसेच जाहिरात फलकाद्वारे प्रसिध्दी देण्यात आलेली आहे.

<u>सभापती, श्री. सुनिल मुकुंद सुर्वे –</u> अभय योजना दिनांक ३१ मे पर्यंत वाढवा.

<u>मुख्य लेखा अधिकारी, श्री. दादासाहेब पाटील:–</u> दिनांक ३१ मे पर्यंत म्हटले तर आम्हाला अडचण येते.

<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>तुम्हाला काय अडचण आहे.

<u>मुख्य लेखा अधिकारी, श्री. दादासाहेब पाटील:–</u> कर विभागाची आणि पाणीपुरवठा विभागाची अशी दोन्ही विभागांसाठी अंतिम तारीख दिनांक ३१ मे केली तर प्रचंड ताण येतो, शेवटच्या दिवशी, तर पाणीपुरवठयाच्या अभय योजनेची अंतिम तारीख दिनांक २७ मे ठेवु, आणि गरज वाटली तर वाढवू शकतो ना.

<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>पाण्याची देयके अभय योजना लागु करण्याच्या दिनाकांपर्यंत संबंधितांच्या घरापर्यंत पोहचवा, तशी पोहोच ठेवा, संबंधितांच्या स्वाक्षरी घ्या, तसेच त्यांचा मोबाईल नंबरसुध्दा घ्या.

<u>अधिक्षक, श्री. नितेश रंगारी :–</u>हो, पाण्याची देयके पोहचतील.

<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>पुढील स्थायी समितीच्या बैठकीमध्ये किती पाणीपटटीधारकांना देयके पोहचली त्याची माहिती मिळाली पाहिजे.

<u>मुख्य लेखा अधिकारी, श्री. दादासाहेब पाटील:–</u> ४ दिवसांत देयके वाटप होतील कारण ३००० ते ३२०० इतकीच पाणीपटटी धारक आहेत.

<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>जर पाणीपटटी धारकांना वेळेवर देयके पोहचली नाहीत तर त्यांना अभययोजनेचा लाभ वर्षभर कधीही मिळाला पाहिजे. तसेच पाणीपट्टी वरील व्याज व विलंब शुल्क निर्लेखित करुन अभय योजना लागू करणार ना.

**अति. आयुक्त, श्री. श्रीधर पाटणकर, आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :—** पाणीपट्टी वरील व्याज व विलंब शुल्क निर्लेखित करण्याचे अधिकार मा. आयुक्तांकडे राहतील.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—**नाही, जसा प्रस्ताव आहे तसा ठराव करा.

**महापालिका सचिव :—** सदर विषय पारीत करण्यात यावा का?

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्री. सुनिल मुकुंद सुर्वे —** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १८ :—** घरगुती व बिगर घरगुती धारकांकडे थकीत असलेल्या पाणीपटटी वरील विलंब शुल्क व व्याज माफ करण्यासाठी माफ करण्यासाठी सदर रक्कमा निर्लेखित करून अभय योजना लागू करण्याबाबत.

**प्रस्तावना**

उल्हासनगर शहराची पाणी पुरवठा योजना दैनदिन देखभाल व दुरूस्तीसाठी महाराष्ट् जीवन प्रधिकरानाने उल्हासनगर महानगर पालिकेकडे दिनांक १९/१२/१९९४ रोजी हस्तातरीत केली आहे. दिनांक २०/१२/१९८४ पूर्वी पाणी पटटी वसुली मिटर पध्दतीने महाराष्ट् जीवन प्रधिकराना मार्फत करण्यात येत होती. त्यानंतर दिनांक २०/१२/१९९४ ते मार्च २००० पर्यत महानगर पालिकेकडून मिटर पध्दतीने बिल बजावून वसुली करण्यात येत होती.

सदयस्थितीत उल्हासनगर महानगर पालिका क्षेत्रात अस्तित्वात असलेल्या अदांजित ३०१५ बिगर घरगुती नळ जोडणी धारंकानवर स्वंतत्ररित्या पाणी पुरवठा विभागा मार्फत मिटर पदध्तीने बिले बजावून वसुली करण्यात येते. आजमितीस अंदाजित पाणी पटटी रक्कम रू.१३३ करोड थकबाकी असून त्यावर १८ टक्के दराने विलंब शुल्क आकारण्यात येत आहे.

उदा . मार्च २००० रोजी एखादया नळ जोडणी धारंकाकडे रक्कम रू.१०००/— थकबाकी असेल तर सदर थकीत रक्कमेवर आजमितीस १० टक्के दराने विलंब शुल्क रक्कम रू. १३२५/— इतका आकारण्यात येतो. म्हणजे संबधित नळजोडणी धारकांस रक्कम रू. २३२५/—इतकी रक्कम भरणा करणे आवश्यक आहे.

विलंब शुल्कांची रक्कम मुळ थकीत रक्कमे पेक्षा जास्त असल्यामुळे बहुतास नळ जोडणी धारंकांचा पाणी पटटी थकीत रक्कम न भरण्याकडे कल आहे. त्यामुळे पाणी पटटीच्या थकबाकी मध्ये सतत वाढ होत आहे.

त्या अंनुषगांने उल्हासनगर महानगर पालिके मार्फत वेळोवेळी महासभेच्या मंजुरीने घरगुती व बिगरघरगुती पाणी देयकांची थकबाकी असलेल्या ग्राहकांना विलंब शुल्क माफ करण्यासाठी निर्भय योजना राबविलेली आहे. महासभा ठराव क्रमांक ६१ दिंनाक ०६/०३/२०१३ नुसार सदर योजनेस मुदत वाढ देण्यात आली. व ही योजना ३१/०३/२०१५ रोजी बंद करण्यात आली.

सदर योजनेस नांगरिकांन कडून चांगला प्रतिसाद प्राप्त झाला आहे.काही नळजोडणी धांरकांना काही कारणास्तव योजनेचा लाभ घेता आली नाही. आशा नळजोडणी धांरकांचे विलंब शुल्क माफ केल्यास पाणी पटटी थकबाकी अदा करण्याची त्यांची ईच्छा आहे.

अशा परिस्थित संपूर्ण थकीत पाणी पटटी रक्कम एक रक्कमी भरणा करणा—या नळजोडणी धांरकांस १०० टक्के विलंब शुल्क व व्याज माफ केल्यास पाणी पटटी थकबाकी रक्कमावसूल होण्यास मदत होईल. या कामी अभय योजना राबविणे प्रस्तावित आहे. त्याचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

१. योजनेचा कालावधी
 दिनांक ०९/में/२०१६ ते २७/में/२०१६ असा राहील.
२. योजनेची व्याप्ती

अ.सदर योजने अंतर्गत घरगुती व बिगर घरगुती पाणी पटटी थकबाकी असलेल्या नळ धारंकांना लाभ घेता येईल.
ब. योजनेच्या कालावधीत नळ जोडणी धारंकांन कडे पाणी पटटी थकीत असलेल्या मुळ रक्कमेचे एक रक्कमी संपूर्ण भरणा केल्यास थकीत रक्कमेवर १८ टक्के दराने आकारण्यात येणारे दिनांक ३१/मार्च/२०१६ पर्यतचे विलंब शुल्क व व्याज १०० टक्के माफ करण्यात येईल
३.योजने अंतर्गत स्वलतीस पात्र असलेल्या रक्कमा

सदर योजना हि वर नमुद केलेल्या कालावधीत जमा केलेल्या रक्कमानांच लागू राहील या योजनेच्या प्रारंभापूवी अथवा संमाप्ती नंतर भरणा केलेल्या रक्कमांना लागू राहणार नाही.योजना सुरू होण्यापूर्वी भरणा केलेल्या कोणत्याही रक्कमेच्या परताव्यासाठी या योजने अंतर्गत दावा करता येणार नाही.

४.योजनेच्या संवलतीचा लाभ घेण्यासाठी करावयाचा भरणा व अपील मागे घेणे इत्यादी साठी लागू असलेल्या अटी व शर्ती

अ.ज्या कालावधी साठी लाभ घेवायाचा आहे त्या कालावधीत प्रंलबित असलेल्या अपील पूर्ण निरिक्षणासाठी आलेले आंवेदन व संदर्भ आवेदन व विविध स्तरावरील न्यायालयात दाखल केलेला दावा किंवा रिट याचिका प्रलबित असल्यास ते विना अट मागे घेतले पाहीजे.

ब.जर अभय योजनेचा लाभ मिळाल्या नंतर अपील पूर्ण निरिक्षणासाठी आलेले आंवेदन व संदर्भ आवेदन व विविध स्तरावरील न्यायालयात दाखल केलेला दावा किंवा रिट याचिका दाखल केली तर योजने अंतर्गत संबधित कालावधीसाठी दिलेल्या संवलती काढून घेण्यात येईल.

५. अधिकार प्रदान करणे.

योजनेच्या कालावधीत थकीत पाणी पटटी वरील विलंब शुल्क व व्याज माफ करण्याचे अधिकार कार्यकारी अभियता पा.पु.वि. यांना राहतील. सदर कालावधी नंतर हे अधिकार संपूष्टात येतील.ग्राहकांन कडून या योजने अंतर्गत अर्ज प्राप्त झाल्यानंतर दिनांक ३१/०३/२०१६ पर्यत विलंब शुल्क व व्याज माफीच्या टाळेबंद तयार करून प्रस्ताव मुख्य लेखा परिक्षक व मुख्य लेखाधिकारी यांची मंजुरी नंतरच पुढील कार्यवाही करण्यात येईल

६. योजने अंतर्गत कार्यवाही विषयक बाबी.

अ.पाणी पुरवठा विभागाने निर्भय योजना राबविण्यासाठी संर्व सबधितांनी थकीत पाणी पटटीवरील विलंब शुल्क व व्याज माफ केल्याची नोंद नळ जोडणी धांकाने संपूर्ण थकीत रक्कम एकरक्कमी भरणा केल्यानंतर घ्यावी

ब.प्रोग्रामर महिति तंत्रज्ञान विभाग यांनी निर्भय योजना राबविण्यासाठी संगणम प्रणालीत योग्य ती सुधारणा /बददल तात्काळ करावेत.त्या अंनुषंगाने पाणी पटटी रक्कम भरणा करण्यासाठी उपलब्ध असलेल्या सर्व ठिकाणी उदा. नागरिक सुविधा केंद्र व क्युओक्स सेटर इतर ठिकाणी योग्य ती व्यवस्था करावी.

७. योजनेची जाहिरात व प्रसिध्दी

निर्भया योजना राबविण्यासाठी नांगरिकांचा मोठया प्रमाणात प्रतिसाद मिळावा.यासाठी सदर योजनेचा तपशिल बाबत केबल, वृत्तपत्र, इलेट्निक्स प्रसार माध्यामे मनपा संकेत स्थळ इत्यादी व्दारे व्यापक प्रसिध्दी देणे

उक्त बाबी विचारांत घेता शास्ती माफ करण्या संदर्भात पूढील प्रमाणे प्रस्ताव मंजुरी करीता सादर करण्यात येत आहे.

१. महासभा व शासन मंजुरीच्या आधिन राहून संपूर्ण थकीत पाणी पटटी रक्कम एक रक्कमी भरणा करणा—या नळजोडणी धारंकांस दिनांक ३१/०३/२०१६ पर्यतचे १०० टक्के विलंब शुल्क व व्याज माफ करणे.
२. प्रस्तावास मा. आयुक्तांची मंजुरी मिळाल्यानंतर संगणक प्रणालीत आवश्यक ती सुधारणा/बद्दल करणे त्या अंनुषागाने पाणी पटटी थकीत रक्कम भरणा करण्यासाठी उपलब्ध असलेल्या सर्व ठिकाणी नागरिक सुविधा केंद्र क्युओक्स सेंटर योग्य ती व्यवस्था प्रागोमर माहिती तत्रज्ञान विभाग यांनी करावी.
३. सदर योजने अंतर्गत करदात्यानां सुचित करणे आवश्यक असल्याने त्यांची केबल वृतपत्र इलेक्ट्निक्स प्रसार माध्यमे व मनपा संकेत स्थळ इत्यादी व्दारे व्यापक प्रसिध्दी देणे.
४. सदया महानगरपालिकेची अर्थिकस्थिती बेताची झालेली असून सर्व विभागाच्या देयाकाच्या रू.९० कोटी रक्कमेच्या आसपास रक्कमा देणे प्रलंबित आहे. नविन कामासाठी आवश्यक निधी जमा होणे गरजेचे आहे दृ खेमाणी नाल्यासाठी रू.३२ कोटी एवढया रक्कमेची आवश्यकता आहे.तसेच शहरामध्ये भुयारी गटार योजना साठी रू. २२३ कोटी रक्कमेस राज्य शासन व केद्रं शासनाने तत्वत: मान्यता दिलेली आहे. सुधारीत पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेसाठी रू. ४० कोटी रक्कमेचा प्रस्ताव सादर केलेला आहे. दैनदिन कामाकाजासाठी दर माहिन्यात येणा—या उत्पन्न मधून रू.३ कोटी रक्कम कमी जमा होत आहे. थकीत पाणी पटटीसाठी अभय योजना लावल्यास ब—या पैकी रक्कम महापालिकेस जमा होवू शकते.

महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९४९ प्रकरण ११ नगरपालिका कराधान नियम १३० पाणी पटटी कुठल्या जागेवर बसवावी तसेच प्रकरण ८ कराधान नियम क्रमांक ९ क अन्वये पाणी पाणी व दंडाची तरतुद आहे. वरील नियमानुसार लावलेले कर नियम क्रमांक ५१ नुसार शास्ती व वसुलीचा खर्च माफ करता येईल तसेच मा. महासभेने पाणी पुरवठा वसुलीसाठी महासभेमध्ये ठराव क्रमांक ७६ दिनांक १९/०३/२०१६ केलेला आहे.

वरील बाबीचा विचार करता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १५२ अन्वये पाणीपट्टी वरील व्याज व विलंब शुल्क निर्लेखित करुन अभय योजना दिनांक ०९/मे/२०१६ ते २७/मे/२०१६ या कालावधी साठी लागू करण्यासाठीचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या मान्यतेसाठी सादर.

<u>स्थायी समिती ठराव क्र. </u>१८ <u>दिनांक:— २/५/२०१६</u>

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. विजय पाटील

ही स्थायी समिति वरील प्रस्तावनेनुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १५२ अन्वये घरगुती व बिगर घरगुती धारकांकडे थकीत असलेल्या पाणीपट्टी वरील व्याज व विलंब शुल्क भरणेसाठी त्यांना दिनांक ९ मे २०१६ ते २७ मे २०१६ पर्यंत बिलामध्ये सवलत लागु राहील.

तसेच

१. सदर बिल वेळेवर देऊन त्याची पोहोच घेणे आवश्यक असेल.

२. सदर बिल वेळेवर संबंधितास न मिळाल्यास वर्षभरात प्राप्त झाल्यानंतर त्यांना ती सवलत लागू राहील.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. १९ वाचुन दाखवितात.

---

विषय क्र. १९ :— अभय योजना 2015—2016 अंतर्गत केलेल्या कार्यवाहीच्या अहवालास मंजुरी मिळणेबाबत.

---

उप—आयुक्त, श्री. जमीर लेंगरेकर :—मागील वर्षीसाठी राबविण्यात आलेल्या अभय योजना 2015—2016 अंतर्गत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्यात आला आहे.

सदस्या, डॉ. श्रीम. निना नाथानी :—पाणीपटटीधारकांना अभय योजना लागू करत आहात, पाण्याची देयके दयायाला जाताना ब—याच अडचणी येतील. त्यामध्ये कसे काय करणार.

महापालिका सचिव :— सदर विषय पारीत करण्यात यावा का?

काही सदस्य :—पास—पास......

सभापती, श्री. सुनिल मुकुंद सुर्वे — सदर योजना दिनांक ३१ मे पर्यंत लागू करावी. तसेच सदरहु ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता करण्यात यावी.

सभापती, श्री. सुनिल मुकुंद सुर्वे — सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑

**विषय क्र. १९** :— अभय योजना 2015—2016 अंतर्गत केलेल्या कार्यवाहीच्या अहवालास मंजुरी मिळणेबाबत

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिका हद्दीत अस्तित्वात असलेल्या अंदाजित 1,70,000 मिळकतींवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 127 (1) (अ), कलम 129 तसेच अधिनियमाचे अनुसूची ड चे प्रकरण 8 (कराधान नियम) मधील तरतुदीनुसार ''मालमत्ता कर'' आकारणी व वसुली करण्यात येते. शिवाय वर्ष 2001—2002 पासुन फक्त निवासी वापर होत असलेल्या मिळकतींवर ''पाणीपट्टी'' आकारणी मालमत्ता कर बिलात करण्यात येत आहे.

प्रतिवर्षाप्रमाणे अधिनियमातील तरतुदीनुसार मालमत्ता कराची बिले तयार करून त्याचे वितरण करण्यात येते. वर्ष 2015—2016 अखेर मालमत्ता कराची अंदाजित मागणी रक्कम रू 320 कोटी (चालु मागणीसह) थकीत आहे. त्यापैंकी माहे डिसेंबर 2015 अखेर रक्कम रू 36 कोटी (चालु मागणीसह) वसुली झाली आहे. याशिवाय वसुलीसाठी अधिनियमातील तरतुदीनुसार वेळोवेळी सक्तीची उपाययोजना (उदा. शास्ती लागु करणे, अधिपत्र (वॉरंट) बजावणे, मिळकतीची जप्ती/अटकावणी करून विक्रीद्वारे वसुली करणे इ.) करण्यात येत आहे. मात्र तरीही बहुतांश मिळकतींच्या कर आकारणी असलेला वाद तसेच आर्थिक अडचणींमुळे करदात्यांचा कराचा भरणा न करण्याकडे कल आहे. त्यामुळे कराच्या थकबाकीमध्ये वाढ होत आहे.

वर्ष 2010 पासुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसूची ड मधील प्रकरण 8 (कराधान नियम) मधील नियम 41 व महासभा ठराव क्र. 48 दिनांक 17/09/2011 नुसार बिलाच्या न दिलेल्या रक्कमेवर प्रतिमाह 2 टक्के इतकी शास्ती, थकबाकी व चालु मागणीवर लागु करण्यात येत आहे. मालमत्ता कराच्या मागणीमध्ये शास्तीचा समावेष असल्याने थकबाकीचे प्रमाण वाढत आहे. तसेच शास्ती लागु केल्यामुळे नागरिक व लोकप्रतिनिधी यांचेमध्ये ही रोष निर्माण झालेला असुन यामुळे कर वसुलीस अपेक्षित प्रतिसाद प्राप्त होत नाही. नागरिक तसेच लोकप्रतिनिधी यांचेमार्फत वारंवार शास्तीची रक्कम माफ करणेबाबत मौखिक तक्रारी/लेखी निवेदन विभागात प्राप्त होत आहेत. त्याचा तपषिल खालीलप्रमाणे आहे.

1) श्री. भुल्लर राजेंद्रसिंह वी. (महाराज), नगरसेवक, उ.म.पा यांचेकडील दिनांक 11/01/2016 रोजीचे पत्र

2) श्री. कुमार आयलानी, माजी आमदार व जिल्हा अध्यक्ष, भारतीय जनता पार्टी यांचेकडील दिनांक 21/01/2016 रोजीचे पत्र.

3) श्रीम. ज्योती सुरेश (पप्पु) कालानी, आमदार, उल्हासनगर विधानसभा यांचेकडील दिनांक 25/01/2016 रोजीचे पत्र.

4) मा. अतिरिक्त आयुक्त, उ.म.पा यांचेकडील पत्र क्र. उमपा/आ.का/वि.स.स/42/2016, दिनांक 27/01/2016

मालमत्ता कराच्या मागणीपैंकी माहे डिसेंबर 2015 अखेर रक्कम रू. 36 कोटी (चालु मागणीसह) इतकी वसुली झाली असुन जास्तीत जास्त वसुलीच्या अनुषंगाने ठोस उपाययोजना करणे आवश्यक आहे. कर विभागात अपुरा कर्मचारी वर्ग, निवडणूक कामकाज, राष्ट्रीय लोकसंख्या रजिस्टर (जनगणना) अद्यायावत करणे, मनपाचे इतर विभागाचे अन्य कामकाजाचा प्रभार जसे पाणीपुरवठा, अनधिकृत नळजोडणी शोधणे, इत्यादी कामांमुळे कर वसुली प्रभावित झाली. शिवाय आर्थिक मंदीसदृश्य वातावरण, अपुरा पाऊस त्यामुळे पाणी पुरवठा समस्या यामुळेही कर भरणा प्रभावित झाला आहे. अशा योजनेचा एक भाग म्हणुन शास्ती लावलेली रक्कम माफ केल्यास मालमत्ता कराच्या रक्कमा एकरक्कमी वसुली होण्यास मदत होणार आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसूची ड मधील प्रकरण 8 (कराधान नियम) मधील नियम 51, आयुक्तास, आपल्या स्वेच्छानिर्णयानुसार, नियम 41 खालील शास्ती, किंवा नियम 50 खालील फी किंवा वसुलीचा खर्च पुर्णतः किंवा अंशतः माफ करता येईल.

स्थायी समिती ठराव क्र. 91, दिनांक 27/01/2016 नुसार दिनांक 1 फेब्रुवारी 2016 ते 28 फेब्रुवारी 2016 या कालावधीत पुनः अभय योजना राबविणेसाठी प्रशासनास निर्देश दिलेले आहेत.

सदर नियमाअंतर्गत मा. आयुक्तांचे स्वेच्छानिर्णयानुसार माहे मार्च 2015 पर्यत थकबाकीवरील शास्तीची रक्कम (अंदाजित रक्कम रू. 84 कोटी) तसेच दिनांक 1 एप्रिल 2015 ते 31 डिसेंबर 2015 पर्यंत चालु मागणीवरील शास्तीची रक्कम (अंदाजित रक्कम रू. 22 कोटी) वगळता उर्वरीत संपुर्ण मालमत्ता कराची रक्कम एकरकमी भरणा करणाऱ्या करदात्यास अशी माफी दिल्यास मालमत्ता कराच्या रक्कमा वसुल होण्यास मदत होईल.

त्याअनुषंगाने उक्त नियमाअंतर्गत मा. आयुक्तांचे स्वेच्छानिर्णयानुसार दिनांक 10 फेब्रुवारी 2016 ते दिनांक 31 मार्च 2016 या कालावधीत खालीलप्रमाणे तीन टप्प्यामध्ये **''अभय योजना 2015—2016''** राबविण्यात आली आहे.

## अ) <u>योजनेचा तपशील</u>

**1) योजनेचा कालावधी** :—

दिनांक 10 फेब्रुवारी, 2016 ते दिनांक 31 मार्च, 2016 या कालावधीत तीन टप्प्यामध्ये असेल.

**2) योजनेची व्याप्तीः—**

अ) सदर योजनेअंतर्गत मालमत्ता कर व पाणीपट्टी थकबाकी असलेल्या करदात्यांना लाभ घेता येईल.

ब) योजनेच्या कालावधीत करदात्याकडे प्रलंबित असलेल्या मुळ रक्कमेचे खालीलप्रमाणे भरणा केल्यास प्रलंबित रक्कमेवर नियम 41 नुसार प्रतिमाह 2 टक्के दराने आकारण्यात येणारी शास्ती व नियम 50 खालील जप्ती अधिपत्र बजावणी शुल्क किंवा वसुलीचा खर्च माफ करण्यात येईल.

| टप्पा क्र | **कालावधी** | **मागणीचा तपशील** | **शास्ती माफ** |
|---|---|---|---|
| 1 | दिनांक 10/02/2016 ते दिनांक 29/02/2016 | थकबाकीसह चालु कराची संपुर्ण रक्कम एकरक्कमी भरणा केल्यास | थकीत शास्ती 100 टक्के माफ (थकबाकीसह चालु रक्कमेंवर आकारण्यात आलेली शास्तीची रक्कम) |
| 2 | दिनांक 01/03/2016 ते दिनांक 15/03/2016 | थकबाकीसह चालु कराची संपुर्ण रक्कम व अधिक 25 टक्के शास्तीची रक्कम एकरक्कमी भरणा केल्यास | थकीत शास्ती 75 टक्के माफ (थकबाकीसह चालु रक्कमेंवर आकारण्यात आलेली शास्तीची रक्कम) |
| 3 | दिनांक 16/03/2016 ते दिनांक 31/03/2016 | थकबाकीसह चालु कराची संपुर्ण रक्कम व अधिक 50 टक्के शास्तीची रक्कम एकरक्कमी भरणा केल्यास | थकीत शास्ती 50 टक्के माफ (थकबाकीसह चालु रक्कमेंवर आकारण्यात आलेली शास्तीची रक्कम) |

**3) योजनेचा लाभ खालील बाबीसाठी अनुज्ञेय असेलः—**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसूची ड मधील प्रकरण 8 (कराधान नियम) मधील नियम 41 खालील शास्ती, किंवा नियम 50 खालील फी किंवा वसुलीचा खर्च पुर्णतः किंवा अंशता माफ करता येईल.

**4) योजनेअंतर्गत सवलतीस पात्र असलेल्या रक्कमाः—**

सदर योजना ही वर नमुद केलेल्या कालावधीत जमा केलेल्या रक्कमांनाच लागु राहील. या योजनेच्या प्रारंभापुर्वी अथवा समाप्तीनंतर भरणा केलेल्या कोणत्याही रक्कमांना लागू राहणार नाही. योजना सुरू होण्यापुर्वी भरणा केलेल्या कोणत्याही रक्कमांच्या परताव्यासाठी या योजने अंतर्गत दावा करता येणार नाही.

**5) योजनेच्या सवलतीचा लाभ घेण्यासाठी करावयाचा भरणा आणि अपील मागे घेणे इत्यादीसाठी लागु असलेल्या अटी व शर्ती :—**

अ) ज्या कालावधीसाठी सवलतीचा लाभ घ्यावयाचा आहे, त्या कालावधीत कोणतेही प्रलंबित असलेले अपील, पुर्ननिरीक्षणासाठी आलेले आवेदन, संदर्भ आवेदन, विविध स्तरावरील न्यायालयात दाखल केलेला दावा किंवा रिट याचिका प्रलंबित असल्यास ते विना अट मागे घेतले पाहीजे.

ब) जर अभय योजनेचा लाभ मिळाल्यानंतर अपील, पुर्ननिरीक्षणासाठी आवेदन, संदर्भ आवेदन, विविध स्तरावरील न्यायालयात दाखल केलेला दावा किंवा रिट याचिका दाखल केली, तर योजने अंतर्गत संबंधित कालावधीसाठी दिलेल्या सवलती काढुन घेण्यात येतील.

**6) आयुक्तांचे अधिकार प्रदान करणेः—**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 69, कलम128 तसेच अधिनियमाचे अनुसूची ड मधील प्रकरण 8 (कराधान नियम) मधील नियम 51 नुसार आयुक्तास असलेले अधिकार दिनांक 10 फेब्रुवारी, 2016 ते दिनांक 31 मार्च, 2016 या कालावधीत उप आयुक्त (कर) व कार्यकारी अभियंता (पा.पु.वि) यांना प्रदान करण्यात येत आहेत. सदर कालावधी नंतर सदरचे अधिकार संपुष्टात येतील.

**7) <u>योजने अंतर्गत कार्यवाही विषयक बाबीः—</u>**

अ) मालमत्ता कर व पाणी पुरवठा विभागाने ''अभय योजना 2015–2016'' राबविण्यासाठी मागणी पुस्तकात सदर रक्कमा माफ केल्याची नोंद करदात्याने कराची संपुर्ण रक्कम अधिदान केल्यानंतर घ्यावी.

ब) प्रोग्रामर, माहिती तंत्रज्ञान विभाग यांनी ''अभय योजना 2015–2016'' राबविण्यासाठी संगणकप्रणालीत योग्य ती सुधारणा/बदल तात्काळ करावे. त्याअनुषंगाने मालमत्ता कराची रक्कम भरणा करणेसाठी उपलब्ध असलेल्या सर्व ठिकाणी (नागरिक सुविधा केंद्र, किऑक्स सेंटर) करदाता ज्या क्षणास कराचा भरणा करेल त्या क्षणास (Real Time) नियम 41 खालील शास्ती व नियम 50 खालील फी किंवा वसुलीचा खर्च माफ करणेबाबत बदल करावेत. व तसे प्रमाणपत्र /दाखला करदात्यास देण्यात यावा.

**8) योजनेची जाहीरात व प्रसिध्दी :–**

''अभय योजना 2015–2016'' राबविण्यासाठी नागरिकांचा मोठया प्रमाणात प्रतिसाद मिळावा यासाठी सदर योजनेचा तपशिलाबाबत केबल, वृत्तपत्र, इलेक्ट्रॉनिक्स प्रसार माध्यमे, मनपा संकेतस्थळ इत्यादीद्वारे व्यापक प्रसिध्दी सर्व संबंधित विभागामार्फत देण्यात यावी.

**ब) जनसपंर्कासाठी उपाययोजना**

1) सर्वप्रथम अभय योजनेच्या अनुषंगाने आवश्यक त्या सुधारणा संगणकप्रणालीत करण्यात आल्या.

2) योजनेचा लाभ घेणेसाठी नागरीकांना प्रवृत्त करणेबाबत शहरात मनपाचे वाहनाद्वारे ध्वनीक्षेपकामार्फत **जाहीर आवाहन (Announcement)** करण्यात आले. याकामी मनपाचे एकच वाहन असल्यामुळे उर्वरीत कॅम्प करीता 4 ऑटोरिक्षाद्वारे ध्वनीक्षेपकामार्फत जाहीर आवाहन करण्यात आले आहे. याकामी रक्कम रू. 90000./– इतका खर्च झाला आहे.

3) स्थानिक वृत्तपत्राद्वारे हॅण्डबिल (रंगीत छपाई पेपरवर) वाटप करण्यात आले. तसेच बॅनर्स छपाई करून विविध माध्यमाद्वारे प्रसिध्दी करण्यात आले त्याकरिता रू. 1,96,000/– इतका खर्च झाला आहे.

4) योजनेची माहिती देणेसंदर्भातील शहरात विविध भागात **होर्डीग्ज** लावण्यात आले आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र | ठिकाण |
|---|---|
| 1 | उल्हासनगर महानगरपालिका मुख्यालय, दोन प्रवेशद्वारास. |
| 2 | श्रीराम चौक, उल्हासनगर –4. |
| 3 | चोपडा कोर्ट जवळ, उल्हासनगर – 1. |
| 4 | भगवंती नावानी स्टेज, गोल मैदान, प्रभाग समिती क्र.1. |
| 5 | यात्री निवासी, गोल मैदान, प्रभाग समिती क्र. 2. |
| 6 | व्ही.टी.सी संकुल, गोल मैदान प्रभाग समिती क्र.3. |
| 7 | नेताजी गार्डन, गोल मैदान, प्रभाग समिती क्र. 4. |
| 8 | कैलास कॉलनी, उल्हासनगर –5. |
| 9 | उल्हासनगर स्टेशन, उल्हासनगर –4 |

**होर्डीग्ज** छपाई करून वरील ठिकाणी प्रसिध्दीसाठी रक्कम रू. 1,96,000/– इतका खर्च झाला आहे.

(6) सदर योजनेच्या प्रचारासाठी महानगरपालिकेच्या कर्मचा–यामार्फत रॅली आयोजित करण्यात आली. तसेच रॅलीमध्ये पथनाटय सादर करून नागरिकांना सिंधी, हिंदी भाषेमध्ये योजनेची माहिती देण्यात आली. सदर पथनाटय शहराच्या विविध भागामध्ये तसेच नगरसेवक यांनी सुचविलेल्या भागामध्ये एकूण 40 पथनाटय करण्यात आली.

पथनाटय सादर करणेसाठी रक्कम रू. 1,94,000/– इतका खर्च झाला आहे.

(7) जास्तीत जास्त कर थकीत असलेल्या मालमत्तांधारकांना योजनेचा लाभ घेणेसाठी मनपातील विविध विभागातील कर्मचा–यांची नियुक्त करून व्यक्तिषः संबंधित मिळकतधारकांस योजनेची माहिती देण्यात आली.

(8) महानगरपालिका सदस्य तसेच सेवाभावी संस्थांच्या सहकार्याने खालील ठिकाणी 'मालमत्ता कर वसुली शिबीर'' आयोजित करण्यात आले. त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे.

| अ क्र | दिनांक | ठिकाण | वसुलीचा तपशिल |
|---|---|---|---|
| 1 | 22/02/2016 | डॉ. आंबेडकर चौक, चोपडा कोर्ट, उल्हासनगर–1 | 2,07,311/– |
| 2 | 23/02/2016 | सोनार गल्ली, उल्हासनगर–2 | 2,56,726/– |

| | | | |
|---|---|---|---|
| 3 | 26/02/2016 | गोल मैदान, मॅकडोनाल्ड जवळ, उल्हासनगर–1 | 1,06,413/– |
| 4 | 18/02/2016 | नगरसेवक श्री. भगवान भालेराव यांचे ऑफिस, खेमानी, उल्हासनगर | 1,13,516/– |
| 5 | 22/02/2016 | व्हाईट हाऊस, नगरसेवक श्री. राजेश वधारीया यांचे ऑफिस, उल्हासनगर–2 | 1,20,212/– |
| 6 | 23/02/2016 | व्हाईट हाऊस, नगरसेवक श्री. राजेश वधारीया यांचे ऑफिस, उल्हासनगर–2 | 1,90,716/– |
| 7 | 24/02/2016 | व्हाईट हाऊस, नगरसेवक श्री. राजेश वधारीया यांचे ऑफिस, उल्हासनगर–2 | 2,23,156/– |
| 8 | 20/02/2016 | फर्निचर बाजार, उल्हासनगर–2 | 1,80,760/– |
| 9 | 24/02/2016 | विठ्ठलवाडी, वाघरीपाडा, उल्हासनगर–3 | 1,15,465/– |
| 10 | 24/02/2016 | सी. एच. एम कॉलेज जवळ, उल्हासनगर–3 | 1,35,466/– |
| 11 | 25/02/2016 | धरमवाडी पंचायत, उल्हासनगर स्टेशन, उल्हासनगर–3 | 2,13,665/– |
| 12 | 24/02/2015 | नगरसेवक श्री. सुनिल सूर्वे यांच्या प्रभागामध्ये | 1,16,766/– |
| 13 | 20/02/2016 | नगरसेविका श्रीम. समिधा कोरडे यांचे प्रभागामध्ये | 1,13,556/– |
| 14 | 28/02/2016 | श्री. प्रदिप गोडसे युनिट क्र. 6 | 3,13,166/– |
| 15 | 11/2/2016 | सतरामदास हॉस्पिटल, उल्हासनगर–4 | 1,06,563/– |
| 16 | 13/2/2016 | कलानी सोसायटी, उल्हासनगर–4 | 1,13,311/– |
| 17 | 27/2/2016 | व्हि. टी. सी ग्राउंड, उल्हासनगर–4 | 1,62,666/– |
| 18 | 14/2/2016 | सत्य साई निकेतन, उल्हासनगर–5 | 1,17,756/– |
| 19 | 26/2/2016 | उल्हासनगर टेलिफोन एक्सचेज जवळ, उल्हासनगर–3 | 1,18,059/– |
| 20 | 23/2/2016 | गुरूनानक गुरूद्वारा, सी ब्लॉक उल्हासनगर–1 | 1,03,869/– |
| 21 | 3/3/2016 | संभाजी चौक, दगडी शाखा, उल्हासनगर–4 | 2,18,665/– |
| 22 | 21/2/2016 | लालचक्की चौकात, उल्हासनगर–4 | 1,21,626/– |
| 23 | 18/2/2016 | रोटरी गार्डन, गोल मैदान, उल्हासनगर–1 | 1,42,716/– |
| 24 | 6/3/2016 | सिंधु युथ सर्कल, उल्हासनगर–3 | 1,08,817/– |
| 25 | 17/2/2016 | कवाराम चौक, उल्हासनगर–3 | 2,16,677/– |
| 26 | 8/3/2016 | झुलेलाल मंदिर, उल्हासनगर–1 | 1,18,913/– |
| 27 | 9/3/2016 | बेवस चौक, उल्हासनगर–1 | 1,03,414/– |
| 28 | 13/3/2016 | कालिमाता मंदिर, कुर्ला कॅम्प रोड, उल्हासनगर–5 | 1,13,613/– |
| 29 | 20/2/2016 | सुशिला देवी स्कुल, कैलास कॉलनी, उल्हासनगर–5 | 1,21,769/– |
| 30 | 15/2/2016 | प्रभात गार्डन, नेताजी चौक, उल्हासनगर–4 | 1,27,714/– |
| 31 | 10/3/2016 | नाना–नानी पार्क, गोल मैदान, उल्हासनगर–1 | 1,17,616/– |
| 32 | 16/2/2016 | यात्री निवास, खेमानी, उल्हासनगर–3 | 1,67,817/– |
| 33 | 11/2/2016 | सपना गार्डन, उल्हासनगर–3 | 1,09,411/– |
| 34 | 7/3/2016 | मोहन बेहरानी गार्डन, इंदिरा गांधी मार्केट जवळ, उल्हासनगर–3 | 1,07,789/– |
| 35 | 10/3/2016 | शोभराज गार्डन, उल्हासनगर–5 | 1,14,622/– |
| 36 | 19/2/2016 | चालिया साहेब मंदिर, उल्हासनगर–5 | 1,63,769/– |
| 37 | 14/3/2016 | शांतीप्रकाश आश्रम, उल्हासनगर–5 | 1,73,142/– |
| 38 | 12/2/2016 | ब्रम्हकुमारी गार्डन, नेताजी चौक, उल्हासनगर–4 | 1,37,614/– |
| 39 | 14/3/2016 | सुभाष टेकडी चौक, उल्हासनगर–4 | 1,03,214/– |
| 40 | 15/3/2016 | जिजामाता गार्डन, भाजीमार्केट जवळ, उल्हासनगर–4 | 1,31,816/– |
| 41 | 27/2/2016 | पप्पु गार्डन, सेंट्रल हॉस्पिटल रोड, उल्हासनगर–3 | 1,19,907/– |

वरीलप्रमाणे आयोजित वसुली शिबीरात नागरिकांना मालमत्ता कर बिलाची प्रत व भरणा केल्याची पावती देणेकामी संपुर्ण संगणक संच प्रिटर्स व संगणक चालकासह इ. व्यवस्था करण्यात आली होती. तसेच योजनेची माहिती रंगीत 3X2 चे 1000 पोस्टर्स छपाई करून शहरातील विविध महत्तवाच्या ठिकाणी चिटकविण्यात आली. सदर कामी रक्कम रू. 1,89,000/– इतका खर्च करण्यात आला आहे.

## ड) <u>फलश्रुती</u>

| टप्पा | लाभार्थी | मालमत्ता कराची वसुली रक्कम रू. | विलंब शास्ती माफ केलेली रक्कम रू. | विलंब शास्ती जमा झालेली रक्कम रू. |
|---|---|---|---|---|

| क्र. | संख्या | | | |
|---|---|---|---|---|
| 1 | 10149 | 121094785 | 45445590 | 0 |
| 2 | 4345 | 48636947 | 10812633 (75टक्के) | 4022829 (25टक्के) |
| 3 | 5191 | 49498426 | 4499366 (50टक्के) | 4858270 (50टक्के) |
| **एकुण** | **19,685** | **21,92,30,185** | **6,07,57,589** | **88,81,099** |

सदरचा अहवाल स्थायी समिती पटलावर मंजुरीकरीता सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १९ दिनांकः— २/५/२०१६

सुचकाचे नाव :— श्री. विजय पाटील

अनुमोदकाचे नाव :— श्रीम. अंजली साळवे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार अभय योजना २०१५—२०१६ अंतर्गत केलेल्या कार्यवाहीच्या अहवालास मंजुरी देत आहे.
तसेच
१० मे ते ३१ मे पर्यंत सदर योजना लागू करणेचे प्रशासनास निर्देश देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

दुपारी १.१५ वाजंता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती श्री. सुनिल मुकुंद सुर्वे यांनी जाहिर केले.

**(प्राजक्ता मि. कुलकर्णी )**
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

.

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—१८/५/२०१६

दि. १८/५/२०१६ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती

सभेचे इतिवत्त.

३

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा बुधवार दिनांक १८/५/२०१६ रोजी सांयकाळी ४.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे | सभापती |
| २ | श्रीमती लिलाबाई आशान | सदस्या |
| ३ | श्री. उमेश सुरेश कालानी | सदस्य |
| ४ | श्री. गुरुनो भिकोमल वलेचा | सदस्य |
| ५ | श्री. जमनादास पुरस्वानी | सदस्य |
| ६ | श्रीमती अंजली साळवे | सदस्या |
| ७ | श्री. विजय चाहु पाटील | सदस्य |
| ८ | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | सदस्या |
| ९ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | सदस्या |
| १० | श्रीमती पुष्पाताई नाना बागुल | सदस्या |
| ११ | डॉ. निना प्रकाश नाथानी | सदस्या |
| १२ | श्रीमती वंदना पाटील उर्फ वंदना युवराज भदाणे | सदस्या |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्रीमती जया प्रकाश माखिजा,२. श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर, ३. श्रीमती आशा जिवन इदनानी, ४. श्रीमती इंदिरा उदासी

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. मनोहर हिरे, आयुक्त
२. श्रीमती प्राजक्ता मि. कुलकर्णी, महापालिका सचिव
३. श्री. जमीर लेंगरेकर, उप–आयुक्त
४. श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी
५. श्री. वेखंडे, उप मुख्य लेखा परिक्षक
६. डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी
७. श्री. जितु चोईथानी, उप अभियंता, साबांवि
८. श्री. विनोद केणे, प्र. स्वच्छता निरिक्षक
९. श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर
१०. श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.

१. श्रीमती मनिषा महाजन

२. श्रीमती नर्गिस खान

३. श्री. अशोक रामरख्यानी

सांयकाळी ४.१३ वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

महापालिका सचिव :– विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ विषय क्र. १ :– उल्हासनगर – १ ते ५ येथील पावसाळयापुर्वी शहरातील मोठे नाले मशिनद्वारे (प्रोक्लेन/जेसीबी) व छोटे नाले /कल्व्हर्ट मनुष्यबळाद्वारे सफाई करणे.

---

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–जो गोषवारा दिला आहे त्यात दोन निविदा आल्या आहेत. त्यात कोणी कोणी जॉईंट वेंचर दिले आहे. जेव्हा आम्ही निविदा बनवितो तेव्हा जॉईंट वेचर दिले पाहिजे. यात तर काहीच नाही. तर ही कोणत्या बाबीस बसून टाकत आहोत? आमचा अनुभव आहे. मोठया कामात आपण जॉईंट वेंचर टाकत असतो. तर हे जॉईंट वेंचर ठेकेदाराचे कागदपत्र बघुन टाकतो कि निविदेत टाकतो. आपली नियमावली काय आहे? येणा–या दिवसात पेअर निविदा काढण्यात यावी. ही निविदा कमी दराची आहे फारच चांगली गोष्ट आहे. शहराचा फायदा आहे. आपण किती कोटी मध्ये जॉईंट वेंचर टाकतो?

श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी :–कोटी मध्ये नाही.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>आपण ३२ कोटीची निविदा काढली त्यात जॉईंट वेंचर नाही. माझा अनुभव आहे महापालिकेचा मोठा अनुभव आहे की मोठ मोठी जी कामे होतात ५० कोटी, ८० कोटीचे, तर त्यामध्ये टाकले जाते की जॉईंट वेंचर नॉट अलाउड. दोन कोटी, ४ कोटी, ज्यात अनुभव लागतो त्यात तर कोठेच असे टाकले जात नाही की जॉईंट वेंचर नॉट अलाउड. तर या निविदेत आपण जॉईंट वेंचर टाकले नाही. आम्ही ठेकेदाराच्या कागदपत्र पाहुन निविदा बनवितो किंवा कोणती नियमावली आहे. आपण या निविदेमध्ये दोन जागी टाकले आहे की एका जागी जॉईंट वेचंर अलाउड व एका जागी लिहिले आहे की जॉईंट वेंचर नॉट अलाउड. तर आपल्या महापालिकेची नियमावली काय आहे? माझा सामान्य प्रश्न आहे की येणा—या दिवसात जेवढे होवू शकेल अशीच निविदा काढली जावी. आज आपण १० टक्के खाली निविदा देत आहोत.आपण जर जॉईंट वेंचर टाकले तर बरे होईल.

<u>श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी :—</u>मा. सभापती महोदयांच्या आदेशावरुन बोलतो, सदस्यांना सांगतो की हा जो जॉईंट वेंचर जर टाकले तर ठराविक जी बाब असते त्यामध्ये आपल्याला तांत्रिक बाब पाहिजे. जसे मजुर पुरवठयाचा अनुभव आणि नाले सफाईचा अनुभव. आपले हे काम टाईमबॉड काम आहे, या टाईमबॉड काममध्ये आपल्याला कमीत कमी कालावधीत हे काम पटकन करुन घ्यायचे असते. आणि त्यामुळे अनुभवी माणुस असणे आवश्यक असते. उदाहरणार्थ आपणांस सांगतो की आपण मागील वेळेस बोअरवेलचे काम काढले होते. निविदा काढल्यानंतर ठेकेदाराने बराच वेळ आपली ईएमडी भरलीच नाही. त्यामुळे शहरात पाणी टंचाई असतांना आपले काम वेगात होवु शकले नाही. अशा प्रकारचे तांत्रिक बाबी, अडचणी प्रशासनासमोर येतात. त्यामुळे हे जे विशेष काम आहे नाले सफाईचे त्यामध्ये जॉईंट वेंचर टाकलेले होते. अनुक्रमांक ७५ वर हया मार्गदर्शक सूचना आहेत.त्यामुळे त्यामध्ये दोन्ही चुकुन राहिले होते प्रशासनाकडुन कट करायचे. तर जॉईंट वेंचर बाबतीत आवश्यक बाबी आहेत की कमी कालावधीत काम करायचे आहे अशा पध्दतीचे अटी टाकतो, अटी टाकल्यानंतर ही निविदा सगळयांसाठी उघड असतील जर काही अडचणी असतील मा. सदस्यांना सर्व गोष्टी माहित असतात, जर आपण बोललात तर आपण स्थायी समितीमध्ये मुदतवाढ देवुन त्या कट करु शकतो, त्याची आवश्यकता नाही. असे नाही की प्रशासनाने केलेले अंतिम आहे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>काम लवकर केले पाहिजे, आणि ते आवश्यक काम आहे. आपण ३२ कोटीसारख्या मोठया कामात जॉईंट वेंचर अलाउड केले आहे. २०,२५,५० कोटीचे मोठ मोठी कामे महाराष्ट्र शासनाचे सुध्दा निघते परंतु त्यामध्ये जॉईंट वेचंर अलाउड करत नाहीत. त्यात आपण जॉईंट वेचंर अलाउड केले. आणि हे काम १ कोटी ६० लाखाचे आहे त्यात जॉईंट वेंचरचे महत्वच नाही. एका जागी जॉईंट वेंचर नॉट अलाउड आणि एका जागी टाकले आहे. तर असे होता कामा नये, तसेच दुसरी गोष्ट की आपण जी निविदा काढतो, त्यात आपले सर्वात प्रथम हे उदिष्ट असले पाहिजे की आपल्या महापालिकेचा काय फायदा आहे. तर आपण जेवढे होवू शकेल तेवढया स्पर्धा लावू. जर आपण त्यामध्ये अटी व शर्ती ठेवू की ३ वर्षाचा अनुभव असला पाहिजे, आता ही जी निविदा आली आहे त्यामध्ये तर स्पर्धा झालीच नाही. एकच निविदा आहे. प्रथम सुध्दा एक वेळ असे झाले एकच निविदा, आता सुध्दा आली तर एकच निविदा. जर दुस—या निविदेतील अटी व शर्ती आपण मान्य करत नाहीत तर एकच निविदा. आज आपल्या महापालिकेत अटी शर्ती टाकल्या व जॉईंट वेंचर अलाउड केले तर फारच चांगले होईल. आपला फायदा होईल. मी २० वर्षापासुन सदस्य आहे. ९६ सालापासुन मी येथे आहे. प्रथम काय होत होते नाला सफाईच्या कामासाठी ४० लाखाची निविदा काढत होते. ४० लाखाचे काम पाहिले तर ते काम शुन्याच्या बरोबर होते. प्रोक्लेन व जेसीबीने तर काम होत होते. परंतु त्यावेळी प्रभागांमध्ये १०—१० लोक आपण लिहिले होते, १०—१०, १५—१५ लोक मिळतील परंतु ते मिळालेच नाहीत. २ लाखाचे माझ्या प्रभागातील नाल्याची निविदा होती. मला फक्त १५—२० लोक संपुर्ण कालावधीत मिळाले. आज ४०० रुपये कामगारांचा पगार आहे त्यावेळी १०० रुपये होता. मी म्हटले या १५०० रुपयात माझ्या प्रभागातील कामे झाली आहेत आणि हे काम २ लाखाचे त्यावेळी मी तक्रार केली होती. त्यावेळी श्री. शुळ साहेब आयुक्त होते. त्यांनी त्या नाल्या सफाईच्या बिलास

थांबविले होते. तीन चार वर्षापर्यंत त्या नाला सफाईचे बिल मिळाले नव्हते. आज सुध्दा महापालिकेचा रेकॉर्ड आहे की आजपर्यंत कुणासही बिल मिळाले नाही. आयुक्त साहेबांनी, सर्व्हे केलेला होता. किती लोकांनी कामे केली, काय काय केलीत, रिपोर्ट शुन्य आला. काहीच काम झाले नाही, गाडयांचा थोडेफार पेमेंट झाले. त्यानंतर आपण नविन पध्दत बनविली होती. आम्ही काय केले होते, प्रत्येक विभागात २० कर्मचारी एक महिन्यासाठी घेतले तर एक कर्मचा–याच्या हिशोबाने २००० रुपये होत होते व ३० दिवसांपर्यंत ६० हजार रुपये होत होते. ६० हजार रुपये एक प्रभागात व ७० प्रभाग होते. तेवढयाच पैश्यांचे आम्ही कर्मचारी लावले होते. त्या २० लोकांमधुन आम्ही आमच्या प्रभागातील काम करुन घेत होतो. आपले स्वच्छता निरिक्षक त्यांची हजेरी घेत होते. २० कर्मचारी बरेचसे मिळत असत. व त्यावेळी आपल्या प्रभागातील मोठ मोठी नाले, छोटी छोटी नाले, प्रोक्लेन व गाडयांना सोडुन चांगल्याप्रकारे आमचे काम होत होते. कारण त्यावेळी आम्ही सुध्दा पाहत होतो की २० कर्मचारी आपल्या प्रभागात येत असतात. कधी १० येत असत, कधी १२, कधी १५ येत असत. ते ३० दिवस भरुन मिळत असत. त्यामुळे आमच्या प्रभागातील कामे चांगली होत असत. हे तीन, चार वर्ष चालले त्यानंतर काही तांत्रिक अडचण आल्या. त्यानंतर ती लोक उच्च न्यायालयात गेली की आम्हांस कायम करण्यात यावे. आमचे काय झाले. त्यानंतर ही निविदा पध्दत आली. माझे एवढे भाषण देण्याचा मुद्दा हा होता, ही जी निविदा निघाली त्यानंतर ३–४ वर्ष काय झाले. एक निविदा निघत होती, आणि असे बरेचसे ३–४ नाले होते. तेथे २ लाख, ३ लाखाचे प्राकलन बनत होते. जेथे प्रोक्लेन गाडया व जेसीबी जात नव्हत्या. प्रभागात आपल्याला जास्तीत जास्त ५–५,६–६ मजुर मिळतात. १५ दिवस, एक महिन्यात ५०–६० मजुर मिळतात. १०० मजुर एका प्रभागात मिळत असतात. सार्वजनिक विभागास सुध्दा माहित आहे. नाल्या सफाईसाठी खुप लोकांची आवश्यकता असते. फर्निचर मार्केटमध्ये श्री. नरेंद्र ठाकुर आहेत त्यांच्या प्रभागातील एक नाला आहे, कॅम्प नं. १ बसस्टॉप जवळ, बॅरेक नं. ८० येथे माझ्या प्रभागात एक नाला आहे. नाल्यावर माणुस पायी जावु शकतो. वर मातीचा स्लॅब असतो व खालुन नाला वाहत असतो. आयुक्त महोदयांनी भेट दिल्यानंतर अशा वेगवेगळया निविदा व्हायच्या. परंतु यावेळी काय केले आहे १ कोटी २० लाखाचे छोटया छोटया निविदा व ४० लाखात मोठे मोठे निविदा सर्व जोडुन एकच निविदा बनविल्या आहेत. त्याने काय होईल की एकच व्यक्ती नाला सफाई करेल, प्रोक्लेन आपणांस प्रभागात पुरवेल आणि जे चार–पाच नाले आहेत त्यांना सुध्दा तोच पाहणार. मला असे वाटते की हे काम होणे अति कठिण आहे. परंतु आता वेळ सुध्दा कमी आहे. निविदा सुध्दा झाल्या आहेत, १० टक्के खाली निविदा दिल्या आहेत. मी आयुक्त महोदय, अधिकारी,आरोग्य विभाग व सार्वजनिक बांधकाम विभागाशी निवेदन करेल की त्यांनी कामात लक्ष दयावे. आता शहरात पाण्याची समस्या आहे, त्या पाण्याच्या समस्येशी आपण सुटकारा करुच परंतु आणखी पाण्याची समस्या सुरु होईल. प्रथम पाणी येत नव्हते आता पाणी जास्त प्रमाणात येते. मी हात जोडुन विनंती करेल की हे जे चार–पाच नाले होते, जेथे वेगळी निविदा होती, त्या जागेवर आपण मनुष्यबळ जास्त प्रमाणात लावावे. ५००–५०० जे मनुष्यबळ दिले आहे प्रभाग समितीमध्ये तर असे होता कामा नये की प्रत्येक प्रभागात १०–१० घेणार व परंतु त्या नाल्याची सफाई होणार नाही. कारण स्पष्ट लिहिले नाही की ते ५०० मजुर कोठे लागतील. मी आपणांस विनंती करेल की प्रभागात नाले सफाईसाठी जास्तीत जास्त सफाई कामगार लावले पाहिजेत. तसेच खासकरुन त्या नाल्यावर जेथे प्रोक्लेन, जेसीबी जात नाहीत, तेथे अधिकारी नियुक्त करुन तेथे विशेष स्तरावर काम झाले पाहिजे. दोन व तीन नाले तर माझ्या नजरेत आहेत, कॅम्प नं. १ मधील व एक फर्निचर बाजारातील. आणि एक श्री. नंदु भोईर यांच्या प्रभागातील आहे. असे तीन चार नाले आहेत.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u>एक मिनिट साहेब, मी सांगतो, हीच गोष्ट ना एक लेपरसी कॉलनी आहे ना तेथे एक मोठा नाला आहे. तो रेल्वेला क्रॉस करतो आणि दरवेळेस रेल्वेला त्रास होतो तो काही माझ्या प्रभागात नाही परंतु बाजुला आहे. ते फारच खतरनाक प्रकार होतो. आता जसे श्री. जमनु यांनी सांगितले तर पुढील वर्षी जेव्हा नाले सफाई येईल....

आयुक्त, श्री. मनोहर हिरे :—लेपरसी कॉलनीची काय अडचण आहे?

श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक:—आता रेल्वेने तेथे मोठा कल्वर्ट बनविला आहे.

सदस्या डॉ. निना नाथानी:—माझ्या प्रभागात सुध्दा एक सेंसीटीव्ह एरिया आहे तेथे सुध्दा पाणी भरुन जाते. इमारतीत पाणी घुसते ते फक्त माझ्या प्रभागातच होते. यासाठी मी स्पष्टीकरण देते, आमच्या इकडील नाला फार मोठा नाही, परंतु बरोबर साफसफाई होत नसल्याने ते पाणी इमारतीत तळमजल्यापर्यंत जाते व पाणी भरुन जाते. तर त्यासाठी तेथे सुध्दा आपण जर मजुरांवर लक्ष दिले तर बरे होईल.

आयुक्त, श्री. मनोहर हिरे:—आता इस्टीमेटमध्ये किती मजुर आहेत?

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—श्री. केणीजी आपण एक एक प्रभाग समितीमध्ये किती लेबर देणार आहात? प्रभाग समितीमध्ये किती लेबर आहेत?

श्री. जितु चोईथानी, उप अभियंता, साबांवि:—प्रत्येक प्रभागात १०० आहेत.

सदस्या श्रीमती अंजली साळवे:—प्रत्येक प्रभागात १०० आहेत तर ते पॅनलमध्ये कि प्रभागात?

श्री. जितु चोईथानी, उप अभियंता, साबांवि:—२५०० लेबर आहेत. प्रत्येक प्रभागात १००—२०० आहेत. ५०० लेबर एक्स्ट्रा आहेत. आपण जे म्हणत आहात ना, सत्यम मेडिकल ते सोनारा हॉल जवळ तेथे नाला आहे.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—आपण काय केले, ५०० लेबर प्रभाग समितीमध्ये. माझे म्हणणे ऐकुन घ्या, अडचण काय होईल, आपण जर सत्यम मेडिकल बॅरेक नं. १८० पासुन अमुक अमुक नाल्यापर्यंत २०० ते ३०० मजुर ते तेथेच कामे करतील. परंतु आपण २० प्रभागात ५०० मजुर केलेत. तर तेथे माझ्या नाल्याचे काम होणारच नाही. आता आपण यास चॅलेंज कसे करणार, प्रभागात ५०० मजुर घेतला जर २० प्रभागातील लोक जर दोन दोन जण घेवुन गेले तर यातुन १०—१० जण असेच जातील. आपण स्पेशीफीक लोकेशन टाकले पाहिजे. मला आता हे सांगा की सत्यम मेडिकल येथे मागील वर्षी किती लोक लावले? तेवढे लोक मला दया. सत्यम मेडिकल येथे श्री. नरेंद्रकुमार ठाकुर यांच्या येथे, श्री. नंदु भोसले यांच्या येथे जितके आहे तेवढे दया.

श्री. जितु चोईथानी, उप अभियंता, साबांवि:—होय तेथे काम केले आहे. श्री. कुमारी यांचे सुध्दा काम केले आहे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>होय आपण काम केले असेल. परंतु मला तेवढी लोक दया. आपण असे लिहिले आहे की ५०० लोक प्रभाग समितीमध्ये देणार. जर आपण सत्यम मेडिकल येथे ३०० देणार, फर्निचर बाजार येथे २०० देणार, अमुक नाल्यावर ३०० देणार, ती श्री. केणी यांना माहिती आहे.

<u>श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक:—</u>दोन नाले करत होतो, तेथे जर चार नाले असतील तर ५०० तेथे जातील.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे:—</u>त्यांचा सपोर्ट घेवुन केले नाही का, एकत्रितरित्या नाही केले काय? तुमच्याकडुन त्यांनी घ्यायला पाहिजे ना की किती लोक लागणार. दोन्ही मिळुन बसुन प्लान करा, किती नाले आहेत. नाला सफाईचे काम चालु झाल्यानंतर उदयापासुन त्याची व्हिडीओ शुटींग करा. गाळ काढुन तो तसाच तिस—या दिवसापर्यंत पडुन राहीला. असे होता कामा नये. गाळ काढल्यानंतर तो लगेच उचलला पाहिजे तो पुन्हा तसाच पडतो आठ दहा दिवस व पुन्हा नाल्यात जातो असे चित्र उमटता कामा नये.

<u>सदस्या श्रीमती अंजली साळवे:—</u>गाळ काढल्यानंतर आम्हांला मागे लागावे लागते. आता रस्ते खोदुन ठेवले आहेत, ती माती तशीच पडुन आहे उचलत नाही.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे:—</u>गाळ काढल्यानंतर लगेच डंम्परमध्ये भरुन दुस—या दिवशी उचलला पाहिजे. आणि त्याचे ठिकाण ठरवुन दया त्यास कोठे टाकणार गाळ?

<u>श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक:—</u>गायकवाड पाडा येथे टाकणार, सिल्ट जर टाकले तर गाडी स्लीप मारणार. आपणांस गायकवाड पाडा येथेच सोयीस्कर राहणार.

<u>सदस्या श्रीमती अंजली साळवे :—</u>परंतु गाळ लगेच उचलला पाहिजे.

<u>सदस्या डॉ. निना नाथानी:—</u>श्री. केणी, झोपडपट्टी विभागात पाणी भरते त्यासाठी काय उपाय आहे? प्रत्येक वर्षी किती लोकांची घरे बुडतात.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे:—</u>यावर्षी १२६ टक्के पाणी, परवा जी सभा झाली डीव्हीजनल आणि विभागीय आयुक्त साहेबांशी सुध्दा याबाबत सभा होणार आहे. यामध्ये १२६ टक्के हवामान खात्याचा अंदाज असा आहे की, १२६ टक्के पाऊस होण्याची शक्यता आहे. तुमचे जे ठिकाण आहे ते हायटाईट आहे, मला वाटते जुन मध्ये दोन दिवस आहे व जुलै मध्ये दोन दिवस आहे, ऑगस्टमध्ये तीन दिवस आहे. तारखा दिलेल्या आहेत त्या तारखेस हायटाईट राहणार आहे. त्यावेळेस जर हायटाईट झाली तर मग पाणी जात नाही व पाणी शिरते. तर असे ठिकाण ओळखुन जसे महोदया म्हणत आहेत की झोपडपट्टी आहे, त्या ठिकाणावर पाणी व्यवस्थित जाईल असे नाला सफाई केली पाहिजे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>महापालिकेत टिम वगैरे तयार ठेवली पाहिजे.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे:—</u>आपण आपत्तकालीन कक्ष तयार केला आहे. प्रत्येक प्रभागामध्ये काही लेबर आणि अधिकारी नियुक्त करणार. येथे आपला एक कक्ष असेल. आणि आपल्याला कळेल की अतिवृष्टी कधी होईल, हवामान खात्याचा अंदाज आपणांस एक दिवस आधी येणार आहे. त्याकाळामध्ये आपण तेथे लोक तैनात ठेवु या. मागील वेळेच फक्त महापालिकेतच होते आता आम्ही प्रत्येक प्रभाग समितीमध्ये लेबर ठेवलेत.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>साहेब, हा ठराव पारीत करु या तो सुध्दा इतिवृत्ताची वाट न पाहता.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>इतिवृत्ताची वाट न पाहता तर ठराव पारीत करु या परंतु यामध्ये साहेब....

<u>सदस्या श्रीमती अंजली साळवे:—</u>साहेब, मागच्या वर्षी सारखी यामध्ये तक्रार येता कामा नये.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>मी तेच सांगत होतो की मागील वर्ष प्रभाग समितीमध्ये जे मजुर दिले गेले म्हणजे आमचे प्रभागातुन काढुन दिले गेले. ते लेबर बिन कामाचे आहेत ते असेच आणुन तेथे ठेवले होते.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे:—</u>ठेकेदाराची की आपले?

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>नाही, साहेब ठेकेदाराचे नाही, आपले जे आपण ठेवतो ना, इमरजन्सीला जे लेबर घेतले जातात, ते प्रभागातुनच घेतले जातात.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>नाही, नाही ते फार अडचणीचे होते.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>तो त्रास तर होतोच व लेबर सुध्दा असे घेतले जातात की ते बिनकामाचे असतात.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे:—</u>या तीन चार महिन्यात प्रायव्हेट चालु करायचे आहेत.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>साहेब, हा महत्वाचा विषय आहे, मग त्यावेळेस नगरसेवकांची व अधिका—यांची भांडणे होतात. आणि स्वच्छता निरिक्षकाचे लक्ष असणे फार गरजेचे आहे. मुख्य स्वच्छता निरिक्षक लक्ष देतातच त्याबद्दल वाद नाही. परंतु त्यांना संपुर्ण शहर असते. स्वच्छता निरिक्षकांजवळ तीन किंवा चार प्रभाग असतात. स्वच्छता निरिक्षकांनी या सर्व गोष्टीचे मॉनिटरींग ठेवणे अत्यंत आवश्यक आहे, वेळोवेळी रिपोर्ट करणे, तो घेणे तेवढे महत्वाचे आहे.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे:</u>—एकत्रितरित्या करुन टाकु. स्वच्छता निरिक्षक व मुख्य स्वच्छता निरिक्षकांचा अहवाल एकत्र करु, आणि त्यात कनिष्ठ अभियंता.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:</u>—होवु शकेल तर कराच.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे:</u>—श्री. जाधव व श्री. जितु तुम्ही दोन्हींनी सुपरविजन करायचे त्यामध्ये. ज्याचा ज्याचा प्रभाग आहे तेथिल अभियंता व स्वच्छता निरिक्षक यांनी सुपरविजन करायचे आहे.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:</u>—आणि उदया सकाळपासुन काम सुरु करायचे.

<u>सदस्या डॉ. निना नाथानी:</u>—आयुक्त महोदयांनी सांगितले की आपण सुपरविजन करु. जर विभागणी होत असेल तर सोबत टिम बनवुन करायचे. समजा लाईनीत पॅनल बनवुन घ्यायचे आणि त्या पॅनलमध्ये कोणता नाला सेंसीटीव्ह आहे आणि कोणता नाही ती यादी बनवुन टिकमार्क करायचे आणि मग ते काम आधी करायचे. पहिला पॅनल, नंतर दुसरा नंतर तिसरा पॅनल अशी जर यांच्याकडे यादी असेल ना तर चांगले होईल. आणि नालेवाला एरिया जसे यांनी सांगितले जेथे स्लम एरिया आहे तेथे हायलाईट करुन त्याची नोंद घेवुन तेथे लक्ष दिले तर मला वाटते जर पुर आला आपण जसे आता सांगितले की, यावर्षी पाऊस जास्त आहे आणि वर्तमानपत्रात सुध्दा आले आहे की मे अखेर सुध्दा पाऊस येवु शकतो. जर आपण पॅनलवाईज यादी बनविली तर कुठल्याही पॅनलला त्रास नसणार, मी नाही म्हणत की, पॅनलला त्रास असणार नाही परंतु जर कमीत कमी १५ दिवस अधिका—यांची नियुक्ती करा, मॉनिटरींग करायला लावा. टिम तयार करा.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:</u>—एकदा जर नाले सफाई झाली तर हायटेक आले तरी त्यास नैसर्गीक आपत्ती काहीच करु शकत नाही. जेव्हा अतिवृष्टी झाली होती तेव्हा श्री. रामनाथ सोनवणे यांनी सर्वांना कामावर लावले होते. ती परिस्थिती उद्‌भवायलाच नको असे काही तरी करा. आणि सर्व अधिका—यांना कामावर लावले तर फार बरे होईल अशी माझी विनंती आहे. सुरुवातीचे पंधरा दिवस कामाला लावा, एकदा नाले सफाई झाली तर बरे होईल, जर हायटाईट वगैरे आला तर आपण नैसर्गीक बाबीत काहीच करु शकत नाही. पण पाणी अडते आणि पुढे जात नाही आणि कोठे कचरा अडकला आहे अशी स्थिती व्हायला नको.

<u>श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक:</u>—जसे लेबर मिळतील तसे काम होईल. लेबर सुरुवातीला कमी येतात, त्यास ४०० चा टार्गेट आहे. १० दिवस जातील.

<u>सदस्या श्रीमती अंजली साळवे:</u>—पण शेडयुलप्रमाणे काम होईल हे बघा. नाहीतर दहा दिवस सांगितले की २० दिवस लावणार असे करु नका. जसे आता झाले आहे बोअरवेलचे. यामध्ये दिरंगाई करुन चालणार नाही.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे:</u>—यात लवकर डिप्ले करायचा.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>त्याच्याकडुन जर डिले होत असेल तर त्यास दंड लावा. कारण की कारणे असतात, आजच दिले तर चांगले होईल.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे:—</u>आता तुम्ही सभा संपल्यावर ठराव त्या ठेकेदारास ठरावाची प्रत दया. त्यांना ठराव लवकर इश्यु करा. एग्रिमेंट करुन कामास लवकर सुरुवात केली नाही तर ठेका रद्द करण्यात येईल, असे त्यास सांगा.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>एकतर दंड ठेवा. काम लवकर सुरु करा.

<u>सदस्या श्रीमती अंजली साळवे:—</u>बोलरवेलचे सुध्दा एका महिन्याच्या आत करण्यास सांगितले होते.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>खरेतर साहेब, दरवर्षी का विंलब होत असतो कामास?

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे:—</u>मागच्या वेळेस एप्रिलमध्ये निविदा काढली होती. आता फारच विलंब झाला खरेतर या आधीच झाले असते, परंतु आपल्या मंडळींनी केले नाही.

<u>सदस्या डॉ. निना नाथानी :—</u>लवकर निविदा सुरु करण्यास सांगा. लवकरात लवकर काम सुरु करा.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे:—</u>आजच करा, नाल्यांची जी यादी आहे ती लवकर तयार करा.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>सदरचा ठराव इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता करा.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>आयुक्त महोदय आपण पहिल्या सभेस आलेत तसे प्रत्येक सभेत यावे. आता आल्याबद्दल तर प्रथम धन्यवाद, प्रत्येक सभेत आलात तर बरे होईल. काय आहे, चर्चा तर होतेच परंतु आमच्या काही सदस्यांचे प्रश्न असतात. श्री. पाटणकर साहेब बसले तर ते उत्तर दयायला तयार नसतात व मग वाद होणेपेक्षा सुंदर सभा होणे आवश्यक आहे त्यासाठी तुम्ही सभेत आले तर बरे होईल. तुम्ही तारखा सांगत जा, आम्ही तशी सभा लावु. इमरजन्सी असेल तर आम्ही सभा लावु, तेव्हा साहेब नसतील तर हरकत नाही. परंतु तुम्ही असलात तर चांगले. आणि अधिका—यांनी सुध्दा सभेला उपस्थित रहावे. धन्यवाद।

<u>महापालिका सचिव:—</u>मी ठराव वाचुन दाखविते, ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर—१ ते ५ येथील पावसाळयापुर्वी शहरातील मोठे नाले मशिनद्वारे (प्रोक्लेन/जेसीबी) व छोटे नाले /कल्व्हर्ट मनुष्यबळाद्वारे सफाई करणेकामी मे. शुभम कन्स्ट्रक्शन यांची १०.०० % कमी दराच्या निविदेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

ठराव बरोबर आहे?

<u>काही सदस्य :—</u>हो , पास. पास......

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑ **विषय क्र. १ :—**उल्हासनगर — १ ते ५ येथील पावसाळयापुर्वी शहरातील मोठे नाले मशिनद्वारे (प्रोक्लेन/जेसीबी) व छोटे नाले /कल्व्हर्ट मनुष्यबळाद्वारे सफाई करणे.

<u>प्रस्तावना</u>

सध्या भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधान परिषदेच्या ठाणे स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाचा निवडणूकीचा कार्यक्रम घोषित केला असून ठाणे/पालघर जिल्हयामध्ये ''आदर्श आचार संहिता'' लागू झालेली आहे. सदर आचारसंहिता कालावधीत कोणतेही विकास कामे हाती घ्यावयाचे नसतात, परंतू पावसाळयादरम्यान शहरात पुरपस्थिती निर्माण होवू नये म्हणून सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे पावसाळयापूर्वी शहरातील नाल्यांची सफाई होणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर काम तातडीचे म्हणून आचारसंहिता काळात करण्याकरीता या विभागाने मा.मुख्य निवडणूक आयोगाकडे परवानगी मिळणेबाबत कळविले होते. त्यास अनुसरुन मा.उप सचिव व सह मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचेकडील पत्र क्रमांक एमसीसी—२०१६/प्र.क्र. २३७/२०१६/३३ दिनांक १३ मे,२०१६ अन्वये भारत निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक —४३७/दिनांक १२ मे,२०१६ मध्ये नमुद केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहुन पावसाळयापूर्वी तातडीची कामे आयोजित करण्यास हरकत नसावी असे कळविले आहे. सदर मान्यतेस अनुसरुन **उल्हासनगर महानगरपालिका प्रभाग क्षेत्र क्र.१, २, ३ व ४ मधील नाले सफाई निधीतून मंजुरी मिळालेल्या** उल्हासनगर—१ ते ५ येथील पावसाळयापूवी शहरातील मोठे नाले मशिनद्वारे (प्रोक्लेन/जेसीबी) व छोटे नाले/कल्व्हर्ट मनुष्यबळाद्वारे सफाई करणे **या कामांकरीता बी—१ प्रकारच्या दोन भाग (तांत्रिक व आर्थिक) पध्दतीने नोंदणीकृत ठेकेदारांकडून दिनांक २५/०४/२०१६ रोजी दु.३.०० वाजेपर्यंत निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्याची माहिती खालीलप्रमाणे आहे.**

| | | |
|---|---|---|
| १ | प्राकलनीय खर्च | रु.१६१४६९००/— |
| २ | निविदा प्रसिध्द केलेली वर्तमानपत्रे | |
| ३ | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक २५/०४/२०१६ |
| ४ | निविदा विक्री कालावधी | दिनांक २५/०४/२०१६<br>ते २६/०४/२०१५ |
| ५ | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | ०२/०५/२०१६ |
| ६ | निविदेचा तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | १३/०५/२०१६ |
| ७ | निविदेचा आर्थिक भाग उघडण्याचा दिनांक | १३/०५/२०१६ |
| ८ | विक्री केलेल्या निविदांची संख्या | ३ |

| | | |
|---|---|---|
| | | |
| ९ | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | २ |

दिनांक १३/०५/२०१६ रोजी मा.आयुक्त व अतिरिक्त आयुक्त सो. यांचेशी चर्चा करुन मुख्य लेखा परिक्षक, शहर अभियंता, कार्यकारी अभियंता यांचे उपस्थितीत उल्हासनगर–१ ते ५ येथील पावसाळयापूवी शहरातील मोठे नाले मशिनद्वारे (प्रोक्लेन/जेसीबी) व छोटे नाले/कल्व्हर्ट मनुष्यबळाद्वारे सफाई करणे या कामाच्या निविदेचा तांत्रिक भाग उघडण्यात आला त्याचा तपशिल खालीलप्रमाणे

| अ.क्र. | निविदाकाराच्या निविदेमधील बाबी | मे. शुभम कन्स्ट्रक्शन | मे. ए.एम. रामचंदानी |
|---|---|---|---|
| १ | निविदा प्रपत्रकाच्या खरेदीची रक्कम भरलेली आहे का? | आहे | आहे |
| २ | इसारा रक्कम भरलेली आहे का ? | आहे | आहे |
| ३ | अद्यावत आयकर रिटर्न भरल्याची पावती | आहे | आहे |
| ४ | विक्रीकर/व्हॅट सर्टिफिकेट | आहे | आहे |
| ५ | कामाचा अनुभव (मागील ३ वर्षाचा) | आहे | नाही |
| ६ | मशिनरीचा मालकी हक्काचा पुरावा जोडला आहे का? | आहे | नाही |
| ७ | जॉईंट व्हेंचर | नाही | आहे |
| ८ | नोंदणी प्रमाणपत्र | आहे | आहे |
| ९ | निविदाकाराकडे उपलब्ध असलेल्या तांत्रिक कर्मचा–यांची माहिती | आहे | आहे |
| १० | सर्व्हिस टॅक्स/प्रॉव्हीटंड फंड रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र | टाहे | नाही |

सदर निविदांची सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये छाननी समिती मार्फत छाननी केली असता १) **मे. शुभम कन्स्ट्रक्शन** २) **मे. ए.एम.रामचंदानी** यांच्या निविदा अटी शर्तीनुसार एकच निविदाकार म्हणजे **मे. शुभम कन्स्ट्रक्शन** पात्र आहेत.

परंतु ई–निविदचे लिपिक यांचेकडुन चुकीने वरील निविदाकारांचे निविदेचा दुसरा लिफाफा/आर्थिक देकार उघडण्यात आला आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे :–

| | |
|---|---|
| १) **मे. शुभम कन्स्ट्रक्शन** | दिलेले दर १०.०० टक्के कमी |
| २) **मे. ए.एम. रामचंदानी** | दिलेले दर ०६.०१ टक्के कमी |

उपरोक्त **उल्हासनगर–१ ते ५ येथील पावसाळयापूवी शहरातील मोठे नाले मशिनद्वारे (प्रोक्लेन/जेसीबी) व छोटे नाले/कल्व्हर्ट मनुष्यबळाद्वारे सफाई करणे** या कामाचे उक्त निविदाकारांपैकी **मे. शुभम कन्स्ट्रक्शन** यांनी दरसूची वर १०.०० टक्के कमी (10.00% below) प्रमाणे दर दिले असुन सदर बाबी प्रशासनाने मा.आयुक्तांची निदर्शनास ठेवलेल्या आहेत. सबब, कामाची तातडी विचारात घेता **मे. शुभम कन्स्ट्रक्शन** यांना सदर काम देणे योग्य वाटते.

तरी. **मे. शुभम कन्स्ट्रक्शन** यांची १०.०० % कमी दराच्या निविदेस मा. स्थायी समितीकडून निर्णय होवून मान्यता मिळणेकरीता प्रस्तावित.

<u>स्थायी समिती ठराव क्रः २०</u> <u>दिनांक:– १८/५/२०१६</u>

सुचकाचे नाव :– श्री. विजय पाटील

अनुमोदकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर – १ ते ५ येथील पावसाळयापुर्वी शहरातील मोठे नाले मशिनद्वारे (प्रोक्लेन/जेसीबी) व छोटे नाले /कल्व्हर्ट मनुष्यबळाद्वारे सफाई करणेकामी मे. शुभम कन्स्ट्रक्शन यांची १०.०० % कमी दराच्या निविदेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/–
अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

सभापती / पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

सांयकाळी ४.४५ वाजंता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती श्री. सुनिल सुर्वे यांनी जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी )
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:— १३/६/२०१६

दि. १३/६/२०१६ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवत्त.

४

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा सोमवार दिनांक १३/६/२०१६ रोजी सायं. ४.३० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे | सभापती |
| २ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | सदस्या |
| ३ | श्रीमती लिलाबाई आशान | सदस्या |
| ४ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर | सदस्य |
| ५ | श्री. गुरुनो भिकोमल वलेचा | सदस्य |
| ६ | श्री. जमनादास पुरस्वानी | सदस्य |
| ७ | श्री. विजय चाहु पाटील | सदस्य |
| ८ | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | सदस्या |
| ९ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | सदस्या |
| १० | श्रीमती इंदिरा उदासी | सदस्या |
| ११ | श्रीमती पुष्पाताई नाना बागुल | सदस्या |
| १२ | डॉ. निना प्रकाश नाथानी | सदस्या |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्री. उमेश सुरेश कालानी २. श्रीमती आशा जिवन इदनानी ३. श्रीमती अंजली साळवे ४. श्रीमती वंदना पाटील उर्फ वंदना युवराज भदाणे

खालील अधिकारी सभेस हजर होते.

८७.श्री. मनोहर हिरे, आयुक्त
८८.श्री. नितीन कापडणीस, उप–आयुक्त (मुख्यालय)
८९.श्रीम. प्राजक्ता कुलकर्णी, महापालिका सचिव
९०.श्री. राम जयस्वार, शहर अभियंता
९१.श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा
९२.डॉ. राजा रिजवाणी, वैद्यकिय आरोग्य अधिकारी
९३.श्री. संतोष जाधव, लेखाअधिकारी
९४.श्री. अशोक जाधव, सहा. मुख्य लेखा परिक्षक
९५.श्री. शैलेश दोंदे, प्र. कर निर्धारक व संकलक
९६.श्री. मनिष हिवरे, सहा. आयुक्त (सा. प्र. वि.)
९७.श्रीम. श्रध्दा बाविस्कर, प्रोग्रॅमर, ना. सु. के.
९८.श्री. महेंद्र धिंडे, कनिष्ठ अभियंता, विदयुत विभाग
९९.श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.

१. श्रीमती विशाखा सावंत

२. श्रीमती नर्गिस खान

३. श्री. अशोक रामरख्यानी

सायं. ४. ५५ वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ <u>विषय क्र. १ :–</u> महानगरपालिका कार्यक्षेत्रातील पाणीबाणी व सार्वत्रिक निवडणूक २०१७ करीता सुरक्षेच्या दृष्टीने मा. सचिव सुरक्षा रक्षक मंडळ मुंबई यांचेद्वारा १० सुरक्षा जवानांचा पुरवठा करणेस मान्यता देणे.

---

<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u> सदर विषयाबाबत कोण माहिती देणार.

<u>सुरक्षारक्षक, श्री. बाजीराव जाधव :–</u> सुरक्षा विभागामार्फत सुरक्षा रक्षक मिळणे कामी विविध विभागाकडुन महापालिकेच्या मलमत्तेच्या ठिकाणी सुरक्षिततेसाठी सतत मागणी होत असते परंतु सुरक्षा विभागाकडे सुरक्षा रक्षक मागणीपेक्षा कमी असल्याने मा. आयुक्त सो. यांच्या दिनांक ८/१०/२०१३ ,२७/११/२०१४ रोजीच्या मान्यतेने......

<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u> गोषवारा वाचून दाखवू नका, तो आमच्याकडेपण आहे. मान्यता कशाला पाहिजे त्याबाबत सांगा. सार्वत्रिक निवडणूक २०१७ साठी १० सुरक्षारक्षक पुरतील का?

<u>उपायुक्त (मुख्यालय), श्री. नितीन कापडणीस:–</u> आता तुम्ही या विषयाला मान्यता दिली तर, पुढच्या सभेत आणखी सुरक्षारक्षक नेमण्याचा प्रस्ताव आणण्यात येईल.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u> यात महत्वाचा विषय असा आहे की, आपल्या जेवढया पाण्याच्या टाक्या आहेत तिथे २४ तांस सुरक्षारक्षकांची आवश्यकता आहे. त्याबदद्ल आपण विषय का नाही आणत, आपल्याला

निवडणूकीचे पडले आहे. पण लोकांच्या जीवनाशी निगडीत सर्वात महत्वाचा असलेला विषय आहे हा, पाण्याच्या टाक्यांजवळ २४ तास सुरक्षारक्षक पाहिजेत. आणि मला वाटते प्रत्येक नगरसेवकाच्या प्रभागात एक एक पाण्याची टाकी आहे त्याठिकाणची अवस्था फार खराब आहे. म्हणुन याअनुषंगाने तुम्ही किती लवकरात लवकर आणखी, आपल्या किती टाक्या आहेत आणि किती सुरक्षारक्षक पाहिजेत असा प्रस्ताव पुढच्या सभेत आला पाहिजे.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—</u> आता १० सुरक्षारक्षक आपण मागणी करत आहात ते आधीच दिनांक ४/४/२०१६ पासुन ठेवले आहेत. जो प्रस्ताव आता तुम्ही आम्हाला सादर केला आहे त्याप्रमाणे, तर दिनांक ४/४/२०१६ च्या आधीसुध्दा हे सुरक्षारक्षक आपल्याकडे होते का?

<u>उपायुक्त (मुख्यालय), श्री. नितीन कापडणीसः—</u> हो, होते ना,

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—</u> किती वर्षापासून हे सुरक्षारक्षक आपल्याकडे आहेत, याबाबतची माहिती सदर प्रस्तावामध्ये दयायला हवी होती. सदर सुरक्षारक्षकांची नियुक्ती केव्हा संपुष्टात येणार आहे त्यानुसार सदर दिनांकाच्या आधी एक दोन महिने याबाबतचा प्रस्ताव सादर केला पाहिजे.

<u>उपायुक्त (मुख्यालय), श्री. नितीन कापडणीसः—</u> यापुर्वी नेमणूक केलेल्या सुरक्षारक्षकांचे प्रस्ताव विहीत मुदतीत सादर केले जातात.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—</u> मग आता हा प्रस्ताव आणला आहे १० सुरक्षारक्षकांचा त्यांची नेमणूक आधी केव्हा झाली होती.

<u>उपायुक्त (मुख्यालय), श्री. नितीन कापडणीसः—</u> महापालिकेत अधिका—यांवर हल्ला करण्याच्या मागे झालेल्या घटनांमुळे यांची नेमणूक केली होती.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—</u> म्हणजे सदर सुरक्षारक्षकांची नेमणूक दिनांक ४/४/२०१६ पासूनच आहे का? त्यापुर्वी ते नव्हते.

<u>उपायुक्त (मुख्यालय), श्री. नितीन कापडणीसः—</u> हो, हो, दिनांक ४/४/२०१६ पासून नियुक्ती केली आहे.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—</u> किती तासांची डयुटी दिलेली आहे.

<u>उपायुक्त (मुख्यालय), श्री. नितीन कापडणीसः—</u> ८—८ तासांची डयुटी दिलेली आहे.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—</u> १० सुरक्षारक्षक म्हणजे प्रत्यक्षात दिवसाला ३ सुरक्षारक्षक मिळतील. १० सुरक्षारक्षकांमध्ये काय होणार?

<u>उपायुक्त (मुख्यालय), श्री. नितीन कापडणीसः—</u> यांना शिफ्टमध्ये डयुटी दिलेली नाही.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरेः—</u> नाही, यांना ८—८ तासांची डयुटी दिलेली आहे. ते जनरल कार्यालयीन वेळेतच कार्यरत राहतील त्यामुळे १० च्या १० सुरक्षारक्षक मिळतात.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी</u> :— १० सुरक्षारक्षक मिळतात ठिक आहे यांना जो पगार दयावयाचा आहे ते कोण ठरवत असते.

<u>उपायुक्त (मुख्यालय), श्री. नितीन कापडणीसः—</u> शासनाची संस्था आहे. शासनाने स्थापन केलेल्या सुरक्षा रक्षक मंडळानेच निश्चित केलेल्या दरानुसार पगार दिला जातो.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी</u> :— ई निविदा पध्दतीने निविदा मागवून आपण नियुक्ती केली तर, सुरक्षारक्षक पुरवठा करणा—या विविध शासनमान्य संस्था आहेत त्यांचेकडून निविदा मागवल्यानंतर रू. १० हजार, रू. १२ हजार, रू. ८ हजार याप्रमाणे दर प्राप्त होवू शकतात. आता आपल्याला १० च सुरक्षारक्षक नेमायचे आहेत त्यामुळे चालेल परंतु पुढे जावून आपल्याला ५० सुरक्षारक्षक नेमावे लागतील, जसे पाण्याच्या टाकींवर रात्रंदिवस

सुरक्षारक्षक पाहिजेत त्यानंतर अधिकारी वर्ग जसे आयुक्त साहेब किंवा इतर अधिकारी यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सुरक्षारक्षक नेमावे लागतील. म्हणून जर शासनमान्य संस्थाकडून सुरक्षारक्षक घेतल्यास महापालिकेचे रू. ५ हजार , रू. ३ हजार पर्यंत पण आपण फायदा करू शकलो तर, ५० सुरक्षारक्षकांमागे आपण रू. दोन लाखांपर्यंत महापालिकेचा फायदा करू शकतो अशाप्रकारची पध्दत तुम्ही शोधली पाहिजे.

<u>उपायुक्त (मुख्यालय), श्री. नितीन कापडणीसः—</u> शासनाने स्थापन केलेल्या सुरक्षा रक्षक मंडळाकडूनच सुरक्षारक्षक नेमण्यात यावे असा शासननिर्णय झालेला आहे. त्यामुळे अन्य संस्थाकडून नियुक्ती करता येत नाही.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी</u> :— म्हणजे सुरक्षारक्षक मंडळाकडूनच सुरक्षारक्षक घेणे बंधनकारक आहे.

<u>उपायुक्त (मुख्यालय), श्री. नितीन कापडणीसः—</u> हो. नाहीतर महापालिकेवर एफ आय आर नोंदवला जावू शकतो.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी</u> :— इतर शासन मान्य संस्थाकडून आपण कर्मचारी घेतले तर आपण त्यांच्याकडून इतरही काम घेवू शकतो, व महापालिकेचा पैसाही वाचवू शकतो.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरेः—</u> महाराष्ट्र शासनाचा एक अधिनियम आहे, सुरक्षारक्षक नेमण्यासाठी सुरक्षारक्षक मंडळ जे स्थापन केलेले आहे. त्याच्या अनुषंगाने शासनाने धोरण ठरविले कि, ज्या शासकिय कार्यालयांना सुरक्षारक्षक नेमायचे आहेत त्यांनी शासनाने स्थापन केलेल्या मंडळाकडूनच सुरक्षारक्षक घेतले पाहिजेत, नाहीतर कापडनीस साहेब म्हणाले त्याप्रमाणे आपण एफ. आय. आर साठी पात्र होवू शकतो. त्याच्यातून एक मार्ग असा आहे की, मी त्यांना सांगितले होते की, आपल्याला जर सुरक्षारक्षकच घ्यायचे असतील तर ते त्या मंडळाकडूनच घेणे बंधनकारक आहे. सुरक्षारक्षकच्या ऐवजी दुसरे एखादे नांव देवून अशा कर्मचा—यांची आपण श्री. पुरस्वानी साहेब म्हणतात त्याप्रमाणे ई—निविदा पध्दतीने कर्मचारी घेतले तर त्यांचे वेतन कमी लागेल आणि त्यांच्याकडून काय काम करून घ्यायचे ते आपण ठरवू शकतो. तर असा एक मुदद्दा होता, दुसरा मुदद्दा असा कि, हे करण्यापेक्षा मी असा सल्ला दिला होता कि, प्रत्येक पाण्याच्या टाकीच्या बाजूला एक छोटेसं क्वार्टर जर आपण तिथे बांधले, आणि आपला सफाई कामगार आहे किंवा पाणीपुरवठा विभागाचे प्लंबर, वॉलमन आहेत त्यांना तिथे राहण्यासाठी जागा दिली तर, त्याच्या कुटूंबासोबत तो तिथे राहिल, त्यामुळे तिथे सुरक्षाहि मिळेल आणि त्या कर्मचा—याला राहण्यासाठी जागा मिळेल आणि महापालिकेचे पैसेदेखील वाचतील. अशाप्रकारे मी सेलवन साहेबांना तसा क्वार्टरचा प्रस्ताव तयार करा आणि त्याला मान्यता घ्या असे सांगितले होते. साधारणत: दोन रूम चे क्वार्टर असावेत.

<u>सदस्या, डॉ. निना नाथानी</u> :— हा विषय तर १० सुरक्षारक्षकांचा झाला पण ज्याठिकाणी पाण्याचा मुख्य स्त्रोत आहे त्याठिकाणीसुध्दा सुरक्षारक्षकाची गरज आहे. मी याबाबत आपल्याशी फोनवरूनसुध्दा बोलले आहे. आपण पाणीपुरवठा विभागातील अधिका—यांसोबत बैठकही घेतली होती. परंतु काहीही फरक पडलेला नाही. मेन टाकीला जोडलेल्या मेन पाईपलाईनला पाणी येत नाही आणि इतर दोन चार पाईप लाईन जोडलेल्या आहेत त्यांना चांगले पाणी येते. असे कसे?

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरेः—</u> महोदया जो म्हणत आहेत तो वॉल एमआयडीचा वॉल ओल्ड एमबीआरचा होता ना. तो उघडू देत नाही पाणी वाटपाच्यावेळी तिथे आपला माणूस का नाही ठेवत.

<u>सदस्या, डॉ. निना नाथानी</u> :— मागील दोन महिन्यांपासून पाण्याचा प्रश्न निर्माण झालेला आहे परंतु कोणतेही पाऊल उचलले नाही. मी खरोखर यासाठी चौकशीची मागणी करीत आहे.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरेः—</u> महोदया, सेलवन साहेबांच्या म्हण्ण्यानुसार आता जी पाण्याची समस्या निर्माण झाली आहे, त्यामुळे आता जे शहराला पाणी मिळत आहे त्यामध्ये आणखी वाढ करणे शक्य नाही.

<u>सदस्या, डॉ. निना नाथानी</u> :— गोल मैदानच्या टाकीला जी मेन पाईप लाईन जोडलेली आहे तिला अजिबात पाणी येत नाही. आणि इतर ४—५ पाईप लाईन जोडल्या आहेत त्याला पाणी मिळत आहे.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरेः— </u>तुम्ही ज्या पाईप लाईन म्हणत आहात त्या आता जोडण्यात आल्या आहेत का?

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी </u>:— जी सरळ पाईप लाईन गेली आहे. त्यावर तुम्ही वॉल बसवणार असे सांगितले होते त्याबदद्ल महोदया विचारत आहेत तो वॉल बसविला का?

<u>सदस्या, डॉ. निना नाथानी </u>:— कुठेही वॉल बसवला नाही, कोणत्याही पाईप लाईन्स कापलेल्या नाहीत, पाणी जसे जात आहे तसेच चालू आहे. त्यामध्ये आपण काहीही फरक केलेला नाही. त्यामुळे पाण्याची जी समस्या आहे ती चालूच आहे त्यामध्ये आम्हाला अजिबात सुविधा मिळालेली नाही. आपण बैठक घेतल्सास दोन महिने उलटून गेले त्यापैकी दुस—या बैठकीस मी उपस्थित होते परंतु यामध्ये आपण कोणताही मार्ग काढलेला नाही फक्त आश्वासन देत आहात,

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरेः— </u>आता जसे श्री. जमनादास पुरस्वानी साहेब म्हणाले कि, आपण घेतलेल्या बैठकीत जी सरळ पाईप लाईन जात आहे त्यावर आपण यांना वॉल बसविण्यास सांगितले होते, त्यापैकी दोन ते तीन लाईनवर वॉल बसविले आहेत, सेलवन साहेब किती ठिकाणी वॉल बसवायचे राहिले आहेत.

<u>कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा), श्री. सेलवन :— </u>काही ठिकाणी बसवले व काही एक—दोन ठिकाणी वॉल बसवायचे राहिले आहेत.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरेः—</u>यात असे ठरले होते कि जोपर्यत ओल्ड एमबीआरचे पाणी चालू राहते तोपर्यंत पाणी चालूच राहते तर त्यावर वॉल बसवून त्याला एक ठराविक वेळ निश्चित करा. तर त्यापैकी काही बसवले व काही राहिलेले आहेत असे त्यांचे म्हणणे आहे. तर ते वॉल बसवून टाका ना.

<u>सदस्या, डॉ. निना नाथानी </u>:— परंतु वॉल लावूनसुध्दा ज्या ठराविक वेळेत पाणी जायला पाहिजे तसे न होता त्याव्यतिरिक्तसुध्दा पाणी दिले जाते. पहिले पाणी इतर ठिकाणी पोहचते आणि नंतर ठरवलेल्या ठिकाणी दिले जाते.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी </u>:— याठिकाणी आधी २४ तांस पाणी होते.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरेः— </u>हो, आधी २४ तांस होते परंतु आता पाण्याची समस्या निर्माण झाल्याने त्याठिकाणी वॉल बसवुन पाण्याची ठराविक वेळ निश्चित करून त्याप्रमाणे पाणी सोडावे असे आपण बैठकीत म्हटले होते. सेलवन साहेब, आता राहिलेले वॉल बसवा आणि कायमस्वरूपी त्याठिकाणी आपले कर्मचारी नेमून दया. ज्यावेळी ओल्ड एमबीआरचे पाणी चालू असेल त्यावेळी तो माणूस तिथे राहिल आणि वेळेनुसार वॉल सुरू करेल.

<u>सदस्या, डॉ. निना नाथानी </u>:— साहेब, मी असेपण सांगितले होते की, हि जी पाईप लाईन येत आहे तिथपासून मध्ये मध्ये ब—याच प्लेटस् लावण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे पाणी गोलमैदानच्या समोरच्या प्रभागांमध्ये वळत आहे. आणि आमच्याकडे पाणी पोहचतच नाही याबदद्ल मी आपणाला वारंवार सांगत आहे. पण तरीही अद्यापपर्यंत त्या प्लेटससुध्दा काढून टाकलेल्या नाहीत किंवा काहीच केलेले नाही. आणि वॉल सुरू करण्याचे कामसुध्दा अशाप्रकारे केले जाते कि, सर्व पाणी समोरच्या प्रभागांना जात आहे आणि पाठीमागचे प्रभाग पाण्यावाचून राहत आहेत. तुम्ही दररोज जावून पहा, ज्या दिवशी मी आरडाओरड करेन त्याच्या दुस—या दिवशी थोडेफार पाणी येते. असे दोन महिन्यांपासून चालले आहे. मला खात्री आहे पुढेही असेच चालू राहणार आहे. आपण काहीही करणार नाही. आम्हाला फक्त आश्वासन देणार बस्स्. सदरचा मुदद्ा आम्ही आता महासभेसमोर आणणार आहोत.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरेः— </u>सेलवन साहेब प्लेटस लावून ब्लॉक केले म्हणजे काय केले.

<u>सदस्या, डॉ. निना नाथानी </u>:— साहेब, तुम्ही बघा त्याठिकाणी आतासुध्दा प्लेटस लावलेल्या आहेत. त्यामुळे पाणी येत नाही. मेन टाकीतुन पाणी सोडले जाते तर आमच्यापर्यंत पाण्याचा साधा थेंबसुध्दा पोहचत नाही. त्यात प्लेटस लागलेल्या आहेत तुम्ही कधी पाईप लाईन तपासली का?

<u>कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा), श्री. सेलवन :—</u> पाईप लाईन तपासली आहे.

<u>सदस्या, डॉ. निना नाथानी</u> :— पाईप लाईन कशी तपासली तुम्ही मग नळांना पाणी का नाही येत. माझ्या प्रभागातल्या दोन चार घरात चौकशी करा पाणी येत का त्यांच्याकडे, एकपण माणूस पाणी येते म्हणून सांगणारा भेटणार नाही.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>महोदया, आम्ही आपली भावना समजत आहोत, हि सभा संपल्यानंतर आपण आयुक्तांसोबत, सेलवन साहेब इत्यादी बैठक करू या विषयावर चर्चा करू.

<u>सदस्या, डॉ. निना नाथानी</u> :— तुम्हीच विषय काढलात मी त्यावर पूढे बोलले इतकेच.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u> नाही, आपला विषय सुरक्षारक्षकांचा होता, मी पाण्याच्या टाकीवर सुरक्षारक्षक नेमण्याबदद्ल बोलत होतो.

<u>सदस्या, डॉ. निना नाथानी</u> :— अशा किती बैठका झाल्या, परंतु मार्ग काही निघत नाही.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u> आता हि सभा संपल्यानंतर आपण आपल्या प्रभागातील समस्येबदद्ल चर्चा करू.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे:—</u> हे सुरक्षारक्षक नेमून दया आणि आता इतर ठिकाणी सुरक्षारक्षकांची आवश्यकता आहे त्यानुसार ई—निविदा पध्दतीने कंत्राट पध्दतीने नेमणूका करण्यासाठी तेदेखील दर मागविण्यात यावेत तसेच आपण जी व्हार्टरर्सची चर्चा केली आहे त्यासाठीदेखील हळूहळू प्रस्ताव तयार करावा. आता आपल्याकडे एकूण २८ ते ३० पाण्याच्या टाक्या असतील तर वर्षामध्ये ४—५ क्वार्टरर्स बांधून घेतले तरी पुढच्या तीन वर्षामध्ये तुमचे सगळे क्वार्टरर्स तयार होतील.

<u>महापालिका सचिव:—</u> सदर विषय पारीत करण्यात यावा का?

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u> सदर विषयाच्या ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता करण्यात यावी.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १** :— महानगरपालिका कार्यक्षेत्रातील पाणीबाणी व सार्वत्रिक निवडणूक २०१७ करीता सुरक्षेच्या दृष्टीने मा. सचिव सुरक्षा रक्षक मंडळ मुंबई यांचेद्वारा १० सुरक्षा जवानांचा पुरवठा करणेस मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

सुरक्षा विभागामार्फत सुरक्षा रक्षक मिळणे कामी विविध विभागाकडुन महापालिकेच्या मलमत्तेच्या ठिकाणी सुरक्षिततेसाठी सतत मागणी होत असते परंतु सुरक्षा विभागाकडे सुरक्षा रक्षक मागणीपेक्षा कमी असल्याने मा. आयुक्त सो. यांच्या दिनांक ८/१०/२०१३ ,२७/११/२०१४ रोजीच्या मान्यतेने तसेच मा. स्थायी समिती ठराव क्रमांक ६३ दिनांक १७/१२/२०१३ व ठराव क्रमांक ६६ दिनांक ३०/१२/२०१४ अन्वये उल्हासनगर महानगरपालिकेच्या मालमत्तेचे रक्षण करणेसाठी मा. सचिव सुरक्षा रक्षक मंडळ सानपाडा (मुंबई ठाणे जिल्ह्या करिता) यांचे कडील २१ सुरक्षा रक्षक घेण्यात आलेले असुन ते सध्या महापालिका सेवेत कार्यरत आहेत.

उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रात पाण्याची आणिबाणी लक्षात घेता संप मार्चा, घेराव, धरणे, व आंदोलने या सारखे प्रकार मोठया प्रमाणावर होत आहेत. तसेच सार्वत्रिक निवडणूक २०१७ जवळ आलेली असुन करीता अधिका—यांना अंगरक्षक तसेच मालमत्तेच्या संरक्षणासाठी यापूढे सुरक्षा रक्षकांची आवश्यकता लक्षात घेता तसेच उल्हासनगर महानगरपालिकेच्या मालमत्तेमध्ये दिवसें दिवस विस्तार होत असल्याकारणाने सुरक्षिततेच्या दृष्टिकोणातुन महापालिका प्रशासकिय भवन, चार प्रभाग समिती, इत्यादी ठिकाणी सुरक्षा रक्षकांची अधिक आवश्यकता आहे.

महापालिका सुरक्षेच्या दृष्टीने शासनाने स्थापन केलेल्या सुरक्षा रक्षक मंडळाकडुन १० सुरक्षा जवान घेणे कामी दिनांक ४/४/२०१६ अन्वये मा आयुक्त सो यांची कार्योत्तर मंजुरीचा प्रस्तावास मान्यता प्राप्त झालेली आहे. प्रती सुरक्षा रक्षकास एक महिन्या करीता १७,७७२.९५/— तर ९ सुरक्षा रक्षकांना १,५९,९५६.५५/— तर ९ सुरक्षा रक्षकांना एका वर्षाकरीता १९,१९,४७८.६०/— तसेच एक सुरक्षा सुपरवायझर करीता एका महिण्याला १९,३०६.५०/— तर एक सुपरवायझरसाठी १२ महिण्याकरीता २,३१,६७८.००/— एकुण १० सुरक्षा जवाना करीता १२ महिण्यासाठी २१,५१,१५६.६०/— येवढा खर्च अपेक्षीत आहे.

मा.सचिव सुरक्षा रक्षक मंडळ सानपाडा (मुंबई ठाणे जिल्ह्याकरिता) यांचे कडुन घेण्यात येणा—या सुरक्षा रक्षकांच्या पगारात दर दोन वर्षानी व इतर भत्यात दर सहा महिन्याने वाढ होत असते. त्याच प्रमाणे मुळ वेतन +विशेष भत्ता/महागाई भत्ता = किमान वेतन, नोंदीत सुरक्षा जवानांचा किमान वेतनावर मुळ वेतन + विशेष भत्ता = किमान वेतन मुख्य मालकाने ४६.७५ टक्के दराने लेव्ही देणे बंधनकारक आहे.

त्याच प्रमाणे घर भाडे भत्ता, प्रवास भत्ता व अतिकालीक भत्ता या वर ४.७५ टक्के दराने लेव्ही देणे मुख्य मालकाला बंधनकारक राहिल. तसेच ज्या विभागामध्ये सुरक्षा रक्षकांना कामगार विमा योजना लागु नाही. अशा मुख्य मालकांनी ४३ टक्के लेव्ही किमान वेतनावर ( मुळ वेतन +विशेष भत्ता/महागाई भत्ता = किमान वेतन,) देणे बंधनकारक राहिल.

करीता मा. सचिव सुरक्षा रक्षक मंडळ सानपाडा (मुंबई ठाणे जिल्ह्याकरिता) यांचे कडुन १० सुरक्षा जवान पुरवठा करून एकुण ०९ सुरक्षा रक्षक व ०१ सुपरवाझर एक वर्षा करीता घेणे अपेक्षीत आहे. त्यावर येणारा खर्च महापालिका अंदाजपत्रकातील अ. १(२४) आस्थापना खर्च रोजंदारी/मानधन इत्यादी या लेखाशिर्षकातील मंजुर तरतुदीतुन भागविणेत येईल.

सबब महानगरपालिका मुख्यालय सुरक्षेच्या दृष्टीने दिनांक १३/०४/२०१६ पासुन सुरक्षा मंडळाकडुन एक वर्षापर्यंत पुरवठा करून घेणेत आलेल्य सुरक्षा रक्षकांना एक वर्षापर्यंत नियुक्तीस मान्यता मिळणेसाठी मा. स्थायी समितीपुढे प्रस्तावित.

<u>स्थायी समिती ठराव क्र. :—२१</u> <u>दिनांक : १३/६/२०१६</u>

सूचकाचे नांव :—श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नांव :—श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही स्थायी समिती महानगरपालिका कार्यक्षेत्रातील पाणीबाणी व सार्वत्रिक निवडणूक २०१७ करीता सुरक्षेच्या दृष्टीने दिनांक १३/०४/२०१६ पासुन एक वर्षापर्यंत मा. सचिव सुरक्षा रक्षक मंडळ मुंबई यांचेद्वारा १० सुरक्षा जवानांचा पुरवठा करणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. २ वाचुन दाखवितात

———————————————————————————————————————————

**विषय क्र. २ :–** अभय योजना २०१४–२०१५ व २०१५–२०१६ चे कालावधीत मालमत्ता कराचा भरणा केलेल्या मिळकतधारकांना तांत्रिक बाबीमुळे योजनेचा लाभ न मिळाल्यामुळे त्यांना संबंधित वर्षामधील विलंब शस्ती माफ करुन वर्ष २०१६–२०१७ करीता सुधारीत बिल लागू करणे.

———————————————————————————————————————————

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी</u> :– सदर विषयाबदद्ल कोण माहिती देणार.

<u>प्र. कर निर्धारक व संकलक, श्री. शैलेश दोंदे</u> :– सन २०१४–२०१५ व २०१५–२०१६ ची अभय योजना होती. त्यामध्ये सवलतीची गणना झाली नव्हती. अशी ८ प्रकरणे आहेत, तांत्रिक अडचणींमुळे रू. ५० ते ५२ लाखांचा .....

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u> तुम्ही ही मालमत्ता करासाठी लागू असलेल्या अभय योजनेचे सांगितले, पाणीपुरवठा विभागासाठी सुरू केलेल्या अभययोजनेचे पण याबरोबर सांगा, अभय योजना कधी चालू झाली, किती फायदा झाला, किती रक्कम जमा झाली, वारंवार सांगितले होते तेव्हा, लोकांना एक महिना अगोदर तरी बिले पोहचली पाहिजेत, २०,२२, २५ वर्षापुर्वीची बिले आहेत ती लोकांना पोहचलेली नाहीत, मी माझ्या प्रभागातील लोकांचा अभिलेख पाहिला, त्यातल्या कोणालाही बिले दिलेली नाहीत. मालमत्ता करासाठी आपण तीनवेळा अभय योजना लागू केली, पाणीपुरवठा विभागासाठी हि पहिल्यांदाच अभययोजना लागू केली होती त्यामुळे माझा असा विचार आहे कि, पाणीपुरवठा विभागाच्या अभययोजनेस आता अजून १५ दिवस वाढवुन देवू, आयुक्त साहेब आपल्या अधिकारातसुध्दा मुदत वाढवून देवू शकतात. पाणीपुरवठयाच्या ज्या चुका झाल्या त्या मी सांगत आहे, विहीत मुदतीत त्यांना बिले पोहचलीच नाहीत तर ते भरतील कसे?

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी</u> :– पाणी पुरवठा विभागाची माहिती कोण देण्यासाठी इथे आहे का? कारण मालमत्ता कर विभागाची अभय योजना अगदी निरपेक्षपणे चालली होती, त्यांच्या देयकात नमुद केलेले होते कि, क्षमापित केलेली रक्कम एवढी आहे ती वजा करून उर्वरित रक्कम भरून टाका. तर पाणीपुरवठयाचे तुम्ही पाहिलात तर असे कोणते बिल येत नाही कि ज्यामध्ये लिहिले असेल कि तुम्हाला एवढा दंड लावलेला आहे म्हणुन. कारण माझ्याकडे एक विषय आला होता त्यामध्ये रू.१२ लाख एवढे बिल दिलेले होते. बरे झाले तो व्यक्ति माझ्याकडे आला त्यावेळेस मी आयुक्त साहेबांना बोललो, त्यानंतर कापडणीस साहेबांना बोललो, तेव्हा वजा जाता त्या माणसाचे फक्त रू. ८८ हजार बिल निघाले. त्यावेळेस त्याने लगेच रू. ८८ हजार भरले. परंतु तो माणूस कमीतकमी १५ दिवस जेव्हापासून अभय योजना लागू झाली तेव्हापासून संबंधित अधिका–यांच्यामागे फिरत होता. कि माझे बिल कमी करून दया, पण त्या अधिका–याने, मी इथे नांव नाही घेत त्या अधिका–याचे, आता आपले काम झाले, आपल्याला कामाशी मतलब होता, त्या माणसाने पैसे भरले, कापडनीस साहेबांची मदत घेतली त्यावेळी, पण एक अधिकारी सांगत होता, दिड लाख, चार लाख भरावे लागतील. लोक फिरून फिरून या योजनेपासून वंचित राहिले होते. मालमत्ता करासाठी आम्ही बोलणार नाही परंतु पाणीपुरवठयासाठी अभय योजनेची मुदत आपण वाढवू शकलात तर बरे होईल.

**आयुक्त, श्री. मनोहर हिरे:—** अशा वैयक्तिक केसेस स्थायी समितीपुढे पाठवणार ना?

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—** या अनुषंगाने मी बोलेन ज्या मालमत्ताधारकांनी मालमत्ता कराची देयके भरली नाहीत त्यांच्या मालमत्ता जप्त करा. याबदद्ल आम्ही काही बोलणार नाही, कारण यासाठी आम्हीदेखील हैराण झालो आहोत. कडक कारवाई करा, यामध्ये काय होते माहित आहे, जो कडक कारवाई करणारा अधिकारीच सांगतो त्यांना कि नगरसेवकांकडे जा, काही कर्मचारी आहेत असे पण. शासन म्हणून आम्ही प्रशासनाला सांगत आहे, दुर्देव असे कि, आम्ही सांगतो तरी तुम्ही काही करत नाही, महसुलाचे उत्पन्न बुडणे यापेक्षा मोठा गुन्हा नाही.

**महापालिका सचिव:—** सदर विषय पारीत करण्यात यावा का?

**काही सदस्य:—**पास,पास.......

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—** सदर ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त पारीत होण्याची वाट न पहाता करण्यात यावी.

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. २** :—अभय योजना २०१४—२०१५ व २०१५—२०१६ चे कालावधीत मालमत्ता कराचा भरणा केलेल्या मिळकतधारकांना तांत्रिक बाबीमुळे योजनेचा लाभ न मिळाल्यामुळे त्यांना संबंधित वर्षामधील विलंब शस्ती माफ करुन वर्ष २०१६—२०१७ करीता सुधारीत बिल लागू करणे.

प्रस्तावना

वित्तीय वर्ष २०१४—२०१५ करीता मालमत्ता कर व पाणीपट्टी (निवासी वापर होत असलेल्या मिळकतीवरील) वसुलीच्या दृष्टीने दिनांक १ फेब्रुवारी २०१५ ते दिनांक ३१ मार्च २०१५ तसेच दिनांक १५/४/२०१५ ते ३०/४/२०१५ या कालावधीत ''अभय योजना'' राबविण्यात आली. त्याअंतर्गत करदात्याकडे प्रलंबित असलेल्या मुळ रक्कमेचे एकरक्कमी १०० टक्के अभिवादन केल्यास प्रलंबित रक्कमेवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसूची ड मधील प्रकरण ८ (कराधान नियम) मधील नियम ४१ नुसार प्रतिमाह २ टक्के दराने आकारण्यात येणारी संपुर्ण विलंब शास्तीची रक्कम माफ करण्यात आली आहे.

परंतु काही तांत्रिक बाबीमुळे अभय योजनेच्या कालावधीत कराचा भरणा केलेल्या काही मिळकतधारकांस विलंब शास्तीची रक्कम माफ न झाल्यामुळे सदरची रक्कम पुढील वर्षाचे कर बिलात थकबाकी रकान्यात दर्शविण्यात आली आहे. तसेच विलंब शास्ती माफ करणेबाबत कर विभागात पुढीलप्रमाणे अर्ज प्राप्त झाले आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | मालमत्ता क्रमांक | अर्जदाराचे नाव, पत्ता व अर्ज दिनांक | अभय योजनेचा कालवधी | कराचा भरणा केल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | 36BO006544800<br>[36/0744] | श्रीम. विना एस. सचदेव,<br>बॅरेक नं. १०१३/२,<br>उल्हासनगर—३<br>अर्ज दि. १५/०९/२०१५ | १/२/२०१५ ते<br>३१/३/२०१५ | २८/३/२०१५ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | 33CO00617670 0<br>[ 33/1091] | श्रीम. सुनंदा अशोक चव्हाण, बॅरेक नं. ९०६ मागे,<br>सेक्शन २०, उल्हासनगर–३<br>अर्ज दि. २८/१०/२०१५ | १/२/२०१५ ते<br>३१/३/२०१५ | २९/३/२०१५ |
| ३ | 56DI01195220 0<br>[56/1807] | श्री. अमित एस. छाब्रिया<br>(व्होल्डर)<br>बॅरेक नं. २०२९, रूम नं.१७,१८,१९,२० साई आत्माराम अपार्टमेंट, ६ वा मजला, फ्लॅट नं. ६०४, उल्हासनगर–५<br>अर्ज दि. ३१/०३/२०१५ | १/२/२०१५ ते<br>३१/३/२०१५ | २७/३/२०१५ |
| ४ | 53DI01869530 0<br>[53/1010] | श्री. धरमदास विशिनदास आर बॅरेक नं. १७४३, रूम नं. २, उल्हासनगर–५<br>अर्ज दि. १५/४/२०१५ | १/२/२०१५ ते<br>३१/३/२०१५ | ३०/३/२०१५ |
| ५ | 50DI01081640 0<br>[50/0751] | किरण प्रल्हाद राजपुत (द्वारा)<br>सरोज प्रल्हाद राजपुत<br>ब्लॉक ए २५८/५१६, कुर्ला कॅम्प, उल्हासनगर–४<br>अर्ज दि. ४/४/२०१५ | १/२/२०१५ ते<br>३१/३/२०१५ | १६/३/२०१५ |
| ६ | 30CO00586550 0<br>[30/5095] | श्री. रविंद्रा आर. शर्मा<br>हरी दर्शन अपार्टमेंट, ५ वा मजला, फ्लॅट नं. ५०३, उल्हासनगर–३<br>अर्ज दि. ३१/३/२०१५ | २०/४/२०१५ ते<br>११/५/२०१५ | २/५/२०१५ |
| ७ | 16BI01581470 0<br>[16/0054] | श्रीम. नानकीबाई इसरदास जैसवानी<br>बॅ. नं. ३३३, रूम नं. ३, उल्हासनगर–१<br>अर्ज दि. १२/०५/२०१५ | २०/४/२०१५ ते<br>११/५/२०१५ | ११/५/२०१५ |
| ८ | 53DI01134720 0<br>[53/0247] | श्री. वरूमल के. भाटीया<br>ब्लॉक सी–७९४, रूम नं. १५८७, उल्हासनगर–५<br>अर्ज दि. १०/०३/२०१६ | १/२/२०१५ ते<br>३१/३/२०१५ | २९/३/२०१५ |

उक्त बाबी पाहता, मिळकतधारकांनी दिनांक १ फेब्रुवारी २०१५ ते दिनांक ३१ मार्च २०१५ तसेच दिनांक १५/४/२०१५ ते ३०/४/२०१५ या कालावधीत मालमत्ता कर व पाणीपट्टी (निवासी वापर होत असलेल्या मिळकतीवरील) प्रलंबित असलेल्या मुळ रक्कमेचे एकरक्कमी १०० टक्के भरणा केल्यानंतर त्यांना अभय योजना अंतर्गत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसूची ड मधील प्रकरण ८ (कराधान नियम)

मधील नियम ४१ नुसार प्रतिमाह २ टक्के दराने आकारण्यात येणारी संपुर्ण विलंब शास्तीची रक्कम माफ करणे आवश्यक आहे.

तरी अभय योजना २०१४–२०१५ व २०१५–२०१६ चे कालावधीत मालमत्ता कराचा भरणा केलेल्या परंतु तांत्रिक बाबींमुळे योजनेचा लाभ न मिळालेल्या उक्त मिळकतधारकांना संबंधित वर्षामधील विलंब शास्ती माफ करून वर्ष २०१६–२०१७ करीता सुधारीत बिल लागु करणेसाठी मंजुरीकरीता स्थायी समितीपुढे शिफारस करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. २२ दिनांकः– १३/६/२०१६

सुचकाचे नाव :– श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :– श्री. विजय पाटील

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार अभय योजना २०१४–२०१५ व २०१५–२०१६ चे कालावधीत मालमत्ता कराचा भरणा केलेल्या मिळकतधारकांना तांत्रिक बाबीमुळे योजनेचा लाभ न मिळाल्यामुळे त्यांना संबंधित वर्षामधील विलंब शास्ती माफ करुन वर्ष २०१६–२०१७ करीता सुधारीत बिल लागू करण्यास मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ३ :–** वर्ष २०१६–१७ करीता पावसाळयापुर्वी उल्हासनगर शहरातील प्रभाग क्षेत्र क्र.१ ते ४ मधील रस्त्यांवरील खड्डे भरणेच्या कामाची निविदा कार्यवाही करणेस मान्यता देणे.

---

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :– सदर विषयाचे प्राकलन कोणी बनविले आहे. हे प्राकलन आपल्या नेतृत्वाखाली तयार झाले आहे का?

शहर अभियंता, श्री. राम जयस्वार :– हो, आम्ही तयार केले आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी** :— शहर अभियंता आहात ना आपण, हे प्राकलन आपल्या नेतृत्वाखाली तयार झाले आहे कि, तुम्ही येण्याआधी तयार झाले होते,

**शहर अभियंता, श्री. राम जयस्वार** :— हे प्राकलन आम्ही आता तयार केले आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी** :— उल्हासनगर शहरातील प्रभाग क्षेत्र क्र.१ ते ४ मधील रस्त्यांवरील खड्डे भरणेच्या कामाची निविदा कार्यवाही करणेसाठी जे प्राकलन तयार केले आहे. त्यामध्ये प्रभाग क्र. १ साठी रु. ३९,१८,०७२/—, प्रभाग क्र. २ साठी रु. ६३,८३,२४८/—, प्रभाग क्र. ३ साठी रु. ८५,२०,५८६/—, प्रभाग क्र. ४ साठी रु. १,४५,२९,५२५/— एवढी तर जर हि प्राकलने तयार होतात आणि त्यांचे कार्यादेश दिले जातात, ई निविदा होईल, निविदा निघतील, ठेकेदार येतील, ठेकेदार काम करेल, तर आपल्या अंदाजाने तो ठेकेदार जास्तीत जास्त किती वाढीव काम करू शकेल. समजून घ्या कि, हे प्राकलन आहे रू. ४० लाखाचे त्यानंतर तुम्ही त्याला विनंती केली कि आणखी दोन खडड्े भरून घ्या. तर जास्तीत जास्त किती काम वाढवू शकता.

**शहर अभियंता, श्री. राम जयस्वार** :— निविदेतील अटीनुसार १० टक्केपर्यंत वाढीव काम करता येईल त्यापेक्षा जास्त असेल तर मा. आयुक्त यांच्या परवानगीने कार्यवाही करण्यात येईल.

**सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी** :— आयुक्त साहेब, किती टक्क्यापर्यंत परवानगी देणार.

**आयुक्त, श्री. मनोहर हिरे**:— निविदेतील अटीनुसार १० टक्के वाढ करू शकतो, मागील वर्षाची फाईलसुध्दा मी पाहिली आहे.  आता आपले हे एकुण ३.३३ कोटीचे काम अंतिम होते तेव्हा ते वाढून पावणेपाच कोटीपर्यंत जाते. मग पुढची वाढीव रक्कम मान्यतेसाठी स्थायी समितीपुढे येते. हे असे प्रत्येक वेळेस होत असते.

**सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी** :— आयुक्त साहेब आम्ही आपणांस मनाई तर केली नाही ना कि तुम्ही रू. ३.३३ कोटीचेच बनवा रू.४ कोटीचे नका बनवू म्हणून. आता यांनी रू.४० लाखाचे काम कॅम्प नं. १ साठी तयार केले आहे. आपल्याला वाटते की, रू.४० लाखात काम होईल. कॅम्प नं. १ च्या बसस्टॉपच्या रस्त्याला एवढे खडड्े आहेत, त्याठिकाणचे पाच वर्षापासून खडड्े भरण्याचे काम झालेले नाही. त्याचे कारण काय ते तुम्हाला सांगतो मी, श्री. जितू, अभियंता इथे उभे आहेत ते तुम्हाला सर्व माहिती देतील याबदद्ल.

**कनिष्ठ अभियंता, श्री. जितू चौथानी** — साहेब, डिफेक्ट लायबिलीटी, ठेकेदाराला काळया यादीत का टाकले नाही.

**सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी** :— त्याचे देयक अदा केले का? तुम्ही थांबा आधी, मला बोलू दया, मग तुम्ही सांगा, तुमच्या सर्व चुकापण सांगतो मी,  रू. ४० लाखाचे प्राकलन पाचवर्षापुर्वी कॅम्प नं. १ येथील बसस्टॉपचा संपुर्ण रस्ता तयार करण्यासाठी तयार केले होते. त्यांस मान्यता मिळाली, त्यावर निविदा काढली, कार्यादेश दिले, परंतु साडेचार वर्षामध्ये तेथील काम पुर्ण झाले नाही. फक्त रस्त्याच्या बाजूच्या नाल्या तयार झाल्या त्यालासुध्दा पाच वर्ष लागली. खडड्े भरण्याचे काम झाले नाही आणि याकारणास्तव मी यांना सांगितले कि, ठेकेदार रस्त्याचे काम करत नाही तर तुम्ही खडड्े भरण्याचे काम तरी करा. एका ठेकेदाराला जर एका ठिकाणच्या रस्त्याचे काम दिलेले आहे. तर दुस—या प्राकलनात त्या रस्त्यावरील काम झालेले नाही तरी पुन्हा घेतलेले नाही. मागील ५ वर्षापासून खडड्े भरण्याचे काम झालेले नाही. यांना विचारले कि, तो ठेकेदार काम करत नाही तर काय, ते काम होणारच नाही का?, तर हे सांगतात नाही, ज्या ठेकेदाराला काम दिले आहे त्यानेच ते करून दयायचे आहे. त्याचे प्राकलन तयार होणार नाही,  या पाच वर्षात तुम्ही कॅम्प नं. १ च्या बसस्टॉपच्या रस्त्यावरील खडड्े भरण्यासाठी कधी प्राकलन तयार केले आहे का?

**कनिष्ठ अभियंता, श्री. जितू चौथानी** — जेवढे काम केले होते तेवढयाचेच देयक देण्यात आले आहे.

**सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी** :— एखादा ठेकेदार जर काम करत नाही तर शहरातील नागरीकांनी ते भोगायचे, शेवटपर्यंत तुम्ही काय कार्यवाही केली, काय केले त्याचे देयक तयार केले. रस्त्यांवरील खडड्े भरा. आता एक

सांगा, तुम्ही निविदा प्रक्रीया केली, ठेकेदाराने निविदा भरली, लोकांसमोर बेंडबाजा वाजवला, आपल्या शहरातील आमदार आले, खासदार आले, नारळ फोडले, आपण सगळं केलं, लोकांमध्ये उत्साह निर्माण केला कि, रस्त्याचे काम होणार आहे म्हणून, त्यानंतर रस्ता बनण्याचे तर बाजूलाच राहिले, लोक म्हणू लागले कि, तुम्ही रस्ता बनवणार होतात, रस्ता बनणे तर दुरचे राहिले परंतु प्रत्येक वर्षी रस्त्यावरील खडड्े भरण्याचे काम व्हायचे तेदेखील मागील ४ वर्षापासून बंद झाले आहे.

<u>सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भूल्लर</u> :– रू. ३९ लाखात कॅम्प नं. १ चे काम होणे शक्यच नाही.

<u>सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी</u> :– कॅम्प नं. १ साठी रू. ३९ लाखाचे प्राकलन तयार केले आहे. त्यात काम होणारच नाही, नंतर पुढे रू. ५० लाखापर्यंत वाढीव काम होईलच. १० टक्क्यापेक्षा वाढीव काम होवू दयायचेच नाही.

<u>कनिष्ठ अभियंता, श्री. जितू चौथानी –</u> मे. झा चे काम बाकी आहे.

<u>सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी</u> :– आता पुढच्या विषयात तुमच्या आणखी एका प्राकलनावर मी बोलणार आहे, आता नाही बोलत, तो विषय आला की बोलेन त्यावर. तुरूंगात जायला लागेल असे काम आपण केले आहे, आपणसुध्दा जाल आणि सदस्यांनासुध्दा पाठवाल. या सभेतच तुम्ही ते काम आणले आहे, दाखवतो ते तुम्हाला मी, तुम्ही १० टक्केपेक्षा वाढीव कामास मंजूरीच देवू नका. स्थायी समितीने असा ठराव पारीत करावा कि, कॅम्प नं. १,२,३,४ साठी तयार केलेल्या प्राकलनाच्या १० टक्के वाढीव कामास मंजूरी देण्यात येईल त्यापुढील वाढीव कामास अनुमती देण्यात येणार नाही. नव्याने निविदा प्रक्रीया करण्यात येईल, नाहीतर प्राकलन तयार करून आणतात रू. ३९ लाखाचे, ठेकेदार काम करतो रू. १ करोडचे आणि मग रू. ६० लाखाच्या वाढीव रक्कमेस मान्यता मिळणेसाठी विषय स्थायी समितीपुढे आणला जातो. १० टक्क्यापेक्षा वाढीव कामास मनाई करण्यात यावी.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे:–</u> हे बघा, फक्त मतितार्थ एवढाच कि, रू. ३.३३ करोड मध्ये जास्तीत जास्त १० टक्के वाढ करण्यात यावी आणि त्यात जास्तीत जास्त रस्त्यावरील खडड्े भरण्याचे काम झाले पाहिजे. नाहीतर तर त्याच्याकडून इतर सर्व कामे करून घेतली जातात.

<u>सदस्य, श्री..राजेंद्रसिंह भूल्लर</u> :– मी ठरावात घालावयाच्या अटी वाचून दाखवतो.

१. प्रभाग समिती १ ते ४ मध्ये प्रत्येक वाढीव खर्चास १० टक्के पेक्षा जास्त वाढीव कामास अनुमती देणार नाही.
२. चारही प्रभागांसाठी वेगवेगळया निविदा काढल्या जाव्यात.
३. महापालिका क्षेत्रात ३० किलोमिटरच्या आत कंपनीचे अस्पाट प्लांट असले पाहिजे. आणि त्याबाबत तसे प्रमाणपत्र कार्यकारी अभियंता यांच्याकडुन घेवुन निविदेच्यावेळी अपलोड करायचे आहे, जर तसे केले नाही तर त्यांची निविदा मान्य केली जाणार नाही.
४. जॉईंट वेंचरला परवानगी नाही.
५. क्युबीक मिटरवर बिलींग न होता स्केअर मिटर/ मेजरमेंट वर करता येईल.
६. पार्टोलच्या कामासाठी कल्याण महापालिकेने जे आयटम घेतले आहेच तेच आयटम लागु होईल.

हा कागद घ्या आणि त्यामधील अटी ठरावात  नमुद करा.

<u>सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी</u> :– हो, प्रभागसमितीनिहाय चार वेगवेगळया निविदा मागविण्यात याव्यात.

<u>सदस्या, श्रीम.लिलाबाई आशान</u> :– आमच्या कॅम्प नं. ४ मध्ये काम होतच नाहीत, तर आता काम सुरू करायचे झाले तर आमच्या येथुन आधी सुरूवात करा.

<u>महापालिका सचिव :–</u>मी ठराव वाचून दाखविते.

<u>कनिष्ठ अभियंता, श्री. जितू चौथानी –</u> ठरावात नमुद केल्याप्रमाणे करावयाचे झाल्यास अंदाजपत्रक वाढेल.

<u>शहर अभियंता, श्री. राम जयस्वार</u> :– आपण आता हि प्राकलने तयार केली आहेत ती, क्युबिक मिटरप्रमाणे तयार केली आहेत. ठरावात नमुद केलेल्या अटीनुसार स्क्वेअर मिटरप्रमाणे माप घेतले तर त्यासाठी परत प्राकलने तयार करावी लागतील.

<u>**सदस्य, श्री..राजेंद्रसिंह भूल्लर**</u> :— तुम्ही आणलेली प्राकलनेच बरोबर नाहीत.

<u>**आयुक्त, श्री. मनोहर हिरे:—**</u> स्क्वेअर मिटर फायदयाचे आहे कि, क्युबिक मिटर.

<u>**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—**</u> कल्याणला चांगल्या प्रतीचे काम होते त्यामुळे कल्याणला जसे होते त्याप्रमाणे घ्या.

<u>**शहर अभियंता, श्री. राम जयस्वार**</u> :— मी बघून घेतो, जास्त तफावत असेल तर पुन्हा प्राकलने तयार करावी लागतील.

<u>**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—**</u> निविदा किती दिवसांत होतील.

<u>**सदस्य, श्री..राजेंद्रसिंह भूल्लर**</u> :— बोलतात काही आणि होणार काहीच नाही. जर आताच तुम्ही मापाविना काम सुरू कराल ना तर लगेच गाडया पळवायला सुरूवात होईल.

<u>**आयुक्त, श्री. मनोहर हिरे:—**</u> स्क्वेअर मिटर घ्या, त्यात फायदा होईल, कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे पाहिले तर पुन्हा स्थायी समितीपुढे प्रस्ताव आणावा लागेल.

<u>**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—**</u>कल्याणप्रमाणे करा यासाठी आम्ही आताच परवानगी देतो परंतु विषय तो नाही, तसेच दुसरी गोष्ट अशी कि तुमच्या निविदेची किंमत वाढली तरी आपल्या अंदाजपत्रकात तरतुद तर आहेच ना. फक्त निविदा प्रक्रीया किती दिवसांत होईल ते सांगा. आजची तारिख १३ आहे, कार्यादेश किती दिवसांत मिळतील, इतिवृत्ताची वाट न पहाता सदर ठरावाची अंमलबजावणी करण्यास आम्ही मान्यता देत आहोत.

<u>**आयुक्त, श्री. मनोहर हिरे:—**</u> सार्व. बांधकाम विभागाच्या उपविधीप्रमाणे निविदा प्रक्रीया करण्यास किती कालावधी दिला पाहिजे.

<u>**कनिष्ठ अभियंता, श्री. जितू चौथानी —**</u> १४ दिवसांची नोटीस दयायला पाहिजे.

<u>**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—**</u>१४ दिवसांत सगळे होईल. शक्य तो लवकरात लवकर करा.

<u>**काही सदस्य :—**</u>पास—पास......

<u>**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—**</u> सदरहु ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्ताची वाट न पहाता करण्यात यावी.

<u>**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—**</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ३** :— वर्ष २०१६—१७ करीता पावसाळयापुर्वी उल्हासनगर शहरातील प्रभाग क्षेत्र क्र.१ ते ४ मधील रस्त्यांवरील खड्डे भरणेच्या कामाची निविदा कार्यवाही करणेस मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर शहरामध्ये असलेल्या डांबरी रस्त्यांची दरवर्षी पावसाळयापुर्वी, पावसाळयामध्ये व पावसाळयानंतर दुरुस्ती करण्यात येते. शहरातील काही रस्ते एकात्मिक रस्ते विकास प्रकल्प —२ मधील आहेत व इतर काही प्रमुख रस्ते आहेत त्यामधील असलेले तुरळक खड्डे, टेलिफोन विभाग व पाणी विभागाने खोदलेले खंदके व पावसाळयामुळे पडलेले खड्डे भरणे आवश्यक आहे. पावसाळया दरम्यान गणपती उत्सव दरम्यान रस्त्यात पडलेले खड्डे भरणे गरजेचे असुन व पावसाळयानंतरच असे खड्डे बुजवुन रस्ते सुस्थितीत वाहतुकीस ठेवावे लागतात. याकरिता शहरातील काही अति महत्वाचे रस्ते निवडुन त्यामध्ये अशी कामे प्रस्तावित आहेत. गरज पडल्यास आणखी काही रस्ते ऐनवेळी आढळल्यास त्यामधील खड्डे भरणे आवश्यक असणार आहे. अशा रस्त्याची सार्वजनिक बांधकाम खात्याने क्षेत्रनिहाय यादी तयार केलेली आहे. अशी यादी सोबत जोडली आहे. त्याप्रमाणे प्रत्येक क्षेत्र निहाय खालील प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

क्षेत्र क्र.१ मध्ये एकुण रु. ३९,१८,०७२/— खर्चाची कामे प्रस्तावित.

क्षेत्र क्र.२ मध्ये एकुण रु. ६३,८३,२४८/— खर्चाची कामे प्रस्तावित.

क्षेत्र क्र.३ मध्ये एकुण रु. ८५,२०,५८६/— खर्चाची कामे प्रस्तावित.

क्षेत्र क्र.४ मध्ये एकुण रु. १,४५,२९,५२५ /— खर्चाची कामे प्रस्तावित.

उपरोक्त प्रमाणे एकूण रु.३,३३,५१,४३१/— हा खर्च उल्हासनगर महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पातील लेखाशिर्षात 'अ' अंदाजपत्रक भाग—१ क ६ **(ii)** 'रस्ते दुरुस्ती' या लेखा शिर्षामधून करणे आवश्यक आहे. सदर लेखाशिषाची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

i) लेखाशिर्षाचे नाव :– भाग—१ क ६ (ii) 'रस्ते दुरुस्ती'

ii) लेखाशिर्षामध्ये उपलब्ध एकंदर तरतूद :— रु. ५,००,००,०००/—

iii) मागील दायित्व वजा जाता शिल्लक

राहणारी तरतूद :— रु.

iv) या कामापूर्वी बजेट कंट्रोल रजिस्टरप्रमाणे

शिल्लक असलेली तरतुद :— रु.

iv) या कामावरील खर्च :— रु.३,३३,५१,४३१/—

v) या कामानंतर उक्त लेखाशिर्षात

शिल्लक राहणारी तरतुद :— रु.

मुख्य निवडणूक आयोगाकडील पत्रान्वये महाराष्ट्र विधानपरिषदद्वारे ठाणे स्थानिक प्राधिकारी मतदार संघाची द्विवार्षिक निवडणूक — २०१६ निवडणूक कार्यक्रम घोषित झालेला असल्याने ठाणे/पालघर जिल्हयामध्ये ''आदर्श आचार संहिता'' लागू झालेली आहे. सदर आचारसंहितेच्या कार्यकाळात कोणतेही विकास कामे हाती घ्यावयाचे नसतात. परंतू पावसाळयादरम्यान शहरात पुरपस्थिती निर्माण होवू नये म्हणून सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे पावसाळयापूर्वी शहरातील रस्त्यांवरील खड्डे, नाले सफाई करणेची कामे हाती घेण्यात आली आहेत. सदर कामांची सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे निविदा प्रक्रिया सुरु करण्यात आली होती. आचारसंहिता सुरु असल्याने सदर कामे हाती घेणेकरीता या विभागातर्फे मा.मुख्य निवडणूक अधिकारी यांची परवानगी घेतली असता मा.मुख्य निवडणूक अधिकारी यांनी त्यांचे पत्र क्र.एमसीसी—२०१६/प्र.क्र.२३७/२०१६/३३ दिनांक १३ मे,२०१६ अन्वये सदर कामे पावसाळयापूर्वी करणे आवश्यक असल्याने परवानगी दिली आहे. सदर परवानगीच्या अधिन राहून उक्त कामाची निविदा कार्यवाही करणेस मा. स्थायी समितीकडून मान्यता मिळणेस प्रस्तावित.

<u>स्थायी समिती ठराव क्र. </u> २३ <u>दिनांक:—१३/६/२०१६</u>

सुचकाचे नाव :—श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार वर्ष २०१६—१७ करीता पावसाळयापुर्वी उल्हासनगर शहरातील प्रभाग क्षेत्र क्र. १ ते ४ मधील रस्त्यांवरील खड्डे भरणेच्या कामी खालील अटींवर निविदा कार्यवाही करणेस मान्यता देत आहे.

७. प्रभाग समिती १ ते ४ मध्ये प्रत्येक वाढीव खर्चास १० टक्के पेक्षा जास्त वाढीव कामास अनुमती देणार नाही.
८. चारही प्रभागांसाठी वेगवेगळया निविदा काढल्या जाव्यात.
९. महापालिका क्षेत्रात ३० किलोमिटरच्या आत कंपनीचे अस्पाट प्लांट असले पाहिजे. आणि त्याबाबत तसे प्रमाणपत्र कार्यकारी अभियंता यांच्याकडुन घेवुन निविदेच्यावेळी अपलोड करायचे आहे, जर तसे केले नाही तर त्यांची निविदा मान्य केली जाणार नाही.
१०. जॉईंट वेंचरला परवानगी नाही.
११. क्युबीक मिटरवर बिलींग न होता स्केअर मिटर/ मेजरमेंट वर करता येईल.
१२. पार्टोलच्या कामासाठी कल्याण महापालिकेने जे आयटम घेतले आहेच तेच आयटम लागु होईल.
या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची <u>सही/—</u>

अनुमोदकाची <u>सही/—</u>

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्रमांक. ४ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. ४ :—** उल्हासनगर शहरामधील प्रभाग क्षेत्र क्र.३ अंतर्गत असलेल्या रस्त्यांमधील खड्डे भरणेच्या वाढीव खर्चास मंजुरी देणे.

---

**सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी :—** हा, आता सांगा, आधी मी जे बोललो ना, त्याप्रमाणे वाढीव किती होते. आता तुम्ही मला सांगा रू. ८९,८६,१३७/— एवढया रक्कमेचे प्राकलन आपण कॅम्प नं.३ साठी तयार केले. आणि वाढीव काम १,२७,५३,३८९/— एवढे झाले असे नमुद केले आहे. म्हणजेच येथे १२० ते १२५ टक्के काम झाले आहे. म्हणजेच २० ते २५ टक्के वाढीव काम झाले. आणि आपण म्हणतो १० टक्क्यापेक्षा वाढीव काम होणार नाही. आता तुम्हीच सांगा इथे तुमची कशी चुक झाली ते.

**शहर अभियंता, श्री. राम जयस्वार :—** यात २५ टक्के वाढीव काम झाले आहे.

**सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी :—** अशा कामात निविदा प्रक्रीया झाली पाहिजे, चार संस्थांनी निविदा भरल्या पाहिजेत, परंतु आता जसे तुम्ही रू. ८९ लाखाचे काम होते तेथे रू. १ करोड २७ लाखाचे काम झाले म्हणजे, याआधीच्या विषयात तुम्ही रू. ३,३३ करोडचे काम काढले आहे तर यात तुम्हाला रू. ४.५० लाखापर्यंत वाढीव काम आणावे लागेल. बरोबर आहे कि नाही. म्हणजे १२० टक्के, म्हणजे रू. ८ करोडचे काम होईल ना, मागच्या विषयामध्ये यासाठीच चर्चा केली होती कि तुम्ही वाढीव काम किती करणार म्हणून. त्यावर तुम्ही १० टक्के म्हणालात. आयुक्त साहेब आपण यात जरा खुलासा करावा. जर असेच आपण करत राहिलो तर ई टेंडरीगला अर्थ काय? एक कंपनी आहे तिचे असे म्हणणे आहे कि, प्रभाग क्रमांक ३ मध्ये जर रू. २ करोडचे टेंडर असते तर मी पण भरले असते, परंतु रू. ९० लाखाचे टेंडर बघून त्याने या निविदा प्रक्रीयेत सहभाग घेतला नाही. मग हा त्याच्याबरोबर अन्याय झाला कि नाही, याबाबत जरा खुलासा करावा.

**आयुक्त, श्री. मनोहर हिरे:—** यामध्ये काय आहे कि, इंजिनिअरींग विभागाचे इथे चुकते कि, जेवढया कामाचे प्राकलन तयार केले आहे किंवा कार्यादेश दिला आहे तेवढेच काम केले पाहिजे, खडड् भरण्याऐवजी तुम्ही साईड पटटया मारता असे काहीतरी होते.

**सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी :—** तुम्ही व्यवस्थित प्राकलन तयार करा ना, रू. ४० लाखाचे प्राकलन तयार करता त्याऐवजी रू. ७० लाखाचे प्राकलन तयार करा ना, रू. ३ करोड ऐवजी रू.४ करोड नाहीतर रू. ५ करोड चे प्राकलन तयार करा ना, जेएनएनयुआरएम चे प्राकलन तयार केले आहे, १२६ करोडचे त्यानंतर सुधारीत प्राकलन रू. १०० करोडचे आणि त्यांनतर पुन्हा सुधारीत प्राकलन रू. १०० करोडचे, मग ते सार्व. बांधकाम विभाग असो किंवा पाणीपुरवठा विभाग असो, वाढीव कामाशिवाय कामे होतच नाहीत, आता जेएनएनयुआरएमचे किती काम वाढले तरी लोकं म्हणतात अजून काम पुर्ण झालेले नाही, टाकीचे काम अपुर्ण आहे, कुठे पाण्याच्या लाईन्स नाहीत, झोपडपटटयाचे प्राकलन तयार केलेले नाही. अजुन रू. १०० करोडचे वाढीव काम प्रलंबित आहे, वाढीव वर वाढीव किती काम करू शकतो,

**शहर अभियंता, श्री. राम जयस्वार :—** वेळोवेळी मंजूरी घेवून वाढीव काम केले जाते.

**सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी :—** मग आता हे वाढीव कामाचे सभेपुढे का आणले, तेसुध्दा मान्यता घेवुन करायचे ना सरळ, जर आपण रू. ८९ लाखाचे काम रू. १ करोड २७ लाखापर्यंत वाढीव केले तर मग रू. १ करोड २७ लाखाचे काम का केले? आणि आता हा विषय आणला आहे तो सुध्दा मान्यता घेवून करून

टाकायचा ना. मग आता हे रू. ३.३३ करोडचा विषय कशासाठी सभेपुढे आणला आहे, तेसुध्दा काम असेच करून घ्यायचे ना, पाऊस पण आला नसता, आणि खडड्े पण नसते झाले, करत जायचे, करत जायचे वाढीव वर वाढीव काम, मग वाढीव कामास मान्यता मिळणेसाठी सभेपुढे विषय आणायचा मग आम्ही देतो ना त्यांस मान्यता, आता का आणला आहे हा विषय,

आयुक्त, श्री. मनोहर हिरेः— याला उच्चतम मर्यादा असेल ना काहीतरी.

सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी :— आता आपण असे म्हणालात, जे आम्ही ४ प्रभागसमितींसाठींची प्राकलने तयार केली आहेत, त्यामध्ये १० टक्क्यापेक्षा वाढीव काम करू देणार नाही. आणि आता म्हणता त्यावेळेस रू. १ करोड २७ लाखाचे काम वाढीवमध्ये होत गेले म्हणून मग आता रू. ३.३३ करोडचे काम आहे, मग एक नगरसेवक म्हणेल माझे काम करा, दुसरा म्हणाला माझे काम करा, असे होत गेले आणि आपण प्राकलनच बरोबर तयार केले नाही, तर तुम्ही रू. ७ करोडचे काम करून देणार का? वाढीव वर वाढीव कामे करून देणार का? मग मी मान्यता देतो, परंतु मला खात्री आहे कि तुम्ही रू. ३.३३ करोडचे जे प्राकलन तयार केले आहे ते चुकीचे आहे, या कामासाठी कमीतकमी रू. ६ करोडचे प्राकलन तयार होईल. जास्तीत जास्त वाढीव धरून,

शहर अभियंता, श्री. राम जयस्वार :— नाही, एवढे होणार नाही,

सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी :— का नाही जाणार, तुमच्या डोळयासमोरचा विषय आहे, १२० करोडचा वाढीव काम झाले मग का नाही जाणार, रू. ८९ लाखाचे प्राकलन तयार केले होते तेव्हा खडड्े पाहिले नव्हते का?

शहर अभियंता, श्री. राम जयस्वार :— त्यावेळेस मी नव्हतो,

सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी :— आपण तर आता आला आहात, पण त्यावेळी शहर अभियंता होते, दुसरे अभियंता होते, ज्यावेळेस स्थायी समितीपुढे हा रू. ८९ लाखाचे प्राकलन मंजूरीसाठी आणले होते त्यावेळेससुध्दा आम्ही हाच प्रश्न उपस्थित केला होता कि, यात वाढीव होणार का, तेव्हा त्यावेळच्या शहर अभियंतानेसुध्दा १० टक्क्यापेक्षा वाढीव काम होणार नाही असे सांगितले होते, त्यावेळच्या अभियंताने सुध्दा खडड्े पाहिले होते. आणि आता आपण येथे तेच बोलत आहात, नंतर विषय येईल वाढीव कामास मंजूरी मिळणेबाबत त्यावेळेस तुम्ही नसणार आणि दुसरे शहर अभियंता असतील, मग ते काय बोलणार कि, सलग वाढीव वर वाढीव काम करत गेलात तर रू. २ करोड आणखी वाढीव काम झाले आहे. काय चालले आहे हे,

शहर अभियंता, श्री. राम जयस्वार :— ते काम मंजूरीने केलेले आहे.

सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी :— हे जे रू. ८९ लाखाचे प्राकलन तयार झाले होते ते केव्हा तयार केले होते, कोणत्या तारखेला ते काम पुर्ण झाले आहे, त्याचे देयक कधी झाले,

शहर अभियंता, श्री. राम जयस्वार :— आता ज्या रस्त्यांवर खडड्े झाले आहेत त्यांचे मोजमाप घेवून त्याप्रमाणे प्राकलन तयार करण्यात येईल.

सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी :— देयक तर तयार केले असेल ना, नाहीतर वाढीव काम झाले हे कसे कळले तुम्हाला,

शहर अभियंता, श्री. राम जयस्वार :— पाऊस जास्त झाला तरच खडडे पडतात, परंतु आम्ही जास्त खर्चाचे काम करणार नाही.

सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी :— मोजमाप केव्हा घेतले.

शहर अभियंता, श्री. राम जयस्वार :— जानेवारीमध्ये झाले आहे.

सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी :— जानेवारीमध्ये आपण मोजमाप घेतले, तर फेब्रुवारी महिन्यामध्ये वाढीव कामाचा विषय का नाही आणला सभेपुढे, पाच—सहा महिन्यानंतर का आणला हा विषय, आपण म्हणता विषय

थांबला होता, कोणी संचिका थांबवली होती, काही भ्रष्ट्राचार आहे का, टेबलखालून का मिळाले नाही का? काय कारण होते,

**शहर अभियंता, श्री. राम जयस्वार** :– जानेवारीमध्ये झाले आहे, मी येण्याच्या आधीचा विषय आहे.

**सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी** :– हे काय उत्तर आहे का, मी उच्च न्यायालयात हे इतिवृत्त पाठवतो,

**शहर अभियंता, श्री. राम जयस्वार** :– मला तसे म्हणायचे नाही, पण मी वस्तुस्थिती सांगितली.

**सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी** :– संचिका थांबली होती असे म्हणता मग कोणी थांबवली होती. पुढील कार्यवाही का नाही झाली, जेव्हा आपण रू. ९० लाखाचे काम वाढून रू. १,२७ लाख केले जवळजवळ १२० टक्के, तेव्हा फटाफट कार्यवाही करायची, आपली हि चुक झाली रू. १.२७ लाखाचे काम झाले असे असताना अर्ध्या रात्रीत संचिका तयार करून पाठवायला हवी होती. १० टक्क्यापेक्षा वाढीव काम झाले २० टक्के वाढीव काम झाले म्हणजे आपण रात्रंदिवस एक करून काम करायला हवे होते. आज मी माझे घर बनवत आहे, त्यासाठी मी रू. १० लाखाचे प्राकलन तयार करतो, त्यासाठी मी रू. १० लाखाची तरतुद करतो, त्यानंतर ते काम रू. ११ लाख, १२ लाख झाले तर ठिक आहे, जर ते रू. २२ लाख, २५ लाख झाले तर मी काय करणार, मी त्याचा लगेच बंदोबस्त करेन ना, एवढा पैसा वाढला, काय करू, कुठून आणू, कोणाकडून तरी सल्ला मागेन, आपल्या मोठया भावाशी बोलेन, मोठया अधिका–याशी बोलेन, कि मनात आले तसे रू. १.२७ लाखाचे वाढीव कामास मान्यता मिळणेसाठी समितीपुढे पाठवून दयायचे.

**आयुक्त, श्री. मनोहर हिरे:–** यामध्ये रस्त्यावरील खडडे् भरण्याव्यतिरिक्त अतिरिक्त कामे करून घेतलेली आहेत त्यामुळे हे वाढलेले आहेत असे कारण नमुद केलेले आहे. खडडे् भरण्याच्या कामाबरोबर साईड पटटया मारलेल्या आहेत. तसेच संपुर्ण रस्ताच बनवून घेतलेला आहे. तेव्हा असे तुम्ही करता तर तस का करता? ते सांगा ना, ते का करता? हे करायला नको, मला वाटते, स्थायी समितीला हा विषय मंजूर करायचा नाही ना, तर मग विषय मागे घ्या, आणि अतिरिक्त देयकासाठी नियमानुसार सुधारीत प्रस्ताव सादर करा.

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–** नाही, तसे नाही,

**सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी** :– आयुक्त साहेब, मी असे म्हटले कि, माझ्या प्रभागातील कॅम्प नं. १ मधील बसस्टॉपच्या रस्त्याच्या कामाची निविदा झाल्यानंतरदेखील काम होत नव्हते, म्हणून मी या विषयावर चर्चा केली, सदर विषय मंजूर करण्यास माझी हरकत नाही, परंतु मी संबंधित विभागाकडून होत असलेल्या चुका सुधारण्यासाठी सांगत आहे. आज माझ्या प्रभागातील लोक त्या रस्त्याच्या कामापासून वंचित का राहिले, त्यावर श्री. जितू चौथानी यांचे असे म्हणणे होते कि, त्या रस्त्याच्या कामाचे कार्यादेश यापुर्वीच एका ठेकेदाराला दिलेले आहेत. कॅम्प नं. १ च्या रस्त्यावरील वाढीव कामाचा प्रस्ताव यांनी का सादर केला नाही. त्या रस्त्यावर वाढीव काम झाले असेल तर त्याचादेखील प्रस्ताव तयार करून सादर करायला हवा होता ना, मग मी दिली असती त्यांस मान्यता, कॅम्प नं. १ चे वेगळे, २ चे वेगळे, ठेकेदार वेगळे, त्याठिकाणच्या रस्त्याचे वाढीवमध्ये का नाही केले, रू. १०, २० लाख वाढीव असते तर त्यांसदेखील आम्ही मान्यता दिली असती ना.

**आयुक्त, श्री. मनोहर हिरे:–** आता हे लक्षात घ्या, वाढीव काम करायचेच नाही. कशाला करता?

आता हे काम झालेले आहे, आमच्यापैकीच एका नगरसेवकाच्या सांगण्यानुसार केले असेल, यांत आमची काही हरकत नाही, परंतु पुढे चुका होवू नयेत यासाठी आपण आपल्यामध्ये कशी सुधारणा करू यासाठी.....

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–** ज्या चुका झाल्या आहेत त्या कशा सुधारल्या पाहिजेत,

**सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी** :– आम्ही असे म्हणत नाही, तुम्ही काय केले, आम्ही असे म्हणत नाही का तुम्ही हा प्रस्ताव का आणला म्हणून, परंतु जसे आयुक्त साहेबांनी सांगितले कि, रस्त्यावरील खडडे् भरण्याच्याजागी संपुर्ण रस्ताच तयार करण्यात आला, तर तो बनवा ना, पण इथे आमच्या पुर्व महापौर बसल्या आहेत, त्यांची कामे का नाही केलीत तुम्ही, आणला असतात ना मग प्रस्ताव, डॉ. नाथानी महोदयांचे काम का

नाही केलेत, माझे काम का नाही केलेत, रेखा ठाकुर यांचे काम का नाही केलेत, सगळया कामांमध्ये रू. ५०–५० लाखांचे वाढीव काम केले असते आणि समितीपुढे आणले असते तर आम्ही एका मिनिटात मान्यता दिली असती ना. कॅम्प नं. ३ मधील वाढीव कामाचा प्रस्ताव आणला, कॅम्प न. १ चे वाढीव काम आणले नाही, मग कॅम्प नं.४ चे वाढीव कामाचा प्रस्ताव आणला, हे काय आहे,

**आयुक्त, श्री. मनोहर हिरेः—** यात काय होते, काही लोकांची कामे होतात काहींची नाही, असे नाही झाले पाहिजे. आणि सर्व सन्मा. सदस्यांनी समजले पाहिजे कि, रस्त्यांवरील खडड्े भरण्याचे काम आहे, तेच केले पाहिजे, यामध्ये रस्ते केले नाही पाहिजेत, तर तुम्ही हे रस्ते करता, मग ठेकेदार करतो तर तुम्ही तपासणी करता ना, त्याला सांगायचे जे काम आहे तेच करायचे, अन्य काम करायचे नाही, मी त्याची नोंद घेणार नाही.

**सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी** :— त्या कामाचे देयकच तयार करू नका ना,

**आयुक्त, श्री. मनोहर हिरेः—** देयकच तयार करू नका ना, हे काम झालेले आहे, आणि देयक तयार करता आणि मग मान्यता घेता, त्याशिवाय देयकाची नोंदच करू नका ना, जेवढं प्राकलन तयार केले आहे त्यात १० टक्के वाढीवपर्यंतच्या कामाचेच देयक तयार करा. वाढीव कामाची नोंद करूच नका. ज्यांना रस्ते तयार करायचे आहेत, त्याचे वेगळा प्रस्ताव तयार करून तो स्थायी समितीपुढे येऊ दया ना.

**सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर** :— साहेब, आता रस्त्यांवरील खडड्े भरण्याचे काम सुरू झाले कि, ठेकेदाराच्या गाडयाच पळवल्या जातील त्याचे काय?

**आयुक्त, श्री. मनोहर हिरेः—** गाडया पळवल्या जातील म्हणजे काय?

**सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर** :— आता रस्त्यांवरील खडड्े भरण्याचे काम सुरू झाले कि, ठेकेदाराच्या गाडयाच्या गाडया त्यावरील कर्मचा—यांसह पळवल्या जातात आणि इतर ठिकाणी काम केले जाते.

**सभापती, श्री. सुनिल सुर्वेः—** जिथे प्रशासनाला काम करायचे असेल, ते सोडून दुसरा दादागिरी करून घेवून जातो, आणि आपला कर्मचारीवर्गदेखील त्याच्याबरोबर जातो.

**आयुक्त, श्री. मनोहर हिरेः—** याबदद्ल मी सरळसरळ सांगतो कि, संबंधित विभागाने लेखी कामाचे आदेश ठेकेदाराला दयायचे कि, हया हया रस्त्यावरील खडड्े भरायचे आहेत, आणि गाडी पळवली गेली किंवा काय तर काम बंद करून टाकायचे, ठेकेदार बघून घेईल काय ते, प्राकलनात जे काम असेल तेच करायचे.

**सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी** :— यात असे व्हायला पाहिजे कि, जेवढे प्राकलन आहे तेवढयाचेच देयक तयार करायचे त्यापेक्षा जास्त कामाचे देयकच तयार करायचे नाही.

**आयुक्त, श्री. मनोहर हिरेः—** मागच्यावर्षीसुध्दा मला आठवतयं कि, आम्ही याला तोंड दिले होते. अशीच परिस्थिती होती, आता रू. १.२७ लाख वाढीव कामाचे आले आहे, आणि त्यावेळेस रू. ८८ लाखाचे वाढीव काम होते, प्रत्येकवर्षी असे होते, हे चुकीचे आहे, तुम्हाला जेवढे काम करायचे आहे तेवढेच करा आणि वेगळे रस्ते तयार करायचे आहे, पटट्या मारायच्या आहेत त्यासाठी वेगळा प्रस्ताव सादर करा ना.

**सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी** :— आज जेव्हा रस्त्यांवरील खडड्े भरण्याचे प्राकलन तयार केले जाते त्यामध्ये तुम्ही ठिकाण घातले, आता जमनादास पुरस्वानी, राजेंद्रसिंह भुल्लर किंवा रेखा ठाकूर नगरसेवक,नगरसेविका असोत, तुम्हाला त्यांना सांगायलाच लागणार नाही ना, त्यांना माहिती असणार प्राकलनात माझ्या प्रभागातील ठिकाण आहे म्हणजे माझे काम होणारच आहे, परंतु आज असे होते की, भुल्लर महाराज म्हणतात कि, गाडयाच्या गाडया पळविल्या जातात, तर आम्हाला हमालपटटीचे काम करावे लागते, ठेकेदाराच्या मागे पळावे लागते, पहिले माझ्या प्रभागातील खडड्े भरा, नाहीतर प्राकलनातील तरतुद संपायला नको, तर असे व्हायला नको, जे प्राकलन तयार केले आहे त्याप्रमाणेच काम झाले पाहिजे. ते प्राकलनसुध्दा मापात झाले पाहिजे, प्राकलनातील मापानुसार काम झालेले नसेल तर त्याचे देयक तयार झाले नाही पाहिजे. हे पळापळीचे काम थांबले पाहिजे ना. कामाचे प्राकलन तयार झाले, त्यात काम करण्याची ठिकाणे आली तर त्या ठिकाणची

कामे झाली पाहिजेत ना, आपआपसांत ओढाताण झाली नाही पाहिजे. कामाची ठिकाणी दादागिरी करून गाडी घेवून जाणे, आज कोणी तर उदया कोणी असे करेल, आम्हाला माहिती आहे कि, शहर अभियंता यांनी खुप चांगल्या प्रकारे सर्व रस्त्यांवरील खडड्े भरण्याची ठिकाणे घेतलेली आहेत. म्हणजे त्या ठिकाणची आपोआप कामे होतील. आपोआप कामे झाली पाहिजेत जर यामध्ये काही गडबड झाली तर दुस—यावेळेस अशाप्रकारे वाढीव कामास मंजूरी देणार नाही. आता ठिक आहे, पुढच्या वेळेस आम्ही १० टक्क्यापेक्षा वाढीव कामास मान्यता देणार नाही. निविदातही तसे नमुद करा कि १० टक्क्यापेक्षा वाढीव काम करता येणार नाही.

**सदस्या, श्रीम.लिलाबाई आशान** :— सदर कामास मंजूरी देत आहात, परंतू खडड्े भरण्याचे कामाची सुरवात आमच्या प्रभागापासून करा नाहीतर तर मी हे काम होवू देणार नाही.

**महापालिका सचिव :—** सदर विषय पारीत करण्यात यावा का?

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्री. सुनिल मुकुंद सुर्वे —** सदरहु ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता करण्यात यावी.

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ४ :—** उल्हासनगर शहरामधील प्रभाग क्षेत्र क्र.३ अंतर्गत असलेल्या रस्त्यांमधील खड्डे भरणेच्या वाढीव खर्चास मंजुरी देणे.

**प्रस्तावना**

मागील वर्ष २०१५—१६ या आर्थिक वर्षामध्ये प्रभाग क्षेत्र क्र.३ मधील शहरातील रस्त्यामध्ये खड्डे भरण्याचे रु.८९,८६,१३७/— एवढया खर्चाचे काम प्राकलनिय दरावर (At Par) टक्के जास्त दराने निविदा कार्यवाही करुन देण्यात आले होते. कार्यादेश निर्गमित केल्यानंतर प्रत्यक्षात कामाची सुरुवात पावसाळयानंतर झाली असल्याने पावसाळयात खराब झालेले रस्ते व स्थानिक नगरसेवकांची मागणी इत्यादी नुसार रस्ते वाहतुकी योग्य होण्यासाठी मुळ मंजूर प्राकलनात नमुद कामापेक्षा जास्त काम झाले आहे. त्याबाबत रस्तेनिहाय अतिरिक्त झालेल्या बाबींचे प्रमाण सोबतच्या तपशिलात नमुद आहे.

मुळ मंजुरी प्राप्त रु.८९,८६,१३७/— एवढया खर्चामध्ये आता रु. १,२७,५३,३८९/— इतकी वाढ होऊन एकुण खर्च रु. २,०८,४९,००७/— कोटी इतका होत आहे. सदर खर्च नियमित लेखाशिर्ष अ—अंदाजपत्रक भाग—१ क—४ (६) रस्ते दुरुस्ती व निगा या लेखाशिर्षातील उपलब्ध तरतुदीतून करावयाचा आहे. सदर लेखाशिर्षातील उपलब्ध तरतूदीची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| १) लेखाशिर्षातील 'अ' अंदाजपत्रक भाग—१ रस्ते दुरुस्ती व निगा क—४ (६) वर्ष २०१५—१६ साठी ठेवलेली तरतुद | :— रु. ८,००,००,०००/— |
| २) मागील वर्षातील खर्चाचे दायित्व वजा जाता शिल्लक राहणारी तरतुद | :— — |
| ३) चालु वर्षी वापरलेली तरतूद | :— रु.४,७८,००,०००/— |
| ४) आता शिल्लक असलेली तरतुद | :— रु.३,२२,००,०००/— |
| ५) प्रस्तावित खर्च | :— १,२७,५३,३८९/— |
| ६) शिल्लक रक्कम | :— रु.१,९४,९६,६११/— |

तरी उपरोक्त लेखाशिर्षातंर्गत उपलब्ध तरतूदीनुसार मे. झा.पी.ॲण्ड कंपनी यांनी केलेल्या वाढीव १,२७,५३,३८९/– खर्चाचे कामास मा. स्थायी समितीकडून मंजुरी मिळणेसाठी प्रस्तावित आहे.

स्थायी समिती ठराव क्र. २४ दिनांकः–१३/६/२०१६

सुचकाचे नाव :– श्री. विजय पाटील

अनुमोदकाचे नाव :– श्रीमती रेखा ठाकुर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर शहरामधील प्रभाग क्षेत्र क्र.३ अंतर्गत असलेल्या रस्त्यांमधील खड्डे भरणेकामी मे. झा.पी.ॲण्ड कंपनी यांनी केलेल्या वाढीव खर्च रुपये १,२७,५३,३८९/– यास मंजुरी देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ५ :–** उल्हासनगर–३ येथिल कल्याण–अंबरनाथ रस्त्यावरील अतिक्रमण विरहित जागेच्या ठिकाणी रस्त्यांच्या दुतर्फा नाली बांधणे कामी निविदा प्रक्रिया करणेस मान्यता देणे.

---

सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर :– हे काम असे आहे कि, ५(२) (२) अंतर्गत करायला हवे होते. शहराची अवस्था अशी आहे कि, व्यापा–यावर इतका अन्याय झाला आहे कि, आता रस्तेसुध्दा मोठे झाले आहेत, त्यांच्या दुकानांमध्ये पाणी घूसेल, अपघातसुध्दा होवू शकतात, काहीही होवू शकते, हे काम तर आपल्यामार्फत ५(२) (२) मध्ये यायला हवे होते.

आयुक्त, श्री. मनोहर हिरे:– रस्त्यावर पाणी तुंबले नाही पाहिजे.

<u>सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी</u> :– आपण जे रस्त्यावर नाली खोदली आहेत ते खुप चांगले काम झाले, परंतु यात खुप मोठी हानी अशी आहे कि, या नाल्यांमध्ये पडून दोन–पाच माणसे मरतील,

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे:–</u> हो, हो, बरोबर आहे.

<u>सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी</u> :– आता कल्याण अंबरनाथ रस्त्याचे रूंदीकरण झालेले आहे, २० फुट दुकाने मागे गेली आहेत, त्यामुळे कोणालाच कळणार नाही कि येथे नाली असेल, तुम्ही पाहिले म्हणून तुम्हाला माहित आहे कारण कालच मी तेथील पाहणी केली, कधीही अपघात होवू शकतो, या रस्त्यावर पावसाचे पाणी ऐवढे तुंबेल कि, दोन ते तीन फुट पाणी साचू शकते, पावसात रस्त्यावर पाणी साचलेले असताना रस्त्यावर ट्रफीक झाले आणि एखादा बाईकवाला मागे वळण्यासाठी प्रयत्न करू लागला तर त्याला समजणार नाही आणि तो सरळ नाल्यात पडू शकतो व मी तुम्हाला नक्की सांगतो कि, पावसाळयात मोठा अपघात होवू शकतो,

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे:–</u> नाही, हे खरे आहे परंतु यावर उपाय सांगा ना.

<u>सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी</u> :– मी त्या रस्त्याची काल पाहणी केली असता हैराण राहिलो या लोकांनी २० फुट बाहेर नाली खोदलेली आहे. नाली बनविणे जरूरी होते, पाणी जाण्यासाठी ते आवश्यक होते यात आपली काही चुक नाही. परंतु आता आपण लोकांना कसे सांगणार, पावसाळयात रस्त्यांवर ट्रफीक झाली आणि एखादा बाईकवाला त्याची गाडी मागे वळवू लागला आणि त्याला नालीचा अंदाज आला नाही तर तो सरळ नालीत पडू शकतो आणि अपघात होवू शकतो, आणि तो वाचणार नाही,

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे:–</u> सदर नाल्यांच्या बाजूला बॅरीकेटस् लावू शकतो का?

<u>सदस्या, डॉ. निना नाथानी</u> :– नाल्यांवर लोखंडाच्या जाळया बसविल्या तर.....

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u> यात एक मोठा प्रोब्लेम असा आहे कि, जो मी पाहिला आहे, रस्त्यावर एका ओळीत काही दुकांनाची १०० मीटरपर्यंत कटींग झाली आहे तर त्यापुढील दुकांनाची त्याप्रमाणे कटींग झालेली दिसत नाही. मध्ये मध्ये कटींग झाली आहे, मग पाणी कुठून कुठे जाईल, नाली कशी बनवणार.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे:–</u> आपण साईन बोर्ड नालीच्या ठिकाणी लावू या. म्हणजे लोकांना कळेल कि पुढे नाली आहे किंवा यापुढे जावू नये असे.

<u>सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी</u> :– दुकानात लोकं कशी जातील, कारण २० फुटाची नाली बनवली, तर नालीचे पाणी कुठे जाईल. पावसाळयात मोठा पाऊस झाला आणि रस्त्यावर पाणी साचले आणि ट्रफीक झाले तर गाडया कशा निघतील, नाल्यांमध्ये एखादी गाडी वळवताना घुसली तर अपघात होवू शकतो हे फार भयंकर आहे.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u> आपल्याला हा विचार केला पाहिजे कि, आताच्या स्थितीमध्ये जर पाऊस पडला, आणि थांबला नाही त्यामुळे जर पाणी साचले, तर श्री. जमनादास पुरस्वानी जे म्हणतात ते बरोबर आहे, कि एखादा माणूस नाल्यात पडू शकतो, मला वाटते, शहर अभियंता यांनी सर्व अभियंता यांना घेवून रस्त्याची पाहणी करावी आणि प्रत्येक १०० मीटर पर्यत काय करता येईल किंवा पाणी कसे जाईल ते पहाणे, आणि श्री. कापडणीस साहेब, पाऊस पडण्यापुर्वी जो रस्ता कटींग झालेला नाही, जो १०० फुट झाला नाही, ते ताबडतोब तोडून घेणे, एकदा पाऊस पडला तर ते तोडू देणार नाहीत. मग तोच विषय पुन्हा उभा राहिल, आणि याचा त्रास त्या दुकानदारांना, नागरीकांना होईल, आणि आपल्या शहराचे जास्तीत जास्त नांव बदनाम होण्याचे कारण आता हा रस्ता झालेला आहे असे मला वाटत आहे.

<u>सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर</u> :– या ठरावात असे नमुद करा कि, सदर कामाची पाच भागांत विभागणी करणे, पांच दिवसांची टेंडर नोटीस, कामाच्या मुल्यानुसार कंपनीकडे नेटवर्थ असले पाहिजे, कामाच्या मुल्यानुसार कंपनीकडे टर्नओव्हर असले पाहिजे, जॉईंट व्हेन्चरला परवानगी नाही, ठेकेदाराल वाटले तर तो सबलेट करू शकतो त्यांस महापालिका मंजूरी देईल. हा कागद घ्या आणि यातील अटी घाला.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u> टेंडर नोटीस सांत दिवसांत करा, हे काम लवकरात लवकर झाले पाहिजे.

<u>सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर</u> :– सदर काम ५(२) (२) मध्येच झाले पाहिजे, या गोष्टींची मग आवश्यकताच नाही.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u> त्यादिवशी कुठला अधिकारी आला नाही म्हणून टेंडर उघडले नाही असे होता कामा नये, २३ तारखेला बैठक लावू त्यावेळेला हे सर्व पाहिजे,

<u>सदस्या, डॉ. निना नाथानी</u> :– सदर नाल्या तयार होईपर्यंत व इतर उपाययोजना करेपर्यंत जाळया बसविण्यात याव्यात. म्हणजे अपघात होणार नाहीत.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u> जाळया कोणत्या बसवणार, सिमेंटच्या कि लोखंडाच्या

<u>सदस्या, डॉ. निना नाथानी</u> :– लोखंडाच्या जाळया बसवाव्या लागतील कारण त्या केव्हाही काढता येतील.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u> साहेब, यामध्ये युध्दपातळीवर काम करा, कोणताही अपघात होता कामा नये याची दक्षता घ्या. महापालिकेचे नांव खराब नाही झाले पाहिजे, स्थायी समितीची तुम्हाला परवानगी आहे. सदर कामासाठी जो खर्च होईल त्यांस आजच स्थायी समिती मान्यता देते, कोणाकडून करून घ्यायचे, काय करायचे ते तुम्ही ठरवा. जोपर्यंत निविदा प्रक्रीया होत नाही तोपर्यंत आवश्यक उपाययोजना करा, एकही अपघात होता कामा नये.

<u>सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी</u> :– मी आयुक्तांना निवेदन करतो की, बरेच वेळा आम्ही वॉर्डमध्ये रू. २–२ लाखाचे काम करतो, त्याप्रमाणे आपणांस अत्यावश्यक असल्यास फलक लावणे, तार बांधणे इत्यादी कामांसाठी रू. १ ते २ लाखाची प्राकलने तयार करून ४ ते ५ ठेकेदारांना कामे देवून ही कामे करून घ्यावीत. जेणेकरून आपल्या शहरात अपघात होणार नाही.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u> निविदा उद्याच अपलोड झाले पाहिजे. सदर ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता पारीत करण्यात यावा अशी आम्ही मान्यता देत आहोत. आम्ही ५ ठेकेदार का म्हणालो, जेवढी जास्त लोकं कामे करतील,

<u>शहर अभियंता, श्री. राम जयस्वार</u> :– पाच भागामध्ये काम केले पाहिजे.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u> नाही, आम्ही समजलो नाही,

<u>सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर</u> :– सदर कामासाठी ५ ठेकेदार नियुक्त करा.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u> ६ ठेकेदार नियुक्त करा, तुम्हालापण काम करणे सुलभ होईल.

<u>उप–आयुक्त (मुख्यालय), श्री. नितीन कापडणीस –</u> एखादे टेंडर फेल गेले किंवा प्रतिसादच मिळाला नाही तर...

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे:–</u> ६ ठेकेदारांनी एकदम काम सुरू केले तर, आपला उद्देश सफल होईल, काम लवकरात लवकर होईल. पण एकच ठेकेदार तीन काम घेवून बसला तर, एका ठेकेदाराने एकच निविदा भरावी. एखादा ठेकेदार काम करण्यास तयार नसेल तर ते रदद् करून दुस–या ठेकेदारास देण्यात यावे.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u> एखादा ठेकेदार काम करण्यास तयार नसेल तर ते काम ५(२) (२) मध्ये देवून टाकू, साहेब, जरा एक माहिती सांगा, एखादया ठेकेदाराने काम सुरू केल्यानंतर ते काम करण्यास साधारणत: किती वेळ लागेल,

<u>सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर</u> :– एखादया ठेकेदाराने तीन महिन्याच्या कालावधीत काम केले नाही तर त्याला काळया यादीत टाकण्यात यावे.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:— </u>हो, हो, तीन महिन्यात काम झाले नाही तर काळया यादीत टाका.

<u>सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर </u>:— एखादा ठेकेदार तीन महिन्यात काम करणार नाही तर त्यापुढील प्रत्येक दिवसांसाठी दंड लावण्यात यावा.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:— </u>हो, हो, दंड लावण्यात यावा. प्रशासन जो ठरवेल त्याप्रमाणे प्रतीदिनप्रमाणे दंडात्मक कारवाई सुरू राहिल. आता जे दर आले आहेत त्यामध्ये ते काम करायला तयार असतील ५ पैकी, ५(२) (२) मध्ये आणि ज्याचा दर कमी असेल तर त्याला देवू ना.

<u>सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी </u>:— जो कमीतकमी दर आले असतील, समजा तुम्ही सहा निविदा केल्या आणि एखादयाने ५ टक्क्यापेक्षा कमी दर दिले, बाकी सगळयांनी ५ टक्क्यांपेक्षा जास्त दर दिले असतील, तर सगळयांना बोलावून ५ टक्क्यापेक्षा कमी दरातच दयावे लागेल. नाहीतर तर बाकीच्या निविदा पुन्हा बोलवाव्या लागतील. सगळयांना एकसारखा दर दयावा लागेल, कोणी ८ टक्के, ६ टक्के, ९ टक्के असे दर दिले तर आपल्याला वाटाघाटीसाठी बोलावून सगळयांना एकसारखा दर दयावा लागेल आणि जर एखादा ऐकायला तयार नसेल तर ती निविदा पुन्हा बोलवावी लागेल.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:— </u>त्यांच्यापैकी तयार असतील तर ठिक आहे, नाहीतर पुन्हा निविदा बोलवाव्या लागतील. संबंधित विभागाने नियमानुसार कार्यवाही करावी. शासनाला व प्रशासनालाही अडचणी येणार नाहीत अशापध्दतीने करा. आम्ही तुमच्या बरोबर आहोत.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे:— </u>६ निविदांमध्ये एक निविदा आली ५ टक्क्यांपेक्षा कमी दराचे, २ टक्के कमी दर, ३ टक्क्यांपेक्षा जास्त, १० टक्क्यांपेक्षा कमी, एकच काम अशा वेगवेगळया दरानुसार देता येणार नाही, लेखा परिक्षणात आक्षेप येईल, स्थायी समितीच्या म्हणण्यानुसार निविदेतील दरापेक्षा कमी टक्के दर दिले असतील त्यांना काम देता येईल. आणि जेवढया निविदाकारांनी निविदा भरल्या असतील त्यामध्ये त्यांनी जे दर दिले असतील त्यामधील सर्वात कमी दर असतील त्या दरालाच मान्यता देता येईल.

<u>सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी </u>:— आयुक्त साहेबांना जे इष्ट वाटेल त्याप्रमाणे त्यांनी करावे, आम्ही आयुक्तांवर सोडतो.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u> तुम्हाला सांगतो, या शहरामध्ये मागच्यावर्षी रस्त्यांवरील खडड्े भरण्याचा विषय आला होता, यापुर्वी स्थायी समितीमध्ये हा विषय आला होता, त्यामध्ये एक १३ टक्क्यापेक्षा कमी दर आला होता, आणि तिघे ॲट पार होते असे एकूण चार निविदाकार होते, तर माझे असे म्हणणे आहे कि, जर एक १३ टक्क्यापेक्षा कमी दर देत असेल तर बाकी तिघांनीसुध्दा त्याच दरात काम केले पाहिजे, एका कंपनीस १३ टक्क्यापेक्षा कमी दरात काम दिले होते परंतु कॅम्प नं. ५ मध्ये त्यांनी काम कुठे केले, सार्व. बांधकाम विभागाचे जे नियम आहेत त्याप्रमाणे आपण कार्यवाही करा.

<u>सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी </u>:— एक ठेकेदार एका कामाची निविदा भरत आहे, असे ६ ठेकेदार ६ कामासाठी निविदा भरतील, आणि एका कामासाठी कमीतकमी तीन निविदाकार आले पाहिजेत त्याशिवाय तुम्ही निविदा उघडू शकत नाही, असे असताना, कमीत कमी १८ ठेकेदार आले पाहिजेत त्यासाठी, त्यामुळे ठरावात आपण असे म्हणा कि, एक ठेकेदाराला एकापेक्षा जास्त काम देता येणार नाही, निविदा भरू शकतो,

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे:— </u>एका ठेकेदाराला एकच काम देवू शकतो.

<u>महापालिका सचिव :—</u> सदर विषय पारीत करण्यात यावा का?

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u> सदर विषयाच्या ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता पारीत करण्यात यावा.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

**विषय क्र. ५** :—उल्हासनगर—३ येथिल कल्याण—अंबरनाथ रस्त्यावरील अतिक्रमण विरहित जागेच्या ठिकाणी रस्त्यांच्या दुतर्फा नाली बांधणे कामी निविदा प्रक्रिया करणेस मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

सार्वजनिक बांधकाम कार्यालयाचे पत्र क्र.उमपा/साबांवि/शअ/२७ दिनांक २५/०५/२०१६ नुसार कल्याण—अंबरनाथ रस्त्यावर दुतर्फा फुटपाथ नाली बनविणेच्या कामाचे उल्हासनगर महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे सदर कामांचे रु.८,६०,७८,७००/— एवढया रक्कमेचे प्राकलन तयार करण्यात येवून सदर प्राकलन व प्रस्ताव आपणाकडे निधी उलब्धतेकरीता पाठविण्यात आला आहे.

तद्नंतर एम.एम.आर.डी.ए.चे अधिक्षक अभियंता यांनी दिनांक २७/०५/२०१६ रोजी कल्याण — अंबरनाथ रस्त्याची प्रत्यक्ष पाहणी केली असता त्यांनी सदर रस्त्याचे दुतर्फा फुटपाथ नाली बनविणेच्या कामाकरीता या विभागातर्फे तयार करण्यात आलेल्या प्राकलनात बदल करण्याच्या सुचना दिल्या आहेत. उदा. सदर प्राकलनात नालीच्या भिंतीचे कॉक्रिटचे ग्रेड, स्लॅबच्या कॉक्रिट ग्रेड, Utility Service duct वगळून सदर नालीची रुंदी वाढविणे तसेच २०१५—१६ च्या दरसुचीनुसार प्राकलन तयार करणे इत्यादी सुचविले.

त्याप्रमाणे वरील सुचनांप्रमाणे कल्याण—अंबरनाथ रस्त्यावर दुतर्फा फुटपाथ नाली बनविणेच्या कामाचे रु. १६,२९,२९,२३०/— रक्कमेचे प्राकलन तयार करण्यात करुन निधी उपलब्धेचा प्रस्ताव या कार्यालयाचे पत्र क्र. उमपा/साबांवि/शअ/२९ दिनांक ३०/५/२०१६ रोजी एम.एम.आर.डी.ए.कडे पाठविण्यात आला होता परंतू दिनांक ८/६/२०१६ रोजी सदर पाठविण्यात आलेल्या प्राकलनाची छाननी करुन नाली बांधकामाच्या सेक्शनमध्ये काही बदल करण्यात आले तसेच पाईप न टाकता कॉक्रिटचे बॉटम बनविणेचे सुचविण्यात आले. त्यामुळे या कार्यालयातर्फे सादर करण्यात आलेल्या प्राकलनात बदल करुन अंतिम प्राकलनिय किंमत रु.१३,४५,००,०००/— एवढी झाली आहे. सदर काम अत्यंत महत्वाचे असल्याने एम.एम.आर.डी.ए.कडून निधी उपलब्ध होईपर्यंत एका बाजूला कामाची निविदा प्रक्रिया केल्यास वेळेचा होणारा अपव्यय टळेल.

तरी कल्याण — अंबरनाथ रस्त्याचे दुतर्फा फुटपाथ नाली बनविणेच्या कामाकरीता एम.एम.आर.डी.ए.कडून मिळणाऱ्या निधी उपलब्धतेच्या मान्यतेस अधिन राहुन सदर कामाची निविदा प्रक्रिया करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक असल्याने सदर प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे प्रस्तावित.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> २५ <u>दिनांक:— १३/६/२०१६</u>

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. विजय पाटील

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर—३ येथिल एम.एम.आर.डी.ए कडुन मिळणा—या निधी उपलब्धतेच्या मान्यतेच्या अधिन राहुन कल्याण—अंबरनाथ रस्त्यावरील अतिक्रमण विरहित जागेच्या ठिकाणी रस्त्यांच्या दुतर्फा नाली बांधणे कामी खालील अटींवर निविदा प्रक्रिया करणेस मान्यता देत आहे.

१. हे काम तातडीने पुर्ण करायचे असून या कामाचे ६ विभागात विभागणी करणे.
२. ७ दिवसाच्या कालावधीची टेंडर नोटिस दिली जावी.
३. कामाच्या वॅल्यू नुसार कंपनीकडे नेथवर्क असले पाहिजे.
४. कामाच्या व्हल्यू नुसार टर्नओव्हर असले पाहिजे.
५. जॉईंट वेंचरला परवानगी नाही.

६. जर ठेकेदारास वाटेल तर तो सबलेट करु शकतो त्यास महापालिका मंजुरी देईल.
७. सदर काम ३ महिन्यात पुर्ण होणे आवश्यक असेल. तसे न झाल्यास प्रशासनातर्फे योग्य वाटेल अशी दंडात्मक कारवाई केली जाईल.
८. एका ठेकेदारास एकापेक्षा जास्त काम दिले जाणार नाही.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

————————————————————————————————————————————

**विषय क्र. ६ :—** डॉ.आंबेडकर नगर, चोपडा येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा अर्धाकृती पुतळा पूर्णाकृती करणेच्या रु.१७.५० लक्ष रक्कमेच्या खर्चास वित्तीय मान्यता मिळून सदर कामाची निविदा न मागविता मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियमाचे प्रकरण ५ (२) (२) अंतर्गत श्री. विजय शिरगांवकर यांना कामाचे कार्यारंभ आदेश निर्गमित करणेस मा.स्थायी समितीची मान्यता मिळणेकरीता प्रस्तावित.

————————————————————————————————————————————

महापालिका सचिव :— सदर विषय पारीत करण्यात यावा का?

काही सदस्य :—पास—पास......

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:— सदर विषयाच्या ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता पारीत करण्यात यावा.

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ६ :—**डॉ.आंबेडकर नगर, चोपडा येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा अर्धाकृती पुतळा पूर्णाकृती करणेच्या रु.१७.५० लक्ष रक्कमेच्या खर्चास वित्तीय मान्यता मिळून सदर कामाची निविदा न मागविता मुंबई

प्रांतिक महापालिका अधिनियमाचे प्रकरण ५ (२) (२) अंतर्गत श्री.विजय शिरगांवकर यांना कामाचे कार्यारंभ आदेश निर्गमित करणेस मा.स्थायी समितीची मान्यता मिळणेकरीता प्रस्तावित.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रामधील डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर, चोपडा कोर्ट, उल्हासनगर–३ येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सन १९९३ मध्ये अर्धाकृती पुतळा बसविलेला आहे. या पुतळयास २४ वर्षाचा कालावधी झालेला असून पुतळयास अंतर्गत तडे गेलेले आहेत. पुतळयाची स्थिती नाजूक झालेली आहे. त्यामुळे हा पुतळा बदलणे अत्यंत आवश्यक आहे.

चालू वर्षी जगभर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे १२५ शतोकोत्तर सुवर्ण महोत्सवी वर्षे साजरे केले जात आहे. महाराष्ट्र शासनाने तसेच केंद्र शासनाने सुध्दा बाबासाहेब आंबेडकर यांची १२५ वी जयंती वर्षभर साजरी करण्याचे ठरविलेले आहे. याचे औचित्य साधून आपल्या महापालिका क्षेत्रामध्ये वरील जागी पूर्णाकृती पुतळा बसविल्यास शहराच्या वैभवात भर पडेल. या पुतळयाचा अंदाजित खर्च रु.१७.५० लक्ष रुपयांच्या आसपास असेल.

महापालिकेस रु.१७.५० लक्ष खर्च करावयाचा असल्यास प्रचलित नियमानुसार ई निविदा प्रक्रिया राबवून काम करणे आवश्यक आहे. तथापी, पुतळा बसविणे हे काम इतर दैनंदिन कामासारखे नाही. हे काम शिल्पकलेमधील तज्ञ व्यक्तिकडून करुन घेणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर कामाची निविदा काढणे यथोचित करणार नसल्याने श्री.विजय शिरगांवकर हे महाराष्ट्र मधील नामांकीत शिल्पकार असून त्यांनी आज पर्यंत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे अनेक पुतळे बनविलेले असून त्यांची गुणवत्ता अत्यंत चांगली असल्याचे बोलले जाते. त्यांनी आपल्या बाजूच्या कुळगांव बदलापूर नगरपालिका व खाली त्यांनी बनविलेल्या महान पुरुषांच्या शिल्पाची कामे केलेली आहेत.

**दोन पायावर झेपावणारे फोर्सेबल पुतळे :–**

१. झाशीच्या राणीचा अश्वारुढ फोर्सेबल पुतळा, धनवटे रंगमंदीर समोर, नागपूर, १५ फुट उंचीचा (११–११–१९६२)
२. छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारुढ पुतळा, कोटोसमोर, नाशिक, १२ फुट उंचीचा (६–१–१९७७)
३. छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारुढ पुतळा, मालेगांव १२ फुट उंचीचा (१९७३)
४. छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारुढ पुतळा, रत्नागिरी १२ फुट उंचीचा (१९८४)
५. छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारुढ पुतळा, शेतकरी साखर कारखाना, माधवनगर, सांगली (१९८९)

**तीन पायवावर झेपावणारे फोर्सेबल पुतळे :–**

१. छत्रपती शिवाजी महाराजांचा १२ फुट उंचीचा अश्वारुढ पुतळा, भाजीमार्केट सांगली (३१–०७–१९६२)
२. छत्रपती शिवाजी महाराजांचा १२ फुट उंचीचा अश्वारुढ पुतळा, मासुंदा तलाव, ठाणा (२२–६–१९६४)
३. वीर ताराबाईचा अश्वारुढ १२ फुट उंचीचा पुतळा, ताराबाई विद्यापिठ, कोल्हापूर (२३–२–१९७२)
४. छत्रपती शिवाजी महाराजांचा १२ फुट उंचीचा अश्वारुढ पुतळा, देवळाली रोड, नाशिक (१–२–१९७१)
५. छत्रपती शिवाजी महाराजांचा १२ फुट उंचीचा अश्वारुढ पुतळा, कलंबर साखर कारखाना, नांदेड (१–२–१९७९)
६. छत्रपती शिवाजी महाराजांचा १२ फुट उंचीचा अश्वारुढ पुतळा, राहूरी साखर कारखाना, राहूरी (३१–९–१९८२)
७. छत्रपती शिवाजी महाराजांचा १२ फुट उंचीचा अश्वारुढ पुतळा, पनवेल नगरपालिका, पनवेल.
८. छत्रपती शिवाजी महाराजांचा १२ फुट उंचीचा अश्वारुढ पुतळा खोपोली नगरपालिका, खोपोली.
९. छत्रपती शिवाजी महाराजांचा १२ फुट उंचीचा अश्वारुढ पुतळा, लोणावळा नगरपालिका, लोणावळा.
१०. छत्रपती शिवाजी महाराजांचा १२ फुट उंचीचा अश्वारुढ पुतळा, पाचोरा नगरपालिका, पाचोरा.

**इतर काही कलात्मक पुतळे :–**

१. भाऊसाहेब हिरे यांचा ९ फुट उंचीचा पुतळा, मालेगांव
२. भाऊसाहेब हिरे यांचा ९ फुट उंचीचा पुतळा, साखर कारखाना दाभाडी, मालेगांव
३. पं.जवाहरलाल नेहरु यांचा ९ फुट उंचीचा पुतळा, नाशिक गार्डन, नाशिक.
४. माधवराव बोरस्ते यांचा ९ फुट उंचीचा पुतळा, नेफाड साखर कारखाना, नेफाड.
५. महात्मा ज्योतिबा फुले यांचा १२ फुट उंचीचा पुतळा, मालेगांव नगरपालिका, मालेगांव
६. पं.लालबहादुर शास्त्री यांचा ६ फुट उंचीचा पुतळा, सिंदीया शिपीं कॉर्पोरेशन, मुंबई.
७. यशवंतराव चव्हाण यांचा ९ फुट उंचीचा पुतळा, कऱ्हाड.
८. यशवंतराव चव्हाण यांचा ९ फुट उंचीचा पुतळा, साखर कारखाना कऱ्हाड.

९. डॉ.आंबेडकर यांचा ६ फुट उंचीचा पुतळा, पनवेल महानगरपालिका, पनवेल.
१०. डॉ.आंबेडकर यांचा ६ फुट उंचीचा पुतळा, सुरत नगरपालिका, सुरत.
११. बॅ.स्वातंत्र्यविर सावरकर यांचा बस्ट ३ फुट उंचीचा पुतळा, पनवेल महानगरपालिका, पनवेल
१२. केकूबाददाबू यांचा ३ फुट उंचीचा पुतळा, मिरची बाजार, नागपुर
१३. भाऊसाहेब हिरे यांचा ३ फुटी बस्ट पुतळा, त्र्यंबकेश्वर
१४. हुतात्मा शहिद शंकर यांचा ६ फुटी बस्ट पुतळा, मिरची बाजार, नागपूर
१५. डॉ.आंबेडकर यांचा ६ फुट उंचीचा पुतळा, खोपोली महानगरपालिका, खोपोली.
१६. कै.जयरामजी अंबेरकर स्मारक समिती तर्फे पुतळा, अंबपूर ता.बिलोली, जि.नांदेड
१७. कै.सुवत प्रसाद त्रिवेदी यांचा ३ फुट उंचीचा बेस्ट पुतळा, नागपूर
१८. कै.माधवराव बोरस्ते यांचा ३ फुट उंचीचा बेस्ट पुतळा, ओझर, जि.नाशिक

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे ब्रॉझचे पूर्णाकृती पुतळे :—**

१. भिमवडी रहिवासी संघ (रजि.) डॉ.बाबासाहेब आंबेडकर गौतमनगर, उद्यान, भिमवाडी पी.एल.लोखंडे मार्ग, गोवडी मुंबई.
२. डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा समिती, आंबेडकर चौक पतंगराव घाटकोपर, मुंबई.
३. चिपळून नगरपरिषद बहादूर शेख नाका ता.चिपळूण जिल्हा रत्नागिरी.
४. आंबेडकर चौक ता.अहमदपुर जिल्हा लातूर,
५. मिरा भाईंदर महानगरपालिका ता.जिल्हा ठाणे.
६. कल्याण डोंबिवली महानगरपालिका ता.कल्याण जिल्हा ठाणे.
७. अलिबाग नगरपरिषद ता.अलिबाग, जिल्हा रायगड
८. सुत्रापाडा नगरपालिका ता.सुत्रापाडा जिल्हा जुनागड गुजरात.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे ब्रॉझचे अर्धाकृती पुतळे :—**

१. मुंबई पोर्ट ट्रस्ट डॉकयार्ड मुंबई.
२. मिरा भाईंदर महानगरपालिका ता.जिल्हा ठाणे.
३. मुर्तवडे बुध्दविहार मु.पो.मुर्तवडे, ता.चिपळूण, जिल्हा रत्नागिरी.

वरीलप्रमाणे शिल्पकार श्री.विजय शिरगांवकर यांनी केलेली कामे पहाता त्यांना आपल्या शहरामधील डॉ.बाबासाहेब आंबेडकर, चोपडा, उल्हासनगर—३ येथील पूर्णाकृती पुतळा तयार करण्याचे काम दिल्यास ते चांगल्या प्रकारे करु शकतात. सदर कामासाठी महासभेने ठराव क्र.६२ दिनांक १८/१२/२०१५ अन्वये मंजूरी प्रदान केलेली आहे. तसेच सदर पुतळा पूर्णाकृती बनविण्याकरीता पुतळयाच्या क्ले मॉडेलला कला संचालनालयाची मान्यता श्री.शिरगांवकर यांनी त्यांचेतर्फे घेणे आवश्यक आहे. सदर मान्यता प्राप्त झाल्यानंतरच श्री.शिरगांवकर यांना सदर कामाचे कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात येईल.

वरील सर्व बाबींचा विचार करता पूर्णाकृती पुतळा बनविण्याच्या कामाकरीता येणारा रु.१७.५० लक्ष एवढया खर्चास मान्यता मिळून सदर कामाची अत्यावश्यकता पाहता सदर काम मुंबई महापालिका अधिनियमाचे प्रकरण ५ (२) (२) अंतर्गत श्री.विजय शिरगांवकर यांना कामाचे कार्यारंभ आदेश निर्गमित करणेस मान्यता मिळणेस सविनय सादर.

स्थायी समिती ठराव क्र. २६ दिनांक:— १३/६/२०१६

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— डॉ. निना नाथानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार डॉ.आंबेडकर नगर, चोपडा येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा अर्धाकृती पुतळा पूर्णाकृती करणेच्या रु.१७.५० लक्ष रक्कमेच्या खर्चास वित्तीय मान्यता व सदर कामाची निविदा न मागविता मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियमाचे प्रकरण ५ (२) (२) अंतर्गत श्री.विजय शिरगांवकर यांना कामाचे कार्यारंभ आदेश निर्गमित करणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

महापालिका सचिव :– विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ७ :–** डासनाशक/अळीनाशक/जंतुनाशक/किटकनाशक औषधांचा पुरवठा करुन घेण्यासाठी येणा–या खर्चास व ई–निविदा प्रसिध्द करण्यास मान्यता देणे.

---

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:– या कामाचे टेंडर साधारण किती दिवसात होईल. कारण पावसाच्या आधी खरेतर औषधे खरेदी झाली पाहिजेत. आता हे टेंडर तीन दिवसाच्या मुदतीत दया.

प्र. मुख्य स्व. निरीक्षक, श्री. विनोद केणी:– आपल्याकडे औषधांचा साठा उपलब्ध आहे.

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:– माझी विनंती आहे, खरेतर हि कामे लवकर झाली पाहिजे होती कारण पावसाळा सुरू होणार आहे, मग सात दिवसांची मुदत दया.

आयुक्त, श्री. मनोहर हिरे:– निविदा प्रक्रीयेसाठी किमान ७ दिवसांची नोटीस दयावी लागेल.

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:– औषधे आपल्याकडे असतील तर काही अडचण नाही पण आणखी लागली व कमी पडली तर अडचण निर्माण होवू शकते. सात दिवसांच्या मुदतीत टेंडर मागवा, त्यात कोणी टेंडर भरले नाही तर पुन्हा टेंडर रिकॉल करावे लागेल त्यामध्ये ७ दिवस जातील असे १५ दिवस लागतीलच.

महापालिका सचिव :– सदर विषय पारीत करण्यात यावा का?

काही सदस्य :–पास–पास......

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:– सदर विषयाच्या ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता पारीत करण्यात यावा.

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ७ :–**डासनाशक/अळीनाशक/जंतुनाशक/किटकनाशक औषधांचा पुरवठा करुन घेण्यासाठी येणा–या

खर्चास व ई–निविदा प्रसिध्द करण्यास मान्यता देणे.

प्रस्तावना

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये सविनय सादर करण्यात येते की, शहरातील नागरीकांच्या आरोग्याच्या दृष्टीने व स्वच्छता, साफसफाईचे कामासाठी, शौचालये सफाईसाठी तसेच शहरात डासांचा प्रादुभाव होवू नये याकरीता आरोग्य विभागामार्फत दैनदिंन फवारणी, प्रत्येक प्रभाग समिती निहाय १ असे चार मोबाईल स्प्रेंईग ट्रक्टर व ६५ हॅन्ड स्प्रपंप द्वारे आणि हॅन्डहेल्ड फॉगींग मशिनद्वारे स्प्रईंग नियीमत व सातत्याने करण्यात येत असते. त्याच प्रमाणे डंपिंग ग्राउंडवर नियमीत व सातत्याने बायोकल्चर फवारणी करण्यात येत असते.

सन २०१५–२०१६ या वर्षाकरीता जंतुनाशक/किटकनाशक औषधांचा साठा पुरवठा करून घेण्यात आलेला होता, त्यानूसार संबंधीत प्रभागाचे स्वच्छता निरिक्षक यांना भांडार विभागामार्फत वितरीत करण्यात आला होता. दि. २२/४/२०१६ रोजीच्या पत्रानुसार मुख्य स्वच्छता निरिक्षक, आरोग्य भांडार यांनी जंतुनाशक औषधे खरेदी करुन पुरवठा करण्याबाबत मागणी केलेली आहे. सदर पत्रानुसार दिनांक २२/४/२०१६ रोजी पर्यंत आरोग्य विभागाच्या भांडारात असलेला साठा व प्रत्येक स्वच्छता निरिक्षक यांच्याकडे शिल्लक असलेला साठा पाहता अंदाजे दोन महिन्यांसाठी पुरेल ऐवढा जंतुनाशक/किटकनाशक औषधांचा साठा उपलब्ध आहे. तसेच वेळोवेळी घेतलेल्या नविन उत्पादनांचे प्रात्याक्षीक (डेमो) पाहता काही उत्पादनांचा समावेश करण्यात आलेला आहे. तसेच स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत नियमीत घेण्यात येणा–या मोहिमेअंतर्गत जास्तीत जास्त किटकनाश/जंतुनाशक पावडर व द्रव्याचा वापर होत असल्याने औषधांची मागणी वाढलेली आहे. त्यानुसार औषधांच्या परीमाणात आवश्यक बदल होणे अपेक्षित आहे.

दिनांक ३१/०३/२०१६ रोजीपर्यंत आरोग्य विभागातील भांडार विभागात जंतुनाशकांचा उपलब्ध/शिल्लक असलेल्या साठयाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ. क्रं. | किटकनाशक/जंतुनाशक/अळीनाशक/डासनाशक | सन२०१५–१६ साठी प्राप्त झालेला साठा किलो/लिटर | ३१/०३/१६ पर्यंत उपलब्ध/ शिल्लक साठा किलो/लिटर |
|---|---|---|---|
| १ | ब्लीचीग पावडर, ३३% क्लोरीन आय.एस.आ. प्रमाणीत | १५००० | ५० |
| २ | काळे फिनाईल, शौचालयासाठी(३५ लि.प्लास्टीक कॅन मध्ये) | ७००० | ७० |
| ३ | सॅनिटेक्स व्हाईट क्लिनर, सुंगधीत, शौचालयासाठी व कार्यालयासाठी (३५ लि. प्लास्टीक कॅन मध्ये) | ५००० | ७७० |
| ४ | जर्मीटॉक्स प्लस पावडर, डिसन्फेक्टंर पावडर | १३००० | २७५ |
| ५ | प्रोडेन्टीसाईड झिंक फॉस्फाईडॅ/(रॅटॉल पेस्ट)५० ग्रॅम, उंदीरनाशक | २००० | २५ |
| ६ | फिनॉईल (डांबर) गोळया, जंतुनाशक, मुता–यांसाठी | ५०० | २३५ |
| ७ | सफाया मोनोक्लोरो फिनोल पावडर जंतुनाशक दुंगधीनाशक(३५ लि. प्लास्टीक कॅन मध्ये) | ५००० | निरंक |
| ८ | गोल्डमिल बायोक्लचर, डंम्पीग ग्राउंडसाठी/कच–याचे विघटनकरण्यासाठी | १००० | १९० |
| ९ | मायक्रो फाईन पावडर, सुंगधीत वातावरण निर्मिती करण्यासाठी | १०००० | ३५० |
| १० | क्लीनोव्हाईट, दुर्गधीनाशक WHO स्पेसिफीकेशन प्रमाणे | ५००० | ५५५ |
| ११ | फाईट आउट अळीनाशक | ८०० | २० |

| | | | |
|---|---|---|---|
| १२ | निमटेक्स, हार्बल अळीनाशक, हाफकीन इस्टिट्युटद्वारा टेस्टेड | ६०० | ०५ |
| १३ | सेप्टी टॅक पावडर (सेप्टीक्लीन पावडर) शौचालयाचे सेप्टीक टॅक सफाईसाठी | १००० | निरंक |
| १४ | फ्रेश ऑल डिलक्स, (७५ ग्राम) कार्यालयासाठी | ३०० | ७५ |
| १५ | पिप बेट, ग्रन्युअलस माशानाशक | ५०० | १५ |
| १६ | वेस्ट ट्रीट पावडर, सिलीकेटर, झेडबेस पावडर एन्ट्रीसेप्टीक पावडर मिनरल पावडर (दुंगधीनाशक व रोगजंतूचा अटकाव करण्यासाठी) | १६००० | २५ |
| १७ | बायोक्लचर पावडर डंपिगं ग्राउडसाठी/कच–याचे विघटन करण्यासाठी आवश्यक घटक–नॉन इडिबल पावडर, मिनरल पावडर, कलचर अॅझोटो बॅक्टर–लिगनीग डिग्रेबल बॅक्टोरिया) | ८००० | ३५०० |
| १८ | बॅक्ट्रो फ्रि पावडर – किटकनाशक | १६००० | १५० |
| १९ | हॅड्रोक्लोरिक अॅसिड – शौचालय मुता–या सफाई करणेसाठी | ३००० | ५००० |
| २० | बॅक्टोक्लीन व्हाईट क्लिनर,शौचालय सफाईसाठी | ८००० | १०० |
| २१ | साईथ्रिऑन ५०% EC डासनाशक, किटकनाशक | ११७० | निरंक |
| २२ | मल्टी अॅप्लीकेशन क्लिनर | ५०० | ५४० |
| २३ | युरिनल ब्लॉक्स | १०० | ४० |
| २४ | हायजीन, जंतुनाशक | ५०० | २२० |

उल्हासनगर महापालिका कार्यक्षेत्रातील नागरीकांचे आरोग्य अबाधित ठेवण्यासाठी तसेच शौचालये सफाईसाठी, डस्टींग व स्प्रेईंगसाठी तसेच सेप्टीक टॅक सफाईसाठी व डास निर्मुलनासाठी जंतुनाशक/किटकनाश/दुर्गंधीनाशक/अळीनाशक/डासनाशक द्रव व पावडर स्वरुपात खालील प्रमाणे नमुद किंवा तत्सम् औषधांची खरेदी करणे आवश्यक आहे. सन २०१६–१७ साठी खालील प्रमाणे नमुद आवश्यकते नुसार वेळोवेळी मागविण्यात येणा–या किटकनाशक/जंतूनाशक/ दुर्गधीनाशक/अळीनाशक/डासनाशक/शौचालय व डंपिगं ग्रांउड साठी आवश्यक रसायने खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्रं. | औषधाचे नाव व त्यांचा तपशिल | आवश्यक मालाचा (परिमाण) |
|---|---|---|
| १ | ब्लीचीग पावडर, ३३% क्लोरीन आय.एस.आ. प्रमाणीत | १५००० किलो |
| २ | काळे फिनाईल, शौचालयासाठी (३५ लि. प्लास्टीक कॅन मध्ये) | ७००० लिटर |
| ३ | सॅनिटेक्स व्हाईट क्लिनर, सुंगधीत, शौचालयासाठी व कार्यालयासाठी (३५ लि. प्लास्टीक कॅन मध्ये) | ५००० लिटर |
| ४ | जर्मीटॉक्स प्लस पावडर, डिसन्फेक्टंर पावडर | १०००० किलो |
| ५ | प्रोडेन्टीसाईड झिंक फॉस्फाईडॅ/(रॅटॉल पेस्ट)५० ग्रॅम, उंदीरनाशक | २००० नग (३५ ग्रम टयुब) |

| | | |
|---|---|---|
| ६ | फिनॉईल (डांबर) गोळया, जंतुनाशक, मुता—यांसाठी | ५०० किलो |
| ७ | सफाया मोनोक्लोरो फिनोल पावडर जंतुनाशक दुंगधीनाशक(३५ लि.प्लास्टीक कॅन मध्ये) | ५००० किलो |
| ८ | गोल्डमिल बायोक्लचर, डंम्पीग ग्राउंडसाठी/कच—याचे विघटनकरण्यासाठी | २००० किलो |
| ९ | मायक्रो फाईन पावडर, सुंगधीत वातावरण निर्मिती करण्यासाठी | १०००० किलो |
| १० | क्लीनोव्हाईट, दुर्गधीनाशक WHO स्पेसिफीकेशन प्रमाणे | ५००० लिटर |
| ११ | फाईट आउट अळीनाशक | ५०० लिटर |
| १२ | निमटेक्स, हार्बल अळीनाशक, हाफकीन इस्टिट्युटद्वारा टेस्टेड | ५०० लिटर |
| १३ | सेप्टी टॅक पावडर (सेप्टीक्लीन पावडर) शौचालयाचे सेप्टीक टॅक सफाईसाठी | १००० किलो |
| १४ | फ्रेश ऑल डिलक्स, (७५ ग्राम) कार्यालयासाठी | ३०० नग |
| १५ | पिप बेट, ग्रन्युअलस माशानाशक | ५०० किलो |
| १६ | वेस्ट ट्रीट पावडर, सिलीकेटर, झेडबेस पावडर एन्ट्रीसेप्टीक पावडर मिनरल पावडर (दुंगधीनाशक व रोगजंतूचा अटकाव करण्यासाठी) | १०००० किलो |
| १७ | बायोक्लचर पावडर डंपिगं ग्राउडसाठी /कच—याचे विघटन करण्यासाठी<br>आवश्यक घटक — नॉन इडिबल पावडर, मिनरल पावडर, कलचर<br>ॲझोटो बॅक्टर — लिगनीग डिग्रेबल बॅक्टोरिया) | ५००० किलो |
| १८ | बॅक्ट्रो फ्रि पावडर — किटकनाशक | १०००० किलो |
| १९ | हॅड्रोक्लोरिक ॲसिड (०५ लिटर प्लास्टीक कॅन मध्ये )शौचालय मुता—या सफाई करणेसाठी | ५००० लिटर |
| २० | बॅक्टोक्लीन व्हाईट क्लिनर, शौचालय सफाईसाठी | ५००० किलो |
| २१ | साईथ्रिऑन ५०% EC डासनाशक, किटकनाशक | १००० लिटर |
| २२ | हायजीन, जंतुनाशक | ३००० लिटर |
| २३ | युरिनल ब्लॉक्स | १०० किलो |

उपरोक्त २३ प्रकारचे रसायने, औषधे आवश्यकतेनुसार व उपलब्ध आर्थिक तरतुदीनुसार (औषधांचे परीमाण कमी/जास्त होवू शकते.) खरेदी करण्यात येतील. उक्त सर्व जंतुनाशक औषधे नमुद परीमाणा नुसार खरेदी केल्यास रुपये १,१८,२२४००/— मात्र खर्च अपेक्षीत आहे. सन २०१६—१७ या वर्षासाठी महापालिका अंदाजपत्रकात जंतुनाशक औषधे खरेदीसाठी भाग—१,सी—१(३) जंतुनाशक खरेदी या लेखा शिर्षकात रुपये १,२०,००,०००/— तरतुद केलेली असून सदरचा खर्च त्यातून करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. वरिलप्रमाणे औषधे खरेदी करण्यासाठी त्यांचे दर मागविणे आवश्यक आहे. करीता निविदा सुचना प्रसिद्ध करणेस मान्यता मिळावी. तरी सन २०१६—१७ साठी ई—निविदा व दै. वृत्तपत्रात जाहिर निविदा सुचना प्रसिद्ध करण्यास व खरेदी करण्यसाठी येणा—या खर्चास वित्तीय मान्यतेसाठी सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या मंजुरीसाठी सविनय सादर.

स्थायी समिती ठराव क्र. २७ दिनांकः—१३/६/२०१६

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. विजय पाटील

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार डासनाशक/अळीनाशक/जंतुनाशक/किटकनाशक औषधांचा पुरवठा करुन घेण्यासाठी येणा—या रुपये १,१८,२२,४००/— या खर्चास व ई—निविदा प्रसिध्द करण्यास मान्यता देत आहे.

तसेच

सदर कामाची निविदा कालावधी ७ दिवसाचा असेल.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ८ वाचुन दाखवितात.

---

**विषय क्र. ८ :—** राणा ट्रेडिंग कंपनी जवळील डंपिंग ग्राउंडवरील कच—याचे सपाटीकरण करणेसाठी अतिरिक्त २ प्राक्लेन ४५ दिवसांसाठी घेण्यास व आर्थिक वर्ष २०१६—१७ साठी डंपिंग ग्राउंडवर सपाटीकरणासाठी मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि. उल्हासनगर यांच्याशी आवश्यक मशिनरी भाडेतत्वावर पुरवठा करुन उपलब्ध करुन संविदा करुन घेण्यास मान्यता देणे.

---

सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भूल्लर :— सदर विषय कार्यसुचीवरून वगळण्यात यावा.

प्र. मुख्य स्व. निरीक्षक, श्री. विनोद केणी:— या विषयात दोन प्रस्ताव आहेत.

आयुक्त, श्री. मनोहर हिरे:— मागील ठेकेदारालाच हे काम दयायचे आहे का?

प्र. मुख्य स्व. निरीक्षक, श्री. विनोद केणी:— हो, तशी निविदा झालेली आहे,

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भूल्लर :—** सदर दोन्ही विषय वगळून नव्याने स्वतंत्रपणे घेवून यावेत.

**उप–आयुक्त (मुख्यालय), श्री. नितीन कापडणीस :—** निविदेचा कालावधी दोन वर्षाचा आहे.

**महापालिका सचिव :—** सदर विषय पारीत करण्यात यावा का?

**काही सदस्य :—**नाही, नाही, सदर विषय वगळण्यात यावा.

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑ **विषय क्र. ८ :—** राणा ट्रेडिंग कंपनी जवळील डंपिंग ग्राउंडवरील कच–याचे सपाटीकरण करणेसाठी अतिरिक्त २ प्रोक्लेन ४५ दिवसांसाठी घेण्यास व आर्थिक वर्ष २०१६–१७ साठी डंपिंग ग्राउंडवर सपाटीकरणासाठी मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि. उल्हासनगर यांच्याशी आवश्यक मशिनरी भाडेतत्वावर पुरवठा करुन उपलब्ध करुन संविदा करुन घेण्यास मान्यता देणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर शहरात दररोज अंदाजीत ४१० मेट्रीक टन कचरा निर्माण होत आहे. सदरचा कचरा नियमीत राणा ट्रेडींग कंपनी जवळील पडीक खदाण, म्हारळ गांव, उल्हासनगर–१ येथिल डंपिंगग्राउंडवर वाहतूक केला जातो. सदर ठिकाणी गेले १८ ते १९ वर्षे कचरा टाकण्यात येत आहे. त्यामुळे सदर ठिकाणी कच–याचे ढीग निर्माण झालेले आहेत. व सद्यस्थितीत सदर जागेची कचरा सामावून घेण्याची क्षमता संपली असुन कचरा वाहतुकीच्या वाहनांची रांग लागत आहेत. सदर ठिकाणी डोझर व पोक्लेन मशिनद्वारे कच–याचे सपाटीकरण सुरु आहे. सद्या स्थितीत मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर कं. ली. यांच्या कडून दोन डोझर व तीन पोक्लेन मशीन उपलब्ध करुन घेवून डंपिंग ग्राउंडवरील घनकच–याचे सपाटीकरण सुरु आहे.

सद्यास्थितीत डंपिंग ग्राउंडची कचरा सामावून घेण्याची क्षमता संपल्याने व दैनंदिन कचरा टाकण्यासाठी डंपिंग ग्राउंडसाठी दुसरी जागा उपलब्ध होत नसल्याने सदर ठिकाणी आवश्यकतेनुसार दोन डोझर व तीन पोक्लेन मशीनद्वारे प्रतिदिन ८ तास कचरा सपाटीकरणाचे काम मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर ली., उल्हासनगर यांच्यामार्फत सुरु आहे. तसेच वळोवेळी आवश्यकतेनुसार अतिरीक्त मशनरीचा/वाहनांचा पुरवठा करुन घेण्यात येत असतो. सदरच्या कामाची मुदत कार्यादेश दिल्यापासनु ३६५ दिवसांची असुन दिनांक ७ जुलै २०१६ रोजी त्याची मुदत संपत आहे.

डंपिंग ग्राउंडवर कचरा टाकण्यासाठी जागा उपलब्ध होण्यासाठी सदर ठिकाणी नियमीत बायोकल्चर फवारणी व उक्त मशनरीद्वारे सपाटीकरण्याचे काम सुरु असते. सदरचे काम अतिमहत्त्वाचे व तात्काळ नियमीत स्वरुपात करावयाचे असून नागरीकांच्या आरोग्याशी निगडीत आहे.

डंपिंग ग्राउंडची कचरा सामावून घेण्याची क्षमता संपल्याने सपाटीकरणाच्या कामासाठीच्या निविदेचा कालावधी लवचीक ठेवण्यात आला होता. त्यामुळे कामाचा कालावधी सदर जागेवर (राणा ट्रेडिंग कंपनी जवळ, म्हारळ गांव, उल्हासनगर– १ जोपर्यंत कचरा टाकण्यात येईल तो पर्यंत म्हणजेच किमान ६ महिने ते जास्तीत जास्त दोन वर्षे असा ठेवण्यात आला होता. मात्र आर्थिक मंजुरी घेतांना स्थायी समितीसमोर एका वर्षासाठी अंदाजीत येणा–या खर्चाचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यानुसार मा. स्थायी समितीने सदर प्रस्तावास ठराव क्र. ३६ दिनांक १०/६/२०१५ रोजी अन्वये मान्यता दिलेली आहे. तरी यापुढे सन २०१६–१७ या कालावधीत जास्तीत जास्त ३६५ दिवस अथवा जोपर्यंत डंपिंग ग्राउंडवरील कचरा सापाटीकरणासाठी मशिनरी आवश्यक राहील तोपर्यंतचा कालावधी गृहीत धरला जाईल. तसेच मागील निविदेतील व करारनाम्यातील अटी व शर्ती ठेकेदारास बंधनकारक असतील.

तसेच डंपिंग ग्राउंडवरील कनिष्ठ अभियंता व स्वच्छता निरिक्षक तथा नियंत्रण यांनीजा.क्र.उमपा/आवि/स्वनि/७३ दि: २४/०५/२०१६ रोजी दिलेल्या पत्रानुसार डंपिंग ग्राउंडवरील जागेचे नियोजन करण्यासाठी अतिरीक्त दोन पोक्लेनची मागणी ४५ दिवसांसाठी केलेली आहे. डंपिंग ग्राउंडवरील जागेचे नियोजन करण्यासाठी व तेथे घनकचरा संकलन करण्यास जागा बनविण्यासाठी अतिरक्त दोन इक्स–२००पोक्लेन मशिन ४५ दिवसांसाठी भाडेतत्वावर पुरवठा करुन घेण्यास रुपये २६०५ प्रति तास याप्रमाणे दोन मशिन प्रतिदिन आठ तास काम केल्यास अतिरीक्त एकूण रुपये १८,७५,६००/– खर्च अपेक्षित आहे.

डंपिंग ग्राउंडवरील कच–याचे सपाटीकरण करण्यासाठी मागील निविदेतील अटी,शर्ती नुसार व दरानुसार प्रतिदिन किमान आठ तासांसाठी किमान दोन डी–१२० डोझर व ३ ई–एक्स २०० पोक्लेन मशिन पुरवठा करुन घेतल्यास २ डोझर उपलब्ध करुन घेण्यास रुपये ४३,५६८/– मात्र व ३ पोक्लेन भाडेतत्वावर उपलब्ध

करुन घेण्यासाठी रुपये ६२,५२०/— मात्र खर्च अपेक्षित आहे. सदरच्या कामाचे दिवस तसेच मशिनची संख्या अथवा वेळ यात बदल होण्याची शक्यता आहे. त्यामुळे खर्च कमी अथवा जास्त होण्याची शक्यता आहे. त्याच प्रमाणे घनकचरा व्यवस्थापना अंतर्गत घनकचरा संकलन करण्याचे ठिकाण बदलण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यानुसार १,०९,०८८/— प्रतिदिन व अंदाजीत रुपये ३,९८,१७,१२०/— (रुपये तीन कोटी अठ्ठयान्नव लाख सतरा हजार एकशे वीस मात्र.) वार्षिक खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च भागविण्यासाठी अंदाजपत्रक सन २०१६—२०१७ च्या भाग—१ सी—१(१), कचरा वाहतुक खर्च या लेखाशिर्षकात रुपये २५ कोटी खर्चाची तरतूद करण्यात आलेली आहे त्यातून खर्च करण्याचे प्रस्तावित करण्यात येते.

सद्या असलेले राणा ट्रेडींग कंपनी जवळील डंपिंगच्या जागेची कचरा सामावून घेण्याची क्षमता संपलेली आहे. त्यामुळे घनकचरा व्यवस्थापनासाठी उपलब्ध जागेत कचरा सपाटी करणासाठी भविष्यात उक्त नमुद आवश्यक मशनरींची संख्या कमी अथवा जास्त होवू शकते व त्यानुसार वार्षिक अंदाजीत खर्च कमी अथवा जास्त होवू शकतो.

तरी १) डंपिंग ग्राउंडवरील जागेचे नियोजन करण्यासाठी व तेथे घनकचरा संकलन करण्यास जागा बनविण्यासाठी अतिरीक्त दोन इक्स—२००पोक्लेन मशिन ४५ दिवसांसाठी भाडेतत्वावर पुरवठा करुन येणा—या खर्चास व
२) मागील निविदेतील अटी,शर्ती नुसार व दरानुसार प्रतिदिन किमान आठ तासांसाठी किमान दोन डी—१२० डोझर व ३ ई—एक्स २०० पोक्लेन मशिन पुरवठा करुनयेणा—या खर्चास व मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लिमीटेड, उल्हासनगर यांच्याशी संविदा करण्यसाठी सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३ (क) अन्वये मा. स्थायी समितीच्या मंजुरीसाठी सविनय सादर.

स्थायी समिती ठराव क्र. २७ अ — दिनांक:—१३/६/२०१६

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. विजय पाटील

ही स्थायी समिती राणा ट्रेडिंग कंपनी जवळील डंपिंग ग्राउंडवरील कच—याचे सपाटीकरण करणेसाठी अतिरिक्त २ प्रोक्लेन ४५ दिवसांसाठी घेण्यास व आर्थिक वर्ष २०१६—१७ साठी डंपिंग ग्राउंडवर सपाटीकरणासाठी मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि. उल्हासनगर यांच्याशी आवश्यक मशिनरी भाडेतत्वावर पुरवठा करुन उपलब्ध करुन संविदा करुन घेण्यास मान्यता देण्याचा प्रस्ताव या कार्यसूचीवरुन वगळण्यात येत आहे.

कारण

सदर गोषवा—यात दोन विषय एकत्रित आणले असून सदर विषयांचे वेगवेगळे गोषवारे आणणे आवश्यक आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

**उप—आयुक्त (मुख्यालय), श्री. नितीन कापडणीस :—** सभेपुढे एक विषय आणला आहे, कल्याण—अंबरनाथ रस्ता रूंदीकरण करताना बाधित होणा—या इमारती पाडण्यासाठी लागणा—या खर्चा..........

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—** सदरचा विषय इमारत पाडण्याचा आहे म्हणून तातडीचा आहे, आणि सदस्यांनी एखादा विषय तातडीचा सांगितला तर तो तातडीचा नाही. यात दोनच निविदा आल्या आहेत तर तुम्ही त्या कशा काय मान्य करता, सदर विषय पुढील सभेत रितसर आणण्यात यावा.

सायं. ६.२० वाजंता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती श्री. सुनिल सुर्वे यांनी जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी )
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

.

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः— २७/६/२०१६

दि. २७/६/२०१६ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

५

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा सोमवार दिनांक २७/०६/२०१६ रोजी सायं. ४.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे | सभापती |
| २ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | सदस्या |
| ३ | श्रीमती लिलाबाई आशान | सदस्या |
| ४ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर | सदस्य |
| ५ | श्री. गुरुनो भिकोमल वलेचा | सदस्य |
| ६ | श्री. जमनादास पुरस्वानी | सदस्य |
| ७ | श्रीमती आशा जिवन इदनानी | सदस्या |
| ८ | श्रीमती अंजली साळवे | सदस्या |
| ९ | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | सदस्या |
| १० | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | सदस्या |
| ११ | श्रीमती इंदिरा उदासी | सदस्या |
| १२ | श्रीमती पुष्पाताई नाना बागुल | सदस्या |
| १३ | डॉ. निना प्रकाश नाथानी | सदस्या |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्री. उमेश सुरेश कालानी २. श्री. विजय चाहु पाटील ३. श्रीमती वंदना पाटील उर्फ वंदना युवराज भदाणे

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१००. श्रीम. विजया कंठे, अति. आयुक्त तथा उप—आयुक्त (मुख्यालय)
१०१. श्रीम. प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
१०२. श्री. युवराज भदाणे, प्र. उप—आयुक्त
१०३. श्री. सुखदेव बलमे, मुख्य लेखा परिक्षक

१०४. श्री. महेश सितलानी, कनिष्ठ अभियंता, सा.बां. विभाग
१०५. श्री. भगवान कुमावत, प्रभाग अधिकारी, प्र. स. क्र. ३
१०६. श्री. गणेश शिंपी, प्र. प्रभाग अधिकारी, प्र. स. क्र. ४
१०७. श्रीम. श्रध्दा बावीस्कर, प्रोग्रॅमर, ना. सु.कें
१०८. श्री. संदिप जाधव, कनिष्ठ अभियंता, सा.बां. विभाग
१०९. श्री. महेंद्र धिंडे, कनिष्ठ अभियंता, विदयुत विभाग
११०. श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.

१. श्रीमती विशाखा सावंत
२. श्री. अशोक रामरख्यानी

सायं. ४.२५ वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

श्रीम. विजया कंठे, अति. आयुक्त तथा उप–आयुक्त (मुख्यालय) हया मा. आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणून आसनस्थ होत्या.

प्र. महापालिका सचिव :– आज आपल्याकडे अति. आयुक्त तथा उप–आयुक्त, श्रीम. विजया कंठे महोदया, प्रतिनियुक्तीवर आल्या आहेत. तरी त्यांनी आपली ओळख करून दयावी.

अति.आयुक्त तथा उप–आयुक्त (मुख्यालय), मा.आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी, श्रीम.विजया कंठे :–

तशी मी सर्वांच्या परिचयाची आहे. कारण सन २०१२ ते २०१४ या कालावधीत उपायुक्त म्हणुन मी प्रतिनियुक्तीवर आले होते परंतु माझ्याकडे कर विभागातील करनिर्धारक व संकलक या पदाचा कार्यभार सोपविण्यात आला होता. त्यानंतर आता माझी पुन्हा या महापालिकेत उपायुक्त या पदावर सेवा वर्ग करण्यात आली आहे. आणि आता माझ्याकडे अति. आयुक्त तसेच उपायुक्त (मुख्यालय) या पदाची जबाबदारी सोपवलेली आहे. तुमच्या सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे.

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:– आजच्या सभेला बहुतांश अधिकारी गैरहजर आहेत, मा. आयुक्त महोदया, सभेला सर्व अधिकारी उपस्थित राहतील असे पहा.

अति.आयुक्त तथा उप–आयुक्त (मुख्यालय), मा.आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी, श्रीम.विजया कंठे :–
हो, शहर अभियंता, मला सांगून गेले आहेत, वन संरक्षण दिवस साजरा करण्याच्याबाबतीत मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे बैठक आहे.

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:– नविन उपायुक्त आपल्याकडे आले आहेत, त्यांनी आपली ओळख करून दयावी. तुमच्याकडे कोणकोणते विभाग दिले आहेत.

प्र. उप–आयुक्त, श्री. युवराज भदाणे :– माझ्याकडे २२ जून २०१६ रोजी प्र. उप–आयुक्त या पदाचा कार्यभार सोपविलेला आहे, मालमत्ता कर, पाणीपट्टीवसुली, सार्व. आरोग्य विभाग व जनसंपर्क कार्यालय या विभागाचा कार्यभार आहे.

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:– प्रभाग अधिकारी, शहर अभियंता, पाणीपुरवठा विभाग कोणीच अधिकारी उपस्थित नाहीत. कमीतकमी विषय पटलावर विषय असणारे संबंधित अधिकारी तरी उपस्थित राहायला हवेत.

कनिष्ठ अभियंता, सा.बां. विभाग, श्री. महेश सितलानी :– शहर अभियंता हे झाडांच्या मिटींगसंदर्भात मा. जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे येथे गेले आहेत.

प्र. महापालिका सचिव :– विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ विषय क्र. १ :– मागिल सभेचे दिनांक: ३१/३/२०१६, २/५/२०१६ व दिनांक १८/०५/२०१६ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

<u>प्र. महापालिका सचिव :—</u> सदरचा विषय पारीत करण्यात यावा का?

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>मागील सभेचे दिनांक ३१/३/२०१६, २/५/२०१६ व दिनांक १८/०५/२०१६ रोजीचे इतिवृत जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे

**विषय क्र. १ :—** मागिल सभेचे दिनांक: ३१/३/२०१६, २/५/२०१६ व दिनांक १८/०५/२०१६ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नांव : श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नांव : श्री. जमनादास पुरस्वानी

<u>स्थायी समिती ठराव क्र. :—</u>२७ ब <u>दिनांक :२७/६/२०१६</u>

ही स्थायी समिती महापालिका सचिवांनी प्रस्तृत केलेले दिनांक ३१/३/२०१६ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते ५३ पर्यंतचे, दिनांक २/५/२०१६ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते ४८ पर्यंतचे, दिनांक १८/५/२०१६ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते ९ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>प्र. महापालिका सचिव :—</u> विषय क्र. २ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. २ :—** राणा ट्रेडींग कंपनी जवळील डंपिंग ग्राऊंडवरील कच—याचे सपाटीकरण करणेसाठी अतिरीक्त २ प्रोक्लेन मशिन ४५ दिवसांसाठी मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर ली., उल्हासनगर यांच्याकडून उपलब्ध करुन घेण्यास मान्यता मिळणेबाबत.

---

<u>सदस्या, श्रीम. अंजली साळवे :—</u> सद्या आपण कचरा कुठे टाकत आहे,

<u>प्र. मुख्य स्व. निरीक्षक, श्री. विनोद केणी :—</u>म्हारळ गांव, राणा टेड्रींग येथे कचरा टाकत आहे.

**सदस्या, श्रीम. अंजली साळवे :—** सद्या तिथेच कचरा टाकला जातो का? गायकवाड पाडा येथेसुध्दा कचरा टाकण्याचे काम सुरू केले होते ना.

**प्र. मुख्य स्व. निरीक्षक, श्री. विनोद केणी :—**सुरू केले होते, त्याठिकाणच्या नागरिकांनी विरोध केला आहे.

**उप—आयुक्त (सार्व. आरोग्य विभाग ) :—**म्हारळ गांव येथेच कचरा टाकला जात आहे, तेथील भुखंडाची क्षमता संपल्याने आपण गायकवाडपाडा येथे कचरा टाकण्याचे काम हाती घेतले होते परंतु तेथे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्याने ते पुर्णत: बंद आहे.

**सदस्या, श्रीम. अंजली साळवे :—** ठिक आहे, म्हारळ गांव येथेच कचरा टाकला जात आहे आणि तिथे मशिन लागत असतील तर ठिक आहे, गायकवाडपाडा येथे मशिन लागल्या असत्या तर आमचा विरोध असता.

**प्र. महापालिका सचिव :—** सदरचा विषय पारीत करण्यात यावा का?

**काही सदस्य:—**पास,पास.......

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—** अतिआवश्यक काम असल्याने सदरच्या विषयाच्या ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त होण्याची वाट न पहाता करण्यात यावी.

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. २ :—** राणा ट्रेडींग कंपनी जवळील डंपिंग ग्राऊंडवरील कच—याचे सपाटीकरण करणेसाठी अतिरीक्त २ प्रोक्लेन मशिन ४५ दिवसांसाठी मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर ली., उल्हासनगर यांच्याकडून उपलब्ध करुन घेण्यास मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्तावना**

उल्हासनगर शहरात दररोज अंदाजीत ४१० मेट्रीक टन कचरा निर्माण होत आहे. सदरचा कचरा नियमीत राणा ट्रेडींग कंपनी जवळील पडीक खदाण, म्हारळ गांव, उल्हासनगर—१ येथिल डंपिंगग्राउंडवर वाहतूक केला जातो. सदर ठिकाणी गेले १८ ते १९ वर्षे कचरा टाकण्यात येत आहे. त्यामुळे सदर ठिकाणी कच—याचे ढीग निर्माण झालेले आहेत. व सद्यस्थितीत सदर जागेची कचरा सामावून घेण्याची क्षमता संपली असुन कचरा वाहतुकीच्या वाहनांची रांग लागत आहेत. सदर ठिकाणी डोझर व पोक्लेन मशिनद्वारे कच—याचे सपाटीकरण सुरु आहे. सद्या स्थितीत मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर कं. ली. यांच्या कडून दोन डोझर व तीन पोक्लेन मशीन उपलब्ध करुन घेवून डंपिंग ग्राउंडवरील घनकच—याचे सपाटीकरण सुरु आहे.

सद्यास्थितीत डंपिंग ग्राउंडची कचरा सामावून घेण्याची क्षमता संपल्याने व दैनंदिन कचरा टाकण्यासाठी डंपिंग ग्राउंडसाठी दुसरी जागा उपलब्ध होत नसल्याने सदर ठिकाणी आवश्यकतेनुसार दोन डोझर व तीन पोक्लेन मशीनद्वारे प्रतिदिन ८ तास कचरा सपाटीकरणाचे काम मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर ली., उल्हासनगर यांच्यामार्फत सुरु आहे. तसेच वळोवेळी आवश्यकतेनुसार अतिरीक्त मशनरीचा/वाहनांचा पुरवठा करुन घेण्यात येत असतो. सदरच्या कामाची मुदत कार्यादेश दिल्यापासनु ३६५ दिवसांची असुन दिनांक ७ जुलै २०१६ रोजी त्याची मुदत संपत आहे.

डंपिंग ग्राउंडवर कचरा टाकण्यासाठी जागा उपलब्ध होण्यासाठी सदर ठिकाणी नियमीत बायोकल्चर फवारणी व उक्त मशनरीद्वारे सपाटीकरण्याचे काम सुरु असते. सदरचे काम अतिमहत्त्वाचे व तात्काळ नियमीत स्वरुपात करावयाचे असून नागरीकांच्या आरोग्याशी निगडीत आहे.

डंपिंग ग्राउंडवरील कनिष्ठ अभियंता व स्वच्छता निरिक्षक तथा नियंत्रण यांनीजा.क्र.उमपा/आवि/स्वनि/७३ दि: २४/०५/२०१६ रोजी दिलेल्या पत्रानुसार डंपिंग ग्राउंडवरील जागेचे नियोजन करण्यासाठी अतिरिक्त दोन पोक्लेनची मागणी ४५ दिवसांसाठी केलेली आहे. डंपिंग ग्राउंडवरील जागेचे नियोजन करण्यासाठी व तेथे घनकचरा संकलन करण्यास जागा बनविण्यासाठी अतिरक्त दोन इक्स—२००पोक्लेन मशिन ४५ दिवसांसाठी भाडेतत्वावर पुरवठा करुन

घेण्यास रुपये २६०५ प्रति तास याप्रमाणे दोन मशिन प्रतिदिन आठ तास काम केल्यास अतिरीक्त एकूण रुपये १८,७५,६००/– खर्च अपेक्षित आहे.

सदरचा खर्च भागविण्यासाठी अंदाजपत्रक सन २०१६–२०१७ च्या भाग–१ सी–१(१), कचरा वाहतुक खर्च या लेखाशिर्षकात रुपये २५ कोटी खर्चाची तरतूद करण्यात आलेली आहे त्यातून खर्च करण्याचे प्रस्तावित करण्यात येते.

तरी डंपिंग ग्राउंडवरील जागेचे नियोजन करण्यासाठी व तेथे घनकचरा संकलन करण्यास जागा बनविण्यासाठी अतिरीक्त दोन इक्स–२००प्रोक्लेन मशिन ४५ दिवसांसाठी भाडेतत्वावर पुरवठा करुन येणा–या खर्चास व मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लिमीटेड, उल्हासनगर यांच्याकडून सदरची मशिनरी उपलब्ध करुन घेण्यास मान्यतेसाठी सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या मंजुरीसाठी सविनय सादर.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> २८ <u>दिनांकः– २७/६/२०१६</u>

सुचकाचे नाव :– श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार राणा ट्रेडींग कंपनी जवळील डंपिंग ग्राऊंडवरील कच–याचे सपाटीकरण करणेसाठी अतिरीक्त दोन इक्स–२०० प्रोक्लेन मशिन ४५ दिवसांसाठी भाडेतत्वावर पुरवठा करुन घेण्यास येणा–या अंदाजित रुपये १८,७५,६००/– खर्चास व मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर ली., उल्हासनगर यांच्याकडून उपलब्ध करुन घेण्यास मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची <u>सही/–</u>

अनुमोदकाची <u>सही/–</u>

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>प्र. महापालिका सचिव :–</u> विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ३ :–** राणा ट्रेडींग कंपनी जवळील डंपिंग ग्राऊंडवरील कच–याचे सपाटीकरण करणेसाठी आवश्यक मशनरी भाडेतत्वावर उपलब्ध करुन घेण्यासाठी मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर ली., उल्हासनगर यांच्याशी संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.

---

<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— </u>म्हारळ गांव येथे जोपर्यंत कचरा टाकण्यात येईल मग सहा महिने किंवा १ वर्ष लागो तोपर्यंत सदर मशिनरी तेथे वापरावयाची नंतर ती नविन डंम्पिंग ग्राऊंडवर हलविण्यात यावी. सदर विषयाच्या ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता पारीत करण्यात यावी.

<u>सदस्या, श्रीम. अंजली साळवे :— </u>सद्या म्हारळ गांव येथे कचरा टाकला जात आहे ना, त्याबाबतचा प्रस्ताव आहे ना.

<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— </u>सदर भुखंडाची क्षमता संपल्यानंतर जिथेही नव्याने डम्पींग उपलब्ध होईल तिथे हे मशिन्स हलविण्यात यावे.

<u>प्र. महापालिका सचिव :—</u> सदरचा विषय पारीत करण्यात यावा का?

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— </u>सदर विषयाच्या ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता करण्यात यावी.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ३ :—** राणा ट्रेडींग कंपनी जवळील डंपिंग ग्राऊंडवरील कच—याचे सपाटीकरण करणेसाठी आवश्यक मशनरी भाडेतत्वावर उपलब्ध करुन घेण्यासाठी मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर ली., उल्हासनगर यांच्याशी संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर शहरात दररोज अंदाजीत ४१० मेट्रीक टन कचरा निर्माण होत आहे. सदरचा कचरा नियमीत राणा ट्रेडींग कंपनी जवळील पडीक खदाण, म्हारळ गांव, उल्हासनगर—१ येथिल डंपिंगग्राउंडवर वाहतूक केला जातो. सदर ठिकाणी गेले १८ ते १९ वर्षे कचरा टाकण्यात येत आहे. त्यामुळे सदर ठिकाणी कच—याचे ढीग निर्माण झालेले आहेत. व सद्यस्थितीत सदर जागेची कचरा सामावून घेण्याची क्षमता संपली असुन कचरा वाहतुकीच्या वाहनांची रांग लागत आहेत. सदर ठिकाणी डोझर व पोक्लेन मशिनद्वारे कच—याचे सपाटीकरण सुरु आहे. सद्या स्थितीत मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर कं. ली. यांच्या कडून दोन डोझर व तीन पोक्लेन मशीन उपलब्ध करुन घेवून डंपिंग ग्राउंडवरील घनकच—याचे सपाटीकरण सुरु आहे.

सद्यास्थितीत डंपिंग ग्राउंडची कचरा सामावून घेण्याची क्षमता संपल्याने व दैनंदिन कचरा टाकण्यासाठी डंपिंग ग्राउंडसाठी दुसरी जागा उपलब्ध होत नसल्याने सदर ठिकाणी आवश्यकतेनुसार दोन डोझर व तीन पोक्लेन मशीनद्वारे प्रतिदिन ८ तास कचरा सपाटीकरणाचे काम मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर ली., उल्हासनगर यांच्यामार्फत सुरु आहे. तसेच वळोवेळी आवश्यकतेनुसार अतिरीक्त मशनरीचा/वाहनांचा पुरवठा करुन घेण्यात येत असतो. सदरच्या कामाची मुदत कार्यादेश दिल्यापासनु ३६५ दिवसांची असुन दिनांक ७ जुलै २०१६ रोजी त्याची मुदत संपत आहे.

डंपिंग ग्राउंडवर कचरा टाकण्यासाठी जागा उपलब्ध होण्यासाठी सदर ठिकाणी नियमीत बायोकल्चर फवारणी व उक्त मशनरीद्वारे सपाटीकरण्याचे काम सुरु असते. सदरचे काम अतिमहत्त्वाचे व तात्काळ नियमीत स्वरुपात करावयाचे असून नागरीकांच्या आरोग्याशी निगडीत आहे.

सन २०१५—१६ या वर्षात डंपिंग ग्राउंडची कचरा सामावून घेण्याची क्षमता संपल्याने सपाटीकरणाच्या कामासाठीच्या निविदेचा कालावधी लवचीक ठेवण्यात आला होता. त्यामुळे कामाचा कालावधी सदर जागेवर (राणा ट्रेडिंग कंपनी जवळ, म्हारळ गांव, उल्हासनगर— १ जोपर्यंत कचरा टाकण्यात येईल तो पर्यंत म्हणजेच

किमान ६ महिने ते जास्तीत जास्त दोन वर्षे असा ठेवण्यात आला होता. मात्र आर्थिक मंजुरी घेतांना स्थायी समितीसमोर एका वर्षासाठी अंदाजीत येणा–या खर्चाचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यानुसार मा. स्थायी समितीने सदर प्रस्तावास ठराव क्र. ३६ दिनांक १०/६/२०१५ रोजी अन्वये मान्यता दिलेली आहे. तरी यापुढे सन २०१६–१७ या कालावधीत जास्तीत जास्त ३६५ दिवस अथवा जोपर्यंत डंपिंग ग्राउंडवरील कचरा सापाटीकरणासाठी मशिनरी आवश्यक राहील तोपर्यंतचा कालावधी गृहीत धरला जाईल. तसेच मागील निविदेतील व करारनाम्यातील अटी व शर्ती ठेकेदारास बंधनकारक असतील.

डंपिंग ग्राउंडवरील कच–याचे सपाटीकरण करण्यासाठी मागील निविदेतील अटी,शर्ती नुसार व दरानुसार प्रतिदिन किमान आठ तासांसाठी किमान दोन डी–१२० डोझर व ३ ई–एक्स २०० पोक्लेन मशिन पुरवठा करुन घेतल्यास २ डोझर उपलब्ध करुन घेण्यास रुपये ४३,५६८/– मात्र व ३ पोक्लेन भाडेतत्वावर उपलब्ध करुन घेण्यासाठी रुपये ६२,५२०/– मात्र खर्च अपेक्षित आहे. सदरच्या कामाचे दिवस तसेच मशिनची संख्या अथवा वेळ यात बदल होण्याची शक्यता आहे. त्यामुळे खर्च कमी अथवा जास्त होण्याची शक्यता आहे. त्याच प्रमाणे घनकचरा व्यवस्थापना अंतर्गत घनकचरा संकलन करण्याचे ठिकाण बदलण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यानुसार १,०९,०८८/– प्रतिदिन व अंदाजीत रुपये ३,९८,१७,१२०/– (रुपये तीन कोटी अठ्ठयान्नव लाख सतरा हजार एकशे वीस मात्र.) वार्षिक खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च भागविण्यासाठी अंदाजपत्रक सन २०१६–२०१७ च्या भाग–१ सी–१(१), कचरा वाहतुक खर्च या लेखाशिर्षकात रुपये २५ कोटी खर्चाची तरतूद करण्यात आलेली आहे त्यातून खर्च करण्याचे प्रस्तावित करण्यात येते.

सद्या असलेले राणा ट्रेडींग कंपनी जवळील डंपिंगच्या जागेची कचरा सामावून घेण्याची क्षमता संपलेली आहे. त्यामुळे घनकचरा व्यवस्थापनासाठी उपलब्ध जागेत कचरा सपाटी करणासाठी भविष्यात उक्त नमुद आवश्यक मशनरींची संख्या कमी अथवा जास्त होवू शकते व त्यानुसार वार्षिक अंदाजीत खर्च कमी अथवा जास्त होवू शकतो.

मागील निविदेतील अटी,शर्ती नुसार व दरानुसार प्रतिदिन किमान आठ तासांसाठी किमान दोन डी–१२० डोझर व ३ ई–एक्स २०० प्रोक्लेन मशिन पुरवठा करुन घेण्यास येणा–या खर्चास व मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लिमीटेड, उल्हासनगर यांच्याशी संविदा करण्यासाठी सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या मंजुरीसाठी सविनय सादर.

<u>स्थायी समिति ठराव क्र. २९</u> <u>दिनांकः– २७/६/२०१६</u>

सुचकाचे नाव :– श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार राणा ट्रेडींग कंपनी जवळील डंपिंग ग्राऊंडवरील कच–याचे सपाटीकरण करणेसाठी मागील निविदेतील अटी,शर्ती नुसार व दरानुसार प्रतिदिन किमान आठ तासांसाठी किमान दोन डी–१२० डोझर व ३ ई–एक्स २०० प्रोक्लेन मशिन पुरवठा करुन घेण्यासाठी येणा–या अंदाजीत रुपये ३,९८,१७,१२०/– (रुपये तीन कोटी अठ्ठयान्नव लाख सतरा हजार एकशे वीस मात्र.) खर्चास व मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर ली., उल्हासनगर यांच्याशी संविदा करण्यास मान्यता देत आहे.

<u>तसेच</u>

एका वर्षाच्या कालावधीसाठी जोपर्यंत नविन डंपिंग ग्राऊंड तयार होत नाही तोपर्यंत येथे नंतर नवीन डंपिंग ग्राऊंड तयार झाल्यावर तेथे काम करणेस परवानगी देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

प्र. महापालिका सचिव :– विषय क्रमांक. ४ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. ४** :–उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे बहुमजली धोकादायक/अनधिकृत इमारतींचे निष्कासन करण्यासाठी Combi Crusher मशिन पुरवठा करण्याकामी मे. एडीफाईस इंजिनिअरींग यांची ई–निविदा मान्य करुन त्यांचेशी संविदा करण्यास मान्यता देणे.

---

सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :– मे. एडीफाईस इंजिनिअरींग पेक्षा मे. जिनेसीस इंजिनिअरींग यांनी खरेतर न्युनतम दर सादर केलेला होता. तरीदेखील सदरचे काम मे. एडीफाईस इंजिनिअरींग यांना दिले आहे, त्यामुळे फक्त रू. ५० लाखाचे काम या कंपनीकडून करून घ्या. आणि यामध्ये इतर कामे असतील ती मे. जिनेसीस इंजिनिअरींग या कंपनीला पॅनलमध्ये घेवून त्यांचेकडून करून घेण्यात यावेत. कारण त्याने न्युनतम दर सादर केले असताना त्याला डावलले गेले आहे. परंतु सदर प्रस्ताव प्रशासनाकडून आला आहे त्यामुळे आम्ही तो अमान्य करत नाही. तसेच रू. ५० लाखांच्यावर जेवढीसुध्दा कामे येतील ती स्थायी समितीच्या मान्यतेसाठी आली पाहिजेत, स्थायी समितीच्या मान्यतेशिवाय रू. ५० लाखाच्यावरील एकही काम होता कामा नये.

प्र. महापालिका सचिव :– सदरचा विषय पारीत करण्यात यावा का?

काही सदस्य :–पास–पास......

सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :– सदर विषयाच्या ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता करण्यात यावी.

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:– सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ४** :– उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे बहुमजली धोकादायक/अनधिकृत इमारतींचे निष्कासन करण्यासाठी Combi Crusher मशिन पुरवठा करण्याकामी मे. एडीफाईस इंजिनिअरींग यांची ई–निविदा मान्य करुन त्यांचेशी संविदा करण्यास मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे बहुमजली धोकादायक/अनधिकृत इमारतींचे निष्कासन करण्यासाठी Combi Crusher मशिन पुरवठा करण्याच्या कामाची ई निविदा प्रसिध्द करुन बी–१ प्रकारच्या दोन भाग (तांत्रिक व आर्थिक) पध्दतीने नोंदणीकृत ठेकेदारांकडून दिनांक १३/०४/२०१६ रोजी निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | निविदा प्रसिध्द केलेली वर्तमानपत्रे | १) दै.नवशक्ती २) दै. हमारा महानगर |
| २ | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक १३/०४/२०१६ |
| ३ | निविदा विक्री कालावधी | दिनांक १३/०४/२०१६ ते २०/०४/२०१६<br>मुदतवाढ दिनांक ०४/०६/२०१६ |
| ४ | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक ०९/०६/२०१६ |
| | प्रथम मुदतवाढ | दिनांक २६/०४/२०१६ |
| | द्वितीय मुदतवाढ | दिनांक ०१/०६/२०१६ |
| ५ | तांत्रिक भाग उघडण्याचा | दिनांक १३/०६/२०१६ |
| ७ | आर्थिक भाग उघडण्याचा | दिनांक १३/०६/२०१६ |
| ८ | विक्री केलेल्या निविदांची संख्या | २ |
| ९ | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | २ |

दिनांक १३/०६/२०१६ रोजी मा. अतिरिक्त आयुक्त, उप–आयुक्त (मुख्यालय), मुख्य लेखा परिक्षक, शहर अभियंता यांचे उपस्थितीत बहुमजली धोकादायक/अनधिकृत इमारती निष्कांसित करण्यासाठी Combi Crusher मशिन पुरविणे या कामाच्या निविदेचा तांत्रिक भाग उघडण्यात आला त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| **क्र.** | **निविदाकाराच्या निविदेमधील बाबी** | **जिनेसीस इंजिनिअरींग** | **एडीफाईस इंजिनिअरींग** |
|---|---|---|---|
| १ | निविदा प्रपत्रकाच्या खरेदीची रक्कम भरलेली आहे का? | होय | होय |
| २ | इसारा रक्कम भरलेली आहे का? | होय | होय |
| ३ | अद्यावत आयकर रिटर्न भरल्याची पावती | होय | होय |
| ४ | कामाचा अनुभव | होय | होय |
| ५ | पॅन कार्डाची प्रत | होय | होय |
| ६ | संस्था/कंपनी नोंदणी (भागिदारी, मालकी, कंपनी इत्यादीचे) दस्तऐवज | होय | होय |

सदर निविदांची छाननी केली असता, **मे. जिनेसीस इंजिनिअरींग** या कंपनीकडे महापालिकेने निर्धारित केलेल्या मशिनरीचे कागदपत्रे नसल्याचे तसेच त्यांनी जॉईट वेच्युंअर पध्दतीने निविदा सादर केल्याचे दिसून आले. निविदेतील अटी व शर्तीची पूर्तता करित नसल्याने मे. जिनेसीस इंजिनिअरींग हे अपात्र आहेत.

आज **दिनांक १३/०६/२०१६** रोजी मे. एडिफाईस इंजिनिअरिंग यांचा आर्थिक बाबींचा दुसरा (आर्थिक दर) लिफाफा मा. उपायुक्त, (अबांनिवि) यांचे अध्यक्षतेखालील निवड समिती सदस्य मुख्य लेखापरिक्षक, शहर अभियंता, यांचे उपस्थितीत उघडण्यात आला. त्याप्रमाणे निविदाकांरानी दिलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

**मे. एडीफाईस इंजिनिअरींग : दिलेले दर रु.२,५९,२००/— प्रतिदिन**

उपरोक्त **बहुमजली धोकादायक/अनधिकृत इमारती निष्कांसित करण्यासाठी Combi Crusher मशिन पुरविणे** या कामाचे उक्त निविदाकारापैकी **मे. एडीफाईस इंजिनिअरींग** यांनी ई—निविदेतील दर रु.२,५९,२००/—प्रतिदिन इतके नमुद केले आहे. परंतु सदर दर हे दरपत्रकापेक्षा जास्त असल्याने सदर निविदाकारांशी निविदा समितीने चर्चा करुन दर कमी करण्यास वाटाघाटी करणेबाबत या विभागामार्फत दि.१३/०६/२०१६ रोजी पत्र देण्यात आले होते. त्यानुसार **मे. एडीफाईस इंजिनिअरींग** यांनी दि.१४/०६/२०१६ रोजी रु.२,१२,०००/— या दराने काम करण्यास तयारी दर्शविली आहे. सदर दर हे या विभागामार्फत निविदेतील दिलेल्या दरानुसार म्हणजे रु.२,१२,०००/— प्रतिदिन असून **मे. एडीफाईस इंजिनिअरींग** यांना काम देणेकरिता शिफारस करण्यात येत आहे.

तरी सदर दरावरील **मे. एडीफाईस इंजिनिअरींग** यांची निविदा मान्य करण्यास व त्यांचेशी संविदा करण्यासाठी मा. स्थायी समिती कडुन मान्यतेस सादर आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ३० दिनांक:— २७/६/२०१६

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे बहुमजली धोकादायक/अनधिकृत इमारतींचे निष्कासन करण्यासाठी Combi Crusher मशिन पुरवठा करण्याकामी मे. एडीफाईस इंजिनिअरींग यांची ई—निविदा मान्य करुन त्यांचेशी संविदा करण्यास मान्यता देत आहे.

परंतु

१. सदर कंपनीस ५० लाखापर्यंत काम देण्यात यावे.
२. तसेच मे. जिनोसिस इंजिनिअरींग यांना पॅनलवर घेण्यात यावे.
३. ५० लाखाच्या वर काम स्थायी समितीसमोर मान्यतेसाठी आणणे आवश्यक असेल.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

**प्र. महापालिका सचिव :–** विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ५ :–** ३ ठिकाणचे मोडकळीस आलेले शौचालय निष्कासन व जागेच विनियोगास मान्यता देणे.

---

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–** सदर विषय पारीत करण्यात यावा.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :–** याआधी स्थायी समितीच्या सभेमध्येच आपण असा निर्णय घेतला होता कि, जेदेखील शौचालय निष्कासित करणार आहोत त्याचे प्राकलन तयार केले आहे का? प्रथम प्राकलन मंजूर झालेले पाहिजे.

**कनिष्ठ अभियंता, श्री. महेश सितलानी :–** सदर शौचालयाच्या जागी आमदार फंडातून निधी मंजूर झालेला आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :–** ज्या कोणत्याही फंडातून मंजूरी मिळाली असेल तर ठिक आहे, ते सदर मालमत्ता निष्कासित करतील, नाहीतर महापालिकेची मालमत्ता हडप होवू नये याबाबत शंका निर्माण होते.

**प्र. महापालिका सचिव :–** सदरचा विषय पारीत करण्यात यावा का?

**काही सदस्य :–**पास–पास......

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे :–** सदर विषयाच्या ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता करण्यात यावी.

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ५ :–**३ ठिकाणचे मोडकळीस आलेले शौचालय निष्कासन व जागेच विनियोगास मान्यता देणे.

**प्रस्तावना**

श्रीम. लिलाबाई लक्ष्मण आशान, नगरसेविका यांनी दि.०२/०७/२०१५ रोजीच्या पत्रान्वये पॅनेल क्र. २५ (अ) मधील बॅ.न १२९०,१२९२,१३०१ व जागृती कॉलनी, उल्हासनगर– ४ येथील वापरात नसलेले सार्वजनिक शौचालय निष्कासित करणेची विनंती केलेली आहे.

आरोग्य विभागाकडुन सदर शौचालय बाबत संबंधीत प्रभागाचे मुकादम व आरोग्य निरीक्षक यांनी सादर केलेला अहवाल, पंचनामा व अभिप्राय खालीलप्रमाणे मालमत्ता विभागास प्राप्त झालेले आहेत.

| अ.क्र | निष्कासित करावयाचे शौचालयाचे ठिकाण | नागरीकांचा अभिप्राय | स्वच्छता निरिक्षकांचा अभिप्राय |
|---|---|---|---|
| १ | बॅ.नं १३०१ व १३०८ समोर, ओ.टी सेक्शन, उल्हासनगर–४, | समाजमंदिर बनविण्यात यावे. | सदर ठिकाणी एम.एम. आर.डी.ए.चे शौचालय १०० फुटांवर आहे. म्हणुन सदर ठिकाणी समाजमंदिर |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | बनविण्यात यावे. |
| २ | बॅ.नं १२९२, ओ.टी सेक्शन, उल्हासनगर– ४ | महानगरपालिकेचे कोणतेही कार्यालय बनविण्यास हरकत नाही. | नविन शौचालय बांधण्यात यावे. |
| ३ | बॅ.नं १३०१ च्या समोर, ऑन प्लॉट, ओ.टी सेक्शन, उल्हासनगर–४ | समाजमंदिर बनविण्यात यावे. | समाजमंदिर बनविण्यात यावे. |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७९ अन्वये महानगरपालिकेच्या मालमत्तेचा अन्य प्रकारे विनियोग करावयाचा झाल्यास मा. स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक आहे. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या अभिप्रायानुसार पॅनल क्र. २५(अ) मधील बॅ.नं १३०१ व १३०८ समोर, ओ.टी सेक्शन, उल्हासनगर–४, बॅ.नं १२९२, ओ.टी सेक्शन, उल्हासनगर– ४ व बॅ.नं १३०१ च्या समोर, ऑन प्लॉट, ओ.टी सेक्शन, उल्हासनगर–४ येथील वापरात नसलेले, मोडकळीस आलेले सार्वजनिक शौचालय निष्कासीत करून समाजमंदिर बांधण्यात यावे, असे नमुद केले आहे.

उक्त बाबी विचारात घेता पॅनल क्र. २५(अ) मधील बॅ.नं १३०१ व १३०८ समोर, ओ.टी सेक्शन, उल्हासनगर–४, बॅ.नं १२९२, ओ.टी सेक्शन, उल्हासनगर– ४ व बॅ.नं १३०१ च्या समोर, ऑन प्लॉट, ओ.टी सेक्शन, उल्हासनगर–४ सार्वजनीक शौचालय निष्कासन करून सदर ठिकाणी हजेरी शेड/स्वच्छता विभागासाठी गोडाऊन/समाजमंदिर/नविन शौचालय बनविणेस मंजुरी मिळण्यासाठीचा प्रस्ताव मा. स्थायी समिती पटलावर प्रस्तावित करणेत येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ३१ — दिनांकः– २७/६/२०१६

सुचकाचे नाव :– श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार पॅनल क्र. २५(अ) मधील बॅ.नं १३०१ व १३०८ समोर, ओ.टी सेक्शन, उल्हासनगर–४, बॅ.नं १२९२, ओ.टी सेक्शन, उल्हासनगर– ४ व बॅ.नं १३०१ च्या समोर, ऑन प्लॉट, ओ.टी सेक्शन, उल्हासनगर–४ या ३ ठिकाणचे सार्वजनीक शौचालय निष्कासन करून सदर ठिकाणी हजेरी शेड/स्वच्छता विभागासाठी गोडाऊन/समाजमंदिर/नविन शौचालय बनविणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>प्र. महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. ६ :— उल्हासनगर महानगरपालिका महिला व बालकल्याण समितीद्वारे चार दिवसांचा आयोजित ''उल्हास फेस्टीवल'' कार्यक्रमाकरीता न्युनत्तम निविदाकार मे. अमरज्योत एंटरप्राईजसे, उल्हासनगर यांचे न्युनत्तम दरास प्रशासकिय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत.

---

<u>सदस्या, श्रीम. अंजली साळवे :—</u> विषय काय आहे.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—</u> काय करणार आहोत आपण, कार्यक्रम कधी ठेवला आहे, कुठे ठेवला आहे,

<u>सदस्या, श्रीम. अंजली साळवे :—</u> या विषयाची सविस्तर माहिती दिलेली नाही, पुढचा विषयसुध्दा महिला बाल कल्याण समितीचाच आहे आणि अधिकारी कोणी उपस्थित नाहीत,

<u>प्र. महापालिका सचिव :—</u> महिला व बालकल्याण समितीची सभा झाली होती, सचिव म्हणून मी उपस्थित होते म्हणून हा विषय मला माहित आहे. सदर सभेमध्ये ''उल्हास फेस्टीवल'' साजरा करण्याचा विषय होता.

<u>प्र. मुख्य स्व. निरीक्षक, श्री. विनोद केणी :—</u> महिला व बालकल्याण समितीद्वारे चार दिवसांचा ''उल्हास फेस्टीवल'' कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—</u> कार्यक्रम म्हणजे काय आहे नेमके.

<u>प्र. मुख्य स्व. निरीक्षक, श्री. विनोद केणी :—</u> शहरातील सर्वांसाठी सांस्कृतिक कार्यक्रम करणार आहे.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—</u> सदर कार्यक्रम कधी घेणार आहे.

<u>सदस्या, डॉ. निना नाथानी :—</u> आता समितीचा कालावधी दोन दिवसांनी संपणार आहे, तर हा कार्यक्रम करता येईल का, सदर विषय कोणत्या समितीत पारीत झाला कारण श्रीम. इंदिरा उदासी यासुध्दा समितीच्या सदस्या आहेत परंतु सदर विषय त्यांना माहित नाही.

<u>प्र. मुख्य स्व. निरीक्षक, श्री. विनोद केणी :—</u> सदर विषयास उशिरा मान्यता मिळाल्यामुळे विषय स्थायी समितीपुढे येण्यास उशिर झाला आहे.

<u>प्र. महापालिका सचिव :—</u> सदरचा विषय पारीत करण्यात यावा का?

<u>काही सदस्य :–</u>पास–पास……

<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भूल्लर :–</u> सदर विषयाच्या ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता करण्यात यावी.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ६ :–** उल्हासनगर महानगरपालिका महिला व बालकल्याण समितीद्वारे चार दिवसांचा आयोजित ''उल्हास फेस्टीवल'' कार्यक्रमाकरीता न्युनत्तम निविदाकार मे. अमरज्योत एंटरप्राईजसे, उल्हासनगर यांचे न्युनत्तम दरास प्रशासकिय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिका महिला व बालकल्याण समिती व्दारे चार दिवसांचा आयोजित “उल्हास फेस्टीवल” कार्यक्रमा करिता साहित्य पुरवठा करणेकरीता “ई टेंडर प्रक्रीयेव्दारे” दोन लिफाफा पध्दतीने जाहिर निविदा मागविण्यात आल्या होत्या.नियमानुसार खालील तीन निविदाकारांनी वेबसाईटवरुन निविदा Submit केल्या आहेत.

१. में अमरज्योत एंटरप्राईजेस, उल्हासनगर

२. में मोहित एंटरप्राईजेस, उल्हासनगर

३. में जे. पी.कम्पुटराईज ॲन्ड एंटरप्राईजेस, उल्हासनगर

दिनांक १६/०३/२०१६ रोजी प्राप्त झालेल्या निविदा दिनांक ०२/०४/२०१६ रोजी दुपारी ठिक ०३:०० वाजता मा. अति. आयुक्त तथा निविदा समिती अध्यक्ष यांचे दालनात निविदा समिती समक्ष उघडण्यात आल्या आहेत.

लिफाफा क्र १ च्या अहवालानुसार तीनही निविदाकार पात्र ठरल्याने लिफाफा क्रं २ वरिल सर्व उपस्थितांच्या समक्ष उघडण्यात आला.प्राप्त तिन निविदाकारांच्या दराचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे. (लिफाफा क्रं. १ चा अहवाल सोबत सादर).

(लिफाफा क्रं. २ चा तुलनात्मक तक्ता).

| अ क्रं | तपशिल | आवश्यक परिणाम | पुरवठादाराचे नांव व त्यांनी सादर केलेले प्रति दर | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | मे जे. पी. कम्पुटराईज ॲन्ड एंटरप्राईजेस, उल्हासनगर | मे अमरज्योत एंटरप्राईजेस, उल्हासनगर | मे मोहित एंटरप्राईजेस, उल्हासनगर |
| 1 | Stall 10x10 (for rental ) (4 days) | 110 | ३३०००० | ३५२००० | ३५२००० |
| 2 | Table 3 inch stall (for rental) (4 days) | 110 | १०५००० | ९८४०० | १०८००० |
| 3 | Chairs 5 inch stall (for rental) (4 days) | 110 | ३०००० | २२००० | ३०००० |
| 4 | Visitor chairs (for rental) (4 days) | 200 | १०००० | ८००० | १०००० |
| 5 | VIP chairs for stage (for rental) (4 days) | 20 | ९००० | ८००० | १०००० |
| 6 | CFL light 2 inch sgtall (for rental) (5 days) | 110 | ४८००० | ४६००० | ४४००० |
| 7 | Focus 100w (5 days) | 150 Nos | १४५००० | १४०००० | १३८७५० |
| 8 | Carpet (for rental) (4 days) | 27500 Sqft | ३६०००० | ३४२००० | ३४०००० |
| 9 | Stage 30x20 (4 days) | 1 | ६०००० | ७०००० | ८०००० |
| 10 | Advertising Movie 2 Nos. | 5 | १८००० | १७००० | १६००० |
| 11 | Photo (10x6) | 1000 | ४४००० | ४२००० | ४०००० |
| 12 | Small Trophi (with UMC city Logo) | 50 | ३५००० | ३२००० | ३०००० |
| 13 | Big Trophi (with UMC city Logo) | 250 | २७५००० | २६०००० | २५८००० |
| 14 | Flower Books | 20 | १००००० | ७५००० | ९३७५० |
| 15 | Volentry (4 days) 20 each day | 20 Nos | ८५००० | ८०००० | ९०००० |
| 16 | Generator (for rent6al) (5 days) | 2 Nos | २१६००० | २२०००० | २३०००० |
| 17 | Gift (Juice set) | 150 | ५०००० | ४५००० | ६०००० |
| 18 | Shawl and Coconut | 500 | ११०००० | १००००० | १२०००० |
| 19 | Nasta Pack (Sandwich, Gulabjam, Biscut) | 2000 | १४०००० | १४५००० | १६०००० |
| 20 | Fountain big size (For rental) (4 days) | 1 | ३०००० | २०००० | ३०००० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 21 | Banner for city Add/Welcome Gate/Stall (4 days) | 7500 Sqft | १२०००० | ११२५०० | १२०००० |
| 22 | Advertisement Moving Vehicle (For Rental) | 4 | ८५००० | ७५००० | ९०००० |
| 23 | Cable Advertisement | 1 week | ५०००० | ५५००० | ६०००० |
| 24 | 20 ltr Water jar for Stalls | 300 | ३९००० | ३७५०० | ४०००० |
| 25 | 1 ltr Bisleri Bottle for Officers and VIPs | 100 box | २४००० | २१६०० | २३६०० |
| 26 | Cable Live Program | 4 | ५०००० | ४५००० | ४२००० |
| 27 | CC Camera (with Tv and Back up) (For rental) | 4 | २००००० | २१०००० | २७५००० |
| 28 | D.J. sound system (For rental) | 4 | ५६००० | ५०००० | ४८००० |
| 29 | Cloth Bag with Printing | 500 | २४००० | २०००० | २२००० |
| 30 | Invitation cards | 500 | ७००० | ५००० | ६००० |
| 31 | colour Certificate | 500 | १२००० | १०००० | १२००० |
| 32 | Welcome gate (For rental) | 2 | २४००० | ३०००० | ३२००० |
| 33 | Maharastrain Traditional Dances and singings (with famous Advertise for 2 Hrs daily) | 4 days | १८०००० | १७५००० | १८५००० |
| ३४ | Sindhi Sanskrit Darshan | 1 days | ५७५०० | ५५००० | ५२००० |
| ३५ | Panjabi Loknrutya | 1 days | ५७५०० | ५५००० | ५२००० |
| ३६ | Gujrati Sanskrit Program | 1 days | ५७५०० | ५०००० | ५५००० |
| ३७ | Other Cultural Sanskrit Program | 1 days | ५७५०० | ५०००० | ५५००० |
| | | | ३३०१००० | ३१७९००० | ३४१०१०० |

उक्त तुलनात्मक तक्त्यानुसार निविदेमध्ये प्राप्त **में अमरज्योत एंटरप्राईजेस, उल्हासनगर** यांनी चार दिवसांचा आयोजित “उल्हास फेस्टीवल” कार्यक्रमा करिता साहित्य पुरवठा करणेकरीता सादर केलेले न्युन्नत्तम दर रू. **३१,७९,०००/—** हे अंदाजित किमंतीपेक्षा जास्त आहे. यास्तव उप आयुक्त (मबाकस) यांनी आदेशित केल्यानुसार सदर निविदेतील दराच्या वाटाघाटीसाठी में अमरज्योत एंटरप्राईजेस, उल्हासनगर यांना पत्र क्रं. उमपा/मबाकस/१८४ दिनांक ३१/०५/२०१६ अन्वये दिनांक

३१/०५/२०१६ रोजी दुपारी ०३:०० वाजता उप आयुक्त (मबाकस) यांचे दालनात बोलविण्यात आले व त्यांनी त्यांचे पत्र दिनांक ०१/०६/२०१६ अन्वये सदर साहित्य क्रं. १,८,९,१०,११,१२,१९,३२,३३,३४,३५ मधिल दर कमी केले. निविदे अंती प्राप्त दर रू. ३१,७९,०००/— वरून रू. **२९,५३,०००/—** एवढे कमी करण्यात आले.व त्यानुसार संबधित निविदाकाराने दिनांक ०१/०६/२०१६ रोजी लेखी पत्र दिले आहे.सोबत सदरचे पत्र जोडून सादर.वाटाघाटीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ क्रं | तपशिल | आवश्यक परिणाम | प्राप्त न्युनत्तम दररू. ( में अमरज्योत एंटरप्राईजेस, उल्हासनगर) | वाटाघाटी अंती प्राप्त दर रू. |
|---|---|---|---|---|

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1 | Stall 10x10 (for rental ) (4 days) | 110 | ૩૫૨૦૦૦ | ૩,૦૦,૦૦૦ |
| 2 | Table 3 inch stall (for rental) (4 days) | 110 | ૯૮૪૦૦ | ૯૮૪૦૦ |
| 3 | Chairs 5 inch stall (for rental) (4 days) | 110 | ૨૨૦૦૦ | ૨૨૦૦૦ |
| 4 | Visitor chairs (for rental) (4 days) | 200 | ૮૦૦૦ | ૮૦૦૦ |
| 5 | VIP chairs for stage (for rental) (4 days) | 20 | ૮૦૦૦ | ૮૦૦૦ |
| 6 | CFL light 2 inch sgtall (for rental) (5 days) | 110 | ૪૬૦૦૦ | ૪૬૦૦૦ |
| 7 | Focus 100w (5 days) | 150 Nos | ૧૪૦૦૦૦ | ૧૪૦૦૦૦ |
| 8 | Carpet (for rental) (4 days) | 27500 Sqft | ૩૪૨૦૦૦ | ૩,૦૦,૦૦૦ |
| 9 | Stage 30x20 (4 days) | 1 | ૭૦૦૦૦ | ૫૦,૦૦૦ |
| 10 | Advertising Movie 2 Nos. | 5 | ૧૭૦૦૦ | ૧૬,૦૦૦ |
| 11 | Photo (10x6) | 1000 | ૪૨૦૦૦ | ૪૦,૦૦૦ |
| 12 | Small Trophi (with UMC city Logo) | 50 | ૩૨૦૦૦ | ૨૮,૦૦૦ |
| 13 | Big Trophi (with UMC city Logo) | 250 | ૨૬૦૦૦૦ | ૨૬૦૦૦૦ |
| 14 | Flower Books | 20 | ૭૫૦૦૦ | ૭૫૦૦૦ |
| 15 | Volentry (4 days) 20 each day | 20 Nos | ૮૦૦૦૦ | ૮૦૦૦૦ |
| 16 | Generator (for rent6al) (5 days) | 2 Nos | ૨૨૦૦૦૦ | ૨૨૦૦૦૦ |
| 17 | Gift (Juice set) | 150 | ૪૫૦૦૦ | ૪૫૦૦૦ |
| 18 | Shawl and Coconut | 500 | ૧૦૦૦૦૦ | ૧૦૦૦૦૦ |
| 19 | Nasta Pack (Sandwich, Gulabjam, Biscut) | 2000 | ૧૪૫૦૦૦ | ૧,૩૦,૦૦૦ |
| 20 | Fountain big size (For rental) (4 days) | 1 | ૨૦૦૦૦ | ૨૦૦૦૦ |
| 21 | Banner for city Add/Welcome Gate/Stall (4 days) | 7500 Sqft | ૧૧૨૫૦૦ | ૧૧૨૫૦૦ |
| 22 | Advertisement Moving Vehicle (For Rental) | 4 | ૭૫૦૦૦ | ૭૫૦૦૦ |
| 23 | Cable Advertisement | 1 week | ૫૫૦૦૦ | ૫૫૦૦૦ |
| 24 | 20 ltr Water jar for Stalls | 300 | ૩૭૫૦૦ | ૩૭૫૦૦ |
| 25 | 1 ltr Bisleri Bottle for Officers and VIPs | 100 box | ૨૧૬૦૦ | ૨૧૬૦૦ |
| 26 | Cable Live Program | 4 | ૪૫૦૦૦ | ૪૫૦૦૦ |
| 27 | CC Camera (with Tv and Back up) (For rental) | 4 | ૨૧૦૦૦૦ | ૨૧૦૦૦૦ |
| 28 | D.J. sound system (For rental) | 4 | ૫૦૦૦૦ | ૫૦૦૦૦ |
| 29 | Cloth Bag with Printing | 500 | ૨૦૦૦૦ | ૨૦૦૦૦ |
| 30 | Invitation cards | 500 | ૫૦૦૦ | ૫૦૦૦ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 31 | colour Certificate | 500 | १०००० | १०००० |
| 32 | Welcome gate (For rental) | 2 | ३०००० | २०,००० |
| 33 | Maharastrain Traditional Dances and singings (with famous Advertise for 2 Hrs daily) | 4 days | १७५००० | १,२५,००० |
| ३४ | Sindhi Sanskrit Darshan | 1 days | ५५००० | ४०,००० |
| ३५ | Panjabi Loknrutya | 1 days | ५५००० | ४०,००० |
| ३६ | Gujrati Sanskrit Program | 1 days | ५०००० | ५०००० |
| ३७ | Other Cultural Sanskrit Program | 1 days | ५०००० | ५०००० |
| | | | ३१७९००० | २९,५३,००० |

या अनुषंगाने निविदाकार में अमरज्योत एंटरप्राईजेस, उल्हासनगर यांना चार दिवसांचा आयोजित “उल्हास फेस्टीवल” कार्यक्रमा करिता साहित्य पुरवठा करणे पोटी रू. २९,५३,०००/— एवढी रक्कम अदा करावी लागेल.तसेच निविदेमध्ये प्राप्त न्युन्नत्तम निविदाकार **में अमरज्योत एंटरप्राईजेस, उल्हासनगर** यांचे न्युन्नतम दर रू. २९,५३,०००/— एवढा खर्चास मा.स्थायी समिती च्या प्रशासकिय व वित्तिय मंजुरीस्तव सविनय सादर.

स्थायी समिती ठराव क्र. ३२ दिनांक:— २७/६/२०१६

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिका महिला व बालकल्याण समितीद्वारे चार दिवसांचा आयोजित ‘‘उल्हास फेस्टीवल’’ कार्यक्रमाकरीता न्युनत्तम निविदाकार मे. अमरज्योत एंटरप्राईजसे, उल्हासनगर यांचे न्युनत्तम दर मान्य करुन येणारा खर्च रू. २९,५३,०००/— यास प्रशासकिय व वित्तीय मंजुरी देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

प्र. महापालिका सचिव :— विषय क्र. ७ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. ७ :–** उल्हासनगर शहरातील बाळांतीण झालेल्या महिलांना माहेरचा वसा व माहे जानेवारी २०१६ ते मार्च २०१६ दरम्यान जन्मलेल्या बाळाकरीता फर्स्ट एड बॉक्स (बेबी ऑईल, शॉप, पावडर, क्लॉथ) वाटप करणेकरीता न्युनत्तम निविदाकार मे. विद्याश्री मेडीकेअर, नांदेड यांचे न्युनत्तम खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणे.

---

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :–** एप्रिल, मे, जुन महिन्यामध्ये कसे देणार आहात?

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भूल्लर :–** मागील वर्षाचा निधी वापरला आहे.

**प्र. मुख्य स्व. निरीक्षक, श्री. विनोद केणी :–** माहे जाने. २०१६ ते मार्च २०१६ या कालावधीत जेवढी बालके जन्माला आली आहेत, त्यांना फर्स्ट एड बॉक्स (बेबी ऑईल, शॉप, पावडर, क्लॉथ) वाटप करावयाचे होते, परंतु या प्रस्तावाला आता उशिर झाला आहे, त्यामुळे मंजूरी मिळाल्यानंतर पुढील कोणत्याही तीन महिन्यात सदर साहित्य देवू शकतो.

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–** आपण ठराव पारीत करूया त्यानंतर ठेकेदाराला कार्यादेश दिला जाईल. म्हणजेच ज्या दिनांकाला कार्यादेश मिळाला तेव्हापासून पुढील तीन महिन्यांमध्ये जन्माला आलेल्या बालकांना सदर साहित्य दिले जाईल. गोषवा–यामध्ये नमुद केलेल्या महिन्यांमध्ये जन्माला आलेली बालके व माता अजून हॉस्पिटलमध्ये राहिली नाहीत.

**सदस्या, श्रीम. अंजली साळवे :–** कार्यादेश दिल्यानंतर त्या तारखेनंतरच्या तीन महिन्यात साहित्य देण्यात यावे.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भूल्लर :–** आता विषय मंजूर झाला आहे म्हणजे माहे जुलै ते सप्टेंबर या तीन महिन्यातील बालकांना सदर साहित्य दयावे.

**प्र. महापालिका सचिव :–** मागील वर्षाचा निधी वापरता येईल का?

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भूल्लर :–** हो, वापरता येईल.

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–**कुठली कुठली हॉस्पिटल निश्चित केली आहेत का?

**प्र. मुख्य स्व. निरीक्षक, श्री. विनोद केणी :–** सेंट्रल हॉस्पिटल, कॅम्प नं. ४ चे शासकिय रूग्णालय,

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–** सदर विषयाच्या ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता करण्यात यावी.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :–** १ जुलै ते ३० सप्टेंबर या तीन महिन्याच्या कालावधीत जन्माला आलेल्या बालकांना साहित्य देण्यात यावे.

**सदस्या, डॉ. निना नाथानी :–** सदर वस्तुंचे आपण वाटप करीत असतो परंतु कितीतरी लोकांना हे माहितच नसते, यामध्ये काही लोकांना याचा लाभ होता काहींना नाही, त्यामुळे महापालिकेकडून अशा वस्तुंचे वाटप होणार असल्याचे जाहिरात फलक संबंधित हॉस्पिटलच्याबाहेर प्रसिध्द् करण्यात आले तर ते वाचून नागरीक मागणी करू शकतील.

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–** किती हॉस्पिटलमध्ये देणार आहेत,

**प्र. मुख्य स्व. निरीक्षक, श्री. विनोद केणी :–** महापालिका अंदाजपत्रकातील तरतुदीनुसार आधी शासकिय रूग्णालयातील बालकांना साहित्य वाटप करण्यात येईल.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u> शासकिय रूग्णालयांतील लोकांनाच दया, १५०० लाभार्थ्यांना देणार आहात ना, मग तीन महिन्यांचे सहा महिने लागू देत ना, परंतु सर्व लाभार्थ्यांना लाभ मिळू दे.

<u>सदस्या, डॉ. निना नाथानी :—</u> फर्स्ट एड बॉक्स जो आपण देणार आहे तो कोणत्या कंपनीचा देणार आहोत, कोणत्याही स्थानिक कंपनीचे देता कामा नये, कारण लहान मुलांची त्वचा एकदम नाजूक असते, त्यांना त्याचा त्रास होवू शकतो, आपण गोषवा—यात नमुद करायला हवे होते कि, या या कंपनीचे फर्स्ट एड बॉक्स देणार आहे म्हणून, विप्रो, जॉन्सन ॲण्ड जॉन्सन, हिमालया यापैकी कोणत्याही कंपनीचे उत्पादन असेल तर ठिक आहे,

<u>सदस्या, श्रीम. अंजली साळवे :—</u> लहान मुलांची त्वचा नाजूक असते त्यामुळे स्थानिक कंपनीचे उत्पादन देता कामा नये, मुलांना याचा त्रास होईल.

<u>सदस्या, डॉ. निना नाथानी :—</u> फर्स्ट एड बॉक्स दयायचाच असेल तर चांगल्या कंपनीचा दया, नाहीतर दिला नाही तरी चालेल, ठरावात आपल्याला लिहावे लागेल कोणत्या कंपनीची वस्तू आपण देणार आहात.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—</u> गोषवा—यामध्ये वेगवेगळया वस्तू आहेत, फर्स्ट एड बॉक्स १५०० लोकांना वाटणार व इतर साहित्य ५०० लोकांना असे कसे?

<u>सदस्या, श्रीम. अंजली साळवे :—</u> फर्स्ट एड बॉक्स १५०० लोकांना देता तर मग इतर साहित्यसुध्दा १५०० लोकांना दया ना.

<u>प्र. महापालिका सचिव :—</u> आता तसे करता येणार नाही, कारण त्यानुसार निविदा प्रक्रीया झालेली आहे.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>ठिक आहे, निविदेनुसार कार्यवाही करावी.

<u>प्र. महापालिका सचिव :—</u> सदरचा विषय पारीत करण्यात यावा का?

<u>काही सदस्य :—</u>पास—पास……

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u> सदर विषयाच्या ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता करण्यात यावी.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

**विषय क्र. ७ :—** उल्हासनगर शहरातील बाळांतीण झालेल्या महिलांना माहेरचा वसा व माहे जानेवारी २०१६ ते मार्च २०१६ दरम्यान जन्मलेल्या बाळाकरीता फर्स्ट एड बॉक्स (बेबी ऑईल, शॉप, पावडर, क्लॉथ) वाटप करणेकरीता न्युनत्तम निविदाकार मे. विद्याश्री मेडीकेअर, नांदेड यांचे न्युनत्तम खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर शहरातील बाळांतीन झालेल्या महिलांना माहेरचा वसा व माहे जानेवारी २०१६ ते मार्च २०१६ दरम्यान जन्मलेल्या बाळा करिता First Aid Box (Baby oil, soap, powder,cloth) वाटप करणेकरीता "ई टेंडर प्रक्रीयेव्दारे" दोन लिफाफा पध्दतीने जाहिर निविदा मागविण्यात आल्या होत्या.नियमानुसार खालील तीन निविदाकारांनी वेबसाईटवरुन निविदा Submit केल्या आहेत.

१. में सुनिल टेड्रर्स, धुळे

२. में संदीप टेड्रर्स, धुळे

३. में विद्याश्री मेडीकेअर, नांदेड

दिनांक १०/०२/२०१६ रोजी प्राप्त झालेल्या निविदा बुधवार दिनांक १७/०२/२०१६ रोजी सकाळी ठिक ०१:०० वाजता मा. अति. आयुक्त तथा निविदा समिती अध्यक्ष यांचे दालनात निविदा समिती समक्ष उघडण्यात आल्या आहेत.

लिफाफा क्र १ च्या अहवालानुसार तीनही निविदाकार पात्र ठरल्याने लिफाफा क्रं २ वरिल सर्व उपस्थितांच्या समक्ष उघडण्यात आला.प्राप्त तिन निविदाकारांच्या दराचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे. (लिफाफा क्रं. १ चा अहवाल सोबत सादर).

(लिफाफा क्रं. २ चा तुलनात्मक तक्ता).

| अ क्रं | तपशिल | अंदाजित लाभार्थी | प्रति लाभार्थी तीन महिन्यांसाठी आवश्यक परिणाम | पुरवठादाराचे नांव व त्यांनी सादर केलेले प्रति नग दर | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | में सुनिल टेड्रर्स, धुळे | में संदीप टेड्रर्स, धुळे | में विद्याश्री मेडीकेअर, नांदेड |
| १ | खारीक | १५०० | ३ किलो | ४२० | ३६० | ३४५ |
| २ | खोबर | | दिड किलो | २७० | २४० | २१० |
| ३ | साखर | | ३ किलो | १३५ | १२० | ११४ |
| ४ | तुप | | दिड किलो | ६९० | ६०० | ५१६ |
| ५ | बदाम | | ३०० ग्रॅम | ३०० | २७० | २४० |
| ६ | काजु | | ३०० ग्रॅम | २४० | २१० | २५५ |
| ७ | रवा | | ३ किलो | १३२ | १२० | १०५ |
| ८ | First Aid Box (Baby oil, soap, powder,cloth)पुरवठा करणे | १५०० | | ४२१ | ४०२ | ३९१ |
| | | | | २६०८ | २३२२ | २१७६ |

उक्त तुलनात्मक तक्त्यानुसार दिनांक १८/०४/२०१६ रोजीच्या टिप्पणी नुसार मा. आयुक्त यांनी निविदेमध्ये न्युन्नतम निविदाकार में.विद्याश्री मेडीकेअर, नांदेड यांचे प्राप्त दर रू. १४,७९,०००/— हे न्युनत्तम आहे.परंतु प्राप्त न्युन्नतम दर व बाजारभावा मध्ये किती तफावत आहे.(कमि/जास्त) याबाबत अभिप्राय सादर करणेबाबत आदेशित केले होते.

मा. आयुक्त सो यांनी आदेशित केल्यानुसार महिला व बालकल्याण समिती मार्फत बाजारामधुन साहित्यांचे दर प्राप्त करण्यात आले व त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ क्रं | तपशिल | बाजारा मधुन प्राप्त केलेले (लोकमान्य किराणा स्टोअर्स, उल्हासनगर ४) प्रति साहित्य दर | प्रति लाभार्थी तीन महिन्यांसाठी आवश्यक परिणाम | बाजारा मधुन प्राप्त केलेले प्रति लाभार्थी तीन महिन्यांसाठी दर | में विद्याश्री मेडीकेअर, नांदेड निविदेतील प्राप्त दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | खारीक | १४० | ३ किलो | ४२० | ३४५ |
| २ | खोबर | ८५ | दिड किलो | २५५ | २१० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | साखर | ४५ | ३ किलो | १३५ | ११४ |
| ४ | तुप | १९५ | दिड किलो | ५८५ | ५१६ |
| ५ | बदाम | ९० | ३०० ग्रॅम | २७० | २४० |
| ६ | काजु | १०० | ३०० ग्रॅम | ३०० | २५५ |
| ७ | रवा | ४० | ३ किलो | १२० | १०५ |
| | | | | २०८५ | १७८५ |

उक्त तुलनात्मक तक्त्यानुसार **लोकमान्य किराणा स्टोअर्स, उल्हासनगर** ४ यांचे कडून प्राप्त केलेले बाजारा भाव तीन महिन्यांसाठी दर रू. **२०८५**/— एवढे असून एकूण ५०० लाभार्थ्यां करिता रू. २०८५ x ५०० = १०,४२,५००/— एवढा खर्च व First Aid Box रू. ४०० एवढे असून एकूण १५०० लाभार्थ्यां करिता रू. ३९१ x १५०० = ६०,००००/— एवढा खर्च म्हणजे एकूण १६,२९,०००/— खर्च अपेक्षित आहे.परंतु निविदेमध्ये प्राप्त निविदाकार **में विद्याश्री मेडीकेअर, नांदेड** यांनी निविदेमध्ये सादर केलेले न्युन्नतम दर रू. १७८५ एवढा असून एकूण ५०० लाभार्थ्यां करिता १७८५ x ५०० = ८,९२,५००/— एवढा खर्च व First Aid Box रू. ३९१ एवढे असून एकूण १५०० लाभार्थ्यां करिता रू. ३९१ x १५०० = ५,८६,५००/— एवढा खर्च म्हणजे एकूण १४,७९,५००/— खर्च अपेक्षित असुन बाजारभावाच्या तुलनेनुसार व अंदाजित किमंतीपेक्षा न्युन्यत्तम आहे. तसेच निविदेमध्ये प्राप्त न्युन्नतम निविदाकार **में विद्याश्री मेडीकेअर, नांदेड** यांचे न्युन्नतम दर रू. १४,७९,५००/— एवढया खर्चास मा.स्थायी समिती च्या प्रशासकिय व वित्तिय मंजुरीस्तव सविनय सादर.

स्थायी समिती ठराव क्र. ३३ — दिनांकः— २७/६/२०१६

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर शहरातील बाळांतीण झालेल्या महिलांना माहेरचा वसा जन्मलेल्या बाळाकरीता फर्स्ट एड बॉक्स (बेबी ऑईल, शॉप, पावडर, क्लॉथ) वाटप करणेकरीता न्युनत्तम निविदाकार मे. विद्याश्री मेडीकेअर, नांदेड यांचे न्युनत्तम दर मान्य करुन येणारा खर्च रू. १४,७९,५००/— एवढया खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे.

तसेच

१. सदर कामाचा कालावधी उलटून गेला असल्याने माहे जानेवारी २०१६ ते मार्च २०१६ त्याऐवजी १ जुलै २०१६ ते सप्टेंबर २०१६ या दरम्यान देण्यात यावे.
२. दोन्ही शासकिय इस्पितळात बॅनर लावून जाहिरात करणे आवश्यक राहिल.
३. फर्स्ट एड हे जॉनसन ॲण्ड जॉनसन/हिमालया/विप्रो या स्टॅण्डर्ड कंपनीचे देणे बंधनकारक असेल.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**प्र. महापालिका सचिव :—** विषय क्र. ८ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. ८ :—** उल्हासनगर शहरातील विधवा/परितक्त्या/आर्थिक दृष्टया दुर्बल महिलांना स्वंयरोजगारासाठी फॉल बिडींग/ओव्हरलॉक मशिन वाटप करणेकरीता प्राप्त खर्चास प्रशासकिय व वित्तीय मंजुरी देणे.

---

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—** प्रत्येक नगरसेवकाला किती मशिन देणार?

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—** प्रत्येक नगरसेवकाला ५ मशिन देण्यात येणार आहेत.

**प्र. मुख्य स्व. निरीक्षक, श्री. विनोद केणी :—** महिला बाल कल्याण समितीच्या सभेमध्ये निर्णय झाला होता कि, महापौर, उपमहापौर, सभागृहनेता, सभापती स्थायी समिती यांना ५ अतिरिक्त मशिनस देण्यात येतील.

**सदस्या, श्रीम. लिलाबाई आशान :—** दोन दोन मशिनस वाढवून दया ना.

**सदस्या, श्रीम. लिलाबाई आशान :—** ज्या काही मशिनस दयाल, त्या एकावेळेसच दया कारण मग लोकं आम्हाला विचारतात. ४ वाटल्या आणि बाकीच्या ठेवल्या घरात.

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—** सदर विषयाच्या ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता करण्यात यावी.

**सदस्या, श्रीम. लिलाबाई आशान :—** ज्या मशिनस देणार आहात त्या सर्व एकदमच दया. नाहीतर प्रभागात लोकं म्हणतात चेहरा बघून बघून मशिनस देता का?

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—** स्थायी समिती सदस्यांना ४—४ मशिनस वाढवा. व पदाधिका—यांना १० ऐवजी १२ मशिनस दया.

**प्र. महापालिका सचिव :—** सदरचा विषय पारीत करण्यात यावा का?

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ८ :—** उल्हासनगर शहरातील विधवा/परितक्त्या/आर्थिक दृष्टया दुर्बल महिलांना स्वंयरोजगारासाठी फॉल बिडींग/ओव्हरलॉक मशिन वाटप करणेकरीता प्राप्त खर्चास प्रशासकिय व वित्तीय मंजुरी देणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर शहरातील विधवा/परितक्त्या/आर्थिक दृष्टया दुर्बल महिलांना स्वयंरोजगारासाठी फॉल बिडींग/ओव्हरलॉक मशिन वाटप करणसेकरिता “ई टेंडर प्रक्रयेव्दारे” दोन लिफाफा पध्दतीने जाहिर निविदा मागविण्यात आल्या होत्या.नियमानुसार खालील तीन निविदाकारांनी वेबसाईटवरुन निविदा Submit केल्या आहेत.

१. में ओम मनिष एंटरप्राईजेस, उल्हासनगर

२. में सिध्दांत एंटरप्राईजेस, उल्हासनगर

४. में.विघ्नेश एंटरप्राईजेस, उल्हासनगर

दिनांक १०/०२/२०१६ रोजी प्राप्त झा लेल्या निविदा बुधवार दिनांक १७/०२/२०१६ रोजी सकाळी ठिक ११:०० वाजता मा.अति. आयुक्त तथा निविदा समिती अध्यक्ष यांचे दालनात निविदा समिती समक्ष उघडण्यात आल्या आहेत.

लिफाफा क्र १ च्या अहवालानुसार तीनही निविदाकार पात्र ठरल्याने लिफाफा कं २ वरिल सर्व उपस्थितांच्या समक्ष उघडण्यात आला.प्राप्त तिन निविदाकारांच्या दराचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

(लिफाफा कं. २ चा तुलनात्मक तक्ता).

| अनु.क्र | निविदाकाराचे नाव | अंदाजित किंमत | दर जास्त/कमी |
|---|---|---|---|
| १ | में ओम मनिष एंटरप्राईजेस, उल्हासनगर | रू. २५,५०,०००/— | प्रति फॉल बिडींग/ओव्हरलॉक मशिन रू. ११५०० X ५१० = ५८,६५,००० |
| २ | में सिध्दांत एंटरप्राईजेस, उल्हासनगर | | प्रति फॉल बिडींग/ओव्हरलॉक मशिन रू. ११८५० X ५१० = ६०,४३,५०० |
| ३ | में.विघ्नेश एंटरप्राईजेस, उल्हासनगर | | प्रति फॉल बिडींग/ओव्हरलॉक मशिन रू. ११३९५ X ५१० = ५८,११,४५०/— |

उक्त तुलनात्मक तक्त्यानुसार तिन निविदाकारांपेक्षा में.विघ्नेश एंटरप्राईजेस, उल्हासनगर यांचे दर रू. ५८,११,४५०/— हे न्युनत्तम आहे.परंतु अंदाजित किमंतीपेक्षा दुप्पट असल्यामुळे दिनांक ०३/०३/२०१६ रोजीच्या टिप्पणी नुसार मा. अतिरिक्त आयुक्त यांनी प्राप्त दराच्या वाटाघाटीसाठी निविदाकारस बोलवावे व दरम्यान बाजारभाव तपासावे असे आदेशित केले होते.

मा. अतिरिक्त आयुक्त यांनी आदेशित केल्यानुसार सदर निविदेमध्ये प्राप्त दराच्या वाटाघाटीसाठी निविदाकार में.विघ्नेश एंटरप्राईजेस, उल्हासनगर यांना पत्र कं. उमपा/मबाकस/१२१ दिनांक ०४/०३/२०१६ अन्वये दिनांक ५/०३/२०१६ रोजी सकाळी ११:०० वाजता मा. उप आयुक्त (मबाकस) यांचे दालनात बोलविण्यात आले व त्यांनी त्यांचे पत्र दिनांक ५/०३/२०१६ अन्वये निविदेत दिलेले प्रति फॉल बिडींग/ओव्हरलॉक मशिन रू. ११३८०/— वाटाघाटी करून नविन दर प्रति फॉल बिडींग/ओव्हरलॉक मशिन रू. ७८२५/— (फिलीप्स कंपनी मेक मशिनचा दर) दिलेला

आहे.यास्तव मा उप आयुक्त (मबाकस) यांनी अन्य कंपनीचे दर मागविण्यासाठी आदेशित केले. मा अतिरिक्त आयुक्त व मा. उप आयुक्त (मबाकस) यांनी आदेशित केल्यानुसार महिला व बालकल्याण समितीव्दारे फॉल बिडींग/ओव्हरलॉक मशिनचे दरपत्रके बाजारामधून व Net व्दारे हाती घेण्यात आले. व त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे. (सोबत दरपत्रक सादर.) महिला व बालकल्याण समिती मार्फत दोन फॉल बिडींग/ओव्हरलॉक मशिन चे दर प्राप्त करण्यात आले व त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अनु. | कंपनीचे नाव | फॉल बिडींग/ओव्हरलॉक मशिन तपशिल | प्रति मशिन दर | एकूण ५१० मशिन दर |
|---|---|---|---|---|
| १ | मास्टर एजन्सीज, उल्हासनगर ४ | Silver 13ok Bding Sewing male Intel Slo + mali | ९३५० | रू. ९३५० X ५१० = ४७,६८,५००/— |
| २ | पुष्पक ईलेक्ट्रॉनिक, भिवंडी | Five Hundred Sima Motor Model – 8v Stand Table zipag 130k (Gair) | ९२०० | रू. ९२०० X ५१० = ४६,९२,०००/— |
| ३ | कैलाश सेविंग मशिन, उल्हासनगर २ | Machine Beding Philips with Phul stand Table8.0 small (with 5% Vat) | ८९०० | रू. ९३५० X ५१० = ४५,३९,०००/— |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | उषा जॅनम ड्रीम स्टीच सेविंग मशिन(Net व्दारे ) | उषा जॅनम ड्रीम स्टीच सेविंग मशिन | ७,४७२ | रू. ७४७२ X ५१० = ३८,१०,७२० |
| ५ | सिंगर सेविंग मशिन (Net व्दारे ) | सिंगर ८२८० सेविंग मशिन | ८,१९९ | रू. ८१९९ X ५१० = ४१,८१,४९० |

उक्त तुलनात्मक तक्त्यानुसार **उषा जॅनम ड्रीम स्टीच सेविंग मशिन** यांचे न्युन्नतम दर रू. ७,४७२/— एवढे असून निविदेमध्ये प्राप्त निविदाकार में.विघ्नेश एंटरप्राईजेस, उल्हासनगर यांनी वाटाघाटी अंती कमि केलेले प्रति फॉल बिडींग/ओव्हरलॉक मशिन दर रू. ७८२५/— (फिलीप्स कंपनी मेक मशिनचा दर) पेक्षा खुप कमी आहेत.

या अनुषंगाने **उषा जॅनम ड्रीम स्टीच सेविंग मशिन** यांचे न्युन्नतम दर रू. ७,४७२/— एवढा असून एकूण ५१० मशिन खरेदी करणेकरिता रू. ७४७२ x ५१० = **३८,१०,७२०/—** एवढा खर्च अपेक्षित आहे.परंतु सदर खर्च अंदाजित किमंतीपेक्षा जास्त आहे. सदर बाब आपल्या निर्देशास सादर करण्यात येत आहे. सदर ५१० मशिन खरेदी करणेकरिता येणारा अंदाजित खर्च हा महिला व बाल कल्याण समितीच्या महिलांना स्वयंरोजगारासाठी साहित्य उपलब्ध करून देणेबाबत या लेखाशिर्षात रू. ४० लाखाची तरतुद उपलब्ध असून यामधुन करण्यात येईल.

या अनुषंगाने निविदेमध्ये प्राप्त न्युन्नत्तम निविदाकार में विघ्नेश एंटरप्राईजेस, उल्हासनगर यांचे **उषा जॅनम ड्रीम स्टीच सेविंग मशिन** यांचे न्युन्नतम दर रू. ७,४७२/— एवढा असून एकूण ५१० मशिन खरेदी करणेकरिता रू. ७४७२ x ५१० = **३८,१०,७२०/—** एवढा खर्चास मा.स्थायी समिती च्या प्रशासकिय व वित्तिय मंजुरीस्तव सविनय सादर.

स्थायी समिती ठराव क्र. ३४ दिनांकः— २७/६/२०१६

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर शहरातील विधवा/परितक्त्या/आर्थिक दृष्टया दुर्बल महिलांना स्वंयरोजगारासाठी फॉल बिडींग/ओव्हरलॉक मशिन वाटप करणेकरीता युन्नत्तम निविदाकार में विघ्नेश एंटरप्राईजेस, उल्हासनगर यांचे उषा जॅनम ड्रीम स्टीच सेविंग मशिन यांचे न्युनत्तम दर मान्य करुन य मशिन खरेदी करणेकरिता येणा—या एकुण रुपये ३८,१०,७२०/— एवढया खर्चास प्रशासकिय व वित्तीय मंजुरी देत आहे.

मा. महापौर ——१२

मा. उप—महापौर——१२

मा. स्थायी समिती सभापती ——१२

मा. सभागृह नेता ——१२

मा. विपक्ष नेता —— १२

मा. स्थायी समिती सदस्य प्रत्येकी —— ९ अशा मशिन देण्यास मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्र. ९ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. ९ :– प्रस्तावाची सूचना

सन्माननिय पदाधिकारी/वरिष्ठ अधिकारी कार्यालयातील चतुर्थश्रेणी कर्मचा–यांना अतिकालीन भत्ता अदा करणेकामी पुर्वीच्या स्थायी समिती ठरावामध्ये अंशत: बदल करणेबाबत मा. सभापती, स्थायी समिती श्री. सुनिल सुर्वे यांचा यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

---

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–** सदर विषय आणण्यामागचा उद्देश हाच आहे कि, आपले कर्मचारी उशिरापर्यंत पदाधिकारी असपर्यंत थांबतात, त्यांना रू. १०००/ इतका अतिकालीक भत्ता देण्यात यावा.

**प्र. महापालिका सचिव :–** पदाधिका–यांच्या दालनाबाहेर असणारे व अतिकालीक भत्ता मागणी करणारे कर्मचारी यांचा अतिकालीक भत्ता मी मंजूर करते, मा. उपायुक्त (मुख्यालय) यांचेकडून परिपत्रक आले आहे कि, बायोमेट्रीकप्रमाणे पगार व भत्ते दयावे. कारण आपल्याकडे बायोमेट्रीक पध्दतीने उपस्थिती लावली जाते. त्यामध्ये कार्यालयीन वेळेनुसार उपस्थिती लावली जात असते, त्यामुळे सदर कर्मचारी हे उशिरापर्यंत उपस्थित राहतात किंवा नाही याबाबत मला बायोमेट्रीकचा अहवाल मागवून त्यानुसार अतिकालीक भत्ता देण्यात यावा असे आदेश होते. यामध्ये मला कोणतीही अडचण येता कामा नये. लेखा विभागाचे म्हणणे आहे तुम्ही बायोमेट्रीक तपासून दयायचे आहे.

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–** तुम्ही आम्हाला सांगा कि, स्थायी समितीचा निर्णय मोठा कि उपायुक्तांचा निर्णय मोठा याबाबत आधी आपण खुलासा करा.

**प्र. महापालिका सचिव :–** मला मान्य आहे, स्थायी समितीचा निर्णय नेहमीच मोठा आहे. पंरतु विभागप्रमुख म्हणुन मला विचारणा होत असते. व मला त्यांच्या भत्त्यावर स्वाक्षरी करावी लागते.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भूल्लर:–** मग आम्ळी ठराव करायचा नाही का?

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–** आम्ही ठराव करत आहोत, आणि ठरावानुसार तुम्ही भत्ता देणार आहात मग तुम्हाला स्वाक्षरी करायला काय अडचण येते? स्थायी समितीने मान्यता दिली आहे मग प्रश्नच नाही.

**प्र. महापालिका सचिव :–** तुम्ही ठराव करा पण याबाबतीत विभागप्रमुख म्हणून येणारी अडचण तुम्हास सांगितली, लेखा आक्षेप आले तर त्यांस मी जबाबदार नाही.

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–** आधी ठराव झालेला होता त्यामध्ये अंशत: बदल करत आहोत, बिचारे कर्मचारी उशिरापर्यंत थांबतात, आणि त्यांना भत्ता मिळाला पाहिजे ना. तुमच्यावर काही आक्षेप येणार नाही.

**प्र. महापालिका सचिव :–** सदरचा विषय पारीत करण्यात यावा का?

**काही सदस्य :–**पास–पास......

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–** सदर विषयाच्या ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता करण्यात यावी.

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ विषय क्र. ९ :– प्रस्तावाची सूचना

सन्माननिय पदाधिकारी/वरिष्ठ अधिकारी कार्यालयातील चतुर्थश्रेणी कर्मचा–यांना अतिकालीन भत्ता अदा करणेकामी पुर्वीच्या स्थायी समिती ठरावामध्ये अंशत: बदल करणेबाबत मा. सभापती, स्थायी समिती श्री. सुनिल सुर्वे यांचा यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिकेच्या मा. महापौर तथा शहराच्या प्रथम नागरीक, उप–महापौर, स्थायी समिती सभापती, मा. आयुक्त, मा. अतिरिक्त आयुक्त, मा. सभागृह नेता, सर्व गटनेता, महापालिका सचिव, मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक, उप–आयुक्त व विभाग प्रमुख यांचेकडे कार्यरत असलेल्या चतुर्थश्रेणी कर्मचा–यांना महासभा/स्थायी समिती/विविध विभागांच्या आढावा बैठक शासनाकडे तातडीने सादर करायचे प्रस्ताव/पत्रव्यवहार इत्यादी कामी कार्यालयीन कामकाजाच्या वेळे अगोदर सकाळी लवकर किंवा कार्यालयीन कामकाजाच्या वेळेनंतर सायंकाळी उशिरापर्यंत थांबवून काम करुन घेतले जाते. क्वचित प्रसंगी सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी बोलावून काम करुन घेतले जाते. त्याचा मोबदला म्हणून स्थायी समिती ठरावान्वये प्रतिमहा ५००/– अतिकालीन भत्ता दिला जात होता. त्यानंतर स्थायी समिती ठराव क्र.५९, दिनांक १७/१२/२०१३ अन्वये त्यामध्ये वाढ करुन प्रतिमहा १०००/– (एक हजार) मात्र अतिकालीन भत्ता अदा केला जात होता. परंतु काही दिवसांपासून तासांच्या परिगणनेनुसार अतिकालीन भत्ता दिला जात असल्याने अतिकालीन भत्त्याची पूर्ण रक्कम (रु. १०००/–) मिळत नाही. तसेच पुर्वीच्या ठरावामध्ये नावे अंतर्भुत असलेल्या कर्मचा–यांपैकी काही कर्मचा–यांच्या बदल्या होवून त्यांचे जागी दुसरे कर्मचारी आल्याने अतिकालीन भत्ता मिळण्यास अडचणी येत असल्याच्या बाबी निदर्शनास आणून दिल्या आहेत.

उपरोक्त बाबी लक्षात घेता अतिकालीन भत्त्याबाबत सध्या प्रचलित असलेल्या वर उल्लेख केलेमल्या स्थायी समिती ठरावामध्ये अंशत: बदल करुन सन्माननिय पदाधिकारी व वरिष्ठ अधिकारी यांचे कार्यालयातील ३ ते ४ चतुर्थश्रेणी कर्मचा–यांना वेळ तालीकेची अडचण निर्माण न करता दरमहा सरसकट रुपये १०००/– (रुपये एक हजार) मात्र अतिकालीन भत्ता देणेकामी प्रस्ताव स्थायी समितीपूढे मंजुरीस्तव प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. ३५ दिनांक:– २७/६/२०१६

सुचकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार सन्माननिय पदाधिकारी/वरिष्ठ अधिकारी कार्यालयातील चतुर्थश्रेणी कर्मचा–यांना अतिकालीन भत्ता अदा करणेकामी पुर्वीच्या स्थायी समिती ठरावामध्ये अंशत: बदल करुन सन्माननिय पदाधिकारी व वरिष्ठ अधिकारी यांचे कार्यालयातील ३ ते ४ चतुर्थश्रेणी कर्मचा–यांना वेळ तालीकेची अडचण निर्माण न करता दरमहा सरसकट रुपये १०००/– (रुपये एक हजार) मात्र अतिकालीन भत्ता देणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/-

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

सायं. ५.०० वाजंता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती श्री. सुनिल सुर्वे यांनी जाहिर केले.

**(प्राजक्ता मि. कुलकर्णी )**
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

.

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:— २८/७/२०१६

दि.२८/७/२०१६ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती

सभेचे इतिवत्त.

६

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा गुरूवार दिनांक २८/७/२०१६ रोजी सायं. ४.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे | सभापती |
| २ | श्रीमती लिलाबाई आशान | सदस्या |
| ३ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर | सदस्य |
| ४ | श्री. गुरुनो भिकोमल वलेचा | सदस्य |
| ५ | श्री. जमनादास पुरस्वानी | सदस्य |
| ६ | श्रीमती अंजली साळवे | सदस्या |
| ७ | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | सदस्या |
| ८ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | सदस्या |
| ९ | श्रीमती इंदिरा उदासी | सदस्या |
| १० | डॉ. निना प्रकाश नाथानी | सदस्या |
| ११ | श्रीमती वंदना पाटील उर्फ वंदना युवराज भदाणे | सदस्या |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्रीमती जया प्रकाश माखिजा २. श्री. उमेश सुरेश कालानी ३. श्रीमती आशा जिवन इदनानी ४. श्री. विजय चाहु पाटील ५. श्रीमती पुष्पाताई नाना बागुल

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१११. श्रीम. विजया कंठे, उप—आयुक्त (मुख्यालय)
११२. श्रीम. प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव

११३. श्री. जमीर लेंगरेकर, उप–आयुक्त
११४. श्री. दादासाहेब पाटील, मुख्य लेखा अधिकारी
११५. श्री. सुखदेव बलमे, मुख्य लेखा परिक्षक
११६. श्री. राम जयस्वार, शहर अभियंता
११७. श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा
११८. श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
११९. श्रीम. श्रध्दा बावीस्कर, प्रोग्रॅमर, ना.सु.केंद्र
१२०. श्री. जाधव, सहा. मुख्य लेखा परिक्षक
१२१. श्री. भगवान कुमावत, प्रभाग अधिकारी
१२२. श्री. महेंद्र धिंडे, प्र. उप अभियंता, विदयुत
१२३. श्री. मनिष हिवरे, प्र.सहा. आयुक्त, सा.प्र.वि.
१२४. श्री. शैलेश दोंदे, प्र. कर निर्धारक व संकलक
१२५. श्री. भास्कर मिरपगार, प्र. अग्निशमन अधिकारी
१२६. श्री. बाळु नेटके, प्र. सुरक्षा अधिकारी
१२७. श्री. विनोद केणे, प्र. स्वच्छता निरिक्षक
१२८. श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.

१. श्रीमती विशाखा सावंत

२. श्रीमती नर्गिस खान

३. श्री. अशोक रामरख्यानी

श्रीम. विजया कंठे, उप.आयुक्त (मुख्यालय) या आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ होत्या.

सायं. ४.२५ वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

महापालिका सचिव :– विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ विषय क्र. १ :– मागिल सभेचे दिनांकः १३/६/२०१६ व दिनांक २७/०६/२०१६ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

सदस्या, श्रीम. वंदना पाटील उर्फ वंदना युवराज भदाणेः–सदस्यांनी कृपया इकडे लक्ष दया. सभासुचनेवरील विषयावर आजचीच तारीख आहे आणि तो आजच्याच सभेत कसा काय घेण्यात आला आहे. सदर विषयावर आजची तारीख २८/७/२०१६ असेच नमुद आहे बघा.

महापालिका सचिव :– आजच्या म्हणजेच दिनांक २८/७/२०१६ रोजीच्या सभा सुचनेवर घेण्यात येणा–या विषयांवर त्या सभेचा दिनांक नमुद केला जातो, नेहमी याप्रमाणेच केले जाते. सदरचा विषय पारीत करण्यात यावा का?

काही सदस्य :–पास–पास......

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u> मागील सभेचे दिनांक १३/६/२०१६ व दिनांक २७/०६/२०१६ रोजीचे इतिवृत जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे

☑

**विषय क्र. १** :— मागील सभेचे दिनांक १३/६/२०१६ व दिनांक २७/०६/२०१६ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नांव : श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नांव : श्री. जमनादास पुरस्वानी

<u>स्थायी समिती ठराव क्र. :—३५ अ</u> <u>दिनांक : २८/७/२०१६</u>

ही स्थायी समिती महापालिका सचिवांनी प्रस्तृत केलेले दिनांक १३/०६/२०१६ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते ३५ व दिनांक २७/०६/२०१६ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते २६ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. २ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. २** :— वित्तीय वर्ष २०१६—२०१७ करीता मालमत्ता कराची बिले पोष्ट कार्यालयामार्फत स्पीड पोष्टद्वारे वितरीत करणेसाठी अंदाजित रक्कम रू. ३०,०९,०००/— खर्चास मंजुरी देणे.

---

<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u> स्पीडपोस्टाने बिले पोचतात कुठे, लोकांना इथे येवून बिले काढावी लागतात.

<u>प्र. कर निर्धारक व संकलक, श्री. शैलेश दोंदे :—</u> झोपडपटटीमधील पत्ते अपुर्ण असतात त्यामुळे बिले पोचत नाहीत.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:— </u>स्पीडपोस्टाने एक बिल पाठविण्यासाठी किती खर्च येतो. कधी पाठवणार?

<u>प्र. कर निर्धारक व संकलक, श्री. शैलेश दोंदे :—</u> रू. १७.७० पैसे, आम्ही आधीच बिले पोस्टाने पाठविली आहे.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:— </u>आपल्या जेवढया मालमत्ता आहेत तेवढेच विदयुत जोडणी, पाणी जोडणीचे ग्राहक आहेत, त्यांची बिले नागरीकांपर्यंत बरोबर पोचतात, ते कोणत्या पध्दतीने बिले वाटप करतात, आपल्याकडे बिले वाटप करण्यासाठी दोन—तीन महिने आहेत, आपण आपल्या कर्मचा—यांमार्फत बिले हस्तपोच करू शकतो. यामुळे बिले बरोबर घरोघरी पोहचतील. महापालिकेचे रू. ३० लाख वाचतील, इकडे तर ॲसेसमेंन्ट करण्याचे, न करण्याचेसुध्दा पैसे दयावे लागतात.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>या विषयाबाबत श्री. लेंगरेकर साहेबांनी निवेदन करावे.

<u>उप—आयुक्त, श्री. जमीर लेंगरेकर :—</u> कायदयानुसार कोणताही कागद पोस्टाने पाठविला तर तो संबंधिताला पोहचला असे नियम म्हणतो. त्यामुळे मालमत्ता कराची बिले पोस्टाने पाठविली जातात. काही नागरीकांना बिले पोहचत नाहीत कारण की, त्यांचे पत्ते अपूर्ण असतात किंवा पत्ते अद्ययावत नाहीत. मालमत्तांची ॲसेसमेन्ट खुप जुनी आहे, काही मालमत्ता या होल्डरच्या नावे आहेत तर काहींचे पत्ते बरोबर नाहीत त्यासाठी आम्ही शिबिरे राबविली. आपल्याकडे १,७०,००० मालमत्ता आहेत, काही मालमत्ता दुबार आहेत. अशा मालमत्तांचे विषय मा. स्थायी समितीपुढे आणले आहेत, निष्कासित झालेल्या इमारतींची बिले येतच राहतात, यापुर्वी २०११ मध्ये हा प्रयत्न केला होता. परंतु स्थायी समितीने हा विषय फेटाळला आहे. ई—गर्व्हनन्समध्ये जीआयएस केला आहे. ते तंत्रज्ञान जुने होते. आता नविन तंत्रज्ञान आले आहे त्यांस आयुक्तांची मान्यता मिळाल्यानंतर व्यापक सर्व्हे करणे आवश्यक आहे. उल्हासनगर हे १३ चौ.कि.मी चे शहर असले तरी व्यापारी शहर असल्यामुळे लोकसंख्या वाटत आहे. मालमत्ता कर विभागाची सद्याची परिस्थिती पाहता सर्व्हे करण्यासाठी कर्मचारी उपलब्ध नाहीत. बिल सर्व्हेअर आमच्याकडे नाहीत, नगरपालिकेच्या काळात बिल सर्व्हेअर म्हणुन नियुक्त केलेल्या कर्मचा—यांपैकी काही कर्मचारी सेवानिवृत्त झाले तर काही इतर विभागात कार्यरत आहेत. १३ वसुली लिपीक आहेत यापूर्वी कंत्राटी पध्दतीने सेवा उपलब्ध करून घेण्याकरीता ४ वेळा प्रस्ताव पाठविला होता त्यांस मान्यता मिळालेली नाही.

<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:— </u>आपण अभय योजना राबविली त्यातुन कसा प्रतिसाद आहे.

<u>उप—आयुक्त, श्री. जमीर लेंगरेकर :—</u> अभय योजनेमध्ये ब—याच नागरिकांनी लाभ घेतला, ब—याचशा मालमत्ता त्या त्या व्यक्तींच्या नावांवर नाहीत, बरेचसे फ्लॅट बंद आहेत, जप्तीची कार्यवाही सुरू आहे आता जवळजवळ ४० मालमत्तांवर जप्तीची कार्यवाही केली आहे.

<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:— </u>आम्ही कुठे काय म्हणत आहोत, करा ना कार्यवाही.

<u>उप—आयुक्त, श्री. जमीर लेंगरेकर :—</u> काही सन्मा. सदस्य म्हटले होते, त्यानुसार आम्ही जप्तीची कारवाई थांबविली होती.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:— </u>सन २०१६—१७ करीताची मालमत्ता कराची बिले पोस्टामार्फत पाठवा आणि ३१ जुलै पर्यतची मुदत दया.

<u>उप—आयुक्त, श्री. जमीर लेंगरेकर :—</u> नाही, सप्टेंबर पर्यत मुदत दयावी लागेल.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:— </u>३० सप्टेंबरपर्यंत दोन महिने होतात.

<u>उप—आयुक्त, श्री. जमीर लेंगरेकर :—</u> काही बिले परत येतात.

<u>जनसंपर्क अधिकारी, श्री. युवराज भदाणे :—</u> सुमारे २५ ते ३० हजार बिले परत येतात.

सदस्या, श्रीम. वंदना पाटील उर्फ वंदना युवराज भदाणे:—तुम्ही स्वत: भेटी दिल्या आहेत का?

उप—आयुक्त, श्री. जमीर लेंगरेकर :— मालमत्ता करासंबंधी नागरीकांच्या काही तक्रारी असतील, किंवा काही त्रुटी असतील तर त्या निवारणाकरीता आम्ही प्रभागसमिती कार्यालयातंर्गत शिबीर लावली होती. जर एखादयाच्या निवासी पत्त्यामध्ये दुरूस्ती असेल तर ती नोंद करून घेतली जात होती. मालमत्ता कर विभागामध्ये एक निरीक्षक सक्षमपणे काम करू शकत नाही. आमच्याकडे लिपीककर्मचारीवर्ग अपुरा आहे. इतर विभागातून कर्मचारी वर्ग उपलब्ध झाल्यास आमचा टेबल लिपीक त्याला बाहेरचे काम देवू.

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:— तुमच्याकडून प्रस्ताव येईल तेव्हा आम्ही देवू ना.

प्र. कर निर्धारक व संकलक, श्री. शैलेश दोंदे:— मालमत्ता करांची कर मुल्य निर्धारण करावयाचे झाल्यास एक एक लिपीकाकडे ४ ते ५ हजार मालमत्ता आहेत.

उप—आयुक्त, श्री. जमीर लेंगरेकर :— मालमत्ता करांची कर मुल्य निर्धारण ४ वर्षातून एकदा झालेच पाहिजे.

सदस्या, डॉ. निना नाथानी :— मालमत्ता कराची बिले स्पीड पोस्टाने पाठविल्यानंतर ती परत आली तर काय केले जाते.

उप—आयुक्त, श्री. जमीर लेंगरेकर :— अशी बिले परत येतातच, कारण काहीवेळेस एकाच व्यक्तीला दोन बिले जातात त्यापैकी तो एकच स्विकारतो व दुसरे परत पाठवितो, काही बिलांवर होल्डर वगैरे लिहिलेले असते त्यामुळे तो होल्डर सोडून गेला कि ते बिल परत येते.

सदस्या, डॉ. निना नाथानी :— अपूर्ण पत्त्यावर माणूस पोहचू शकत नाही तर पोस्टाने पाठविलेले बिल कसे पोहचेल.

महापालिका सचिव:—आपण गोषवा—यात स्पीडपोस्टने पाठविणेबाबत मंजुरी मागितली आहे. परंतु त्यात दोन प्रभागाने बचत गटांना काम दिले असे लिहिले आहे. तरी आपण त्यांचे देयक कसे देणार की ते यातच आहे ठराव त्यानुसार करावा लागेल ते स्पष्ट करा.

उप—आयुक्त, श्री. जमीर लेंगरेकर :— बिले पोस्टाने पाठविण्याचे कारण हेच आहे कि, आपण बिल पोस्टाने पाठविले कि ते संबंधिताला मिळाले असे होते.

सदस्या, डॉ. निना नाथानी :— असे गृहीत धरले जाते.

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:— बचत गटामार्फत बिले पाठविल्यास खर्च कमी लागणार आहे.

उप—आयुक्त, श्री. जमीर लेंगरेकर :— महिला बचत गटामार्फत बिल वाटप करण्याबाबतचा पायलट प्रोजेक्ट आम्ही करत आहोत.

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :— आपण मालमत्ता कराची बिले बचत गटामार्फत वाटप करणे सुरू केले आहे. एक वर्ष, दोन वर्ष एकच बचतगटाला आपण एकच विभाग दिला तर तीन चार वर्षात त्या बचतगटाला त्या विभागातील एक एक घराची संपूर्ण माहिती होवून जाईल. त्यानंतर आपण त्यांना कलेक्शनचेसुध्दा काम देवु शकतो. आपण त्यांना सांगितले कि दिवसाचे १ लाख आणून दया, तसा कार्यक्रम लावला आणि त्यातला १ टक्का त्यांना दिला तर ते तेवढे पैसेसुध्दा आपल्याला आणून देतील. जर तुम्ही नियमानुसार कराल तर तुमची केवढी अडचण दुर होईल, जर तुम्ही त्यांना सांगितलेत कि, एक लाख, दिड लाख दया तर ते देतील ना तुम्हाला तेवढे लक्ष्य पुर्ण करून मिळेल.

सदस्या, श्रीम. अंजली साळवे:— आमची अशी विनंती आहे कि, दुसरी कामेसुध्दा बचतगटांना दया, बचतगटांची यादी आपल्याकडे आहे,

सदस्या, डॉ. निना नाथानी :— बचत गट प्रत्येक प्रभागात नाहीत. काही काही प्रभागात नाहीत.

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:— महोदयांचे म्हणणे बरोबर आहे, काही प्रभागांमध्ये बचत गट नाहीत, ज्या प्रभागात जास्त बिल्डींग एरीया आहे त्याठिकाणी बचतगट नाहीत.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :–</u> आजुबाजूच्या प्रभागातील बचत गट काम करू शकतात.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u> आपण आपल्या प्रभागात बचतगट निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे. यावर्षी तर पोस्टाने बिले पाठविली जातील परंतु पुढच्या वर्षासाठी तरी बचतगट लागतील ना.

<u>सदस्या, डॉ. निना नाथानी :–</u> हा आपण जे म्हणता ते बरोबर आहे.

<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:–</u> आपल्याकडे बचत गट नसतील तर काही एनजीओ असतात त्यांचेमार्फत आपण हे काम करू शकतो.

<u>सदस्या, श्रीम. लिलाबाई आशान :–</u> आमच्या प्रभागातसुध्दा बचतगट नाहीत.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u> आहेत, तुमच्या प्रभागामध्ये मागच्या बाजूला भिम कॉलनी आहे ना तिथे तीन बचतगट आहेत,

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :–</u> आम्हाला हा विषय पारीत करण्यास काही हरकत नाही परंतू यात पुढे जावून काहीतरी सुधारणा झालेली पाहिजे, हे बचतगटाच्या माध्यमातून काम झाले पाहिजे.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u> ठरावाला कार्योत्तर मंजूरी देवु शकत नाही आम्ही,

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :–</u> यावेळेस बिले स्पीडपोस्टने पाठवा परंतु पुढच्यावेळेपासून ती बचतगटामार्फत वाटप केली जावीत.

<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:–</u> आपण या गोषवा–यात तसे नमुद केले आहे कि, काही प्रभागातील बिले वाटप ही बचतगटामार्फत करण्यात आली आहेत.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u> ठरावाला कार्योत्तर मंजूरी दिली तर ते बेकायदेशीर होईल. कारण गोषवा–यात तसे नमुद नाही. लेंगरेकर साहेब, मला वाटते हा विषय पुढील सभेत घेण्यात यावा, दोन तीन दिवसांचाच प्रश्न आहे, हा विषय आता पारीत करता येणार नाही ना. तुमचे म्हणणे तांत्रिकदृष्टया बरोबर आहे. तरी देखील तुम्ही गोषवा–यात सुधारणा करून नविन गोषवारा आणा आपण पुढील सभेत तो घेवू या. दोन दोन प्रभाग दिलेले आहेत तर त्यांचासुध्दा उल्लेख आलेला नाही कि कोणता प्रभाग कोणत्या बचतगटाला दिलेला आहे.

<u>काही सदस्य:–</u>सदर विषय वगळण्यात यावा.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. २ :–** वित्तीय वर्ष २०१६–२०१७ करीता मालमत्ता कराची बिले पोष्ट कार्यालयामार्फत स्पीड पोष्टद्वारे वितरीत करणेसाठी अंदाजित रक्कम रू. ३०,०९,०००/– खर्चास मंजुरी देणे.

<u>प्रस्तावना</u>

प्रतिवर्षाप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेस वर्ष २०१६–२०१७ करीता मालमत्ता कराची बिले वितरीत करावयाची आहेत. बिलाचे वितरण झाल्यानंतर विहीत मुदतीचे आत बिलाच्या रक्कमेचा भरणा करण्यात आला नाही तर पुढील सक्तीचे उपाय करण्यात येतात. उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात अंदाजित १,७०,००० मिळकती असुन त्यासाठी मालमत्ता कराची बिले वितरीत करावयाची आहेत. त्याअनुशंगाने मालमत्ता कर विभागात कार्यरत असलेल्या लिपीक व बिल सर्वेअर ची संख्या फारच कमी असुन ते बिल

वितरण करण्यासाठी अपुरे आहेत. याशिवाय बिलाचे वाटप केल्याबद्दल व्यवस्थित पोहोच घेतली नाही तर त्यानंतरची वसुली संदर्भातील संपुर्ण कार्यवाही अवैध ठरते.

मालमत्ता कराची बिले वितरीत करण्यासाठी ठोस उपाययोजना करणे गरजेचे आहे. अशा परिस्थितीत पोस्ट कार्यालयामार्फत बजावयाची झाल्यास याकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | रजिस्टर (पोहोच पावतीसह)<br>Regd (With Acknow) | रू. २६.२०/— प्रति बिल | अंदाजित खर्च रक्कम रू. ४४,५४,०००/— |
| २) | रजिस्टर (पोहोच पावती शिवाय)<br>Regd.(W/O Acknow) | रू. २३.२० /— प्रति बिल | अंदाजित खर्च रक्कम रू. ३९,४४,०००/— |
| ३) | स्पीड पोस्ट [Speed Post] | रू. १७.७०/— प्रति बिल | अंदाजित खर्च रक्कम रू. ३०,०९,०००/— |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसूचितील प्रकरण ८ (कराधान नियम) मध्ये नियम ५५ नुसार कराबद्दलची बिले बजावण्याबाबत पुढीलप्रमाणे विशेष तरतुद समाविष्ट आहे.

कलमे ४७२, ४७३ आणि ४७४ मध्ये काहीही अंतर्भुत असले तरी, कोणत्याही नगरपालिका कराबद्दचे बिल, त्या करास पात्र असलेल्या व्यक्तीस, शहरातील तिच्या शेवटच्या माहीत असलेल्या राहण्याच्या किंवा धंद्याच्या ठिकाणाच्या पत्त्यावर, तिच्या नावावर टपाल दाखला घेऊन, आगाऊ आकार भरलेल्या पत्राद्वारे साध्या डाकेने पाठवता येईल आणि अशा रीतीने पाठवण्यात आलेले प्रत्येक बिल, ते ज्या पाकिटातुन किंवा आवेष्टनातून पाठवण्यात आले असेल ते पाकिट किंवा आवेष्टन ज्या दिवशी टपालाने आले असेल त्या दिवसाच्या लगेच नंतरच्या दिवशी ते बिल देण्यात आले आहे असे मानले जाईल आणि अशा रीतीने बिल दिल्याचे सिध्द् करताना, ज्या पाकिटातुन किंवा आवेष्टातून अस बिल पाठवण्यात आले असेल त्या पाकिटावर किंवा आवेष्टनावर योग्य रीतीने पत्ता लिहिलेला होता आणि ते टपाल दाखला घेऊन टपालात टाकण्यात आले होते, असे सिध्द् करणे पुरेस होईल, अशी तरतुद आहे.

उक्त तरतुदी अंतर्गत कराची बिले पोष्ट कार्यालयामार्फत स्पीड पोष्टद्वारे वितरीत करणेसाठी प्रस्तावित असुन याकामी अंदाजित रक्कम रू. ३०,०९,०००/— खर्च अपेक्षित आहे. तसेच सदरील खर्च वर्ष २०१६—२०१७ चे अंदाजपत्रकातील AB1 A-3[9] Postal / Courier Expenses या लेखा शिर्षातून भागविण्यात येईल.

तरी वर्ष २०१६—२०१७ करीता मालमत्ता कराची बिले पोष्ट कार्यालयामार्फत स्पीड पोष्टद्वारे वितरीत करणेसाठी अंदाजित रक्कम रू. ३०,०९,०००/— खर्चास मंजुरी मिळणेसाठी स्थायी समितीपुढे प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ३५ब　　　　　　　　　　दिनांक:— २८/७/२०१६

सुचकाचे नाव :— श्रीम. वंदना पाटील उर्फ वंदना युवराज भदाणे

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार वर्ष २०१६—२०१७ करीता मालमत्ता कराची बिले पोष्ट कार्यालयामार्फत स्पीड पोष्टद्वारे वितरीत करणेसाठी अंदाजित रक्कम रू. ३०,०९,०००/— मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव कार्यसूचीवरून वगळण्यास मान्यता देत आहे.

**कारण,**

सुधारीत गोषवारा पुढच्या सभेत आणणे आवश्यक राहील.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

---

**⇨ विषय क्र. ३ :—** मालमत्ता क्र. 29CO005231900 (Old No. 29/1138) करीता या मालमत्तेकरीता पाणीपट्टी रक्कम रू 6300+ विलंब शास्ती 2013 जुलै ते 2015 मार्च अखेर पर्यत निर्लेखित करणे.

---

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—** आपण जो प्रस्ताव आणला आहे त्यामध्ये आपण ज्या इमारतींना नोटीसा दिल्या आहेत तेव्हापासून आपण त्यांची पाणीपटटी रक्कम धरली आहेत. प्रत्यक्षात त्यांनी ती इमारत केव्हा सोडली आहे, सदर इमारती खाली झाल्याचा आपणाकडे पुरावा आहे का? त्यांचा काही अर्ज आहे का? पंचनामा वगैरे आहे का? त्या तारखेपासून धरायला पाहिजे ज्या तारखेपासून इमारत खाली केली आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—** यात आपण असे करा, महापालिकेने जितक्यापण धोकादायक बिल्डींग तोडल्या आहेत. ज्या काही ८—१० इमारती तोडल्या असतील, जसे गोलमैदान येथे एक बिल्डींग तोडायचे काम चालू आहे, कॅम्प नं. १ मध्ये तोडकाम चालू आहे. ज्यांच्या आतापर्यंत बिल्डींग तुटल्या आहेत. त्यांचे प्रस्ताव सभेपुढे आणा आणि त्यांचे पाणी व मालमत्ता कर रद्द् करा. तसेच त्या जागेचा मालमत्ता कर जेवढया आकारमानाची ती जागा असेल त्यावर मालमत्ता कर लावा. बाकी ज्या धोकादायक इमारती आहेत त्यांना प्रलंबित ठेवा. आणि त्यांचे पाणी व मालमत्ता कर सदर इमारती तोडल्यानंतर एकदम रद्द् करण्याची कार्यवाही करा.

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—** ज्या इमारती तोडण्यात आल्या आहेत त्यांचे प्रस्ताव आणण्यात काही अडथळा नाही.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—** सदर धोकादायक इमारती महापालिका तोडत आहे. त्यासाठी महापालिकेने ठेकेदार नियुक्त केले आहेत. त्याबदद्ल काही नोंद आहे का आपणाकडे. हा विषय अमान्य करा.

**महापालिका सचिव :—** सदरचा विषय पारीत करण्यात यावा का?

**काही सदस्य :—**सदरचा विषय अमान्य करण्यात यावा.

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑

**विषय क्र. ३ :—** मालमत्ता क्र. 29CO005231900 (Old No. 29/1138) करीता या मालमत्तेकरीता पाणीपट्टी रक्कम रू 6300+ विलंब शास्ती 2013 जुलै ते 2015 मार्च अखेर पर्यत निर्लेखित करणे.

## प्रस्तावना

उपरोक्त विषयास अनुसरून सादर करण्यात येते की, श्री श्यामलाल ताराचंद इदनानी राहणार फ्लॅट नं. बी—3 पंचशिल को—आ हा. सोसायटी के बी रोड उल्हासनगर—3. यांनी दि.24/9/2014 रोजीच्या अर्जान्वये महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत करपात्र **मालमत्ता क्र.** 29CO005231900 **(Old No. 29/1138)** या मालमत्तेकरीता पाणीपट्टी रक्कम रू 6300+ विलंब शास्ती 2013 जुलै ते 2015 मार्च अखेर पर्यत निर्लेखित करणेसाठी हरकत दाखल केली आहे.

विषयांकित प्रकरणा संदर्भात कार्यालयीन दफ्तरी नोंदीचा तपषिल खालीलप्रमाणे आहे.
उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील फ्लॅट नं. बी—3 पंचशिल को—आ हा. सोसायटी के बी रोड उल्हासनगर—3 या मिळकतीची कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 29CO005231900 **(Old No. 29/1138)** अन्वये नोंद असुन मालमत्ता कर वसुलीच्या प्रयोजनार्थ कर भरण्यास प्रथम पात्र व्यक्ती म्हणुन श्री श्यामलाल ताराचंद इदनानी या नावे कर आकारणी सुरू आहे. करपात्र बाबींचा तपशिल पुढीलप्रमाणे आह

| Const. Type | Occu.Status | Usage | Annual Rent | Asst. Year | Total Area | Exempted Area | Assessable Area |
|---|---|---|---|---|---|---|---|
| RCC | Owner | Residential | 0 | 01-Apr-86 | 377 | 0 | 377 |
| RCC | Owner | Residential | 0 | 01-Apr-91 | 31 | 0 | 31 |

1) उक्त मिळकती करीता उल्हासनगर महानगरपालिकाकडुन बजावण्यात आलेली जा क्र. उमपा/अबनिवि/प्र.स—2(5)13 दिनांक 1/6/2013 नोटीस जोडली आह

2) उक्त मिळकतीकरीता पाणी व विदयुत पुरवठा रद्द करण्यात आलेला आहे

सदर नोटीसच्या अनुशंगाने आकारणी करण्यात मालमत्तेकरीता पाणीपट्टी पोटी रक्कम रू 6300/— कमी करून अखेर 2013 जुलै 2015 मार्च अखेर पर्यत निर्लेखित करणेसाठी हरकत दाखल केली आहे.

**संदर्भित मिळकतीकरीता सदर इमारत निष्कळीत केलेली असुन त्यापोटी आकारण्यात आलेली पाणीप्टी कमी करून कर आकारणीत करावी.**

१)उक्त हरकतीच्या अनुषंगाने दाखल अर्जावर निर्णय घेण्यात आलेला नाही. तरी विषयांकित प्रकरणी संदर्भित मिळकतीची ४/२/२०१५ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली असता मिळकती करीता इमारत धोकादायक होती म्हणुन निष्कळीत करण्यात आल्याची दिसुन येते. तसेच मिळकतीमध्ये नळजोडणी, विद्युत जोडणी नाही.

२) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कराधान नियमातील तरतुदीनुसार महानगरपालिका क्षेत्रात अस्तित्वात असलेल्या इमारती व जमिनींवर मालमत्ता कर आकारणी करण्यात येते. त्याअनुषंगाने महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात सुधारणा करणे बाबत.

३) श्री ष्यामलाल ताराचंद इदनानी यांनी सादर केले कागदपत्र पाहता मिळकत क्र 29CO005231900 या मालमत्तेकरीता पाणीबिल रक्कम रू६३०० /— रद्द करून प्रथम वर्ष आकारणी परिसरातील प्रचलित वाजवी दरानुसार वर्ष २०१४—१५ पासुन करयोग्य मुल्य निश्चित करणे करीता

उक्त बाबी पाहता कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 29CO005231900 **(Old No. 29/1138)** अन्वये नोंद असलेल्या मिळकतीचे पाणीपट्टी अखेर 2013 जुलै ते 2015 मार्च या कालावधीत क्षेत्रफळ गृहीत धरून कर आकारणी सुरू ठेवणे तसेच बांधकाम गृहीत धरून केलेली उर्वरीत कर आकारणी निर्लेखित करणेसाठी स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक आहे.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, कर आकारणी पुस्तकात 29CO005231900 **(Old No. 29/1138)** नुसार नोंद असलेल्या मिळकतीसाठी वर्ष २०१३जुलै पासुन२०१५ मार्च पर्यत मिळकतीचे पाणीपट्टी आकारणीपोटी थकीत असलेली अतिरिक्त रक्कम (वसुल न होण्याजोगा

कर) रक्कम रू ६३०० + विलंब शास्ती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १५२ नुसार स्थायी समितीच्या मंजुरीने निर्लेखित करणेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ३६ दिनांकः— २८/७/२०१६

सुचकाचे नाव :— श्रीम. रेखा अशोक ठाकुर

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार कर आकारणी मालमत्ता क्र.29CO005231900 (Old No. 29/1138) करीता या मालमत्तेकरीता पाणीपट्टी रक्कम रू 6300+ विलंब शास्ती २०१३ जुलै ते २०१५ मार्च अखेर पर्यत निर्लेखित करण्याचा प्रस्ताव अमान्य करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्रमांक. ४ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. ४ :—** महापौर फंडातून दिवाळी बाजार आनंद मेळाव्यास उभारण्यात आलेल्या स्टॉलसाठी झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी देणे

---

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—** या विषयाची माहिती कोण देणार?

यावेळी सदस्या श्रीमती इंदिरा उदासी, डॉ. निना नाथानी हया सभागृहातुन बाहेर गेल्या.

**श्रीम. विजया कंठे, उप.आयुक्त (मुख्यालय) या आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :—** उल्हासनगर महानगरपालिकेच्याअंतर्गत महापौर फंडातुन दिवाळी बाजार आनंद मेळाव्याचे आयोजन करणेकामी दिनांक ७/१०/२०१५ रोजी मान्यता घेतल्यानुसार दिनांक २ ते ६ नोव्हेंबर, २०१५ या कालावधीत बचत गटातील महिलांना स्वयंरोजगार उपलब्ध व्हावा यासाठी त्यांनी तयार केलेल्या गृहोपयोगी वस्तुंच्या विक्रीकरीता दशहरा मैदान, उल्हासनगर—५ येथे स्टॉल उभारण्यात आले होते. ०५ दिवसासाठी ६० स्टॉल उभे केले होते. त्यासाठी जो खर्च आला तो होता रू. १, ९९,५००/—, सदर खर्च झालेला आहे व त्या खर्चास कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत सभेपुढे प्रस्ताव ठेवला आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—** मा. महापौर महोदयांनी सदर कार्यक्रम घेण्यासाठी पत्र दिले होते. ते काम आपण दिनांक २ ते ६ नोव्हेंबर, २०१५ या कालावधीत केले. सदर कामास दिनांक २ नोव्हेंबर, २०१५ पासून आजपर्यंत सुमारे ८ महिन्याचा कालावधी लोटला आहे. कार्योत्तर मंजूरीसाठी काही नियमावली आहे की नाही. कार्योत्तर मंजूरीचे प्रस्ताव किती कालावधीत आणले पाहिजे. त्याचा काही कालावधी असेल ना, किंवा मागील महापालिका अंदाजपत्रकातील तरतुद आहे किंवा कसे इत्यादी बाबी पहाणे आवश्यक आहे. सदर विषय दिनांक ३१ मार्चपुर्वी आणला पाहिजे किंवा नाही. दिनांक २ नोव्हेंबर, २०१५ रोजीचे काम म्हटले तर त्यावर्षाचे अंदाजपत्रक दिनांक ३१ मार्च, २०१६ रोजी संपले आहे. आता नविन अंदाजपत्रक सुरू झाले आहे. काहीही चालले आहे ना, सर्व मनमानी सुरू आहे.

**मुख्य लेखा अधिकारी, श्री. दादासाहेब पाटील :—** तीन महिन्याचे आंत प्रस्ताव सादर केला पाहिजे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—** मा. महापौर महोदया यांनी दिनांक ७/१०/२०१५ रोजी पत्र दिले. त्यानुसार दिनांक २/११/२०१५ ला काम सुरू झाले. याप्रकारे आपण एक्सपर्ट काम करतो परंतु मंजूरीसाठी वेळेवर आणत नाही. गंभीरतेने सदर बाबी पाहिल्या पाहिजेत ना, सर्व सदस्य तसेच सर्व अधिकारी यांनी हे लक्षात घ्या कि, आमचा या विषयास विरोध नाही कि आम्ही हा विषय पारीत करणार नाही वगैरे, परंतु आमच्या शहरात काही नियमावली तयार झाली पाहिजे. कार्योत्तर मंजूरी किती दिवसांत घेतली पाहिजे, काय करायचे आहे, काही टाईमटेबल वगैरे असले पाहिजे, इथे असे झाले कि, माझ्या घरचे काम आहे, आणि मी माझ्या मुलाला सांगितले कि फर्निचर घेवून ये, ते त्याने आणून ठेवले व एक वर्षानंतर सांगितले कि, वडीलांनी फर्निचर आणायला सांगितले ते मी आणले आहे आता त्याचे पैसे दया असे काम झाले. एवढया उशिरा प्रस्ताव आणला आहे तो आपण कसा मान्य करणार, यात आयुक्तांनी काय करायचे ते पाहिले पाहिजे ना, आम्ही असे बेकायदेशीर काम कसे करणार, आम्ही कसे करणार, तसे नियमातच नाही, कधीपण प्रस्ताव आणतील, अधिका—यांनी काही विचार करायचा नाही, काही नाही, आणि विषय पारीत करायचा, त्याची जबाबदारी आमच्यावर येईल.

**सदस्या, श्रीम. अंजली साळवे :—** नियमाप्रमाणे करता येत नसेल तर.....

**श्रीम. विजया कंठे, उप.आयुक्त (मुख्यालय) या आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी** :— भांडार विभाग माझ्याकडेच आहे, भांडार विभागप्रमुख श्री. जाधव यांनी माझ्याकडे प्रस्ताव आणला होता त्यावर मी हा खर्च मागच्यावर्षीचा आहे तो पाठविता येणार नाही असे सांगितले होते. परंतु मा. महापौर महोदया यांनी सदर प्रस्ताव स्थायी समितीपुढे पाठविणेस सांगितले म्हणून चर्चा करून प्रस्ताव स्थायी समितीपुढे आणला आहे. सदरचे काम झालेले आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—** हो, काम झालेले आहे परंतु सदरचा प्रस्ताव मंजूरीसाठी तीन महिन्यांत आणला पाहिजे होता ना.

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—** याअनुषंगाने मी भांडार विभागास आणखी एक गोष्ट सांगतो की, आम्हाला डाय—या डिसेंबरच्याआधी मिळाल्या पाहिजेत. डाय—या जानेवारीच्या १ तारखेला चालणार नाहीत. आता पाच महिने तुम्हाला आहेत, पाच महिन्यांत जर डाय—यासारखी वस्तू झाली नाही तर मग पहा, दिवाळी ग्रिटींग्जपण दिले जातात जसे मा. महापौर, उपमहापौर, त्याचीपण काही हालचाल दिसत नाही. ब—याच गोष्टी ढिल्या चाललेल्या आहेत, याबाबत आम्ही बोलणे योग्य नाही, प्रशासनाचे काम आता जसे नियमात अडकले आहे तीन महिन्याच्या आंत प्रस्ताव कार्योत्तर मंजूरीला आणणे आवश्यक होते. परंतु तसे झाले नाही. महोदया, यावर्षीच्या डाय—या मिळाल्याच नाहीत, जर पुढच्यावर्षी डाय—या मिळाल्या नाहीत

सन २०१६ पर्यंत जे टेंडर संपले आहेत ते सगळे विषय स्थायी समितीपुढे आले पाहिजेत.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भूल्लर :—** सचिव महोदया यांनी सांगावे सदर विषय पारीत करता येईल का?

**महापालिका सचिव :—** यापुर्वी स्थायी समितीने कार्योत्तर मंजुरी अनेक प्रस्तावांना दिली आहे. नियमात कार्योत्तर मंजुरी विषयी काही लिहिले नाही. माहितीसाठी आले पाहिजे.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भूल्लर :—** स्थायी समिती चुकीचे करेल त्यात तुम्ही सहभागी व्हाल का?

**महापालिका सचिव :—** तुम्ही प्रशासनाला निर्देश दया ना. गोषवारे नियम पाहुन आणावेत. संबंधीत विभागाने नियमानुसार सदर विषय माहितीसाठी आणायला हवा होता. १५ दिवसाच्या आत नियमान्वये गोषवारे सादर केले पाहिजेत.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भूल्लर :—** कायदयात काय लिहिले आहे. श्री. पाटील साहेब तुम्ही सांगा.

**श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी :—**तीन महिन्याच्या आत.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—** दोन महिने अधिकारी नाही म्हणुन संचिका फिरत होती, त्यानंतरसुध्दा सदर प्रस्ताव मे महिन्यामध्ये, जुन महिन्यामध्ये, जुलै महिन्यामध्ये आणायला हवा होता. सदर विषय दिनांक ४/४/२०१५ रोजीपासुन तसाच पडून आहे. तीन महिन्यानंतर एक महिना लेखा विभागात पडून होता त्यानंतर तरी तो प्रस्ताव सभेपुढे यायला हवा होता तेसुध्दा नाही. सदर प्रस्तावावर सर्वांची मान्यता झाली असतानादेखील सदर प्रस्ताव सभेपुढे आला नाही. ज्यांनी काम केले आहे त्यांना पर्वा नाही मग आम्ही का उशीरा हा प्रस्ताव पारीत करायचा.

**महापालिका सचिव :—** कायदयात तीन महिन्याची तरतुद आहे असे काही दिसून येत नाही, स्थायी समितीने ठरवा, सदर विषय पारीत करावयाचा किंवा नाही ते सर्वानुमते सांगा.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—** सदर विषय अमान्य करण्यात यावा. माझा विरोध आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भूल्लर :—** सदर विषय अमान्य करण्यात यावा.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—** आपण सर्व सदस्यांना विचारा, मतदान घ्या, माझा विरोध असेल.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भूल्लर :—** सदर प्रस्ताव तीन महिन्यात आणायला हवा होता, परंतु तो सात महिन्यानंतर आणला गेला आहे व ते नियमानुसार नसल्याने अमान्य करण्यात यावा. ठरावात नमुद करावे. नियमात बसत नाही.

**काही सदस्य :—** सदर विषय अमान्य करण्यात यावा.

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—** सदरचा विषय सर्वानुमते अमान्य करण्यात येत आहे. सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ४ :—** महापौर फंडातून दिवाळी बाजार आनंद मेळाव्यास उभारण्यात आलेल्या स्टॉलसाठी झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी देणे

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका महापौर फंडातून दिवाळी बाजार आनंद मेळाव्याचे आयोजन करणेकामी मा. महापौर यांनी दि. ०७/१०/२०१५ रोजीच्या पत्रान्वये मान्यता दिल्यानुसार दि. ०२/११/२०१५ ते ०६/११/२०१५ या कालावधीत बचत गटातील महिलांना स्वयंरोजगार उपलब्ध व्हावा व त्यांनी तयार केलेल्या गृहपयोगी वस्तूंची विक्री होणेसाठी दशहरा मैदान, उल्हासनगर —५ येथे दिवाळी बाजार आनंद मेळाव्याचे आयोजन करणेत आले होते. सदर कार्यक्रमासाठी वापरण्यात आलेल्या साहित्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | साहित्याचा तपशिल | संख्या | रू. प्रती नग | एकूण किंमत |
|---|---|---|---|---|
| ०१ | ६×८ साईजचे बांबुचे स्टॉल उभारणे, तीन बाजुंना कापडी बंदीस्त करणे, व पावसाच्या | ६० नग | ६६५ रू. प्रती दिवस | १,९९,५००/— |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | संरक्षणासाठी वर पत्रे टाकणे (भाडयाने) | ०५ दिवस | | |
| एकूण | | | | १,९९,५००/— |

सदरचा कार्यक्रम पार पाडणेकरीता भांडार विभागाकडे कालावधी खुपच कमी असल्याने मा. महापौर यांचे मार्फत सदर कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आलेले होते. सदर कार्यक्रमाबाबत भांडार विभागामार्फत नियंत्रण ठेवण्यात आलेले नव्हते. व दिवाळी बाजाराचे आयोजन केलेल्या ठिकाणी सदर साहित्य हे खाजगी पुरवठादारांमार्फत पुरविण्यात आलेले आहे.

सद्यस्थितीत दिवाळी बाजार आनंद मेळावा कार्यक्रम पूर्ण झालेला असून त्याबाबत आता दरपत्रके काढल्यास लेखा परिक्षणामध्ये आक्षेप घेतला जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्यानुषंगाने दिवाळी बाजार आनंद मेळावा करीता साहित्य पुरवठादार मे. मोहित एंटरप्रायझेस यांचे मार्फत वारंवार विचारणा होत असल्याने सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या पटलावर कार्योत्तर मंजूरीसाठी सविनय सादर.

स्थायी समिती ठराव क्र.३७ — दिनांकः— २८/७/२०१६

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार दिवाळी बाजार आनंद मेळावा करीता साहित्य पुरवठादार मे. मोहित एंटरप्रायझेस यांचे मार्फत उभारण्यात आलेल्या स्टॉलसाठी झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरीचा प्रस्ताव अमान्य करीत आहे.

**कारण**

नियमात बसत नाही.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ५ :—** महापौर फंडातून दिवाळी बाजार आनंद मेळाव्यास व्हिडीओ कॅमेरा, फायर एस्टीग्वीशर,स्टेज, खुर्च्या, बिसलरी पाण्याच्या बाटल्या व पाण्याचे कॅन इत्यादीसाठी झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी देणे

---

<u>काही सदस्य :—</u> सदर विषय अमान्य करण्यात यावा.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u> सदरचा विषय सर्वानुमते अमान्य करण्यात येत आहे. सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ५ :—** महापौर फंडातून दिवाळी बाजार आनंद मेळाव्यास व्हिडीओ कॅमेरा, फायर एस्टीग्वीशर,स्टेज, खुर्च्या, बिसलरी पाण्याच्या बाटल्या व पाण्याचे कॅन इत्यादीसाठी झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी देणे

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिका महापौर फंडातून दिवाळी बाजार आनंद मेळाव्याचे आयोजन करणेकामी मा. महापौर यांनी दि. ०७/१०/२०१५ रोजीच्या पत्रान्वये मान्यता दिल्यानुसार दि. ०२/११/२०१५ ते ०६/११/२०१५ या कालावधीत बचत गटातील महिलांना स्वयंराजगार उपलब्ध व्हावा व त्यांनी तयार केलेल्या गृहपयोगी वस्तूंची विक्री होणेसाठी दशहरा मैदान, उल्हासनगर —५ येथे दिवाळी बाजार आनंद मेळाव्याचे आयोजन करणेत आले होते. सदर कार्यक्रमासाठी वापरण्यात आलेल्या साहित्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | साहित्याचा तपशिल | संख्या | रू. प्रती नग | एकूण किंमत |
|---|---|---|---|---|
| ०१ | १००० वॅट हॅलोजन फिटींग मेंटनन्ससह | ७५ नग<br>०५ दिवस | १८५ प्रती दिवस | ६९३७५/— |
| ०२ | दिवाळी बाजार बॅनर | ४००० sq ft | १५ रू. sq ft | ६०,०००/— |
| ०३ | नास्टा पॅकेट | १००० नग | ६० रू. प्रती नग | ६०,०००/— |
| ०४ | चहा | १००० नग | १० रू. | १०,०००/— |
| एकूण | | | | १,९९,३७५/— |

सदरचा कार्यक्रम पार पाडणेकरीता भांडार विभागाकडे कालावधी खुपच कमी असल्याने मा. महापौर यांचे मार्फत सदर कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आलेले होते. सदर कार्यक्रमाबाबत भांडार विभागामार्फत नियंत्रण ठेवण्यात आलेले नव्हते. व दिवाळी बाजाराचे आयोजन केलेल्या ठिकाणी सदर साहित्य हे खाजगी पुरवठादारांमार्फत पुरविण्यात आलेले आहे.

सद्यस्थितीत दिवाळी बाजार आनंद मेळावा कार्यक्रम पूर्ण झालेला असून त्याबाबत आता दरपत्रके काढल्यास लेखा परिक्षणामध्ये आक्षेप घेतला जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्यानुषंगाने दिवाळी बाजार आनंद मेळावा करीता साहित्य पुरवठादार मे. मोहित एंटरप्रायझेस यांचे मार्फत वारंवार विचारणा होत असल्याने सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या पटलावर कार्योत्तर मंजूरीसाठी सविनय सादर.

स्थायी समिती ठराव क्र. ३८ दिनांकः—२८/७/२०१६

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार महापौर फंडातून दिवाळी बाजार आनंद मेळाव्यास व्हिडीओ कॅमेरा, फायर एस्टीग्वीशर, स्टेज, खुर्च्या, बिसलरी पाण्याच्या बाटल्या व पाण्याचे कॅन इत्यादी साहित्य पुरवठादार मे. मोहित एंटरप्रायझेस यांचे मार्फत झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरीचा प्रस्ताव अमान्य करीत आहे.

कारण
नियमात बसत नाही.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ६ :—** महापौर फंडातून दिवाळी बाजार आनंद मेळाव्यास १००० वॅटचे हॅलोजन, दिवाळी बाजार बॅनर्स, नाश्ता पॅकेट व चहा इत्यादीसाठी झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी देणे

---

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:— सदरचा विषय सर्वानुमते अमान्य करण्यात येत आहे.

काही सदस्य :— सदर विषय अमान्य करण्यात यावा.

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

**विषय क्र. ६ :—** महापौर फंडातून दिवाळी बाजार आनंद मेळाव्यास १००० वॅटचे हॅलोजन, दिवाळी बाजार बॅनर्स, नाश्ता पॅकेट व चहा इत्यादीसाठी झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी देणे

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिका महापौर फंडातून दिवाळी बाजार आनंद मेळाव्याचे आयोजन करणेकामी मा. महापौर यांनी दि. ०७/१०/२०१५ रोजीच्या पत्रान्वये मान्यता दिल्यानुसार दि. ०२/११/२०१५ ते ०६/११/२०१५ या कालावधीत बचत गटातील महिलांना स्वयंराजगार उपलब्ध व्हावा व त्यांनी तयार केलेल्या गृहपयोगी वस्तूंची विक्री होणेसाठी दशहरा मैदान, उल्हासनगर —५ येथे दिवाळी बाजार आनंद मेळाव्याचे आयोजन करणेत आले होते. सदर कार्यक्रमासाठी वापरण्यात आलेल्या साहित्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | साहित्याचा तपशिल | संख्या | रू. प्रती नग | एकूण किंमत |
|---|---|---|---|---|
| ०१ | १००० वॅट हॅलोजन फिटींग मेंटनन्ससह | ७५ नग<br>०५ दिवस | १८५ प्रती दिवस | ६९३७५/— |
| ०२ | दिवाळी बाजार बॅनर | ४००० sq ft | १५ रू. sq ft | ६०,०००/— |
| ०३ | नास्टा पॅकेट | १००० नग | ६० रू. प्रती नग | ६०,०००/— |
| ०४ | च्हा | १००० नग | १० रू. | १०,०००/— |
| | एकूण | | | १,९९,३७५/— |

सदरचा कार्यक्रम पार पाडणेकरीता भांडार विभागाकडे कालावधी खुपच कमी असल्याने मा. महापौर यांचे मार्फत सदर कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आलेले होते. सदर कार्यक्रमाबाबत भांडार विभागामार्फत नियंत्रण ठेवण्यात आलेले नव्हते. व दिवाळी बाजाराचे आयोजन केलेल्या ठिकाणी सदर साहित्य हे खाजगी पुरवठादारांमार्फत पुरविण्यात आलेले आहे.

सद्यस्थितीत दिवाळी बाजार आनंद मेळावा कार्यक्रम पूर्ण झालेला असून त्याबाबत आता दरपत्रके काढल्यास लेखा परिक्षणामध्ये आक्षेप घेतला जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्यानुषंगाने दिवाळी बाजार आनंद मेळावा करीता साहित्य पुरवठादार मे. मोहित एंटरप्रायझेस यांचे मार्फत वारंवार विचारणा होत असल्याने सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या पटलावर कार्योत्तर मंजूरीसाठी सविनय सादर.

स्थायी समिती ठराव क्र. ३९ दिनांक:— २८/७/२०१६

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार महापौर फंडातून दिवाळी बाजार आनंद मेळाव्यास १००० वॅटचे हॅलोजन, दिवाळी बाजार बॅनर्स, नाश्ता पॅकेट व चहा इत्यादी साहित्य पुरवठादार मे. मोहित एंटरप्रायझेस यांचे मार्फत झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरीचा प्रस्ताव अमान्य करीत आहे.

**कारण**

नियमात बसत नाही.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

———————————————————————————————————

**विषय क्र. ७ :—** महापौर फंडातून दिवाळी बाजार आनंद मेळाव्यास जनरेटर सेट, टयुब लाईट, फाउंटन, पॅम्पलेट इत्यादीसाठी झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी देणे.

———————————————————————————————————

**काही सदस्य :—** सदर विषय अमान्य करण्यात यावा.

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—** सदरचा विषय सर्वानुमते अमान्य करण्यात येत आहे. सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ७ :—** महापौर फंडातून दिवाळी बाजार आनंद मेळाव्यास जनरेटर सेट, टयुब लाईट, फाउंटन, पॅम्पलेट इत्यादीसाठी झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी देणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका महापौर फंडातून दिवाळी बाजार आनंद मेळाव्याचे आयोजन करणेकामी मा. महापौर यांनी दि. ०७/१०/२०१५ रोजीच्या पत्रान्वये मान्यता दिल्यानुसार दि. ०२/११/२०१५ ते ०६/११/२०१५ या कालावधीत बचत गटातील महिलांना स्वयंराजगार उपलब्ध व्हावा व त्यांनी तयार केलेल्या गृहपयोगी वस्तूंची विक्री होणेसाठी दशहरा मैदान, उल्हासनगर —५ येथे दिवाळी बाजार आनंद मेळाव्याचे आयोजन करणेत आले होते. सदर कार्यक्रमासाठी वापरण्यात आलेल्या साहित्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | साहित्याचा तपशिल | संख्या | रू. प्रती नग | एकूण किंमत |
|---|---|---|---|---|
| ०१ | जनरेटर सेट (भाडे तत्वावर) | ०१ नग<br>०७ दिवस | १८००० प्रती दिन | १,२६,०००/— |
| ०२ | टयुब लाईट फिटींग मेंटनन्ससह | १३० नग<br>०५ दिवस | ४० प्रती दिन | २६०००/— |
| ०३ | फाऊंटन १०×१० | ०५ दिवस | ५००० प्रती दिन | २५०००/— |
| ०४ | पॅम्प्लेट | ३०००० नग | ०.७५ पै. प्रती नग | २२५००/— |
| एकूण | | | | १,९९,५००/— |

सदरचा कार्यक्रम पार पाडणेकरीता भांडार विभागाकडे कालावधी खुपच कमी असल्याने मा. महापौर यांचे मार्फत सदर कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आलेले होते. सदर कार्यक्रमाबाबत भांडार विभागामार्फत नियंत्रण ठेवण्यात आलेले नव्हते. व दिवाळी बाजाराचे आयोजन केलेल्या ठिकाणी सदर साहित्य हे खाजगी पुरवठादारांमार्फत पुरविण्यात आलेले आहे.

सद्यस्थितीत दिवाळी बाजार आनंद मेळावा कार्यक्रम पूर्ण झालेला असून त्याबाबत आता दरपत्रके काढल्यास लेखा परिक्षणामध्ये आक्षेप घेतला जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्यानुषंगाने दिवाळी बाजार आनंद मेळावा करीता साहित्य पुरवठादार मे. मोहित एंटरप्रायझेस यांचे मार्फत वारंवार विचारणा होत असल्याने सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या पटलावर कार्योत्तर मंजूरीसाठी सविनय सादर.

स्थायी समिती ठराव क्र. ४० दिनांकः— २८/७/२०१६

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार महापौर फंडातून दिवाळी बाजार आनंद मेळाव्यास जनरेटर सेट, टयुब लाईट, फाउंटन, पॅम्पलेट इत्यादी साहित्य पुरवठादार मे. मोहित एंटरप्रायझेस यांचे मार्फत झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरीचा प्रस्ताव अमान्य करीत आहे.

**कारण**

नियमात बसत नाही.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. ८ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ८ :–** महापौर फंडातून दिवाळी बाजार आनंद मेळाव्यास पाण्याचे बॅरल, धुम्रपान निषेध फलक, डि.जे. सिस्टीम, निमंत्रण पत्रिका, मल्टीकलर प्रमाणपत्र, शाल, नारळ, बुके, दिवाळी बाजारचे फोटो व कारपेट इत्यादीसाठी झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी देणे.

---

<u>काही सदस्य :–</u> सदर विषय अमान्य करण्यात यावा.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u> सदरचा विषय सर्वानुमते अमान्य करण्यात येत आहे.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ८ :–** महापौर फंडातून दिवाळी बाजार आनंद मेळाव्यास पाण्याचे बॅरल, धुम्रपान निषेध फलक, डि.जे. सिस्टीम, निमंत्रण पत्रिका, मल्टीकलर प्रमाणपत्र, शाल, नारळ, बुके, दिवाळी बाजारचे फोटो व कारपेट इत्यादीसाठी झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी देणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिका महापौर फंडातून दिवाळी बाजार आनंद मेळाव्याचे आयोजन करणेकामी मा. महापौर यांनी दि. ०७/१०/२०१५ रोजीच्या पत्रान्वये मान्यता दिल्यानुसार दि. ०२/११/२०१५ ते ०६/११/२०१५ या कालावधीत बचत गटातील महिलांना स्वयंराजगार उपलब्ध व्हावा व त्यांनी तयार केलेल्या गृहपयोगी वस्तूंची विक्री होणेसाठी दशहरा मैदान, उल्हासनगर –५ येथे दिवाळी बाजार आनंद मेळाव्याचे आयोजन करणेत आले होते. सदर कार्यक्रमासाठी वापरण्यात आलेल्या साहित्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | साहित्याचा तपशिल | संख्या | रू. प्रती नग | एकूण किंमत |
|---|---|---|---|---|
| ०१ | पाण्याचे बॅरल (२०० लिटर) | १० नग<br>०५ दिवस | १५० प्रती नग | ७५००/– |
| ०२ | धुम्रपान निषेधचे फलक | ६० नग | ५० रू. प्रती नग | ३०००/– |
| ०३ | डि. जे. सिस्टम ०५ दिवस (भाडेतत्वावर) | ०१ नग | ९००० प्रती दिवस | ४५०००/– |
| ०४ | निमंत्रण पत्रीका | २०० नग | १० रू. प्रती नग | २०००/– |
| ०५ | मल्टीकलर प्रमाणपत्र | ६०० नग | २५रू. प्रती नग | १५०००/– |
| ०६ | शॉल | ५० नग | २००रू. प्रती नग | १०,०००/– |
| ०७ | नारळ | ५० नग | ३०रू. प्रती नग | १५००/– |
| ०८ | बुके | ५० नग | ३००रू. प्रती नग | १५०००/– |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०९ | दिवाळी बाजाराचे फोटो | २५० फोटो | ४० रू. प्रती नग | १०,०००/— |
| १० | कारपेट | ६००० स्क्वे. फुट | ३ रू. स्क्वे. फुट | ९०,०००/— |
| एकूण | | | | १,९९,०००/— |

सदरचा कार्यक्रम पार पाडणेकरीता भांडार विभागाकडे कालावधी खुपच कमी असल्याने मा. महापौर यांचे मार्फत सदर कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आलेले होते. सदर कार्यक्रमाबाबत भांडार विभागामार्फत नियंत्रण ठेवण्यात आलेले नव्हते. व दिवाळी बाजाराचे आयोजन केलेल्या ठिकाणी सदर साहित्य हे खाजगी पुरवठादारांमार्फत पुरविण्यात आलेले आहे.

सद्यस्थितीत दिवाळी बाजार आनंद मेळावा कार्यक्रम पूर्ण झालेला असून त्याबाबत आता दरपत्रके काढल्यास लेखा परिक्षणामध्ये आक्षेप घेतला जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्यानुषंगाने दिवाळी बाजार आनंद मेळावा करीता साहित्य पुरवठादार मे. अमरज्योत एंटरप्रायझेस यांचे मार्फत वारंवार विचारणा होत असल्याने सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या पटलावर कार्योत्तर मंजूरीसाठी सविनय सादर

स्थायी समिती ठराव क्र. ४१ दिनांकः— २८/७/२०१६

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार महापौर फंडातून दिवाळी बाजार आनंद मेळाव्यास पाण्याचे बॅरल, धुम्रपान निषेध फलक, डि.जे. सिस्टीम, निमंत्रण पत्रिका, मल्टीकलर प्रमाणपत्र, शाल, नारळ, बुके, दिवाळी बाजारचे फोटो व कारपेट इत्यादी साहित्य पुरवठादार मे. मोहित एंटरप्रायझेस यांचे मार्फत झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरीचा प्रस्ताव अमान्य करीत आहे.

**कारण**

नियमात बसत नाही.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ९ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ९ :—** कल्याण अंबरनाथ रस्त्यावर बाधीत होणारी बांधकामे निष्कासीत करतांना पोलीस कर्मचारी व मनपा कर्मचारी यांचे अल्पोपहाराची व भोजनाची व्यवस्था करण्याच्या प्रस्तावास कार्योत्तर मंजूरी देणे.

---

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भूल्लर :—** सदर विषयाची माहिती कोण देणार?

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—** सदर विषय अमान्य करण्यात येत आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भूल्लर :—**सदर विषयदेखील नियमानुसार नसल्याने अमान्य करण्यात यावा.

**काही सदस्य :—** सदर विषय अमान्य करण्यात यावा.

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ९ :—** कल्याण अंबरनाथ रस्त्यावर बाधीत होणारी बांधकामे निष्कासीत करतांना पोलीस कर्मचारी व मनपा कर्मचारी यांचे अल्पोपहाराची व भोजनाची व्यवस्था करण्याच्या प्रस्तावास कार्योत्तर मंजूरी देणे.

**प्रस्तावना**

उपरोक्त विषयान्वये सादर करण्यात येते की राज्य मार्ग क्र. ३५ च्या रूंदीकरणासाठी उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील अतिक्रमणे काढणेबाबत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने महापालिकेस कळविले होते. कल्याण—अंबरनाथ रस्त्याच्या रूंदीकरणाची १०० फुटांची मर्यादा प्राप्म करण्यासाठी डाव्या बाजुकडील ४५० व रस्त्याच्या उजव्या बाजुकडील ३६१ अशी एकूण ८२१ बांधकामे बाधीत झालेली आहेत.

या संदर्भात मा. आयुक्त यांनी आढावा बैठक आयोजीत करून सदर बैठकीमध्ये सदर रस्ता १०० फुट रूंद करून बाधित होणारी बांधकामे हटविण्याचा निर्णय घेण्यात आला.

सदर रस्ता रूंदीकरणाचे काम करतांना महापालिका कर्मचारी तसेच पोलीस कर्मचारी यांना चहापान, अल्पोपहार व भोजनाची व्यवस्था करणे आवश्यक असल्याने रस्ता रूंदीकरणासाठी महापालिकेचे सुमारे २५० कर्मचारी व २५० पोलीस कर्मचारी एवढी संख्या होती. त्यांचेसाठी सकाळी अल्पोपहार व चहा, दुपारी जेवण व सायंकाळचा चहा व पाण्याचे ग्लास अशी व्यवस्था खाजगी पुरवठादार मे. मोहित एंटरप्रायझेस यांचेकडून करण्यात आलेली होती. रस्ता रूंदीकरणाचे काम दिनांक ०४/१२/२०१५ पासून सरू करण्यात आले होते. सुटट्ीचा कालावधी वगळता सदरची कार्यवाही १० दिवस चालू होती. यासाठी खालीलप्रमाणे खर्च झालेला आहे.

| अ.क्र. | तपशिल | दर प्रती नग | प्रतिदिन झालेला खर्च | एकूण खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | अल्पोपहार | ४० रू. | २०,०००/— | २,००,०००/— |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | भोजन | ६५ रू. | ३२५००/— | ३,२५,०००/— |
| ३ | चहा | १० रू. | १०,०००/— | १,००,०००/— |
| ४ | पाणी ग्लास | ०३ रू. | ३०००/— | ३०,०००/— |
| | एकूण | | | ६,५५,०००/— |

सन २०१५—१६ च्या अर्थसंकल्पामध्ये इ. संकिर्ण (२२) या लेखा शिर्षाखाली रू. ५० लक्ष एवढी तरतुद उपलब्ध असून सद्यस्थितीत सदर लेखा शिर्षाखाली रू. २४ लक्ष एवढी तरतुद शिल्लक आहे. तरी सदरचे काम अतितातडीचे असल्याने निविदा न मागविता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ५ चे कलम (२) (२) अन्वये मे. मोहित एंटरप्रायझेस यांचेशी थेट संविदा करून काम पार पाडणेकामी मा. अतिरिक्त आयुक्त यांची मान्यता घेण्यात आलेली होती. सबब, कार्योत्तर मंजुरी मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या पटलावर मान्यतेसाठी सविनय सादर.

स्थायी समिती ठराव क्र. ४२ दिनांक:— २८/७/२०१६

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार कल्याण अंबरनाथ रस्त्यावर बाधीत होणारी बांधकामे निष्कासीत करतांना पोलीस कर्मचारी व मनपा कर्मचारी यांचे अल्पोपहाराची व भोजनाची व्यवस्था करणेकामी पुरवठादार मे. मोहित एंटरप्रायझेस यांचेमार्फत झालेल्या खर्चाच्या प्रस्तावास कार्योत्तर मंजुरीचा प्रस्ताव अमान्य करीत आहे.

**कारण**

नियमात बसत नाही.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. १० वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १०** :— महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाचे कलम १५२ अन्वये करपात्र मालमत्ता क्र. 10AO 007660500 व मालमत्ता क्र.10AO 007660600 या दोन्ही मिळकत रद्द करुन स्थायी समितीची मंजूरी मिळेपर्यंतची विलंब शास्तीसहची थकीत रक्कम निर्लेखित करणे.

---

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :–</u> सदर विषय काय आहे.

<u>प्र. कर निर्धारक व संकलक, श्री. शैलेश दोंदे :–</u> सदर मालमत्ता रस्ता रूंदीकरणामध्ये बाधीत झाल्या आहेत. त्यामुळे सदर मिळकत रदद् करावयाच्या आहेत.

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १०** :– महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाचे कलम १५२ अन्वये करपात्र मालमत्ता क्र. 10AO 007660500 व मालमत्ता क्र.10AO 007660600 या दोन्ही मिळकत रद्द करुन स्थायी समितीची मंजूरी मिळेपर्यंतची विलंब शास्तीसहची थकीत रक्कम निर्लेखित करणे.

<u>प्रस्तावना</u>

१) उपरोक्त विषयास अनुसरण सादर करण्यात येते की श्री.मिलींद नाना बागुल रा. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर चोपडा कोर्ट उल्हासनगर – ३. यांनी दि.७/११/२०१५ रोजीच्या अर्जान्वये महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत करपात्र मालमत्ता क्र. 10AO 007660500 व मालमत्ता क्र. 10AO 007660600 चे आकारणी विरूद्ध हरकत दाखल केली आहे.

२) उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत संदर्भित मिळकतीकरिता नमुद असलेल्या करपात्र बाबीचा तपशिल पुढीलप्रमाणे श्रीम पुष्पा.मिलींद बागुल मालमत्ता क्र. 10AO 007660500

| बांधकाम प्रकार | वापर | करयोग्य मुल्यासाठीचे दर | वार्षीक भाडे | एकुण क्षेत्र | करमाफ क्षेत्र | करपात्र क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|
| yQkVs | निवासी | १एप्रील ९६ | – | 200 pkS फुट | – | 200 pkS फुट |

३) श्री.मिलींद नाना बागुल मालमत्ता क्र. 10AO 007660600

| बांधकाम प्रकार | वापर | करयोग्य मुल्यासाठीचे दर | वार्षीक भाडे | एकुण क्षेत्र | करमाफ क्षेत्र | करपात्र क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|
| yQkVs | निवासी | १एप्रील ९६ | – | 200 pkS फुट | – | 200 pkS फुट |

४) मालमत्ता क्र. 10AO 007660500 या मिळकतीकरीता वर्श 2015 &2016 करीता थकीत व चालु मागणीसह आकारण्यात आलेला मालमत्ता कर रक्कम रू.७,५२८ /– विलंब षास्ती/– ही रककम थकीत आहे.

५) मालमत्ता क्र. 10AO 007660600 या मिळकतीकरीता वर्श २०१५ –२०१६ करीता थकीत व चालु मागणीसह आकारण्यात आलेला मालमत्ता कर रक्कम रू.७,६१३ /– विलंब षास्ती/– ही रककम थकीत आहे.

६) दिनांक ५/२/२०१६ रोजी दोन्ही मिळकतीची कर निरीक्षक यांनी सदर जागेची प्रत्यक्ष पहाणी केली असता व महासभा ठराव कं ७८ दिं २०/३/२०१५ अन्वये या दोन्ही मिळकत वर्ष २००४—२००५ पासुन रस्ता रुंदीकरणात निष्कासीत झालेने दोन्ही मिळकतीचा कर माफ केले जावे तसेच यापुढे त्यांचे देयक निरंक ठेवुन दोन्ही मिळकतीचे खाते नियमीत सुरु ठेवणे तसेच त्यांच्या मालकी हक्कास कुठेही बाधा येणार नाही दक्षता घेणे तसेच दोन्ही मिळकतीची थकबाकी ही वर्ष २०१२—२०१३ पासुन रक्कम रू. १५,०५७/— अधिक विलंब शास्तीथकीत आहे. व दोन्ही मालमत्तेची स्थायी समितीची मंजूरी मिळेपर्यंतची विलंब शास्तीसहची थकीत रक्कम कलम १५२ अन्वये निर्लेखित करणेकरीता शिफारीस करणेत आली आहे.

७) उप कर निर्धारक व संकलक व प्र कर निर्धारक व संकलक यांनी कर निरीक्षकाच्या पाहणी अहवालानुसार वरीलप्रमाणे करणेकरीता शिफारीस केली आहे.

८) महासभा ठराव कं ७८ दिं २०/३/२०१५ अन्वये महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत करपात्र मालमत्ता क्र.10AO007660500 व मालमत्ता क्र.10AO007660600 या दोन्ही मिळकत वर्ष २००४—२००५ पासुन रस्ता रुंदीकरणात निष्कासीत झालेने दोन्ही मिळकतीचा कर माफ केले जावे तसेच यापुढे त्यांचे देयक निरंक ठेवुन दोन्ही मिळकतीचे खाते नियमीत सुरु ठेवणे व दोन्ही मालमत्तेची स्थायी समितीची मंजूरी मिळेपर्यंतची विलंब शास्तीसहची थकीत रक्कम निर्लेखित करणे,अशी मागणी अर्जदाराने केलेली आहे. परंतु अर्जदाराची सदर मागणी नियमानुसार योग्य नाही.

९) महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियमचे कलम १५२ अन्वये करपात्र मालमत्ता क्र.10AO 007660500 व मालमत्ता क्र.10AO 007660600 या दोन्ही मिळकती रदद करुन दोन्ही मालमत्तेची स्थायी समितीची मंजूरी मिळेपर्यंतची विलंब शास्तीसहची थकीत रक्कम स्थायी समितीची मंजूरी मिळेपर्यंतची विलंब शास्तीसहची थकीत रक्कम वसुल न होण्याजोगे आहे असे इकडील मत आहे.

सबब महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियमचे कलम १५२ अन्वये करपात्र मालमत्ता क्र.10AO 007660500 व मालमत्ता क्र.10AO 007660600 या दोन्ही मिळकती रदद करुन दोन्ही मालमत्तेची स्थायी समितीची मंजूरी मिळेपर्यंतची विलंब शास्तीसहची थकीत रक्कम निर्लेखित करणेसाठी मा. स्थायी समितीच्या पटलावर निर्णयार्थ प्रस्तावित

<u>स्थायी समिती ठराव क्र. </u> ४३ <u>दिनांक:— २८/७/२०१६</u>

सुचकाचे नाव :— श्रीम. रेखा अशोक ठाकुर

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाचे कलम १५२ अन्वये करपात्र मालमत्ता क. 10AO 007660500 व मालमत्ता क्र.10AO 007660600 या दोन्ही मिळकत रद्द करुन स्थायी समितीची मंजूरी मिळेपर्यंतची विलंब शास्तीसहची थकीत रक्कम निर्लेखित करणेस मान्यता देत आहे.

सुचकाची <u>सही/—</u>

अनुमोदकाची <u>सही/—</u>

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ११ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ११ :—** दिनांक १०/०५/२०१६ ते ३१/०५/२०१६ या कालावधीतील अभय योजना अंतर्गत केलेल्या कार्यवाहीच्या अहवालास मंजुरी देणे.

---

**महापालिका सचिव :—** सदर विषय पारीत करण्यात यावा का?

**काही सदस्य :—**पास—पास……

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ११ :—** दिनांक १०/०५/२०१६ ते ३१/०५/२०१६ या कालावधीतील अभय योजना अंतर्गत केलेल्या कार्यवाहीच्या अहवालास मंजुरी देणे.

**प्रस्तावना**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार उल्हासनगर महानगरपालिका हद्दीत अस्तित्वात असलेल्या मिळकतींवर मालमत्ता कर व पाणीपट्टी आकारणी करण्यात येत आहे. त्याअनुषंगाने कर वसुलीच्या दृष्टीने अधिनियमाचे अनुसूची ड चे प्रकरण ८ (कराधान नियम) मधील नियम ५१ अन्वये आयुक्तास प्राप्त झालेल्या अधिकारानुसार तसेच महासभा ठराव क्र. महासभा ठराव क्र. ७६, दिनांक १९/०३/२०१६ नुसार दिनांक १०/०५/२०१६ ते ३१/०५/२०१६ या कालावधीत ''अभय योजना'' लागु करण्यात आली होती. त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| कालावधी | मागणीचा तपशिल | विलंब शास्ती माफीचा तपशिल |
|---|---|---|
| दिनांक १०/०५/२०१६ ते दिनांक ३१/०५/२०१६ | थकबाकीसह वर्ष २०१६—२०१७ या चालु आर्थिक वर्षातील कराची संपुर्ण रक्कम व अधिक २५ टक्के शास्तीची रक्कम एकरक्कमी भरणा केल्यास | ७५ टक्के विलंब शास्ती माफ (थकबाकीसह चालु रक्कमेंवर आकारण्यात आलेली शास्तीची रक्कम) |

२)सर्वप्रथम अभय योजनेच्या अनुषंगाने आवश्यक त्या सुधारणा संगणकप्रणालीत करण्यात आल्या.
३)नागरीकांना योजनेचा लाभ घेता यावा यासाठी जनजनागृती करणेसंदर्भात माहितीपट तयार करून त्याचे शहरात केबलद्वारे प्रसारण करण्यात आले. यासाठी रक्कम रू. १,९८,०००/— इतका खर्च झाला आहे.
४)शहरात मनपाचे वाहनाद्वारे ध्वनीक्षेपकामार्फत जाहीर आवाहन करण्यात आले.
५)हॅण्डबिल (रंगीत छपाई पेपरवर) छपाई करून स्थानिक वृत्तपत्र तसेच मनपा कर्मचा—यामार्फत त्याचे वाटप करण्यात आले. यासाठी रक्कम रू. ८३,०००/— इतका खर्च झाला आहे.
६)योजनेची माहिती देणेसंदर्भातील होर्डींग्ज शहरात विविध भागात लावण्यात आले आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र | साईज | ठिकाण | संख्या |
|---|---|---|---|
| १ | १८ ग २० | उल्हासनगर महानगरपालिका मुख्यालय, उल्हासनगर—३ (दोन प्रवेंशद्वार) (लोखंडी फ्रेमसह) | २ |
| २ | १८ ग २० | श्रीराम चौक, उल्हासनगर—४ (लोखंडी फ्रेमसह) | १ |
| ३ | १८ ग २० | चोपडा कोर्ट जवळ, उल्हासनगर—१ (लोखंडी फ्रेमसह) | १ |
| ४ | १८ ग २० | भगवंती नावानी स्टेज, गोल मैदान, प्रभाग समिती क्र. १ चे कार्यालय, उल्हासनगर—१ (लोखंडी फ्रेमसह) | १ |
| ५ | १८ ग २० | यात्री निवास, गोल मैदान, प्रभाग समिती क्र. २ चे कार्यालय, उल्हासनगर—२ | १ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | (लोखंडी फ्रेमसह) | |
| ६ | १८ ग २० | व्हि. टी. सी संकुल, गोल मैदान, प्रभाग समिती क्र. ३ चे कार्यालय, उल्हासनगर–३ (लोखंडी फ्रेमसह) | १ |
| ७ | १८ ग २० | नेताजी गार्डन, गोल मैदान, प्रभाग समिती क्र. ४ चे कार्यालय, उल्हासनगर–४ (लोखंडी फ्रेमसह) | १ |
| ८ | १८ ग २० | कैलास कॉलनी, उल्हासनगर–५ (लोखंडी फ्रेमसह) | १ |
| ९ | १८ ग २० | उल्हासनगर स्टेशन, उल्हासनगर–४ (लोखंडी फ्रेमसह) | १ |

होर्डीग्ज छपाई करून वरील ठिकाणी प्रसिध्द्वीसाठी रक्कम रू. १,९६,०००/– इतका खर्च झाला आहे.
७)योजने संदर्भातील बॅनर्स छपाई करून शहरात विविध भागात व कर विभागातील वाहनांवर लावण्यात आले आहेत. तसेच वर्तमानपत्र व रॅली दरम्यान हॅण्डबिल वाटप करण्यात आले आहेत. यासाठी रक्कम रू. १,९६,०००/– इतका खर्च झाला आहे.

८)फलश्रुती:– अभय योजने अंतर्गत वसुली

| लाभार्थी संख्या | कर वसुलीची रक्कम | शास्ती माफ केलेली रक्कम |
|---|---|---|
| २०५४ | ७,२७,९५,१२१ | ८५,६८,४६७ |

सदरचा अहवाल स्थायी समिती पटलावर मंजुरीकरीता सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ४४ दिनांक:– २८/७/२०१६

सुचकाचे नाव :– श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार दिनांक १०/०५/२०१६ ते ३१/०५/२०१६ या कालावधीतील अभय योजना अंतर्गत केलेल्या कार्यवाहीच्या अहवालास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. १२ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १२ :–** उल्हासनगर महानगरपालिकेच्या वाहन विभागाअंतर्गत फेर ई निविदा प्रक्रियाद्वारे सिव्हरेज संक्शन व जेटींग मशिन या वाहनांवर वाहनचालक,मदतनीस व किरकोळ दुरूस्ती इत्यादीकामी लघुत्तम दराचे निविदाकार मे. प्रकाश इंन्टरप्राझेस यांच्या निविदेस मान्यता देणे.

---

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भूल्लर :–** सदर कामाच्या निविदा मागविल्या आहेत ना.

**प्र. वाहन व्यवस्थापक, श्री. यशवंत सगळे:–** हो, निविदा प्रक्रीया केली आहे.

**महापालिका सचिव :–** सदर विषय पारीत करण्यात यावा का?

**काही सदस्य :–**पास–पास......

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १२ :–** उल्हासनगर महानगरपालिकेच्या वाहन विभागाअंतर्गत फेर ई निविदा प्रक्रियाद्वारे सिव्हरेज संक्शन व जेटींग मशिन या वाहनांवर वाहनचालक,मदतनीस व किरकोळ दुरूस्ती इत्यादीकामी लघुत्तम दराचे निविदाकार मे.प्रकाश इंन्टरप्राझेस यांच्या निविदेस मान्यता देणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील भुयारी गटार योजना देखभाल दुरूस्ती अंतर्गत शहरातील ड्रेनेज चेंबरर्सचे चोकअप काढण्याचे काम वाहन क्र एम.एच ०५–२७६०,एम.एच ०५–एन ५३, एम.एच ०५–एन ७४, एम.एच ०५–एन २१६ या वाहनाद्वारे (एस.एल.सी.एम.)काम करण्यात येते. कामी लागणारा रू १९,७२,९२०/– हा खर्च सन २०१६–२०१७ याच्या लेखा शिर्षि CC(6) या मधुन खर्च करण्यात येणार आहे. सबब याकरीता सिव्हरेज संक्शन व जेटींग मशिन या वाहनांवर वाहनचालक, मदतनीस व किरकोळ दुरूस्ती करण्यासाठी फेर ई निविदा प्रक्रियाद्वारे या कामाकरिता २ लिफाफा पध्दतीने ठेकेदार/मक्तेदार यांचेकडून ई निविदा मागविण्यात आल्या असुन त्यांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्राकलनीय खर्च | रु. १९,७२,९२०/– |
| २ | निविदा प्रसिध्द केलेली वर्तमानपत्रे | १)दैनिक फ्रि प्रेस जनर्रल, २)दैनिक नवभारत, |
| ३ | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक ११/०३/२०१६ ते दिनांक १४/०३/२०१६ |
| ४ | निविदा विक्री कालावधी | दिनांक १५/०३/२०१६ ते दिनांक २९/०३/२०१६ |
| ५ | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक ३१/३/२०१६ ते दिनांक १/४/२०१६ |
| ६ | निविदेचा तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | दिनांक ५/०४/२०१६ ते दिनांक १२/०४/२०१६ |
| ७ | निविदेचा आर्थिक भाग उघडण्याचा दिनांक | दिनांक २२/०४/२०१६ ते दिनांक २९/०४/२०१६ |
| ८ | विक्री केलेल्या निविदांची संख्या | १ |

| ९ | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | १ |
|---|---|---|

दिनांक १२/०४/२०१६ रोजी निविदा क्र. ८७९ या फेर ई निविदाचा तांत्रिक भाग मा. अतिरिक्त आयुक्त सो., मा.मुख्य लेखा परिक्षक, मा. लेखा अधिकारी, मा. उप आयुक्त(वाहन), यांचे उपस्थितीत उल्हासनगर महानगरपालिकेच्या सिव्हरेज संक्शन व जेटींग मशिन या वाहनांवर वाहनचालक,मदतनीस व किरकोळ दुरूस्ती बाबतचे या कामाच्या निविदेचा भाग–१ लिफाफा उघडण्यात आला त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | निविदाकाराच्या निविदेमधील बाबी | मे.प्रकाश इंटरप्रायजेस |
|---|---|---|
| १ | EMD (Earnest money deposit) | होय |
| २ | संस्था नोंदणी प्रमाणपत्र | होय |
| ३ | आयकर पुनरागमन पडताळणी फॉम | होय |
| ४ | अनुभवाचा दाखला | होय |
| ५ | सेल्स टॅक्स नोंदणी प्रमाणपत्र | होय |
| ६ | Copy of Pan Card | होय |

सदर निविदेची वाहन व्यावस्थापक यांनी छाननी केली असता १) मे.प्रकाश इंटरप्राइजेस यांच्या निविदा अटी शर्तीनुसार असल्याने पात्र आहेत.

तरी उपरोक्त निविदाकांराच्या निविदाचा दुसरा भाग (आर्थिक) दिनांक २९/०४/२०१६ रोजी मा. अतिरिक्त आयुक्त सो, यांच्या अध्यक्षते खालील निवड समिती सदस्य मुख्य लेखापरिक्षक,मुख्य लेखाअधिकारी, उप आयुक्त (वाहन) यांचे उपस्थितीत उघडण्यात आला. त्याचा तपशिल दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | तपशील | निविदा रक्कम | **मे.प्रकाश इंटरप्राइजेस** |
|---|---|---|---|
| | | रू | दर रू. |
| 1 | Item No.1:-Providing Operator cum Driver & Cleaner cum Helper for SLCM vehicle & Suction Unit with Routine & preven tive maintenance with misc.material complete.<br>(For S.L.C.M. Vehicle No. MH-05 N-216, MH-05 N-74, MH-05 N-53, MH-05 2760, MH-05 2731.) | 1972920 /- | **2170212 /-** |
| 2 | Driver cum Machine Operator | | |
| 3 | Cleaner cum Helper | | |
| 4 | Maintenance for vehicles | | |
| 5 | वाढीव दर % | | **+ 10 %** |

वरील तुलनात्मक तक्त्यानुसार मे.प्रकाश इंटरप्राइजेस , यांनी वाहना संबंधी सादर केलेले दर हे न्युनतम आहेत. परंतु सदर निविदाकाराचे दर हे अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा १० % जास्त म्हणजेच २१,७०,२१२/– इतका होता. परंतु मा.अति आयुक्त सो. यांनी वाटाघाटी करण्यास आदेश दिले त्यानुसार जा.क्र उमपा /वाहन /२५/१६ दि ०२/५/२०१६ रोजीच्या पत्रान्वये मे.प्रकाश इंटरप्राइजेस यांना दि. ०३/५/२०१६ रोजी उपस्थित राहणे बाबत कळविण्यात आले.या वेळी मा अति आयुक्त यांच्या अध्यक्षते खालील निवड समिती सदस्य उपस्थित होते. वाटाघाटीमध्ये यांनी निविदामध्ये आहे त्या दरात काम करण्यात यावे असे आदेशीत केले त्यानुसार मे.प्रकाश इंटरप्राइजेस, चेंम्बुर हे रू १९,७२,९२०/—या दरात काम

करण्याची तयारी दर्शविली आहे. परंतु मा.आयुक्त सो., यानी दिनांक १४/६/२०१६ रोजी पुन्हा वाटाघाटी करण्यास आदेश दिले त्यानुसार जा.क्र उमपा /वाहन/४४/१६ दि. १४/६/२०१६ रोजीच्या पत्रान्वये मे. प्रकाश इंटरप्राइजेस यांना दि. १५/६/२०१६ रोजी उपस्थित राहणे बाबत कळविण्यात आले होते. बऱ्याच वाटाघाटीनंतर मे.प्रकाश इंटरप्राइजेस, चेंम्बुर यांनी निविदेच्या मागील वर्षाच्या दरात अंदाजीत रू १७,६६,८८०/—एवढया रक्कमेत काम करण्यास तयारी दर्शविली आहे.

यावरून असे दिसुन येते की, मे.प्रकाश इंटरप्राइजेस, चेंम्बुर हे निविदेच्या मागील वर्षाच्या दरात काम करण्यास तयार असुन या दरास मान्यता देणेसाठी सदर प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर सादर.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ४५</u> <u>दिनांकः—२८/७/२०१६</u>

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिकेच्या वाहन विभागाअंतर्गत फेर ई निविदा प्रक्रियाद्वारे सिव्हरेज संक्शन व जेटींग मशिन या वाहनांवर वाहनचालक,मदतनीस व किरकोळ दुरूस्ती इत्यादीकामी लघुत्तम दराचे निविदाकार मे.प्रकाश इंन्टरप्राझेस यांच्या निविदेस मान्यता देत आहे.

सुचकाची <u>सही/—</u>

अनुमोदकाची <u>सही/—</u>

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. १३ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १३ :—** उल्हासनगर महानगरपालिका मालकिचे प्रभाग क्र. ३७ मधील बॅ.नं २००५जवळ, उल्हासनगर—५ येथील महापालिकेने बांधलेले नविन शौचालय ''पैसे दया व वापरा'' या तत्वावर २० वर्ष कालावधीसाठी दलित वेल्फेअर सोसायटी, यांना देखभाल, दुरूस्ती करून चालविणेसाठी मान्यता मिळणे.

---

<u>सदस्या, श्रीम. अंजली साळवे:—</u> सदर शौचालये २० वर्ष कालावधीसाठी चालवायला दिली आहेत. ५ वर्षाकरीताच दयायला हवी होती. त्यामुळे ते चालविणा—यांची मक्तेदारी चालू असते.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:— </u>सदर शौचालये महानगरपालिकेने जरी बांधली आहेत, तर अशी शौचालये मोफत चालवायला पाहिजेत, महानगरपालिकेचे सफाई कामगार त्याची देखभाल करतात. आणि जे पैसे दया व वापरा या तत्वावर शौचालये चालवावयास दिली जातात त्यांची देखभाल दुरूस्ती संबंधित संस्थाच करतात, आणि त्या संस्था मी तुम्हाला एक नाही २० संस्था दाखवेन, बाजारपेठांमध्ये शौचालय बांधावयाचे झाल्यास यांच्यामध्ये स्पर्धा असते. आम्ही सदर शौचालये बांधून दयायची आणि पैसे दया व वापरा या तत्वावर चालवायलापण दयायची. तर मग हे शहराचे नुकसान आहे. आजपर्यंत असे झालेले नाही मी पहिल्यांदा हा विषय पाहत आहे.

<u>सदस्या, श्रीम. अंजली साळवे:— </u>काही संस्था मुंबईच्या आहेत.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:— </u>विषय तो नाही की, संस्था मुंबईच्या आहेत कि उल्हासनगरच्या, तर विषय असा आहे, हया शौचालयांना बांधले कोणी आहे.

<u>सदस्या, श्रीम. अंजली साळवे:— </u>शौचालये महानगरपालिकेने बांधली आहेत.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:— </u>सदर शौचालय महानगरपालिकेने बांधली आहेत तर ती नागरीकांना मोफत वापरास उपलब्ध करून दया ना. महापालिका त्याची देखभाल करेल. महानगरपालिकेचे शौचालय आहे. जर त्या संस्थेने शौचालय बांधले असते, किंवा बांधायला पैसा लावला असता, तर.......

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:— </u>मला वाटते हा विषय महासभेमध्ये यायला हवा. धोरणात्मक निर्णय होईल ना. प्रशासनाने विषय आणला आहे तर मग धोरणात्मक निर्णयासाठी जाऊ दया ना.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:— </u>सदर शौचालय बांधण्यासाठी महापालिकेने केलेला खर्च जर सदर संस्था देत असेल तर भलेही संस्थेस चालवायला दया. महापालिकेला झालेला खर्च रू. १० लाख महापालिकेस परत करावेत.

<u>काही सदस्य :—</u>सदर विषय अमान्य करण्यात येत आहे.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १३ :—** उल्हासनगर महानगरपालिका मालकिचे प्रभाग क्र. ३७ मधील बॅ.नं २००५जवळ, उल्हासनगर—५ येथील महापालिकेने बांधलेले नविन शौचालय ''पैसे दया व वापरा'' या तत्वावर २० वर्ष कालावधीसाठी दलित वेल्फेअर सोसायटी, यांना देखभाल, दुरूस्ती करून चालविणेसाठी मान्यता मिळणे.

<u>प्रस्तावना</u>

उप—अभियंता (साबांवि), प्रभाग समिती क्र. ४ यांचेकडील पत्र क्र. उमपा/साबांवि/उपअ/२०/२०१६, दि. २३/०२/२०१६ रोजीच्या पत्रान्वये प्रभाग क्र. ३७ मधील, बॅ.नं २००५ जवळ, उल्हासनगर— ५ येथील सार्वजनिक शौचालयाचे बांधकाम पूर्ण झालेले आहे. त्यानुसार सदर सार्वजनिक शौचालयाचा ताबा मालमत्ता विभागाकडे देण्यात आलेला आहे. तसेच

प्रभाग क्र. ३७ मधील, बॅ.नं २००५ जवळ, उल्हासनगर— ५ येथील सार्वजनिक शौचालय हे महापालिका निधीतुन बांधण्यात आलेले असुन सदर शौचालय बांधणेसाठी रू. १०,००,०००/— (दहा लाख रूपये मात्र) एवढा खर्च झालेला आहे.

महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्र. मुंसाशी—१०००/ स.क्र २४१/प्र.क्र १३/पा.पु २१, दिनांक ३०/०८/२००१ अन्वये सुलभ व तत्सम

सेवाभावी संस्थांतर्फे ''पैसे द्या व वापरा'' या तत्वावर शौचालय बांधकामाचा कार्यक्रम हाती घ्यावा, यासाठी सेवाभावी संस्थांची निवड महानगरपालिकेच्या स्थायी समिती/सर्वसाधारण सभा ठरवतील त्या निकष, अटी व शर्तीप्रमाणे करावी असे निर्देश आहेत. अशाप्रकारे शौचालय बांधल्यास महापालिकेवर आर्थिक बोजा पडणार नाही व संस्थेमार्फत परस्पर संबधित शौचालयांची देखभाल व दुरुस्ती होणार असल्याने नागरिकांना चांगल्या प्रतीची सेवा उपलब्ध होऊ शकेल.

उल्हासनगर महानगरपालिकेने यापूर्वी शहरात विविध ठिकाणी ''बांधा, वापरा व हस्तातंरीत करा'' या तत्वावर शौचालय बांधलेले असुन सद्यस्थितीत ''पैसे दया व वापरा'' या पध्दतीने सदरहु शौचालय विविध संस्थांमार्फत चालविण्यात येत आहेत.

उल्हासनगर महानगरपालिका मालकिचे प्रभाग क्र. ३७ मधील बॅ.नं २००५ जवळ, उल्हासनगर–५ येथील महापालिकेने बांधलेले नविन शौचालय ''पैसे दया व वापरा'' या तत्वावर अटी व शर्तीसह देण्याकामी जाहीर सुचना दै. उल्हास विकास, दै. नगर न्युज, व दै. अमृत कलश या वर्तमानपत्रात दि. ०२/०५/२०१६ रोजी प्रसिध्द् करून इच्छुकांकडुन अर्ज मागविण्यात आले होते. त्या अनुषंगाने खालील प्रमाणे अर्ज प्राप्त झालेले आहेत.

| अ. क्र | संस्थेचे नाव व पत्ता | अर्ज सादर करण्यात आलेला दिनांक | सोबत जोडलेली कागदपत्रे |
|---|---|---|---|
| ११ | दलित वेल्फेअर सोसायटी, रामदेव नगर, रूम नं १५५, ऑर्थर रोड, जे. आर. बोरीछा मार्ग, मुंबई– ४०००११ | ०४/०५/२०१६ | १) संस्थेचे नोदणी प्रमाणपत्र.<br>२) कामाचा अनुभव असलेला दाखला |
| २२ | एकता सामाजिक प्रतिष्ठान, प्लॅाट नं २७८, म्हाडा कॉलनी, कर्जत रोड, बदलापुर (पुर्व)– ४२१५०३ | १२/०५/२०१६ | १) संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र.<br>२) कामाचा अनुभव असलेला दाखला |
| ३३ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन कल्याण संस्था, भैय्यासाहेब आंबेडकर नगर, ओ.टी. सेक्शन–२, उल्हासनगर–२ | १३/०५/२०१६ | १) संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र. |
| ४४ | श्री. साई समर्थ प्रतिष्ठान (रजि), ब्लॉक नं २, रूम नं. १ शांतीनगर, साने गुरूजी मार्ग, महालक्ष्मी, मुंबई– ४०००११ | १६/०५/२०१६ | १) संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र.<br>२) कामाचा अनुभव असलेला दाखला |

वर्तमानपत्रात जाहीर केलेल्या सुचनेमध्ये नमुद केलेल्या अटी व शर्तीमध्ये अट क्र. ८ मध्ये नमुद केल्याप्रमाणे जी संस्था/मंडळे सर्व प्रथम अर्ज सादर करील त्यांना प्राधान्य देण्यात येईल. असे नमुद करण्यात आलेले होते. त्या अनुषंगाने दलित वेल्फेअर सोसायटी, रामदेव नगर, रूम नं १५५, ऑर्थर रोड, जे.आर. बोरीछा मार्ग, मुंबई– ४०००११ यांनी सर्व प्रथम अर्ज सादर केलेला आहे. तसेच त्यांनी अटी व शर्तीनुसार कागदपत्रे सादर केलेली आहेत.

उक्त बाबी विचारात घेता उल्हासनगर महानगरपालिका मालकिचे प्रभाग क्र. ३७ मधील बॅ.नं २००५ जवळ, उल्हासनगर–५ येथील महापालिकेने बांधलेले नविन शौचालय ''पैसे दया व वापरा'' या तत्वावर २० वर्ष कालावधीसाठी दलित वेल्फेअर सोसायटी, यांना देखभाल, दुरूस्ती करून चालविणेस देण्याची मंजुरी मिळण्यासाठीचा प्रस्ताव मा. स्थायी समिती पटलावर प्रस्तावित करणेत येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ४६ दिनांक:– २८/७/२०१६

सुचकाचे नाव :— श्रीम. अंजली साळवे

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिका मालकिचे प्रभाग क्र. ३७ मधील बॅ. नं २००५ जवळ, उल्हासनगर—५ येथील महापालिकेने बांधलेले नविन शौचालय ''पैसे दया व वापरा'' या तत्वावर २० वर्ष कालावधीसाठी दलित वेल्फेअर सोसायटी, यांना देखभाल, दुरूस्ती करून चालविणेसाठी देण्याचा प्रस्ताव अमान्य करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. १४ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १४ :—** स्थानिक संस्था कर विभागासाठी सल्लागार नियुक्ती करणे.

---

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:— मी सदर विषयाबाबत चर्चा केली तर यामध्ये कॅगची हरकत आहे का?

उप—आयुक्त, श्री. जमीर लेंगरेकर:— कॅगची चौकशी सुरू आहे.

सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भूल्लर :— कितीतरी कर्मचा—यांच्या चौकशा चालू आहेत यात, आणि आपण म्हणता हरकत नाही म्हणजे चुकीचे आहे ना. प्रशासनाने आधीच ठेवले आहेत स्थानिक संस्था करामध्ये कर्मचारी, आयुक्तांना अधिकार आहेत ना.

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:— आमचे असे म्हणणे आहे की, प्रशासनाने यात निर्णय घ्यावा. आमच्याकडून या विषयाला मान्यता नाही. कारण तांत्रिकदृष्टया वसुलीची बाब आहे, वसुलीच्याबाबतीत ठेवल्या गेलेल्या व्यक्ती कशा आहेत, काय आहेत, ते माहित नाही.

सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भूल्लर :— उदया असे व्हायचे संबंधित लोकांनी काही चुकीचे केले तर घोटाळा होईल. प्रशासन बाजूला राहिल आणि पारीत करणारे दोषी धरले जातील.

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:— आम्ही एवढी मुभा देऊ शकतो की, प्रशासनाने यात निर्णय घ्यावा.

सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भूल्लर :— आयुक्तांना अधिकार आहेत ना. एखादया विषयावर जर निर्णय होत नसेल तर नियमानुसार ९० दिवसानंतर आयुक्त निर्णय घेवू शकतात. सदर विषय अमान्य करण्यात यावा.

काही सदस्य :—सदर विषय अमान्य करण्यात येत आहे.



<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १४ :—** '' स्थानिक संस्था कर विभागासाठी सल्लागार नियुक्ती करणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात दि. ०१ जुलै २०१२ पासुन स्थानिक संस्था कर प्रणाली अंमलात आली आहे. त्याअनुषंगांने आजपर्यंत १५१२८ व्यापाऱ्यांची नोंदणी करण्यात आलेली अूसन, स्थानिक संस्था कर नियम २०१० चे नियम २९ (२) (ख) अंतर्गत प्रत्येक नोंदणीकृत व्यापाऱ्यांनी आपले व्यवसायासंबंधीचे वार्षिक विवरणपत्र सादर करणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने सन २०१२—१३, २०१३—१४ व २०१४—१५ या आर्थिक वर्षाचे व्यापाऱ्यांनी सादर केलेले वार्षिक विवरणपत्र ;म.प्द्ध सादर केलेले असून, त्यांचे मुल्यमापन (असेसमेंट) करून स्थानिक संस्था करातील फरक व व्यापाऱ्यांचे खरेदी—विक्री बाबतचे दस्तऐवज तपासणे तसेच ज्या व्यापाऱ्यांनी चुकीची माहिती सादर केलेली आहे अथवा कमी कर भरणा केलेला आहे याबाबतची शहानिशा करणेकामी तज्ञ व अनुभवी अधिका—यांची आवश्यकता आहे.

याबाबतचा गोषवारा दिनांक १४/०५/२०१५ रोजीच्या मा. महासभेच्या पटलावर सादर करण्यात आलेला आहे. परंतू सदरची महासभा तहकुब झालेली असून, पुढील महासभेचे आयोजन होईपर्यंत सदरचा ठराव संमत होण्यास विलंब लागणार असल्यामुळे व स्थानिक संस्था कराची वसुली वाढविण्याच्या दृष्टीने तसेच अशा व्यापा—यांचा फरक वसुल केल्यास महापालिकेच्या उत्पन्नात भरणा पडेल यादृष्टीने मागील तीन वर्षाचे मुल्यमापन करणे अत्यावश्यक आहे.

मा. महासभेच्या मंजुरीसाठी ठेवण्यात आलेल्या गोषवाऱ्याच्या मंजुरीच्या (महासभा ठराव) अधिन राहून मा. आयुक्त यांच्या मंजुरीने सल्लागार या पदाच्या नियुक्तीसाठी अनुभवी सेवानिवृत्त विक्रिकर/आयकर अधिकारी/सनदी लेखापाल यांचेकडुन वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन सल्लागारांची (पात्र सनदी लेखापाल) नियुक्ती करणेकामी अटी/शर्तीच्या अधिन राहून अर्ज मागविण्यात येते होते.

: **स्थानिक संस्था कर विभागसाठी सल्लागार नियुक्तीबाबतच्या अटी व शर्ती** :

१) जाहिरातीमध्ये नमूद केल्याप्रमाणे ज्या कामांसाठी सल्लागार नियुक्त करावयाचे आहेत, त्या कामासाठी आवश्यक शैक्षणीक पात्रता असलेल्या उमेदवारांनी, स्वसाक्षांकित केलेल्या शैक्षणीक अर्हता व अनुभवांची प्रमाणपत्रे अर्जा सोबत जोडणे आवश्यक आहे. आवश्यकता असल्यास संबंधित सल्लागार व्यक्ती/संस्था यांना प्रत्यक्ष मुलाखतीसाठी बोलाविण्यात येईल त्यावेळी मूळ प्रमाणपत्रांची तपासणी करण्यात येईल.

२) विहित शैक्षणीक अर्हता धारण करणाऱ्या सल्लागारांनी/संस्थांनी दिनांक / / २०१५ पर्यंत जाहिराती मध्ये नमूद केलेल्या वेळेत अर्ज दाखल करावेत.

३) करावयाच्या कामासाठी स्थानिक संस्था कर रक्कमेच्या मर्यादेनुसार महापालिकेने एकत्रित दर निश्चित केलेले आहेत ते खालीलप्रमाणे

| LBT assessed amount (including interest, penalty etc) | Unit | Rate |
|---|---|---|
| Up to Rs. 5000 | Per assessee | 800 |
| From Rs. 5001 to Rs. 50000 | Per assessee | 1260 |
| From Rs. 50001 to Rs. 500000 | Per assessee | 3000 |
| From Rs. 500001 to Rs. 2500000 | Per assessee | 3400 |
| From Rs. 2500001 to Rs. 5000000 | Per assessee | 7250 |
| From 5000001 to Rs. 1 Crore | Per assessee | 12500 |

| | | |
|---|---|---|
| Above Rs. 01 Crore | Per assessee | 14000 |

४) वरील दर हे ठरवून दिलेल्या कामासाठी एकत्रितपणे निश्चित केलेले असल्याने ज्या सल्लागारांकडून जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या कामापैकी जे काम करून घेतले जाईल त्या कामासाठी निश्चित केलेल्या एकूण रक्कमेच्या १/३, २/३ किंवा संपूर्ण रक्कम अदा केली जाईल.

५) सल्ला देण्यासाठी ज्या विवरणपत्राच्या नस्ती संबंधितांना उपलब्ध करून देण्यात येतील त्या संदर्भातील कामकाजाच्या नस्ती दिल्यापासून ०८ दिवसांच्या आत पूर्ण करावी लागेल तसे न केल्यास प्रति दिवस रू. ५०/— याप्रमाणे दंड आकारण्यात येईल.

६) कोणत्याही परिस्थितीत विवरणपत्राच्या नस्ती कार्यालयाच्या बाहेर नेता येणार नाहीत किंवा त्यांच्या छायांकीत प्रती काढुन घेता येणार नाही असे केल्याचे आढळून आल्यास त्यांचेवर कायद्यातील विहित तरतूदीप्रमाणे पुढील कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

७) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५२ (म) मधील तरतूदीप्रमाणे सल्लागार यांना दिलेल्या कामाची कोणतीही माहिती अन्य व्यक्तीस/संस्थेस देता येणार नाही असे हमीपत्र द्यावे लागेल.

८) वरील प्रकारच्या कामांसाठी निश्चित केलेली शैक्षणीक अर्हता असलेल्या उमेदवारांनी प्रस्तूत कामकाजासाठी श्रवपदज टमदजनतम करता येईल. मात्र श्रवपदज टमदजनतम मध्ये अटी व शर्ती या महापालिकेस लागू असलेल्या नियमातील तरतूदींशी व प्रस्तूत कामकाजाच्या अटी व शर्तीशी विसंगत असणार नाहीत.

९) श्रवपदज टमदजनतम केलेले असल्यास एकापेक्षा जास्त सल्लागार एकत्रितपणे अर्ज करण्यास पात्र असतील.

१०) सल्लागार म्हणून नियुक्ती केल्यास विहित नमुन्यात व विहित रक्कमेच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करून द्यावा लागेल.

११) प्रस्तूत कामामध्ये विवरणपत्रांची छाननी करणे, निर्धारणा आदेश पारित करणे, पुर्ननिर्धारणा करणे, पुर्ननिधारणा आदेश पारित करणे, पुर्ननिर्धारणा आदेशामध्ये दुरूस्ती करणे, अपील प्राप्त झाल्यास त्याची छाननी करणे, त्या संदर्भातील सल्ला देणे, स्थानिक संस्था कर विवरणपत्र धारकांना परतावा मागीतला असल्यास, दिलेला परतावा योग्य आहे किंवा नाही याबाबत सल्ला देणे इत्यादी व इतर त्या अनुषंगाने येणारी इतर सर्व कामे अभिप्रेत आहेत.

१२) संबंधित सल्लागार यांना द्यावयाच्या सल्लागार फी मधून शासनाचे दरांप्रमाणे आवश्यक असलेले सर्व कर व दर यांची कपात करून घेण्यात येईल.

१३) केलेली नियुक्ती पूर्णपणे तात्पूरत्या स्वरूपाची असून, कोणत्याही वेळी सल्ला देण्याबाबतची सेवा खंडित करण्याचे अधिकार महापालिकेचे राहतील. त्याबाबतचे कोणतेही स्पष्टीकरण देणे महापालिकेवर बंधनकारक असणार नाही.

१४) सल्लागार त्यांचे मदतीसाठी त्यांचे कर्मचारी नियुक्त करू शकतील. मात्र त्यापूर्वी अशी नेमणूक करण्यासाठी स्थानिक संस्था कर विभागाकडील उपायुक्त, स्थानिक संस्था कर यांची पूर्व मान्यता घेणे बंधनकारक असेल. सदर कर्मचाऱ्यांनाही स्थानिक संस्था कर कार्यालयातच मुद्द्ा क्रमांक ७ मध्ये नमूद केल्यानुसार प्रतिज्ञापत्र देऊन कामकाज करावे लागेल.

१५) सल्लागार यांना नेमून दिलेल्या कामकाजासंदर्भातच सल्ला देणे मर्यादित राहील. मात्र दिलेल्या निर्णयावर अंतिम निर्णय घ्यावयाचा अधिकार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम व स्थानिक संस्था कर निमय २०१० मधील तरतूदीप्रमाणे महापालिकेस असतील.

१६) सल्ला देण्यासाठी निश्चित केलेले दर हे सन २०१२—१३, २०१३—१४ व २०१४—१५ या वर्षांच्या विवरणपत्रांची छाननीचे काम पूर्ण होईपर्यंत अंमलात राहतील. त्यामध्ये कोणत्याही प्रकारची दरवाढ केली जाणार नाही.

१७) सल्लागार यांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम व स्थानिक संस्था कर नियम २०१० मधील तरतूदीनुसार वरील दिलेल्या कामकाजासाठी कायद्याशी विसंगत सल्ला देता येणार नाही. अशी बाब निदर्शनास आल्यास संबंधित सल्लागार यांचेवर कायदेशीर कार्यवाही करणे संदर्भात महापालिका उपायुक्त यांचा निर्णय अंतिम असेल.

१८) या संदर्भात कोणतेही प्रकरण न्यायालयांत नेल्यास, याबाबत न्यायालयीन प्रकरणाचा सर्व खर्च संबंधीत सल्लागार यांना करावा लागेल आणि यासाठी उल्हासनगर हेच न्यायालयीन क्षेत्र राहील.

१९) यासाठी नियुक्त केलेल्या सल्लागारांची संख्या निश्चित करण्याचे अधिकार मा. महापालिका आयुक्त यांचे असतील.

२०) या संदर्भातील कोणताही वाद निर्माण झाल्यास मा. महापालिका आयुक्त यांचा निर्णय अंतिम राहील व सदरचा निर्णय दोन्ही पक्षांवर बंधनकारक राहील.

२१) वरिल सर्व अटी मान्य असल्याबाबत व त्याप्रमाणे कामकाज करण्याची तयारी असल्यास संबंधितांनी अर्ज करावेत असे सूचविण्यात येत असून, अर्ज दाखल केल्यानंतर या संदर्भातील कोणतीही तक्रार महापालिकेकडून विचारात घेतली जाणार नाही.

२२) नेमणूक केलेल्या सल्लागारांकडे महापालिका हददीतील ज्या व्यापाऱ्यांचे कोणतेही कर विषयक कामकाज असेल त्याची यादी अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहील. तसेच असे नसल्यास त्याबाबतचे हमीपत्र द्यावे लागेल.

२३) उल्हासनगर महापालिकेत सेवा उपलब्ध करून घेतल्यावर, त्या सल्लागार व्यक्ती/संस्था यांना स्थानिक संस्था कर विभागाकडे नोंदणी केलेल्या व्यापाऱ्यांचे स्थानिक संस्था कर संदर्भातील कामकाज करता येणार नाही. सेवा संपूष्टात आल्यावर उल्हासनगर महापालिका क्षेत्रात ०३ वर्षे स्ठण्ज्ञ विषयक काम करदात्याच्या वतीने घेता येणार नाही.

२४) तज्ञ व्यक्ती ज्यात सनदी लेखापाल/वकील/विक्रिकर किंवा उप कर विभागातील निवृत्ती अधिकारी/कर्मचारी/नोंदणीकृत कर सल्लागार मंडळ तयार करणेकामी त्यांची किमान शैक्षणिक पात्रता/अनुभव यांचे निकष निश्चित करावे लागतील. त्यानुसार खालील निष्कर्ष निश्चित करणेत येत आहेत

२४ अ) विक्रिकर/उपकर/निवृत्त अधिकारी/कर्मचारी/नोंदणीकृत कर सल्लागार किमान शिक्षण कोणत्याही शाखेतील पदवी व अनुभव–विक्रिकर/उपकर यांच्या निर्धारणा/ पुर्ननिर्धारणा/दुरुस्ती आदेश आणि अपीले या संदर्भातील कामकाज किमान ४ वर्षाचा अनुभव तसेच अन्वेषण/ अपील व अनुषंगिक कामकाजाचा अनुभव.

२४ ब) सनदी लेखापाल/वकील/नोंदणीकृत कर सल्लागार म्हणुन विक्रिकर/उपकर/ विषयातील निर्धारणा पुर्ननिर्धारणा/दुरुस्ती आदेश आणि अपीले या संदर्भातील कामकाजाचा किमान ४ वर्षाचा अनुभव तसेच अन्वेषण अनूषंगिक कामकाजाचा अनूभव.

यानुषंगाने मा.आयुक्त यांनी सदरची बाब ही महानगरपालिकेच्या अर्थिक हिताची असल्याने सद्यस्थितीत मानधन तत्वावर किमान ६ (सहा) सल्लागार रू १५०००/– मानधनावर नेमण्याची मान्यता दिली असल्याने सहा सल्लागारांना दिनांक ०१ ऑक्टोंबर २०१५ पासुन तात्पुरती नियुक्ती देण्यात आली आहे. सदरची बाब ही मा.स्थायी समितीच्या निदर्शनास तसेच मा. स्थायी समितीकडून मान्यता मिळणेस्तव सादर

स्थायी समिती ठराव क्र. ४७ — दिनांक:– २८/७/२०१६

सुचकाचे नाव :– श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार स्थानिक संस्था कर विभागासाठीरू १५०००/– मानधनावर दिनांक ०१ ऑक्टोंबर २०१५ पासून तात्पुरत्या स्वरूपात नियुक्त केलेल्या ६ (सहा) सल्लागार यांच्या नियुक्ताचा प्रस्ताव अमान्य करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. १५ वाचुन दाखवितात

**विषय क्र. १५ :—** पैसे दया व वापरा'' या तत्वावर देण्यात आलेल्या शौचालयाच्या सेवा शुल्कामध्ये तसेच संस्थेने महापालिकेमध्ये जमा करावयाच्या रक्कमेत दर वाढ निश्चित करणे.

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—** सदर विषय हा धोरणात्मक असल्यामुळे तो महासभेपुढे आणला पाहिजे. कारण यामध्ये सेवाशुल्कामध्ये वाढ प्रस्तावित केली आहे. स्थानिक नगरसेवक यांनी अशी पत्र दिली आहेत कि, सेवाशुल्कामध्ये वाढ करण्यात यावी म्हणून, एक अधिकारी जातो आणि पाहणी करतो आणि दरवाढ प्रस्तावित करतो. दरवाढ देण्यासाठी ते सुविधा देतात का? त्यांचा अहवाल स्थानिक नगरसेवकांकडून घेतला आहे का? तिथे पाणीपुरवठा आहे, साफसफाई आहे, हे सर्व उपलब्ध करून देतात तर दरवाढ प्रस्तावित केली तर ठिक आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** सदर विषय व्यवस्थित आणण्यात यावा. आधी तर या संस्थेची नावे व पत्ता व त्यांनी सदरचे शौचालय या दिवशी बांधले आहे व त्यासाठी एवढा खर्च केला आहे. आणि असे कोणते आहेत कि जे महानगरपालिकेने बांधले आहेत व संस्थेस चालवावयास दिले आहेत. आणि असे कोणते आहेत कि जे संस्थेने स्वत: बांधले आहेत. अशाप्रकारे वेगवेगळा प्रस्ताव तयार करावा. जे संस्थेने बांधले आहेत त्याबाबत आम्ही विचार करू व महापालिकेने बांधले असतील त्यासाठी वेगळा विचार करण्यात येईल. तर अशाप्रकारे सर्व प्रस्ताव सविस्तर आला पाहिजे. किती वर्षासाठी चालवायला दिले होते, त्यांची मुदत संपली आहे किंवा कसे या सर्व बाबी सविस्तर आल्या पाहिजेत, तोपर्यत सदर विषय वगळण्यात यावा.

**महापालिका सचिव :—** सदर विषयाबाबत काय करायचे?

**काही सदस्य :—** सदर विषय कार्यसुचीवरून वगळण्यात यावा.

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. १५ :—** पैसे दया व वापरा'' या तत्वावर देण्यात आलेल्या शौचालयाच्या सेवा शुल्कामध्ये तसेच संस्थेने महापालिकेमध्ये जमा करावयाच्या रक्कमेत दर वाढ निश्चित करणे.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात ३१ ठिकाणी '' पैसे द्या व वापरा'' या तत्वावर शौचालय चालविण्यासाठी देण्यात आले आहे. त्यांची यादी पुढीलप्रमाणे आहे.

| अ. क्र | संस्थेचे नाव व पत्ता | शौचालयाचे ठिकाण |
|---|---|---|
| १ | **टॉयलेट ॲन्ड टॉयलेट प्रा. लि.,** त्रिभुवनदास जावेरी समोर, भारत पेट्रोल पंप जवळ, मॅथ्यु रोड, ओपेरा हाऊस, मुंबई— ०४. | १) सुर्या हॉटेल समोर, पेट्रोल पंप, कचरा कुंडी जवळ, उल्हासनगर— ०४<br>२) बॅ.नं. २००९, उल्हासनगर— ५ |
| २ | **आदर्श नवयुवक सामाजीक सेवा मंडळ,** सी/१०३, भारत वैभव अपा., चंदन क्रास समोर, आचोळे रोड, नालासोपारा (पूर्व). | १) बॅ.नं. ५२४, डॉ. किंगर डिस्पेंन्सरी जवळ, जपानी बाजार मागे,उल्हासनगर—२<br>२) जकात नाका क्रं. ०९ च्या बाजुला, कैलास कॉलनी उल्हासनगर— ५ |
| ३ | **एकता सामाजिक प्रतिष्ठान,** १२, नवसुचिता अपा. रामचंद्र नगर, नांदिवली रोड, डोंबिवली(पूर्व). | १) प्रभात सिनेमा समोर,नेताजी चौक,उ. नगर— ५<br>२) जपानी बाजार, कुमार डिपार्टमेन्टल स्टोअर्स समोर, उ.नगर— २<br>३) नवजीवन बॅक शेजारी,मटन मार्केट जवळ, बॅ. नं. १८२२, उ.नगर— ५ |
| ४ | **शांती सेवा संस्था,** | १) उल्हासनगर रेल्वे स्टेशनच्या बाहेर(पूर्व), |

| | | |
|---|---|---|
| | २७/३, शांतीनगर, साने गुरूजी मार्ग, सातरस्ता, मुंबई— ११. | उल्हासनगर— ३.<br>२) १ बस स्टॉप जवळ, उल्हासनगर— १.<br>३) चेलाराम मार्केट, उल्हासनगर— २.<br>४) स्मशानभुमी जवळ, शांतीनगर,उल्हासनगर— ३<br>५) टोकीयो मार्केट, उल्हासनगर— २.<br>६) गजानन मार्केट, उल्हासनगर— २. |
| ५ | **वाल्मिकी युवा समाज समिती,** अखिल भारतीय वाल्मिकी नवयुवकसंघ, दरर्गा जवळ, खारटन रोड, ठाणे. | जयमाता अन्नपूर्णा मंदिराच्या समोर, बॅ.नं. ४३४, लाजवंती धर्मशाळा, उल्हासनगर— २. |
| ६ | **मेहतर समाज बेरोजगार कल्याण संस्था,** शांतीनगर २७/२, साने गुरूजी मार्ग, नेक सर्कल, मुंबई— ११. | १) गोलमैदान, मेन गेट जवळ, उल्हासनगर— १.<br>२) कृष्णा मार्केट, बॅ.नं. ५१८ जवळ, उ,नगर— २<br>३) राजीव गांधी नगर, उल्हासनगर— १<br>४) बॅ.नं. ३५२ जवळ, सोनार गल्ली, उल्हासनगर— २ |
| ७ | **वाल्मिकी समाज बेरोजगार कल्याणकारी सेवा संस्था,** बॅ.नं. ११३३, फालवर लाईन, उल्हासनगर— ३ | १) वार्ड क्रं. ३१, बॅ.नं. ९९७ जवळ, पारस वाईन समोर, उल्हासनगर— ३<br>२) वार्ड क्रं. ३०, सिकी अपा. समोर अनिल पापडवाला जवळ, उल्हासनगर— ३ |
| ८ | **नवल वेल्फेअर फाऊन्डेशन,** आशिर्वाद भवन, जोशीबाग, कल्याण(पश्चिम). | बॅ.नं. १८३५, झुलेलाल बाजार, कापड बाजार, जुन्या शौचालयाच्या जागेवर, उल्हासनगर— ५ |
| ९ | **डॉ. बाबासाहेब आंबेडकर लोकसेवा फाऊन्डेशन,** १२०/पेनीनसुला पार्क, सपना गार्डन, उ.नगर— ३ | १) चंदर हार्डवेयरच्या मागे, आवतराम चौक, खेमाणी भाजीमार्केट, उल्हासनगर— २<br>२) पवई चौक,ब्रिज रोड, ॲडमिनीस्ट्री गेट जवळील फुटपाथवर,उल्हासनगर— ३<br>३) बॅ.नं. १९८८ समोर, उमपा. शाळा क्रं. १६ जवळ, जुना बस स्टॉप जवळ,उ.नगर— ५ |
| १० | **मेघ वेल्फेअर सोसायटी,** साईबाबा सोसायटी,नंदा पाटकर रोड,विले पार्ले(पूर्व) मुंबई— ५७. | साईबाबा मंदिराजवळ, शांतीनगर, उ.नगर— ३ |
| ११ | **मेहतर समाज बेरोजगार उत्थान सेवा संस्था** | जंगल हॉटेलच्या मागे, सेक्शन— २८, उ.नगर— ४ |
| १२ | **महर्षी वाल्मिकी सेवा संस्था.** मुरलीधर अपा. शाम सुंदर सोसायटीच्या बाजुला, ओ.टी. सेक्शन बॅ.नं. १०९८ जवळ, उल्हासनगर— ३ | संगम ट्रॅव्हलच्या समोर, १७ सेक्शन उ,नगर— ३ |
| १३ | **एकलव्य सेवा भावी संस्था.** साई समर्थ, ठाणे | १) सेंट्रल हॉस्पीटल, एम.पी पान हाऊस जवळ, उल्हासनगर—३<br>२) सपना गार्डन, हिंदी शाळेजवळ, उल्हासनगर—३ |
| १४ | **तेजस्विनी महिला मंडळ** १, सिध्दी विनायक सोसा. ठाणकर पाडा, कल्याण (पश्चिम) | १) डालडा प्रेस मार्केट, उल्हासनगर— ३<br>२) बॅ.नं १८२८, आनंदपूरी दरबार, सेक्शन—३८, उल्हासनगर—५ |

उपरोक्त संस्थापैकी १) शांती सेवा संस्था २) एकता सामाजिक प्रतिष्ठाण ३) मेहतर समाज बेरोजगार कल्याण संस्था, यांनी शौचालयाच्या सेवाशुल्कात वाढ करून मिळणेकामी विनंती अर्ज सादर केलेले आहेत.

महानगरपालिका करारनाम्यातील अट क्र. १ मध्ये महानगरपालिकेत जमा करावयाची रक्कम प्रति सिट रू. ५/— प्रती महिना (मुतारी वगळुन) एवढी आहे.

सदर संस्थेसोबत केलेल्या करारनाम्यात अट क्र. ४ (अ) मध्ये पहिल्या तीन वर्षासाठी सेवा शुल्क मंजुर केलेले शौचालय वापर दर खालीलप्रमाणे आहेत.

| स्वरूप | बाहेर गावावरून येणाऱ्या नागरीकांकरिता | कायम स्वरूपी नागरीकांकरीता |
|---|---|---|
| मुतारी | मोफत | मोफत |
| शौचालय | रूपये ०१/— | दरमहा रूपये २५/— प्रति कुंटूब/प्रतिमहा (पाच व्यक्तीपर्यत) |
| स्नांनासाठी | रूपये ०५/— | दरमहा रूपये ७५/— प्रति कुंटूब/प्रतिमहा (सात व्यक्ती पुढे) सात पेक्षा जास्त असल्यास अतिरिक्त शुल्क |

उल्हासनगर शहरात वरील संस्था गेले १० ते १२ वर्षापासुन शौचालयांची दैनदिन स्वच्छता व देखभाल करीत आहेत. तसेच महापालिकेने ठरवुन दिलेल्या दरानुसार शुल्क घेत आहेत. परंतू सफाई कामगारांचे पगार, साफसफाईसाठी लागणारे सामान व शौचालयाचे दुरूस्तीचे साहित्य महागले आहे. तसेच शौचालयास लागणारे इलेक्ट्रीक दरही वेळोवेळी वाढत असुन, कमर्शियल दराप्रमाणे भरावे लागत आहे.

सदर संस्थांनी शौचालय वापराचे एका वेळेचे प्रतिवापर दर बाहेर गावावरून येणाऱ्या नागरीकांना रक्कम रूपये १/— वरून रूपये ७/— करावे अशी मागणी केलेली आहे.

सदर संस्थेने नमुद केलेले पैसे दया व वापरा तत्वावरील शौचालयाचे ठिकाणे शहरातील मोठे मार्केट, औद्योगिक क्षेत्र, शहरातील मुख्य चौक इत्यादी रहदारीच्या ठिकाणी असल्याने प्रस्तावित वाढ मंजुर करण्यास हरकत नसावी.

उपरोक्त संस्था यांचे बरोबर केलेल्या करारनाम्यात नमुद केल्याप्रमाणे सेवा शुल्कात वाढ करणेबाबत विनंती केलेली आहे. सदर सस्थांशी केलेल्या करारनाम्यातील अटी व शर्ती मधील अट क्र. ४ मध्ये वापराचे दर दिलेले आहेत. पहिल्या तीन वर्षासाठी प्रति वापर भाडे रू. १/— प्रमाणे आकारणी करणेत येत आहे. उक्त नमुद संस्थाशी करारनामा करून तीन वर्षपेक्षा अधिक कालावधी झालेला असल्याने अद्यापपर्यत सेवा शुल्कात वाढ करणेत आलेली नाही.

**अट क्र. ४(ब) नुसार करारनाम्यानंतर तीन वर्षानंतर महानगरपालिका आयुक्त यांचे मंजुरीने मा. आयुक्त ठरवेल एवढे सेवाशुल्क वेळोवेळी आकारण्यात येतील असे नमुद आहे.**

उल्हासनगर महानगरपालिकेने शहरात वरील नमुद केलेल्या ठिकाणी ''पैसे द्या व वापरा'' या तत्वावर देण्यात आलेल्या शौचालयाचे वापर दरांमध्ये खालीलप्रमाणे वाढ होणे उचित वाटते.

| स्वरूप | बाहेर गावावरून येणाऱ्या नागरीकांकरिता | कायम स्वरूपी नागरीकांकरीता |
|---|---|---|
| मुतारी | मोफत | मोफत |
| शौचालय | रूपये ०५/— | दरमहा रूपये ६०/— प्रति कुंटूब/प्रतिमहा (पाच व्यक्तीपर्यत) |
| स्नानासाठी | रूपये १०/— | दरमहा रूपये १००/— प्रति कुंटूब/प्रतिमहा (सात व्यक्ती पुढे) सात पेक्षा जास्त असल्यास अतिरिक्त शुल्क |

त्याचप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात ''पैसे द्या व वापरा'' या तत्वावर शौचालय चालवित असलेल्या विविध संस्थेमार्फत महानगरपालिकेमध्ये जमा करावयाची रक्कम **प्रति महा, प्रति शिट रूपये ५/— वरून प्रति महा, प्रति शिट रूपये १०/—** इतकी वाढ केल्यास महानगरपालिका उत्पन्नात देखील भर पडेल.

तरी उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात ''पैसे दया व वापरा'' या तत्वावर विविध संस्थांना देण्यात आलेल्या शौचालयाच्या सेवा शुल्कामध्ये तसेच सदर संस्थानी महापालिकेमध्ये जमा

करावयाच्या रक्कमेत वाढ करणेबाबतचा प्रस्ताव पुनश्च मा. स्थायी समिती सभेच्या पटलावर निर्णयासाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ४७अ दिनांकः— २८/७/२०१६

सुचकाचे नाव :— श्रीम. रेखा अशोक ठाकूर

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात ''पैसे दया व वापरा'' या तत्वावर विविध संस्थांना देण्यात आलेल्या शौचालयाच्या सेवा शुल्कामध्ये तसेच सदर संस्थानी महापालिकेमध्ये जमा करावयाच्या रक्कमेत वाढ करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव कार्यसूचीवरून वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

सायं. ५.३५ वाजंता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती श्री. सुनिल सुर्वे यांनी जाहिर केले.

**(प्राजक्ता मि. कुलकर्णी )**
प्र. महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

.

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः— ४/८/२०१६

दि.४/८/२०१६ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती

सभेचे इतिवृत्त.

(७)

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा गुरूवार दिनांक ४/८/२०१६ रोजी सायं. ४.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे | सभापती |
| २ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | सदस्या |
| ३ | श्रीमती लिलाबाई आशान | सदस्या |
| ४ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर | सदस्य |
| ५ | श्री. उमेश सुरेश कालानी | सदस्य |
| ६ | श्री. गुरुनो भिकोमल वलेचा | सदस्य |
| ७ | श्री. जमनादास पुरस्वानी | सदस्य |
| ८ | श्रीमती आशा जिवन इदनानी | सदस्या |
| ९ | श्रीमती अंजली साळवे | सदस्या |
| १० | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | सदस्या |
| ११ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | सदस्या |
| १२ | श्रीमती इंदिरा उदासी | सदस्या |
| १३ | श्रीमती पुष्पाताई नाना बागुल | सदस्या |
| १४ | डॉ. निना प्रकाश नाथानी | सदस्या |
| १५ | श्रीमती वंदना पाटील उर्फ वंदना युवराज भदाणे | सदस्या |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.
१. श्री. विजय चाहु पाटील

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१२९. श्रीम. विजया कंठे, उप—आयुक्त (मुख्यालय)
१३०. श्रीम. प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
१३१. श्री. दादासाहेब पाटील, मुख्य लेखा अधिकारी
१३२. श्री. सुखदेव बलमे, मुख्य लेखा परिक्षक

१३३. श्री. राम जयस्वार, शहर अभियंता
१३४. श्रीमती मंगला माळवे, सहा. आयुक्त
१३५. श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
१३६. डॉ. राजा रिजवाणी, प्र. वैद्यकिय आरोग्य अधिकारी
१३७. श्रीम. छाया डांगळे, प्र. सहा. आयुक्त (विधी)
१३८. श्री. गणेश शिंपी, प्र. प्रभाग अधिकारी
१३९. श्री. भगवान कुमावत, प्र. प्रभाग अधिकारी
१४०. श्री. नंदलाल सामतानी, प्र. प्रभाग अधिकारी
१४१. श्री. हनुमंत खरात, प्र. कार्यकारी अभियंता, विदयुत
१४२. श्री. मनिष हिवरे, प्र.सहा. आयुक्त, सा.प्र.वि.
१४३. श्री. शैलेश दोंदे, प्र. कर निर्धारक व संकलक
१४४. श्री. जितू चौथानी, कनिष्ठ अभियंता, सार्व.बांध.विभाग.
१४५. श्री. विनोद केणे, प्र. स्वच्छता निरिक्षक
१४६. श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक
१४७. श्री. संतोष लोणे, कनिष्ठ अभियंता, ना. सु. केंद्र

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.
१. श्रीमती विशाखा सावंत
२. श्री. अशोक रामरख्यानी

**श्रीम. विजया कंठे, उप.आयुक्त (मुख्यालय) या आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ होत्या.**

सायं. ४.०० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ **<u>विषय क्र. १</u>** :– उल्हासनगर महानगरपालिकेतील विद्युत विभागाचे कामाची माहिती स्थायी समीतीस देणे करीता.

---

<u>महापालिका सचिव :–</u> सदर विषय पारीत करण्यात यावा का?

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

यावेळी सदस्या श्रीमती आशा इदनानी व सदस्य श्री. उमेश कालानी हे सभागृहातुन बाहेर गेले.



**<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑

**विषय क्र. १ :– उल्हासनगर महानगरपालिकेतील विद्युत विभागा चे कामाची माहिती स्थायी समीतीस देणे करीता.**

**<u>प्रस्तावना</u>**

उल्हासनगर महानगरपालिका विद्युत विभागाचे कामास दिलेल्या मंजुरीची माहीती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ ( ड ) नुसार पुढील प्रमाणे देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | मंजुर रक्कम | कराराचा दिनांक | एजंन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| १ | उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात उभारलेल्या दिवाबत्तीची स्वंयचलित यंत्रणा वर्षभर कार्यरत ठेवण्यासाठी इलेक्ट्रॉनिक साहित्य खरेदी करण्याकरीता | १४,७४,०००/— | १६/०६/२०१६ | मे.एशियन कंट्रोल ॲन्ड एक्वीपमेटं,मुंबई [1] ४०० ०१२. |
| २ | उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात उभारलेल्या दिवाबत्तीचे टायमर बॉक्स व स्ट्रीट लाईट बॉक्स बदलणेकामी फेब्रिकेशन साहित्य खरेदी करण्याकरीता . | ७,९१,५००/— | २३/०६/२०१६ | मे.टिंव्कल टेक्नो क्राफ्ट . भारत चौक,पोलिस स्टेशन जवळ,शॉप नं.४९२/४९३. उल्हासनगर [1] ४२१००१. |
| ३ | उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात उभारलेल्या दिवाबत्तीच्यां वार्षिक देखभाल व दुरुस्तीसाठी इलेक्ट्रीकल साहित्य खरेदी करणेकरिता | २१,६०,०००/— | २३/०६/२०१६ | मे. टिंव्कल टेक्नो क्राफ्ट . भारत चौक,पोलिस स्टेशन जवळ,शॉप नं.४९२/४९३. उल्हासनगर [1] ४२१००१. |

तरी सदरची माहीती स्थायी समिती अवलोकनार्थ प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ४८ दिनांकः— ४/८/२०१६

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिका विद्युत विभागाचे कामास दिलेल्या मंजुरीची माहीतीची नोंद करणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. २ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. २ :—** सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत निविदा प्रक्रीया केलेल्या उल्हासनगर—१, प्रभाग समिती क्र.१ मधील रस्त्यामधील खड्डे भरणे या कामाकरिता मे. जयभारत कन्स्ट्रक्शन यांच्या निविदेस मा. स्थायी समितीची मान्यता मिळणे.

---

<u>सदस्या, श्रीम. रेखा ठाकुरः—</u> मागच्यावेळेस यांनाच काम दिले होते, या ठेकेदाराला काळया यादीत टाकले आहे ना. सदर ठेकेदार हे व्यवस्थित मालाचा वापर करीत नाहीत तरीसुध्दा त्याच ठेकेदाराला पुन्हा हे काम दिले जाते.

<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u> सदर ठेकेदाराला काळया यादीत टाकले आहे का?

<u>सदस्या, श्रीम. रेखा ठाकुरः—</u> काळया यादीत टाकलेले नसले जरी तरी ठेकेदार व्यवस्थित मालाचा वापर करत नाही आणि दरवर्षीचा हा विषय आहे. व माझ्या माहितीनुसार यांच्यामुळेच मा. सर्वोच्च न्यायालयातर्फे महापालिकेवर दंडात्मक कारवाई झाली आहे. जर पुन्हा तो ठेकेदार दुस—या कंपनीच्या नावाने निविदा भरत असेल तर कोणत्या बाबीवर आपण त्याला हे काम दयायचे.

<u>शहर अभियंता, श्री. राम जयस्वार :—</u> काळया यादीत टाकलेले नाही.

<u>सदस्या, श्रीम. रेखा ठाकुरः—</u> मागच्याच्या मागच्यावर्षी सदर काम हे या ठेकेदारालाच दिले होते ना.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—</u> हे जे रस्त्यावरील खडड्े भरण्याचे काम निविदा पध्दतीने झाले आहेत.

<u>सदस्या, श्रीम. रेखा ठाकुरः—</u> काही तरी अशी कामे झाली पाहिजेत ना.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—</u> याठिकाणी असे करता येईल कि, प्रशासनाने त्यांच्या कामाच्या गुणवत्तेची चाचणी करावी. जसे काम करताना ते कोणत्या प्रकारचा माल वापरतात त्याची तपासणी करावी, मालामध्ये काही कमतरता नसावी,

<u>सदस्या, श्रीम. रेखा ठाकुरः—</u> एक महिन्यामध्ये रस्ता संपुर्ण उघडतो.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—</u> आपली जबाबदारी विषय पारीत करण्यापर्यंत आहे, प्रशासनाची जबाबदारी आहे सदर बाबी पाहण्याची. आम्ही इथे प्रशासनाला सांगत आहोत कि, ठेकेदाराकडून केल्या जाणा—या कामाची गुणवत्ता तपासली गेली पाहिजे जेणेकरून आमच्याकडे काही तक्रारी नाही आल्या पाहिजेत.

<u>सदस्य, श्री. गुरूनो वलेचा :—</u> ठेकेदाराची माणसे येतच नाहीत, केवळ रस्त्याची मापे घेण्यास येतात. रस्त्यांवरील खडड्े काही भरले जात नाहीत नेहमी फक्त रस्त्यांची यादी बनवतात.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—</u> आता रस्त्यांची ठिकाणांनुसार यादी तयार केली आहे.

<u>सदस्य, श्री. गुरूनो वलेचा :—</u> आम्ही रस्त्यावर जावून उभे राहतो, आणि सांगतो कि इथे काम करा म्हणुन, श्री. अश्विनी अहुजा, अभियंता यांना वेळोवेळी विचारणा केली तर ते काही सांगत नाहीत. रस्त्यांची यादी तयार होते, काम पुर्ण होते. ४ वर्षात अद्यापपर्यंत माझ्या प्रभागातील रस्त्यांवरील खडड्े भरलेले नाहीत.

<u>सदस्या, श्रीम. रेखा ठाकुरः—</u> तुम्ही या प्रस्तावाबाबत समाधानी आहात का?

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—</u> आता ठिकांणानुसार रस्त्यांची यादी तयार केलेली आहे.

<u>सदस्य, श्री. गुरूनो वलेचा :—</u> रस्त्यांची यादी कुठे आहे, दाखवा आम्हाला, श्री. अश्विनी अहुजा, अभियंता यांना विचारले तर यादी माझ्याकडे नाही असे सांगतो. सर्व दादागिरी चालते.

<u>सदस्या, डॉ. निना नाथानी :—</u> तुम्ही रस्त्यांवरील खडड्े भरताना त्या खडडयांचे आतील माप घेता आणि सोडून देता, त्याच्या आजूबाजूचेदेखील माप घेतले पाहिजे ना ही एक गोष्ट आणि दुसरी गोष्ट म्हणजे रस्ता तयार करताना माल एकत्रित करून टाकतात आणि निघतात, पाऊस आला कि, तो माल निघून जातो आणि रस्त्यावरील खडड्ा तसाच राहतो, असा रस्ता किती दिवस चालणार, तुम्हाला काही माहित नाही का? आता नविन मिक्सचर टाकले जाते जे इन्स्टंट आहे, त्यामुळे त्या रस्त्याचे आयुष्य वाढेल, मी टू व्हिलर चालवते म्हणून मी सांगते, रस्त्यांच्या कामांची गुणवत्ता चांगली नाही. निविदा प्रक्रीया करता तर कामसुध्दा चांगले असले पाहिजे, जे खडड्याचे माप आहे तेदेखील व्यवस्थित घेतले जात नाही. खडड्ादेखील पुर्ण भरला जात नाही, अर्धवट भरला जातो. खडड्याच्या मधोमध माल टाकता आणि निघून जातो, असे तर तेथील जवळपासचे दुकानदार देखील करतील. करायचे असेल तर व्यवस्थित काम करा. निविदेमध्ये स्पष्टपणे सर्व बाबी टाका आणि नंतरच अंतीम करा.

<u>सदस्या, श्रीम. रेखा ठाकुरः—</u> रस्त्यांवर खडड्े भरण्यासाठी टाकण्यात येणा—या मालाची चाचणी करता का? प्रत्येकवर्षीचे हे काम आहे ना, का नाही मालाची चाचणी होत?

<u>सदस्या, डॉ. निना नाथानी :—</u> जोपर्यंत या सर्व बाबी स्पष्ठ होत नाहीत तोपर्यंत निविदा अंतिम करू नये, हा आणि खडी टाकण्याचे हे टाईमपासवाले काम करायचे असेल तर मग अशी कामे करूच नका ना.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u> एकावेळेस एकच सदस्यांनी बोलावे, नाहीतर गोंधळ होतो आणि काही समजत नाही. कृपया एकावेळेस एकानेच बोलावे.

<u>सदस्या, डॉ. निना नाथानी :—</u> जोपर्यंत व्यवस्थित माप घेवून व्यवस्थित खडड्े भरले पाहिजेत, आता इन्स्टंन्ट मिक्स्चर आले आहेत ते वापरावेत.

<u>शहर अभियंता, श्री. राम जयस्वार :—</u> पावसाळयात रस्त्यांवर खडीच टाकली जाते.

<u>सदस्या, डॉ. निना नाथानी :—</u> हे काम आपल्याला पावसाळयापुर्वीच करायला नको होते का? इतके भयंकर अपघात होत असतात, महासभेमध्येसुध्दा कितीवेळा या विषयावर चर्चा झाली आहे. किती लोकांच्या कंबर मोडल्या आहेत, किती लोकांना अपघात झाले आहेत. आपल्याला असे वाटत नाही का आता या कामास उशिर झाला आहे. आता उशिरपण झालेला आहे आणि आपण म्हणत आहात कि, आम्ही फक्त खडीच टाकणार कारण पावसाळा आहे, हे आपले चांगले कारण आहे, खडी तर पावसात वाहुन जाईल.

<u>शहर अभियंता, श्री. राम जयस्वार :—</u> यावेळेस आम्ही इन्स्टंन्ट मिक्स्चर टाकलेले नाही कारण ते वाहून जाईल.

<u>सदस्या, डॉ. निना नाथानी :—</u> आता पाऊस कमी आहे, सर्वत्र सुके आहे.

<u>शहर अभियंता, श्री. राम जयस्वार :—</u> शासनाचे आदेश आहेत पावसाळयात रस्त्यांवर डांबर टाकू शकत नाही.

<u>सदस्या, डॉ. निना नाथानी :—</u> मग पहिले का नाही डांबर टाकले. मध्येच सुके असेल तर तेव्हासुध्दा काम करणार नाही का? हे आपली चुक आहे कि आपण पहिल्यापासुनच काम केलेले नाही.

<u>शहर अभियंता, श्री. राम जयस्वार :—</u> दिनांक १५ मे पासून पावसाळा सुरू होईपर्यंत

<u>सदस्या, डॉ. निना नाथानी :—</u> हे बरोबर नाही, सदर कामाची निविदा प्रक्रीया खुप लवकर व्हायला हवी होती.

<u>सदस्या, श्रीम. अंजली साळवे :—</u> पावसाळयाच्या आधी हे काम करायला हवे होते. रस्त्यावरील खडड्ा मोठा झालेला आहे. त्यात पाणी भरले कि खडड्ा अजिबात दिसत नाही. किती लोकं त्या खडडयात पडली आहेत, आता रस्त्यावर खडी आणून टाकली आहे ती लगेच निघून जात आहे, त्यामध्ये काही मिसळून टाकले पाहिजे ना. यापुर्वीदेखील खडी टाकली होती तीपण निघून गेली. काही उपयोग नाही.

<u>सदस्या, डॉ. निना नाथानी :—</u> तो खडड्ा किती मोठा आहे हे आम्हाला कळतदेखील नाही. टू व्हिलर तर अगदी खडडयात आंतमध्ये जातात.

<u>शहर अभियंता, श्री. राम जयस्वार :—</u> ज्याठिकाणी मोठा खडड्ा आहे.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—</u> खडी टाकून खडड्ा भरून घ्यावा.

<u>शहर अभियंता, श्री. राम जयस्वार :—</u> रेती मिसळून टाकतो ना.

<u>सदस्या, श्रीम. रेखा ठाकुर:—</u> हिराघाटचा जो मेन खडड्ा आहे तो आतापर्यंत भरलेला नाही. एखादा खडड्ा भरण्यासाठी आपणांस किती कालावधी पाहिजे ते सांगा,

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u> आपण सदस्य ज्या रस्त्यांवरील खडडयांविषयी सांगत आहेत ते संबंधित अधिका—यांनी नोंद घ्यावी व सदर कामे सुरू करावीत.

<u>सदस्या, डॉ. निना नाथानी :—</u> सभापती साहेब, मी असे म्हणेन कि, सदस्य सांगतात तेच का? संबंधित विभागाने स्वत: जावून पाहणी करायला पाहिजे ना.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u> मी आधी सांगितल्याप्रमाणे फक्त स्थायी समितीचे सदस्य सांगतील तेच नाही तर इतर सदस्यांचीदेखील नोंद घ्यावी.

<u>शहर अभियंता, श्री. राम जयस्वार :—</u> निविदा प्रक्रीया झाल्यानंतर....

**<u>सदस्या, श्रीम. रेखा ठाकुरः–</u>** निविदा प्रक्रीया होईपर्यंत आम्ही थांबायचे का? तोपर्यंत लोकं रस्त्यांवर पडली पाहिजेत का?

**<u>शहर अभियंता, श्री. राम जयस्वार :–</u>** कालपासून आम्ही खडड्े भरायला सुरूवात केली आहे.

**<u>सदस्या, श्रीम. रेखा ठाकुरः–</u>** काल तुम्ही काही खडड्े भरले असतील पण जो महत्वाचा मोठा खडडा आहे तो भरलाच नाही अजून, तो भरला पाहिजे ना.

**<u>सदस्य, श्री. गुरूनो वलेचा :–</u>** हिराघाट येथील खडड्ा भरला का?

**<u>सदस्या, डॉ. निना नाथानी :–</u>** काजल पेट्रोल पंपकडून विठठ्लवाडी स्टेशनकडे जाणा–या रस्त्यांवर शांतीनगरला जाणा–या रस्त्यांवर केवढा मोठा खडड्ा आहे, तो खडड्ा भरला आहे का आपण, कारसुध्दा एकदम आत बसते.

**<u>सदस्या, श्रीम. रेखा ठाकुरः–</u>** जे खडड्े मोठे आहेत ते तरी पहिले भरण्यात यावेत.

**<u>कनिष्ठ अभियंता, श्री. जीतू चौथानी :–</u>** रस्त्यांची यादी संगणकाद्वारे नेटवर प्रसिध्द् केली जाईल.

**<u>सदस्य, श्री. गुरूनो वलेचा :–</u>** नेटवर कशाला इथेच यादी देवून टाका ना आम्हाला.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>** खडड्े भरण्यासाठी नियुक्त केलेल्या संस्थेच्या गाडया चोरी झाल्या नाही पाहिजेत.

**<u>सदस्या, श्रीम. अंजली साळवेः–</u>** घरासमोरून गाडी गायब होते, कामपण झालेले नसते, असे उल्हासनगरमध्येच होते आणि कुठे नाही.

**<u>महापालिका सचिव :–</u>** सदर विषय पारीत करण्यात यावा का?

**<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वेः–</u>** सदर विषय पारीत करण्यात यावा.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>** सदर विषयाच्या ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता करण्यात यावी.

**<u>काही सदस्यः–</u>**पास,पास.......

**<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वेः–</u>**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. २ :–** सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत निविदा प्रक्रीया केलेल्या उल्हासनगर–१, प्रभाग समिती क्र.१ मधील रस्त्यामधील खड्डे भरणे या कामाकरिता मे. जयभारत कन्स्ट्रक्शन यांच्या निविदेस मा. स्थायी समितीची मान्यता मिळणेबाबत

<u>प्रस्तावना</u> .

उल्हासनगर महानगरपालिका प्रभाग क्षेत्र क्र.१ मधील मंजुरी मिळालेल्या उल्हासनगर–१, प्रभाग क्र.१ मधील रस्त्यामधील खड्डे भरणे या कामांकरीता बी–१ प्रकारच्या दोन भाग (तांत्रिक व आर्थिक) पध्दतीने नोंदणीकृत ठेकेदारांकडून दिनांक २९/०६/२०१६ रोजी निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्राकलनीय खर्च | रु.३९१८०७२/– |
| २ | निविदा प्रसिध्द केलेली वर्तमानपत्रे | १) दै.नवशक्ती २) दै. हमारा महानगर |
| ३ | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक २९/०६/२०१६ |

| | | |
|---|---|---|
| ४ | निविदा विक्री कालावधी | दिनांक २९/०६/२०१६ ते ०७/०७/२०१६ |
| ५ | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक ०७/०७/२०१६ ते ११/०७/२०१६<br>दोन वेळा मुदतवाढ देण्यात आली आहे.<br>दिनांक २१/०७/२०१६ व २५/०७/२०१६ पर्यंत |
| ६ | तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | दिनांक २७/०७/२०१६ |
| ७ | आर्थिक भाग उघडण्याचा दिनांक | दिनांक २७/०७/२०१६ |
| ८ | विक्री केलेल्या निविदांची संख्या | २ |
| ९ | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | १ |

दिनांक २७/०७/२०१६ रोजी मा.उप आयुक्त (मुख्यालय), मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक, शहर अभियंता यांचे उपस्थितीत उल्हासनगर–१, प्रभाग क्र.१ मधील रस्त्यामधील खड्डे भरणे या कामाच्या निविदेचा तांत्रिक भाग उघडण्यात आला यामध्ये फक्त एकाच निविदाकाराची म्हणजे मे. जयभारत कन्स्ट्रक्शन निविदा प्राप्त झालेली आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ. क्र. | निविदाकाराच्या निविदेमधील बाबी | मे.जय भारत कन्स्ट्रक्शन |
|---|---|---|
| १ | निविदा प्रपत्रकाच्या खरेदीची रक्कम भरलेली आहे का? | होय |
| २ | इसारा रक्कम भरलेली आहे का ? | होय |
| ३ | महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्यात नोंदणी असल्याचे प्रमाणपत्र जोडले आहे का? | होय |
| ४ | निविदा भरतेवेळी निविदाकाराकडुन डांबराचे एकुण ०२ कामे पूर्ण झालेल्या निविदा किंमती पर्यंत अथवा रु.१.०० कोटी पर्यंत मागील ३ वर्षामध्ये इतका सम कामाचा अनुभवाचा दाखला. | होय |
| ५ | निविदाकाराने वार्षिक उलाढाल रु.१.०० कोटी पर्यंत मागील ३ वर्षात असल्याचे चार्टड अकाउंटट मार्फत दिलेले प्रमाणपत्र | होय |
| ६ | जॉईंट व्हेंचर (Not Allowed) | होय |
| ७ | विक्रीकर/व्हॅट रिर्टन भरण्याची पावती | होय |
| ८ | निविदाकाराकडे उपलब्ध असलेल्या तांत्रिक कर्मचा–यांची माहिती | होय |
| ९ | प्लांट मशिनरी, ॲसफाल्ट प्लांट, व्हायब्रेटर रोलर, स्टॅटीक रोल्ट, पेव्हर फिनिशर यांची मालकी व असल्याचे दस्तऐवज व तसेच सदर ॲसफाल्ट प्लांट हे उमपा मुख्य कार्यालयापासून ३० किलोमीटरचे आत असल्याचे प्रमाणपत्र | होय |

सदर निविदांची सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये छाननी समिती मार्फत छाननी केली असता १) **मे. जयभारत कन्स्ट्रक्शन** यांच्या निविदा अटी शर्तीनुसार पात्र असून व रस्ता दुरुस्ती जसे की डांबरीकरणाने रस्त्यामधील खड्डे भरणे सदरचे काम अत्यंत आवश्यक असल्यामुळे तरी उपरोक्त निविदाकारांच्या निविदांचा दुसरा भाग उघडण्यात प्रस्तावित करण्यात आले.

आज दिनांक २७/०७/२०१६ रोजी उपरोक्त निविदाकारांचा आर्थिक बाबींचा दुसरा भाग (आर्थिक दर) मा. अतिरिक्त आयुक्त सो., यांचे अध्यक्षतेखालील निवड समिती सदस्य मुख्य लेखाअधिकारी, मुख्य लेखापरिक्षक, शहर अभियंता, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे उपस्थितीत उघडण्यात आला. त्याप्रमाणे निविदाकांरानी दिलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

१) मे. जय भारत कन्स्ट्रक्शन — दिलेले दर १०.०० टक्के जास्त

उपरोक्त **उल्हासनगर–१, प्रभाग समिती क्र.१ मधील रस्त्यामधील खड्डे भरणे** या कामाचे उक्त निविदाकारांपैकी **मे. जयभारत कन्स्ट्रक्शन** या सर्वात कमी दराच्या निविदाकारांशी निविदा समितीने चर्चा करुन दर कमी करण्यास वाटाघाटी करणेबाबत या विभागामार्फत दिनांक २७/०७/२०१६ रोजी पत्र देण्यात आले होते. तरी सदर पत्राच्या अनुषंगाने **मे. जयभारत कन्स्ट्रक्शन** यांनी आपल्या पत्रामध्ये नमुद केले आहे की, निविदेत भरलेले १०.०० टक्के जादा दर योग्य आहेत. तरी **मे. जयभारत कन्स्ट्रक्शन** यांनी वाटाघाटीअंती दरसूचीप्रमाणे (At Par) दिले असुन दि.२८/०७/२०१६ रोजी पत्र दिले आहे.

तरी **मे. जयभारत कन्स्ट्रक्शन** यांनी दरसूचीप्रमाणे (At Par) दिलेल्या दराचे निविदेस मा. स्थायी समितीची मिळणेकरिता प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. ४९ — दिनांकः– ४/८/२०१६

सुचकाचे नाव :– श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत निविदा प्रक्रीया केलेल्या उल्हासनगर–१, प्रभाग समिती क्र. १ मधील रस्त्यामधील खड्डे भरणे या कामाकरिता निविदाकार मे. जय भारत कन्स्ट्रक्शन यांनी दरसूचीप्रमाणे (**At Par**) दिलेल्या दराचे निविदेस मान्यता देत आहे.

**परंतु**

सदर कामाची गुणवत्ता तपासणेचे काम प्रशासनाचे राहील.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहत थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. ३** :– सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत निविदा प्रक्रीया केलेल्या उल्हासनगर–२,३ प्रभाग समिती क्र.२ मधील रस्त्यामधील खड्डे भरणे या कामाकरिता मे. जय भारत कन्स्ट्रक्शन यांच्या निविदेस मा. स्थायी समितीची मान्यता मिळणे.

---

सदस्या, श्रीम. रेखा ठाकुरः– जे मोठे मोठे खडड्े आहेत ते आधी भरा.

महापालिका सचिव :– सदर विषय पारीत करण्यात यावा का?

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :– सदर विषयाच्या ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता करण्यात यावी.

काही सदस्य :–पास–पास……

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑

**विषय क्र. ३ :— सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत निविदा प्रक्रीया केलेल्या उल्हासनगर—२,३ प्रभाग समिती क्र.२ मधील रस्त्यामधील खड्डे भरणे या कामाकरिता मे. जय भारत कन्स्ट्रक्शन यांच्या निविदेस मा. स्थायी समितीची मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिका प्रभाग क्षेत्र क्र.२ मधील मंजुरी मिळालेल्या उल्हासनगर—२, ३ प्रभाग समिती क्र.२ मधील रस्त्यामधील खड्डे भरणे या कामांकरीता बी—१ प्रकारच्या दोन भाग (तांत्रिक व आर्थिक) पध्दतीने नोंदणीकृत ठेकेदारांकडून दिनांक २९/०६/२०१६ रोजी निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्राकलनीय खर्च | रु.६३८३२४८/— |
| २ | निविदा प्रसिध्द केलेली वर्तमानपत्रे | १) दै.नवशक्ती २) दै. हमारा महानगर |
| ३ | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक २९/०६/२०१६ |
| ४ | निविदा विक्री कालावधी | दिनांक २९/०६/२०१६ ते ०७/०७/२०१६ |
| ५ | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक ०७/०७/२०१६ ते ०८/०७/२०१६ |
| ६ | तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | दिनांक १२/०७/२०१६ ते १५/०७/२०१६ |
| ७ | आर्थिक भाग उघडण्याचा दिनांक | दिनांक २०/०७/२०१६ |
| ८ | विक्री केलेल्या निविदांची संख्या | ३ |
| ९ | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ३ |

दिनांक १५/०७/२०१६रोजी मा.उप आयुक्त (मुख्यालय), मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक, शहर अभियंता यांचे उपस्थितीत उल्हासनगर—२,३, प्रभाग समिती क्र.२ मधील रस्त्यामधील खड्डे भरणे या कामाच्या निविदेचा तांत्रिक भाग उघडण्यात आला त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ. क्र. | निविदाकाराच्या निविदेमधील बाबी | मे.जय हिंद रोड बिल्डर्स | मे. जय भारत कन्स्ट्रक्शन | मे.झा.पी.ॲण्ड कंपनी |
|---|---|---|---|---|
| १ | निविदा प्रपत्रकाच्या खरेदीची रक्कम भरलेली आहे का? | होय | होय | होय |
| २ | इसारा रक्कम भरलेली आहे का ? | होय | होय | होय |
| ३ | महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्यात नोंदणी असल्याचे प्रमाणपत्र जोडले आहे का? | होय | होय | होय |
| ४ | निविदा भरतेवेळी निविदाकाराकडुन डांबराचे एकुण ०२ कामे पूर्ण झालेल्या निविदा किंमती पर्यंत अथवा | होय | होय | होय |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | रु.१.०० कोटी पर्यंत मागील ३ वर्षामध्ये इतका सम कामाचा अनुभवाचा दाखला. | | | |
| ५ | निविदाकाराने वार्षिक उलाढाल रु.१.०० कोटी पर्यंत मागील ३ वर्षात असल्याचे चार्टड अकाउंटट मार्फत दिलेले प्रमाणपत्र | होय | होय | होय |
| ६ | जॉईंट व्हेंचर (Not Allowed) | - | - | - |
| ७ | विक्रीकर/व्हॅट रिर्टन भरण्याची पावती | होय | होय | होय |
| ८ | निविदाकाराकडे उपलब्ध असलेल्या तांत्रिक कर्मचा—यांची माहिती | होय | होय | होय |
| ९ | प्लांट मशिनरी, ॲसफाल्ट प्लांट, व्हायब्रेटर रोलर, स्टॅटीक रोल्ट, पेव्हर फिनिशर यांची मालकी व असल्याचे दस्तऐवज व तसेच सदर ॲसफाल्ट प्लांट हे उमपा मुख्य कार्यालयापासून ३० किलोमीटरचे आत असल्याचे प्रमाणपत्र | होय | होय | होय |

सदर निविदांची सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये छाननी समिती मार्फत छाननी केली असता **१) मे. जय हिंद रोड बिल्डर्स २) मे. जय भारत कन्स्ट्रक्शन ३) मे. मे.झा.पी.ॲण्ड कंपनी** यांच्या निविदा अटी शर्तीनुसार असल्याने पात्र आहेत. तरी उपरोक्त निविदाकारांच्या निविदांचा दुसरा भाग उघडण्यात प्रस्तावित करण्यात आले.

आज दिनांक २०/०७/२०१६ रोजी उपरोक्त निविदाकारांचा आर्थिक बाबींचा दुसरा भाग (आर्थिक दर) मा. अतिरिक्त आयुक्त सो., यांचे अध्यक्षतेखालील निवड समिती सदस्य मुख्य लेखाअधिकारी, मुख्य लेखापरिक्षक, शहर अभियंता, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे उपस्थितीत उघडण्यात आला. त्याप्रमाणे निविदाकांरानी दिलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| **१) मे. जय हिंद रोड बिल्डर्स** | दिलेले दर ४.९५ टक्के जास्त |
| **२) मे. जय भारत कन्स्ट्रक्शन** | दिलेले दर दरसूचीप्रमाणे |
| **३) मे. मे.झा.पी.ॲण्ड कंपनी** | दिलेले दर ११.११ टक्के जास्त |

उपरोक्त उल्हासनगर—२,३, प्रभाग समिती क्र.२ मधील रस्त्यामधील खड्डे भरणे या कामाचे उक्त निविदाकारांपैकी मे. जय भारत कन्स्ट्रक्शन यांनी दरसूचीप्रमाणे दर (At Par) दिले आहेत. **मे. जयभारत कन्स्ट्रक्शन** यांना दिनांक ०२/०७/२०१६ रोजी दर कमी करण्याकरिता या विभागामार्फत पत्र देण्यात आले होते. सदर पत्राला अनुसरुन मे. जय भारत कन्स्ट्रक्शन ने पेट्रोल, डिझेल व डांबराचे मार्केट वर जास्त असल्याने त्यांनी भरलेले दर कमी न करता दरसूचीप्रमाणे दरावर (At Par) काम देण्यास विनंती केली आहे.

तरी **मे. जय भारत कन्स्ट्रक्शन** या निविदाकाराने दिलेल्या दरसूचीप्रमाणेच्या दराचे निविदेस मा. स्थायी समितीचे मान्यतेसाठी प्रस्तावित

स्थायी समिती ठराव क्र. ५० दिनांक:— ४/८/२०१६

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर
अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत निविदा प्रक्रीया केलेल्या उल्हासनगर—२,३ प्रभाग समिती क्र.२ मधील रस्त्यामधील खड्डे भरणे या कामाकरिता निविदाकार मे. जय भारत कन्स्ट्रक्शन यांनी दरसूचीप्रमाणे (**At Par**) दिलेल्या दराचे निविदेस मान्यता देत आहे.

परंतु

सदर कामाची गुणवत्ता तपासणेचे काम प्रशासनाचे राहील.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहत थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्रमांक. ४ वाचून दाखवितात.

---

⇨ विषय क्र. ४ :— सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत निविदा प्रक्रीया केलेल्या उल्हासनगर—४ प्रभाग समिती क्र.३ मधील रस्त्यामधील खड्डे भरणे या कामाकरिता मे. झा.पी.ॲण्ड कंपनी यांच्या निविदेस मा. स्थायी समितीची मान्यता मिळणेबाबत.

---

<u>**सदस्या, श्रीम. अंजली साळवे :—**</u> सदर कंपनीचा मागील कामाचा अनुभव चांगला नाही. आमचे फोन उचलत नाहीत, कामे करत नाहीत, माझा विरोध आहे या विषयाला.

<u>**सदस्या, श्रीम. रेखा ठाकुर:—**</u> माझीदेखील हरकत आहे. कंपनीने केलेल्या मागील वर्षाच्या कामाचे लेखा परिक्षण झाले आहे का?

<u>**सदस्य, श्री. गुरूनो वलेचा :—**</u> मागील वर्षाचे काम प्रलंबित आहे.

<u>**सदस्या, श्रीम. रेखा ठाकुर:—**</u> मागील वर्षाच्या कामाचे लेखापरिक्षण प्रलंबित आहे तरीसुध्दा याच कंपनीला आता काम काम दिले जात आहे.

<u>**सदस्या, श्रीम. अंजली साळवे:—**</u> कंपनीला देण्यात आलेले प्रमाणपत्र आम्हालासुध्दा दाखवा. मुंबईचे उदाहरण आपण बघत आहोत, सदर कंपनीचा मागील वर्षाचा अनुभव खुप वाईट आहे. फोन उचलत नाही. ई—टेंडरींगसाठी कंपनीने सादर केलेली सर्व कागदपत्र आम्हाला पाहायची आहेत. आमच्या नजरेखालून जावू दया.

<u>**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—**</u> ज्या सदस्यांना सदर कंपनीची कागदपत्र पाहायची असतील त्यांना सार्व. बांधकाम विभागाने आपल्या विभागात ती ताबडतोब दाखवून दयावीत.

<u>**श्रीम. विजया कंठे, उप—आयुक्त (मुख्यालय) तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :—**</u> संबंधित कंपनीची सार्व.बांधकाम विभागात संचिकाच दाखवून देवू ना.

<u>**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—**</u> संचिका मागवून घेतली तरी चालेल.

<u>**सदस्या, श्रीम. अंजली साळवे:—**</u> चांगली गोष्ट आहे कारण की, आता मुंबईचे उदाहरणच पहा ना.

<u>**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—**</u> संपूर्ण संचिका सदस्यांना दाखवून दया. कारण ज्या लोकांना मागच्यावेळेस त्रास झाला होता त्यांना संचिका दाखवा.

<u>**सदस्या, श्रीम. अंजली साळवे:—**</u> मागील वर्षी या संस्थेला काम दिले होते, मागील वर्षाचा अनुभव चांगला नाही तसेच आमच्या प्रभागातील कामपण झालेले नाही. मालाचा योग्य वापर करत नव्हता, फोनदेखील उचलत नव्हता.

<u>**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—**</u> ही तक्रार रास्त आहे कि फोन उचलत नाही. त्याबाबत खुलासा व्हावा.

<u>**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—**</u> सदरहु जबाबदारी ही अधिका—याची आहे.

<u>**सदस्य, श्री. गुरूनो वलेचा :—**</u> श्री. अश्विनी अहुजा, कनिष्ठ अभियंता, हेदेखील कधी फोन उचलत नाहीत.

<u>**सदस्या, श्रीम. अंजली साळवे:—**</u> कुठेही काम चालू असते त्यावेळेस कोणताही अधिकारी येवून त्याची पाहणी करत नाही. आम्हाला लक्ष दयायला लागते कसे काम होत आहे ते.

<u>**सदस्य, श्री. गुरूनो वलेचा :—**</u> कोणत्या अधिका—याला आतापर्यंत आपण पत्र दिले आहे.

<u>**सदस्या, श्रीम. रेखा ठाकुर:—**</u> हे बघा, आम्ही रस्त्यावरील खडड्े भरण्याच्या विरोधात नाही. ते भरले पाहिजेत.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :–</u> सदर मुद्दा सन्मा. सदस्या श्रीम, अंजली साळवे यांनी उपस्थित केला आहे. आणि त्या ज्याठिकाणचा अनुभव सांगत होत्या ती बाब प्रभाग समिती क्र. ४ ची होती. आणि आता सदर कंपनीला जे काम देण्याचा विषय आहे तो प्रभाग समिती क्र. ३ चा आहे. त्यामुळे आपण प्रभाग समिती क्र. ३ च्या विषयास का विरोध करायचा.

<u>सदस्या, श्रीम. अंजली साळवे:–</u> आम्ही आमचा अनुभव सांगत आहोत.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :–</u> सदर विषय हा प्रभाग समिती क्र. ३ चा आहे. प्रभाग समिती क्र. ४ चा असता तर त्यांस आपला विरोध समजू शकतो. अधिकारी लक्ष देत नाहीत त्यांनाच टाईट केले पाहिजे.

<u>सदस्य, श्री. गुरूनो वलेचा :–</u> रस्त्यांवरील खडड्े भरण्याचे काम होत नाही तर हे पहाणे अधिका–यांचे काम आहे.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :–</u> प्रत्येक कामाच्याठिकाणी अधिकारी हजर असले पाहिजेत.

<u>सदस्य, श्री. गुरूनो वलेचा :–</u> अधिकारी कुठे असतात, कधीच नसतात.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :–</u> कामाच्याठिकाणी काहीतरी सुपरविझन असले पाहिजे.

<u>सदस्या, श्रीम. रेखा ठाकुर:–</u> काल काही ठिकाणी रस्त्यांवरील खडड्े भरण्याचे काम झाले त्याठिकाणी आपला एकही अधिकारी नव्हता.

<u>शहर अभियंता , श्री. राम जयस्वार:–</u> आमच्याकडे मनुष्यबळ खुप कमी आहे त्यामुळे प्रत्येक ठिकाणी आपला अधिकारी उपस्थित राहणे शक्य नाही.

<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिहं भुल्लर :–</u> म्हणजे आपण काम करणार नाही का, खडड्े भरणार नाही का? जसे आपण म्हणता कि आमच्याकडे अधिकारी/कर्मचारी नाहीत.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :–</u> आपल्याकडे कर्मचारी नसतील तर ठेका पध्दतीने कर्मचारी उपलब्ध करून घ्या ना.

<u>सदस्या, डॉ. निना नाथानी :–</u> शहरातील एक रस्ता दाखवा जेथून आपण सुरक्षित प्रवास करू शकतो. एकही रस्ता असा नाही जेथे खडड्े नाहीत. इथे खडडयातून रस्ता काढायचा आहे.

<u>शहर अभियंता , श्री. राम जयस्वार:–</u> आता आम्ही चांगल्या पध्दतीने खडड्े भरणार आहोत.

<u>सदस्य, श्री. गुरूनो वलेचा :–</u> शहर अभियंता साहेब, तुमच्यावर आम्ही विश्वास ठेवतो.

<u>महापालिका सचिव :–</u> सदर विषय पारीत करण्यात यावा का?

<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिहं भुल्लर :–</u> सदर विषयाच्या ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता करण्यात यावी.

<u>महापालिका सचिव :–</u> सन्मा. सदस्या, श्रीम. अंजली साळवे महोदया यांचा विरोध आहे,काय करावे?

<u>सदस्या, श्रीम. अंजली साळवे:–</u> हो, त्याने मागच्यावेळेस आमच्या प्रभागात चांगले काम केलेले नाही.

<u>महापालिका सचिव :–</u> सदर विषय पारीत करण्यात यावा का?

<u>सदस्या, श्रीम. अंजली साळवे:–</u> माझा विरोध दर्शविण्यात यावा.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u> सदर विषयावर मतदान घेण्यात यावे.

<u>महापालिका सचिव :–</u> जे सदस्य सदर प्रस्तावाच्या बाजुने असतील त्यांनी हात वर करावा.

<u>खालिल सदस्य प्रस्तावाच्या बाजूने आहेत.</u>

१. श्री. सुनिल मुकुंद सुर्वे
२. श्रीमती जया प्रकाश माखिजा
३. श्रीमती लिलाबाई आशान

४. श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर
५. श्री. गुरुनो भिकोमल वलेचा
६. श्री. जमनादास पुरस्वानी
७. श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग
८. श्रीमती रेखा अशोक ठाकुर
९. श्रीमती पुष्पाताई नाना बागुल
१०.डॉ. निना प्रकाश नाथानी
११.श्रीमती वंदना पाटील उर्फ वंदना युवराज भदाणे

खालिल सदस्य प्रस्तावाच्या विरोधात आहेत.

श्रीम. अंजली साळवे

महापालिका सचिव :— सदरचा विषय बहुमताने पारीत करण्यात येत आहे.

काही सदस्य :—पास—पास......

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑

विषय क्र. ४ :— सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत निविदा प्रक्रीया केलेल्या उल्हासनगर—४ प्रभाग समिती क्र.३ मधील रस्त्यामधील खड्डे भरणे या कामाकरिता मे. झा.पी.ॲण्ड कंपनी यांच्या निविदेस मा. स्थायी समितीची मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिका प्रभाग क्षेत्र क्र.३ मधील मंजुरी मिळालेल्या उल्हासनगर—४ प्रभाग समिती क्र. ३ मधील रस्त्यामधील खड्डे भरणे या कामांकरीता बी—१ प्रकारच्या दोन भाग (तांत्रिक व आर्थिक) पध्दतीने नोंदणीकृत ठेकेदारांकडून दिनांक २९/०६/२०१६ रोजी निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्राकलनीय खर्च | रु.८५२०५८६/— |
| २ | निविदा प्रसिध्द केलेली वर्तमानपत्रे | १) दै.नवशक्ती २) दै. हमारा महानगर |
| ३ | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक २९/०६/२०१६ |
| ४ | निविदा विक्री कालावधी | दिनांक २९/०६/२०१६ ते ०७/०७/२०१६ |
| ५ | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक ०७/०७/२०१६ ते ०८/०७/२०१६ |
| ६ | तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | दिनांक १२/०७/२०१६ ते १५/०७/२०१६ |
| ७ | आर्थिक भाग उघडण्याचा दिनांक | दिनांक २०/०७/२०१६ |

| | | |
|---|---|---|
| ८ | विक्री केलेल्या निविदांची संख्या | ३ |
| ९ | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ३ |

दिनांक १५/०७/२०१६रोजी मा.उप आयुक्त (मुख्यालय), मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक, शहर अभियंता यांचे उपस्थितीत उल्हासनगर–४, प्रभाग समिती क्र.३ मधील रस्त्यामधील खड्डे भरणे या कामाच्या निविदेचा तांत्रिक भाग उघडण्यात आला त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ. क्र. | निविदाकाराच्या निविदेमधील बाबी | मे.जय हिंद रोड बिल्डर्स | मे. जय भारत कन्स्ट्रक्शन | मे.झा.पी.ॲण्ड कंपनी |
|---|---|---|---|---|
| १ | निविदा प्रपत्रकाच्या खरेदीची रक्कम भरलेली आहे का? | होय | होय | होय |
| २ | इसारा रक्कम भरलेली आहे का ? | होय | होय | होय |
| ३ | महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्यात नोंदणी असल्याचे प्रमाणपत्र जोडले आहे का? | होय | होय | होय |
| ४ | निविदा भरतेवेळी निविदाकाराकडुन डांबराचे एकुण ०२ कामे पूर्ण झालेल्या निविदा किंमती पर्यंत अथवा रु.१.०० कोटी पर्यंत मागील ३ वर्षामध्ये इतका सम कामाचा अनुभवाचा दाखला. | होय | होय | होय |
| ५ | निविदाकाराने वार्षिक उलाढाल रु.१.०० कोटी पर्यंत मागील ३ वर्षात असल्याचे चार्टड अकाउंटट मार्फत दिलेले प्रमाणपत्र | होय | होय | होय |
| ६ | जॉईंट व्हेंचर (Not Allowed) | होय | होय | होय |
| ७ | विक्रीकर/व्हॅट रिर्टन भरण्याची पावती | होय | होय | होय |
| ८ | निविदाकाराकडे उपलब्ध असलेल्या तांत्रिक कर्मचा–यांची माहिती | होय | होय | होय |
| ९ | प्लांट मशिनरी, ॲसफाल्ट प्लांट, व्हायब्रेटर रोलर, स्टॅटीक रोल्ट, पेव्हर फिनिशर यांची मालकी व असल्याचे दस्तऐवज व तसेच सदर ॲसफाल्ट प्लांट हे उमपा मुख्य कार्यालयापासून ३० किलोमीटरचे आत असल्याचे प्रमाणपत्र | होय | होय | होय |

सदर निविदांची सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये छाननी समिती मार्फत छाननी केली असता १) **मे. जय हिंद रोड बिल्डर्स** २) **मे. जय भारत कन्स्ट्रक्शन** ३) **मे. मे.झा.पी.ॲण्ड कंपनी** यांच्या निविदा अटी शर्तीनुसार असल्याने पात्र आहेत. तरी उपरोक्त निविदाकारांच्या निविदांचा दुसरा भाग उघडण्यात प्रस्तावित करण्यात आले.

आज दिनांक २०/०७/२०१६ रोजी उपरोक्त निविदाकारांचा आर्थिक बाबींचा दुसरा भाग (आर्थिक दर) मा. अतिरिक्त आयुक्त सो., यांचे अध्यक्षतेखालील निवड समिती सदस्य मुख्य लेखाअधिकारी, मुख्य लेखापरिक्षक, शहर अभियंता, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे उपस्थितीत उघडण्यात आला. त्याप्रमाणे निविदाकांरानी दिलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| **१) मे. जय हिंद रोड बिल्डर्स** | दिलेले दर ११.७० टक्के जास्त |
| **२) मे. जय भारत कन्स्ट्रक्शन** | दिलेले दर १०.०० टक्के जास्त |
| **३) मे. झा.पी.ॲण्ड कंपनी** | दिलेले दर ९.९९ टक्के जास्त |

उपरोक्त **उल्हासनगर–४, प्रभाग समिती क्र.३ मधील रस्त्यामधील खड्डे भरणे** या कामाचे उक्त निविदाकारांपैकी **मे. झा.पी.ॲण्ड कंपनी** या सर्वात कमी दराच्या निविदाकारांशी निविदा समितीने चर्चा करुन दर कमी

करण्यास वाटाघाटी करणेबाबत या विभागामार्फत दिनांक ०२/०७/२०१६ रोजी पत्र देण्यात आले होते. तरी सदर पत्राच्या अनुषंगाने **मे. झा.पी.ॲण्ड कंपनी** यांनी आपल्या पत्रामध्ये नमुद केले आहे की, निविदेत भरलेले ९.९९ टक्के जादा दर योग्य आहेत. तरी मे. झा.पी.ॲण्ड कंपनी यांनी वाटाघाटीअंती दरसूचीप्रमाणे (At Par) दिले असुन दि. २२/०७/२०१६ रोजी पत्र दिले आहे.

तरी **मे. झा.पी.ॲण्ड कंपनी** यांनी दरसूचीप्रमाणे (At Par) दिलेल्या दराचे निविदेस मा. स्थायी समितीची मिळणेकरिता प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. ५१ दिनांकः— ४/८/२०१६

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत निविदा प्रक्रीया केलेल्या उल्हासनगर—४ प्रभाग समिती क्र.३ मधील रस्त्यामधील खड्डे भरणे या कामाकरिता निविदाकार मे. झा.पी.ॲण्ड कंपनी य यांनी दरसूचीप्रमाणे (At Par) दिलेल्या दराचे निविदेस मान्यता देत आहे

परंतु

सदर कामाची गुणवत्ता तपासणेचे काम प्रशासनाचे राहील.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहत थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

बहुमताने

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ५ :—** सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत निविदा प्रक्रीया केलेल्या उल्हासनगर—४ प्रभाग समिती क्र.४ मधील रस्त्यामधील खड्डे भरणे या कामाकरिता मे. साईसिध्दनाथ कन्स्ट्रक्शन यांच्या निविदेस मा. स्थायी समितीची मान्यता मिळणे.

---

सदस्या, श्रीम. अंजली साळवेः— सदर प्रभागासाठी मागच्यावेळेस कोणाला काम दिलेले होते.

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :— सन्मा. सदस्या ज्या सांगत आहेत कि, मे. साईसिध्दनाथ कंपनी जी आहे त्यांचे थर्डपार्टी ऑडीट सुरू आहे. आणि ऑडीट पुर्ण झालेले नाही. या कंपनीने आधीसुध्दा एक काम घेतले जाते. सन्मा.सदस्य श्री. दिपक सिरवानी यांच्या प्रभागातील, काम घेताना प्रस्तावित निविदा दरापेक्षा कमी दर भरतात आणि काम मिळाल्यानंतर एक—एक महिना, सहा—सहा महिने काम करत नाहीत. सदर कंपनीने काम केले नाही त्यानंतर सार्व. बांधकाम विभागाकडून सदरचे काम कमी दर देणा—या दुस—या क्रमांकावरील कंपनीस हे काम दिले. आता यामध्ये अशी माहिती दया कि, हया कंपनीला आजपर्यंत किती कामे दिली व ती त्यांनी केली नाहीत.

<u>सदस्या, श्रीम. अंजली साळवेः— </u> डिसेंबर २०१४ मध्ये रस्ते केले आहेत. रस्त्यांचा खर्च रू. ३ कोटी २० लाख झाला आणि तो पाण्यात गेला.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—</u> मे. साई सिध्दनाथ कन्स्ट्रक्शन कंपनीने कितीतरी मोठ मोठी कामे घेतली होती आणि कुठे कुठे अर्धवट काम सोडून दिले, कामच केली नाहीत याची आपण माहिती दया. राधास्वामी सतसंग जवळील रस्त्याचे काम होते व अशी इतर काही कामे होती ती या कंपनीने केली नाहीत त्यानंतर सहा—सहा महिने वाट पाहून मग दुस—या कंपनीस देण्यात आली.

<u>सदस्या, श्रीम. अंजली साळवेः— </u> डिसेंबर २०१४ मध्ये रस्त्याचे काम केले होते ते खरे आहे का?

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—</u> आपण विषय आणला आहे तर मग विषयाशी संबंधित सर्व माहिती तर आपल्याला सभागृहासमोर मांडावी लागेलच ना. आपण आज प्रभाग समिती क्र. १,२,३ व ४ साठी विषय आणले आहेत त्यात प्रभाग समिती क्र. १,२ व ३ साठी ज्या कंपनींनी निविदा भरली आहे त्यांनी ॲट पार दर दिले आहेत आणि याच कंपनीने प्रभाग समिती क्र. ४ साठी निविदेतील दरापेक्षा कमी दर दिले आहेत. आता कमी दर भरून याला काम मंजूर केल्यानंतर सदर ठेकेदार कार्यादेश घ्यायलाच येणार नाही, सहा—सहा महिने कामच सुरू करणार नाहीत. मग आपण काय करणार, गणपती उत्सवामध्ये त्याचप्रमाणे पावसाळयात खडडे् पडतील त्याचे आपण काय करणार? मग तुम्ही सदर ठेकेदार काम करेल म्हणून वाट बघाल, तोपर्यंत दिपावली येईल, त्यानंतर तुम्ही दुस—या ठेकेदारास हे काम दयाल. कधीपर्यंत वाट पहायची, त्याचा मागचा अहवाल घ्या ना, सहा—सहा महिने त्याने त्याला दिलेली कामे केलेली नाहीत.

<u>शहर अभियंता , श्री. राम जयस्वारः— </u> आम्ही वाट पाहणार नाही आणि नियमानुसार कारवाई करणार.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—</u> या अगोदर आपण काय कारवाई केली. सहा महिने आठ महिने वाट पाहिली आणि त्यानंतर दुस—या क्रमांकावरील ठेकेदाराला काम दिले. आपण त्यावर काही कारवाई नाही केली, संबंधित कंपनीला काळया यादीत टाकले नाही, त्याला कोणतीही नोटीस दिली नाही. आता आपण काय करणार? जो ठेकेदार काम करत नाही, त्याच्यावर काहीतरी कारवाई झाली पाहिजे ना, त्याला काळया यादीत टाकले पाहिजे होते ना,

<u>सदस्या, श्रीम. रेखा ठाकुरः— </u> माझ्यामते सदर ठेकेदाराला काळया यादीत टाकले आहे.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—</u> सन्मा. सदस्या, श्रीम. रेखा ठाकूर इतक्या वेळा म्हणतात कि, सदर ठेकेदाराला काळया यादीत टाकले आहे. तर इतर सदस्य काय समजतील, काम नाही झाले म्हणजे काळया यादीत टाकले असेल, पण तुम्हाला माहिती असेल काळया यादीत टाकणेसाठी कितीतरी बाबींची पुर्तता करावी लागते ते सहज शक्य नाही. कितीतरी नियम पहावे लागतात, नोटीसा दयाव्या लागतात, अशाप्रकारचे ठेकेदार काम घेवून बसतील आणि महापालिकेला ,सदस्यांना त्रास देतील. तर शहराचे काम कसे होईल. यात आपण असे करा, सदर कंपनीने आजपासून तीन दिवसांत इएमडी भरून कार्यादेश घ्यावा. जर इएमडी भरून तीन दिवसांत काम नाही घेतले तर दुस—या क्रमांकावरील ठेकेदाराला ॲट पारमध्ये हे काम दयायचे. माझे असेच मत आहे.

<u>सदस्या, श्रीम. रेखा ठाकुरः— </u> दरवर्षीचा ही अडचण आहे, प्रत्येकवेळेला असे ठेकेदार निविदा भरतात, कामाच्या निविदा प्रसिध्द करताना त्यात काहीतरी अटी शर्ती तयार केल्या पाहिजेत ना.

<u>सदस्या, श्रीम. अंजली साळवेः— </u> सदर ठेकेदाराने आपल्या प्रभागातील काम केव्हा केले आहे, डिसेंबरमध्ये केले आहे ना. डिसेंबर पासून किती महिने झाले सहा महिने झाले ना. रस्त्यावरील भरण्यात आलेले खडडे् किती कालावधीपर्यंत चालले पाहिजेत.

<u>शहर अभियंता , श्री. राम जयस्वारः— </u> ६—६ महिन्यांत खडडे् भरले जातात, आणि नविन रस्ता १ ते २ वर्षांनी केला जातो.

<u>सदस्या, श्रीम. रेखा ठाकुरः— </u> रस्त्यावरील खडडे् भरण्याचे काम तातडीने सुरू झाले पाहिजे.

<u>सदस्या, श्रीम. अंजली साळवेः— </u> माझ्या घराजवळील खडडे् भरले जात नाहीत किती खेदाची गोष्ट आहे.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—</u> सदरचे काम हे न्युनतम दर सादर करणा—या दुस—या क्रमांकावरील कंपनीस हे काम देण्यात यावे.

<u>सदस्या, श्रीम. रेखा ठाकुर:—</u> आपण म्हणता या ठेकेदाराने काम नाही केले तर दुस—या क्रमांकावरील कंपनीस हे काम देण्यात येईल तर मग त्याचे कागदपत्र पाहावी लागतील.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—</u> आपण असे करू कि या कंपनीने तीन दिवसांत इएमडी भरून कार्यादेश घेतला नाही तर दुस—या क्रमांकावरील कंपनीस हे काम देण्यात यावे असा ठराव करू मग पुन्हा सदर विषय सभेपुढे आणायची गरज नाही.

<u>सदस्या, श्रीम. अंजली साळवे:—</u> एकदम नाही, पुर्णपणे घाणेरडे काम केले आहे. तुम्ही पाहिले असेल रस्त्याची काय अवस्था आहे ते.

<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u> तीन दिवसांत इएमडी भरून कामास सुरूवात नाही केली तर दुस—या क्रमांकावरील कंपनीस हे काम देण्यात यावे.

<u>सदस्या, श्रीम. अंजली साळवे:—</u> सदर विषयाला माझा विरोध आहे.

<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u> सदर विषय सभेत पुन्हा आणण्याची गरजच नाही.

<u>शहर अभियंता , श्री. राम जयस्वार:—</u> दुस—या क्रमांकावरील न्युनतम दर सादर करणा—या कंपनीमध्ये खुपच वेगळेपणा आहे.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—</u> सदर ठेकेदाराचा तसा अहवाल आहे, १० टक्के, १५ टक्के कमी दराने काम घेतो आणि काम पूर्ण करत नाही. वर्षभर वाट पाहिली, इएमडी भरली नाही कि कार्यादेश घेतला नाही, त्यानंतर मग काम सोडून दिले. तरीसुध्दा त्याला तीन दिवस देत आहोत जर त्याला काम करायचे असेल तर त्याने कार्यादेश घ्यावा.

<u>सदस्या, श्रीम. रेखा ठाकुर:—</u> निविदा प्रक्रीयेद्वारे निविदा भरताना काही अटी व शर्ती टाकत नाहीत का, जेणेकरून अशा कंपनी निविदाच भरणार नाहीत.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—</u> अशा ठेकेदाराना काळया यादीत टाकले पाहिजे ना.

<u>सदस्या, श्रीम. अंजली साळवे:—</u> सर्व कामे अशीच होतात. कामात कुठेच व्यवस्थितपणा नाही, कुठे बरोबर स्लोप नाही काही नाही.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—</u> जर या कंपनीने प्रस्तावित दरापेक्षा कमी दर दिले आहेत तर यात आपण आता काय करायचे.

<u>शहर अभियंता , श्री. राम जयस्वार:—</u> त्या सर्व कंपन्यांच्या देयकातील रक्कमा जप्त केल्या जातील, रक्कमेच्याबाबतीतील शासननिर्णयानुसार संबंधित कंपनीला काळया यादीत टाकण्याची कार्यवाही केली जाईल. प

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—</u> यापुर्वी या कंपनीने कार्यादेश घेवूनसुध्दा काम केलेले नाही, असे असू शकेल कि त्यावेळेस तुम्ही नव्हता दुसरे कोणी अधिकारी होते, त्यांनी त्यांचेवर कारवाई केली नाही तर आता आपणसुध्दा त्यांनी मागे सहा सहा महिने कामे घेवून पुर्ण न केल्यामुळे त्यांच्यावर कारवाई करू शकता ना. कोणीही ठेकेदार असो, संपूर्ण शहरात, ज्याने १ वर्ष, २ वर्ष, पासून कार्यादेश घेवून ठेवले आहेत आणि काम पुर्ण केले नाही. त्यांना नोटीस दया ना.

<u>सदस्या, श्रीम. अंजली साळवे:—</u> जो ठेकेदार बरोबर काम करत नाही त्यांना तर काम दयायलाच नको.

<u>शहर अभियंता , श्री. राम जयस्वार:—</u> आमच्या इथे खुप निविदा निघत असतात त्यामुळे अशा लोकांना....

<u>सदस्या, डॉ. निना नाथानी :—</u> जे ठेकेदार काळया यादीत टाकले आहेत त्यांची यादी आपण प्रथम प्रसिध्द् करावी. आम्हाला कसे कळेल कि काय चालले आहे ते. त्यामुळे कामात पारदर्शकता येईल. असे ठेकेदार पुन्हा हिम्मत करणार नाहीत, मग कुठेच ते अशी कामे करणार नाहीत.

<u>सदस्या, श्रीम. अंजली साळवे:—</u> असे केले तरच मग पुढे चालून हे लोक चांगले काम करतील, प्रत्येक वर्षी कसेही काम करा, काम यांनाच मिळते त्यामुळे असे झाले आहे.

<u>सदस्या, डॉ. निना नाथानी :—</u> इथे नाही तर दुसरीकडे कुठेतरी काम मिळाले कि तिथेदेखील अशीच कामे करतात. यामध्ये फसवणूक शहरवासियांचीच होत आहे ना.

<u>सदस्या, श्रीम. अंजली साळवे:–</u> एका बाजुने कच–याच्या समस्येमुळे त्रस्त आहोत तर दुसरीकडे रस्त्यांवरील खडडयांमुळे, उल्हासनगर शहर हे आता राहण्यासाठी लायक राहिलेले नाही.

<u>सदस्या, श्रीम. रेखा ठाकुर:–</u> रस्त्यांवरील खडड्े भरण्याच्या कामांची यादी आम्हालाही मिळाली पाहिजे.

<u>सदस्या, श्रीम. अंजली साळवे:–</u> मागच्यावर्षी अशी कामे केली आहेत तर त्यांना आपण काम दिलेच नाही पाहिजे. आणि यांची सर्व कागदपत्रे आम्हाला दाखवा.

<u>शहर अभियंता , श्री. राम जयस्वार:–</u> ३ टक्के इएमडी सर्व निविदाकारांनी भरली आहे, सुरक्षा अनामत रक्कम भरावयाची आहे.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :–</u> सुरक्षा अनामत रक्कम किती टक्के भरावयाची आहे.

<u>शहर अभियंता , श्री. राम जयस्वार:–</u> ५ टक्के

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u> सर्व ठेकेदारांना पत्र पाठविण्यापेक्षा ई मेल करा आणि येत्या सोमवारपासून कामास सुरूवात करा.

<u>सदस्या, श्रीम. रेखा ठाकुर:–</u> सोमवारपासून कामास सुरूवात झाली नाही तर काय?

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u> इतिवृत्ताची वाट न पहाता ठरावाची अंमलबजावणी करण्यात यावी.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :–</u> सोमवारपासून कामास सुरूवात झाली नाही तर निविदा प्रक्रीयेतील दुस–या क्रमांकावरील न्युनतम दर सादर करणा–या निविदाकारास काम देता येईल.

<u>सदस्या, श्रीम. अंजली साळवे:–</u> यालाच का देत आहात, तुम्ही दुस–या क्रमांकावरील ठेकेदारासच हे काम दया ना.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :–</u> ३ दिवसांची मुदत देवून बघू.

<u>सदस्या, श्रीम. रेखा ठाकुर:–</u> ३ दिवसांचा कालावधी देवू.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :–</u> सुरक्षा अनामत रक्कम भरून कार्यादेश घेवून सोमवारपासून काम सुरू केले पाहिजे.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u> दहीहंडी, गणेशोत्सव, इत्यादी सण आता जवळ आले आहेत, त्यामुळे रस्तांवरील खडड्े तातडीने भरणे आवश्यक आहे.

<u>सदस्या, श्रीम. रेखा ठाकुर:–</u> कॅम्प नं. ४ मध्ये चालिया साहेब सण साजरा होतो. त्यासाठीसुध्दा खडड्े तातडीने भरणे आवश्यक आहे.

<u>सदस्या, श्रीम. अंजली साळवे:–</u> दरवर्षी तीच अडचण आहे, याला तर दयायलाच नको, माझा तर विरोध आहे.

<u>महापालिका सचिव :–</u> सदर विषय पारीत करण्यात यावा का?

<u>सदस्या, श्रीम. रेखा ठाकुर:–</u> ३ दिवसांची मुदत देवून कामास सुरूवात करण्यात यावी.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :–</u> ३ दिवसांची मुदत देवून दिनांक ८/८/२०१६ पर्यंत सुरक्षा अनामत रक्कम भरून घ्यावी व दिनांक ९/८/२०१६ पासून काम सुरू करण्यात यावे. नाहीतर निविदा प्रक्रीयेतील दुस–या क्रमांकावरील न्युनतम दर सादर करणा–याला अॅट पारमध्ये सदरचे काम देता येईल.

<u>महापालिका सचिव :–</u>श्रीमती साळवे महोदया आपण?

<u>सदस्या श्रीमती अंजली साळवे:–</u>मी तटस्थ आहे.

<u>महापालिका सचिव:–</u> सदर विषयात श्रीम. अंजली साळवे, सदस्या तटस्थ आहेत.

<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिहं भुल्लर :–</u> सदर विषयाच्या ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता करण्यात यावी.

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ५ :— सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत निविदा प्रक्रीया केलेल्या उल्हासनगर—४ प्रभाग समिती क्र.४ मधील रस्त्यामधील खड्डे भरणे या कामाकरिता मे. साईसिध्दनाथ कन्स्ट्रक्शन यांच्या निविदेस मा. स्थायी समितीची मान्यता मिळणेबाबत.**

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिका प्रभाग क्षेत्र क्र.४ मधील मंजुरी मिळालेल्या उल्हासनगर—४ प्रभाग समिती क्र.४ मधील रस्त्यामधील खड्डे भरणे या कामांकरीता बी—१ प्रकारच्या दोन भाग (तांत्रिक व आर्थिक) पध्दतीने नोंदणीकृत ठेकेदारांकडून दिनांक २९/०६/२०१६ रोजी निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्राकलनीय खर्च | रु.१४५२९५२५/— |
| २ | निविदा प्रसिध्द केलेली वर्तमानपत्रे | १) दै.नवशक्ती २) दै. हमारा महानगर |
| ३ | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक २९/०६/२०१६ |
| ४ | निविदा विक्री कालावधी | दिनांक २९/०६/२०१६ ते ०७/०७/२०१६ |
| ५ | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक ०७/०७/२०१६ ते ०८/०७/२०१६ |
| ६ | तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | दिनांक १२/०७/२०१६ ते १५/०७/२०१६ |
| ७ | आर्थिक भाग उघडण्याचा दिनांक | दिनांक २०/०७/२०१६ |
| ८ | विक्री केलेल्या निविदांची संख्या | ३ |
| ९ | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ३ |

दिनांक १५/०७/२०१६ रोजी मा.उप आयुक्त (मुख्यालय), मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक, शहर अभियंता यांचे उपस्थितीत उल्हासनगर—४, प्रभाग समिती क्र.४ मधील रस्त्यामधील खड्डे भरणे या कामाच्या निविदेचा तांत्रिक भाग उघडण्यात आला त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ. क्र. | निविदाकाराच्या निविदेमधील बाबी | मे. जय भारत कन्स्ट्रक्शन | मे.साई सिध्दनाथ कन्स्ट्रक्शन | मे.झा.पी.ॲण्ड कंपनी |
|---|---|---|---|---|
| १ | निविदा प्रपत्रकाच्या खरेदीची रक्कम भरलेली आहे का? | होय | होय | होय |
| २ | इसारा रक्कम भरलेली आहे का ? | होय | होय | होय |
| ३ | महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्यात नोंदणी असल्याचे प्रमाणपत्र जोडले आहे का? | होय | होय | होय |
| ४ | निविदा भरतेवेळी निविदाकाराकडुन डांबराचे एकुण ०२ कामे पूर्ण झालेल्या निविदा किंमती पर्यंत अथवा रु.१.०० कोटी पर्यंत मागील ३ वर्षामध्ये इतका सम कामाचा अनुभवाचा दाखला. | होय | होय | होय |
| ५ | निविदाकाराने वार्षिक उलाढाल रु.१.०० कोटी पर्यंत मागील ३ वर्षात असल्याचे चार्टड अकाउंटट मार्फत दिलेले | होय | होय | होय |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | प्रमाणपत्र | | | |
| ६ | जॉईंट व्हेंचर (Not Allowed) | - | - | - |
| ७ | विक्रीकर/व्हॅट रिर्टन भरण्याची पावती | होय | होय | होय |
| ८ | निविदाकाराकडे उपलब्ध असलेल्या तांत्रिक कर्मचा–यांची माहिती | होय | होय | होय |
| ९ | प्लांट मशिनरी, अॅसफाल्ट प्लांट, व्हायब्रेटर रोलर, स्टॅटीक रोल्ट, पेव्हर फिनिशर यांची मालकी व असल्याचे दस्तऐवज व तसेच सदर अॅसफाल्ट प्लांट हे उमपा मुख्य कार्यालयापासून ३० किलोमीटरचे आत असल्याचे प्रमाणपत्र | होय | होय | होय |

सदर निविदांची सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये छाननी समिती मार्फत छाननी केली असता १) **मे. जय भारत कन्स्ट्रक्शन** २) **मे. साई सिध्दनाथ कन्स्ट्रक्शन** ३) **मे. मे.झा.पी.अॅण्ड कंपनी** यांच्या निविदा अटी शर्तीनुसार असल्याने पात्र आहेत. तरी उपरोक्त निविदाकारांच्या निविदांचा दुसरा भाग उघडण्यात प्रस्तावित करण्यात आले.

आज दिनांक २०/०७/२०१६ रोजी उपरोक्त निविदाकारांचा आर्थिक बाबींचा दुसरा भाग (आर्थिक दर) मा.अतिरिक्त आयुक्त सो., यांचे अध्यक्षतेखालील निवड समिती सदस्य मुख्य लेखाअधिकारी, मुख्य लेखापरिक्षक, शहर अभियंता, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे उपस्थितीत उघडण्यात आला. त्याप्रमाणे निविदाकारांनी दिलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| १) मे. जय भारत कन्स्ट्रक्शन | दिलेले दर दरसूचीप्रमाणे |
| २) मे. साई सिध्दनाथ कन्स्ट्रक्शन | दिलेले दर ८.७८ टक्के कमी |
| ३) मे. मे.झा.पी.अॅण्ड कंपनी | दिलेले दर २०.५० टक्के जास्त |

उपरोक्त **उल्हासनगर–४, प्रभाग समिती क्र.४ मधील रस्त्यामधील खड्डे भरणे** या कामाचे उक्त निविदाकारांपैकी **मे. साईसिध्दनाथ कन्स्ट्रक्शन** यांनी दरसूची वर ८.७८ टक्के कमी (8.78% below) प्रमाणे दर दिले असुन त्याप्रमाणे **मे. साईसिध्दनाथ कन्स्ट्रक्शन** यांची सदर काम देणेकरिता शिफारस करण्यात येत आहे.

तरी **मे. साईसिध्दनाथ कन्स्ट्रक्शन** यांच्या ८.७८ टक्के कमी दराचे निविदेस मा. स्थायी समितीची मान्यता मिळणेकरिता प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. ५२      दिनांक:– ४/८/२०१६

सुचकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत निविदा प्रक्रीया केलेल्या उल्हासनगर–४ प्रभाग समिती क्र.४ मधील रस्त्यामधील खड्डे भरणे या कामाकरिता निविदाकार मे. साईसिध्दनाथ कन्स्ट्रक्शन यांच्या ८.७८ टक्के कमी दराचे निविदेस मान्यता देत आहे.

परंतु

सदर ठेकेदाराने ३ दिवसात सुरक्षा अनामत रक्कम भरून ८ तारखेपर्यंत कामाचे आदेश घेऊन ९ तारखेपर्यंत काम सुरू करणे आवश्यक असेल अन्यथा दुसऱ्या लघुकाम दराचे निविदाकारास दरसूची (At Par) दराने काम देण्यात यावे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहत थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

—————————————————————————————————————————

**विषय क्र. ६ :—** जंतुनाशक/किटकनाशक द्रव्ये व पावडरचे बाब निहाय न्युनतम दर सादर करणाऱ्या निविदाकारांकडून खरेदी करण्यासाठी मे. मित्र हर्बल प्रा.लि. कंपनी, डोंबिवली व मे. रविराज केमिकल्स, डोंबिवली यांच्याशी संविदा करण्यास मान्यता मिळणे.

—————————————————————————————————————————

**सदस्या, श्रीम. अंजली साळवे:—** दरवर्षी तुम्ही औषधे खरेदी करता, मागच्यावेळेस तुम्हाला सांगितले होते की, आम्हाला याची यादी दया पण तुम्ही ती दिली नाही. आम्हालापण माहिती पाहिजे ना काय काय औषधे खरेदी होतात ती, कारण कितीतरी वेळा औषधांची मागणी केली तर नाहीत म्हणून सांगितले जाते.

**महापालिका सचिव :—** सदर विषय पारीत करण्यात यावा का?

**काही सदस्य :—**पास—पास……

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑

**विषय क्र. ६ :—**जंतुनाशक/किटकनाशक द्रव्ये व पावडरचे बाब निहाय न्युनतम दर सादर करणा—या निविदाकारांकडून खरेदी करण्यासाठी मे. मित्र हर्बल प्रा. लि. कंपनी, डोंबिवली व मे. रविराज केमिकल्स, डोंबिवली यांच्याशी संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्तावना**

सार्वजनिक आरोग्य विभागास दरवर्षी उल्हासनगर शहराच्या नागरीकांच्या आरोग्याच्या दृष्टीने व स्वच्छता, साफसफाईचे कामासाठी किटकनाशक/जंतुनाशके व अळीनाशक व डासनाशक औषधे खरेदी करणे आवश्यक असते. त्यानुसार मा. स्थायी समिती ठराव क्र. २७ दि. १३/६/२०१६ रोजीच्या मान्यतेने सदर औषधे/रसायने खरेदीची निविदा ई—टेंडरींगद्वारे प्रसिध्द करुन जाहिर निविदा सुचना दै. प्रहार, गावकरी व दैनिक पुर्व विराम या वृत्तपत्रात प्रसिध्दीसह उल्हासनगर महानगरपालीकेच्या वेब साइटवर ई—निविदा सुचना प्रसिध्द करुन E-Tendering निविदा मागविण्यात आल्या होत्या. असता विहित मुदतीत खालील निविदाकारांनी त्यांच्या निविदा दाखल केलेल्या होत्या.

१) मे. गगन फार्मा, मालाड, मुंबई,

२) मे. मित्र हर्बल्स प्रा. ली., डोंबिवली.

३) मे. रविराज केमिकल्स., डोंबिवली.

प्राप्त निविदाकारांचे तांत्रिक लिफाफे दिनांक ०४/७/२०१६ रोजी उघडण्यात आल्या होत्या. निविदा समितीने निविदाधारकांनी सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी व पडताळणी करुन निविदेच्या अटी व शर्तीनुसार सर्व कागदपत्राची तपासणी केली. निविदा समितीमधील खालील सदस्य उपस्थित होते.

१) उपायुक्त (आरोग्य)

२) मुख्य लेखा अधिकारी

३) मुख्य लेखा परीक्षक

मे. मित्र हर्बल्स प्रा. ली., डोंबिवली, मे. रविराज केमिकल्स., डोंबिवली यांनी सादर केलेल्या कागदपत्रानुसार सर्व Mandatory Condition ची पूर्तता करीत आहेत. तथापी मे. गगन फार्मा, मुंबई यांच्याकडे आवश्यक जंतुनाशक पुरवठा करण्याच्या कामाचा अनुभवाचा दाखला व License to stock, sale & exhibit of insecticide हा परवाना नसल्याने त्यांना अपात्र ठरविण्यात आले व दोन निविदाकारांच्या निविदा पात्र होत्या तथापी निविदा स्पर्धात्मक दर प्राप्त होण्यासाठी पाच दिवसांचा फेर निविदा काढण्याचे सर्वानुमते ठरले होते.

त्या अनुषंगाने फेर ई–निविदा प्रसिध्द करुन दिनांक १२/७/२०१६ रोजी पर्यंत निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यात पुनश्च दोन निविदा प्राप्त झाल्या. तथापी फेर निविदा काढुनही निविदेला अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्याने व जंतुनाशक खरेदी तातडीने खरेदी करणे आवश्यक असल्याने निविदा समितीने निविदा उघडण्याचे एकमताने सर्वानुमते ठरले. तद्नंतर तांत्रिक लिफाफा उघडून निविदाधारकांनी सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी व पडताळणी करुन निविदेच्या अटी व शर्तीनुसार सर्व कागदपत्राची तपासणी केली. पात्र दोन्ही निविदाकारांचे "Commercial Bid" उघण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.

प्राप्त दरांच्या तुलनात्मक तक्त्यानुसार मे. मित्र हर्बल्स प्रा. ली., डोंबिवली व मे. रविराज केमिकल्स., डोंबिवली यांचे बाब निहाय दर न्युनतम होते. समितीने सर्वानुमते सदरच्या निविदेतील न्युनतम दराच्या निवदाकारांसोबत दरांबाबत वाटाघाटी करण्यासाठी उपायुक्त (आरोग्य) यांना सुचना निर्गमित केल्या. पात्र झालेल्या निविदाकारांकडुन सादर केलेल्या सदर जंतुनाशक/किटकनाशक/अळीनाशक/डासनाशक औषधे दरपत्रकांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्रं. | औषधाचे नाव व त्यांचा तपशिल | आवश्यक मालाचा (परिमाण) | निविदाधारकाचे नाव व त्यांचे प्राप्त दर प्रति नग/किलो/लिटर | |
|---|---|---|---|---|
| | | | मे. मित्र हर्बल | मे. रविराज |
| १ | ब्लीचीग पावडर, ३३% क्लोरीन आय.एस.आ. प्रमाणीत | १५००० किलो | ३९ | ३४.५० |
| २ | काळे फिनाईल, शौचालयासाठी (३५ लि. प्लास्टीक कॅन मध्ये) | ७००० लिटर | ९८ | ८५ |
| ३ | सॅनिटेक्स व्हाईट क्लिनर, सुंगधीत, शौचालयासाठी व कार्यालयासाठी (३५ लि. प्लास्टीक कॅन मध्ये) | ५००० लिटर | ७९ | ८५ |
| ४ | जर्मीटॉक्स प्लस पावडर, डिसन्फेक्टंर पावडर | १०००० किलो | ८१ | ८७ |
| ५ | प्रोडेन्टीसाईड झिंक फॉस्फाईडॅ/(रॅटॉल पेस्ट)५० ग्रॅम, उंदीरनाशक | २००० नग (३५ ग्रम टयुब) | ६० | ५३ |
| ६ | फिनॉईल (डांबर) गोळया, जंतुनाशक, मुता–यांसाठी | ५०० किलो | ४७० | ३५० |
| ७ | सफाया मोनोक्लोरो फिनोल पावडर जंतुनाशक दुंगधीनाशक(३५ लि.प्लास्टीक कॅन मध्ये) | ५००० किलो | ७७ | ८२ |
| ८ | गोल्डमिल बायोक्लचर, डंम्पीग ग्राउंडसाठी/कच–याचे विघटनकरण्यासाठी | २००० किलो | ४०६ | ५३५ |
| ९ | मायक्रो फाईन पावडर, सुंगधीत वातावरण निर्मिती करण्यासाठी | १०००० किलो | १४५ | १४० |
| १० | क्लीनोव्हाईट, दुर्गधीनाशक WHO स्पेसिफीकेशन प्रमाणे | ५००० लिटर | १९० | १८५ |
| ११ | फाईट आउट अळीनाशक | ५०० लिटर | १५८९ | ११३० |
| १२ | निमटेक्स, हार्बल अळीनाशक, हाफकीन इस्टिट्युटद्वारा टेस्टेड | ५०० लिटर | १५३२ | १५५० |
| १३ | सेप्टी टॅक पावडर (सेप्टीक्लीन पावडर) शौचालयाचे सेप्टीक टॅक सफाईसाठी | १००० किलो | ८३३ | ७९० |
| १४ | फ्रेश ऑल डिलक्स, (७५ ग्राम) कार्यालयासाठी | ३०० नग | ११० | ९५ |
| १५ | पिप बेट, ग्रन्युअलस माशानाशक | ५०० किलो | १२८९ | १३७६ |
| १६ | वेस्ट ट्रीट पावडर, सिलीकेटर, झेडबेस पावडर एन्ट्रीसेप्टीक पावडर मिनरल पावडर (दुंगधीनाशक व रोगजंतूचा अटकाव करण्यासाठी) | १०००० किलो | ९२ | १०५ |
| १७ | बायोक्लचर पावडर डंपिगं ग्राउडसाठी /कच–याचे विघटन करण्यासाठी<br>आवश्यक घटक – नॉन इडिबल पावडर, मिनरल पावडर, कलचर | ५००० किलो | १०० | ११९ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ॲझोटो बॅक्टर – लिगनीग डिग्रेबल बॅक्टोरिया) | | | |
| १८ | बॅक्ट्रो फ्रि पावडर – किटकनाशक | १०००० किलो | १०५ | ११५ |
| १९ | हॅड्रोक्लोरिक ॲसिड (०५ लिटर प्लास्टीक कॅन मध्ये )शौचालय मुता–या सफाई करणेसाठी | ५००० लिटर | ५५ | ३९ |
| २० | बॅक्टोक्लीन व्हाईट क्लिनर, शौचालय सफाईसाठी | ५००० किलो | ९८ | ९२ |
| २१ | साईथ्रिऑन ५०% EC डासनाशक, किटकनाशक | १००० लिटर | १४६५ | १३३० |
| २२ | हायजीन, जंतुनाशक | ३००० लिटर | –– | ३५० |
| २३ | युरिनल ब्लॉक्स | १०० किलो | १८७५ | १९३५ |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्यानुसार अ.क्र. ३,४,७,८,१२,१५,१६,१७,१८ व २३ या करीता मे. मित्र हर्बल प्रा.लि. कंपनी डोंबिवली यांनी सर्वात कमी दर सादर केले आहेत, तर अ.क्र. १,२,५,६,९,१०,११,१३,१४,१९,२०,२१ व २२ या करीता मे. रविराज केमिकल्स, डोंबिवली यांनी सर्वात कमी दर सादर केलेले आहेत. उक्त जंतुनाशके नमुद केलेल्या परीमाणानुसार खेरदी केल्यास रुपये १,४६,११,५००/– मात्र खर्च अपेक्षित आहे. उक्त प्राप्त दर हे मागील दराच्या तुलनेत २२ टक्के पेक्षा जास्त दर असल्याने मा. निविदा समितीने दिलेल्या निर्देशानुसार न्युनतम दराच्या निविदाकारांना वाटाघाटीसाठी जा.क्र. उमपा/उप–आ/आवि/९३/१६ दिनांक १६/७/२०१६ रोजी अन्वये बोलवण्यात आले. त्यानुसार दिनांक १८/७/२०१६ रोजी त्यांच्याशी प्राप्त झालेले न्युनतम दरांनुसार त्यांच्याशी वाटाघाटी केल्या. तसेच अ.क्र.२२ वर असलेल्या हायजीन, जंतुनाशकसाठी स्पर्धा झालेली नसल्याने व मे. रविराज केमिकल यांच्या कडे त्या जंतुनाशकाचे ऑथोरायझेशन लेटर नसल्याने सदरचे जंतुनाशक वगळण्यात आले आहे व तसेच उर्वरीत जंतूनाशकांची दरांची  वाटाघाटी दरम्यान संबधीत निविदाकारांनी इतर नगरपालिकेत/महापालीकेत पुरवठा केलेल्या दरांची प्रती व उत्पादक कंपन्याची दरांच्या प्रती सादर केलेल्या आहेत. वाटाघाटी अंती प्राप्त दर मागील वर्षीच्या दराच्या तुलनेत सरासरी ४ टक्के जास्त आहेत. त्यानुसार वाटाघाटी अंती प्राप्त झालेले दर वाजवी आहेत. वाटाघाटी अंती प्राप्त दरांचा तक्ता खालीप्रमाणे आहेत.

| अ.क्रं. | औषधाचे नाव व त्यांचा तपशिल | आवश्यक मालाचा (परिमाण) | निविदाधारकाचे नाव व त्यांचे प्राप्त दर प्रति नग/किलो/लिटर | | वाटाघाटी अंती प्राप्त दर रुपये | अपेक्षीत खर्च रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | मे. मित्र हर्बल | मे. रविराज | | |
| १ | ब्लीचीग पावडर, ३३% क्लोरीन आय.एस.आ. प्रमाणीत | १५००० किलो | | ३४.५० | ३३ | ४९५००० |
| २ | काळे फिनाईल, शौचालयासाठी (३५ लि. प्लास्टीक कॅन मध्ये) | ७००० लिटर | | ८५ | ७४ | ५१८००० |
| ३ | सॅनिटेक्स व्हाईट क्लिनर, सुंगधीत, शौचालयासाठी व कार्यालयासाठी (३५ लि. प्लास्टीक कॅन मध्ये) | ५००० लिटर | ७९ | | ७५ | ३७५००० |
| ४ | जर्मीटॉक्स प्लस पावडर, डिसनफेक्टंर पावडर | १०००० किलो | ८१ | | ६८ | ६८०००० |
| ५ | प्रोडेन्टीसाईड झिंक फॉस्फाईडॅ/(रॅटॉल पेस्ट)५० ग्रॅम, उंदीरनाशक | २००० नग (३५ ग्रम टयुब) | | ५३ | ५२ | १०४००० |
| ६ | फिनॉईल (डांबर) गोळया, जंतुनाशक, मुता–यासाठी | ५०० किलो | | ३५० | २८९ | १४४५०० |
| ७ | सफाया मोनोक्लोरो फिनोल पावडर जंतुनाशक दुंगधीनाशक(३५ लि.प्लास्टीक कॅन मध्ये) | ५००० किलो | ७७ | | ५८ | २९०००० |
| ८ | गोल्डमिल बायोक्लचर, डंम्पीग ग्राउंडसाठी/कच–याचे | २००० किलो | ४०६ | | ३८० | ७६०००० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | विघटनकरण्यासाठी | | | | | |
| ९ | मायक्रो फाईन पावडर, सुंगधीत वातावरण निर्मिती करण्यासाठी | १०००० किलो | | १४० | १२९ | १२९०००० |
| १० | क्लीनोव्हाईट, दुर्गधीनाशक WHO स्पेसिफीकेशन प्रमाणे | ५००० लिटर | | १८५ | १४० | ७००००० |
| ११ | फाईट आउट अळीनाशक | ५०० लिटर | | ११३० | १०४५ | ५२२५०० |
| १२ | निमटेक्स, हार्बल अळीनाशक, हाफकीन इस्टिट्युटद्वारा टेस्टेड | ५०० लिटर | १५३२ | | १०६० | ५३०००० |
| १३ | सेप्टी टॅंक पावडर (सेप्टीक्लीन पावडर) शौचालयाचे सेप्टीक टॅंक सफाईसाठी | १००० किलो | | ७९० | ६२५ | ६२५००० |
| १४ | फ्रेश ऑल डिलक्स, (७५ ग्राम) कार्यालयासाठी | ३०० नग | | ९५ | ८५ | २५५०० |
| १५ | पिप बेट, ग्रन्युअलस माशानाशक | ५०० किलो | १२८९ | | ९७० | ४८५००० |
| १६ | वेस्ट ट्रीट पावडर, सिलीकेटर, झेडबेस पावडर एन्ट्रीसेप्टीक पावडर मिनरल पावडर (दुंगधीनाशक व रोगजंतूचा अटकाव करण्यासाठी) | १०००० किलो | ९२ | | ८६ | ८६०००० |
| १७ | बायोक्लचर पावडर डंपिगं ग्राउडसाठी /कच—याचे विघटन करण्यासाठी<br>आवश्यक घटक — नॉन इडिबल पावडर, मिनरल पावडर, कलचर<br>ॲझोटो बॅक्टर — लिगनीग डिग्रेबल बॅक्टोरिया) | ५००० किलो | १०० | | ९४ | ४७०००० |
| १८ | बॅक्ट्रो फ्रि पावडर — किटकनाशक | १०००० किलो | १०५ | | ९९ | ९९०००० |
| १९ | हॅड्रोक्लोरिक ॲसिड (०५ लिटर प्लास्टीक कॅन मध्ये )शौचालय मुता—या सफाई करणेसाठी | ५००० लिटर | | ३९ | ३४ | १७०००० |
| २० | बॅक्टोक्लीन व्हाईट क्लिनर, शौचालय सफाईसाठी | ५००० किलो | | ९२ | ८२ | ४१०००० |
| २१ | साईथ्रिऑन ५०% EC डासनाशक, किटकनाशक | १००० लिटर | | १३३० | १०२५ | १०२५००० |
| २३ | युरिनल ब्लॉक्स | १०० किलो | १८७५ | | १८२५ | १८२५०० |

उक्त नमुद केलेली जंतूनाशके/रसायने त्यांच्या समोर दर्शविलेल्या परीमाणा नुसार खरेदीकरीता रू १,१६,५२,०००/— ( रुपये एक करोड सोळा लाख बावन्न हजार मात्र) खर्च अपेक्षित आहे. सदरची जंतूनाशक/किटकनाशके आवश्यकतेनुसार वेळोवेळी उपलब्ध करुन घेण्यात येतील, सदरचा खर्च सन २०१६—१७ च्या अर्थिक अंदाजपत्रकामध्ये जंतुनाशक खदेरीसाठी भाग—१ सी—१ (३) रुपये १,२०,००,०००/— तरतूद करण्यात आली आहे त्यापैकी पुर्ण तरतूद शिल्लक आहे त्यातून करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

तरी सदरच्या खर्चास व तसेच उक्त औषधांसाठी बाब निहाय न्युनतम दर सादर करणा—या निविदाकार मे. मित्र हर्बल प्रा. लि. कंपनी, डोंबिवली व मे. रविराज केमिकल्स, डोंबिवली यांच्याशी संविदा करण्याकरीता मा. स्थायी समितीची मान्यता आवश्यक आहे. करीता सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३ (क) अन्वये मा. स्थायी समितीच्या मंजुरीसाठी सविनय सादर.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> ५३ <u>दिनांकः— ४/८/२०१६</u>

सुचकाचे नाव :— श्रीम. रेखा ठाकूर

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार जंतुनाशक/किटकनाशक द्रव्ये व पावडरचे बाब निहाय न्युनतम दर सादर करणा—या निविदाकारांकडून खरेदी करण्यासाठी मे. मित्र हर्बल प्रा. लि. कंपनी, डोंबिवली व मे. रविराज केमिकल्स, डोंबिवली यांच्याशी संविदा करण्यास मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहत थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ७ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र.** ७ :— स्थायी समिती ठराव क्र. २५ दिनांक १३/६/२०१६ मध्ये फेरबदल करणे.

---

<u>शहर अभियंता, श्री. राम जयस्वार :—</u>कल्याण अंबरनाथ रस्त्यावरील खडड्े भरणेबाबतच्या कामासाठी ६ निविदा निघाल्या आहेत.

<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u> शासनाचे दिनांक १० जून, २०१६ रोजीचे पत्र, आदेश आहेत व आम्ही १३ जून, २०१६ रोजी ठराव केला आहे. आपण ते शासनाकडील पत्र वाचून दाखवा ना.

<u>शहर अभियंता, श्री. राम जयस्वार :—</u>आमच्याकडे काही लिखीत आलेले नाही.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वेः—</u> शासनाकडून अद्याप लिखीतमध्ये काहीच आलेले नाही, त्यांनी एवढेच सांगितले आहे कि ४ महिन्यामध्ये आम्ही रस्ता बनवणार.

<u>सदस्या, श्रीम. रेखा ठाकूर :—</u> परंतु त्यांनी असे म्हटले आहे कि, सदर रस्त्यावरील फुटपाथ आणि ड्रेनेज लाईन्स हे सर्व एमएमआरडीच करणार आहेत.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वेः—</u> एमएमआरडीए करेल असे सांगितले नाही. एवढेच सांगितले कि, रस्त्याचे काम आम्ही ४ महिन्यात करू.

<u>सदस्या, श्रीम. रेखा ठाकूर :—</u> आमच्याकडे याबाबतचा व्हिडीओ पण आहे.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वेः—</u> आताची जी रस्त्याची परिस्थिती आहे आणि त्यांनी आपल्याला जे रस्त्याच्याबाजूचे ड्रेनेजचे जे काम रू. १३ करोडचे दिलेले आहे. ते करणे जरूरी आहे. आपल्याला कोणतेही आदेश नाहीत कि काही नाही, आणि सदरचे काम करणे जरूरीचे आहे. त्यामुळे सदर कामाची प्रक्रीया ७

दिवसांत निविदा प्रक्रीया पुर्ण करून त्यांच्याकडून आपण अधीन राहून निधी आणणार आहोत. जर त्यांनी निधी दिला नाही तर हा विषय आपोआपच संपेल. आता आपण हा विषय मंजूर करू त्यानंतर निविदा प्रक्रीया होईल व त्यानंतर आम्ही त्यांचेकडे जावू. त्यांचेकडून निधी मिळाला तर कामाचे कार्यादेश देणार ना संबंधिताला.

सदस्य, श्री. गुरूनो वलेचा :— मग पावसाळयानंतर कामे करणार का?

शहर अभियंता, श्री. राम जयस्वार :—आमच्याकडे कोणतेही आदेश प्राप्त झालेले नाहीत.

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—त्यांनी निधी दिलेला नाही. आम्ही संबंधित कार्यालयाकडे जाणार आहोत, निधी एमएमआरडीएकडून येणार आहे. मा. मुख्यमंत्री महोदय यांनी स्वत: सांगितले आहे कि, साईड ड्रेनचे काम तातडीने करण्यात यावे.

सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— शासन निर्णय वाचून दाखवा ना.

शहर अभियंता, श्री. राम जयस्वार :—सदरचे काम लहान लहान तुकडे करून करण्यात येईल, यात कोणतीही अनियमितता होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :— चांगल्या ठेकेदाराला काम दिले पाहिजे. आणि कार्यादेश देताना त्यामध्ये अटी व शर्तीचा समावेश असला पाहिजे. समजा, रू. १३ करोडचे काम आहे आणि त्या कामासाठी ज्या कंपनीने निविदा भरली आहे. त्या निविदाकाराचे टर्नओव्हर रू.१२ करोड असले पाहिजे तसे प्रमाणपत्र घेतले पाहिजे. बांधकामासाठी ठेकेदाराकडून आवश्यक सर्व प्रमाणपत्र घेतली पाहिजेत व ती सर्व प्रमाणित असली पाहिजेत. कार्यकारी अभियंता दर्जाच्या अधिका—याने निविदा तयार केली पाहिजे.

महापालिका सचिव :— या आधी प्रस्तावित केलेल्या सर्व शर्ती संपवून तसे करावे लागेल.

सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— आता तसे करता येणार नाही.

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :— आम्ही खालिलप्रमाणे अटी व शर्ती सुचवित आहोत, आपण त्या तपासून बघा.

१) निविदाधारकांनी पूर्ण झालेल्या मागील ३ वर्षाचे १२ कोटी रक्कमेची उलाढाल (Turn Over) केलेली असावी त्यासाठी ३ वर्षाचे Income Tax Returns सादर करणे आवश्यक आहे व तसे चार्टड अकाऊंटचे प्रमाणपत्र सोबत जोडले पाहिजे.

२) निविदाधारकांनी पूर्ण झालेल्या मागील ५ वर्षात शासकीय किंवा निमशासकीय संस्थेत कमीत कमी १० कोटीचे काम केल्याचे अनुभव प्रमाणपत्र कार्यकारी अभियंता किंवा तत्सम प्राधिकारी यांच्या स्वाक्षरीने सादर करणे आवश्यक राहील.

३) निविदाधारकांनी पूर्ण झालेल्या मागील ५ वित्तीय वर्षात खालील प्रमाणे प्रत्येक बाबी समोर नमूद परीमाण पूर्ण केले असावे व तसे कार्यकारी अभियंता किंवा तत्सम प्राधिकारी मार्फत जारी करण्यात आलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

४)

| S.No. | Item of Work | Quantity | Unit |
|---|---|---|---|
| i) | GSB/WBM/Gr.I/Gr.II/Gr.III | 1750.00 | Cum |
| ii) | Pavement Concrete M-40 and above | 2500.00 | Cum |
| iii) | Concrete M-20 and above other than Pavement | 450.00 | Cum |

शहर अभियंता, श्री. राम जयस्वार :— सदरच्या अटी व शर्ती आम्हाला शासनाकडे पाठवाव्या लागतील.

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :— आपण आता जो विषय आणला आहे तो, स्थायी समितीपुढे आहे मग शासनाकडे काय कळवायचे.

महापालिका सचिव :— ठरावात दोन्ही अटी व शर्तीचा समावेश करावयाचा का?

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :— निविदा तयार करण्याचा व त्यांत आवश्यक अटी व शर्ती घालण्याचा अधिकार आम्ही शहर अभियंता यांना देतो.

सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— आम्ही सांगितले आहेत त्याच्याव्यतिरिक्तसुध्दा ज्या आवश्यक वाटतील.

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :— परंतु चांगला ठेकेदार आला पाहिजे.

सदस्या, श्रीम. अंजली साळवे :— मेन रस्ता बनवत आहेत.

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—सदर विषय पारीत करण्यात यावा. तसेच सदर विषयाच्या ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता करण्यात यावी.

शहर अभियंता, श्री. राम जयस्वार :— त्यांनी पहिलेच मान्य केलेले नाही.

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—शासन निर्णयात काय म्हटले आहे.

शहर अभियंता, श्री. राम जयस्वार :— अजुनही त्यांस मान्यता मिळालेली नाही ते तिकडे जावून पहावे लागेल.

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—कार्यादेश देण्याचा नियम आहे.

शहर अभियंता, श्री. राम जयस्वार :— मोठया रक्कमेची निविदा असल्याने किमान १ महिना किंवा २५ दिवसांची नोटीस दयावी लागेल.

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—शहर अभियंता म्हणून तुम्हाला नियुक्त केले आहे. तुम्ही टेक्निकल आहात ना ज्या अटी व शर्ती दिल्या आहेत, त्यानुसार ताबडतोब निविदा प्रसिध्द करावी. तसेच निधीची मान्यता आल्याशिवाय कार्यादेश देवू नये.

शहर अभियंता, श्री. राम जयस्वार :— मोठया म्हणजे रू. ५० लाखापर्यंत किंवा रू. ५० लाखांच्यावर असेल तर.....

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—लेखा विभागाशी विचारणा करतो, किती दिवसांची नोटीस दयावी लागेल.

मुख्य लेखा अधिकारी, श्री. दादासाहेब पाटील :— किमान ७ दिवसांची नोटीस दयावी लागते तसा शासननिर्णयच आहे.

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—सदरचा विषयाच्या ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता करण्यात यावी.

काही सदस्य :—पास—पास......

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ७ :— मा.स्थायी समिती ठराव क्र.२५, दिनांक १३/०६/२०१६ मध्ये फेरबदल करणे.**

**प्रस्तावना**

उपरोक्त विषयान्वये कल्याण—अंबरनाथ रस्त्यावर दुतर्फा फुटपाथ नाली बनविणेच्या कामाचे रु.१३,४५,००,०००/— एवढया प्राकलनिय किंमतीचा प्रस्ताव एम.एम.आर.डी.ए.कडून निधी उपलब्ध होईपर्यंत एका बाजूला कामाची निविदा प्रक्रिया करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणेकरीता प्रस्तावित केले होते. सदर प्रस्तावास मा.स्थायी समितीने सदर प्रस्तावास मंजूरी देताना ०८ अटींचा समावेश करुन ठराव क्र.२५ दिनांक १३/६/२०१६ पारीत केला होता.

तद्नंतर सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे सदर कामाची निविदा प्रक्रिया करण्यापूर्वी दिनांक ०५/०७/२०१६ रोजी निविदाकारांसमवेत प्रिबिड बैठक घेण्यात आली होती. सदर बैठकीत झालेल्या चर्चेच्या वेळी मा.स्थायी समितीने ठरावात समाविष्ट केलेल्या अटींपैकी अट क्र.८ निविदाकारांना मान्य नसल्याचे त्यांनी सांगितले. सध्या पावसाळा सुरु असल्याने सदर

काम तातडीचे असल्याने सदर ठरावाबाबत फेरविचार होणे अथवा अट क्र.८ शिथिल करणेकरीता मा.आयुक्त सो.यांना सादर केले असता मा.आयुक्त सो. यांनी सदर प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे ठेवणेचे आदेश दिले. परंतू त्यादरम्यान मा.स्थायी समिती सभापती यांनी त्यांचे पत्र क्र.उमपा/स्थास/७१ दिनांक २५/७/२०१६ अन्वये शासन परिपत्रक क्र.संकीर्ण/२०१५/प्र.क्र. ९०/नवि–१६ दिनांक १०/६/२०१६ नुसार विशेष निधीतून करावयाचे कामांचे तुकडे न करता एकच निविदा काढणेचे स्पष्ट नमुद असल्याने व सदरचा शासन निर्णय हा स्थायी समितीच्या बैठकीपूर्वी निर्गमित झालेला असल्याचे माहित नसल्याने कामांना मंजूरी देण्यात आली होती त्यामुळे कामांचे तुकडे न करता एकच निविदा काढणेबाबत विनंती केली आहे.

तरी मा. स्थायी समितीच्या ठराव क्र.२५ दिनांक १३/६/२०१६ मध्ये नमुद केल्याप्रमाणे कल्याण–अंबरनाथ रस्त्यावर दुतर्फा फुटपाथ नाली बनविणेच्या कामाचे ६ तुकडे न करता एकच निविदा मागविणेस मा.स्थायी समितीची मंजूरी मिळणेस प्रस्तावित.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> ५४ <u>दिनांकः– ४/८/२०१६</u>

सुचकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार स्थायी समिती, ठराव क्रं. २५, दि. १३/०६/२०१६ मध्ये पुढीलप्रमाणे फेरबदल करीत आहे, उल्हासनगर–३ येथिल एम.एम.आर.डी.ए कडुन मिळणा–या निधी उपलब्धतेच्या मान्यतेच्या अधिन राहुन कल्याण–अंबरनाथ रस्त्यावरील अतिक्रमण विरहित जागेच्या ठिकाणी रस्त्यांच्या दुतर्फा नाली बांधणेकामी पूर्वीच्या ठरावातील अटी वगळून नव्याने खालील अटींवर निविदा प्रक्रिया करणेस मान्यता देत आहे.

१) निविदाधारकांनी पूर्ण झालेल्या मागील ३ वर्षाचे १२ कोटी रक्कमेची उलाढाल (Turn Over) केलेली असावी त्यासाठी ३ वर्षाचे Income Tax Returns सादर करणे आवश्यक आहे व तसे चार्टड अकाऊंटचे प्रमाणपत्र सोबत जोडले पाहिजे.

२) निविदाधारकांनी पूर्ण झालेल्या मागील ५ वर्षात शासकीय किंवा निमशासकीय संस्थेत कमीत कमी १० कोटीचे काम केल्याचे अनुभव प्रमाणपत्र कार्यकारी अभियंता किंवा तत्सम प्राधिकारी यांच्या स्वाक्षरीने सादर करणे आवश्यक राहील.

३) निविदाधारकांनी पूर्ण झालेल्या मागील ५ वित्तीय वर्षात खालील प्रमाणे प्रत्येक बाबी समोर नमूद परीमाण पूर्ण केले असावे व तसे कार्यकारी अभियंता किंवा तत्सम प्राधिकारी मार्फत जारी करण्यात आलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

४)

| S.No. | Item of Work | Quantity | Unit |
|---|---|---|---|
| i) | GSB/WBM/Gr.I/Gr.II/Gr.III | 1750.00 | Cum |
| ii) | Pavement Concrete M-40 and above | 2500.00 | Cum |
| iii) | Concrete M-20 and above other than Pavement | 450.00 | Cum |

५) सदर निवीदेसाठी उल्लेख करण्यात आलेल्या मुख्य अटी व शर्ती व्यतिरीक्त वित्तीय तांत्रिक व कायदेशीर बाबीसाठी व अन्य काही अटी समावेश करण्याचा किंवा फेरफार करण्याचा अधिकार शहर अभियंता यांना राहतील.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहत थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

महापालिका सचिव :– विषय क्र. ८ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ८ :–** वित्तीय वर्ष २०१६–२०१७ करीता मालमत्ता कराची बिले पोष्ट कार्यालयामार्फत स्पीड पोष्टद्वारे तसेच प्रायोगिक तत्वावर ३ वॉर्डमध्ये बचत गटामार्फत वितरीत करणेसाठी अंदाजित रक्कम रू. ३०,०९,०००/– खर्चास कार्योत्तर मंजुरी मिळणे.

---

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :– कार्योत्तर मंजूरी देत आहोत परंतु पुढील वर्षासाठी सर्व बिले वाटपाचे काम एप्रिल पासून देण्यात यावे.

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:– जसे सन्मा. सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी यांनी सांगितले त्याप्रमाणे ज्या ज्या प्रभागामध्ये बचतगट आहेत, संपुर्ण शहरात जेवढी बचत गट आहेत त्यांना हे काम देण्यात यावे. कारण तुम्हाला माहित आहे कुठल्या प्रभागात कुठला बचतगट आहे ते, महापालिकेतील सुवर्ण जयंती शहरी रोजगार विभागात बचतगटाची नोंद असते त्यामुळे तुम्हाला माहिती आहे त्याप्रमाणे बचतगटांना हे काम दिल्यास त्यांनादेखील रोजगार मिळेल. कारण महिला सक्षमीकरणाचे काम आपण करायला पाहिजे, त्यांना हे काम देताना त्यात असे नमुद करा कि, प्रत्येक घरोघरी जावून बिले वाटप करताना त्यांनी फोननंबरसुध्दा त्या संबंधित ग्राहकांचे आणावेत आणि सदर बिल दिल्याची सहीदेखील आणावी. त्यामुळे आपल्याकडे एक माहिती तयार होते मालक व त्याचा नंबर. बचत गटांना काम देतो तेव्हा त्यांना आपण फक्त रू. १४ एका बिलासाठी देतो आणि रू. १७ आपण स्पीड पोस्टला देतो. पोस्टाने बिले जातात किंवा नाही ते काही माहित नाही. आणि ते आपल्याला काही पोच पावती देत नाहीत.

प्र. कर निर्धारक व संकलक, श्री. शैलेश दोंदे :– पोच पावती देतात.

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:– पोच पावती देतात पण मला बिल मिळाले असे माझ्याकडून लेखी काही असते का?

प्र. कर निर्धारक व संकलक, श्री. शैलेश दोंदे :– १० ते १५ हजार बिले परत येतात.

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:– आपण ज्या बचत गटाला देवू जसे मागच्यावर्षी आपण प्रायोगिक तत्वावर केले होते, यावर्षीही आपण त्यांना हे काम दिले ते कसे बिले पोच केल्याच्या सहया आणून देतात, मोबाईल नंबर आणून देतात, श्री. जमनादास पुरस्वानी यांनी जसे सांगितले कि, लाईट बिल दर महिन्याला ग्राहकाला मिळू शकते तर दरवर्षातून एकदा हे बिल का नाही मिळू शकत.

प्र. कर निर्धारक व संकलक, श्री. शैलेश दोंदे :– ग्राहकांचे पत्तेसुध्दा सापडत नाहीत, घरचे पत्ते बरोबर नसतात.

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:– अशाप्रकारे बिलेवाटप केल्यास संबंधित ग्राहकाला त्याचा पत्ता व्यवस्थित देण्यासाठीसुध्दा आपण बोलवू शकतो ना.

सदस्या, श्रीम. अंजली साळवे :– खरेतर हा विषय मागच्यावर्षीच झाला होता, सदरचे काम हे बचतगटांना देण्याचे ठरले होते.

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :– किती बिले पोस्ट केली.

प्र. कर निर्धारक व संकलक, श्री. शैलेश दोंदे :– सुमारे १ लाख ५ हजार बिले पोस्ट केली आहेत.

सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :– किती बिले शिल्लक राहिली आहेत.

**प्र. कर निर्धारक व संकलक, श्री. शैलेश दोंदे :—** सुमारे ६५ हजार शिल्लक आहेत.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—** शिल्लक राहिलेली बचतगटांना देता येतील.

**प्र. कर निर्धारक व संकलक, श्री. शैलेश दोंदे :—** आता आपण जी बिले पोस्टात टाकली आहेत त्यापैकीदेखील काही बिले परत येतात.

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—** ठिक आहे, जी बिले पोस्टातून परत येतील ती बिले विभागून त्या त्या बचतगटांना दया. हे झाले तरी आपले बरेचसे काम होईल.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—** मग हे काम दुबार होईल व खर्चदेखील दुबार होईल.

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—** जी बिले परत आली त्यांचे पैसे घेत नाहीत ना.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—** असे नाही, पैसे घेतले जातात.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—** असे करता येणार नाही. याउलट जी बिले बचतगटामार्फत वाटली जाणार नाहीत ती पोस्टाद्वारे पाठवावीच लागतील.

**सदस्या, श्रीम. अंजली साळवे :—** सर्वांना एक विनंती आहे, सर्व अधिका—यांनासुध्दा, सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना विभागाकडे बचतगटांची यादी आहे तसेच कोणकोणती कामे बचतगटांना देवू शकतो त्याचीदेखील यादी आहे हे तुम्ही लक्षात घेवुन तसे करा ना. मागच्यावर्षीदेखील आम्ही या विषयावर बोललो होतो. आम्ही महिला आहोत आणि आम्ही बचतगटांना प्रोत्साहन नाही देणार तर बचतगट बंद पडतील. आपल्या हातात जी कामे आहेत ती आपण दयायला पाहिजेत ना.

**प्र. कर निर्धारक व संकलक, श्री. शैलेश दोंदे :—** मध्यंतरी निवडणूकीची आचारसंहिता आली होती. त्यामुळे त्या कामास विलंब झाला आणि सदर काम तातडीने होणे आवश्यक असल्यामुळे बिले पोस्टाने टाकणे जरूरी होते.

**सदस्या, श्रीम. अंजली साळवे :—** सदरची कामे महिलांनाच दयायला हवीत. महिलांना सक्षम करायचे आहे. यापुढे तरी सदरची कामे आपण बचतगटांना दयावीत.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—** दयायला पाहिजेत ना.

**सदस्या, श्रीम. अंजली साळवे :—** शिक्षणमंडळातील गणवेष शिवण्याचे कामसुध्दा बचतगटांना देण्याबाबत मी सांगितले होते परंतु ते दिले नाही. आणि काही बचतगटांना काम दिले तर त्यांची दिड दिड हजारांची बिले मंजूर करायला दहा चकरा माराव्या लागल्या.

**महापालिका सचिव :—** सदर विषय पारीत करण्यात यावा का?

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ८ :—** वित्तीय वर्ष २०१६—२०१७ करीता मालमत्ता कराची बिले पोष्ट कार्यालयामार्फत स्पीड पोष्टद्वारे तसेच प्रायोगिक तत्वावर ३ वार्डमध्ये बचत गटामार्फत वितरीत करणेसाठी अंदाजित रक्कम रू. ३०,०९,०००/— खर्चास कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत.

**प्रस्तावना**

प्रतिवर्षाप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेस वर्ष २०१६—२०१७ करीता मालमत्ता कराची बिले वितरीत करावयाची आहेत. बिलाचे वितरण झाल्यानंतर विहीत मुदतीचे आत बिलाच्या रक्कमेचा भरणा करण्यात आला नाही तर पुढील सक्तीचे उपाय करण्यात येतात. उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात अंदाजित १,७०,००० मिळकती असुन त्यासाठी मालमत्ता कराची बिले वितरीत करावयाची आहेत. त्याअनुशंगाने

मालमत्ता कर विभागात कार्यरत असलेल्या लिपीक व बिल सर्वेअर ची संख्या फारच कमी असुन ते बिल वितरण करण्यासाठी अपुरे आहेत. याशिवाय बिलाचे वाटप केल्याबद्दल व्यवस्थित पोहोच घेतली नाही तर त्यानंतरची वसुली संदर्भातील संपुर्ण कार्यवाही अवैध ठरते.

मालमत्ता कराची बिले वितरीत करण्यासाठी ठोस उपाययोजना करणे गरजेचे आहे. अशा परिस्थितीत पोस्ट कार्यालयामार्फत बजावयाची झाल्यास याकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | रजिस्टर (पोहोच पावतीसह)<br>Regd (With Acknow) | रू. २६.२०/— प्रति बिल | अंदाजित खर्च रक्कम रू. ४४,५४,०००/— |
| २) | रजिस्टर (पोहोच पावती शिवाय)<br>Regd.(W/O Acknow) | रू. २३.२० /— प्रति बिल | अंदाजित खर्च रक्कम रू. ३९,४४,०००/— |
| ३) | स्पीड पोस्ट [Speed Post] | रू. १७.७०/— प्रति बिल | अंदाजित खर्च रक्कम रू. ३०,०९,०००/— |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसूचितील प्रकरण ८ (कराधान नियम) मध्ये नियम ५५ नुसार कराबद्दलची बिले बजावण्याबाबत पुढीलप्रमाणे विशेष तरतुद समाविष्ट आहे.

कलमे ४७२, ४७३ आणि ४७४ मध्ये काहीही अंतर्भुत असले तरी, कोणत्याही नगरपालिका कराबद्दचे बिल, त्या करास पात्र असलेल्या व्यक्तीस, शहरातील तिच्या शेवटच्या माहीत असलेल्या राहण्याच्या किंवा धंद्याच्या ठिकाणाच्या पत्त्यावर, तिच्या नावावर टपाल दाखला घेऊन, आगाऊ आकार भरलेल्या पत्राद्वारे साध्या डाकेने पाठवता येईल आणि अशा रीतीने पाठवण्यात आलेले प्रत्येक बिल, ते ज्या पाकिटातुन किंवा आवेष्टनातून पाठवण्यात आले असेल ते पाकिट किंवा आवेष्टन ज्या दिवशी टपालाने आले असेल त्या दिवसाच्या लगेच नंतरच्या दिवशी ते बिल देण्यात आले आहे असे मानले जाईल आणि अशा रीतीने बिल दिल्याचे सिध्द् करताना, ज्या पाकिटातुन किंवा आवेष्टातून अस बिल पाठवण्यात आले असेल त्या पाकिटावर किंवा आवेष्टनावर योग्य रीतीने पत्ता लिहिलेला होता आणि ते टपाल दाखला घेऊन टपालात टाकण्यात आले होते, असे सिध्द् करणे पुरेस होईल, अशी तरतुद आहे.

उक्त तरतुदी अंतर्गत कराची बिले पोष्ट कार्यालयामार्फत स्पीड पोष्टद्वारे वितरीत करणेसाठी प्रस्तावित असुन याकामी अंदाजित रक्कम रू. ३०,०९,०००/— खर्च अपेक्षित आहे. तसेच सदरील खर्च वर्ष २०१६—२०१७ चे अंदाजपत्रकातील AB1 A-3[9] Postal / Courier Expenses या लेखा शिर्षातून भागविण्यात येईल. सदर रक्कमेपैकी पोष्ट कार्यालयास रक्कम रू. २० लाख अदा करण्यात आली आहे.

तसेच ३ वार्डमध्ये महापालिका सदस्यांच्या विनंतीनुसार प्रायोगिक तत्वावर बचत गटामार्फत पोष्टाची बिले वाटप करणेबाबत. प्रतिबिल रू. १४/— या प्रमाणे कार्यवाही करण्यात आली.

तरी वर्ष २०१६—२०१७ करीता मालमत्ता कराची बिले पोष्ट कार्यालयामार्फत स्पीड पोष्टद्वारे तसेच बचत गटामार्फत वितरीत करणेसाठी अंदाजित रक्कम रू. ३०,०९,०००/— खर्चास मंजुरी मिळणेसाठी स्थायी समितीपुढे प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ५५      दिनांकः— ४/८/२०१६

सुचकाचे नाव :— श्रीम. रेखा ठाकूर

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भूल्लर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार वर्ष २०१६—२०१७ करीता मालमत्ता कराची बिले पोष्ट कार्यालयामार्फत स्पीड पोष्टद्वारे तसेच बचत गटामार्फत वितरीत करणेसाठी अंदाजित रक्कम रू. ३०,०९,०००/— खर्चास कार्योत्तर मंजुरी देत आहे.

**परंतु**

पुढील वर्षापासुन सदर काम त्या त्या ५८ वार्डातील महिला बचत गटाकडून करून घेणे प्रशासनास बंधनकारक राहील.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

महापालिका सचिव :– विषय क्र. ९ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ९ :–** उल्हासनगर महानगरपालिकेच्या वाहनांवर खाजगी कंपनीकडून वाहनचालक पुरवठा करण्याबाबतच्या निविदेस मान्यता मिळणे.

---

सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भूल्लर :– सदर विषयाची माहिती कोण देणार?

श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक :– महानगरपालिकेकडील सध्या वापरात असलेल्या ५२ वाहनांवर फक्त २६वाहनचालक कार्यरत आहे.व प्रभारी वाहनचालक (मजुर,सफाई कामगार)मिळूण सद्या एकूण ३५ वाहनचालक कार्यरत आहेत. वाहनचालकांची कमतरता आहे.

सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भूल्लर :– वाहनचालकांची नियुक्ती दोन वर्षाकरीताच देण्यात यावी.

महापालिका सचिव :– सदर विषय पारीत करण्यात यावा का?

सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भूल्लर :– वाहनचालकांची कमतरता असल्याने पारीत करण्यास हरकत नाही, तसेच सदर विषयाच्या ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता करण्यात यावी.

काही सदस्य :–पास–पास......

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ९ :–** उल्हासनगर महानगरपालिकेच्या वाहनांवर खाजगी कंपनीकडून वाहनचालक पुरवठा करण्याबाबतच्या निविदेस मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावना

**उल्हासनगर महानगरपालिकेची स्वत:ची वापरात असलेली वाहने ५२ व वाहनचालंक मंजुर ६० पदांपैकी केवळ २६ पदे भरलेली आहेत. सबब उर्वरीत मंजुर पदावर वाहनचालंकाची नेमणुक अद्यापही झालेली नाही शासन धोरणानुसार भरतीवर असलेले निर्बध,मनपाची आर्थिक स्थिती पाहता वाहनचालक सद्यास्थितीत भरती होऊन उपलब्ध होणे लगेच शक्य नाही.**

त्यामुळे मनपास आजरोजी वाहनचालकांची अत्यत निकड भासत आहे ही अत्यावश्यक बाब असल्याने खाजगी ठेकेदारामार्फत शासन धोरणानुसार सेवा उपलब्ध करून घेणे प्राप्त आहे. म्हणुन खाजगी अभिकर्त्याकडून/संस्थेकडून वाहनचालक सेवा उपलब्ध करणेस प्रस्तावित करण्यात आलेले आहे.

महानगरपालिकेकडील सध्या वापरात असलेल्या ५२ वाहनांवर फक्त २६वाहनचालक कार्यरत आहे.व प्रभारी वाहनचालक (मजुर,सफाई कामगार)मिळूण सद्या एकूण ३५ वाहनचालक कार्यरत आहेत. मात्र वाहनांची संख्या व वाहनचालंकाची उपलब्धता पाहता लोकहितार्थ आवश्यक असलेल्या सेवा पुरवठयामध्ये वाहनांच्या वाहनचालकांना १२–१२ तास काम करावे लागते व त्यांना सुट्टी देखील घेता येत नाही.रूग्णवाहिका, शववाहिका व अग्नीशमन अशा अत्यावश्यक सेवांमध्ये एका वाहनावर कमीत कमी ४ वाहनचालकांची आवश्यकता आहे.

या अनुषंगाने तातडीची बाब म्हणून खाजगी कंपनीकडून Minimum wages Act च्या दरानुसार वाहनचालक घेण्याचा प्रस्ताव ई निविदा द्वारे सादर करण्यात आले होते.या कामाकरिता २

लिफाफा पध्दतीने ठेकेदार/मक्तेदार यांचेकडून ई निविदा मागविण्यात आल्या असुन त्यांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| | प्राकलनीय खर्च | रु. ७६,४४,०००/— |
| | निविदा प्रसिध्द केलेली वर्तमानपत्रे | १)दैनिक प्रात:काल,२)दैनिकलोकमत, ३)दैनिक ठाणे वैभव |
| | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दि. ०४/०५/२०१६ ते दि. ०७/०५/२०१६ |
| | निविदा विक्री कालावधी | दि. ०९/०५/२०१६ ते दि. ३१/०५/२०१६ |
| | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दि. ३१/५/२०१६ ते दि. ०२/६/२०१६ |
| | निविदेचा तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | दि. ०४/०६/२०१६ ते दि. ०७/०६/२०१६ |
| | निविदेचा आर्थिक भाग उघडण्याचा दिनांक | दि. ०४/०६/२०१६ ते दि. ०७/०६/२०१६ |
| | विक्री केलेल्या निविदांची संख्या | ३ |
| | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ३ |

दिनांक ०४/०७/२०१६ रोजी निविदा क्र. ९५७ या ई निविदाचा तांत्रिक भाग मा. अतिरिक्त आयुक्त सो., मा.मुख्य लेखा परिक्षक, मा. लेखा अधिकारी, मा. उप आयुक्त (वाहन), यांचे उपस्थितीत उल्हासनगर महानगरपालिकेच्या वाहनांवर खाजगी कंपनीकडून वाहनचालक पुरवठा करणे बाबतचे या कामाच्या निविदेचा भाग—१ लिफाफा उघडण्यात आला त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | निविदाकाराच्या निविदेमधील बाबी | मे.शुभम कन्ट्रक्शनस् | मे.आदित्य ट्रॅव्हल्स् ॲन्ड इंन्टरप्राझेस | मे.शेतमजुर सहकारी संघ |
|---|---|---|---|---|
| १ | पी.एफ.रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र | होय | होय | होय |
| २ | संस्था नोंदणी प्रमाणपत्र | होय | होय | होय |
| ३ | अनुभवाचा दाखला | होय | होय | होय |
| ४ | सर्व्हिस टॅक्स प्रमाणपत्र | होय | होय | होय |
| ५ | पॅनकार्डची प्रत | होय | होय | होय |

सदर निविदेची वाहन विभागात छाननी केली असता १) मे.शुभम कन्ट्रक्शनस २) मे.आदित्य ट्रॅव्हल्स् ॲन्ड इंन्टरप्राझेस, ३) मे.शेतमजुर सहकारी संघ यांच्या निविदा अटी शर्तीनुसार असल्याने पात्र आहेत.

तरी उपरोक्त निविदाकांराच्या निविदाचा दुसरा भाग (आर्थिक) दिनांक २१/०७/२०१६ रोजी मा.अति.आयुक्त/उप आयुक्त (मुख्यालय),यांच्या अध्यक्षते खालील निवड समिती सदस्य मुख्य लेखापरिक्षक,मुख्य लेखाअधिकारी, उप आयुक्त (वाहन) यांचे उपस्थितीत उघडण्यात आला. त्याचा तपशिल दर खालीलप्रमाणे आहे.

| अ क्रं | वाहनाचा प्रकार | मे.शुभम कन्ट्रक्शनस | | मे.आदित्य ट्रॅव्हल्स् ॲन्ड इंन्टरप्राझेस | | **मे.शेतमजुर सहकारी संघ** | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रतिदिन प्रति वाहन चालक दर | प्रति महिना प्रति वाहन चालक दर | प्रतिदिन प्रति वाहन चालक दर | प्रति महिना प्रति वाहन चालक दर | **प्रतिदिन प्रति वाहन चालक दर** | **प्रति महिनाप्रति वाहन चालक दर** |
| १ | कार | ५०१/— | १५०३०/— | ४५८/— | १३७५०/— | ४४५/— | १३३५०/— |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | जिप | ५०१/— | १५०३०/— | ४५८/— | १३७५०/— | ४४५/— | १३३५०/— |
| ३ | अॅपे पियाजो टेम्पो | ५०१/— | १५०३०/— | ४५८/— | १३७५०/— | ४४५/— | १३३५०/— |
| ४ | ४०७/४१० ट्रक | ५०१/— | १५०३०/— | ४५८/— | १३७५०/— | ४४५/— | १३३५०/— |
| ५ | रूग्णवाहिका | ५०१/— | १५०३०/— | ४५८/— | १३७५०/— | ४४५/— | १३३५०/— |
| ६ | शववाहिका | ५०१/— | १५०३०/— | ४५८/— | १३७५०/— | ४४५/— | १३३५०/— |
| ७ | हायड्रोलिक शिडी | ५०१/— | १५०३०/— | ४५८/— | १३७५०/— | ४४५/— | १३३५०/— |
| ८ | ट्रॅक्टर | ५०१/— | १५०३०/— | ४५८/— | १३७५०/— | ४४५/— | १३३५०/— |
| ९ | टॅकर | ५०१/— | १५०३०/— | ४५८/— | १३७५०/— | ४४५/— | १३३५०/— |
| १० | संक्शन पंप | ५०१/— | १५०३०/— | ४५८/— | १३७५०/— | ४४५/— | १३३५०/— |
| ११ | जेटींग पंप | ५०१/— | १५०३०/— | ४५८/— | १३७५०/— | ४४५/— | १३३५०/— |
| १२ | डंपर | ५०१/— | १५०३०/— | ४५८/— | १३७५०/— | ४४५/— | १३३५०/— |
| १३ | जे.सी.बी | ५०१/— | १५०३०/— | ४५८/— | १३७५०/— | ४४५/— | १३३५०/— |
| १४ | पोकलन | ५०१/— | १५०३०/— | ४५८/— | १३७५०/— | ४४५/— | १३३५०/— |
| १५ | अग्नीशमन बंब | ५०१/— | १५०३०/— | ४५८/— | १३७५०/— | ४४५/— | १३३५०/— |

वरील तुलनात्मक तक्त्यानुसार १) मे.शेतमजुर सहकारी संघ, यांनी वाहनचालक संबंधी सादर केलेले दर हे न्युनतम आहेत. परंतु सदर दर हे Minimum wages Act प्रमाणे अंदाजपत्रकीय प्रति वाहनचालक प्रति माह रू. १३,०००/— इतका असुन मक्तेदार/ठेकेदार मे.शेतमजुर सहकारी संघ यांनी भरणा केलेले प्रति वाहनचालक प्रति माह दर रू. १३,३५०/— आहे. सदर दर हे अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा २.६२ % जास्त आहे. म्हणजेच रू. १३,३५०/— इतका आहे.

या अनुषंगाने मे. शेतमजुर सहकारी संघ यांचा प्राप्त दरानुसार पुढील कारवाई करीता मा. स्थायी समिती समोर निर्णयास्तव सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ५६ दिनांकः— ४/८/२०१६

सुचकाचे नाव :— श्रीम. रेखा ठाकूर

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिकेच्या वाहनांवर खाजगी कंपनीकडून वाहनचालक पुरवठा करण्याबाबत न्युनतम दर सादर करणा—या निविदाकार मे. शेतमजुर सहकारी संघ यांच्याशी निविदेस मान्यता देत आहे.

**परंतु**

सदर काम २ वर्षासाठीच देण्यात यावे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहत थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

**<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>** सन्मा. सदस्यांनी कृपया लक्ष दयावे, खरंतर सुरूवातीलाच हा विषय व्हायला हवा होता, परंतु राहुन गेले, कालच आपल्या महापालिका सदस्या श्रीम. माई कांवळी यांचे निधन झाले आहे तर त्यांना श्रध्दांजली वाहण्यात यावी.

**यावेळी सर्व सदस्य व अधिका—यांनी मौन पाळुन श्रध्दांजली अर्पित केली.**

सायं. ५.३० वाजंता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती श्री. सुनिल सुर्वे यांनी जाहिर केले.

**(प्राजक्ता मि. कुलकर्णी )**
प्र. महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

.

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—३/९/२०१६

दि. ३/९/२०१६ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवत्त.

(८)

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा शनिवार दिनांक ३/९/२०१६ रोजी सांयकाळी ४.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे | सभापती |
| २ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | सदस्या |
| ३ | श्रीमती लिलाबाई आशान | सदस्या |
| ४ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर | सदस्य |
| ५ | श्री. गुरुनो भिकोमल वलेचा | सदस्य |
| ६ | श्री. जमनादास पुरस्वानी | सदस्य |
| ७ | श्रीमती आशा जिवन इदनानी | सदस्या |
| ८ | श्रीमती अंजली साळवे | सदस्या |
| ९ | श्री. विजय चाहु पाटील | सदस्य |
| १० | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | सदस्या |
| ११ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | सदस्या |
| १२ | श्रीमती इंदिरा उदासी | सदस्या |
| १३ | श्रीमती पुष्पाताई नाना बागुल | सदस्या |
| १४ | श्रीमती वंदना पाटील उर्फ वंदना युवराज भदाणे | सदस्या |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्री. उमेश सुरेश कालानी, २. डॉ. निना प्रकाश नाथानी

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१४८. श्रीमती विजया कंठे, उप–आयुक्त, मुख्यालय
१४९. श्रीमती प्राजक्ता मि. कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
१५०. श्री. जमीर लेंगरेकर, उप–आयुक्त, कर
१५१. श्री. सुखदेव बलमे, मुख्य लेखा परिक्षक
१५२. श्री. जाधव, सहा. लेखा परिक्षक
१५३. श्रीमती मंगला माळवे, सहा. आयुक्त
१५४. डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी
१५५. श्री. सेलवन, उप अभियंता, पाणी पुरवठा
१५६. श्री. शैलेश दोंदे, प्र. कर निर्धारक व संकलक
१५७. श्री. नंदु समतानी, प्र. सहा. आयुक्त
१५८. श्री. गणेश शिंपी, प्र. सहा. आयुक्त
१५९. श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
१६०. श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक
१६१. श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर
१६२. श्रीमती निलम कदम, शिक्षण मंडळ

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.

१. श्रीमती मनिषा महाजन

२. श्रीमती नर्गिस खान

३. श्री. अशोक रामरख्यानी

सांयकाळी ४.२० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ <u>विषय क्र. १</u>:–सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत निविदा प्रक्रीया केलेल्या उल्हासनगर–४ स्मशानभुमी येथील शेडची दुरूस्ती, नुतनीकरण करणे, लॅन्डस्कोपींग, प्रवेशव्दार बांधणे व बेंचेस पुरविणे या कामाकरीता मे. बुबरे अण्ड असोसिएट्स यांच्या दरसुचीप्रमाणेच्या निविदेस मा. स्थायी समितीची मान्यता मिळणे.

---

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>मा. सभापती महोदय, स्थायी समितीची सभा चालु झाली आहे, आता सव्वाचार वाजले आहेत, अधिकारी सभेत उपस्थित नाहीत. प्रथम तर जे जे विषय आहेत त्या विषयांशी निगडीत असलेले विभाग प्रमुखांनी प्रथम सभेस आले पाहिजे. त्याशिवाय आपण कसे निर्णय घेणार?

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>प्रत्येक सभेचा अनुभव आहे, स्थायी समितीची महत्वाची बैठक असतांना सुध्दा अधिकारी कधीच सभेत वेळेवर उपस्थित नसतात. त्यांना त्याचे महत्व समजतच नाही. तर त्यासंदर्भात प्रशासन त्यांच्यावर काय कारवाई करणार आहे?

<u>श्रीमती विजया कंठे, उप—आयुक्त, मुख्यालय:—</u>मी आधीच्या स्थायी समिती बैठकीबाबतीत काहीही भाष्य करणार नाही. आजच्या स्थायी समिती सभेचा जो भाग आहे त्याबद्दल मी सांगते. अधिका—यांना मीच पाठविले आहे. आज मी स्वत: आता उप—आयुक्त, मुख्यालय यांच्या दालनात म्हणजेच श्री. कापडनीस साहेब बसत होते त्या दालनात प्रभाग रचनेचे काम चालु आहे. मा. आयुक्त, कोकण भवन हे आपणाकडे गुरुवारी येणार आहेत. सुट्टीचा दिवस असतांना सुध्दा आम्हांला तेच काम करावे लागणार आहे. त्यामुळे नगररचना इंजिनिअर व बांधकाम खात्यातील इंजिनिअर हे माझ्याकडे निगडित असल्याने ते त्या प्रभाग रचनेत घुसलेले आहेत. तेथे आता श्री. कुलदेव, प्रोग्रामर महोदया आणि ३ इंजिनिअर व त्यातील एक जे आहेत श्री. दिपक हे रजेवर आहेत त्यांची प्रकृती बरोबर नसल्याने ते कार्यालयात येतच नाहीत. ही वस्तुस्थिती आहे. तसेच दुसरा भाग म्हणजे रस्त्यावरील खड्डे भरण्याकरीता साईटवर शहर अभियंता व त्यांच्याबरोबर एक इंजिनिअर श्री. तरुण शेवकानी हे साईट इंजिनिअर गेले आहेत. ते आता कुठे असतील तर त्यांच्याशी मी संपर्क साधुन बोलावुन घेते. तिसरा मुद्दा कर विभागाचे अधिकारी येथेच आहेत. दोन प्रभाग अधिकारी आले आहेत, दोन अदयाप येथे पोहोचले नाहीत. गणेश उत्सवानिमित्ताने रस्त्यावरील जे अतिक्रमण आहेत ती आपण हटवित आहोत त्यामुळे दोन्ही प्रभाग अधिकारी तेथेच आहेत. त्यामुळे सन्माननिय सभागृहास मी विनंती करेल की, प्रशासनाकडुन असे नाही की आम्ही सभागृहाचा अवमान करु इच्छितो, असे आता कुठल्याही अधिका—यांनी केलेले नाही. आता जे पाणी पुरवठा अधिकारी आलेत, अधिकारी वेळेवर येतात, आता निवडणुकीचा कालावधी असल्याने एकेका माणसाला तीन तीन माणसांची कामे दिलेली आहेत. प्रशासनाची वस्तुस्थिती अशी आहे की, आपणाकडे खरोखर स्टाफ हा फक्त ३० टक्केच आहे. चार माणसाऐवजी एकच माणुस काम करत असतो त्यामुळे सभागृहास विनम्रपणे विनंती करते की आमच्याकडुन कोणतीच हलगर्जीपणा, कसुराई किंवा सभागृहाचा अवमान करणे, असे काहीही झालेले नाही. मा. आयुक्त साहेब हे आज ग्रॅण्ड ॲम्ब्रेसेडर श्री. अमिताभ बच्चन यांच्या मार्फत मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या हस्ते जे स्वच्छता अभियान होणार होते चर्चगेट येथे तर ते तेथुन येत आहेत, ते रस्त्यात आहेत. मी ही सर्व वस्तुस्थिती आपणासमोर मांडत आहे. अधिकारी उपस्थित नाहीत त्याबद्दल मी पुढील सभेत त्यांना उपस्थित राहण्यास सांगते.

<u>सदस्या श्रीमती लिलाबाई आशान :—</u>आमचे तसे म्हणणे नाही. आम्ही कसे येवुन बसलो. आता कसे हे लोक फटाफट आलेत? तुम्ही एवढे कारणे दाखवितात आम्हांला.

<u>श्रीमती विजया कंठे, उप—आयुक्त, मुख्यालय:—</u>महोदया, तसे नाही.

<u>सदस्या श्रीमती लिलाबाई आशान:—</u>सचिव महोदया आम्हांला सांगतात सभा सुरु झाल्यावर सहया करा, तोपर्यंत तुम्हांला जाता येणार नाही. तर मग आम्हांला नियम आहे, तुम्हांला नाही काय?

श्रीमती विजया कंठे, उप–आयुक्त, मुख्यालयः–आहे ना, प्रशासनाने कधी तो नाकारलेला नाही की जी आमची जबाबदारी आहे ती आमची नाही म्हणुन. मी विनम्रपणे सद्यस्थिती सांगितली आहे.

,

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–सभापती महोदय, माझे असे म्हणणे आहे की ज्या अधिका–यांचा विषय आहे त्यांनी सभेत हजर असले पाहिजे. भले ज्यांचा विषय नाही आहे ते सभेस नाही आले तरी चालतील परंतु ज्या अधिका–यांचा विषय आहे त्यांनी सभेत हजर राहिले पाहिजे. जेणेकरुन आपण त्या विषयावर चर्चा करु शकु.

श्रीमती विजया कंठे, उप–आयुक्त, मुख्यालयः–मी आपली माफी मागते मी स्वतः पंधरा–वीस मिनिटे उशिरा आली.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–ठिक आहे, कर्मचारी वर्ग कमी आहे, गणपतीचा उत्सव चालु आहे हे खरे आहे. परंतु ज्यांचा स्थायी समितीमध्ये विषय आहे त्या अधिका–यांनी वेळेवर उपस्थित असले पाहिजे.

सभापती, श्री. सुनिल सुर्वेः–ज्यांचा विषय आहे त्यांनी सभेत उपस्थित असले पाहिजे. नाहीतर नेमके काय होते की तो विषय थांबुन जातो. आणि आम्हांला पुढील वेळेस ९९ टक्के तरी अधिकारी उपस्थित पाहिजेत. नाहीतर तुम्ही सांगा तुमच्या सोयीनुसार आम्ही बैठक लावु.

श्रीमती विजया कंठे, उप–आयुक्त, मुख्यालयः–मला मान्य आहे. तशी नोंद घेतली जाईल. आणि ज्यांचा विषय आहे त्यांना सभेस उपस्थित राहण्यास सांगते.

सभापती, श्री. सुनिल सुर्वेः–आमचा आक्षेप नाही, परंतु गेल्या दोन सभेपासुन मी हेच पाहत आहे. नाहीतर तुमच्या सोयीनुसार तुम्ही सांगा आम्ही त्या दिवशी सभा घेवु.

श्रीमती विजया कंठे, उप–आयुक्त, मुख्यालयः–आपण बोलतो, माझी नम्र विनंती आहे सभागृहाचे अपमान करणे हे कोणाचेच मत नाही.

यावेळी सदस्या श्रीमती लिलाबाई आशान सभागृहातुन बाहेर गेल्या. 

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः–मा. सभापती महोदय, यापुर्वी देखील सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे एक प्राकलन बनविले होते तर ते अदयाप बनविले नाही. त्याची निविदा सुध्दा बनविली आहे.

**<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u>**कॅम्प नं.१ चे सुध्दा आहे, २ चे सुध्दा आहे. तर २ नंबरचा सुध्दा प्रस्ताव आलेला नाही.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–</u>**आज आम्ही पारीत करतो परंतु जो काही विषय प्रलंबित आहे, ३ नंबर स्मशानीभुमीचा असो तो देखील आणावा. जे अत्यावश्यक आहे ते सर्व आणले जावे. एकुण ४ स्मशान भुमी आहे आपणाकडे. १चे आले बाकी ३ चे आणण्यात यावे. कॅम्प नं. १ व २ चे एक व ३नंबर, ५ नंबर असे तीन आणण्यात यावे.

**<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u>**कॅम्प नं. ४ चा आला आहे.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–</u>**हा विषय अतिआवश्यक आहे. इतिवृत्ताची वाट न पाहता हा पारीत करण्यात यावा.

**<u>महापालिका सचिव:–</u>**ठराव वाचुन दाखविते.

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत निविदा प्रक्रीया केलेल्या उल्हासनगर–४ स्मशानभुमी येथील शेडची दुरूस्ती, नुतनीकरण करणे,लॅन्डस्कोपींग, प्रवेशव्दार बांधणे व बेंचेस पुरविणे या कामाकरीता मे. बुबरे अण्ड असोसिएट्स यांच्या दरसुचीप्रमाणेच्या (At Par) दराच्या निविदेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

**<u>काही सदस्य :–</u>**पास–पास......

**<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १ :–** सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत निविदा प्रक्रीया केलेल्या उल्हासनगर–४ स्मशानभुमी येथील शेडची दुरूस्ती,नुतनीकरण करणे,लॅन्डस्कोपींग, प्रवेशव्दार बांधणे व बेंचेस पुरविणे या कामाकरीता मे. बुबरे अण्ड असोसिएट्स यांच्या दरसुचीप्रमाणेच्या निविदेस मा. स्थायी समितीची मान्यता मिळणे.

**<u>प्रस्तावना</u>**

उल्हासनगर महानगरपालिका प्रभाग क्षेत्र क्र.४ मधील मंजुरी मिळालेल्या उल्हासनगर–४ स्मशानभुमी येथील शेडची दुरुस्ती, नुतनीकरण करणे, लॅन्डस्केपिंग, प्रवेशद्वार बांधणे व बेंचेस पुरविणे या कामांकरीता बी–१ प्रकारच्या दोन भाग (तांत्रिक व आर्थिक) पध्दतीने नोंदणीकृत ठेकेदारांकडून दिनांक ०१/०३/२०१६ रोजी निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्राकलनीय खर्च | रु. ३५०००००/— |
| २ | निविदा प्रसिध्द केलेली वर्तमानपत्रे | १) दै.नवशक्ती २) दै. हमारा महानगर |
| ३ | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक ०१/०३/२०१६ |
| ४ | निविदा विक्री कालावधी | दिनांक ०३/०३/२०१६ ते ०४/०४/२०१६ |
| ५ | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक १३/०४/२०१६ |
| (अ) | प्रथम मुदतवाढ | |
| ब) | द्वितीय मुदतवाढ | |
| क) | तृतीय मुदतवाढ | |
| ६ | तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | दिनांक २२/०४/२०१६ |
| ७ | आर्थिक भाग उघडण्याचा दिनांक | दिनांक २७/०४/२०१६ |
| ८ | विक्री केलेल्या निविदांची संख्या | ३ |
| ९ | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ३ |

दिनांक २२/०४/२०१६ रोजी मा.अतिरिक्त आयुक्त, मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक, शहर अभियंता यांचे उपस्थितीत उल्हासनगर—४ स्मशानभुमी येथील शेडची दुरुस्ती, नुतनीकरण करणे, लॅन्डस्केपिंग, प्रवेशद्वार बांधणे व बेंचेस पुरविणे या कामाच्या निविदेचा तांत्रिक भाग उघडण्यात आला त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | निविदाकाराच्या निविदेमधील बाबी | मे. बुबेरे ॲण्ड असोसिएट्स | मे. हिंदुस्थान एंटरप्रायजेस | मे. फ्रेन्डस कन्स्ट्रक्शन |
|---|---|---|---|---|
| १ | निविदा प्रपत्रकाच्या खरेदीची पावती | होय | होय | होय |
| २ | इसारा रक्कमेचा डी.डी. जोडला आहे का ? | होय | होय | होय |
| ३ | महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्यात वर्ग—१—अ मध्ये नोंदणी असल्याचे प्रमाणपत्र जोडले आहे का? | होय | होय | होय |
| ४ | अद्यावत आयकर रिटर्न भरल्याची पावती | होय | होय | होय |
| ५ | कामाचा अनुभव | होय | होय | होय |
| | अ) ८० टक्के पहिल्या कामासाठी | होय | होय | होय |
| | ब) ५० टक्के दुस—या कामासाठी | होय | होय | होय |
| | क) ४० टक्के तिस—या कामासाठी | होय | होय | होय |
| | निविदाकाराने निविदा भरलेली रक्कम तपासणे. | होय | होय | होय |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | निविदाकाराकडे उपलब्ध असलेल्या तांत्रिक कर्मचा–यांची माहिती | होय | होय | होय |
| ७ | निविदा फॉर्म पुर्णपणे भरलेले (परिशिष्ट–१) | होय | होय | होय |
| ८ | प्राधिकृत केलेल्या व्यक्तिसाठी निविदाकाराने द्यावयाचे प्रमाणपत्र (परिशिष्ट–२) | होय | होय | होय |
| ९ | निविदाकाराने प्राधिकृत व्यक्तिसाठी दिलेला दाखला निविदाकार अंकलिखित असल्याचे नोटराईजड केलेले प्रतिज्ञापत्र (परिशिष्ट–३) | होय | होय | होय |
| १० | निविदाकाराची सविस्तर माहिती (परिशिष्ट–४) | होय | होय | होय |
| ११ | निविदाकाराची कामगिरी वरुन माहिती (परिशिष्ट–५) | होय | होय | होय |
| १२ | संस्था/कंपनी नोंदणी (भागिदारी, मालकी, कंपनी इत्यादीचे) दस्तऐवज | होय | होय | होय |
| १३ | व्हॅट नोंदणी प्रमाणपत्र | होय | होय | होय |
| १४ | विक्रीकर/व्हॅट रिर्टन भरण्याची पावती | होय | होय | होय |
| १५ | पॅन कार्डाची प्रत | होय | होय | होय |
| १६ | निविदा भरतेवेळी निविदाकाराच्या हाती असलेल्या अथवा पूर्ण झालेल्या निविदा किंमती इतक्या सम कामाचा अनुभवाचा दाखला. | होय | होय | होय |
| १७ | नाव, पदनाम व मोबाईल नंबर इत्यादी मुख्य कार्य अधिकारी स्तरावरील अधि–याचे अखत्यारित (प्रोब्लेम एक्सलेशन मेकॅनिझम) | होय | होय | होय |
| १८ | प्लांट मशिनरी, व्हायब्रेटर रोलर, स्टॅटीक रोल्ट, पेव्हर फिनिशर यांची मालकी व असल्याचे दस्तऐवज | होय | होय | होय |
| १९ | मेमोरण्डम पुर्णपणे भरलेले व स्वाक्षरी केलेले | होय | होय | होय |
| २० | सॉलवन्सी सर्टीफिकेट | होय | होय | होय |

सदर निविदांची सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये छाननी समिती मार्फत छाननी केली असता १) **मे. बुबेरे अॅण्ड असोसिएट्स** २) **मे. हिंदुस्थान एंटरप्रायजेस** ३) **मे. फ्रेन्डस कन्स्ट्रक्शन** यांच्या निविदा अटी शर्तीनुसार असल्याने पात्र आहेत. तरी उपरोक्त निविदाकारांच्या निविदांचा दुसरा भाग उघडण्यात प्रस्तावित करण्यात आले.

मा. महापौर यांचे दालनामध्ये दिनांक १५ सप्टेंबर, २०१५ रोजी ई–निविदेची आढावा बैठक घेण्यात आली होती. त्याअनुषंगाने ई–निविदेचा लिफाफा क्र.१ व २ वर एकाच वेळी उघडण्यात यावे. असे निर्देश देण्यात आले आहे. त्यामुळे सदर निविदेचे आर्थिक व तांत्रिक भाग उघडण्यात आला आहे.

आज दिनांक २७/०४/२०१६ रोजी उपरोक्त निविदाकारांचा आर्थिक बाबींचा दुसरा भाग (आर्थिक दर) मा. अतिरिक्त आयुक्त सो., यांचे अध्यक्षतेखालील निवड समिती सदस्य मुख्य लेखाअधिकारी, मुख्य लेखापरिक्षक, शहर अभियंता, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे उपस्थितीत उघडण्यात आला. त्याप्रमाणे निविदाकांरानी दिलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| १) **मे. बुबेरे ॲण्ड असोसिएट्स** | दिलेले दर दरसूचीप्रमाणे |
| २) **मे. हिंदुस्थान एंटरप्रायजेस** | दिलेले दर १.०० टक्के जास्त |
| ३) **मे. फ्रेन्डस कन्स्ट्रक्शन** | दिलेले दर ०.५० टक्के जास्त |

उपरोक्त **उल्हासनगर–४ स्मशानभुमी येथील शेडची दुरुस्ती, नुतनीकरण करणे, लॅन्डस्केपिंग, प्रवेशद्वार बांधणे व बेंचेस पुरविणे** या कामाचे उक्त निविदाकारांपैकी **मे. बुबेरे ॲण्ड असोसिएट्स** यांनी दरसूचीप्रमाणे दर (At Par) दिले असुन त्याप्रमाणे **मे. बुबेरे ॲण्ड असोसिएट्स** यांची सदर काम देणेकरिता शिफारस करण्यात येत आहे.

तरी **मे. बुबेरे ॲण्ड असोसिएट्स** या निविदाकाराने दिलेल्या दरसूचीप्रामणेच्या दराचे निविदेस मा. स्थायी समितीचे मान्यतेसाठी प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. ५७ दिनांकः– ३/९/२०१६

सुचकाचे नाव :– श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत निविदा प्रक्रीया केलेल्या उल्हासनगर–४ स्मशानभुमी येथील शेडची दुरूस्ती, नुतनीकरण करणे,लॅन्डस्कोपींग, प्रवेशव्दार बांधणे व बेंचेस पुरविणे या कामाकरीता मे. बुबरे अण्ड असोसिएट्स यांच्या दरसुचीप्रमाणेच्या (At Par) दराच्या निविदेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. २ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. २** :– महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत करपात्र मालमत्ता क्र. ४४सीओ ०१०४१४००(जुना मा.क्र. ४४/२४१५) ही नोंद रद्द करून मा.स्थायी समितीची मंजुरी मिळेपर्यंत थकीत कर

आकारणी व पाणीपट्टी बील (विलंब शास्तीसह)निर्लेखीत करणे.

---

**श्री. शैलेश दोंदे, प्र. कर निर्धारक व संकलक :**—हे श्री. विजय महाले यांचे आहे. दोन वेळा नोंद झाली आहे. आम्ही पाहणी करुन आलो, चौकशी केली त्यांची दुबार नोंद आहे. ते एक बिल भरतात. एक बिल रद्द करावे लागेल.

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:**—अशी आपणाकडे किती प्रकरणे आलीत? माझ्या माहितीप्रमाणे जवळ जवळ ३ टक्के ते ४ टक्के एकुण रक्कमेपैकी ५ टक्के रक्कम ही दुबार नोंदीची आहे. ब—याच लोकांनी अर्ज सुध्दा केले आहेत, मी सुध्दा अर्ज केला आहे परंतु त्या अर्जात माझा अर्ज कोठेच दिसत नाही. दुबार नोंदीबाबत लोकांचे म्हणणे काय असते आम्ही बिल भरतो ना मग दया ती दुसरी मालमत्ता आम्हांला. पुर्ण शहराचे आहे, ब—याच लोकांनी अर्ज केलेला आहे.

**श्री. शैलेश दोंदे, प्र. कर निर्धारक व संकलक:**—असे आपण प्राधान्याने करु.

**श्री. जमीर लेंगरेकर, उप—आयुक्त, कर :**—अडचण काय आहे माहित आहे काय की, जी दुबार नोंद आहे. मा. आयुक्तांकडुन प्रोसेस व्हायला डिले होतो. आमचे ५ बिले आहेत. प्रत्येक वेळी स्थायी समितीत आमचा विषय असतो.

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:**—त्याबाबतीत आम्ही खरच तुमचे आभारी आहोत. त्यात एक गोष्ट करा की, तुम्ही म्हणतात की प्रत्येक टेबलवर, तर असे हे टेबल कमी करु शकत नाही काय? असे काही अधिकार कोणा एकाकडे देवु शकत नाही का? लेखा विभागाचा विषय आहे, निर्लेखन बरोबर आहे. ऑडीट पॅरानुसार पारदर्शकता आणुन जर दोन टेबल कमी केले तर तेवढे लवकर येईल. आपण बसलो आहोत लोकांचे प्रश्न सोडवायला. शहरामध्ये कोणाचे आहे कोणाचे नाही. माझे फक्त एवढेच म्हणणे आहे की लवकरात लवकर प्राधान्याने करा. एकाच टेबलावर होईल ते पहा नाहीतर तो व्यक्ती नाही आला तर ती संचिका तेथेच राहते. तो कधीतरी येतो, करतो सही आणि कोठेही निघुन जातो.

**काही सदस्य:**—पास,पास.......

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:**—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑ **विषय क्र. २** :—महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत करपात्र मालमत्ता क्र. ४४सीओ०१०४१४०० (जुना मा. क्र.४४/२४१५) ही नोंद रद्द करून मा.स्थायी समितीची मंजुरी मिळेपर्यंत थकीत कर आकारणी व पाणीपट्टी बील (विलंब शास्तीसह)निर्लेखीत करणे.

**प्रस्तावना**

उपरोक्त विषयास अनसुरून सादर करण्यात येते की, श्री. विक्रम गोदा महाले रा. हट इन महादेव नगर, उल्हासनगर— ४. यांनी दि.०४/०२/२०१५ रोजीच्या अर्जान्वये महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत

करपात्र मालमत्ता क्र. ४४सीओ००९९६१६०० (जुना मा. क्र. ४४/०३७१) या एकाच मालमत्तेची मालमत्ता क्र. ४४सीओ०१०१४१४०० (जुना मा. क्र. ४४/२४१५) अन्वये झालेली दुबार नोंद रद्द करणेसाठी विनंती केलेली आहे.

१.विषयांकित प्रकरणा संदर्भात कार्यालयीन दफ्तरी नोंदीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | तपषिल | मालमत्ता क्र. ४४/०३७१ ४४सीओ००९९६१६०० | मालमत्ता क्र. ४४/२४१५ ४४सीओ०१०१४१४०० |
|---|---|---|---|
| १. | मिळकतीचे कर भरण्यास जबाबदार असलेल्या व्यक्तीचे नाव व पत्ता | श्री. विक्रम जी. एम. रा. हट इन महादेव नगर, उल्हासनगर–४ | श्री. व्ही. जी. महाले रा. हाउस अॅट महादेव नगर उल्हासनगर–४ |
| २. | मालमत्तेचा पत्ता | हट इन महादेव नगर, उल्हासनगर–४ | हाउस अॅट महादेव नगर, उल्हासनगर – ४ |
| ३. | प्रथम कर निर्धारण वर्ष | वर्ष १९८६–८७ | वर्ष १९९१–९२ |
| ४ | क्षेत्रफळ | ३५७. चौ.फु | ३३२.२५. चौ.फु |
| ५ | बांधकाम प्रकार | लफाटा | एसी शिट ब्रिक्स |
| ६ | वापर | निवासी | निवासी/भाडोत्री |
| ७ | भाडेकरू असल्यास वार्शीक भाडे रक्कम | निरंक | ३६००/– |
| ८ | प्रथम कर निर्धारणानंतर मालमत्ता कर भरण्यास प्रथमत: जबाबदार व्यक्तींमध्ये बदल झाला असल्यास त्याचा तपशिल (आदेश क्रमांकासह) | निरंक | निरंक |
| ९ | प्रथम कर निर्धारणानंतर वेळोवेळी सुधारीत कर निर्धारण झाली असल्यास त्याबाबतचासविस्तर तपशिल (मालमत्ता क्रमांक/निर्धारण वर्श) | निरंक | निरंक |
| ९अ | सुधारीत क्षेत्रफळ | निरंक | निरंक. |
| ९ब | सुधारीत बांधकाम प्रकार मिळकतीचा वापर | निरंक | निरंक |
| ९क | सुधारीत वापर | निवासी | निवासी |
| ९ड | भाडेकरू असल्यास वार्शीक भाडे रक्कम | निरंक | ३६००/– |
| १० | वर्ष १४–१५ अखेर मालमत्ता करापोटी थकीत रक्कम(चालु मागणीसह) | निरंक | रु. ८०२६९/– |
| ११ | वर्ष १४–१५ अखेर पाणीपट्टी करापोटी थकीत रक्कम(चालु मागणीसह) | निरंक | रु. १४४५६/– |
| १२ | एकुण थकीत रक्कम (चालु मागणीसह) | निरंक | रु. ९४७२५/– +विलंब शास्ती |
| १३ | मालमत्ता कराचा भरणा केला असल्यास त्याचा तपशिल (पावती | पावती क्र. १२५०१७ दि. ३०/१२/१४ | निंरक |

| | | | |
|---|---|---|---|
| | क्रमांक,दिनांक,रक्कम) | रक्कम रू. ४८४२/— | |

२.तक्रारी अर्जाच्या अनुसंगाने प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली असुन त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे,

| | | |
|---|---|---|
| १ | स्थळ पाहणी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव पदनाम व दिनांक | श्री. डी. एल. मगर<br>दिनांक ११/०२/२०१५ |
| २ | महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीप्रमाणे दोन्ही मिळकतीकरिता मालमत्ता कर भरण्यास जबाबदार असलेली व्यक्ती म्हणुन असलेल्या नोंदीत समानता आहे काय? नसल्यास मालमत्तानिहाय नोंदीचा तपशिल | होय |
| ३ | महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीप्रमाणे संदर्भित दोन्ही मिळकतीकरीता पत्त्यात असलेल्या नोंदीत समानता आहे काय? नसल्यास मालमत्तानिहाय नोंदीचा तपषिल | दोन्ही मिळकतीचे पत्यात जवळपास समानता असल्याचे दिसून येते. |
| ४ | दोन्ही मालमत्तेचे क्षेत्रफळ, बांधकाम प्रकार व वापर इ. करपात्र बाबींत समानता आहे काय? | मालमत्ता क्षेत्रफळ, बांधकाम प्रकार, इत्यादीमध्ये फरक आहे. वापर समानता आहे. |
| ५ | स्थळ पाहणी केली असता सद्यस्थितीत जागेवर एकच मिळकत अस्तिवात असल्याचे आढळुन आले आहे काय? | होय. मालमत्ता क्र.४४/२४१५<br>४४सीओ०१०१४१४०० |

३. सद्यस्थितीत जागेवर श्री. विक्रम जी. एम यांचे नावे असलेली मालमत्ता क्र. ४४**सीओ**००९९६१६०० **(जुना मा. क्र.** ४४/०**३७१**) ही अस्तिवात असून महानरगरपालिका कर आकारणी नोंदवहीप्रमाणे मिळकतीकरिता नमुद कर पात्र बाबी प्रत्यक्ष जागेवर असल्याचे दिसून येत आहे. तसेच संबंधीत प्रभाग क्र. ४४ मध्ये मालमत्ता क्र. ४४**सीओ**०१०**१**४**१**४०० **(जुना मा. क्र.** ४४/२४**१**५) ही कोठेही अस्तित्वात असल्याचे आढळून येत नाही.

४. श्रीम. कुसुम विक्रम महाले यांनी संदर्भित मिळकतीपैंकी मालमत्ता क्र. ४४**सीओ**००९९६**१**६०० **(जुना मा. क्र.** ४४/०**३७१**) ही दुबार नोंद रद्व करणेकरीता अर्ज सादर केला आहे. त्याबाबत समक्ष चर्चा करून दि. १६/०६/२०१६ रोजी प्रतिज्ञापत्र सादर केले आहे. मालमत्ता क्र. ४४**सीओ**००९९६**१**६०० **(जुना मा. क्र.** ४४/०**३७१**) **चे कर बिल नियमित भरत असून मालमत्ता क्र.** ४४**सीओ**०१०**१**४**१**४०० **(जुना मा. क्र.** ४४/२४**१**५) हे दुबार बिल असून ते रद्व करणेसाठी अर्ज केले आहे. अर्जदार यांना **अभय योजनेअंतर्गत दिनांक: १३/०७/२०१५ रोजी नोटीस** पाठविण्यात आली असून श्रीम. कुसूम विक्रम महाले हजर होत्या.

दिनांक: १५/०६/२०१५ रोजी अर्जदार कुसूम विक्रम महाले यांच्यासी प्रत्यक्ष चर्चा केली असून सबंधितांचे प्रतिज्ञा पत्र, रेशन कार्ड नं. एसबी. नं. ०७९४३९४, आधारकार्ड नं. ९०९२ ५२२३ ०६२७, भारत निवडणूक आयोग यांच्याकडील ओळखपत्र क्र. एमटी/१०/०५५/०६८१७०९, सादर केले आहे

५.उक्त बाबी विचारात घेता महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत करपात्र मालमत्ता क्र. ४४**सीओ**००९९६**१**६०० **(जुना मा. क्र.** ४४/०**३७१**) या एकाच मालमत्तेची मालमत्ता क्र. ४४**सीओ**०१०**१**४**१**४०० **(जुना मा. क्र.** ४४/२४**१**५) ही दुबार नोंद असल्याचे दिसुन येत आहे. तसेच मिळकत संदर्भात वर्ष २०१४—१५ अखेर थकीत मालमत्ता कर रक्कम रु. ९४७२५/— +विलंब शास्ती वसुल न होण्याजोगे आहे असे इकडील मत आहे.

६. सबब, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५२ नुसार मालमत्ता क्र. ४४**सीओ**०१०**१**४**१**४०० **(जुना मा. क्र.** ४४/२४**१**५) ही नोंद रद्द करून मिळकतीच्या खात्यात वर्ष २०१६—१७ अखेर थकीत कर आकारणी व पाणीपट्टी (विलंब शास्तीसह) रक्कम रू. **११**९५९९/— + विलंब शास्ती. मा. स्थायी समितीची मंजूरीमिळेपर्यत थकीत कर आकारणी व पाणीपट्टी बील (विलंबशास्तीसह) निर्लेखित करणेस मंजुरीकरीता मा.स्थायी समितीपुढे सादर करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> ५८ <u>दिनांक:— ३/९/२०१६</u>

सुचकाचे नाव :—श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत करपात्र मालमत्ता क्र. ४४सीओ ०१०४१४००(जुना मा.क्र.४४/२४१५) ही नोंद रद्द करून थकीत कर आकारणी व पाणीपट्टी बील (विलंब शास्तीसह)निर्लेखीत करणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ३ :—** उल्हासनगर महानगरपालिकेच्या शाळा क्र. १३ व १४ च्या पूर्नबांधणी करणेकामी न्युनत्तम दराचे निविदाकार मे. शेपस् ॲड कॉर्नरस् एल.एल.पी.यांच्याशी संविदा करण्यास मान्यता देणे.

---

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—सदरचा विषय हा इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करण्यात यावा.

सदस्य श्री. गुरुनो वलेचा :—विषय क्र. ३ आहे ना, खुलासा करा याचा.

सदस्या श्रीमती अंजली साळवे:—याचा तपशिल सांगा.

सदस्या श्रीमती रेखा ठाकुर :—हे कसले डेव्हलपमेंट आहे, काय पास करत आहात, किती निधी आहे, शाळेत मुले किती आहेत? काय डेव्हलोपमेंट करणार आहात?

सदस्या श्रीमती अंजली साळवे:—करोडोचा निधी आहे.

<u>श्रीमती निलम कदम, लेखापाल, शिक्षण मंडळ:—</u> ती शाळा ब्रिटीशकालीन आहे. तिचा पुर्नबांधणीचा प्रस्ताव आहे. हे अत्यावश्यक आहे. पुर्नबांधणीसाठी कंन्सेप्ट आहे. ही एक अशी कंन्सेप्ट आहे की, पी फॅब्रीक अशी कंन्सेप्ट आहे की आपण जे आरसीसीमध्ये काम करता यामध्ये पी फॅब्रीकेशनमध्ये २ शीटच्यामध्ये अशा मटेरीयलचा वापर केला जातो की ज्यामध्ये मी पुर्ण ब्रीफ केलेले आहे. यामध्ये कसे असते की थंड वातावरणात आतमध्ये वॉर्म राहणार आणि एकदम गरम वातावरणात आतमध्ये थंड राहणार आणि ज्यावेळी भुकंप येतो त्यावेळी ते संपुर्ण संरक्षण देतो.

<u>सदस्या श्रीमती रेखा ठाकुर :—</u>त्या शाळेमध्ये किती मुले आहेत?

<u>श्रीमती निलम कदम, लेखापाल, शिक्षण मंडळ:—</u>तेथे २ शाळा आहे. १३ नंबर शाळेमध्ये २५० मुले आहेत. आणि १४ मध्ये ३४५ मुले आहेत. सिंधी माध्यम नाही. एक गुजराथी माध्यम आहे. आणि एक मराठी माध्यम आहे.

<u>सदस्या श्रीमती अंजली साळवे:—</u> कोणत्या वर्गापर्यंत शाळा आहे.

<u>श्रीमती निलम कदम, लेखापाल, शिक्षण मंडळ:—</u>पहिली ते सातवीपर्यंत शाळा आहे.

<u>सदस्या श्रीमती अंजली साळवे :—</u>आपण एवढा निधी देत आहोत तर ही शाळा कशाप्रकारे बांधणार आहेत? पी फ्रॅब्रीकेशन ठीक आहे. वर्ग किती आहे यामध्ये? याचा तपशिल दयायला पाहिजे होता ना तुम्ही?

<u>श्रीमती निलम कदम, लेखापाल, शिक्षण मंडळ:—</u>१३मध्ये सुध्दा १ ते ७ वी पर्यंत वर्ग आहे आणि १४ मध्ये सुध्दा १ ते ७ वी पर्यंत वर्ग आहे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>संपुर्ण शाळा ही प्री प्रायमरी आहे, सेकेंडरी नाही. आपल्या महापालिकेच्या जेवढया शाळा आहेत त्या १ ते ७ वी पर्यंतच आहेत, सेकेंडरी नाहीत.

<u>श्रीमती निलम कदम, लेखापाल, शिक्षण मंडळ:—</u>जेथे सिंधी माध्यम आहे तेथे विदयार्थीच नसल्यामुळे १ ते ४ थी वर्ग आहे.

<u>सदस्या श्रीमती रेखा ठाकुर :—</u>असे पाहण्यात आले आहे की शिक्षण मंडळाचे जे कार्यालय आहे वुडलॅण्ड कॉम्पलेक्स येथे ते आपणांस माहितच आहे. महासभेत सुध्दा पारीत झाले आहे की महानगरपालिकेत ते कार्यालय आले पाहिजे. कारण की कोठे सभा होतात, ए.ओ. असतात नसतात. नोबडी नोज. काय डेव्हलपमेंट होत आहे याचा खुलासा होत नसतो. आपण जे सांगितले ते ठिक आहे परंतु डन टु द नोट क्लीअर. ठिक आहे.

<u>सदस्या श्रीमती अंजली साळवे:—</u>१ ते ७ वी पर्यंत शाळा आहे, आपण किती वर्ग काढणार, त्याचा एवढा निधी लागणार आहे काय?

<u>श्रीमती निलम कदम, लेखापाल, शिक्षण मंडळ:—</u>होय, सर्वात प्रथम त्याचा कंन्सेप्ट असा आहे महोदया की, सर्वात खाली हॉल असणार तेथे सांस्कृतिक कार्यक्रम होतील. मुलांचा जो कल्चरल प्रोग्राम आहे तो आपण टाऊन हॉल येथे घेतो, त्यासाठी तेथे मोठा हॉल असेल, लायब्ररी असेल, कॉम्प्युटर लॅब असेल, एक फ्लोअर १३ नंबरवर व एक फ्लोअर १४ नंबरवर असेल. फ्लोअरवाईज आहे.

<u>सदस्य श्री. जमनादाास पुरस्वानी :—</u>महोदया, हया ज्या शाळा आहेत १३ नंबर व १४ नंबर हे कोठे असणार?

<u>श्रीमती निलम कदम, लेखापाल, शिक्षण मंडळ:—</u>विठ्ठलवाडी स्टेशन आहे ना, तेथे असणार.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>आता जे बनणार तोडुन ते आरसीसीच बनेल ना? तर आपण कोठे शिप्ट करणार?

<u>श्रीमती निलम कदम, लेखापाल, शिक्षण मंडळ:—</u>हा जो प्रस्ताव पारीत होईल त्यानंतर प्रशासनच निर्णय घेईल की त्यांना कोठे शिफ्ट करणार. जी व्यवस्थापन समिती असेल ती निर्णय घेईल.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>आता काय आहे महोदया, आता शहरात जेवढया काही शासकिय शाळा आहेत ना, त्यांची स्थिती फारच बिकट आहे.

<u>सदस्या श्रीमती अंजली साळवे:—</u>एकदम बरोबर आहे.

<u>सदस्य श्री. जमनादाास पुरस्वानी :—</u>तर मी म्हणतो की आता आपण जसे करत आहात ते इतर शाळेसाठी सुध्दा करणार तर बरे होईल. ज्या इतर शाळा आहेत त्यांची अतिशय दयनीय स्थिती आहे. आपण हे कराच आणि आपण आणखीन दोन तीन शाळा घ्या. परंतु प्रत्येक कॅम्पवाईज जसे १, २, ३, ४ व ५ मध्ये प्रत्येक ठिकाणी एक अशी शाळा असली पाहिजे. जर आपण दुस—यांना सुध्दा शिप्ट करु शकतो.

<u>सदस्या श्रीमती अंजली साळवे:—</u>बाकीच्या शाळेत रिक्वायरमेंट सुध्दा नाहीत.

<u>श्रीमती निलम कदम, लेखापाल, शिक्षण मंडळ:—</u>४ इमारत आहे. प्रिमायसेस वाईज असते. १८ व २९ सुध्दा प्रोसेसमध्ये आहे.

<u>सदस्य श्री. गुरुनो वलेचा :–</u>शाळेत ६०० मुलांसाठी आहे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–</u>बाकीच्या शाळेसाठी सुध्दा आणण्यात यावे. आपण तो प्रस्ताव घेवुन यावा.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u>थोडक्यात सर्व सदस्यांची इच्छा अशी आहे, शाळांची अत्यंत दुरावस्था आहे. आणि ज्या प्राथमिक सुविधा आहेत त्या सुध्दा नाहीत त्यामुळे हे जसे आहे तसे बाकीच्या सुध्दा घ्या. अर्थसंकल्पात तशी तरतुद करुन स्थायी समितीच्या मंजुरीसाठी केव्हाही आणा तुम्ही आम्ही लगेच मंजुरी देवु.

<u>सदस्या श्रीमती अंजली साळवे:–</u>प्रचंड बजेट आपण या दोन शाळेंना देत आहोत. जशी रक्कम पास करत आहात तसे शाळेचे काम झाले पाहिजे. कारण आम्हांला बघावे लागेल शाळा कशी बनते.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>९ कोटीचे काम आले आहे, निविदा झालेल्या आहेत.

<u>सदस्या श्रीमती रेखा ठाकुर:–</u>असे इतर शाळेचे सुध्दा आले पाहिजे.

<u>सदस्य श्री. गुरुनो वलेचा:–</u>हे फक्त दोनच शाळा आहेत, आणखीन शाळेचे झाले पाहिजे. आमचा विरोध आहे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–</u>आज येथे एवढा मोठा निर्णय होत आहे, मी आपणास धन्यवाद देतो. कारण कोठुन ना कोठुन आपणांस सुरुवात करावीच लागेल. आपण शाळेत जातो तेव्हा पाहतो की एवढी शाळेची दयनिय स्थिती आहे. सर्व शिक्षा अभियान चालवा असे आपण म्हणतो आणि आज आपण महापालिकेच्या शाळा नाही चालवु शकत. आणि आज जर असा विषय आला आहे तर आपण त्याचा विरोध कशा प्रकारे करु शकतो? एकसाथ आपणांस सर्व शहराचे रस्ते बनवायचे आहे तर मग काय आपण २००, ५०० कोटी एकत्र आणुन बनवु शकतो काय? आज आपणास शाळा बनवायची आहे तर दोन, दोन, तीन, तीन आता येथे तीन चार शाळा आणल्या आहेत, मी परत एकदा धन्यवाद देतो. आपण एक एक करुनच बनवु शकतो. माझ्या प्रभागाची शाळा नाही तरी मी याचे समर्थन करतो कारण की आपल्या शहरातील गरीब मुले हजार, दोन हजार, पाचशे रुपये नाही भरु शकत. आपण त्यांना जेवण देतो, पुस्तके देतो, अशा शाळेची दयनिय स्थिती झाली आहे तेथे गरीब झोपडपट्टीतील मुले शिकतात. आपण विरोध करत असाल तर भलेही आपण विरोध करा. कारण काय आहे विरोध करण्याचा,आपण कारण सुध्दा सांगत नाहीत. आपण म्हणता सर्व शाळा एकत्र बनवा, सर्व एकसाथ बनविण्यासाठी ५०० कोटी कोठुन येणार? महापालिकेकडे एवढे पैसे आहेत काय? आपण आज ९ कोटी देत आहोत. आपण विरोध करता परंतु कारण सुध्दा सांगत नाहीत.

<u>सदस्य श्री. गुरुनो वलेचा :–</u>दुस–या ठिकाणी सुध्दा काम झाले पाहिजे ना, ५ नंबर कॅम्पमधील शाळा आहे त्याची एवढी दययनिय स्थिती आहे, मुलांचे हाल पहा.

<u>सदस्या श्रीमती अंजली साळवे :—</u>ही चांगली गोष्ट आहे. अशी शाळा बनत आहे पुढे आणखीन बनल्या पाहिजेत. यास विरोध करण्याचा प्रश्नच येत नाही परंतु त्याचा तपशिल आम्हां लोकांना दया.

<u>सदस्या श्रीमती रेखा ठाकुर :—</u>खरे तर आम्हांला याचा तपशिल पाहिजे. आपण छोटया ऑरगनाईजमध्ये सुध्दा मुलांना शिकवु शकतो. उगाच डेव्हलोपमेंट करणे यात काही अर्थ नाही.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>श्रीमती रेखाजी आपण तर एनजीओ तर चालवत आहात ना? माझे ऐकुन घ्या मी उप महापौर होतो तेव्हा मी सर्व शाळांना भेट दिली आहे. आपण एका शाळेत जा तेथे एक सिंधी माध्यमची शाळा आहे. सिंधी माध्यमच्या शाळेत १ ते ७ वी पर्यंतची मुले एकाच वर्गात शिकतात. कारण काय तर आपल्या शाळेत बाथरुम बनलेले नाही, शाळेचे छत गळत आहे. आज आपण आरसीसी शाळा बनवत आहोत तेथे मुले शिकतील. आज मराठी माध्यमातील मुले कमी होत चालले आहेत. त्यास फी लागणार नाही. आणि आज आपण एवढे सुंदर शाळेचे प्रयोजन करत आहोत.

<u>सदस्या श्रीमती रेखा ठाकुर :—</u>आज आम्ही तपशिल मागत आहोत.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>संपुर्ण तपशिल देवू ना.

<u>सदस्या श्रीमती अंजली साळवे:—</u>पुढील सभेत आपण याची माहिती दया.

<u>सदस्या श्रीमती रेखा ठाकुर :—</u>तसेच महासभेत जे पारीत झाले आहे की, त्याचे कार्यालय महापालिकेत आले पाहिजे तर ते अदयाप का झाले नाही? तेथे कोण मुख्य आहे ते कामावर येतात नाही येत?

<u>श्री. जमीर लेंगरेकर, उप—आयुक्त :—</u>महासभेत पारीत झाला नाही, पाठविला आहे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>आपणाकडे जागा नव्हती म्हणुन आपण शिप्ट केले नाही, आपणाकडे जागा नाही आपण आणु ना येथे.

<u>सदस्य श्री. गुरुनो वलेचा :—</u>कधी आणणार?

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>महोदया हे पहा, आपणाकडे जी इमारत होती, तेथे जागा कमी पडत होती, सभापती आहेत, तेथिल कार्यरत कर्मचारी आहेत तर त्यांना जागा कमी पडत असल्यामुळे आपण त्यांना तात्पुरते हलविले होते. आता आमचे प्लोअर तयार झाले आहे. जर जागा असेल तर आपण महासभेत तसे आणु. असे पण शिक्षण मंडळ ओसाड पडले आहे. शिक्षण मंडळ आहेच नाही. जर शिक्षण मंडळाला जागा पाहिजे तर महापालिकेत जागा असेल तर आम्हांस देण्यास हरकत काय?

सदस्या श्रीमती रेखा ठाकुर :—आमचा हेतु हाच आहे. आम्ही म्हणतो की मुलांना चांगले शिक्षण मिळाले पाहिजे. परंतु काय विकास झाला पाहिजे ते महत्वाचे आहे.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—ती इमारत तोडुन आरसीसी इमारत बनत आहे.

सदस्या श्रीमती रेखा ठाकुर :—आम्हांला तपशिल पाहिजे.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—होय सर्व तपशिल आहे ना.

सदस्या श्रीमती रेखा ठाकुर :—आम्ही असे नाही म्हणत की ती इमारत बनली नाही पाहिजे परंतु आम्हांला खरेतर तपशिल पाहिजे.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—आपण यांना तपशिल दयावा व मी म्हणतो की हा विषय सर्वसंमतीने पारीत करावा.

सदस्य श्री. गुरुनो वलेचा :—नाही, बाकी शाळेचे कधी करणार?

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—अर्थसंकल्पात तरतुद करुन दुस—यावेळी तसे आणु.

सभापती श्री. सुनिल सुर्वे:— यावर्षी तर नाही येणार, पुढील सभेत येणार ना.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—आज महासभेस २० वर्षे झाली आहेत. २० वर्षात प्रथमच अशा शाळा तोडुन आरसीसी बांधकाम होत आहे.

सभापती श्री. सुनिल सुर्वे:—हे प्रथमच आले आहे.

सदस्य श्री.गुरुनो वलेचा :—कधी होणार, प्रभाग समिती ४ मध्ये कधी होणार, पुढील निवडणूकीच्या वेळी?

सभापती श्री. सुनिल सुर्वे:—हो हे पुढील निवडणूकीनंतरच्या अर्थसंकल्पात येईल ना. अजुन काही प्रस्ताव आहे का आपला?

<u>श्रीमती निलम कदम, लेखापाल, शिक्षण मंडळ:—</u>८, ११,२९ प्रोसेसमध्ये आहे. जस जश्या निविदा होतील तसे आपणाकडे येईल.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>ठिक आहे, ८,११,२९ हे प्रोसेसमध्ये आहे. आणि १३ व १४?

<u>श्रीमती निलम कदम, लेखापाल, शिक्षण मंडळ:—</u>ते अभ्यासिकासाठी आहे.

<u>सभापती श्री. सुनिल सुर्वे:—</u>ठिक आहे, ती अभ्यासिकासाठी आहे व हे इमारतीसाठी वेगळे प्रपोजल आहे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>हो तेच आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने काढले होते, तेच आहे काय?

<u>श्रीमती निलम कदम, लेखापाल, शिक्षण मंडळ:—</u>सार्वजनिक बांधकाम विभागाने काढले होते तेच आहे परंतु त्यास कोणी रिसपॉन्सच नाही दिला.

<u>सदस्या श्रीमती अंजली साळवे :—</u>नंतर याची तपशिलवार माहिती पुढील सभेत नक्की दया.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>शहर अभियंता हे नक्की ठेवा.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>आपला आराखडा असेल ना?

<u>सदस्य श्री. गुरुनो वलेचा :—</u>प्रत्येक प्रभागात १—१ शाळा असलीच पाहिजे. दोन्ही ९ कोटीचे येथेच प्रस्ताव पारीत करत आहात? बाकी शहरात कोठेच नाही? आमचा विरोध आहे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>आपला काय विरोध आहे?

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>विरोध काय?

<u>सदस्य श्री. गुरुनो वलेचा :—</u>प्रत्येक प्रभागात एक एक शाळा असली पाहिजे. एकाच ठिकाणी केले आहे. बाकी ठिकाणचे काय?

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>एवढेच ना, याचा तर विरोध नाही ना?

<u>सदस्य श्री. गुरुनो वलेचा :–</u>फक्त तेथेच झाले आहे बाकी शहरात झालेले नाही.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>१० शाळा आहेत.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u>दोन शाळा आहे, दुसरी अभ्यासिका आहे.

<u>सदस्य श्री. गुरुनो वलेचा :–</u>आता जे आहे डॉ.बाबासाहेब आंबेडकर ते नाही, ते सोडा. आता कोणती शाळा आहे साहेब?

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u>१३ नंबर शाळा व १४ नंबर शाळा त्याचा विरोध आहे ना?

<u>सदस्य श्री. गुरुनो वलेचा :–</u>होय.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u>विरोध काय आहे ते तर सांगा ना? हरकतीला काही तरी कारण तर असले पाहिजे ना?

<u>सदस्या श्रीमती अंजली साळवे :–</u> जशी रक्कम आहे तशी इमारत झाली पाहिजे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>आज आपणांस १० इमारत बनवायची आहे, ५ कोटीचे आहे. ५ कोटीत दोन इमारत होत आहे तर बाकीची तरतुद कोठुन आणणार? हळु हळु होईल ना. समजुन घ्या.

<u>सदस्य श्री. गुरुनो वलेचा :–</u>आम्ही समजणार नाही. आम्ही समजदार नाहीत. आपण जास्त समजदार आहात, आपण जास्त समजावितात.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>मग विरोध का? सर्व एकत्र बनवु नाही शकत ना?

<u>सदस्य श्री. गुरुनो वलेचा :–</u>आम्ही सुध्दा बिझनेस मॅन आहे आम्ही सुध्दा उदाहरण देवु शकतो. ठिक आहे ना, आम्ही विरोध करतो याचा.

यावेळी सदस्या श्रीमती रेखा ठाकुर हया सभागृहातुन बाहेर गेल्या. 

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—नाहीतर एकत्र आणा, सर्व एकत्र पैसे जमा करा. १०० कोटी जमा करा हा प्रस्ताव बाजुला ठेवुन राखु.

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—हा प्रस्ताव मतास टाका कोणाला विरोध असेल तर.

महापालिका सचिव :—यावर मतदान घेतले जाईल.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—१—१ इमारत करुन बनेल १०—१० इमारत एकत्र कधी नाही बनवु शकत.

सदस्य श्री. गुरुनो वलेचा :—घरात दोन मुली असतील एकाचेच लग्न होईल दुस—याचे नाही होणार काय?

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—अहो ज्याच्याकडे पैसा आहे तो बनवेल ना, ज्याच्याजवळ पैसे नाही तो काय करेल? मतदान घ्या या प्रस्तावावर.

श्रीमती विजया कंठे, उप—आयुक्त, मुख्यालय:—आमच्याकडे उत्पन्नाचे जे स्त्रोत आहे ना, आपण एकत्र तर नाही आणु शकत.

सदस्य श्री. विजय पाटील:—योग्य असेल तर करावे नाही तर नाही.

सदस्य श्री. गुरुनो वलेचा :—मुले शाळेत शिकतात ती आनंदाची गोष्ट आहे.

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—इतर शाळेचे पुढील सभेत आणता येईल ना.

सदस्य श्री. गुरुनो वलेचा :—मतदान घ्या.

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—साहेब, मतदानास अडचण होईल, जरा काही असेल तर सांगा ना.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>हरकत आहे तर मतदान घ्या.

<u>सदस्य श्री. गुरुनो वलेचा:—</u> डेंजर ४ केले आहे, ते ४ चे घ्या ना. लहानपणी आम्ही तेथेच शिकलो आहे, तेथे बोरींगचेसुध्दा प्यायला पाणी नाही.

यावेळी सदस्या श्रीमती वंदना भदाणे यांनी सभागृहात प्रवेश केला.

यावेळी सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी हे सभागृहातुन बाहेर गेले.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>आम्ही असे नाही म्हणत नाही. आधी हे तर होवु दया, नंतर ते पाहु या. जेव्हा केव्हा बनेल तेव्हा प्रथम याचा विचार करु ना.

<u>सदस्य श्री. गुरुनो वलेचा :—</u>पुढील वेळेस दुसरी बॉडी येईल.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>प्रशासन तर हेच राहणार ना, प्रशासन थोडेच बदलणार. आम्ही हे नाही बोलु शकत की ही निविदा प्रशासनातर्फे आली आहे, आपण असे नाही म्हणु शकत की हे रद्द करा व हे घ्या. जी निविदा प्रोसेसमध्ये आहे ती घेतल्यानंतर आपण यास कसे ना करु शकतो?

<u>सदस्य श्री. गुरुनो वलेचा :—</u>चारही घ्या ना मग? २ डेंजर आहेत.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>मी तेच म्हणतो जर २ डेंजर आहे ना मग घेवु ना ते सुध्दा. आता यावर मतदान घ्या. जे मतदान घेतले जाते त्यावर हरकत कशाला घेता? आता ज्या इमारत होत आहे त्याप्रमाणे प्रशासन त्या २ डेंजर इमारतीचे सुध्दा करतील. हे रिवाईज्डमध्ये आणा. या २ शाळेसाठी या वर्षी अर्थसंकल्पात तरतुद आहे का?

<u>शहर अभियंता, श्री. राम जैसवार:—</u>होय पहावे लागेल साहेब.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>साहेब, तुम्ही सांगा शिक्षण मंडळात आहे का तरतुद?

<u>श्रीमती निलम कदम, लेखापाल, शिक्षण मंडळ:—</u>होय साहेब, अर्थसंकल्पात तरतुद आहे.

<u>श्री. जमीर लेंगरेकर, उप–आयुक्त:– </u> २ वर्षापुर्वी निविदा काढली होती लोकांचा प्रतिसाद मिळाला नाही, आम्ही शाळा नक्कीच घेवु.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u>जर अर्थसंकल्पात तरतुद असेल १६ नंबर डेंजर घोषित असेल तर प्रथम घ्या. या प्रस्तावावर मतदान घ्या.

यावेळी सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी, सदस्या श्रीमती रेखा ठाकुर यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>महापालिका सचिव :–</u>जे या प्रस्तावाच्या बाजुने आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

<u>प्रस्तावाच्या बाजुने ८ मते</u>

१. श्री. सुनिल सुर्वे
२. श्री. जमनादास पुरस्वानी
३. श्री. राजेंद्रसिंह भुल्लर
४. श्री. विजय पाटील
५. श्रीमती अंजली साळवे
६. श्रीमती जया माखिजा
७. श्रीमती पुष्पाताई बागुल
८. श्रीमती वंदना भदाणे

<u>महापालिका सचिव :–</u>जे या प्रस्तावाच्या विरोधात आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

<u>प्रस्तावाच्या विरोधात ३ मते</u>

१. श्रीमती रेखा ठाकुर
२. श्री. गुरुनो वलेचा
३. श्रीमती लक्ष्मी सिंग

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>हा प्रस्ताव इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करा.

<u>महापालिका सचिव :–</u>हा प्रस्ताव बहुमताने पारीत होईल.

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u>सदरचा विषयाबाबत बहुमताने पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ३** :–उल्हासनगर महानगरपालिकेच्या शाळा क्र. १३ व १४ च्या पूर्नबांधणी करणेकामी न्युनत्तम

दराचे निविदाकार मे. शेपस् ॲड कॉर्नरस् एल.एल.पी.यांच्याशी संविदा करण्यास मान्यता देणे.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण मंडळ अंतर्गत म.न.पा. शाळा क्र.१३ व १४ च्या Pre-fabrication बांधणी पदधतीने पूर्नबांधणीकरीता मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने सदर बांधणीची निविदा ई–टेंडरींगव्दारे प्रसिध्द करून जाहीर निविदा सुचना दै. परशुराम समाचार (हिंदी व मराठी), दै. नगर न्युज, दै. अमृत कलश या वृत्तपत्रात प्रसिध्दीसह उल्हासनगर महानगरपालिकेच्या वेब साइटवर ई–निविदा सुचना प्रसिध्द करून ई–टेंडरिंग पध्दतीने इंटरनेट व्दारे निविदा मागविण्यात आल्या होत्या.

. सदर ई–निविदेचा कालावधी दि. २५/०१/२०१६ पर्यंत होता. सदर कालावधीपर्यंत एकाही निविदाधारकाने निविदा भरली नव्हती. तद्नंतर सदर ई–निविदेस मुदतवाढ दोन वेळा देण्यात आली होती. सदर मुदतवाढ दि.१७/०७/२०१६ पर्यंत देण्यात आली होती. सदर मुदतवाढीनंतर वर्तमान पत्रामध्ये तसेच ई–निविदेमध्ये दिलेल्या जाहीराती प्रमाणे म.न.पा. शाळा क्र.१३ व १४ च्या पूर्नबांधणीसाठी एकूण ०२ निविदाधारकांच्या निविदा तसेच नमूने प्राप्त झालेले आहेत. सदर प्राप्त दोन निविदा, निविदा समितीचे सदस्य मा. अतिरिक्त आयुक्त, उपआयुक्त (शिक्षण), मुख्य लेखा परिक्षक, मुख्य लेखा अधिकारी, तसेच निविदाधारक व त्यांचे प्रतिनिधी यांचे समोर ई–निविदा संगणक प्रणालीव्दारे उघडण्यात आल्या. प्राप्त निविदांच्या निविदाधारकांनी लिफाफा क्र.१ मध्ये आवश्सक कागदपत्रांची पुर्तता केलेली असल्याने त्यांच्या निविदेचा दुसरा लिफाफा उघडण्यास निविदा समितीने मान्यता दिली. त्यानुसार निविदेचा वित्तीय लिफाफा निविदा समिती अध्यक्ष, सदस्य, निविदाधारक व त्यांचे प्रतिनिधी यांच्या समक्ष संगणकाव्दारे उघडण्यात आला. पात्र झालेल्या निविदाकारांकडुन सादर केलेल्या सदर बांधणीच्या दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशिल | **M/s Shapes and Corners L.L.P.** | **M/s Skylark Infra Projects Pvt. Ltd** |
|---|---|---|---|
| १ | म.न.पा. शाळा क्र.१३ व १४ ची पूर्नबांधणी | Rs.31035646.09 | Rs.31595897.22 |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्यानुसार मेसर्स शेपस् ॲड कॉर्नरस् एल.एल.पी. यांनी सर्वात कमी दर सादर केलेले आहेत. तरी मा. अध्यक्ष निविदा समिती यांच्या निर्देशानुसार वरील प्रमाणे न्युनतम दराच्या निविदाधारकाशी त्यांनी सादर केलेल्या दरांबाबत वाटाघाटी करण्यासाठी रोजी बोलवण्यात आले. त्यानुसार वाटाघाटीअंती प्राप्त झालेले दर हे बाजारभावांच्या तुलनेत वाजवी आहेत. वाटाघाटी अंती प्राप्त दरांचा तक्ता खालीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | तपशिल | **M/s Shapes and Corners L.L.P.** |
|---|---|---|
| १ | म.न.पा. शाळा क्र. १३ व १४ ची पूर्नबांधणी | Rs.30835646.09 |

उपरोक्त दरांनुसार सदर बांधणीकरीता रू.३,०८,३५,६४६/– एवढा खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च 'म.न.पा. शाळा पुर्नबांधणी' या लेखाशिर्षकांतर्गत भागविता येवू शकतो. तरी सदरच्या खर्चास व तसेच सदर बांधणी करणेसाठी न्यूनतम दर सादर करणाऱ्या निविदाकार मे. शेपस् ॲड कॉर्नरस् एल.एल.पी. यांच्याशी संविदा करण्याकरीता मा. स्थायी समितीची मान्यता आवश्यक आहे. करिता सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३ (क) अन्वये मा. स्थायी समितीच्या मंजुरीसाठी सविनय सादर.

स्थायी समिती ठराव क्र. ५९ दिनांकः— ३/९/२०१६

सुचकाचे नाव :—श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिकेच्या शाळा क्र. १३ व १४ च्या पूर्नबांधणी करणेकामी न्युनत्तम दराचे निविदाकार मे. शेपस् ॲड कॉर्नरस् एल.एल.पी.यांच्याशी संविदा करण्यास मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

बहुमताने

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्रमांक. ४ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. ४** :—म.न.पा. शाळा क्र. ८,११,२९ च्या परिसरात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शैक्षणिक अभ्यास केंद्र बनविणेकामी न्युनत्तम दराचे निविदाकार मे. शुभम कन्स्ट्रक्शन यांच्याशी संविदा करण्यास मान्यता देणे.

---

सदस्या श्रीमती अंजली साळवे:—अतिशय चांगला प्रस्ताव आहे, याबद्दल प्रशासनाचे अभिनंदन करते. पण आपल्या शहरामध्ये पहिल्यांदा असे शैक्षणीक अभ्यासक्रम बनत आहे.

सभापती, श्री. सुनिल सुर्वेः—मी सुध्दा प्रशासनाचे अभिनंदन करतो.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—महोदया, हा जो विषय आला आहे तर याबाबत असा प्रस्ताव कोठे कोठे करण्याचा प्रस्ताव आहे आपणाकडे? आता हे कसे आणले तसे इतर शाळेमध्ये सुध्दा आहे का तसा प्रस्ताव.

श्रीमती निलम कदम, लेखापाल, शिक्षण मंडळः—हा एकच प्रस्ताव आहे. आणि तो परिपुर्ण आहे. त्यामध्ये वाचनालय, ग्रंथालय सर्व काही असणार आहे.

<u>सदस्या श्रीमती अंजली साळवे :</u>—एक मिनिट आपण हे मे. शुभम कंन्स्ट्रक्शन यांना दयायचे ठरविले आहे. यांनी मागे अशा प्रकारचे काम केले आहे का? कारण हे चांगल्या प्रकारचे ऐतिहासिक केंद्र होणार आहे. कारण मागील वेळेस त्यांच्याकडे नाल्यांचे काम दिले होते. तर मग त्यांनी अशा प्रकारचे काम केलेले आहे काय?

<u>सभापती श्री. सुनिल सुर्वे:</u>—हो नाल्याचा होता, सार्वजनिक बांधकामाचे ही कामे दिलेली होती.

<u>सदस्या श्रीमती अंजली साळवे :</u>—त्यांना या कामाचा अनुभव आहे का तेच विचारत आहे सांगा ना.

<u>श्रीमती निलम कदम, लेखापाल, शिक्षण मंडळ:</u>—ही जी शाळा आहे ती परिपुर्ण असणार, एखादया शाळेला वाटले तर ती वापर करु शकते. हे सेंटर आहे.

<u>श्री. जमीर लेंगरेकर, उप—आयुक्त:</u>—आपण निविदा प्रक्रिया केलेली आहे.

<u>सदस्या श्रीमती अंजली साळवे :</u>—निविदा प्रक्रिया केली आहे. यांना अनुभव आहे का? अनुभव टाकले नाही. अटीप्रमाणे निविदा काढली आहे का? त्यांना बांधकामाचा अनुभव आहे का?

<u>श्रीमती निलम कदम, लेखापाल, शिक्षण मंडळ:</u>—नाही, हे काम पहिल्यांदा होत आहे. आपण निविदा काढली आहे. त्यांनी निविदा भरली आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शैक्षणिक अभ्यासिका केंद्र बनविणेसाठी एकूण ०२ निविदाधारकांच्या निविदा तसेच नमूने सदर प्राप्त दोन निविदा, निविदा समितीचे सदस्य मा. अतिरिक्त आयुक्त, उपआयुक्त (शिक्षण), मुख्य लेखा परिक्षक, मुख्य लेखा अधिकारी, तसेच निविदाधारक व त्यांचे प्रतिनिधी यांचे समोर ई—निविदा संगणक प्रणालीव्दारे उघडण्यात आल्या. प्राप्त निविदांच्या निविदाधारकांनी लिफाफा क्र.१ मध्ये आवश्सक कागदपत्रांची पुर्तता केलेली असल्याने त्यांच्या निविदेचा दुसरा लिफाफा उघडण्यास निविदा समितीने मान्यता दिली. मेसर्स शुभम कंस्ट्रक्शन यांनी सर्वात कमी दर सादर केलेले आहेत.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:</u>—यामध्ये आपण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने टाकत आहे, तर हे काम चांगल्या दर्जाचे व लवकरात लवकर व्हावे आणि त्यांने दिलेल्या मुदतीमध्ये हे काम पुर्ण करावे हे महत्वाचे आहे.

<u>सदस्या श्रीमती अंजली साळवे:</u>—होय आणि काम चांगले झाले पाहिजे.

<u>श्रीमती निलम कदम, लेखापाल, शिक्षण मंडळ:</u>—होय.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–</u>साहेब, आणखी मी एक खुलासा करु इच्छितो की हे जे बनणार आहे हे कोणाच्या देखरेखीत बनणार? सार्वजनिक बांधकाम विभागाच्या देखरेखीत बनेल की शिक्षण मंडळाच्या देखरेखीत बनेल?

<u>श्री. जमीर लेंगरेकर, उप–आयुक्त :–</u>आमचे शिक्षण मंडळाचे देखरेखीत कामकाज करणार.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने हे फारच चांगले काम पहिल्यांदा होत आहे. शहरात हे काम पहिल्यांदा दिसणार आहे, शिक्षण मंडळातील इंजिनिअर हे चेक करतील ते ठिक आहे, परंतु शहर अभियंता, आमच्या सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे जर देखरेख होत असेल तर दोन्ही मिळुन काम होत असेल तर फारच चांगली गोष्ट होईल. चांगले सुपरविजन होईल.

<u>सदस्या श्रीमती अंजली साळवे :–</u>अमाउंट वेगळी आहे. सदर बाबतीत एवढी अमांउट आहे, खाली वेगळी आहे. वर वेगळी रक्कम म्हणजे ५ लिहिली आहे व खाली ३ अशी लिहिली आहे.

<u>श्री. जमीर लेंगरेकर, उप–आयुक्त :–</u>हो ती चुक झाली आहे.

<u>श्रीमती निलम कदम, लेखापाल, शिक्षण मंडळ:–</u>टायपिंग करतांना पेस्टींगमध्ये चुक झाली आहे. ५ च्या ऐवजी ३ लिहिले गेले आहे.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u>ठिक आहे, सचिव महोदया, गोषवा–यात तशी दुरुस्ती करावी. ठिक आहे, प्रिंटींग चुक आहे

<u>महापालिका सचिव :–</u>प्रस्ताव पारीत करायचा?

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>सदरचा प्रस्ताव इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करण्यात यावा.

<u>महापालिका सचिव :–</u>ठराव वाचुन दाखविते.

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार म.न.पा. शाळा क्र. ८,११,२९ च्या परिसरात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शैक्षणिक अभ्यास केंद्र बनविणेकामी रुपये ५,०३,८९,०३९/– हे न्युनत्तम दर सादर करणारे निविदाकार मे. शुभम कन्स्ट्रक्शन यांच्याशी संविदा करण्यास मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

काही सदस्य :—पास—पास......

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ४** :— म.न.पा. शाळा क्र. ८,११,२९ च्या परिसरात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शैक्षणिक अभ्यास केंद्र बनविणेकामी न्युनत्तम दराचे निविदाकार मे. शुभम कन्स्ट्रक्शन यांच्याशी

संविदा करण्यास मान्यता देणे.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिका शाळा क्र. ८,११ व २९ च्या परिसरात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शैक्षणिक अभ्यास केंद्र बांधणीकरीता मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने सदर बांधणीची निविदा ई—टेंडरींगव्दारे प्रसिध्द करून जाहीर निविदा सुचना दै. परशुराम समाचार (हिंदी व मराठी), दै. नगर न्युज, दै. अमृत कलश या वृत्तपत्रात प्रसिध्दीसह उल्हासनगर महानगरपालिकेच्या वेब साइटवर ई—निविदा सुचना प्रसिध्द करून ई—टेंडरिंग पध्दतीने इंटरनेट व्दारे निविदा मागविण्यात आल्या होत्या.

सदर ई—निविदेचा कालावधी दि. ११/०५/२०१६ पर्यंत होता. सदर कालावधीपर्यंत एकाही निविदाधारकाने निविदा भरली नव्हती. तद्नंतर सदर ई—निविदेस दोन वेळा मुदतवाढ देण्यात आली होती. सदर मुदतवाढ दि. ०७/०७/२०१६ पर्यंत देण्यात आली होती. सदर मुदतवाढीनंतर वर्तमान पत्रामध्ये तसेच ई—निविदेमध्ये दिलेल्या जाहीराती प्रमाणे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शैक्षणिक अभ्यासिका केंद्र बनविणेसाठी एकूण ०२ निविदाधारकांच्या निविदा तसेच नमूने सदर प्राप्त दोन निविदा, निविदा समितीचे सदस्य मा. अतिरिक्त आयुक्त, उपआयुक्त (शिक्षण), मुख्य लेखा परिक्षक, मुख्य लेखा अधिकारी, तसेच निविदाधारक व त्यांचे प्रतिनिधी यांचे समोर ई—निविदा संगणक प्रणालीव्दारे उघडण्यात आल्या. प्राप्त निविदांच्या निविदाधारकांनी लिफाफा क्र.१ मध्ये आवश्सक कागदपत्रांची पुर्तता केलेली असल्याने त्यांच्या निविदेचा दुसरा लिफाफा उघडण्यास निविदा समितीने मान्यता दिली. त्यानुसार निविदेचा वित्तीय लिफाफा निविदा समिती अध्यक्ष, सदस्य, निविदाधारक व त्यांचे प्रतिनिधी यांच्या समक्ष संगणकाव्दारे उघडण्यात आला. पात्र झालेल्या निविदाकारांकडुन सादर केलेल्या सदर बांधणीच्या दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | तपशिल | **M/s Shubham Construction** | **M/s Chandrakant Construction** |
|---|---|---|---|
| १ | म.न.पा. शाळा क्र.८,११ व २९ च्या परिसरात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शैक्षणिक अभ्यास केंद्र बांधणी | Rs.50389039/- | Rs.53072746/- |

उक्त दोन्ही निविदाकारांनी दिलेल्या दरांची तुलना केली असता मेसर्स शुभम कंस्ट्रक्शन यांनी सर्वात कमी दर सादर केलेले आहेत. सबब त्यांनी निविदेत सादर केलेले दरांनुसार सदर बांधणीकरीता रू. ५,०३,८९,०३९/— एवढा खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च 'म.न.पा. शाळा पुर्नबांधणी' या लेखाशिर्षकांतर्गत भागविता येवू शकतो. तरी सदरच्या खर्चास व तसेच सदर बांधणी करणेसाठी न्यूनतम दर सादर करणाऱ्या निविदाकार मेसर्स शुभम कंस्ट्रक्शन यांच्याशी संविदा करण्याकरीता मा. स्थायी समितीची मान्यता आवश्यक आहे. करिता सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३ (क) अन्वये मा. स्थायी समितीच्या मंजुरीसाठी सविनय सादर.

स्थायी समिती ठराव क्र. ६० दिनांक:— ३/९/२०१६

सुचकाचे नाव :—श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार म.न.पा. शाळा क्र. ८,११,२९ च्या परिसरात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शैक्षणिक अभ्यास केंद्र बनविणेकामी रुपये ५,०३,८९,०३९/— हे न्युनत्तम दर सादर करणारे निविदाकार मे. शुभम कन्स्ट्रक्शन यांच्याशी संविदा करण्यास मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ५ :—विशेष मालमत्ता कर वसुली मोहिम २०१६-१७** राबविणेकामीच्या खर्चास मान्यता देणे.

---

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—सदरचा प्रस्ताव इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करण्यात यावा.

काही सदस्य :—पास—पास......

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ५** :— विशेष मालमत्ता कर वसुली मोहिम २०१६—१७ राबविणेकामीच्या खर्चास मान्यता देणे.

प्रस्तावना

आपल्या महापालिका क्षेत्रामध्ये एकूण मालमत्ता १,७०,००० एवढया असून, त्याच्या वसुलीसाठी ५८ प्रभाग करण्यात आले आहेत. प्रभावी वसुली करण्यासाठी विशेष मालमत्ता कर वसुली मोहिमेअंतर्गत एकूण ५८ लिपिक व ५८ शिपाई यांची नियुक्ती करण्यात आली आहे. उल्हासनगर महापालिकेअंतर्गत ५८ प्रभागामधील मालमत्ता कराची वसुली करणेसाठी प्रत्येक प्रभागामध्ये एक लिपिक व एक शिपाई यांची नियुक्ती केलेली आहे. ज्यामुळे मालमत्ता कराची वसुली जलदगतीने होवून महापालिकेच्या उत्पन्नात वाढ होईल. कर्मचारी व शिपाई यांना मालमत्ता कराची देयके वसुलीसाठी प्रत्येक मालमत्ता धारकाच्या घरी जावयाचे आहे.आजमितीस मालमत्ता कराची चालू वर्षाची मागणी रु. ९० कोटी व थकबाकी रु.२४० कोटी एवढी आहे. सदर कर्मचाऱ्यांची विशेष मोहिमेअतर्गत नियुक्ती करण्यात आलेली असल्याने, सदर कर्मचाऱ्यांना दिलेल्या प्रभागामध्ये वसुलीचे उद्दीष्ट पुर्ण करण्यासाठी विशेषबाब म्हणून दरमहा रु. २,०००/- दळणवळण भत्ता(Conveyance Allowance) मंजूर करण्यास हरकत नाही. यामुळे एकूण मासिक रु. २,३२,०००/- एवढा खर्च अपेक्षीत आहे. तरी सदरच्या खर्चास मंजुरी मिळणेसाठी स्थायी समितीपुढे प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिति ठराव क्र. ६१ दिनांकः— ३/९/२०१६

सुचकाचे नाव :—श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिति वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे सन २०१६—१७ करीता विशेष मालमत्ता कर वसुली मोहिमेअंतर्गत नियुक्ती करण्यात आलेल्या कर्मचा—यांना दिलेल्या प्रभागामध्ये वसुलीचे उदिष्ट पुर्ण करण्यासाठी विशेष बाब म्हणुन दरमहा रु. २,०००/— दळणवळण भत्ता असे एकुण मासिक रुपये २,३२,०००/— खर्चास मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ६** :— महापौर निधितून इ. १० वी व १२ वी च्या शालांत व उच्च माध्यमीक परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचे सत्कार समारंभ कार्यक्रमाचे आयोजनाचे कामाची माहिती नोंद करणे.

---

काही सदस्य :—पास—पास......

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ६** :— महापौर निधितून इ. १० वी व १२ वी च्या शालांत व उच्च माध्यमीक परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचे सत्कार समारंभ कार्यक्रमाचे आयोजनाचे कामाची माहिती नोंद करणे.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिका महापौर निधितून इ. १० वी व १२ वी च्या शालांत व उच्च माध्यमीक परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचे सत्कार समारंभ कार्यक्रमाचे आयोजन दिनांक २९/०६/२०१६ रोजी करण्यात आले होते. सदर कार्यक्रमासाठी दिलेल्या मंजुरीची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये पुढीलप्रमाणे देण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | मंजूर रक्कम | एजन्सीचे नाव |
|---|---|---|---|
| ०१ | महापौर निधितून इ. १० वी व १२ वी च्या शालांत व उच्च माध्यमीक परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचे सत्कार समारंभ कार्यक्रमाचे आयोजनाचे | ९९,९००/— | मे. मोहिनी एंटरप्रायझेस उल्हासनगर— ०४ |

तरी सदरची माहिती मा. स्थायी समितीच्या अवलोकनार्थ प्रस्तावीत करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ६२ दिनांक:— ३/९/२०१६

सुचकाचे नाव :—श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार महापौर निधितून इ. १० वी व १२ वी च्या शालांत व उच्च माध्यमीक परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचे सत्कार समारंभ कार्यक्रमाचे आयोजनाच्या कामाची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. ७ :— महापौर निधितून करीअर व्हिजन मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजनाचे कामाची माहिती नोंद करणे.

---

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—कुठले विभागाकडे आहे? भांडार विभागाचे आहे तर मग कोण आहे?

श्रीमती विजया कंठे, उप—आयुक्त, मुख्यालय :—होय, बोलवा त्यांना. माहिती नोंद करायचा विषय आहे.

काही सदस्य :—ठिक आहे, पास—पास......

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

**विषय क्र. ७** :—महापौर निधितून करीअर व्हिजन मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजनाचे कामाची माहिती नोंद करणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिका महापौर फंडातून करीअर व्हिजन मार्गदर्शन कार्यक्रम दिनांक ०४/०७/२०१६ रोजी आयोजीत करण्यात आला होता. सदर कार्यक्रमासाठी दिलेल्या मंजुरीची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये पुढीलप्रमाणे देण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | मंजूर रक्कम | एजन्सीचे नाव |
|---|---|---|---|
| ०१ | महापौर निधितून करीअर व्हिजन मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजनाचे करीता लागणारे साहित्य मागविणेबाबत. | १,४९,९८०/— | मे. मोहिनी एंटरप्रायझेस उल्हासनगर— ०४ |

तरी सदरची माहिती मा. स्थायी समितीच्या अवलोकनार्थ प्रस्तावीत करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> ६३ <u>दिनांक:— ३/९/२०१६</u>

सुचकाचे नाव :—श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार महापौर निधितून करीअर व्हिजन मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजनाचे करीता लागणारे साहित्य मागविणेबाबतच्या कामाची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची <u>सही/—</u>

अनुमोदकाची <u>सही/—</u>

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ८ वाचुन दाखवितात

**विषय क्र. ८** :—मनपा कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 54DI013357200 Old No. 54/2670

अन्वये नोंद असलेल्या मिळकतीसाठी वर्ष २०१४–२०१५ पासुन भाडोत्री नोंद रद्द करून प्रथम कर आकारणी परिसरातील प्रचलित दरानुसार करयोग्य मुल्य निश्चित करणे तसेच (प्रतिवर्ष रक्कम रू. ८२४०४) वर्ष २०१४–२०१५, २०१५–२०१६ करीता मिळकतीचे खात्यातील अतिरिक्त कर आकारणी रक्कम रू. १६४८०८ अधिक विलंब शास्ती (वसुल न होण्याजोगा कर) निर्लेखित करणे.

---

श्री. शैलेश दोंदे, प्र. कर निर्धारक व संकलक :—ज्याठिकाणी मोबाईल टॉवर भाडे घेत होते. ते निर्धारीत करुन निष्कासित केल्या. ती व्यक्ती ३ वर्षापासुन अर्ज करत होते.

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—साहेब, विस्तृत सांगा, लक्षात नाही आले काय आहे ते?

श्री. शैलेश दोंदे, प्र. कर निर्धारक व संकलक :—स्वतः त्यांचा अर्ज होता. श्री. विजय कटारीया यांनी ॲड संजय सिंग यांचेमार्फत दिनांक ९/४/२०१४ व ८/७/२०१४ रोजीचे पत्रान्वये सदरील मिळकतीमधील मोबाईल टॉवर निष्कासित करण्यात आल्याने वर्ष २०१३–२०१४ पासुन भाडोत्री नोंद रद्द करून कर आकारणी करणेबाबत विनंती केली आहे.

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—कुठला विभाग आहे?

श्री. शैलेश दोंदे, प्र. कर निर्धारक व संकलक :—उल्हासनगर–४ येथिल आहे.

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—मग त्याचा अहवाल आहे का?

श्री. शैलेश दोंदे, प्र. कर निर्धारक व संकलक :—हो आहे.

श्री. जमीर लेंगरेकर, उप–आयुक्त,कर:—ज्या दिवशी त्यांनी अर्ज केला त्यादिवशी निष्कासीत केले.

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—ठिक आहे.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—हा प्रस्ताव इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करा.

काही सदस्य :—पास—पास......

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ८** :–मनपा कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 54DI013357200 Old No. 54/2670 अन्वये

नोंद असलेल्या मिळकतीसाठी वर्ष २०१४–२०१५ पासुन भाडोत्री नोंद रद्द करून प्रथम कर आकारणी परिसरातील प्रचलित दरानुसार करयोग्य मुल्य निश्चित करणे तसेच (प्रतिवर्ष रक्कम रू. ८२४०४) वर्ष २०१४–२०१५, २०१५–२०१६ करीता मिळकतीचे खात्यातील अतिरिक्त कर आकारणी रक्कम रू. १६४८०८ अधिक विलंब शास्ती (वसुल न होण्याजोगा कर) निर्लेखित करणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील शिवलोक बिल्डिंग, तिसरा मजला, उल्हासनगर–५ या मिळकतीची कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 54DI011595000 Old No. 54/0773 अन्वये नोंद असुन मालमत्ता कर वसुलीच्या प्रयोजनार्थ कर भरण्यास प्रथम पात्र व्यक्ती म्हणुन BHAGWANDAS GUMANDAS या नावे कर आकारणी सुरू आहे. करपात्र बाबींचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| Const. Type | Occu.Status | Usage | Annual Rent | Asst. Year | Total Area | Exempted Area | Assessable Area |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Open | Owner | Residential | 0 | 01-Apr-86 | 78 | 0 | 78 |
| Open | Owner | Residential | 0 | 01-Apr-03 | 377 | 0 | 377 |
| RCC | Owner | Residential | 0 | 01-Apr-01 | 868 | 0 | 868 |
| RCC | Owner | Residential | 0 | 01-Apr-03 | 1331 | 0 | 1331 |
| RCC | Owner | Non Residential | 0 | 01-Apr-03 | 2166 | 0 | 2166 |
| Open | Owner | Non Residential | 0 | 01-Apr-01 | 550 | 0 | 550 |

२, सदर मिळकतीवर Bharti Cellular Ltd या कंपनीमार्फत मोबाईल टॉवर उभारण्यात आल्याने ५५० चौ.फुट क्षेत्राकरीता वार्षिक भाडे रक्कम रू. १२६०००/– गृहीत धरून स्वतंत्ररित्या मालमत्ता क्र. 54DI013357200 Old No. 54/2670 अन्वये कर भरण्यास प्रथम पात्र व्यक्ती म्हणुन ठभ्ळॅछकै। ळन्ड छकै। या नावे कर आकारणी करण्यात आली. करपात्र बाबींचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| Const. Type | Occu.Status | Usage | Annual Rent | Asst. Year | Total Area | Exempted Area | Assessable Area |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Open | Tenant | Non Residential | 126000 | 01-Apr-01 | 550 | 0 | 550 |

३, श्री. विजय कटारीया यांनी ॲड संजय सिंग यांचेमार्फत दिनांक ९/४/२०१४ व ८/७/२०१४ रोजीचे पत्रान्वये सदरील मिळकतीमधील मोबाईल टॉवर निष्कासित करण्यात आल्याने वर्ष २०१३–२०१४ पासुन भाडोत्री नोंद रद्द करून कर आकारणी करणेबाबत विनंती केली आहे. हरकती अर्जासोबत भाडे कराराची प्रत सादर केली आहे.

४, हरकतीच्या अनुषंगाने संबंघित कर निरीक्षक यांनी प्रत्यक्ष पाहणी केली असता शिवलोक बिल्डिंगची प्रत्यक्ष पाहणी केली असता इमारतीचे टेरेसवर मोबाईल टॉवर अथवा इतर साहित्य नसल्याचे दिसुन आले आहे. तसेच शिवलोक बिल्डिंग, तिसरा मजला, उल्हासनगर–५ या मिळकतीवरील मोबाईल टॉवर निष्कासनासंबंधीची माहिती/दस्तावेज प्रभाग समिती क्र. ४, अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाकडे विचारणा केली असता त्यांनी दिनांक २७/३/२०१५ रोजीचे पत्रान्वये संबंधित मोबाईल टॉवर निष्कासनाबाबतची माहिती उपलब्ध नसल्याबाबत कळविले आहे. पंचनाम्यामध्ये सद्यस्थितीत सदर ठिकाणी कोणतेही मोबाईल टॉवरचे साहित्य नसल्याचे नमुद केले आहे.

५, अर्जदाराने सादर केलेले लिव्ह ॲण्ड लायसन्स पाहता ते नोंदणीकृत अथवा नोटराईज केले नसल्याचे दिसुन येत आहे. सदर करार दोन्ही पक्षकारामध्ये ऑक्टोबर २००२ रोजी करण्यात आला असुन तो पुढील १० वर्षाकरीता (म्हणजेच ऑक्टोंबर २०१२ पर्यंत) असल्याचे नमुद आहे. त्यानुसार कराराचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर माहे ऑक्टोंबर २०१२ ते मार्च २०१३ व एप्रिल २०१३ ते मार्च २०१४ या कालावधीत मोबाईल टॉवर निष्कासित केल्यामुळे भाडोत्री नोंद रदद करणेसाठी हरकत अर्ज दाखल केल्याचे दिसुन येत नाही. तद्नंतर दिनांक ९/४/२०१४ रोजी सदर बाब वकिलामार्फत मनपात दाखल केली आहे. त्यामुळे अर्जदाराचे म्हणण्यानुसार माहिती अभावी वर्ष २०१३–२०१४ पासुन निर्णय घेणे अशक्य आहे.

६, उक्त बाबी पाहता अर्जदाराने दाखल केलेल्या अर्जाच्या दिनांक ९/४/२०१४ पासुन मनपा कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 54DI013357200 Old No. 54/2670 अन्वये नोंद असलेल्या मिळकतीसाठी वर्ष २०१४–२०१५ पासुन भाडोत्री नोंद रद्द करून प्रथम कर आकारणी परिसरातील प्रचलित दरानुसार करयोग्य मुल्य निश्चित करणे तसेच वर्ष २०१४–२०१५, २०१५–२०१६ करीता मिळकतीचे खात्यातील अतिरिक्त कर आकारणी रक्कम (वसुल न होण्याजोगा कर) स्थायी समितीच्या मंजुरीने निर्लेखित करणे आवश्यक आहे. त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे.

| वर्ष | लिव्ह ॲण्ड लायसन्स मध्ये नमुद वार्षिक भाडेनुसार (भाडोत्री गृहीत धरून) कर आकारणी रक्कम रू. | प्रथम कर आकारणी परिसरातील प्रचलित दरानुसार (स्वत: वापर गृहीत धरून) कर आकारणी रक्कम रू. | अतिरिक्त कर आकारणी रक्कम रू. (२ – ३) |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| २०१४–. २०१५ | ८३३४८ अधिक विलंब शास्ती | ९४४ | ८२४०४ अधिक विलंब शास्ती |
| २०१५–२०१६ | ८३३४८ अधिक विलंब शास्ती | ९४४ | ८२४०४ अधिक विलंब शास्ती |
| एकुण | **१६६६९६ अधिक विलंब शास्ती** | **१८८८** | **१६४८०८ अधिक विलंब शास्ती** |

सबब, वरीलप्रमाणे प्रस्ताव मंजुरीकरीता स्थायी समितीपुढे प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ६४</u> <u>दिनांक:–३/९/२०१६</u>

सुचकाचे नाव :– श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार मनपा कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 54DI013357200 Old No. 54/2670 अन्वये नोंद असलेल्या मिळकतीसाठी वर्ष २०१४–२०१५ पासुन भाडोत्री नोंद रद्द करून प्रथम कर आकारणी परिसरातील प्रचलित दरानुसार करयोग्य मुल्य निश्चित करणेस तसेच (प्रतिवर्ष रक्कम रू. ८२४०४) वर्ष २०१४–२०१५, २०१५–२०१६ करीता मिळकतीचे खात्यातील अतिरिक्त कर आकारणी रक्कम रू. १६४८०८ अधिक विलंब शास्ती (वसुल न होण्याजोगा कर) निर्लेखित करण्यास मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. ९ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ९ :–** मालमत्ता क्र. 48CI010535200 (Old No. 48/0569) करीता बांधकाम प्रकार टियर गरडर ३७९ चौ. फुट रद्द करुन वर्ष २०१५–२०१६ करीता करयोग्य मुल्य व आकारणी निश्चित करणे.

---

श्री. शैलेश दोंदे, प्र. कर निर्धारक व संकलक :–हे बांधकाम टिअर गर्डरचे आहे.

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–मला हे समजत नाही, बांधकाम प्रकार, बांधकाम झाल्यानंतर कर योग्य मुल्य आले. जरा विस्तृत सांगा ना की ही कशी काय चुक झाली?

श्री. शैलेश दोंदे, प्र. कर निर्धारक व संकलक :–बांधकाम टिअर गर्डर आहे असे गृहित धरुन कर आकारणी केली होती.

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–आता टिअरगर्डन नाही तर नोंद कशी झाली? अशी कशी नोंद झाली?

श्री. शैलेश दोंदे, प्र. कर निर्धारक व संकलक :–सुरुवातीपासुन आहे.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>अगोदर टिअर गर्डर होते नंतर पत्रे टाकले असे काही केले का त्या माणसाने?

<u>श्री. शैलेश दोंदे, प्र. कर निर्धारक व संकलक :—</u> मिळकतीची प्रत्यक्ष पाहणी केली असता सद्यस्थितीत बांधकाम प्रकार एसी शिट ब्रिक्स असल्याचे दिसुन आले आहे. जागेवर कोणतेही टियर गरडर बांधकाम नाही.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>ज्याने हे काम केले त्या कर्मचारीवर काय कारवाई केली? कोणी हे बिल जनरेट केले? सुरुवातीपासुन आहे का हे?

<u>श्री. शैलेश दोंदे, प्र. कर निर्धारक व संकलक :—</u> होय.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>कर आकारणी सुरुवातीपासुन आहे तर मग त्या माणसावर किती मोठा अन्याय झाला? ज्या व्यक्तीने आरसीसीचे लोड बेअरींग नोंद केली त्या कर्मचा—यावर तुम्ही काय कारवाई करणार?

<u>श्री. शैलेश दोंदे, प्र. कर निर्धारक व संकलक :—</u>त्यांची फाईल प्रस्तावित सुध्दा केली.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>काय प्रस्तावित केली, मागच्या वेळेस सुध्दा तुम्हांला म्हटलो होतो. मी तुम्हांला सांगतो मी असा एकही विषय घेणार नाही तुमचा.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>सभापती महोदय यांचे असे म्हणणे आहे की, जो अधिकारी तेथे कर आकारणी करण्यासाठी जातो त्याने कर आकारणी करतांना टिअरगर्डर लिहुन कर आकारणी केली असेल, असे केले असेल म्हणुनच टिअर गर्डर लिहिले आहे ना. आज आपण ती रद्द करत आहोत. तेथे बॅरेक आहे, पत्रा आहे, ज्या अधिका—याने त्यास टिअर गर्डर सांगितले, त्यावर काही ना काही कारवाई केली पाहिजे आणि बाकी हे काम करण्यास हरकत नाही. तो व्यक्ती त्रासात असेल. ते त्रासाचे काम काढणे आवश्यक आहे.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>असे तर नाही ती मालमत्ता लोड बेअरींगची आहे आणि कुण्या दुस—याची आहे आणि ती कुण्या बाजुची दाखवत आहात. असे सुध्दा असु शकते ना.

<u>श्री. शैलेश दोंदे, प्र. कर निर्धारक व संकलक :—</u>तसे नाही. आपण २ अधिका—यांवर कारवाई करु.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>कोण आहेत नाव सांगा.

<u>श्री. शैलेश दोंदे, प्र. कर निर्धारक व संकलक :–</u> श्री. बंभानी व श्री. अनिल ही दोन्ही व्यक्ती आहेत. आता त्यांच्यावर कारवाई सुरु केली आहे.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u>मला वाटते दोन्ही रिटायर आहेत किंवा एक रिटायर आहे.

<u>श्री. शैलेश दोंदे, प्र. कर निर्धारक व संकलक :–</u>नाही.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u>नाही ना, मग जे बिल पाठविले त्याचे काय.

<u>श्री. शैलेश दोंदे, प्र. कर निर्धारक व संकलक :–</u>त्यांना नोटिसा देवुन कारवाई करु.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u>किती दिवसात होईल?

<u>श्री. शैलेश दोंदे, प्र. कर निर्धारक व संकलक :–</u>हो पुढील सभेत आणु.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u>महोदया, नोंद करा, यांनी काय कारवाई केली ती. या विषयाबाबत ना.

<u>श्रीमती विजया कंठे, उप–आयुक्त, मुख्यालय:–</u>त्या व्यक्तीस नोटिस देवुन तशी कारवाई सुरु करा.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>आपण जर कारवाई करत नसाल तर येणा–या दिवसात तसेच होत राहील. टिअर गर्डर म्हणुन नोंद करुन कर आकारणी सुरु होईल आणि ज्याचे काम असेल तर व्यक्ती सारखा चकरा मारत राहील. त्यासाठी त्या कर्मचा–यांस नोटिस देणे आवश्यक आहे.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u>जे कायदयात बसते त्या नुसार कारवाई करा. कारण की हा एखादया माणसावर खुप मोठा अन्याय आहे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>आपण त्या साईटवर गेला असाल भेट देण्यासाठी, आपण त्याचा पंचनामा बनविला? आजुबाजुवाल्यांच्या सहयाने की येथे टिअरगर्डर नाही येथे कच्चे घर आहे.

<u>श्री. शैलेश दोंदे, प्र. कर निर्धारक व संकलक :–</u>होय, तेथेच पंचनामा बनविला जातो. तेथे जे लोक असतात तेच सादर करतात.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :**—हो तो पंचनामा अहवाल देणे आवश्यक आहे. ठिक आहे.

**सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :**—ठरावात येवु दया की त्या कर्मचा—यावर कारवाई केली जाईल म्हणुन.

**महापालिका सचिव :**—ज्या कर्मचा—याने नोंद केली त्यावर कारवाई करुन अशी ठरावात नोंद घेते.

**काही सदस्य :**—पास—पास......

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:**—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ९** :— मालमत्ता क्र. 48CI010535200 (Old No. 48/0569) करीता बांधकाम प्रकार टियर गरडर ३७९ चौ. फुट रद्द करुन वर्ष २०१५—२०१६ करीता करयोग्य मुल्य व आकारणी निश्चित करणे.

**प्रस्तावना**

मनपा कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 48CI010535200 [Old No. 48/0569, अन्वये नोंद असलेल्या मिळकतीकरीता कर देण्यास प्रथमत: पात्र व्यक्ती म्हणुन कविता अशोकलाल कुंदनानी अशी नोंद आहे. करपात्र बाबींचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| Const. Type | Occu. Status | Usage | Asst. Year | Total Area | Assessable Area |
|---|---|---|---|---|---|
| AC Sheet Bricks | Owner | Residential | 01-Apr-86 | 410 | 410 |
| Tear Gardier | Owner | Residential | 01-Apr-03 | 379 | 379 |

तथापि, श्रीम. कविता अशोकलाल कुंदनानी, बॅरेक नं. १६९२/१, उल्हासनगर—४ यांनी दिनांक २४/०२/२०१५ रोजीच्या अर्जान्वये संदर्भित मिळकतीसाठी कर आकारणी पुस्तकात बांधकाम प्रकार एसी शिट ब्रिक्स व टियर गरडर असा नोंदविला असुन प्रत्यक्षात जागेवर फक्त बांधकाम प्रकार एसी शिट ब्रिक्स असुन टियर गरडर बांधकाम नाही. त्यानुसार संदर्भित मिळकतीसाठी बांधकाम प्रकार टियर गरडर रद्द करून एसी शिट ब्रिक्स प्रमाणे कर आकारणी करणेसाठी हरकत दाखल केली आहे.

संदर्भित मिळकतीकरीता वर्ष २०१४—२०१५ अखेर कराचा भरणा केलेला आहे.

संदर्भित मिळकतीची प्रत्यक्ष पाहणी केली असता सद्यस्थितीत बांधकाम प्रकार एसी शिट ब्रिक्स असल्याचे दिसुन आले आहे. जागेवर कोणतेही टियर गरडर बांधकाम नाही.

तरी वरीलप्रमाणे वस्तुस्थिती स्थायी समितीपुढे सादर करण्यात येत असुन मनपा कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 48CI010535200 [Old No. 48/0569, अन्वये नोंद असलेल्या मिळकतीकरीता बांधकाम प्रकार टियर गरडर ३७९ चौ.फुट रद्द करून वर्ष २०१५—२०१६ करीता करयोग्य मुल्य व आकारणी निश्चित करणेसाठी मंजुरी मिळावी.

**स्थायी समिती ठराव क्र. ६५**      **दिनांक:—३/९/२०१६**

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार मालमत्ता क्र. 48CI010535200 (Old No. 48/0569) करीता बांधकाम प्रकार टियर गरडर ३७९ चौ. फुट रद्द करुन वर्ष २०१५–२०१६ करीता करयोग्य मुल्य व आकारणी निश्चित करण्यास मान्यता देत आहे.

तसेच

ज्या कर्मचा–याने ही चुकीची नोंद केली आहे त्यावर जबाबदारी निश्चित करुन कारवाई करणेस प्रशासनास निर्देश देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. १० वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. १० :–** मालमत्ता क्र. 46CI010330800 करीता प्रथम कर आकारणी दरानुसार बांधकाम प्रकार एसी शिट ब्रिक्स गृहित धरुन वर्ष २०१५–२०१६ पासुन करयोग्य मुल्य व आकारणी निश्चित करणे.

---

श्रीमती विजया कंठे, उप–आयुक्त, मुख्यालय:– सदर बांधकाम आरसीसी आहे पण पर्सनल वापर आहे त्यामुळे कर जास्त लावला.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–दोन्हीही विषय इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता अंमलात आणण्यात यावे.

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–याबाबत जरा सांगा आरसीसी आहे की हे पण तसेच चुकुन झाले आहे?

श्री. शैलेश दोंदे, प्र. कर निर्धारक व संकलक :–सदर बांधकाम आरसीसी लिहिले, एसीसी होते, तो टीअर गर्डर सारखा प्रकार होता.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u>मग याला सुध्दा सारखीच कारवाई होईल. कारण सरळ सरळ त्या माणसास आरसीसी आणि पत्रा यातील फरकच कळत नाही. हा विषय सुध्दा इतिवृत्ताची वाट न पाहता अंमलात आणा आणि पुढील सभेत हे दोन्ही प्रस्ताव लवकरात लवकर आणा.

यावेळी सदस्या श्रीमती आशा इदनानी, श्रीमती इंदिरा उदासी यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>आणि पंचनामा व फोटो सक्तीचे आहे.

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑**विषय क्र. १०** :– मालमत्ता क्र. 46CI010330800 करीता प्रथम कर आकारणी दरानुसार बांधकाम प्रकार

एसी शिट ब्रिक्स गृहित धरुन वर्ष २०१५–२०१६ पासुन करयोग्य मुल्य व आकारणी

निश्चित करणे.

<u>प्रस्तावना</u>

मनपा कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 46CI010330800 अन्वये नोंद असलेल्या मिळकतीकरीता कर देण्यास प्रथमत: पात्र व्यक्ती म्हणुन लिलाबाई शितलदास अशी नोंद आहे. करपात्र बाबींचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| Const. Type | Occu. Status | Usage | Asst. Year | Total Area | Exempted Area | Assessable Area |
|---|---|---|---|---|---|---|
| RCC | Owner | Residential | 01-Apr-86 | 793 | 0 | 793 |
| RCC | Owner | Non Residential | 01-Apr-91 | 131 | 0 | 131 |

तथापि, श्रीम. लिलाबाई शितलदास, बॅरेक नं. १५८७/१ जवळ, उल्हासनगर–४ यांनी दिनांक २०/०३/२००३, १६/०३/२००४, १४/०१/२००५, १४/३/२००७, २०/०२/२००७, १२/१२/२०११, २४/०२/२०१५ रोजीच्या अर्जान्वये संदर्भित मिळकतीसाठी कर आकारणी पुस्तकात बांधकाम प्रकार आर.सी.सी नोंदविला असुन प्रत्यक्षात जागेवर बांधकाम प्रकार एसी शिट ब्रिक्स असा आहे. त्यानुसार संदर्भित मिळकतीसाठी बांधकाम प्रकार एसी शिट ब्रिक्स प्रमाणे कर आकारणी करणेसाठी हरकत दाखल केली आहे.

संदर्भित मिळकतीकरीता वर्ष २०१४–२०१५ अखेर बांधकाम प्रकार आर.सी.सी याप्रमाणे कराचा भरणा केलेला आहे.

संदर्भित मिळकतीची प्रत्यक्ष पाहणी केली असता सद्यस्थितीत बांधकाम प्रकार एसी शिट ब्रिक्स असल्याचे दिसुन आले आहे. जागेवर कोणतेही आर.सी.सी बांधकाम नाही.

तरी वरीलप्रमाणे वस्तुस्थिती स्थायी समितीपुढे सादर करण्यात येत असुन मनपा कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 46CI010330800 अन्वये नोंद असलेल्या मिळकतीकरीता प्रथम कर आकारणी दरानुसार बांधकाम प्रकार एसी शिट ब्रिक्स गृहीत धरून वर्ष २०१५–२०१६ पासुन करयोग्य मुल्य व आकारणी निश्चित करणेसाठी मंजुरी मिळावी.

स्थायी समिती ठराव क्र. ६६ दिनांक:–३/९/२०१६

सुचकाचे नाव :– श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार मालमत्ता क्र. 46CI010330800 करीता प्रथम कर आकारणी दरानुसार बांधकाम प्रकार एसी शिट ब्रिक्स गृहित धरुन वर्ष २०१५–२०१६ पासुन करयोग्य मुल्य व आकारणी निश्चित करण्यास मान्यता देत आहे.

तसेच

ज्या कर्मचा–याने ही चुकीची नोंद केली आहे त्यावर जबाबदारी निश्चित करुन कारवाई करणेस प्रशासनास निर्देश देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. ११ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ११** :–श्री. गणेश दर्शन प्रतियोगिता सन २०१५–१६ कार्यक्रमाचे आयोजनाची माहिती नोंद करणे.

---

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–सदरचा प्रस्ताव इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करावा.

काही सदस्य :–पास–पास......

महापालिका सचिव :—सदर विषय माहितीसाठी आहे.

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ११** :— श्री. गणेश दर्शन प्रतियोगिता सन २०१५—१६ कार्यक्रमाचे आयोजनाची माहिती नोंद करणे.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिका तर्फे श्री. गणेश दर्शन प्रतियोगिता सन २०१५—२०१६ कार्यक्रमाचे आयोजन दिनांक १७/९/२०१५ ते २७/९/२०१५ या कालावधीत आयोजित करण्यात आले होते. सदर कार्यक्रमासाठी दिलेल्या मंजूरीची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये पुढील प्रमाणे देण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नावे | मंजूर रक्कम | एजंन्सीचे नाव |
|---|---|---|---|
| ०१ | श्री. गणेश दर्शन प्रतियोगिता सन २०१५—२०१६ कार्यक्रमाचे आयोजनाचे करीता लागणारे साहित्य पुरविणे बाबत. | १,९८,५००/— | मे. मोहित एंटरप्रायझेस उल्हासनगर—३ |

तरी सदरची माहिती मा. स्थायी समितीच्या अवलोकनार्थ प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ६७ दिनांक:—३/९/२०१६

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार श्री. गणेश दर्शन प्रतियोगिता सन २०१५—१६ कार्यक्रमाचे आयोजनाचे करीता लागणारे साहित्य पुरविण्याबाबतची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. १२ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १२ :—** उल्हासनगर महानगरपालिका आवारातील लोखंड व प्लास्टीक मिश्रीत भंगार साहित्याची विल्हेवाट लावणेकामी मान्यता देणे.

---

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**सदरचा प्रस्ताव इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करावा.

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १२ :—** उल्हासनगर महानगरपालिका आवारातील लोखंड व प्लास्टीक मिश्रीत भंगार साहित्याची विल्हेवाट लावणेकामी मान्यता देणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका आवारातील लोखंड व प्लास्टीक मिश्रीत भंगार साहित्याची विल्हेवाट लावणेबाबत भांडार विभागामार्फत माहे जानेवारी २०१६ मध्ये ई—निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. निविदा प्रसिध्द केल्यानंतर प्रथम वेळेस फक्त एकाच निविदाकाराने निविदेमध्ये सहभाग घेतल्यामुळे सदर निविदेस तीन वेळा मुदतवाढ देण्यात आली. परंतु तीन वेळा मुदतवाढ देवूनही प्रथम निविदाकार यांचीच निविदा प्राप्त असल्यामुळे सदर निविदा दिनांक १९ मार्च २०१६ रोजी उघडण्यात आली.

भंगार साहित्य खरेदीकामी महापालिकेमाफत प्रथम दर पत्रक मागवून प्रती किलो १६ रु. दर निश्चिती करुन निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. परंतु निविदाकार मे. दिपक ट्रेडर्स, उल्हासनगर—३ यांनी भंगार साहित्य खरेदी करणेकामी निविदेमध्ये प्रति किलो १३ रु. असे दर सादर केल्याचे दिसून आले. महापालिकेने निश्चित केलेले दर व निविदाकार यांनी सादर केलेले दर यामध्ये तफावत असल्यामुळे सदर निविदाकार यांना दर वाटाघाटी करणेबाबत पत्राद्वारे कळविण्यात आले असता निविदाकार यांनी वाटाघाटी अंती १३ रुपये ५० पैसे या दराने प्रती किलो खरेदी करण्यास तयार असल्याचे मान्य केले आहे.

स्बब सद्यस्थितीत महापालिका आवारामध्ये लोखंड व प्लास्टीक मिश्रीत भंगार अस्ताव्यस्त पडलेले असून पावसामुळे सदरचे साहित्य आणखीनच खराब होत आहे. तरी मे. दिपक ट्रेडर्स, उल्हासनगर—३ यांनी सादर केलेल्या १३.५० खरेदी दरास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या पटलावर सादर करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र.** ६८ **दिनांक:—३/९/२०१६**

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिका आवारातील लोखंड व प्लास्टीक मिश्रीत भंगार साहित्याची विल्हेवाट लावणेकामी मे. दिपक ट्रेडर्स, उल्हासनगर—३ यांनी सादर केलेल्या १३.५० खरेदी दरास मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्र. १३ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १३ :–** मनपा कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 31CO005930200 Old No. 31/0253 [Bk. No. 825, Room No. 2, Ulhasnagar-3] अन्वये नोंद असलेल्या मिळकतीसाठी न्यायालयाचे निर्णयाच्या अधिन राहुन वर्ष २००० पासुन प्रतिमाह भाडे रक्कम रू. ५,०००/– भाडे गृहीत धरून करयोग्य मुल्य व आकारणी निश्चित करणेसाठी निर्णय घेणे.

---

**श्री. शैलेश दोंदे, प्र. कर निर्धारक व संकलक :–** या प्रकारात मालक व भाडेकरु यांच्यात वाद आहेत. यांचे कोर्टात केस चालु आहे. मालक भाडे भरण्यास तयार नाही. कोर्टाचा निर्णय आहे की २९ लाख भाडे प्रलंबित आहे. आम्ही तात्पुरते दर महिन्यास ५ हजार भाडे भरायला सांगितले आहे. आपण मान्यता दिली तर आपण ५ हजार त्यांच्याकडुन वसुल करु.

**श्रीमती विजया कंठे, उप–आयुक्त, मुख्यालय:–** बाकी कोर्टाचा निर्णयाच्या अधिन राहून करा.

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–** आपण कोर्टाच्या निर्णयाच्या अधिन राहुन निर्णय घेवु शकतो काय, आणि दुसरी गोष्ट आपण जी रक्कम मागणी करत आहोत, आता आपण म्हणत आहोत की त्याने ५ हजार रुपये तरी कमीत कमी भरले पाहिजे.

**सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–** ती मालमत्ता सील करा व ती रक्कम त्यास अर्धी भरण्यास सांगा.

<u>श्री. शैलेश दोंदे, प्र. कर निर्धारक व संकलक :—</u>मालमत्ता सील करायला गेलो तर कोर्टाचा आदेश आहे.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>कोर्टाने सांगितले आहे काय सील करु नका म्हणुन.

<u>श्री. शैलेश दोंदे, प्र. कर निर्धारक व संकलक :—</u>जर कोणी कोर्टात गेले तर आपण त्यांच्यावर कारवाई नाही करु शकत.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>नाही, नाही असे कोठे लिहिले नाही.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>हा विषय अदयाप आम्हांला नीट समजला नाही. आता जर कोर्टाचा निर्णय प्रलंबित आहे तर कोर्टात चालु दया ना. तोपर्यंत आपण त्याच्याकडुन ५ हजार रुपये घेत आहोत ना?

<u>श्री. शैलेश दोंदे, प्र. कर निर्धारक व संकलक :—</u>कोर्टाचा आदेश येईर्यंत त्यांच्याकडुन तात्पुरते ५ हजार वसुल करु.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>ठिक आहे घ्या ना.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>त्यांचे महिन्याचे व्याज किती होते?

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>नाही, नाही ते तर नंतर जेव्हा कोर्टाचा निर्णय येईल तेव्हा घेवुच ना.

<u>सदस्य श्री. विजय पाटील :—</u>२९ लाखाचे ५ हजार महिन्याचे का घेत आहोत. काय सिध्द होणार आहे? कोर्टात तो कशामुळे गेला त्यांच्या वादात ना?

<u>श्री. शैलेश दोंदे, प्र. कर निर्धारक व संकलक :—</u>कोर्टात केस चालु आहे.

<u>सदस्य श्री. विजय पाटील:—</u>तुम्हांला काय कोर्टाने आदेश दिला काय?

<u>श्री. शैलेश दोंदे, प्र. कर निर्धारक व संकलक :—</u>कोर्टात तो गेला. आपण स्वतः पार्टी आहोत. श्री. कदम म्हणुन वकिल आहेत त्यांनी सांगितले की तुम्ही तात्पुरते ५ हजार घ्या. ती व्यक्ती स्वतःहुन भरायला तयार आहेत, तर तात्पुरते घ्या त्यांच्याकडुन.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u>नाही, नाही, तात्पुरते नाही, कोर्टाने काहीच सांगितले नाही. कोर्टाच्या अधीन राहुन आपण हा विषय म्हणुच शकत नाही. कोर्टाचा आदेश येईपर्यंत आपले जे भाडे आहे तेच लावा. आहे तेच चालु राहु दया. जो निर्णय होईल ते कोर्ट देईल. असे निर्लेखित करण्याचे आपल्या हातात काही राहणार नाही. त्यामुळे कोर्टाच्या विषयावर आपण बोलणे बरोबर नाही. माझे सर्व सदस्यांना विनंती आहे की कोर्टाचे जसे चालले आहे तसे होवु दया. आणि कोर्टाचा अंतिम निर्णय काय येतो ते पहा.

<u>श्रीमती विजया कंठे, उप–आयुक्त, मुख्यालय:–</u>तोवर व्याज चालु राहिल.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u>होय, तोवर व्याज चालु राहील, ५ हजार का भरायचे?

<u>सदस्या श्रीमती अंजली साळवे :–</u>२९ लाख होईपर्यंत आपण कोठे लक्ष दिले?

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u>२९ लाख होईपर्यंत आपण काय करत होतात? कोण अधिकारी आहे? तुमचा कर निरिक्षक कोण आहे?

<u>श्री. शैलेश दोंदे, प्र. कर निर्धारक व संकलक :–</u>श्री. नितेश रंगारी म्हणुन कर निरिक्षक आहेत.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u>त्याच्यावर काय कारवाई करणार? त्याने एवढे वर्ष एवढी थकबाकी होईपर्यंत काय केले? आपल्याकडे आजच्या स्थितीमध्ये ब–याच लोकांचे पाच, पाच, दहा, दहा लाख थकबाकी आहे. दहा हजार वकिल करुन आणि पाच हजार वकिल करुन काय होणार? ते कोर्टात गेले आणि थांबवुन ठेवले तर काय अवस्था होईल आपली?

<u>सदस्या श्रीमती अंजली साळवे:–</u>कधीपासुनची थकबाकी आहे?

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–</u>याचाच अर्थ असा की आपण जे पाच हजार रुपये लावत आहात तर तो व्यक्ती २००० साला पासुन आजपर्यंत भरेल आणि त्यानंतर जेवढे काही होईल तर कोर्टाचा निर्णय आल्यानंतर बाकी पैसे भरेल. ठिक आहे ना, मग पारीत करण्यास काय हरकत आहे. आपल्या महापालिकेस पैसे मिळत आहे ना.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>तो व्यक्ती आठ लाख भरायला तयार आहे.

<u>श्री. शैलेश दोंदे, प्र. कर निर्धारक व संकलक :–</u>२००० सालापासुन हे चालु आहे.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>हे यांनी लिहिले आहे, माझे असे म्हणणे आहे की, कोर्टाने आदेश दिले का? त्या व्यक्तीने अर्ज केला आहे म्हणजे त्या भाडोत्रीने मान्य केले आहे ना. आधी कोर्टाचे आदेश पहा, तपासा. मग पहा ते. त्या व्यक्तीने अर्ज केला आहे की मी भरेल रक्कम ते. कोर्टाचा काय आदेश आहे ते पहा, आम्ही निर्णय देणार. तो अर्ज करत आहे आपण म्हणुन भरुन टाक बाबा एवढे. तर ते सर्व बरोबर काम होईल.

<u>श्रीमती विजया कंठे, उप—आयुक्त, मुख्यालय :—</u>त्याने कोर्टात दाखल केले आहे.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>तो कोर्टात असे दाखवेल का की मी एवढे सर्व भरत आहे.

<u>सदस्या श्रीमती अंजली साळवे:—</u>प्रलंबित ठेवा.

<u>श्रीमती विजया कंठे, उप—आयुक्त, मुख्यालय :—</u>त्याने काही तरी रक्कम भरली म्हणजे त्याला न्यायालयात दाखवता येईल.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>माझ्या हिशोबाने त्यास कोर्टातच जावु दया.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>आपण मालमत्ता सील केली काय?

<u>श्री. शैलेश दोंदे, प्र. कर निर्धारक व संकलक :—</u>मी सील केले होते त्यानंतर कोर्टाचे आदेश आलेत.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>कोर्टाने आदेश दिला काय की उघडा म्हणुन मालमत्ता?

<u>श्री. शैलेश दोंदे, प्र. कर निर्धारक व संकलक :—</u> त्याने आपल्याला पार्टी केले आहे.

<u>श्री. जमीर लेंगरेकर, उप—आयुक्त, कर:—</u>यामध्ये जो मालक आहे त्याने ॲग्रीमेंट करुन २००५ मध्ये भाडयाने दिले. त्यास तो ५ हजार भाडे देणे होते. जेव्हापासुन तो व्यक्ती भाडयाने राहतो त्याने भाडे भरले नाही व २००५ पासुन त्याच्या ताब्यात ती प्रापर्टी आहे. मालकाने कोर्टात केस दाखल केली आहे. आपण जर ५ हजार रक्कम त्या व्यक्तीकडुन वसुल केली तर तसे कोर्टात दाखल करावे लागेल.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>हे पहा यामध्ये एक गोष्ट लक्षात घ्या, महापालिकेस नुकसान नाही ही गोष्ट बरोबर आहे. परंतु एखादा भाडोत्री भरत आहे आणि मालक पण भरायला तयार असेल तर मालकाकडुन का नाही घ्यायचे?

<u>श्री. जमीर लेंगरेकर,उप—आयुक्त,कर:—</u>मालक भरण्यास तयार नाही.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>मग मालकाचे लेखी तसे दिले आहे तुम्हांला.

<u>श्री. जमीर लेंगरेकर,उप—आयुक्त,कर:—</u>मालक महापालिकेची तक्रार करत आहे, त्याने वेगवेगळया ठिकाणी महापालिकेची तक्रार केली आहे. मालक स्वत:हुन कर भरण्यास तयार नाही. त्यामुळे आपण ती रक्कम भाडेकरु कडुन वसुल करण्याचे ठरविले आहे.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>एक मत आहे, आपणांस कोर्टाने सांगितले आहे का की मालमत्ता सील नका करु, आपणांस पार्टी केले आहे.  हे आपले नियम आहेत त्या नियमानुसार जर मालमत्ता सील करता आली तर करु शकतो ना.  आपणास कोर्टाने तसे काही आदेश दिलेले नाही. प्रथम मालमत्ता सील करा आणि मग कोर्टाने सांगु दया ना की सील करु नका हा व्यक्ती एवढी रक्कम भरायला तयार आहे, याने अर्ज केला आहे. तुम्ही महापालिकेतर्फे का नाही दाखल करत की आम्ही मालमत्ता सील केली याने असा असा अर्ज केला तर त्यावर स्थायी समितीचा निर्णय असा झालेला आहे की सदर बाबतीत कोठेही कोर्टाने आदेश न दिल्यामुळे कोर्टाच्या आदेशाची अवमानता न होण्यासाठी आम्ही आमची कारवाई म्हणुन ते पैसे वसुल करण्यासाठी त्याची मालमत्ता सील करत आहोत. आणि त्याने जर अर्ज केला त्यावेळेस जर कोर्ट आदेश देत असेल तर आम्ही ते पैसे घेवुन त्याला ओपन करुन देवु. असे करु शकतो, हे पहा लक्षात घ्या. सात—आठ घेण्यापेक्षा मुख्य बाब अशी आहे की जर त्याची मालमत्ता सील केली तर तो रक्कम जास्त देईल. कारण कोर्टाने आदेश दिलेला नाही.

<u>सदस्य श्री. विजय पाटील:—</u>आपल्याला कोर्टाने आदेश दिले काय?

<u>श्री. जमीर लेंगरेकर,उप—आयुक्त,कर:—</u>हे न्यायप्रविष्ट आहे.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>सदर बाब न्यायप्रविष्ट असणे आणि कोर्टाने काहीच आदेश दिलेला नाही.

<u>श्री. जमीर लेंगरेकर,उप—आयुक्त,कर:—</u>आपण पार्टी आहोत, सदर बाब न्यायप्रविष्ट असल्याने आपण काहीच करु शकत नाही. आपण विधी विभागाकडुन अभिप्राय घेवु.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>असे करु या आपण सदरचा विषय वगळु या.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>सदरचा विषय वगळण्यात यावा.

**<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u>**सदर मालमत्ता सील करावी व त्याचा अहवाल देवुन न्यायालयात दया की आमची एवढी थकबाकी बाकी आहे.

**<u>सदस्या श्रीमती अंजली साळवे:–</u>**हे सुध्दा लिहिले आहे ना की या प्रकरणात महानगरपालिका प्रतिवादी नाही. असे स्पष्ट लिहिले आहे.

**<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u>**आर्थिक नुकसान ते महापालिकेचे करत आहेत. प्रथम सिल करा त्यानंतर कोर्टाचा काय निर्णय होता मग तशी माहिती दया. प्रथम सील करा आणि नंतर पुढील वेळेस हा विषय आणा. आणि इतिवृत्ताची वाट न पाहता कायम करा.

**<u>महापालिका सचिव :–</u>**साहेब, हा विषय वगळत आहेत ना मग इतिवृत्ताची वाट न पाहता कसे येईल?

**<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u>**ठिक आहे, वगळण्यात आहे ना, मग काही नाही. ही मालमत्ता सील करा, तसे कोर्टात पाठवा आणि लिहुन पाठवा एवढी एवढी रक्कम बाकी आहे. कारण कोर्टाचा सील करण्याबाबत कोठेही आदेश नाही. कोर्टाचा अवमान होण्याचा प्रश्नच येत नाही येथे.

**<u>काही सदस्य:–</u>**प्रस्ताव वगळण्यात यावा.

**<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u>**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १३** :– मनपा कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 31CO005930200 Old No. 31/0253 [Bk. No. 825, Room No. 2, Ulhasnagar-3] अन्वये नोंद असलेल्या मिळकतीसाठी न्यायालयाचे निर्णयाच्या अधिन राहुन वर्ष २००० पासुन प्रतिमाह भाडे रक्कम रू. ५,०००/– भाडे गृहीत धरून करयोग्य मुल्य व आकारणी निश्चित करणेसाठी निर्णय घेणे.

**<u>प्रस्तावना</u>**

उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 31CO005930200 Old No. 31/0253 [Bk. No. 825, Room No. 2, Ulhasnagar-3] अन्वये नोंद असलेल्या मिळकतीसाठी मालमत्ता कर वसुलीच्या प्रयोजनार्थ कर देण्यास प्रथम पात्र व्यक्ती म्हणुन PRITAMDAS ANSHIMAL अशी नोंद आहे. कर आकारणी करपात्र बाबींचा तपषिल खालीलप्रमाणे आहे.

| Const. Type | Occu.Status | Usage | Annual Rent | Asst. Year | Total Area |
|---|---|---|---|---|---|
| OPEN | OWNER | NON RESIDENTIAL | 0 | 01-APR-86 | 209 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| RCC | TENANT | NON RESIDENTIAL | 120000 | 01-APR-01 | 1735 |
| OPEN | OWNER | NON RESIDENTIAL | 0 | 01-APR-01 | 227 |
| RCC | TENANT | NON RESIDENTIAL | 96000 | 01-APR-01 | 375 |

B] संदर्भित मिळकतीमध्ये भाडेकरू असल्याने प्रतिमाह भाडे रक्कम रू. १०,०००/— (भाडेकरू वेणुगोपाल) व प्रतिमाह भाडे रक्कम रू. ८,०००/— (अमरलाल) गृहीत धरून संदर्भित मिळकतीचे करयोग्य मुल्य रू. १९४९८६ नुसार नियमितपणे कर आकारणी सुरू आहे. वर्श २०१६—२०१७ याकरीता दिनांक १९/०८/२०१६ पर्यंत मालमत्ता कर आकारणी रक्कम रू. २९,४२,४९४/— विलंब शास्तीसह थकीत आहे. थकीत रक्कमेचा भरणा करणेसाठी संबंधितास वेळोवेळी सुचित करण्यात आले आहे. तरीही कराचा भरणा न केल्यामुळे माहे डिसेंबर २०१५ मध्ये अधिपत्र (वॉरंट) बजावण्यात आले. तसेच स्थानिक वर्तमानपत्रात कसुरदारांची यादी प्रसिध्द् करण्यात आली. या कालावधीदरम्यान विभागात संबंधितांनी संपर्क साधलेला नाही. तद्नंतर वर्तमानपत्रात प्रसिध्द् केलेल्या कसुरदारांच्या स्थावर/जंगर मालमत्ता जप्ती/अटकावणी करण्याची कार्यवाही माहे जानेवारी २०१६ मध्ये सुरू करण्यात आली. सदर कार्यवाही दरम्यान संदर्भित मिळकत जप्त करण्यात आली. परंतु श्रीम. संगिता वेणुगोपाल षेट्टी यांनी संदर्भित मिळकतीचे भाडे आकारणीबाबत दिवाणी न्यायालय, उल्हासनगर येथे वाद सुरू असल्याने मिळकतीस लावण्यात आलेले सील उघडणेबाबत विनंती केली आहे. तसेच दिनांक २१/०१/२०१६ रोजी त्यांनी बंधपत्र सादर केले आहे. त्याचा तपषिल खालीलप्रमाणे आहे.

“मनपा कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 31CO005930200 Old No. 31/0253 [Bk No. 825 Room No. 2 UNR-3] अन्वये नोंद असलेल्या मिळकतीकरीता मालमत्ता कर वसुलीच्या प्रयोजनार्थ कर देण्यास प्रथम पात्र व्यक्ती म्हणुन Pritamdas Anshimal अशी नोंद आहे. संदर्भित मिळकतीचे खात्यात मालमत्ता करापोटी वर्ष २०१५—२०१६ माहे डिसेंबर अखेर रक्कम रू. २६,६०,२२०/— (विलंब शास्तीसह) थकीत आहे. संदर्भित मिळकतीमध्ये मी भाडेकरू आहे. संदर्भित मिळकतीचे भाडे निष्चितीबाबत दिवाणी न्यायालय, उल्हासनगर येथे चौकशी अर्ज ६५/२००५ व ७५/२०११ तसेच दिवाणी न्यायालय, कल्याण येथे अपिल दाखल आहे. लिव्ह ॲण्ड लायसन्स नुसार भाडे प्रतिमाह रक्कम रू. ५०००/— आहे. परंतु सदर प्रकरणे सद्यस्थितीत न्यायप्रविष्ठ आहे. थकीत रक्कमेचे वसुलीकामी मनपाने संदर्भित मिळकत अटकावणी/जप्ती केली आहे. तरी आपणांस विनंती करण्यात येते की, आज रोजी रक्कम रू. १०,०००/— भरणा करीत आहे. तसेच वर्ष २००० पासुन आजपर्यंत मासिक भाडे ५००० प्रमाणे कर आकारणी करावी. त्यानुसार महानगरपालिकेत मी भरणा केलेली रक्कम वजा करून उर्वरीत रक्कम ३० दिवसांत भरणा करेन. तसेच न्यायालयाचा जो काही निर्णय असेल त्यानुसार महानगरपालिकेने निश्‍चित केलेली कर आकारणी मला मान्य असेल व ती रक्कम भरणा करण्याची मी हमी देत आहे. तरी संदर्भित मिळकतीचे सिल उघडण्यात यावे’’

C] संगिता वेणुगोपाल षेट्टी यांनी दिनांक २२/०१/२०१६ रोजीचे पत्रान्वये संदर्भित मिळकतीसाठी प्रतिमाह भाडे रक्कम रू. ५,०००/— गृहीत धरून वर्श २००० पासुन कर मुल्यांकन करणेबाबत विनंती आहे. सोबत खालीलप्रमाणे कागदपत्राच्या प्रति सादर केल्या आहेत.

| अ. क्र | तपषिल |
|---|---|
| १ | श्री. वेणुगोपाळ षेट्टी यांचा कर आकारणी दुरूस्ती करणेबाबत महानगरपालिकेत दिनांक १/९/२००६ रोजी सादर केलेला अर्ज |
| २ | श्रीम. संगिता वेणुगोपाळ षेट्टी द्वारा वेणुगोपाळ षेट्टी यांचा कर आकारणी दुरूस्ती करणेबाबत महानगरपालिकेत दिनांक १२/७/२००७ रोजी सादर केलेला अर्ज |

| | |
|---|---|
| ३ | श्री. वेणुगोपाळ षेट्टी यांचा कर आकारणी दुरूस्ती करणेबाबत महानगरपालिकेत दिनांक २८/५/२००९ रोजी सादर केलेला अर्ज |
| ४ | श्री. वेणुगोपाळ षेट्टी यांचा चुकीची कर आकारणी दुरूस्ती करणेबाबत महानगरपालिकेत दिनांक २०/९/२०१० रोजी सादर केलेला स्मरणपत्र |
| ५ | श्रीम. संगिता वेणुगोपाळ षेट्टी यांचा कर आकारणी दुरूस्ती करणेबाबत महानगरपालिकेत दिनांक २३/११/२०१० रोजी सादर केलेला अर्ज |
| ६ | श्रीम. संगिता वेणुगोपाळ षेट्टी यांचा कर आकारणी दुरूस्ती करणेबाबत महानगरपालिकेत दिनांक १४/०३/२०१२ रोजी सादर केलेला अर्ज |
| ७ | श्रीम. संगिता वेणुगोपाळ षेट्टी यांचा कर आकारणी दुरूस्ती करणेबाबत महानगरपालिकेत दिनांक ४/१/२०१४ रोजी सादर केलेला अर्ज |
| ८ | श्रीम. संगिता वेणुगोपाळ षेट्टी यांचा कर आकारणी दुरूस्ती करणेबाबत महानगरपालिकेत दिनांक २२/४/२०१५ रोजी सादर केलेला अर्ज |
| ९ | श्रीम. संगिता वेणुगोपाळ षेट्टी यांचा कर आकारणी दुरूस्ती करणेबाबत महानगरपालिकेत दिनांक २२/०१/२०१६ रोजी सादर केलेला अर्ज |
| १० | रू. २० च्या मुद्रांकपेपरवर सुनिल इदनदास बुधरानी (लिहुन देणार) व पुजा इंदलाल माखिजा (लिहुन घेणार) यांचे दरम्यान दिनांक ११/१०/१९९९ रोजी झालेले खरेदीखाची प्रत. |
| ११ | रू. २० च्या मुद्रांकपेपरवर पुजा इंदलाल माखिजा (लिहुन देणार) व वेणुगोपाळ एम. षेट्टी (लिहुन घेणार) यांचे दरम्यान दिनांक ०१/०३/२००० रोजी झालेले लिव्ह ॲण्ड लायसन्सची प्रत. |
| १२ | मालमत्ता कर रू. ५०,०००/— भरणा केल्याची पावती क्र. ०२१७३२ दि. ११/१०/२००२ |
| १३ | मालमत्ता कर रू. १०,०००/— भरणा केल्याची पावती क्र. ०२६३१२ दि. १६/१०/२००२ |
| १४ | मालमत्ता कर रू. १,००,०००/— भरणा केल्याची पावती क्र. १५७८४२ दि. ३१/०३/२००४ |
| १५ | मालमत्ता कर रू. १,०९,०००/— भरणा केल्याची पावती क्र. १६१७९४ दि. २२/०६/२००४ |
| १६ | मालमत्ता कर रू. ५०,०००/— भरणा केल्याची पावती क्र. १८९११८ दि. १८/०३/२००५ |
| १७ | मालमत्ता कर रू. १०,०००/— भरणा केल्याची पावती क्र. ०२१७३२ दि. ११/१०/२००२ |
| १८ | वेणुगोपाळ एम. शेट्टी (वादी)<br>पुजा इंदर माखिजा (प्रतिवादी)<br>दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, उल्हासनगर येथे दाखल सुट क्र. १२६/२००२ ची प्रत |
| १९ | दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, उल्हासनगर येथे दाखल सुट क्र. १२६/२००२ मध्ये दिनांक ६/१/२००२ रोजी न्यायालयाने दिलेले आदेषाची प्रत |
| २० | वेणुगोपाळ एम. शेट्टी (वादी)<br>पुजा इंदर माखिजा (प्रतिवादी)<br>दिवाणी न्यायालय, उल्हासनगर येथे दाखल प्रमाणित भाडे निष्चित करणेबाबत दाखल Misc |

| | |
|---|---|
| | Application No. 65/2005 ची प्रत |
| २१ | वेणुगोपाळ एम. शेट्टी /पुजा इंदर माखिजा (अपिलार्थी)<br>उल्हासनगर महानगरपालिका (प्रतिवादी)<br>दिवाणी न्यायालय, वरिश्ठ स्तर, कल्याण येथे दाखल म्युनिसिपल अपिल क्र. २७/२००६ |
| २२ | वेणुगोपाळ एम. शेट्टी /पुजा इंदर माखिजा (अपिलार्थी)<br>उल्हासनगर महानगरपालिका (प्रतिवादी)<br>दिवाणी न्यायालय, वरिश्ठ स्तर, कल्याण येथे दाखल म्युनिसिपल अपिल क्र. ७/२००७ |
| २३ | वेणुगोपाळ एम. शेट्टी /पुजा इंदर माखिजा (अपिलार्थी)<br>उल्हासनगर महानगरपालिका (प्रतिवादी)<br>दिवाणी न्यायालय, कनिश्ठ स्तर, उल्हासनगर येथे दाखल आर. सी. एस. नं. ७५/२०११ |
| २४ | वेणुगोपाळ एम. शेट्टी /पुजा इंदर माखिजा (अपिलार्थी)<br>उल्हासनगर महानगरपालिका (प्रतिवादी)<br>दिवाणी न्यायालय, वरिश्ठ स्तर, कल्याण येथे दाखल म्युनिसिपल अपिल क्र. २/२०१२ |

D] वेणुगोपाळ शेट्टी व संगिता वेणुगोपाळ शेट्टी यांनी दाखल केलेले अर्जामध्ये उपस्थित मुद्यांचा सारांष तपषिल खालीलप्रमाणे आहे.

''संदर्भित मिळकत दिनांक १/३/२००३ रोजीचे भाडेकरू करारान्वये दरमहा रू. ५,०००/— भाडयाने पुजा इंदर माखिजा यांचेकडुन घेतली आहे. त्यामध्ये सुपर कलर लॅब नावाचा फोटो काढण्याचा व्यवसाय करीत आहे. सदरहु मालमत्ता पुजा इंदर माखिजा यांचे नावे नसुन ती प्रितमदास ऐंषीमल याचे नावे आहे त्याचा ठाव ठिकाणा नाही. मालमत्ता भाडयाने घेतल्यापासुन आजपर्यंत प्रितमदास ऐंषीमल यांनी संपर्क साधलेला नाही. भाडेनुसार कर आकारणी बाबत २००३ पासुन सतत हरकत दाखल केली आहे. परंतु मनपाने सुनावणीची संधी दिलेली नाही तसेच कर वाढविण्याबाबत नोटीस दिलेली नाही तरीही मी वेळोवेळी कराच भरणा केला आहे. तरी अवाढव्य, चुकीची कर आकारणी रद्द करून प्रतिमाह रू. ५,०००/— भाडेप्रमाणे कर आकारणी दुरूस्ती करावी.''

E] वेणुगोपाळ शेट्टी यांनी न्यायालयात दाखल केलेल्या दाव्यांचे अवलोकन केले असता खालील बाबी निदर्षनास येत आहेत.

i] वेणुगोपाळ एम. शेट्टी (वादी) यांनी दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, उल्हासनगर येथे दाखल सुट क्र. १२६/२००२ मध्ये पुजा इंदर माखिजा (प्रतिवादी) यांचेविरूध्द् संदर्भित मिळकतीचे भाडे रू. ५,०००/— निष्चित करणेसाठी दावा दाखल केला आहे. सदर प्रकरणात महानगरपालिका प्रतिवादी नाही. तसेच सदर प्रकरणात वेणुगोपाळ एम. शेट्टी यांचे असे म्हणणे ''मिळकतीचे भाडेपोटी प्रतिमाह रू. ५,०००/— पुजा इंदर माखिजा यांना न्यायालयाचे निकालानंतर अदा करण्यात येईल'' दि. ६/१/२००२ रोजी न्यायालयाने दाखल करून घेतले आहे. परंतु सदर प्रकरणात अंतिम निर्णय झालेला नाही.

ii] तसेच वेणुगोपाळ एम. शेट्टी (वादी) दिवाणी न्यायालय, उल्हासनगर येथे मिळकतीचे प्रमाणित भाडे निष्चित करणेबाबत पुजा इंदर माखिजा (प्रतिवादी) यांचेविरूध्द् दाखल केलेले डपेब ।चचसपबंजपवद छवण ६५६२००५ मध्ये ही निर्णय झालेला नाही.

iii] तथापि, वेणुगोपाळ एम. शेट्टी /पुजा इंदर माखिजा यांनी भाडे निष्चितीबाबत दिवाणी न्यायालय, वरिश्ठ स्तर, कल्याण येथे दाखल म्युनिसिपल अपिल क्र. २७/२००६, ७/२००७, २/२०१२ मध्ये उल्हासनगर महानगरपालिका प्रतिवादी असुन सदर प्रकरण न्यायप्रविश्ठ आहे.

iv] वेणुगोपाळ एम. शेट्टी /पुजा इंदर माखिजा (अपिलार्थी) यांनी भाडे निष्चितीबाबत दिवाणी न्यायालय, कनिश्ठ स्तर, उल्हासनगर येथे दाखल आर. सी. एस. नं. ७५/२०११ मध्ये उल्हासनगर महानगरपालिका प्रतिवादी असुन सदर प्रकरण न्यायप्रविश्ठ आहे.

F] वेणुगोपाळ एम. शेट्टी व संगिता वेणुगोपाळ शेट्टी यांनी संदर्भित मिळकतीचे भाडेप्रमाणे कर आकारणीबाबत महानगरपालिकेत दाखल केलेल्या अर्जावर निर्णय झालेला नाही.

G] संदर्भित मिळकतीचे मालकी हक्क हस्तांतणासंबंधी संगिता वेणुगोपाळ शेट्टी यांनी सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता प्रितमदास अंषमल (कर देण्यास प्रथम पात्र व्यक्ती) यांनी सुनिल इदनदास बुधरानी यांना मालकी हक्क हस्तांतरण केलेल्या कागदपत्र दिसुन येत नाही. परंतु रू. २० च्या मुद्रांकपेपरवर सुनिल इदनदास बुधरानी (लिहुन देणार) व पुजा इंदलाल माखिजा (लिहुन घेणार) यांचे दरम्यान दिनांक ११/१०/१९९९ रोजी खरेदीखत करण्यात आले आहे. सदरील करार नोंदणीकृत नाही. तसेच रू. २० च्या मुद्रांकपेपरवर पुजा इंदलाल माखिजा (लिहुन देणार) व वेणुगोपाळ एम. षेट्टी (लिहुन घेणार) यांचे दरम्यान मिळकतीचे ४१४ चौ.फुट क्षेत्रासाठी दिनांक १५/०२/२००० ते १४/०१/२००१ या कालावधीदरम्यान प्रतिमाह भाडे रू ५०००/— असा करार दिनांक ०१/०३/२००० रोजी (लिव्ह ॲण्ड लायसन्स ) झालेला आहे. सदरील करार नोंदणीकृत नाही. तसेच भाडेकराराचे नुतणीकरणसंबंधी कोणतेही कागदपत्र सादर केलेले नाहीत.

सबब, मिळकतीचे मालकी हक्क हस्तांतरण तसेच भाडे निष्चिती बाबत स्पष्ट खुलासा होत नाही.

H] सद्यस्थितीत संदर्भित मिळकतीचा संपुर्ण ताबा संगिता वेणुगोपाळ शेट्टी (भाडेकरू) यांचेकडे असुन ते मिळकतीचा भोगवटा करीत आहेत.

I] संदर्भित मिळकतीसाठी वर्ष २००० पासुन प्रतिमाह भाडे रक्कम रू. ५,०००/— गृहीत धरून करयोग्य मुल्य निष्चित करावे किंवा कसे? याबाबत विधी विभागामार्फत कायदेषिर सल्ला घेण्यात आला आहे. कायदेषिर सल्लागाराने संदर्भित मिळकतीसाठी वर्ष २००० पासुन प्रतिमाह भाडे रक्कम रू. ५,०००/— गृहीत धरून कर आकारणी करणेसाठी संमती दर्षविली आहे.

J] वेणुगोपाळ शेट्टी यांनी न्यायालयात दाखल केलेल्या दाव्यांचे अवलोकन केले असता खालील बाबी निदर्षनास येत आहेत.

i] वेणुगोपाळ एम. शेट्टी (वादी) यांनी दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, उल्हासनगर येथे दाखल सुट क्र. १२६/२००२ मध्ये पुजा इंदर माखिजा (प्रतिवादी) यांचेविरूध्द् संदर्भित मिळकतीचे भाडे रू. ५,०००/— निष्चित करणेसाठी दावा दाखल केला आहे. सदर प्रकरणात महानगरपालिका प्रतिवादी नाही. तसेच सदर प्रकरणात वेणुगोपाळ एम. शेट्टी यांचे असे म्हणणे ''मिळकतीचे भाडेपोटी प्रतिमाह रू. ५,०००/— पुजा इंदर माखिजा यांना न्यायालयाचे निकालानंतर अदा करण्यात येईल'' दि. ६/१/२००२ रोजी न्यायालयाने दाखल करून घेतले आहे. परंतु सदर प्रकरणात अंतिम निर्णय झालेला नाही.

ii] तसेच वेणुगोपाळ एम. शेट्टी (वादी) दिवाणी न्यायालय, उल्हासनगर येथे मिळकतीचे प्रमाणित भाडे निष्चित करणेबाबत पुजा इंदर माखिजा (प्रतिवादी) यांचेविरूध्द् दाखल केलेले Misc Application No. 65/2005 मध्ये ही निर्णय झालेला नाही.

iii] तथापि, वेणुगोपाळ एम. शेट्टी /पुजा इंदर माखिजा यांनी भाडे निष्चितीबाबत दिवाणी न्यायालय, वरिश्ठ स्तर, कल्याण येथे दाखल म्युनिसिपल अपिल क्र. २७/२००६, ७/२००७, २/२०१२ मध्ये उल्हासनगर महानगरपालिका प्रतिवादी असुन सदर प्रकरण न्यायप्रविश्ठ आहे.

iv] वेणुगोपाळ एम. शेट्टी /पुजा इंदर माखिजा (अपिलार्थी) यांनी भाडे निष्चितीबाबत दिवाणी न्यायालय, कनिश्ठ स्तर, उल्हासनगर येथे दाखल आर. सी. एस. नं. ७५/२०११ मध्ये उल्हासनगर महानगरपालिका प्रतिवादी असुन सदर प्रकरण न्यायप्रविश्ठ आहे.

विषयांकित प्रकरणात संबंधितांची सुनावणी घेण्यात आली. दिनांक ६/५/२०१६ रोजीचे सुनावणी दरम्यान श्रीम. संगिता वेणुगोपाळ षेट्टी उपस्थित असुन श्रीम. पुजा इंदरलाल माखिजा, श्री. प्रितमदास ऐंषीमल, श्री. सुनिल इदनदास बुधरानी गैरहजर आहेत

सुनावणी दरम्यान श्रीम. संगिता वेणुगोपाळ षेट्टी यांनी संदर्भित मिळकतीचे भाडे रू. ५,०००/— गृहीत धरावे. सन २००० पासुन आजपर्यतचा कर आकारावा. तसेच यापुर्वी भरणा केलेली रक्कम समायोजित करून उर्वरीत रक्कम भरण्यास तयार असल्याबाबत लेखी निवेदन सादर केले आहे.

संदर्भित मिळकतीचे मालकी हक्क हस्तांतणासंबंधी संगिता वेणुगोपाळ शेट्टी यांनी सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता प्रितमदास अंषमल (कर देण्यास प्रथम पात्र व्यक्ती) यांनी सुनिल इदनदास बुधरानी यांना मालकी हक्क हस्तांतरण केलेल्या कागदपत्र दिसुन येत नाही. परंतु रू. २० च्या मुद्रांकपेपरवर सुनिल इदनदास बुधरानी (लिहुन देणार) व पुजा इंदलाल माखिजा (लिहुन घेणार) यांचे दरम्यान दिनांक ११/१०/१९९९ रोजी खरेदीखत करण्यात आले आहे. सदरील करार नोंदणीकृत नाही. तसेच रू. २० च्या मुद्रांकपेपरवर पुजा इंदलाल माखिजा (लिहुन देणार) व वेणुगोपाळ एम. षेट्टी (लिहुन घेणार) यांचे दरम्यान मिळकतीचे ४१४ चौ.फुट क्षेत्रासाठी दिनांक १५/०२/२००० ते १४/०१/२००१ या कालावधीदरम्यान प्रतिमाह भाडे रू ५०००/— असा करार दिनांक ०१/०३/२००० रोजी (लिव्ह ॲण्ड लायसन्स ) झालेला आहे. सदरील करार नोंदणीकृत नाही. तसेच भाडेकराराचे नुतणीकरणसंबंधी कोणतेही कागदपत्र सादर केलेले नाहीत. सबब, मिळकतीचे मालकी हक्क हस्तांतरण तसेच भाडे निष्चिती बाबत स्पष्ट खुलासा होत नाही.

वेणुगोपाळ एम. शेट्टी यांनी संदर्भित मिळकतीसाठी वर्ष २००० पासुन प्रतिमाह भाडे रक्कम रू. ५,०००/— भाडे गृहीत धरून कर आकारणी करणेसंदर्भात विविध न्यायालयात दाखल केलेले अर्ज, अपिल न्यायप्रविष्ठ आहेत.

न्यायालयाचे निर्णयाच्या अधिन राहुन संदर्भित मिळकतीसाठी वर्ष २००० पासुन प्रतिमाह भाडे रक्कम रू. ५,०००/— गृहीत धरून करयोग्य मुल्य व आकारणी निष्चित केल्यास बऱ्याच वर्षापासुन प्रलंबित असलेले सदर प्रकरण निकाली काढता येईल.

तरी मनपा कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 31CO005930200 Old No. 31/0253 [Bk. No. 825, Room No. 2, Ulhasnagar-3] अन्वये नोंद असलेल्या मिळकतीसाठी न्यायालयाचे निर्णयाच्या अधिन राहुन वर्ष २००० पासुन प्रतिमाह भाडे रक्कम रू. ५,०००/— भाडे गृहीत धरून करयोग्य मुल्य व आकारणी निष्चित करणेसाठी निर्णयास्तव स्थायी समितीपुढे प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ६८ अ</u> <u>दिनांकः— ३/९/२०१६</u>

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार मनपा कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 31CO005930200 Old No. 31/0253 [Bk. No. 825, Room No. 2, Ulhasnagar-3] अन्वये नोंद असलेल्या मिळकतीसाठी न्यायालयाचे निर्णयाच्या अधिन राहुन वर्ष २००० पासुन प्रतिमाह भाडे रक्कम रू. ५,०००/— भाडे गृहीत धरून करयोग्य मुल्य व आकारणी निश्चित करण्याचा प्रस्ताव या कार्यसूचीवरुन वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची <u>सही/—</u>

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

महापालिका सचिव :— विषय क्र. १४ वाचुन दाखवितात

————————————————————————————————————————————————————

⇨ **विषय क्र. १४ :—** उल्हासनगर महानगरपालिकेत कार्यालयीन कामकाजासाठी कार,व्हॅन,सुमो वाहन वाहनचालकासह भाडेतत्वावर पुरविणेबाबतच्या निविदेस मान्यता मिळणे.

————————————————————————————————————————————————————

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—हा विषय इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करावा.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—५ वर्षासाठी रिन्यु करा.

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—निविदा आहे पण काय आहे आता जे मिळणार आहे तो कायम आपणास पाच वर्षासाठी देत नाही. हा जो दर आलेला आहे तो स्पर्धात्मक होवुन आलेला आहे ना? आणि हा दर कमीत कमी आहे की जास्तीत जास्त आहे?

श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक:—भाडे मिनीमम आहे. शासनाच्या दरानुसार १२ टक्के सर्व्हिस टॅक्स घेतला आहे.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—५ वर्षासाठी दया.

यावेळी सदस्या श्रीमती आशा इदनानी व श्रीमती जया माखिजा हया सभागृहातुन बाहेर गेल्या.

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—शासनाच्या दरानुसार आहे ना.

श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक:—में. मोहिनीराज ट्रॅव्हल्स ॲण्ड ट्रान्सपोर्ट यांनी वाहना संबंधी सादर केलेले दर हे इतर ठेकेदार/ मक्तेदारापेक्षा न्युनतम आहेत. नियीमत कार्यालर्यात कामाकरीता जादा तासाचा दर

८ तासानंतर प्रती तास यामध्ये कमी केले आहे. तसेच आपत्कालीन परिस्थिती, खासदार दौरा, पल्स पोलियो, व इतर महत्वाच्या कामासाठी दर कमी केले आहे. तरी वाटाघाटी अती प्राप्त दर शासनाच्या दरापेक्षा कमी व वाजवी आहेत.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>ठिक आहे.

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑**विषय क्र. १४ :—** उल्हासनगर महानगरपालिकेत कार्यालयीन कामकाजासाठी कार,व्हॅन,सुमो वाहन वाहनचालकासह भाडेतत्वावर पुरविणेबाबतच्या निविदेस मान्यता मिळणे.

<u>प्रस्तावना</u>

उपरोक्त विषयान्वये उल्हासनगरमहानगरपालिका मुबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ नुसार कार्य करीत आहे शहरातील जनतेला मुलभुत सुविधा देण्यासाठी मनपातील विविध विभाग कार्यरत आहे. वाहन विभागामार्फत अधिकारी यांना वाहनचालकासह मा. आयुक्त यांच्या आदेशने आत्यावश्क महत्वाच्या सेवा पुरवण्याऱ्या अधिकारी यांना वाहन पुरवले जाते म्हणून खाजगी कंपनीकडून कार, व्हॅन, सुमो इत्यादी वाहन वाहनचालकासह भाडेतत्वावर घेण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात आले आहे.या कामाकरिता ई निविदा मागविण्यात आल्या असुन त्यांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्राकलनीय खर्च | रु. ८८,००,०००/— |
| २ | निविदा प्रसिध्द केलेली वर्तमानपत्रे | १)दैनिक लोकमत २)दैनिक पुण्यनगरी,३)दैनिक धनुषधारी |
| ३ | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दि. १४/०७/२०१६ ते दि. १६/०७/२०१६ |
| ४ | निविदा विक्री कालावधी | दि. १६/०७/२०१६ ते दि.२७/०७/२०१६ |
| ५ | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दि. २७/७/२०१६ ते दि. २८/७/२०१६ |
| ६ | निविदेचा तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | दि. ०१/०७/२०१६ ते दि. ०२/०७/२०१६ |
| ७ | निविदेचा आर्थिक भाग उघडण्याचा दिनांक | दि. ०१/०७/२०१६ ते दि. ०२/०७/२०१६ |
| ८ | विक्री केलेल्या निविदांची संख्या | ३ |
| ९ | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ३ |

दिनांक ०१/०८/२०१६ रोजी निविदा क्र. १०५६ या ई निविदाचा तांत्रिक भाग मा.उप आयुक्त (मुख्या.) मा. मुख्य लेखा परिक्षक, मा. लेखा अधिकारी, मा. उप आयुक्त (वाहन), यांचे उपस्थितीत उल्हासनगर महानगरपालिकेच्या वाहनांवर खाजगी कंपनीकडून वाहनचालक पुरवठा करणे बाबत या कामाच्या निविदेचा भाग—१ लिफाफा उघडण्यात आला त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अक्र | निविदाकाराच्या निविदेमधील | में. अनमोल ट्रान्सपोर्ट | में. मोहिनीराज ट्रॅव्हल्स | मे.हरदिप रोडवेज |
|---|---|---|---|---|

| | बाबी | कंपनी | ॲण्ड ट्रान्सपोर्ट | |
|---|---|---|---|---|
| १ | अनुभवाचा दाखला | होय | होय | होय |
| २ | पॅन कार्ड | होय | होय | होय |
| ३ | स्व:ताच्या नावे पाच वाहने असल्या बद्दलचे कागद पत्र | होय | होय | होय |
| ४ | सेवा कर (सर्विस टॅक्स) प्रमाणपत्र | होय (सेवा कराचे हमीपत्र) | होय (सेवा कराचे हमीपत्र) | होय (सेवा कराचे हमीपत्र) |

सदर निविदेची वाहन विभागात छाननी केली असता १) में. अनमोल ट्रान्सपोर्ट कंपनी २) में. मोहिनीराज ट्रॅव्हल्स ॲण्ड ट्रान्सपोर्ट ३) मे.हरदिप रोडवेज यांच्या निविदा अटी शर्तीनुसार असल्याने पात्र आहेत.

तरी उपरोक्त निविदाकांराच्या निविदाचा दुसरा भाग (आर्थिक) दि ३/०८/२०१६ रोजी मा.अति. आयुक्त/उप आयुक्त (मुख्यालय),यांच्या अध्यक्षते खालील निवड समिती सदस्य मुख्य लेखापरिक्षक,मुख्य लेखाअधिकारी, उप आयुक्त (वाहन) यांचे उपस्थितीत उघडण्यात आला. त्याचा तपशिल दर पुढीलप्रमाणे आहे.

अ) नियमीत कार्यालयीन कामकाजा करीता

| वाहनाचा तपशील | | वाहनाचा दर प्रती दिवस ४०कि. मी. साठी महिना १२५० कि.मी. ८ तासासाठी दर रूपयामध्ये | | | जादा कि.मी.चा दर प्रती दिवस ४० कि.मी. नंतर/महिना १२५० कि.मी नंतर. दर रूपयामध्ये | | | जादा तासाचा दर ८ तासानंतर. प्रती तास **दर रूपयामध्ये** | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | निविदा धारकाचे नाव/ कंपनी | में. अनमोल ट्रान्सपोर्ट कंपनी | **में. मोहिनीराज ट्रॅव्हल्स ॲण्ड ट्रान्सपोर्ट** | मे.हरदिप रोडवेज | में. अनमोल ट्रान्सपोर्ट कंपनी | **में. मोहिनीराज ट्रॅव्हल्स ॲण्ड ट्रान्सपोर्ट** | मे.हरदिप रोडवेज | में. अनमोल ट्रान्सपोर्ट कंपनी | **में. मोहिनीराज ट्रॅव्हल्स ॲण्ड ट्रान्सपोर्ट** | मे.हरदिप रोडवेज |
| १. टाटा इंडिगोस्विफ्ट डिझार(ए. सी) डिझेल | | २१०० | २००० | २३०० | १७ | १६ | १६.५० | ८० | ७० | ७५ |
| २. टाटा इंडिका/ वॅगनर(ए. सी) डिझेल | | १७०० | १६०० | १६५० | १७ | १४ | १५ | ८० | ६० | ६५ |
| ३. टाटा इंडिका (नॉन ए. सी) डिझेल | | १६०० | १५०० | १६०० | १५ | १४ | १५ | ८० | ६० | ६५ |
| ४. इनोव्हा(ए | | ३००० | २६०० | २७०० | २० | १८ | १९ | २०० | २०० | २५० |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| .सी) डिझेल | | | | | | | | | | |
| ५. मारूती व्हॅन (नॉन ए. सी) डिझेल | | १६५० | १६०० | १७०० | १५ | १४ | १५ | ८० | ६० | ६५ |

ब) आपत्कालीन परिस्थिती, खासदार दौरा, पल्स पोलियो, व इतर महत्वाच्या कामासाठी.

| वाहनाचा तपशील | | वाहनाचा दर प्रती दिवस ४०कि. मी. साठी महिना १२५० कि.मी. ८ तासासाठी दर रूपयामध्ये | | | जादा कि.मी.चा दर प्रती दिवस ४० कि.मी. नंतर/महिना १२५० कि.मी नंतर. दर रूपयामध्ये | | | जादा तासाचा दर ८ तासानंतर. प्रती तास दर रूपयामध्ये | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | निविदा धारकाचे नाव/ कंपनी | में. अनमोल ट्रान्सपोर्ट कंपनी | **में. मोहिनीराज ट्रॅव्हल्स ॲण्ड ट्रान्सपोर्ट** | मे.हरदिप रोडवेज | में. अनमोल ट्रान्सपोर्ट कंपनी | **में. मोहिनीराज ट्रॅव्हल्स ॲण्ड ट्रान्सपोर्ट** | मे. हरदिप रोडवेज | में. अनमोल ट्रान्सपोर्ट कंपनी | **में. मोहिनीराज ट्रॅव्हल्स ॲण्ड ट्रान्सपोर्ट** | मे. हरदिप रोडवेज |
| १. टाटा इंडिगो (ए.सी) डिझेल | | २३०० | २२०० | २४०० | १७ | १६ | १६.५० | ८० | ७० | ७५ |
| २. टाटा सूमो (नॉन ए.सी) डिझेल | | २२०० | २१०० | २३०० | १७ | १६ | १६.५० | ८० | ७० | ७५ |
| ३. इनोव्हा (ए.सी) डिझेल | | ३००० | २६०० | २७०० | २० | १८ | १९ | २०० | २०० | ३०० |
| ४ जे.सी.बी. | प्रति तासाचा दर | २७०० | २५०० | ३००० | | | | | | |

वरील तुलनात्मक तक्त्यानुसार “अ” मधील अनुक्रमाक १,२,३,४,५ मधील प्राप्त दर व “ब” तक्त्या मधील अनुक्रमाक १,२,३,४ मधील प्राप्त दर हे में. मोहिनीराज ट्रॅव्हल्स ॲण्ड ट्रान्सपोर्ट यांनी वाहना संबंधी सादर केलेले दर हे इतर ठेकेदार/ मक्तेदारापेक्षा न्युनतम आहेत.

वरील निविदाधारक में. मोहिनीराज ट्रॅव्हल्स ॲण्ड ट्रान्सपोर्ट यांच्या प्राप्त दरास मा. आयुक्त सो.यांनी दिनांक ८/८/२०१६ रोजी मागीलदर व सद्याचे प्राप्तदर यांची तुलनात्मक अभिप्राय सहा सादर करण्यास आदेश दिले त्यानुसार फेर सादर करण्यात आले.

मा. आयुक्त सो., यांच्या दिनांक ०८/०८/२०१६ रोजीच्या निर्देशान्वये मागील निविदेतील दर व सद्याचे प्राप्त दर यांची तुलना करून अभिप्राय सादर करण्यास सांगितले आहे. मागिल निविदा ही सन २०११ ची असल्याने उत्तरोत्तर होणारी भाव वाढ पाहता सन २०११ चे दर व सन २०१६ चे दर तुलना करणे व्यावहारिक होणार नाही तरी ही खालील प्रमाणे प्राप्त दराची तुलना पुढील प्रमाणे आहे.

*अ) नियमित कार्यालयीन कामकाजा करीता*

| वाहनाचा तपशील | वाहनाचा दर प्रती दिवस ४०कि.मी. साठी महिना १२५० कि.मी. ८ तासासाठी दर रूपयामध्ये | | | जादा कि.मी.चा दर प्रती दिवस ४० कि.मी. नंतर/महिना १२५० कि.मी नंतर. दर रूपयामध्ये | | | जादा तासाचा दर ८ तासानंतर. प्रती तास दर रूपयामध्ये | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मागील सन २०११चे दर | शासनाचे दर ' ४०कि.मी. ८ तासा | निविदेत प्राप्त दर | मागील सन २०११चे दर | शासनाचे दर' ४०कि.मी. ८ तासा | सध्याचे प्राप्त दर | मागील सन २०११चे दर | शासनाचे दर' ४०कि.मी. ८ तासा | निविदेत प्राप्त दर |
| १.टाटा इंडिगो स्विफ्ट डिझार (ए.सी)डिझेल | १३०० | १५०० | २००० | ७ | १५ | १६ | ३५ | ८० | ७० |
| २.टाटा इंडिका/ वॅगनर (ए.सी) डिझेल | १३०० | दर नाही | १६०० | ७ | दर नाही | १४ | ३५ | दर नाही | ६० |
| ३. टाटा इंडिका (नॉन ए.सी) डिझेल | ९०० | दर नाही | १५०० | ७ | दर नाही | १४ | ३५ | दर नाही | ६० |
| ४.इनोव्हा (ए.सी) डिझेल | १८०० | ३२०० | २६०० | ७ | १६ | १८ | ३५ | २०० | २०० |
| ५.मारूती व्हॅन (नॉन ए.सी) डिझेल | ९५० | दर नाही | १६०० | ७ | दर नाही | १४ | ३५ | दर नाही | ६० |

*ब) आपत्कालीन परिस्थिती, खासदार दौरा, पल्स पोलियो, व इतर महत्वाच्या कामासाठी.*

| वाहनाचा तपशील | वाहनाचा दर प्रती दिवस ४०कि. मी. साठी महिना १२५० कि.मी. ८ तासासाठी | | | जादा कि.मी.चा दर प्रती दिवस ४० कि.मी. नंतर/महिना १२५० कि.मी नंतर. | | | जादा तासाचा दर ८ तासानंतर. प्रती तास | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मागील सन २०११चे दर | शासनाचे दर ' ४०कि.मी. ८ तासा | निविदेत प्राप्त दर | मागील सन २०११चे दर | शासनाचे दर ' ४०कि.मी. ८ तासा | सध्याचे प्राप्त दर | मागील सन २०११चे दर | शासनाचे दर ' ४०कि.मी. ८ तासा | निविदेत प्राप्त दर |
| १.टाटा इंडिगो (ए. | १५०० | २१९० | २२०० | ८ | १५ | १६ | ३५ | ८० | ७० |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सी)डिझेल | | | | | | | | | |
| २.टाटा सूमो (नॉन ए.सी) डिझेल | १३७५ | **दर नाही** | <u>२१००</u> | ८ | दर नाही | <u>१६</u> | ३५ | दर नाही | <u>७०</u> |
| ३.इनोव्हा (ए.सी) डिझेल | २००० | **३२००** | <u>२६००</u> | ८ | १६ | <u>१८</u> | ३५ | २०० | <u>२००</u> |
| ४. जे.सी.बी. प्रति तास | ५०० | **दर नाही** | <u>२५००</u> | ७० | दर नाही | — | ७० | दर नाही | — |

शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र शापसे– १०१४/प्र.क्र.१३२/का ३१दिनांक ११ मे २०१५ चे विवरणपत्र.शासनाचे दर हे प्रति ४ तासाप्रमाणे आहेत हिशोबासाठी/तुलनेसाठी ८ (आठ) तासाप्रमाणे विचारात घेतले आहेत.

मा. आयुक्त सो.यांनी पुन्हा प्राप्त दरामध्ये वाटाघाटी करून सादर करण्यास आदेश दिले.त्यानुसार वाहन विभागामार्फत

मा.आयुक्त सो,यांनी दिनांक ०८/०८/२०१६ रोजी आदेशीत केल्यानुसार जा.क्र.उमपा/वाहन/९१/१६,दिनांक ११/०८/२०१६ रोजी पत्रान्वये सदर ठेकेदारास वाटाघाटी संर्दभात पत्र देण्यात आले होते. त्या अनुषगाने दिनांक १९/०८/२०१६ रोजी दुपारी १२:०० वाजता मा.अति.आयुक्त यांच्या अध्यक्षते खालील निवड समिती सदस्य मा. मुख्य लेखापरिक्षक,मा.मुख्य लेखाअधिकारी, मा.उप आयुक्त (वाहन) व ठेकेदार में. मोहिनीराज ट्रॅव्हल्स ॲण्ड ट्रान्सपोर्ट यांच्या सोबत वाटाघाटी दरम्यान खालील प्रमाणे दर प्राप्त झाले.

<u>अ) नियमित कार्यालयीन कामकाजा करीता</u>

| अ क्र. | वाहनाचा तपशील | वाहनाचा दर प्रती दिवस ४०कि.मी. साठी महिना १२५० कि.मी. ८ तासासाठी दर रूपयामध्ये | | | | जादा कि.मी.चा दर प्रती दिवस ४० कि.मी. नंतर/महिना १२५० कि.मी नंतर. दर रूपयामध्ये | | | | जादा तासाचा दर ८ तासानंतर. प्रती तास दर रूपयामध्ये | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मागील सन २०११चे दर | शासनाचे दर४० कि.मी. ८ तासा | निविदेत प्राप्त दर | **वाटाघाटी दरम्यान सादर केलेले दर** | मागील सन २०११ चे दर | शासनाचे दर' ४०कि.मी.८ तासा | सध्याचे प्राप्त दर | **वाटाघाटी दरम्यान सादर केलेले दर** | मागील सन २०११ चे दर | शासनाचे दर'४० कि.मी. ८तासा | निविदेत प्राप्त दर | **वाटाघाटी दरम्यान सादर केलेले दर** |
| १ | टाटा इंडिगो स्विफ्ट डिझार (ए. सी) डिझेल | १३०० | १५०० | <u>२०००</u> | <u>२०००</u> | ७ | १५ | <u>१६</u> | <u>१५</u> | ३५ | ८० | <u>७०</u> | <u>६०</u> |
| २ | टाटा इंडिका/ वॅगनर (ए.सी) डिझेल | १३०० | **दर नाही** | <u>१६००</u> | <u>१६००</u> | ७ | **दर नाही** | <u>१४</u> | <u>१३</u> | ३५ | **दर नाही** | <u>६०</u> | <u>५०</u> |
| ३ | टाटा इंडिका (नॉन ए. सी) डिझेल | ९०० | **दर नाही** | <u>१५००</u> | <u>१५००</u> | ७ | **दर नाही** | <u>१४</u> | <u>१३</u> | ३५ | **दर नाही** | <u>६०</u> | <u>५०</u> |

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | इनोव्हा (ए.सी) डिझेल | १८०० | ३२०० | २६०० | २६०० | ७ | १६ | १८ | १७ | ३५ | २०० | २०० | १७५ |
| ५ | मारूती व्हॅन (नॉन ए. सी) डिझेल | ९५० | दर नाही | १६०० | १६०० | ७ | दर नाही | १४ | १३ | ३५ | दर नाही | ६० | ५० |

**ब) आपत्कालीन परिस्थिती, खासदार दौरा, पल्स पोलियो, व इतर महत्वाच्या कामासाठी.**

| अ.क्र. | वाहनाचा तपशील | वाहनाचा दर प्रती दिवस ४०कि.मी. साठी महिना १२५० कि.मी. ८ तासासाठी | | | | जादा कि.मी.चा दर प्रती दिवस ४० कि.मी. नंतर/महिना १२५० कि.मी नंतर. | | | | **जादा तासाचा दर ८ तासानंतर. प्रती तास** | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मागील सन २०११चे दर | शासनाचे दर ४०कि.मी.८ तासा | निविदेत प्राप्त दर | **वाटाघाटी दरम्यान सादर केलेले दर** | मागील सन २०११ चे दर | शासनाचे दर ४० कि.मी. ८ तासा | सध्याचे प्राप्त दर | **वाटाघाटी दरम्यान सादर केलेले दर** | मागील सन २०११ चे दर | शासनाचे दर ४०कि मी. ८ तासा | निविदेत प्राप्त दर | **वाटाघाटी दरम्यान सादर केलेले दर** |
| १ | टाटा इंडिगो (ए.सी) डिझेल | १५०० | **२१९०** | २२०० | २२०० | ८ | १५ | १६ | १५ | ३५ | ८० | ७० | ६० |
| २ | टाटा सूमो (नॉन ए. सी) डिझेल | १३७५ | **दर नाही** | २१०० | २१०० | ८ | दर नाही | १६ | १५ | ३५ | दर नाही | ७० | ६० |
| ३ | इनोव्हा (ए. सी) डिझेल | २००० | **३२००** | २६०० | २६०० | ८ | १६ | १८ | १७ | ३५ | २०० | २०० | १७५ |
| ४ | जे.सी.बी. प्रतितास | ५०० | **दर नाही** | २५०० | २४०० | ७० | दर नाही | — | दर नाही | ७० | दर नाही | — | दर नाही |

सदर में. मोहिनीराज ट्रॅव्हल्स ॲण्ड ट्रान्सपोर्ट यांनी वाटाघाटी दरम्यान १) अ) नियीमत कार्यालर्यात कामाकरीता वाहनाचा दर प्रती दिवस ४०कि.मी. साठी महिना १२५० कि.मी. ८ तासासाठी कोणतेही दर कमी करण्यास असमर्थ दर्शविली आहे.

ब) आपत्कालीन परिस्थिती, खासदार दौरा, पल्स पोलियो, व इतर महत्वाच्या कामासाठी वाहनाचा दर प्रती दिवस ४०कि.मी. साठी महिना १२५० कि.मी. ८ तासासाठी दरामध्ये अनुक्रमाक १,२,३ मध्ये कोणतेही दर कमी करण्यास असमर्थ दर्शविली आहे,पण अनुक्रमक ४ मध्ये १००रू दर कमी करण्यात आला आहे.

२) अ) नियीमत कार्यालर्यात कामाकरीता ब) आपत्कालीन परिस्थिती, खासदार दौरा, पल्स पोलियो, व इतर महत्वाच्या कामासाठी जादा कि.मी.चा दर प्रती दिवस ४० कि.मी. नंतर/महिना १२५० कि.मी यामध्ये दरामध्ये १ रू दर कमी करण्यात आला आहे.

३) अ) नियीमत कार्यालर्यात कामाकरीता जादा तासाचा दर ८ तासानंतर. प्रती तास यामध्ये अनुक्रमे १,२,३,५ प्राप्त दरामध्ये १० रू तर अ.क्र. ४ मध्ये २५ रू कमी केले आहे.तसेच ब) आपत्कालीन परिस्थिती, खासदार दौरा, पल्स

पोलियो, व इतर महत्वाच्या कामासाठी अनुक्रमे १,२ मध्ये १०रू कमी केले आहे. तर अनुक्रमे ३ मध्ये २५ रू कमी केले आहे. तरी उपरोक्त वाटाघाटी अती प्राप्त दर शासनाच्या दरापेक्षा कमी व वाजवी आहेत.

त्या अनुषंगाने मे. मोहिनीराज ट्रॅव्हल्स ॲण्ड ट्रान्सपोर्ट यांचा प्राप्त दरानुसार पुढील कारवाई करीता मा. स्थायी समिती समोर निर्णयास्तव सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ६९ दिनांकः— ३/९/२०१६

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिकेत कार्यालयीन कामकाजासाठी सलग ५ वर्षासाठी कार,व्हॅन,सुमो वाहन वाहनचालकासह भाडेतत्वावर पुरविणेकामी मे. मोहिनीराज ट्रॅव्हल्स ॲण्ड ट्रान्सपोर्ट यांच्या प्राप्त दराच्या निविदेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. १५ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १५ :—** डेंग्यु व मलेरिया आदी रोगांवर प्रतिबंधात्मक कार्यवाही आवश्यक अळीनाशके / डासनाशके खरेदीसाठी न्युनत्तम दर सादर करणारे मे. रविराज केमीकल्स, डोंबिवली व मे. श्रीराम ॲग्रो, अमरावती यांच्याशी संविदा करण्यास मान्यता देणे.

---

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—यास उशिर का झाला.

डॉ. राजा रिजवानी, वैद्यकीय आरोग्य अधिकारी :—सभापती महोदय, उशिर नाही झाला, १५ दिवसात प्रक्रिया सुरु करु. १५—२० दिवस लागतील.

सदस्या श्रीमती अंजली साळवे:—प्रतिबंधात्मक कार्यवाही करतो का आपण? झाल्यानंतर करतो? डेंग्युच्याबाबत जागृतता नाही ठेवत ना, झाल्यानंतर मग येते. विलंब लागला आहे.

यावेळी सदस्य श्री. विजय पाटील सभागृहातुन बाहेर गेले. 

डॉ. राजा रिजवानी, वैद्यकीय आरोग्य अधिकारी :—जो युनिट आहे मी श्री. केणी व श्री. पवार यांना आदेश दिले आहेत, काम सुरु आहे.

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—आता सुरु आहे ना. जर ही ऑर्डर इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता लवकरात लवकर देत आहोत तर मग किती दिवसात येणार?

डॉ. राजा रिजवानी, वैद्यकीय आरोग्य अधिकारी :—१५—२० दिवस लागतील.१५—२० दिवस जुना स्टॉक आहे.

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—१५—२० दिवस दुसरा स्टॉक आहे ना? नाहीतर त्रासाचे काम होता कामा नये.

सदस्या श्रीमती अंजली साळवे:—फवारणी आणि मलेरिया ऑईलचे आपण मागे डिटेल्स दयायला सांगितले होते. कोणीच देत नाही.

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—श्री. केणी कोठे आहे? नाही आले?

सदस्या श्रीमती अंजली साळवे:—साहेब, आपण मागे मागणी केली होती की प्रत्येक नगरसेवकांकडे किती औषधे जातात, याची माहिती आम्हांला दया म्हणुन. कारण नियमित फवारणी कोठे होतच नाही. नियमित फवारणी करतच नाही जोपर्यंत आम्ही पाठपुरावा करत नाही तोपर्यंत. यासाठी आम्ही प्रत्येक महिन्यात त्याची माहिती देण्यास सांगितली आहे. १५—१५, २०—२० दिवस आम्ही जेव्हा बोलणार तेव्हा फवारणी मारणार तोपर्यंत नाही.

श्री. राजा रिजवानी, वैद्यकीय आरोग्य अधिकारी :— डासनाशक औषधे खरेदीसाठी मा. आयुक्त सो यांच्या दि. १५/७/२०१६ रोजीच्या मान्यतेने सदर औषधे खरेदीची निविदा ई—टेंडरींगद्वारे प्रसिध्द करुन जाहिर निविदा सुचना वृत्तपत्रात प्रसिध्दीसह उल्हासनगर महानगरपालीकेच्या वेब साइटवर ई—निविदा सुचना प्रसिध्द करुन E-Tendering निविदा मागविण्यात आल्या होत्या. यामध्ये प्राप्त चार निविदा दिनांक १२/८/२०१६ रोजी सकाळी

११.०० वाजता निविदा समितीचे सदस्य उप–आयुक्त (आरोग्य), मुख्य लेखा परिक्षक, मुख्य लेखा अधिकारी तसेच निविदाधारक व त्यांचे प्रतिनिधि यांचे समोर ई–निविदा संगणक प्रणालीद्वारे उघडण्यात आल्या. त्याप्रमाणे न्युनतम दराच्या निविदाधारकांशी त्यांनी सादर केलेल्या दरांबाबत वाटाघाटीसाठी करण्यासाठी दिनांक २०/०८/२०१६ रोजी दुपारी १२.०० वाजता बोलावून न्युनतम दराच्या निविदाकारांशी निविदा समितीने वाटाघाटी केल्या.

<u>काही सदस्यः—</u>पास, पास..... इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करा.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑ **विषय क्र. १५** :— डेंग्यु व मलेरिया आदी रोगांवर प्रतिबंधात्मक कार्यवाही आवश्यक अळीनाशके / डासनाशके खरेदीसाठी न्युनत्तम दर सादर करणारे मे. रविराज केमीकल्स, डोंबिवली व मे. श्रीराम ॲग्रो, अमरावती यांच्याशी संविदा करण्यास मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

वैद्यकीय आरोग्य विभागास दरवर्षी उल्हासनगर शहराच्या नागरीकांच्या आरोग्याच्या दृष्टीने औषधे खरेदी करणे आवश्यक असते. डासांमुळे डेंगू व मलेरीया आदि आजार होतात. त्यामुळे वेळीच प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यासाठी वेळीच फवारणी व मलेरीया ऑईल स्प्रेडींग करणे आवश्यक असते. त्यानुसार आवश्यक डासनाशक औषधे खरेदीसाठी मा. आयुक्त सो यांच्या दि. १५/७/२०१६ रोजीच्या मान्यतेने सदर औषधे खरेदीची निविदा ई–टेंडरींगद्वारे प्रसिध्द करुन जाहिर निविदा सुचना दैनिक नवभारत, उल्हास विकास व आपल महानगर या वृत्तपत्रात प्रसिध्दीसह उल्हासनगर महानगरपालीकेच्या वेब साइटवर ई–निविदा सुचना प्रसिध्द करुन म. ज्मदकमतपदह निविदा मागविण्यात आल्या होत्या.

यामध्ये प्राप्त चार निविदा दिनांक १२/८/२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता निविदा समितीचे सदस्य उप–आयुक्त (आरोग्य), मुख्य लेखा परिक्षक, मुख्य लेखा अधिकारी तसेच निविदाधारक व त्यांचे प्रतिनिधि यांचे समोर ई–निविदा संगणक प्रणालीद्वारे उघडण्यात आल्या. प्राप्त चार निविदाकारांनी लिफाफा क्र. १ मध्ये आवश्यक कागदपात्रांची पुर्तता केलेली असल्याने त्यांचा निविदेचा दुसरा लिफाफा उघडण्यास निविदा समितीने मान्यता दिली. लगेचच दुपारी २.०० वाजता निविदेचा वित्तिय लिफाफा निविदा समिती अध्यक्ष, सदस्य व निविदाधारक व त्यांचे प्रतिनीधी यांच्या समवेत संगणकाद्वारे उघडण्यात आला. पात्र झालेल्या निविदाकारांकडुन सादर केलेल्या सदर अळीनाशक/डासनाशक औषधे दरपत्रकांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | अळीनाशक/डासनाशक /किटकनाशक औषधांचे नाव | परिमाण | निविदाधारकाचे नाव व त्यांचे प्राप्त दर प्रति नग/किलो/लिटर | | | | अपेक्षित दर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | मे. डॅपमन्स पेस्ट कन्ट्रोल | मे. रविराज केमिकल्स | मे. श्रीराम ॲग्रो एजन्सीज | मे. रमेश ॲग्रो–केम कॉर्पोरेशन | |
| १ | मलेरिया लार्व्हीसाईड ऑईल आय.एस.क्र ५८८/१९७८ | ७००० लिटर | १७०/— | <u>१६८/—</u> | १७६/— | १७२/— | ११७६०००/— |
| २ | पायरेथ्रम ०.५: . मॅलेथऑन १: | ४०० लिटर | २८२०/— | २७९०/— | <u>२४६०/—</u> | २६५०/— | ९८४०००/— |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | टेमेफॉस ५०५: इ.सी. आय.एस.क्र. ८४९८/१९७२<br><br>CIB Registered, WHO Approved | ५०० लिटर | १९९२/— | <u>१८८९/—</u> | १९०५/— | १८९५/— | ९४४५००/— |
| ४ | डेल्टामेथ्रीन १.२५५: यु.एल.व्ही.आय.एस.क्र १५२२७/२००२<br><br>CIB Registered, WHO Approved | ५०० लिटर | २०५०/— | <u>१९९९/—</u> | २०४९/— | २०९५/— | ९९९५००/— |
| ५ | लॅबडा सायहैलोथ्रीन १०: डब्ल्यु.पी.आय.एस. क्र १४५१०/१९९७<br><br>CIB Registered, WHO Approved | ३०० किलो | ४३५०/— | ४२६०/— | <u>३६१०/—</u> | ३८४०/— | १०८३०००/— |
| ६ | सॅफीनोथ्रील ५: इ.सी. आ.एस.क्र. ८४९८/१९७२<br><br>CIB Registered, WHO Approved | २०० लिटर | —— | —— | —— | —— | —— |
| ७ | करनिम EC | २०० लिटर | १९५०/— | १८५०/— | <u>१५२१/—</u> | १५५२/— | ३०४२००/— |
| | एकूण अपेक्षित खर्च रुपये | | | | | | ५४९१२००/— |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्यानुसार अ.क्र. १,३ व ४ या करीता मे. रविराज केमिकल्स, डोंबिवली यांनी सर्वात कमी दर सादर केलेले आहेत. तर अ. क्र. २,५ व ७ साठी मे. श्रीराम ॲग्रो, मोर्शी, अमरावती यांनी सर्वात कमी दर सादर कलेले आहेत आणि अ.क्र. ६ साठी कोणत्याही निविदाकाराने दर सादर केलेले नाहीत. तरी निविदा समिती यांच्या निर्देशानुसार वरील प्रमाणे न्युनतम दराच्या निविदाधारकांशी त्यांनी सादर केलेल्या दरांबाबत वाटाघाटीसाठी करण्यासाठी दिनांक २०/०८/२०१६ रोजी दुपारी १२.०० वाजता बोलावून न्युनतम दराच्या निविदाकारांशी निविदा समितीने वाटाघाटी केल्या. वाटाघाटी अंती प्राप्त दरांचा तक्ता खालीप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | औषधांचे नांव व त्यांचा तपशील | परिमाण | न्युनतम निविदाधारकाचे नाव व त्यांचे प्राप्त दर प्रति नग/किलो/लिटर | | मागील दर (सन २०१५—१६ | वाटाघाटी अंती प्राप्त दर | अपेक्षीत खर्च रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | मे. रविराज केमिकल्स | मे. श्रीराम ॲग्रो | | | |
| १ | मलेरिया लार्व्हीसाईड ऑईल आय.एस.क्र ५८८/१९७८ | ७००० लिटर | <u>१६८/—</u> | | १४० | १५१ | १०५७००० |
| २ | पायरेथ्रम ०.५:. मॅलेथऑन १: | ४०० लिटर | | <u>२४६०/—</u> | —— | २३९० | ९५६००० |
| ३ | टेमेफॉस ५०५: इ.सी. आय. एस.क्र. ८४९८/१९७२<br>CIB Registered, WHO Approved | ५०० लिटर | <u>१८८९/—</u> | | १४९८ | १६०० | ८००००० |
| ४ | डेल्टामेथ्रीन १.२५५: यु.एल. व्ही.आय.एस.क्र | ५०० | <u>१९९९/—</u> | | १५८० | १६४५ | ८२२५०० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | १५२२७/२००२<br>CIB Registered, WHO Approved | लिटर | | | | | |
| ५ | लॅबडा सायहैलोथ्रीन १०: डब्ल्यु.पी.आय.एस.क्र १४५१०/१९९७<br>CIB Registered, WHO Approved | ३०० किलो | | <u>३६१०/—</u> | ३४०० | ३५५० | १०६५००० |
| ७ | करनिम EC | २०० लिटर | | <u>१५२१/—</u> | १४५० | १४६५ | २९३००० |

वाटाघाटी अंती प्राप्त दरानुसार उक्त नमुद केलेली अळीनाशक/डासनाशके त्यांच्या समोर दर्शविलेल्या परीमाणा नुसार खरेदीकरीता रू ४९९३५००/— (रुपये एकोणपन्नास लाख सत्त्याऐंशी हजार मात्र) खर्च अपेक्षित आहे. प्राप्त दर वाजवी आहेत. सदरचा खर्च सन २०१६—१७ च्या अर्थिक अंदाजपत्रकामध्ये हिवताप व डेंग्यु प्रतिबंधक खर्च यात रुपये ५०,००,०००/— तरतूद करण्यात आली आहे पैकी पुर्ण तरतूद शिल्लक आहे त्यातून करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. तरी सदरच्या खर्चास व तसेच उक्त औषधांसाठी बाब निहाय न्युनतम दर सादर करणा—या निविदाकार मे. रविराज केमिकल्स, डोंबिवली व मे. श्रीराम ॲग्रो, अमरावती यांच्याशी संविदा करण्याकरीता मा. स्थायी समितीची मान्यता आवश्यक आहे. करिता सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३ (क) अन्वये मान्यतेसाठी सविनय सादर.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> ७० <u>दिनांकः—३/९/२०१६</u>

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार डेंग्यु व मलेरिया आदी रोगांवर प्रतिबंधात्मक कार्यवाही आवश्यक अळीनाशके / डासनाशके खरेदीसाठी न्युनत्तम दर सादर करणारे मे. रविराज केमीकल्स, डोंबिवली व मे. श्रीराम ॲग्रो, अमरावती यांच्याशी संविदा करण्यास मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची <u>सही/—</u>

अनुमोदकाची <u>सही/—</u>

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. १६ वाचुन दाखवितात

————————————————————————————————————————

⇨ विषय क्र. १६ :—<u>प्रस्तावाची सूचना</u>

सन्माननिय पदाधिकारी/वरिष्ठ अधिकारी कार्यालयातील वर्ग—३ चे कर्मचा—यांना अतिकालीन भत्ता अदा करणेकामी मा. सभापती, स्थायी समिती श्री. सुनिल सुर्वे यांचा यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

---

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>सदरचा विषय इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करावा.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>नाही, नाही, हा जो विषय मांडला तो असा आहे की यामध्ये आपण सर्व विभाग घेतले परंतु माझ्या मते नंतर माहिती काढल्यानंतर असे लक्षात आले की बायोमॅट्रीक जे आहे ते करणे गरजेचे आहे. आणि शासनाच्या मान्यतेच्या अधिन राहुन दिले तर बरे होईल.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>याबाबत लेखा विभागाकडुन खुलासा केला जावा, हा अशासकिय प्रस्ताव आलेला आहे.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>मागच्या वेळेस आम्ही विचारणा केली तर आम्हांला असे समजले आमचे जे भत्ते आहे त्यात १०० रुपये आम्हांला जास्त मिळाल्यामुळे लेखा विभागाकडुन आक्षेप आलेला आहे. त्यामुळे कायदेशीर काय आहे ते पहा, असे देता येणार नाही. शासनाची मान्यता घेतली तर बरे होईल.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>हा अशासकिय प्रस्ताव म्हणुन स्थायी समितीत आलेला आहे महासभेत आलेला नाही आणि दुसरे म्हणजे हा भत्ता दिल्याने किती लोड वाढेल काय आम्ही असे पारीत करु शकतो काय की शासनाच्या अखत्यारीत येते?

<u>सभापती श्री सुनिल सुर्वे:—</u>शासनाची मान्यता लागणार काय याला?

<u>श्री. सुखदेव बलमे, मुख्य लेखा परिक्षक :—</u>शासनाच्या मान्यतेशिवाय देता येणार नाही.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>मग वगळा हा विषय.

<u>महापालिका सचिव :—</u>वगळता नाही येणार, परत हा विषय येईल.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>आताच आक्षेप आला आहे की नगरसेवकांच्या पगारातुन १०० रुपये वसुली करा म्हणुन. शासनाने नगरसेवकांची वसुली करायला सांगितली आहे.

<u>महापालिका सचिव :–</u>नगरसेवकांना १०० वरुन २०० रुपये भत्ता जो केला होता त्याबाबत ए.जी. कडुन आक्षेप आलेला आहे की शासनाची मान्यता न घेता दिला आहे वसुली रक्कम दिली आहे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>जी वसुली करणार आपण ती कशी करणार पगारातुनच कपात करा ना.

<u>महापालिका सचिव :–</u>हो, ते सर्वांशी बोलुन मग कपात केली जाईल.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u>आमदार, खासदार यांना वाढवा, जेवढे पाहिजे तेवढे.

<u>श्री. सुखदेव बलमे, मुख्य लेखा परिक्षक :–</u>जो पगार दिला जातो त्यातुन कपात करु, चालेल आम्हांला.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>किती महिन्यापासुन दिले आपण.

<u>महापालिका सचिव :–</u>मागील दोन–तीन महिन्यापासुन १०० रुपये भत्ताच देण्यात येत आहे. यापुर्वी २०१३ पासुन भत्ता वाढ देण्यात आली आहे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>तर मग ३६०० हे ७२०० मधुन कपात करुन टाका ना, लवकरात लवकर.

<u>काही सदस्य :–</u>या विषयास मान्यता देवु नका, अमान्य करा.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑विषय क्र. १६ :– <u>प्रस्तावाची सूचना</u>

सन्माननिय पदाधिकारी/वरिष्ठ अधिकारी कार्यालयातील वर्ग–३ चे कर्मचा–यांना अतिकालीन भत्ता अदा करणेकामी मा. सभापती, स्थायी समिती श्री. सुनिल सुर्वे यांचा यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिकेच्या मा. महापौर तथा शहराच्या प्रथम नागरिक, उप–महापौर, स्थायी समिती सभापती, मा. आयुक्त, मा. अतिरिक्त आयुक्त, मा. सभागृह नेता, विरोधी पक्ष नेता, सर्व गटनेता, महापालिका सचिव, मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक, सर्व उप आयुक्त यांचेकडे कार्यरत असलेल्या वर्ग–३च्या कर्मचा–यांनामहासभा/स्थायी समिती/विविध विभागाच्या आढावा बैठका, शासनाकडे तातडीने सादर करावयाच्या निविदा प्रस्ताव/पत्रव्यवहार इत्यादी कामी कार्यालयीन कामकाजाच्या वेळेअगोदर (सकाळी लवकर) किंवा कार्यालयीन कामकाजाच्या वेळेनंतर (सकाळी उशिरा पर्यंत) थांबवून काम करुन घेतले जाते. क्वचित प्रसंगी सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी बोलावून काम करुन घेतले जाते. त्यामुळे वेळ तालीकेची अडचण निर्माण न

करता वर्ग–३ च्या कर्मचा–यांना मोबदला म्हणुन रु. २०००/– (रु. दोन हजार) सरसकट अतिकालीन भत्ता देणे कामीचा प्रस्ताव स्थायी समितीपुढे मंजुरीस्तव प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. ७१ दिनांक:– ३/९/२०१६

सुचकाचे नाव :– श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार सन्माननिय पदाधिकारी/वरिष्ठ अधिकारी कार्यालयातील वर्ग–३ चे कर्मचा–यांना अतिकालीन भत्ता अदा करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देत नाही.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–पुढील वेळेस पहा की अधिकारी लवकरात लवकर सभेस उपस्थित असले पाहिजेत. ज्याचा विषय आहे तो तरी पाहिजे. हे महत्वाचे आहे त्यामध्ये.

श्रीमती विजया कंठे, उप–आयुक्त, मुख्यालय :–त्याची दक्षता मी घेईल.

सांयकाळी ५.२५ वाजंता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती श्री. सुनिल सुर्वे यांनी जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी )

प्र. महापालिका सचिव

उल्हासनगर महानगरपालिका

.

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:– २९/०९/२०१६

दि. २९/०९/२०१६ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

९

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा गुरुवार दिनांक २९/९/२०१६ रोजी सायं. ४.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे | सभापती |
| २ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर | सदस्य |
| ३ | श्री. गुरुनो भिकोमल वलेचा | सदस्य |
| ४ | श्री. जमनादास पुरस्वानी | सदस्य |
| ५ | श्रीमती अंजली साळवे | सदस्या |
| ६ | श्री. विजय चाहु पाटील | सदस्य |
| ७ | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | सदस्या |
| ८ | श्रीमती इंदिरा उदासी | सदस्या |
| ९ | श्रीमती पुष्पाताई नाना बागुल | सदस्या |
| १० | डॉ. निना प्रकाश नाथानी | सदस्या |
| ११ | श्रीमती वंदना पाटील उर्फ वंदना युवराज भदाणे | सदस्या |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्रीमती जया प्रकाश माखिजा २. श्रीमती लिलाबाई आशान ३. श्री. उमेश सुरेश कालानी ४. श्रीमती आशा जिवन इदनानी ५. श्रीमती रेखा अशोक ठाकुर

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१६३. श्री. राजेंद्र निंबाळकर, आयुक्त
१६४. श्रीम. विजया कंठे, उप–आयुक्त (मुख्यालय)
१६५. श्रीम. प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
१६६. श्री. जमीर लेंगरेकर, उप–आयुक्त
१६७. श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी
१६८. श्री. सुखदेव बलमे, मुख्य लेखा परिक्षक
१६९. श्री. राम जयस्वार, शहर अभियंता
१७०. श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा
१७१. डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी

१७२.	श्री. महेंद्र धिंडे, कनिष्ठ अभियंता, विदयुत विभाग
१७३.	श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
१७४.	श्री. शैलेश दोंदे, उप करनिर्धारक व संकलक
१७५.	श्री. गणेश शिंपी, प्रभाग अधिकारी, प्र.स.क्र.४
१७६.	श्री. अजित गोवारी, प्रभाग अधिकारी, प्र.स.क्र.२
१७७.	श्री. भास्कर मिरपगार, प्र. अग्निशमन अधिकारी
१७८.	श्री. बाळु नेटके, प्र. सुरक्षा अधिकारी
१७९.	श्रीम. छाया डांगळे, प्र. सहा. आयुक्त (विधी)
१८०.	श्री. विनोद केणे, प्र. स्वच्छता निरिक्षक

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.
१. श्रीमती विशाखा सावंत
२. श्रीमती नर्गिस खान

**श्री. जमीर लेंगरेकर, उप.आयुक्त हे आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ होते.**

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u> आपल्या महानगरपालिकेत श्री. राजेंद्र निंबाळकर, (भा.प्र.से.) नव्याने रूजू झाले आहेत. ते आल्यानंतर स्थायी समितीची हि पहिलीच सभा आहे, त्यामुळे आम्ही स्थायी समितीमध्ये त्यांचे स्वागत करीत आहोत.

**यावेळी मा.आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर यांनी सभागृहात प्रवेश केला व आपल्या स्थानी आसनस्थ झाले.**

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—</u> इथली काय परिस्थिती आहे. प्रत्येक सभेला आयुक्त यांनी उपस्थित रहायचे असते किंवा कसे? महत्वाचे काही विषय असतील तर मी उपस्थित राहीनच. परंतु उद्या निवडणूक आरक्षण सोडतीचा कार्यक्रम असल्याने मला आज त्याची रंगीत तालीम घ्यायची आहे. त्याकामात मी व्यस्त आहे.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u> आज आम्ही सभा चालवतो, सदस्यांचे बरेचसे प्रश्न आहेत, परंतु थोडक्यात तुम्हांला सगळयांचा भावना सांगतो. अडचण अशी आहे कि, आपल्या कुठल्या अधिका—यांकडे संचिका गेली तर त्यावर वेळेत कार्यवाही होत नाही. टेंडर प्रक्रीया पार पाडणा—या कर्मचा—यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—</u> मी आजच सभा घेतली, वेळेत कामाचा निपटारा, संचिका प्रलंबित न ठेवणे, कार्यालयात वेळेवर उपस्थित राहणे याबाबत मी सर्व विभागप्रमुख यांना निर्देश दिले आहेत. आपणांस लगेच परिणाम दिसू लागेल. दिनांक २ ऑक्टोंबर २०१६ रोजी आपले शहर हागणदारी मुक्त करण्याचा निर्धारदिन साजरा करावयाचा आहे. अनधिकृत बांधकामाला आळा, कल्याण अंबरनाथ रस्ता, इत्यादी विषय महत्वाचे आहेत. तरी स्वच्छ भारत अभियानातंर्गत २ ऑक्टोंबर २०१६ रोजी निर्धारदिनानिमित्त सर्वांनी उल्हासनगर रेल्वे स्टेशन (पश्चिम) येथे उपस्थित रहावे.

**यावेळी मा. आयुक्त श्री. राजेंद्र निंबाळकर हे सभागृहातुन बाहेर गेले व उप—आयुक्त, मुख्यालय श्रीमती विजया कंठे हया सभागृहातुन बाहेर गेल्या.**

श्री. जमीर लेंगरेकर, उप.आयुक्त हे आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ होते.

सायं. ४.३० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. १ :—** महापालिका आवारातील चहा कॅन्टीन भाडेने चालविण्याकरिता निविदाकार मे. शुभम कन्स्ट्रक्शन, यांनी प्रस्तावित केलेले दर महापालिकेने प्रस्तावित केलेल्या दरापेक्षा कमी असल्याने याबाबत निर्णय घेणे.

---

**सदस्या, श्रीम. अंजली साळवे :—** मागे असा विषय झाला होता की, महानगरपालिकेतील ठराविक कामे हि बचतगटांमार्फत करण्यात यावीत. मग हे काम आपण बचतगटांना का नाही देत. त्यांनीसुध्दा मागणी केली होती ना.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भूल्लर :—** सदर कामाची निविदा प्रकीया केली होती. त्यामध्ये एकच निविदाकाराने निविदा भरली होती. निविदेला मुदतवाढ दिल्यानंतर कोणीही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे सदर निविदाकारास सदर काम देण्याचे प्रस्तावित करण्यात आले.

**सदस्या, श्रीम. अंजली साळवे :—** बचतगटातील महिला इतक्या शिकलेल्या नाहीत, मी म्हणेन कि सदरचे काम बचतगटांनाच देण्यात यावे. मला हा प्रस्ताव मान्य नाही. बचतगटांना सक्षम करण्याचे काम पालिका नाही करणार मग कोण करणार? सदर कामाची पुन्हा निविदा प्रक्रीया करा आणि कोणी भरले नाही तर मग यांना दया. लेंगरेकर साहेब, तुम्ही सांगा ना बचतगटांना हे काम देता येत नाही का?

**उप.आयुक्त आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी, श्री.जमीर लेंगरेकर :—** सन्मा. सभागृहाने यात निर्णय घ्यायचा आहे.

**सदस्या, श्रीम. अंजली साळवे :—** आज सभागृहात आपण इतक्या महिला आहोत, पालिकेतील कामे बचतगटांनाच मिळाली पाहिजेत. महिलांचे सक्षमीकरण करणार नाहीत तर काय करणार,

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भूल्लर :—** महापालिका जागा उपलब्ध करून देणार आहे, तेथे कॅन्टीन बांधून चालवायचे आहे.

**सदस्या, श्रीम. अंजली साळवे :—** यात आपण मागेच चर्चा केली होती ना, बचतगटांना दयायचे झाल्यास आपण काही अटी शिथील करू म्हणुन आणि नेहमी आपण मे. शुभम कन्स्ट्रक्शनलाच का कामे देतो, नाल्याची कामेपण यालाच आणि आता हे कामसुध्दा यालाच, दुसरे कोणी भरतच नाहीत का?

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भूल्लर :—** आता निविदा प्रक्रीया पुर्ण करून प्रस्ताव मान्यतेसाठी आलेला आहे. आता ते शक्य नाही.

**सदस्या, श्रीम. अंजली साळवे :—** नाही, आपली आधीच चर्चा झाली होती तरीसुध्दा आपण बचतगटांना हे काम देत नाही, मला हे मान्य नाही, यासाठी सर्व बचतगटांना मागणीपत्र दिले होते, तरीसुध्दा त्यांचा विचार झाला नाही, मी सर्व बचतगटांच्या महिलाकरवी आंदोलन करेन. कारण आतापर्यंत एकसुध्दा काम आपण बचतगटांना दिलेले नाही. मागच्याचवर्षी आपण मालमत्ता करवसुलीचे देयकाचे वाटपाचे काम बचतगटांना देण्याचे म्हटले होते परंतु तेदेखील झालेले नाही, फक्त एकच प्रभागाचे काम दिले आहे. अशात—हेने बचतगटांना कामे मिळाली नाहीत तर बचतगट बंद होतील. तुम्ही विचार करा किती बचतगट होते आणि आता किती बचतगट राहिले आहेत, माझा याला विरोध आहे.

<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भूल्लर :— </u>सदर काम मे. शुभम कन्स्ट्रक्शन यांनाच देण्यात यावे.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:— </u>हा जो प्रस्ताव आणला आहे यामध्ये सविस्तर माहिती नाही, तो काय खर्च करणार, तो काय बनवणार आहे, कसा बनवणार आहे.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :— </u>आपण जे कामाची निविदा काढली आहे ते रू.४३,०००/— मासिक भाडे रक्कमेचे, आणि निविदाकाराने रू. २०,२००/— इतके भाडेदर भरले आहेत. आणि यामध्ये चहा कॅन्टीन बनवण्याचा खर्च आपण ठेकेदारावर निश्चित केला आहे. तो ठेकेदार बनवण्यासाठी किती खर्च करणार आहे, १ लाख, १० लाख, २० लाख किती करणार आहे याची सविस्तर माहिती यात नाही.

<u>सदस्या, श्रीम. अंजली साळवे :— </u>बनवण्याचे काही दिलेच नाही यात.

<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भूल्लर :— </u>जो हे काम घेणार आहे त्यानेच ते बनवायचे आहे.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :— </u>जे चहा कॅन्टीन बनविण्यात येणार आहे त्याचे काही नियोजन केलेले आहे का? काही आराखडा आहे का?

<u>मालमत्ता व्यवस्थापक, श्रीम. विशाखा सावंत :— </u>नाही, तसा काही आराखडा तयार केलेला नाही.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :— </u>आराखडा तयार केलेला नाही तर बनवणार काय तो. किती खर्च करणारा, कॅन्टीनची लॉबी किती असेल, कॅन्टीन किती भव्य असेल, कशी असेल चांगली असेल,

<u>सदस्या, श्रीम. अंजली साळवे :— </u>बनवण्याचे काही दिलेच नाही.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :— </u>हि निविदा कोणत्या विभागाने तयार केली आहे. जरा संबंधित विभागाने खुलासा करावा.

<u>मालमत्ता व्यवस्थापक, श्रीम. विशाखा सावंत :— </u>मालमत्ता विभागाने निविदा तयार केली आहे.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :— </u>जरा या विषयाचा खुलासा करावा, यात काहीच माहिती नाही, तो किती जागेत कॅन्टीन बनवणार आहे, त्याचा आराखडा काय आहे. ग्राऊंड प्लस वन बनवणार आहे किंवा ग्राऊंड प्लस टू बनवणार आहे, कि फक्त ग्राऊंड बनवणार आहे किंवा नाहीतर उद्या ५ बाय २ चे झोपडे तयार करून सोडेल तर याबाबत.....

<u>सदस्या, श्रीम. अंजली साळवे :— </u>काहीच माहिती दिलेली नाही, बचतगटांना बनवून चालविण्यास दयायला काहीच हरकत नाही.

<u>मालमत्ता व्यवस्थापक, श्रीम. विशाखा सावंत :— </u>मालमत्ता

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:— </u>चहा कॅन्टीनचे बांधकाम होणार आहे ते सार्व. बांधकाम विभागाच्या अखत्यारीत होणार आहे कि नगररचना विभागाच्या.

<u>मालमत्ता व्यवस्थापक, श्रीम. विशाखा सावंत :— </u>सार्व. बांधकाम विभागाच्या अधिपत्याखाली होईल.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:— </u>५५ चौ.मी. जागेत कशाप्रकारे कॅन्टीन बांधण्यात येईल. त्या भिंतीला लागून कोणता विभाग आहे का? बांधकाम करणार आहे ते आर सी सी करणार आहे किंवा कसे?

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :— </u>निविदेमध्ये त्रुटी आहेत. कॅन्टीनचे बांधकाम ग्राऊंड प्लस वन बनवणार आहे किंवा ग्राऊंड प्लस टू बनवणार आहे, कि फक्त ग्राऊंड बनवणार आहे, बसणा—यांची सोय काय इत्यादी काहीच माहिती निविदेत नाही.

<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भूल्लर :— </u>ठेकेदार बनवणार, तीन वर्षांनी तो तयार बांधकाम परत करणार. सदर विषयाचा ठराव पारीत करण्यात यावा. सदरचा ठराव इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात यावा.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u> सदर बांधकामाचे डिझाईनला सार्व. बांधकाम विभागाची मंजूरी घ्यावी.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :— </u>ठरावात अटी टाका. यामध्ये नुकसान आहे. ५५ चौ. मी मध्ये बांधकाम करायचे आहे. ठेकेदाराने ३ वर्षाने परत कायचे आहे.

<u>सदस्या, श्रीम. अंजली साळवे :— </u>या प्रस्तावाला माझा विरोध आहे.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>सचिव महोदया, सदर विषयात मतदान घ्या.

<u>महापालिका सचिव :—</u> जे प्रस्तावाच्या बाजूने आहेत त्यांनी आपला हात वर करावा.

१. श्री. सुनिल सुर्वे
२. श्री. जमनादास पुरस्वानी
३. श्री. राजेंद्रसिंह भुल्लर
४. डॉ. निना नाथानी
५. श्रीम. इंदिरा उदासी
६. श्रीम. वंदना भदाणे
७. श्रीम. पुष्पाताई बागुल
८. श्री. गुरूनो वलेचा
९. श्री. विजय पाटील
१०.श्रीम. लक्ष्मी सिंग

जे प्रस्तावाच्या विरोधात आहेत त्यांनी आपला हात वर करावा.

१. श्रीम. अंजली साळवे

सदर विषय बहुमताने पारीत करण्यात येत आहे.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>सदर विषयाच्या ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करण्यात यावी.

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u> सदरचा विषयाबाबत बहुमताने पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १ :—** महापालिका आवारातील चहा कॅन्टीन भाडेने चालविण्याकरिता निविदाकार मे. शुभम कन्स्ट्रक्शन, यांनी प्रस्तावित केलेले दर महापालिकेने प्रस्तावित केलेल्या दरापेक्षा कमी असल्याने याबाबत निर्णय घेणे.

<u>प्रस्तावना</u>

महापालिका मुख्यालयात निविदा पध्दतीने चहा कॅन्टीन भाडेने चालविणेकामी निविदा मागविण्यास मान्यता मिळणेसाठी मा. महासभेसमोर प्रस्ताव सादर करण्यात आला होता. मा. महासभा ठराव क्र. १७, दि. ०२/०७/२०१५ अन्वये मान्यता दिल्यानुसार महापालिका आवारातील चहा कॅन्टीन भाडेने चालविण्याकरिता निविदा मागविण्यात आलेली होती.

महापालिका आवारातील चहा कॅन्टीन भाडेने चालविण्यास देणेबाबत निविदा ई निविदा पध्दतीने संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आल्यानंतर सदर निविदेस चार वेळा मुदतवाढ देण्यात आली होती. तथापी सदर निविदेस प्रतिसाद म्हणुन फक्त एकाच निविदाकाराने निविदा सादर केली आहे.

निविदेस चार वेळा मुदतवाढ देऊन देखिल एकच निविदा प्राप्त झाल्याने सदरची निविदा उघडण्यात आली असता मे. शुभम कन्स्ट्रक्शन, उल्हासनगर या निविदाकाराने निविदा भरलेली आहे.

सदरहु निविदा मागविताना उपहार गृहाच्या जागेचे किमान मासिक भाडे रक्कम रूपये ४३,०००/— एवढे निश्चित करण्यात आले होते. परंतु मे. शुभम कन्स्ट्रक्शन यांनी निविदा भरताना उपहार गृहाच्या जागेचे भाडे रूपये २०,२००/— एवढी रक्कम प्रस्तावित केलेली आहे.

महापालिकेने प्रस्तावित केलेले उपहार गृहाच्या जागेचे किमान मासिक भाडे व मे. शुभम कन्स्ट्रक्शन यांनी प्रस्तावित केलेले दर हे महापालिकेने प्रस्तावित केलेल्या दरापेक्षा कमी असल्याने मे.शुभम कन्स्ट्रक्शन यांना वाटाघाटासाठी बोलावुन दर वाढवून मिळणेसाठी कळविण्यात आले होते.

मे. शुभम कन्स्ट्रक्शन यांनी त्यांचेकडील दि. ०४/०८/२०१६ रोजीच्या पत्रान्वये सदर जागेवर कॅन्टीन अस्तित्वात नाही. सदर ठिकाणी कर्मचाऱ्यांकरिता सुयोग्य असे कॅन्टीन असल्यास त्याचे भाडे रू. ४३,०००/— एवढी आकारणी ठिक होती. परंतू सदर जागेवर कॅन्टीनच नसल्याने याबाबत मी भरलेले भाडेदर योग्य आहे. याबाबत मी सदर कॅन्टीनचे रू. २१,०००/— एवढे भाडे भरण्यास तयार असल्याचे कळविण्यात आले आहे.

उपरोक्त प्रकरणी महापालिकेने प्रस्तावित केलेले उपहार गृहाच्या जागेचे किमान मासिक भाडे व मे. शुभम कन्स्ट्रक्शन यांनी प्रस्तावित केलेले दर हे महापालिकेने प्रस्तावित केलेल्या दरापेक्षा कमी असल्याने याबाबत निर्णय होणेसाठीचा प्रस्ताव मा. स्थायी समितीपुढे प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र. :—</u> ७२ <u>दिनांक :२९/९/२०१६</u>

सूचकाचे नांव : श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नांव : श्री. विजय चाहू पाटील

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार खालील अटींच्या अधिन राहून महापालिका आवारातील चहा कॅन्टीन भाडेने चालविण्याकरिता निविदाकार मे. शुभम कन्स्ट्रक्शन, यांनी प्रस्तावित केलेले दर महापालिकेने प्रस्तावित केलेल्या दरापेक्षा कमी असल्याने चहा कॅन्टीन रुपये २१०००/— भाडे तत्वावर ३ वर्षाकरीता चालविण्यास मान्यता देत आहे.

१. उपहारगृहाचा बांधण्याचा संपुर्ण खर्च ठेकेदाराने स्वत: करायचा आहे.
२. सार्वजनिक बांधकामाच्या देखरेखीखाली सदर उपहारगृह ''५५'' स्केअर मिटरमध्येच बांधकाम करणे आवश्यक आहे.
३. ठेकेदाराने ३ वर्षानंतर शुन्य किंमतीने ती जागा बांधकामासहीत महापालिकेस परत करावयाची आहे.
४. दरवर्षी १० टक्के भाढेवाढ देणे आवश्यक राहिल.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>बहुमताने</u>

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. २ वाचुन दाखवितात

———————————————————————————————————————

⇨ **विषय क्र. २ :—** उल्हासनगर महानगरपालिका मालमत्तेच्या सुरक्षेच्या दृष्टीने मा.सचिव सुरक्षा रक्षक मंडळ. सानपाडा यांचेद्वारा नियुक्त सुरक्षा रक्षक यांना मुदतवाढ देणेस प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणे.

---

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—**सदर विषयाची सविस्तर माहिती सांगा.

**प्र. सुरक्षा अधिकारी, श्री. बाळू नेटके :—** सुरक्षा विभागामार्फत सुरक्षा रक्षक मिळणे कामी विविध विभागाकडुन महापालिकेच्या मालमत्तेच्या ठिकाणी सुरक्षिततेसाठी सतत मागणी होत असते परंतु सुरक्षा विभागाकडे सुरक्षा रक्षक मागणीपेक्षा कमी असल्याने मा. आयुक्त सो. यांच्या दिनांक ८/१०/२०१३, दिनांक २७/११/२०१४, व दिनांक १३/१०/२०१५ रोजीच्या मान्यतेने तसेच मा. स्थायी समिती ठराव क्रमांक ६३ दिनांक १७/१२/२०१३, ठराव क्रमांक ६६ दिनांक ३०/१२/२०१४, अन्वये व ठराव क्रमांक ५७ दिनांक ०२/१२/२०१५ अन्वये. उल्हासनगर महानगरपालिकेच्या मालमत्तेचे रक्षण करणेसाठी मा. सचिव सुरक्षा रक्षक मंडळ सानपाडा (मुंबई ठाणे जिल्ह्या करिता) यांचे कडील २१ सुरक्षा रक्षक घेण्यात आलेले आहेत त्याची मुदत दिनांक ३० सप्टेंबर २०१६ अखेर संपूष्ठात येणार आहे. शासकिय कार्यालयांना सुरक्षारक्षक नेमायचे असतील तर ते शासन मान्यताप्राप्त मंडळांकडूनच सुरक्षारक्षक नेमायचे आहेत तसा शासननिर्णयच आहे.

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—**शासन निर्णय आहे तर ठिक आहे, आपण त्यांना पगार किती देतो.

**प्र. सुरक्षा अधिकारी, श्री. बाळू नेटके :—** शासनाला ४६.७५ टक्के दराने लेव्ही देणे बंधनकारक आहे. उर्वरित रू. १३०००/— पर्यंत पगार त्यांना मिळतो.

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—**इतर ठिकाणी काही खाजगी सुरक्षारक्षक नेमतात ते कसे काय?

**प्र. सुरक्षा अधिकारी, श्री. बाळू नेटके :—** आपण तसे घेवू शकत नाही. शासननिर्णयानुसार शासनमान्य मंडळांकडूनच सुरक्षारक्षक नेमावे लागतात.

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—**खाजगी संस्थाकडून कमी खर्चात सुरक्षारक्षक मिळू शकतात.

**प्र. सुरक्षा अधिकारी, श्री. बाळू नेटके :—** आपण जे खाजगी ठेकेदारांकडून घेतलेले सुरक्षारक्षक नसून हरकामे आहेत, त्यांचेकडून सर्व प्रकारची कामे करून घेतली जातात.

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—** सुरक्षारक्षक म्हणून काम करून घेवू शकतो का?

**प्र. सुरक्षा अधिकारी, श्री. बाळू नेटके :—** आपण सन २०१० मध्ये एक प्रकरण झाले होते व ते सद्यस्थितीत न्यायालयात प्रलंबित आहे.

**महापालिका सचिव :—** सदर विषय पारीत करण्यात यावा का?

**काही सदस्य:—**पास,पास.......

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. २ :—**उल्हासनगर महानगरपालिका मालमत्तेच्या सुरक्षेच्या दृष्टीने मा.सचिव सुरक्षा रक्षक मंडळ. सानपाडा यांचेद्वारा नियुक्त सुरक्षा रक्षक यांना मुदतवाढ देणेस प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणे.

**प्रस्तावना**

सुरक्षा विभागामार्फत सुरक्षा रक्षक मिळणे कामी विविध विभागाकडुन महापालिकेच्या मालमत्तेच्या ठिकाणी सुरक्षिततेसाठी सतत मागणी होत असते परंतु सुरक्षा विभागाकडे सुरक्षा रक्षक मागणीपेक्षा कमी असल्याने मा. आयुक्त सो. यांच्या दिनांक ८/१०/२०१३, दिनांक २७/११/२०१४, व दिनांक १३/१०/२०१५ रोजीच्या मान्यतेने तसेच मा. स्थायी समिती ठराव क्रमांक ६३ दिनांक १७/१२/२०१३, ठराव क्रमांक ६६ दिनांक ३०/१२/२०१४, अन्वये व ठराव क्रमांक ५७ दिनांक ०२/१२/२०१५ अन्वये. उल्हासनगर महानगरपालिकेच्या मालमत्तेचे रक्षण करणेसाठी मा. सचिव सुरक्षा रक्षक मंडळ सानपाडा (मुंबई ठाणे जिल्ह्या करिता) यांचे कडील २१ सुरक्षा रक्षक घेण्यात आलेले आहेत त्याची मुदत दिनांक ३० सप्टेंबर २०१६ अखेर संपूष्ठात येणार आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडनुक २०१७ जवळ आलेली असुन सुरक्षिततेच्या दृष्टिकोणातुन महापालिका प्रशासकिय भवन, तसेच चार प्रभाग समित्या, इत्यादी ठिकाणी संप, मार्चा, घेराव, धरणे, व आंदोलने या सारखे प्रकार मोठया प्रमाणावर होत असतात. त्याचप्रमाणे अधिका–यांना अंगरक्षक तसेच उल्हासनगर महानगरपालिकेच्या मालमत्तेमध्ये दिवसें दिवस विस्तार होत असल्याकारणाने मालमत्तेच्या संरक्षणासाठी यापूढे सुरक्षा रक्षकाची आवशक्ता लक्षात घेता. महापालिका सुरक्षेच्या दृष्टीने शासनाने स्थापन केलेल्या सुरक्षा रक्षक मंडळाकडुन २१ सुरक्षा रक्षकांना दिनांक ०१ ऑक्टोबर २०१६ पासून ०१ वर्षाची मुदतवाढ देणे कामी प्रस्तावित आहे. करिता प्रती सुरक्षा रक्षकास ०१ महिन्या करीता **१७,९३५.०५/–** तर २१ सुरक्षा रक्षकांना ०१ महिन्यासाठी **३,७६,६३६.०५/–** व २१ सुरक्षा रक्षकांना ०१ वर्षाकरीता ४५,१९,६३३/— येवढा खर्च अपेक्षीत आहे.

मा.सचिव सुरक्षा रक्षक मंडळ सानपाडा (मुंबई ठाणे जिल्ह्याकरिता) यांचे कडुन घेण्यात येणा–या सुरक्षा रक्षकांच्या पगारात दर दोन वर्षानी व इतर भत्यात दर सहा महिन्याने वाढ होत असते. त्याच प्रमाणे मुळ वेतन +विशेष भत्ता/महागाई भत्ता = किमान वेतन, नोंदीत सुरक्षा जवानांचा किमान वेतनावर मुळ वेतन + विशेष भत्ता = किमान वेतन मुख्य मालकाने ४६.७५ टक्के दराने लेव्ही देणे बंधनकारक आहे. त्याच प्रमाणे घर भाडे भत्ता, प्रवास भत्ता व अतिकालीक भत्ता या वर ४.७५ टक्के दराने लेव्ही देणे मुख्य मालकाला बंधनकारक राहिल.

तसेच ज्या विभागामध्ये सुरक्षा रक्षकांना कामगार विमा योजना लागु नाही. अशा मुख्य मालकांनी ४३ टक्के लेव्ही किमान वेतनावर (मुळ वेतन +विशेष भत्ता/महागाई भत्ता = किमान वेतन,) देणे बंधनकारक राहिल.

सबब. मा. सचिव सुरक्षा रक्षक मंडळ सानपाडा (मुंबई ठाणे जिल्ह्याकरिता) यांचे कडील कार्यरत २१ सुरक्षा रक्षकांना एक वर्षा करीता मुदत वाढ देणे आवश्यक आहे. त्यावर येणारा खर्च महापालिका अंदाजपत्रकातील अ. १(२४) आस्थापना रोजंदारी/मानधन इत्यादी या लेखाशिर्षकातील मंजुर तरतुदीतुन करणेसाठी मा. स्थायी समितीच्या प्रशासकिय व वित्तीय मान्यतेस्तव सविनय सादर.

स्थायी समिती ठराव क्र. ७३ — दिनांक:– २९/९/२०१६

सूचकाचे नांव : श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नांव : श्री. विजय चाहू पाटील

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिका मालमत्तेच्या सुरक्षेच्या दृष्टीने मा.सचिव सुरक्षा रक्षक मंडळ. सानपाडा यांचेद्वारा नियुक्त २१ सुरक्षा रक्षक यांना एक वर्षाची मुदतवाढ देणेस प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

---

➡ **विषय क्र. ३ :–** महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत करपात्र मालमत्ता क्र. ५०डीआय'३३८०० (जुना मा. क्र.५०/२००७) ही नोंद रद्द करून मा. स्थायी समितीची मंजूरी मिळेपर्यत थकीत कर आकारणी व पाणीपट्टी बिल (विलंबशास्तीसह) निर्लेखित करणे.

---

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:– यासंदर्भात जरा, यापूर्वी काय कारवाई केली, असेच विषय आले होते, त्याबदद्ल मागील सभांमध्ये माहिती देणेविषयी सांगितले होते. कारवाईबाबत स्थायी समितीच्या प्रत्येक सभेत बहुतांश सदस्यांनी मागणी केली होती. ज्या ज्या चुकीच्या गोष्टी आणल्या आहेत, ज्या ज्यामुळे झाले आहेत त्यांच्यावर तुम्ही काय कारवाई केलीत हे पहिले महासभेपुर्वी आम्हाला माहिती दया. एकतर तुम्ही माहिती देत नाही, मला लक्षात येत नाही आपण याबदद्लची माहिती का देत नाही.

प्र. कर निर्धारक व संकलक, श्री. शैलेश दोंदे :–दोन प्रस्ताव पाठविले होते त्यावर अद्याप निर्णय झालेले नाही.

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:– हे काही उत्तर नाही कि निर्णय झाला नाही. संबंधित विभाग काय बाहेर आहे, महापालिका हदद्ीतच आहे ना. शिक्षण मंडळ कसे तसे काही आहे का? मग ते का होत नाही, आम्ही प्रत्येक वेळेस कारवाईची मागणी करतो, आमचा जो अधिकार आहे, त्या अधिकाराला बाधीत तुम्ही काम करीत आहात.

उप.आयुक्त आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी, श्री.जमीर लेंगरेकर :– संबंधित अधिकारी/कर्मचारी यांची विभागीय चौकशी सामान्य प्रशासन विभागामार्फत सुरू केलेली आहे. नैसर्गिक न्यायतत्वाच्याआधारे संबंधित कर्मचारी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्यात आलेली आहे. माझ्यामते ६ कि ७ ऑक्टोंबरला त्यांच्या दालनांत सुनावणी ठेवली आहे. कार्यालयीन कामकाज पाहता विभागीय चौकशी एका दिवसांत संपणारा विषय नाही, संबंधित विभागातून कर्मचा–यांची अन्य विभागात बदली करण्यात आलेली आहे.

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:– आताच मी आयुक्त साहेबांना सांगितले आहे. एवढया दिवसांपासून हा विषय प्रलंबित आहे. लोकांना आपण न्याय देणार आहे कि नाही, संबंधितांवर कारवाई करणार कि नाही.

उप.आयुक्त आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी, श्री.जमीर लेंगरेकर :– उप–आयुक्त (मु.) म्हणून.............

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:– यात जबाबदार आम्हाला धरणार ना, या लोकांच्या चुका आहेत आणि आम्ही सांगूनसुध्दा कारवाई होत नाही, हि मोठी रक्कम आहे ना, त्याला जे जबाबदार आहेत, आठ–आठ वर्षाची प्रकरणे पडलेली आहेत. महसूलाची बाब आहे, अनधिकृत बांधकाम, निवडणूका इत्यादी बाबी आहेत.

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :–उप–आयुक्त (कर) यांच्यासहीने विषय आणलेला आहे. आम्ही आधीच म्हटलेले आहे.

उप.आयुक्त आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी, श्री.जमीर लेंगरेकर :– तुम्हाला हा अधिकार असल्याने......

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:– म्हणून तर मालमत्ता कर वसुलीचा फुगवटा दिसत आहे.

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :–विषय योग्य आहे. अशाप्रकारचे विषय लवकरात लवकर आणावेत.

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:– कार्यवाही पण अपेक्षित आहेत.

उप.आयुक्त आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी, श्री.जमीर लेंगरेकर :– उप–आयुक्त (मु.) ला आदेश व्हावेत.

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:– नाही, आम्ही आपणाला सांगितले आहे हे तुम्ही त्यांना सांगा.

महापालिका सचिव:– सदर विषय पारीत करण्यात यावा का?

काही सदस्य :—पास—पास……

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ३ :—** महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत करपात्र मालमत्ता क्र. ५०डीआय'३३८०० (जुना मा. क्र. ५०/२००७) ही नोंद रद्द करून मा. स्थायी समितीची मंजूरीमिळेपर्यत थकीत कर आकारणी व पाणीपट्टी बिल (विलंबशास्तीसह) निर्लेखित करणे.

प्रस्तावना

उपरोक्त विषयास अनसुरून सादर करण्यात येते की, श्री. राजेद्रा क्रिष्णाराव मार्कडेय रा. साईक्रीपा सोसायटी. प्लॅट. ६, उल्हासनगर—४. यांनी दि. १७/०५/२०१३ रोजीच्या अर्जान्वये महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत करपात्र मालमत्ता क्र. **५०डीआय०१०८४३१००(जुना मा. क्र.** ५०/१०४८) या एकाच मालमत्तेची मालमत्ता क्र. **५०डीआय०१०९३३८०० (जुना मा. क्र.**५०/२००७) अन्वये झालेली दुबार नोंद रद्द करणेसाठी विनंती केलेली आहे.
१.विषयांकित प्रकरणा संदर्भात कार्यालयीन दफ्तरी नोंदीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | तपशिल | मालमत्ता क्र. ५०/१०४८ **५०डीआय०१०८४३१००** | मालमत्ता क्र. ५०/२००७ **५०डीआय०१०९३३८००** |
|---|---|---|---|
| १. | मिळकतीचे कर भरण्यास जबाबदार असलेल्या व्यक्तीचे नाव व पत्ता | श्री. राजेद्रा क्रिष्णाराव मार्कन्डेय रा. साईक्रीपा सोसायटी. प्लॅट. ६, उल्हासनगर—४ | श्री. होल्डर रा. साई क्रिपा को. ऑ. सोसायटी प्लॅट नं.६, उल्हासनगर—४ |
| २. | मालमत्तेचा पत्ता | साईक्रीपा सोसायटी. प्लॅट. ६, उल्हासनगर—४ | साई क्रिपा को. ऑ. सोसायटी प्लॅट नं.६, उल्हासनगर — ४ |
| ३. | प्रथम कर निर्धारण वर्ष | वर्ष १९८६—८७ | वर्ष १९९१—९२ |
| ४ | क्षेत्रफळ | ४५०. चौ.फु | ५१९. चौ.फु |
| ५ | बांधकाम प्रकार | आर. सी. सी | आर. सी. सी |
| ६ | वापर | निवासी | निवासी |
| ७ | भाडेकरू असल्यास वार्शीक भाडे रक्कम | निरंक | निरंक |
| ८ | प्रथम कर निर्धारणानंतर मालमत्ता कर भरण्यास प्रथमत:जबाबदार व्यक्तींमध्ये बदल झाला असल्यास त्याचा तपशिल (आदेश क्रमांकासह) | निरंक | निरंक |
| ९ | प्रथम कर निर्धारणानंतर वेळोवेळी सुधारीत कर निर्धारण झाली असल्यास त्याबाबतचासविस्तर तपशिल (मालमत्ता क्रमांक/निर्धारण वर्ष) | निरंक | निरंक |
| ९अ | सुधारीत क्षेत्रफळ | निरंक | निरंक. |
| ९ब | सुधारीत बांधकाम प्रकार मिळकतीचा वापर | निरंक | निरंक |
| ९क | सुधारीत वापर | निवासी | निवासी |
| ९ड | भाडेकरू असल्यास वार्षीक भाडे रक्कम | निरंक | निरंक |
| १० | वर्ष १५—१६ अखेर मालमत्ता करापोटी थकीत रक्कम(चालु मागणीसह) | निरंक | ८११४७/— |
| ११ | वर्ष १५—१६ अखेर पाणीपट्टी करापोटी थकीत रक्कम(चालु मागणीसह) | निरंक | ३१३१२/— |

| | | | |
|---|---|---|---|
| १२ | एकुण थकीत रक्कम (चालु मागणीसह) | निरंक | ११२४५९/— +वि.शा. |
| १३ | मालमत्ता कराचा भरणा केला असल्यास त्याचा तपशिल (पावती क्रमांक,दिनांक,रक्कम) | पावती क्र. ३४२६२<br>दि. २६/०६/१५<br>रक्कम रू. ४१९४/— | निरंक |

**तक्रारी अर्जाच्या अनुसंगाने प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली असून त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे,**

| | | |
|---|---|---|
| १ | स्थळ पाहणी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव पदनाम व दिनांक | श्री. डी. एल. मगर<br>दिनांक ३०/०७/२०१५ |
| २ | महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीप्रमाणे दोन्ही मिळकतीकरिता मालमत्ता कर भरण्यास जबाबदार असलेली व्यक्ती म्हणुन असलेल्या नोंदीत समानता आहे काय? नसल्यास मालमत्तानिहाय नोंदीचा तपशिल | नाही. करपात्र व्यक्तीच्या नावात तफावत आहे. |
| ३ | महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीप्रमाणे संदर्भित दोन्ही मिळकतीकरीता पत्त्यात असलेल्या नोंदीत समानता आहे काय? नसल्यास मालमत्तानिहाय नोंदीचा तपशिल | दोन्ही मिळकतीचे पत्त्यात समानता असल्याचे दिसून येते. |
| ४ | दोन्ही मालमत्तेचे क्षेत्रफळ, बांधकाम प्रकार व वापर इ. करपात्र बाबींत समानता आहे काय? | मालमत्ता क्षेत्रफळ,बांधकाम प्रकार, इत्यादीमध्ये फरक आहे. वापरात समानता आहे. |
| ५ | स्थळ पाहणी केली असता सद्यस्थितीत जागेवर एकच मिळकत अस्तित्वात असल्याचे आढळुन आले आहे काय? | होय. मालमत्ता क्र.५०/१०४८<br>**५०डीआय०१०८४३१००** |

३.सद्यस्थितीत जागेवर श्री. राजेद्रा क्रिष्णाराव मार्कन्डेय यांचे नावे असलेली मालमत्ता क्र. **५०डीआय०१०८४३१००** **(जुना मा. क्र. ५०/१०४८)** ही अस्तिवात असून महानरगरपालिका कर आकारणी नोंदवहीप्रमाणे मिळकतीकरिता नमुद कर पात्र बाबी प्रत्यक्ष जागेवर असल्याचे दिसून येत आहे. तसेच संबंधीत प्रभाग क्र. ५० मध्ये मालमत्ता क्र. **५०डीआय०१०९३३८००** **(जुना मा. क्र.५०/२००७)** ही कोठेही अस्तित्वात असल्याचे आढळून येत नाही.

४. श्री. राजेद्रा क्रिष्णाराव मार्कन्डेय यांनी संदर्भित मिळकतीपैकी मालमत्ता क्र.**५०डीआय०१०९३३८००** **(जुना मा. क्र. ५०/२००७)** ही दुबार नोंद रद्व करणेकरीता अर्ज सादर केला आहे. त्याबात नाव हस्तांतरण आदेश युएमसी/टीडी/युनिट ७/६१६/२००९ दि. १७/०४/१०, वर्ष २००१—२००२, च्या प्रती सादर केल्या आहेत. तसेच मालमत्ता क्र.**५०डीआय०१०८४३१००** **(जुना मा. क्र. ५०/१०४८)** ची कर बिल ते नियमित भरत आहेत.

५.उक्त बाबी विचारात घेता महानगरपालिका कर आकारणी नोंदवसहीत करपात्र मालमत्ता क्र. पावती सारद केली तरी महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत करपात्र मालमत्ता क्र.**५०डीआय०१०८४३१००** **(जुना मा. क्र. ५०/१०४८)** या एकाच मालमत्तेची मालमत्ता क्र. **५०डीआय०१०९३३८००** **(जुना मा. क्र.५०/२००७)** ही दुबार नोंद असल्याचे दिसून येत आहे. तसेच मिळकत संदर्भात वर्ष २०१५—१६ अखेर थकीत मालमत्ता कर रक्कम रू. ११२४५९/— + विलंब शास्ती वसुल न होण्याजोगे आहे असे इकडील मत आहे.

६.सबब मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५२ नुसार मालमत्ता क्र. **५०डीआय०१०९३३८००** **(जुना मा. क्र.५०/२००७)** ही नोंद रद्व करून मिळकतीच्या खात्यात वर्ष २०१६—१७ अखेर थकीत कर आकारणी व पाणीपट्टी (बिलंब शास्तीसह) रक्कम रू. १३२७२२/+ विलंब शास्ती. मा स्थायी समितीची मंजूरीमिळेपर्यत थकीत कर आकारणी व पाणीपट्टी बिल (विलंबशास्तीसह) निर्लेखिल करणेस मंजुरीकरीता मा. स्थायी समितीपुढे सादर करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र.** ७४ दिनांकः—२९/९/२०१६

सूचकाचे नांव : श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नांव : श्री. विजय पाटील

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत करपात्र मालमत्ता क्र. ५०डीआय'३३८०० (जुना मा. क्र.५०/२००७) ही नोंद रद्व करून मिळकतीच्या खात्यात वर्ष २०१६—१७ अखेर थकीत कर आकारणी व पाणीपट्टी (बिलंब शास्तीसह) रक्कम रू. १३२७२२/+ विलंब शास्ती निर्लेखित करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्रमांक. ४ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. ४ :—** वाहतूक नियमनासाठी सन २०१६—१७ साठी २५ 'ट्रॅफिक वॉर्डन' चे अर्थसहाय्य मंजुरी मिळणेबाबत.

---

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>** वाहतूक नियमनासाठी ट्रॅफिक वॉर्डनची नियुक्ती वाहतुक विभागाकडून होते परंतु त्यावर होणारा खर्च आपण करत आहोत. वाहतुक विभागाचे वाहतुक पोलिस काम करत नाहीत आणि हे २५ लोकच काम करताना दिसतात. मागच्यावेळेसदेखील हा विषय सभेपुढे आला होता त्यावेळीसुध्दा आम्ही हा विषय कार्यसूचीवरून वगळण्यात आला होता. वाहतुक समस्या सोडविण्याचे काम वाहतूक शाखेचे आहे आणि त्यासाठी खर्च आपली महापालिका का करेल?

**<u>उप.आयुक्त आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी, श्री.जमीर लेंगरेकर :—</u>** महापालिकेचे कर्तव्य आहे नागरिकांच्या सुरक्षिततेच्यादृष्टीने वाहतूक शाखेस सहकार्य करणे आवश्यक आहे. याचा उपयोग नागरिकांनाच होणार आहे.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>** वाहतूक शाखेसाठी नियुक्त करण्यात येणा—या ट्रॅफिक वॉर्डन साठी होणा—या खर्चाची जबाबदारी कधीपर्यंत आपण करायची आहे.

**<u>उप.आयुक्त आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी, श्री.जमीर लेंगरेकर :—</u>** जोपर्यंत महापालिका आहे तोपर्यंत आपणावर हि जबाबदारी राहिल.

**<u>प्र. वाहन व्यवस्थापक, श्री. यशवंत सगळे :—</u>** कल्याण डोंबिवली महानगरपालिकासुध्दा ट्रॅफिक वॉर्डनसाठी खर्च करतात.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>** वाहतूक शाखेतील वाहतूक पोलिस फक्त दंडात्मक कारवाईची कामे करतात, वाहतूक शाखेला ट्रॅफिक वॉर्डनची आवश्यकता आहे. मग त्या वाहतूक शाखेचे एसीपी, डीसीपी यांनी येथे येवून आपल्याला विनंती केली पाहिजे कि नाही.

**<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>** कायदयाची तरतूद आहे का यात?

**<u>उप.आयुक्त आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी, श्री.जमीर लेंगरेकर :—</u>** महानगरपालिकेने करावयाचे घटनात्मक कर्तव्य आहे.

**<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>** असे घटनात्मक खुप विषय आहेत. पण आपण ते आवश्यक समजत नाही.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>** आमच्या सदस्यांना कधी वाहतूक विभागाशी काही काम पडले तर हा विभाग सहकार्य करतो का? एसीपी, वाहतूक विभाग यांनी आपल्याला एकदा तरी येवून निवेदन केले पाहिजे ना.

**<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>** एखादा नागरीक चूकून गाडी नो पार्किंगमध्ये लावतो. तेव्हा हे लोक ऐकत नाहीत. कित्येकवेळा महिला रडतात. तरीदेखील हे लोक ऐकत नाहीत, पोलिसांचा लोगो असलेली गाडी उचलत नाहीत. पुढच्यावेळेस या विभागातील अधिकारी यांना बोलवा त्यानंतरच हा विषय पारीत करण्यात येईल तोपर्यंत सदर विषय वगळण्यात यावा.

**<u>काही सदस्य :—</u>**वगळण्यात यावा.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ४ :—** वाहतूक नियमनासाठी सन २०१६—१७ साठी २५ 'ट्रॅफिक वॉर्डन' चे अर्थसहाय्य मंजुरी मिळणेबाबत.

<u>प्रस्तावना</u>

उपरोक्त विषयान्वये उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रात उल्हासनगर व अंबरनाथ अशी दोन युनिट असुन उल्हासनगर पोलिस स्टेशन मध्यवर्ती पोलिस स्टेशन,हिललाईन पोलिस स्टेशन बदलापुर पूर्व व पश्चिम पोलिस स्टेशन अशी ८ पोलिस ठाण्याची हदद असुन या हद्‍दीतील युनिटमध्ये अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून वाहतूक नियमन तसेच पार्कींग व्यवस्था केली जाते. वरील नमुद युनिटमध्ये नैमत्तीक रजा हक्क रजा, वैद्यकीय रजा, यावर कर्मचारी सोडले जात असल्याने प्रत्येक्षात वाहतुक नियमन व वाहन पार्कींगसाठी कर्मचाऱ्यांची संख्या अत्यंत कमी पडते परिणामी स्वरूप योग्य प्रकारे वाहतुक नियमन वाहन पार्कींग होत नसल्याने यांचा त्रास उपद्रव नागरीकांना होतो.

शहर वाहतुक उपशाखा उल्हासनगर हद्‍दीत वाहतुक नियमसाठी २५ ट्राफिक वार्डन पुरविण्याबाबत मा. स्थायी समिती ठराव क्र. ५६, दि. १७/१२/२०१३ अन्वये वाहतुक शाखेस २५ ट्राफीक वार्डन मानधनावर प्रति वार्डन रू. ४०००/— प्रमाणे देण्याबाबत ठराव पारीत करण्यात आलेला असुन २५ ट्राफिक वार्डन यांना वार्षिक मानधनापोटी रू. १२,००,०००/— एवढा खर्च अपेक्षीत आहे. सदर खर्च सन २०१६—२०१७ च्या अंदाजपत्रकीय लेखाशिर्ष C-5(6)Part-I (TrafficSing) मध्ये रू. ५०,००,०००/— एवढी तरतुद करण्यात अलेली आहे. तसेच मा.स्थायी समिती ठराव क्र. १००, दि. १४/०३/२०१६ अन्वये ट्राफिक वार्डन यांना दि. ३१/०८/२०१६ रोजी पर्यत अर्थसहाय्य मंजुरी देण्यात आलेली असुन सदर देण्यात आलेली अर्थसहाय्य मंजुरी संपुष्टात येत आहे. तरी सदर ट्राफिक वार्डन यांना पुढील एक वर्षाकरीता अर्थसहाय्य मंजुरी मिळणेबाबत. सदर प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> ७४ अ <u>दिनांक:— २९/९/२०१६</u>

सूचकाचे नांव : श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नांव : श्री. विजय पाटील

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार वाहतूक नियमनासाठी सन २०१६—१७ साठी २५ 'ट्रॅफिक वॉर्डन' यांना एक वर्षाकरीता अर्थसहाय्य देण्याचा प्रस्ताव या सभेच्या कार्यसूचीवरुन वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची <u>सही/—</u>

अनुमोदकाची <u>सही/—</u>

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ५ :—** शहर वाहतुक उपविभाग, उल्हासनगर व उपविभाग, विठ्ठलवाडी हद्‍दीत वाहतुक

नियमानासाठी अतिरिक्त २० ट्राफिक वार्डन मिळणेबाबत.

---

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—**सदर कामाकरीता खर्च करण्याची अंदाजपत्रकात तरतुद आहे का?

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—** एसीपी, वाहतूक विभाग यांनी आपल्याला एकदा तरी येवून निवेदन केले पाहिजे ना. सदरचा विषय वगळण्यात यावा.

**काही सदस्य :—**वगळण्यात यावा.

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ५ :—** शहर वाहतुक उपविभाग, उल्हासनगर व उपविभाग, विठ्ठलवाडी हद्दीत वाहतुक नियमानासाठी अतिरिक्त २० ट्राफिक वार्डन मिळणेबाबत.

**प्रस्तावना**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये उल्हासनगर महानगरपालिका वाहन विभागामार्फत उल्हासनगर शहरातील वाहतुक कोंडीच्या समस्या दुर करणेकरीता शहर वाहतुक उपविभाग,उल्हासनगर यांना मदतीकरीता २५ ट्राफिक वार्डन नियुक्त करण्यात आलेले आहे. त्यांना ३१ऑगस्ट २०१६ पर्यंत अर्थसहाय्य मंजुरी देण्यात आलेली असुन त्यांची अर्थसहाय्य मंजुरीची मुदत दिनांक ३१/०८/२०१६ रोजी संपुष्टात येत आहे.

तसेच उल्हासनगर शहरातील कॅम्प नं. ४ व ५ कार्यक्षेत्रातात बाजार पेठा व कपडा मार्केट तसेच जिन्स कारखाने मोठया प्रमाणात असल्यामुळे सदर ठिकाणी खरेदी करणेकरीता बाहेरून जास्त प्रमाणात ग्राहक येत असतात. तसेच शहरातील लोकसंख्या पाहता लोकांना दळणवळणाकरीता वाहनांची आवश्यकता असल्याने वाहनांची संख्याही जास्त प्रमाणात असुन शहरातील रस्तेही अरूंद व अपूरे आहेत. त्यामुळे ठिकठिकाणच्या चौकांमध्ये सतत वाहतुक कोंडी होत असुन वाहतुक कोंडी सोडविण्यासाठी शहर वाहतुक उपविभाग, विठ्ठलवाडी यांनी महापालिकेमार्फम ०५ ट्राफिक वार्डन मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

त्याच प्रमाणे शहर वाहतुक उपविभाग,उल्हासनगर यांनी देखील उल्हासनगर हद्दीतील चोपडा कोर्ट ते शहाड व अन्य ठिकाणी रस्त्याचे काम चालु असल्याने वाहतुक कोंडीची मोठयाप्रमाणात समस्या उद्भवत असल्यामुळे त्याचे निराकरण करणे करीता अतिरिक्त १५ ट्राफिक वार्डन मिळणेबाबत विनंती केलेली आहे. तरी सदर वाहतुक विभागास अतिरिक्त २० ट्राफिक वार्डन उपलब्ध करून दिल्यास प्रति वार्डन रू. 4000X 20X 12 = ९,६०,०००/— एवढा वार्षीक खर्च मानधनपोटी अपेक्षित आहे. सदर बाबत अंदाजपत्रकीय लेखाशिर्ष C-5(6) Part-I (Traffic Sing) मध्ये तरतुद करण्यात आलेली आहे.

त्या अनुषंगाने शहर वाहतुक उपविभाग, उल्हासनगर व उपविभाग, विठ्ठलवाडी यांना वाहतुक नियमनासाठी अतिरिक्त २० ट्राफिक वार्डनची अर्थसहाय्य मंजुरी मिळणेबाबत सदर प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र.** ७४ ब                    दिनांक:—२९/९/२०१६

सूचकाचे नांव : श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नांव : श्री. विजय पाटील

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार शहर वाहतुक उपविभाग, उल्हासनगर व उपविभाग, विठ्ठलवाडी यांना वाहतुक नियमनासाठी अतिरिक्त २० ट्राफिक वार्डन मिळणेस मान्यता देण्याचा प्रस्ताव या सभेच्या कार्यसूचीवरुन वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी

महापालिका सचिव :— विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

——————————————————————————————————————

विषय क्र. ६ :— उल्हासनगर महापालिका आवारात साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा उभारणेकरीता विशेष बाब म्हणुन रु.१७.५० लक्ष रक्कमेच्या खर्चास वित्तीय मान्यता मिळून सदर कामाची निविदा न मागविता मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियमाचे प्रकरण ५ (२) (२) अंतर्गत श्री. विजय शिरगांवकर यांना कामाचे कार्यारंभ आदेश निर्गमित करणेस मा.स्थायी समितीची मान्यता मिळणे.

——————————————————————————————————————

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:— महापालिका अधिनियमाचे प्रकरण ५(२)(२) मध्ये आपण पुतळे उभारणेचे काम आणतो, दैवत आहेत आपले ते आणले पाहिजेत, परंतु सेलवनसाहेब, जेव्हा कि सदस्य तुम्हाला वेळोवेळी सांगतात, तरीदेखील पाणीपुरवठयातील कामे आपण ५(२)(२) मध्ये का आणत नाहीत, गणेश विसर्जनघाटाचे काम ५(२)(२) मध्ये येत नाही, कल्याणडोंबिवली महापालिकेने त्यांच्या क्षेत्रात गणेशविसर्जन करण्यास मनाई केली त्यामुळे आपल्या कार्यक्षेत्रात मोठया गणेशमुर्ती विसर्जनासाठी घाट तयार करावा लागला, त्या ठेकेदाराने ११ दिवसांत घाटाचे काम पुर्ण केले, सगळयांनी त्याचे कौतुक केले.

कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा), श्री. सेलवन :— पाणीपुरवठा लिकेजची कामे तातडीची असल्याने ५(२)(२) मध्ये आणतो आम्ही, मध्यंतरी कितीतरी कामे आणली होती.

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:— कामाची तातडी ठरवतो कोण? मागे स्थायी समितीमध्ये उद्यानाच्या कामाच्या निविदेचे काम ५(२)(२) मध्ये आणले होते, सदस्यांचे तातडीचे काम आले नाही. प्रशासनाला कायदयाच्या कक्षेत बसवूनच करायचे आहे. श्री. दिलीप गायकवाड, ज्येष्ठ सदस्य, यांच्याकडे साधूबेला शाळेजवळ पाईप लाईन टाकली नाही म्हणून पाणीच येत नाही, गेल्या ४ महिन्यात आम्ही काय भोगले हे तुम्हाला माहित नाही. या विषयात तीन अटींची पुर्तता केलेली नाही तरी हा विषय ५(२)(२) मध्ये कसा आला?

शहर अभियंता, श्री. राम जयस्वार :— पुतळे उभारण्यासाठी शासनाच्या १६ अटी आहेत त्यामध्ये महत्वाच्या तीन अटी आहेत. १) क्ले मॉडेल २) कशा मटेरियलमध्ये बनवायचा आहे. ३) चीफ आर्किटेक्टची परवानगी घ्यायची आहे. या सर्व परवानग्या घेवून मा. जिल्हाधिकारी यांचेकडे प्रस्ताव पाठवायचा आहे. क्ले मॉडेलसाठी यापुर्वी निविदा प्रक्रीया केली परंतु कोणी त्यांस प्रतिसाद दिला नाही. आणि आता मा. आयुक्त यांच्या मान्यतेने हा प्रस्ताव आम्ही सभेसमोर आणला आहे.

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—वरील अटींच्या अधीन राहून मान्यता दिल्यानंतर किती कालावधीत हे काम पुर्ण होईल.

शहर अभियंता, श्री. राम जयस्वार :— सुमारे ४ महिन्यांत होईल.

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—महापालिकेच्या निवडणूका दोन महिन्यावर आहेत. कुठलाही सदस्य जर आपला निधी देत असेल तर त्याची कामे झाली पाहिजेत ना.

शहर अभियंता, श्री. राम जयस्वार :— गणपती उत्सवामध्ये शेवटच्या दिवसापर्यंत आमचे कर्मचारी व्यस्त होते व त्यानंतर सर्व कर्मचारी निवडणूक प्रभाग रचनेमध्ये व्यस्त झाले. त्यामुळे सार्व. बांधकाम विभागातील कामे प्रलंबित राहिली आहेत.

**<u>सदस्या, श्रीम. अंजली साळवे :—</u>**हा विषय ५(२)(२)मध्ये न घेता सर्वसाधारणपणे आणू शकत नाहीत का?

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>**सदर विषय हा तातडीचा असल्याने तो ५(२)(२)मध्ये आणला आहे.

**<u>सदस्या, श्रीम. अंजली साळवे :—</u>**आमचा यांस विरोध नाही, मंजूरी दयायचीच आहे. पण सेलवनसाहेब, भरतनगर येथे पाईप लाईन टाकण्याचे काम झालेले नाही. पाणीपुरवठा हा विषय तातडीचा नाही का?

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>**सदर विषयाच्या ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता करण्यात यावी. तसेच संबंधित विभागाने नमुद केलेल्या तीन आवश्यक अटींच्या पुर्ततेच्या अधीन राहून मान्यता देत आहे.

**<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>**आमचीदेखील काही महत्वाची कामे आहेत तीदेखील ५(२)(२)मध्ये आली पाहिजेत.

**<u>महापालिका सचिव :—</u>**सदर विषय पारीत करण्यात यावा का?

**<u>काही सदस्य :—</u>**पास—पास......

**<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ६ :—** उल्हासनगर महापालिका आवारात साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा उभारणेकरीता विशेष बाब म्हणुन रु.१७.५० लक्ष रक्कमेच्या खर्चास वित्तीय मान्यता मिळून सदर कामाची निविदा न मागविता मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियमाचे प्रकरण ५ (२) (२) अंतर्गत श्री. विजय शिरगांवकर यांना कामाचे कार्यरंभ आदेश निर्गमित करणेस मा.स्थायी समितीची मान्यता मिळणे.

<u>प्रस्तावना</u>

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये उल्हासनगर महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयाच्या आवारात **साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे** यांचा पुतळा महापालिकेच्या आवारात उभारणेबाबत महासभा ठराव क्र. १०५, दिनांक २०/११/२००३ अन्वये झालेला आहे. शासन निर्णय दिनांक २/२/२००५ मधील पुतळा उभारणेसंबंधिच्या मार्गदर्शक तत्वांप्रमाणे आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करुन इकडील पत्र क्र.उमपा/साबांवि/शअ/१५५/२००७ दिनांक १६/७/२००७ अन्वये सदर प्रस्ताव मंजूरीस्तव मा.जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे मान्यतेकरीता सादर केला होता.

मा.जिल्हाधिकारी, ठाणे यांनी त्यांचेकडील पत्र क्र.गृह/का—१/पुतळा/वशी—३४६ दिनांक १४/६/२०१० व दिनांक २२/६/२०१० अन्वये सदरच्या विषयातील पुतळा उभारणेकामी शासन निर्णय दिनांक २/२/२००५ मधील पुतळे उभारण्यासंबंधिच्या मार्गदर्शक तत्वांप्रमाणे खालील आवश्यक कागदपत्रांची पूर्तता होणे अपेक्षित असल्याने खालील तीन त्रृटी असल्याचे कळविले आहे.

१) पुतळया संबंधित मुख्य वास्तु शास्त्रज्ञ महाराष्ट्र राज्य यांचेकडील प्रमाणपत्र.

२) पुतळयाच्या क्ले मॉडेलला कला संचालनालयाची मान्यता घेतल्याबाबतचे प्रमाणपत्र.

३) स्थानिक स्वराज्य संस्था/ निम शासकीय संस्था/ शासकीय कार्यालय या मध्ये पुतळा उभारावयाचा झाल्यास संबंधित मंत्रालयीन विभागाकडून घेतलेले ना हरकत प्रमाणपत्र.

उपरोक्त मुद्दयांपैकी मुद्दा क्र.३ ची पूर्तता करणेकरीता शासनाकडून सदर ना हरकत मिळणेकरीता इकडील पत्र क्र. १) क्र.८३—ए दिनांक ७/६/२००४ २) क्र.४५ दिनांक १९/५/२००५ ३) क्र.२५९ दिनांक २२/११/२००७ ४)क्र.३१८ दिनांक १४/१/२००८ ५) क्र.१२७ दिनांक १३/१०/२००८ ६) क्र.२३७ दिनांक ५/१२/२००९ च्या पत्रांनुसार तसेच वैयक्तिकरित्या पाठपुरावा सुरु आहे. परंतू अद्याप शासनाकडूनही प्रस्तावास

मान्यता मिळालेली नाही. महाराष्ट्र क्रांती लहुजी सेना सामाजिक संघटना यांचे दिनांक ३०/७/२०१६ रोजीच्या विनंती पत्रा समवेत शिल्पकार श्री. विजय शिरगांवकर यांनी दिलेले दरपत्रकानुसार पुतळयाची अंदाजित खर्च रुपये १७,५०,०००/— लक्ष रुपयांच्या आसपास असेल.

महापालिकेस रु. १७.५० लक्ष खर्च करावयाचा असल्यास प्रचलित नियमानुसार ई निविदा प्रक्रिया राबवून काम करणे आवश्यक आहे. तथापी, पुतळा बसविणे हे काम इतर दैनंदिन कामासारखे नाही. हे काम शिल्पकलेमधील तज्ञ व्यक्तिकडून करुन घेणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर कामाची निविदा काढणे यथोचित करणार नसल्याने श्री.विजय शिरगांवकर हे महाराष्ट्र मधील नामांकीत शिल्पकार असून आज पर्यंत त्यांनी अनेक पुतळे बनविलेले असून त्यांची गुणवत्ता अत्यंत चांगली असल्याचे बोलले जाते. त्यांनी आपल्या बाजूच्या कुळगांव बदलापूर नगरपालिका व खाली त्यांनी बनविलेल्या महान पुरुषांच्या शिल्पाची कामे केलेली आहेत.

**दोन पायावर झेपावणारे फोर्सेबल पुतळे :—**

१. झाशीच्या राणीचा अश्वारुढ फोर्सेबल पुतळा, धनवटे रंगमंदीर समोर, नागपूर, १५ फुट उंचीचा (११—११—१९६२)
२. छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारुढ पुतळा, कोटोसमोर, नाशिक, १२ फुट उंचीचा (६—१—१९७७)
३. छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारुढ पुतळा, मालेगांव १२ फुट उंचीचा (१९७३)
४. छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारुढ पुतळा, रत्नागिरी १२ फुट उंचीचा (१९८४)
५. छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारुढ पुतळा, शेतकरी साखर कारखाना, माधवनगर, सांगली (१९८९)

**तीन पायवावर झेपावणारे फोर्सेबल पुतळे :—**

६. छत्रपती शिवाजी महाराजांचा १२ फुट उंचीचा अश्वारुढ पुतळा, भाजीमार्केट सांगली (३१—०७—१९६२)
७. छत्रपती शिवाजी महाराजांचा १२ फुट उंचीचा अश्वारुढ पुतळा, मासुंदा तलाव, ठाणा (२२—६—१९६४)
८. वीर ताराबाईचा अश्वारुढ १२ फुट उंचीचा पुतळा, ताराबाई विद्यापिठ, कोल्हापूर (२३—२—१९७२)
९. छत्रपती शिवाजी महाराजांचा १२ फुट उंचीचा अश्वारुढ पुतळा, देवळाली रोड, नाशिक (१—२—१९७१)
१०. छत्रपती शिवाजी महाराजांचा १२ फुट उंचीचा अश्वारुढ पुतळा, कलंबर साखर कारखाना, नांदेड (१—२—१९७९)
११. छत्रपती शिवाजी महाराजांचा १२ फुट उंचीचा अश्वारुढ पुतळा, राहूरी साखर कारखाना, राहूरी (३१—९—१९८२)
१२. छत्रपती शिवाजी महाराजांचा १२ फुट उंचीचा अश्वारुढ पुतळा, पनवेल नगरपालिका, पनवेल.
१३. छत्रपती शिवाजी महाराजांचा १२ फुट उंचीचा अश्वारुढ पुतळा खोपोली नगरपालिका, खोपोली.
१४. छत्रपती शिवाजी महाराजांचा १२ फुट उंचीचा अश्वारुढ पुतळा, लोणावळा नगरपालिका, लोणावळा.
१५. छत्रपती शिवाजी महाराजांचा १२ फुट उंचीचा अश्वारुढ पुतळा, पाचोरा नगरपालिका, पाचोरा.

**इतर काही कलात्मक पुतळे :—**

१६. भाऊसाहेब हिरे यांचा ९ फुट उंचीचा पुतळा, मालेगांव
१७. भाऊसाहेब हिरे यांचा ९ फुट उंचीचा पुतळा, साखर कारखाना दाभाडी, मालेगांव
१८. पं.जवाहरलाल नेहरु यांचा ९ फुट उंचीचा पुतळा, नाशिक गार्डन, नाशिक.
१९. माधवराव बोरस्ते यांचा ९ फुट उंचीचा पुतळा, नेफाड साखर कारखाना, नेफाड.
२०. महात्मा ज्योतिबा फुले यांचा १२ फुट उंचीचा पुतळा, मालेगांव नगरपालिका, मालेगांव
२१. पं.लालबहादुर शास्त्री यांचा ६ फुट उंचीचा पुतळा, सिंदीया शिपीं कॉर्पोरेशन, मुंबई.
२२. यशवंतराव चव्हाण यांचा ९ फुट उंचीचा पुतळा, कऱ्हाड.
२३. यशवंतराव चव्हाण यांचा ९ फुट उंचीचा पुतळा, साखर कारखाना कऱ्हाड.
२४. डॉ.आंबेडकर यांचा ६ फुट उंचीचा पुतळा, पनवेल महानगरपालिका, पनवेल.
२५. डॉ.आंबेडकर यांचा ६ फुट उंचीचा पुतळा, सुरत नगरपालिका, सुरत.
२६. बॅ.स्वातंत्र्यविर सावरकर यांचा बस्ट ३ फुट उंचीचा पुतळा, पनवेल महानगरपालिका, पनवेल
२७. केकूबाददाबू यांचा ३ फुट उंचीचा पुतळा, मिरची बाजार, नागपुर
२८. भाऊसाहेब हिरे यांचा ३ फुटी बस्ट पुतळा, त्र्यंबकेश्वर
२९. हुतात्मा शहिद शंकर यांचा ६ फुटी बस्ट पुतळा, मिरची बाजार, नागपूर
३०. डॉ.आंबेडकर यांचा ६ फुट उंचीचा पुतळा, खोपोली महानगरपालिका, खोपोली.

३१.कै.जयरामजी अंबेरकर स्मारक समिती तर्फे पुतळा, अंबपूर ता.बिलोली, जि.नांदेड

३२.कै.सुवत प्रसाद त्रिवेदी यांचा ३ फुट उंचीचा बेस्ट पुतळा, नागपूर

३३.कै.माधवराव बोरस्ते यांचा ३ फुट उंचीचा बेस्ट पुतळा, ओझर, जि.नाशिक

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे ब्रॉझचे पूर्णाकृती पुतळे :—**

३४.भिमवडी रहिवासी संघ (रजि.) डॉ.बाबासाहेब आंबेडकर गौतमनगर, उद्यान, भिमवाडी पी.एल.लोखंडे मार्ग, गोवडी मुंबई.

३५.डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा समिती, आंबेडकर चौक पतंगराव घाटकोपर, मुंबई.

३६.चिपळून नगरपरिषद बहादूर शेख नाका ता.चिपळूण जिल्हा रत्नागिरी.

३७.आंबेडकर चौक ता.अहमदपुर जिल्हा लातूर,

३८.मिरा भाईंदर महानगरपालिका ता.जिल्हा ठाणे.

३९.कल्याण डोंबिवली महानगरपालिका ता.कल्याण जिल्हा ठाणे.

४०.अलिबाग नगरपरिषद ता.अलिबाग, जिल्हा रायगड

४१.सुत्रापाडा नगरपालिका ता.सुत्रापाडा जिल्हा जुनागड गुजरात.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे ब्रॉझचे अर्धाकृती पुतळे :—**

४२.मुंबई पोर्ट ट्रस्ट डॉकयार्ड मुंबई.

४३.मिरा भाईंदर महानगरपालिका ता.जिल्हा ठाणे.

४४.मुर्तवडे बुध्दविहार मु.पो.मुर्तवडे, ता.चिपळूण, जिल्हा रत्नागिरी.

वरीलप्रमाणे शिल्पकार श्री.विजय शिरगांवकर यांनी केलेली कामे पहाता त्यांना आपल्या

उल्हासनगर महानगरपालिकेच्या मुख्य आवारात **साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे या राष्ट्रपुरुषांचे पूर्णाकृती (१० फुट उंचीचे) पुतळा** तयार करण्याचे काम दिल्यास ते चांगल्या प्रकारे करु शकतात. तसेच सदर पुतळा पूर्णाकृती बनविण्याकरीता पुतळयाच्या क्ले मॉडेलला कला संचालनालयाची मान्यता श्री.शिरगांवकर यांनी त्यांचेतर्फे घेणे आवश्यक आहे. सदर मान्यता प्राप्त झाल्यानंतरच श्री.शिरगांवकर यांना सदर कामाचे कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात येईल.

उक्त विषयाबाबत मा.महापौर सो.यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ९ ऑगस्ट, २०१६ रोजी दुपारी ३.०० वाजता बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीचे इतिवृत्त या कार्यालयास दिनांक ८/९/२०१६ रोजी प्राप्त झाले आहे. सदर इतिवृत्तातील मुद्दा क्र.२ नुसार महापालिकेच्या आवारात वरील पुतळा उभारणेस निविदा कार्यवाही करुनही प्रतिसाद न मिळाल्याने विशेष बाब म्हणून सदर काम श्री.विजय शिरगांवकर यांना देणेचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेकरीता सादर करणेबाबत नमुद आहे.

यामध्ये असे स्पष्ट केले करण्यात येते की, मा.महापौर सो. यांचे दालनात झालेल्या बैठकीत उपस्थित केलेल्या मुद्द्यातील मुद्दा क्र.३) शासनाची मान्यता मिळणेपूर्वी मुद्दा क्र.१) मुख्य वास्तु शास्त्रज्ञ यांची मान्यता व मुद्दा क्र.२) पुतळयाच्या क्ले मॉडेलला कला संचनालयाची मान्यता संबंधित वास्तुविशारदा यांनी घेणे असते. श्री. विजय शिरगांवकर यांना कामाचे कार्यारंभ आदेश दिल्यास ते स्वत:च वरील मुद्दा क्र.१ व २ ची पूर्तता करतील.

वरील सर्व बाबींचा विचार करता वरील कामास वेळेचा होणारा अपव्यव टाळण्याकरीता दिनांक ८/९/२०१६ च्या इतिवृत्तातील मुद्दा क्र.२ नुसार महापालिकेच्या आवारात वरील पूर्णाकृती पुतळा बनविण्याच्या कामाकरीता येणारा रु. १७.५० लक्ष एवढया खर्चास मान्यता मिळून सदर कामाची अत्यावश्यकता पाहता सदर काम मुंबई महापालिका अधिनियमाचे प्रकरण ५ (२) (२) अंतर्गत श्री.विजय शिरगांवकर यांना कामाचे कार्यारंभ आदेश निर्गमित करणेस सदर प्रस्ताव मा.स्थायी समितीसमोर ठेवणेकरीता मान्यता मिळणेस्त प्रस्तावित.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> ७५ <u>दिनांक:— २९/९/२०१६</u>

सूचकाचे नांव : श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नांव : श्री. विजय पाटील

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महापालिका आवारात साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा उभारणेकरीता विशेष बाब म्हणुन रु. १७.५० लक्ष रक्कमेच्या खर्चास वित्तीय मान्यता देवुन सदर कामाची

निविदा न मागविता मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियमाचे प्रकरण ५ (२) (२) अंतर्गत श्री.विजय शिरगांवकर यांना कामाचे कार्यारंभ आदेश निर्गमित करणेस खालील ३ अटींच्या पुर्ततेच्या अधिन राहून मान्यता देत आहे.

१) पुतळया संबंधित मुख्य वास्तु शास्त्रज्ञ महाराष्ट्र राज्य यांचेकडील प्रमाणपत्र उपलब्ध करुन देणे.

२) पुतळयाच्या क्ले मॉडेलला कला संचालनालयाची मान्यता घेतल्याबाबतचे प्रमाणपत्र उपलब्ध करुन देणे.

३) स्थानिक स्वराज्य संस्था/ निम शासकीय संस्था/ शासकीय कार्यालय या मध्ये पुतळा उभारावयाचा झाल्यास संबंधित मंत्रालयीन विभागाकडून घेतलेले ना हरकत प्रमाणपत्र उपलब्ध करुन देणे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ७ :–** उल्हासनगर महापालिका आवारात महात्मा ज्योतिबा फुले यांचा पुतळा उभारणेकरीता विशेष बाब म्हणुन रु.१७.५० लक्ष रक्कमेच्या खर्चास वित्तीय मान्यता मिळून सदर कामाची निविदा न मागविता मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियमाचे प्रकरण ५ (२) (२) अंतर्गत श्री.विजय शिरगांवकर यांना कामाचे कार्यारंभ आदेश निर्गमित करणेस मा.स्थायी समितीची मान्यता मिळणे.

---

महापालिका सचिव :–सदर विषय पारीत करण्यात यावा का?

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:– पारीत करण्यात यावा तसेच सदर विषयाच्या ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता करण्यात यावी.

काही सदस्य :–पास–पास......

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ७ :–**उल्हासनगर महापालिका आवारात महात्मा ज्योतिबा फुले यांचा पुतळा उभारणेकरीता विशेष बाब म्हणुन रु.१७.५० लक्ष रक्कमेच्या खर्चास वित्तीय मान्यता मिळून सदर कामाची निविदा न मागविता मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियमाचे प्रकरण ५ (२) (२) अंतर्गत श्री.विजय शिरगांवकर यांना कामाचे कार्यारंभ आदेश निर्गमित करणेस मा.स्थायी समितीची मान्यता मिळणे.

प्रस्तावना

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये उल्हासनगर महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयाच्या आवारात **महात्मा ज्योतिबा फुले** यांचा पुतळा महापालिकेच्या आवारात उभारणेबाबत महासभा ठराव क्र. १०५, दिनांक २०/११/२००३ अन्वये झालेला आहे. शासन निर्णय दिनांक २/२/२००५ मधील पुतळा उभारणेसंबंधिच्या मार्गदर्शक तत्वांप्रमाणे आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करुन इकडील पत्र क्र.उमपा/साबांवि/शअ/१५५/२००७ दिनांक १६/७/२००७ अन्वये सदर प्रस्ताव मंजूरीस्तव मा.जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे मान्यतेकरीता सादर केला होता.

मा.जिल्हाधिकारी, ठाणे यांनी त्यांचेकडील पत्र क्र.गृह/का–१/पुतळा/वशी–३४६ दिनांक १४/६/२०१० व दिनांक २२/६/२०१० अन्वये सदरच्या विषयातील पुतळा उभारणेकामी शासन निर्णय दिनांक २/२/२००५ मधील पुतळे उभारण्यासंबंधिच्या मार्गदर्शक तत्वांप्रमाणे खालील आवश्यक कागदपत्रांची पूर्तता होणे अपेक्षित असल्याने खालील तीन त्रृटी असल्याचे कळविले आहे.

१) पुतळया संबंधित मुख्य वास्तु शास्त्रज्ञ महाराष्ट्र राज्य यांचेकडील प्रमाणपत्र.

२) पुतळयाच्या क्ले मॉडेलला कला संचालनालयाची मान्यता घेतल्याबाबतचे प्रमाणपत्र.

३) स्थानिक स्वराज्य संस्था/ निम शासकीय संस्था/ शासकीय कार्यालय या मध्ये पुतळा उभारावयाचा झाल्यास संबंधित मंत्रालयीन विभागाकडून घेतलेले ना हरकत प्रमाणपत्र.

उपरोक्त मुद्दयांपैकी मुद्दा क्र.३ ची पूर्तता करणेकरीता शासनाकडून सदर ना हरकत मिळणेकरीता इकडील पत्र क्र. १) क्र.८३–ए दिनांक ७/६/२००४ २) क्र.४५ दिनांक १९/५/२००५ ३) क्र.२५९ दिनांक २२/११/२००७ ४)क्र.३१८ दिनांक १४/१/२००८ ५) क्र.१२७ दिनांक १३/१०/२००८ ६) क्र.२३७ दिनांक ५/१२/२००९ च्या पत्रांनुसार तसेच वैयक्तिकरित्या पाठपुरावा सुरु आहे. परंतू अद्याप शासनाकडूनही प्रस्तावास मान्यता मिळालेली नाही. महाराष्ट्र क्रांती लहुजी सेना सामाजिक संघटना यांचे दिनांक ३०/७/२०१६ रोजीच्या विनंती पत्रा समवेत शिल्पकार श्री. विजय शिरगांवकर यांनी दिलेले दरपत्रकानुसार पुतळयाची अंदाजित खर्च रुपये १७,५०,०००/– लक्ष रुपयांच्या आसपास असेल.

महापालिकेस रु. १७.५० लक्ष खर्च करावयाचा असल्यास प्रचलित नियमानुसार ई निविदा प्रक्रिया राबवून काम करणे आवश्यक आहे. तथापी, पुतळा बसविणे हे काम इतर दैनंदिन कामासारखे नाही. हे काम शिल्पकलेमधील तज्ञ व्यक्तिकडून करुन घेणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर कामाची निविदा काढणे यथोचित करणार नसल्याने श्री.विजय शिरगांवकर हे महाराष्ट्र मधील नामांकीत शिल्पकार असून आज पर्यंत त्यांनी अनेक पुतळे बनविलेले असून त्यांची गुणवत्ता अत्यंत चांगली असल्याचे बोलले जाते. त्यांनी आपल्या बाजूच्या कुळगांव बदलापूर नगरपालिका व खाली त्यांनी बनविलेल्या महान पुरुषांच्या शिल्पाची कामे केलेली आहेत.

**दोन पायावर झेपावणारे फोर्सेबल पुतळे :–**

१. झाशीच्या राणीचा अश्वारुढ फोर्सेबल पुतळा, धनवटे रंगमंदीर समोर, नागपूर, १५ फुट उंचीचा (११–११–१९६२)

१. छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारुढ पुतळा, कोटेसमोर, नाशिक, १२ फुट उंचीचा (६–१–१९७७)
२. छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारुढ पुतळा, मालेगांव १२ फुट उंचीचा (१९७३)
३. छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारुढ पुतळा, रत्नागिरी १२ फुट उंचीचा (१९८४)
४. छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारुढ पुतळा, शेतकरी साखर कारखाना, माधवनगर, सांगली (१९८९)

**तीन पायवावर झेपावणारे फोर्सेबल पुतळे :–**

५. छत्रपती शिवाजी महाराजांचा १२ फुट उंचीचा अश्वारुढ पुतळा, भाजीमार्केट सांगली (३१–०७–१९६२)
६. छत्रपती शिवाजी महाराजांचा १२ फुट उंचीचा अश्वारुढ पुतळा, मासुंदा तलाव, ठाणा (२२–६–१९६४)
७. वीर ताराबाईचा अश्वारुढ १२ फुट उंचीचा पुतळा, ताराबाई विद्यापिठ, कोल्हापूर (२३–२–१९७२)
८. छत्रपती शिवाजी महाराजांचा १२ फुट उंचीचा अश्वारुढ पुतळा, देवळाली रोड, नाशिक (१–२–१९७१)

९. छत्रपती शिवाजी महाराजांचा १२ फुट उंचीचा अश्वारुढ पुतळा, कलंबर साखर कारखाना, नांदेड (१–२–१९७९)

१०.छत्रपती शिवाजी महाराजांचा १२ फुट उंचीचा अश्वारुढ पुतळा, राहूरी साखर कारखाना, राहूरी (३१–९–१९८२)

११.छत्रपती शिवाजी महाराजांचा १२ फुट उंचीचा अश्वारुढ पुतळा, पनवेल नगरपालिका, पनवेल.

१२.छत्रपती शिवाजी महाराजांचा १२ फुट उंचीचा अश्वारुढ पुतळा खोपोली नगरपालिका, खोपोली.

१३.छत्रपती शिवाजी महाराजांचा १२ फुट उंचीचा अश्वारुढ पुतळा, लोणावळा नगरपालिका, लोणावळा.

१४.छत्रपती शिवाजी महाराजांचा १२ फुट उंचीचा अश्वारुढ पुतळा, पाचोरा नगरपालिका, पाचोरा.

**इतर काही कलात्मक पुतळे :—**

१५.भाऊसाहेब हिरे यांचा ९ फुट उंचीचा पुतळा, मालेगांव

१६.भाऊसाहेब हिरे यांचा ९ फुट उंचीचा पुतळा, साखर कारखाना दाभाडी, मालेगांव

१७.पं.जवाहरलाल नेहरु यांचा ९ फुट उंचीचा पुतळा, नाशिक गार्डन, नाशिक.

१८.माधवराव बोरस्ते यांचा ९ फुट उंचीचा पुतळा, नेफाड साखर कारखाना, नेफाड.

१९.महात्मा ज्योतिबा फुले यांचा १२ फुट उंचीचा पुतळा, मालेगांव नगरपालिका, मालेगांव

२०.पं.लालबहादुर शास्त्री यांचा ६ फुट उंचीचा पुतळा, सिंदीया शिपीं कॉर्पोरेशन, मुंबई.

२१.यशवंतराव चव्हाण यांचा ९ फुट उंचीचा पुतळा, कऱ्हाड.

२२.यशवंतराव चव्हाण यांचा ९ फुट उंचीचा पुतळा, साखर कारखाना कऱ्हाड.

२३.डॉ.आंबेडकर यांचा ६ फुट उंचीचा पुतळा, पनवेल महानगरपालिका, पनवेल.

२४.डॉ.आंबेडकर यांचा ६ फुट उंचीचा पुतळा, सुरत नगरपालिका, सुरत.

२५.बॅ.स्वातंत्र्यविर सावरकर यांचा बस्ट ३ फुट उंचीचा पुतळा, पनवेल महानगरपालिका, पनवेल

२६.केकूबाददाबू यांचा ३ फुट उंचीचा पुतळा, मिरची बाजार, नागपुर

२७.भाऊसाहेब हिरे यांचा ३ फुटी बस्ट पुतळा, त्र्यंबकेश्वर

२८.हुतात्मा शहिद शंकर यांचा ६ फुटी बस्ट पुतळा, मिरची बाजार, नागपूर

२९.डॉ.आंबेडकर यांचा ६ फुट उंचीचा पुतळा, खोपोली महानगरपालिका, खोपोली.

३०.कै.जयरामजी अंबेरकर स्मारक समिती तर्फे पुतळा, अंबपूर ता.बिलोली, जि.नांदेड

३१.कै.सुवत प्रसाद त्रिवेदी यांचा ३ फुट उंचीचा बेस्ट पुतळा, नागपूर

३२.कै.माधवराव बोरस्ते यांचा ३ फुट उंचीचा बेस्ट पुतळा, ओझर, जि.नाशिक

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे ब्रॉझचे पूर्णाकृती पुतळे :—**

३३.भिमवडी रहिवासी संघ (रजि.) डॉ.बाबासाहेब आंबेडकर गौतमनगर, उद्यान, भिमवाडी पी.एल.लोखंडे मार्ग, गोवडी मुंबई.

३४.डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा समिती, आंबेडकर चौक पतंगराव घाटकोपर, मुंबई.

३५.चिपळून नगरपरिषद बहादूर शेख नाका ता.चिपळूण जिल्हा रत्नागिरी.

३६.आंबेडकर चौक ता.अहमदपुर जिल्हा लातूर,

३७.मिरा भाईंदर महानगरपालिका ता.जिल्हा ठाणे.

३८.कल्याण डोंबिवली महानगरपालिका ता.कल्याण जिल्हा ठाणे.

३९.अलिबाग नगरपरिषद ता.अलिबाग, जिल्हा रायगड

४०.सुत्रापाडा नगरपालिका ता.सुत्रापाडा जिल्हा जुनागड गुजरात.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे ब्रॉझचे अर्धाकृती पुतळे :—**

४१.मुंबई पोर्ट ट्रस्ट डॉकयार्ड मुंबई.

४२.मिरा भाईंदर महानगरपालिका ता.जिल्हा ठाणे.

४३.मुर्तवडे बुध्दविहार मु.पो.मुर्तवडे, ता.चिपळूण, जिल्हा रत्नागिरी.

वरीलप्रमाणे शिल्पकार श्री.विजय शिरगांवकर यांनी केलेली कामे पहाता त्यांना आपल्या

उल्हासनगर महानगरपालिकेच्या मुख्य आवारात **महात्मा ज्योतिबा फुले या राष्ट्रपुरुषाचे पूर्णाकृती (१० फुट उंचीचे) पुतळा** तयार करण्याचे काम दिल्यास ते चांगल्या प्रकारे करु शकतात. तसेच सदर पुतळा पूर्णाकृती बनविण्याकरीता पुतळयाच्या क्ले मॉडेलला कला संचालनालयाची मान्यता श्री.शिरगांवकर यांनी त्यांचेतर्फे घेणे आवश्यक आहे. सदर मान्यता प्राप्त झाल्यानंतरच श्री.शिरगांवकर यांना सदर कामाचे कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात येईल.

उक्त विषयाबाबत मा.महापौर सो.यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ९ ऑगस्ट, २०१६ रोजी दुपारी ३.०० वाजता बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीचे इतिवृत्त या कार्यालयास दिनांक ८/९/२०१६ रोजी प्राप्त झाले आहे. सदर इतिवृत्तातील मुद्दा क्र.२ नुसार महापालिकेच्या आवारात वरील पुतळा उभारणेस निविदा कार्यवाही करुनही प्रतिसाद न मिळाल्याने विशेष बाब म्हणून सदर काम श्री.विजय शिरगांवकर यांना देणेचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेकरीता सादर करणेबाबत नमुद आहे.

यामध्ये असे स्पष्ट केले करण्यात येते की, मा.महापौर सो. यांचे दालनात झालेल्या बैठकीत उपस्थित केलेल्या मुदद्यातील मुद्दा क्र.३) शासनाची मान्यता मिळणेपूर्वी मुद्दा क्र.१) मुख्य वास्तु शास्त्रज्ञ यांची मान्यता व मुद्दा क्र.२) पुतळयाच्या क्ले मॉडेलला कला संचनालयाची मान्यता संबंधित वास्तुविशारदा यांनी घेणे असते. श्री.विजय शिरगांवकर यांना कामाचे कार्यारंभ आदेश दिल्यास ते स्वत:च वरील मुद्दा क्र.१ व २ ची पूर्तता करतील.

वरील सर्व बाबींचा विचार करता वरील कामास वेळेचा होणारा अपव्यव टाळण्याकरीता दिनांक ८/९/२०१६ च्या इतिवृत्तातील मुद्दा क्र.२ नुसार महापालिकेच्या आवारात वरील पूर्णाकृती पुतळा बनविण्याच्या कामाकरीता येणारा रु. १७.५० लक्ष एवढया खर्चास मान्यता मिळून सदर कामाची अत्यावश्यकता पाहता सदर काम मुंबई महापालिका अधिनियमाचे प्रकरण ५ (२) (२) अंतर्गत श्री.विजय शिरगांवकर यांना कामाचे कार्यारंभ आदेश निर्गमित करणेस सदर प्रस्ताव मा.स्थायी समितीसमोर ठेवणेकरीता मान्यता मिळणेस्त प्रस्तावित.

<u>स्थायी समिती ठराव क्र. </u> ७६ <u>दिनांक:—२९/९/२०१६</u>

सूचकाचे नांव : श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नांव : श्री. विजय पाटील

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महापालिका आवारात महात्मा ज्योतिबा फुले यांचा पुतळा उभारणेकरीता विशेष बाब म्हणुन रु.१७.५० लक्ष रक्कमेच्या खर्चास वित्तीय मान्यता देवुन सदर कामाची निविदा न मागविता मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियमाचे प्रकरण ५ (२) (२) अंतर्गत श्री.विजय शिरगांवकर यांना कामाचे कार्यारंभ आदेश निर्गमित करणेस खालील ३ अटींच्या पुर्ततेच्या अधिन राहून मान्यता देत आहे.
१) पुतळया संबंधित मुख्य वास्तु शास्त्रज्ञ महाराष्ट्र राज्य यांचेकडील प्रमाणपत्र उपलब्ध करुन देणे.
२) पुतळयाच्या क्ले मॉडेलला कला संचालनालयाची मान्यता घेतल्याबाबतचे प्रमाणपत्र उपलब्ध करुन देणे.
३) स्थानिक स्वराज्य संस्था/ निम शासकीय संस्था/ शासकीय कार्यालय या मध्ये पुतळा उभारावयाचा झाल्यास संबंधित मंत्रालयीन विभागाकडून घेतलेले ना हरकत प्रमाणपत्र उपलब्ध करुन देणे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची <u>सही/—</u>

अनुमोदकाची <u>सही/—</u>

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ८ वाचुन दाखवितात

---

➡ **विषय क्र. ८ :—** उल्हासनगर महापालिका आवारात पुज्य साई झुलेलाल यांचा पुतळा उभारणेकरीता विशेष बाब

म्हणुन रु.१७.५० लक्ष रक्कमेच्या खर्चास वित्तीय मान्यता मिळून सदर कामाची निविदा न मागविता मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियमाचे प्रकरण ५ (२) (२) अंतर्गत श्री.विजय शिरगांवकर यांना कामाचे कार्यारंभ आदेश निर्गमित करणेस मा.स्थायी समितीची मान्यता मिळणे.

---

**महापालिका सचिव :—**सदर विषय पारीत करण्यात यावा का?

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—**सदर विषय पारीत करण्यात यावा तसेच सदर विषयाच्या ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता करण्यात यावी.

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ८ :—** उल्हासनगर महापालिका आवारात पुज्य साई झुलेलाल यांचा पुतळा उभारणेकरीता विशेष बाब म्हणुन रु.१७.५० लक्ष रक्कमेच्या खर्चास वित्तीय मान्यता मिळून सदर कामाची निविदा न मागविता मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियमाचे प्रकरण ५ (२) (२) अंतर्गत श्री.विजय शिरगांवकर यांना कामाचे कार्यारंभ आदेश निर्गमित करणेस मा.स्थायी समितीची मान्यता मिळणे.

**प्रस्तावना**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये उल्हासनगर महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयाच्या आवारात **पुज्य साई झुलेलाल** यांचा पुतळा महापालिकेच्या आवारात उभारणेबाबत महासभा ठराव क्र. १०५, दिनांक २०/११/२००३ अन्वये झालेला आहे. शासन निर्णय दिनांक २/२/२००५ मधील पुतळा उभारणेसंबंधिच्या मार्गदर्शक तत्वांप्रमाणे आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करुन इकडील पत्र क्र.उमपा/साबांवि/शअ/१५५/२००७ दिनांक १६/७/२००७ अन्वये सदर प्रस्ताव मंजूरीस्तव मा.जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे मान्यतेकरीता सादर केला होता.

मा.जिल्हाधिकारी, ठाणे यांनी त्यांचेकडील पत्र क्र.गृह/का—१/पुतळा/वशी—३४६ दिनांक १४/६/२०१० व दिनांक २२/६/२०१० अन्वये सदरच्या विषयातील पुतळा उभारणेकामी शासन निर्णय दिनांक २/२/२००५ मधील पुतळे उभारण्यासंबंधिच्या मार्गदर्शक तत्वांप्रमाणे खालील आवश्यक कागदपत्रांची पूर्तता होणे अपेक्षित असल्याने खालील तीन त्रृटी असल्याचे कळविले आहे.

१) पुतळया संबंधित मुख्य वास्तु शास्त्रज्ञ महाराष्ट्र राज्य यांचेकडील प्रमाणपत्र.

२) पुतळयाच्या क्ले मॉडेलला कला संचालनालयाची मान्यता घेतल्याबाबतचे प्रमाणपत्र.

३) स्थानिक स्वराज्य संस्था/ निम शासकीय संस्था/ शासकीय कार्यालय या मध्ये पुतळा उभारावयाचा झाल्यास संबंधित मंत्रालयीन विभागाकडून घेतलेले ना हरकत प्रमाणपत्र.

उपरोक्त मुद्दयांपैकी मुद्दा क्र.३ ची पूर्तता करणेकरीता शासनाकडून सदर ना हरकत मिळणेकरीता इकडील पत्र क्र. १) क्र.८३—ए दिनांक ७/६/२००४ २) क्र.४५ दिनांक १९/५/२००५ ३) क्र.२५९ दिनांक २२/११/२००७ ४)क्र.३१८ दिनांक १४/१/२००८ ५) क्र.१२७ दिनांक १३/१०/२००८ ६) क्र.२३७ दिनांक ५/१२/२००९ च्या पत्रांनुसार तसेच वैयक्तिकरित्या पाठपुरावा सुरु आहे. परंतू अद्याप शासनाकडूनही प्रस्तावास मान्यता मिळालेली नाही. महाराष्ट्र क्रांती लहुजी सेना सामाजिक संघटना यांचे दिनांक ३०/७/२०१६ रोजीच्या विनंती पत्रा समवेत शिल्पकार श्री. विजय शिरगांवकर यांनी दिलेले दरपत्रकानुसार पुतळयाची अंदाजित खर्च रुपये १७,५०,०००/— लक्ष रुपयांच्या आसपास असेल.

महापालिकेस रु. १७.५० लक्ष खर्च करावयाचा असल्यास प्रचलित नियमानुसार ई निविदा प्रक्रिया राबवून काम करणे आवश्यक आहे. तथापी, पुतळा बसविणे हे काम इतर दैनंदिन कामासारखे नाही. हे काम शिल्पकलेमधील तज्ञ व्यक्तिकडून करुन घेणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर कामाची निविदा काढणे यथोचित करणार नसल्याने श्री.विजय शिरगांवकर हे महाराष्ट्र मधील नामांकीत शिल्पकार असून आज पर्यंत त्यांनी अनेक पुतळे बनविलेले असून त्यांची गुणवत्ता अत्यंत चांगली असल्याचे बोलले जाते. त्यांनी आपल्या बाजूच्या कुळगांव बदलापूर नगरपालिका व खाली त्यांनी बनविलेल्या महान पुरुषांच्या शिल्पाची कामे केलेली आहेत.

**दोन पायावर झेपावणारे फोर्सेबल पुतळे :—**

१. झाशीच्या राणीचा अश्वारुढ फोर्सेबल पुतळा, धनवटे रंगमंदीर समोर, नागपूर, १५ फुट उंचीचा (११—११—१९६२)
२. छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारुढ पुतळा, कोटोसमोर, नाशिक, १२ फुट उंचीचा (६—१—१९७७)
३. छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारुढ पुतळा, मालेगांव १२ फुट उंचीचा (१९७३)
४. छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारुढ पुतळा, रत्नागिरी १२ फुट उंचीचा (१९८४)
५. छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारुढ पुतळा, शेतकरी साखर कारखाना, माधवनगर, सांगली (१९८९)

**तीन पायवावर झेपावणारे फोर्सेबल पुतळे :—**

६. छत्रपती शिवाजी महाराजांचा १२ फुट उंचीचा अश्वारुढ पुतळा, भाजीमार्केट सांगली (३१—०७—१९६२)
७. छत्रपती शिवाजी महाराजांचा १२ फुट उंचीचा अश्वारुढ पुतळा, मासुंदा तलाव, ठाणा (२२—६—१९६४)
८. वीर ताराबाईचा अश्वारुढ १२ फुट उंचीचा पुतळा, ताराबाई विद्यापिठ, कोल्हापूर (२३—२—१९७२)
९. छत्रपती शिवाजी महाराजांचा १२ फुट उंचीचा अश्वारुढ पुतळा, देवळाली रोड, नाशिक (१—२—१९७१)
१०.छत्रपती शिवाजी महाराजांचा १२ फुट उंचीचा अश्वारुढ पुतळा, कलंबर साखर कारखाना, नांदेड (१—२—१९७९)
११.छत्रपती शिवाजी महाराजांचा १२ फुट उंचीचा अश्वारुढ पुतळा, राहूरी साखर कारखाना, राहूरी (३१—९—१९८२)
१२.छत्रपती शिवाजी महाराजांचा १२ फुट उंचीचा अश्वारुढ पुतळा, पनवेल नगरपालिका, पनवेल.
१३.छत्रपती शिवाजी महाराजांचा १२ फुट उंचीचा अश्वारुढ पुतळा खोपोली नगरपालिका, खोपोली.
१४.छत्रपती शिवाजी महाराजांचा १२ फुट उंचीचा अश्वारुढ पुतळा, लोणावळा नगरपालिका, लोणावळा.
१५.छत्रपती शिवाजी महाराजांचा १२ फुट उंचीचा अश्वारुढ पुतळा, पाचोरा नगरपालिका, पाचोरा.

**इतर काही कलात्मक पुतळे :—**

१६.भाऊसाहेब हिरे यांचा ९ फुट उंचीचा पुतळा, मालेगांव
१७.भाऊसाहेब हिरे यांचा ९ फुट उंचीचा पुतळा, साखर कारखाना दाभाडी, मालेगांव
१८.पं.जवाहरलाल नेहरु यांचा ९ फुट उंचीचा पुतळा, नाशिक गार्डन, नाशिक.
१९.माधवराव बोरस्ते यांचा ९ फुट उंचीचा पुतळा, नेफाड साखर कारखाना, नेफाड.
२०.महात्मा ज्योतिबा फुले यांचा १२ फुट उंचीचा पुतळा, मालेगांव नगरपालिका, मालेगांव
२१.पं.लालबहादुर शास्त्री यांचा ६ फुट उंचीचा पुतळा, सिंदीया शिपीं कॉर्पोरेशन, मुंबई.
२२.यशवंतराव चव्हाण यांचा ९ फुट उंचीचा पुतळा, कऱ्हाड.
२३.यशवंतराव चव्हाण यांचा ९ फुट उंचीचा पुतळा, साखर कारखाना कऱ्हाड.
२४.डॉ.आंबेडकर यांचा ६ फुट उंचीचा पुतळा, पनवेल महानगरपालिका, पनवेल.
२५.डॉ.आंबेडकर यांचा ६ फुट उंचीचा पुतळा, सुरत नगरपालिका, सुरत.
२६.बॅ.स्वातंत्र्यविर सावरकर यांचा बस्ट ३ फुट उंचीचा पुतळा, पनवेल महानगरपालिका, पनवेल
२७.केकूबाददाबू यांचा ३ फुट उंचीचा पुतळा, मिरची बाजार, नागपुर
२८.भाऊसाहेब हिरे यांचा ३ फुटी बस्ट पुतळा, त्र्यंबकेश्वर
२९.हुतात्मा शहिद शंकर यांचा ६ फुटी बस्ट पुतळा, मिरची बाजार, नागपूर
३०.डॉ.आंबेडकर यांचा ६ फुट उंचीचा पुतळा, खोपोली महानगरपालिका, खोपोली.

३१.कै.जयरामजी अंबेरकर स्मारक समिती तर्फे पुतळा, अंबपूर ता.बिलोली, जि.नांदेड

३२.कै.सुवत प्रसाद त्रिवेदी यांचा ३ फुट उंचीचा बेस्ट पुतळा, नागपूर

३३.कै.माधवराव बोरस्ते यांचा ३ फुट उंचीचा बेस्ट पुतळा, ओझर, जि.नाशिक

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे ब्रॉझचे पूर्णाकृती पुतळे :—**

३४.भिमवडी रहिवासी संघ (रजि.) डॉ.बाबासाहेब आंबेडकर गौतमनगर, उद्यान, भिमवाडी पी.एल.लोखंडे मार्ग, गोवडी मुंबई.

३५.डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा समिती, आंबेडकर चौक पतंगराव घाटकोपर, मुंबई.

३६.चिपळून नगरपरिषद बहादूर शेख नाका ता.चिपळूण जिल्हा रत्नागिरी.

३७.आंबेडकर चौक ता.अहमदपुर जिल्हा लातूर,

३८.मिरा भाईंदर महानगरपालिका ता.जिल्हा ठाणे.

३९.कल्याण डोंबिवली महानगरपालिका ता.कल्याण जिल्हा ठाणे.

४०.अलिबाग नगरपरिषद ता.अलिबाग, जिल्हा रायगड

४१.सुत्रापाडा नगरपालिका ता.सुत्रापाडा जिल्हा जुनागड गुजरात.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे ब्रॉझचे अर्धाकृती पुतळे :—**

४२.मुंबई पोर्ट ट्रस्ट डॉकयार्ड मुंबई.

४३.मिरा भाईंदर महानगरपालिका ता.जिल्हा ठाणे.

४४.मुर्तवडे बुध्दविहार मु.पो.मुर्तवडे, ता.चिपळूण, जिल्हा रत्नागिरी.

वरीलप्रमाणे शिल्पकार श्री.विजय शिरगांवकर यांनी केलेली कामे पहाता त्यांना आपल्या

उल्हासनगर महानगरपालिकेच्या मुख्य आवारात **पुज्य साई झुलेलाल यांचे पूर्णाकृती (१० फुट उंचीचे) पुतळा** तयार करण्याचे काम दिल्यास ते चांगल्या प्रकारे करु शकतात. तसेच सदर पुतळा पूर्णाकृती बनविण्याकरीता पुतळयाच्या क्ले मॉडेलला कला संचालनालयाची मान्यता श्री.शिरगांवकर यांनी त्यांचेतर्फे घेणे आवश्यक आहे. सदर मान्यता प्राप्त झाल्यानंतरच श्री.शिरगांवकर यांना सदर कामाचे कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात येईल.

उक्त विषयाबाबत मा.महापौर सो.यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ९ ऑगस्ट, २०१६ रोजी दुपारी ३.०० वाजता बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीचे इतिवृत्त या कार्यालयास दिनांक ८/९/२०१६ रोजी प्राप्त झाले आहे. सदर इतिवृत्तातील मुद्दा क्र.२ नुसार महापालिकेच्या आवारात वरील पुतळा उभारणेस निविदा कार्यवाही करुनही प्रतिसाद न मिळाल्याने विशेष बाब म्हणून सदर काम श्री.विजय शिरगांवकर यांना देणेचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेकरीता सादर करणेबाबत नमुद आहे.

यामध्ये असे स्पष्ट केले करण्यात येते की, मा.महापौर सो. यांचे दालनात झालेल्या बैठकीत उपस्थित केलेल्या मुदद्यातील मुद्दा क्र.३) शासनाची मान्यता मिळणेपूर्वी मुद्दा क्र.१) मुख्य वास्तु शास्त्रज्ञ यांची मान्यता व मुद्दा क्र.२) पुतळयाच्या क्ले मॉडेलला कला संचनालयाची मान्यता संबंधित वास्तुविशारदा यांनी घेणे असते. श्री.विजय शिरगांवकर यांना कामाचे कार्यारंभ आदेश दिल्यास ते स्वत:च वरील मुद्दा क्र.१ व २ ची पूर्तता करतील.

वरील सर्व बाबींचा विचार करता वरील कामास वेळेचा होणारा अपव्यव टाळण्याकरीता दिनांक ८/९/२०१६ च्या इतिवृत्तातील मुद्दा क्र.२ नुसार महापालिकेच्या आवारात वरील पूर्णाकृती पुतळा बनविण्याच्या कामाकरीता येणारा रु. १७.५० लक्ष एवढया खर्चास मान्यता मिळून सदर कामाची अत्यावश्यकता पाहता सदर काम मुंबई महापालिका अधिनियमाचे प्रकरण ५ (२) (२) अंतर्गत श्री.विजय शिरगांवकर यांना कामाचे कार्यारंभ आदेश निर्गमित करणेस सदर प्रस्ताव मा.स्थायी समितीसमोर ठेवणेकरीता मान्यता मिळणेस्त प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. ७७ दिनांक:— २९/९/२०१६

सूचकाचे नांव : श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नांव : श्री. विजय पाटील

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महापालिका आवारात पुज्य साई झुलेलाल यांचा पुतळा उभारणेकरीता विशेष बाब म्हणुन रु. १७.५० लक्ष रक्कमेच्या खर्चास वित्तीय मान्यता देवुन सदर कामाची निविदा न मागविता मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियमाचे प्रकरण ५ (२) (२) अंतर्गत श्री.विजय शिरगांवकर यांना कामाचे कार्यारंभ आदेश निर्गमित करणेस खालील ३ अटींच्या पुर्ततेच्या अधिन राहून मान्यता देत आहे.

१) पुतळया संबंधित मुख्य वास्तु शास्त्रज्ञ महाराष्ट्र राज्य यांचेकडील प्रमाणपत्र उपलब्ध करुन देणे.
२) पुतळयाच्या क्ले मॉडेलला कला संचालनालयाची मान्यता घेतल्याबाबतचे प्रमाणपत्र उपलब्ध करुन देणे.
३) स्थानिक स्वराज्य संस्था/ निम शासकीय संस्था/ शासकीय कार्यालय या मध्ये पुतळा उभारावयाचा झाल्यास संबंधित मंत्रालयीन विभागाकडून घेतलेले ना हरकत प्रमाणपत्र उपलब्ध करुन देणे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ९ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ९ :—** सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत निविदा प्रक्रीया केलेल्या उल्हासनगर—५ प्रभाग क्र.३८ येथील पटेल नगर मधील पाण्याच्या टाकीच्या कंपाउंड जवळील मोकळया जागेवर उद्यान विकसित करणे या कामाकरिता मे.मॉ भवानी कन्स्ट्रक्शन यांच्या निविदेस मान्यता मिळणेबाबत.

---

**सदस्या, डॉ. निना नाथानी :—**सदर उद्यान विकसित करण्यासाठी कोणी सांगितले होते.

**शहर अभियंता, श्री. राम जयस्वार :—** प्रभाग क्र. ३८ चे सदस्यांनी मागणी केली होती. पाण्याच्या टाकीजवळील मोकळया जागेवर उद्यान विकसित करणेबाबत.

**सदस्या, श्रीम. अंजली साळवे :—**शहरात पाण्याच्या टाक्या किती आहेत.

**सदस्या, डॉ. निना नाथानी :—**माझ्या प्रभागातील उद्यानाच्या टाकीखाली किती गर्दुल्ले येवून बसतात, मी किती वेळा सांगितले आहे कि त्या ठिकाणी उद्यान विकसित करा तर त्याकडे कोणी लक्ष दिले नाही.

**सदस्या, श्रीम. अंजली साळवे :—**शहरात पाण्याच्या टाक्या किती आहेत.

**शहर अभियंता, श्री. राम जयस्वार :—** संपूर्ण शहरात २१ ठिकाणी पाण्याच्या टाक्या आहेत.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—**या निविदेला कितीवेळा मुदतवाढ दिली आहे.

**शहर अभियंता, श्री. राम जयस्वार :—** सदरची माहिती आता मी देवू शकत नाही कारण कि माझ्या कडे संचिका नाही.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—**निविदेला कमीत कमी तीन निविदाकार स्पर्धक आले पाहिजेत ना?

**शहर अभियंता, श्री. राम जयस्वार :—** साहेब, माझ्याकडे संचिका नाही त्यामुळे मी काही सांगू शकत नाही.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>दोन निविदाकार यांनीच निविदा भरलेली दिसत आहे. तीन निविदाकार असणे आवश्यक आहे ना?

<u>शहर अभियंता, श्री. राम जयस्वार :– </u>जर सदर निविदेस एकदा मुदतवाढ दिली आणि त्यानंतरसुध्दा तीनपेक्षा कमी निविदाकार आले तर तसे करू शकतो.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>आर्थिक भाग उघडण्याचा दिनांक २५/८/२०१६ हे काय आहे.

<u>शहर अभियंता, श्री. राम जयस्वार :– </u>आमचे अधिकारी आता नाहीत, मी तुम्हाला नंतर माहिती देतो.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:– </u>तुम्ही संचिका मागवून घ्या ना तोपर्यंत सदर विषय प्रलंबित ठेवू या.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>मुख्य लेखा अधिकारी, आपण सांगा हे योग्य आहे का?

<u>मुख्य लेखा अधिकारी, श्री. दादासाहेब पाटील :–</u>नियम क्र. २२२ नुसार एक निविदा असेल तरीसुध्दा अपवादात्मक परिस्थितीत निविदा उघडू शकतो.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>एकाला एक नियम असे का? तीनपेक्षा कमी निविदाकार आले तर मुदतवाढ दिली पाहिजे ना, मग दोन निविदाकारांमध्येच हा प्रस्ताव कसा आणला आहे.

<u>शहर अभियंता, श्री. राम जयस्वार :– </u>निविदा प्रसिध्द केल्यानंतर पहिल्यांदा प्रतिसाद मिळाला नाही म्हणून दुस–यांदा मुदतवाढ दिलेली आहे.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u>प्रतिसाद मिळाला नाही तर मुदतवाढ देतो, मग दोनच निविदाकार आले असे कसे?

<u>शहर अभियंता, श्री. राम जयस्वार :– </u>निविदा

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>अशाप्रकारे यापूर्वी आपण काम केलेले आहे का? हे नियमानुसार आहे का?

<u>शहर अभियंता, श्री. राम जयस्वार :– </u>हो, अशाप्रकारे आपण दोन निविदाकारांमधून निवड करू शकतो.

<u>सदस्या, डॉ. निना नाथानी :–</u>अशाप्रकारच्या कामांसाठी सर्व उद्यानांचे एकत्र प्रस्ताव आणले पाहिजेत ना. देखभाल  दुरूस्तीअभावी पडीक झालेल्या उद्यानांमध्ये गर्दुल्ले येवुन बसतात, सगळीकडे घाण करतात, चांगली लोकं तिथे येवू शकत नाहीत.

<u>शहर अभियंता, श्री. राम जयस्वार :– </u>सन्मा. महोदया यांनी आता सांगितले आहे, तर त्यांचादेखील प्रस्ताव तयार करण्यात येईल.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u>आता आम्ही या प्रस्तावाला मंजूरी देतो परंतु यामधील तांत्रिक बाबी आपण तपासून बघा, अन्यथा आपल्या स्तरावर यावर योग्य ती कार्यवाही करा.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>आपल्याकडे शासनाचा कोणता निर्णय आहे का? मी तुम्हाला आणून दाखवेन, कोणत्याही कामासाठी निविदा मागविल्यास किमान तीन निविदाकार आले पाहिजेत त्यापेक्षा कमी निविदाकार आल्यास मुदतवाढ दयायची आहे, दोन–तीन वेळा आपण मुदतवाढ देवू शकतो.

<u>शहर अभियंता, श्री. राम जयस्वार :– </u>पहिल्यांदा अशी बाब निदर्शनास आल्यास सदर निविदेस मुदतवाढ दयावी लागते ना.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>मग यात आपण मुदतवाढ दिलीच नाही, सदरचा प्रस्ताव चुकीचा आहे, आमचा यास विरोध आहे. नियमाबाहेर आहे. असा प्रस्ताव आपण का आणला? शहर अभियंता म्हणुन आपलीच प्रस्तावावर सही आहे.

<u>शहर अभियंता, श्री. राम जयस्वार :—</u> महोदय, मी सदर प्रकरण बघून सांगतो, मुदतवाढ दिली आहे किंवा नाही.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>सदरच्या प्रस्तावाची संचिका मागवून घ्या, आणि तपासून सांगा.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>अशाप्रकारे मग आपण सगळयाच प्रस्तावांवर कार्यवाही करा ना, काही प्रस्तावावर वेगळे निर्णय घेतले जातात. असे नाही झाले पाहिजे.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>प्रत्येक विभागात कामाची एक पध्दत असली पाहिजे, सदर प्रकरणांमध्ये निविदा प्रसिध्द केली आहे, ८ दिवसांचा कालावधी दिला आहे त्यामध्ये, निविदेस प्रतिसाद न मिळालेले प्रस्ताव एवढे आहेत, त्यांस पुन्हा ठराविक कालावधीत मुदतवाढ दिली पाहिजे, परंतु असे होत नाही, एखादा नगरसेवकाने सदर बाब निदर्शनास आणून दिल्यानंतर मग त्या निविदेस मुदतवाढ देण्याची कार्यवाही केली जाते. निविदेशी संबंधित कर्मचा—याने निविदेच्या कार्यवाहीची आपोआपच विहीत कालावधीत योग्य ती कार्यवाही केली पाहिजे.

<u>मुख्य लेखा अधिकारी, श्री. दादासाहेब पाटील :—</u>ई निविदेमध्ये या बाबी आपोआपच होत असतात.

<u>कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा, श्री. सेलवन :—</u>ई निविदेमध्ये सदर बाबी आपोआप करता येणार नाही.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>जो कर्मचारी ई निविदेचे काम पाहतो त्याला आदेश देवून मॅन्युअली हया सर्व बाबी पाहिल्या गेल्या पाहिजेत. एखादया निविदेस विहीत मुदतीत प्रतिसाद मिळाला नाही तर विहीत मुदतीचा कालावधी संपल्यानंतर त्यांस मुदतवाढ देण्याबाबत ई—निविदेमध्ये तसे प्रस्तावित केले पाहिजे.

<u>शहर अभियंता, श्री. राम जयस्वार :—</u> महोदय, सदर विषय श्री. नागदेव, हे कर्मचारी पाहतात.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u> परंतु त्यांच्याकडून विहित मुदतीत काम होत नाही, त्यामुळे सर्व सदस्य नाराज आहेत, आणि आता हि कामे होण्याची गरज आहे. सद्यस्थितीत सदर विषय बाजूला ठेवू या, संचिका आणायला पाठविले आहे. नाहीतर मग सदर विषय वगळण्यात यावा.

<u>सदस्या, श्रीम. अंजली साळवे :—</u>माझ्या प्रभागातील पाण्याच्या टाकीखालच्या उद्यानाचा विषय मंजूर झालेला आहे तो प्रस्तावदेखील श्री. जयस्वार सभेपुढे घेवून यावे.

<u>शहर अभियंता, श्री. राम जयस्वार :—</u> विभागात संबंधित कर्मचारी नसल्याने संचिका मिळाली नाही.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—</u> आपण हा प्रस्ताव आणला आहे. सदर विषयाच्या गोषवा—यावर शहर अभियंता म्हणून तुम्ही सही केली आहे आणि आता आपण म्हणता कि मी संचिका बघून सांगतो. तर हे योग्य नाही. त्यामुळे सदर विषय वगळण्यात यावा असे वाटते. तसेच सदरचा विषय पुढील सभेत घेवून यावा.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>सचिव महोदया, जरा हा नियम वाचुन दाखवा.

<u>महापालिका सचिव :—</u> महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील संविदा प्रकरण ड मध्ये रू. २५ लाखापर्यंतच्या वित्तीय मंजूरीचे प्रस्ताव स्थायी समितीपुढे मान्यतेसाठी आले पाहिजेत.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>रू. ५ ते २५ लाखापर्यंतचे वित्तीय मंजूरीचे प्रत्येक प्रस्ताव स्थायी समितीपुढे आले पाहिजेत ना. प्रत्येक विभागाने १५ दिवसांचे आंत असे प्रस्ताव स्थायी समितीपुढे आणले पाहिजेत ना, नियमाला धरून आहे ना, मग का नाही आणले जात,

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—</u> आता आपण इथे एक ठराव करून दयायला पाहिजे कि, रू. २५ लाखापर्यंतचे वित्तीय मंजूरीचे प्रस्ताव सर्व विभागांनी स्थायी समितीपुढे आणले पाहिजेत.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u> तसा नियम/ कायदाच आहे, सचिव महोदया, सदर नियम सभागृहास वाचून दाखवा.

<u>महापालिका सचिव :–</u> महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील संविदा प्रकरण ड मध्ये वाचुन दाखविले.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u> रू. २५ लाखापर्यंतचे वित्तीय मंजूरीचे प्रस्ताव स्थायी समितीच्या मान्यतेसाठी आले पाहिजेत आणि तसे होत नाही, म्हणजेच तुम्ही नियम डावलत आहात, रू. ५ ते २५ लाखाच्या दरम्यानचे सर्व प्रस्ताव, १५ दिवसात स्थायी समितीसमोर माहितीसाठी आले पाहिजे.

<u>उप.आयुक्त आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी, श्री.जमीर लेंगरेकर :–</u>रू. २५ लाखापर्यंतचे वित्तीय मंजूरीचे प्रस्ताव स्थायी समितीच्या मान्यतेसाठी १५ दिवसांच्या आंत आणण्याचे सर्व विभागप्रमुखांना आदेश देतो.

<u>महापालिका सचिव :–</u> सदर विषय पारीत करण्यात यावा का?

<u>काही सदस्य :–</u>सदर विषय वगळण्यात यावा.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ९** :–सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत निविदा प्रक्रीया केलेल्या उल्हासनगर–५ प्रभाग क्र.३८ येथील पटेल नगर मधील पाण्याच्या टाकीच्या कंपाउंड जवळील मोकळया जागेवर उद्यान विकसित करणे या कामाकरिता मे.मॉ भवानी कन्स्ट्रक्शन यांच्या निविदेस मान्यता मिळणेबाबत.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिका प्रभाग क्षेत्र क्र.४ मधील मंजुरी मिळालेल्या **उल्हासनगर–५ प्रभाग क्र.३८ येथील पटेल नगर मधील पाण्याच्या टाकीच्या कंपाउंड जवळील मोकळया जागेवर उद्यान विकसित करणे** या कामांकरीता बी–१ प्रकारच्या दोन भाग (तांत्रिक व आर्थिक) पध्दतीने नोंदणीकृत ठेकेदारांकडून दिनांक १२/०७/२०१६ रोजी निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्राकलनीय खर्च | रु.२४०००००/– |
| २ | निविदा प्रसिध्द केलेली वर्तमानपत्रे | |
| ३ | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक १२/०७/२०१६ |
| ४ | निविदा विक्री कालावधी | दिनांक १४/०७/२०१६ ते ०४/०८/२०१६ |
| ५ | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक ११/०८/२०१६ |
| (अ) | प्रथम मुदतवाढ | |
| ब) | द्वितीय मुदतवाढ | |
| क) | तृतीय मुदतवाढ | |
| ६ | तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | दिनांक १६/०८/२०१६ |
| ७ | आर्थिक भाग उघडण्याचा दिनांक | दिनांक २५/०८/२०१६ |
| ८ | विक्री केलेल्या निविदांची संख्या | २ |

| | | |
|---|---|---|
| ९ | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | २ |

दिनांक १६/०८/२०१६ रोजी मा.अतिरिक्त आयुक्त, मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक, शहर अभियंता यांचे उपस्थितीत **उल्हासनगर–५ प्रभाग क्र.३८ येथील पटेल नगर मधील पाण्याच्या टाकीच्या कंपाउंड जवळील मोकळया जागेवर उद्यान विकसित करणे** या कामाच्या निविदेचा तांत्रिक भाग उघडण्यात आला त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | निविदाकाराच्या निविदेमधील बाबी | मे. शुभम कन्स्ट्रक्शन | मे. माँ भवानी कन्स्ट्रक्शन |
|---|---|---|---|
| १ | निविदा प्रपत्रकाच्या खरेदीची रक्कम भरलेली आहे का? | होय | होय |
| २ | इसारा रक्कम भरलेली आहे का? | होय | होय |
| ३ | अद्यावत आयकर रिटर्न भरल्याची पावती | होय | होय |
| ४ | कामाचा अनुभव | होय | होय |
| ५ | पॅन कार्डाची प्रत | होय | होय |
| ६ | संस्था/कंपनी नोंदणी (भागिदारी, मालकी, कंपनी इत्यादीचे) दस्तऐवज | होय | होय |

सदर निविदांची सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये छाननी समिती मार्फत छाननी केली असता १) **मे. शुभम कन्स्ट्रक्शन** २) **मे. माँ भवानी कन्स्ट्रक्शन** यांच्या निविदा अटी शर्तीनुसार असल्याने पात्र आहेत. तरी उपरोक्त निविदाकारांच्या निविदांचा दुसरा भाग उघडण्यात प्रस्तावित करण्यात आले.

मा. महापौर यांचे दालनामध्ये दिनांक १५ सप्टेंबर, २०१५ रोजी ई–निविदेची आढावा बैठक घेण्यात आली होती. त्याअनुषंगाने ई–निविदेचा लिफाफा क्र.१ व २ वर एकाच वेळी उघडण्यात यावे. असे निर्देश देण्यात आले आहे. त्यामुळे सदर निविदेचे आर्थिक व तांत्रिक भाग उघडण्यात आला आहे.

आज दिनांक २५/०८/२०१६ रोजी उपरोक्त निविदाकारांचा आर्थिक बाबींचा दुसरा भाग (आर्थिक दर) मा. अतिरिक्त आयुक्त सो., यांचे अध्यक्षतेखालील निवड समिती सदस्य मुख्य लेखाअधिकारी, मुख्य लेखापरिक्षक, शहर अभियंता, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे उपस्थितीत उघडण्यात आला. त्याप्रमाणे निविदाकारांनी दिलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

**१) मे. शुभम कन्स्ट्रक्शन** दिलेले दर दरसूचीप्रमाणे

**२) मे. माँ भवानी कन्स्ट्रक्शन** दिलेले दर ०.०१ टक्के कमी

उपरोक्त **उल्हासनगर–५ प्रभाग क्र.३८ येथील पटेल नगर मधील पाण्याच्या टाकीच्या कंपाउंड जवळील मोकळया जागेवर उद्यान विकसित करणे** या कामाचे उक्त निविदाकारांपैकी **मे. माँ भवानी कन्स्ट्रक्शन** यांनी दरसूची वर ०.०१ टक्के कमी (0.01% below) प्रमाणे दर दिले असुन त्याप्रमाणे **मे. माँ भवानी कन्स्ट्रक्शन** यांची सदर काम देणेकरिता शिफारस करण्यात येत आहे.

तरी **मे. माँ भवानी कन्स्ट्रक्शन** यांच्या ०.०१ टक्के कमी दराचे निविदेस मा. स्थायी समितीची मान्यता मिळणेकरिता प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. ७७ अ दिनांक:– २९/९/२०१६

सूचकाचे नांव : श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नांव : श्री. विजय पाटील

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत निविदा प्रक्रीया केलेल्या उल्हासनगर–५ प्रभाग क्र.३८ येथील पटेल नगर मधील पाण्याच्या टाकीच्या कंपाउंड जवळील मोकळया जागेवर उद्यान विकसित करणे या कामाकरिता मे.मॉ भवानी कन्स्ट्रक्शन यांच्या ०.०१ टक्के कमी दराचे निविदेस मान्यता देण्याचा प्रस्ताव वगळण्यात येत आहे.

सुचकाची सही/–
अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. १० वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १० :–** उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील विविध विकास कामांचे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखा परिक्षण करणेकरीता मागविण्यात आलेल्या निविदेमध्ये निम्न दराचे मे.वेबकॉस प्रा. लिमि. यांची नियुक्ती करणेस तसेच विधानसभा तारांकीत प्रश्नाद्वारे उपस्थित केलेल्या रस्त्यांवरील खड्डे भरणेच्या कामाचेही लेखा परिक्षण मे.वेबकॉस प्रा.लिमि.यांचेकडून करुन घेण्यास मान्यता देणे.

---

सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भूल्लर :–सदर विषय जरा सांगा काय आहे ते.

शहर अभियंता, श्री. राम जयस्वार :– महाराष्ट्र शासनाचा शासननिर्णय आहे. त्यात रू. ५० लाखावरील कामाचे थर्ड पार्टी ऑडीट होणे आवश्यक आहे.

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–मला एवढेच सांगा कि, शासनाने हा नियम कधी केला होता, आणि हा विषय आता का येत आहे.

शहर अभियंता, श्री. राम जयस्वार :– महाराष्ट्र शासनाचा शासननिर्णय सन २००९ चा आहे.

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–सन २००९ पासून आतापर्यंत असे ऑडीट करण्यासाठी आपल्याकडून कोणाची नेमणूक आतापर्यंत का केली नाही. खुलासा केलात तर बरे होईल.

शहर अभियंता, श्री. राम जयस्वार :– मागे अशाप्रकारचा प्रस्ताव केला होता, नागपुर अधिवेशनामध्ये मा. आमदार, श्रीम. ज्योती कलानी महोदया यांनी हा मुदद्ा उपस्थित केला होता, त्यांवर आयुक्तांनी आश्वासन दिले होते कि, आम्ही व्हीजेटीआय कडून ऑडीट करून घेवू. तसे ऑडीटही करून घेतले परंतु अद्याप त्यांचे देयक अदा केलेले नाही.

सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भूल्लर :– त्यावेळेस जे खडड्े बुजवले आता ते उघडले आहेत त्याचे ऑडीट कसे होणार?

सदस्या, श्रीम. अंजली साळवे :–माझ्या प्रभागातील खडड्े बुजविण्याचे काम झालेलेच नाही,

सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भूल्लर :– मी सगळयांना विनंती करतो कि, सदरचा विषय हा महापालिकेच्या फायदयाचा विषय आहे. आज आपण जेव्हा ठेकेदाराला काम देतो, तेव्हा आपण तक्रार करतो कि, डांबर बरोबर

नाही, सिमेंट बरोबर नाही, किंवा योग्य माल वापरत नाही म्हणून अशावेळी थर्ड पार्टी ऑडीट होणे आवश्यक आहे.

सदस्य, श्री. विजय पाटील :– माझ्या प्रभागात आजपर्यंत अजिबात काम झालेले नाही,

शहर अभियंता, श्री. राम जयस्वार :– 'ड' वर्ग महानगरपालिकांसाठी रू. ५० लाख पर्यंतच्या कामाचे लिमीटेशन आहे.

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :– आम्हाला कंपनीने सादर केलेल्या दरांचा तक्ता तर सांगा, त्याप्रमाणे ऑडीट करून घेणेसाठी महापालिकेला किती खर्च येणार आहे.

शहर अभियंता, श्री. राम जयस्वार :– मे. वेबकॉस कंपनीने बिटूमिनस रोडसाठी, सी.सी रोडसाठी रू. ६५,०००/– इतके कमी दर दिलेले आहेत. तुलनेने एसजीएस कंपनीने दिलेले दर खुप जास्त आहेत.

मुख्य लेखा अधिकारी, श्री. दादासाहेब पाटील :– केंद्र शासन मान्यताप्राप्त कंपनी आहे.

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :– रू. ५० लाखापेक्षा कमी खर्चाचे काम असेल तर....

शहर अभियंता, श्री. राम जयस्वार :– तर त्याप्रमाणे ऑडीटचे दर कमी होतील.

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :– या प्रस्तावामध्येसुध्दा दोन निविदाकार यांनी दर सादर केलेले आहेत, सदर निविदेमध्ये मुदतवाढ दिली होती का?

शहर अभियंता, श्री. राम जयस्वार :– ६ वेळा मुदतवाढ दिली होती कोणीच प्रतिसाद देत नव्हते.

मुख्य लेखा अधिकारी, श्री. दादासाहेब पाटील :–पुर्वी आपण रू. ५० लाखाच्यावरील कामांचे व्हीजेटीआयकडून ऑडीट करून घेत होतो. त्यानंतर आमच्याकडे कामाचा खुप ताण असल्यामुळे आम्ही हे काम करणार नाही असे त्यांनी पत्र दिले होते, वेबकास हि कंपनी केंद्र शासन मान्यताप्राप्त आहे.

महापालिका सचिव :– सदर विषय पारीत करण्यात यावा का?

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–सदरचा विषय पुढील सभेत आणण्यात यावा. तोपर्यंत सदर विषय वगळण्यात यावा.

काही सदस्य :–सदर विषय वगळण्यात यावा.

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १०** :–उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील विविध विकास कामांचे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखा परिक्षण करणेकरीता मागविण्यात आलेल्या निविदेमध्ये निम्न दराचे मे.वेबकॉस प्रा. लिमि. यांची नियुक्ती करणेस तसेच विधानसभा तारांकीत प्रश्नाद्वारे उपस्थित केलेल्या रस्त्यांवरील खड्डे भरणेच्या कामाचेही लेखा परिक्षण मे.वेबकॉस प्रा.लिमि.यांचेकडून करुन घेण्यास मान्यता देणे.

प्रस्तावना

शासनाने नगरविकास विभागाकडील दिनांक २ मार्च, २००९ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार विकास कामांची त्रयस्थ संस्थेकडुन तांत्रिक लेखा परिक्षण करुन घेण्याचे आदेश दिलेले आहेत. सदर आदेशातील परिच्छेद–४ मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थाचे वर्गवारी प्रमाणे अनिवार्य तांत्रिक लेखा परिक्षणासाठी किमान किंमत दिलेली आहे. सदर तांत्रिक तपासणीवरील खर्च भागविण्यासाठी महापालिका अर्थसंकल्पामध्ये आवश्यक ती तरतुद करण्याचे आदेश आहेत.

उल्हासनगर महानगरपालिका 'ड' वर्ग महानगरपालिकेमध्ये समाविष्ट असल्याने उक्त तरतुदीनुसार रु. ५०.०० लक्ष पेक्षा अधिक किंमतीच्या सर्व कामांची जिल्हयातील शासकीय

अभियांत्रिकी/तंत्रज्ञान/वास्तुशास्त्र/महाविद्यालय/शासकीय तंत्रनिकेतन ते शक्य नसल्यास अथवा त्यांना सल्लागारांचे काम करणे शक्य नसल्यास आपल्या क्षेत्रातील उपरोक्त संस्थेपैकी एका त्रयस्थ संस्थेकडुन तांत्रिक लेखा परिक्षण (Third Party Audit) करुन घेणेकामी अशा संस्थांच्या प्राचार्यांशी संपर्क करावा. तसेच ज्याठिकाणी तांत्रिक लेखा परिक्षणाची गरज आहे किंवा ज्याठिकाणी एखादया प्रकल्पाच्या विशिष्ट स्वरुपाचा विचार करता विशिष्ट कौशल्य असलेल्या लेखा परिक्षकाची नियुक्ती करण्याची गरज आहे त्याठिकाणी निविदा प्रक्रियेतुन सुयोग्य तांत्रिक संस्था/तज्ञ व्यक्तीची तांत्रिक लेखा परिक्षक म्हणून नियुक्ती करावी व रु.५०.०० लक्ष किंमतीच्या कमी कामांच्या संदर्भात Random पध्दतीने किमान १० टक्के कामांचे त्रयस्थ तांत्रिक लेखा परिक्षण करुन घ्यावे असे आदेश आहेत.

त्यानुसार महापालिकेने दि.२१ मार्च, २०१२ च्या पत्रान्वये १. वीरमाता जिजाबाई टेक्नॉलॉजिकल इन्स्टीटयूट (VJTI) मुंबई २. गर्व्हमेंट पॉलीटेक्नीक, मुंब्रा ३. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे इत्यादी संस्थांना कळविले होते. त्यापैकी विरमाता जिजाबाई टेक्नॉलॉजीकल इन्स्टीटयुट (VJTI) मुंबई या संस्थेने E-mail द्वारे प्रतिसाद दिला. त्यांनी E-mail द्वारे प्रतिसाद दिनांक २०/११/२०१२ रोजी कामाचे शुल्क प्रति रस्ता रु.२,१०,०००/– अधिक सेवा कर १२.३६ टक्के शुल्क सुरु करणेपुर्वी आगावु धनादेश संचालक, व्ही.जे.टी.आय. यांचे नांवाने सादर केल्यावर १२ आठवडयाचे कालावधीत सुरु करण्यात येईल. तसेच तांत्रिक लेखा परिक्षण यंत्रणेस आवश्यक ते सहकार्य करणे अशा अटी नमुद केल्या होत्या.

त्यानुसार महापालिकेने व्ही.जे.टी.आय. या संस्थेकडुन Third Party Audit (Conditional Survey) करुन घेणेकामीच्या प्रस्तावास स्थायी समिती ठराव क्र.५४, दिनांक २३/०१/२०१३ अन्वये मान्यता प्राप्त झाल्यावर त्यांना कामाचे आदेश दिले होते. तीन वर्षाचे कालावधीत त्यांनी दोन रस्त्यांचे तांत्रिक लेखापरिक्षण झाले. त्यांनी तांत्रिक लेखा परिक्षणाचे कामास विलंब लावल्याने व कामांची संख्या जास्त असल्याने शासन निर्णयातील परिच्छेद–३ मधील तरतुदीनुसार निविदा कार्यवाहीचे प्रस्तावास मा. आयुक्तांची मान्यता प्राप्त झाल्यावर निविदा कार्यवाही करण्यात आली. त्यामध्ये निविदेस ६ वेळा मुदतवाढ देवूनही १. मे. एस.जी.एस.ई. प्रा.लि. २. मे. व्हेपकॉस लि. या दोन संस्थांच्या निविदा प्राप्त झाल्या, सदर निविदाकार शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे निविदा भरु शकत नाही.

Company Name WAPCOS LTD

| Sr. No. | Estimate Cost of Works ( In INR) | Bituminous Road (In INR) | CC Road (IN INR) | Buildings (In INR) | Bridges (IN INR) |
|---|---|---|---|---|---|
| 01 | Up to 50 Lacs | 65000 | 65000 | 70000 | 60000 |
| 02 | 50 Lacs to 2.50 Cr. | 120000 | 120000 | 130000 | 130000 |
| 03 | 2.50 Cr. to 5.00 Cr. | 250000 | 250000 | 270000 | 270000 |
| 04 | 5.00 Cr. to 10.00 Cr. | 350000 | 350000 | 350000 | 300000 |
| 05 | 10.00 Cr. And above | 475000 | 475000 | 500000 | 500000 |

Company Name : SGS India Private Limited

| Sr. No. | Estimate Cost of Works ( In INR) | Bituminous Road (In INR) | CC Road (IN INR) | Buildings (In INR) | Bridges (IN INR) |
|---|---|---|---|---|---|
| 01 | Up to 50 Lacs | 500000 | 500000 | 5000000 | 5000000 |
| 02 | 50 Lacs to 2.50 Cr. | 1000000 | 1000000 | 1000000 | 1000000 |
| 03 | 2.50 Cr. to 5.00 Cr. | 1500000 | 15000000 | 1500000 | 1500000 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 04 | 5.00 Cr. to 10.00 Cr. | 4000000 | 40000000 | 4000000 | 4000000 |
| 05 | 10.00 Cr. And above | 10000000 | 100000000 | 10000000 | 10000000 |

सदर निविदेचे मुदतीनंतर शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे यांचे पत्र प्राप्त झाले.

उक्त दोन संस्थानी १. डांबरीकरण रस्ता २. सिमेंट कॉक्रीटीकरण रस्ता ३. इमारत बांधकाम ४. पुल बांधकाम इ. कामांचे प्रकल्पाचे प्राकलनीय किंमतीवर दर दिले आहेत. उक्त दोन संस्थातील मे. एस.जी.एस.ई. लि. या संस्थेचे दर जास्त असून मे. व्हेपकॉस या संस्थेचे दर कमी आहेत. त्याअनुषंगाने शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे यांनी सदर निविदेसाठी तयारी दर्शविली आहे. त्याप्रमाणे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे यांनी सदर कामासाठी हमीपत्र पत्र क्र. १८९, दिनांक २८/०७/२०१५ रोजी या कार्यालयास दिले आहे

महापालिका क्षेत्रातील विकास कामांचे तांत्रिक लेखापरिक्षण करणे शासनाचे आदेशानुसार अनिवार्य

असल्याने आर्थिक खर्च विचारात घेता प्रस्तावाबाबत मुख्य लेखा अधिकारी यांनी VJTI या संस्थेचे प्राचार्य श्री.पी.डब्ल्यु. कुबडे यांचेशी दुरध्वनीद्वारे संपर्क केला असता त्यांनी रस्त्यांचे तांत्रिक लेखा परिक्षणाबाबत मागील रु.२,१०,००० अधिक सेवाकर १२.३६ टक्के प्रमाणे त्यांचे अटीप्रमाणे करणेस कामनिहाय आगाऊ रक्कम दिल्यास तयारी दर्शविली आहे व शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे यांचे दर मागवून तांत्रिक लेखा परिक्षण करणेचे कामांसाठी निविदा कार्यवाही करुन किफायतशीर दर दिलेल्या शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे या संस्थेची नियुक्ती करावी अथवा यापूर्वी नियुक्ती केलेल्या व्ही.जे.टी.आय. व अन्य संस्थेची त्यांचे अटीप्रमाणे कामनिहाय आगावु रक्कम देवून तुर्त प्रभाग समितीनिहाय सी.सी.पायवाटा, Potholes चे रस्त्यांचे कामनिहाय तांत्रिक लेखा परिक्षण करुन घेणेकरिताचे प्रस्तावित केले असता मा.आयुक्त सो. यांनी खड्डे भरणेच्या कामाचे त्रयस्थ संस्थेकडून लेखा परिक्षण करुन घेणेच्या विधानसभा तारांकीत प्रश्नावर मा.मंत्री महोदयांनी आश्वासन दिले असल्याने सदर खड्डे भरण्याच्या कामाचे लेखा परिक्षण व्ही.जे.टी.आय.यांचेकडून करुन घेणेबाबत सुचना दिल्या.

मा.आयुक्त सो. यांचे वरील सुचनेस अनुसरुन उल्हासनगर शहरातील रस्त्यांवरील खड्डे भरणेच्या कामाकरीता व्ही.जे.टी.आय., मुंबई यांचेकडून करुन घेणेकरीता त्यांना या कार्यालयाचे दिनांक ९/२/२०१६ व २२/३/२०१६ चे पत्रान्वये कळविले. परंतू व्ही.जे.टी.आय. चे प्राचार्य यांनी त्यांचे दिनांक २७/४/२०१६ चे पत्रान्वये सदर खड्डे भरण्याचे कामावर सुरवातीपासून त्यांचे निरीक्षण / पाहणी झालेली नसल्याने सदर कामावर कोणतीही तपासणी NDT अथवा Core Test बांधकामाकरीता वापरण्यात आलेल्या बांधकाम साहित्यावर करता येणार नाही असे कळविले. यावरुन ते खड्डे भरण्याच्या कामाचे लेखा परिक्षण करणार नसल्याचे समजते.

सद्यस्थितीत सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे शहरातील विविध विकास कामांचे त्रयस्थ संस्थेकडून लेखा परिक्षण करणेच्या कामाकरीता एजन्सी नेमणूकीकरीता निविदा प्रक्रिया करण्यात आली आहे. या निविदाप्रक्रियेत प्राप्त झालेल्या दोन निविदाकारांपैकी मे.वेबकॉस लिमि. यांचे दर कमी आहेत.

वरील संपूर्ण वस्तुस्थिती लक्षात घेता शहरातील विविध विकास कामांचे लेखा परिक्षण करणेकरीता मे.वेबकॉस यांचे दर कमी असल्याने त्यांची नेमणूक करणेकरीता मा.स्थायी समितीच्या मान्यतेकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे. तथापी, शहरातील रस्त्यांवरील खड्डे भरणेच्या कामाकरीता उपस्थित झालेल्या विधानसभा तारांकीत प्रश्नाकरीता मा. मंत्रीमहोदयांनी उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे दिलेल्या आश्वासनाच्या पूर्तीकरीता रस्त्यांवरील खड्डे भरणेच्या कामांचेही त्रयस्थ संस्थेकडून लेखा परिक्षण करणे आवश्यक असल्याने सदर कामाचे लेखा परिक्षण मे.वेबकॉस प्रा.लि.यांचेकडून करुन घेणेस मा.स्थायी समितीकडून मान्यता मिळणेस प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र.** ७७ ब  दिनांकः— २९/९/२०१६

सूचकाचे नांव : श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नांव : श्री. विजय पाटील

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील विविध विकास कामांचे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखा परिक्षण करणेकरीता मागविण्यात आलेल्या निविदेमध्ये निम्न दराचे मे.वेबकॉस प्रा.लिमि. यांची

नियुक्ती करणेस तसेच विधानसभा तारांकीत प्रश्नाद्वारे उपस्थित केलेल्या रस्त्यांवरील खड्डे भरणेच्या कामाचेही लेखा परिक्षण मे.वेबकॉस प्रा.लिमि.यांचेकडून करुन घेण्यास मान्यता देण्याचा प्रस्ताव या सभेच्या कार्यसूचीवरुन वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ११ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ११ :—** उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात कल्चरल सिंधी मेला ना विसार च्या कार्यक्रमाचे आयोजनाचे कामाची माहिती नोंद करणे

---

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :— सदर विषयाची माहिती कोण देणार? खर्च कसा केला आहे, कोणताही कार्यक्रम असो, सिंधी असो वा मराठी, आम्हाला माहिती तर मिळाली पाहिजे ना, रू. ११,९९,०००/— एवढा कार्यक्रमावर खर्च केला आहे, सदर कामासाठी निविदा प्रक्रीया केली होती किंवा कसे?

मुख्य लेखा अधिकारी, श्री. दादासाहेब पाटील :— निविदेशिवाय, कोटेशनशिवाय, कोणत्याही मंजूरीशिवाय हा खर्च झालेला आहे.

सदस्य, श्री. विजय पाटील :— सदरचा खर्च कोणी केला आहे.

मुख्य लेखा अधिकारी, श्री. दादासाहेब पाटील :— माहित नाही.

सदस्य, श्री. विजय पाटील :— मग हा खर्च देणार कोणाला? प्रशासनाची जबाबदारी नाही का? अधिकारी अशी उत्तरे कशी देतात? अधिकारी अशी उत्तरे देवु शकतात का?

सदस्या, डॉ. निना नाथानी :— कल्चरल सिंधी मेला होता आणि आम्हाला काही माहितच नाही,

सदस्य, श्री. विजय पाटील :— सदरचा विषय वगळण्यात यावा.

उप.आयुक्त आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी, श्री.जमीर लेंगरेकर :— संबंधित विभागाचे अधिकारी आता उपस्थित नाहीत.

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :— आम्ही पाण्याची गळती बंद करण्यासाठी कामे करण्यासाठी सांगतो तर सांगतात कि, हि कामे करू शकत नाहीत. आम्हांला तर कार्यक्रमाची पत्रिका पण नाही.

महापालिका सचिव :— सदरचा विषय पारीत करण्यात यावा का?

काही सदस्य :—सदरचा विषय अमान्य करण्यात यावा.

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ११ :—** उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात कल्चरल सिंधी मेला ना विसार च्या कार्यक्रमाचे आयोजनाचे कामाची माहिती नोंद करणे

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्राात कल्चरल सिंधी मेला ना विसार या कार्यक्रमाचे आयोजनाचे दिनांक २५/०४/२०१६ ते ०८/०५/२०१६ रोजी करण्यात आले होते. सदर कार्यक्रमासाठी दिलेल्या मंजुरीची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये पुढीलप्रमाणे देण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | मंजूर रक्कम | एजन्सीचे नाव |
|---|---|---|---|
| ०१ | उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात कल्चरल सिंधी मेला ना विसार च्या कार्यक्रमाचे आयोजनाचेसाठी लागणारे साहीत्य मागविणेबाबत. | ११,९९,०००/— | मे. मोहित एंटरप्रायझेस उल्हासनगर— ०४ |

तरी सदरची माहिती मा. स्थायी समितीच्या अवलोकनार्थ प्रस्तावीत करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र.** ७८ **दिनांकः— २९/९/२०१६**

सूचकाचे नांव : श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नांव : श्री. विजय पाटील

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात कल्चरल सिंधी मेला ना विसार च्या कार्यक्रमाचे आयोजनाचे कामाची माहिती नोंद करण्याचा प्रस्ताव अमान्य करीत आहे.

सुचकाची सही/—

,

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १२ वाचुन दाखवितात.

———————————————————————————————————

विषय क्र. १२ :— **प्रस्तावाची सूचना**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०२ नुसार मागील वर्षाचे विरोधी पक्ष नेता, सभागृह नेता, गटनेता, प्रभाग समिती सभापती निधीची कामे होण्याबाबतचा स्थायी समिती सभापती श्री. सुनिल सुर्वे यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

---

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—** या विषयाबाबत माझी प्रशासनाला विनंती आहे कि, हा विषय वगळण्यात यावा आणि पुढील सभेत सदर विषयावर चर्चा व्हावी, असे म्हणतो कारण कि, सन २०१४—१५, २०१५—१६ मधील नगरसेवक निधी, प्रभागसमिती निधी कोणाकोणाचे किती शिल्लक आहेत तसेच जनरल निधी किती शिल्लक आहे याची माहिती प्रशासनाने दयायला पाहिजे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—** माहिती कशाला हवी, नगरसेवक निधी, प्रभागसमिती निधी, सभागृहनेता निधी, महापौर—उपमहापौर निधी, स्थायी समिती निधी ज्यांच्या जितका शिल्लक राहिला आहे तो देण्यात यावा. आमची कामे थांबलेली आहेत,

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—** सन २०१४—१५, २०१५—१६ दोन्ही वर्षाचे निधी घ्यायला हवेत ना. सन २०१४—१५ चे पण शिल्लक निधी घ्यायचा ना, कारण नियम आहे कि, मागील दोन वर्षाचे शिल्लक निधी आपण घेवू शकतो.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—** सन २०१४—१५ चा शिल्लक निधी आपण नंतर घेवू, आता सन २०१५—१६ चा प्रस्ताव आला आहे त्यावर आपण निर्णय घेवू.

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—** आपण निर्णय घेवू शकतो ना, सन २०१४—१५ आणि २०१५—१६ दोन्ही वर्षाचे शिल्लक निधी देण्यात यावा असा प्रस्ताव मंजूर करू, आपल्याला तसे अधिकार आहेत ना.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—** ठिक आहे, सन २०१४—१५, २०१५—१६ या दोन्ही वर्षाचे शिल्लक निधी देण्यास मान्यता देण्यात येत आहे. माझा उप—महापौर पदावर असतानाचा उपमहापौर निधी शिल्लक राहिलेला आहे तो देखील देण्यात यावा.

**महापालिका सचिव :—** सदरचा विषय पारीत करण्यात यावा का?

**काही सदस्य :—**पास—पास......

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—** सदर विषयाच्या ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता करण्यात यावी.

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ विषय क्र. १२ :— **प्रस्तावाची सूचना**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०२ नुसार मागील वर्षाचे विरोधी पक्ष नेता, सभागृह नेता, गटनेता, प्रभाग समिती सभापती निधीची कामे होण्याबाबतचा स्थायी समिती सभापती श्री. सुनिल सुर्वे यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या सन २०१५–१६ च्या आर्थिक वर्षातील तरतुदीनुसार सदर निधी हा मा. महापौर, उप–महापौर, स्थायी समिती सभापती, विरोधी पक्ष नेता,सभागृह नेता, गटनेता, प्रभाग समिती सभापती व स्थायी समिती सदस्य निधी यांना पुर्णपणे वापरण्यासाठी विशेष निधी मंजुर करण्यात आला होता. परंतु महापालिकेच्या अन्य सदस्यांना मंजुर निधीपैकी प्रभाग समिती निधी व नगरसेवक निधी ५० टक्के देण्यात आला असून उर्वरीत ५० टक्के निधीचा अदयाप वापर करणेत आलेला नसल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील १०२ कलम नुसार कुठल्याही अर्थसंकल्पामध्ये तरतुद केल्यानंतर निधी खर्च न झाल्यास सदरचा निधी हा पुढील २ वर्षापर्यंत वापरता येत असल्याने सदर निधितुन प्रलंबित असलेली विकास कामे करण्यासाठी व मान्यता मिळणेसाठी या प्रस्तावाच्या सुचनेद्वारे सूचना मांडत आहे.

कृपया सदर प्रस्तावाची सूचना बैठकीमध्ये चर्चेला घेवुन उर्वरीत निधी वापरणेस मंजुरी मिळावी, ही विनंती.

स्थायी समिती ठराव क्र. ७९ दिनांकः–२९/९/२०१६

सूचकाचे नांव : श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नांव : श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार सभेत ठरलेल्या चर्चेअंती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०२ नुसार मा. महापौर, उप–महापौर, स्थायी समिती सभापती, विरोधी पक्ष नेता,सभागृह नेता, गटनेता, प्रभाग समिती सभापती व स्थायी समिती सदस्य निधीची सन २०१४–१५ व सन २०१६–१७ या दोन वर्षाची कामे करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

सायं. ५.५० वाजता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती श्री. सुनिल सुर्वे यांनी जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी )
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

.

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:—७/१०/२०१६

दि. ७/१०/२०१६ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

१०

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा शुक्रवार दिनांक ७/१०/२०१६ रोजी सायंकाळी ४.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | सदस्या |
| २ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर | सदस्य |
| ३ | श्री. गुरुनो भिकोमल वलेचा | सदस्य |
| ४ | श्री. जमनादास पुरस्वानी | सदस्य |
| ५ | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | सदस्या |
| ६ | श्रीमती इंदिरा उदासी | सदस्या |
| ७ | श्रीमती पुष्पाताई नाना बागुल | सदस्या |
| ८ | डॉ. निना प्रकाश नाथानी | सदस्या |
| ९ | श्रीमती वंदना पाटील उर्फ वंदना युवराज भदाणे | सदस्या |

तर,

१. सभापती,श्री. सुनिल सुर्वे

तसेच

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

२. श्रीमती लिलाबाई आशान, ३. श्री. उमेश सुरेश कालानी, ४. श्रीमती आशा जिवन इदनानी, ५. श्रीमती अंजली साळवे, ६. श्री. विजय चाहु पाटील, ७. श्रीमती रेखा अशोक ठाकुर

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१८१. श्रीमती विजया कंठे, उप–आयुक्त, मुख्यालय
१८२. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
१८३. श्री. जमीर लेंगरेकर, उप–आयुक्त
१८४. श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी
१८५. श्री. सुखदेव बलमे, मुख्य लेखा परिक्षक
१८६. श्री. राम जैयस्वार, शहर अभियंता
१८७. श्री. सेलवन, उप अभियंता, पाणी पुरवठा
१८८. श्री. महेंद्र धिंडे, उप अभियंता, विद्युत
१८९. श्री. भगवान कुमावत, प्र. सहा. आयुक्त
१९०. श्री. नंदु समतानी, प्र. सहा. आयुक्त
१९१. श्री. गणेश शिंपी, प्र. सहा. आयुक्त
१९२. श्री. अजित गोवारी, प्र. सहा. आयुक्त
१९३. श्री. शैलेश दोंदे, प्र. कर निर्धारक व संकलक
१९४. श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
१९५. श्री. बाळु नेटके, प्र. सुरक्षा अधिकारी
१९६. श्री. श्रीकांत धरणे, पोलिस आयुक्त, वाहतुक नियंत्रण विभाग
१९७. श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर
१९८. श्रीमती छाया डांगळे, प्र. विधी विभाग प्रमुख
१९९. श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक
२००. श्री. बाजीराव जाधव, प्र. भांडार विभाग प्रमुख

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.

१. श्रीमती विशाखा सावंत

४.२० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>आज सभेत सभापती उपस्थित नसल्याने पीठासीन अधिकारी म्हणुन श्री. जमनादास पुरस्वानी यांचे मी नाव सुचवितो.

यावेळी श्री. जमनादास पुरस्वानी हे सभापती स्थानी पीठासीन अधिकारी म्हणुन आसनस्थ होते.

यावेळी श्रीमती विजया कंठे, उप–आयुक्त मुख्यालय हया आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ होत्या.

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ <u>विषय क्र. १ :–</u> मागिल सभेचे दिनांक: २८/७/२०१६, ४/८/२०१६ व दिनांक ३/९/२०१६ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

<u>काही सदस्य :—</u>पास—पास……

<u>पीठासीन अधिकारी श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>मागील सभेचे दिनांक २८/७/२०१६, ४/८/२०१६ व दिनांक ३/९/२०१६ रोजीचे इतिवृत जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १** :— मागिल सभेचे दिनांक: २८/७/२०१६, ४/८/२०१६ व दिनांक ३/९/२०१६ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नांव : श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नांव : श्रीमती इंदिरा उदासी

<u>स्थायी समिती ठराव क्र. :—</u> ७९ अ <u>दिनांक : ७/१०/२०१६</u>

ही स्थायी समिती महापालिका सचिवांनी प्रस्तृत केलेले दिनांक २८/७/२०१६ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते ३९ पर्यंतचे, दिनांक ४/८/२०१६ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते ३४ पर्यंतचे, दिनांक ३/९/२०१६ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते ४८ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

.<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. २ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. २** :— प्रभाग क्षेत्र क्र. १,२ व ३ मधील उल्हासनगर क्षेत्र क्र. १,२ व ३ येथे रस्त्यावर ट्रफिक साईन बोर्ड लावणे व रस्त्यावर थर्मोप्लास्टीक पेंट करणे या कामास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणे.

---

<u>महापालिका सचिव :–</u>हा विषय दिनांक ३१/३/२०१६ रोजी झालेला आहे. नजरचुकीने त्यांनी गोषवारा पाठविला आहे.

<u>पीठासीन अधिकारी, श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>हा विषय जर ३१/३/२०१६ रोजी झाला आहे तर त्यावर काय केले? रस्त्यावर थर्मोप्लास्टीक पेंट करण्यासाठी दिले आहे तर मग त्यानंतर आपण काय केले?

<u>श्री. राम जैस्वार, शहर अभियंता :–</u> सदर विषय झाला आहे हे आम्हांस माहित नव्हते.

<u>पीठासीन अधिकारी, श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>आपणांस माहित नव्हते? स्थायी समिती ठराव पारीत करते. रस्त्यावर ट्रॉफिक होते म्हणुन हे लावणे आवश्यक आहे, हे माहित नव्हते? ट्राफिक साईन बोर्ड लावायचा आहे, रस्त्यावर थर्मोप्लास्टीक पेंट करणे याबाबत ३१/३/२०१६ रोजी विषय झालेला आहे, त्यावर काही झालेले सुध्दा नाही. सहा, सात महिन्यांनी परत हा विषय ठेवला आहे. हे किती चुकीचे आहे.

<u>महापालिका सचिव :–</u> सदर विषय शहर अभियंता यांचेकडून नजरचुकीने आला असल्याने तो मागे घेण्याबाबत त्यांनी पत्र दिले आहे.

<u>पीठासीन अधिकारी, श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>आता मी काय म्हणत आहे, जे झाले ते ठिक आहे, या विषयावर त्वरीत अंमलबजावणी करण्यात यावी. तर हा विषय मागे घेत आहोत. आपण जुन्या ठरावावर काम सुरु करावे.

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ३ :–** पैसे दया व वापरा'' या तत्वावर देण्यात आलेल्या शौचालयाच्या सेवा शुल्कामध्ये तसेच संस्थेने महापालिकेमध्ये जमा करावयाच्या रक्कमेत दर वाढ निश्चित करणे.

---

<u>पीठासीन अधिकारी, श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>याची माहिती कोण देणार? हा विषय स्थायी समितीपुढे आला होता. त्यावेळी यावर चर्चा झाली होती की या शहरामध्ये किती असे शौचालय आहेत, किती संस्थेद्वारे चालु आहेत, त्यात महापालिकेने किती बनविले आहेत आणि संस्थेने किती बनविले आहेत, त्याची माहिती असेल तर दराच्या बाबतीत निश्चीत करु या असे करुन ठराव वगळला होता व या विषयास आज पुन्हा आणला आहे. हा विषय परत आणल्यावर देखील अदयाप माहिती दिलेली नाही. आम्ही अशी माहिती मागितली होती की जे शौचालय महापालिकेने बनविले आहेत व जे शौचालय संस्थेन आपले पैसे लावुन बनविले आहेत तर त्यांना आपण वाढवुन सुध्दा देवु शकतो, काहीही करु शकतो. जे महापालिकेने खर्च केला आहे तर आपण त्यास वाढवुन का दयावा, तर याबाबतची यादी अदयाप दिलेली नाही. या विषयास आपण वगळु या. आता जेवढे स्थायी समितीत अधिकारी आहेत त्यांनी, प्रशासनातर्फे जो विषय येतो त्याची माहिती सोबत आणवयास पाहिजे.

व ज्यावेळी कोणीही सदस्य वा सभापती विचारतात तेव्हा ही माहिती आम्ही नंतर देवु असे सांगणे उचित नाही. माहिती तर सोबत आणली पाहिजे ना.

**डॉ. विजया कंठे, उप–आयुक्त, मुख्यालय :–**साहेब, मी, मॅडम, टीपी सोबत......

**पीठासीन अधिकारी, श्री. जमनादास पुरस्वानी :–** ठिक आहे, माहिती तर सोबत आणली पाहिजे ना, माहिती मागवा आता. नाहीतर हा विषय वगळण्यात यावा. यापुर्वीदेखील आपण हा विषय वगळला होता व सविस्तर माहिती घेवुन येण्याबदद्ल सांगितले होते.

**श्रीम. विशाखा सावंत, मालमत्ता व्यवस्थापक :–**मा. सभापती महोदय, पैसे दया व वापरा या तत्वावर देण्यात आलेल्या शौचालयांच्या सेवाशुल्कामध्ये तसेच संस्थेने महापालिकेमध्ये जमा करावयाच्या रक्कमेत कित्येक वर्ष वाढ झालेली नाही. तसेच सदरहु शौचालये संबंधित संस्थांनी बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर बांधलेली असून ती २० वर्षासाठी चालविण्यास देण्यात आलेली आहेत. संबंधित संस्था त्याची देखभाल व दुरूस्ती करीत असते.

**महापालिका सचिव :–** सदर विषय पारीत करण्यात यावा का?

**पीठासीन अधिकारी, श्री. जमनादास पुरस्वानी :–** ठिक आहे, सदर विषय पारीत करण्यात यावा.

**काही सदस्य :–**पास–पास......

**पीठासीन अधिकारी, श्री. जमनादास पुरस्वानी :–** सदर विषयाच्या ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता करण्यात यावी. सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ३ :–** पैसे दया व वापरा'' या तत्वावर देण्यात आलेल्या शौचालयाच्या सेवा शुल्कामध्ये तसेच संस्थेने महापालिकेमध्ये जमा करावयाच्या रक्कमेत दर वाढ निश्चित करणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात ३१ ठिकाणी '' पैसे द्या व वापरा'' या तत्वावर शौचालय चालविण्यासाठी देण्यात आले आहे. त्यांची यादी पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | संस्थेचे नाव व पत्ता | शौचालयाचे ठिकाण |
|---|---|---|
| १ | **टॉयलेट ॲन्ड टॉयलेट प्रा. लि.,** त्रिभुवनदास जावेरी समोर, भारत पेट्रोल पंप जवळ, मॅथ्यु रोड, ओपेरा हाऊस, मुंबई– ०४. | १) सुर्या हॉटेल समोर, पेट्रोल पंप, कचरा कुंडी जवळ, उल्हासनगर– ०४<br>२) बॅ.नं. २००९, उल्हासनगर– ५ |
| २ | **आदर्श नवयुवक सामाजीक सेवा मंडळ,** | १) बॅ.नं. ५२४, डॉ. किंगर डिस्पेंसरी जवळ, |

| | | |
|---|---|---|
| | सी/१०३, भारत वैभव अपा., चंदन क्रास समोर, आचोळे रोड, नालासोपारा (पूर्व). | जपानी बाजार मागे,उल्हासनगर—२<br>२) जकात नाका क्रं. ०९ च्या बाजुला, कैलास कॉलनी उल्हासनगर— ५ |
| ३ | **एकता सामाजिक प्रतिष्ठान,** १२, नवसुचिता अपा. रामचंद्र नगर, नांदिवली रोड, डोंबिवली(पूर्व). | १) प्रभात सिनेमा समोर, नेताजी चौक,उ. नगर— ५<br>२) जपानी बाजार, कुमार डिपार्टमेन्टल स्टोअर्स समोर, उ. नगर— २<br>३) नवजीवन बॅक शेजारी,मटन मार्केट जवळ, बॅ. नं. १८२२, उ.नगर— ५ |
| ४ | **शांती सेवा संस्था,**<br>२७/३, शांतीनगर, साने गुरूजी मार्ग, सातरस्ता, मुंबई— ११. | १) उल्हासनगर रेल्वे स्टेशनच्या बाहेर(पूर्व), उल्हासनगर— ३.<br>२) १ बस स्टॉप जवळ, उल्हासनगर— १.<br>३) चेलाराम मार्केट, उल्हासनगर— २.<br>४) स्मशानभुमी जवळ, शांतीनगर, उल्हासनगर— ३<br>५) टोकीयो मार्केट, उल्हासनगर— २.<br>६) गजानन मार्केट, उल्हासनगर— २. |
| ५ | **वाल्मिकी युवा समाज समिती,**<br>अखिल भारतीय वाल्मिकी नवयुवकसंघ, दरर्गा जवळ, खारटन रोड, ठाणे. | जयमाता अन्नपूर्णा मंदिराच्या समोर, बॅ.नं. ४३४, लाजवंती धर्मशाळा, उल्हासनगर— २. |
| ६ | **मेहतर समाज बेरोजगार कल्याण संस्था,** शांतीनगर २७/२, साने गुरूजी मार्ग, नेक सर्कल, मुंबई— ११. | १) गोलमैदान, मेन गेट जवळ, उल्हासनगर— १.<br>२) कृष्णा मार्केट, बॅ.नं. ५१८ जवळ, उ,नगर— २<br>३) राजीव गांधी नगर, उल्हासनगर— १<br>४) बॅ.नं. ३५२ जवळ, सोनार गल्ली, उल्हासनगर— २ |
| ७ | **वाल्मिकी समाज बेरोजगार कल्याणकारी सेवा संस्था,**<br>बॅ.नं. ११३३, फालवर लाईन, उल्हासनगर— ३ | १) वार्ड क्रं. ३१, बॅ.नं. ९९७ जवळ, पारस वाईन समोर, उल्हासनगर— ३<br>२) वार्ड क्रं. ३०, सिकी अपा. समोर अनिल पापडवाला जवळ, उल्हासनगर— ३ |
| ८ | **नवल वेल्फेअर फाऊन्डेशन,**<br>आशिर्वाद भवन, जोशीबाग, कल्याण(पश्चिम). | बॅ.नं. १८३५, झुलेलाल बाजार, कापड बाजार, जुन्या शौचालयाच्या जागेवर, उल्हासनगर— ५ |

| | | |
|---|---|---|
| ९ | **डॉ. बाबासाहेब आंबेडकर लोकसेवा फाऊंन्डेशन,**<br>१२०/पेनीनसुला पार्क, सपना गार्डन, उ.नगर– ३ | १) चंदर हार्डवेयरच्या मागे, आवतराम चौक, खेमाणी भाजीमार्केट, उल्हासनगर– २<br>२) पवई चौक,ब्रिज रोड, ॲडमिनीस्ट्री गेट जवळील फुटपाथवर,उल्हासनगर– ३<br>३) बॅ.नं. १९८८ समोर, उमपा. शाळा क्रं. १६ जवळ, जुना बस स्टॉप जवळ,उ.नगर– ५ |
| १० | **मेघ वेल्फेअर सोसायटी,**<br>साईबाबा सोसायटी,नंदा पाटकर रोड,विले पार्ले(पूर्व) मुंबई– ५७. | साईबाबा मंदिराजवळ, शांतीनगर, उ.नगर– ३ |
| ११ | **मेहतर समाज बेरोजगार उत्थान सेवा संस्था** | जंगल हॉटेलच्या मागे, सेक्शन– २८, उ.नगर– ४ |
| १२ | **महर्षी वाल्मिकी सेवा संस्था.**<br>मुरलीधर अपा. शाम सुंदर सोसायटीच्या बाजुला, ओ.टी. सेक्शन बॅ.नं. १०९८ जवळ, उल्हासनगर– ३ | संगम ट्रॅव्हलच्या समोर, १७ सेक्शन उ,नगर– ३ |
| १३ | **एकलव्य सेवा भावी संस्था.**<br>साई समर्थ, ठाणे | १) सेंट्रल हॉस्पीटल, एम.पी पान हाऊस जवळ, उल्हासनगर–३<br>२) सपना गार्डन, हिंदी शाळेजवळ, उल्हासनगर–३ |
| १४ | **तेजस्विनी महिला मंडळ**<br>१, सिध्दी विनायक सोसा. ठाणकर पाडा, कल्याण (पश्चिम) | १) डालडा प्रेस मार्केट, उल्हासनगर– ३<br>२) बॅ.नं १८२८, आनंदपूरी दरबार, सेक्शन–३८, उल्हासनगर–५ |

उपरोक्त संस्थापैकी १) शांती सेवा संस्था २) एकता सामाजिक प्रतिष्ठाण ३) मेहतर समाज बेरोजगार कल्याण संस्था, यांनी शौचालयाच्या सेवाशुल्कात वाढ करून मिळणेकामी विनंती अर्ज सादर केलेले आहेत.

महानगरपालिका करारनाम्यातील अट क्र. १ मध्ये महानगरपालिकेत जमा करावयाची रक्कम प्रति सिट रू. ५/– प्रती महिना (मुतारी वगळुन) एवढी आहे.

सदर संस्थेसोबत केलेल्या करारनाम्यात अट क्र. ४ (अ) मध्ये पहिल्या तीन वर्षासाठी सेवा शुल्क मंजुर केलेले शौचालय वापर दर खालीलप्रमाणे आहेत.

| स्वरूप | बाहेर गावावरून येणाऱ्या नागरीकांकरिता | कायम स्वरूपी नागरीकांकरीता |
|---|---|---|
| मुतारी | मोफत | मोफत |
| शौचालय | रूपये ०१/– | दरमहा रूपये २५/– प्रति कुंटूब/प्रतिमहा (पाच व्यक्तीपर्यंत) |

| | | |
|---|---|---|
| स्नानासाठी | रूपये ०५/— | दरमहा रूपये ७५/— प्रति कुंटूब/प्रतिमहा (सात व्यक्ती पुढे) सात पेक्षा जास्त असल्यास अतिरिक्त शुल्क |

उल्हासनगर शहरात वरील संस्था गेले १० ते १२ वर्षापासुन शौचालयांची दैनदिन स्वच्छता व देखभाल करीत आहेत. तसेच महापालिकेने ठरवुन दिलेल्या दरानुसार शुल्क घेत आहेत. परंतू सफाई कामगारांचे पगार, साफसफाईसाठी लागणारे सामान व शौचालयाचे दुरूस्तीचे साहित्य महागले आहे. तसेच शौचालयास लागणारे इलेक्ट्रीक दरही वेळोवेळी वाढत असुन, कमर्शियल दराप्रमाणे भरावे लागत आहे.

सदर संस्थांनी शौचालय वापराचे एका वेळेचे प्रतिवापर दर बाहेर गावावरून येणाऱ्या नागरीकांना रक्कम रूपये १/— वरून रूपये ७/— करावे अशी मागणी केलेली आहे.

सदर संस्थेने नमुद केलेले पैसे दया व वापरा तत्वावरील शौचालयाचे ठिकाणे शहरातील मोठे मार्केट, औद्योगिक क्षेत्र, शहरातील मुख्य चौक इत्यादी रहदारीच्या ठिकाणी असल्याने प्रस्तावित वाढ मंजुर करण्यास हरकत नसावी.

उपरोक्त संस्था यांचे बरोबर केलेल्या करारनाम्यात नमुद केल्याप्रमाणे सेवा शुल्कात वाढ करणेबाबत विनंती केलेली आहे. सदर सस्थांशी केलेल्या करारनाम्यातील अटी व शर्ती मधील अट क्र. ४ मध्ये वापराचे दर दिलेले आहेत. पहिल्या तीन वर्षासाठी प्रति वापर भाडे रू. १/— प्रमाणे आकारणी करणेत येत आहे. उक्त नमुद संस्थाशी करारनामा करून तीन वर्षपेक्षा अधिक कालावधी झालेला असल्याने अद्यापपर्यत सेवा शुल्कात वाढ करणेत आलेली नाही. **अट क्र. ४(ब) नुसार करारनाम्यानंतर तीन वर्षानंतर महानगरपालिका आयुक्त यांचे मंजुरीने मा. आयुक्त ठरवेल एवढे सेवाशुल्क वेळोवेळी आकारण्यात येतील असे नमुद आहे.**

उल्हासनगर महानगरपालिकेने शहरात वरील नमुद केलेल्या ठिकाणी ''पैसे द्या व वापरा'' या तत्वावर देण्यात आलेल्या शौचालयाचे वापर दरांमध्ये खालीलप्रमाणे वाढ होणे उचित वाटते.

| स्वरूप | बाहेर गावावरून येणाऱ्या नागरीकांकरिता | कायम स्वरूपी नागरीकांकरीता |
|---|---|---|
| मुतारी | मोफत | मोफत |
| शौचालय | रूपये ०५/— | दरमहा रूपये ६०/— प्रति कुंटूब/प्रतिमहा (पाच व्यक्तीपर्यत) |
| स्नानासाठी | रूपये १०/— | दरमहा रूपये १००/— प्रति कुंटूब/प्रतिमहा (सात व्यक्ती पुढे) सात पेक्षा जास्त असल्यास अतिरिक्त शुल्क |

त्याचप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात ''पैसे द्या व वापरा'' या तत्वावर शौचालय चालवित असलेल्या विविध संस्थेमार्फत महानगरपालिकेमध्ये जमा करावयाची रक्कम **प्रति महा, प्रति शिट रूपये ५/— वरून प्रति महा, प्रति शिट रूपये १०/—** इतकी वाढ केल्यास महानगरपालिका उत्पन्नात देखील भर पडेल.

तरी उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात ''पैसे दया व वापरा'' या तत्वावर विविध संस्थांना देण्यात आलेल्या शौचालयाच्या सेवा शुल्कामध्ये तसेच सदर संस्थानी महापालिकेमध्ये जमा करावयाच्या रक्कमेत वाढ करणेबाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समिती सभेच्या पटलावर धोरणात्मक निर्णयासाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ८० दिनांकः— ७/१०/२०१६

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर
अनुमोदकाचे नाव :— श्री. गुरुनो वलेचा

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात ''पैसे दया व वापरा'' या तत्वावर देण्यात आलेल्या शौचालयाच्या सेवा शुल्कामध्ये तसेच संस्थेने महापालिकेमध्ये जमा करावयाच्या रक्कमेत दर वाढ करण्यास मान्यता देत आहे.

<u>परंतु</u>

१. महापालिकेने स्वत: बांधलेल्या शौचालयाच्या सेवा शुल्कामध्ये दर वाढ करता येणार नाही.
२. जे शौचालय विविध संस्थांनी बीओटी तत्वावर स्वत: बनवुन चालवित आहेत अशा संस्थांच्या सेवा शुल्कामध्ये तसेच संस्थेने महापालिकेमध्ये जमा करावयाच्या रक्कमेत दर वाढ करता येईल.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची <u>सही/–</u>

अनुमोदकाची <u>सही/–</u>

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्रमांक. ४ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. ४ :–** वाहतूक नियमनासाठी सन २०१६–१७ साठी २५ 'ट्रॅफिक वॉर्डन' चे अर्थसहाय्य मंजुरी मिळणेबाबत.

---

<u>पीठासीन अधिकारी, श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>हा विषय आपण वगळला होता, आता ट्रफिक विभागाकडुन काही अधिकारी आलेले आहेत. त्यांचा परिचय होण्यासाठी हा विषय आपणांस करायचा होता. समजा काही ट्रफिक बाबतीत अडचणी येतात, काही समस्या येतात तर त्यासाठी जे अधिकारी आलेले आहेत त्यांचा परिचय घ्या, आपला सुध्दा परिचय दया. मग या विषयास आपण पारीत करु या.

<u>श्री. श्रीकांत धरणे, वाहतुक नियंत्रण विभाग:–</u> मी उल्हासनगर कॅम्प नं. १,२,३ चा इन्चार्ज आहे, कॅम्प नं. ४ व ५ साठी दुसरे अधिकारी आहेत. मी सभागृहास विनंती करतो की, वाहतूक नियमनासाठी सन २०१६–१७ साठी २५ 'ट्रॅफिक वॉर्डन' चे अर्थसहाय्यास मंजूरी मिळावी.

<u>पीठासीन अधिकारी, श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>सदर विषय इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करु या. सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑ **विषय क्र. ४ :—** वाहतूक नियमनासाठी सन २०१६—१७ साठी २५ 'ट्रॅफिक वॉर्डन' चे अर्थसहाय्य मंजुरी मिळणेबाबत.

<u>प्रस्तावना</u>

उपरोक्त विषयान्वये उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रात उल्हासनगर व अंबरनाथ अशी दोन युनिट असुन उल्हासनगर पोलिस स्टेशन मध्यवर्ती पोलिस स्टेशन,हिललाईन पोलिस स्टेशन बदलापुर पूर्व व पश्चिम पोलिस स्टेशन अशी ८ पोलिस ठाण्याची हदद असुन या हद्दीतील युनिटमध्ये अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून वाहतूक नियमन तसेच पार्कींग व्यवस्था केली जाते. वरील नमुद युनिटमध्ये नैमत्तीक रजा हक्क रजा, वैद्यकीय रजा, यावर कर्मचारी सोडले जात असल्याने प्रत्येक्षात वाहतुक नियमन व वाहन पार्कींगसाठी कर्मचाऱ्यांची संख्या अत्यंत कमी पडते परिणामी स्वरूप योग्य प्रकारे वाहतुक नियमन वाहन पार्कींग होत नसल्याने यांचा त्रास उपद्रव नागरीकांना होतो.

शहर वाहतुक उपशाखा उल्हासनगर हद्दीत वाहतुक नियमसाठी २५ ट्राफिक वार्डन पुरविण्याबाबत मा. स्थायी समिती ठराव क्र. ५६, दि. १७/१२/२०१३ अन्वये वाहतुक शाखेस २५ ट्राफीक वार्डन मानधनावर प्रति वार्डन रू. ४०००/— प्रमाणे देण्याबाबत ठराव पारीत करण्यात आलेला असुन २५ ट्राफिक वार्डन यांना वार्षिक मानधनापोटी रू. १२,००,०००/— एवढा खर्च अपेक्षीत आहे. सदर खर्च सन २०१६—२०१७ च्या अंदाजपत्रकीय लेखाशिर्ष C-5(6)Part-I (TrafficSing) मध्ये रू. ५०,००,०००/— एवढी तरतुद करण्यात अलेली आहे. तसेच मा.स्थायी समिती ठराव क्र. १००, दि. १४/०३/२०१६ अन्वये ट्राफिक वार्डन यांना दि. ३१/०८/२०१६ रोजी पर्यत अर्थसहाय्य मंजुरी देण्यात आलेली असुन सदर देण्यात आलेली अर्थसहाय्य मंजुरी संपुष्टात येत आहे. तरी सदर ट्राफिक वार्डन यांना पुढील एक वर्षाकरीता अर्थसहाय्य मंजुरी मिळणेबाबत. सदर प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> ८१ <u>दिनांकः— ७/१०/२०१६</u>

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती इंदिरा उदासी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार वाहतूक नियमनासाठी सन २०१६—१७ साठी २५ 'ट्रॅफिक वॉर्डन' यांना एक वर्षाकरीता अर्थसहाय्य देणेस मंजुरी देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची <u>सही/—</u>

अनुमोदकाची <u>सही/—</u>

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

———————————————————————————————————————

**विषय क्र. ५** :—शहर वाहतुक उपविभाग, उल्हासनगर व उपविभाग, विठ्ठलवाडी हद्दीत वाहतुक नियमानासाठी अतिरिक्त २० ट्राफिक वार्डन मिळणेबाबत.

———————————————————————————————————————

<u>महापालिका सचिव :—</u> सदर विषय पारीत करण्यात यावा का?

<u>काही सदस्य :—</u>पास—पास...... इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करा.

<u>पीठासीन अधिकारी श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

**विषय क्र. ५** :—शहर वाहतुक उपविभाग, उल्हासनगर व उपविभाग, विठ्ठलवाडी हद्दीत वाहतुक नियमानासाठी अतिरिक्त २० ट्राफिक वार्डन मिळणेबाबत.

<u>प्रस्तावना</u>

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये उल्हासनगर महानगरपालिका वाहन विभागामार्फत उल्हासनगर शहरातील वाहतुक कोंडीच्या समस्या दुर करणेकरीता शहर वाहतुक उपविभाग,उल्हासनगर यांना मदतीकरीता २५ ट्राफिक वार्डन नियुक्त करण्यात आलेले आहे. त्यांना ३१ऑगस्ट २०१६ पर्यंत अर्थसहाय्य मंजुरी देण्यात आलेली असुन त्यांची अर्थसहाय्य मंजुरीची मुदत दिनांक ३१/०८/२०१६ रोजी संमपुष्टात येत आहे.

तसेच उल्हासनगर शहरातील कॅम्प नं. ४ व ५ कार्यक्षेत्रातात बाजार पेठा व कपडा मार्केट तसेच जिन्स कारखाने मोठया प्रमाणात असल्यामुळे सदर ठिकाणी खरेदी करणेकरीता बाहेरून जास्त प्रमाणात ग्राहक येत असतात. तसेच शहरातील लोकसंख्या पाहता लोकांना दळणवळणाकरीता वाहनांची आवश्यकता असल्याने वाहनांची संख्याही जास्त प्रमाणात असुन शहरातील रस्तेही अरूंद व अपूरे आहेत. त्यामुळे ठिकठिकाणच्या चौकामध्ये सतत वाहतुक कोंडी होत असुन वाहतुक कोंडी सोडविण्यासाठी शहर वाहतुक उपविभाग, विठ्ठलवाडी यांनी महापालिकेमार्फम ०५ ट्राफिक वार्डन मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

त्याच प्रमाणे शहर वाहतुक उपविभाग,उल्हासनगर यांनी देखील उल्हासनगर हद्दीतील चोपडा कोर्ट ते शहाड व अन्य ठिकाणी रस्त्याचे काम चालु असल्याने वाहतुक कोंडीची मोठयाप्रमाणात समस्या उद्भवत असल्यामुळे त्याचे निराकरण करणे करीता अतिरिक्त १५ ट्राफिक वार्डन मिळणेबाबत विनंती केलेली आहे. तरी सदर वाहतुक विभागास अतिरिक्त २० ट्राफिक वार्डन उपलब्ध करून दिल्यास प्रति वार्डन रू. 4000X 20X 12 = <u>९,६०,०००/—</u> एवढा वार्षीक खर्च मानधनपोटी अपेक्षित आहे. सदर बाबत अंदाजपत्रकीय लेखाशिर्ष C-5(6) Part- I (Traffic Sing) मध्ये तरतुद करण्यात आलेली आहे.

त्या अनुषंगाने शहर वाहतुक उपविभाग, उल्हासनगर व उपविभाग, विठ्ठलवाडी यांना वाहतुक नियमनासाठी अतिरिक्त २० ट्राफिक वार्डनची अर्थसहाय्य मंजुरी मिळणेबाबत सदर प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> ८२ <u>दिनांकः— ७/१०/२०१६</u>

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती इंदिरा उदासी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार शहर वाहतुक उपविभाग, उल्हासनगर व उपविभाग, विठ्ठलवाडी यांना वाहतुक नियमनासाठी अतिरिक्त २० ट्राफिक वार्डन मिळणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची <u>सही/—</u>

अनुमोदकाची <u>सही/—</u>

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>**महापालिका सचिव :—**</u> विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ६** :— सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत निविदा प्रक्रीया केलेल्या उल्हासनगर—५ प्रभाग क्र.३८ येथील पटेल नगर मधील पाण्याच्या टाकीच्या कंपाउंड जवळील मोकळया जागेवर उद्यान विकसित करणे या कामाकरिता मे.मॉ भवानी कन्स्ट्रक्शन यांच्या निविदेस मान्यता मिळणेबाबत.

---

<u>**पीठासीन अधिकारी, श्री. जमनादास पुरस्वानी :—**</u>ठिक आहे, हा विषय पारीत करु या. परंतु आमच्या सदस्या डॉ. निना नाथानी यांनी विषय केला होता, गोल मैदान येथिल पाण्याच्या टाकीखाली दारु पिणारे येवुन बसतात, तर आपण तो सुध्दा विषय आणा. शहरातील इतर ठिकाणी असलेल्या टाकीचे सुध्दा काम करण्यात यावे.

<u>**सदस्या, डॉ. निना नाथानी:—**</u>मी आपणांस सांगु इच्छिते की, साहेब, याची तातडीची आवश्यकता का आहे तर प्रभाग समितीमध्ये आपण जर तक्रार घेवुन गेले तर तेथिल लोक काय म्हणतात की आमच्याकडे वॉचमन नाही आहे त्यांना पळविण्यासाठी. आमचे कोणते अधिकारी जाणार, हे आमचे काम नाही. तर मी या विषयावर स्पष्ट करु इच्छिते की, प्रशासनाचे काहीच कर्तव्य नाही का? तेथे ड्रगीस्ट लोक येवुन बसतात, दारु पितात, जुगार खेळतात. ती लोक जनतेला दिसत आहेत, तर काय तेथे अधिकारी लोकांना दिसत नाहीत का ती लोक? तेथिल कर्मचारी टाळतात व सांगतात की हे आमचे काम नाही, आमच्याकडे वॉचमन नाही, तर हे काम आमचे नाही? हे उत्तर बरोबर आहे काय? तेथे मी स्वत: जावुन त्या लोकांना पळविले आहे. परंतु आमचा

कोणताही अधिकारी पुढे जावुन त्यांना पळवत नाही. कारण आमचे हे कर्तव्य नाही. प्रभाग अधिकारी तर कामावर कधीच नसतात. तर नक्की कोठे असतात कायमचे. बाकी इतर ठिकाणी असतात.

पीठासीन अधिकारी, श्री. जमनादास पुरस्वानी :–ज्या ज्या ठिकाणी टाकी आहेत जेथे आपण गार्डन बनवु शकतो, जेथे जागा उपलब्ध आहे तर आपण तसा प्रस्ताव तयार करावा. आणि वेगवेगळा सर्व टाक्यांचा प्रस्ताव आणण्यात यावा. दोन–दोन, तीन–तीन करुन आणावा आणि सुरक्षा रक्षकाबाबत सुध्दा आम्ही म्हटले होते की सर्व टाक्यांवर सुरक्षा अधिकारी असले पाहिजे. जर त्याची सुध्दा निविदा झालेली नसले, अडचणी असतील तर त्या सुध्दा पुर्ण करण्यात याव्यात.

सदस्या, डॉ. निना नाथानी:–सुरक्षा अधिका–यांच्या बाबतीत आपला हा विषय झालेला आहे. तो सुध्दा आलेला नाही. कोठे आहे? सुरक्षा रक्षकांबाबतीत आधी सुध्दा विषय झालेला आहे कारण की कॅम्प नं. १ च्या पाण्याच्या टाकी येथे काहीतरी मारामारी वगैरे झाल्या होत्या. तेथे काहीतरी झाले होते, तेथील लोकांनी टाक्यांवर काही लाकुड वगैरे फेकले होते. याबाबतीत कोण जबाबदार आहे, आपले लक्षच नाही तर सुरक्षा कशी मिळेल? याचा परिणाम जनतेस होतो. आपण हो सांगतात परंतु आपण सांगु शकाल की हे काम कधी होईल? आपण खात्री देणार आम्हांस. आपण फक्त हो म्हणु नका. आपण खात्री दया की कधी पर्यंत हे काम होईल. आम्ही तर म्हटले होते आम्ही काय हे पहिल्या वेळेस सांगत नाही. तेथे प्रत्येक जागी अॅटेंडंट आहेत, आमच्या येथे तर नसतात.

पीठासीन अधिकारी, श्री. जमनादास पुरस्वानी :–आपण किती वेळ ठेवतो? २४ तास की १२ तास?

श्री.बाळू नेटके, सुरक्षा अधिकारी :–साहेब, ब–याचशा जागी असे होते की, एकच सुरक्षारक्षक आठ आठ तास असतात. परंतु एक सुरक्षारक्षक ठेवुन काहीच फायदा होत नाही. व सात ते तीन, तीन ते अकरा, अकरा ते सात असे असेल तरच सुरक्षा व्यवस्थित राहील.

पीठासीन अधिकारी, श्री. जमनादास पुरस्वानी :–आपण जे ठेवले आहेत ते तीन शिप्टने ठेवले की कसे?

श्री.बाळू नेटके, सुरक्षा अधिकारी :– सुरक्षारक्षक तीन शिप्टने ठेवले आहेत.

पीठासीन अधिकारी, श्री. जमनादास पुरस्वानी :–तर मग त्यांना ड्रेस आहेत ना.

श्री.बाळू नेटके, सुरक्षा अधिकारी :– होय, त्यांचा ड्रेस आहे.

पीठासीन अधिकारी, श्री. जमनादास पुरस्वानी :–मग महोदया आपण खात्री करा की तुमच्याकडे आहेत की नाही?

<u>सदस्या डॉ. निना नाथानी:—</u>नाही, गोल मैदान येथे नाही आहेत. मी किती तरी वेळा तेथे गेले आहे व जनेतेची तक्रार ऐकूनच तेथे जाते. तर मी तेथे कधीच कोणास पाहिले नाही. तेथे फिरतात परंतु विदाउट ड्रेस, आपण ड्रेस म्हणाला म्हणुन सांगते. ते तेथे विदाउट ड्रेस तर फिरत असतात व सांगतात की आमची येथे एक्स्ट्रा डयुटी लावली आहे. आमचे काम आहे बुस्टरवर परंतु आम्हांस एक्स्ट्रा काम दिले आहे, मी तर त्यांच्यावर लक्ष ठेवुनच आहे. ते म्हणतात आम्ही का करावे, तर आम्ही तेथे जावुन परत आलो. मी त्या लोकांचे नाव नाही सांगणार. कारण त्यांची तेथे डयुटी नाही तर त्यांनी का थांबावे तेथे? जे मुख्य अॅटेंडंट आहेत ते तेथे नसतात. तर याबाबतीत तपासणी केली जावी की ते कोठे असतात?

<u>श्री.बाळू नेटके, सुरक्षा अधिकारी :—</u> ते जे अटेंन्डंट आहेत ते सुरक्षा विभागाच्या अखत्यारीत येत नाहीत.

<u>सदस्या डॉ. निना नाथानी :—</u>मी समजले, निरिक्षक आहेत ठिक आहे, खरे आहे परंतु कोणीतरी असेल ना अजुन. मी सांगेल की फक्त गोल मैदानच नाही तर प्रत्येक पाण्याच्या टाकीवर असले पाहिजेत.

<u>पीठासीन अधिकारी, श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>मी आमच्या महोदयांना आदेश करतो की, आपले जेवढे प्रभाग अधिकारी आहेत त्यांनी नजर ठेवावे. पाण्याच्या टाक्या ज्या प्रभाग समितीत येतात तेथे आम्ही पैसे सुध्दा भरत आहेत, आमचे अधिकारी जे आहेत ते वेळेवर तेथे येतात की नाही येत. आम्ही जे खाजगी कर्मचारी ठेवले आहेत तर होवु शकते येवुन परत निघुन जात असतील. तर प्रभाग अधिका—यांनी येता जातांना नजर ठेवावी की कोण गैरहजर आहे, त्याची तक्रार महापालिकेत दयावी.

<u>सदस्या डॉ. निना नाथानी :—</u>मी श्रीमती कंठे महोदयांना विनंती करेल की, प्रभाग अधिका—यांना निर्देश दयावे. ती लोक येथे तेथे जावुन सर्व गोष्टी तर पाहतात. जेव्हा आम्ही खड्डयांविषयी सांगतो तर थोडयाफार प्रमाणात खड्डे भरले जातात, बाकी तसेच राहुन जातात. पावसाच्या वेळेस मी ऐकले की थोडयाफार प्रमाणात पावडर टाकतात वगैरे. तर कमीत कमी खड्डे तर भरण्यात यावे, किती तरी अपघात होत असतात. ती तेथे लक्ष तर दयावे ना. ज्या विभागात गाडया स्लीप होतात, मुले जोर जोरात गाडया फिरवितात तेथे अपघात होतात, तर तेथे लक्ष दयावे व स्पीड ब्रेकर लावण्यात यावेत. प्रभाग अधिकारी तर बिल्कुल लक्षच देत नाहीत.

<u>पीठासीन अधिकारी, श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>आमच्या सदस्या श्रीमती निना नाथानी यांच्याकडुन लोकेशन घेवुन तेथे लवकरात लवकर खड्डे भरण्याचे काम सुरु करावे असा मी आदेश देतो.

<u>श्री.राम जयस्वार, शहर अभियंता :—</u> महोदया आपण मला ठिकाण सांगा.

<u>सदस्या डॉ. निना नाथानी :—</u>तेथे अपघाताने मुले पडतात.

<u>पीठासीन अधिकारी, श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>महोदया आपण लोकेशन दया, उदयाच्या उदयाच ते काम होईल. वर्कऑर्डर आधीच देण्यात आलेले आहेत. आपण शहर अभियंता यांना विभाग सांगा.

<u>सदस्या डॉ. निना नाथानी :—</u>बाकी प्रभाग अधिका—यांकडुन तर मी काहीच अपेक्षा ठेवत नाही व त्यांना तर काहीच सांगणार नाही. धन्यवाद।

<u>पीठासीन अधिकारी, श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>हा विषय इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करण्यात यावा.

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>पीठासीन अधिकारी श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

☑ **विषय क्र. ६ :—** सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत निविदा प्रक्रीया केलेल्या उल्हासनगर—५ प्रभाग क्र.३८ येथील पटेल नगर मधील पाण्याच्या टाकीच्या कंपाउंड जवळील मोकळया जागेवर उद्यान विकसित करणे या कामाकरिता मे.माँ भवानी कन्स्ट्रक्शन यांच्या निविदेस मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिका प्रभाग क्षेत्र क्र.४ मधील मंजुरी मिळालेल्या **उल्हासनगर—५ प्रभाग क्र.३८ येथील पटेल नगर मधील पाण्याच्या टाकीच्या कंपाउंड जवळील मोकळया जागेवर उद्यान विकसित करणे** या कामांकरीता बी—१ प्रकारच्या दोन भाग (तांत्रिक व आर्थिक) पध्दतीने नोंदणीकृत ठेकेदारांकडून दिनांक १२/०७/२०१६ रोजी निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्राकलनीय खर्च | रु.२४०००००/— |
| २ | निविदा प्रसिध्द केलेली वर्तमानपत्रे | |
| ३ | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक १२/०७/२०१६ |
| ४ | निविदा विक्री कालावधी | दिनांक १४/०७/२०१६ ते ०४/०८/२०१६ |
| ५ | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक ११/०८/२०१६ |
| (अ) | प्रथम मुदतवाढ | |
| ब) | द्वितीय मुदतवाढ | |
| क) | तृतीय मुदतवाढ | |
| ६ | तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | दिनांक १६/०८/२०१६ |
| ७ | आर्थिक भाग उघडण्याचा दिनांक | दिनांक २५/०८/२०१६ |
| ८ | विक्री केलेल्या निविदांची संख्या | २ |
| ९ | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | २ |

दिनांक १६/०८/२०१६ रोजी मा.अतिरिक्त आयुक्त, मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक, शहर अभियंता यांचे उपस्थितीत **उल्हासनगर—५ प्रभाग क्र.३८ येथील पटेल नगर मधील पाण्याच्या टाकीच्या कंपाउंड जवळील मोकळया जागेवर उद्यान विकसित करणे** या कामाच्या निविदेचा तांत्रिक भाग उघडण्यात आला त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | निविदाकाराच्या निविदेमधील बाबी | मे. शुभम कन्स्ट्रक्शन | मे. माँ भवानी कन्स्ट्रक्शन |
|---|---|---|---|
| १ | निविदा प्रपत्रकाच्या खरेदीची रक्कम भरलेली आहे का? | होय | होय |
| २ | इसारा रक्कम भरलेली आहे का? | होय | होय |
| ३ | अद्यावत आयकर रिटर्न भरल्याची पावती | होय | होय |
| ४ | कामाचा अनुभव | होय | होय |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | पॅन कार्डाची प्रत | होय | होय |
| ६ | संस्था/कंपनी नोंदणी (भागिदारी, मालकी, कंपनी इत्यादीचे) दस्तऐवज | होय | होय |

सदर निविदांची सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये छाननी समिती मार्फत छाननी केली असता १) **मे. शुभम कन्स्ट्रक्शन** २) **मे. मॉ भवानी कन्स्ट्रक्शन** यांच्या निविदा अटी शर्तीनुसार असल्याने पात्र आहेत. तरी उपरोक्त निविदाकारांच्या निविदांचा दुसरा भाग उघडण्यात प्रस्तावित करण्यात आले.

मा. महापौर यांचे दालनामध्ये दिनांक १५ सप्टेंबर, २०१५ रोजी ई–निविदेची आढावा बैठक घेण्यात आली होती. त्याअनुषंगाने ई–निविदेचा लिफाफा क्र.१ व २ वर एकाच वेळी उघडण्यात यावे. असे निर्देश देण्यात आले आहे. त्यामुळे सदर निविदेचे आर्थिक व तांत्रिक भाग उघडण्यात आला आहे.

आज दिनांक २५/०८/२०१६ रोजी उपरोक्त निविदाकारांचा आर्थिक बाबींचा दुसरा भाग (आर्थिक दर) मा.अतिरिक्त आयुक्त सो., यांचे अध्यक्षतेखालील निवड समिती सदस्य मुख्य लेखाअधिकारी, मुख्य लेखापरिक्षक, शहर अभियंता, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे उपस्थितीत उघडण्यात आला. त्याप्रमाणे निविदाकांरानी दिलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

**१) मे. शुभम कन्स्ट्रक्शन** दिलेले दर दरसूचीप्रमाणे

**२) मे. मॉ भवानी कन्स्ट्रक्शन** दिलेले दर ०.०१ टक्के कमी

उपरोक्त **उल्हासनगर–५ प्रभाग क्र.३८ येथील पटेल नगर मधील पाण्याच्या टाकीच्या कंपाउंड जवळील मोकळया जागेवर उद्यान विकसित करणे** या कामाचे उक्त निविदाकारांपैकी **मे. मॉ भवानी कन्स्ट्रक्शन** यांनी दरसूची वर ०.०१ टक्के कमी (0.01% below) प्रमाणे दर दिले असुन त्याप्रमाणे **मे. मॉ भवानी कन्स्ट्रक्शन** यांची सदर काम देणेकरिता शिफारस करण्यात येत आहे.

तरी **मे. मॉ भवानी कन्स्ट्रक्शन** यांच्या ०.०१ टक्के कमी दराचे निविदेस मा. स्थायी समितीची मान्यता मिळणेकरिता प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. ८३ दिनांकः– ७/१०/२०१६

सुचकाचे नाव :– श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :– श्री. गुरुनो वलेचा

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत निविदा प्रक्रीया केलेल्या उल्हासनगर–५ प्रभाग क्र.३८ येथील पटेल नगर मधील पाण्याच्या टाकीच्या कंपाउंड जवळील मोकळया जागेवर उद्यान विकसित करणेकरिता मे.मॉ भवानी कन्स्ट्रक्शन यांच्या ०.०१ टक्के कमी दराच्या निविदेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र.** ७ :– उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील विविध विकास कामांचे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखा परिक्षण करणेकरीता मागविण्यात आलेल्या निविदेमध्ये निम्न दराचे मे.वेबकॉस प्रा.लिमि. यांची नियुक्ती करणेस व शहरातील रस्त्यांवरील खड्डे भरणेच्या कामाचे त्रयस्थ संस्थेकडून लेखा परिक्षण करणेकरीता उपस्थित केलेल्या विधानसभा तारांकीत प्रश्नावर मा.मंत्री महोदयांनी दिलेल्या आश्वासनाच्या पूर्तीकरीता खड्डे भरणेच्या कामाचेही लेखा परिक्षण मे.वेबकॉस प्रा.लिमि.यांचकडून करुन घेण्यास मान्यता देणे.

---

<u>महापालिका सचिव :–</u> सदर विषय पारीत करण्यात यावा का?

<u>पीठासीन अधिकारी, श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>हा विषय इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करण्यात यावा.

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>पीठासीन अधिकारी श्री. जमनादास पुरस्वानी:–</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र.** ७ :– उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील विविध विकास कामांचे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखा परिक्षण करणेकरीता मागविण्यात आलेल्या निविदेमध्ये निम्न दराचे मे.वेबकॉस प्रा. लिमि. यांची नियुक्ती करणेस व शहरातील रस्त्यांवरील खड्डे भरणेच्या कामाचे त्रयस्थ संस्थेकडून लेखा परिक्षण करणेकरीता उपस्थित केलेल्या विधानसभा तारांकीत प्रश्नावर मा.मंत्री महोदयांनी दिलेल्या आश्वासनाच्या पूर्तीकरीता खड्डे भरणेच्या कामाचेही लेखा परिक्षण मे.वेबकॉस प्रा.लिमि.यांचकडून करुन घेण्यास मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

शासनाने नगरविकास विभागाकडील दिनांक २ मार्च, २००९ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार विकास कामांची त्रयस्थ संस्थेकडुन तांत्रिक लेखा परिक्षण करुन घेण्याचे आदेश दिलेले आहेत. सदर आदेशातील परिच्छेद–४ मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थाचे वर्गवारी प्रमाणे अनिवार्य तांत्रिक लेखा परिक्षणासाठी किमान किंमत दिलेली आहे. सदर तांत्रिक तपासणीवरील खर्च भागविण्यासाठी महापालिका अर्थसंकल्पामध्ये आवश्यक ती तरतुद करण्याचे आदेश आहेत.

उल्हासनगर महानगरपालिका 'ड' वर्ग महानगरपालिकेमध्ये समाविष्ट असल्याने उक्त तरतुदीनुसार रु. ५०.०० लक्ष पेक्षा अधिक किंमतीच्या सर्व कामांची जिल्हयातील शासकीय अभियांत्रिकी / तंत्रज्ञान/ वास्तुशास्त्र/ महाविद्यालय/शासकीय तंत्रनिकेतन ते शक्य नसल्यास अथवा त्यांना सल्लागारांचे काम करणे शक्य नसल्यास आपल्या क्षेत्रातील उपरोक्त संस्थेपैकी एका त्रयस्थ संस्थेकडुन तांत्रिक लेखा परिक्षण (Third Party Audit) करुन घेणेकामी अशा संस्थांच्या प्राचार्यांशी संपर्क करावा. तसेच ज्याठिकाणी तांत्रिक लेखा परिक्षणाची गरज आहे किंवा ज्याठिकाणी एखादया प्रकल्पाच्या विशिष्ट स्वरुपाचा विचार करता विशिष्ट कौशल्य असलेल्या लेखा परिक्षकाची नियुक्ती करण्याची गरज आहे त्याठिकाणी निविदा प्रक्रियेतुन सुयोग्य तांत्रिक संस्था/तज्ञ व्यक्तीची तांत्रिक लेखा परिक्षक म्हणून नियुक्ती करावी व रु.५०.०० लक्ष किंमतीच्या कमी कामांच्या संदर्भात Random पध्दतीने किमान १० टक्के कामांचे त्रयस्थ तांत्रिक लेखा परिक्षण करुन घ्यावे असे आदेश आहेत.

त्यानुसार महापालिकेने दि.२१ मार्च, २०१२ च्या पत्रान्वये १. वीरमाता जिजाबाई टेक्नॉलॉजिकल इन्स्टीटयूट (VJTI) मुंबई २. गर्व्हमेंट पॉलीटेक्नीक, मुंब्रा ३. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे इत्यादी संस्थांना कळविले होते. त्यापैकी विरमाता जिजाबाई टेक्नॉलॉजीकल इन्स्टीटयुट (VJTI) मुंबई या संस्थेने E-mail द्वारे प्रतिसाद दिला. त्यांनी E-mail द्वारे प्रतिसाद दिनांक २०/११/२०१२ रोजी कामाचे शुल्क प्रति रस्ता रु.२,१०,०००/– अधिक सेवा कर १२.३६ टक्के शुल्क सुरु करणेपुर्वी आगावु धनादेश संचालक, व्ही.जे.टी.आय. यांचे नांवाने सादर केल्यावर १२ आठवडयाचे कालावधीत सुरु करण्यात येईल. तसेच तांत्रिक लेखा परिक्षण यंत्रणेस आवश्यक ते सहकार्य करणे अशा अटी नमुद केल्या होत्या.

त्यानुसार महापालिकेने व्ही.जे.टी.आय. या संस्थेकडुन Third Party Audit (Conditional Survey) करुन घेणेकामीच्या प्रस्तावास स्थायी समिती ठराव क्र.५४, दिनांक २३/०१/२०१३ अन्वये मान्यता प्राप्त झाल्यावर त्यांना कामाचे आदेश दिले होते. तीन वर्षाचे कालावधीत त्यांनी दोन रस्त्यांचे तांत्रिक लेखापरिक्षण झाले. त्यांनी तांत्रिक लेखा परिक्षणाचे कामास विलंब लावल्याने व कामांची संख्या जास्त असल्याने शासन निर्णयातील परिच्छेद–३ मधील तरतुदीनुसार निविदा कार्यवाहीचे प्रस्तावास मा. आयुक्तांची मान्यता प्राप्त झाल्यावर निविदा कार्यवाही करण्यात आली. त्यामध्ये निविदेस ६ वेळा मुदतवाढ देवूनही १. मे. एस.जी.एस.ई. प्रा.लि. २. मे. व्हेपकॉस लि. या दोन संस्थांच्या निविदा प्राप्त झाल्या, सदर निविदाकार शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे निविदा भरु शकत नाही.

Company Name WAPCOS LTD

| Sr. No. | Estimate Cost of Works ( In INR) | Bituminous Road (In INR) | CC Road (IN INR) | Buildings (In INR) | Bridges (IN INR) |
|---|---|---|---|---|---|
| 01 | Up to 50 Lacs | 65000 | 65000 | 70000 | 60000 |
| 02 | 50 Lacs to 2.50 Cr. | 120000 | 120000 | 130000 | 130000 |
| 03 | 2.50 Cr. to 5.00 Cr. | 250000 | 250000 | 270000 | 270000 |
| 04 | 5.00 Cr. to 10.00 Cr. | 350000 | 350000 | 350000 | 300000 |
| 05 | 10.00 Cr. And above | 475000 | 475000 | 500000 | 500000 |

Company Name : SGS India Private Limited

| Sr. No. | Estimate Cost of Works ( In INR) | Bituminous Road (In INR) | CC Road (IN INR) | Buildings (In INR) | Bridges (IN INR) |
|---|---|---|---|---|---|
| 01 | Up to 50 Lacs | 500000 | 500000 | 5000000 | 5000000 |
| 02 | 50 Lacs to 2.50 Cr. | 1000000 | 1000000 | 1000000 | 1000000 |
| 03 | 2.50 Cr. to 5.00 Cr. | 1500000 | 15000000 | 1500000 | 1500000 |
| 04 | 5.00 Cr. to 10.00 Cr. | 4000000 | 40000000 | 4000000 | 4000000 |
| 05 | 10.00 Cr. And above | 10000000 | 100000000 | 10000000 | 10000000 |

सदर निविदेचे मुदतीनंतर शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे यांचे पत्र प्राप्त झाले.

उक्त दोन संस्थानी १. डांबरीकरण रस्ता २. सिमेंट कॉक्रीटीकरण रस्ता ३. इमारत बांधकाम ४. पुल बांधकाम इ. कामांचे प्रकल्पाचे प्राकलनीय किंमतीवर दर दिले आहेत. उक्त दोन संस्थातील मे. एस.जी.एस.ई. लि. या संस्थेचे दर जास्त असून मे. व्हेपकॉस या संस्थेचे दर कमी आहेत. त्याअनुषंगाने शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे यांनी सदर निविदेसाठी तयारी दर्शविली आहे. त्याप्रमाणे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे यांनी सदर कामासाठी हमीपत्र पत्र क्र. १८९, दिनांक २८/०७/२०१५ रोजी या कार्यालयास दिले आहे

महापालिका क्षेत्रातील विकास कामांचे तांत्रिक लेखापरिक्षण करणे शासनाचे आदेशानुसार अनिवार्य

असल्याने आर्थिक खर्च विचारात घेता प्रस्तावाबाबत मुख्य लेखा अधिकारी यांनी VJTI या संस्थेचे प्राचार्य श्री.पी.डब्ल्यु. कुबडे यांचेशी दुरध्वनीद्वारे संपर्क केला असता त्यांनी रस्त्यांचे तांत्रिक लेखा परिक्षणाबाबत मागील रु.२,१०,००० अधिक सेवाकर १२.३६ टक्के प्रमाणे त्यांचे अटीप्रमाणे करणेस कामनिहाय आगाऊ रक्कम दिल्यास तयारी दर्शविली आहे व शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे यांचे दर मागवून तांत्रिक लेखा परिक्षण करणेचे कामांसाठी निविदा कार्यवाही करुन किफायतशीर दर दिलेल्या शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे या संस्थेची नियुक्ती करावी अथवा यापूर्वी नियुक्ती केलेल्या व्ही.जे.टी.आय. व अन्य संस्थेची त्यांचे अटीप्रमाणे कामनिहाय आगावु रक्कम देवून तुर्त प्रभाग समितीनिहाय सी.सी.पायवाटा, Potholes चे रस्त्यांचे कामनिहाय तांत्रिक लेखा परिक्षण करुन घेणेकरिताचे प्रस्तावित केले असता मा.आयुक्त सो. यांनी खड्डे भरणेच्या कामाचे त्रयस्थ संस्थेकडून लेखा परिक्षण करुन घेणेच्या विधानसभा तारांकीत प्रश्नावर मा.मंत्री महोदयांनी आश्वासन दिले असल्याने सदर खड्डे भरण्याच्या कामाचे लेखा परिक्षण व्ही.जे.टी.आय.यांचेकडून करुन घेणेबाबत सुचना दिल्या.

मा.आयुक्त सो. यांचे वरील सुचनेस अनुसरुन उल्हासनगर शहरातील रस्त्यांवरील खड्डे भरणेच्या कामाकरीता व्ही.जे.टी.आय., मुंबई यांचेकडून करुन घेणेकरीता त्यांना या कार्यालयाचे दिनांक ९/२/२०१६ व २२/३/२०१६ चे पत्रान्वये कळविले. परंतू व्ही.जे.टी.आय. चे प्राचार्य यांनी त्यांचे दिनांक २७/४/२०१६ चे पत्रान्वये सदर खड्डे भरण्याचे कामावर सुरवातीपासून त्यांचे निरीक्षण / पाहणी झालेली नसल्याने सदर कामावर कोणतीही तपासणी NDT अथवा Core Test बांधकामाकरीता वापरण्यात आलेल्या बांधकाम साहित्यावर करता येणार नाही असे कळविले. यावरुन ते खड्डे भरण्याच्या कामाचे लेखा परिक्षण करणार नसल्याचे समजते.

सद्यस्थितीत सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे शहरातील विविध विकास कामांचे त्रयस्थ संस्थेकडून लेखा परिक्षण करणेच्या कामाकरीता एजन्सी नेमणूकीकरीता निविदा प्रक्रिया करण्यात आली आहे. या निविदाप्रक्रियेत प्राप्त झालेल्या दोन निविदाकारांपैकी मे.वेबकॉस लिमि. यांचे दर कमी आहेत.

वरील संपूर्ण वस्तुस्थिती लक्षात घेता शहरातील विविध विकास कामांचे लेखा परिक्षण करणेकरीता मे.वेबकॉस यांचे दर कमी असल्याने त्यांची नेमणूक करणेकरीता मा.स्थायी समितीच्या मान्यतेकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे. तथापी, शहरातील रस्त्यांवरील खड्डे भरणेच्या कामाकरीता उपस्थित झालेल्या विधानसभा तारांकीत प्रश्नाकरीता मा. मंत्रीमहोदयांनी उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे दिलेल्या आश्वासनाच्या पूर्तीकरीता रस्त्यांवरील खड्डे भरणेच्या कामांचेही त्रयस्थ संस्थेकडून लेखा परिक्षण करणे आवश्यक असल्याने सदर कामाचे लेखा परिक्षण मे.वेबकॉस प्रा.लि.यांचेकडून करुन घेणेस मा.स्थायी समितीकडून मान्यता मिळणेस प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. ८४ दिनांकः— ७/१०/२०१६

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. गुरुनो वलेचा

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील विविध विकास कामांचे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखा परिक्षण करणेकरीता मागविण्यात आलेल्या निविदेमध्ये निम्न दराचे मे.वेबकॉस प्रा.लिमि. यांची नियुक्ती करणेस व शहरातील रस्त्यांवरील खड्डे भरणेच्या कामाचे त्रयस्थ संस्थेकडून लेखा परिक्षण करणेकरीता उपस्थित केलेल्या विधानसभा तारांकीत प्रश्नावर मा.मंत्री महोदयांनी दिलेल्या आश्वासनाच्या पूर्तीकरीता खड्डे भरणेच्या कामाचेही लेखा परिक्षण मे.वेबकॉस प्रा.लिमि.यांचकडून करुन घेण्यास मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**पीठासीन अधिकारी, श्री. जमनादास पुरस्वानी :—**दुसरा असा विषय होता की, स्थायी समितीमध्ये इतिवृत्त जे येतात ते जरा लवकर आले पाहिजे.

**महापालिका सचिव :—**स्थायी समितीचे इतिवृत्त लिहिणा—या श्रीमती विशाखा सावंत यांना प्रभारी मालमत्ता व्यवस्थापकचा पदभार आहे. त्यामुळे त्या या कार्यालयात वेळ देवु शकत नाही. त्या या कार्यालयात बसत नाहीत. जास्तीत जास्त वेळ मालमत्ता विभागातच राहतात. त्यामुळे इतिवृत्त प्रलंबित राहतात. याबाबत मी आयुक्त महोदयांकडे दोन—तीन वेळा टिप्पणी सुध्दा सादर केली आहे की त्यांना एकतर मालमत्तेचा पुर्ण कार्यभार देवुन सचिव कार्यालयात एक लिपिक कर्मचारी वर्ग पुरविण्यात यावा. याबद्दल मी स्थायी समितीस सभापती महोदयांना सुध्दा सांगितले होते. स्थायी समितीचे इतिवृत्त प्रलंबित राहतात परंतु महासभेचे इतिवृत्त वेळेवर दिले जातात.

**पीठासीन अधिकारी, श्री. जमनादास पुरस्वानी :—**आपण तर बरेचसे विषय इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करतो परंतु एखादा राहुन जातो, जसे आता स्थायी समितीमध्ये नगरसेवक निधी, प्रभाग समिती निधी हे प्रलंबित आहेत कारण इतिवृत्तामुळे. तर त्याचे इतिवृत्त त्वरीत बनविण्यात यावे. जेणेकरुन आम्ही

आमचे काम करु शकु. जे शौचालय संस्थेने केले आहेत व त्यात महापालिकेने पैसे नाही टाकले तर आम्ही त्यामध्ये हे दर वाढवुन देत आहोत. जर महापालिकेने शौचालय बनविले असतील व कोणत्या संस्थेस दिले असेल तर तोच दर असेल आम्ही त्यास दरवाढ करुन देत नाहीत. तो खर्च महापालिकेने केलेला आहे. सार्वजनिक संस्थेने जे शौचालय बनविले आहेत व स्वत: बीओटीवर चालवत आहेत, ज्यांनी शौचालय बनविण्यासाठी स्वत: पैसे लावले आहेत तर त्यात दर वाढविण्याची मान्यता देत आहोत.

**सदस्या श्रीमती अंजली साळवे:—**महासभेत करु शकतो ना?

**पीठासीन अधिकारी, श्री. जमनादास पुरस्वानी :—**नाही करु शकतो ना, सार्वजनिक शौचालय आहे ना. स्थायी समितीत करु शकतो दुसरे काही नाही. ठरावात असे टाकण्यात यावे की, जेवढे काही सार्वजनिक शौचालय आहेत, संस्थेने ते स्वत: बनवुन बीओटीवर चालवत आहेत, स्वत: बनविल्याने वापरत आहेत, चालवत आहेत तर त्याचे दर वाढविण्यासाठी परवानगी देत आहेत, आणि जे महापालिकेने खर्च करुन बनविले आहेत त्यात नाही. बरेचसे असे शौचालय आहेत जे महापालिकेने सुध्दा बनवुन दिलेले आहेत संस्थेस. जर महापालिकेने पैसे लावुन बनविले आहेत तर आपण त्यात दर वाढविणार नाहीत. तसेच हा ठराव इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता अंमलात आणावा. ही सभा आता संपवु या. आणि जर आमच्या सदस्यास कुठल्या अन्य विषयावर बोलायचे असेल तर आमचे अधिकारी बसले आहेत तर पाच मिनिटे त्यांच्याशी चहा पीत बोलु शकतात. ही सभा संपविण्यात येत आहे.

५.३० वाजंता सभेचे कामकाज संपल्याचे पीठासीन अधिकारी श्री. जमनादास पुरस्वानी यांनी जाहिर केले.

**(प्राजक्ता मि. कुलकर्णी )**
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—२७/१०/२०१६

दि.२७/१०/२०१६ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवत्त.

११

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा गुरूवार दिनांक २७/१०/२०१६ रोजी सायं. ४.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे | सभापती |
| २ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | सदस्या |
| ३ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर | सदस्य |
| ४ | श्री. उमेश सुरेश कालानी | सदस्य |
| ५ | श्री. गुरुनो भिकोमल वलेचा | सदस्य |
| ६ | श्री. जमनादास पुरस्वानी | सदस्य |
| ७ | श्रीमती अंजली साळवे | सदस्या |
| ८ | श्री. विजय चाहु पाटील | सदस्य |
| ९ | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | सदस्या |
| १० | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | सदस्या |
| ११ | श्रीमती इंदिरा उदासी | सदस्या |
| १२ | श्रीमती पुष्पाताई नाना बागुल | सदस्या |
| १३ | डॉ. निना प्रकाश नाथानी | सदस्या |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्रीमती लिलाबाई आशान २. श्रीमती आशा जिवन इदनानी ३. श्रीमती वंदना पाटील उर्फ वंदना युवराज भदाणे

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. दादासाहेब पाटील, मुख्य लेखा अधिकारी
२. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
३. श्री. सुखदेव बलमे, मुख्य लेखा परिक्षक
४. श्री. राम जयस्वार, शहर अभियंता
५. श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
६. डॉ. राजा रिजवानी, वैद्यकिय आरोग्य अधिकारी
७. श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
८. श्रीम. मंगला माळवे, सहा. आयुक्त
९. श्री. मनिष हिवरे, प्र. सहा. आयुक्त, सा.प्र.वि.
१०. श्रीम. छाया डांगळे, प्र. सहा. आयुक्त, विधी
११. श्री. नंदलाल समतानी, प्र. सहा. आयुक्त तथा प्रभाग अधिकारी
१२. श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.

१. श्रीमती विशाखा सावंत

२. श्रीमती नर्गिस खान

३. श्री. अशोक रामरख्यानी

सायं. ४.२० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

यावेळी श्री. दादासाहेब पाटील, मुख्य लेखा अधिकारी हे आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ होते.

श्री. दादासाहेब पाटील, मुख्य लेखा अधिकारी,आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारीः— मा. सभापती महोदय, प्रशासनाकडून एक आयत्यावेळचा विषय आणला आहे. सदर विषय सभेच्या कार्यसुचीवर सामावून घ्यावा.

सभापती, श्री. सुनिल सुर्वेः— प्रशासनाकडून आयत्यावेळी विषय आणला आहे. सर्वांनी बघून घ्यावे. सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत निविदा प्रक्रिया केलेल्या उल्हासनगर—३ सपना गार्डन येथिल समाज मंदिर (झुलेलाल साई) बांधणे या कामाकरीता मे. प्रकाश कस्ट्रक्शन यांच्या निविदेस मान्यता देणे असा विषय आहे. विषय सामावून घ्यायचा कि नाही हे सदस्यांनी सांगा.

महापालिका सचिव :— प्रथम आयत्यावेळचा विषय सामावून घ्यायचा किंवा नाही याबाबत मान्यता झाली पाहिजे.

सभापती, श्री. सुनिल सुर्वेः—निविदा प्रक्रीया झाली आहे. विषय फक्त आता आला आहे, त्यामुळे सदर विषयाचा समावेश करून घ्यावा.

महापालिका सचिव :— आयत्यावेळचा विषय सामावून घेण्यात येत आहे.

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—सर्व सदस्यांना आयत्या वेळच्या विषयाची प्रत उपलब्ध करून दयावी.

महापालिका सचिव :— विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

**विषय क्र. १ :—** माहे **एप्रिल ते मे २०१६** अखेरपर्यंतचा महानगरपालिका लेख्यांच्या छाननीचा मुख्य लेखा परिक्षकांचा अहवाल विचारात घेणे.

---

**महापालिका सचिव :—** सदर विषय पारीत करण्यात यावा का?

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १ :—** माहे **एप्रिल ते मे २०१६** अखेरपर्यंतचा महानगरपालिका लेख्यांच्या छाननीचा मुख्य लेखा परिक्षकांचा अहवाल विचारात घेणे.

प्रस्तावना

मुबंई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ नुसार माहे एप्रिल ते मे २०१६ चा जमा खर्चाचा अहवाल खालील प्रमाणे सादर केलेला आहे. कृपया सदरचा अहवाल मा. स्थायी समितीपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात यावा.

जमा:—

वित्तीय वर्ष २०१६—२०१७ च्या "अ" "ब" व "क" अर्थसंकल्पात अंदाजे अपेक्षित केलेले उत्पन्न खालीलप्रमाणे आहे.

| अर्थसंकल्प | अंदाजपत्रकानुसार जमा रुपये |
|---|---|
| १ | २ |
| "अ" | ५३२७१७५००० |
| "ब" | १५०००००० |
| "क" | १९४४८००००० |
| एकूण | ७२८६९७५००० |

सदर अपेक्षित जमेमध्ये कर्ज वगळता खालील बाबी अंर्तभूत आहेत.

| अ.क्र. | बाब | अंदाजपत्रकानुसार जमा रुपये |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| २ | महसूल जमा | ५००९६६५००० |
| ३ | शासकीय अनुदान | ५४८५८५००० |
| ४ | अनामत रकमा/दायित्वे इ. | १३६६२५००० |
| ५ | एकुण | ५६९४८७५००० |
| ६ | प्रारंभिक शिल्लक | ११२४९५००० |
| ७ | एकुण :— | ५८०७३७०००० |

वित्तीय वर्ष २०१६—२०१७ च्या अर्थसंकल्पात सुधारीत महसूल जमा रक्कम रुपये ५५१७०६५०००/— अपेक्षित धरलेली आहे. माहे एप्रिल ते मे, २०१६ मध्ये समप्रमाणात रुपये ९१९५१००००/— महसूल उत्पन्न अपेक्षित होते. आरंभिची शिल्लक वगळता प्रत्यक्षात रुपये ३४९४६८०००/— (एकूण अपेक्षित महसूल जमेच्या ३८ टक्के) महसूल उत्पन्न प्राप्त झाले.

माहे एप्रिल ते मे, २०१६ मध्ये प्रारंभिक अंदाजानुसार अपेक्षित असलेली जमा व प्रत्यक्ष जमा महसूल लेखा शिर्षनिहाय खालीलप्रमाणे आहे.

| लेखा शिर्ष अर्थ संकल्प "अ" | | सन २०१६–१७ चे अंदाजित उत्पन्न | माहे एप्रिल अखेर २०१६ पर्यंत अपेक्षित महसुली उत्पन्न | माहे एप्रिल २०१६ पर्यंत प्रत्यक्ष जमा उत्पन्न |
|---|---|---|---|---|
| अर्थसंकल्प ''अ'' | | १ | २ | ३ |
| १ | स्थानिक संस्था कर | २५०००००००० | ४१६६६६००० | २३२७५९०० |
| २ | मालमत्ता कर | ५७२०००००० | ९५३३४००० | ३४४११००० |
| ३ | एम. आर. टी. पी. वसूली | ९८६५००००० | १६४४१६००० | ३८९९४००० |
| ४ | अनाधिकृत बांधकाम दंड वसूली | २०००००००० | ३३३३४००० | |
| ५ | मार्केट | १००००००० | १६६६००० | |
| ६ | रुग्णालय फी | ४५०००० | ७६००० | ५७००० |
| ७ | परवाना व इतर फी | ४१८००००० | ६९६६००० | १०९७००० |
| ८ | संकीर्ण | २८६१५०००० | ४७७०००० | ५१०१००० |
| ९ | महानगरपालिका मालमत्ता उत्पन्न | ३०४९००००० | ५०८१६००० | १०८५००० |
| | एकूण "अ" | ४६४४२६५००० | ७७४०४४००० | ३१३५४०००० |
| | अर्थसंकल्प "ब" | | | |
| | महसूल उत्पन्न | २५००००० | ४१६००० | |
| | एकूण "ब" | | | |
| | अर्थसंकल्प "क" | | | |
| १ | पाणी बिल वसुली (कर) | ५०००००००० | ८३३३४००० | २०४२२००० |
| १ (अ) | पाणी बिल वसुली (पाणी पट्टी) | २०००००००० | ३३३३४००० | ४५८७००० |
| २ | मालमत्ता कर | १६९०००००० | २८१६६००० | १०७९०००० |
| ३ | परवाना/इतर फी | १०००००० | १६६००० | ०१९०९५ |
| ४ | संकीर्ण | ३००००० | ५०००० | |
| | एकुण "क" | ८७०३००००० | १४५०५०००० | ३५९९८९ |
| | एकुण "अ","ब" व "क" | ५५१७०६५००० | ९१९५१०००० | ३४९४६८००० |

सन २०१६–१७ च्या 'अ''ब'व'क' अंदाजपत्रकात एकूण उत्पन्न रु. ७४०१९७००००/– (प्रारंभिक शिल्लकेसह) अपेक्षित धरलेले आहे. प्रत्यक्षात माहे एप्रिल ते मे, २०१६ अखेरपर्यंत रू. ९९३३४८२६३/– (प्रारंभिक शिल्लकेसह) उत्पन्न प्राप्त झाले आहे.

पुरेसा कर्मचारीवृंद नसल्याने उत्पन्नाचे लेखा परिक्षण अद्यावत ठेवता येत नाही. तथापी आर्थिक वर्ष संपताच मागील वर्षाचे जमेचे लेखापरिक्षण करण्यात येत असून अनियमितता आढळल्यास निदर्शनास आणून देवून योग्य ती कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात येतात.

खर्च–

माहे एप्रिल ते मे, २०१६ अखेर पर्यंत रु. ३७९९८८८०३/– खर्च लेखांकित झालेला आहे. तो एकूण प्रत्यक्ष जमा महसुलाच्या ३८.२५ टक्के झाल्याचे दिसून येत आहे. खर्चाचे पूर्व लेखापरिक्षण होत असते व लेखा परिक्षणात उपस्थित केलेल्या आक्षेपांचे निराकरण झाल्यावरच देयकाचे प्रदान करण्यात येत आहे. झालेला खर्च हा सक्षम प्राधिका–याच्या पूर्व मंजुरीने झालेला असून तो अर्थसंकल्पीय तरतूदीच्या अधिन आहे.

माहे एप्रिल ते मे, २०१६ ची जमा व खर्चाची पत्रके सोबत जोडली आहेत.

निवृत्ती वेतन प्रकरणे–माहे एप्रिल ते मे, २०१६ मध्ये महानगरपालिकेच्या सेवेतून निवृत्त झालेल्या / निधन पावलेल्या कर्मचा–यांची ४ निवृत्ती वेतन प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत.

लेखा परिक्षणामध्ये निदर्शनास आलेल्या गंभीर बाबी (मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ कलम ०६(१) अ च्या तरतुदीप्रमाणे) अर्थसंकलपिय अंदाजाप्रमाणे महानगरपालिकेस फारच कमी उत्पन्न मिळाले आहे.

१) स्थानिक संस्था कर २) मालमत्ता कर ३) महानगरपालिका मालमत्ता उत्पन्न एकूण उत्पन्नात वाढ होणे आवश्यक आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र. </u> ८५ <u>दिनांकः—२७/१०/२०१६</u>

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. विजय पाटील

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार माहे एप्रिल ते मे २०१६ अखेरपर्यंतचा महानगरपालिका लेख्यांच्या छाननीचा मुख्य लेखा परिक्षकांचा अहवालाची नोंद घेत आहे व उत्पन्न वाढविण्या प्रयोजनार्थ प्रशासनास योग्य उपाययोजना करण्यास व कठोर पावले उचलण्यास निर्देशित करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. २ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. २ :—** सफाई साहित्य/साधने खरेदीसाठी बाब निहाय न्युनतम दर सादर करणा—या निविदाकार मोहित इंटरप्राईझेस, मोहिनी इंटरप्राईझेस व जेपी कॉम्प्युट्रोनिक्स, उल्हासनगर यांच्याशी संविदा करणेस मान्यता देणे.

---

<u>महापालिका सचिव :—</u> सदर विषय पारीत करण्यात यावा का?

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u> सदर विषयाच्या ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता करण्यात यावी.

<u>काही सदस्य:—</u>पास,पास.......

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—</u> सर्व विषय इतिवृत्ताची वाट न पहाता पारीत करण्याची प्रथा पडली आहे. मी सन १९९७ पासून नगरसेवक आहे, तेव्हापासून महासभा झाली कि पुढील सभेत मागील सभेचे इतिवृत्त कायम होण्यासाठी येत होते. परंतु काही महिन्यांपासुन अशी प्रथा पडत चालली आहे कि, इतिवृत्ताची वाट न पहाता असे लिहिले जाते, हे जरूरी आहे परंतु काही महत्वाचे विषय असतील तर ठिक आहे. पण आपण प्रत्येक विषयात म्हणाल कि इतिवृत्ताची वाट न पहाता तर ते बरोबर नाही. कारण आजच्या सभेत आपण पाहिले तर ५—६ सदस्य उपस्थित नाहीत, परंतु या सभेचे इतिवृत्त त्यांना मिळाल्यानंतर ते वाचतील कि आमच्या अनुपस्थित सभेत काय चर्चा झाली कोणते विषय पारीत झाले. सदस्य विषयावर काय बोलले, तर हे पुढील स्थायी समितीच्या सभेत त्यांना माहिती झाले पाहिजे, आता सभापती महोदयांनी म्हटले कि, इतिवृत्ताची वाट न पहाता ठरावाची अंमलबजावणी करण्यात यावी. परंतु अशी प्रथा पडता कामा नये कि प्रत्येक विषयाला इतिवृत्ताची वाट न पहाता पारीत करण्यात यावे. काही तातडीचे विषय असतील तर ठिक आहे आपण तसे करू शकतो पण खुपच जरूरी काम आहे आणि दोन दिवसांत कार्यादेश दयायचे आहेत तेव्हा आम्ही करू

शकतो. परंतु माझे असे मत आहे कि हि प्रथा बंद झाली पाहिजे यावर सगळयांचे मत घेण्यात यावे. सभेचे इतिवृत्त एक आठवडयाच्या आंत मिळाले पाहिजे. एक आठवडयात शक्य नसेल तर पुढील सभेच्या आधीतरी मिळाले पाहिजे.

<u>महापालिका सचिव :—</u> महापालिका सचिव कार्यालय हे आयएसओ कार्यालय आहे, आपण नियमित इतिवृत्त कायम करण्यास पुढील बैठकीत ठेवत असतो. परंतु माझ्याकडे लिपीक म्हणून असलेल्या श्रीम. विशाखा सावंत यांना प्र. मालमत्ता व्यवस्थापक या पदाचा कार्यभार असल्याने त्या सचिव कार्यालयातील कामास वेळ देवू शकत नाहीत व त्यामुळेच इतिवृत्त कायम होण्यास विलंब होत आहे. मी प्रशासनाला विनंती केली आहे कि, मला त्यांच्याऐवजी एक लिपीक कर्मचारी दयावा परंतु अद्याप कोणीही कर्मचारी मिळालेला नाही.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—</u> हे सर्व ठिक आहे, आपण आपल्या वरिष्ठ प्रशासन अधिकारी यांचेकडून कर्मचारी वर्गाची मागणी करावी. म्हणुन आम्ही प्रत्येक विषयाला इतिवृत्ताची वाट न पहाता पारीत करणे योग्य नाही.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u> मी पिठासीन अधिकारी यांना आदेश देतो की, त्यांनी मा. आयुक्तांशी चर्चा करून पुढच्या सभेपर्यंत सचिव कार्यालयास लघूलेखक नियुक्त करण्यात यावा.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—</u> प्रत्येक वेळेस ठराव इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता पारीत करू शकत नाही. आता ठिक आहे परंतु वारंवार करणे योग्य नाही.

<u>महापालिका सचिव :—</u> माझ्याकडे कर्मचारी नाही म्हणून असे होत आहे नाहीतर नियमित इतिवृत्त देण्यात येत असते.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u> लघूलेखकाची नियुक्ती करावी, पुढच्यावेळेस हि अडचण येता कामा नये. महासभेमध्येही हि अडचण येत आहे.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—</u> या कार्यकालाची तीन वर्ष झाली परंतु आता हे मी पहिल्यांदा ऐकत आहे, इतिवृत्ताची वाट न पहाता, यात अशी अडचण आहे, जे सदस्य सभेत विषयावर बोलतात आणि ते जर पुढील सभेत नसतील किंवा असतील तर कोण काय म्हणाले हे आम्हाला इतिवृत्तातुन कळते. जोपर्यंत इतिवृत्त कायम होत नाही तोपर्यंत तो विषय स्थगित ठेवला जातो. जर तो विषय इतिवृत्ताची वाट न पहाता पारीत झाला तर मग आपण काही म्हणू शकत नाही, विषय पास झाला, मतदान झाले, काय झाले हे काही कळत नाही तर हे लोकप्रशासनात योग्य नाही. लोकतांत्रिक प्रणालीमध्ये जे काम होते त्याचे इतिवृत्त तयार झाले पाहिजे, ते वाचले गेले पाहिजे, त्यानुसार ठराव झाला पाहिजे. जर कुठे चुक झाली तर आम्ही त्यांस हरकत घेवू शकतो कि इथे आम्ही असे बोललो होतो आणि असे लिहिले आहे, एकवेळा ठिक आहे परंतु वारंवार इतिवृत्ताची वाट न पहाता योग्य नाही. आजच्या सर्व विषयांवर आम्ही इतिवृत्ताची वाट न पहाता ठराव पारीत करू परंतु पुढील सभेतील विषय हे इतिवृत्त कायम झाल्यानंतरच पारीत करण्यात येतील.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u> आयुक्तांच्या स्थानी असलेले प्राधिकृत अधिकारी यांना मी आदेश देतो कि, पुढच्या वेळेस लघुलेखक देण्यात यावा, अशी अडचण येता कामा नये.

<u>श्री. दादासाहेब पाटील, मुख्य लेखा अधिकारी,आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:—</u> सदरहु बाब मी आयुक्तांच्या निदर्शनास आणून देतो.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वेः— </u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. २ :—** सफाई साहित्य/साधने खरेदीसाठी बाब निहाय न्युनतम दर सादर करणा—या निविदाकार मोहित इंटरप्राईझेस, मोहिनी इंटरप्राईझेस व जेपी कॉम्प्युट्रोनिक्स, उल्हासनगर यांच्याशी संविदा करणेस मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

मा. आयुक्त सो. यांनी दिनांक ०१/८/२०१६ रोजी अन्वये आरोग्य विभागासाठी सफाई व स्वच्छतेसाठी आवश्यक साहित्ये—साधने खरेदी करणेसाठी ई—निवदा सुचना प्रसिध्द करण्यास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार दिनांक ०४/८/२०१६ रोजी दै. वृतमानस, हिंद माता व मुंबई मित्र या वृत्तपत्रात निविदा सुचना प्रसिध्द करुन ई—टेंडरींगद्वारे महापालीका वेबसाईटवर जाहिर ई—निविदा सुचना प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. त्याअनुशंगाने ३ निविदाकारांनी विहित मुदतीत निविदा सादर केल्या होत्या. प्राप्त निविदा दि. ०३/९/२०१६ रोजी ई—निविदा कक्षात निविदा समिती सदस्य व निविदाकारांच्या उपस्थितीत संगणकाच्या माध्यमाने उघडण्यात आल्या. सदर सर्व निविदाकारांनी निविदेतील नमुद अटी व शर्तीनुसार आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्याने निविदा समितीने वित्तीय लिफाफा उघडण्याबाबत सुचना केल्या त्यानुसार दिनांक ३/०९/२०१६ रोजी दुपारी ३.०० वाजता निविदा समितीच्या मान्यतेन वित्तीय लिफाफा उघडण्यात आला. पात्र ३ निविदाकारांनी सादर केलेल दर खालीलप्रमाणे आहेत.

<u>तुलनात्मक तक्ता</u>

| अ. क्र. | सफाई साहित्याचे नाव व त्यांचा तपशिल | | आवश्यक मालाचा परिणाम | निविदाधारकाचे नाव व त्यांचे प्राप्त दर प्रति नग/किलो/लिटर | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | मोहिनी इंटरप्राइजेस | मोहित इंटरप्राइजेस | जेपी कंप्युट्रोनिक्स |
| १ | गॅलव्हनाईज बादल्या | | ३२० नग | २४०/— | <u>२३३/—</u> | २३७/— |
| २ | गोवा ब्रुम (७५० ग्राम प्रति नग) | | १५००० नग | <u>६२/—</u> | <u>६२/—</u> | ६४/— |
| ३ | बाम्बु (अदांजे १८ फुट लांबी) | | २३४ नग | ३१२/— | <u>३००/—</u> | ३१०/— |
| ४ | रबरी हातमौजे | | ९६००नग (जोडी) | ६५/— | ६७/— | <u>५९/—</u> |
| ५ | हातरूमाल (प्रति कर्मचारी प्रति महिना ०१ नग) | | १५००० नग | ६०/— | <u>५५/—</u> | ५८/— |
| ६ | साबण (हिंदुस्थान लिव्हर कंपनीचे ७५ ग्राम/नग) | | १४८०० नग | २८/— | २७/— | <u>२५/—</u> |
| ७ | फावडे | ४'' इंच साईज | १५६ नग | १६५/— | <u>१६२/—</u> | १६६/— |
| | | ६'' इंच साईज | १५६ नग | १७८/— | <u>१७३/—</u> | १७५/— |
| | | ८'' इंच साईज | १५६ नग | १९८/— | <u>१९०/—</u> | १९५/— |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ८ | डस्टर्स | १५० नग | ३५/— | ३२/— | ३३/— |
| ९ | रबरी बुच | ५० नग | १७३/— | १८०/— | १७७/— |
| १० | फुल झाडू | १०० नग | ९०/— | ९३/— | ९४/— |
| ११ | रबरी स्कायझर | ५० नग | ३४०/— | ३४५/— | ३५०/— |
| १२ | काथ्या ब्रश | ७८० नग | २०५/— | २१४/— | २१०/— |
| १३ | दातारी (१२—दाती) | १५६ नग | ३५०/— | ३४३/— | ३४७/— |
| १४ | दातारी (०२—दाती) | ७८ नग | २१४/— | २०५/— | २१०/— |
| १५ | लोखंडी हातगाडया (कार्यालयातील नमूण्याप्रमाणे) | ८० नग | ७९९०/— | ८२००/— | ८१००/— |
| १६ | फेस मास्क (कापडी) | १५००० नग | २५/— | २४/— | २५/— |
| १७ | घमेला प्लास्टिकचे दोरीवाले | २३४ नग | ३००/— | २९२/— | २९५/— |
| १८ | फावडे दांडे ४ फुटी | ४६८ नग | ५५/— | ४६/— | ५०/— |
| १९ | विम पावडर | १०० नग | ६०/— | ५४/— | ५८/— |
| २० | टू—व्हील बिन्स १२० (लिटर क्षमतेच्या) | २३४ किलो | ५५००/— | ५३७५/— | ५३००/— |
| २१ | पंखा झाडू (ब्रुम) कार्यालयीन नमुन्याप्रमाणे | ७८० नग | १२०/— | १२५/— | १२३/— |

वरील साहित्यात खालील निविदाकारांचे त्यांचेनावासमोर दर्शविलेल्या अनुक्रमावर साहित्याचे दर न्युनमत आहेत.

मे. मोहिनी इंटरप्राईझेस :— अनु क्र. ९,१०,११,१२,१५ व २१

मे. मोहित इंटरप्राईझेस :— अनु क्र. १,३,५,७,८,१३,१४,१६,१७,१८ व १९

मे. जेपी कॉक्प्युट्रॉनिक्स :— अनु क्र. ४,६ व २०.

तसेच अ.क्र. २ गोवा ब्रुम झाडू साठी मे. मोहित इंटरप्राईझेस व मे. मोहिनी इंटरप्राईझेस यांनी समान दर भरलेले आहेत.

उक्त प्राप्त परीमाण व दरानुसार साहित्य/साधने खरेदीस रुपये ५६,१७,४६४/—मात्र खर्च अपेक्षित आहे. तथापी प्राप्त न्युनतम दरांबाबत निविदा समितीने दिलेल्या निर्देशानुसार निविदाकारांना वाटाघाटी करिता जा. क्र.उमपा/उप.आ/आवि/१८८/१६ दिनांक ०८/०९/२०१६ रोजीच्या पत्रान्वये न्युनतम दर सादर करणा—या निविदाकारांना वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते. वाटाघाटीअंती संबंधीत निविदाकारांनी लेखी पत्र दिलेले आहे. तसेच अ.क्र.२ गोवा ब्रुम झाडू साठी मे. मोहित

इंटरप्राईझेस व मे. मोहिनी इंटरप्राईझेस यांनी समान दर भरलेले होते तथापी वाटाघाटी अंती मे. मोहिनी इंटरप्राईझेस यांनी कमी दर सादर केलेले आहेत. तसेच अ.क्र. २० वर नमुद टू—व्हील बिन्स १२० (लिटर क्षमतेच्या) दर खुपच जास्त असल्याने व वाटाघाटी अंती सदरचे दर निविदाकाराने कमी करण्यास असमर्थता

दर्शविली असल्याने सदरचे साहित्य वगळण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. वाटाघाटी अंती प्राप्त दरांचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

| अ. क्र | सफाई साधनांचे/साहितयाचे नाव | अंदाजीत आवश्यक मागणी | दरपत्रके द्वारे प्राप्त दर रुपये | मागील प्राप्त दर २०१५ –१६ | निविदाकाराचे नाव व त्याने सादर केलेले दर रुपये | वाटाघाटी अंती प्राप्त दर रुपये | अपेक्षीत खर्च रुपये | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | मे. मोहिनी इंटर. | मे. मोहित इंटर. | जेपी कंप्युट्रोनिक्स | | |
| १ | गॅलव्हनाईज बादल्या | ३२० नग | २९८ | २१५ | | २३३ | | २२० | ७०४०० |
| २ | गोवा ब्रुम (७५० ग्राम प्रति नग) | १५००० नग | ५० | ५५ | ६२ | ६२ | | ५५ | ८२५००० |
| ३ | बाम्बु (अदांजे १८ फुट लांबी) | २३४ नग | २४० | २५० | | ३०० | | २४५ | ५७३३० |
| ४ | रबरी हातमौजे | ९६०० नग (जोडी) | ५० | ५३ | | | ५९ | ५३ | ५०८८०० |
| ५ | हातरूमाल (प्रति कर्मचारी प्रति महिना ०१ नग) | १५००० नग | ४५ | ५० | | ५५ | | ५० | ७५०००० |
| ६ | साबण (हिंदुस्थान लिव्हर कंपनीचे ७५ ग्राम/नग) | १४८०० नग | २५ | २३ | | | २५ | २३ | ३४०४०० |
| ७ | फावडे ४'' इंच साईज | १५६ नग | १५५ | १५० | | १६२ | | १५० | २३४०० |
| | ६'' इंच साईज | १५६ नग | १६० | १६० | | १७३ | | १६० | २४९६० |
| | ८'' इंच साईज | १५६ नग | १७५ | १७५ | | १९० | | १७५ | २७३०० |
| ८ | डस्टर्स | १५० नग | ३० | २९ | | ३२ | | ३० | ४५०० |
| ९ | रबरी बुच | ५० नग | ९५ | १६० | १७३ | | | १५० | ७५०० |
| १० | फुल झाडू | १०० नग | ९५ | ६० | ९० | | | ६० | ६००० |
| ११ | रबरी स्क्वायझर | ५० नग | १७५ | ३१४ | ३४० | | | ३१५ | १५७५० |
| १२ | काथ्या ब्रश | ७८० नग | १९० | १९० | २०५ | | | १९० | १४८२०० |
| १३ | दातारी (१२–दाती) | १५६ नग | ३१५ | ३१८ | | ३४३ | | ३१५ | ४९१४० |
| १४ | दातारी | ७८ नग | १८५ | १९० | | २०५ | | १९० | १४८२० |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | (०२—दाती) | | | | | | | | |
| १५ | लोखंडी हातगाडया (कार्यालयातील नमूण्याप्रमाणे) | ८० नग | ७००० | ७२०० | ७९९० | | | ७२०० | ५७६००० |
| १६ | फेस मास्क (कापडी) | १५००० नग | २२ | २२ | | २४ | | २२ | ३३०००० |
| १७ | घमेला प्लास्टिकचे दोरीवाले | २३४ नग | २७५ | २७० | | २९२ | | २७० | ६३१८० |
| १८ | फावडे दांडे ४ फुटी | ४६८ नग | ४५ | ४२ | | ४६ | | ४२ | १९६५६ |
| १९ | विम पावडर | १०० नग | ५० | ५० | | ५४ | | ५० | ५००० |
| २० | टू—व्हील बिन्स १२० (लिटर क्षमतेच्या) | २३४ किलो | ४६५० | ४८०० | | | ५३०० | ५३०० | |
| २१ | पंखा झाडू (ब्रुम) कार्यालयीन नमुन्याप्रमाणे | ७८० नग | ७० | ९० | १२० | | | ७० | ५४६०० |

वाटाघाटी अंती प्राप्त दर वाजवी असल्याने प्राप्त दरानुसार व नमुद केलेल्या परीमाणा नुसार सदरचे साहित्य/साधने खरेदीस रुपये ३९,२१,९३६/— (रुपये एकोणचाळीस लाख एकविस हजार नऊशे छत्तीस मात्र) अपेक्षीत आहे. सन २०१६—१७ साठी भांडवली खर्च भाग—२, सी—१(१) साफसफाई साहित्य खरेदी या लेखा शिर्षकाअंतर्गत रु. ५०,००,०००/— तरतूद उपलब्ध आहे.

तरी उक्त नमूद आवश्यक साहित्य/साधने त्यांच्या समोर दर्शविलेल्या परीमाणा प्रमाणे खरेदी केल्यास रुपये ३९,२१,९३६/— (रुपये एकोणचाळीस लाख एकविस हजार नऊशे छत्तीस मात्र) खर्च अपेक्षित आहे. तरी अ.क्र. १ ते २१ साठी साहित्य/साधने बाब निहाय न्युनतम दर सादर करणा—या निविदाकार मोहित इंटरप्राईझेस, मोहिनी इंटरप्राईझेस व जेपी कॉम्प्युट्रोनिक्स, उल्हासनगर यांच्याशी संविदा करण्याकरीता मा. स्थायी समितीची मान्यता आवश्यक आहे. करिता सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या मंजुरीसाठी विषय पटलावर सविनय सादर.

स्थायी समिती ठराव क्र. ८६ दिनांक:— २७/१०/२०१६

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. विजय पाटील

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार सफाई साहित्य/साधने खरेदीसाठी बाब निहाय न्युनतम दर सादर करणा—या निविदाकार मोहित इंटरप्राईझेस, मोहिनी इंटरप्राईझेस व जेपी कॉम्प्युट्रोनिक्स, उल्हासनगर यांच्याशी संविदा करणेस मान्यता देत आहे.
या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ३ :—** प्रभाग समिती फंडातून दिवाळी बाजार आनंद मेळाव्याच्या कार्यक्रमाची माहिती नोंद करणे.

---

महापालिका सचिव :— सदर विषय पारीत करण्यात यावा का? माहितीची नोंद आहे.

काही सदस्य :—पास—पास......

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ३ :—** प्रभाग समिती फंडातून दिवाळी बाजार आनंद मेळाव्याच्या कार्यक्रमाची माहिती नोंद करणे.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिका तर्फे प्रभाग समिती फंडातून दिवाळी बाजार आनंद मेळाव्याच्या कार्यक्रमाचे आयोजन दिनांक ०७/११/२०१५ ते ०९/११/२०१५ या कालावधीत आयोजीत करण्यात आले होते. सदर कार्यक्रमासाठी दिलेल्या मंजूरीची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनीयम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये पुढील प्रमाणे देण्यात येत आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | मंजूर रक्कम | एजंन्सीचे नाव |
|---|---|---|---|
| ०१ | प्रभाग समिती फंडातून दिवाळी बाजार आनंद मेळाव्याच्या कार्यक्रमाचे आयोजनाचे करीता लागणारे साहीत्य पुरविणेबाबत. | १,९९,०००/— | मे. अमरज्योत एंटरप्रायझेस उल्हासनगर—३ |

तरी सदरची माहीती मा. स्थायी समितीच्या अवलोनार्थ प्रस्तावीत करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ८७ दिनांकः—२७/१०/२०१६

सुचकाचे नाव :— श्रीमती लक्ष्मी सिंह

अनुमोदकाचे नाव :— डॉ. निना नाथानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार प्रभाग समिती फंडातून दिवाळी बाजार आनंद मेळाव्याच्या कार्यक्रमाची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्रमांक. ४ वाचून दाखवितात.

---

**विषय क्र. ४ :—** प्रभाग समिती फंडातून दिवाळी बाजार आनंद मेळाव्याच्या कार्यक्रमाची माहिती नोंद करणे.

---

**महापालिका सचिव :—** सदर विषय पारीत करण्यात यावा का?

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ४ :—** प्रभाग समिती फंडातून दिवाळी बाजार आनंद मेळाव्याच्या कार्यक्रमाची माहिती नोंद करणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका तर्फे प्रभाग समिती फंडातून दिवाळी बाजार आनंद मेळाव्याच्या कार्यक्रमाचे आयोजन दिनांक ०७/११/२०१५ ते ०९/११/२०१५ या कालावधीत आयोजीत करण्यात आले होते. सदर कार्यक्रमासाठी दिलेल्या मंजूरीची माहीती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनीयम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये पुढील प्रमाणे देण्यात येत आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | मंजूर रक्कम | एजंन्सीचे नाव |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| ०१ | प्रभाग समिती फंडातून दिवाळी बाजार आनंद मेळाव्याच्या कार्यक्रमाचे आयोजनाचे करीता लागणारे साहीत्य पुरविणेबाबत. | १,४८,२००/– | मे. अमरज्योत एंटरप्रायझेस उल्हासनगर–३ |

तरी सदरची माहीती मा. स्थायी समितीच्या अवलोनार्थ प्रस्तावीत करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ८८ दिनांकः– २७/१०/२०१६

सुचकाचे नाव :– श्री. उमेश कालानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. गुरुनो वलेचा

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार प्रभाग समिती फंडातून दिवाळी बाजार आनंद मेळाव्याच्या कार्यक्रमाची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

——————————————————————————————————————————————

⇨ **विषय क्र. ५ :–** प्रभाग समिती फंडातून दिवाळी बाजार आनंद मेळाव्याच्या कार्यक्रमाची माहिती नोंद करणे.

——————————————————————————————————————————————

महापालिका सचिव :– सदर विषय पारीत करण्यात यावा का?

काही सदस्य :–पास–पास......

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ५ :—** प्रभाग समिती फंडातून दिवाळी बाजार आनंद मेळाव्याच्या कार्यक्रमाची माहिती नोंद करणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका तर्फे प्रभाग समिती फंडातून दिवाळी बाजार आनंद मेळाव्याच्या कार्यक्रमाचे आयोजन दिनांक ०७/११/२०१५ ते ०९/११/२०१५ या कालावधीत आयोजीत करण्यात आले होते. सदर कार्यक्रमासाठी दिलेल्या मंजूरीची माहीती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनीयम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये पुढील प्रमाणे देण्यात येत आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | मंजूर रक्कम | एजंन्सीचे नाव |
|---|---|---|---|
| ०१ | प्रभाग समिती फंडातून दिवाळी बाजार आनंद मेळाव्याच्या कार्यक्रमाचे आयोजनाचे करीता लागणारे साहीत्य पुरविणेबाबत. | १,९९,६००/— | मे. मोहीत एंटरप्रायझेस उल्हासनगर—३ |

तरी सदरची माहीती मा. स्थायी समितीच्या अवलोनार्थ प्रस्तावीत करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र.** ८९ **दिनांक:—** २७/१०/२०१६

सुचकाचे नाव :— श्रीमती अंजली साळवे

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती रेखा ठाकुर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार प्रभाग समिती फंडातून दिवाळी बाजार आनंद मेळाव्याच्या कार्यक्रमाची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

———————————————————————————————————————

**विषय क्र. ६** :— उल्हासनदीच्या पात्रात खेमाणी नाला मिसळत असल्या ठिकाणी कचरा अडविण्यासाठी तातडीने जाळया बसविणे व कचरा काढण्यासाठी मजुर पुरवठा करणे या कामाची माहितीची नोंद मा. स्थायी समितीत होणेबाबत.
———————————————————————————————————————

<u>महापालिका सचिव :—</u> सदर विषय पारीत करण्यात यावा का?

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ६** :— उल्हासनदीच्या पात्रात खेमाणी नाला मिसळत असल्या ठिकाणी कचरा अडविण्यासाठी तातडीने जाळया बसविणे व कचरा काढण्यासाठी मजुर पुरवठा करणे या कामाची माहितीची नोंद मा. स्थायी समितीत होणेबाबत.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर शहरातून वाहणारा खेमाणी नाला हा शहाड येथील एम.आय.डी.सी. च्या पंप हाऊसाच्या शेजारी असलेल्या उल्हास नदीच्या पात्रात मिसळतो. सदर वाहणा—या नाल्यामधुन मोठया प्रमाणात कचरा उदा. प्लास्ट्रिकच्या पिशव्या तसेच अन्य घाण कचरा पाण्यात मिसळत असल्यामुळे एम.आय.डी.सी. च्या उपसा विहिरीच्या जाळयामध्ये सदर कचरा जावुन त्यामुळे वेळोवेळी पंप बंद पडतात. त्यामुळे उल्हासनगर शहरास होणा—या पाणी पुरवठयात व्यत्यय निर्माण होऊन पाणी पुरवठयावर विपरित परिणाम होतो.

सध्या पावसाळयाचे दिवस असल्यामुळे खेमाणी नाल्यातुन मोठया प्रमाणात नाल्याचा प्रवाह येत असून त्यामुळे शहाड येथील पंपिग स्टेशनच्या जाळयामध्ये मोठया प्रमाणात कचरा अडकुन पंपिग बंद पडत होते.

त्यामुळे सदर प्रकरणी मा. आयुक्त सो. यांचे समवेत उप आयुक्त(पाणी पुरवठा) व कार्यकारी अभियंता (पा.पु.) यांनी दि. ०६/०७/२०१५ रोजी शहाड येथील एम.आय.डी.सी. च्या पंप हाऊस च्या शेजारी खेमाणी नाल्याची पहाणी केली असता मा. आयुक्त सो., यांनी सदर खेमाणी नाल्याचा कचरा उल्हास नदीच्या पात्रात न मिसळण्याबाबत तातडीने उपाययोजना करणे बाबत निर्देश दिले.

त्याअनुषंगाने दि. ७/०७/२०१५ रोजी सदर कम तातडीने करणे कामी ठेकेदार झा.पी. ॲन्ड कंपनी यांना सुचना देण्यात आल्या असुन संबंधित ठेकेदारामार्फत खाली कामे करून घेण्यात आले आहे.

या करीता तातडीने खेमाणी नाला ज्या ठिकाणी उल्हास नदीच्या पात्रात मिसळतो, त्या ठिकाणी तातडीने खालील कामे करणे गरजेचे होते.

१) उल्हासनदीच्या पात्रात जेथे खेमाणी नाला मिसळतो, त्या ठिकाणी पुढे व मागे लोखंडी जाळी बसविणे.

२) दररोज ज्या ठिकाणी लोखंडी जाळया बसविण्यात येणार आहेत तेथे साठणारा कचरा काढण्यासाठी मजुर मार्फत करण्यात आले आहे.

तरी सबब उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील उल्हासनदीच्या पात्रात खेमाणी नाला मिसळत असल्या ठिकाणी कचरा अडविण्यासाठी तातडीने जाळया बसविणे व कचरा काढण्यासाठी मजुर पुरवठा करणेबाबतचे काम करण्यात आलेले आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या अवलोकनार्थ प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ९० दिनांकः—२७/१०/२०१६

सुचकाचे नाव :— श्रीमती रेखा ठाकूर

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती लक्ष्मी सिंह

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनदीच्या पात्रात खेमाणी नाला मिसळत असल्या ठिकाणी कचरा अडविण्यासाठी तातडीने जाळया बसविणे व कचरा काढण्यासाठी मजुर पुरवठा करणे या कामाची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

महापालिका सचिव :— विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ७ :—** उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील गणपती विसर्जन, दुर्गादेवी विसर्जन झाल्यामुळे उल्हास नदीमधून गाळ, कचरा व इतर साहित्य बाहेर काढणे व विल्हेवाट लावणे या कामाबाबतची माहितीची नोंद होणेबाबत.

---

महापालिका सचिव :— सदर विषय पारीत करण्यात यावा का?

काही सदस्य :—पास—पास......

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

**विषय क्र. ७ :—** उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील गणपती विसर्जन, दुर्गादेवी विसर्जन झाल्यामुळे उल्हास नदीमधून गाळ, कचरा व इतर साहित्य बाहेर काढणे व विल्हेवाट लावणे या कामाबाबतची माहितीची नोंद होणेबाबत.

प्रस्तावना

गणपती विसर्जन, दुर्गादेवी विसर्जन झाल्यामुळे उल्हास नदीमधुन गाळ, कचरा व इतर साहित्य बाहेर काढणे व विल्हेवाट लावणे बाबत रू. ६,७८,८०९/— या कामास मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव मा. अतिरीक्त आयुक्त उल्हासनगर महानगरपालिका यांनी मा. आयुक्त सो. यांच्या स्वाक्षरीसाठी ठेवण्याकरीता मंजुरी दिली आहे स्थायी समिती पुढे प्रस्ताव सादर करणेसाठी दि. २४/११/२०१५ रोजी मंजुरी दिली आहे.

गणेशोत्सव व दुर्गादेवी महोत्सवाच्या काळात गणेशमूर्ती देवीच्या मातीच्या मुर्तीचे विसर्जन झाल्यामुळे पाणी पुरवठा करणा—या पंपीग स्टेशन जवळ मोठया प्रमाणात निर्माण झालेला गाळ तातडीने काढणे आवश्यक होते. अन्यथा उल्हासनगर शहराच्या पाणी पुरवठयावर परिणाम होवून पंपीग स्टेशनमध्ये पाणी पोहचण्यास अडथळा झाल्यामुळे पाणी पुरवठा बंद झाला असता. सदर काम तातडीने करून घेणे आत्यावश्यक असलेने पाणी पुरवठा विभागाने ते करून घेतले आहे तरी तातडीची बाब म्हणून काम करण्यात आले आहे.

तरी सबब उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील गणपती विसर्जन, दुर्गादेवी विसर्जन झाल्यामुळे उल्हास नदीमधून गाळ, कचरा व इतर साहित्य बाहेर काढणे व विल्हेवाट लावणे बाबतचे काम करण्यात आलेले आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या अवलोकनार्थ प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ९१ दिनांक:—२७/१०/२०१६

सुचकाचे नाव :— श्रीमती रेखा ठाकुर

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती लक्ष्मी सिंह

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील गणपती विसर्जन, दुर्गादेवी विसर्जन झाल्यामुळे उल्हास नदीमधून गाळ, कचरा व इतर साहित्य बाहेर काढणे व विल्हेवाट लावणे या कामाबाबतची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ८ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ८ :—** मा. आयुक्त यांचे निवासस्थान नसल्यामुळेभाडे तत्वावर निवासस्थान उपलब्ध होणेबाबत.

---

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—</u> सदर विषयावर चर्चा होणे आवश्यक आहे. सन १९९६ पासुन २०१६ पर्यत २० वर्ष झाली महानगरपालिकेच्या प्रत्येक अंदाजपत्रकात आयुक्त निवासासाठी तरतुद केली आहे. प्रत्येक वेळेस अंदाजपत्रक तयार केले जाते ते संपून जाते, त्यामध्ये इतर कामे होतात परंतु आयुक्तांच्या निवासाचे काम होत नाही. यासाठी कोणतेही नियोजन केले जात नाही कि प्राकलन तयार केले जात नाही, तसेच आयुक्त निवासासाठी न कोणती जागा निश्चित केली जाते किंवा न निविदा प्रक्रीया केली जाते, ज्या विभागाशी संबंधित हा विषय आहे त्यांनी याबाबत जरा सांगावे. आजुबाजूच्या नगरपालिका, महानगरपालिका पाहिल्या तर सगळीकडे, आयुक्तांसाठी, महापौरांसाठी निवासस्थान तयार केलेले आहेत. परंतु हि उल्हासनगर महानगरपालिका आहे जिथे प्रत्येक वर्षी अंदाजपत्रकात तरतुद केली जाते परंतु आयुक्त निवास तयार करण्यासाठी नियोजन केले जात नाही.

<u>श्री. दादासाहेब पाटील, मुख्य लेखा अधिकारी,आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:—</u> मा. सभापती महोदय, आणि सन्मा. सदस्य, प्रत्येक वेळी आपण अंदाजपत्रक तयार करतो, विशेष करून मागील तीन वर्षापासून मी अंदाजपत्रक तयार करत आहे परंतु त्यामध्ये आयुक्त निवासासाठी काही तरतुद केलेली नाही ही वस्तुस्थिती आहे. यापुर्वीच्या मागील सहा सात वर्षाच्या अंदाजपत्रकामध्येदेखील आयुक्त निवासासाठी तरतुद नव्हती. परंतु येणा—या अंदाजपत्रकामध्ये नक्की आयुक्त निवासासाठी तरतुद करण्यात येईल.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—</u> सन १९९७ पासून १६ वेळा अंदाजपत्रकामध्ये घेण्यात आले आहे. परंतु त्यावर कार्यवाही होत नसल्यामुळे ती तरतुद काढून टाकण्यात आली आहे. तसेच महापालिकेकडे समावेशक आरक्षणातुन प्राप्त २५ टक्के मालमत्ता आहेत त्या आम्ही विकल्या तर त्यातुन रू.२० कोटी रक्कम प्राप्त होवू शकते. जर त्या भाडयाने दिल्या तर त्यापासुन रू.२ कोटी रक्कम प्राप्त होवु शकते. परंतु आपण काही करत नाही. मालमत्ता विभागामध्ये हा विषय प्रलंबित आहे. आता लहान लहान नगरपालिका/महानगरपालिकांनी जेव्हा जकात करवसुली चालू होती तेव्हा त्यांनी कशाप्रकारे निविदा काढल्या होत्या. त्यामध्ये ठेकेदार रू. १० करोड रक्कम महापालिकेला जकात करवसुली देणार व एक बंगला बनवुन देणार आयुक्तांसाठी, किंवा रू. ५५ करोड रक्कम महापालिकेला देणार व महापौरांसाठी एक बंगा बनवुन देणार अशाप्रकारे निविदांद्वारे लहान लहान नगरपालिका/महानगरपालिकांना आयुक्त व महापौरांसाठी बंगले तयार करून घेतले आहेत. आपलीच महानगरपालिका आहे जिथे हे झाले नाही. आयुक्तांसाठी हे आवश्यक आहे. बाहेरून आयुक्तांची नेमणूक होते, प्रवासातच त्यांचे ४—५ तास जातात, अंदाजपत्रकात तरतुद केली पाहिजे, भविष्यात जे कोणी आयुक्त किंवा महापौर येतील त्यांना याचा लाभ घेता येईल. आता ठिक आहे, अंदाजपत्रकात तरतुद नाही, एप्रिलमध्ये तयार करण्यात येणा—या अंदाजपत्रकामध्ये तरतुद करण्यात येईल परंतु आयुक्त निवासासाठी स्थान निश्चित झाले पाहिजे, तेथे बंगला तयार करण्यासाठी प्राकलन तयार झाले पाहिजे, त्यानुसार आराखडा तयार केला पाहिजे,

<u>श्री. दादासाहेब पाटील, मुख्य लेखा अधिकारी,आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:—</u> आता आम्ही महापालिका अंदाजपत्रकात तरतुद करू. त्यामुळे हा विषय पारीत करण्यात यावा.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—</u> आपली महानगरपालिका आहे जिथे आयुक्तांच्या निवासस्थानासाठी तरतुद नाही. आपण अंदाजपत्रकामध्ये तरतुद ठेवली पाहिजे. आयुक्त निवास, महापौर निवास यासाठी पुढील अंदाजपत्रकामध्ये तरतुद करू शकतो.

**<u>श्री. दादासाहेब पाटील, मुख्य लेखा अधिकारी,आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:–</u>** आता पुढे सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्यात येईल त्यामध्येसुध्दा आयुक्त निवासासाठी तरतुद करू शकतो.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>** आपण सदरहु बाब ठरावामध्ये घेऊ शकता कि मा. आयुक्त निवास व महापौर निवास याकामाच्या खर्चाचे सुधारीत अंदाजपत्रकात तरतुद करण्यात यावी. व तसा प्रस्ताव आणण्यात यावा. तोपर्यंत आता आणलेला विषय आम्ही २ वर्षासाठी पारीत करण्यास मान्यता देतो.

**<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u>**सदरचा विषय श्री. जमनादास पुरस्वानी यांनी विशेष सांगितला आहे, शहर अभियंता यांनी आयुक्त व मा. महापौर यांचेकरीता निवास बांधणेसाठी कार्यवाही सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्यापुर्वी सुरू करण्यात यावे. हे स्थायी समितीचे स्थायी आदेश आहेत याची अंमलबजावणी झालीच पाहिजे, तसेच पुढच्या वर्षाच्या अंदाजपत्रकामध्ये जागेची निश्चिती, अंदाजपत्रकात तरतुद इत्यादी बाबी पुर्ण कराव्यात. महापौर व आयुक्त यांना घेवून संबंधित विभागाने फिरावे व जागा निश्चित करावी. कारण आता निवडणूका जवळ आल्या आहेत त्यामुळे नविन येणारे आयुक्त किंवा महापौर यांना त्याचा लाभ घेता येईल.

**<u>महापालिका सचिव :–</u>** सदरचा विषय पारीत करण्यात यावा का?

**<u>काही सदस्य :–</u>**पास–पास......

**<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u>** सदर विषयाच्या ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता करण्यात यावी.

**<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u>**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ८ :–** मा. आयुक्त यांचे निवासस्थान नसल्यामुळेभाडे तत्वावर निवासस्थान उपलब्ध होणेबाबत.

<u>प्रस्तावना</u>

मा. श्री. राजेंद्र निंबाळकर, भारतीय प्रशासकिय सेवा, आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिकेत दिनांक २२/९/२०१६ रोजी रुजु झाले आहेत, त्यामुळे मा. आयुक्तांकरीता सुसज्ज असे निवासस्थान उपलब्ध करुन देणे ही महापालिकेची जबाबदारी आहे, आपल्या शेजारील कल्याण डोंबिवली, भिवंडी निजामपूर इत्यादी महानगरपालिकांमध्ये तेथिल आयुक्तांसाठी सर्व सोयी सुविधांयुक्त बंगलो वजा निवासस्थान आयुक्तांकरीता उपलब्ध करुन देण्यात आले आहे. परंतु आपल्या उल्हासनगर महानगरपालिकेने मा. आयुक्तांकरीता निवासस्थानाचे प्रयोजन केलेले नाही, मा. आयुक्त हे पुणे ते पुणे येथिल रहिवाशी असून त्यांची स्वत:ची उल्हासनगर अथवा मुंबई जवळपास राहणेची निवासाची व्यवस्था नाही. त्यामुळे त्यांना महापालिका क्षेत्रात किंवा शेजारच्या शहरात निवासस्थान उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

मा. आयुक्त यांनी ठाणे येथे सेमी फर्निस निवासस्थान पाहिले असून, त्यात त्यांची व्यवस्था करणे आवश्यक आहे. ठाणे येथे महत्वाची शासकिय कार्यालये असून ते रेल्वे व रस्ते याने उल्हासनगर तसेच महत्वाची शासकिय कार्यालये असलेले ठिकाणी मुंबई व पुणे येथे जोडलेले शहर आहे, या शहरामध्ये शासकिय महत्वाच्या बैठकांकरीता मा. आयुक्तांना वेळोवेळी उपस्थित रहावे लागते, त्या ठिकाणी मा. आयुक्त यांचे निवासस्थान महापालिकेस भाडेतत्वावर घेणे उचित राहील. या संदर्भात चौकशी केली असता ठाणे स्टेशनच्या परिसरामध्ये भाडे तत्वावर निवासस्थान घ्यावयाचे झाल्यास त्यास किमान ३०,००० ते ४०,००० एवढे मासिक भाडे घरमालक अपेक्षित करीत आहेत. त्यामुळे खालीलप्रमाणे मा. आयुक्तांचे निवासस्थानाकरीता खर्च महापालिकेस अपेक्षित आहे.

| अ.क्र. | तपशिल | अपेक्षित खर्च |
|---|---|---|
| १. | भाडे तत्वावरील रुमचे सुरक्षा अनामत रक्कम | २,००,००० |
| २. | ११ महिन्याचे मासिक भाडे प्रति महिना रु. ३५,००० त्यानंतर पुढील देय भाडे | ३,८५,००० |
| ३. | निवासस्थानात फर्निचर व इतर आवश्यक वस्तुकरिता अपेक्षित खर्च | २,००,००० |

तरी मा. स्थायी समितीची खर्चास मान्यता मिळावी, ही विनंती.

स्थायी समिती ठराव क्र. ९२ दिनांकः– २७/१०/२०१६

सुचकाचे नाव :– श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :– श्री. विजय पाटील

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार मा. आयुक्त यांचे निवासस्थान नसल्यामुळे २ वर्षासाठी भाडे तत्वावर निवासस्थान उपलब्ध करुन देणेस येणा–या अंतर्भुत खर्चास प्रशासकिय मान्यता देत आहे.

तसेच

मा. महापौर व आयुक्त महोदय यांच्या निवासस्थानासाठी सुधारीत अर्थसंकल्पात तरतूद करावी व तसा प्रस्ताव आणावा.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. ९ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. ९ :– प्रस्तावाची सूचना

अंदाजपत्रकात राखून ठेवलेल्या तरतूदीनुसार एकुण रु. ९३.६२ कोटीच्या रस्त्याचा विकास कामाच्या निविदा काढण्याकरीता निर्णय घेणेबाबतचा स्थायी समिती सभापती श्री. सुनिल सुर्वे यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

---

सभापती, श्री. सुनिल सुर्वेः–आयुक्त साहेब नसल्यामुळे सदरचा विषय वगळण्यात यावा. पुढील सभेत घेण्यात येईल.

<u>काही सदस्य :–</u> सदरचा विषय वगळण्यात यावा.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

विषय क्र. ९ :– <u>प्रस्तावाची सूचना</u>

अंदाजपत्रकात राखून ठेवलेल्या तरतूदीनुसार एकुण रु. ९३.६२ कोटीच्या रस्त्याचा विकास कामाच्या निविदा काढण्याकरीता निर्णय घेणेबाबतचा स्थायी समिती सभापती श्री. सुनिल सुर्वे यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिकेच्या सन–२०१६–१७ च्या अंदाजपत्रकिय बैठकीमध्ये सर्वपक्षाच्या पदाधिका–याच्या संमतीने शहरातील प्रमुख रस्ताचा विकास होण्याकरीता तशी चर्चा करुन महासभेच्या मान्यतेने ठराव पारीत केला आहे.सोबत ठरावाची प्रत जोडत आहे. परंतु अदयाप पर्यत महासभेने केलेल्या ठरावाच्या प्रस्तावानुसार प्रस्ताव बनविण्यात आलेले नाही. उल्हासनगर शहरात गेल्या १० वर्षात कोणत्याही नवीन रस्त्यांचे काम कमी प्रमाणात हाती घेण्यात आल्याने व सद्या ते नादुरुस्त अवस्थेत असल्याने या रस्त्यावर होणारा दर वर्षी खर्च तसेच पावसाळयापूर्वी व पावसाळयानंतर खड्डेमय रस्त्यांवर होणारा खर्चाचा विचार पाहता. नाहक खर्च महापालिकेस दरवर्षी सोसावा लागत आहे. तसेच काही रस्त्ये अरुंद असल्याने त्यांचा देखील विकास होणे आवश्यक असल्याने त्या मार्गे जाता येतांना नागरीकांना व वाहतूकीस नाहक त्रास सहन करावा लागत आहे. याकरिता शहरातील वरील नमुद रस्त्यांच्या विकास होणे अत्यंत आवश्यक आहे. सदर नादुरुस्त रस्त्यामुळे नागरीकांच्या रोषास आम्हांला दैनंदिन सामोरे जावे लागत असून, शहरात चर्चेचा विषय बनला आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेची आगामी सार्वत्रिक निवडणूक–२०१७ मध्ये होत असल्याने मतदाराच्या प्रश्नाला आम्हाला सामोरे जावे लागणार आहे. या विषयावर विरोधकांकडून राजकरण करुन शहरात कायदा व सुव्यवस्था बिघडविण्याचा प्रयत्नात आहेत. या सर्व बाबींचा विचार करता व सर्वपक्षाच्या संमतीने महासभेच्या अंदाज पत्रकात तरतुदीनुसार शहरातील सोबत जोडलेल्या यादीतील प्रमुख रस्त्याचे विकासाची निविदा काढण्याबाबत चर्चा विनिमय करण्याकरिता विशेष तात्काळ महासभा लावण्याबाबत विनंती करण्यात आली होती परंतु अद्यापपर्यंत विशेष महासभेचे आयोजन करण्यात न आल्याने येत्या दि.२७/१०/२०१६ रोजी होणाऱ्या स्थायी समितीच्या बैठकीमध्ये प्रस्तावाची सुचनेनुसार मांडत असून विषय घेण्यात यावा, ही विनंती.

| अक्र | तपशिल | रक्कम |
|---|---|---|
| | रस्त्ये | |
| १ | विठ्ठलवाडी ते शांतीनगर डॉल्फीन | ३ कोटी |
| २ | नेहरु चौक ते फॉलवर लाईन | ८ कोटी |
| ३ | आशा कोल्ड्रीन ते पोलिस स्टेशन, बस स्टॉप, उल्हासनग–१ | ३ कोटी |
| ४ | श्रीराम, आनंद दिघे प्रवेशद्वार | २ कोटी |
| ५ | खेमाणी ते बजरंग आईस फॅक्टरी | ५ कोटी |
| ६ | उल्हास स्टेशन ते जिजामाता व्हाया सावरकर चौक | ५ कोटी |
| ७ | नेताजी स्कूल ते लालचक्की, उल्हासनगर–५ | ५ कोटी |
| ८ | सी ब्लॉक ते शांतीनगर साईबाबा डॉल्फीन व्हाया | १० कोटी |
| ९ | शहाड स्टेशन ते महानगरपालिका व्हाया सी ब्लॉक रोड, साईड ड्रेन आणि फुटपाथ | ७ कोटी |

| | | |
|---|---|---|
| १० | रमेश मुकणे हाऊस ते शास्त्री नगर | १.५० कोटी |
| ११ | मधुबन हॉटेल ते हिरा संकूल विकास व मा.बाळासाहेब ठाकरे स्मारक बांधणे | ५० लाख |
| | **उद्यानाचे सुशोभिकरण व नुतनीकरण** | |
| १ | नाना नानी गार्डन, ४४४ गार्डन समोर, धनराज गार्डन, नेहरु नगर गार्डन, आनंद दिघे गार्डन, आजी आजोबा पार्क तक्षशिला पाण्याच्या टाकीसमोर, लिला चौक बिल्डींगच्या बाजूला, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे उद्यान उल्हासनगर–५, राजीव गांधी ड्यान, इंदिरा गांधी गार्डन, रामरख्यानी गार्डन, डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यान, कुर्ला कॅम्प, उल्हासनगर–४, इंदिरा गांधी गार्डन, गोल मैदान महिला उद्यान | अंदाजपत्रकात उद्याने या लेखाशिर्षखाली तरतूद करण्यात आली आहे. |
| | **पुतळयांचे सुशोभिकरण व नुतनीकरण** | |
| १ | शिवाजी महाराज पुतळा नुतनीकरण | ५१ लाख |
| २ | शिवाजी महाराज पुतळा नुतनीकरण, राजा गेमनानी हाऊस | १० लाख |

**स्थायी समिती ठराव क्र.** ९२ अ                    दिनांकः–२७/१०/२०१६

सुचकाचे नाव :–श्री. उमेश कालानी

अनुमोदकाचे नाव :– श्रीमती रेखा ठाकुर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार अंदाजपत्रकात राखून ठेवलेल्या तरतूदीनुसार एकुण रु. ९३.६२ कोटीच्या रस्त्याच्या विकास कामाच्या निविदा काढण्याकरीता निर्णय घेण्याचा प्रस्ताव या कार्यसूचीवरुन वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्र. १० वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १० :– आयत्यावेळचा विषय**

सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत निविदा प्रक्रिया केलेल्या उल्हासनगर–३ सपना गार्डन येथिल समाज मंदिर (झुलेलाल साई) बांधणे या कामाकरीता मे. प्रकाश कस्ट्रक्शन यांच्या निविदेस मान्यता देणे.

---

**महापालिका सचिव :—** सदर विषय पारीत करण्यात यावा का?

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—** निविदाकाराने अॅट पार दर दिलेले आहेत. त्यामुळे पारीत करण्यास हरकत नाही.

**काही सदस्य :—**पास—पास......

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—** सदर विषयाच्या ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता करण्यात यावी.

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १० :—** आयत्यावेळचा विषय
सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत निविदा प्रक्रिया केलेल्या उल्हासनगर—३ सपना गार्डन येथिल समाज मंदिर (झुलेलाल साई) बांधणे या कामाकरीता मे. प्रकाश कस्ट्रक्शन यांच्या निविदेस मान्यता देणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका प्रभाग क्षेत्र क्र.२ मधील मंजुरी मिळालेल्या **उल्हासनगर—३ सपना गार्डन येथील समाज मंदिर (झुलेलाल साई) बांधणे** या कामांकरीता बी—१ प्रकारच्या दोन भाग (तांत्रिक व आर्थिक) पध्दतीने नोंदणीकृत ठेकेदारांकडून दिनांक ०५/१०/२०१५ रोजी निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्राकलनीय खर्च | रु.३००००००/— |
| २ | निविदा प्रसिध्द केलेली वर्तमानपत्रे | १) दै.नवशक्ती २) दै. हमारा महानगर |
| ३ | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक ०५/१०/२०१५ |
| ४ | निविदा विक्री कालावधी | दिनांक १२/१०/२०१५ ते २३/१०/२०१५ |
| ५ | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक ०२/११/२०१५ |
| अ) | प्रथम मुदतवाढ | |
| ब) | द्वितीय मुदतवाढ | |
| क) | तृतीय मुदतवाढ | |
| ६ | तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | दिनांक १८/११/२०१५ |
| ७ | आर्थिक भाग उघडण्याचा दिनांक | दिनांक १८/११/२०१५ |
| ८ | विक्री केलेल्या निविदांची संख्या | ३ |
| ९ | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | |

**दिनांक १८/११/२०१५** रोजी मा.अतिरिक्त आयुक्त, मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक, शहर अभियंता यांचे उपस्थितीत **उल्हासनगर–३ सपना गार्डन येथील समाज मंदिर (झुलेलाल साई) बांधणे** या कामाच्या निविदेचा तांत्रिक भाग उघडण्यात आला त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ. क्र. | निविदाकाराच्या निविदेमधील बाबी | मे.प्रकाश कन्स्ट्रक्शन | मे. ए.एम. रामचंदानी | मे.प्रगती कन्स्ट्रक्शन कंपनी |
|---|---|---|---|---|
| १ | निविदा प्रपत्रकाच्या खरेदीची रक्कम भरलेली आहे का? | होय | होय | होय |
| २ | इसारा रक्कम भरलेली आहे का ? | होय | होय | होय |
| ३ | अद्यावत आयकर रिटर्न भरल्याची पावती | होय | होय | होय |
| ४ | कामाचा अनुभव | होय | होय | होय |
| ५ | पॅन कार्डाची प्रत | होय | होय | होय |
| ६ | संस्था/कंपनी नोंदणी (भागिदारी, मालकी, कंपनी इत्यादीचे) दस्तऐवज | होय | होय | होय |

सदर निविदांची सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये छाननी समिती मार्फत छाननी केली असता **१) मे. प्रकाश कन्स्ट्रक्शन २) मे. ए.एम.रामचंदानी ३) मे.प्रगती कन्स्ट्रक्शन कंपनी** यांच्या निविदा अटी शर्तीनुसार असल्याने पात्र आहेत. तरी उपरोक्त निविदाकारांच्या निविदांचा आर्थिक बाबींचा दुसरा भाग (आर्थिक दर) उघडण्यात आला.

आज **दिनांक १८/११/२०१५** रोजी उपरोक्त निविदाकारांचा आर्थिक बाबींचा दुसरा भाग (आर्थिक दर) मा. अतिरिक्त आयुक्त सो., यांचे अध्यक्षतेखालील निवड समिती सदस्य मुख्य लेखाअधिकारी, मुख्य लेखापरिक्षक, शहर अभियंता, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे उपस्थितीत उघडण्यात आला. त्याप्रमाणे निविदाकांरानी दिलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) **मे. प्रकाश कन्स्ट्रक्शन** | | दिलेले दर १३.५० टक्के जास्त |
| २) **मे. ए.एम.रामचंदानी** | | दिलेले दर १७.०० टक्के जास्त |
| ३) **मे.प्रगती कन्स्ट्रक्शन कंपनी** | | दिलेले दर १८.८१ टक्के जास्त |

उपरोक्त निविदाकार **मे. प्रकाश कन्स्ट्रक्शन** यांनी १३.५० टक्के जास्त दर दिल्यामुळे सदर निविदाकारांशी निविदा समितीने चर्चा करुन दर कमी करण्यास वाटाघाटी करणेबाबत या विभागामार्फत दिनांक १९/११/२०१५ रोजी पत्र देण्यात आले. त्यानुसार निविदेत भरलेल्या १३.५० टक्के जादा दर योग्य आहेत. तरी सुध्दा **मे. प्रकाश कन्स्ट्रक्शन** यांनी या पत्रास मान देवून वाटाघाटीअंती दरसूचीप्रमाणे दर (At Par) दिले असुन त्यांनी दिनांक निरंकचे पत्र दिले आहे.

तरी **मे. प्रकाश कन्स्ट्रक्शन** या निविदाकाराने दिलेल्या दरसूचीप्रामणेच्या दराचे निविदेस मा. स्थायी समितीचे मान्यतेसाठी प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. ९३ दिनांकः–२७/१०/२०१६

सुचकाचे नाव :— श्री.राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. विजय पाटील

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत निविदा प्रक्रिया केलेल्या उल्हासनगर—३ सपना गार्डन येथिल समाज मंदिर (झुलेलाल साई) बांधणे या कामाकरीता मे. प्रकाश कस्ट्रक्शन या निविदाकाराने दिलेल्या दरसूचीप्रमाणेच्या (At Par) दराचे निविदेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

सायं. ४.४७ वाजंता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती श्री. सुनिल सुर्वे यांनी जाहिर केले.

**(प्राजक्ता मि. कुलकर्णी )**
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

.

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—१८/११/२०१६

**दि.१८/११/२०१६ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवत्त.**

**१२**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा शुक्रवार दिनांक १८/११/२०१६ रोजी वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे | सभापती |
| २ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर | सदस्य |
| ३ | श्री. गुरुनो भिकोमल वलेचा | सदस्य |
| ४ | श्री. जमनादास पुरस्वानी | सदस्य |
| ५ | श्रीमती अंजली साळवे | सदस्या |
| ६ | श्री. विजय चाहु पाटील | सदस्य |
| ७ | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | सदस्या |
| ८ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | सदस्या |
| ९ | श्रीमती इंदिरा उदासी | सदस्या |
| १० | श्रीमती पुष्पाताई नाना बागुल | सदस्या |
| ११ | श्रीमती वंदना पाटील उर्फ वंदना युवराज भदाणे | सदस्या |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्रीमती जया प्रकाश माखिजा, २. श्रीमती लिलाबाई आशान, ३. श्री. उमेश सुरेश कालानी, ४. श्रीमती आशा जिवन इदनानी, ५. डॉ. निना प्रकाश नाथानी

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
२. श्री. जमीर लेंगरेकर, उप—आयुक्त
३. श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी
४. श्री. सुखदेव बलमे, मुख्य लेखा परिक्षक
५. श्री. राम जैसवार, शहर अभियंता
६. डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी
७. श्री. भगवान कुमावत, प्र. प्रभाग अधिकारी
८. श्री. नंदु समतानी, प्र. प्रभाग अधिकारी
९. श्री. गणेश शिंपी, प्र. प्रभाग अधिकारी
१०. श्री. अजित गोवारी, प्र. प्रभाग अधिकारी
११. श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
१२. श्री. भास्कर मिरपगार, प्र. अग्निशमन अधिकारी
१३. श्री. हनुमंत खरात, उप अभियंता, विद्युत
१४. श्री. जितु चोईथानी, उप अभियंता, साबांवि
१५. श्री. तरुण सेवकानी, उप अभियंता, साबांवि
१६. श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक
१७. श्री. नितेश रंगारी, कर निरिक्षक
१८. श्रीमती छाया डांगळे, प्र. विधी विभाग प्रमुख
१९. श्री. सचिन जाधव, लिपिक, कर विभाग

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.
१. श्रीमती विशाखा सावंत
२. श्रीमती नर्गिस खान
३. श्री. अशोक रामरख्यानी

सायं. ४.१० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

यावेळी श्री. जमीर लेंगरेकर, उप–आयुक्त हे आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ होते.

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ <u>विषय क्र. १ :–</u> महापालिका क्षेत्रातील अतिधोकादायक इमारती निष्कासित करणेकामी वाढीव खर्चास मान्यता देणे.

---

<u>महापालिका सचिव :–</u> सदर विषय पारीत करण्यात यावा का?

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १ :–** महापालिका क्षेत्रातील अतिधोकादायक इमारती निष्कासित करणेकामी वाढीव खर्चास मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

उपरोक्त विषयान्वये सादर करण्यात येते की, उल्हासनगर शहरातील अतिधोकादायक इमारतींचे हाय रीच जॉ क्रशर मशिनद्वारे निष्कासन करणेसाठी दिनांक १३/०४/२०१६ रोजी ई. निविदा मागविण्यात आल्या होत्या. मे एडीफाईस इंजिनीअरींग कंपनी या निविदाकाराने न्युनतम दराची निविदा सादर केली होती. सदरचा प्रस्तावाला मान्यता दिली होती. तथापि मा. स्थायी समितीने सदर कंपनीस रू. ५० लाखापर्यंत काम देण्यात यावे अशी अट नमुद केली होती.

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील खालील नमूद केलेल्या अतिधोकादायक इमारती हाय रीच जॉ क्रशर मशिनद्वारे पूर्णपणे निष्कासीत करण्यात आलेल्या आहेत.

१. साई आशारात अपार्टमेंट, उल्हासनगर–४
२. मलिका महल अपार्टमेंट, उल्हासनगर–४
३. रामा चेंबर्स, उल्हासनग–१
४. निळकंठ अपार्टमेंट, उल्हासनगर–१

मे. एडिफाईस इंजिनीअरींग या कंपनीने एका दिवसासाठी रू. २,१२,०००/– एवढे दर नमूद केले होते. सदर चार इमारतींचे निष्कासन करणेसाठी एकूण २७ दिवसांचा कालावधी लागलेली आहे. यामुळे एकूण खर्च रू. ५७,२४,०००/–(कर वगळून) एवढा झालेला आहे. मा. स्थायी समितीने रू. ५० लक्षाच्या वर काम गेल्यास स्थायी समितीसमोर मान्यतेसाठी आणणे आवश्यक राहील अशी अट टाकली होती. तरी वाढीव खर्च रू. ७,२४,०००/– (कर वगळून) यास स्थायी समितीची मान्यता मिळणेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> ९४ <u>दिनांक:– १८/११/२०१६</u>

सुचकाचे नाव :– श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :– श्रीमती इंदिरा उदासी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार महापालिका क्षेत्रातील अतिधोकादायक इमारती निष्कासित करणेकामी वाढीव खर्च रुपये ७,२४,०००/— (कर वगळून) यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. २ वाचुन दाखवितात

---

➡ **विषय क्र. २ :—** मनपा कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 31C0005930200 Old No. 31/0253 [Bk. No. 825, Room No. 2, Ulhasnagar-3] अन्वये नोंद असलेल्या मिळकतीसाठी न्यायालयाचे निर्णयाच्या अधिन राहुन वर्ष २००० पासुन प्रतिमाह भाडे रक्कम रू. ५,०००/— भाडे गृहीत धरून करयोग्य मुल्य व आकारणी निष्चित करणेसाठी निर्णय घेणे.

---

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—आजची काय परिस्थिती आहे?

सदस्या, श्रीम. रेखा ठाकुर :—यांचे कोर्टमेटर आहे.

श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी :—कोर्टात केस चालु आहे. ५०० हजार कोर्टात भरायचे आहे.

सदस्या, श्रीम. रेखा ठाकुर :— सदर विषयासाठी एक महिला वारंवार कर विभागात फे—या मारत आहे, तिच्यावर अन्याय होत आहे. आपण सदर विषयाची संपुर्ण माहिती घेतली तर आपणांस लक्षात येईल कि, तिच्या मालमत्तेची कर आकारणी कमी आहे व आपण तिच्याकडून जास्तीची वसुल करत आहोत. ज्या महिलेचा हा विषय आहे ती अत्यंत गरजु व्यक्ती आहे.

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:— आम्ही इथे निर्णय घ्यायला बसलो आहोत, न्यायलयात प्रकरण असताना सुध्दा सदर मालमत्ता सील करण्यात आली आहे तर मग आता आम्ही निर्णय देवून सदर सील उघडणारे कोन, आम्हाला हे समजत नाही.

सदस्या, श्रीम. रेखा ठाकुर :— सदर प्रकरण न्यायालयात दाखल आहे. आणि जी मालमत्तांची प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत ती कायदयाने सील करता नाहीत.

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:— सदर विषय सभेपुढे आणला आहे, न्यायालयात प्रकरण असतानादेखील सदर मालमत्ता सील करण्यात आली आहे. पक्षाचा इथे काही आक्षेप नाही. आता सभापती म्हणुन मी आपणासोबत बसलो आहे. काही चुकीचा निर्णय झाला तर सर्वांना याचा त्रास होईल असे मला म्हणायचे आहे. यामुळे प्रशासनाने यावर योग्य तो निर्णय घ्यावा असे माझे मत आहे. सदर मालमत्ता आजच सील केली आहे. मग यावर आपण काय निर्णय घेणार. आमचे असे म्हणणे आहे कि, सील केल्यानंतर आम्ही निर्णय देवू शकतो का? सदर मालमत्ता यापुर्वी सील का नाही केली, आजच सील का केली?

सदस्या, श्रीम. रेखा ठाकुर :— सदर मालमत्तेचा वाद होता तर ती सीलच करायला नको होती.

उप—आयुक्त, श्री. जमीर लेंगरेकर :— सदर विषय जवळजवळ दिड महिना आधी आम्ही पाठविला आहे. शासनाने जी सुविधा दिली आहे कि, रू. ५००/— व रू. १०००/— च्या जुन्या नोटा बंद होणार आहेत त्यांची अंतिम तारीख २४ नोव्हेंबर दिलेली आहे. त्यापुर्वी सदर नोटांच्यारूपात थकीत मालमत्ता करांचा भरणा करणेसाठी सवलत देण्यात आली आहे. त्यानुसार रू. ५ लाखाच्यावर थकीत मालमत्ता करांचा वर्षानुवर्षे भरणा न करणा—या मालमत्ताधारकांच्या मालमत्ता सील करण्याची कार्यवाही केली आहे.

**सदस्या, श्रीम. रेखा ठाकुर :—** सदर विषय सभेपुढे पाठविला होता तर मग सदर मालमत्ता सील करायला नको होती.खरेतर अधिका—यांची सुध्दा चुक आहे.

यावेळी सदस्या श्रीमती वंदना भदाणे यांनी सभागृहात प्रवेश केला.

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—** सदर विषय आजच्याच सभेपुढे होता तर मग तुम्ही आजच ती मालमत्ता सील का केली? मग यावर आम्ही आता निर्णय कसा द्यायचा. एकतर त्या मालमत्तेचा न्यायालयात वाद सुरू आहे, याचा निर्णय काय द्यायचा आता, आज सभा होती तर तोपर्यंत थांबायला हवे होते ना.

यावेळी सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

**श्री. जमीर लेंगरेकर, उप—आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :—**जुनी सिल केली आहे. जास्तीत जास्त रक्कम आपल्या निधीत जमा होईल.

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—** स्थायी समिती प्रशासनाला आदेश देते की, प्रशासनाने यावर योग्य तो निर्णय द्यावा. आमचा विरोध नाही या विषयाला, कायदयाच्या काय बाबी आहेत त्या तपासा, निर्णय आम्ही तुमच्यावर सोडतो.

**श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी :—**आपण ५००० रुपये निश्चित करा ना.

**सदस्या, श्रीम. अंजली साळवे :—** वर्ष २००० पासुन प्रतिमाह भाडे रक्कम रू. ५,०००/— भाडे गृहीत धरून करयोग्य मुल्य व आकारणी निश्चित करावयाची आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—** सदर मालमत्ता सील केली आहे यावर आपण काही भाष्य करण्याची गरज नाही. सभेच्या विषय पटलावर जो विषय आला आहे तो जर आपण वाचला तर लक्षात येईल कि, सदर मिळकतीसाठी न्यायालयाचे निर्णयाच्या अधिन राहुन वर्ष २००० पासुन प्रतिमाह भाडे रक्कम रू. ५,०००/— भाडे गृहीत धरून करयोग्य मुल्य व आकारणी निश्चित करणेबाबत मान्यता दयायची आहे.

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—** हो, बरोबर आहे, सदर विषय करयोग्य मुल्य व आकारणी निश्चित करण्यासाठी आला आहे. तर मग आजच सदर मालमत्ता का सील केली? जर त्यांनी निर्णय घेवुन मालमत्ता सील केली आहे तर त्यांनीच याबाबत निर्णय घ्यावा हे योग्य राहिल.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—** प्रशासनाने ज्या मालमत्ताधारकांची मोठी थकबाकी होती त्यांच्या मालमत्ता सील करण्याची कार्यवाही केली आहे. परंतु हा विषय न्यायालयात प्रलंबित असल्यामुळे न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहुन वर्ष २००० पासुन प्रतिमाह भाडे रक्कम रू.५०००/— गृहीत धरून करयोग्य मुल्य निश्चित केल्यास त्यानुसार करआकारणी केल्यानंतर सदर मालमत्ताधारकाची थकबाकी कमी होईल व त्यांना त्याचा लाभ होईल.

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—** सदर विषय सभेपुढे ठेवला असताना आणि या विषयावर आजच निर्णय होणार असताना आजच प्रशासनाने सदर मालमत्ता सील केली आहे. त्यामुळे प्रशासनाने यावर निर्णय घ्यावा.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—** प्रशासनाने मालमत्ता सील केली असली तरी आज आपण सदर विषयावर निर्णय घेतला असता त्यानुसार करयोग्य मुल्य निश्चित होईल व जी थकबाकी निघेल ती जर संबंधित मालमत्ताधारकाने भरली तर त्यांचे सील उघडण्यात येईल. प्रशासनाने आणलेल्या प्रस्तावानुसार करयोग्य मुल्य निश्चित केले आणि सदर मालमत्ताधारकाची थकबाकी कमी झाली तर याचा त्याला फायदाच होईल.

**सदस्य, श्री. विजय पाटील :—** सदर विषय सभेपुढे आणला आहे त्यामध्ये आपला अधिकार आहे त्याप्रमाणे आपण निर्णय देवू.

**सदस्या, श्रीम. अंजली साळवे :—** स्थायी समितीने दिलेल्या निर्णयानुसार प्रशासन कार्यवाही करेल. मालमत्ताधारकाने थकबाकी भरल्यानंतर सील उघडण्यात येईल.

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—**ठिक आहे, सर्वांची संमती आहे ना, मग सर्व संमतीने हा विषय पारीत करण्यात यावा. प्रशासनाने यावर योग्य तो निर्णय घ्यावा.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—** प्रशासनाने स्थायी समितीपुढे जो विषय पाठविला आहे. त्यावर आपण निर्णय घेवू. सदर विषय पारीत करण्यात यावा.

**महापालिका सचिव :—**ठराव असा असेल की, मिळकतीसाठी वर्ष २००० पासुन प्रतिमाह भाडे रक्कम रू. ५,०००/— भाडे गृहीत धरून करयोग्य मुल्य व आकारणी निश्चित करण्यास मान्यता देत आहे. परंतु सदरबाबतीत न्यायालयाचा निर्णय अंतिम असेल.

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—** सदर विषयाच्या ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता करण्यात यावी.

**काही सदस्य:—**पास,पास.......

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

**विषय क्र. २ :—** मनपा कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 31CO005930200 Old No. 31/0253 [Bk. No. 825, Room No. 2, Ulhasnagar-3] अन्वये नोंद असलेल्या मिळकतीसाठी न्यायालयाचे निर्णयाच्या अधिन राहुन वर्ष २००० पासुन प्रतिमाह भाडे रक्कम रू. ५,०००/— भाडे गृहीत धरून करयोग्य मुल्य व आकारणी निष्चित करणेसाठी निर्णय घेणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 31CO005930200 Old No. 31/0253 [Bk. No. 825, Room No. 2, Ulhasnagar-3] अन्वये नोंद असलेल्या मिळकतीसाठी मालमत्ता कर वसुलीच्या प्रयोजनार्थ कर देण्यास प्रथम पात्र व्यक्ती म्हणुन PRITAMDAS ANSHIMAL अशी नोंद आहे. कर आकारणी करपात्र बाबींचा तपषिल खालीलप्रमाणे आहे.

| Const. Type | Occu.Status | Usage | Annual Rent | Asst. Year | Total Area |
|---|---|---|---|---|---|
| OPEN | OWNER | NON RESIDENTIAL | 0 | 01-APR-86 | 209 |
| RCC | TENANT | NON RESIDENTIAL | 120000 | 01-APR-01 | 1735 |
| OPEN | OWNER | NON RESIDENTIAL | 0 | 01-APR-01 | 227 |
| RCC | TENANT | NON RESIDENTIAL | 96000 | 01-APR-01 | 375 |

B] संदर्भित मिळकतीमध्ये भाडेकरू असल्याने प्रतिमाह भाडे रक्कम रू. १०,०००/— (भाडेकरू वेणुगोपाल) व प्रतिमाह भाडे रक्कम रू. ८,०००/— (अमरलाल) गृहीत धरून संदर्भित मिळकतीचे करयोग्य मुल्य रू. १९४९८६ नुसार नियमितपणे कर आकारणी सुरू आहे. वर्श २०१६—२०१७ याकरीता दिनांक १९/०८/२०१६ पर्यंत मालमत्ता कर आकारणी रक्कम रू. २९,४२,४९४/— विलंब शास्तीसह थकीत आहे. थकीत रक्कमेचा भरणा करणेसाठी संबंधितास वेळोवेळी सुचित करण्यात आले आहे. तरीही कराचा भरणा न केल्यामुळे माहे डिसेंबर २०१५ मध्ये अधिपत्र (वॉरंट) बजावण्यात आले. तसेच स्थानिक वर्तमानपत्रात कसुरदारांची यादी प्रसिध्द् करण्यात आली. या कालावधीदरम्यान विभागात संबंधितांनी संपर्क साधलेला नाही. तद्नंतर वर्तमानपत्रात प्रसिध्द् केलेल्या कसुरदारांच्या स्थावर/जंगर मालमत्ता जप्ती/अटकावणी करण्याची कार्यवाही माहे जानेवारी २०१६ मध्ये सुरू करण्यात आली. सदर कार्यवाही दरम्यान संदर्भित मिळकत जप्त करण्यात आली. परंतु श्रीम. संगिता वेणुगोपाल शेट्टी यांनी संदर्भित मिळकतीचे भाडे आकारणीबाबत दिवाणी न्यायालय, उल्हासनगर येथे वाद सुरू असल्याने मिळकतीस लावण्यात आलेले सील उघडणेबाबत विनंती केली आहे. तसेच दिनांक २१/०१/२०१६ रोजी त्यांनी बंधपत्र सादर केले आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

“मनपा कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 31CO005930200 Old No. 31/0253 [Bk No. 825 Room No. 2 UNR-3] अन्वये नोंद असलेल्या मिळकतीकरीता मालमत्ता कर वसुलीच्या प्रयोजनार्थ कर देण्यास प्रथम पात्र व्यक्ती म्हणुन Pritamdas Anshimal अशी नोंद आहे. संदर्भित मिळकतीचे खात्यात मालमत्ता करापोटी

वर्ष २०१५–२०१६ माहे डिसेंबर अखेर रक्कम रू. २६,६०,२२०/– (विलंब शास्तीसह) थकीत आहे. संदर्भित मिळकतीमध्ये मी भाडेकरू आहे. संदर्भित मिळकतीचे भाडे निश्चितीबाबत दिवाणी न्यायालय, उल्हासनगर येथे चौकशी अर्ज ६५/२००५ व ७५/२०११ तसेच दिवाणी न्यायालय, कल्याण येथे अपिल दाखल आहे. लिव्ह ॲण्ड लायसन्स नुसार भाडे प्रतिमाह रक्कम रू. ५०००/– आहे. परंतु सदर प्रकरणे सद्यस्थितीत न्यायप्रविष्ठ आहे. थकीत रक्कमेचे वसुलीकामी मनपाने संदर्भित मिळकत अटकावणी/जप्ती केली आहे. तरी आपणांस विनंती करण्यात येते की, आज रोजी रक्कम रू. १०,०००/– भरणा करीत आहे. तसेच वर्ष २००० पासुन आजपर्यंत मासिक भाडे ५००० प्रमाणे कर आकारणी करावी. त्यानुसार महानगरपालिकेत मी भरणा केलेली रक्कम वजा करून उर्वरीत रक्कम ३० दिवसांत भरणा करेन. तसेच न्यायालयाचा जो काही निर्णय असेल त्यानुसार महानगरपालिकेने निश्चित केलेली कर आकारणी मला मान्य असेल व ती रक्कम भरणा करण्याची मी हमी देत आहे. तरी संदर्भित मिळकतीचे सिल उघडण्यात यावे''

सी) संगिता वेणुगोपाल शेट्टी यांनी दिनांक २२/०१/२०१६ रोजीचे पत्रान्वये संदर्भित मिळकतीसाठी प्रतिमाह भाडे रक्कम रू. ५,०००/– गृहीत धरून वर्ष २००० पासुन कर मुल्यांकन करणेबाबत विनंती आहे. सोबत खालीलप्रमाणे कागदपत्राच्या प्रति सादर केल्या आहेत.

| अ. क्र | तपशिल |
|---|---|
| १ | श्री. वेणुगोपाळ शेट्टी यांचा कर आकारणी दुरूस्ती करणेबाबत महानगरपालिकेत दिनांक १/९/२००६ रोजी सादर केलेला अर्ज |
| २ | श्रीम. संगिता वेणुगोपाळ शेट्टी द्वारा वेणुगोपाळ षेट्टी यांचा कर आकारणी दुरूस्ती करणेबाबत महानगरपालिकेत दिनांक १२/७/२००७ रोजी सादर केलेला अर्ज |
| ३ | श्री. वेणुगोपाळ शेट्टी यांचा कर आकारणी दुरूस्ती करणेबाबत महानगरपालिकेत दिनांक २८/५/२००९ रोजी सादर केलेला अर्ज |
| ४ | श्री. वेणुगोपाळ शेट्टी यांचा चुकीची कर आकारणी दुरूस्ती करणेबाबत महानगरपालिकेत दिनांक २०/९/२०१० रोजी सादर केलेला स्मरणपत्र |
| ५ | श्रीम. संगिता वेणुगोपाळ शेट्टी यांचा कर आकारणी दुरूस्ती करणेबाबत महानगरपालिकेत दिनांक २३/११/२०१० रोजी सादर केलेला अर्ज |
| ६ | श्रीम. संगिता वेणुगोपाळ शेट्टी यांचा कर आकारणी दुरूस्ती करणेबाबत महानगरपालिकेत दिनांक १४/०३/२०१२ रोजी सादर केलेला अर्ज |
| ७ | श्रीम. संगिता वेणुगोपाळ शेट्टी यांचा कर आकारणी दुरूस्ती करणेबाबत महानगरपालिकेत दिनांक ४/१/२०१४ रोजी सादर केलेला अर्ज |
| ८ | श्रीम. संगिता वेणुगोपाळ शेट्टी यांचा कर आकारणी दुरूस्ती करणेबाबत महानगरपालिकेत दिनांक २२/४/२०१५ रोजी सादर केलेला अर्ज |
| ९ | श्रीम. संगिता वेणुगोपाळ शेट्टी यांचा कर आकारणी दुरूस्ती करणेबाबत महानगरपालिकेत दिनांक २२/०१/२०१६ रोजी सादर केलेला अर्ज |
| १० | रू. २० च्या मुद्रांकपेपरवर सुनिल इदनदास बुधरानी (लिहुन देणार) व पुजा इंदलाल माखिजा (लिहुन घेणार) यांचे दरम्यान दिनांक ११/१०/१९९९ रोजी झालेले खरेदीखाची प्रत. |
| ११ | रू. २० च्या मुद्रांकपेपरवर पुजा इंदलाल माखिजा (लिहुन देणार) व वेणुगोपाळ एम. शेट्टी (लिहुन घेणार) यांचे दरम्यान दिनांक ०१/०३/२००० रोजी झालेले लिव्ह ॲण्ड लायसन्सची प्रत. |
| १२ | मालमत्ता कर रू. ५०,०००/– भरणा केल्याची पावती क्र. ०२१७३२ दि. ११/१०/२००२ |
| १३ | मालमत्ता कर रू. १०,०००/– भरणा केल्याची पावती क्र. ०२६३१२ दि. १६/१०/२००२ |
| १४ | मालमत्ता कर रू. १,००,०००/– भरणा केल्याची पावती क्र. १५७८४२ दि. ३१/०३/२००४ |
| १५ | मालमत्ता कर रू. १,०९,०००/– भरणा केल्याची पावती क्र. १६१७९४ दि. २२/०६/२००४ |
| १६ | मालमत्ता कर रू. ५०,०००/– भरणा केल्याची पावती क्र. १८९११८ दि. १८/०३/२००५ |
| १७ | मालमत्ता कर रू. १०,०००/– भरणा केल्याची पावती क्र. ०२१७३२ दि. ११/१०/२००२ |
| १८ | वेणुगोपाळ एम. शेट्टी (वादी)<br>पुजा इंदर माखिजा (प्रतिवादी)<br>दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, उल्हासनगर येथे दाखल सुट क्र. १२६/२००२ ची प्रत |
| १९ | दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, उल्हासनगर येथे दाखल सुट क्र. १२६/२००२ मध्ये दिनांक ६/१/२००२ रोजी न्यायालयाने दिलेले आदेषाची प्रत |
| २० | वेणुगोपाळ एम. शेट्टी (वादी)<br>पुजा इंदर माखिजा (प्रतिवादी)<br>दिवाणी न्यायालय, उल्हासनगर येथे दाखल प्रमाणित भाडे निश्चित करणेबाबत दाखल Misc |

| | |
|---|---|
| | Application No. 65/2005 ची प्रत |
| २१ | वेणुगोपाळ एम. शेट्टी /पुजा इंदर माखिजा (अपिलार्थी)<br>उल्हासनगर महानगरपालिका (प्रतिवादी)<br>दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, कल्याण येथे दाखल म्युनिसिपल अपिल क्र. २७/२००६ |
| २२ | वेणुगोपाळ एम. शेट्टी /पुजा इंदर माखिजा (अपिलार्थी)<br>उल्हासनगर महानगरपालिका (प्रतिवादी)<br>दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, कल्याण येथे दाखल म्युनिसिपल अपिल क्र. ७/२००७ |
| २३ | वेणुगोपाळ एम. शेट्टी /पुजा इंदर माखिजा (अपिलार्थी)<br>उल्हासनगर महानगरपालिका (प्रतिवादी)<br>दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, उल्हासनगर येथे दाखल आर. सी. एस. नं. ७५/२०११ |
| २४ | वेणुगोपाळ एम. शेट्टी /पुजा इंदर माखिजा (अपिलार्थी)<br>उल्हासनगर महानगरपालिका (प्रतिवादी)<br>दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, कल्याण येथे दाखल म्युनिसिपल अपिल क्र. २/२०१२ |

D] वेणुगोपाळ शेट्टी व संगिता वेणुगोपाळ शेट्टी यांनी दाखल केलेले अर्जामध्ये उपस्थित मुद्यांचा सारांश तपशिल खालीलप्रमाणे आहे.

''संदर्भित मिळकत दिनांक १/३/२००३ रोजीचे भाडेकरू करारान्वये दरमहा रू. ५,०००/— भाडयाने पुजा इंदर माखिजा यांचेकडुन घेतली आहे. त्यामध्ये सुपर कलर लॅब नावाचा फोटो काढण्याचा व्यवसाय करीत आहे. सदरहु मालमत्ता पुजा इंदर माखिजा यांचे नावे नसुन ती प्रितमदास ऐंषीमल याचे नावे आहे त्याचा ठाव ठिकाणा नाही. मालमत्ता भाडयाने घेतल्यापासुन आजपर्यंत प्रितमदास ऐंषीमल यांनी संपर्क साधलेला नाही. भाडेनुसार कर आकारणी बाबत २००३ पासुन सतत हरकत दाखल केली आहे. परंतु मनपाने सुनावणीची संधी दिलेली नाही तसेच कर वाढविण्याबाबत नोटीस दिलेली नाही तरीही मी वेळोवेळी कराच भरणा केला आहे. तरी अवाढव्य, चुकीची कर आकारणी रद्द करून प्रतिमाह रू. ५,०००/— भाडेप्रमाणे कर आकारणी दुरूस्ती करावी.''

E] वेणुगोपाळ शेट्टी यांनी न्यायालयात दाखल केलेल्या दाव्यांचे अवलोकन केले असता खालील बाबी निदर्शनास येत आहेत.

i] वेणुगोपाळ एम. शेट्टी (वादी) यांनी दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, उल्हासनगर येथे दाखल सुट क्र. १२६/२००२ मध्ये पुजा इंदर माखिजा (प्रतिवादी) यांचेविरूध्द् संदर्भित मिळकतीचे भाडे रू. ५,०००/— निश्चित करणेसाठी दावा दाखल केला आहे. सदर प्रकरणात महानगरपालिका प्रतिवादी नाही. तसेच सदर प्रकरणात वेणुगोपाळ एम. शेट्टी यांचे असे म्हणणे ''मिळकतीचे भाडेपोटी प्रतिमाह रू. ५,०००/— पुजा इंदर माखिजा यांना न्यायालयाचे निकालानंतर अदा करण्यात येईल'' दि. ६/१/२००२ रोजी न्यायालयाने दाखल करून घेतले आहे. परंतु सदर प्रकरणात अंतिम निर्णय झालेला नाही.

ii] तसेच वेणुगोपाळ एम. शेट्टी (वादी) दिवाणी न्यायालय, उल्हासनगर येथे मिळकतीचे प्रमाणित भाडे निष्चित करणेबाबत पुजा इंदर माखिजा (प्रतिवादी) यांचेविरूध्द् दाखल केलेले Misc Application No. 65/2005 मध्ये ही निर्णय झालेला नाही.

iii] तथापि, वेणुगोपाळ एम. शेट्टी /पुजा इंदर माखिजा यांनी भाडे निश्चितीबाबत दिवाणी न्यायालय, वरिश्ठ स्तर, कल्याण येथे दाखल म्युनिसिपल अपिल क्र. २७/२००६, ७/२००७, २/२०१२ मध्ये उल्हासनगर महानगरपालिका प्रतिवादी असुन सदर प्रकरण न्यायप्रविश्ठ आहे.

iv] वेणुगोपाळ एम. शेट्टी /पुजा इंदर माखिजा (अपिलार्थी) यांनी भाडे निश्चितीबाबत दिवाणी न्यायालय, कनिश्ठ स्तर, उल्हासनगर येथे दाखल आर. सी. एस. नं. ७५/२०११ मध्ये उल्हासनगर महानगरपालिका प्रतिवादी असुन सदर प्रकरण न्यायप्रविश्ठ आहे.

F] वेणुगोपाळ एम. शेट्टी व संगिता वेणुगोपाळ शेट्टी यांनी संदर्भित मिळकतीचे भाडेप्रमाणे कर आकारणीबाबत महानगरपालिकेत दाखल केलेल्या अर्जावर निर्णय झालेला नाही.

G] संदर्भित मिळकतीचे मालकी हक्क हस्तांतणासंबंधी संगिता वेणुगोपाळ शेट्टी यांनी सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता प्रितमदास अंषमल (कर देण्यास प्रथम पात्र व्यक्ती) यांनी सुनिल इदनदास बुधरानी यांना मालकी हक्क हस्तांतरण केलेल्या कागदपत्र दिसुन येत नाही. परंतु रू. २० च्या मुद्रांकपेपरवर सुनिल इदनदास बुधरानी (लिहुन देणार) व पुजा इंदलाल माखिजा (लिहुन घेणार) यांचे दरम्यान दिनांक ११/१०/१९९९ रोजी खरेदीखत करण्यात आले आहे. सदरील करार नोंदणीकृत नाही. तसेच रू. २० च्या मुद्रांकपेपरवर पुजा इंदलाल माखिजा (लिहुन देणार) व वेणुगोपाळ एम. षेट्टी (लिहुन घेणार) यांचे दरम्यान मिळकतीचे ४१४ चौ.फुट क्षेत्रासाठी दिनांक १५/०२/२००० ते १४/०१/२००१ या कालावधीदरम्यान प्रतिमाह

भाडे रू ५०००/— असा करार दिनांक ०१/०३/२००० रोजी (लिव्ह अॅण्ड लायसन्स ) झालेला आहे. सदरील करार नोंदणीकृत नाही. तसेच भाडेकराराचे नुतणीकरणसंबंधी कोणतेही कागदपत्र सादर केलेले नाहीत.

सबब, मिळकतीचे मालकी हक्क हस्तांतरण तसेच भाडे निश्चिती बाबत स्पष्ट खुलासा होत नाही.

H] सद्यस्थितीत संदर्भित मिळकतीचा संपुर्ण ताबा संगिता वेणुगोपाळ शेट्टी (भाडेकरू) यांचेकडे असुन ते मिळकतीचा भोगवटा करीत आहेत.

I] संदर्भित मिळकतीसाठी वर्ष २००० पासुन प्रतिमाह भाडे रक्कम रू. ५,०००/— गृहीत धरून करयोग्य मुल्य निष्चित करावे किंवा कसे? याबाबत विधी विभागामार्फत कायदेषिर सल्ला घेण्यात आला आहे. कायदेशिर सल्लागाराने संदर्भित मिळकतीसाठी वर्ष २००० पासुन प्रतिमाह भाडे रक्कम रू. ५,०००/— गृहीत धरून कर आकारणी करणेसाठी संमती दर्षविली आहे.

J] वेणुगोपाळ शेट्टी यांनी न्यायालयात दाखल केलेल्या दाव्यांचे अवलोकन केले असता खालील बाबी निदर्शनास येत आहेत.

i] वेणुगोपाळ एम. शेट्टी (वादी) यांनी दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, उल्हासनगर येथे दाखल सुट क्र. १२६/२००२ मध्ये पुजा इंदर माखिजा (प्रतिवादी) यांचेविरूध्द् संदर्भित मिळकतीचे भाडे रू. ५,०००/— निष्चित करणेसाठी दावा दाखल केला आहे. सदर प्रकरणात महानगरपालिका प्रतिवादी नाही. तसेच सदर प्रकरणात वेणुगोपाळ एम. शेट्टी यांचे असे म्हणणे ''मिळकतीचे भाडेपोटी प्रतिमाह रू. ५,०००/— पुजा इंदर माखिजा यांना न्यायालयाचे निकालानंतर अदा करण्यात येईल'' दि. ६/१/२००२ रोजी न्यायालयाने दाखल करून घेतले आहे. परंतु सदर प्रकरणात अंतिम निर्णय झालेला नाही.

ii] तसेच वेणुगोपाळ एम. शेट्टी (वादी) दिवाणी न्यायालय, उल्हासनगर येथे मिळकतीचे प्रमाणित भाडे निष्चित करणेबाबत पुजा इंदर माखिजा (प्रतिवादी) यांचेविरूध्द् दाखल केलेले Misc Application No. 65/2005 मध्ये ही निर्णय झालेला नाही.

iii] तथापि, वेणुगोपाळ एम. शेट्टी /पुजा इंदर माखिजा यांनी भाडे निष्चितीबाबत दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, कल्याण येथे दाखल म्युनिसिपल अपिल क्र. २७/२००६, ७/२००७, २/२०१२ मध्ये उल्हासनगर महानगरपालिका प्रतिवादी असुन सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

iv] वेणुगोपाळ एम. शेट्टी /पुजा इंदर माखिजा (अपिलार्थी) यांनी भाडे निश्चितीबाबत दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, उल्हासनगर येथे दाखल आर. सी. एस. नं. ७५/२०११ मध्ये उल्हासनगर महानगरपालिका प्रतिवादी असुन सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

विषयांकित प्रकरणात संबंधितांची सुनावणी घेण्यात आली. दिनांक ६/५/२०१६ रोजीचे सुनावणी दरम्यान श्रीम. संगिता वेणुगोपाळ शेट्टी उपस्थित असुन श्रीम. पुजा इंदरलाल माखिजा, श्री. प्रितमदास ऐंशीमल, श्री. सुनिल इदनदास बुधरानी गैरहजर आहेत सुनावणी दरम्यान श्रीम. संगिता वेणुगोपाळ शेट्टी यांनी संदर्भित मिळकतीचे भाडे रू. ५,०००/— गृहीत धरावे. सन २००० पासुन आजपर्यतचा कर आकारावा. तसेच यापुर्वी भरणा केलेली रक्कम समायोजित करून उर्वरीत रक्कम भरण्यास तयार असल्याबाबत लेखी निवेदन सादर केले आहे.

संदर्भित मिळकतीचे मालकी हक्क हस्तांतणासंबंधी संगिता वेणुगोपाळ शेट्टी यांनी सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता प्रितमदास अंशमल (कर देण्यास प्रथम पात्र व्यक्ती) यांनी सुनिल इदनदास बुधरानी यांना मालकी हक्क हस्तांतरण केलेल्या कागदपत्र दिसुन येत नाही. परंतु रू. २० च्या मुद्रांकपेपरवर सुनिल इदनदास बुधरानी (लिहुन देणार) व पुजा इंदलाल माखिजा (लिहुन घेणार) यांचे दरम्यान दिनांक ११/१०/१९९९ रोजी खरेदीखत करण्यात आले आहे. सदरील करार नोंदणीकृत नाही. तसेच रू. २० च्या मुद्रांकपेपरवर पुजा इंदलाल माखिजा (लिहुन देणार) व वेणुगोपाळ एम. शेट्टी (लिहुन घेणार) यांचे दरम्यान मिळकतीचे ४१४ चौ.फुट क्षेत्रासाठी दिनांक १५/०२/२००० ते १४/०१/२००१ या कालावधीदरम्यान प्रतिमाह भाडे रू ५०००/— असा करार दिनांक ०१/०३/२००० रोजी (लिव्ह अॅण्ड लायसन्स ) झालेला आहे. सदरील करार नोंदणीकृत नाही. तसेच भाडेकराराचे नुतणीकरणसंबंधी कोणतेही कागदपत्र सादर केलेले नाहीत. सबब, मिळकतीचे मालकी हक्क हस्तांतरण तसेच भाडे निश्चिती बाबत स्पष्ट खुलासा होत नाही.

वेणुगोपाळ एम. शेट्टी यांनी संदर्भित मिळकतीसाठी वर्ष २००० पासुन प्रतिमाह भाडे रक्कम रू. ५,०००/— भाडे गृहीत धरून कर आकारणी करणेसंदर्भात विविध न्यायालयात दाखल केलेले अर्ज, अपिल न्यायप्रविष्ठ आहेत.

न्यायालयाचे निर्णयाच्या अधिन राहुन संदर्भित मिळकतीसाठी वर्ष २००० पासुन प्रतिमाह भाडे रक्कम रू. ५,०००/— गृहीत धरून करयोग्य मुल्य व आकारणी निश्चित केल्यास बऱ्याच वर्षापासुन प्रलंबित असलेले सदर प्रकरण निकाली काढता येईल.

तरी मनपा कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 31C0005930200 Old No. 31/0253 [Bk. No. 825, Room No. 2, Ulhasnagar-3] अन्वये नोंद असलेल्या मिळकतीसाठी न्यायालयाचे निर्णयाच्या अधिन राहुन

वर्ष २००० पासुन प्रतिमाह भाडे रक्कम रू. ५,०००/— भाडे गृहीत धरून करयोग्य मुल्य व आकारणी निष्चित करणेसाठी निर्णयास्तव स्थायी समितीपुढे प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ९५ दिनांकः— १८/११/२०१६

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती इंदिरा उदासी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार मनपा कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 31CO005930200 Old No. 31/0253 [Bk. No. 825, Room No. 2, Ulhasnagar-3] अन्वये नोंद असलेल्या मिळकतीसाठी वर्ष २००० पासुन प्रतिमाह भाडे रक्कम रू. ५,०००/— भाडे गृहीत धरून करयोग्य मुल्य व आकारणी निश्चित करण्यास मान्यता देत आहे.

परंतु

सदर बाबतीत न्यायालयाचा निर्णय अंतिम असेल.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. ३ :— प्रस्तावाची सूचना

अंदाजपत्रकात राखून ठेवलेल्या तरतूदीनुसार एकुण रु. ९३.६२ कोटीच्या रस्त्याचा विकास कामाच्या निविदा काढण्याकरीता निर्णय घेणेबाबतचा स्थायी समिती सभापती श्री. सुनिल सुर्वे यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

---

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—पास करायचे आहे परंतु आपण निविदा मागविणार काय?

शहर अभियंता, श्री. राम जयस्वार :—हो, निविदा मागविणार.

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—सदर कामाच्या निविदा काढण्यास किती दिवस लागतील.

शहर अभियंता, श्री. राम जयस्वार :—सदर कामाचे प्राकलन तयार करण्यासाठी १५ दिवस लागतील,

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:— प्राकलन तयार करायला १५ दिवस लागतील, एवढे वर्ष आम्ही उल्हासनगर शहरात काय करतोय? या उल्हासनगर शहरातील रस्त्याची लांबी, रूंदी जर इथल्या वर्षानुवर्षे कार्यरत अभियंताना माहिती नसेल तर वाईट आहे हि गोष्ट, पंधरा दिवस कशाला लागायला पाहिजे मला सांगा ना,

शहर अभियंता, श्री. राम जयस्वार :—काही तांत्रिक बाबीसुध्दा असतात त्या पहाव्या लागतात.

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:— तांत्रिक बाबी पहाव्या लागतात हे ठिक आहे परंतु, तुमच्या अखत्यारीत जे अभियंता आहेत त्यांचेकडून माहिती घेवुन सदर विषय लवकरात लवकर हाताळा, तांत्रिक बाबी म्हणुन तुम्ही

वर्षानुवर्षे सदर विषय प्रलंबित ठेवणार का? या अमुक रस्त्याचे प्राकलन किती कोटीचे पाहिजे ते संगणकामध्ये सर्व माहिती असते त्यानुसार तयार करणे सोपे आहे. हाताने करायचे नाही.

शहर अभियंता, श्री. राम जयस्वार :— तरीसुध्दा १५ दिवस लागतील. आयुक्तांची मान्यता लागेल.

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:— आयुक्त म्हणुन कोण बसले आहेत आता, प्राकलन बनविण्याचे दोन दिवसाचेसुध्दा काम नाही. पंधरा दिवस का मागता? प्रत्येक गोष्टीला तुम्ही वेळ का मागता, आमच्याकडे डिसेंबरला आचारसंहिता लागेल, आम्ही शहराला काही दयायचे किंवा नाही. प्रशासनाकडून शहरासाठी आम्ही काही काम केले म्हणुन का काही नाही? तीन जानेवारी हि मर्यादा आहे, काम कसे रखडावयाचे हे इथे चालले आहे, शहर अभियंता साहेब, हे आपले बरोबर नाही. तुमचे काम बरोबर नाही, आपण बरोबर बोलत नाहीत. अंदाजपत्रकात होवू शकत नाही, अंदाजपत्रकात हि कामे आहेत कि नाहीत. मग एवढे दिवस आपण काय करत होतात. हि काय पध्दत आहे. आम्ही सर्वसंमतीने वरपर्यंत तक्रार करू, तुम्हाला सांगत आहोत, या गोष्टीत मी इतका गंभीर आहे. अंदाजपत्रक बनवता तेव्हा का नाही बोलत कि या अंदाजपत्रकात त्रुटी आहेत म्हणुन आयुक्त उभे राहुन बोलतात. तीन महिन्यांपासुन प्रत्येक नगरसेवक हैराण झाला आहे. तुम्हाला प्राकलन बनवायला वेळ हवा आहे. मग आठ महिने झक मारली का?

सदस्य, श्री. विजय पाटील :— साहेब तुम्ही सांगा किती दिवसांत हे काम होईल. तुमचे काम आहे ते.

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:— मी आता आपणांस सांगतो कि मी खुप संयम पाळला आहे, मला माझे संतुलन घालवुन देवु नका. प्रत्येक गोष्टीची मर्यादा असते, मागच्यावेळेसपण रोडचे यांनी असेच केले, एक महिना टेंडर येवु दिले नाही, मला नक्की तारीख सांगा तुम्ही कधी देणार आहे, जबाबदार अधिकारी आहात आपण, नाहीतर मी तक्रार करणारच, नगरसचिव, मंत्रालय, लोकआयुक्तपासुन मी तक्रार करणारच, जाणीवपुर्वक, मी सगळया अधिका—यांना कामाला लावेन, बसलेल्या सर्व अधिका—यांनी लक्षात ठेवा, आता बस्स झालं, फक्त नागरीकांची कशी वाट लागेल, आणि नगरसेवक कशा शिव्या खातील हे बघताय तुम्ही, लेंगरेकर साहेब, गेल्या पाच वर्षापासुन श्री. विजय पाटील हे सदस्य आहेत परंतु त्यांच्या प्रभागात कुठेही एक थेंबाचे डांबर पडलेले नाही. श्रीम. अंजली साळवे, हया दर सभेमध्ये आरडाओरड करत असतात, कि त्यांच्या प्रभागातील रस्त्याचे काम होत नाही. काय करत आहे प्रशासन.

सदस्य, श्री. विजय पाटील :— मागील सभेतसुध्दा सांगितले होते आपण पण काम काही झाले नाही.

सदस्या, श्रीम. अंजली साळवे :— माझ्या प्रभागात माझ्या घरासमोरील रस्त्यावरील खडड्‍ बुजवायला अजुन कोणी आलेले नाही.

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:— आपण इतके दिवस शांततेत बोलत आहात म्हणुन हे चालले आहे, काढा चप्पल एकेकाला, अशी भाषा बोलतो मी आता.

शहर अभियंता, श्री. राम जयस्वार :— २८ तारखेपर्यंत करतो.

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:— सोमवारी २८ तारखेपर्यंत काय देणार आपण, मी टेंडरचे विचारले आहे कि, टेंडर कुठल्या तारखेला प्रसिध्द् होईल. कारण १५ ते २० डिसेंबरला आचारसंहिता लागते, टेंडरमध्ये किती दिवस देणार आपण, मी नियमाच्या कक्षेत बोलतो.

श्री. जमीर लेंगरेकर, उप—आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :—आपले म्हणणे बरोबर आहे.

शहर अभियंता, श्री. राम जयस्वार :— २५ दिवस

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:— कोणी सांगितले तुम्हाला कि २५ दिवस दयावे लागतील म्हणुन, कायदा माहित आहे का आपल्याला, श्री. पाटील साहेब, कृपा करून जरा यांना सांगा किती दिवसाची निविदा प्रसिध्द् करावी लागेल ते.

<u>श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी :–</u>आम्ही तर पाच दिवसात करुन देतो परंतु आयुक्त साहेबांची मान्यता तर झाली पाहिजे.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u> स्थायी समितीच्या आदेशाचे आयुक्त काय करणार आहेत ते तुम्ही ठरवा. आम्ही आदेश असे दिले आहेत, आम्ही कायदयाच्या कक्षेत बसुन बोलत आहोत,

<u>सदस्य, श्री. विजय पाटील :–</u> तुम्ही तुमचे काम करून दया ना.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u> आम्ही चुकीचे असेल तर आता सांगा आम्हाला, आम्ही चुकीचे आदेश देत असेल तर तसे सांगा, यानंतर आयुक्तांनी करायचे नाही करायचे ते नंतर बघू, नाहीतर वरपर्यंत जावू ना आम्ही, आयुक्त साहेबांची इच्छा आहे करायची परंतु हे अधिकारीच टाळाटाळ करतात,

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :–</u> आयुक्त साहेबांचे मत सकारात्मक आहे, मी सर्व कामे करेन, ते कधी म्हणाले नाहीत कि हे काम मी करणार नाही म्हणुन,

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u> जी तांत्रिक रक्कम आहे, जितकी रक्कम आहे, आमच्या यादीत जर फरक पडत असेल तर, आपल्याकडे यादी दिलेली आहे, त्यात कामाचे नांव दिलेले आहे, तेवढी कामे आपण करा. आज १८/११/२०१६ तारीख आहे, त्यानंतर ७ दिवसांचा कालावधी देतो, २५/११/२०१६ तारखेनंतर २८/११/२०१६ तारखेला टेंडर कॉल झाले पाहिजे. हि आपली जबाबदारी आहे, तसेच स्थायी समितीचा हा आदेश आहे आपल्याला जो कोणी या विषयाशी संबंधित आहेत त्यांना. जे अधिकारी उपस्थित नाहीत त्यांना मी टारगेट करेल. मा काही अडचण नाही. तुम्ही सर्वांना आदेश दया, याची दक्षता घ्या.

<u>श्री. जितु चोईथानी, उप अभियंता, साबांवि:–</u>स्थायी समितीमधुन जे महासभेत गेले आहे ती आहेत. वृक्षप्राधिकरणात सुध्दा आहे. मागील वर्षात होते आता यामध्ये नाही.

<u>श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी</u> :–१० दिवसाची यादी मी देतो तुम्हांला.

<u>शहर अभियंता, श्री. राम जैसवार:–</u>पुतळयाची परवानगी पाहिजे.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u>पुतळयाचे नुतनीकरण करायचे आहे.

<u>सदस्या श्रीमती लक्ष्मी सिंग:–</u>साहेब माझ्या प्रभागातील सुध्दा रस्त्याचे काम आहे.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u>महोदया, नविन नाही जोडु शकत.

<u>महापालिका सचिव :–</u> सदर विषय पारीत करण्यात यावा का?

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u> या ठरावात नमुद करा कि, सदर विषयाच्या ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता पारीत करण्यात यावा.

<u>काही सदस्य :–</u>पास–पास……

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ विषय क्र. ३ :–<u>प्रस्तावाची सूचना</u>

अंदाजपत्रकात राखून ठेवलेल्या तरतूदीनुसार एकुण रु. ९३.६२ कोटीच्या रस्त्याचा विकास कामाच्या निविदा काढण्याकरीता निर्णय घेणेबाबतचा स्थायी समिती सभापती श्री. सुनिल सुर्वे यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिकेच्या सन–२०१६–१७ च्या अंदाजपत्रकिय बैठकीमध्ये सर्वपक्षाच्या पदाधिका–याच्या संमतीने शहरातील प्रमुख रस्ताचा विकास होण्याकरीता तशी चर्चा करुन महासभेच्या मान्यतेने ठराव पारीत केला आहे.सोबत ठरावाची प्रत जोडत आहे. परंतु अदयाप पर्यत महासभेने केलेल्या ठरावाच्या प्रस्तावानुसार प्रस्ताव बनविण्यात आलेले नाही. उल्हासनगर शहरात गेल्या १० वर्षात कोणत्याही नवीन रस्त्यांचे काम कमी प्रमाणात हाती घेण्यात आल्याने व सद्या ते नादुरुस्त अवस्थेत असल्याने या रस्त्यावर होणारा दर वर्षी खर्च तसेच पावसाळयापूर्वी व पावसाळयानंतर खड्डेमय रस्त्यांवर होणारा खर्चाचा विचार पाहता. नाहक खर्च महापालिकेस दरवर्षी सोसावा लागत आहे. तसेच काही रस्त्ये अरुंद असल्याने त्यांचा देखील विकास होणे आवश्यक असल्याने त्या मार्गे जाता येतांना नागरीकांना व वाहतूकीस नाहक त्रास सहन करावा लागत आहे. याकरिता शहरातील वरील नमुद रस्त्यांच्या विकास होणे अत्यंत आवश्यक आहे. सदर नादुरुस्त रस्त्यामुळे नागरीकांच्या रोषास आम्हांला दैनंदिन सामोरे जावे लागत असून, शहरात चर्चेचा विषय बनला आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेची आगामी सार्वत्रिक निवडणूक–२०१७ मध्ये होत असल्याने मतदाराच्या प्रश्नाला आम्हाला सामोरे जावे लागणार आहे. या विषयावर विरोधकांकडून राजकरण करुन शहरात कायदा व सुव्यवस्था बिघडविण्याचा प्रयत्नात आहेत. या सर्व बाबींचा विचार करता व सर्वपक्षाच्या संमतीने महासभेच्या अंदाज पत्रकात तरतुदीनुसार शहरातील सोबत जोडलेल्या यादीतील प्रमुख रस्त्याचे विकासाची निविदा काढण्याबाबत चर्चा विनिमय करण्याकरिता विशेष तात्काळ महासभा लावण्याबाबत विनंती करण्यात आली होती परंतु अद्यापपर्यंत विशेष महासभेचे आयोजन करण्यात न आल्याने येत्या दि.२७/१०/२०१६ रोजी होणाऱ्या स्थायी समितीच्या बैठकीमध्ये प्रस्तावाची सुचनेनुसार मांडत असून विषय घेण्यात यावा, ही विनंती.

| अक्र | तपशिल | रक्कम |
|---|---|---|
| | रस्त्ये | |
| १ | विठ्ठलवाडी ते शांतीनगर डॉल्फीन | ३ कोटी |
| २ | नेहरु चौक ते फॉलवर लाईन | ८ कोटी |
| ३ | आशा कोल्ड्रीन ते पोलिस स्टेशन, बस स्टॉप, उल्हासनग–१ | ३ कोटी |
| ४ | श्रीराम, आनंद दिघे प्रवेशद्वार | २ कोटी |
| ५ | खेमाणी ते बजरंग आईस फॅक्टरी | ५ कोटी |
| ६ | उल्हास स्टेशन ते जिजामाता व्हाया सावरकर चौक | ५ कोटी |
| ७ | नेताजी स्कूल ते लालचक्की, उल्हासनगर–५ | ५ कोटी |
| ८ | सी ब्लॉक ते शांतीनगर साईबाबा डॉल्फीन व्हाया | १० कोटी |
| ९ | शहाड स्टेशन ते महानगरपालिका व्हाया सी ब्लॉक रोड, साईड ड्रेन आणि फुटपाथ | ७ कोटी |
| १० | रमेश मुकणे हाऊस ते शास्त्री नगर | १.५० कोटी |
| ११ | मधुबन हॉटेल ते हिरा संकूल विकास व मा.बाळासाहेब ठाकरे स्मारक बांधणे | ५० लाख |
| | उद्यानाचे सुशोभिकरण व नुतनीकरण | |
| १ | नाना नानी गार्डन, ४४४ गार्डन समोर, धनराज गार्डन, नेहरु नगर गार्डन, आनंद दिघे गार्डन, आजी आजोबा पार्क तक्षशिला पाण्याच्या टाकीसमोर, लिला चौक बिल्डींगच्या बाजूला, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे उद्यान उल्हासनगर–५, राजीव गांधी डद्यान, इंदिरा गांधी गार्डन, रामरख्यानी गार्डन, डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यान, कुर्ला कॅम्प, उल्हासनगर–४, इंदिरा गांधी गार्डन, गोल मैदान महिला | अंदाजपत्रकात उद्याने या लेखाशिर्षखाली तरतूद करण्यात |

| | | |
|---|---|---|
| | उद्यान | आली आहे. |
| | पुतळयांचे सुशोभिकरण व नुतनीकरण | |
| १ | शिवाजी महाराज पुतळा नुतनीकरण | ५१ लाख |
| २ | शिवाजी महाराज पुतळा नुतनीकरण, राजा गेमनानी हाऊस | १० लाख |

स्थायी समिती ठराव क्र. ९६ दिनांकः— १८/११/२०१६

सुचकाचे नाव :— श्रीमती इंदिरा उदासी
अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमूद यादीत समाविष्ट असलेल्या अंदाजपत्रकातील मंजुर तरतूदीनुसार शहरातील रस्ते, उदयाने व पुतळा सुशोभिकरण व नुतनीकरण कामाच्या निविदा काढणेस मान्यता देत आहे.

तसेच

सदर निविदा २८ नोव्हेंबर, २०१६ पर्यंत काढणेचे प्रशासनास निर्देश देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

सायंकाळी ५.१५ वाजंता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती श्री. सुनिल सुर्वे यांनी जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी )
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः– १३/१२/२०१६

दि. १३/१२/२०१६ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवत्त.

१३

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा मंगळवार दिनांक १३/१२/२०१६ रोजी सायंकाळी ४.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे | सभापती |
| २ | श्रीमती लिलाबाई आशान | सदस्या |
| ३ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर | सदस्य |
| ४ | श्री. जमनादास पुरस्वानी | सदस्य |
| ५ | श्रीमती अंजली साळवे | सदस्या |
| ६ | श्री. विजय चाहु पाटील | सदस्य |
| ७ | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | सदस्या |
| ८ | श्रीमती इंदिरा उदासी | सदस्या |
| ९ | श्रीमती पुष्पाताई नाना बागुल | सदस्या |
| १० | डॉ. निना प्रकाश नाथानी | सदस्या |
| ११ | श्रीमती वंदना पाटील उर्फ वंदना युवराज भदाणे | सदस्या |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्रीमती जया प्रकाश माखिजा, २. श्री. उमेश सुरेश कालानी, ३. श्री. गुरुनो भिकोमल वलेचा, ४. श्रीमती आशा जिवन इदनानी, ५. श्रीमती रेखा अशोक ठाकुर

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. जमीर लेंगरेकर, उप आयुक्त
२. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
३. श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी
४. श्री. सुखदेव बलमे, मुख्य लेखा परिक्षक
५. श्री. राम जैसवार, शहर अभियंता
६. श्री. जितु चोईथानी, उप अभियंता, साबांवि
७. श्री. तरुण शेवकानी,उप अभियंता, साबांवि
८. श्री. अश्विनी अहूजा, क. अभियंता, साबांवि
९. श्री. शितलानी,क. अभियंता, साबांवि
१०. श्री. संदिप जाधव, क. अभियंता, साबांवि
११. डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी
१२. श्री. भगवान कुमावत, प्र. प्रभाग अधिकारी
१३. श्री. नंदु समतानी, प्र. प्रभाग अधिकारी
१४. श्री. गणेश शिंपी, प्र. प्रभाग अधिकारी
१५. श्री. अजित गोवारी, प्र. प्रभाग अधिकारी
१६. श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक
१७. श्री. भास्कर मिरपगारे, प्र. अग्निशमन अधिकारी
१८. श्री. बाळु नेटके, प्र. सुरक्षा अधिकारी
१९. श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक
२०. श्री. मनिष हिवरे, प्र. सहा. आयुक्त
२१. श्रीमती छाया डांगळे, प्र. विधी विभाग प्रमुख
२२. श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.

१. श्रीमती मनिषा महाजन

२. श्रीमती नर्गिस खान

३. श्री. अशोक रामरख्यानी

सांयकाळी ४.२० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

यावेळी श्री. जमीर लेंगरेकर, उप–आयुक्त हे आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ झाले.

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–**अजुन अधिकारी आले नाहीत. मागील वेळेस सांगितले होते की जे अधिकारी उशिरा येतील त्यांना नोटिसा दया, जे अधिकारी उशिरा येतील त्यांची नावे नोंदविली जावी. मागील वेळेस जे अधिकारी नव्हते त्यांना नोटिसा दिल्या काय?

श्री. जमीर लेंगरेकर, उप–आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :–हे माझ्याकडे नाही. ते सामान्य प्रशासन विभाग बघेल. मी मागील वेळेस त्यांच्या उप–आयुक्तांना सांगितले होते की काही विभाग प्रमुख उपस्थित नव्हते, काही उशिरा आले होते म्हणुन चेअरमनने नाराजी व्यक्त केली आहे.

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–सदस्यांचे काय म्हणणे आहे जे अधिकारी आले नाहीत त्यांना नोटिसा दयाव्या ना.

श्री. जमीर लेंगरेकर, उप–आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :–हो, आजच कारणे दाखवा नोटिस देतो. मा. सभापती यांच्या निर्देशानुसार आज जे अधिकारी उपस्थित नाहीत त्यांना कारणे दाखवा नोटिस आजच बजावली जाईल.

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:– ठिक आहे, सभेस सुरुवात करा.

महापालिका सचिव :– विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ विषय क्र. १ :– मागिल सभेचे दिनांक २९/९/२०१६ व ७/१०/२०१६ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

काही सदस्य :–पास–पास......

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–मागील सभेचे दिनांक २९/९/२०१६ व ७/१०/२०१६ रोजीचे इतिवृत जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे 👍

---

☑ **विषय क्र. १** :– मागील सभेचे दिनांक २९/९/२०१६ व ७/१०/२०१६ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नांव : श्री. विजय पाटील

अनुमोदकाचे नांव : श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

<u>स्थायी समिती ठराव क्र. :–९६ अ</u> <u>दिनांक : १३/१२/२०१६</u>

ही स्थायी समिती महापालिका सचिवांनी प्रस्तृत केलेले दिनांक २९/९/२०१६ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते ३७ पर्यंतचे व ७/१०/२०१६ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते १५ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. २ :–** सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत निविदा प्रक्रीया केलेल्या उल्हासनगर–५ कैलाश कॉलनी येथे गेट बनविणे, चौकाचे सुशोभिकरण करणे व क्रॉस ड्रेन बनविणेचे काम करणेकरिता मे. श्री. मॉ. कन्स्ट्रक्शन कंपनी यांच्या निविदेस मान्यता देणे.

---

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u>इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करा.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करा.

<u>सदस्य श्री. विजय पाटील:–</u>साहेब, डिमोलेशन करायचे आहे ना? सुशोभिकरण होईल काय?

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u>तसा विषय नाही हा फक्त कल्व्हर्टचा आहे.

<u>सदस्य श्री. विजय पाटील:—</u>रस्त्याच्या बाजुलाच महापालिकेच्या खोल्या आहेत ना? ते डिमोलेशन करायला पाहिजे ना?

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>सुशोभिकरणाचा विषय नाही, त्याचा एक कोटी निधी होता. फक्त ३२ का ३३ लाख त्यांनी कल्व्हर्टचा विषय घेतला आहे. परंतु सदस्यांची भावना लक्षात घ्या, ज्याच्या ऑर्डर झालेल्या आहेत. मा. प्रभाग अधिकारी ते डिमोलेशन करण्याचे काय झाले?

<u>श्री. गणेश शिंपी, प्र. प्रभाग अधिकारी :—</u>साहेब, मी पाहणी केली. आयुक्त साहेबांनी पाहणी करतात.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>पुढील सभेच्या आत करा. साहेबांना दाखवुन दया.

<u>श्री. गणेश शिंपी, प्र. प्रभाग अधिकारी :—</u> दाखविले आहे साहेबांना, त्याची पाहणी केली आहे.

<u>महापालिका सचिव :—</u>गोषवारा तसाच आहे. आपण तशीच निविदा मागविली आहे ना? कल्व्हर्ट कसे? लिगली नाही. त्यात स्पष्ट लिहिले आहे की, कैलास कॉलनी चौकाचे सुशोभिकरण करणेकरीता १ कोटी रक्कमेचा मागविण्यात आलेल्या, आपण त्यासाठीच निविदा मागविली आहे ना? जर निविदा वेगळी काढली आहे तर ठराव मी कसा वेगळा करेल? आणि कल्व्हर्ट कसे बोलता तुम्ही? हे लिगली होणार नाही, तुम्ही ठरवा काय ते.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>चुकीचे लिहिले आहे. तांत्रिक बाबी तपासा.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>जसा गोषवारा तसाच पारीत करा. गेट बनविणे, चौकाचे सुशोभिकरण करणे व क्रॉस ड्रेन बनविणेचे काम आहे. जोपर्यंत नाला नाही बनविणार तर पाणी रोडवर वाहिल तर मग सुशोभिकरण कसे होईल. जसा आहे तसा पास करा.

<u>सदस्य श्री. विजय पाटील :—</u>कुठला नाला बनविणार?

<u>सदस्य श्री. राम पारवानी :—</u>नाला मंदिराच्या बाजुला आहे.

<u>श्री. अश्विनी अहुजा, क. अभियंता:—</u>होय, तेथे जलाश्रम आहे, जलाश्रम जवळ आहे.

<u>सदस्य श्री. विजय पाटील:—</u>उल्लेख पाहिजे ना?

महापालिका सचिव :–मी ठराव वाचुन दाखविते. ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत निविदा प्रक्रीया केलेल्या उल्हासनगर–५ कैलाश कॉलनी येथे गेट बनविणे, चौकाचे सुशोभिकरण करणे व क्रॉस ड्रेन बनविणेचे काम करणेकरिता मे. श्री. मॉ. कन्स्ट्रक्शन कंपनी यांची दरसूचीपेक्षा ०.००१**%** कमी दराच्या निविदेस मान्यता देत आहे.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करा.

सदस्य श्री. विजय पाटील:–ब्रिज कुठला?

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–यात सर्व काही नमुद करायला पाहिजे होते.

श्री. राम जैसवार, शहर अभियंता:–प्राकलनामध्ये आहे.

श्री. अश्विनी अहुजा, क. अभियंता:–एकच आहे जलाश्रम.

सदस्य श्री. विजय पाटील:–त्यात करा ना उल्लेख.

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–त्यांचे म्हणणे असे आहे की, जलाश्रम जवळचा कल्व्हर्ट.

महापालिका सचिव :–फक्त यांनी वर्कऑर्डर मध्ये तसे लिहावे.

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–वर्क ऑर्डर देतांना तसे नमुद करा.

काही सदस्य:–पास,पास.......

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. २** :– सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत निविदा प्रक्रीया केलेल्या उल्हासनगर–५ कैलाश कॉलनी येथे गेट बनविणे, चौकाचे सुशोभिकरण करणे व क्रॉस ड्रेन बनविणेचे काम करणेकरिता मे. श्री. मॉ. कन्स्ट्रक्शन कंपनी यांच्या निविदेस मान्यता देणे.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिका प्रभाग क्षेत्र क्र.५ मधील मंजुरी मिळालेल्या उल्हासनगर–५ कैलाश कॉलनी येथे गेट बनविणे, चौकाचे सुशोभिकरण करणे व क्रॉस ड्रेन बनविणेचे काम करणे या कामांकरीता बी–१ प्रकारच्या दोन भाग (तांत्रिक व आर्थिक) पध्दतीने नोंदणीकृत ठेकेदारांकडून दिनांक १२/०७/२०१६ रोजी निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्राकलनीय खर्च | रु.१००००००००/– |
| २ | निविदा प्रसिध्द केलेली वर्तमानपत्रे | |
| ३ | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक १२/०७/२०१६ |
| ४ | निविदा विक्री कालावधी | दिनांक १४/०७/२०१६<br>ते २६/०८/२०१६ |
| ५ | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक ३१/०८/२०१६ |
| (अ) | प्रथम मुदतवाढ | |
| ब) | द्वितीय मुदतवाढ | |
| क) | तृतीय मुदतवाढ | |
| ६ | तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | दिनांक २०/०९/२०१६ |
| ७ | आर्थिक भाग उघडण्याचा दिनांक | दिनांक २१/०९/२०१६ |
| ८ | विक्री केलेल्या निविदांची संख्या | २ |
| ९ | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | २ |

दिनांक २०/०९/२०१६ रोजी मा.अतिरिक्त आयुक्त, मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक, शहर अभियंता यांचे उपस्थितीत उल्हासनगर–५ कैलाश कॉलनी येथे गेट बनविणे, चौकाचे सुशोभिकरण करणे व क्रॉस ड्रेन बनविणेचे काम करणे या कामाच्या निविदेचा तांत्रिक भाग उघडण्यात आला होता. त्याअनुषंगाने सदर निविदेसाठी एकाच निविदाकाराने प्रतिसाद दिला असल्याने सदर निविदेस मुदतवाढ देण्यात आली. सदर निविदेस २ निविदाकारांनी प्रतिसाद दिला. त्यानुसार कामाच्या निविदेचा तांत्रिक भाग उघडण्यात आला त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ. क्र. | निविदाकाराच्या निविदेमधील बाबी | मे. व्ही.के. कन्स्ट्रक्शन | मे. श्री मॉ कन्स्ट्रक्शन कंपनी |
|---|---|---|---|
| १ | निविदा प्रपत्रकाच्या खरेदीची रक्कम भरलेली आहे का? | होय | होय |
| २ | इसारा रक्कम भरलेली आहे का? | होय | होय |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | अद्यावत आयकर रिटर्न भरल्याची पावती | होय | होय |
| ४ | कामाचा अनुभव | होय | होय |
| ५ | पॅन कार्डाची प्रत | होय | होय |
| ६ | संस्था/कंपनी नोंदणी (भागिदारी, मालकी, कंपनी इत्यादीचे) दस्तऐवज | होय | होय |

सदर निविदांची सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये छाननी समिती मार्फत छाननी केली असता १) **मे. व्ही.के. कन्स्ट्रक्शन** २) **मे. श्री मॉ कन्स्ट्रक्शन कंपनी** यांच्या निविदा अटी शर्तीनुसार असल्याने पात्र आहेत. तरी उपरोक्त निविदाकारांच्या निविदांचा दुसरा भाग उघडण्यात प्रस्तावित करण्यात आले.

आज दिनांक २१/०९/२०१६ रोजी उपरोक्त निविदाकारांचा आर्थिक बाबींचा दुसरा भाग (आर्थिक दर) मा.अतिरिक्त आयुक्त सो., यांचे अध्यक्षतेखालील निवड समिती सदस्य मुख्य लेखाअधिकारी, मुख्य लेखापरिक्षक, शहर अभियंता, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे उपस्थितीत उघडण्यात आला. त्याप्रमाणे निविदाकांरानी दिलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| १) मे. **व्ही. के. कन्स्ट्रक्शन** | दिलेले दर २.०० टक्के जास्त |
| २) **मे. श्री मॉ कन्स्ट्रक्शन कंपनी** | दिलेले दर ०.००१ टक्के कमी |

उपरोक्त **उल्हासनगर–५ कैलाश कॉलनी येथे गेट बनविणे, चौकाचे सुशोभिकरण करणे व क्रॉस ड्रेन बनविणेचे काम करणे** या कामाचे उक्त निविदाकारांपैकी **मे. श्री मॉ कन्स्ट्रक्शन कंपनी** यांनी दरसूची वर ०.००१ टक्के कमी (0.001% below) प्रमाणे दर दिले असुन त्याप्रमाणे **मे. श्री मॉ कन्स्ट्रक्शन कंपनी** यांची सदर काम देणेकरिता शिफारस करण्यात येत आहे.

मा.आयुक्त सो. यांनी टी–३ वर महापालिकेची सध्या आर्थिक परिस्थिती बिकट असल्याने अत्यंत तातडीचे असलेली कामेच सध्याच्या अंदाजपत्रकामधून करणे शक्य आहे. त्यामुळे सदर सुचविलेल्या कामापैकी सुशोभिकरणाचे काम वगळून उर्वरित अत्यंत निकड असलेली कामेच प्रस्तावित करुन फेरसादर करणेबाबत निर्देश दिले आहेत.

त्याअनुषंगाने उल्हासनगर–५ येथील कैलाश कॉलनी चौकाचे जवळील असलेला साकव अत्यंत खराब झाला आहे. या साकवचे लोखंड गजंले असल्याने कोणत्याही वेळी दुर्घटना होवू शकते. त्यामुळे सदर साकव तयार करणे अत्यंत आवश्यक आहे. सदर साकव नव्याने बांधण्याकरीता रु. ३३,१२,८००/– एवढया रक्कमेचे प्राकलन तयार करण्यात आले आहे.

सदर साकव बांधण्याच्या कामाकरीता फेरनिविदा काढल्यास वेळेचा अपव्यय होईल. त्यामुळे उल्हासनगर–५ येथील कैलाश कॉलनी चौकाचे सुशोभिकरण करणेच्या रु. १.०० कोटी रक्कमेच्या कामाकरीता मागविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत प्राप्त झालेली **मे. श्री मॉ. कन्स्ट्रक्शन** यांच्या ०.००१ टक्के कमी या निम्न दराच्या निविदेतून सदर काम करणेस व सदर प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या पटलावर ठेवणेस सादर करणेत येत आहे.

तरी **मे. श्री मॉ कन्स्ट्रक्शन कंपनी** यांची दरसूचीपेक्षा ०.००१**%** कमी दराच्या निविदेस मा. स्थायी समितीचे मान्यतेसाठी प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र.** ९७ **दिनांकः– १३/१२/२०१६**

सूचकाचे नांव : श्री. विजय पाटील

अनुमोदकाचे नांव : श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत निविदा प्रक्रीया केलेल्या उल्हासनगर–५ कैलाश कॉलनी येथे गेट बनविणे, चौकाचे सुशोभिकरण करणे व क्रॉस ड्रेन बनविणेचे काम करणेकरिता मे. श्री. मॉ. कन्स्ट्रक्शन कंपनी यांची दरसूचीपेक्षा ०.००१**%** कमी दराच्या निविदेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ३ :–** उल्हासनगर महानगरपालिकेकरीता ६०० लि.क्षमतेची दोन नविन (जेंटींग मशिन) वाहन खरेदी करणेसाठी कमी दराच्या निविदेस मान्यता देणे.

---

सदस्य श्री.जमनादास पुरस्वानी :–पास, इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करावा.

काही सदस्य :–पास–पास......

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ३ :–** उल्हासनगर महानगरपालिकेकरीता ६०० लि.क्षमतेची दोन नविन (जेंटींग मशिन) वाहन खरेदी करणेसाठी कमी दराच्या निविदेस मान्यता देणे.

प्रस्तावना

उपरोक्त विषयान्वये मा.सभापती,प्रभाग समिती क्र. ३ यांनी शौचालय नियमित स्वच्छ रहावी यासाठी २ टॉयलेट क्लीनींग मोबाईल व्हॅन खरेदी करणेसाठी या विभागात विनंती केलेली असुन प्रभाग समिती ३ कार्यक्षेत्रातील सार्वजनिक शौच्छालयाची पाण्या अभावी खुप दयानिय अवस्था असल्यामुळे शौचालयाची व्यवस्थीत साफ सफाई होत नाही.त्यामुळे परिसरात खुप घाण पसरत आहे.

सदर वाहननिविदेचा वाहन पुरविणे कामी लागणारा रू २१,६९,७६४/— हा खर्च सन २०१५—२०१६ याच्या लेखा शिर्ष CC(3) PART II या मधुन खर्च करण्यात येणार आहे. सबब याकरीता ६०० लि.क्षमतेची दोन नविन वाहन (जेंटींग मशिन) खरेदी ई निविदा प्रक्रियाद्वारे या कामाकरिता २ लिफाफा पध्दतीने ठेकेदार/मक्तेदार यांचेकडून निविदा मागविण्यात आल्या होत्या त्याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्राकलनीय खर्च | रु. २१,६९,७६४/— |
| २ | निविदा प्रसिध्द केलेली वर्तमानपत्रे | १)दैनिक सामना, २)दैनिक खबरे आज तक |
| ३ | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक १३/०७/२०१६ |
| ४ | निविदा विक्री कालावधी | दिनांक १६/०७/२०१६ ते दिनांक ०५/१०/२०१६ |
| ५ | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक १६/०७/२०१६ ते दिनांक ०५/१०/२०१६ |
| | प्रथम मुदत वाढ | दिनांक १६/०७/२०१६ ते दिनांक २६/०८/२०१६ |
| | द्वितीय मुदत वाढ | दिनांक १६/०७/२०१६ ते दिनांक २३/०९/२०१६ |
| | तृतीय मुदत वाढ | दिनांक १६/०७/२०१६ ते दिनांक ०५/१०/२०१६ |
| ६ | निविदेचा तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | दिनांक १०/१०/२०१६ ते दिनांक १३/१०/२०१६ |
| ७ | निविदेचा आर्थिक भाग उघडण्याचा दिनांक | दिनांक १०/१०/२०१६ ते दिनांक १३/१०/२०१६ |
| ८ | विक्री केलेल्या निविदांची संख्या | ३ |
| ९ | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ३ |

दिनांक १३/१०/२०१६ रोजी मा.अतिरिक्त आयुक्त सो.,मा.मुख्य लेखा परिक्षण, उप आयुक्त (वाहन), यांचे उपस्थितीत उल्हासनगर महानगरपालिकेच्या ६०० लि.क्षमतेची दोन नविन वाहन (जेंटींग मशिन) खरेदी बाबतचे या कामाच्या निविदेचा भाग—१ लिफाफा उघडण्यात आला त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ. क्र. | निविदाकाराच्या निविदेमधील बाबी | मे.न्यु साई फायबर्स | मे.मिरा स्टिल फॅब्रीकेशन ॲन्ड फयबर्स | मे.एस एस इंजिनीयर्स |
|---|---|---|---|---|
| १ | संस्था नोंदणी प्रमाणपत्र | होय | होय | होय |
| २ | पॅन कार्ड | होय | होय | होय |
| ३ | सर्विस टॅक्स | होय | होय | होय |
| ४ | अनुभवाचा दाखला | होय | होय | होय |
| ५ | आय.एस.ओ/आय.एस.आय प्रमाणपत्र | होय | होय | होय |

सदर निविदेची छाननी केली असता १) में. श्री साई फायबर्स २) में. मिरा स्टिल फॅब्रीकेशन अॅन्ड फयबर्स ३) मे.एस एस इंजिनीयर्स यांच्या निविदा अटी शर्तीनुसार असल्याने पात्र आहेत.

तरी उपरोक्त निविदाकारांच्या निविदाचा दुसरा भाग (आर्थिक) दिनांक १७/१०/२०१६ रोजी मा. अतिरिक्त आयुक्त सो, यांच्या आध्यक्षते खाली निवड समिती सदस्य मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखाअधिकारी, उप आयुक्त (वाहन) यांचे उपस्थितीत उघडण्यात आली. त्याचा तपशिल दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | वाहनाचा प्रकार व इतर माहिति (पंपाची ) | नग | मे.न्यु साई फायबर्स | में.मिरा स्टिल फॅब्रीकेशन अॅन्ड फयबर्स | मे.एस.एस इंजिनीयर्स |
|---|---|---|---|---|---|
| १ | LCV Mounted Sewer mini jetting machine of 600Ltr. Tank capacity on your suitable chassis having GVW not less than 2180 Kg. for dechoking of sewer lines,Special purpose motor vehicle Engine rpm will be 3000rpm 2mmThickness, material ms 152062 Grade. | २ | १३,३३,२२४/— | १३,६५,०००/— | १३,९८,०००/— |
| २ | Tata Ace B.S.IV Chassis with GPS System. RTO & Insurance Included. Warrantee one year agajnst manufacturing defects only. | २ | ९,२२,८००/— | ९,३२,०००/— | ९,४०,०००/— |
| | एकुण | | २२,५६,०२४/— | २२,९७,०००/— | २३,३८,०००/— |

वरील तुलनात्मक तक्त्यानुसार १) मे. न्यु साई फायबर्स, यांनी वाहना संबंधी सादर केलेले दर हे न्युनतम व वाजवी आहेत.परंतु सदर निविदाकाराचे दर हे अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा ४% जास्त म्हणजेच २२,५६,०२४/— इतका आहे व मे. मिरा स्टिल फॅब्रीकेशन अॅन्ड फयबर्स व मे.एस.एस इंजिनीयर्स यांनी भरणा केलेले दर मे. न्यु साई फायबर्स यांच्या रक्कमेपेक्षा ३.५४ % जास्त आहे.

तसेच मा. अति. आयुक्त सो यांनी दिनांक २४/१०/२०१६ रोजी निविदा क्र. १०५३ या निविदेबाबतच्या रक्कमेची वाटाघाटी करणेसाठी आदेशीत केल्यानुसार वाहन विभागामार्फत जा.क्र. उमपा/वाहन/१७३/१६,दिनांक २४/१०/२०१६ अन्वये मे.न्यु साई फायबर्स यांना पत्रान्वये दिनांक २७/१०/२०१६ रोजी वाटाघाटीस उपस्थित राहणे बाबत कळविले असता मा.अति.आयुक्त यांना दिनांक २७/१०/२०१६ रोजी सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रमाबाबत निवडणूक आयोगाकडे बैठक असल्यामुळे मा.अति. आयुक्त वाटाघाटीस उपस्थित नसल्यामुळे सदर निविदेबाबतची वाटाघाटी रद्द करण्यात आली. व मे.न्यु साई फायबर्स यांना जा. क्र. उपमा/वाहन/१८३/१६, दिनांक २८/१०/२०१६ अन्वये दिनांक १०/११/२०१६ रोजी वाटाघाटीस उपस्थित राहणे बाबत कळविले असता सदर बैठकीस मे.न्यु साई फायबर्स चे प्रतिनिधी

उपस्थित होते. व त्यांनी सदर निविदेचे दर रू.२२,५३,०२४/— या रक्कमेतून रू. ८७,२२४/— एवढी रक्कम कमी करून रू. २१,६८,८००/— एवढी रक्कम निश्चित करून काम करण्यास तयारी दर्शविलेली आहे.

यावरून असे दिसुन येते की, नविन वाहन खरेदीसाठी में. साई फायबर्स यांचे दराच्या निविदेस मान्यता देणेसाठी सदर प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर सादर.

स्थायी समिती ठराव क्र. ९८ दिनांकः— १३/१२/२०१६

सूचकाचे नांव : श्री. विजय पाटील

अनुमोदकाचे नांव : श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिकेकरीता ६०० लि.क्षमतेची दोन नविन (जेंटींग मशिन) वाहन खरेदी करणेसाठी में. साई फायबर्स यांचे कमी दराच्या निविदेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्रमांक. ४ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. ४ :— महापौर फंडातून दिवाळी बाजार आनंद मेळाव्याच्या कार्यक्रमाचे आयोजनाचे कामाची माहीती नोंद करणे**

---

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—माहिती नोंद करण्याचा विषय आहे ना, मग इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करावा. विषय क्र. ५,६,७,८,९ हे सर्व माहिती नोंद करण्याचा विषय आहे. त्यामुळे विषय क्र. ५,६,७,८ व ९ पर्यंत सर्व विषय पास करा.

काही सदस्य :—पास—पास......

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ४ :—** महापौर फंडातून दिवाळी बाजार आनंद मेळाव्याच्या कार्यक्रमाचे आयोजनाचे कामाची माहीती नोंद करणे

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका महापौर फंडातून फंडातून दिवाळी बाजार आनंद मेळाव्याच्या कार्यक्रमाचे आयोजन दिनांक ०२/११/२०१५ ते ०७/११/२०१५ या कालावधीत आयोजीत करण्यात आले होते. सदर कार्यक्रमासाठी दिलेल्या मंजूरीची माहीती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनीयम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये पुढील प्रमाणे देण्यात येत आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | मंजूर रक्कम | एजंन्सीचे नाव |
|---|---|---|---|
| ०१ | महापौर फंडातून दिवाळी बाजार आनंद मेळाव्याच्या कार्यक्रमाचे आयोजनाचे करीता लागणारे साहीत्य पुरविणेबाबत. | १,९९,५००/— | मे. मोहीत एंटरप्रायझेस उल्हासनगर—३ |

तरी सदरची माहीती मा. स्थायी समितीच्या अवलोनार्थ प्रस्तावीत करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ९९ दिनांक:— १३/१२/२०१६

सूचकाचे नांव : श्री. विजय पाटील

अनुमोदकाचे नांव : श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार महापौर फंडातून दिवाळी बाजार आनंद मेळाव्याच्या कार्यक्रम आयोजनाच्या कामाची माहीती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

महापालिका सचिव :– विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ५ :–**महापौर फंडातून दिवाळी बाजार आनंद मेळाव्याच्या कार्यक्रमाचे आयोजनाचे कामाची माहीती नोंद करणे

---

**काही सदस्य :–**पास–पास......

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ५ :–** महापौर फंडातून दिवाळी बाजार आनंद मेळाव्याच्या कार्यक्रमाचे आयोजनाचे कामाची माहीती नोंद करणे

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका महापौर फंडातून फंडातून दिवाळी बाजार आनंद मेळाव्याच्या कार्यक्रमाचे आयोजन दिनांक ०२/११/२०१५ ते ०७/११/२०१५ या कालावधीत आयोजीत करण्यात आले होते. सदर कार्यक्रमासाठी दिलेल्या मंजूरीची माहीती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनीयम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये पुढील प्रमाणे देण्यात येत आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | मंजूर रक्कम | एजंन्सीचे नाव |
|---|---|---|---|
| ०१ | महापौर फंडातून दिवाळी बाजार आनंद मेळाव्याच्या कार्यक्रमाचे आयोजनाचे करीता लागणारे साहीत्य पुरविणेबाबत. | १,९९,३७५/– | मे. मोहीत एंटरप्रायझेस उल्हासनगर–३ |

तरी सदरची माहीती मा. स्थायी समितीच्या अवलोनार्थ प्रस्तावीत करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १०० दिनांक:– १३/१२/२०१६

सूचकाचे नांव : श्री. विजय पाटील

अनुमोदकाचे नांव : श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार महापौर फंडातून दिवाळी बाजार आनंद मेळाव्याच्या कार्यक्रम आयोजनाच्या कामाची माहीती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ६ :—** महापौर फंडातून दिवाळी बाजार आनंद मेळाव्याच्या कार्यक्रमाचे आयोजनाचे कामाची माहीती नोंद करणे

---

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ६ :—** महापौर फंडातून दिवाळी बाजार आनंद मेळाव्याच्या कार्यक्रमाचे आयोजनाचे कामाची माहीती नोंद करणे

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिका महापौर फंडातून फंडातून दिवाळी बाजार आनंद मेळाव्याच्या कार्यक्रमाचे आयोजन दिनांक ०२/११/२०१५ ते ०७/११/२०१५ या कालावधीत आयोजीत करण्यात आले होते. सदर कार्यक्रमासाठी दिलेल्या मंजूरीची माहीती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनीयम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये पुढील प्रमाणे देण्यात येत आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | मंजूर रक्कम | एजंन्सीचे नाव |
|---|---|---|---|
| ०१ | महापौर फंडातून दिवाळी बाजार आनंद मेळाव्याच्या कार्यक्रमाचे आयोजनाचे करीता लागणारे साहीत्य पुरविणेबाबत. | १,९९,८५०/— | मे. अमरज्योत एंटरप्रायझेस उल्हासनगर—३ |

तरी सदरची माहीती मा. स्थायी समितीच्या अवलोनार्थ प्रस्तावीत करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १०१ दिनांक:— १३/१२/२०१६

सूचकाचे नांव : श्री. विजय पाटील

अनुमोदकाचे नांव : श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार महापौर फंडातून दिवाळी बाजार आनंद मेळाव्याच्या कार्यक्रम आयोजनाच्या कामाची माहीती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :- विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ७ :-** महापौर फंडातून दिवाळी बाजार आनंद मेळाव्याच्या कार्यक्रमाचे आयोजनाचे कामाची माहीती नोंद करणे

---

काही सदस्य :-पास-पास......

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:-सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ७ :-** महापौर फंडातून दिवाळी बाजार आनंद मेळाव्याच्या कार्यक्रमाचे आयोजनाचे कामाची माहीती नोंद करणे

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिका महापौर फंडातून फंडातून दिवाळी बाजार आनंद मेळाव्याच्या कार्यक्रमाचे आयोजन दिनांक ०२/११/२०१५ ते ०७/११/२०१५ या कालावधीत आयोजीत करण्यात आले होते. सदर कार्यक्रमासाठी दिलेल्या मंजूरीची माहीती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनीयम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये पुढील प्रमाणे देण्यात येत आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | मंजूर रक्कम | एजंन्सीचे नाव |
|---|---|---|---|
| ०१ | महापौर फंडातून दिवाळी बाजार आनंद मेळाव्याच्या कार्यक्रमाचे आयोजनाचे करीता लागणारे साहीत्य पुरविणेबाबत. | १,९९,०००/— | मे. अमरज्योत एंटरप्रायझेस उल्हासनगर—३ |

तरी सदरची माहीती मा. स्थायी समितीच्या अवलोनार्थ प्रस्तावीत करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १०२ दिनांकः— १३/१२/२०१६

सूचकाचे नांव : श्री. विजय पाटील

अनुमोदकाचे नांव : श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार महापौर फंडातून दिवाळी बाजार आनंद मेळाव्याच्या कार्यक्रम आयोजनाच्या कामाची माहीती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ८ वाचुन दाखवितात

---

विषय क्र. ८ :—कल्याण अंबरनाथ रस्त्यावर बाधीत होणारी बांधकामे निष्कासीत करताना पोलीस कर्मचारी व मनपा कर्मचारी यांचेकरीता करण्यात आलेल्या अल्पोपहार व भोजन संबधीच्या खर्चाची माहीती नोंद करणे.

---

काही सदस्य :—पास—पास......

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ८ :—** कल्याण अंबरनाथ रस्त्यावर बाधीत होणारी बांधकामे निष्कासीत करताना पोलीस कर्मचारी व मनपा कर्मचारी यांचेकरीता करण्यात आलेल्या

अल्पोपहार व भोजन संबधीच्या खर्चाची माहीती नोंद करणे.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतून जाणाऱ्या कल्याण अंबरनाथ रस्त्याच्या रूंदीकरणाच्या कामामध्ये बाधीत होणारी बांधकामे निष्कासीत करण्याचे काम दिनांक ०४/१२/२०१५ पासून सुरू करण्यात आले होते. सुटट्ीचा कालावधी वगळता सदरचे काम १० दिवसू चालू होते. याकामी २५० पोलीस कर्मचारी व २५० महापालिका कर्मचारी उपस्थित होते. त्याकामी झालेल्या खर्चाची माहीती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनीयम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये पुढील प्रमाणे देण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | मंजूर रक्कम | एजन्सीचे नाव |
|---|---|---|---|
| ०१ | कल्याण अंबरनाथ रस्त्यावर बाधीत होणारी बांधकामे निष्कासीत करताना पोलीस कर्मचारी व मनपा कर्मचारी यांचेकरीता करण्यात आलेल्या अल्पोपहार व भोजनाकरीता झालेल्या खर्चाबाबत. | ६,५५,०००/— | मे. मोहित एंटरप्रायझेस उल्हासनगर—३ |

तरी सदरची माहीती मा. स्थायी समितीच्या अवलोनार्थ प्रस्तावीत करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १०३ दिनांक:— १३/१२/२०१६

सूचकाचे नांव : श्री. विजय पाटील

अनुमोदकाचे नांव : श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार कल्याण अंबरनाथ रस्त्यावर बाधीत होणारी बांधकामे निष्कासीत करताना पोलीस कर्मचारी व मनपा कर्मचारी यांचेकरीता करण्यात आलेल्या अल्पोपहार व भोजन संबधीच्या खर्चाची माहीती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ९ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ९ :—** महापौर फंडातून दिवाळी बाजार आनंद मेळाव्याच्या कार्यक्रमाचे आयोजनाचे कामाची माहीती नोंद करणे

---

**काही सदस्य :—**पास—पास……

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ९ :—** महापौर फंडातून दिवाळी बाजार आनंद मेळाव्याच्या कार्यक्रमाचे आयोजनाचे कामाची माहीती नोंद करणे

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका महापौर फंडातून फंडातून दिवाळी बाजार आनंद मेळाव्याच्या कार्यक्रमाचे आयोजन दिनांक ०२/११/२०१५ ते ०७/११/२०१५ या कालावधीत आयोजीत करण्यात आले होते. सदर कार्यक्रमासाठी दिलेल्या मंजूरीची माहीती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनीयम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये पुढील प्रमाणे देण्यात येत आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | मंजूर रक्कम | एजंन्सीचे नाव |
|---|---|---|---|
| ०१ | महापौर फंडातून दिवाळी बाजार आनंद मेळाव्याच्या कार्यक्रमाचे आयोजनाचे करीता लागणारे साहीत्य पुरविणेबाबत. | १,९९,५००/— | मे. मोहीत एंटरप्रायझेस उल्हासनगर—३ |

तरी सदरची माहीती मा. स्थायी समितीच्या अवलोनार्थ प्रस्तावीत करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र.** १०४ **दिनांक:—** १३/१२/२०१६

सूचकाचे नांव : श्री. विजय पाटील

अनुमोदकाचे नांव : श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार महापौर फंडातून दिवाळी बाजार आनंद मेळाव्याच्या कार्यक्रम आयोजनाच्या कामाची माहीती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. १० वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १०** :—वर्ष २०१६—१७ मध्ये उल्हासनगर शहरातील प्रभाग क्र. १ ते ४ अंतर्गत असलेल्या रस्त्यावरील खड्डेभरणेच्या कामाकरीता लेखाशिर्षाअंतर्गत समायोजन करुन होणा—या वाढीव खर्चास मान्यता देणे.

---

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—रस्त्यावरील खड्डे भरण्याचा आहे.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :— हा विषय वगळण्यात यावा.

काही सदस्य :—विषय वगळण्यांत यावा.

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १०** :— वर्ष २०१६—१७ मध्ये उल्हासनगर शहरातील प्रभाग क्र. १ ते ४ अंतर्गत असलेल्या रस्त्यावरील खड्डेभरणेच्या कामाकरीता लेखाशिर्षाअंतर्गत समायोजन करुन होणा—या वाढीव खर्चास मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर शहरामध्ये असलेल्या डांबरी रस्त्यांची दरवर्षी पावसाळयापुर्वी, पावसाळयामध्ये व पावसाळयानंतर दुरुस्ती करण्यात येते. शहरातील काही रस्ते एकात्मिक रस्ते विकास प्रकल्प –२ मधील आहेत व इतर काही प्रमुख रस्ते आहेत त्यामधील असलेले तुरळक खड्डे, टेलिफोन विभाग व पाणी विभागाने खोदलेले खंदके व पावसाळयामुळे पडलेले खड्डे बुजवुन रस्ते वाहतुकीस सुस्थितीत ठेवावे लागतात.

याच धर्तीवर वर्ष २०१६–१७ मध्ये शहरातील रस्त्यांवरील खड्डे भरण्याकरीता प्रभाग क्षेत्र निहाय रु. ३,३३,५१,४३१/– (तीन लक्ष तेहतीस लाख एक्कावन्न हजार चारशे एकतिस फक्त) एवढया खर्चाच्या प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता घेवून प्रभाग क्षेत्र निहाय ठराव मंजूर करण्यात आले. त्याची माहिती खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | प्रभाग क्षेत्र क्र. | प्राकलनिय किंमत | स्थायी समिती ठराव क्र. व दिनांक | कार्यारंभ आदेश क्र. व दिनांक | एजन्सीचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्षेत्र क्र.१ | रु.३९,१८,०७२/– | ठराव क्र.४९ दिनांक ०४/०८/२०१६ | आदेश क्र.२३२७ दिनांक १०/८/२०१६ | मे.जयभारत कंन्स्ट्रक्शन |
| २ | प्रभाग क्षेत्र क्र.२ | रु.६३,८३,२४८/– | ठराव क्र.५० दिनांक ०४/०८/२०१६ | आदेश क्र.२३२८ दिनांक १०/८/२०१६ | मे.जयभारत कंन्स्ट्रक्शन |
| ३ | प्रभाग क्षेत्र क्र.३ | रु.८५,२०,५८६/– | ठराव क्र.५१ दिनांक ०४/०८/२०१६ | आदेश क्र.२३२९ दिनांक ६/०९/२०१६ | मे.झा.पी.ॲण्ड कंपनी |
| ४ | प्रभाग क्षेत्र क्र.४ | रु.१,४५,२९,५२५/– | ठराव क्र. ५२ दिनांक ०४/०८/२०१६ | आदेश क्र.२३३० दिनांक ०९/८/२०१६ | मे.सिध्दनाथ कंन्स्ट्रक्शन |

महापालिकेच्या अर्थसंकल्पातील 'अ' अंदाजपत्रक भाग–१ क ५ (iii) 'रस्ते दुरुस्ती' या लेखाशिर्षातील एकूण रु.५,००,००,०००/– (अक्षरी पाच कोटी) एवढया एकंदर तरतूदीतून सदर कामावरील खर्च करण्यात आला आहे. वरील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे शहरातील रस्त्यांवर खड्डे भरणेच्या कामांचे कार्यारंभ आदेश निर्गमित केल्यानंतर कामास सुरुवात करण्यात आली. यावर्षी पावसाने जुन महिन्याच्या सुरवातीपासूनच जोर धरल्याने शहरातील रस्त्यांवर मोठया प्रमाणात खड्डे पडले होते. तसेच सप्टेंबर महिन्याच्या पहिल्या आठवडयातच गणेशोत्सव असल्याने पावसाळयादरम्यानच रस्त्यांवरील खड्डे बुजविण्यात आले होते. त्यामुळे वरील रु.३,३३,५१,४३१/– (तीन लक्ष तेहतीस लाख एक्कावन्न हजार चारशे एकतिस फक्त) या प्राकलनिय खर्चाची कामे पूर्ण करण्यात आली. परंतू यावर्षी संपूर्ण महाराष्ट्रात सप्टेंबर महिन्यात मुसळधार पाउस झाला. त्यामुळे खड्डे भरलेल्या रस्त्यांवर पुनश्च खड्डे भरावे लागले. तसेच या अतिपावसामुळे इतर रस्त्यांवरही नव्याने खड्डे भरावे लागणार आहेत. काही रस्त्यांवर डांबरीकरण करण्यात आले आहे. (Dence Bituminous Macadam) अंतिम फिनिशिंग (Asphaltic Concrete) देणे बाकी आहे.

वरील परिच्छेद क्र.३ मध्ये नमुद कारणांमुळे खड्डे भरण्याच्या मुळ प्राकलनिय किंमतीत वाढ होत आहे. ती खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | प्रभाग क्षेत्र क्र. | एजन्सीचे नाव | मुळ प्राकलनिय किंमत | वाढीव खर्च | एकूण होणारा प्रस्तावित खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | प्रभाग क्षेत्र क्र.१ | मे.जयभारत कंन्स्ट्रक्शन | रु.३९,१८,०७२/– | रु.५०,००,०००/– | रु.८९,१८,०७२/– |
| २ | प्रभाग क्षेत्र क्र.२ | मे.जयभारत कंन्स्ट्रक्शन | रु.६३,८३,२४८/– | रु.२७,६६,४९७/– | रु.९१,४९,७४५/– |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | प्रभाग क्षेत्र क्र.३ | मे.झा.पी.ॲण्ड कंपनी | रु.८५,२०,५८६/– | रु.९१,२०,९३४/– | रु.१,७६,४१,५२०/– |
| ४ | प्रभाग क्षेत्र क्र.४ | मे.सिध्दनाथ कंन्स्ट्रक्शन | रु.१,४५,२९,५२५/– | रु.१,०७,३५,८८६/– | रु.२,५२,६५,४१०/– |
| | | **एकूण** | रु.३,३३,५१,४३१/– | रु.२,७६,२३,३१६/– | रु.६,०९,७४,७४७/– |

वास्तविक पाहता वरील तक्त्यातील स्तंभ क्र.५ प्रमाणे शहरातील रस्त्यांवरील खड्डे भरण्याच्या कामावरील वाढीव खर्च रु.२,७६,२३,३१६/– (अक्षरी दोन कोटी शहात्तर लाख तेवीस हजार तिनशे सोळा मात्र) एवढा खर्च अर्थसंकल्पातील लेखाशिर्षात 'अ' अंदाजपत्रक भाग–१ क ५ **(iii)** 'रस्ते दुरुस्ती'या लेखा शिर्षमिधून करणे अपेक्षित आहे. परंतू या लेखाशिर्षात वरील वाढीव खर्चास तरतूद शिल्लक नाही. परंतू 'अ' अंदाजपत्रक भाग–१ क ४ **(7)** 'नविन रस्ते सिमेंट कॉक्रिट करणे' या लेखाशिर्षात एकुण रु.६१,५९,००,०००/– (अक्षरी एकसष्ट कोटी एकोणसाठ लाख मात्र) इतकी तरतुद उपलब्ध आहे. शहरातील नागरीक व लोकप्रतिनिधी यांच्या मागण्या लक्षात घेता रस्त्यांवरील खड्डे भरणेकरीता वरीलप्रमाणे झालेले वाढीव काम करणे आवश्यक आहे. तसेच मा.स्थायी समितीनेही ठराव क्र.२३ दिनांक १३/०६/२०१६ रोजीच्या ठरावास मंजूरी देताना १० टक्के पेक्षा जास्त वाढीव कामास अनुमती देणार नाही असे ठरावात नमुद केले आहे.

त्यामुळे वर्ष २०१६–१७ मध्ये पावसाळयादरम्यान उल्हासनगर शहरातील प्रभाग क्षेत्र क्र.१ ते ४ मधील रस्त्यांवरील खड्डे भरण्याच्या कामावरील होणारा वाढीव खर्च रु.२,७६,२३,३१६/– (अक्षरी दोन कोटी शहात्तर लाख तेवीस हजार तिनशे सोळा मात्र) एवढया खर्चाकरीता 'अ' अंदाजपत्रक भाग–१ क ४ **(7)** 'नविन रस्ते सिमेंट कॉक्रिट करणे' या लेखाशिर्षातील उपलब्ध असलेली तरतूद 'अ' अंदाजपत्रक भाग–१ क ५ **(iii)** 'रस्ते दुरुस्ती' या लेखाशिर्षात समायोजन करुन सदर काम करणे आवश्यक आहे. त्याची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

१) 'अ' अंदाजपत्रक भाग–१ क ५ **(iii)** 'रस्ते दुरुस्ती

मध्ये वर्ष २०१६–१७ साठी ठेवलेली एकूण तरतूद :– रु. ५,००,००,०००/–

२) मागील वर्षातील दायित्व वजा जाता शिल्लक राहणारी तरतूद :– रु. निरंक

३) तरतूदीच्या समायोजनासाठी अ' अंदाजपत्रक भाग–१

क ४ **(7)** 'नविन रस्ते सिमेंट कॉक्रिटीकरण करणे' मध्ये

उपलब्ध असलेली तरतूद :– रु.६१,५९,००,०००/–

४) वरील प्रमाणे समायोजन केल्यावर 'अ' अंदाजपत्रक

भाग–१ क ५ **(iii)** 'रस्ते दुरुस्ती या लेखाशिर्षात

उपलब्ध होणारी तरतूद :– रु. २,७६,२३,३१६/–

५) या कामावरील खर्च :– रु. २,७६,२३,३१६/–

६) शिल्लक तरतूद (अनु.क्र.३ मध्ये) :– रु.५८,८२,७६,६८४/–

वरील वाढीव कामाची फेरनिविदा मागविल्यास कामास विलंब होवून वेळेचा अपव्यय होणार आहे. सध्या उल्हासनगर महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक २०१७ ची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. त्यामुळे निवडणूकीची आचारसंहिता जाहिर होण्यापूर्वी करणे आवश्यक आहे. त्यामुळे वर्ष २०१६–१७ मध्ये शहरातील रस्त्यांवरील खड्डे भरण्याकरीता केलेल्या निविदाप्रक्रियेलाच ग्राहय धरुन प्रभाग क्षेत्र निहाय वरील तक्ता क्र.१ मध्ये नमुद असलेल्याच एजन्सीकडून त्यांनी भरलेल्या दराप्रमाणे सदर वाढीव काम करुन घेणेस तसेच सदर मुळ

प्राकलनिय किंमत रुपये ३,३३,५१,४३१/— पेक्षा वाढीव व जादा खर्च रुपये ६,०९,७४,७४७/— एवढया खर्चाचे सुधारीत प्राकलनास मंजूरी मिळणेस तसेच लेखाशिर्षाअंतर्गत करावयाच्या समायोजनास स्थायी समितीकडून मान्यता मिळणेस प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. १०४ अ    दिनांकः— १३/१२/२०१६

सूचकाचे नांव : श्री. विजय पाटील

अनुमोदकाचे नांव : श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार वर्ष २०१६—१७ मध्ये उल्हासनगर शहरातील प्रभाग क्र. १ ते ४ अंतर्गत असलेल्या रस्त्यावरील खड्डेभरणेच्या कामाकरीता लेखाशिर्षाअंतर्गत समायोजन करुन होणा—या वाढीव खर्चास मान्यता देण्याचा प्रस्ताव या कार्यसूचीवरुन वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

यावेळी श्री. जमीर लेंगरेकर हे सभागृहातुन बाहेर गेले. व श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी हे आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ झाले.

महापालिका सचिव :— विषय क्र. ११ वाचुन दाखवितात.

---

⇨ विषय क्र. ११ :— प्रभाग समिती क्र. १ मध्ये शौचालयाची दुरुस्ती करण्याच्या प्राकलनास मान्यता देणे.

---

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—श्री. राम जैसवार या विषयाचे गोषवारे कुठे आहे?

श्री. राम जैसवार, शहर अभियंता:—गोषवारे देतो, दिले आहेत झेरॉक्स काढायला.

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—तुमचे सर्व काम हळुवार आहे. हा वेळोवेळीचा अनुभव आहे.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—यात जरा सांगावे, हे जे चार्ट दिले आहे की महापालिकेने बांधेली एकुण शौचालय ६६ आहेत तर जेव्हा महापालिका बनली तेव्हापासुन ६६ आहे की आजच्या स्थितीतील ६६ आहेत.

श्री. राम जैसवार, शहर अभियंता:—आजच्या स्थितीत.

श्री. जितु चोईथानी, उप अभियंता:—यामध्ये आजची स्थिती आहे.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—तसेच ४० शौचालय जी आहेत, उत्तर कोण देणार? आपण देणार की श्री. जितु देतील, त्यांनेच उभे राहावे. ठिक आहे, आता यामध्ये लिहिले आहे की चांगल्या स्थितीतील शौचालय १४ व दुरुस्ती करणारे शौचालय ४०, ४० अधिक १४ किती होतात?

श्री. राम जैसवार, शहर अभियंता:—५४ होतात. यामध्ये महापालिकेने बांधलेले शौचालयापैकी १४ चांगल्या स्थितीतील शौचालय आहेत व ४० शौचालय दुरुस्त करावी लागणार आहेत. तसेच मोडकळीस आलेली व वापरात नसलेली शौचालय १२ आहेत.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—५४ आहेत तर मग जी ६६ आहेत त्यात १२ शौचालय कोठे गेलीत?

श्री. राम जैसवार, शहर अभियंता:—१२ शौचालय मोडकळीस आलेल्या मध्ये आहे.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—म्हणजे मोडकळीस अवस्थेत / वापरात नसलेली शौचालये (नवीन बांधावी लागणारी शौचालये) १२ आहेत तर मग काय ते दुरुस्त नाही होवु शकत काय?

श्री. राम जैसवार, शहर अभियंता:—ते पुर्ण नविन बनवायचे आहे.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—पुर्ण तोडुन, मग आता आपण त्याचे काय करणार? आता स्वच्छ भारत अभियान चालु आहे. तसेच तेथे जुने शौचालय हे तोडुन पडलेली आहेत. १२ शौचालय अशी आहेत जी दुरुस्त होणार नाहीत. ते तसेच पडुन राहतील, आपण त्यास दुरुस्त करु शकत नाहीत. जर त्या १२ शौचालयाची स्थिती तशीच राहीली तर तेथे घाण राहणार की नाही राहणार? तर बनविण्याआधी १२ शौचालय हटविण्याचा बंदोबस्त करा ना. त्यास हटवुन तेथे कंपाउंड वगैरे बांधुन ठेवा जोपर्यंत बनविण्याचा प्रस्ताव होत नाही, घाण तर हटवा ना. आज आपण ४० शोचालय दुरुस्त करणार १२ शौचालय आपण म्हणता की दुरुस्त

होणारच नाहीत. बरोबर आहे ना, आपला अहवाल सांगत आहे की १२ शौचालय जे दुरुस्त होणार नाहीत. ते असेच पडुन राहणार तर मग आपण तेथे स्वच्छता कशी करणार? स्वच्छ भारत अभियान श्री. मोदीजी यांचे स्वप्न आहे तर त्यास पुर्ण कसे करणार?

<u>श्री. राम जैसवार, शहर अभियंता:—</u>मी आपणांस सांगु इच्छितो की, १२ शौचालय आहेत, त्याचे प्राकलन करायचे आहे. प्रभाग समितीमध्ये जेवढी विस्तुत माहिती आहे ती काढा असा आयुक्त महोदयांचा आदेश आहे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>नविन बनवायचे आहे का?

<u>श्री. राम जैसवार, शहर अभियंता:—</u>हो नविन बांधावी.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>नविन बांधावी लागणारी शौचालय १२ आहेत. तर ते बनवेपर्यंत तेथील घाण काढणार नाहीत काय? तेथे मच्छर, आजार वगैरे पसरत आहे. स्वच्छ भारत मिशनचा जे पहिले चरण आहे, पडलेले, तुटलेले शौचालय आहे, ज्याचे पाणी वाहत आहे तर माझे असे म्हणणे आहे की त्यास त्वरीत हटविले जावे. तर त्यासाठी आपण काही प्रस्ताव टाकलेला नाही. २१ लाख २७ हजार रुपये ४० शौचालय बनविण्यास लागतील आणि १२ शौचालयांची दुर्गंधी, मलबा हटविण्यासाठी व त्यास तारेचे कंपाउंड करण्यासाठी १२ लाख रुपये लागतील. तर काही समजले असते. १२ शौचालयांची घाण तर हटविली नाही, काही थोडे थोडे शौचालय तर बनविले. १२ शौचालय म्हणजे एकुण एक नंबर प्रभाग समितीत २० प्रभाग आहेत, तर प्रत्येक प्रभागात एक सोडुन एक आहेतच. तर कसे होणार काम? तर त्यासाठी पुढे काय उपाययोजना आहे? दुर्गंधी कशी हटविणार? त्यात खर्च नाही. १२ शौचालयांची दुर्गंधी, घाण हटविण्यासाठी २०—२० लाख जरी खर्च केले तरी होईल, अडीच—तीन लाख होतील. तीन तीन लाखात जेसीबी लावुन मलबा वगैरे हटवुन सर्व तोडफोड करुन तार लावुन बांबु लावुन ठेवावे जोपर्यंत दुसरा प्रस्ताव येतो, निदान दुर्गंधी तर हटेल ना.

<u>श्री. राम जैसवार, शहर अभियंता:—</u>हे कंडीशनर करणार.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>तर तोपर्यंत हा प्रस्ताव तसाच पडुन राहणार ना. तोपर्यंत नाहीतर हा प्रस्ताव प्रलंबित ठेवावा लागेल. सर्व एकत्र बनवावे लागतील.

<u>श्री. राम जैसवार, शहर अभियंता:—</u>ठिक आहे. आपण जी सूचना दिली ती प्रस्तावात टाकु. शौचालय तर आवश्यक आहेच ना.

यावेळी श्री. जमीर लेंगरेकर, उप—आयुक्त यांनी सभागृहात पुनः प्रवेश केला व आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ झाले.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>ठिक आहे, हे आवश्यक आहेत. परंतु यामध्ये स्वच्छ भारत अभियनाचा जो विषय आहे तो अडकुन पडला आहे, आपण आता जो विषय आपणला होता हंगणदारी मुक्त करण्याचा तर तो सुध्दा पुर्ण होणार नाही अशाने. शौचालय तुटुन पडलेले असतील तर ते सुध्दा स्वप्न पुर्ण होणार नाही. ३—४ लाख फक्त जास्त खर्च करावा लागेल. यामध्ये आपण त्याचा उल्लेख करावयास पाहिजे होता. १२ शौचालय जी बनणार नाहीत, रिपेअर होणार नाहीत, दुर्गंधी हटणार नाही, ५०—२५ हजार एकावर खर्च करणार तर तीन लाख रुपये जास्त खर्च करणार तर संपुर्ण प्रभागाचे कमीत कमी सुधारणा होईल. लहानश्या २—३ लाख खर्चामुळे १२ प्रभागातील कामे कसे करणार,

<u>श्री. राम जैसवार, शहर अभियंता:—</u>एकुण ८३ मोडकळीस आलेले शौचालय आहेत. एका प्रभागामध्ये १२ शौचालये आहेत.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>अहवाल तर १२ शौचालयांचा आपण दिला आहे ना. एकाच प्रभागाचे म्हणत आहे ना, एक प्रभागात १२ शौचालय अशी आहेत जी दुरुस्त नाही होवु शकत. ज्याचे आपण अहवाल देतात ती तुटलेली शौचालय दुरुस्त होवु शकणार नाहीत, ज्याचा वापर नाही, तर लोक तेथे जावुन कचरा टाकतात. कचरा टाकल्यामुळे श्री. केणी सुध्दा त्रस्त होतात त्यांना सारखे फोन येतात, तर त्यांचा त्रास आपण दुर केला नाही. काम वाढविले ते तर केले पाहिजे ना आपण कमीत कमी. १२ शौचालयाचा मलबा हटविण्यासाठी २५—३० लाख रुपये खर्च झाले असते. तर आपण यामध्ये असा प्रस्ताव तयार करावा की ज्यामध्ये आपण १२ शौचालय दाखविले आहेत तर तेथिल दुर्गंधी हटविण्यासाठी तेथे स्वच्छ करण्यासाठी, तेथे मार्किंग करण्यासाठी ४—५ लाखाचे प्राकलन बनविण्यात यावे, प्रत्येक प्रभागात तर आपणाकडे यासाठी १८ लाख ५२ हजार उरलेले आहेत. तर याच निधीतुन आपण घ्या, चारही प्रभाग समितीत. प्रत्येक मध्ये पहा १२, २ नंबर येथे २४, ३ नंबरमध्ये १३, ४ नंबरमध्ये १६ तर असे भरपुर झाले आपणाकडे. असे ६३ शौचालय झाले आहेत. तर लावा १८ लाखाचा निधी. आपण गोषवा—यात तर विस्तृतपणे दिलेच नाही की ४० शौचालयाचे काय करणार ते. ते ४० शौचालयात कोणकोणते आपण दुरुस्त करणार आहात. माझ्या डोक्यात असे आहे की माझ्या प्रभागातील २४० होतील, त्याबाबत मी पत्र सुध्दा दिले आहे. व महासभेमध्ये सुध्दा मुद्दा उचलला होता. ४० शौचालयाची यादी आहे का आपणाकडे आम्हांस यादी तर मिळाली पाहिजे ना.

<u>श्री. राम जैसवार, शहर अभियंता:—</u>माझ्याकडे यादी आहे.

<u>सदस्या श्रीमती अंजली साळवे:—</u>आम्हांला यादी मिळाली पाहिजे ना. आमच्या प्रभागात कोणते आहे ते आम्हांस माहित पडले पाहिजे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>आम्हांस यादी कधी देणार?

<u>श्री. राम जैसवार, शहर अभियंता:—</u>उदया देतो.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>प्रत्येक सदस्यास यादी दया जेवढे काही नगरसेवक आहेत तेवढे सर्वांना, ७८ सदस्यांना.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u>१६ सदस्यांना आताची जी यादी आहे ती दया. जे जे सदस्य उपस्थित आहेत त्यांना दया आणि बाकी नगरसेवकांना नंतर पाठुवन दया.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>आणि माझी अशी सूचना आहे, हे चारींचे एकच निविदा काढली आणि त्याचबरोबर त्या १८ लाखाचे प्राकलनही बनवितो, ५२ हजार शिल्लक ठेवुन, मलबा दुर्गंधी हटविण्याचे चारही प्रभाग समितीचे केले, याबाबत एकच निविदा काढली तर मला वाटते चांगले होईल. आपण काय केले आहे ४० शौचालय दुरुस्त करण्यासाठी आपण एकच बाकी शौचालय दुरुस्त करण्यासाठी ५० हजार ठेवले आहेत. त्यात कोणाचे दरवाजे लागतील, कोणाची इतर दुरुस्ती असेल तर ५० हजारात ते काम करायचे आहे. एक चांगला ठेकेदार असेल तर तोच काम करु शकेल. बाकी २ लाखाचे प्राकलन बनवितो तर काही दुरुस्ती होणार नाही.

<u>श्री. राम जैसवार, शहर अभियंता:–</u>शौचालयाचे लवकरात लवकर काम झाले पाहिजे तरच लवकर काम होईल. एकटा माणुस काही करु शकणार नाही. जे काही येतील ती आताची परिस्थिती पाहुन करावे लागेल. एकत्र प्राकलनासाठी वेळ जाईल, हे काम लवकरात लवकर झाले पाहिजे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>मग दोन करायचे काय, कॅम्प नं. १ व २ सोबत.

<u>श्री. राम जैसवार, शहर अभियंता:–</u>असे करणार तरी वेळ जाईल.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>किती दिवसाची नोटिस देणार? जेवढे होवु शकेल, कमीत कमी कालावधीत आपल्या नियमावलीत बसेल तशी शाश्वती देवुन कॅम्प नं. १ व २ प्रभाग समितीस जोडुन व कॅम्प ३ व ४ जोडुन असे दोन निविदा काढा.

<u>महापालिका सचिव :–</u>गोषवारा वेगवेगळा आहेम.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u>महोदया, गोषवारा वेगळा असला तरीही, स्थायी समितीच्या सदस्यांचे असे म्हणणे आहे की, कॅम्प नं. १ व २ असे जोडा.

<u>महापालिका सचिव :–</u>सर्व गोषवा–यात लिहिले आहे. मला तर वेगवेगळे ठराव बनवावे लागतील ना.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u>१–२ नाही घेणार, महोदया तसे ठरावात नमुद करा ना.

<u>महापालिका सचिव :—</u>प्रत्येक ठरावात नमुद करावे लागेल. हे बरोबर नाही वाटत. ठरावात कसे लिहिणार १ आणि २ नमुद करा.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>असे नाही होवु शकत का?

<u>महापालिका सचिव :—</u>नाही, असे कसे होईल? त्यास वेगवेगळे नंबर लागतील ना.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>तर चारही वेगवेगळे करा.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>मागील वेळेस सुध्दा असा प्रस्ताव आला होता.

<u>महापालिका सचिव:—</u>हो तो एकच होता ना, हे वेगवेगळे चार गोषवारे आहेत.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>ती ४० ची यादी दाखवा.

<u>सदस्या श्रीमती अंजली साळवे:—</u>जे तोडायचे आहे जे वापरात नाहीत त्याचे काय करायचे?

<u>श्री. राम जैसवार, शहर अभियंता:—</u>नविन बनवायचे आहे. नियमाचे १० टक्के करु शकतो ना.

<u>सदस्या श्रीमती लिलाबाई आशान :—</u>जे वापरात नाही ते दुरुस्त करा.

<u>श्री. राम जैसवार, शहर अभियंता:—</u>आम्ही ४० पकडले आहे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>६ दिवसात परत सभा ठेवा.

<u>श्री. राम जैसवार, शहर अभियंता:—</u>वेगवेगळया प्रक्रिया आहेत. निविदा वेगवेगळया आहेत. आम्हांस परत करावे लागेल.

<u>महापालिका सचिव :—</u>सदस्यांची यादी घेवुन तसे करावे.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>श्री. जैसवार साहेब,तुम्ही पाटोल्समध्ये करतांना गोषवारा एकच आणला. प्रभाग समिती क्र. १,२,३,४ करुन. पाटोल्सचा एकच आणला आणि याचे वेगवेगळे गोषवारे का नाही आणले? मी म्हणतो यात घाई न करता एकत्र आणा. व पुन्हा सर्व नगरसेवकांची यादी घेवुन ही सभा आपण शनिवारी लावुन.

<u>सदस्या श्रीमती लिलाबाई आशान :—</u>मी नाही आहे शनिवारी.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>मग सोमवारी ठेवु या.

<u>श्री. राम जैसवार, शहर अभियंता:—</u>पण आता कसे करणार? वेळ जाईल. निविदा वेगवेगळया काढाव्या लागतील.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>पाटोल्समध्ये कसे आणाला वेगळा गोषवारा? त्यात चारही समित्या वेगळया आहेत ना?

<u>श्री. राम जैसवार, शहर अभियंता:—</u>साहेब, हे एकत्र नाही होवु शकत. ते वेगवेगळे आहेत. यास फक्त तुम्हांला पारीत करायचे आहे. निविदा वेगळी आहे.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>ठिक आहे, सदस्यांचे काही आहे की नाही ते तर पहा.

<u>सदस्या डॉ. निना नाथानी:—</u>आपण हे वेगवेगळे करत आहात व सभा जर स्थगित करत आहात तर काय सदस्य वेगवेगळे संचिका तपासत बसले काय? असा एक एक सदस्यास संचिका पाहायला वेळ जाईल ना? त्यापेक्षा आपण आम्हांस प्रत दया आम्ही तपासुन पाहु. आता जे बसले आहेत ते ठिक आहे परंतु जे बसले नाही त्यांचे काय?

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>हो बरोबर आहे. त्यात अशी अडचण आहे की आचारसंहिता जी लागणार आहे त्यात आता ७ दिवस, ८ दिवस जे आहेत ना तर त्यात निविदा मागविण्यासाठी १५ दिवसाचा वेळ देवुन, ते खोलुन नंतर आपल्याकडे आल्यानंतर त्यांना वर्क ऑर्डर देणे वगैरेला वेळ लागेल तर काम होईल.

<u>सदस्या डॉ. निना नाथानी :—</u>मग शुक्रवारी सभा ठेवा, सोमवार पर्यंत का घेवुन जाता?

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>हो आजच करुन टाकु या.

<u>श्री. राम जैसवार, शहर अभियंता:—</u>निविदेस वेळ जातो.

<u>सदस्या डॉ. निना नाथानी :–</u>श्री. जैसवारजी जर सिस्टमेटीक आणले असते तर ही अडचणच नसती आली ना? सिस्टमेटीक नाही आहे म्हणुनच तर सर्व बोलत आहेत. आता मी सुध्दा चेक करणार, त्यांनी चेक केले त्यांना नाही मिळाले. सर्वांना तर तीच अडचण आली ना?

<u>सदस्या श्रीमती अंजली साळवे:–</u>जे शौचालय वापरात नाही तर त्यांना पाडायचे आहे अशी लोकांची मागणी आहे.

<u>श्री. राम जैसवार, शहर अभियंता:–</u>त्यामध्ये १–२ च आहेत, एकदम खराब नाहीत.

<u>सदस्या श्रीमती अंजली साळवे:–</u>जेथे दरवाजे नाहीत, ओपन आहेत ते सर्व बसवुन घ्याला पाहिजे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>हे जे विषय आलेले आहेत त्यात सर्वांना एकत्र घेत आहोत. वेगवेगळया प्रभाग समिती ज्या आहेत, तर यामध्ये जे आपण १२ शौचालय जी दाखविली आहेत. ते बनणार नाहीत तर आमची विनंती आहे की प्रभाग समितीत जे ६३ शौचालये आहेत त्यामध्ये जे बंद पडले आहेत, ते दुरुस्त सुध्दा होणार नाहीत, त्याचा मलबा काढण्यासाठी आपण एक प्राकलन तयार करावे. व लवकरात लवकर ६ दिवसाच्या आत येथे आणण्यात यावे. तेथे तार बांधुन सुरक्षित ठेवावे जेणेकरुन ती जागा कोणी हडप करु शकणार नाही. तसेच १८ लाखाचा जो निधी उरला आहे तर तसे आपण ठरावात टाकावे की हा १८ लाखाचा निधी दुसरीकडे कोठे वापरायचा नाही. त्याचा येथेच वापर करावा नाहीतर पडुन राहु दया. तर त्या १८ लाखाचे चारही प्रभागाचे ४–४ लाखाचे बनवुन आणावेत.

<u>श्री. राम जैसवार, शहर अभियंता:–</u>त्यात डिस्क मेंटेन करुन वायर टाकु.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी</u> :–१३ शौचालय जे आहेत ते दुरुस्त होवु शकत नाही म्हणुन त्याचा मलबा हटविण्यासाठी ४–५ लाखाचे प्राकलन तयार करण्यात यावे. सर्वात असे टाकुन दया.

<u>सदस्या श्रीमती अंजली साळवे :–</u>होय तोडुन मलबा हटविणे.

<u>महापालिका सचिव :–</u>ठिक आहे, ठरावात टाकते, उर्वरीत निधी शौचालयाच्या दुरुस्तीसाठी आणावा.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी</u> :–तोडफोड करण्यासाठी मलबा हटविण्यासाठी असे टाकावे.

<u>सदस्या श्रीमती अंजली साळवे :–</u>मोडकळीस आलेले शौचालय तोडणे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>चारही वेगवेगळे पारीत करा. इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता हे ठराव पारीत करा. आता आमचे काम करा आम्ही तुमचे काम करुन दिले.

<u>सदस्या श्रीमती अंजली साळवे :—</u>शैचालयाच्या दुरुस्तीचे काय?

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>श्री. जैसवारजी, ही निविदा कधी निघेल? चला ठिक आहे, इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता आम्ही पारीत करु. उदया सकाळी ठरावाची प्रत तर आपणांस मिळुन जाईल. आपणांस नंबर दिला जाईल, १२—१.०० वाजेपर्यंत मिळेल. तर निविदा किती दिवसात होईल?

<u>श्री. राम जैसवार, शहर अभियंता:—</u>३ दिवसात करु.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>३ दिवसात जाईल. कुठल्या अधिका—यास काही अडचण आहे का सही करायला ते सुध्दा सांगा आता. कारण आता आचारसंहिता लागणार आहे. आता आम्हां सदस्यांची जी परिस्थिती आहे ती एकदम खराब आहे. आणि आपण कुठला निधी सूध्दा दिलेला नाही. परत हे जे आपण करत आहात ते झाले पाहिजे. कमीत कमी शौचालय जर दुरुस्त झाले तर नगरसेवकांना म्हणता तरी येईल की शौचालयांची दुरुस्ती केली आहे. यास कमीत कमी वेळ दयावा. ७ दिवस, ४ दिवस, ५ दिवस, जो कमीत कमी वेळ असेल तो देवुन लवकर करण्यात यावा.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी::—</u>साहेब, हे जे १८ लाख रुपये उरले आहेत, शौचालयातील मलबा हटविण्यासाठी तर त्याचे सुध्दा चारही प्रभाग समितीचे प्राकलन तयार करण्यात यावे. लोकेशन टाकुन ५—५ लाखाचे त्वरीत बनविण्यात यावे. प्रत्येक प्रभाग समितीत जे हटविणे लायक आहेत, १०—१२ आहेत.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>त्यांचे एवढेच म्हणणे आहे की स्वच्छ भारत अभियनाबाबत आपण जो कॅटेरिया लावतो आणि ज्याप्रमाणे आदेश मा. पंतप्रधान महादेयांनी दिलेले आहेत. त्या अनुषंगाने जे मोडकळीस आलेले शौचालय नादुरुस्त असतील, त्याचे निष्कासन लवकरात लवकर नगरसेवकांच्या पत्राची वाट न पाहता करा. जर तुम्हांला आवश्यक वाटत असेल तर. हे प्रशासनाने लक्षात घ्या.

<u>श्री. राम जैसवार, शहर अभियंता:—</u>१२ शौचालय आहेत.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>आपण एक एक प्रभागाचे १२ आहेत असे म्हणत आहात

<u>महापालिका सचिव :—</u>ज्या ज्या प्रभागाचे आहे तसा आदेश दया. त्या त्या प्रभागाचे त्या त्या प्रभागात येईल.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>जे बनण्यालायक नाहीत त्याचे काय?

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>यात असे होईल की जे बनण्यालयक नाहीत जरा साहेबांना सांगावे.

<u>श्री. राम जैसवार, शहर अभियंता:—</u>त्यास दुरुस्त करणार तर जास्त खर्च होईल. १—२ चालु स्थितीत आहेत. कोठे कोठे स्लॅब कोसळले आहे. आम्ही जास्तीत जास्त प्रयत्न करु.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>असे पण त्यास बनविण्याची गरजच नाही ना, बंदच आहेत ना, पाच पाच, दहा दहा वर्ष झाली.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>आपण निष्कासन करुन जर क्लीअर करतो तर तेथे सीसी पॅसेज बनविला पाहिजे, कंपाउंड वॉल झाले पाहिजे की जेणेकरुन त्यास कोणी हडक करता कामा नये.

<u>महापालिका सचिव :—</u>नाही, नाही सीसी पॅसेज बनविण्यासाठी तसा प्रस्ताव होईल.

<u>सदस्या श्रीमती अंजली साळवे :—</u>शौचालयाचे मेंटेनन्सचे काही तरी एक ठरवा. त्यादिवशी विषय झाला ना महासभेत, मेंटेन कोणी करायचे?

<u>सदस्या श्रीमती लिलाबाई आशान:—</u>जे चालु आहे ते सोडुन जे तुटले आहे ते दुरुस्त करावे. कोणाचे भांडे तुटले आहे, कोठे लाईट नाही. ते दुरुस्त करा.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>त्याकरीताच हा विषय घेतला आहे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>साहेब, यामध्ये लाईटचे घेतले नसेल ना? पाण्याचे काय?

<u>सदस्या श्रीमती अंजली साळवे :—</u>कोणाच्या अंडर मेंटेनन्स आहे म्हणजे आम्ही त्यास संपर्क करु.

<u>श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक:—</u>लाईट चा व इतर मेंटेनन्सचा खर्च सार्वजनिक बांधकाम विभाग करतो.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>पाण्याची सोय पाहिजे. शौचालयाला जाणारी व्यक्ती जी आहे ना त्याने कमीत कमी ४—५ लिटरचा डब्बा तरी नेला पाहिजे. आणि आपण पाण्याची सोय न केल्यामुळे, तो व्यक्ती जर एक लिटरचा डब्बा नेत असेल तर शौचालय साफ होत नाही.

<u>सदस्या श्रीमती लिलाबाई आशान:—</u>पाण्याची टाकी असली पाहिजे ना.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>आता आपणाकडे जे स्टेशनजवळ जे शौचालय बांधायचे आहे ना ते त्यासाठीच थांबले आहे की पाण्याची सोय नाही, टाकी नाही.  शौचालय बनविले आहे ४ शिटचे, तेथे पाण्याची सोय असेल,पाण्याची टाकी असेल तरच चालु करायचे नाहीतर नाही. हे आता आपणच ठरवायला पाहिजे, नगरसेवकांनीच ठरवायला पाहिजे. आपण त्यांना पत्र देतो, नविन बनविण्यासाठी सांगतो, त्यासाठी संपुर्ण तयारी केली पाहिजे व साफ झाले पाहिजे. ठिक आहे.

<u>सदस्या श्रीमती अंजली साळवे:—</u>कोणाकडे मेंटेनन्स आहे सार्वजनिक बांधकाम विभागाकडे?

<u>श्री. राम जैसवार, शहर अभियंता:—</u>होय.

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>हे सर्व ठराव इतिवृत्त कायम होण्याचाी वाट न पाहता ठराव पारीत करावा.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑**विषय क्र. ११** :— प्रभाग समिती क्र. १ मध्ये शौचालयाची दुरुस्ती करण्याच्या प्राकलनास मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर शहरामध्ये महापालिकेने बांधलेले तसेच एम.एम.आर.डी.ए. तर्फे राबविलेल्या निर्मल एम.एम.आर.योजनेअंतर्गत बांधलेले शौचालये अस्तित्वात आहेत. ही शौचालये साधारणत: पाच वर्षापूर्वीची बांधलेली असल्याने या शौचालयांमध्ये किरकोळ दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

देशातील सर्व शहरे पूर्णपणे स्वच्छ, निरोगी आणि राहण्यायोग्य करणे, शहरातील गरीब आणि महिलांच्या आरोग्य विषयक व स्वच्छताविषयक बाबींकडे विशेष लक्ष केंद्रीत करुन सर्व नागरीकांना स्वच्छ व चांगले आरोग्य आणि पर्यावरण मिळावे तसेच देशातील सर्व सांविधानिक शहरांना स्वच्छतेची सुविधा उपलब्ध करुन देणे या उद्‌देशाने केंद्र शासनानेही ''स्वच्छ भारत अभियान (नागरी)'' ची अंमलबजावणी सुरु केली आहे.

या अभियानाच्या धर्तीवर तसेच उल्हासनगर शहरातील नागरीकांच्या निरोगी आरोग्याकरीता प्रभाग क्षेत्र क्र.१ अंतर्गत असलेल्या खराब व बिकट अवस्थेत असलेल्या शौचालयांची दुरुस्ती करणेचा खालीलप्रमाणे प्रस्ताव तयार करण्यात आला आहे.

| अ.क्र. | प्रभाग क्षेत्र क्र. | महापालिकेने बांधलेली एकूण शौचालये | चांगल्या स्थितीतील शौचालय | दुरुस्ती करावी लागणारी शौचालये | मोडकळीस अवस्थेत / वापरात नसलेली शौचालये (नवीन बांधावी लागणारी शौचालये) | एम.एम. आर.डी. ए.तर्फे बांधलेली एकूण शौचालये | चांगल्या स्थितीतील शौचालय | दुरुस्ती करावी लागणारी शौचालये | नदुरुस्त शौचालयांची दुरुस्ती करण्याकरीता तयार करण्यात आलेल्या शौचालयांची प्राकलनिय किंमत | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | **प्रभाग क्र. १** | ६६ | १४ | ४० | १२ | ३८ | १८ | १५ | रु.२१,२७,९७५/— | एम.एम. आर.डी.ए.ची ०५ शौचालये बंद आहेत |

सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रभाग क्षेत्र क्र.१ ते ४ अंतर्गत असलेली शौचालये दुरुस्ती करणेचा एकूण रु.९९,४७,६६६/— एवढया रक्कमेचा प्रभाग क्षेत्र निहाय प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. वर्ष २०१६—१७ च्या महापालिकेच्या अर्थसंकल्पातील 'ड' जल निस:रण खाते मध्ये 'सार्वजनिक शौचालय व मुताऱ्या दुरुस्ती' **(ii)** या लेखाशिर्षात एकूण रु.७५,००,०००/— एवढी तरतूद उपलब्ध आहे. सदर तरतुद शौचालय दुरुस्तीच्या एकूण रु.९९,४७,६६६/— एवढया रक्कमेपेक्षा कमी आहे. तथापी, 'ड' जल निस:रण खाते मध्ये 'दुर्बल घटक वसाहतीत शौचालय मुताऱ्या नाले, गटार व कल्व्हर्ट इत्यादी खर्च'' **(iii)** या लेखाशिर्षात रु.४३,००,०००/— एवढी रक्कम शिल्लक आहे.

शहरातील सर्वच भागातील शौचालयांची दुरुस्ती करावयाची असल्याने 'सार्वजनिक शौचालय व मुताऱ्या दुरुस्ती' **(ii)** या लेखाशिर्षातील एकूण रु.७५,००,०००/— या उपलब्ध तरतूदीत 'दुर्बल घटक वसाहतीत शौचालय मुताऱ्या नाले, गटार व कल्व्हर्ट इत्यादी खर्च'' **(iii)** या लेखाशिर्षातील रु.४३,००,०००/— एवढी उपलब्ध रक्कम समायोजित केल्यास सदर कामाकरीता एकूण रु.१,१८,००,०००/— एवढी रक्कम उपलब्ध होवू शकते. त्याची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

१) 'ड' जल निस:रण खाते मधील 'सार्वजनिक शौचालय व मुताऱ्या दुरुस्ती' **(ii)** मध्ये वर्ष २०१६—१७ साठी ठेवलेली एकूण उपलब्ध तरतूद :— रु. ७५,००,०००/—

२) 'दुर्बल घटक वसाहतीत शौचालय मुताऱ्या नाले, गटार व कल्व्हर्ट इत्यादी खर्च'' **(iii)** मध्ये वर्ष २०१६—१७ साठी ठेवलेली एकूण तरतूद :— रु. ५०,००,०००/—

३) वरील अनु.क्र.२ मध्ये मागील वर्षातील दायित्व वजा जाता शिल्लक राहणारी तरतूद :— रु. ४३,००,०००/—

४) वरील अनु.क्र.१ मध्ये अनु.क्र.२ समायोजित केल्यास उपलब्ध होणारी रक्कम :— रु. १,१८,००,०००/—

५) प्रभाग क्षेत्र क्र.१ मधील शौचालय दुरुस्ती करणे या कामावरील खर्च :— रु. २१,२७,९७५/—

६) अनु.क्र.१ मध्ये शिल्लक राहणारी तरतूद :— रु. ९६,७२,०२५/—

तरी वरीलप्रमाणे लेखाशिर्षाअंतर्गत करावयाच्या समायोजनास तसेच प्रभाग क्षेत्र क्र. १ अंतर्गत असलेल्या शौचालयांची दुरुस्ती करणेच्या कामाचे रु.२१,२७,९७५/— एवढया रक्कमेच्या प्राकलनास मान्यता मिळून कामाची निविदा प्रक्रिया करणेकरीता मा.स्थायी समितीची मान्यता मिळणेस्तव प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. १०५ दिनांकः— १३/१२/२०१६

सूचकाचे नांव : श्री. विजय पाटील

अनुमोदकाचे नांव : श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार प्रभाग समिती क्र. १ मध्ये शौचालयाची दुरुस्ती करणेच्या कामाचे रु.२१,२७,९७५/— एवढया रक्कमेच्या प्राकलनास मान्यता देवुन कामाची निविदा प्रक्रिया करणेस मान्यता देत आहे.

तसेच

उर्वरीत निधी मोडकळीस अवस्थेत / वापरात नसलेली १२ शौचालयासाठी वापरण्यात यावा व तसा प्रस्ताव लवकरात लवकर आणण्यात यावा.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. १२ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. १२ :— प्रभाग समिती क्र. २ मध्ये शौचालयाची दुरुस्ती करण्याच्या प्राकलनास मान्यता देणे.

काही सदस्य :—पास—पास......

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑विषय क्र. १२ :— प्रभाग समिती क्र. २ मध्ये शौचालयाची दुरुस्ती करण्याच्या प्राकलनास मान्यता देणे.

प्रस्तावना

उल्हासनगर शहरामध्ये महापालिकेने बांधलेले तसेच एम.एम.आर.डी.ए. तर्फे राबविलेल्या निर्मल एम.एम.आर.योजनेअंतर्गत बांधलेले शौचालये अस्तित्वात आहेत. ही शौचालये साधारणत: पाच वर्षापूर्वीची बांधलेली असल्याने या शौचालयांमध्ये किरकोळ दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

देशातील सर्व शहरे पूर्णपणे स्वच्छ, निरोगी आणि राहण्यायोग्य करणे, शहरातील गरीब आणि महिलांच्या आरोग्य विषयक व स्वच्छताविषयक बाबींकडे विशेष लक्ष केंद्रीत करुन सर्व नागरीकांना स्वच्छ व चांगले आरोग्य आणि पर्यावरण मिळावे तसेच देशातील सर्व सांविधानिक शहरांना स्वच्छतेची सुविधा उपलब्ध करुन देणे या उद्देशाने केंद्र शासनानेही ''स्वच्छ भारत अभियान (नागरी)'' ची अंमलबजावणी सुरु केली आहे.

या अभियानाच्या धर्तीवर तसेच उल्हासनगर शहरातील नागरीकांच्या निरोगी आरोग्याकरीता प्रभाग क्षेत्र क्र.२ अंतर्गत असलेल्या खराब व बिकट अवस्थेत असलेल्या शौचालयांची दुरुस्ती करणेचा खालीलप्रमाणे प्रस्ताव तयार करण्यात आला आहे.

| अ.क्र. | प्रभाग क्षेत्र क्र. | महापालिकेने बांधलेली एकूण शौचालये | चांगल्या स्थितीतील शौचालय | दुरुस्ती करावी लागणारी शौचालये | मोडकळीस अवस्थेत / वापरात नसलेली शौचालये (नवीन बांधावी लागणारी शौचालये) | एम.एम. आर.डी. ए.तर्फे बांधलेली एकूण शौचालये | चांगल्या स्थितीतील शौचालय | दुरुस्ती करावी लागणारी शौचालये | नदुरुस्त शौचालयांची दुरुस्ती करण्याकरीता तयार करण्यात आलेल्या शौचालयांची प्राकलनिय किंमत | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | प्रभाग क्षेत्र क्र.२ | ८० | २४ | ३२ | २४ | ३० | — | २७ | रु.२१,००,५१६/— | एम.एम.आर. डी.ए.ची ०३ शौचालये बंद आहेत |

सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रभाग क्षेत्र क्र.१ ते ४ अंतर्गत असलेली शौचालये दुरुस्ती करणेचा एकूण रु.९९,४७,६६६/— एवढया रक्कमेचा प्रभाग क्षेत्र निहाय प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. वर्ष २०१६—१७ च्या महापालिकेच्या अर्थसंकल्पातील 'ड' जल निस:रण खाते मध्ये 'सार्वजनिक शौचालय व मुताऱ्या दुरुस्ती' (ii) या लेखाशिर्षात एकूण रु.७५,००,०००/— एवढी तरतूद उपलब्ध आहे. सदर तरतुद शौचालय दुरुस्तीच्या एकूण रु.९९,४७,६६६/— एवढया रक्कमेपेक्षा कमी आहे. तथापी, 'ड' जल

निस:रण खाते मध्ये 'दुर्बल घटक वसाहतीत शौचालय मुताऱ्या नाले, गटार व कल्व्हर्ट इत्यादी खर्च'' **(iii)** या लेखाशिर्षात रु.४३,००,०००/— एवढी रक्कम शिल्लक आहे.

शहरातील सर्वच भागातील शौचालयांची दुरुस्ती करावयाची असल्याने 'सार्वजनिक शौचालय व मुताऱ्या दुरुस्ती' **(ii)** या लेखाशिर्षातील एकूण रु.७५,००,०००/— या उपलब्ध तरतूदीत 'दुर्बल घटक वसाहतीत शौचालय मुताऱ्या नाले, गटार व कल्व्हर्ट इत्यादी खर्च'' **(iii)** या लेखाशिर्षातील रु.४३,००,०००/— एवढी उपलब्ध रक्कम समायोजित केल्यास सदर कामाकरीता एकूण रु.१,१८,००,०००/— एवढी रक्कम उपलब्ध होवू शकते. त्याची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) 'ड' जल निस:रण खाते मधील 'सार्वजनिक शौचालय व मुताऱ्या दुरुस्ती' **(ii)** मध्ये वर्ष २०१६–१७ साठी ठेवलेली एकूण उपलब्ध तरतूद | :— | रु. ७५,००,०००/— |
| २) 'दुर्बल घटक वसाहतीत शौचालय मुताऱ्या नाले, गटार व कल्व्हर्ट इत्यादी खर्च'' **(iii)** मध्ये वर्ष २०१६–१७ साठी ठेवलेली एकूण तरतूद | :— | रु. ५०,००,०००/— |
| ३) वरील अनु.क्र.२ मध्ये मागील वर्षातील दायित्व वजा जाता शिल्लक राहणारी तरतूद | :— | रु. ४३,००,०००/— |
| ४) वरील अनु.क्र.१ मध्ये अनु.क्र.२ समायोजित केल्यास उपलब्ध होणारी रक्कम | :— | रु. १,१८,००,०००/— |
| ५) प्रभाग क्षेत्र क्र.१ मधील शौचालय दुरुस्ती करणेचा खर्च वजा जाता शिल्लक राहणारी तरतूद | :— | रु. ९६,७२,०२५/— |
| ६) प्रभाग क्षेत्र क्र.२ मधील शौचालय दुरुस्ती करणे या कामावरील खर्च | :— | रु. २१,००,५१६/— |
| ७) अनु.क्र.१ मध्ये शिल्लक राहणारी तरतूद | :— | रु. ७५,७१,५०९/— |

तरी वरीलप्रमाणे लेखाशिर्षाअंतर्गत करावयाच्या समायोजनास तसेच प्रभाग क्षेत्र क्र.१ अंतर्गत असलेल्या शौचालयांची दुरुस्ती करणेच्या कामाचे रु.२१,००,५१६/— एवढया रक्कमेच्या प्राकलनास मान्यता मिळून कामाची निविदा प्रक्रिया करणेकरीता मा.स्थायी समितीची मान्यता मिळणेस्तव प्रस्तावित.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> १०६      <u>दिनांक:— १३/१२/२०१६</u>

सूचकाचे नांव : श्री. विजय पाटील

अनुमोदकाचे नांव : श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार प्रभाग समिती क्र. २ मध्ये शौचालयाची दुरुस्ती करणेच्या कामाचे रु.२१,००,५१६/—एवढया रक्कमेच्या प्राकलनास मान्यता देवुन कामाची निविदा प्रक्रिया करणेस मान्यता देत आहे.

तसेच

उर्वरीत निधी मोडकळीस अवस्थेत / वापरात नसलेली २४ शौचालयासाठी वापरण्यात यावा व तसा प्रस्ताव लवकरात लवकर आणण्यात यावा.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. १३ वाचुन दाखवितात

————————————————————————————————————————————

⇨ **विषय क्र. १३ :—** प्रभाग समिती क्र. ३ मध्ये शौचालयाची दुरुस्ती करण्याच्या प्राकलनास मान्यता देणे.

————————————————————————————————————————————

काही सदस्य :—पास—पास……

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १३ :—** प्रभाग समिती क्र. ३ मध्ये शौचालयाची दुरुस्ती करण्याच्या प्राकलनास मान्यता देणे.

प्रस्तावना

उल्हासनगर शहरामध्ये महापालिकेने बांधलेले तसेच एम.एम.आर.डी.ए. तर्फे राबविलेल्या निर्मल एम.एम.आर.योजनेअंतर्गत बांधलेले शौचालये अस्तित्वात आहेत. ही शौचालये साधारणत: पाच वर्षापूर्वीची बांधलेली असल्याने या शौचालयांमध्ये किरकोळ दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

देशातील सर्व शहरे पूर्णपणे स्वच्छ, निरोगी आणि राहण्यायोग्य करणे, शहरातील गरीब आणि महिलांच्या आरोग्य विषयक व स्वच्छताविषयक बाबींकडे विशेष लक्ष केंद्रीत करुन सर्व नागरीकांना स्वच्छ व चांगले आरोग्य आणि पर्यावरण मिळावे तसेच देशातील सर्व सांविधानिक शहरांना स्वच्छतेची सुविधा

उपलब्ध करुन देणे या उद्‌देशाने केंद्र शासनानेही ''स्वच्छ भारत अभियान (नागरी)'' ची अंमलबजावणी सुरु केली आहे.

या अभियानाच्या धर्तीवर तसेच उल्हासनगर शहरातील नागरीकांच्या निरोगी आरोग्याकरीता प्रभाग क्षेत्र क्र.३ अंतर्गत असलेल्या खराब व बिकट अवस्थेत असलेल्या शौचालयांची दुरुस्ती करणेचा खालीलप्रमाणे प्रस्ताव तयार करण्यात आला आहे.

| अ.क्र. | प्रभाग क्षेत्र क्र. | महापालिकेने बांधलेली एकूण शौचालये | चांगल्या स्थितीतील शौचालय | दुरुस्ती करावी लागणारी शौचालये | मोडकळीस अवस्थेत / वापरात नसलेली शौचालये (नवीन बांधावी लागणारी शौचालये) | एम.एम.आर.डी.ए.तर्फे बांधलेली एकूण शौचालये | चांगल्या स्थितीतील शौचालय | दुरुस्ती करावी लागणारी शौचालये | नदुरुस्त शौचालयांची दुरुस्ती करण्याकरीता तयार करण्यात आलेल्या शौचालयांची प्राकलनिय किंमत | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | प्रभाग क्षेत्र क्र.३ | ६८ | १९ | ३६ | १३ | ४४ | २३ | १८ | रु.२७,८६,१७५/– | एम.एम.आर.डी.ए.ची ०३ शौचालये बंद आहेत |

सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रभाग क्षेत्र क्र.१ ते ४ अंतर्गत असलेली शौचालये दुरुस्ती करणेचा एकूण रु.९९,४७,६६६/– एवढया रक्कमेचा प्रभाग क्षेत्र निहाय प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. वर्ष २०१६–१७ च्या महापालिकेच्या अर्थसंकल्पातील 'ड' जल निस:रण खाते मध्ये 'सार्वजनिक शौचालय व मुताऱ्या दुरुस्ती' **(ii)** या लेखाशिर्षात एकूण रु.७५,००,०००/– एवढी तरतूद उपलब्ध आहे. सदर तरतुद शौचालय दुरुस्तीच्या एकूण रु.९९,४७,६६६/– एवढया रक्कमेपेक्षा कमी आहे. तथापी, 'ड' जल निस:रण खाते मध्ये 'दुर्बल घटक वसाहतीत शौचालय मुताऱ्या नाले, गटार व कल्व्हर्ट इत्यादी खर्च'' **(iii)** या लेखाशिर्षात रु.४३,००,०००/– एवढी रक्कम शिल्लक आहे.

शहरातील सर्वच भागातील शौचालयांची दुरुस्ती करावयाची असल्याने 'सार्वजनिक शौचालय व मुताऱ्या दुरुस्ती' **(ii)** या लेखाशिर्षातील एकूण रु.७५,००,०००/– या उपलब्ध तरतूदीत 'दुर्बल घटक वसाहतीत शौचालय मुताऱ्या नाले, गटार व कल्व्हर्ट इत्यादी खर्च'' **(iii)** या लेखाशिर्षातील रु.४३,००,०००/– एवढी उपलब्ध रक्कम समायोजित केल्यास सदर कामाकरीता एकूण रु.१,१८,००,०००/– एवढी रक्कम उपलब्ध होवू शकते. त्याची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

१) 'ड' जल निस:रण खाते मधील 'सार्वजनिक शौचालय व मुताऱ्या दुरुस्ती' **(ii)** मध्ये वर्ष २०१६–१७ साठी ठेवलेली एकूण उपलब्ध तरतूद :— रु. ७५,००,०००/—

२) 'दुर्बल घटक वसाहतीत शौचालय मुताऱ्या नाले, गटार व कल्व्हर्ट इत्यादी खर्च'' **(iii)** मध्ये वर्ष २०१६–१७ साठी ठेवलेली एकूण तरतूद :— रु. ५०,००,०००/—

३) वरील अनु.क्र.२ मध्ये मागील वर्षातील दायित्व वजा जाता शिल्लक राहणारी तरतूद :— रु. ४३,००,०००/—

४) वरील अनु.क्र.१ मध्ये अनु.क्र.२ समायोजित केल्यास उपलब्ध होणारी रक्कम :— रु. १,१८,००,०००/—

५) प्रभाग क्षेत्र क्र.२ मधील शौचालय दुरुस्ती करणेचा खर्च वजा जाता शिल्लक राहणारी तरतूद :— रु. ७५,७१,५०९/—

६) प्रभाग क्षेत्र क्र.३ मधील शौचालय दुरुस्ती करणे या कामावरील खर्च :— रु. २७,८६,१७५/—

७) अनु.क्र.१ मध्ये शिल्लक राहणारी तरतूद :— रु. ४७,८५,३३४/—

तरी वरीलप्रमाणे लेखाशिर्षाअंतर्गत करावयाच्या समायोजनास तसेच प्रभाग क्षेत्र क्र.३ अंतर्गत असलेल्या शौचालयांची दुरुस्ती करणेच्या कामाचे रु.२७,८६,१७५/— एवढया रक्कमेच्या प्राकलनास मान्यता मिळून कामाची निविदा प्रक्रिया करणेकरीता मा.स्थायी समितीची मान्यता मिळणेस्तव प्रस्तावित.

स्थायी समिति ठराव क्र. १०७ दिनांकः— १३/१२/२०१६

सूचकाचे नांव : श्री. विजय पाटील

अनुमोदकाचे नांव : श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार प्रभाग समिती क्र. ३ मध्ये शौचालयाची दुरुस्ती करणेच्या कामाचे रु.२७,८६,१७५/— एवढया रक्कमेच्या प्राकलनास मान्यता देवुन कामाची निविदा प्रक्रिया करणेस मान्यता देत आहे.

तसेच

उर्वरीत निधी मोडकळीस अवस्थेत / वापरात नसलेली १३ शौचालयासाठी वापरण्यात यावा व तसा प्रस्ताव लवकरात लवकर आणण्यात यावा.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. १४ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. १४ :—** प्रभाग समिती क्र. ४ मध्ये शौचालयाची दुरुस्ती करण्याच्या प्राकलनास मान्यता देणे.

---

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. १४ :—** प्रभाग समिती क्र. ४ मध्ये शौचालयाची दुरुस्ती करण्याच्या प्राकलनास मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर शहरामध्ये महापालिकेने बांधलेले तसेच एम.एम.आर.डी.ए. तर्फे राबविलेल्या निर्मल एम.एम.आर.योजनेअंतर्गत बांधलेले शौचालये अस्तित्वात आहेत. ही शौचालये साधारणत: पाच वर्षापूर्वीची बांधलेली असल्याने या शौचालयांमध्ये किरकोळ दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

देशातील सर्व शहरे पूर्णपणे स्वच्छ, निरोगी आणि राहण्यायोग्य करणे, शहरातील गरीब आणि महिलांच्या आरोग्य विषयक व स्वच्छताविषयक बाबींकडे विशेष लक्ष केंद्रीत करुन सर्व नागरीकांना स्वच्छ व चांगले आरोग्य आणि पर्यावरण मिळावे तसेच देशातील सर्व सांविधानिक शहरांना स्वच्छतेची सुविधा उपलब्ध करुन देणे या उद्देशाने केंद्र शासनानेही ''स्वच्छ भारत अभियान (नागरी)'' ची अंमलबजावणी सुरु केली आहे.

या अभियानाच्या धर्तीवर तसेच उल्हासनगर शहरातील नागरीकांच्या निरोगी आरोग्याकरीता प्रभाग क्षेत्र क्र.४ अंतर्गत असलेल्या खराब व बिकट अवस्थेत असलेल्या शौचालयांची दुरुस्ती करणेचा खालीलप्रमाणे प्रस्ताव तयार करण्यात आला आहे.

| अ.क्र. | प्रभाग क्षेत्र क्र. | महापालिकेने बांधलेली एकूण शौचालये | चांगल्या स्थितीतील शौचालय | दुरुस्ती करावी लागणारी शौचालये | मोडकळीस अवस्थेत / वापरात नसलेली शौचालये (नवीन बांधावी लागणारी शौचालये) | एम.एम. आर.डी. ए.तर्फे बांधलेली एकूण शौचालये | चांगल्या स्थितीतील शौचालय | दुरुस्ती करावी लागणारी शौचालये | नदुरुस्त शौचालयांची दुरुस्ती करण्याकरीता तयार करण्यात आलेल्या शौचालयांची प्राकलनिय किंमत | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | प्रभाग क्षेत्र क्र.४ | ४६ | — | ३२ | १४ | ५१ | ३१ | १६ | रु.२९,३३,०००/— | एम.एम.आर. डी.ए.ची ०४ शौचालये बंद आहेत |

सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रभाग क्षेत्र क्र.१ ते ४ अंतर्गत असलेली शौचालये दुरुस्ती करणेचा एकूण रु.९९,४७,६६६/— एवढया रक्कमेचा प्रभाग क्षेत्र निहाय प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. वर्ष २०१६—१७ च्या महापालिकेच्या अर्थसंकल्पातील 'ड' जल निस:रण खाते मध्ये 'सार्वजनिक शौचालय व मुताऱ्या दुरुस्ती' **(ii)** या लेखाशिर्षात एकूण रु.७५,००,०००/— एवढी तरतूद उपलब्ध आहे. सदर तरतुद शौचालय दुरुस्तीच्या एकूण रु.९९,४७,६६६/— एवढया रक्कमेपेक्षा कमी आहे. तथापी, 'ड' जल निस:रण खाते मध्ये 'दुर्बल घटक वसाहतीत शौचालय मुताऱ्या नाले, गटार व कल्व्हर्ट इत्यादी खर्च'' **(iii)** या लेखाशिर्षात रु.४३,००,०००/— एवढी रक्कम शिल्लक आहे.

शहरातील सर्वच भागातील शौचालयांची दुरुस्ती करावयाची असल्याने 'सार्वजनिक शौचालय व मुताऱ्या दुरुस्ती' **(ii)** या लेखाशिर्षातील एकूण रु.७५,००,०००/— या उपलब्ध तरतूदीत 'दुर्बल घटक वसाहतीत शौचालय मुताऱ्या नाले, गटार व कल्व्हर्ट इत्यादी खर्च'' **(iii)** या लेखाशिर्षातील रु.४३,००,०००/— एवढी उपलब्ध रक्कम समायोजित केल्यास सदर कामाकरीता एकूण रु.१,१८,००,०००/— एवढी रक्कम उपलब्ध होवू शकते. त्याची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) 'ड' जल निस:रण खाते मधील 'सार्वजनिक शौचालय व मुताऱ्या दुरुस्ती' **(ii)** मध्ये वर्ष २०१६—१७ साठी ठेवलेली एकूण उपलब्ध तरतूद | :— | रु. ७५,००,०००/— |
| २) 'दुर्बल घटक वसाहतीत शौचालय मुताऱ्या नाले, गटार व कल्व्हर्ट इत्यादी खर्च'' **(iii)** मध्ये वर्ष २०१६—१७ साठी ठेवलेली एकूण तरतूद | :— | रु. ५०,००,०००/— |
| ३) वरील अनु.क्र.२ मध्ये मागील वर्षातील दायित्व वजा जाता शिल्लक राहणारी तरतूद | :— | रु. ४३,००,०००/— |
| ४) वरील अनु.क्र.१ मध्ये अनु.क्र.२ समायोजित केल्यास उपलब्ध होणारी रक्कम | :— | रु. १,१८,००,०००/— |
| ५) प्रभाग क्षेत्र क्र.३ मधील शौचालय दुरुस्ती करणेचा खर्च वजा जाता शिल्लक राहणारी तरतूद | :— | रु. ४७,८५,३३४/— |
| ६) प्रभाग क्षेत्र क्र.४ मधील शौचालय दुरुस्ती करणे या कामावरील खर्च | :— | रु. २९,३३,०००/— |
| ७) अनु.क्र.१ मध्ये शिल्लक राहणारी तरतूद | :— | रु. १८,५२,३३४/— |

तरी वरीलप्रमाणे लेखाशिर्षाअंतर्गत करावयाच्या समायोजनास तसेच प्रभाग क्षेत्र क्र.४ अंतर्गत असलेल्या शौचालयांची दुरुस्ती करणेच्या कामाचे रु.२९,३३,०००/— एवढया रक्कमेच्या प्राकलनास मान्यता मिळून कामाची निविदा प्रक्रिया करणेकरीता मा.स्थायी समितीची मान्यता मिळणेस्तव प्रस्तावित.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> १०८ — <u>दिनांक:— १३/१२/२०१६</u>

सूचकाचे नांव : श्री. विजय पाटील

अनुमोदकाचे नांव : श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार प्रभाग समिती क्र. ४ मध्ये शौचालयाची दुरुस्ती करणेच्या कामाचे रु.२९,३३,०००/— एवढया रक्कमेच्या प्राकलनास मान्यता देवुन कामाची निविदा प्रक्रिया करणेस मान्यता देत आहे.

तसेच

उर्वरीत निधी मोडकळीस अवस्थेत / वापरात नसलेली १४ शौचालयासाठी वापरण्यात यावा व तसा प्रस्ताव लवकरात लवकर आणण्यात यावा.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

सांयकाळी ५.१० वाजंता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती श्री. सुनिल सुर्वे यांनी जाहिर केले.

**(प्राजक्ता मि. कुलकर्णी )**
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

.

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:—२८/१२/२०१६

दि. २८/१२/२०१६ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती

सभेचे इतिवत्त.

१४

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा बुधवार दिनांक २८/१२/२०१६ रोजी सायं. ४.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे | सभापती |
| २ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | सदस्या |
| ३ | श्रीमती लिलाबाई आशान | सदस्या |
| ४ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर | सदस्य |
| ५ | श्री. गुरुनो भिकोमल वलेचा | सदस्य |
| ६ | श्री. जमनादास पुरस्वानी | सदस्य |
| ७ | श्रीमती आशा जिवन इदनानी | सदस्या |
| ८ | श्रीमती अंजली साळवे | सदस्या |
| ९ | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | सदस्या |
| १० | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | सदस्या |
| ११ | श्रीमती इंदिरा उदासी | सदस्या |
| १२ | श्रीमती पुष्पाताई नाना बागुल | सदस्या |
| १३ | डॉ. निना प्रकाश नाथानी | सदस्या |

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्री. उमेश सुरेश कालानी, २. श्री. विजय चाहु पाटील, ३. श्रीमती वंदना पाटील उर्फ वंदना युवराज भदाणे

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. राजेंद्र निंबाळकर, आयुक्त
२. श्रीमती विजया कंठे, उप–आयुक्त, मुख्यालय
३. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
४. श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी
५. श्री. सुखदेव बलमे, मुख्य लेखा परिक्षक
६. डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी
७. श्री. सेलवन, उप अभियंता, पाणी पुरवठा
८. श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
९. श्री. महेश सितलानी, प्र. कार्यकारी अभियंता, सार्व.बांधकाम विभाग
१०. श्री. शैलेश दोंदे, प्र. उपकर निर्धारक व संकलक
११. श्री. तरूण सेवकानी, प्र. उप अभियंता, सार्व.बांधकाम विभाग
१२. श्रीम. मंगला माळवे, सहा. आयुक्त,
१३. श्रीम. छाया डांगळे, सहा. आयुक्त (विधी)
१४. श्री. महेंद्र धिंडे, कनिष्ठ अभियंता, विदयुत विभाग
१५. श्रीम. श्रध्दा बावीस्कर, प्रोग्रॅमर, ना.सु.कें
१६. श्री. भास्कर मिरपगार, प्र. अग्निशमन अधिकारी

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.

१. श्रीमती विशाखा सावंत

२. श्रीमती नर्गिस खान

सायं. ४.३० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–</u> प्रशासनाकडून आयत्यावेळचा विषय आला आहे. तो सामावुन घेण्यासाठी तुमच्यासमोर ठेवतो. सार्व. बांधकाम विभाग, प्रभाग समिती क्र. १,२,३ व ४ निहाय दलितवस्तीमधून करावयाची कामांसाठी तातडीने मंजुरी मिळणेस्तव प्रशासनाकडून आणला आहे. प्रशासनाने सदर विषय घेणेबाबत आपल्याला विनंती केली आहे. आणि आपण आता येणा–या निवडणूकीचा विचार करून ९ जे आपले दलित प्रभाग आहेत त्याकरीता आपण हा प्रस्ताव मान्य करत आहोत. यांस सर्वांची संमती आहे ना.

<u>महापालिका सचिव :–</u> सदरचा विषय सामावून घेण्यात यावा का?

<u>काही सदस्य :–</u> हो–हो...... विषय सामावुन घेण्यात यावा.

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

———————————————————————————————————————————

⇨ **विषय क्र. १ :—** मागिल सभेचे दिनांक २७/१०/२०१६ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

**महापालिका सचिव :—** सदरचा विषय पारीत करण्यात यावा का?

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—**मागील सभेचे दिनांक २७/१०/२०१६ रोजीचे इतिवृत जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १ :—** मागिल सभेचे दिनांक २७/१०/२०१६ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नांव : श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नांव : डॉ. निना नाथानी

**स्थायी समिती ठराव क्र. :—** १०८ अ **दिनांक : २८/१२/२०१६**

ही स्थायी समिती महापालिका सचिवांनी प्रस्तुत केलेले दिनांक २७/१०/२०१६ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते २४ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. २ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र.** २:–उल्हासनगर महानगरपालिका मालकिचे प्रभाग क्र. ३७ मधील बॅ.नं २००५ जवळ, उल्हासनगर–५ येथील महापालिकेने बांधलेले नविन शौचालय ''पैसे दया व वापरा'' या तत्वावर २० वर्ष कालावधीसाठी दलित वेल्फेअर सोसायटी, यांना देखभाल, दुरूस्ती करून चालविणेसाठी मान्यता मिळणे.

---

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:–</u> सदरचा विषय यापुर्वी अमान्य करण्यात आला होता, त्याचे कारण असे होते की, जे शौचालय महानगरपालिकेने बांधले आहे तेथे नागरीकांना मोफत सुविधा मिळाली पाहिजे. सदर शौचालय पैसे दया व वापरा या तत्वावर देता कामा नये. आमचा असा सल्ला आहे, पैसे दया व वापरा या तत्वावर अशी शौचालये दयावीत जी त्या संस्था स्वत: बांधकाम करतील, अशाप्रकारची पुर्वी शौचालये संबंधित संस्थांना दिली आहेत. त्यांना आपण ठिकाणे दिली होती व संबंधित संस्थांनी तेथे स्वखर्चाने बांधकाम करून शौचालय बांधून ती पैसे दया व वापरा या तत्वावर चालवली जात आहेत. परंतु महापालिकेने स्वत: खर्च करून बांधलेल्या शौचालयाची देखभाल दुरूस्ती व साफसफाई महापालिकेकडुनच करण्यात यावी असे आमचे मत आहे. यापुर्वी हा विषय अमान्य केला होता. सदरचा विषय पुन्हा आणण्यात आला आहे. आता जर आपण महापालिकेने बांधलेले शौचालय एखादया संस्थेला चालवावयाला दिले तर यापुर्वी ज्या संस्थांनी स्व:खर्चाने ५ ते १० लाख रू. खर्च करून शौचालये बांधून पैसे दया व वापरा या तत्वावर चालवत आहेत त्यांच्यावर अन्याय केल्यासारखे होईल. सदरचे शौचालय महापालिकेने चालवावयास हवे.

<u>सदस्या, श्रीम. अंजली साळवे –</u> यापुर्वी काही संस्थांना शौचालये पैसे दया व वापरा या तत्वावर चालवावयास दिली आहेत त्यांचीदेखील देखभाल व्यवस्थित होत नाही.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:– :–</u> यांस आपण अमान्य म्हणत आहात, परंतु सदर शौचालय चालवावयास देण्याबाबत प्रक्रीया पुर्ण केलेली आहे. कारण यानंतरसुध्दा माझ्याकडे दोन–तीन शौचालयाचे प्रस्ताव आले होते, ते मी स्थगित ठेवले आहेत. शहरात जेवढे शौचालय आहेत, सगळयांची एक यादी तयार करून त्यानुसार सर्व एकत्रित प्रस्ताव ठेवला पाहिजे, एक–एक स्वतंत्र प्रस्ताव ठेवणे बरोबर नाही. एकतर संस्थांनी स्वत: बांधायचे आणि आपण काही शुल्क आकारणार नसु तर त्यांनी लोकांकडून जे काही शुल्क आकारावयाचे आहे ते आपण निश्चित केले पाहिजे. आणि ते कमीतकमी असले पाहिजे किंवा निविदा काढून आपण शुल्क निश्चित करून दिले पाहिजे. जर का सदर शौचालय आपण बांधले आहे आणि सुस्थितीतील शौचालय आपण संस्थांच्या ताब्यात देणार आहोत तर त्यासाठीसुध्दा निविदा प्रक्रीया करणे उचीत वाटते, भलेही त्यांच्याकडून काही नाममात्र शुल्क आकारले जाणार असले तर यात एक स्पर्धा होईल आणि एक–एक, दोन–दोन देण्यापेक्षा शहरातील जे चारशे पाचशे शौचालये आहेत ती सर्वच एकदम ज्या कोणाची चालविण्याची क्षमता असेल त्यांना देता येईल. किंवा प्रभागनिहाय देता येतील

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:–</u> साहेब, त्यामध्ये असेही नमुद केले पाहिजे कि, ज्या संस्थेला शौचालय चालविण्यास देण्यात येतील त्यांनीच सदर शौचालयाची देखभाल दुरूस्ती सर्व करावयाची आहे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:— :—** हो, हो, सदर शौचालयाची देखभाल दुरूस्ती करण्याची जबाबदारी संस्थेचीच राहिल. आपण जसे म्हणत आहात कि, सदर शौचालय आपण का नाही चालवत तर सद्यस्थितीत कर्मचारीवर्ग अपुरा आहे. शौचालयांच्याबाबतीत आपण चांगल्या भुमिकेतुन काम करत आहोत, त्यामुळे सुदैवाने आपल्याकडे चांगले शौचालय बांधलेले आहेत. त्यांची देखभाल दुरूस्ती व्यवस्थित झाली आणि ते वापरात राहिले तर ते चांगले राहतील. शहरातील सर्व शौचालयांचा एकत्रित प्रस्ताव ठेवण्यासाठी निविदा मागविण्यास काही कालावधी लागणार आहे व आता आचारसंहिता लागू होईल त्यामुळे सदर प्रस्तावास थोडा वेळ लागेल.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** तोपर्यंत सदर विषय अमान्य करण्यात यावा.

**काही सदस्य:—**ठिक आहे, अमान्य.

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. २** :—उल्हासनगर महानगरपालिका मालकिचे प्रभाग क्र. ३७ मधील बॅ.नं २००५ जवळ, उल्हासनगर—५ येथील महापालिकेने बांधलेले नविन शौचालय ''पैसे दया व वापरा'' या तत्वावर २० वर्ष कालावधीसाठी दलित वेल्फेअर सोसायटी, यांना देखभाल, दुरूस्ती करून चालविणेसाठी मान्यता मिळणे.

**प्रस्तावना**

मा. स्थायी समिती ठराव क्र. ४६, दि. २८/०७/२०१६ अन्वये उल्हासनगर महानगरपालिका मालकिचे प्रभाग क्र. ३७ मधील बॅ. नं २००५ जवळ, उल्हासनगर—५ येथील महापालिकेने बांधलेले नविन शौचालय ''पैसे दया व वापरा'' या तत्वावर २० वर्ष कालावधीसाठी दलित वेल्फेअर सोसायटी, यांना देखभाल, दुरूस्ती करून चालविणेसाठी देण्याचा प्रस्ताव अमान्य करीत आहे. असे ठरावात नमुद करण्यात आलेले होते.

उप—अभियंता (साबांवि), प्रभाग समिती क्र. ४ यांचेकडील पत्र क्र. उमपा/साबांवि/उपअ/२०/२०१६, दि. २३/०२/२०१६ रोजीच्या पत्रान्वये प्रभाग क्र. ३७ मधील, बॅ.नं २००५ जवळ, उल्हासनगर— ५ येथील सार्वजनिक शौचालयाचे बांधकाम पूर्ण झालेले आहे. त्यानुसार सदर सार्वजनिक शौचालयाचा ताबा मालमत्ता विभागाकडे देण्यात आलेला आहे. तसेच प्रभाग क्र. ३७ मधील, बॅ.नं २००५ जवळ, उल्हासनगर— ५ येथील सार्वजनिक शौचालय हे महापालिका निधीतुन बांधण्यात आलेले असुन सदर शौचालय बांधणेसाठी रू. १०,००,०००/— (दहा लाख रूपये मात्र) एवढा खर्च झालेला आहे.

महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्र. मुंसाशी—१०००/ स.क्र २४१/प्र.क्र १३/पा.पु २१, दिनांक ३०/०८/२००१ अन्वये सुलभ व तत्सम सेवाभावी संस्थांतर्फे ''पैसे द्या व वापरा'' या तत्वावर शौचालय बांधकामाचा कार्यक्रम हाती घ्यावा, यासाठी सेवाभावी संस्थांची निवड महानगरपालिकेच्या स्थायी समिती/सर्वसाधारण सभा ठरवतील त्या निकष, अटी व शर्तीप्रमाणे करावी असे निर्देश आहेत. अशाप्रकारे शौचालय बांधल्यास महापालिकेवर आर्थिक बोजा पडणार नाही व संस्थेमार्फत परस्पर संबधित शौचालयांची देखभाल व दुरुस्ती होणार असल्याने नागरिकांना चांगल्या प्रतीची सेवा उपलब्ध होऊ शकेल.

उल्हासनगर महानगरपालिकेने यापूर्वी शहरात विविध ठिकाणी ''बांधा, वापरा व हस्तातंरीत करा'' या तत्वावर शौचालय बांधलेले असुन सद्यस्थितीत ''पैसे दया व वापरा'' या पध्दतीने सदरहु शौचालय विविध संस्थांमार्फत चालविण्यात येत आहेत.

उल्हासनगर महानगरपालिका मालकिचे प्रभाग क्र. ३७ मधील बॅ.नं २००५ जवळ, उल्हासनगर—५ येथील महापालिकेने बांधलेले नविन शौचालय ''पैसे दया व वापरा'' या तत्वावर अटी व शर्तीसह देण्याकामी जाहीर सुचना दै. उल्हास विकास, दै. नगर न्युज, व दै. अमृत कलश या वर्तमानपत्रात दि. ०२/०५/२०१६ रोजी प्रसिध्द् करून इच्छुकांकडुन अर्ज मागविण्यात आले होते. त्या अनुषंगाने खालील प्रमाणे अर्ज प्राप्त झालेले आहेत.

| अ.क्र | संस्थेचे नाव व पत्ता | अर्ज सादर करण्यात आलेला दिनांक | सोबत जोडलेली कागदपत्रे |
|---|---|---|---|
| १ | दलित वेल्फेअर सोसायटी, रामदेव नगर, रूम नं १५५, ऑर्थर रोड, जे. आर. बोरीछा मार्ग, मुंबई— ४०००११ | ०४/०५/२०१६ | १) संस्थेचे नोदणी प्रमाणपत्र.<br>२) कामाचा अनुभव असलेला<br>दाखला |
| २ | एकता सामाजिक प्रतिष्ठान, प्लॉट नं २७८, म्हाडा कॉलनी, कर्जत रोड, बदलापुर (पुर्व)— ४२१५०३ | १२/०५/२०१६ | १) संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र.<br>२) कामाचा अनुभव असलेला<br>दाखला |
| ३ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन कल्याण संस्था, भैय्यासाहेब आंबेडकर नगर, ओ.टी. सेक्शन—२, उल्हासनगर—२ | १३/०५/२०१६ | १) संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र. |
| ४ | श्री. साई समर्थ प्रतिष्ठान (रजि), ब्लॉक नं २, रूम नं. १ शांतीनगर, साने गुरूजी मार्ग, महालक्ष्मी, मुंबई— ४०००११ | १६/०५/२०१६ | १) संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र.<br>२) कामाचा अनुभव असलेला<br>दाखला |

वर्तमानपत्रात जाहीर केलेल्या सुचनेमध्ये नमुद केलेल्या अटी व शर्तीमध्ये अट क्र. ८ मध्ये नमुद केल्याप्रमाणे जी संस्था/मंडळे सर्व प्रथम अर्ज सादर करील त्यांना प्राधान्य देण्यात येईल. (सोबत जाहिर सुचना जोडण्यात आलेली आहे.) असे नमुद करण्यात आलेले होते. त्या अनुषंगाने दलित वेल्फेअर सोसायटी, रामदेव नगर, रूम नं १५५, ऑर्थर रोड, जे.आर. बोरीछा मार्ग, मुंबई— ४०००११ यांनी सर्व प्रथम अर्ज सादर केलेला आहे. तसेच त्यांनी अटी व शर्तीनुसार कागदपत्रे सादर केलेली आहेत.

उक्त बाबी विचारात घेता उल्हासनगर महानगरपालिका मालकिचे प्रभाग क्र. ३७ मधील बॅ.नं. २००५ जवळ, उल्हासनगर—५ येथील महापालिकेने बांधलेले नविन शौचालय ''पैसे दया व वापरा'' या तत्वावर २० वर्ष कालावधीसाठी दलित वेल्फेअर सोसायटी, यांना देखभाल, दुरूस्ती करून चालविणेस देण्याची मंजुरी मिळण्यासाठीचा पुन:च प्रस्ताव मा. स्थायी समिती पटलावर प्रस्तावित करणेत येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र. १०९</u> — <u>दिनांक:— २८/१२/२०१६</u>

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— डॉ. निना नाथानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिका मालकिचे प्रभाग क्र. ३७ मधील बॅ. नं २००५ जवळ, उल्हासनगर—५ येथील महापालिकेने बांधलेले नविन शौचालय ''पैसे दया व वापरा'' या तत्वावर २० वर्ष कालावधीसाठी दलित वेल्फेअर सोसायटी, यांना देखभाल, दुरूस्ती करून चालविणेसाठी देण्याचा प्रस्ताव अमान्य करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ३:—** मालमत्ता क्र. 31C0020116400 [31-1254] करीता वर्ष २०१४—२०१५ पासुन नोंद करण्यात आलेले वाढीव आरसीसी क्षेत्र १११७ चौ.फुट व एसी शिट ब्रिक्स ३१५ चौ. फुट रद्द करून त्यावरील कर आकारणी व अनधिकृत बांधकाम शास्ती तसेच विलंब शास्ती निर्लेखित करणे.

---

उप कर निर्धारक व संकलक, श्री. शैलेश दोंदे :— सदर विषयामध्ये दोन मालमत्ता आहेत व दोन्ही मालमत्तांना कर आकारणी सुरू होत्या. सदर मालमत्तेचे वाढीव क्षेत्र १४३२ चौ. फुट असल्याचे निर्धारीत झालेले आहे. त्यामुळे सदर वाढीव क्षेत्रासाठी होत असलेली कर आकारणी निर्लेखित होणे आवश्यक आहे.

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:— शहरातील सर्व नागरीकांकडून तक्रारी येत आहेत की, मालमत्ता करातील देयकामध्ये मालमत्ता कराबरोबर पाणीपटटी करदेखील लावून येते. त्याचप्रमाणे इमारतींच्या मालमत्ता कराच्या देयकामध्ये इमारतीच्या सेक्रेटरीच्या देयकामध्ये टेरेस, पार्किंग व मोकळया जागेचे देयक लावून येते त्याचबरोबर पाणीपटटी करदेखील लावून येतो. पाणीपटटी ही फक्त घरांनाच लावली गेली पाहिजे ना परंतु ती इतर देयकाबरोबर देखील लावली जाते. सदर तक्रार विचारात घेतली तर बरे होईल.

**उप कर निर्धारक व संकलक, श्री. शैलेश दोंदे :—** काही बिलांमध्ये आढळून आले आहे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:— :—** सदर विषय तुम्ही माझ्याकडे ठेवा ना.

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—**साहेब, मंदिरांनादेखील पाणीपटटी लावून येते.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** घरगुती/व्यापारी संस्थांच्या मालमत्ता कराच्या देयकातसुध्दा पाणीपटटी आकारली जाते.

**उप कर निर्धारक व संकलक, श्री. शैलेश दोंदे :—** घरगुती मालमत्ता असेल तर त्यात पाणीपटटी लावून येते कारण तसे आपल्या देयकाच्या सॉफ्टवेअरमध्ये व्यवस्था आहे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:— :—** माझ्याकडे हा विषय ठेवा.

**महापालिका सचिव :—** सदरचा विषय पारीत करण्यात यावा का?

**काही सदस्य :—**पास—पास......

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—** सदर विषयाच्या ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता करण्यात यावी.

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ३** :— मालमत्ता क्र. 31CO020116400 [31-1254] करीता वर्ष २०१४—२०१५ पासुन नोंद करण्यात आलेले वाढीव आरसीसी क्षेत्र १११७ चौ.फुट व एसी शिट ब्रिक्स ३१५ चौ. फुट रद्द करून त्यावरील कर आकारणी व अनधिकृत बांधकाम शास्ती तसेच विलंब शास्ती निर्लेखित करणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील शॉप नं. 359, नेनुमल मार्केट, शिवाजी चौक, उल्हासनगर—3 या मिळकतीकरीता कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 31CO007851300 [31-1254] & 31CO020116400 [31-1254] अन्वये नोंद असुन मालमत्ता कर वसुलीच्या प्रयोजनार्थ कर भरण्यास प्रथम पात्र व्यक्ती म्हणुन Mulchand Dewandas Jethwani या नावे कर आकारणी सुरू आहे. करपात्र बाबींचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

1) मालमत्ता क्र. 31CO007851300 [31-1254]

कर देण्यास प्रथम पात्र व्यक्ती :– Mulchand Dewandas Jethwani

पत्ता :– शॉप नं. 359, नेनुमल मार्केट, शिवाजी चौक, उल्हासनगर–3 (क्षेत्र चौरस.फुटात)

| Const. Type | Occu. Status | Usage | Asst. Year | Total Area | Exempted Area | Assessable Area |
|---|---|---|---|---|---|---|
| RCC | Owner | Non Residential | 01-Apr-01 | 1241 | 0 | 1241 |
| Open | Owner | Non Residential | 01-Apr-01 | 391 | 0 | 391 |

2) मालमत्ता क्र. 31CO020116400 [31-1254]

कर देण्यास प्रथम पात्र व्यक्ती :– Mulchand Dewandas Jethwani

पत्ता :– शॉप नं. 359, नेनुमल मार्केट, शिवाजी चौक (पोर्शन) उल्हासनगर–3 (क्षेत्र चौरस.फुटात)

| Const. Type | Occu. Status | Usage | Asst. Year | Total Area | Exempted Area | Assessable Area |
|---|---|---|---|---|---|---|
| RCC | Owner | Non Residential | 01-Apr-01 | 355 | 0 | 355 |
| RCC | Owner | Non Residential | 30-Apr-14 | 945 | 0 | 945 |
| Ac Sheet Bricks | Owner | Non Residential | 30-Apr-14 | 315 | 0 | 315 |
| RCC | Owner | Non Residential | 30-Apr-14 | 100 | 100 | 0 |
| RCC | Owner | Non Residential | 30-Apr-14 | 72 | 36 | 36 |

वर्ष 2014–2015 मध्ये संबंधित कर निरीक्षकामार्फत मालमत्ता क्र. 31CO020116400 [31-1254] मध्ये वाढीव क्षेत्र 1432 चौ.फुट नोंद करण्यात आली आहे. वास्तवित पाहता सदरचे क्षेत्राकरीता मालमत्ता क्र. 31CO007851300 [31-1254]नुसार स्वतंत्ररित्या कर आकारणी सुरू आहे. सदर बाबीची संबंधित कर निरीक्षकामार्फत पडताळणी करणे आवश्यक होते.

श्री. मुलचंद देवनदास जेठानी, शॉप नं. 359, नेनुमल मार्केट, शिवाजी चौक, उल्हासनगर–3 यांनी दिनांक 31/05/2016 रोजीचे अर्जान्वये मालमत्ता क्र. 31CO020116400 [31-1254] करीता नोंद असलेले वाढीव क्षेत्र रद्द करणे तसेच मालमत्ता क्र. 31CO007851300 [31-1254] & 31CO020116400 [31-1254] अन्वये नोंद असलेल्या मिळकतीं एकत्रित करून एकच बिल देणेबाबत विनंती केली आहे.

तरी मालमत्ता क्र. 31CO020116400 [31-1254] करीता वर्ष 2014–2015 पासुन नोंद करण्यात आलेले वाढीव आरसीसी क्षेत्र 1117 चौ.फुट व एसी शिट ब्रिक्स 315 चौ.फुट रद्द करून त्यावरील कर आकारणी व अनधिकृत बांधकाम शास्ती तसेच विलंब शास्ती निर्लेखित करणेसाठी स्थायी समितीपुढे मंजुरीकरीता शिफारस करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ११० दिनांक:– २८/१२/२०१६

सुचकाचे नाव :– श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :– डॉ. निना नाथानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार मालमत्ता क्र. 31C0020116400 [31-1254] करीता वर्ष २०१४–२०१५ पासुन नोंद करण्यात आलेले वाढीव आरसीसी क्षेत्र १११७ चौ.फुट व एसी शिट ब्रिक्स ३१५ चौ.फुट रद्द करून त्यावरील कर आकारणी व अनधिकृत बांधकाम शास्ती तसेच विलंब शास्ती निर्लेखित करणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्रमांक. ४ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. ४ :–** संरक्षण दलातील शौर्य पदक धारक आणि माजी सैनिकांच्या विधवांना त्यांच्या नावावर असलेल्या मालमत्तेंच्या मालमत्ता करातील “ सर्वसाधारण कर ”यामध्ये सुट देणे.

---

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकरः– सर्वसाधारण करात संपूर्ण सुट देण्यात येणार आहे किंवा कसे?

सभापती, श्री. सुनिल सुर्वेः– संरक्षण दलातील एखादा सेवानिवृत्त अधिकारी असेल त्यालाच माफ आहे कि, कारण यात जरा वेगळे दिले आहे कि, देशाचे संरक्षण करताना बजाविण्यात आलेल्या उत्कृष्ट कामगिरीकरीता संरक्षण दलातील शौर्य पदक धारकांना सुधारीत शासन निर्णय काय आहे, माजी स्वातंत्र्यसैनिकांनी आम्हाला विनंती केली आहे कि, इतर महापालिकांमध्ये अशाप्रकारे मालमत्ता करामध्ये सुट दिली जाते तर आम्हाला मिळावी. सर्व माजी सैनिकांना दयायचे का?

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकरः– संरक्षण दलातील शौर्य पदक धारक आणि माजी सैनिकांच्या विधवांना दयायचे आहे. माजी सैनिक असतील तर शौर्य पदकाची अट नाही.

<u>उप कर निर्धारक व संकलक, श्री. शैलेश दोंदे :—</u> सुधारीत शासन निर्णय आला आहे.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u> मालमत्ता करात माफी म्हटलं पाहिजे. सुट म्हटले कि, मालमत्ता करातील आकारणीमध्ये सुट देणे होईल. ठरावात लिहा की 'सर्वसाधारण कर' मध्ये संपुर्ण सुट दिली जाईल.

<u>उप कर निर्धारक व संकलक, श्री. शैलेश दोंदे :—</u> शासन निर्णयातच तसा शब्द वापरला आहे.

<u>महापालिका सचिव :—</u> सदर विषय पारीत करण्यात यावा का?

<u>काही सदस्य :—</u>पास—पास……

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u> सदर विषयाच्या ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता करण्यात यावी.

<u>महापालिका सचिव :—</u>सदर विषयामध्ये धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक आहे त्यामुळे महासभेच्या मान्यतेस अधिन राहुन सदर विषय पारीत करण्यात यावा.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र.** ४ :—संरक्षण दलातील शौर्य पदक धारक आणि माजी सैनिकांच्या विधवांना त्यांच्या नावावर असलेल्या मालमत्तेंच्या मालमत्ता करातील '' सर्वसाधारण कर ''यामध्ये सुट देणे.

<u>प्रस्तावना</u>

उपरोक्त विषयान्वये महाराष्ट्र शासनाने संरक्षण दलामधील शौर्य पदकधारक आणि माजी सैनिकांच्या विधवांना त्यांच्या नावावर असलेल्या मालमत्तेच्या मालमत्ता करातून सूट दण्याचा निर्णय घेतला आहे. शासन निर्णय शुध्दीपत्रक क्रमांक:— संकिर्ण—२०१६/प्र.क्र. ५९/नवि—२०, दि. ७/४/२०१६ अन्वये.

मिळकतीच्या मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १३९ अन्वये बृहन्मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १२७ अन्वये महानगरपालिका व महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम १०५ अन्वये नगरपरिषदा, नगरपंचायती मालमत्ता कराची आकरणी करतात.

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्रात राहणा—या, देशासाठी प्राणाची बाजी लावून, जीवाची पर्वा न करता नि:स्वार्थीपणे '' **देशाचे संरक्षण करताना बजाविण्यात आलेल्या उत्कृष्ट कामगिरीकरीता संरक्षण दलातील शौर्य पदक धारकांना आणि माजी सैनिकांच्या विधवांना त्यांच्या नावावर असलेल्या मालमत्तेच्या मालमत्ता**

**करातून सुट''** देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यानुसार अशा कर माफीस पात्र ठरणा—या व्यक्तीने जिल्हा सैनिक कल्याण अधिका—याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने मालमत्ता कराच्या ''सर्व साधारण कर '' (General Tax) करात सुट देणेसाठी सदर प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजुरीने महासभेपुढे मंजुरीकरिता शिफारस करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १११ दिनांकः—२८/१२/२०१६

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— डॉ. निना नाथानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार संरक्षण दलातील शौर्य पदक धारक आणि माजी सैनिकांच्या विधवांना त्यांच्या नावावर असलेल्या मालमत्तेंच्या मालमत्ता करातील '' सर्वसाधारण कर ''यामध्ये संपुर्ण सुट देण्यास महासभेच्या मंजुरीच्या अधिन राहून मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र.** ५ :— उल्हासनगर—१ मधील आय.डी.आय. कंपनी जवळ गणपती विसर्जनासाठी नविन रस्ता व संरक्षण भिंत बांधणेकामी कार्योत्तर मंजुरी मिळणे.

---

श्री. तरुण सेवकानी, कनिष्ठ अभियंता (सार्व.बांधकाम विभाग) :—उल्हासनगरमधील मोठे गणपती कल्याण येथे विर्सजित केले जात असत परंतु यावर्षी त्यांनी बंदी केल्यामुळे अचानकपणे गणपती घाट तयार करावा लागला होता. केवळ १५ दिवसांतच आयडीआय कंपनीजवळ गणपती विर्सजनासाठी गणपती घाटावर जाण्यासाठी नविन रस्ता व संरक्षण भिंत बांधण्यात आली होती. सदरचे काम तातडीने होणे आवश्यक होते. त्यामुळे ते काम ५ (२) (२) अंतर्गत करण्यात आले आहे.

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—१०० टक्के काम झालेले आहे.

श्री. तरुण सेवकानी, कनिष्ठ अभियंता (सार्व.बांधकाम विभाग) :—१०० टक्के काम पुर्ण झालेले आहे, आणि सदरचे काम तातडीने पुर्ण केल्याबदद्ल डिसीपी साहेब पोलिस यांनीदेखील कौतुक केले होते.

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:— सदरचे काम पुर्ण झालेले आहे, ५—२—२ मध्ये काम झालेले आहे त्यामुळे सदर विषय माहितीसाठी यायला हवा होता.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:— रू. २५ लाखाचे वरील काम मंजुरीसाठी आणणे आवश्यक आहे.

महापालिका सचिव :— सदरचा विषय पारीत करण्यात यावा का?

काही सदस्य :—पास—पास......

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:— सदर विषयाच्या ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता करण्यात यावी.

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ५** :—उल्हासनगर—१ मधील आय.डी.आय. कंपनी जवळ गणपती विसर्जनासाठी नविन रस्ता व संरक्षण भिंत बांधणेकामी कार्योत्तर मंजुरी मिळणे.

<u>प्रस्तावना</u>

उपरोक्त विषयान्वये उल्हासनगर–१ मधील आय.डी.आय. कंपनी जवळ गणपती विसर्जनासाठी नविन रस्ता व संरक्षण भिंत बांधणेचे काम करावयाचे आहे. तसेच पोलिस बंदोबस्तासाठी तंबू बांधावयाचे काम करावयाचे आहे. सदर ठिकाणी गणपती विसर्जनासाठी येणा–या नागारिकांच्या सुविधेसाठी व सुरक्षिततेसाठी रस्ता व संरक्षण भिंत बांधणेचे काम अत्यंत आवश्यक आहे. सदर कामाचे रु.४६,३२,४२९/– एवढया किंमतीचे प्राकलन तयार करण्यात आले आहे.

सदर खर्च महापालिका अर्थसंकल्पातील श्री गणपती घाट विसर्जन निधी या लेखाशिर्षातील तरतुदीमधुन करणे अपेक्षित आहे. या लेखाशिर्षाची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| i) लेखाशिर्ष | :– गणेश घाट |
| ii) लेखाशिर्षामध्ये उपलब्ध एकंदर तरतुद | :– रु.१,००,००,०००.००/– |
| iii) या कामापूर्वी बजेट कंट्रोल रजिस्टरप्रमाणे शिल्लक असलेली तरतुद | :–रु.४०,८५,२१२.००/– |
| iv) या कामावरील खर्च | :–रु.४६,३२,४२१.००/– |

सदर प्राकलनास आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:– साो. यांच्या अखत्यारित मुंबई प्रांतिक महानगर अधिनियम १९४९ चे कलम ७३ डी अंतर्गत सदर कामावरील रु.४६,३२,४२९/–इतक्या खर्चास मान्यता मिळून **मे. जयभारत कन्स्ट्रक्शन** यांचेकडून सदर काम करुन घेऊन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५चे कलम २(२) अंतर्गत स्थायी समितीची कार्योत्तर मंजूरी मिळणेसाठी प्रस्तावित.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> ११२ <u>दिनांक:– २८/१२/२०१६</u>

सुचकाचे नाव :– श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :– डॉ. निना नाथानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर–१ मधील आय.डी.आय. कंपनी जवळ गणपती विसर्जनासाठी **मे. जयभारत कन्स्ट्रक्शन** यांचेकडून नविन रस्ता व संरक्षण भिंत बांधणेकामी कार्योत्तर मंजुरी देत आहे.

सुचकाची <u>सही/–</u>

अनुमोदकाची <u>सही/–</u>

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

---

➯ **विषय क्र. ६ :—** वर्ष २०१६—१७ मध्ये उल्हासनगर शहरातील प्रभाग क्र. १ ते ४ अंतर्गत असलेल्या रस्त्यावरील खड्डेभरणेच्या कामाकरीता लेखाशिर्षाअंतर्गत समायोजन करुन होणा—या वाढीव खर्चास मान्यता देणे.

---

<u>सदस्या, श्रीम. लिलाबाई आशान :—</u>सदर विषयास माझा विरोध आहे.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>सार्व. बांधकाम विभागातील अभियंता, श्री. सेवकानी, श्री. सितलानी यापैकी कोणीही एकाने आम्हाला माहिती दया कि, आतापर्यंत किती कामे झाली आहेत आणि किती कामांची प्राकलने तयार केलेली आहेत आणि किती प्रभागांमध्ये कामे होणे बाकी आहे. सर्व सदस्यांचे असे म्हणणे आहे कि, प्राकलने मंजूर होतात परंतु कामे होत नाहीत,

<u>श्री. तरुण सेवकानी, कनिष्ठ अभियंता (सार्व.बांधकाम विभाग) :—:—</u>सर्व मुख्य रस्ते घेण्यात आले होते फक्त आतील रस्ते सुधारीत प्राकलनात घेण्यात आले आहेत.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u> आपण आपल्याकडील कामांची यादी दाखवा, जसे श्रीम. आशान महोदया यांनी म्हटले आमचा रस्ता घेतला आहे का? तसेच डॉ. नाथानी महोदया यांचेदेखील म्हणणे आहे कि, आमचे काम होत नाही.

<u>श्री. तरुण सेवकानी, कनिष्ठ अभियंता (सार्व.बांधकाम विभाग) :—:—</u>हो, घेण्यात आले आहे.

<u>सदस्या, श्रीम. लिलाबाई आशान :—</u>त्यांचे विरोध करण्याचे कारण एवढेच आहे कि, सांगितल्यानंतरसुध्दा काम होत नाही.

<u>सदस्या, डॉ. निना नाथानी :—</u>साहेब, आम्हाला कामांची यादी दया ना.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u> वाढीव रू. २.७६ मध्ये यांची कामे आहेत का?

<u>श्री. तरुण सेवकानी, कनिष्ठ अभियंता (सार्व.बांधकाम विभाग) :—</u>हो,

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः— </u>श्री. सेवकानी, आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकरः— साहेबसुध्दा आहेत इथे, मी सांगु इच्छितो की, जेव्हा कधीही रस्त्यांवरील खडड्े भरण्याचा विषय येतो, आणि श्रीम.आशान महोदया, आपल्या माजी महापौर आहेत, त्यांची नेहमी तक्रार असते कि, त्यांच्या प्रभागातील रस्त्याचे काम होत नाही, आपण त्यांना नेहमी आश्वासन देतो कि, आपल्या प्रभागातील रस्त्याचे काम घेतलेले आहे म्हणून, मला आठवते कि, सहा महिन्यापुर्वीदेखील रस्त्याच्या विषय सभेपुढे आला होता तेव्हादेखील त्यांनी त्यांच्या प्रभागातील रस्त्याच्या कामाबदद्ल विचारणा केली होती. त्यामुळे सदस्यांच्या बोलण्याकडे असे दुर्लक्ष होता कामा नये असे मला वाटते. उलट त्यांच्या भावनांची कदर केली पाहिजे. त्यांचे काम आपण प्रथम करून दया.

<u>श्री. तरुण सेवकानी, कनिष्ठ अभियंता (सार्व.बांधकाम विभाग) :—</u>श्रीम. आशान महोदया यांच्या प्रभागापासूनच कामाची सुरूवात करण्यात येईल.

<u>सदस्या, श्रीम. अंजली साळवे :—</u>सर्वच प्रभागातील कामे झाली पाहिजेत, आमच्या प्रभागात देखील काम झालेले नाही.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वेः— </u>आपण जे कबूल करत आहात, की या सदस्यांचे काम घेण्यात आले आहे तर त्याऐवजी आपण त्यांना सांगितले की, कुठले काम घेण्यात आले आहे तर बरे होईल. आणि हे आयुक्त साहेबांच्या समोर झाले तर आम्ही कमीतकमी त्यांना विचारू शकतो

<u>सदस्या, डॉ. निना नाथानी :—</u>साहेब, आम्हाला कामांची यादी पाहिजे कारण की, हे फक्त आश्वासन देतात प्रत्यक्षात काम होत नाही.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वेः— </u>हो, मला माहित आहे, म्हणून तर मी सभा लवकर का सुरू नाही केली कारण आयुक्त साहेबांनी या सभेत यावे असे मला वाटत होते आणि ते आल्यानंतरच आपण सभा सुरू केली. रस्त्याच्या विषय आपल्यासाठी खुप महत्वपुर्ण आहे.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकरः— :— </u> रू. २.७६/— लाखाची कामे होत आहेत, श्री. शेवकानी आपण सर्वांना कामांची यादी देवून टाका. आता यादी आणा आणि दया ना.

<u>सदस्या, कु. रेखा ठाकुर :— </u>रस्त्याच्या काम कोणत्याही ठेकेदाराला दिले जाते, त्या कामाची गुणवत्ता मिळत नाही, तेच रस्ते परत बनवले जातात आणि तेच रस्ते पुन्हा खराब होतात. यावर जरा लक्ष दिले तर बरे होईल.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकरः— :— </u>शासनाकडून रू.२० करोडचा निधी मान्य झाला आहे. आणि आता रस्त्यांचे काम करण्यासाठी निविदेमध्येच अट नमुद करण्यात आली आहे की, तीन वर्षापर्यंत रस्ते सुस्थितीत राहिले पाहिजेत, त्यामुळे रस्त्याच्या कामाचे शुल्क भलेही वाढेल परंतु एकदा जर रस्ते व्यवस्थित तयार झाले कि पुढील तीन वर्ष रस्त्यांची डोकेदुखी राहणार नाही. त्याचप्रमाणे पुढच्यावर्षीचा रस्त्यावरील खडड्े भरण्याचे कामाचा जो विषय आहे, त्यामध्येसुध्दा ज्या कमतरता होत्या त्या विचारात घेणार आहोत, जसे पुर्वी रस्त्यांवरील

खडड्‌ भरण्याच्या कामात केवळ रस्त्यांवरील खडड्‌ मोजून त्याप्रमाणे खडड्यांचेच प्राकलन तयार करत असत, हे खुपच चुकीचे आहे, यात आपल्याला संपुर्ण रस्त्यांचे काम घेतले पाहिजे, मग त्या रस्त्यावर किती खडड्‌ आहेत, किंवा पाऊस कमी झाला, जास्त झाला, आणि त्यात आणखी काही काम वाढणार आहे हे त्या ठेकेदारानेच पहावे अशाप्रकारे निविदाप्रक्रीया केली जाईल. आणि एकदा काम झाले कि, त्या कामाचे आयुष्य किती असले पाहिजे याबदद्‌लदेखील एक कालावधी ठरवला पाहिजे जेणेकरून त्या रस्त्यांचे काम निघाल्यास तो ठेकेदार त्या कालावधीत ते काम विनाशुल्क करून देईल.

<u>सदस्या, श्रीमती रेखा ठाकुर :—</u> रस्त्याची कामे बरेचवेळा त्याच त्याच ठेकेदाराना दिली जातात, ज्यांची नेहमी तक्रार असते,

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकरः— :—</u> मी आल्यानंतरसुध्दा ब—याच निविदा झाल्या, पण असे निदर्शनास आले कि, ऑनलाईन निविदा प्रक्रीया असतानासुध्दा कित्येकवेळा एखादया कामास प्रतिसादच मिळत नाही. इतक्या पारदर्शकतेने काम होत असतानादेखील निविदाकार येत नाहीत म्हणजे काहीतरी प्रशासनाच्या प्रक्रीयेमध्ये उदा. ठेकेदारांचे देयक अदा करणे असो किंवा निविदा मान्य करण्याची प्रक्रीया असो यामध्ये आम्हाला जरा बदल करण्याची गरज आहे, जेव्हा आपण विश्वास देवू कि चांगली माणसे येतील तर त्यांनादेखील सहकार्य करण्याची गरज आहे, अशा ब—याच काही गोष्टी आहेत परंतु इथे बोलण्याची गरज नाही, ठेकेदाराला सरळ काम करू दिले जात नाही, हा विश्वास हळूहळू जेव्हा आपण वाढवू, तेव्हाच चांगले लोक तिथे येतील, आमच्याबाजूने तरी आम्ही पुर्ण प्रयत्न करत आहोत कि, जेवढे आम्ही त्याला कामाचे पैसे देणार आहोत तेवढे काम आम्ही त्याच्याकडून करून घेवू.

<u>सदस्या, डॉ. निना नाथानी :—</u> मागील वेळेस जेव्हा रस्त्यावरील खडडे भरण्याच्या कामाबाबत तीन सभांपासून बोलणी चालली होती, तेव्हा गोलमैदान येथील एक अपघातक्षेत्राच्या ठिकाणी स्पीडब्रेकर तयार करण्यासाठी सांगितले होते, त्यानंतरसुध्दा श्री. जयस्वार आम्हाला नेहमी सांगतात कि, दोन दिवसांत सदरचे काम करून देतो परंतु अद्यापपर्यंत ते काम झालेले नाही. आणि सदर ठिकाणी अजून किती अपघात झाले आहेत याची नोंद नाही. दोन ठिकाणी स्पीडब्रेकर तयार करण्याची आम्ही मागणी केली होती. त्यानंतर आज चौथी सभा आहे, परंतु ते स्पीडब्रेकर तयार करण्याचे क्षुल्लक काम झालेले नाही, आणि त्याठिकाणी आतापर्यंत बरेच अपघात झाले आहेत, यासाठी आवश्यक असलेला पत्रव्यवहार पाठपुराव्यासह मी सर्व पुर्ण केला आहे, परंतु अद्याप कार्यवाही होत नाही.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकरः—</u> श्री. शेवकानी, आपण क्षुल्लक कामांसाठी काही बजेटची तरतुद ठेवत नाहीत का?

<u>श्री. तरुण सेवकानी, कनिष्ठ अभियंता (सार्व.बांधकाम विभाग) :—</u>नाही.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकरः— :—</u> क्षुल्लक कामांसाठी तरतुद केली पाहिजे, जसे स्पीड ब्रेकर बनविणे असेल किंवा लहान दुरूस्तीची कामे असतील त्यासाठी एक बजेट हेड बनवा ना, त्यात तरतुद ठेवा, कारण आपल्या ठराविक कामांच्याव्यतिरिक्तदेखील काही कामे असु शकतात तर ती करण्यासाठी बजेटमध्ये तरतुद असणे आवश्यक आहे.

**सदस्या, श्रीम. अंजली साळवे :–**सहा महिन्यांपासुन एक काम सांगितले ते होत नाही. रस्त्याचे काम करू तेव्हा करू असे प्रत्येकवेळा सांगितले जाते.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:– :–** एक स्पीडब्रेकरचे प्राकलन तयार करून ते बजेटमध्ये दाखवता येत नाही. आणि यांनी क्षुल्लक खर्चासाठीदेखील बजेटमध्ये तरतुद केलेली नाही त्यामुळे अडचण ही येते की बजेटमध्ये तरतुद नाही. त्याकरीता दोन–चार करोडचे सर्वसाधारण बजेट तयार करून घ्या. त्यामधून ही क्षुल्लक कामे करता येतील,

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:–** सदर विषयाच्या ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता करण्यात यावी.

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–**साहेब, एक लक्षात घ्या, त्यांचे असे म्हणणे आहे, चार नंबर ओटी नाही, रूक्मिणी सोसायटीपासुन खाली भिमनगरपर्यंत तो खुप लहान तुकडा आहे, ओटीपासुन म्हटले तर मोठा तुकडा होईल आणि तिथे सिमेंट ब्लॉकचा रस्ता आहे.

**सदस्या, श्रीम. अंजली साळवे :–**माझ्या प्रभागातील भरतनगर, लालसाई येथील रस्त्याचे काम झालेले नाही.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:– :–** आता जी कामे झाली आहेत त्यामध्ये असा फिडबॅक मिळाला आहे कि रस्त्याची कामे चांगली झाली आहेत.

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–**यात अशी हरकत आहे कि, बीएम झाले आहे परंतु एसीचे काम झालेले नाही, आणि काय होत साहेब, कि बीएम झाले आणि एसीचे काम झाले नाही तर पहिल्या पावसाळयात बीएम उघडतोच उघडतो. अशी सुरूवात होते आणि रस्त्यांवर खडडे तयार होतात. त्यामुळे ज्या ठिकाणी १०० टक्के बीएमचे काम झाले आहे त्याठिकाणी तरी एसीचे काम झाले तर व्यवस्थित होईल.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:– :–** सभापती महोदय, जे सांगत आहेत त्याची दखल घेण्यात यावी.

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:–**श्री. अश्विनी अहुजा, आपण हाती घेतलेल्या कामांची यादीतील ठिकाणे सांगितली तर सदस्यांना समाधान वाटेल.

**सदस्या, श्रीम. अंजली साळवे :–**प्रस्तावातील गोषवा–यात एका ठिकाणी रक्कम रू. ३ लक्ष ऐवजी रू. ३ करोड अशी दुरूस्ती करण्यात यावी.

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u> श्री. विजय पाटील, नगरसेवक व सदस्य हे आज उपस्थित नाहीत, परंतु त्यांच्या प्रभाग क्र.५ मधील नेहरूनगर, इंदिरानगर, गॅस गोडाऊन, इत्यादी ठिकाणे नमुद करण्यात यावीत, विठठलनगर यात नाही का?

<u>कनिष्ठ अभियंता (सार्व.बांधकाम विभाग), श्री. अश्विनी अहुजा :—</u> हो, आहे ना, विठठलनगर यातच येते.

<u>सदस्या, डॉ. निना नाथानी :—</u> यापेक्षा आपण सर्वांना यादी दया.

<u>महापालिका सचिव :—</u> सदर विषय पारीत करण्यात यावा का?

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>सदर विषयाच्या ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता करण्यात यावी.

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>डॉ. नाथानी महोदया, आपण आपल्या कामाची नोंद आहे का ते तपासले आहे का, जोपर्यंत कामांची यादी मिळत नाही तोपर्यंत आपण सभा संपवणार नाही,

<u>सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑ **विषय क्र.६**:—वर्ष २०१६—१७ मध्ये उल्हासनगर शहरातील प्रभाग क्र. १ ते ४ अंतर्गत असलेल्या रस्त्यावरील खड्डेभरणेच्या कामाकरीता लेखाशिर्षाअंतर्गत समायोजन करुन होणा—या वाढीव खर्चास मान्यता देणे.

प्रस्तावना

उल्हासनगर शहरामध्ये असलेल्या डांबरी रस्त्यांची दरवर्षी पावसाळयापुर्वी, पावसाळयामध्ये व पावसाळयानंतर दुरुस्ती करण्यात येते. शहरातील काही रस्ते एकात्मिक रस्ते विकास प्रकल्प –२ मधील आहेत व इतर काही प्रमुख रस्ते आहेत त्यामधील असलेले तुरळक खड्डे, टेलिफोन विभाग व पाणी विभागाने खोदलेले खंदके व पावसाळयामुळे पडलेले खड्डे बुजवुन रस्ते वाहतुकीस सुस्थितीत ठेवावे लागतात.

याच धर्तीवर वर्ष २०१६–१७ मध्ये शहरातील रस्त्यांवरील खड्डे भरण्याकरीता प्रभाग क्षेत्र निहाय रु. ३,३३,५१,४३१/– (तीन कोटी तेहतीस लाख एक्कावन्न हजार चारशे एकतिस फक्त) एवढया खर्चाच्या प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता घेवून प्रभाग क्षेत्र निहाय ठराव मंजूर करण्यात आले. त्याची माहिती खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | प्रभाग क्षेत्र क्र. | प्राकलनिय किंमत | स्थायी समिती ठराव क्र. व दिनांक | कार्यारंभ आदेश क्र. व दिनांक | एजन्सीचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्षेत्र क्र.१ | रु.३९,१८,०७२/– | ठराव क्र. ४९ दिनांक ०४/०८/२०१६ | आदेश क्र.२३२७ दिनांक १०/८/२०१६ | मे.जयभारत कंन्स्ट्रक्शन |
| २ | प्रभाग क्षेत्र क्र.२ | रु.६३,८३,२४८/– | ठराव क्र.५० दिनांक ०४/०८/२०१६ | आदेश क्र.२३२८ दिनांक १०/८/२०१६ | मे.जयभारत कंन्स्ट्रक्शन |
| ३ | प्रभाग क्षेत्र क्र.३ | रु.८५,२०,५८६/– | ठराव क्र.५१ दिनांक ०४/०८/२०१६ | आदेश क्र.२३२९ दिनांक ६/०९/२०१६ | मे.झा.पी.ॲण्ड कंपनी |
| ४ | प्रभाग क्षेत्र क्र.४ | रु.१,४५,२९,५२५/– | ठराव क्र. ५२ दिनांक ०४/०८/२०१६ | आदेश क्र.२३३० दिनांक ०९/८/२०१६ | मे.सिध्दनाथ कंन्स्ट्रक्शन |

महापालिकेच्या अर्थसंकल्पातील 'अ' अंदाजपत्रक भाग–१ क ५ (iii) 'रस्ते दुरुस्ती' या लेखाशिर्षातील एकूण रु.५,००,००,०००/– (अक्षरी पाच कोटी) एवढया एकंदर तरतूदीतून सदर कामावरील खर्च करण्यात आला आहे. वरील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे शहरातील रस्त्यांवर खड्डे भरणेच्या कामांचे कार्यारंभ आदेश निर्गमित केल्यानंतर कामास सुरुवात करण्यात आली. यावर्षी पावसाने जुन महिन्याच्या सुरवातीपासूनच जोर धरल्याने शहरातील रस्त्यांवर मोठया प्रमाणात खड्डे पडले होते. तसेच सप्टेंबर महिन्याच्या पहिल्या आठवडयातच गणेशोत्सव असल्याने पावसाळयादरम्यानच रस्त्यांवरील खड्डे बुजविण्यात आले होते. त्यामुळे वरील रु.३,३३,५१,४३१/– (तीन लक्ष तेहतीस लाख एक्कावन्न हजार चारशे एकतिस फक्त) या प्राकलनिय खर्चाची कामे पूर्ण करण्यात आली. परंतू यावर्षी संपूर्ण महाराष्ट्रात सप्टेंबर महिन्यात मुसळधार पाउस झाला. त्यामुळे खड्डे भरलेल्या रस्त्यांवर पुनश्च खड्डे भरावे लागले. तसेच या अतिपावसामुळे इतर रस्त्यांवरही नव्याने खड्डे भरावे लागणार आहेत. काही रस्त्यांवर डांबरीकरण करण्यात आले आहे. (Dence Bituminous Macadam) अंतिम फिनिशिंग (Asphaltic Concrete) देणे बाकी आहे.

वरील परिच्छेद क्र.३ मध्ये नमुद कारणांमुळे खड्डे भरण्याच्या मुळ प्राकलनिय किंमतीत वाढ होत आहे. ती खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | प्रभाग क्षेत्र क्र. | एजन्सीचे नाव | मुळ प्राकलनिय किंमत | वाढीव खर्च | एकूण होणारा प्रस्तावित खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | प्रभाग क्षेत्र क्र.१ | मे.जयभारत कंन्स्ट्रक्शन | रु.३९,१८,०७२/– | रु.५०,००,०००/– | रु.८९,१८,०७२/– |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | प्रभाग क्षेत्र क्र.२ | मे.जयभारत कंन्स्ट्रक्शन | रु.६३,८३,२४८/— | रु.२७,६६,४९७/— | रु.९१,४९,७४५/— |
| ३ | प्रभाग क्षेत्र क्र.३ | मे.झा.पी.अॅण्ड कंपनी | रु.८५,२०,५८६/— | रु.९१,२०,९३४/— | रु.१,७६,४१,५२०/— |
| ४ | प्रभाग क्षेत्र क्र.४ | मे.सिध्दनाथ कंन्स्ट्रक्शन | रु.१,४५,२९,५२५/— | रु.१,०७,३५,८८६/— | रु.२,५२,६५,४१०/— |
| | | **एकूण** | **रु.३,३३,५१,४३१/—** | **रु.२,७६,२३,३१६/—** | **रु.६,०९,७४,७४७/—** |

वास्तविक पाहता वरील तक्त्यातील स्तंभ क्र.५ प्रमाणे शहरातील रस्त्यांवरील खड्डे भरण्याच्या कामावरील वाढीव खर्च रु.२,७६,२३,३१६/— (अक्षरी दोन कोटी शहात्तर लाख तेवीस हजार तिनशे सोळा मात्र) एवढा खर्च अर्थसंकल्पातील लेखाशिर्षात 'अ' अंदाजपत्रक भाग—१ क ५ **(iii)** 'रस्ते दुरुस्ती'या लेखा शिर्षामधून करणे अपेक्षित आहे. परंतू या लेखाशिर्षात वरील वाढीव खर्चास तरतूद शिल्लक नाही. परंतू 'अ' अंदाजपत्रक भाग—१ क ४ **(7)** 'नविन रस्ते सिमेंट कॉक्रिट करणे' या लेखाशिर्षात एकुण रु.६१,५९,००,०००/— (अक्षरी एकसष्ट कोटी एकोणसाठ लाख मात्र) इतकी तरतुद उपलब्ध आहे. शहरातील नागरीक व लोकप्रतिनिधी यांच्या मागण्या लक्षात घेता रस्त्यांवरील खड्डे भरणेकरीता वरीलप्रमाणे झालेले वाढीव काम करणे आवश्यक आहे. तसेच मा.स्थायी समितीनेही ठराव क्र.२३ दिनांक १३/०६/२०१६ रोजीच्या ठरावास मंजूरी देताना १० टक्के पेक्षा जास्त वाढीव कामास अनुमती देणार नाही असे ठरावात नमुद केले आहे.

त्यामुळे वर्ष २०१६—१७ मध्ये पावसाळयादरम्यान उल्हासनगर शहरातील प्रभाग क्षेत्र क्र.१ ते ४ मधील रस्त्यांवरील खड्डे भरण्याच्या कामावरील होणारा वाढीव खर्च रु.२,७६,२३,३१६/— (अक्षरी दोन कोटी शहात्तर लाख तेवीस हजार तिनशे सोळा मात्र) एवढया खर्चाकरीता 'अ' अंदाजपत्रक भाग—१ क ४ **(7)** 'नविन रस्ते सिमेंट कॉक्रिट करणे' या लेखाशिर्षातील उपलब्ध असलेली तरतूद 'अ' अंदाजपत्रक भाग—१ क ५ **(iii)** 'रस्ते दुरुस्ती' या लेखाशिर्षात समायोजन करुन सदर काम करणे आवश्यक आहे. त्याची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

१) 'अ' अंदाजपत्रक भाग—१ क ५ **(iii)** 'रस्ते दुरुस्ती

मध्ये वर्ष २०१६—१७ साठी ठेवलेली एकूण तरतूद :— रु. ५,००,००,०००/—

२) मागील वर्षातील दायित्व वजा जाता शिल्लक राहणारी तरतूद :— रु. निरंक

३) तरतूदीच्या समायोजनासाठी अ' अंदाजपत्रक भाग—१

क ४ **(7)** 'नविन रस्ते सिमेंट कॉक्रिटीकरण करणे' मध्ये

उपलब्ध असलेली तरतूद :— रु.६१,५९,००,०००/—

४) वरील प्रमाणे समायोजन केल्यावर 'अ' अंदाजपत्रक

भाग—१ क ५ **(iii)** 'रस्ते दुरुस्ती या लेखाशिर्षात

उपलब्ध होणारी तरतूद :— रु. २,७६,२३,३१६/—

५) या कामावरील खर्च :— रु. २,७६,२३,३१६/—

६) शिल्लक तरतूद (अनु.क्र.३ मध्ये) :— रु.५८,८२,७६,६८४/—

वरील वाढीव कामाची फेरनिविदा मागविल्यास कामास विलंब होवून वेळेचा अपव्यय होणार आहे. सध्या उल्हासनगर महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक २०१७ ची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. त्यामुळे निवडणूकीची आचारसंहिता जाहिर होण्यापूर्वी करणे आवश्यक आहे. त्यामुळे वर्ष २०१६—१७ मध्ये शहरातील रस्त्यांवरील खड्डे भरण्याकरीता केलेल्या निविदाप्रक्रियेलाच ग्राहय धरुन प्रभाग क्षेत्र निहाय वरील तक्ता क्र.१ मध्ये नमुद असलेल्याच एजन्सीकडून त्यांनी भरलेल्या दराप्रमाणे सदर वाढीव काम करुन घेणेस तसेच सदर मुळ प्राकलनिय किंमत रुपये

३,३३,५१,४३१/— पेक्षा वाढीव व जादा खर्च रुपये ६,०९,७४,७४७/— एवढया खर्चाचे सुधारीत प्राकलनास मंजूरी मिळणेस तसेच लेखाशिर्षाअंतर्गत करावयाच्या समायोजनास स्थायी समितीकडून मान्यता मिळणेस प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. ११३ दिनांकः— २८/१२/२०१६

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— डॉ. निना नाथानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार वर्ष २०१६—१७ मध्ये उल्हासनगर शहरातील प्रभाग क्र. १ ते ४ अंतर्गत असलेल्या रस्त्यावरील खड्डेभरणेच्या कामाकरीता लेखाशिर्षाअंतर्गत समायोजन करुन प्राकलनिय किंमत रुपये ३,३३,५१,४३१/— पेक्षा वाढीव व जादा खर्च रुपये ६,०९,७४,७४७/— एवढया खर्चाचे सुधारीत प्राकलनास मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ७** :—सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत निविदा प्रक्रीया केलेल्या प्रभाग समिती १ येथे दलित वस्ती निधीतून विकास कामे करणेस मान्यता मिळणे.

---

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:— रू. अडीच कोटीमध्ये कोणता रस्ता आहे.

कनिष्ठ अभियंता (सार्व.बांधकाम विभाग), श्री. सितलानी:— यामध्ये रस्त्याचे काम नाही, दलितवस्तीमधील विकास कामे आहेत.

सभापती, श्री. सुनिल सुर्वे:— आपण जर सदस्यांना कामांची यादी दिली तर सदस्यांचे समाधान होईल कि, रू. अडीच कोटीमध्ये आपण कोणत्या ठिकाणी किती रक्कमेचे काय काम करणार हे सदस्यांना समजेल, प्रभाग समिती क्र. १ मध्ये काही कामे व प्रभाग समिती क्र. २, ३ व ४ मध्ये काही कामे करणार आहात का,

<u>**कनिष्ठ अभियंता (सार्व.बांधकाम विभाग), श्री. सितलानी:—**</u> प्रभाग समिती क्र. १ मध्ये रू. अडीच कोटीचे काम आहे व प्रभाग समिती क्र. २, ३ व ४ मध्ये एकत्र रू. अडीच कोटीचे काम आहे असे एकूण ५ कोटीचे दलित वस्तीमधील करावयाची कामे आहेत.

<u>**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—**</u> प्रभाग समितीनिहाय कामांची यादी दया ना, कुठलाही विषय असेल तर त्याची पुर्वतयारी पाहिजे.

<u>**कनिष्ठ अभियंता (सार्व.बांधकाम विभाग), श्री. सेवकानी:—**</u> साहेब, कामांची यादी आपल्याकडे तयार आहे पाहिजे असल्यास मी झेरॉक्स काढून देतो.

<u>**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:— :—**</u> सदर कामांचे आदेश ताबडतोब देण्यात यावेत.

<u>**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—**</u> सदर विषयाच्या ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता करण्यात यावी.

<u>**काही सदस्य :—**</u>पास—पास......

<u>**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—**</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑विषय क्र. ७ :— <u>आयत्यावेळचा विषय</u>

सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत निविदा प्रक्रीया केलेल्या प्रभाग समिती १ येथे दलित वस्ती निधीतून विकास कामे करणेस मान्यता मिळणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिका प्रभाग क्षेत्र क्र.१ मधील मंजुरी मिळालेल्या प्रभाग समिती १ येथे दलित वस्ती निधीतून विकास कामे करणे या कामांकरीता बी—१ प्रकारच्या दोन भाग (तांत्रिक व आर्थिक) पध्दतीने नोंदणीकृत ठेकेदारांकडून दिनांक ०९/११/२०१६ रोजी निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्राकलनीय खर्च | रु.२,४६,८१,७००/— |
| २ | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक ०९/११/२०१६ |

| | | |
|---|---|---|
| ३ | निविदा विक्री कालावधी | दिनांक ११/११/२०१६ ते १४/१२/२०१६ |
| ४ | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक १६/१२/२०१६ |
| (अ) | प्रथम मुदतवाढ | |
| ब) | द्वितीय मुदतवाढ | |
| क) | तृतीय मुदतवाढ | |
| ५ | तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | दिनांक २०/१२/२०१६ |
| ६ | आर्थिक भाग उघडण्याचा दिनांक | दिनांक २०/१२/२०१६ |
| ७ | विक्री केलेल्या निविदांची संख्या | २ |
| ८ | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | २ |

दिनांक २०/१२/२०१६ रोजी मा.अतिरिक्त आयुक्त, मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक, शहर अभियंता यांचे उपस्थितीत प्रभाग समिती १ येथे दलित वस्ती निधीतून विकास कामे करणे या कामाच्या निविदेचा तांत्रिक भाग उघडण्यात आला त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ. क्र. | निविदाकाराच्या निविदेमधील बाबी | मे. झा.पी.ॲण्ड कंपनी | मे. ए.एम. रामचंदानी |
|---|---|---|---|
| १ | निविदा प्रपत्रकाच्या खरेदीची रक्कम भरलेली आहे का? | होय | होय |
| २ | इसारा रक्कम भरलेली आहे का? | होय | होय |
| ३ | अद्यावत आयकर रिटर्न भरल्याची पावती | होय | होय |
| ४ | कामाचा अनुभव | होय | होय |
| ५ | पॅन कार्डाची प्रत | होय | होय |
| ६ | संस्था/कंपनी नोंदणी (भागिदारी, मालकी, कंपनी इत्यादीचे) दस्तऐवज | होय | होय |

सदर निविदांची सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये छानणी समिती मार्फत छाननी केली असता १) **मे. झा.पी.ॲण्ड कंपनी २) मे. ए.एम.रामचंदानी** यांच्या निविदा अटी शर्तीनुसार असल्याने पात्र आहेत. तरी उपरोक्त निविदाकारांच्या निविदांचा दुसरा भाग उघडण्यात प्रस्तावित करण्यात आले.

आज दिनांक २०/१२/२०१६ रोजी उपरोक्त निविदाकारांचा आर्थिक बाबींचा दुसरा भाग (आर्थिक दर) मा.अतिरिक्त आयुक्त सो., यांचे अध्यक्षतेखालील निवड समिती सदस्य मुख्य लेखाअधिकारी, मुख्य लेखापरिक्षक, शहर अभियंता, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे उपस्थितीत उघडण्यात आला. त्याप्रमाणे निविदाकांरानी दिलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| १) मे. झा.पी.ॲण्ड कंपनी | दिलेले दर १८.५४ टक्के कमी |
| २) मे. ए.एम.रामचंदानी | दिलेले दर १५.१८ टक्के कमी |

उपरोक्त प्रभाग समिती १ येथे दलित वस्ती निधीतून विकास कामे करणे या कामाचे निविदाकारांपैकी मे. झा.पी.ॲण्ड कंपनी यांनी दरसूची वर १८.५४ टक्के कमी (18.54% below) प्रमाणे दर दिले असुन त्याप्रमाणे मे. झा.पी.ॲण्ड कंपनी यांची सदर काम देणेकरिता शिफारस करण्यात येत आहे.

तरी **मे. झा.पी.ॲण्ड कंपनी** यांची दरसूचीपेक्षा १८.५४% कमी दराच्या निविदेस मा. स्थायी समितीची मान्यता मिळणेकरिता प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. ११४ — दिनांक:— २८/१२/२०१६

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत निविदा प्रक्रीया केलेल्या प्रभाग समिती १ येथे दलित वस्ती निधीतून विकास कामे करणेस **मे. झा.पी.ॲण्ड कंपनी** यांची दरसूचीपेक्षा १८.५४% कमी दराच्या निविदेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ८ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ८** :—सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत निविदा प्रक्रीया केलेल्या प्रभाग समिती २, ३ आणि ४

येथे दलित वस्ती निधीतून विकास कामे करणेस मान्यता मिळणे.

---

**महापालिका सचिव :—** सदरचा विषय पारीत करण्यात यावा का?

**काही सदस्य :—**पास—पास......

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** सदर विषयाच्या ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता करण्यात यावी.

**सभापती, श्री. सुनिल सुर्वे:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ विषय क्र. ८ :—आयत्यावेळचा विषय

सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत निविदा प्रक्रीया केलेल्या प्रभाग समिती २, ३ आणि ४ येथे दलित वस्ती निधीतून विकास कामे करणेस मान्यता मिळणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका प्रभाग क्षेत्र क्र.२ मधील मंजुरी मिळालेल्या प्रभाग समिती २, ३ आणि ४ येथे दलित वस्ती निधीतून विकास कामे करणे या कामांकरीता बी—१ प्रकारच्या दोन भाग (तांत्रिक व आर्थिक) पध्दतीने नोंदणीकृत ठेकेदारांकडून दिनांक ०९/११/२०१६ रोजी निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्राकलनीय खर्च | रु.२४६८१७००/— |
| २ | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक ०९/११/२०१६ |
| ३ | निविदा विक्री कालावधी | दिनांक ११/११/२०१६ ते २५/११/२०१६ |
| ४ | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक ०६/१२/२०१६ |
| (अ) | प्रथम मुदतवाढ | |
| ब) | द्वितीय मुदतवाढ | |
| क) | तृतीय मुदतवाढ | |
| ५ | तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | दिनांक ०९/१२/२०१६ |
| ६ | आर्थिक भाग उघडण्याचा दिनांक | दिनांक १३/१२/२०१६ |
| ७ | विक्री केलेल्या निविदांची संख्या | ३ |

| | | |
|---|---|---|
| ८ | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ३ |

दिनांक ०९/१२/२०१६ रोजी मा.अतिरिक्त आयुक्त, मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक, शहर अभियंता यांचे उपस्थितीत प्रभाग समिती २, ३ आणि ४ येथे दलित वस्ती निधीतून विकास कामे करणे या कामाच्या निविदेचा तांत्रिक भाग उघडण्यात आला त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ. क्र. | निविदाकाराच्या निविदेमधील बाबी | मे. व्ही.के. कन्स्ट्रक्शन | मे. झा.पी.ॲण्ड कंपनी | मे. ए.एम. रामचंदानी |
|---|---|---|---|---|
| १ | निविदा प्रपत्रकाच्या खरेदीची रक्कम भरलेली आहे का? | होय | होय | होय |
| २ | इसारा रक्कम भरलेली आहे का? | होय | होय | होय |
| ३ | अद्यावत आयकर रिटर्न भरल्याची पावती | होय | होय | होय |
| ४ | कामाचा अनुभव | होय | होय | होय |
| ५ | पॅन कार्डाची प्रत | होय | होय | होय |
| ६ | संस्था/कंपनी नोंदणी (भागिदारी, मालकी, कंपनी इत्यादीचे) दस्तऐवज | होय | होय | होय |

सदर निविदांची सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये छाननी समिती मार्फत छाननी केली असता १) **मे. व्ही.के. कन्स्ट्रक्शन २) मे. झा.पी.ॲण्ड कंपनी ३) मे. ए.एम.रामचंदानी** यांच्या निविदा अटी शर्तीनुसार असल्याने पात्र आहेत. तरी उपरोक्त निविदाकारांच्या निविदांचा दुसरा भाग उघडण्यात प्रस्तावित करण्यात आले.

आज दिनांक **२१/०९/२०१६** रोजी उपरोक्त निविदाकारांचा आर्थिक बाबींचा दुसरा भाग (आर्थिक दर) मा.अतिरिक्त आयुक्त सो., यांचे अध्यक्षतेखालील निवड समिती सदस्य मुख्य लेखाअधिकारी, मुख्य लेखापरिक्षक, शहर अभियंता, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे उपस्थितीत उघडण्यात आला. त्याप्रमाणे निविदाकांरानी दिलेले दर खालीलप्रमाणे आहेत

| | |
|---|---|
| १) **मे. व्ही.के. कन्स्ट्रक्शन** | दिलेले दर १६.०० टक्के कमी |
| २) मे. झा.पी.ॲण्ड कंपनी | दिलेले दर १५.०९ टक्के कमी |
| ३) मे. ए.एम.रामचंदानी | दिलेले दर १६.१० टक्के कमी |

उपरोक्त प्रभाग समिती २, ३ आणि ४ येथे दलित वस्ती निधीतून विकास कामे करणे या कामाचे निविदाकारांपैकी मे. ए.एम.रामचंदानी यांनी दरसूची वर १६.१० टक्के कमी (16.10% below) प्रमाणे दर दिले असुन त्याप्रमाणे मे. ए.एम.रामचंदानी यांची सदर काम देणेकरिता शिफारस करण्यात येत आहे.

तरी मे.ए.एम.रामचंदानी यांची दरसूचीपेक्षा १६.१०% कमी दराच्या निविदेस मा. स्थायी समितीकडून मान्यता मिळणेस्तव प्रस्तावित.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ११५</u> <u>दिनांकः— २८/१२/२०१६</u>

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— डॉ. निना नाथानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत निविदा प्रक्रीया केलेल्या प्रभाग समिती २, ३ आणि ४ येथे दलित वस्ती निधीतून विकास कामे करणेस मे.ए.एम.रामचंदानी यांची दरसूचीपेक्षा १६.१०% कमी दराच्या निविदेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची <u>सही/—</u>

अनुमोदकाची <u>सही/—</u>

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

सांयकाळी ५.३० वाजंता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती श्री. सुनिल सुर्वे यांनी जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी )
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

.